पं. दीनदयाळ उपाध्याय विचार दर्शन

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ...निबंध.....
सं. क्र. ३७०८

खंड पहिला

REFBK-0024899

भारतीय विचार साधना प्रकाशन, पुणे

पं. दीनदयाळ उपाध्याय विचार दर्शन

खंड पहिला

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ...नि१९५...
सं. क्र. ३७०८



REFBK-0024899

संदर्भ निबंध

३१४९
२४८९९
३१।३।८६

३१४९
२४८९९
३१।३।८६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचनाः—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५[८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

18 OCT 1987

18 NOV 1987

23 DEC 1987

(कृ. मा. पहा)
५०००-३-८४

पं. दीनदयाळ उपाध्याय : विचारदर्शन

खंड पहिला

अथातो तत्त्वजिज्ञासा
– द. बा. ठेंगडी

एकात्म मानव दर्शन
– वि. वा. नेने

दीनदयाळजींचा राजकीय वारसा
– भा. कृ. केळकर

एकात्म अर्थनीती
– श. अ. कुळकर्णी


REFBK-0024899

भारतीय विचार साधना प्रकाशन, पुणे

प्रकाशक :

ब. शं. दाते,

भारतीय विचार साधना,

१८४७ सदाशिव पेठ,

पुणे ४११ ०३०.

*

मूल्य रु. शंभर

*

महाशिवरात्र, शके १९०७

८ मार्च १९८६

*

मुद्रक :

अ. **चि. रायरीकर,**

स्वस्तिक मुद्रणालय,

४३९ शनवार पेठ,

पुणे ४११ ०३०.



मनोगत

'पंडित दीनदयाळ उपाध्याय : विचारदर्शन' वाचकांपुढे ठेवताना एक अत्यंत आवडीचे पण तितकेच जबाबदारीचे काम तडीस गेल्याचे समाधान वाटत आहे. सात-आठ वर्षांपासून हा विषय मनात घोळत होता. तथापि विवेकच्या संपादकीय जबाबदारीतून मुक्त झाल्यानंतरच या कामासाठी आवश्यक असलेली उसंत मिळू शकली. आणि आता हे विचारदर्शन ग्रंथरूपात वाचकांपुढे येत आहे.

या विषयावर लिहिण्याचा विचार प्रथम सुरू झाला तेव्हा त्याचे संकल्पित स्वरूप तुलनेने बरचसे मर्यादित व सोपे होते. पंडितजींचे प्रसिद्ध व अप्रसिद्ध लिखाण, भाषणे, पत्रकार परिषदांमधून आलेले विषय, निवेदने, चर्चाबैठकी व अभ्यासवर्गांतून चर्चिले गेलेले विषय आदी साहित्य निरनिराळ्या ठिकाणी शोध घेऊन एकत्र करावे आणि ते विषयवार संपादित करून परंतु कोणतीही टीकाटिप्पणी न करता जसेच्या तसे त्यांच्याच शब्दांत मांडावे अशी प्रारंभीची कल्पना होती. परंतु पुढे जसजसे साहित्य हाती येत गेले, विविध क्षेत्रांतील कार्यकर्त्या मित्रमंडळींशी व अधिकारी व्यक्तींशी चर्चा होत गेली तसतशी हळूहळू ही मूळ कल्पनाही नवा आकार घेत गेली. साहित्य संकलनाची आणि ते संपादित करून विषयवार मांडण्याची सुरुवातीची कल्पना कायम राहिली; परंतु हे साहित्य जसेच्या तसे न देता त्या त्या विषयाला आवश्यक असे विवेचन आणि काही तत्कालीन तसेच पूर्वकालीनही विचारप्रवाहांचे, घटनांचे संदर्भ यांची जोड द्यावी ही

कल्पना पक्की झाली. आणि आता त्याच स्वरूपात हे दर्शन वाचकांपुढे येत आहे.

विचारदर्शनाच्या स्वरूपासंबंधीची ही पार्श्वभूमी सांगत असतानाच तदनुषंगाने येणारा आणखी एक मुद्दाही स्पष्ट करणे उचित वाटते. तो मुद्दा असा की, हे दीनदयाळजींचे चरित्र नाही, किंवा 'समग्र दीनदयाळ-दर्शन' ही नाही. हे विचारदर्शन आहे. त्यातही पुन्हा पं. दीनदयाळजींनी निरनिराळ्या प्रसंगी मांडलेल्या यच्चयावत् विचारांचा या ग्रंथात समावेश आहे असे म्हणता येणार नाही. एवढे मात्र निश्चितपणे म्हणता येईल की दीनदयाळजींचे व्यक्तिमत्त्व, विचारधन आणि कार्यकर्तृत्व यांचा बोध पूर्णांशाने नाही तरी बऱ्याच अंशी होऊ शकेल एवढी खबरदारी साहित्याची निवड आणि मांडणी करताना घेण्यात आली आहे.

या एकूण उपक्रमामागची प्रेरणा कोणती ? दीनदयाळजींचे एक ज्येष्ठ सहकारी आणि संघाचे वरिष्ठ अधिकारी माननीय श्री. भाऊराव देवरस यांनी नेमका हाच प्रश्न त्यांच्या एका भेटीच्या वेळी मला विचारला होता. त्याचे थोडक्यात उत्तर पुढीलप्रमाणे सांगण्यात येईल. सध्या आपल्या देशासमोर – आणि साऱ्या जगासमोरही – ज्या अनेक जटिल समस्या निर्माण झाल्या आहेत त्यांची योग्य आणि स्थायी सोडवणूक करावयाची असेल तर दीनदयाळजींनी भारतीय संस्कृतीच्या मूल्यांवर अधिष्ठित असे जे कालोचित दर्शन 'एकात्म मानव दर्शना'च्या रूपाने आपल्यासमोर ठेवले आहे ते समजून घेणे, त्याचा अंगीकार करणे आणि ते प्रत्यक्षात आणणे हाच एकमेव मार्ग आहे. याची जाणीव अलीकडच्या विविध घडामोडी पाहून विशेषत्वाने होऊ लागली आहे. अर्थात् त्याबरोबरच हेही खरे की प्रदीर्घ चिंतन आणि तपश्चर्येतून विकसित झालेले हे परिपूर्ण दर्शन व त्याचे उद्‌गाते पं. दीनदयाळजी यांना एखाद्या कर्मदरिद्री माणसाप्रमाणे बाजूला सारून आपण बेगडी मुखवटचांच्या मागे धावत सुटलो आहोत या गोष्टीची मनस्वी चीड आणि व्यथाही हा उपक्रम हाती घेण्यामागे आहे.

हे अतिशय अवघड कार्य तडीस नेण्यास ज्या अनेकांचे सहकार्य लाभले

त्या सर्वांचा ऋणनिर्देश करावयाचा म्हटले तर ते खरोखरच अगदी असंभव आहे. तथापि काही नावांचा उल्लेख करणे अत्यावश्यक आहे. उदाहरणार्थ, दीनदयाळ शोध संस्थान, साप्ताहिक ऑर्गनायझर, पांचजन्य, विवेक, साधना (गुजराती) तसेच राष्ट्रधर्म मासिक यांच्या कार्यालयांतून खूप मोठ्या प्रमाणात साहित्य उपलब्ध झाले. त्यांचा हा सहयोग खूपच मोलाचा. या उपक्रमात सहभागी झालेल्या मान्यवर लेखकांच्या सहयोगासंबंधी तर लिहावे तेवढे अपुरेच आहे. निरनिराळ्या ठिकाणांहून जमविलेले त्या त्या विषयाचे जे साहित्य त्यांना सुपूर्द करण्यात आले, तेवढ्यावरच विसंबून न राहता त्या सर्वांनीच आपापल्या विषयाच्या लेखनासाठी आवश्यक असलेली पूरक माहिती आणि संदर्भ अथक परिश्रम घेऊन गोळा केले आणि आपापल्या विषयाला परिपूर्ण न्याय देण्याची पराकाष्ठा केली.

आणखी एक ऋणनिर्देशही तितकाच महत्त्वाचा. अशा प्रकारचा उपक्रम हाती घेतल्यावर ज्यांना हक्काने कोणतेही काम सांगावे आणि त्यांनी ते आत्मीयतेने व तत्परतेने करावे अशी धावपळ करणारी मंडळीही लागतात. सुदैवाने तीही मिळाली. श्री. माधव भांडारी, विनायक जोशी, सौ. सविता जोशी, अलका सावरकर, प्रा. नीलिमा देशपांडे, चंद्रवदन जोशी, श्री. बाळ ठाकूर चंचल स्मृतीमधील श्री. गोपाळराव महाडिक, विविध एंटरप्राइजेसचे श्री. जगन्नाथराव तळवलकर, गुजराती साधना साप्ताहिकाचे संपादक श्री. बचुभाई ठाकर यांची सुकन्या प्रज्ञा ठाकर आदींचा नामनिर्देश या संदर्भात अगत्याचा.

तसेच संदर्भ-सूची परिश्रमपूर्वक अल्पावधीत तयार करून दिल्याबद्दल पुण्याचे डॉ. मधुसूदन परशुराम पेठे यांचे मनःपूर्वक आभार.

भेटीगाठी, वाचन, चिंतन, लिखाण आदींसाठी तात्पुरते कार्यालय म्हणून मध्यवर्ती ठिकाणी जागेची विशेष आवश्यकता होती. भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यालयात सर्व सोयींनी युक्त जागा उपलब्ध झाली. या उपक्रमाच्या यशामध्ये ' चंचल स्मृती ' मधील लहान थोर सर्वांच्या प्रेमपूर्ण सहयोगाचा वाटा खूपच मोठा आहे.

जागेचाच विषय निघाला म्हणून आणखी एक उल्लेखही करावयास

हवा. सर्व लेखकांचे लिखाण पूर्ण झाल्यानंतर त्या लिखाणाचे सामूहिक वाचन व चर्चा पुण्याच्या कौशिक आश्रमात झाली. सुमारे सहासात दिवस सर्व मंडळी तेथे होती. या उपक्रमाच्या वाटचालीच्या इतिहासात ते सहा दिवस निःसंशय अविस्मरणीय आहेत.

माननीय श्री. दत्तोपंत ठेंगडी यांच्या लोभाविषयी काय आणि किती म्हणून लिहावे ? त्यांनी अगदी प्रारंभापासून हा प्रकल्प स्वतःचा मानला. अनेक कामे व अखंड प्रवास मागे असूनही या कामाला अग्रक्रम देऊन त्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन व सहाय्य तर केलेच, परंतु त्याचबरोबर या विचारदर्शनाला विस्तृत प्रस्तावनाही लिहून दिली. या प्रस्तावनेमुळे या विचारदर्शनाला एक भक्कम आणि साजेशी पार्श्वभूमी उपलब्ध झाली आहे, आणि त्याबरोबरच त्याच्या गुणवत्तेत आणि परिणामकारकतेत मोलाची भर पडली आहे.

शेवटचा आणि महत्त्वाचा ऋणनिर्देश भारतीय विचार साधनेचा. वरील सर्व मंडळींच्या सहकार्यातून आणि परिश्रमांतून हे विचारदर्शन लेखवार झाले हे खरे, परंतु ते नीटस स्वरूपात प्रकाशित करून वाचकांपर्यंत पोहोचविण्याची कामगिरी भारतीय विचार साधनेने केलेली आहे. असो. या सर्व मंडळींनी या उपक्रमासाठी आपापल्या परीने जे अथक परिश्रम केले, सहकार्य केले, ते स्वर्गस्थ दीनदयाळजींविषयी त्यांच्या मनात वसत असलेल्या आदरापोटी, त्यांच्या विचारांच्या संजीवक सामर्थ्याविषयी वाटत असलेल्या विश्वासापोटी होय, हे उघड आहे. या सर्वांच्या उत्स्फूर्त सहकार्यामुळेच हे दर्शन या स्वरूपात आपल्यासमोर येत आहे. माझ्यासंबंधी बोलायचे झाले, तर मी सर्वार्थाने निमित्तमात्र आहे.

– वि. वा. नेने

पं. दीनदयाळ उपाध्याय
विचारदर्शन



पं. दीनदयाळ उपाध्याय

अथातो तत्त्वजिज्ञासा

द. बा. ठेंगडी

श्री. दत्तात्रय बाळकृष्ण ठेंगडी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या तालमीतून आणि कै. श्रीगुरुजींच्या निकट सहवासातून जे गुणसमृद्ध नेतृत्व अनेक क्षेत्रांत निर्माण झाले त्यात श्री. दत्तात्रय बाळकृष्ण ठेंगडी यांचा प्रामुख्यानें उल्लेख करावा लागेल. कुशाग्र बुद्धीचे, व्यासंगी तत्त्वचिंतक, कुशल संघटक आणि राष्ट्रसमर्पित जीवनाचे ध्येयतपस्वी या शब्दांत त्यांचे वर्णन करता येईल. श्री. दत्तोपंत हे संघाचे आजीव प्रचारक. भारतीय मजूर संघ त्यांनी स्थापिला व त्याला भव्य आकारास आणले. विद्यार्थी परिषद, भारतीय किसान संघ, सहकार भारती अशा अनेक संघटनांचे काम त्यांनी केले. पण संघातील त्यांची सक्रीयता अबाधीत राहिली. आणि संघविचारांची त्यांची बैठक कधी ढळली नाही. संघाचे प्रचारक ही त्यांची भूमिका त्यांनी कायम राखली आहे. उदंड लौकिक लाभला असताही साधा स्वभाव आणि अतीव स्नेहभाव यामुळे ते सामान्य लोकांत प्रिय आहेत. दत्तोपंतानी संघटनात्मक कामाच्या दबडग्यातही तत्त्वग्राही लिखाण भरपूर केले आहे. पं. दीनदयाळजींप्रमाणेंच हिंदू जीवनदर्शनाचे समर्थ भाष्यकार या नात्याने मोठा अधिकार त्यांनी संपादन केला आहे. त्यांनी या ग्रंथाला चिंतनात्मक प्रबंधाची जी जोड दिली आहे, त्यावरून दत्तोपंतांच्या या अधिकाराचा प्रत्यय वाचकांना येऊ शकेल. या एकूण ग्रंथातील निरनिराळचा विभागांचे लेखन करताना त्या त्या लेखकांना दत्तोपंतांचे बहुमोल मार्गदर्शन झाले आहे. एवढे म्हटलें तरी पुरे. साठी ओलांडून पुढे गेल्यानंतरही त्यांची कार्यव्यापकता स्तिमित करणारी वाटते.



अथातो तत्त्वजिज्ञासा

दि. ११ फेब्रुवारी १९६८.

१ या दिवशी देशावर वज्राघात झाला.
पंडित दीनदयाळजींच्या हत्येच्या आकस्मिक वार्तेने सर्व देश शोकाकुल झाला. सर्व दिशांनी शोक-संवेदना प्रकट होऊ लागली.

राष्ट्रपती डॉ. झाकिर हुसेन उद्‌गारले, " मुझे श्री. दीनदयाळ उपाध्यायकी मृत्युकी खबर सुनकर गहरा आघात लगा । "

सर्व पक्षीय व अपक्ष पुढाऱ्यांनी त्यांना उत्स्फूर्त श्रद्धांजली समर्पण केली. उपराष्ट्रपती श्री. व्ही. व्ही गिरी, श्री. नीलम संजीव रेड्डी, श्री. मोरारजी देसाई, श्री. यशवंतराव चव्हाण, श्री. जयप्रकाश नारायण, श्री. हिरेन मुखर्जी, श्रीमती वायोलेट अल्वा, आचार्य व सौभाग्यवती कृपलानी, श्री. नानासाहेब गोरे, श्री. नाथ पै, श्री. एस्. एम् जोशी, श्री. मधू लिमये, श्री. प्रेम भसीन, श्री. राजाभाऊ खोब्रागडे, श्री. संत फत्तेसिंह, श्री. जगजीवनराम, श्री. स. का. पाटील, श्री. चक्रवर्ती राजगोपालाचार्य, बॅ. एन्. सी. चतर्जी, श्री. चरणसिंह, श्री. के. एम्. मुनशी, शेठ गोविंददास, बक्षी गुलाम महंमद, श्री. गुलाम महंमद सादिक, सरदार स्वर्णसिंग, श्री. लक्ष्मणसिंग गिल, श्री. हुमायून कबीर, श्री. फकरुद्दिन अलि अहंमद, श्री. ओम् प्रकाश त्यागी, श्री. रामगोपाल शालवाले, श्रीमती सिंधुताई फाटक, श्री. रघुवीरसिंह शास्त्री, श्री. रामचंद्र विकल, आदी पुढाऱ्यांनी पंडितजींना भावपूर्ण आदरांजली वाहिली.

सरकार्यवाह माननीय बाळासाहेब देवरस, माननीय लाला हंसराजजी गुप्ता, मा. माधवराव मुळे, मा. प्रकाशदत्तजी भार्गव, मा. बाबासाहेब घटाटे, मा. वसंतराव ओक, मा. ब्रह्मदेवजी, मा. सोहनसिंहजी आदी निकटस्थांनी, तसेच मा. भाऊराव देवरस.

बॅ. नरेंद्रजितसिंहजी व सौ. बुआजी आदी मंडळींनी त्यांना हार्दिक श्रद्धांजली समर्पण केली.

जनसंघ-कार्यकारिणीने श्रद्धांजली अर्पण करताना म्हटले, "थोडेही वर्षोंमें देशमें राजनैतिक जीवनमें जनसंघने जो प्रमुख स्थान प्राप्त किया है, उसका श्रेय यदि किसी एक व्यक्ति को है तो वह श्री. उपाध्याय है।"

पंडितजींचे उत्तराधिकारी श्री. अटलविहारी वाजपेयी म्हणाले,

"एक दीपक बुझ गया है और चारों ओर अंधःकार है। श्री. उपाध्याय दूरदृष्टीवाले और संपूर्ण देशका विचार करनेवाले थे। वे मौलिक विचारक, कुशल संघटनकर्ता और सबको साथ लेकर चलनेमें प्रवीण थे। जनसंघको बनाने का श्रेय उन्हीको है।"

प्रधान मंत्री इंदिरा गांधी म्हणाल्या, "श्री. उपाध्याय देशके राजनीतिक जीवनमें एक प्रमुख भूमिका अदा कर रहे थे। जनसंघ और कॉंग्रेसके बीच मतभेद चाहे जो हो मगर श्री. उपाध्याय सर्वाधिक सम्मानपात्र नेता थे और उन्होंने अपना जीवन देशकी एकता एवं संस्कृति को समर्पित कर दिया था।"

सरसंघचालक परमपूजनीय श्रीगुरुजी उद्‌गारले, "हे प्रभो!"

भारताच्या संसदेने – पंडितजी संसदसदस्य नसतानाही – त्यांना श्रद्धांजली वाहिली. पंडितजींचे मामेबंधू श्री. प्रभुदयालजी शुक्ल यांच्या शोकात सर्वच देशवासी सहभागी झाले.

भारताची राष्ट्रशक्तीच जणू आर्त हृदयाने म्हणत होती,

"बडे शौकसे सुन रहा था जमाना
तुमहि सो गये दास्तान कहते कहते"

२ पंडितजींनी संघात प्रवेश करण्यापूर्वीच्या त्यांच्या जीवनाविषयी विशेष माहिती उपलब्ध नाही. त्यांची प्रसिद्धि-पराङ्मुखता हेही या स्थितीचे एक कारण आहे. ते स्वतःविषयी बोलत नसत.

पंडितजींचा जन्म दि. २५ सप्टेंबर १९१६ (विक्रम संवत् १९७३, चैत्र), शालिवाहन शके १८३८, भाद्रपद–अश्विन कृष्ण १३, सोमवार या दिवशी जयपूर-अजमेर लाइनवरील धानकिया या गावी त्यांचे आजोबा (आईचे वडील) श्री. चुन्नीलालजी शुक्ल (धानकियाचे स्टेशन-मास्तर) यांचे घरी झाला. पंडितजींचे वडील श्री. भगवतिप्रसादजी मूळचे मथुरा जिल्ह्यातील नंगला चंद्रभानचे. मथुरेजवळील जलेसररोड स्टेशनवर स्टेशनमास्तर म्हणून ते काम करीत. पंडितजींच्या मातोश्रींचे नाव श्रीमती रामप्यारी असे होते. पंडितजींचे आजोबा (वडिलांचे वडील) पंडित हरीरामजी हे नाणावलेले ज्योतिषी होते. त्यांच्या मृत्यूमुळे आग्रा व मथुरा येथे हरताळ पाळण्यात आला होता.

पंडितजींच्या जन्मानंतर दोन वर्षांनी त्यांना आणखी भाऊ झाला. त्याचे नाव शिवदयाल असे ठेवण्यात आले. नंतर सहाच महिन्यांनी पंडित भगवतिप्रसादजी यांचा मृत्यू झाला. तेव्हा ते आईवरोबर श्री. चुनीलालजी शुक्ल यांचेकडे राहू लागले. पंडितजी साडेसहा वर्षांचे असताना त्यांची आईही इहलोक सोडून गेली. त्यानंतर त्यांचे पालन-पोषण त्यांचे मामा श्री. राधारमणजी शुक्ल यांनी केले. ते गंगापूर (राजस्थान) स्टेशनवर फ्रॉंटिअर मेलचे गार्ड होते. सन १९३४ च्या कार्तिक कृ. ११ ला धाकटा भाऊ शिवदयाल मृत्युमुखी पडला व पंडितजींचे जीवन एकाकी झाले. अर्थात् मातुलगृहातील सर्व मंडळींचा त्यांचेशी अत्यंत आत्मीयतेचाच व्यवहार होता. श्री. प्रभुदयाळ शुक्ल, स्वामेश्वरनाथ, ब्रह्मानंद, विनोदकुमार, विजयकुमार, अरुणकुमार या मंडळींची शेवट-पर्यंत पंडितजींशी जवळीक होती.

पंडितजींनी सिकरच्या कल्याण हायस्कूलमधून मॅट्रिकची परीक्षा दिली व अजमेर-बोर्डात पहिल्या वर्गात प्रथम क्रमांकाने ते उत्तीर्ण झाले. त्याबद्दल बोर्डाने व हायस्कूलने त्यांना सुवर्णपदके दिली. त्यानंतर दोन वर्षांनी पिलानीच्या बिर्ला कॉलेजमधून ते इंटरची परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. पुन्हा त्यांना दोन सुवर्णपदके मिळाली. – एक बोर्डाकडून व दुसरे कॉलेजकडून. कानपूरच्या एस्. डी. कॉलेजमधून त्यांनी बी. ए. ची परीक्षा (गणित) प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली. अलाहाबादहून ते बी. टी. झाले. मध्यंतरी शिक्षणाकरिता त्यांना थोडा काल गंगापूर, कोटा, आग्रा व रामगढ येथेही रहावे लागले. रामगढला त्यांचे चुलत मामा श्री. नारायण शुक्ल स्टेशन-मास्तर होते. विद्यार्थी-दशेतच मा. सुंदरसिंहजी भंडारींशी त्यांची मैत्री जमली होती. महाविद्यालयीन शिक्षणाच्या संपूर्ण कालात त्यांना स्कॉलरशिप मिळत होती.

सन १९३७ मध्ये त्यांचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंध आला. त्या वर्षीच्या मकरसंक्रमणाच्या उत्सवप्रसंगी वेदमूर्ती पंडित सातवळेकर यांचे हस्ते कानपूरच्या शाखेला ध्वज देण्यात आला. त्या शुभ मुहूर्तावर पंडितजींनी संघाची प्रतिज्ञा घेतली. त्यांच्या संघप्रवेशाचे श्रेय मुख्यतः माननीय भाऊराव देवरस यांना आहे. मा. बापुराव मोघे, भैयाजी सहस्रबुद्धे, नानाजी देशमुख, बापू जोशी ही मंडळी त्या वेळी संघकार्यानिमित्त उत्तरप्रदेशात वास्तव्य करीत होती. सन १९४२ मध्ये लखीमपूर जिल्हा-प्रचारक या नात्याने पंडितजींनी आपल्या प्रचारकी जीवनाला प्रारंभ केला. मा. पंडित शामनारायण मिश्र यांचेकडेच त्यांचे मुख्य वास्तव्य असे. त्या वेळी तेथील एका उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्यपद त्यांना देऊ करण्यात आले होते. परंतु त्या पदाचा स्वीकार करणे संघप्रचारकाच्या भूमिकेत बसत नसल्यामुळे ते त्यांनी नाकारले. सन १९४७ मध्ये उत्तर-प्रदेशचे सहप्रांतप्रचारक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. या काळात उत्तरप्रदेशातील सर्वच संघ-कार्यकर्त्यांना त्यांचा निकट सहवास लाभला.

श्री. रामनाथ भल्ला, सत्यव्रत सिन्हा, मा. राजेंद्रसिंह, मा. वीरेन भाई, डॉ. कृष्ण विहारी, जुगादे बंधू, करंजकर बंधू, कृष्णदत्त शर्मा, गोपालकृष्ण कलंत्री, कुंजविहारीलाल

राठी, रजनिकांत लहिरी, राध्येश्याम कपूर, डॉ. पी. के. बॅनर्जी, मा. देवळे, सर्वश्री गोपाळराव कालिया, जयगोपालजी, अनंतराव गोखले, पंडित श्योवरणसिंह, सतीश सक्सेना, मधुसूदन बापट, विजय मुंजे, मनोहर आठवले, राजाभाऊ सावरगावकर व ग्वाल्हेरचे डॉ. गुणे आदी कार्यकर्त्यांना त्यांचे सहकारी म्हणून काम करण्याचे भाग्य लाभले.

सन १९४७ मध्ये 'राष्ट्रधर्म-प्रकाशना'ची स्थापना झाली. त्याच्यामार्फत राष्ट्रधर्म मासिक, पांचजन्य साप्ताहिक व स्वदेश दैनिक प्रकाशित होत असे. पंडितजी शेवटच्या दोन पत्रांचे संपादक म्हणून काम करीत असत. प्रकाशनाचे मॅनेजिंग डायरेक्टर या नात्याने मा. नानाजी देशमुख काम बघत. संपादनाचे कार्य अनुक्रमे सर्वश्री महावीरप्रसाद त्रिपाठी, राजीवलोचन अग्निहोत्री, अटलबिहारी बाजपेयी, महेंद्र कुलश्रेष्ठ, गिरिशचंद्र मिश्र, तिलकसिंह परमार, यादवराव देशमूख व वचनेश त्रिपाठी यांनी सांभाळले. या शिवाय मनमोहन गुप्त, ज्वालाप्रसाद चतुर्वेदी (प्रबंधक), राधेशाम कपूर (प्रकाशक), पावगी – बजरंगशरण तिवारी (प्रेस-व्यवस्थापक), हे कार्यकर्तेही राष्ट्रधर्म-कुटुंबात होते. या कुटुंबाचे वत्सल कर्तेपण दीनदयाळजींकडेच होते.

ॲडव्होकेट राजकुमार (लखनौ), यांच्या अध्यक्षतेखाली उत्तरप्रदेशात जनसंघाची स्थापना झाली. त्या वेळी दीनदयाळजींकडे प्रदेश-जनसंघाचे काम सोपविण्यात आले. तत्पूर्वी दि. ५ मे १९५१ ला डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींच्या नेतृत्वाखाली कलकत्त्याला पीपल्स पार्टीची स्थापना झाली. दि. २७ मे १९५१ ला जालंदर येथे प्रादेशिक-स्तरावर भारतीय जनसंघ स्थापन करण्यात आला. दि. ८ सप्टेंबर १९५१ ला विविध प्रांतांतील प्रमुख कार्यकर्त्यांची दिल्लीला प्राथमिक बैठक झाली व अखिल भारतीय पक्षाच्या स्थापनेचा विचार झाला. दि. २० ते २२ ऑक्टोबरला दिल्ली येथे अखिल भारतीय संमेलन आयोजित करण्यात आले. त्याचे उद्घाटत राधोमल आर्य हायर सेकंडरी स्कूलच्या प्रांगणात झाले. दि. २१ आक्टोबरला भारतीय जनसंघाच्या स्थापनेची अधिकृत घोषणा करण्यात आली. जनसंघाचे पहिले अखिल भारतीय अधिवेशन कानपूर येथे डिसेंबर १९५२ मध्ये झाले. त्या प्रसंगी जनसंघाचे अखिल भारतीय महामंत्री म्हणून दीनदयाळजींचे नाव घोषित करण्यात आले.

राजकीय क्षेत्रात शिरण्यापूर्वी राजकीय प्रश्नांविषयी पंडितजींची मनःस्थिती कशी होती हे समजून घेणे आवश्यक आहे. राजकारण व राजकीय पक्ष यांविषयीची संघाची भूमिका प. पू. श्रीगुरुजींच्या त्या काळातील भाषणांतून स्पष्ट झालेली आहे. ही भाषण-माला पुढे 'ध्येयदर्शन' या पुस्तिकेच्या रूपाने प्रकाशित झाली आहे. त्यातून संघाच्या सर्वसाधारण भूमिकेचा बोध होतो. व्यक्तिशः पंडितजींच्या मनात या विषयासंबंधी कोणते विचार त्या काळात होते हे समजून घेणेही उपयुक्त होईल. त्या दृष्टीने पुढील लेख मुळातूनच वाचणे चांगले, इतकेच लिहिणे सध्या पुरेसे होईल.

पं. दीनदयाळजींचे लेख २००४ – २००६ (१९४७–४९)

राष्ट्रधर्म

इतिहास १) भारतीय राष्ट्रधारा का पुण्यप्रवाह (बुद्ध से शंकराचार्य तक) : वर्ष – १ – अंक १, श्रावणी पूर्णिमा, विक्रम सं. २००४.

२) भगवान् कृष्ण : वर्ष – १ अंक २, भाद्रपदी पूर्णिमा २००४.

संस्कृती ३) चिती : वर्ष – १ – अंक ३ – ४, कार्तिक पूर्णिमा २००४.

राजनीती ४) राष्ट्रजीवन की समस्याएँ : अंक ९, शरद पूर्णिमा, २००६.

५) भारतीय राजनीति की मौलिक भूलें : अंक ११ मार्गशीर्ष पूर्णिमा, २००६.

पांचजन्य – वर्ष १ – जानेवारी १९४८ ते डिसेम्बर १९४८.

इतिहास-दृष्टी १) लोकमान्य तिलक की राजनीति : स्वतंत्र भारत में लोकमान्य की प्रथम जयंती के अवसर पर. श्रावण कृष्ण ८, २००५.

व्यंगात्मक ललित निबंध २) १४४ (धारा १४४ के इतिहास व उपयोगपर व्यंग.) आषाढ शुक्ल ७, २००५.

पांचजन्य – ३) राजनैतिक आय-व्यय : भाद्रपद शुक्ल १०, २००५. जुलाई १९४९ से जुलाई १९५०.

सांस्कृतिक १) जीवन का ध्येय राष्ट्रीय आत्मानुभूति : भाद्रपद कृष्ण ९, २००६.

२) विजयादशमी (सहिष्णुता के समानही जयिष्णुता की आवश्यकता) : विजयादशमी विशेषांक, २००६.

राजनीति ३) भारतीय संविधान पर एक दृष्टी (कठोर एवं बृहद् संविधान के निर्माण के बजाय संविधानिक विकास प्रक्रिया प्रारम्भ करने का आग्रह) मार्गशीर्ष शुक्ल ४, २००६.

याच कालखंडात दीनदयाळजींच्या दोन साहित्यिक कृती प्रकाशित झाल्या. १) जगद्गुरु शंकाराचार्य. २) सम्राट् चंद्रगुप्त.

राजकारणात प्रवेश करण्यापूर्वी पंडितजींचे विचार कोणत्या दिशेने चाललेले होते याची बरीचशी कल्पना या साहित्यावरून येऊ शकते. *

वास्तविक पंडितजींचा पिंड संघ-प्रचारकाचाच होता. संघकार्याच्या प्राथमिक अवस्थेत नवीन ठिकाणी कार्याचा प्रारंभ करताना किती अडचणींना तोंड द्यावे लागत असे याची

---

* परिशिष्ट क्र. १ पहा.

कल्पना आज येऊ शकत नाही. आज हे सांगितले तर आश्चर्य वाटेल की, गोलाकोकर्णनाथच्या लोकांनी त्यांना भडभुंजाच्या दुकानातून फुटाणे विकत घेऊन त्यावर दिवस-दिवस निर्वाह करताना पाहिले आहे, तर महंमदीच्या लोकांनी त्यांना दुकानाच्या बाहेरच्या पटरीवर झोपून रात्र व्यतित करताना पाहिले आहे. स्टेशनवरून गावात नेण्याकरिता टांगेवाला दोन पैसे अधिक मागत होता, ते वाचविण्याकरता भर पावसात भिजत चाललेल्या पंडितजींना हरदोईच्या लोकांनी पाहिले आहे. बाह्य परिस्थितीची प्रतिकूलता हा एक भाग होताच; पण त्याचबरोबर स्वतः पंडितजींची अनासक्त कर्मयोगी वृत्ती हीही महत्त्वाची बाब होती. पुढे आयुष्यात अनुकूलता प्राप्त झाल्यानंतरही त्यांनी तिचा लाभ घेतला नाही. स्वतःचे कपडे ते स्वतः धूत असत. आपल्या फाटलेल्या कपड्यांची शिलाई ते स्वतःच करीत. कोणतेही वस्त्र किंवा पादत्राण अती जीर्ण-शीर्ण झाल्याशिवाय ते बदलत नसत. स्वदेशीचा आग्रह त्यांनी प्रत्यक्ष व्यवहारात उतरविला होता. सार्वजनिक पैशाचा उपयोग विश्वस्ता-प्रमाणे किती काटकसरीने करावयाचा असतो, याचे आदर्श उदाहरण त्यांनी स्वतःच्या व्यवहाराने प्रस्तुत केले होते. अगदी हलकीसलकी कामेही ते तितक्याच उत्साहाने करीत.

सर्व बारीकसारीक गोष्टी ते कटाक्षाने सतत पाळू शकत होते; नव्हे, तो त्यांचा स्वभावच झाला होता. कारण बाह्यतः ते लौकिक व्यवहारात मग्न दिसले तरी त्यांचे खरे लक्ष 'ज्ञानोत्तर भक्तिपूर्वक कर्मयोग' हेच होते. परंतु दैनंदिन व्यवहार चारचौघां-सारखाच असे. त्यामुळे त्यांच्या खऱ्या थोरवीची कल्पना जवळच्या मंडळींना येत नसे.

राष्ट्रधर्माचे काम* पहात असताना त्यांनी कित्येकदा कंपोझिंगचे, बाईंडिंगचे व डिस्पॅचिंगचेही काम स्वतः केले होते. निष्काम कर्मयोग ही त्यांची सहज प्रवृत्ती होती

"सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ।
ततो युद्धाय युज्यस्व....."

हा त्यांचा स्वभावच होता. अहंकार, व्यक्तिगत आकांक्षा अशा क्षुद्र भावनांचा स्पर्शही त्यांच्या ध्येयनिष्ठ मनाला होत नव्हता. आदेशाप्रमाणे त्यांनी राजकीय क्षेत्रात प्रवेश केला परंतु त्यांची वृत्ती होती –

दुनियामें है दुनियाके तलबगार नहीं।
बाजारसे निकले है खरीददार नहीं।

अशी निर्लेप. **

सक्रिय राजकारणात असूनही पंडितजींची मनःस्थिती 'पद्मपत्रमिवांभसा' अशी होती. परमपूजनीय श्रीगुरुजी आपल्या जोनपूरच्या भाषणात म्हणतात,

---

* परिशिष्ट क्र. २ पहा.

** हे स्पष्ट आहे की, ते थुसिडिडस किंवा मॅकिअॅव्हेली यांच्या गोत्रातील नव्हते.

" दीनदयालजीका राजनीतिक क्षेत्रकी ओर कतई झुकाव नहीं था। पिछले वर्षोंमें कितनीही बार मुझसे उन्होंने कहा, ' किस झमेले में मुझे डाल दिया ? मुझे फिरसे अपना प्रचारकका काम करने दे। ' मैंने कहा, ' भाई, तुम्हारे सिवा इस झमेलेमें किसको डाले ? संघटनके कार्यपर जिसके मनमें इतनी अविचल श्रद्धा और दृढनिष्ठा है वही उस झमेलेमें रहकर किचडमें भी अस्पृश्य रहता हुआ सुचारु रुपसे वहाँकी सफाई कर सकेगा, दूसरा कोई नहीं कर सकेगा। " (यामुळेच परमपूजनीय बाळासाहेब म्हणाले होते, " श्री. दीनदयाळजीको देखकर मुझे किसी अन्यकी नहीं, अपितु संघके संस्थापक डॉ. हेडगेवारजीकी स्मृति हो आती है। ")

राजकारणाविषयी इतका उबग असूनही एकदा ते कार्य दिले गेल्यानंतर पंडितजींनी ते इतक्या सुव्यवस्थित रीतीने, शास्त्रीय पद्धतीने, पूर्ण मन लावून व सर्व शक्ती पणाला लावून केले की, त्यामुळे ' योग: कर्मसु कौशलम् ' या उक्तीचा व्यावहारिक अर्थ कोणाच्याही ध्यानात यावा. आपल्या JANA SANGH (जनसंघ) या प्रबंधांत ग्रेग बॅक्स्टर म्हणतात :

" It (i. e. Jana Sangh) is the only party that has increased its percentage of the popular vote as well as its share of Parliamentary and Assembly seats in each successive election from 1952 through 1967 "

' The Jana Sangh : Idealogy and Organisation in Party Behaviour ' या आपल्या प्रदीर्घ प्रबंधात Walter K. Andersen म्हणतात, "Upadhyaya's assumption of the Presidency in 1967 signified that the basic organising phase of the Party was completed and it now intended to become a serious competitor for power on the national level. "

[तो (म्हणजे जनसंघ) असा एकच पक्ष आहे की ज्याने १९५२ पासून १९६७ पर्यंतच्या प्रत्येक निवडणुकीत आपल्याला मिळणाऱ्या मतांची टक्केवारी व जिंकलेल्या लोकसभेतील आणि विधानसभांतील जागा यांचे प्रमाण एकसारखे वाढवले आहे.

वॉल्टर के. अँडरसन : – " उपाध्याय १९६७ साली अध्यक्षपदी आरूढ झाले याचा अर्थच हा की, पक्षाची संघटनात्मक पायाभरणी करण्याचे काम पूर्ण झाले आहे आणि राष्ट्रीय पातळीवरील एक प्रबळ स्पर्धक या नात्याने सत्तास्पर्धेत उतरायचा त्याचा मनोदय आहे. "]

शून्यांतून सृष्टीची निर्मिती व्हावी अशातलाच हा प्रकार होता.

अखिल भारतीय स्तरावरील जबाबदारी त्यांचेकडे आल्यानंतर त्यांच्या व्यावहारिक अनुभवाचे व घनिष्ठ वैयक्तिक संबंधाचे क्षेत्र अधिकाधिक विस्तृत होत गेले. जनसंघाच्या प्रारंभिक अवस्थेत सर्वश्री डॉ. मुखर्जी, डॉ. भाई महावीर, बलराज मधोक, महाशय कृष्ण, भल्ला बंधू, गुरुदत्त वैद्य, मौलिचंद्र शर्मा, उमाशंकर त्रिवेदी, वसंतराव ओक आदी

मंडळींच्याबरोबर काम करण्याचा त्यांना योग आला. सर्वश्री बापुसाहेब सोहनी, प्रेमनाथजी डोग्रा, डॉ. रघुवीर, देवप्रसाद घोष, पीतांबरदास, ए. रामाराव, वच्छराज व्यास या सर्वांच्या अध्यक्षीय कारकीर्दीत सूत्रसंचालनाचे कार्य पंडितजींचेच हाती असे. जनसंघ कार्यालय-प्रमुख श्री. जगदीश माथुर तर त्यांचे अनुचरच होते. जनसंघाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते व त्यांतही विशेषतः सर्व संघटनमंत्री यांना त्यांच्या सहवासाचा लाभ होत असे. रा. स्व. संघापासून संस्कार व प्रेरणा ग्रहण करून राष्ट्रजीवनाच्या विभिन्न क्षेत्रांत कार्य करणारे स्वयंसेवक नेहमीच त्यांच्या मार्गदर्शनाची इच्छा ठेवीत व तेही ही सर्व कार्ये आपलीच पारिवारिक आहेत असे समजत. (अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे पहिले अध्यक्ष व महामंत्री श्री. ओमप्रकाश बहेल व श्री. वेदप्रकाश नंदा यांचेशी तर त्यांचा संबंध जुनाच होता.) पंडितजींचे मुख्य कार्यालय अर्थातच दिल्लीला असे. आज राजकीय क्षेत्रात नसलेले जगदीशजी अग्रवाल तसेच श्री. चमनलालजी आदी कार्यकर्तेही त्या वेळी पंडितजींच्या निकट सहवासात असत. तेथील वास्तव्यात ऑर्गनायझरच्या कार्यालयाला ते अवश्य भेट देत व सर्वश्री के. आर्. मलकानी, एल्. के. अडवानी व सुधाकर राजे यांचेशी विचारांची देवाण–घेवाण करीत. अशीच देवाण–घेवाण देशभर पत्रकारितेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या भिन्नभिन्न भाषांच्या सर्व समविचारी बंधूंशी ते अगत्यपूर्वक करीत. हिंदुस्थान समाचारचे संस्थापक श्री. दादासाहेब आपटे, श्री. बापुराव लेले व श्री. बालेश्वर अग्रवाल अशा मंडळींत प्रमुख होते.

संघक्षेत्रात त्यांचा सर्वच स्तरांवरील कार्यकर्त्यांशी कमीअधिक संबंध येत असे. संघाच्या बैठकांत त्यांचे उल्लेखनीय योगदान असे. मा. एकनाथजी रानडे यांच्या मार्गदर्शनाखाली संघाची घटना लिपिबद्ध करण्याचे कामी त्यांचा प्रमुख सहभाग होता व या कामात मा. दादासाहेब आपटे, मा. राजपाल पुरी यांचे त्यांना विशेष सहाय मिळत होते. मा. बाबासाहेब आपटे व पंडितजी यांची बैठक म्हणजे 'समसमासंयोगा'चा नमुना. सरकार्यवाह, सहसरकार्यवाहपदाची जबाबदारी सांभाळणाऱ्या सर्वच अधिकाऱ्यांशी त्यांचे घनिष्ठ संबंध असत. मा. मल्हारराव काळे, मा. आप्पाजी जोशी. मा. भय्याजी दाणी, मा. एकनाथजी रानडे व मा. माधवराव मुळे या श्रेणीत येतात. तीच गोष्ट मा. यादवराव जोशी इत्यादी संघाच्या अन्यान्य पदाधिकाऱ्यांचे, तसेच सरसंघचालकांचे खाजगी सचिव डॉ. आबासाहेब थत्ते व केंद्र-कार्यालय-प्रमुख श्री. पांडुरंगपंत क्षीरसागर यांचे बाबतीत होती.

संघावरील पहिली बंदी उठल्यानंतरच्या महत्त्वपूर्ण कालखंडात अन्यक्षेत्रीय कार्यकर्त्यांचा परमपूजनीय बाळासाहेब देवरस यांचेशी विशेष संबंध येत असे. हे खरे की, स्वयंसेवकांचे द्वारा संचालित सर्व संस्था स्वायत्त आहेत. कोणत्याही संस्थेला संघ आपली फ्रंट ऑर्गनायझेशन (विशिष्ट क्षेत्रातील आघाडी) वा ट्रॅन्स्मिशन बेल्ट (संक्रमण-साधन) मानीत नाही. तथापि ज्याप्रमाणे व्यक्तिगत जीवनात त्याचप्रमाणे सार्वजनिक जीवनातही योग्य ठिकाणावरून मार्गदर्शन प्राप्त व्हावे अशी इच्छा कार्यकर्त्यांच्या मनात असतेच. त्याला अनुसरून ज्येष्ठ व्यावहारिक मार्गदर्शक या नात्याने प. पू. बाळासाहेबांकडे कार्यकर्ते

बघत असत. आपल्या क्षेत्राच्या नवीन जडण-घडणीच्या बाबतीत पंडितजीही त्यांचेशी वारंवार सल्लामसलत करीत.

पंडितजींचा सर्वांत महत्त्वाचा, जिव्हाळ्याचा व अलौकिक संबंध अर्थात् सरसंघचालक प. पू. श्रीगुरुजींशी होता.

प. पू. श्रीगुरुजी व श्री. दीनदयाळजी यांच्या संबंधांचे वर्णन शब्दांनी करणे कठीण आहे. स्वयंसेवक, प्रचारक व कार्यकर्ता या नात्याने दीनदयाळजींपासून गुरुजींच्या विशेष अपेक्षा होत्या, हे सर्वच निकटवर्तीयांच्या ध्यानात येत होते. दोघांचीही 'वेव्ह लेंग्थ' एक होती. कोणत्याही घटनेवर श्रीगुरुजींची प्रतिक्रिया काय असेल याची अचूक कल्पना दीनदयाळजी करू शकत असत. स्वयंसेवकांचेद्वारा संचालित संस्थांवर कम्युनिस्ट पक्षाप्रमाणे नियंत्रण ठेवण्याची कल्पना संघाची नाही. वर म्हटल्याप्रमाणे अशी कोणतीही संस्था संघाची फ्रंट ऑर्गनायझेशन किंवा ट्रॅन्स्मिशन बेल्ट नाही. संघाच्या विंग्ज म्हणजे संघाचे स्वयंसेवक. संघाचा संबंध स्वयंसेवकांशी आहे. त्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रांत कार्याची रचना व विचारांचा विकास संघाच्या आदर्शांच्या प्रकाशात करावा, अशी अपेक्षा आहे. परंतु कम्युनिस्ट पक्षाप्रमाणे विभिन्न क्षेत्रांतील आपल्या कार्यकर्त्यांच्या गतिविधींवर नियंत्रण ठेवण्याची कल्पना संघाच्या योजनेत बसत नाही. अर्थात् संघालाही ही आशा व हा विश्वास आहे की, आपले स्वयंसेवक सर्व काही योग्य पद्धतीनेच करतील. श्रीगुरुजी व पं. दीनदयाळजी यांच्या वैचारिक सामरस्यामुळे ही अपेक्षा जनसंघाच्या बाबतीत पूर्ण होत गेली.

स्वराज्यप्राप्तीनंतर नवनिर्मितीचा कालखंड आला. देशाच्या विभाजनामुळे निर्माण झालेले प्रश्न, विस्थापितांच्या पुनर्वसनाची समस्या, जम्मू-काश्मीरवरील पाकचे आक्रमण, पं. नेहरूंचे अब्दुल्ला-प्रेम, शेख अब्दुल्लांची महत्त्वाकांक्षा व त्यांना खतपाणी घालणारे भारताच्या घटनेतील ३७० वे कलम, पंडित नेहरूंची युनोकडे धाव व आझाद काश्मीरचे भिजतघोंगडे, पूर्व पाकिस्तानचे हिंदूविरोधी धोरण, नेहरू सरकारचे पाक अनुनयाचे धोरण व तदनुषंगाने पाकिस्तानशी विभिन्न करार, पोर्तुगाल व फ्रान्सद्वारा शासित प्रदेशांविषयीचे धोरण आदी गोष्टी सर्वच देशभक्तांना सचिंत करणाऱ्या होत्या. स्वदेश, स्वधर्म, स्वातंत्र्य यांकरता करावा लागणारा संघर्ष संपलेला नाही हे स्पष्ट दिसत होते. देशाच्या रक्षणाच्या प्रश्नाला अग्रक्रम देऊन या विषयांवर जनजागृती करण्याचे, लष्करी शिक्षण अनिवार्य करण्याचे, शस्त्रधारणेचा अधिकार सर्व नागरिकांना देण्याचे आणि सैनिकांच्या व निवृत्त सैनिकांच्या कल्याणाची विशेष काळजी घेण्याचे धोरण स्वीकारण्याची काँग्रेस-सरकारची तयारी नाही, हे उघड झाले होते. पाकिस्तानच्या निर्मितीनंतरही उर्वरित भारतात काँग्रेसने, मतांच्या मोहाने मुसलमानांचे लाड चालूच ठेवले होते. मतांच्या लालसेने हिंदू समाज विघटित करून त्याचे अंगभूत असलेल्या शीख, बौद्ध, जैन, लिंगायत आदींच्या मनांत पृथकत्वाची भावना भडकवण्याचा प्रयत्नही चालूच होता. विदेशी मिशनऱ्यांच्या देशघातकी कारवायांकडेही सरकार जाणूनबुजून कानाडोळा करीत होते. (त्यामुळेच पुढे नियोगी-कमिटीच्या व रेगे-कमिटीच्या या विषयांवरील शिफारशींची उपेक्षा करण्यात आली.)

अशाच कारणाकरता संपूर्ण गोवंशहत्यानिरोधाची हिंदूंची मागणी सरकार धुडकावून लावीत होते. धर्मांतर म्हणजे राष्ट्रांतर नव्हे, आपली उपासना-पद्धती कायम ठेवूनही भारताच्या संस्कृतीशी इंडोनेशियाच्या मुसलमानांप्रमाणे एकात्म होता येते, हे त्यांना सांगण्याला काँग्रेस तयार नव्हती. प्रवासी भारतीयांच्या भवितव्याविषयी सरकार उदासीन होते आणि त्यामुळे दक्षिण अफ्रिका, श्रीलंका, वर्मा, मलाया, मॉरिशस आणि फिजीमध्ये स्थायिक झालेल्या भारतीयांना पूर्ण नागरिक-अधिकार प्राप्त करून देण्याची व उपर्युक्त देशांशी, तसेच सुरिनाम, ग्वायना, त्रिनिदाद आदी देशांशी विशेष संबंध प्रस्थापित करण्याची जबाबदारी भारतसरकार टाळीत होते. स्वतःच्या उदार मनाची प्रतिमा उभी करून सहजासहजी विश्वनेतृत्व प्राप्त करण्याच्या इच्छेमुळे पं. नेहरू देशहिताला प्रतिकूल असे परराष्ट्रीय धोरण विकसित करीत होते. नेपाळसारख्या राष्ट्राची उपेक्षा; शेजारच्या राष्ट्राशी चांगले संबंध ठेवण्याविषयी उदासीनता; डॉ. मुखर्जी, डॉ. आंबेडकर व श्रीगुरुजी यांच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष करून चीनच्या तिबेटवरील आक्रमणाकडे केलेली डोळेझाक, कोलंबो ठरावाचे स्वागत, बेरुबारीचे हस्तांतरण, कच्छ, गोवा, चीन आणि पाकद्वारा व्याप्त भारतीय प्रदेश; आसाममधील पाकिस्तानी घुसखोरी व नागा बंडखोरी यांविषयी स्वीकारलेली उदार (?) वृत्ती, (पुढे याच वृत्तीची परिणती ताश्कंद-करारात झाली.) मोहन रानडे व डॉ. मस्कारिनस यांच्या भवितव्याविषयी बेजबाबदार उदासीनता; भारताच्या सरहद्दीवरील चीनच्या सैनिकी सिद्धतेकडे दुर्लक्ष करून 'हिंदी चिनी भाई भाई' ही दिलेली घोषणा; ब्रिटिश कॉमनवेल्थविषयीचा स्वाभिमानशून्य निर्णय व दुर्बल राष्ट्राच्या घोषित अलिप्तता-वादाचे वैय्यर्थ्य न जाणण्याइतका स्वप्नाळूपणा – या सर्व गोष्टी म्हणजे पं. नेहरूंच्या विश्वनेतृत्वाच्या शेखमहंमदी इच्छेचीच कटू फळे होत. यामुळेच श्री. महावीर त्यागींनी पं. नेहरूंच्या उपस्थितीत त्यांच्या धोरणाचे वर्णन पुढील शब्दांत केले :–

> " अपनोंसे बैर कर लिया, गैरोंसे दोस्ती
> अपनोंके सर कटा दिये, सरदार बन गये ॥ "

विदेशी भांडवलाविषयीही असेच बोटचेपे धोरण सरकारने स्वीकारले होते. या सर्व सामयिक बाबींवर श्रीगुरुजी व दीनदयाळजी यांची प्रतिक्रिया एकसमान होती, हे सहज ध्यानात येण्यासारखे आहे. परंतु त्याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे ' परं वैभवं नेतुमेतत् स्वराष्ट्रम् ' हे ध्येय, अखंड भारताविषयीचा निर्धार, ' तमसो मा ज्योतिर्गमय ' हे ब्रीदवाक्य, पक्षाच्या ध्वजाचा सूचक रंग, * भारताच्या राष्ट्रीयत्वाचे (एक, देश, एक जन, एक संस्कृती, एक राष्ट्र) स्वरूप, भारतात सर्वधर्म-समादराची स्वाभाविकता, भारताच्या घटनेचे स्वरूप, धर्मराज्याची ** (The rule of Law) स्वागतार्हता, राष्ट्रीय स्वयंपूर्णता व भारतीयीकरणाचा आग्रह या मौलिक मान्यतांचे दोघेही कट्टर प्रवर्तक होते.

---

* भगव्या ध्वजाविषयी पंडितजी म्हणत, " यही ध्वज हमे अपने अतीत का यथार्थ ज्ञान, भविष्य की उत्तम प्रेरणा तथा वर्तमान की स्वयंस्फूर्त कर्म-चेतना प्रदान कर सकता है । "

** परिशिष्ट क्र. ३ पहा.

राजकारणाचे उद्दिष्ट कोणते याविषयीही दोघांचे एक मत होते. बेंथॅमप्रमाणे, " The greatest happiness of the greatest number " हे त्यांच्या राजकीय कार्याचे ध्येय नव्हते; कारण ते ' सर्वभूतहिते रताः " या परंपरेतले होते. बार्हस्पत्य सूत्रात म्हटले आहे त्याप्रमाणे, " नीतेः फलं धर्मार्थकामावाप्ति " राजनीतीचे उद्दिष्ट, धर्म, अर्थ व काम यांची सिद्धी हे आहे. परंतु बार्हस्पत्यानुसार, अर्थ, काम, धर्माच्या कसोटीवर उतरणारे असावेत. मनु व कौटिल्य यांचे आणि **कामदंडीयाचेही** हेच मत आहे. आपल्या धर्मशास्त्रातील या विषयावरील संपूर्ण चर्चेचा जणू समारोपच करताना या विषयावरील अधिकारी लेखक महामहोपाध्याय डॉ. पांडुरंग वामन काणे म्हणतात :

" The goal of the State was deemed to be to enable men to attain the four purusharthas, particularly the first three, (as the last viz. Moksha depended only upon individual philosophical insight and mystical experience and was attainable only by a microscopic number). Even the Barhaspatya Sutra (II 43) says that the fruit of polity was the attainment of Dharma, artha and Kama. Somedeva begins his Nitivakyasutra in a characteristic way when he performs obeisance to Rajya (the State) which yields the three fruits of Dharma, Artha and Kama.

The Dharmasastra authors held that Dharma was the supreme power in the State and was above the King, who was only the instrument to realise the goal of Dharma. "

[" चार पुरुषार्थांची प्राप्ती करून घेता यावी अशी अनुकूलता लोकांना प्राप्त करून देणे हे राज्याचे उद्दिष्ट मानले जात असे. विशेषतः पहिले तीन पुरुषार्थ (कारण अखेरचा मोक्ष पुरुषार्थ व्यक्तीची सखोल तत्त्वदृष्टी व गूढ अनुभूती यांच्यावरच अवलंबून असतो आणि तो साध्य करून घेऊ शकणारांची संख्या अगदी अत्यल्पच असते.) बार्हस्पत्य सूत्रदेखील (२–४३) म्हणते की राजनीतीचे फळ धर्म, अर्थ आणि काम यांची सिद्धी हे आहे. सोमदेव आपल्या नीतिवाक्यसूत्राचा प्रारंभच वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने करतो. तो प्रथमच राज्याची प्रशस्ती गातो व म्हणतो की, राज्य धर्म, अर्थ व काम ही तीन फळे देते.

धर्मशास्त्रकारांचे मत होते की, राज्यात धर्म ही सर्वश्रेष्ठ शक्ती असते व प्रत्यक्ष राजापेक्षादेखील त्याचा अधिकार मोठा असतो. राजा हा धर्माचे उद्दिष्ट साध्य करून घेण्याचे केवळ साधन मात्र असतो. "]

याच उद्दिष्टाची युगानुकूल सिद्धी दोघांनाही अभिप्रेत होती.

मूलभूत मान्यता समान असल्यामुळे विविध प्रश्नांवरील प्रतिक्रियाही समान असे. राष्ट्रजीवनाच्या विभिन्न क्षेत्रांतील धोरणाविषयींचे विचारही समान असत. परराष्ट्रीय धोरणाची आधारभूत तत्त्वे, दक्षिणपूर्व आशियाच्या सांस्कृतिक राष्ट्रमंडळाची संकल्पना

Nuclear Deterrent (अण्वस्त्रसज्जतेची दहशत)ची प्रयोजकता, मानवी अधिकार व नागरी स्वातंत्र्याचे रक्षण, राज्यपुनर्रचनेचे मार्गदर्शक सिद्धांत, शासनप्रणालीचे स्वरूप, सामाजिक समरसता व समता स्थापन करण्याचे मार्ग, संयुक्त स्वतंत्र राष्ट्रीय चर्चेची आवश्यकता, भाषा, शिक्षण, स्वास्थ्य व देशांतर्गत व्यवस्था यांविषयींची दूरदृष्टीची धोरणे हे सर्व विषय याच प्रकारचे होत. आर्थिक क्षेत्रातील रचना करताना अर्थ-कामाचा अभाव व प्रभाव, या दोन्हींना कटाक्षाने टाळले पाहिजे, असा उभयतांचा आग्रह असे. राष्ट्र-निर्माणकार्यातील नियोजनाचे स्थान व मर्यादा; आणि नियोजनातील अग्रक्रम; बेकारी-निवारण व भावनियंत्रणाच्या प्रश्नांना प्राधान्य; जीवनावश्यक वस्तूंच्या सतत व स्वस्त पुरवठ्याचा आग्रह; अन्नसमस्येवरील उपाययोजना; स्वदेशीचा पुरस्कार; आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण; श्री. चारु मुजुमदार यांच्या नवोदित नक्सलवादाचे विश्लेषण; जमीन व उद्योग यांच्या स्वामित्वाच्या कसोट्या; अधिकतम उत्पादन, समान वितरण व संयमित उपभोग यांची प्रयोजकता; कामाच्या अधिकाराची व न्यूनतम निर्वाहाची हमी आणि न्यूनतम व अधिकतम उत्पन्नांतील अनुपाताची आवश्यकता; 'हर हाथ को काम और हर खेत को पानी' या लक्ष्याचे औचित्य; करपद्धतीचे अभिनवीकरण; भारतीय परिस्थितीत उपयुक्त तंत्रज्ञानाचा प्रश्न; आदी विषयांवर दोघांचेही विचार एकच होते. पुढे दि. २३ ते २६ जानेवारी १९६५ या दिवसांत पं. बच्छराजजी व्यास यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या विजयवाडा अधिवेशनात स्वीकृत झालेला 'सिद्धान्त व धोरण' हा दस्तऐवज अशाच विचाराचा एक परिपाक होता, हे ध्यानात घेण्यासारखे आहे. तसेच सन १९५४ च्या सिंदी – शिबिरातील श्रीगुरुजींची भाषणमाला व एकात्म मानवतावादावरील पंडितजींचे भाष्य यांचेही तुलनात्मक अध्ययन उद्‌बोधक ठरेल.

केवळ विचारांत एकता होती इतकेच नव्हे, तर त्यांच्या अभिव्यक्तीविषयीचे धोरणही समानच होते. पारिभाषिक शब्द भारतीय परंपरेतीलच असावेत, विदेशी नसावेत हा दोघांचाही आग्रह असे. शब्दरचना शिथिल किंवा भोंगळ नसावी. 'एकः शब्दः सम्यक् ज्ञातः सुप्रयुक्तः लोके स्वर्गे च कामधुक् भवति।' ही दोघांचीही धारणा होती. * सुदैवाने या दोन्ही बाबतींत डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींचीही 'वेव्ह लेंग्थ' तीच होती. त्यामुळे जनसंघाच्या सुरुवातीच्या काळात मानसिक वातावरण कशाप्रकारचे असेल, याची कल्पना येण्यासारखी आहे. **

हे खरे आहे की, संघाला राजनीतीत रस नाही. सत्तेच्या राजकारणाशी संघाचा मुळीच संबंध नाही. परंतु परिकल्पना या दृष्टीने संघ व राष्ट्र समव्याप्त असल्याने आणि मानसिक दृष्टीने संघ संपूर्ण राष्ट्राशी एकात्म असल्याने संघ राष्ट्रकारणापासून अलग राहू शकत नाही. राष्ट्रकारणासाठी राजकारण असावे, ही संघाची स्वाभाविक अपेक्षा

---

* परिशिष्ट क्र. ४ पहा.

** परिशिष्ट क्र. ५ पहा.

आहे. राजनीती व राष्ट्रनीती यांची वर्तुळे एकरूप (आयडेंटिकल) नाहीत पण त्यांत समव्याप्त (Overlapping) भाग बराच आहे. ' लोकवृत्ताद् राजवृत्तम् – अन्यदाह बृहस्पतिः।' राष्ट्र व राज्य या संकल्पनांतील भेद न कळल्यामुळे होणारा वैचारिक गोंधळ आपण कित्येकदा अनुभवला आहे * राष्ट्रकारणासाठी राजकारण व धर्मकारणाच्या प्रकाशात राष्ट्रकारण, ही भारतीय परंपरा आहे.

या परंपरेचा निर्वाह करणे केवळ सत्तावादी पुढाऱ्याला शक्य तरी होईल काय ? फेब्रुवारी १९६३ मध्ये भारतीय जनसंघाच्या भोपाळ येथील अ. भा अधिवेशनात प्रतिनिधींच्या समोर बोलताना पंडितजी म्हणाले,"आज जनसंघ, प्रजासमाजवादी पक्ष, समाजवादी पक्ष किंवा काँग्रेस यांतील सध्याच्या मतभेदांची खाई अधिक रुंद न करता, तिचा विसर पाडण्याची आवश्यकता आहे. राष्ट्रद्रोही कम्युनिस्टांना एकाकी पाडणे राष्ट्रहिताच्या दृष्टीने आवश्यकच आहे. परंतु या आमच्या प्रयत्नांत जर एखादा पक्ष किंवा व्यक्ती आम्हाला पूर्णपणे साथ न देईल तरी अशा पक्षाला किंवा व्यक्तीला ' कम्युनिस्ट-समर्थक ' असे वारंवार म्हणून कम्युनिस्टांच्या जाळ्यात ढकलणे योग्य होणार नाही. "

" गावोगावी जाऊन समाजात आशा व विश्वास निर्माण करण्याकरिता आम्ही अग्रेसर होण्याची आवश्यकता आहे. राष्ट्रद्रोही लोक पंडित नेहरूंचा चँगकैशेक बनविण्याचे कारस्थान करीत आहेत. ही गोष्ट जनतेला समजावून सांगून अशी घोषणा करणे आवश्यक आहे की, चीनच्या त्या दुर्भाग्यपूर्ण इतिहासाची पुनरावृत्ती या भारतभूमीमध्ये आम्ही होऊ देणार नाही. आमच्या ससोर पन्नादाईचा आदर्श आहे. तिने उदयसिंहाचा जीव वाचविण्यासाठी आपल्या काळजावर दगड ठेवून आपल्या मुलाचा बळी दिला. वारसा म्हणून प्राप्त झालेली राष्ट्राची अस्मिता, अखंडता आणि विश्वात सर्वश्रेष्ठ भारतीय संस्कृती व जीवनदर्शन यांच्या संरक्षणाकरिता कोणतेही बलिदान करण्याला आम्ही नित्यसिद्ध आहोत. "

पंडितजींच्या अमेरिकेच्या दौऱ्यात फ्रेंड्स ऑफ इंडिया कमेटीने त्यांच्या स्वागताचा समारंभ आयोजित केला होता. त्या कमेटीचे अध्यक्ष डॉ. नॉर्मन डी. पामर पंडितजींच्या मृत्यूनंतर म्हणाले की, " पंडितजी अशा व्यक्तींपैकी नव्हते, ज्यांच्या विषयी अलेक्झांडर पोपने पुढील उद्‌गार काढले आहेत. –

" Born for the Universe, narrowed his mind
And to party gave up what was meant for mankind. "

या पार्श्वभूमीवर पंडितजींनी श्री. शामबहादूर वर्मा यांना दिलेले सडेतोड उत्तर त्यांच्या मनःस्थितीवर प्रकाश टाकणारे आहे. श्री. वर्मांनी विचारले की, " दीनदयाळजी ! काय तुम्हाला असे वाटते काय की, सत्ता हाती आल्यानंतर ज्याप्रमाणे काँग्रेस भ्रष्ट झाली,

---

* परिशिष्ट क्र. ६ पहा.

त्याप्रमाणे भारतीय जनसंघ – सत्ता मिळूनही भ्रष्ट होणार नाही ? " पंडितजी म्हणाले, " सत्ता सामान्यतः भ्रष्ट करते. या बाबतीत आम्ही पूर्ण काळजी घेतल्यानंतरही जर जनसंघात भ्रष्टता आली तर त्याला विसर्जित करून दुसरा जनसंघ आम्ही निर्माण करू. तितक्यावरही काम निभले नाही तर तिसरा निर्माण करू. असाच क्रम चालू राहील. भगवान् परशुरामाने एकवीस वेळा राजांचा संहार केला. आदर्श राजा या रूपाने शेवटी रामचंद्र पुढे आले. रामराज्याची स्थापना झाल्यानंतर परशुरामाने वनाकडे प्रस्थान केले. आपण निर्माण केलेल्या संस्थेविषयी सुद्धा मोह का बाळगावा ? लहान मूल गाजराशी खेळते व त्याची उपयोगिता संपल्यावर ते खाऊन टाकते. आपण निर्माण केलेली संस्था-सुद्धा जर राष्ट्रहिताच्या विरुद्ध कार्य करील तर अशा स्वनिर्मित संस्थेचा नायनाट करणे हा धर्मच होतो. राष्ट्र हे सर्वश्रेष्ठ होय; संस्था नव्हे. " सत्तालोलुप राजकारणी पुरुष असे उद्‌गार काढू शकेल काय ?

कोणत्याही नवस्वतंत्र देशातील सार्वजनिक पुढाऱ्यांचे चार भागांत वर्गीकरण करता यावे. एक तर विशुद्ध सत्तावाद्यांचा वर्ग, पक्ष्याच्या डाव्या डोळ्यावर संपूर्ण लक्ष केंद्रित करणाऱ्या अर्जुनाप्रमाणे विशुद्ध सत्तावादी केवळ सत्ता प्राप्तीवर आपले चित्त एकाग्र करून असतो व दुसरे कोणतेही सत्कार्य किंवा सद्‌विचार त्याच्या या एकाग्रतेचा भंग करू शकत नाही. दुसरा वर्ग विशुद्ध राष्ट्रनिर्मात्यांचा. यांचेही चित्त एकाग्रच असते; परंतु ते राष्ट्र-निर्माण-कार्यावर. याच कार्याच्या सिद्धीसाठी प्रसंगी राजकारणात भाग घेणे आवश्यक दिसले तरी, तसे करण्यापासून होणारे लाभ व हानी यांचा व स्वतःच्या भूमिकेचा समग्र विचार करून, या वर्गातील लोक राजकीय कार्याला कटाक्षाने टाळतात. किंवा असे म्हणता येईल की, राजकीय कार्य आणखी कोणाकडून करवून घेता येईल, परंतु आपणच राज-कारणात पडल्यामुळे नैतिक अधिकार कमी झाल्यासारखा भासला, तर त्यामुळे होणारे नुकसान अधिक मोठे आहे असा त्यांचा हिशोब असतो. या दोन वर्गांतील मंडळींना स्पष्ट-पणे ओळखता येते. त्यांत गल्लत होण्याची संभावना नाही. परंतु पुढील दोन वर्गांतील सीमारेषा फार बारीक आहे व त्यामुळे त्यांतील पुढाऱ्यांचे वर्गीकरण करणे कठीण जाते. मुख्यतः सत्तावादी, परंतु सत्तेचा गौरीशंकर गाठावयाचा असेल तर त्याकरता राष्ट्रनिर्माण कार्याच्या तीर्थक्षेत्रातून थोडेफार चालत जाण्याशिवाय गत्यंतर नाही म्हणून नाइलाजाने थोड्याफार प्रमाणात राष्ट्रनिर्माणाचेही कार्य करणारा, म्हणजेच मुख्यतः सत्तावादी व अनुषंगिकरीत्या राष्ट्रनिर्माता अशा व्यक्तींचा एक वर्ग व दुसरा वर्ग अशा पुढाऱ्यांचा की ज्यांना राजकारणात मुळीच रुची नाही, राष्ट्रनिर्माणकार्य हेच एकमेव ध्येय आहे, परंतु त्या ध्येयमंदिराकडे जाणारा मार्ग राजकारणाच्या बाजारांतून जात असल्याने अपरिहार्य-पणे ज्यांना राजकारणप्रवेश करावा लागतो, म्हणजेच मुख्यतः राष्ट्रनिर्माता व अनुषंगिकरीत्या राजकारणी अशी भूमिका असणाऱ्यांचा. पंडितजी या चौथ्या वर्गात मोडत असत हे सहज समजण्यासारखे आहे.

भारतीय राष्ट्रपुरुषांचे मानसशास्त्र पाश्चिमात्य राज्यशास्त्रविशारदांना व त्यांच्या

भारतीय शिष्यांना आकलन होणे कठीण आहे. किंवहुना त्यांच्या मापदंडाने मूल्यांकन केल्याने, ते या निकषावर पोचले तर नवल नाही की, ऐतिहासिक कालात भारताचे पुढारीपण करणाऱ्या मंडळीत वेड्यांचीच संख्या अधिक होती.

श्री रामचंद्र व भरत यांचा चित्रकूट पर्वतावर अयोध्येच्या राज्याच्या स्वामित्वाबद्दल विवाद झाला. प्रत्येक दुसऱ्याला म्हणावयाचा की, हे राज्य तुझे आहे, माझे नाही; व तुलाच ते चालवावे लागेल. नवशिक्षित भारतात नगरपालिकेच्या एका वॉर्डकरताही असा विवाद आता ऐकायला मिळावयाचा नाही !

एका साम्राज्यसत्तेच्या उमेदवाराच्या आईने भगवंताला अशी प्रार्थना केली की, माझ्यावर व माझ्या पुत्रांवर सदैव संकटे येवोत म्हणजे आम्हा सर्वांना तुझी सदैव आठवण येत राहील. अशी प्रार्थना करायला आज ग्रामपंचायतीच्या उमेदवाराची आईही तयार होणार नाही.

स्वतःच्या कर्तृत्वाने स्थापिलेल्या साम्राज्याचे प्रधानमंत्रीपद स्वतःहून दुसऱ्याच्या स्वाधीन करून हिमालयाची वाट धरणाऱ्याला आता वेड्याच्या इस्पितळातच रवाना करण्यात येईल.

हिंदवी स्वराज्य व्हावे ऐसे ' श्रीं ' चे मनात फार आहे. ' श्री ' कोण ? निवडणूक आयोगाने प्रकाशित केलेल्या मतदारांच्या यादीत यांचे नाव आढळत नाही. एक मतसुद्धा देण्याचा अधिकार ज्या ' श्रीं 'ना नाही त्यांच्या इच्छेची मातब्बरी ती काय ?

" मुख्य ते हरिकथा निरुपण – दुसरे ते राजकारण । "

जगातील सर्व गोष्टी सत्तेच्या माध्यमातूनच प्राप्त होत असल्यामुळे सत्तेकडे सरळ धाव घेण्याचे सोडून मध्येच ही हरिकथा-निरूपणाची भानगड किंवा अडगळ कशाला ?

" सकळ सुखांचा त्याग – करोनि साधिजे हा योग ।
राज्यसाधनाची लगबग – केली पाहिजे ॥ "

काय हा मूर्खपणा ? ' सकळ सुखांचा भोग ' घेण्याकरता तर राज्याची आवश्यकता. त्याला योग ही संज्ञा देणे व त्याकरता सुखाचा जीव दुःखात टाकण्याचा सल्ला देणे हे पागलपणाचेच लक्षण नव्हे काय ?

' राजा म्हणजे प्रजेचा उपभोगशून्य स्वामी.' ' राज्योपभोग म्हणजेच राजसंन्यास '. या विधानांतील स्वयंविरोध मॅट्रिक नापास झालेल्या आजच्या मुलालाही स्पष्ट होण्यासारखा आहे.

या सर्व विचारपरंपरेचा उपहास आधुनिक वातावरणाच्या दृष्टीने स्वाभाविक आहे. परंतु त्याचबरोबर हेही खरे आहे की, भारताचे श्रेष्ठत्व व चिरंतनत्व प्रस्थापित करण्याच्या कार्यात अशा पागल लोकांचा व त्यांनी स्थापन केलेल्या जीवनमूल्यांचा, *सिंहाचा वाटा

---

*परिशिष्ट क्र. ७ पहा.

राहिला आहे. अशांच्या वागणुकीविषयी अचूक अंदाज करणेही आजच्या सुधारलेल्या मंडळींना कठीण जाईल. 'तुझा तू वाढवी राजा – शीघ्र आम्हाची देखता' असा वर देवीला मागणारे समर्थ प्रत्यक्ष शिवराज्याभिषेकाचे प्रसंगी रायगडावर उपस्थितसुद्धा नव्हते हे कसे? सन १९६७ मध्ये विभिन्न संविद सरकारांत जनसंघमंत्र्यांचा शपथविधी होत असताना 'आम्ही सज्जनगडीं राहतो कौतुक शिवरायाचे पाहतो' अशा वृत्तीने अजमेरी गेट कार्यालयात राहणाऱ्या दीनदयाळजींचीही तटस्थता नवीन मंडळींना अनाकलनीय अशीच राहील.

या संदर्भात एक घटना उल्लेखनीय आहे :–

कालिकत अधिवेशन संपल्यानंतर काही जनसंघ पुढाऱ्यांसह पंडितजी बंगलोरवरून डोडाबल्लापूर येथे पोहोचले. तेथे संघाचे शिबिर होते व स्वतः श्रीगुरुजी त्यांत उपस्थित होते. सायंकाळी श्रीगुरुजींचा बौद्धिक वर्ग व्हावयाचा होता. परंतु त्यापूर्वी चहाचे वेळी श्रीगुरुजी म्हणाले की, "आता दीनदयाळ बोलेल." यावर सर्वांना आश्चर्य वाटले. एकाने म्हटले, "शिबिरात सर्व लोक आपल्या मार्गदर्शनासाठी एकत्रित आले आहेत." श्रीगुरुजी म्हणाले, "नहीं भाई. दीनदयाळ बोलेल." त्यावर कोणी म्हटले, "ते तर जनसंघाचे अध्यक्ष आहेत." यावर श्रीगुरुजी तावडतोब म्हणाले, "नाही, दीनदयाळ संघ-स्वयंसेवक आहे, तो स्वयंसेवक या नात्याने बोलेल. जनसंघ-अध्यक्षाच्या नात्याने नाही," आणि श्रीगुरुजींच्या उपस्थितीत पंडितजींचाच बौद्धिक वर्ग झाला. या घटनेवर भाष्य करण्याची आवश्यकता नाही.

जनसंघाच्या ध्येयधोरणाचे प्रमुख शिल्पकार दीनदयाळजीच होते. त्यामुळे प्रगमनशील (?) पक्षांच्या विचारांत जसा गोंधळ, परस्पर विसंगती व अंतर्विरोध आढळून येतो तसा अखिल भारतीय जनसंघाच्या बाबतीत दिसून येत नाही. जनसंघाच्या ध्येयधोरणात स्वयंप्रतिभत्व, सुस्पष्टता, व मौलिकता यांचे दर्शन होते. उदाहरणार्थ – सेक्युलॅरिझमची संकल्पना घ्या.

आपल्या देशात या शब्दाचा ज्या अर्थाने वापर केला जातो त्या अर्थाने जगातील कोणत्याही देशात केला जात नाही.* कोणत्याही इंग्रजी शब्दकोशात सेक्युलर शब्दाचा असा अर्थ दिलेला आढळणार नाही. वास्तविक पं. नेहरूंना जे अभिप्रेत होते ते व्यक्त करण्याकरिता सर्वांत जवळचा इंग्रजी शब्द होता NON - DENOMINATIONAL (असांप्रदायिक).

सेक्युलॅरिझमच्या संकल्पनेविषयी घटना-समितीतील वादविवादापासून तो अगदी अलीकडील श्री. पी. सी. चटर्जी यांच्या 'सेक्युलर व्हॅल्यूज फॉर सेक्युलर इंडिया' च्या प्रकाशनापर्यंत वरीच उलटसुलट चर्चा होऊन गेली आहे. स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही या संकल्पनेचे स्वरूप घटना-समितीतील आपल्या भाषणात स्पष्ट केले आहे.

---

* परिशिष्ट क्र. ८ पहा.

वास्तविक सेक्युलॅरिझमचा व्यावहारिक अर्थ वायबलच्या पुढील निर्देशात स्पष्ट होतो. " Render unto Caesar that which is Caesar's and unto God that which is God's. " [" जे सीझरचे असेल ते सीझरला द्या आणि जे ईश्वराचे असेल ते ईश्वराला द्या. "] (सुरुवातीला भारतीय घटनेत ' सेक्युलर ' हा शब्दच नव्हता. सन १९७६ साली झालेल्या ४२ व्या घटना-दुरुस्तीनुसार तीत ' सेक्युलर ' व ' सोशॅलिस्ट ' या दोन शब्दांचा समावेश करण्यात आला.)

हिंदू-राष्ट्र-कल्पना व सेक्युलॅरिझम यांत परस्परविरोध वा विसंगती नाही, असे पं. दीनदयाळजींना वाटे. हिंदुस्थानात राज्यसंस्था नेहमीच सेक्युलर राहिली आहे. हिंदू स्टेट नेहमीच सेक्युलर असते. फर्डिनांड व इझाबेलाच्या (inquisition) क्रूर धार्मिक न्यायपीठाची कल्पनासुद्धा या देशाच्या वातावरणाशी विसंगत आहे. सेक्युलर म्हणजे निधर्मी ही कल्पना चुकीची आहे. सेक्युलरचा अर्थ धर्मसमभावी. हिंदु-कोड बिलावर पार्लमेंटमध्ये बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते :–

" It (Secular State) does not mean that we shall not take into consideration the religious sentiments of the people. All that a Secular state means is that this Parliament shall not be competent to impose particular religion upon the rest of the people. That is the only limitation that the Constitution recognises. — Secularism does not mean abolition of religion."

[" त्याचा (सेक्युलर स्टेटचा) अर्थ असा होत नाही की लोकांच्या धर्म-भावना आम्ही विचारात घेणार नाही. सेक्युलर स्टेट याचा अर्थ एवढाच होतो की इतरांवर एक विशिष्ट संप्रदाय लादण्याचा अधिकार या लोकसभेला नाही. घटनेने एवढीच मर्यादा मान्य केलेली आहे. सेक्युलॅरिझम म्हणजे धर्मच नाहीसा करणे नव्हे. "]*

हिंदू-राष्ट्र-समर्थकांची सदैव हीच भूमिका राहिली आहे. पंडितजींनी हे सत्य निरनिराळे दृष्टान्त देऊन जनतेसमोर मांडले.

प. पू. श्रीगुरुजींनी हे वारंवार स्पष्ट केले आहे की, हिंदू इतिहासात स्टेट सदैव सेक्युलरच राहिले आहे. हिंदूंचे स्टेट म्हणजेच सेक्युलर स्टेट. हिंदू हा रिलिजन नाही, हा एक तर राष्ट्रवाचक शब्द आहे. परंतु त्याहूनही अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे हिंदू ही संकल्पना Multi faceted (अनेक पैलू असलेली) व Multi dimensional (अनेक मिती असलेली) आहे, त्यामुळे संकुचित पाश्चिमात्य पद्धतीने व्याख्येच्या चौकटीत तिला सीमित करणे वास्तवतेला सोडून होईल.** पूज्य महात्माजींनी हे स्पष्ट केले होते की,

---

* परिशिष्ट क्र. ९ पहा.

** परिशिष्ट क्र. १० पहा.

"There is, in Hinduism, room enough for Jesus, as there is for Mohamad, Zoreaster and Moses *

[" हिंदुत्वात जीझससाठी पुरेशी जागा आहे, त्याचप्रमाणे महंमद, झरतुष्ट्र आणि मोझेस यांच्यासाठीही आहे."]

या संदर्भात श्री. अर्नाड टायन्बी म्हणतात, " Hinduism takes it for granted that there is more than one valid approach to truth and to salvation, and that these different approaches are not only compatible with each other but are complimentary."

["सत्याकडे आणि मुक्तीकडे जाण्याचे एकाहून अधिक मार्ग आहेत हे हिंदू धर्म गृहीत धरतो. त्याला हेही मान्य आहे की हे निरनिराळे मार्ग एकमेकांना विरोधी नाहीत. एवढेच नव्हे तर, ते परस्परपूरक आहेत. "]

सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश श्री. गजेंद्रगडकर ह्यांचा पुढील अभिप्राय चिंतनीय आहे –

" ····· unlike other religions in the world, the Hindu religion does not claim any one prophet ; it does not worship any one God, it does not so subscribe to any one philosophic concept; it does not follow any one set of religious rites or performances; in fact it does not appear to satisfy the narrow traditional features of any religion or creed. It may be described as a way of life and nothing more .... The history of Indian thought emphatically brings out the fact that the development of Hindu religion has always been inspired by an endless quest of the mind for TRUTH, based on the consciousness that truth has many facets. Truth is one, but wise men describe it differently. (एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति ।)"

["..... जगातील अन्य धर्मांप्रमाणे हिंदू धर्म कोणी एकच प्रेषित असल्याचा दावा करीत नाही. कोणा एकाच ईश्वराची पूजा करीत नाही. कोणा एकाच तत्त्वज्ञानात्मक संकल्पनेचा तो अनुगामी नाही. पूजाविधी व धार्मिक आचार यांचा एकच साचा तो अवलंबीत नाही. वस्तुस्थिती अशी आहे की कोणताही धर्म अथवा

---

* अहिंदूंचेविषयी ही अपेक्षा योग्यच आहे की, येथील राष्ट्रीय संस्कृतीशी त्यांनी एकात्म असावे, व त्यामुळे आपल्या राम–कृष्ण आदी राष्ट्रीय महापुरुषांविषयी त्यांचे मनांत तसाच आदर असावा, जसा पिरॅमिड्सच्या निर्मात्यांविषयी इजिप्तच्या मुसलमानांच्या मनात, किंवा ॲटिल्लाविषयी तुर्की मुस्लिम समाजात किंवा दरायसविषयी इराणी मुसलमानांच्या मनांत आहे.

संप्रदाय यांची जी संकुचित अंगे परंपरेने मानली जातात, त्यांची पूर्तता हिंदू धर्म करीत नाही. हिंदू धर्माचे वर्णन फार तर एक जीवनसरणी म्हणूनच करता येईल. ··· भारतीय तत्त्वचिंतनाच्या इतिहासावरून हे ठळकपणे निष्पन्न होते की हिंदू धर्माचा विकास नेहमी सत्याच्या अनंत शोधातून झालेला आहे. सत्याचे अनेक पैलू असतात, या जाणीवेवर तो आधारलेला आहे. सत्य एकच आहे पण सुज्ञ लोक त्याचे वर्णन वेगवेगळ्या प्रकारे करतात. (एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति ।)"]

ह्या पार्श्वभूमीवर भगिनी निवेदितांचा पुढील विचार पाहा :

" The supreme crime for the follower of any Indian sect shall be the criticism of another as if it were without the bounds of the Eternal Faith (Sanatana Dharma). Rightly defined the Vedas are the sanction of Buddhism, Mohamedanism, Christianity, Confucianism. "

[" कोणत्याही भारतीय संप्रदायाच्या अनुयायांचा सर्वांत मोठा गुन्हा म्हणजे इतर संप्रदाय जणू काही सनातन धर्माच्या कक्षेबाहेर आहेत असे मानून त्यांच्यावर टीका करणे. योग्य व्याख्या केल्यास बुद्ध, इस्लाम, ख्रिश्चन, कन्फ्युशियन या सर्व धर्माच्या मुळाशी वेदांचे प्रामाण्यच आहे.]

या दृष्टीने श्री. हुमायून कबीर यांनी उद्धृत केलेला के. विल्यम् काप (K. William Kaap) यांचा पुढील अभिप्राय चिंतनीय आहे :

" In fact, there must be as many truths and as many facets of reality as there are ' Inner dispositions ' and frames of reference. The origin of tolerance in the Hindu mind can be traced back to this recognition of abundance of inner attitudes, each of which may provide access to a particular facet of reality. Whereas European philosophy has tended to reject contradictory categories and European Thought has sought to interpret reality in terms of clear-cut distinctions aiming at absolute truth, Hindu epistemology has recognised a multitude of stand points and degrees of truths without rejecting any of them. " ते पुढे म्हणतात, " It (European Thought) has also tended to interpret reality in terms of absolute truth and absolute error. This has given intensity and rigour to European Thought, but it has also tended to make the European attitude to truth dogmatic and narrow. Indian philosophy, has on the other hand, recognised from the earliest times the real has many facets and cannot be expressed in terms of purely contradictory categories. Indian philosophy has recognised degrees of truth on a scale which has perhaps no parallel in European metaphysics."

या वस्तुस्थितीच्या आधारावर त्यांचा निष्कर्ष आहे की, " It is this capacity of adjusting and combining seemingly disparate creeds and contradictory

systems of belief which more than any other factor accounts for the unique vitality and longevity of Hindu culture, due to its ability to accommodate dissimilar elements and to give them a complexity and diversity which is probably unequalled in the history of mankind."

[" माणसाच्या जेवढचा ' अंतःप्रवृत्ती ' आणि वागणुकीचे निकष असतील तेवढी सत्ये व वास्तवाचे तेवढे पैलू अवश्य असले पाहिजेत. हिंदू मनाच्या सहिष्णुतेचा उगम या अंतःप्रवृत्तींची विपुलता व प्रत्येक प्रवृत्तीतून प्रकट होणारा वास्तवतेचा विशिष्ट पैलू यांना त्याने दिलेल्या मान्यतेत शोधता येईल. युरोपीय तत्त्वज्ञानाचा कल परस्परविरोधी वर्ग अमान्य करण्याकडे आहे आणि स्पष्ट विभागणी करून एकच अंतिम सत्य प्रस्थापित करण्याच्या दिशेने वास्तवाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न युरोपीय चिंतनाने केला आहे. हिंदू शास्त्रांनी अनेकविध भूमिका व सत्याच्या अनेक श्रेणी मान्य केल्या आहेत. त्यांपैकी एकही झिडकारलेली नाही. संपूर्ण सत्य व संपूर्ण असत्य ठरविण्याच्या दृष्टीने युरोपीय चिंतन वास्तवाचा अर्थ लावते. यामुळे युरोपीय चिंतनाला एक धार व जोम आला आहे. पण युरोपियनांची सत्याकडे पाहण्याची दृष्टी आग्रही व संकुचित बनविण्यासही ते कारणीभूत झाले आहे. उलट, अगदी प्राचीन काळापासून भारतीय तत्त्वज्ञानाची मान्यता आहे की, सत्याचे अनेक पैलू असतात व केवळ परस्परविरोधी वर्गांत मांडणी करून ते सांगता येत नाहीत. भारतीय तत्त्वज्ञानाने सत्याच्या श्रेणी एवढचा प्रमाणात मान्य केल्या आहेत की युरोपीय परमार्थ-विचारात त्या तोडीचे काहीही आढळत नाही. "

" बाह्यतः विसंगत आणि परस्परविरोधी असणाऱ्या धर्ममतांच्या श्रद्धांचा समन्वय आणि समवाय करण्याची हिंदू संस्कृतीची ही जी क्षमता आहे, तीच इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा या संस्कृतीला चैतन्य व जीवनसातत्य देण्यास कारणीभूत ठरली आहे. भिन्नता सामावून घेण्याचा आणि विविधतेसहित नांदण्याचा हा गुण मानवी इतिहासात अजोड म्हणावा लागेल."]

प. पू. श्रीगुरुजींना हिंदुत्वाचे हेच वास्तविक म्हणजे सर्वव्यापक, सर्वसमावेशक स्वरूप अभिप्रेत होते. त्यांची ही श्रद्धा होती की, पुढे एकात्म मानवदर्शन वा चालू भाषेत सांगावयाचे म्हणजे विश्वबंधुत्व,* संपूर्ण जगात प्रस्थापित करावयाचे असेल तर त्या मंगल मोहिमेकरिता

---

* आपल्या देशात या शब्दाचा प्रयोग फार भोंगळपणाने होतो. वास्तविक ' आंतरराष्ट्रीय ' म्हणविल्या गेलेल्या विचारधारांचे तीन भागांत वर्गीकरण आहे –

1) International Communalism.
2) International Secterianism.
3) International Humanism.

हिंदूपणा (Hinduness) ची प्रकृती तिसऱ्या वर्गाची आहे. त्याचे Base of operation भारत आहे.

आधारभूमी Base of operation म्हणून उपयुक्त असा देश म्हणजे हिंदुस्थानच आहे. या पार्श्वभूमीवर त्यांचा हिंदुराष्ट्र संकल्पनेविषयी आग्रह होता. हिंदुराष्ट्र हा शब्द कोणत्याही मोहाला बळी पडून आपण सोडला, या शब्दाविषयी कोणतीही तडजोड केली, तर आपण आपले स्वत्व व सर्वस्व गमावून बसू असे ते म्हणत.

हिंदुत्वाच्या संदर्भात जनसंघाची वैचारिक पूर्वपीठिका कोणती, हा एक स्वतंत्र विषय आहे. संघ–जनसंघाच्या या विषयींच्या भूमिकेतील साधर्म्य–वैधर्म्य यांवर बरीच सार्वजनिक चर्चा झालेली आहे. परंतु सन १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामाचे खरे नेतृत्व करणारे सेनानी, महर्षी अण्णासाहेब पटवर्धनांच्या परंपरेतील लोक, श्रीमद्भगवद्गीता हातात घेऊन फाशीला कवटाळणारे क्रांतिकारक, गांधीपूर्वयुगात गीतारहस्यकार टिळकांचा काँग्रेसच्या अंतर्गत असलेला लाल–बाल–पाल गट, गदर पार्टीचे संस्थापक लाला हरदयाळ यांच्या सारखे दिव्य स्वप्न पहाणारे राष्ट्रभक्त, तसेच गांधीयुगात महात्माजींच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात प्रत्यक्ष भाग घेऊनही त्यांच्या मुस्लिम अनुनयाच्या * धोरणावर नाराज असलेले काँग्रेसजन, हिंदुत्वाचे कट्टर पुरस्कर्ते असूनही हिंदुमहासभेच्या काही धोरण-वक्तव्यांवर ** असंतुष्ट असलेले हिंदुत्ववादी, मालवीय, केळकर, मुंजे, जयकर यांच्या प्रतियोगी सहकारितेच्या धोरणाचे समर्थक, व अणे–मालवीयांच्या काँग्रेस नॅशनॅलिस्ट पार्टीचे अनुयायी – या विभिन्न मतप्रवाहांपैकी कोणाचा किती वैचारिक वारसा जनसंघाने आपल्याकडे घेतला आहे, या विषयावर अजून संशोधन व्हावयाचे आहे. तथापि एक निष्कर्ष मात्र निरपवादपणे काढता येतो. 'ऑर्गनायझर'मध्ये जनसंघाच्या स्थापनेपूर्वी प्रकाशित झालेले श्री. पी. परमेश्वरन्, श्री. बलराज मधोक, श्री. कमल (के. आर.) मलकानी, व मा दादा परमार्थ यांचे लेख व एक ख्रिश्चन विचारक Anthony Elenjimittm, यांची 'The Philosophy and action of the R.S.S. for the Hind Swaraj' ही पुस्तिका, या सर्वांतून एकाच विषयाचे प्रतिपादन होते आणि ते म्हणजे हिंदुत्वनिष्ठ राजकीय पक्षाची व कार्याची आवश्यकता.

'हिंदुत्व', 'हिंदूराष्ट्र' यांचे स्वरूप काय? हल्ली हिंदुराष्ट्र की भारतीय राष्ट्र, हा प्रश्न बरेचदा चर्चेला येतो. प्रस्तुत ग्रंथातही या विषयावर समर्थक व विस्तृत विवरण आले आहे. येथे एकच उल्लेख पुरेसा होईल असे वाटते. फेब्रुवारी १९५६ च्या पहिल्या आठवड्यात

---

* खिलाफत आंदोलन, संमिश्र संस्कृतीची कल्पना, बंडखोर मोपल्यांविषयीचे धोरण, स्वामी श्रद्धानंदांच्या खुन्याविषयीचे उद्गार, अफगाणिस्तानच्या अमीराने भारतावर आक्रमण करावे या सूचनेवरील भोंगळ प्रतिक्रिया, कम्युनल अवॉर्डविषयीचे धोरण, जिनांना कोरा चेक देण्याची तयारी, सत्तेच्या हस्तांतरणापूर्वी चाललेल्या वाटाघाटींतील बोटचेपी भूमिका, इत्यादी बाबींचा समावेश अशा अनुनयात होती.

** उदा., " काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष आहे. मुस्लिम लीगबरोबर वाटाघाटी करण्याचे काम आमच्या हिंदुसभेवर सोपविण्यात यावे. "

पंजाब–जनसंघ–समितीसमोर बोलताना दीनदयाळजी म्हणाले होते, " Eversince our inception, we have been persistantly treating Hindu Rashtra as Synonimous with Bharatiya Rashtravad. "

[" आपल्या पक्षाचा जन्म झाल्यापासून सतत आपण हिंदू राष्ट्रवाद म्हणजेच भारतीय राष्ट्रवाद असे मानीत आलो आहोत. "]

भारतीय जनसंघाच्या पहिल्याच वार्षिक अधिवेशनात (कानपूर) भाषण करताना डॉ. शामाप्रसाद मुखर्जी म्हणाले, " Our Party, though ever prepared to extend its hand of equality to all citizens, does not feel ashamed to urge for the consolidation of Hindu Society,nor does it suffer from an inferiority complex to acknowledge proudly that the great edifice of Indian culture and civilisation has been built most of all by the labour, sacrifice and wisdom of Hindu sages, savants and patriots. "

[" आपला पक्ष सर्व नागरिकांना समानता देण्यास सिद्ध असला, तरी हिंदू समाजाच्या दृढीकरणाची आवश्यकता प्रतिपादन करण्यात त्याला मुळीच संकोच वाटत नाही. किंवा भारतीय संस्कृतीच्या आणि सभ्यतेच्या भव्य प्रासादाची उभारणी प्राधान्याने हिंदू साधुसंत आणि देशभक्त यांच्या परिश्रमांवर, त्यागावर व ज्ञानावर झालेली आहे, हे अभिमानाने मान्य करताना कोणताही न्यूनगंड त्याला स्पर्श करीत नाही. "]

भारतीय जनसंघाच्या सर्व जीवनश्रद्धांचे (Articles of Faith) अधिष्ठान हिंदुत्व हेच होते. सुदैवाने पक्षाध्यक्ष डॉ. शामाप्रसाद मुखर्जींपासून तो तहत खेडयांतील लहान कार्यकर्त्यापर्यंत सर्वांच्या जीवनश्रद्धा हिंदुत्वाधिष्ठितच होत्या.

या हिंदुत्वनिष्ठ भूमिकेमुळेच अखंड भारत ही जनसंघाची पहिली जीवनश्रद्धा (Article of Faith) होती. बरेच संशयात्मे प्रश्न करीत, ' जनसंघ हे कसे घडवून आणणार ? ' डॉ. शामाप्रसाद मुखर्जी म्हणत :– " Akhand Bharat is no election slogan with us, it is an article of faith. A leading Congressman asked me how precisely Janasangh proposed to effect re-union. My answer to him was a question. I asked, " When the Congress first gave the call for freedom, did or could anybody foretell the precise course the freedom movement would take ? This is no communal question. It is a national political problem. It is a challenge to our manhood and humanity alike. No artificial borders can keep Bharat divided, which is and has always remained one geographically, culturally and economiclly. We are determined to undo the wrong that has been done to the motherland by the Congress-League conspiracy and restore her to her natural position."

[" आमच्यासाठी अखंड भारत ही केवळ निवडणूक-घोषणा नाही तर ती एक जीवनश्रद्धा आहे. जनसंघ भारत व पाकिस्तान पुन्हा एक कसे करणार हे नेमके

सांगा, अशी विचारणा एका काँग्रेसजनाने माझ्याकडे केली. मी विचारले, 'जेव्हा काँग्रेसने स्वातंत्र्यप्राप्तीच्या ध्येयाचा प्रथम उदघोष केला, तेव्हा स्वातंत्र्याचे आंदोलन नेमके कोणत्या वळणांनी जाईल हे कोणी सांगितले काय? हा जातीय प्रश्न नाही. तो राष्ट्रीय – राजकीय प्रश्न आहे. आपले पौरुष व मानवता या उभयतांनाही ते आव्हान आहे. भारत देश हा भौगोलिक, सांस्कृतिक आणि आर्थिक दृष्टींनी एक आहे व तो नेहमी तसाच राहात आलेला आहे. काँग्रेस-लीग यांच्या संगनमताने मातृभूमीवर जो अन्याय झालेला आहे, तो दूर करण्याचा आणि मातृभूमीला तिची स्वाभाविक अवस्था प्राप्त करून देण्याचा आमचा निर्धार आहे.'' *]

यावरून वैचारिक दृष्टीने जनसंघाची जातकुळी कोणती होती हे स्पष्ट होते. (हे पूर्णपणे जाणूनही मद्रासचे डॉक्टर व्ही. के. जॉन यांच्यासारखे पुढारी जनसंघात प्रविष्ट झाले ही घटना विचार करण्यासारखी आहे.)

हीच मौलिकता व हेच स्वयंप्रतिभत्व जनसंघाच्या इतर विचार-धनातही दृष्टोत्पत्तीस येते.

योग्य विचारांची निर्मिती, विकास, प्रतिपादन व प्रचार यांच्याच भरंवशावर केवळ कोणताही पक्ष मजबूत होत नाही, याची पंडितजींना जाणीव होती. एकेका कार्यकर्त्याची प्रयत्नपूर्वक घडवणूक, अशा रीतीने घडविल्या गेलेल्या कार्यकर्त्यांची प्रत्येक स्तरावर टीम, अशा कार्यकर्त्यांच्या माध्यमातून जनसंपर्क, जनजागरण, जनशिक्षण, जनसंघटन व जन-आंदोलन, या सर्वांच्या फलस्वरूप एकीकडे पक्षवृक्षाची पाळेमुळे खोलवर रुजविणे व दुसरीकडे ध्येयप्राप्तीच्या आकाशाकडे त्या वृक्षाच्या शाखांना अधिकाधिक उंचावत नेणे, ही प्रक्रिया त्यांना अभिप्रेत होती. प्रचाराचे महत्त्व आहे, परंतु त्याहून अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे शिक्षण (Education) व त्याहूनही महत्त्वाची गोष्ट – विशेषतः कार्यकर्त्यांच्या दृष्टीने – म्हणजे संस्कार.** कार्यकर्त्यांना संस्कारित करण्याकरिता सर्वोत्कृष्ट साधन म्हणजे पुढाऱ्याचे स्वतःचे जीवन व त्याचा कार्यकर्त्यांशी नित्य, अनौपचारिक, पारिवारिक संबंध, त्याकरता एकेका कार्यकर्त्याबरोबर सहवास, कार्यकर्त्यांच्या लहान लहान गटांतून बैठकी, मनमोकळी प्रश्नोत्तरे, अभ्यासवर्ग आदी मोठ्या वृत्तपत्रांतून केल्या जाणाऱ्या धुवांधार प्रचाराव्यतिरिक्त आपल्या मित्रांनी चालविलेल्या नियतकालिकांतून व

---

* परिशिष्ट क्रमांक ११ पहा.

** श्री अरविंद म्हणतात,'' Inspiration is real work. Let a truely inspiring word be uttered and it will breathe life into dry bones. Let the inspiring life be lived and it will produce workers by thousands.''

['' प्रेरकता हे खरे कार्य आहे. एखादा खराखुरा प्रेरक शब्द उच्चारला जाऊ द्या आणि त्यायोगे शुष्क हाडांतही चैतन्य संचारेल. प्रेरणादायी जीवन जगा की त्यामुळे हजारो कार्यकर्ते निर्माण होतील.'']

पक्षाच्या साहित्यातून कार्यकर्त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था. एकेका कार्यकर्त्याचा स्वभाव, त्याची कार्यप्रेरणा (मोटिव्हेशन) व निरनिराळ्या कार्यकर्त्यांचे परस्परसंबंध (Personal Relations) यांची माहिती. त्यांतून कोणाची कोठे योजना करावी या विषयी अचूक निर्णय घेण्याची क्षमता. कार्यकर्ता कोणत्या परिस्थितीत आहे व कोणत्या अडचणींतून वाट काढीत आहे याची माहिती, त्याला त्यांतून मार्गदर्शन करण्याची तत्परता व त्याच्या कामगिरीचे योग्य मूल्यमापन. संघटनेच्या अंतर्गत कार्यकर्त्यांना नेतृत्वाकडून योग्य न्याय मिळेलच, कार्यकर्त्यांचे मूल्यांकन, त्यांची ध्येयनिष्ठा, गुणवत्ता व कर्तृत्व या कसोटीवरून होईल, व्यक्तिगत आवडी-निवडीचा त्यावर परिणाम होणार नाही, असा विश्वास त्यांच्या मनात आपोआप – तोंडाने तसे बोलून न दाखविताही – निर्माण व्हावा असा व्यवहार. देशाच्या सार्वजनिक जीवनात अभावानेच आढळणाऱ्या ध्येयानुकूल जीवनमूल्यांची कार्यकर्त्यांचे मनांत प्रतिष्ठापना व त्यानुसार, स्वकेंद्रित नव्हे तर, संघटनकेंद्रित विचार करीत राहाण्याचा संस्कार. व्यक्तिगत उपक्रमशीलतेची वाढ व संघटनात्मक मर्यादांचे पालन यांचा समन्वय साधणारी लवचिक शिस्त (Elastic Discipline). व्यक्तिगत सोयी गैरसोयींचे बाबतींत आग्रहाचा अभाव व तत्त्वांच्या बाबतींत तडजोडीचा अभाव अशी सवय लावणारी शिकवण. ध्येयनिष्ठा म्हणजेच आकाशातील ताऱ्यांशी प्रेम जुळविण्याचा मूर्खपणा ही स्पष्ट जाणीव कार्यकर्त्यांना दिल्यामुळे प्रदीर्घ कालपर्यंत धैर्यपूर्वक निरपेक्षबुद्धीने सतत काम करीत राहाण्याची त्यांची मानसिक तयारी. अशा कार्यकर्त्यांच्या नुसत्या बोलण्याने नव्हे, तर प्रत्यक्ष व्यवहारामुळे सहवासात येणाऱ्या मंडळींच्या मनात निर्माण होणारी पक्षाविषयीची विश्वसनीयता, प्रत्यक्ष पक्षसदस्य, सहानुभूतिपूर्ण लोकांचे पहिले वर्तुळ व त्यांतून निर्माण होणारे " उपकारक तटस्थतेचे क्षेत्र " (Zone-of benevolent neutrality) हे सर्व मिळून पक्षसंघटनेची आवश्यक पूर्वसिद्धता (Infra-structure) पूर्ण होते. ही पूर्वतयारी घडवून न आणता केवळ धुवांधार प्रचार व पुढाऱ्यांचे प्रतिमा-निर्माण (Image-building) यांच्या आधारावर पक्षाचा प्रभाव वाढविण्याचा प्रयत्न म्हणजे जमिनीत पाळेमुळे नसलेल्या पतंगाची आकाशातील भिरभिर होय, असे पंडितजींचे मत होते. पूर्वसिद्धता नीट झाल्यानंतर आवश्यकतेनुसार धुवांधार प्रचाराचे तंत्र प्रसंगोपात्त अवलंबावे लागते. परंतु तेही काम सफलतापूर्वक करणे अशा Infra-structure शिवाय शक्य होत नाही.* इतकेच काय पण कार्यकालेसमुत्पन्ने पक्षाला धनबळ व जनबळ यांचीही मदत मिळाली तरी तिचा पूर्ण व उचित उपयोग करून घेणे अशा Infra-structure च्या अभावी जमू

---

* कन्फ्यूशस म्हणतो, " There is a way to get the kingdom – get the people and the kingdom is got. There is a way to get the people – get their hearts and the people are got "

[" राज्यप्राप्तीचा एक मार्ग आहे – लोक मिळवा आणि राज्य मिळालेच असे समजा. लोक मिळविण्याचा एक मार्ग आहे– त्यांची अंतःकरणे जिंका आणि लोक तुम्हाला मिळालेच असे समजा. "]

शकत नाही. अशा शास्त्रशुद्ध पद्धतीने पक्षसंघटनेचा पाया घालण्याचे काम पंडितजींनी केले. ते एक कुशल संघटकही होते; परंतु एक श्रेष्ठ विचारक हा त्यांचा पैलू जनतेच्यासमोर इतक्या प्रकर्षाने आला की, एक श्रेष्ठ संघटक ही त्यांची भूमिका लोकांच्या दृष्टिआड झाली. त्यांच्या विचारकभूमिकेने त्यांच्या संघटक-भूमिकेवर अन्याय केला, असेच म्हटले पाहिजे.

एकदा श्रीगुरुजी उद्‌गारले होते. "And here we are the experts in the science of organisation." ["आम्ही संघटनेच्या शास्त्रातील तज्ज्ञ आहोत."]

राजकीय पक्ष-संघटनेच्या क्षेत्रात पंडितजींनी श्रीगुरुजींचे शब्द पूर्णपणे सार्थ करून दाखविले.

संघटना उभी करण्याच्या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा भाग म्हणजे प्रत्येक स्तरावर कार्यकर्त्यांची सुसंवादी टीम तयार करणे. या टीममधील सर्व कार्यकर्ते एकाच ध्येयमंदिराचे पथिक असतात, ध्येयसिद्धीच्या तळमळीने पेटलेले असतात. एकाच ध्येयाचे पुजारी व एकाच मार्गाचे पथिक असल्यामुळे परस्परांविषयी प्रेम व विश्वास बाळगून असतात. अशा सुसंवादी टीमला नेपोलियन हिलने Master-mind Group अशी समर्पक संज्ञा दिली आहे. या ग्रुपमधील कार्यकर्त्यांची संख्या वाढती असावी व प्रत्येक कार्यकर्त्याची ध्येयनिष्ठा व गुणवत्ता वाढती असावी, यात संघटनेच्या शक्तीचे मर्म आहे. असा ग्रुप प्रत्येक पातळीवर निर्माण व्हावा व तो संख्यात्मक, गुणात्मक * या दोन्ही दृष्टींनी सारखा वाढत रहावा याविषयी पंडितजी अखंड सतर्क असत. संमेलने, अधिवेशने आदी प्रकट सार्वजनिक समारंभांपेक्षाही, एकेका कार्यकर्त्याशी अनौपचारिक बोलणे यापासून तो अभ्यासवर्गापर्यंतच्या जडणघडणाच्या सर्व कार्यक्रमांना ते अधिक महत्त्व देत. दि. २७ जून १९५९ पासून दहा दिवस पुणे येथे झालेला अखिल भारतीय अभ्यासवर्ग महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांच्या स्मरणात आहेच. त्यापूर्वी सन १९५७ मध्ये दि. ८ ऑगस्ट ते १८ ऑगस्टपर्यंत छत्तीसगडमधील बिलासपूर येथे एकादशदिवसीय अखिल भारतीय अभ्यासवर्ग घेण्यात आला होता. या सर्व अभ्यासवर्गातून कार्यकर्ते तयार करण्याच्या दृष्टीने विशेष काळजी घेण्यात येई. विविध बैठकांतूनही या पैलूवर विशेष भर देण्यात येई. या सर्वांचे फळही पंडितजी जीवित असतानाच दिसायला लागले होते. सर्व स्तरांवर

---

* संख्या व गुणात्मकता यांच्या अनुमानाचे मार्गदर्शक उदाहरण नेपोलियनच्या पुढील शब्दांत आढळते :– 'These same Prussions who are so beautiful today were three to one at Jena and six to one at Montmirail."

[हेच आज सुंदर असणारे प्रशियन्स जेनाला एकास तीन आणि माँटमिरेलला एकास सहा असे होते.]

"गुरु गोविंदसिंह म्हणाले, सवालाखसे एक लढाऊं।"

कार्यकर्त्यांचे असे संच तयार होऊ लागले होते. त्यांतील कार्यकर्त्यांची गुणात्मक वाढ तर होतच होती, परंतु त्या गुणात्मकतेसहित प्रत्येक 'टीम' मधील कार्यकर्त्यांची संख्या वाढत होती.*

पंडितजी लोकशाहीचे कट्टे पुरस्कर्ते होते. परंतु लोकशाही म्हणजे पाश्चिमात्य पद्धतीचीच हे त्यांना मान्य नव्हते. भारतीय परंपरेशी सुसंगत लोकशाही रचना त्यांना अभिप्रेत होती. भारत ही सर्वांत विशाल (Largest) लोकशाही आहे, परंतु ही सर्वांत श्रेष्ठ (Greatest) मात्र म्हणता येणार नाही, याचे त्यांना दुःख होत असे. लोकशाहीच्या यशस्वीतेकरता लोकशिक्षण अनिवार्य आहे असे त्यांचे मत होते. पक्षसंघटन व जनअंदोलन यांचीही परिणामकारकता शेवटी लोकशिक्षणाच्या स्तरावरच अवलंबून राहील. लोकशिक्षण म्हणजे केवळ प्रचार (Propaganda) नव्हे, आत्मस्तुति - परनिंदा हा पक्ष-प्रचाराचा गाभा असतो. परंतु त्याने लोकशाही यशस्वी होऊ शकेल असे त्यांना वाटत नसे. त्यामुळे पक्ष-कार्यकर्त्यांच्या शिक्षणाबरोबरच जनशिक्षणाचाही आग्रह ते धरीत. या पद्धतीने रचनात्मक विचार करणाऱ्या पक्षांची व पुढाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे, ही गोष्ट लोकशाहीच्या भवितव्याच्या दृष्टीने चिंताजनक आहे असे ते म्हणत. लोकांच्या स्तरावर येऊन त्यांना समजेल अशा भाषेत विषय मांडणे हे पंडितजींचे वैशिष्ट्य होते. उदाहरणार्थ, एकदा अल्पशिक्षित श्रोतृसमूहासमोर 'संस्कृती म्हणजे काय' हा कठीण विषय मांडण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला. त्या वेळी त्यांनी पुढील उदाहरण दिले : प्रत्येकाला केव्हातरी जांभई येतेच. ती स्वाभाविक रीतीने येईल तशी देणे ही झाली प्रकृती. मुद्दाम वेडेवाकडे तोंड करीत, जोराने आवाज करीत, जांभई देणे, ही विकृती आणि आवाज न करता व प्रदर्शन टाळून जांभई देताना तोंडासमोर रुमाल धरणे ही संस्कृती. इतक्या सोप्या शब्दांत कठीण विषय मांडण्याची कला त्यांच्याजवळ होती. ते उत्तम लोकशिक्षक होते; परंतु त्यांना असे वाटत असे की, केवळ सत्तेच्यामागे धावणारा राजकारणी पुरुष खऱ्या अर्थी लोकशिक्षणाचे काम करू शकणार नाही. ज्याला सत्तारूढ होण्याची मुळीच इच्छा नाही तोच हृदयपूर्वक लोकशिक्षणाचे काम करू शकेल.

खऱ्या अर्थी लोकशिक्षणाचे काम राजकीय पुढाऱ्याला परवडण्यासारखे नसते. उदाहरणार्थ, आज पश्चिमेत व म्हणून भारतातही भौतिकताप्रधान अधिकारवादाची चलती आहे. त्या प्रवाहाला तोंड देऊन कर्तव्यधर्माचे आग्रहपूर्वक प्रतिपादन करणारे कांट, कार्लाईल, मॅझिनी, रेनोवीयर व ब्रॅडले हे थोर पुरुष अपवादभूतच आहेत. एकंदर पश्चिमी मनाचा कल अधिकारवादाकडेच आहे. त्यामुळे भारतीय सुशिक्षितही अधिकारवादीच आहेत. विचाराच्या या लाटेविरुद्ध उभे राहून भारतीय संस्कृतीच्या कर्तव्यधर्माचा विचार खणखणीतपणे प्रतिपादन करणे इतके सरळ नव्हते. परंतु स्वस्त लोकप्रियतेची किंमत देऊनही पंडितजींनी कर्तव्यधर्माची घोषणा केली. अशा लोकशिक्षणाच्या अभावी, बिल डचूरांट म्हणतात त्याप्रमाणे, क्रांतिकारक यशस्वी झाले की, ज्यांना त्यांनी पदभ्रष्ट केलेले असते, त्यांच्याच नीतीचा व मार्गाचा अवलंब ते करतात.

---

* परिशिष्ट क्र. १२ पहा.

जननेता हा आपल्या राष्ट्राचा सजग प्रहरी असावा लागतो. तो जागृत असतो म्हणून इतर लोक स्वस्थपणे झोप घेऊ शकतात. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर थोड्याच काळात श्रीगुरुजी व अन्य देशभक्तांना भारतात काम करणाऱ्या विदेशी गुप्तचरसंस्थांच्या कारवायांविषयी चिंता वाटू लागली होती. व ती त्यांनी प्रकटही केली होती. राजकीय क्षेत्रात या प्रश्नाला हात घालणे म्हणजे 'अवघड जागीचे दुखणे होईल' असे, मतांचे याचक असलेल्या सत्तारूढ व विरोधी पक्षांनाही वाटत असे. कारण अशा गुप्तचरसंस्थांच्या कारवाया देशद्रोही असल्या तरी त्या सर्वांच्या गठ्ठामतांच्या लॉबीज देशात विद्यमान होत्या व त्यांना दुखवणे सत्ताकांक्षी मंडळींना परवडण्यासारखे नव्हते. राजकारणाच्या क्षेत्रात पंडितजी हे पहिलेच असे पुढारी की, ज्यांनी विशुद्ध राष्ट्रहिताच्या भावनेने प्रेरित होऊन गठ्ठामतांची पर्वा न करता या प्रश्नावर आवाज उठविला. त्या वेळी त्यांचे बोलणे राजकीय क्षेत्रातील अरण्यरुदनासारखेच वाटले. या बाबतीत पावले उचलण्याची प्रमुख जबाबदारी अर्थातच सरकारची होती. परंतु पंडितजींच्या मृत्यूपर्यंत व त्यानंतरही सरकारने या इशाऱ्याची दखल घेतली नाही. जणूकाही डोक्यावरून पाणी जाईपर्यंत निष्क्रिय रहाण्याचा सरकारने निर्धारच केला होता. मामला नाजुक असल्यामुळे सबुरीने घेणे आवश्यक होते. परंतु शेवटी सरकारची निष्क्रियता असहच झाल्यामुळे दि. २० नोव्हेंबर १९७२ ला जनसंघाने प्रकटपणे अशी मागणी केली की, भारतातील विदेशी गुप्तचर संस्थांच्या कारभाराविषयी चौकशी करण्याकरिता एक कमिशन नियुक्त करण्यात यावे. प्रकट ठराव नंतर झाला असला तरी या प्रश्नाला राजकीय मंचावरून वाचा फोडण्याचे काम सर्वप्रथम पंडिजींनीच केले. ही गोष्ट त्यांच्या विशुद्ध मातृभक्तीचा, दूरदृष्टीचा व अखंड सावधान वृत्तीचा परिचय करून देणारी आहे. संभाजी राजांना लिहिलेल्या पत्रात समर्थांनी आग्रहपूर्वक म्हटले आहे की, 'अखंड सावधान असावे.' ही सावधानता जो ठेवील तोच यशस्वी संघटक, संघर्षकारी व लोकशिक्षक बनू शकतो.

सार्वजनिक संस्था व सार्वजनिक कार्य यांचा आर्थिक व्यवहार चोख असावा याविषयी पंडितजींचा सुरुवातीपासूनच फार आग्रह असे. परंतु सन १९६७ च्या निवडणुकांनंतर काही प्रांतांत जनसंघासहित संविद सरकारे स्थापन झाल्यानंतर या विषयासंबंधीची त्यांची जागरूकता अधिकच वाढली. कलकत्त्याच्या एस्. बी. दांडेकर आणि कं. चे श्री. वसंत विनायक बापट यांना पंडितजींनी योजनापूर्वक दिल्ली येथील केंद्र-कार्यालयाचे, मुंबई येथील महाराष्ट्र-राज्य-कार्यालयाचे व लखनौ येथील उत्तरप्रदेश राज्य-कार्यालयाचे हिशेबांची तपासणी करण्याकरिता व तेथील आर्थिक व्यवहारांना शिस्त लावण्याकरता पाठविले होते. इतरही राज्यांत श्री. बापट यांचा याच उद्देशाने प्रवास व्हावा अशी त्यांची कल्पना होती.

खरा लोकशिक्षक व संघटनशास्त्राचा तज्ज्ञच आंदोलनाचे नेतृत्व यशस्वीरीतीने करू शकतो. पंडितजींची राजकीय कारकीर्द म्हणजे आंदोलनपर्वच होते. विभिन्न प्रश्नांवर व विभिन्न स्तरांवर चळवळी चालूच असत. त्या सर्वांची जंत्री देण्याचे येथे कारण नाही. त्यांच्या कारकीर्दीतील पहिले आंदोलन काश्मीर-सत्याग्रहाचे होते. दि. ६-३-१९५३ ला

दिल्ली येथे काश्मीर-सत्याग्रहाचा प्रारंभ झाला; * दि. ११ मे स डॉ. मुखर्जींनी जम्मूत प्रवेश करून अटक करून घेतली व २३ जूनला त्यांनी हुतात्म्याचे मरण स्वीकारले. हे पंडितजींच्या कारकीर्दीतील पहिले आंदोलन होते. या सत्याग्रहात अकरा हजार लोकांनी भाग घेतला होता. **

सर्वांत मोठे आंदोलन कच्छ-करारावरुद्ध झाले. दि. १-७-१९६५ ला कच्छ-करारावर सह्या झाल्या. दि. २३ जुलै ते ९ ऑगस्ट या अवधीत संपूर्ण देशात कच्छ-करारावरोधी जवळजवळ एक लक्ष निदर्शने झाली आणि दि. १६ ऑगस्ट १९६५ ला पार्लमेंट-हाउससमोर पाच लाख लोकांचे विशाल प्रदर्शन करण्यात आले. अशा सर्व लहानमोठ्या चळवळींना मार्गदर्शन करण्याचे काम पंडितजी करीत असत. ते सूत्रसंचालक आहेत ही जाणीव कार्यकर्त्यांना प्रेरणादायक असे. ते पंडितजींकडे केवळ एक माननीय पुढारी या नात्याने बघत नसत. आपल्या ध्येयदेवतेची राजकीय क्षेत्रातील सगुण साकार मूर्ती याच दृष्टीने सर्वजण पंडितजींकडे पाहात असत. त्यामुळे अत्युच्च साहस व त्याग प्रकट करण्याची इच्छा कार्यकर्त्यांच्या मनात निर्माण होई. सन १९५४ च्या जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवडचात मा. विनायकराव आपटे यांच्या मार्गदर्शनाखाली 'आझाद गोमांतक दल' हे नाव धारण करून राजधानी सेल्व्हासासह दादरा-नगर-हवेलीच्या मुक्ततेची यशस्वी मोहीम पार पाडणारे सर्वश्री त्र्यंबक भट, विश्वनाथ नरवणे, सुधीर फडके, नाना काजरेकर, राजाभाऊ वाकणकर, रमण गुजर, शिवाजी जाधव, धनाजी बुरंगुळे, विष्णू भोपळे, शांताराम वैद्य, बाळकृष्ण साने, वसंत बडवे, बाबासाहेब पुरंदरे, श्रीकृष्ण भिडे, बिंदुमाधव जोशी, व त्यांचे वीर साथी; * दि. १५ ऑगस्ट १९५४ ला गोव्यातील पणजीच्या सचिवालयावर पोर्तुगीज सैनिकांच्या गोळीबाराची चिंता न करता भारताचा तिरंगा फडकवणारे श्री. हेमंत सोमण, दि. २३ जून १९५५ ला गोवा सरहद्द पार करून मृत्यूच्या मुखात प्रवेश करणारे श्री. जगन्नाथराव जोशी किंवा दि. १५ ऑगस्ट १९५५ ला गोवा संग्रामात आत्मबलिदान करणारे राजाभाऊ महांकाळ यांच्या मनश्चक्षूंसमोर प्रेरणास्रोत म्हणून पंडितजींची मूर्ती उभी असे. पंडितजी प्रत्येक चळवळीतील प्रश्नांचा तिच्या रणनीतीचा, बाह्य परिस्थितीतील वारकाव्यांचा सूक्ष्मपणे अभ्यास करून मार्गदर्शन करीत. कार्यकर्ते सर्वस्व पणाला लावायला

---

* देशाच्या अखंडतेकरिता जम्मूच्या प्रजापरिषदेने सुरू केलेले हे आंदोलन जनसंघाने उचलून धरले व त्याला देशव्यापी स्वरूप प्राप्त करून दिले.

** परिशिष्ट क्र. १३ पहा.

* दादरा-नगर-हवेलीच्या मुक्तिसंग्रामातील वीरांना भारताच्या आधुनिक इतिहासात उचित स्थान देण्यात येत नाही, ही दुःखाची गोष्ट आहे. या संग्रामात गोव्याचे सर्वश्री आप्पा करमळकर, विश्वनाथ लवंदे, शामराम लाड, प्रभाकर सितारी व मोहन रानडे यांनीही भाग घेतला होता. दादरा-नगर-हवेलीचे श्री. जयंतभाई देसाई व दमणचे श्री. विष्णुभाई पंड्या यांनीही महत्त्वपूर्ण साथ दिली होती.

प्रसिद्ध असत आणि पंडितजी प्रत्येक कार्यकर्त्याला आपल्या पोटच्या मुलाप्रमाणे समजून त्याची कामगिरीवर योजना करीत.

नेतृत्वाला आवश्यक असे अनेक गुण पंडितजींच्या ठायी प्रकर्षाने वास करीत असले तरी त्यांचा सर्वांत मोठा गुण हा होता की, स्वतःच्या मोठेपणाची जाणीव त्यांच्या मनाला कधीही स्पर्श करीत नसे. "कमळिणी काय – जाणे तो परिमल" किंवा "माते तृण वाळा – दुधाची ते गोडी" अशी त्यांची अवस्था असे. त्यांच्या बोलण्या-वागण्यावरून इतरांनाही त्यांच्या श्रेष्ठतेचा कधीच आभास होत नसे. त्यांच्या मनात स्वतःविषयीचा विचारच नसे. समोरच्या व्यक्तीशी ते तावडतोब एकरूप होत. कालिकत-अधिवेशनाचे वर्णन करताना श्री. पी. परमेश्वरन् म्हणतात, –

"दीनदयाळजी अधिवेशनाच्या स्थळी मोटारमधून कधी जात नसत. इतर प्रतिनिधींप्रमाणे पायी चालत जात. प्रवेशद्वाराजवळ थांबून तेथील स्वयंसेवकाला आपला पास दाखवीत. ते जेथे उतरले होते तेथे धोबी कपडे न्यावयास आला की, ते त्याला म्हणायचे "बैठो भई." धोब्याला एवढा मोठा नेता आपल्याला 'भाई' म्हणतो याचीच अपूर्वाई वाटायची. काही दिवसांतच दीनदयाळजींच्या मृत्यूची बातमी वृत्तपत्रात वाचताच त्याच्या डोळ्यांत अश्रू आले."

एकदा दिल्लीला एका कार्यक्रमासाठी निघताना त्यांनी आपली बॅग उघडली. प्रवासावरून ते नुकतेच परतले होते व सर्व कपडे मळके झाले होते. जवळच्या कार्यकर्त्याला ते बरे वाटले नाही. अशा मळक्या कपड्यांत पक्षाचे अखिल भारतीय महामंत्री सभेत येणार ? "पंडितजी ! तुम्ही माझा हा स्वच्छ कुडता घाला." तो म्हणाला, पंडितजी हसून म्हणाले, "त्यामुळे माझ्या धोतराचा मळकटपणा अधिकच जाणवेल. त्यापेक्षा आहे हाच कुडता बरा."

---

* हिटलरने आपल्या आत्मचरित्रात म्हटले आहे, "The union of theorist, organiser and leader in one man is the rarest phenomenon on this earth."

[एकाच व्यक्तीत तत्त्वचिंतक, संघटक व नेता यांचे गुण आढळणे ही जगातील अत्यंत दुर्मिळ घटना होय.]

पंडितजींच्या नेतृत्वगुणांचा साकल्याने विचार करणाऱ्याला भगिनी निवेदितांनी आद्य शंकराचार्यांच्या नेतृत्वगुणांचे केलेले पुढील मूल्यांकन आठवणे स्वाभाविकच आहे. निवेदिता म्हणतात, "Shankara united in one person the devotion of St. Francis, the intellect of Abelard, the force and freedom of Martin Luther and the political efficiency of Ignatius of Loyola."

[शंकराचार्यांच्या ठायी सेंट फ्रान्सिसची भक्तिसंपन्नता, ॲबेलार्डची बुद्धिमत्ता, मार्टिन ल्यूथरचा जोम आणि विमुक्तपणा आणि लोयोलोच्या इग्नेशियनची व्यावहारिक कार्यक्षमता हे गुण एकवटलेले होते.]

असे एक ना दोन शेकडो प्रसंग. प्रवासात पक्षाच्या सामान्य कार्यकर्त्यांच्या घरीच त्यांचा मुक्काम असावयाचा व घरच्या मंडळींनाही वाटायचे की, आपल्या कुटुंबातीलच ते एक आहेत.(अलौकिक जो हमे – लोकांप्रति ।) स्वत.च्या व्यक्तिगत सोयीगैरसोयींकरता कार्यकर्त्यांना त्रास द्यावयाचा नाही, हा त्यांचा स्वभाव होता. त्यामुळे त्यांची आवड-निवड खरोखर काय आहे, हेही कळत नसे. भाषा मृदू, स्वभाव गोड, सवयी प्रचारकाला शोभणाऱ्या. श्री. मा. कृ. केळकर यांनी नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या त्यांच्या लेखात पंडितजींच्या आत्मविलोपी व्यक्तित्त्वाचे वर्णन ' वेदांती व्यक्तित्व ' या शब्दांत केले आहे ते अगदी यथार्थ आहे. त्यामुळे नेहमी त्यांच्या सहवासात राहाणाऱ्या व्यक्तीलाही ते स्वतःसारखेच किंवा आपल्यांतीलच एक असे वाटे. अशा सर्वच निकटवर्तीयांना पंडितजींच्या आकस्मिक निधनानंतर त्यांच्या खऱ्या थोरवीचा जणू एकदमच साक्षात्कार झाला व विश्वरूपदर्शनामुळे भांबावलेल्या अर्जुनासारखी त्यांची मनःस्थिती झाली.

सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं हे कृष्ण, हे यादव, हे सखेति ।
अजानता महिमानं तवेदं मया प्रमादात् प्रणयेन वाऽपि ।।

संघटनशास्त्राच्या दृष्टीने पंडितजींच्या सहवासात राहून काम करण्याचा ज्यांना ज्यांना योग आला ते खरोखर भाग्यशाली होत. पंडितजींचे असे अनेक सहकारी आजही राजकारणात व विपुल प्रसिद्धीच्या प्रकाशात आहेत. त्यांचे विस्मरण आज कोणालाही होऊ शकत नाही. ते आपापले नेतृत्व स्वकर्तृत्वाने टिकवून आहेत. परंतु काही प्रमुख संघटक सहकार्यकर्ते आज निरनिराळ्या कारणांनी राजकीय क्षेत्राच्या बाहेर आहेत. कर्नाटकचे वरदराज शेट्टी, तामिळनाडूचे वासुदेवन्, महाकोसलचे सुभाष बॅनर्जी, नागपूरचे जाल गिमी, विंध्य प्रदेशचे हुकुमचंद जैन, बिहारचे ताराकांत झा, आसामचे रमेश मिश्र, ओरिसाचे श्रीधर आचार्य, मुंबईचे मधुकरराव महाजन, गुजरातचे सुमंत पारीख, श्रीमती हिराबाई अय्यर ही मंडळी या प्रकारात मोडतात. काही राजकीय क्षेत्राबाहेर असले तरी सार्वजनिक जीवनात काम करीत आहेत. सर्वश्री रामभाऊ गोडबोले, डॉ. ओमप्रकाश मैंगी, प्रभाकरराव फैजपूरकर, पी. परमेश्वरन्, सौ. सुमतीबाई सुकळीकर, लाला भगवानदासजी, गिरिराज किशोर आचार्य हे सर्व अन्यान्य आघाडचांवर आज सक्रिय आहेत. परंतु दुर्दैवाने पंडितजींचे काही सहकार्यकर्ते कालवश झाले आहेत. बंगालचे रामप्रसाद दास, सत्येन बोस, हरिपद भारती व रामदास कळसकर, आंध्रचे गोपाळराव ठाकूर, कर्नाटकचे सौमित्री शर्मा, एम्. ए. व्यंकटराव व भाऊराव देशपांडे, दिल्लीचे टेकचंद शर्मा, गुजरातचे वसंत गजेंद्रगडकर, महाराष्ट्राचे रामभाऊ म्हाळगी व प्रेमजीभाई असर, विदर्भाचे बबनराव देशपांडे, महाकोशालचे गिरीराज किशोर कपूर, मद्रासचे व्ही. राजगोपालाचारी व उत्तरप्रदेशचे माधवप्रसाद त्रिपाठी ही मंडळी यांत प्रामुख्याने आहेत. या सर्व ब्रह्मीभूतांचे स्मरण म्हणजे अल्पांशाने का होईना पण ऋषिऋण फेडण्याचा प्रयास आहे.

हे निराळे सांगण्याची आवश्यकता नाही की, यांतील बहुतेक सर्व रा. स्व. संघातून आलेले आहेत आणि ते स्वाभाविकच आहे. कारण सन १९४७ नंतर देशातील सर्व लोक

व्यवहारचतुर झाले आहेत. घरचे खाऊन लष्करच्या भाकऱ्या भाजणारे 'पागल' लोक संघाबाहेर क्वचितच आढळतील.

रा. स्व. संघ व भारतीय जनसंघ यांतील परस्पर संबंधांचे स्वरूप काय, हा प्रश्न वारंवार उपस्थित केला जातो व याविषयी दोहोंच्या प्रवक्त्यांची, तसेच त्रयस्थांचो वक्तव्येही अनेकदा प्रकाशित झाली आहेत. श्री. ग्रेग बॅक्स्टर (Greig Baxter) यांच्या प्रमाणेच जनसंघाचा सखोल अभ्यास करणारे एक विद्वान् श्री. वॉल्टर के. अंडरसेन (Walter K.Aanderson) यांनी आपल्या 'The Janasangh-Ideology and Organisation in Party Behaviour' या प्रबंधात या विषयासंबंधी व्यक्त केलेला अभिप्राय विचारात घेण्यासारखा आहे.

आपल्या मुख्य अभिप्रायाची पार्श्वभूमी तयार करताना श्री. अँण्डरसेन अन्य विचारकांचे काही सर्वसाधारण निष्कर्ष प्रथम कथन करतात. आपल्या 'Ideology as a Cultural System' या ग्रंथात श्री. Clifford Geertz म्हणतात. "Ideologies function as Road Maps guiding people to desired political end."

["इच्छित राजकीय उद्दिष्टांकडे जाण्यासाठी विचारप्रणाली मार्गाच्या नकाशाप्रमाणे काम करतात."]

'Shri Robert Michels आपल्या 'Political Parties' मध्ये म्हणतात की, 'Parties which operate in a democratic political system have a tendency to dilute their political goal by maximising support from heterogeneous political elements."

["लोकशाही राजकीय व्यवस्थेत काम करणाऱ्या पक्षांत विषम राजकीय घटकांचा जास्तीत जास्त पाठिंबा मिळवून आपले राजकीय उद्दिष्ट सैल करण्याची प्रवृत्ती असते."]

ह्याच पुस्तकात Robert Michels नी काढलेला एक निष्कर्ष लेनिनने आपल्या 'What is to be done' मध्ये काढलेल्या निष्कर्षाशी मिळताजुळता आहे.तो असा की, "Ideological commitment is less likely to be diluted if a separate ideological elite structure socialises and supplies the party with its workers."

["जर वैचारिक दृष्टचा प्रबुद्ध असलेल्या निवडक कार्यकर्त्यांचा वेगळा वर्ग समाजात काम करून पक्षाला कार्यकर्ते पुरवीत असेल, तर पक्षाची वैचारिक बांधिलकी सैल होण्याचा फार कमी संभव उरतो."]

या पार्श्वभूमीवर श्री. अँण्डरसेन जनसंघाच्या दाढर्याचे निदान करतात.–

"The Janasangh has been able to maintain a high level of ideological commitment among its strategic elites by recruiting workers from the R. S. S."

[" राष्ट्रीय स्वयंसेवक संघातून कार्यकर्त्यांची भरती करून आपल्या वैचारिक भूमिकेचा घट्टपणा प्रमुख कार्यकर्त्यांत उत्तम प्रकारे टिकवून धरण्यात जनसंघाने यश मिळविले आहे."]

निष्कर्षरूपाने श्री. ॲण्डरसेन सांगतात. " My major thesis is that the Jana-sangha's ability to retain a loyal cader is a result of its close links with the R. S. S."

[" माझे मुख्य प्रतिपादन हे आहे की निष्ठावंत कार्यकर्त्यांचा संच टिकवून ठेवण्याची जनसंघाची क्षमता रा. स्व. संघाशी असलेल्या निकटच्या संबंधामुळेच शक्य झाली आहे."]

या रचनेमुळे संघ आणि स्वयंसेवकांच्या प्रभावाखालील राजकीय व गैरराजकीय संस्था यांचे संबंध कम्युनिस्ट पार्टी व पार्टीच्या फ्रंट ऑर्गनिझेशन्ससारखे होणार नाहीत काय ? ॲण्डरसेन यांचे निरीक्षण असे आहे.–

" The R. S. S. established a loose symbiotic relationship with each of its affiliates. By assuming the socialisation function for the affiliate workers, the R. S. S. retained its original ' educational ' purpose. Golwalkar and other senior R. S. S. figures recognised that if the R. S. S. were to retain its socialisation function, it would have to remain outside the conventional political process and remain aloof from the decision - making process in the affiliates. Had the R. S. S. leadership been drawn into politics, they would not have much of the aura of detachment which provides them their legitimacy as teachers, ' cultural ' commentators and arbitrators. Moreover, they genuinely fear that the central values of the R. S. S. would be seriously diluted by the bargaining process required in the political arena."

[" रा. स्व. संघाने आपल्या संलग्न संघटनांशी एक symbiotic संबंध प्रस्थापित केला आहे. संलग्न संस्थांतील कार्यकर्त्यांसाठी समाजात काम करण्याचे पत्करून त्याने आपला मूळ ' शैक्षणिक ' उद्देश कायम ठेवला आहे. गोळवलकर आणि अन्य ज्येष्ठ संघ-कार्यकर्ते यांना याची जाणीव आहे की जर संघाला आपली समाजव्यापी बनण्याची भूमिका कायम राखावयाची असेल तर रूढ राजकीय प्रक्रियेपासून त्याला दूर राहावे लागेल आणि संलग्न संस्थांतील निर्णय घेण्याच्या प्रक्रियेपासूनही अलिप्तता बाळगावी लागेल. जर रा. स्व संघाचे नेतृत्व राजकारणात ओढले गेले असते, तर उपदेशक, ' सांस्कृतिक भाष्यकार ' आणि मध्यस्थ या नात्याने मान्यता लाभण्यासाठी जे अलिप्तपणाचे वलय लागते, ते त्यांना फारसे मिळू शकले नसते. शिवाय त्यांना खरोखरीच अशी भीती वाटते की राजकीय क्षेत्रात जो सौदेबाजीचा प्रकार आवश्यक ठरतो, त्यात संघाच्या प्राणभूत मूल्यांचा कडवे-पणा नाहीसा होऊन जाईल."]

प. पू. श्रीगुरुजींच्या मनात काय होते वा नव्हते हा निराळा प्रश्न आहे. परंतु ॲण्डरसेनसारख्या विदेशी निरीक्षकाचा हा माइंड-रीडिंगचा प्रयत्न कौतुकास्पदच म्हटला पाहिजे.

राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवकांची मनःस्थिती व मोटिव्हेशन याविषयी ते म्हणतात :

" The Swayamsevaks tend to perceive political participation as an extension of their former R. S. S. activities. For the more committed, participation is gratifying not necessarily for the material rewards or the power that are potentially theirs, The political task, like the ' Cultural ' task in the R. S. S. is to mobilise people behind the R. S. S. belief system. Indeed, if this were not so, the Janasangh, which has seldom been in a positon to distribute patronage and power, could not have elicited such, sustained commitment."

[" राजकारणातील सहभाग म्हणजे आपल्या संघाच्या पूर्वीच्याच कार्याचा विस्तार आहे असे मानण्याकडे स्वयंसेवकांचा कल आहे. जे विचाराने अधिक कडवे आहेत त्यांच्या दृष्टीने राजकारणातील सहभाग स्वागतार्ह ठरतो तो भौतिक लाभांसाठी अथवा सत्ता हस्तगत होईल म्हणून नव्हे. त्यांना वाटते की, 'सांस्कृतिक' कार्याप्रमाणेच राजकीय कार्याचाही उद्देश संघाच्या विचारपद्धतीमागे लोकमताचा पाठिंबा उभा करणे हा असला पाहिजे. असे जर नसते तर सत्ता व भौतिक लाभ यांचे वितरण करण्याची क्षमता नसलेल्या जनसंघाला एवढा काळपर्यंत निष्ठावंत अनुयायांचा लाभ झालाच नसता."]

एका विवेकशील विदेशी विचारकाचा अभिप्राय या नात्याने वरील उदाहरण विचारणीय आहे. या विषयासंबंधीची वस्तुस्थिती अधिकृतरीत्या श्रीगुरुजींनी 'ऑर्गनायझर'च्या दि. २५ जून १९५६ च्या अंकात स्पष्ट केली आहे व त्याचा उल्लेख या ग्रंथातही विस्तृतपणे आला आहे.

(प. पू. श्रीगुरुजींच्या या लेखात एका संबंधित गोष्टीचा उल्लेख मात्र आलेला नाही. त्या वेळी हा उल्लेख करणे औचित्याला सोडून झाले असते. आज तसे करण्यात औचित्यहानी तर नाहीच, उलटपक्षी त्या काळच्या परिस्थितीची पूर्ण कल्पना यावी, या दृष्टीने या गोष्टीची माहिती इथे देणे आवश्यकही आहे. संघ व संघाचे स्वयंसेवक यांचे-विषयी सरदार पटेल व पं. नेहरू यांचे दृष्टिकोन किती भिन्न होते हे सर्व जाणतात. संघा-वरील बंदी उठवल्यानंतर संघाविषयी सरदार पटेलांच्या मनात कोणते विचार चाललेले होते याचे स्पष्ट दर्शन त्यांच्या एका पत्रातून होऊ शकते. हे पत्र सरदार पटेलांनी श्री. वेंकटराम शास्त्री यांना दि. १६ जुलै १९४९ रोजी लिहिले होते. त्यातील संबंधित भाग पुढीलप्रमाणे आहे :—

" I am glad that you expect to see Shri. Golwalkar and give him some wholesome avdice. I am sure he needs it. You know the condition prevailing in your own province. You have also an idea of the firm conviction that the only alternative to Congress is chaos. At least there is no political body to strengthen that organisation, I have advised the R.S.S. in the past that the only way for them is to reform the Congress from within, if they think the Congress is going on the wrong path. I would suggest, if you agree, that you may take a similar stand. "

[" आपण श्री. गोळवलकरांना भेटणार आहात व त्यांना काही पथ्यकर सल्ला देणार आहात, याचा आनंद होतो. त्यांना असा सल्ला हवाच आहे. तुमच्याच प्रांतात काय परिस्थिती आहे, हे तुम्ही उत्तम प्रकारे जाणता. आज काँग्रेसला एकमेव पर्याय म्हणजे अराजक आहे. ही माझी ठाम धारणा असल्याचे आपल्याला पुरतेपणी ठाऊक आहेच. काँग्रेस संघटनेला वळ देणारी कोणतीही राजकीय संस्था आज नाही, हे तर नक्कीच. यापूर्वी मी संघाला सल्ला दिला आहे की जर काँग्रेस चुकीच्या मार्गाने जात आहे असे त्यांना वाटत असेल तर काँग्रेसमध्ये सामील होऊन आतून काँग्रेसची सुधारणा करणे हाच एक मार्ग त्यांच्यापुढे मोकळा आहे. माझी ही भूमिका आपल्याला मान्य असेल तर तीच आपणही स्वीकारावी अशी माझी सूचना आहे."]

यावर वेगळे भाष्य अनावश्यक आहे. मूळ मजकूरच पुरेसा बोलका आहे.)

सत्तावादी राजकीय पुढारी या सर्व गोष्टी कितपत समजू शकेल याविषयी संदेहच आहे. कारण पूर्वी म्हटल्याप्रमाणे तो एकाग्रचित्ताने केवळ सत्तेवरच दृष्टी ठेवून असतो. जीवनाचे सारसर्वस्व म्हणजे राजकीय सत्ता, अशी त्याची धारणा असते.* ही धारणा चुकीची आहे, समग्रतेने प्रत्येक पैलूचा विचार करण्याच्या हिंदू-परंपरेला सोडून आहे व खऱ्या बुद्धिवादी मनाला न पटणारी अशी आहे. खरा बुद्धिवादी - मग तो हिंदू परंपरेचा अनुयायी असो वा नसो – साकल्याने, समग्र बुद्धीनेच प्रत्येक प्रश्नाचा विचार करतो. उदाहरणार्थ – रॅडिकल ह्युमॅनिस्ट विचारक श्री. व्ही. एम्. तारकुंडे यांचे पुढील विधान पाहा.

" Politics being a part of social life, political ideals and political practice must be co-related, not only to each other, but to a total view of existence with a clear conception of the basic instincts of man, the place of the individual in society, and the general course of history and evolution. "

* सत्तापरिवर्तन राजकीय तत्त्वज्ञानातील क्रांतिशिवायही होऊ शकते. अशा राजकीय क्रांतीनंतरही समाजरचनेत गुणात्मक अंतर येत नाही. राजकीय तत्त्वज्ञानातील क्रांती दोन मार्गांनी होते. एकतर, प्रचलित विचारप्रणाल्यांहून एकदम भिन्न अशा नवीन विचारप्रणालींचा विकास, किंवा दुसरे, विद्यमान विचारप्रणालींना आतापर्यंत प्रचलित नसलेला असा नवीन अर्थ प्रदान करणे.

[" राजकारण हा समाजजीवनाचा एक भाग असल्यामुळे, राजकीय उद्दिष्टे आणि राजकीय व्यवहार एकमेकांशी संबद्ध असले पाहिजेत. ते एकमेकांशी संबद्ध असले पाहिजेत एवढेच केवळ नव्हे तर, मूलभूत मानवी प्रवृत्ती, व्यक्तीचे समाजातील स्थान आणि इतिहासाची व उत्क्रांतीची सर्वसाधारण दिशा यांची सुस्पष्ट कल्पना ठेवून अस्तित्वाच्या समग्र विचारांशीही त्यांची सुसंबद्धता राखली पाहिजे. "]

या विशिष्ट संदर्भात हिंदू विचारपद्धतीची दिशाही अशीच आहे हे वेगळे सांगावयास नको.

सारांश, प्रतिज्ञा ग्रहण केली त्या क्षणापासून पं. दीनदयाळजींचा व्यवहार आदर्श स्वयंसेवकाला साजेसा असाच होता.

राष्ट्रजीवनाच्या विभिन्न क्षेत्रांत कार्य करणाऱ्या स्वयंसेवकांकडून संघाच्या असलेल्या अपेक्षा त्यांनी शतप्रतिशत पुऱ्या केल्या. आपल्या क्षेत्रातील कार्याची रचना व विचारांचा विकास त्यांनी संघ-सिद्धांतांच्या प्रकाशात केला. आपल्या क्षेत्रात जलद यश प्राप्त व्हावे, या इच्छेने त्यांत पूर्वीपासून चालत आलेल्या चुकीच्या सवयी व रीतीनीती यांचा स्वीकार करण्याचा मोह सामान्य माणसाला होतो. पंडितजी ह्या मोहाला बळी पडले नाहीत. संघ-संस्कारांना अनुकूल पद्धती व रीतीनीतीचा त्यांनी राजकीय क्षेत्रात सूत्रपात केला. यामुळे तात्कालिक यशप्राप्तीला बाधा येईल हे ते जाणून होते. परंतु इतरांनी अस्वच्छ करून ठेवलेल्या कार्यक्षेत्राला स्वच्छ, परिष्कृत करण्याचे आपले काम आहे, मग त्यामुळे कार्य-सिद्धीला विलंब झाला तरी चालेल, अशी त्यांची विचारसरणी होती.* ध्येयनिष्ठा, विचारांची स्पष्टता व दूरदर्शिता या तीनही गुणांचा संगम त्यांच्या ठायी झाला होता. त्यामुळे ते जाणत होते की, अशास्त्रीय घिसाडघाईमुळे अक्षम्य विलंब होतो. श्रीगुरुजींच्या ' Hasten slowly ' या मार्गदर्शनातील रहस्य त्यांनी नीट ओळखले होते. तसेच श्रीगुरुजींच्या दुसऱ्याही सूचनेचे मर्म त्यांना आकलन झाले होते. अन्य क्षेत्रांत काम करणाऱ्या स्वयंसेवकांनी शाखेशी नित्य संबंध ठेवण्याच्या बाबतीत इतर स्वयंसेवकांहूनही अधिक आग्रही असले पाहिजे, ही ती सूचना होय. ही सर्व पथ्ये निरंतर सांभाळून त्यांनी अशा स्वयंसेवकांकरता एक परिपूर्ण आदर्श प्रस्तुत केला होता. या दृष्टीने पंडितजींच्या वैशिष्ट्यांचे व्यवच्छेदक विवरण मा. भाऊराव देवरस यांनी दि. २५ सप्टेंबर १९७९ या दिवशी दीनदयाळ शोध

---

* जमीनदारी–निर्मूलनाविषयी जनसंघाची भूमिका कायम ठेवली तर जनसंघाची तत्काळ बरीच हानी होईल व या तत्त्वाविषयी तडजोड स्वीकारली तर ही हानी टाळता येईल, अशी स्थिती राजस्थानमध्ये निर्माण झाली, त्यां वेळी तत्काळ पक्षाला बसणारा धक्का स्वीकारूनही पंडितजींनी तत्त्वाविषयी तडजोड करण्याला साफ नकार दिला व त्यामुळे होणारी हानी पत्करली, याचे अनेकांना स्मरण असेल. अशाप्रकारचे बरेच कठोर निर्णय त्यांना घ्यावे लागले.

संस्थानात केलेल्या भाषणात आढळते. *

[पश्चिमेतील नवपुनर्रचित नेतृत्वशास्त्राच्या परिभाषेत सांगावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की, पंडितजींचे नेतृत्व म्हणजे ' Transforming Leadership '; – Transactional Leadership नव्हे.]

३

इतिहास घडविणाऱ्या कोणत्याही थोर पुरुषाचे व्यक्तिदर्शन व विचारदर्शन कोणत्या वेळी प्रकाशित करण्यात औचित्य आहे यासंबंधी सरसकट एक नियम सांगता येणार नाही. विचारदर्शनाला उचित असलेली वेळ व्यक्ति-दर्शनाला उचित असेलच असे निश्चित सांगता येत नाही.

अनेक श्रेष्ठ पुरुषांच्या बाबतीमध्ये असे दिसते की, त्यांच्या कार्याचे खरे मूल्यांकन त्यांच्या समकालीनांना बरोबर होऊ शकत नाही. समकालीनांच्या समोर एक अडचण असते. त्या कालखंडामधले प्रश्न, त्यामध्ये निरनिराळचा लोकांनी घेतलेल्या निरनिराळचा भूमिका, त्यामुळे निर्माण झालेले पूर्वग्रह. तर ज्याची दृष्टी स्वच्छ आहे अशा माणसाला सुद्धा ज्याप्रमाणे वादळामध्ये सापडल्यानंतर डोळचांत धूळ गेल्यामुळे समोरच्या वस्तू स्पष्ट दिसत नाहीत त्याचप्रमाणे घटनाक्रमाच्या वादळात समकालीन लोक सापडलेले असतात, व त्यांना त्यामुळे मोठचा माणसाच्या जीवनाविषयी, कार्याविषयी खरे मूल्यांकन करणे कठीण जाते. ज्या वेळेला वादळ शांत होते, डोळचांतील धूळ निघून जाते, दृष्टी साफ होते, अशा वेळेला मग खरे मूल्यांकन करणे शक्य होते. आणि ह्याला वेळ लागतो – कधी काही दशकांचा, कधी काही शतकांचा सुद्धा !

अशी ही विलक्षण प्रक्रिया आहे. नेपोलियन वॉटर्लूहून परत आल्यानंतर संपूर्ण फ्रेंच राष्ट्राचे, त्याच्याविषयीचे मूल्यांकन फारच खालच्या स्तराचे होते. पण काही दशकांनंतर हा आपला फार श्रेष्ठ राष्ट्रपुरुष आहे, असे संपूर्ण फ्रेंच राष्ट्राचे मत झाले. त्याच्या अस्थी गौरवपूर्वक, सेंट हेलिनावरून आणण्यात आल्या आणि त्याचे पुतळे उभारण्यात आले.

जीझस ख्राइस्टला ज्या राज्यकर्त्यांनी ' एक दुष्ट मनुष्य ' म्हणून सुळावर चढविला त्यांना ३३० वर्षांनंतर आपले मूल्यांकन बदलावे लागले. हा एक श्रेष्ठ पुरुष होता, इतकेच मानून ते थांबले नाहीत तर त्याच्या मताचाही त्या रोमन राज्यकर्त्यांनी स्वीकार केला.

कदाचित् क्लासिकल उदाहरण जोन ऑफ आर्कचेच असेल. केवळ अपप्रचाराला बळी पडून या श्रेष्ठ स्त्रीची निंदा लोकांनी केली. व्हेटिकन सिटीने सुद्धा ती एक ' नीच स्त्री ' आहे

---

* परिशिष्ट क्र. १४ पहा.

असे म्हटले व तिला जिवंत जाळण्यात आले. परंतु ५०० वर्षांनंतर त्याच व्हेटिकन सिटीने 'सेंट' म्हणून तिला गौरविले.

अशा कित्येक उदाहरणांवरून हे ध्यानात येते की, कुणाच्याही श्रेष्ठतेचा निर्णयात्मक मापदंड वर्तमानकालीन प्रसिद्धी किंवा लोकप्रियता नसतो. त्याच्या कार्याची छाया भविष्य-काळात किती दूरवर पडते यावर त्याचे श्रेष्ठत्व अवलंबून आहे.

तेव्हा जे जे श्रेष्ठ आणि म्हणून वादळी व्यक्तिमत्व असेल, त्याच्याविषयी समकालीनांचे मूल्यांकन प्रमाण मानता येत नाही.*

सारांश, अनेक थोर पुरुषांच्या बाबतीत असे म्हणता येण्यासारखे आहे की, त्यांचे यथार्थ व्यक्तिदर्शन घडण्यासाठी मध्ये काही काळ लोटणे आवश्यक व कधी कधी अपरिहार्यही होऊन बसते.

ज्या प्रमाणे व्यक्तीच्या मूल्यांकनाला, त्याचप्रमाणे मौलिक, सर्वकष व उच्च विचारांच्या मूल्यांकनालाही काही काळ लागावा हे स्वाभाविकच आहे. परंतु विचार-दर्शनाच्या बाबतीत तसे म्हणता येत नाही. विचारदर्शन शक्य तितक्या लवकर व विस्तृत-प्रमाणावर होत राहणे आवश्यक आहे. हे कार्य जितक्या द्रुत गतीने होईल, तितक्या, लवकर अशा विचारांचे योग्य मूल्यांकन करणे विचारवंतांना शक्य होईल.

परंतु बऱ्याच विचारकांच्या बाबतीत असे दिसते की, त्यांच्या विचारांचे दर्शन – म्हणजे मांडणी व प्रचार – यावर ग्रहयोगाचाही परिणाम होत असावा. पंडितजींनी ज्या 'दैशिक शास्त्रा'च्या आधारावर काही सिद्धांतांची मांडणी केली, ते सन १९२० मध्ये प्रकाशित झाले होते. परंतु त्याची दखल घेतली गेली चार दशकांनंतर पंडितजींच्या द्वारे. कोपरनिकसच्या पुस्तकाची पहिली छापील प्रत त्याच्या मृत्यूपूर्वी काही तास त्याच्या हाती पडली. त्यानंतर त्या पुस्तकाची कोणीही कुठेही चर्चा केली नाही. ३० वर्षांनंतर एका शास्त्रज्ञाने त्याचा केवळ उल्लेख केला व त्यानंतर ५० वर्षांनी त्या पुस्तकाला नकारात्मक मान्यता मिळाली. कारण प्रकाशनानंतर ८० वर्षांनी पोप महाशयांनी हे पुस्तक प्रक्षिप्त असल्याची घोषणा केली.

महाराष्ट्रात ज्ञानेश्वरीची थोरवी सर्वमान्य आहे. परंतु या ग्रंथराजालाही जनमान्यता मिळण्याला बरीच प्रतीक्षा करावी लागली. ज्ञानेश्वरी लिहून झाल्यानंतर अडीचशे – पावणेतीनशे वर्षांनी श्री एकनाथांनी ग्रंथाची जुनी प्रत धुंडाळून ती शुद्ध करून, नीट स्वरूपात पुन्हा जनतेसमोर ठेविली व त्यानंतर तिला प्रतिष्ठा प्राप्त झाली.

विचारदर्शनालाही अशा प्रकारे विलंब झाल्याची आणखीही अनेक उदाहरणे आहेत.

---

* चार दशकांनंतर कम्युनिस्ट चीनने चँग-कै-शेकला दिलेले उत्कट देशभक्तीचे प्रमाणपत्र विचारात घेण्यासारखे आहे.

परंतु असा विलंब अक्षम्यच मानला गेला आहे. कारण विचाराच्या प्रसाराला जर उशीर झाला तर त्याच्या उचित मूल्यांकनाला अधिकच उशीर होणार व यात मानवजातीची फार मोठी हानी आहे.

पंडितजींच्या मृत्यूनंतर अनेकांच्या मनांत अशी तीव्र इच्छा उत्पन्न झाली होती की, पंडितजींच्या विचारसरणीविषयी संशोधनाचे काम सुरू करण्यात यावे आणि त्याच वेळी 'पं. दीनदयाळ उपाध्याय : समग्र (व्यक्ति व विचार) दर्शन' तयार करण्याचा उपक्रमही तावडतोब प्रारंभ व्हावा. परंतु सुरुवातीला कोणत्या ना कोणत्या कारणाने या कामात विलंब होत गेला, आणि आणीबाणीनंतरच्या वेगवान घटनाचक्रामुळे शेवटी हे काम तसेच मागे पडले.

विलंब होण्याला कारणेही तशीच होती. या विषयावरील अधिकारी लेखक कोण हा एक प्रश्न होताच. परंतु सर्वांत महत्त्वाची अडचण म्हणजे असा उद्योग यशस्वी करण्याकरिता आवश्यक अशा साधनसामुग्रीची कमतरता.

देशाच्या विचारप्रक्रियेला पंडितजींचे जे विपुल व गतिशील योगदान प्राप्त झाले आहे, ते ध्यानात घेता त्यांचे व त्यांच्याविषयींचे उपलब्ध साहित्य फारच थोडे आहे ही वस्तुस्थिती आहे.

पंडितजींनी राजकीय जीवनात प्रवेश करण्यापूर्वी त्यांचे 'चंद्रगुप्त मौर्य' व 'जगद्गुरु शंकराचार्य' हे हिंदीतील चरित्र राष्ट्रधर्म-प्रकाशनाने प्रकाशित केले होते. त्या वेळी पंडितजी साप्ताहिक पांचजन्य व दैनिक स्वदेश (लखनौ) यांचे संपादक म्हणून काम पहात असत. त्यानंतरच्या काळात त्यांची काही पुस्तके प्रकाशित झाली. 'The Two Plans (1958), Devaluation - A Great Fall (1966), Integral Humanism (1967), 'जनसंघ : सिद्धान्त और नीति', 'अखंड भारत', 'इनकोभी आजादी चाहिये','अमरीकी अनाज : पी. एल. ४८०', 'भारतीय अर्थनीती (विकास की एक दिशा)', 'बेकारी समस्या – और उसका हल', 'एकात्म मानववाद', 'विश्वासघात,' 'टॅक्स या लूट', 'राष्ट्रजीवनकी समस्याएँ,' आदी कृती त्यांनी स्वत: लिहिल्या आहेत. काही ग्रंथ त्यांच्या भाषणांच्या व लेखांच्या संकलनांच्या स्वरूपाचे आहेत. सन १९६८ मध्येच पंडितजींच्या ऑर्गनायझरमधील लेखांचे एक संकलन जायको पब्लिशिंग हाउसद्वारा 'Political Diary' या शीर्षकाखाली प्रकाशित झाले. याला काशी विद्यापीठाचे त्या वेळचे चॅन्सेलर डॉ. संपूर्णानंद यांनी मार्मिक उपोद्घात लिहिला आहे. श्री. भानुप्रताप शुक्ल व श्री. रामशंकर अग्निहोत्री यांनी 'राष्ट्रजीवन की दिशा' हे महत्त्वपूर्ण संकलन संपादित केले.'एकात्म मानववाद', 'एकात्म मानववाद – समग्र दर्शनकी रूपरेखा', 'राष्ट्रचिंतन' आदी संकलने आहेत. दीनदयाळ शोध संस्थानने पुढील पुस्तके प्रकाशित केली आहेत

1) Pandit Deendayal Upadhyaya – A Profile – Ed. by Sudhakar Raje (English and Hindi) 1972.

2) Integral Approach (English and Hindi) 1979.

3) Gandhi, Lohia and Deendayal (Foreward by Prof. Madhu Dandavate) (English and Hindi) 1978.

4) Destination (Ed. Sudhakar Raje 1978).

५) पं. दीनदयाळ उपाध्याय – व्यक्तित्व एवं जीवनदर्शन : ले. डॉ. हरिश्चन्द्र बर्थकल. या व्यतिरिक्त – ' Who killed Upadhyaya ? ', ' पंडित दीनदयाळ उपाध्याय हत्याकांड-मुकदमा ', श्री. तनसुखराम गुप्त यांचे ' पं. दीनदयाळ उपाध्याय-महाप्रस्थान ', श्री. शंकर सुल्तानपुरी यांचे ' अमर शहीद पं. दीनदयाळ उपाध्याय, ' श्री. दि. घ. दातार यांचे ' एकात्म मानववाद ', श्री. ठेंगडी यांची ' एकात्म मानववाद ' व ' His legacy : Our mission '; श्री. एन्. मध्वाराव यांचे ' पंडित दीनदयाळ उपाध्याय ' व त्याचे श्री. प्रकाश देशपांडेद्वारा मराठी भाषांतर, श्री. दाऊदयाळ शास्त्री यांचे प्रबंध-काव्य – ' राष्ट्रपुरुष पं. दीनदयाळ उपाध्याय ' (डॉ. मुकुंदराव आगासकर यांच्या प्रस्तावनेसहित). ही पुस्तके पंडितजींच्या जीवनावर व विचारावर प्रकाश टाकणारी आहेत. प्रकाशनाचे बाबतींत भारतीय जनसंघाचे कार्यालय प्रमुख श्री. जगदीशप्रसाद माथूर, तमेच राष्ट्रधर्म प्रकाशन, लखनऊ, जायको पब्लिशिंग हाउस, दीनदयाळ शोध संस्थान, दिल्ली; राष्ट्रोत्थान परिषद – बंगलोर व अनिल प्रकाशन, मुंबई, यांनी परिश्रम केले.

पंडितजींचे लिखाण इतस्ततः विखुरलेले आहे. त्याचे संपूर्ण संकलन अद्याप झालेले नाही. त्यांच्या आत्मविलोपी वृत्तीमुळे त्यांचे काही मौलिक लिखाण प्रकाशाच्या झोतात आले नाही. तसेच काही साहित्य प्रकाशात आले तरी त्याच्या कर्त्याविषयी बहुतेकांना माहिती नाही. उदाहरणार्थ – श्री. नाना पालकर यांनी मराठीत लिहिलेल्या प. पू. डॉक्टर हेडगेवारांच्या चरित्राचे हिंदी भाषांतर पंडितजींनी केले आहे, याची माहिती किती लोकांना असेल ? *

जी गोष्ट लिखित साहित्याची तीच त्यांच्या मौखिक वाङ्मयीन तपाची आहे.

सतत तीन दशके पंडितजी प्रवासात होते. हा काल त्यांनी मुख्यतः वाहनात घालविला. सर्व प्रकारची वाहने – अगदी बैलगाडी – पॅसेंजर ट्रेनपासून तो जलद विमानापर्यंत. त्यांचेबरोबर कोणी प्रतिमा-निर्माता (image builder) असता तर त्याने अमेरिकन पद्धतीने भपकेदार आकडे प्रस्तुत केले असते. एकूण किती लाख मैलांचा प्रवास झाला, संपूर्ण प्रवासात एकूण किती कोटी व्यक्तींशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध आला, एकूण बोलले गेलेले सर्व शब्द एकामागून एक टेप केले असते तर ती टेप किती दिवसपर्यंत चालली असती, इत्यादी. अमेरिकेत राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीचे वेळी प्रचाराचे कंत्राट घेणाऱ्या

---

* सन १९५५–५६ मध्ये चालू राष्ट्रीय घटनांविषयी अतिशय मार्मिक भाष्य ' पांचजन्य ' मध्ये ' विचारवीथी ' या सदरात श्री. पराशर या नावाने प्रकाशित होत असे. तेही पंडितजींचेच लिखाण होते.

संस्था या पद्धतीची कितीतरी आकडेवारी प्रकाशित करीत असतात. सुदैवाने पंडितजींना कोणीही प्रतिमा-निर्माता मिळाला नाही. मूळ प्रतिमाच उज्ज्वल असल्यामुळे अशा निर्मात्याची आवश्यकता नव्हती. 'स्वभावसुंदरं वस्तु न संस्कारमपेक्ष्यते' 'जातीच्या सुंदरा' – यातलाच हा प्रकार. शिवाय हे तंत्र पंडितजींच्या स्वभावातही बसणारे नव्हते.

इतक्या प्रचंड भ्रमंतीत पंडितजी जितके काही बोलले असतील त्याचा एकशतांश तरी आज उपलब्ध आहे काय ? किती बौद्धिक वर्ग, किती सार्वजनिक भाषणे, किती बैठका, किती वैयक्तिक संभाषणे. या व्यतिरिक्त कितीतरी लोकांशी व्यक्तिगत हितगुज. यांत 'आपला संवाद आपणाशी' अशा संवादांची गणती केलेलीच नाही. हे सर्व वाङ्मय आज उपलब्ध असते तर नवीन पिढीला व नवीन कार्यकर्त्यांना किती भक्कम आधार प्राप्त झाला असता. कदाचित असे असेल की, आमच्या परंपरेची ही प्रकृतीच आहे. शक्यतोवर श्रुतिवरच काम निभवायचे, व वाढत्या व्यापामुळे तसे करणे असंभव झाले तर नाइलाज म्हणून स्मृतीचा आधार घ्यावयाचा. ते कसेही असले तरी हे निश्चित की, अजूनही वेळ निघून गेलेली नाही. त्यांच्या सहवासात आलेले बरेच लोक आजही आहेत. तसेच त्यांच्या भाषणां-संभाषणाच्या काही नोट्स निरनिराळ्या जागी विखुरलेल्या सापडतील. त्यांतील संकलित भाग हा थोडा आहे व असंकलित फार अधिक. या सर्वांचे संकलन करण्याचा उद्योग राष्ट्रहिताला पोषक असाच राहील. त्यांच्या जीवनाविषयी उपलब्ध असलेली माहितीही फारच अपुरी आहे.

एकतर पंडितजी प्रकृत्याच आत्मविलोपी. 'माझ्या मृत्यूनंतर माझे लहानसेसुद्धा स्मारक उभारले जाऊ नये' अशी विनंती आपल्या मृत्युपत्रांत करणारांच्या परंपरेत वाढलेले. वेदांतील सूक्तांचे व उपनिषदांचे कर्ते इतके ऋषी आहेत, त्यांची नावे आपल्या-पर्यंत आलेली आहेत, परंतु त्यांच्यापैकी कितीचे चरित्र आपल्याला माहीत आहे ? या परंपरेत वाढलेला मनुष्य लॉइड जॉर्ज किंवा चर्चिलप्रमाणे आपली संस्मरणे लिहून ठेवील किंवा पंडित नेहरू, मुसोलिनी वा हिटलर यांच्याप्रमाणे आपले आंशिक आत्मचरित्र प्रकाशित करील, अशी आशा करणे वस्तुस्थितीला सोडून होईल. शिवाय रा. स्व. संघाचा संस्कार. आमचे मित्र श्री. दि. वि. गोखले एकदा म्हणाले,

"RSS has raised great men, but made all of them faceless."

["राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने थोर माणसे निर्माण केली; पण त्या साऱ्यांना विनचेहऱ्याचे बनविले."]

पंडितजींचा जीवनक्रमही या दृष्टीने अनुकूल असा नव्हता. लॅण्ड्स्बर्ग कारागृहात मिळालेल्या सक्तीच्या फुरसतीचा उपयोग करून हिटलरने आपला 'माइनकांफ' लिहिला. असे लिखाण करण्यासारखा वेळ लेनिनला, त्याच्या स्वित्झर्लंडमधील हद्दपारीच्या जीवनात मिळू शकला. मावोत्से तुंग हा क्रांतिकारी सेनानी व शासक होता. परंतु त्यालाही येनानच्या वास्तव्यात अशी फुरसत मिळू शकली. परंतु पंडितजींना ही सवलत त्यांच्या अती व्यस्त जीवनक्रमामुळे मिळू शकली नाही.

एकाकी, अखंड ' चरैवेती 'चे पंडितजींचे व्रत. त्यांच्या कार्याचे बहुआयामी स्वरूप व त्यांच्या जवळच्या लोकांची लेखणीविषयीची अनास्था, यांच्या परिणामस्वरूप पंडितजींच्या जीवनात या दृष्टीने उपयुक्त अशी व्यक्ती येणे अशक्यच होते. भगवान् रामकृष्ण परमहंसांच्या जीवनात ' एम्.' ने * एक विशेष भूमिका निभावली होती. महात्माजींना महादेवभाई मिळाले होते. सरदार पटेलांच्या कन्येचेही या पद्धतीचे योगदान मोठे होते. मॅडम संन्यत्सेन ने आपल्या पतीच्या बाबतीत या स्वरूपाची कामगिरी बजावली होती. डॉ. जॉन्सन यांचा चरित्रकार बॉसवेल तर प्रसिद्धच आहे. अशा प्रकारचा कोणताही योग पडितजींच्या कुंडलीत नव्हता.

बेंजामिन फ्रँकलिनप्रमाणे दर दिवशी तपशीलवार डायरी लिहिण्याची पंडितजींना सवय असती तर त्यांची डायरीच प्रामाणिक आत्मचरित्र म्हणून प्रकाशित होऊ शकली असती. परंतु तसेही घडावयाचे नव्हते.

पंडितजींचे व्यक्तित्व, पूर्वी दर्शविल्याप्रमाणे बहुआयामी होते. जगाच्या इतिहासात काही थोर व्यक्ती अशा होऊन गेल्या की, ज्यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून इतिहासाला वळण दिले. रूसो, वाल्टेअर, मार्क्स यांची नावे या संदर्भात दृष्टीपुढे यावीत. काही महापुरुषांनी उत्कृष्ट जननेता व उत्कृष्ट लेखक अशा दोन्ही भूमिका उत्तम रीतीने वठविल्या. ज्युलिअस सीझर, नेपोलियन, लेनिन, विन्स्टन चर्चिल व चार्लस् दी गॉल या श्रेणीत येतात. काही श्रेष्ठ पुरुष असे होऊन गेले आहेत की, ज्यांची छाया इतिहासावर लांबवर पडलेली आहे ; परंतु जे इतके मौलिक लिखाण करू शकले नाहीत, आपले संघटन-कौशल्य, विभिन्न प्रवृत्तींच्या लोकांना आपल्याबरोबर घेऊन चालण्याची क्षमता, आपल्या विचारांच्या वा लिखाणांच्या आधारे नव्हे तर आपल्या व्यक्तिगत संपर्कातून इतरांना कार्याची व त्यागाची प्रेरणा देण्याची शक्ती, ही अशा मंडळींची वैशिष्ट्ये होती. १४ वा लुई, मार्शल टिटो, लिंडन जॉन्सन, हो–ची–मिन्ह या वर्गात मोडतात. पंडितजींचा योग असा होता की, त्यांना या सर्वच व याशिवायही इतर अनेक भूमिका एकसमयावच्छेदेकरून पार पाडाव्या लागल्या. अशा व्यक्तित्वाचे यथायोग्य मूल्यमापन करणे म्हणजे आकाशाला आलिंगन देण्यासारखेच आहे.

पंडितजींच्या अनुयायांची संख्या फार मोठी आहे. परंतु मनात भक्ती बाळगणे ही एक वेगळी गोष्ट आहे आणि श्रेष्ठत्वाचे उचित मूल्यांकन करण्याची क्षमता ही वेगळी गोष्ट आहे. ' कमळिनी दर्दूर – एकेठायी बिढार. ' असाच प्रकार अनेकदा आढळायचा. आणि हे स्वाभाविकच आहे. नित्सेने असे म्हटले आहे की, पर्वतारोहण करताना आपण जितके अधिकाधिक वर जातो तितके थंडीचे प्रमाण वाढत जाते व हवा विरळ होत जाते. इतक्या उंचीपर्यंत ज्यांचा दम टिकेल असे लोक समाजात किती असतात ? म्हणूनच म्हटले आहे की, ' स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवि कधी जन्मती ? '

---

* मास्टर मोशाँय महेन्द्रनाथ गुप्त.

या सर्व कारणांमुळे असा उपक्रम हाती घेण्याला विलंब होणे स्वाभाविक होते. कालांतराने हे काम मागेही पडले. घटनाचक्र कितीही वेगवान असले तरी या कामाविषयीची आतुरता त्यांच्या अनुयायांच्या मनातून पूर्णपणे नष्ट होणे अशक्य होते. कारण मनुष्याचा सर्वसाधारण स्वभाव.

माझ्या शालेय जीवनात एक चर्चा वारंवार ऐकण्याचा किंवा वर्तमानपत्रांतून वाचण्याचा प्रसंग माझेवर येत असे. चर्चेचा विषय असे -'लोकमान्य टिळक आज हयात असते तर ?' आम्हा मुलांना तत्कालीन राजकारणातील प्रवाह-उपप्रवाहांची माहिती नसल्यामुळे याचे आश्चर्य वाटे की, हा प्रश्न वरचेवर सार्वजनिक रीतीने का चर्चिला जात आहे. नवीन परिस्थिती वा प्रश्न उपस्थित झाला की, त्यावर होणाऱ्या प्रतिक्रियांच्या पार्श्वभूमीवर ही चर्चा दरवेळी डोके वर काढते हे समजण्याइतकी बुद्धीची प्रगल्भता त्या वेळी नव्हती. परंतु आता हे ध्यानात येत आहे की, प्रत्येक महापुरुषाच्या निर्वाणानंतर कोणताही पेचप्रसंग देशासमोर उभा झाला की, असाच प्रश्न जनतेच्या मनात स्वाभाविकपणेच येतो. पंडितजींच्या मृत्यूनंतर सतरा वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. या काळात कितीतरी महत्त्वाचे प्रश्न देशासमोर निर्णयाकरता आले. पक्षासमोर व राष्ट्रभक्तांसमोरही बरेच पेचप्रसंग सोडवणुकीकरता आले. आणीबाणीसारखे अभूतपूर्व संकटही येऊन गेले. अर्थात् अशा सर्व प्रसंगी पंडितजींच्या भक्तांच्या मनात हा प्रश्न येणे साहजिक होते की, 'पंडितजी आज हयात असते तर ?'

आणि या दृष्टीने पंडितजींच्या व्यक्तित्वाचे व विचारांचे समग्र दर्शन प्रकाशित होणे अत्यावश्यक आहे ही भावना जोर धरू लागली.

हे खरे आहे की, हा प्रश्न मनात येणे जितके स्वाभाविक, तितकेच त्याचे उत्तर देण्याचा प्रयत्न करणे कठीण व प्रसंगी धोक्याचेही. कारण प्रश्नकर्ता कितीही प्रामाणिक असला तरी, अशा प्रश्नांचा विचार पूर्ण वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून, स्वमनःस्थिती-निरपेक्ष-बुद्धीने करणे अशक्यप्राय आहे. स्वतःला नकळत स्वतःच्या स्वाभाविक प्रवृत्तीचा व प्रतिक्रियांचा परिणाम या प्रश्नाचे उत्तर शोधताना प्रश्नकर्त्यावर होत असतो. यामुळेच असा शोध धोक्याचाही ठरू शकतो.

परंतु त्यामुळे 'पंडितजी आज हयात असते तर' हा प्रश्न त्यांच्या अनुयायांच्या मनात उद्भवणे थांबेल असे मात्र नाही. हा प्रश्न उद्भवणारच व कमीअधिक प्रमाणात त्याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न चालूच राहाणार. अनुयायांच्या जिज्ञासेचे पूर्ण समाधान करण्याच्या दृष्टीने आज उपलब्ध असलेली साधनसामुग्री तुटपुंजी आहे, हे मान्यच करावे लागेल. अर्थात् कामचलाऊ अंदाज बांधायला उपयुक्त असा काही मसाला पंडितजी मागे ठेवून गेले आहेत. त्यांचे लिखित व मौखिक साहित्य, त्यांचा जीवनपट, आणि विशेषेकरून 'सिद्धांत व धोरण' हा दस्तऐवज ह्या कामात उपयुक्त होऊ शकेल.

या दस्तऐवजाच्या प्रकाशात बऱ्याच प्रचलित व भावी प्रश्नांची उत्तरे स्थूलमानाने

शोधता येतात. हा दस्तऐवज राष्ट्रजीवनाच्या सर्व क्षेत्रांना स्पर्श करणारा सर्वंकष असा आहे. अर्थात् याच्या उपयुक्ततेला स्वभावसिद्ध व्यावहारिक मर्यादाही आहेत. ग्रंथप्रामाण्य-बुद्धीने याचा उपयोग करणे उचित होणार नाही. यांतील मजकुराला संदर्भ-बिंदू (Point of reference) मानणे अधिक उपयुक्त ठरेल. सर्व संबंधित समस्यांवर व परिस्थितीवर हा दस्तऐवज प्रकाश टाकतो हे खरे आहे. परंतु त्यांतील प्रत्येक प्रश्नाचे वा तत्त्वाचे पूर्ण स्पष्टीकरण यापूर्वीच झालेले असेल असे नाही. प्रचलित परिस्थितीच्या संदर्भात ज्या विषयांना गंभीर महत्त्व प्राप्त होते, त्यांच्यासंबंधीचे विचार भाषणां-वक्तव्यांतून अधिक सविस्तर व आग्रहपूर्वक मांडावे लागतात. जे प्रश्न गंभीर व स्फोटक स्वरूप धारण करीत नाहीत त्यांचेविषयी मूळ तत्त्वे या दस्तऐवजात ग्रथीत असली तरी, चाकोरीबाहेर जाऊन त्यांच्या पूर्ण विशदीकरणाचा प्रयत्न (केवळ अभ्यासवर्गांचा अपवाद वगळता) अप्रासंगिक व हास्यास्पद ठरण्याचाच संभव अधिक. या सर्वसाधारण व्यावहारिक नियमामुळे हे सुद्धा शक्य आहे की, आज सन १९८४-८५ मध्ये जी समस्या आम्हांला स्फोटक व म्हणून प्राथमिक महत्त्वाची वाटते, तिने पंडितजी जिवंत असतांना इतके गंभीर स्वरूप धारण केले नसेल व त्यामुळे त्यासंबंधीच्या ग्रथित तत्त्वांचे विशदीकरण करण्याचा प्रसंग पंडितजींवर आला नसेल.

फेब्रुवारी १९६८ पर्यंत जनसंघासमोर आलेल्या काही महत्त्वपूर्ण समस्यांचा उल्लेख यापूर्वी अन्य संदर्भात केलेला आहे. हे स्पष्ट आहे की, त्यांतील काही समस्या मूलभूत सिद्धांताशी संबंधित अशा होत्या, तर अन्य काही त्या सिद्धांताच्या प्रकाशात निश्चित करावयाच्या रणनीतीशी व रणयुक्तीशी संबधित अशा होत्या. उपर्युक्त रणनीती – रण-युक्तीच्या प्रकाशात वेळोवेळी तात्कालिक कार्यक्रमाचे आदेश देण्यात आले होते. काही समस्या अकस्मात निर्माण झालेल्या, सामयिक स्वरूपाच्या होत्या व विवेकबुद्धीच्या आधारे विचार करावा लागला होता. काही समस्या चिघळत्या स्वरूपाच्या वा वारंवार उद्‌भवणाऱ्या अशा असतात. विविध नैसर्गिक आपत्ती व त्यामुळे पीडित लोकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न, सांप्रदायिक व इतर दंगे व त्यांतून निघणारे दुष्परिणाम, पोलिसांच्या अत्याचारांचे व गोळीबारांचे बळी, समाजविरोधी तत्त्वांच्या व नक्सलवाद्यांच्या आतंकाने पीडित लोक, झुग्गी-झोपडीवाल्यांच्या मागण्या, हरिजनांवरील अत्याचार, मंत्र्यांच्या भ्रष्टाचारांची प्रकरणे, भाववाढ, रेल्वेदरातील वाढ, करांतील वाढ, दरवर्षीच्या बजेटमधील ग्राहकविरोधी व गरीब-विरोधी तरतुदी, लहान शेतकऱ्यांना व्याजरहित कर्ज देण्याची मागणी, जमीनसुधारणेच्या अंमलबजावणीसाठी वनवासींच्या चळवळी इत्यादी विषय या वर्गात मोडतात. दक्षिण आफ्रिकेच्या वंशभेदावर आधारित सरकारी धोरणाचा निषेध, भारताबाहेरील परतंत्र राष्ट्रांनी चालविलेल्या साम्राज्यसत्ता-विरोधी स्वातंत्र्यसंग्रामांना पाठिंबा, यूनोच्या पुनर्घटनेची मागणी हे विषयसुद्धा याच वर्गातील आहेत. निवडणूक-पद्धतीत करावयाच्या सुधारणांच्या दिशेविषयीही हेच म्हणता येण्यासारखे आहे. परकीय आक्रमणाचे वेळी ' वयं पंचाधिकं शतम् ' ही वृत्ती धारण करण्याचे व तदनुसार आपल्या राष्ट्राच्या युद्धप्रयत्नाला जनशक्तीचे पाठबळ प्राप्त करून देण्याचे धोरण नेहमीकरता

निरपवाद असेच म्हणावे लागेल. या सर्व विषयांसंबंधी पंडितजींच्या जीवनकालात ठरविण्यात आलेल्या दिशा पुढेही मार्गदर्शक मानता येण्यासारख्या आहेत. तसेच मतदानाच्या पात्रतेची वयोमर्यादा कमी करण्याची मागणी, राज्याराज्यांतील सीमांचे विवाद सोडविण्यासाठी सुचविलेली पद्धती, सरकारी कर्मचाऱ्यांच्या, अध्यापकांच्या व मजूरांच्या, कामगारसंघटनांच्या अधिकारांचा प्रश्न, सिंधमधील विस्थापितांचे पूर्ण पुनर्वसन व त्यांना नागरिकत्वाचे अधिकार देण्याची मागणी, शहरी व ग्रामीण संपत्तीवरील, तसेच व्ययय्योग्य उत्पन्नावरील कमाल मर्यादेची मागणी, आणि अखंड भारताच्या ध्येयाचे पुनःस्मरण हे सर्व विषय पूर्व-निर्धारित धोरणाच्या चौकटीत बसणारे असेच आहेत. अर्थात् वेळोवेळी बदलत्या परिस्थितीला अनुसरून या सर्व विषयांसंबंधीच्या ठरावांत, मागण्यांत, तात्कालिक प्रकट धोरणांत व तज्जन्य आंदोलनांच्या स्वरूपात उचित फेरबदल करावे लागतील, परंतु मूळ पूर्वीची दिशा कायम रहावी असेच या सर्व प्रश्नांचे स्वरूप आहे.

हे खरे आहे की, इतिहासाची पुनरावृत्ती अगदी जशीच्या तशी होत नाही. दोन ऐतिहासिक परिस्थितींत सादृश्य दिसले तरी त्या हुबेहुब एकसारख्या नसतात. एकाच घटनेची जशीच्या तशी पुनरावृत्ती होत नाही, परंतु अनेकदा मौलिक प्रश्न व तत्त्व मात्र तेच कायम रहाते.

पंडितजींच्या मृत्यूनंतर काही प्रसंग असे आले आहेत की, ज्यांच्याकरिता हुबेहूब समांतर प्रसंग त्यांच्या जीवनांत आढळायचे नाहीत. आणीबाणी हा असाच प्रसंग होता. आणि त्यानंतरचा घटनाक्रम अगदीच निराळ्या धाटणीचा होता. बरोबर समांतर घटना आढळत नसल्या तरी अशा प्रसंगी धोरणांची मार्गदर्शक सूत्रे काय असावीत याविषयी ज्या वरून अनुमान काढता येईल अशा काही घटना त्यांच्याही जीवनकालात अवश्य सापडतात. उदाहरणार्थ, मध्यंतरी बराच काळ, हिंदुमहासभा, जनसंघ व रामराज्य-परिषद यांच्या एकीकरणाच्या चर्चेत गेला. ती संपूर्ण चर्चा येथे देण्याचे कारण नाही. परंतु अशा वाटाघाटींचे वेळी आपला कोणता मुद्दा सोडावयाचा, कोणत्या मुद्यावर किती अडून बसायचे आणि आपला पक्ष इतर पक्षांत विलीन करण्याविषयी किंवा न करण्याविषयी कोणते धोरण घेणे उचित होईल या विषयी सरळ मार्गदर्शन नव्हे, पण सर्वसामान्य दिशादर्शन पंडितजींच्या त्या काळातील व्यवहारातून प्राप्त होऊ शकते. त्याचप्रमाणे विविध निवडणुकांचे वेळी अन्य पक्षांशी तात्कालिक जवळिक साधण्याचे काही प्रयत्न झाले. काही वामपंथीयांनाही जवळ आणण्याचा उपक्रम झाला. हे सर्व जसेच्या तसे पुढील काळातील परिस्थितिकरता उपयुक्त ठरणारे नव्हते हे स्पष्टच आहे. तथापि त्यावरून अशा प्रयत्नांतील बारकाव्यांविषयी व मर्यादांविषयी बराच बोध होण्यासारखा आहे. सन १९६७ च्या निवडणुकांनंतर काही प्रांतात संविद सरकारे आली. जनसंघही त्यांत सहभागी झाला. सहभागी होणाऱ्यांत तथाकथित डावे-उजवे होते. त्या वेळी संयुक्त सरकारांविषयी कालबद्ध, न्यूनतम सामान्य कार्यक्रम हा केंद्रबिंदू कल्पून पंडितजींनी केलेले मार्गदर्शन तर आजही अनुपयुक्त किंवा कालबाह्य झालेले नाही, असे ठामपणे म्हणता येण्यासारखे आहे.

अर्थात् इतक्या ठामपणे ज्यांच्याविषयी वरील प्रकारचा अभिप्राय प्रकट करता येईल अशा समस्या एका हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्यासुद्धा सापडावयाच्या नाहीत हे उघड आहे. यापूर्वी म्हटल्याप्रमाणे कालांतराने निर्माण होणाऱ्या दोन परिस्थिती किंवा समस्या सकृत्दर्शनी सारख्या वाटल्या तरी त्यांचे ऐतिहासिक संदर्भ, मानसशास्त्रीय वारकावे व घटनाक्रमांच्या गुंतागुंती इतक्या भिन्न स्वरूपाच्या असतात की, पहिलीच्या अनुभवावरून दुसरीविषयी घोपटमार्गी निष्कर्ष काढणे चुकीचेच ठरेल. त्यामुळे सन १९६८ नंतरच्या प्रत्येक राजकीय परिस्थितीविषयी पंडितजींनी कशी प्रतिक्रिया प्रकट केली असती याचा शोध घेण्याचा प्रयत्न करणे अवास्तवच होईल. वर दिलेल्या सर्वसाधारण अभिप्रायाला जोड म्हणून इतके अवश्य नमूद करण्यासारखे आहे की, कोणत्याही परिस्थितीत पडितजींनी तत्त्वाविषयी तडजोड स्वीकारली नसती.* संघात ग्रहण केलेल्या व्यावहारिक रीतीनीतीपद्धतीचा त्याग केला नसता व संघाने दिलेले आणि मानशास्त्राच्या सखोल अध्ययनावर आधारलेले संघटनाशास्त्र दृष्टिआड होऊ दिले नसते. यामुळेच दीनदयाळ शोध संस्थानातील आपल्या भाषणात मा. भाऊराव देवरस ठामपणे सांगू शकले, की, "दीनदयाळजी आज जिवंत असते तर प्राप्त परिस्थितीत कसे वागले असते ?" काही अगदी मूलभूत गोष्टींच्या व्यतिरिक्त दैनंदिन राजकारणात उद्भवणाऱ्या प्रत्येक प्रश्नाविषयी पंडितजींची वृत्ती कशी राहिली असती याचा विचार मोठासा फलदायी ठरण्यासारखा नाही.

सामान्यतः हेच ग्राह्य असले तरी पंडितजींच्या मृत्यूनंतरचा सव्वापाच वर्षांचा एक लहानसा कालखंड या नियमाला अपवाद म्हणून मानावा लागेल. या अल्पावधीत घटनाही फार वेगाने घडत गेल्या. झेकोस्लोव्हाकियावरील रशियाचे आक्रमण, ज्या राष्ट्राजवळ अण्वस्त्रे नाहीत त्यांना ती उपलब्ध होऊ नयेत असे ठरविणारा 'नॉन प्रॉलिफरेशन ट्रीटी', केंद्रिय सरकारी कर्मचाऱ्यांचा संप, कलकत्त्याची रवींद्र सरोवर घटना, केरळमध्ये मुस्लिमप्रधान मल्लपुरम् जिल्ह्याची निर्मिती, 'रावात'चा अपमान, काँग्रेस-कम्युनिस्ट-मुस्लिम लीग युती, भारत-रशिया करार, विदेशियांच्या हिंदुमहासागरातील हालचाली, काँग्रेसमधील दुफळी, बँकांचे सरकारीकरण, तेलंगण-आंदोलन, फरक्का-वाद, सिमला-करार, बांगला देशचे युद्ध व स्वाधीन बांगला देशच्या मान्यतेचा प्रश्न या त्या घटना होत. या सर्व घटनांवर पंडितजींची काय प्रतिक्रिया राहिली असती हे निश्चितपणे सांगणे शक्य आहे. कारण त्यांच्याशी संपूर्ण वैचारिक आणि मानसिक तादात्म्य असलेला, देशाच्या हिताहिताचा एक निकष दि. ५ जून १९७३ पर्यंत आपल्यांत उपलब्ध होता. उपरिनिर्दिष्ट प्रत्येक प्रकरणात श्रीगुरुजींनी जे विचार प्रकट केले तेच दीनदयाळजींनी केले असते, असे निःसंकोचपणे म्हणता येण्यासारखे आहे.

हा अपवादभूत छोटासा कालखंड वगळला तर साधारणपणे हेच म्हणता येईल की, पंडितजींच्या जीवनाचे व व्यक्तिमत्वाचे संपूर्ण व सुस्पष्ट दर्शन जोपर्यंत उपलब्ध होत नाही

---

* परिशिष्ट क्र. १५ पहा.

तोपर्यंत त्यांच्या विचारांविषयी प्रत्येक प्रसंगी अचुक अनुमान करणे शक्य होणार नाही. याचा अर्थ असा की, एकतर त्यांचे संपूर्ण साहित्य एकत्रित करून ते प्रकाशिण्यात यावे आणि दुसरे या ग्रंथाच्या निमित्ताने यांतील प्रथितयश लेखकांनी अतिपरिश्रमपूर्वक ज्याप्रमाणे पंडितजींच्या विचारांचे दर्शन घडविले आहे त्याचप्रमाणे तशाच सिद्धहस्त लेखकांनी त्यांच्या वहुआयामी व्यक्तिमत्वाचे दर्शन घडविण्याचा उपक्रम तातडीने हाती घेणे आवश्यक आहे.

'पंडित दीनदयाळ उपाध्याय : समग्र (व्यक्ति व विचार) दर्शन' हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला तर तो सध्याच्या व आगामी राष्ट्रीय नेतृत्वाला होकायंत्राप्रमाणे उपयुक्त ठरेल यात शंका नाही. राजवाडयांच्या 'मराठ्यांच्या इतिहासाचो साधने' या कृतिप्रमाणे साधनभूत असलेल्या प्रस्तुत ग्रंथाच्या प्रकाशनामुळे अशा उद्योगाकडे वळण्याची प्रेरणा या विषयावरील अधिकारी लेखकांना होईल अशी आशा करू या.

प्रस्तुत ग्रंथ म्हणजे अशा चिर-अपेक्षित, सर्वस्पर्शी वाङमयीन कृतीचा अग्रदूतच होय.

४

या ग्रंथात दीनदयाळजींच्या विचारांच्या विविध पैलूंवर निरनिराळ्या लेखकांनी प्रकाश टाकला आहे. समाजप्रबोधनाचे कार्य करणाऱ्या 'भारतीय विचार साधना' या संस्थेने याच्या प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारून राष्ट्रकार्याला वहुमोल मदत केली आहे, व त्याबद्दल संस्थेचे संचालक सर्वश्री बाळूकाका दात्ये, हरिभाऊ मिरासदार व विनायकराव जोशी अभिनंदनास पात्र आहेत. लेखनाचा भार उचलणारे सर्व विचारवंत आपापल्या क्षेत्रात ख्यातनाम आहेत व शिवाय या विषयावरील अधिकारी पुरुष आहेत. 'स्वस्तिक मुद्रणालया'चे श्री. अ. चि. रायरीकर यांनी ह्या ग्रंथाच्या मुद्रणाची जबाबदारी स्वीकारली व अत्यंत आपुलकीने ती पार पाडली याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत.

या उपक्रमाचे प्रवर्तक श्री. विनायक वासुदेव उपाख्य राजाभाऊ नेने सन १९६१ ते १९७९ या काळात साप्ताहिक 'विवेक'चे संपादक म्हणून काम बघत होते. सन १९३८ पासून ते रा. स्व. संघाचे स्वयंसेवक आहेत व संघाचे प्रचारक म्हणून त्यांनी सन १९४२ ते १९४९ या काळात गुजरातमध्ये काम केले आहे. 'विचारधन', 'भारताचा वारसा' व 'दिशाबोध' या पुस्तकाच्या मराठी भाषांतराचे कामही त्यांनीच पार पाडले आहे. श्री. बळवंत नारायण उपाख्य बाळासाहेब जोग सन १९३७ पासून स्वयंसेवक आहेत. सन १९५४ ते १९६१ या काळात ते 'विवेक'चे संपादक होते. 'यक्षप्रश्न', 'बांगला देश', 'चिनी आक्रमण' ही त्यांची पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. श्री. शरद अनंत कुलकर्णी आर्थिक प्रश्नावरील त्यांच्या प्रभुत्वाबद्दल प्रसिद्ध आहेत. या विषयावर विभिन्न नियत-

कालिकांतून त्यांचे लिखाण प्रसिद्ध होत असते. श्री. भालचंद्र कृष्णाजी केळकर हे प्रारंभापासून विवेकच्या लेखक व संपादक वर्गापैकी एक राहिले आहेत. महाराष्ट्राच्या दिल्लीतील माहिती-केंद्राची स्थापना त्यांनी केलेली आहे व सहा वर्षेपर्यंत त्यांनी त्या केंद्राचे संचालनही केले आहे. हिंदी, मराठी व इंग्रजीतील नियतकालिकांत व वृत्तपत्रांत त्यांचे बरेच लेख प्रसिद्ध होत असतात. त्यांनी बरीच वर्षे प्रेस इन्फर्मेशन ब्यूरोचेही काम पाहिले होते. ते काही काळ 'नवशक्तीचे' सहसंपादक होते. 'सावरकर', 'सुभाष' व 'समाजसुधारक सावरकर' या पुस्तकांचे ते लेखक आहेत. तसेच 'केसरी प्रकाशन'च्या 'समग्र टिळक' च्या सात खंडांचे संपादनही त्यांनी केले आहे. श्री. विश्वनाथ नारायण उपाख्य विसुभाऊ देवधर यांनी वार्ताहर, वृत्तसंपादक व विशेष प्रतिनिधी (दिल्ली) या नात्याने कित्येक वर्षे केसरी, महाराष्ट्र टाइम्स, विवेक या वृत्तपत्रांत काम केले. दैनिक 'तरुण भारत'चे ते ६ वर्षे संपादक होते. नंतर दैनिक 'महा-राष्ट्र'चे संपादक म्हणून ते काम पहात असत. 'रविवारची रेवडी' (विवेक), 'भेळ आणि शहाळी' (महाराष्ट्र टाइम्स), आदी स्तंभांचे तेच लेखक होते. पुण्याच्या 'तरुण भारत'चे भूतपूर्व संपादक श्री. चंद्रशेखर परमानंद उपाख्य बापुराव भिशीकर यांचा एक व्यासंगी व विवेचक पत्रकार म्हणून लौकिक आहे. पुण्याच्या 'तरुण भारत'चे संपादक या नात्याने त्यांनी १४ वर्षे काम केले. त्यांचा रविवासरीय स्तंभ हा त्यांच्या निवृत्तिनंतरही एक आकर्षणाचे केंद्र होऊन राहिले आहे. ते बालपणापासून संघाचे स्वयंसेवक आहेत. त्यांनी काही वर्षे संघप्रचारक म्हणून सिधमध्ये काम केले आहे.'केशवः संघनिर्माता' 'श्रीगुरुजी', 'जीवन आणि संस्कृती', 'संस्कृतीच्या मळवाटा', 'नव्या पिढीशी हितगुज', 'प. पू. सरसंघचालक श्री बाळासाहेब देवरस : धावती ओळख', मा. दादाराव परमार्थ, मा. भय्याजी दाणी व मा. बाबासाहेब आपटे यांची संक्षिप्त चरित्रे, या त्यांच्या कृती प्रकाशित झाल्या आहेत. तसेच 'पत्ररूप श्रीगुरुजी'चे मराठी भाषांतरही त्यांनीच केले आहे.

या सर्व लेखकांनी हे काम केवळ प्रेमाच्या पोटी 'स्वान्तःसुखाय' या मनोवृत्तीनेच केले आहे. प्रत्येकाच्या मनात जॉन बनियनची भावना होती की," I did it for my own self to gratify." प्रत्येकाच्या मनात विचार हाच आहे की, "आपरितोषाद् विदुषां न साधु मन्ये प्रयोगविज्ञानम्।" कुणाच्याही मनात 'तान् प्रति नैष यत्नः' असा भाव नाही. आज अनेक कारणांनी देशात एक वैचारिक पोकळी निर्माण झालेली आहे. ती भरून काढण्याकरिता या कृतीने अंशतः मदत झाली तरी लेखकांना आपल्या श्रमाचे सार्थक झाल्यासारखे वाटेल.

या सर्व अधिकारी लेखकांनी आपापल्या विषयांना पूर्ण न्याय दिला आहे. त्या पैलूंना इथे स्पर्श करणे अनावश्यक आहे. त्यामुळे त्या विषयांची पुनरुक्ती न करता त्यांची पार्श्वभूमी व पंडितजींच्या विचारपद्धतीची वैशिष्ट्ये या दोन बाजू थोड्या सविस्तर मांडल्या तरी पुरे, असे वाटते.

अमेरिकेत असा एक विनोद प्रचलित आहे की, राजकीय पुढारी म्हणत असतो, " I have already made up my mind; kindly don't disturb it by further facts. " [" माझे मन मी आधीच पक्के केले आहे. आता आणखी वस्तुस्थिती सांगून त्यात चलबिचल करू नका."] कारण उघड आहे. further facts म्हणजे पुनर्विचाराला निमंत्रण आणि त्याकरिता वेळ कुणाला आहे ? पुढारी म्हणतो, " I have no time to think, because I have always to speak. " [" मला विचार करायला वेळ नाही, कारण मला सारखे बोलावे लागते."]

यातील विनोदाचा भाग वगळला तरी, हे खरे आहे की, अखंड घाईत असलेल्या पुढाऱ्यांना विचाराला वेळ नसतो व त्यामुळे कोणत्याही प्रश्नाचे विविध पैलू शांतपणे समजून घेण्याइतकी उसंत त्यांच्याजवळ नसते. अर्थात् हा अमेरिकेतील लोकांचा अनुभव आहे. थोड्याफार फरकाने इतर लोकशाही देशांतही या वृत्तीचे कमी-अधिक दर्शन होत असले पाहिजे.

ही वृत्ती सोयीस्कर असली तरी, उचित निर्णयाप्रत पोहोचण्याकरता ती उपयुक्त नाही. अनेकदा असे आढळते की, काही विचारवंत नेहमी एकाच वातावरणात, एकाच संगतीत राहात असतात; व त्यामुळे त्यांच्या विचारांना ठामपणा प्राप्त झाला तरी त्यात एकांगीपणाच अधिक असतो. साधकबाधक विचाराचा अभाव आढळतो. ज्यांचे संपर्कक्षेत्र बरेच विस्तृत व विविधतेने युक्त असे आहे, त्यांच्या विचारांत एकांगीपणा कमी असतो, परंतु त्याचबरोबर त्यांत ठामपणाचाही अभाव असतो. 'म्हटलं तर आहे, म्हटलं तर नाही,' ही वृत्ती उदारपणाची असली तरी त्यात भोंगळपणाही आहे. ' बुद्धेः फलं अनाग्रहः' हे खरे आहे. परंतु आग्रहाचा अभाव याचा अर्थ निर्णयाचा अभाव किंवा निश्चयाचा अभाव असा होत नाही. नवीन प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारावर संपूर्ण प्रश्नाचा पुनर्विचार करण्याची मानसिक तयारी अवश्य असली पाहिजे. परंतु पुढे कदाचित् अशी पाळी येईल म्हणून उपलब्ध माहितीच्या आधारावरही निश्चित निर्णय घेण्याचे टाळणे वा असहाय्यतेने दिरंगाईचे धोरण स्वीकारणे हेही बुद्धिमत्तेचे लक्षण नाही. दुराग्रह नसावा, पुनर्विचाराची तयारी असावी. परंतु प्राप्त परिस्थितीत अनिर्णय किंवा अनिश्चयसुद्धा नसावा. विचारात ठामपणा असणे आवश्यक आहे. विशालमनस्कतेच्या नावाखाली सर्वच विचार व मते गुळमुळीत राहिली तर कोणतेही महत्कार्य हातून पार पडावयाचे नाही.

ध्येयवादी विचारी पुरुष आपल्या बुद्धीची दारे बंद करीत नाही. तो सर्वच बाजू विचारात घेतो. त्यामुळे त्यात एकांगीपणा नसतो. परंतु अशा व्यक्तीच्या विचारात भोंगळपणाही नसतो. सर्वच अनिश्चित, सर्वच भगवानके भरोसे, सर्वच गुळमुळीत अशी

त्याची स्थिती नसते. ध्येयवादी असल्यामुळे तो निश्चितच ध्येयकेंद्रित म्हणजेच एककेंद्रित असतो. परंतु समंजसपणामुळे एकांगी मात्र राहात नाही. एक-केंद्रित मन सर्वांगीण विचाराची क्षमता ठेवू शकते. पंडितजींच्या बाबतीतही हाच नियम लागू पडत होता.

ठामपणा हे त्यांच्या विचारांचे एक वैशिष्ट्य होते.* एकीकडे 'बालादपि सुभाषितं ग्राह्यम्' अशी त्यांची वृत्ती होती, तर दुसरीकडे श्रेष्ठ व्यक्तींकडून आलेल्या विचारांचेही ते 'नीरक्षीरविवेकाने' मूल्यांकन करीत. Pragmatism या इंग्रजी शब्दांचा मूळ अर्थ काय आहे याची मला कल्पना नाही. परंतु आपल्या देशांत सध्या त्याचा अर्थ होतो 'गंगा गये गंगादास – जमना गये जमनादास' अशी वृत्ती. या अर्थाने पंडितजी pragmatic नव्हते. कोणत्याही व्यक्तीच्या मोठेपणाच्या झगमगाटाने ते प्रभावित होत नसत. त्यामुळे दिपून न जाता मूलग्राही पद्धतीने सर्व गोष्टींचे मर्म समजून घेण्याचा त्यांचा प्रयत्न असे. त्यांच्या व्यक्तिगत संपर्काचे क्षेत्र फार विस्तृत होते. अनेकविध व्यक्तींशी, संस्थांशी व पक्षांशी त्यांचा संपर्क निरनिराळ्या प्रमाणात असे. संतशिरोमणी प्रभुदत्त ब्रह्मचारी, मुनी सुशीलकुमार, भाईजी हनुमानप्रसाद पोद्दार, महामना मदनमोहन मालवीय यांचेपासून तो कुटिलतम राजकारणी लोकांपर्यंत त्यांचे संबंध पसरलेले होते. डॉ. मुखर्जींच्या नेतृत्वाखालील National Democratic Party मध्ये जनसंघाव्यतिरिक्त श्री. प्रफुल्लचंद भंजदेव व श्री. राजेंद्र नारायणसिंग देव यांची गणतंत्र परिषद ; वॅ. एन्. सी. चटर्जी, वि. घ. देशपांडे. डॉ. ना. भा. खरे व सर गोकुळचंद नारंग यांची हिंदुमहासमा; व्ही. मुन्नुस्वामी, ए. जयरामन्, व्ही. नूवर्गसामी पदयाची, एन्. डी. गोविंदस्वामी आदींची तामीलनाडू टॉयलर्स पार्टी; ए. कृष्णस्वामी मुदलियार, एन्. आर्. एम्. स्वामी व दोरायस्वामी, पिल्ले रामचंद्र यांची कॉमनविलपार्टी; एस्. के. कंडस्वामी बेवी यांचा द्रविड कळघम ; सरदार हुकुमसिंह, सरदार अजितसिंग सरहदी यांचे (मास्टर तारासिंगांचे) अकाली दल ; श्री. शिवमूर्ती स्वामी यांचा लोकसेवक संघ; व Annie Mascavek, एडवर्ड पाल, मथुराम आदी काही स्वतंत्र सदस्य या सर्वांचा समावेश होता. या सर्वांशीच पंडितजींचे संबंध असत. श्री. जमनादास मेहता यांचा लोकशाही स्वराज्य पक्ष, जम्मूची प्रजापरिषद, पं. नीलकंठ दास यांचा स्वाधीन जनसंघ, आर. शंकर यांचे हिंदूमहामंडळ, स्वामी करपात्री व श्री. नंदलाल शास्त्री यांची रामराज्यपरिषद, चक्रवर्ती राजगोपालाचारी, एन्. जी. रंगा व मिनू मसानी यांची स्वतंत्र पार्टी, पं. द्वारकाप्रसाद मिश्र व पु. य. देशपांडे यांची भारतीय लोक काँग्रेस, बिहारचे शोषित दल, भारतीय क्रांति दल, संयुक्त महाराष्ट्र समिती, महागुजरात जनता परिषद, गोवा मुक्ति संग्राम समिती, राजस्थानची जनता पार्टी, (छोटा नागपूर) जनता पार्टी, श्री, महामायाप्रसाद सिन्हा यांचे जनक्रांतिदल या सर्वांशी पंडितजी संपर्क साधून होते. सर छोटूराम यांच्या युनियनिस्ट पार्टीचे काही अनुयायीही त्यांच्या संबंधात होते. वामपंथीयांशीही त्यांचे व्यक्तिगत संबंध होते. डॉ. राममनोहर

---

*"Nothing is so discouraging to subordinates as a chief who hesitates." (Napoleon)

लोहिया, श्री. एच्. व्ही. कामथ, श्री. अशोक मेहता आदींची गणना या श्रेणीत आहे. तीच गोष्ट रिपब्लिकन पार्टीचे दादासाहेब गायकवाड यांचीही आहे. खुद्द काँग्रेसमधील डॉ. संपूर्णानंद, राजर्षी पुरुषोत्तमदास टंडन, सेठ गोविंददास, के. एम्. मुनशी, आचार्य कृपलानी, माननीय लालबहादूर शास्त्री, घनश्यामदास गुप्त, ठाकूर रघुनाथ सिंग, राष्ट्रकवी सोहनलालजी द्विवेदी, आदी पुढारी तसेच राष्ट्रसेविका समिती, आर्यसमाज व सर्वदलीय गोरक्षा महाअभियान समिती यांच्या कार्यकर्त्यांशीही त्यांची जवळीक होती. डॉ. धनंजयराव गाडगीळ व इतर अर्थशास्त्रज्ञांशीही ते वारंवार विचार-विनिमय करीत. The Two Plans या त्यांच्या कृतीच्या मागे अशा विचार-विमर्शाची भक्कम पार्श्वभूमी होती. पूर्ण विचारांती निश्चित झालेल्या आपल्या जीवनश्रद्धा कायम ठेवून या सर्व लहान-थोरांच्या विचारांचे मार्मिक रसग्रहण ते करीत व त्याचा उपयोग आपली मूळ भूमिका अधिक परिष्कृत व पुष्ट करण्याकरिता ते करीत. त्यांच्या मन-बुद्धीची दारे उघडी होती. परंतु केवळ बाह्य अवडंबरावर भुलून जाऊन कोणाच्याही विचारांचा विवेकशून्य, तारतम्य-विरहित स्वीकार त्यांना अयोग्य वाटत असे.

६

जनसंघाची मुख्य स्पर्धा सत्तेच्या क्षेत्रात काँग्रेसशी व विचारसरणीच्या क्षेत्रात कम्युनिझम्शी होती. हिंदू राष्ट्राच्या समर्थकांच्या मनांत संदेह, संभ्रम व न्यूनगंड निर्माण करण्याच्या दृष्टीने एक स्वस्त युक्ती कम्युनिस्ट अवलंबितात. 'तुमच्या हिंदुराष्ट्राचे ब्ल्यूप्रिन्ट कोठे आहे ?' अशी पृच्छा ते अशा थाटात करतात की जणू जागतिक कम्युनिस्ट समाजरचनेचा ब्ल्यू प्रिन्ट खिशात घेऊनच हे घराबाहेर पडले आहेत. हे अर्थात् खरे आहे की, अशा प्रकारचा उथळपणा वरच्या श्रेणीचे, गंभीर प्रवृत्तीचे पुढारी दाखवीत नाहीत; परंतु अशांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे व स्वस्त चलाखीचा उपयोग करणाऱ्या अती उत्साही कार्यकर्त्यांची संख्या सारखी वाढती आहे.

तत्त्वज्ञान या दृष्टीने कम्युनिझमला आमचा विरोध आहे. आणि तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने कम्युनिझम व सोशॅलिझमविषयी काही विवरण पुढे करण्याचाही मानस आहे. परंतु वरील प्रश्नाच्या संदर्भात हे म्हणणे क्रमप्राप्त आहे की, कम्युनिझमचे प्रणेते व नेते उत्तम विचारक असले तरी त्यांचे बहुसंख्य अनुयायी प्रकृतीने उथळ असावेत, हा शापच जणू कम्युनिझमच्या चळवळीला लागलेला आहे. उदाहरणार्थ, या चळवळीच्या प्रारंभिक काळात Engels ने केलेले पुढील निरीक्षण पहा –

" The materialist conception of history has a lot of them now-a days, to whom it serves as an excuse for not studying history.

In general, the word ' materialistic ' serves many of the younger

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३४९
R.T.E.E.
लोकायत ३१/८/८६

writers in Germany as a mere phrase with which anything and everything is labelled without further study. That is, they stick on this label and then consider the question disposed of."

"And as for our own Party ..... a large section of the German Communist Party is also angry with me for opposing their utopias and declamations."

"You, who have really done something, must have noticed yourself how few of the young literary men who fasten themselves on to the party give themselves the trouble to study economics, the history of economics,, the history of trade, of industry, of agriculture, of the formations of Society ..... It often seems as if these gentlemen think anything is good enough for the workers. If these gentlemen only knew that Marx thought his best things were still not good enough for the workers, how he regarded it as a crime to offer the workers anything but the very best."

["इतिहासाची भौतिकतावादी उपपत्ती मानणारे हल्ली असे पुष्कळजण आहेत की ज्यांना इतिहासाचा अभ्यास न करण्यासाठी ते एक सोइस्कर निमित्त केवळ ठरते.

सर्वसाधारणतः, जर्मनीतील अनेक तरुण लेखकांना 'भौतिकतावादी' हा असा शब्द गवसला आहे की विशेष अध्ययन न करता प्रत्येक गोष्टीवर जो एखाद्या लेबलाप्रमाणे चिकटवून द्यावा. म्हणजे, ते हे लेबल लावून टाकतात आणि तो प्रश्न निकालात निघाला आहे असे मानतात."

"आणि आपल्या पक्षाविषयीच बोलावयाचे तर जर्मन कम्युनिस्ट पक्षातील बराच मोठा गट माझ्यावर रागावलेला आहे. कारण मी त्यांच्या स्वप्नरंजनाला व वक्तृत्वपूर्ण आतषबाजीला विरोध करतो."

"तुम्ही प्रत्यक्ष काही काम केलेले आहे. तुमच्या ध्यानात आलेच असेल की पक्षाला चिकटून असलेल्या तरुण साहित्यिकांपैकी किती थोडेजण अर्थशास्त्र, अर्थशास्त्राचा इतिहास, व्यापाराचा इतिहास तसेच उद्योग, शेती, समाजाची जडणघडण इत्यादी गोष्टींचा अभ्यास करण्याचे कष्ट घेतात. पुष्कळदा असे दिसते की, कामगारांपुढे काहीही ठोकून दिले तरी चालते, असेच या सद्गृहस्थांना वाटत असावे. आपल्या उत्कृष्ट गोष्टीही कामगारांसाठी पुरेशा समाधानकारक नाहीत, अत्युत्कृष्ट जे असेल त्या व्यतिरिक्त काहीही कामगारांना देणे म्हणजे गुन्हा आहे असे मार्क्सला किती उत्कटतेने वाटत असे, याचे ज्ञान जर या सद्गृहस्थांना असते तर किती बरे झाले असते."]

विचारांच्या उथळपणाच्या बाबतीत आजचे भारतीय कम्युनिस्ट गेल्या शतकातील

लोहिया, श्री. एच्. व्ही. कामथ, श्री. अशोक मेहता आदींची गणना या श्रेणीत आहे. तीच गोष्ट रिपब्लिकन पार्टीचे दादासाहेब गायकवाड यांचीही आहे. खुद्द काँग्रेसमधील डॉ. संपूर्णानंद, राजर्षी पुरुषोत्तमदास टंडन, सेठ गोविंददास, के. एम्. मुनशी, आचार्य कृपलानी, माननीय लालबहादूर शास्त्री, घनश्यामदास गुप्त, ठाकूर रघुनाथ सिंग, राष्ट्रकवी सोहनलालजी द्विवेदी, आदी पुढारी तसेच राष्ट्रसेविका समिती, आर्यसमाज व सर्वदलीय गोरक्षा महाअभियान समिती यांच्या कार्यकर्त्यांशीही त्यांची जवळीक होती. डॉ. धनंजयराव गाडगीळ व इतर अर्थशास्त्रज्ञांशीही ते वारंवार विचार-विनिमय करीत. The Two Plans या त्यांच्या कृतीच्या मागे अशा विचार-विमर्शाची भक्कम पार्श्वभूमी होती. पूर्ण विचारांती निश्चित झालेल्या आपल्या जीवनश्रद्धा कायम ठेवून या सर्व लहान-थोरांच्या विचारांचे मार्मिक रसग्रहण ते करीत व त्याचा उपयोग आपली मूळ भूमिका अधिक परिष्कृत व पुष्ट करण्याकरिता ते करीत. त्यांच्या मन-बुद्धीची दारे उघडी होती. परंतु केवळ बाह्य अवडंबरावर भुलून जाऊन कोणाच्याही विचारांचा विवेकशून्य, तारतम्य-विरहित स्वीकार त्यांना अयोग्य वाटत असे.

६

जनसंघाची मुख्य स्पर्धा सत्तेच्या क्षेत्रात काँग्रेसशी व विचारसरणीच्या क्षेत्रात कम्युनिझम्शी होती. हिंदू राष्ट्राच्या समर्थकांच्या मनांत संदेह, संभ्रम व न्यूनगंड निर्माण करण्याच्या दृष्टीने एक स्वस्त युक्ती कम्युनिस्ट अवलंबितात. 'तुमच्या हिंदुराष्ट्राचे ब्ल्यूप्रिन्ट कोठे आहे ?' अशी पृच्छा ते अशा थाटात करतात की जणू जागतिक कम्युनिस्ट समाजरचनेचा ब्ल्यू प्रिन्ट खिशात घेऊनच हे घराबाहेर पडले आहेत. हे अर्थात् खरे आहे की, अशा प्रकारचा उथळपणा वरच्या श्रेणीचे, गंभीर प्रवृत्तीचे पुढारी दाखवीत नाहीत; परंतु अशांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे व स्वस्त चलाखीचा उपयोग करणाऱ्या अती उत्साही कार्यकर्त्यांची संख्या सारखी वाढती आहे.

तत्त्वज्ञान या दृष्टीने कम्युनिझमला आमचा विरोध आहे. आणि तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने कम्युनिझम व सोशॅलिझमविषयी काही विवरण पुढे करण्याचाही मानस आहे. परंतु वरील प्रश्नाच्या संदर्भात हे म्हणणे क्रमप्राप्त आहे की, कम्युनिझमचे प्रणेते व नेते उत्तम विचारक असले तरी त्यांचे बहुसंख्य अनुयायी प्रकृतीने उथळ असावेत, हा शापच जणू कम्युनिझमच्या चळवळीला लागलेला आहे. उदाहरणार्थ, या चळवळीच्या प्रारंभिक काळात Engels ने केलेले पुढील निरीक्षण पहा –

" The materialist conception of history has a lot of them now-a days, to whom it serves as an excuse for not studying history.

In general, the word ' materialistic ' serves many of the younger

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३४९
क्र. ८८९
लेबाय अगस्ट

writers in Germany as a mere phrase with which anything and everything is labelled without further study. That is, they stick on this label and then consider the question disposed of."

"And as for our own Party ..... a large section of the German Communist Party is also angry with me for opposing their utopias and declamations."

"You, who have really done something, must have noticed yourself how few of the young literary men who fasten themselves on to the party give themselves the trouble to study economics, the history of economics,, the history of trade, of industry, of agriculture, of the formations of Society ..... It often seems as if these gentlemen think anything is good enough for the workers. If these gentlemen only knew that Marx thought his best things were still not good enough for the workers, how he regarded it as a crime to offer the workers anything but the very best."

["इतिहासाची भौतिकतावादी उपपत्ती मानणारे हल्ली असे पुष्कळजण आहेत की ज्यांना इतिहासाचा अभ्यास न करण्यासाठी ते एक सोइस्कर निमित्त केवळ ठरते.

सर्वसाधारणतः, जर्मनीतील अनेक तरुण लेखकांना 'भौतिकतावादी' हा असा शब्द गवसला आहे की विशेष अध्ययन न करता प्रत्येक गोष्टीवर जो एखाद्या लेबलाप्रमाणे चिकटवून द्यावा. म्हणजे, ते हे लेबल लावून टाकतात आणि तो प्रश्न निकालात निघाला आहे असे मानतात."

"आणि आपल्या पक्षाविषयीच बोलावयाचे तर जर्मन कम्युनिस्ट पक्षातील बराच मोठा गट माझ्यावर रागावलेला आहे. कारण मी त्यांच्या स्वप्नरंजनाला व वक्तृत्वपूर्ण आतषबाजीला विरोध करतो."

"तुम्ही प्रत्यक्ष काही काम केलेले आहे. तुमच्या ध्यानात आलेच असेल की पक्षाला चिकटून असलेल्या तरुण साहित्यिकांपैकी किती थोडेजण अर्थशास्त्र, अर्थशास्त्राचा इतिहास, व्यापाराचा इतिहास तसेच उद्योग, शेती, समाजाची जडणघडण इत्यादी गोष्टींचा अभ्यास करण्याचे कष्ट घेतात. पुष्कळदा असे दिसते की, कामगारांपुढे काहीही ठोकून दिले तरी चालते, असेच या सद्गृहस्थांना वाटत असावे. आपल्या उत्कृष्ट गोष्टीही कामगारांसाठी पुरेशा समाधानकारक नाहीत, अत्युत्कृष्ट जे असेल त्या व्यतिरिक्त काहीही कामगारांना देणे म्हणजे गुन्हा आहे असे मार्क्सला किती उत्कटतेने वाटत असे, याचे ज्ञान जर या सद्गृहस्थांना असते तर किती बरे झाले असते."]

विचारांच्या उथळपणाच्या बाबतीत आजचे भारतीय कम्यनिस्ट गेल्या शतकातील

युरोपियन कम्युनिस्टांवर मात करीत आहेत असे म्हणण्याला वाव आहे. अखिल भारतीय स्तराच्या एका कम्युनिस्ट पुढाऱ्याने केलेल्या वक्तव्यावर आपल्या निवाड्यात सुप्रिम कोर्टाच्या विद्वान् न्यायाधीशांनी पुढील अभिप्राय प्रकट केला आहे.

"We are doubtful if he has fully appreciated the (Communist) literature, if he has read it ..... either he does not know or has deliberately distorted the writings of Marx, Engels and Lenin for his own purpose. We do not know which will be the more charitable view to take ..... It is obvious that appellant has misguided himself about the true teaching of Marx, Engels and Lenin."

["त्याने जर कम्युनिस्ट साहित्य वाचलेच असेल, तर त्याचा आशय नीटपणे त्याच्या ध्यानात आला आहे किंवा नाही, याबद्दल आम्हाला शंका आहे ..... एक तर त्याला मार्क्स, एंजल्स आणि लेनिन यांचे म्हणणे काय होते हे ठाऊक नाही, किंवा आपल्या हेतूसाठी त्यांच्या अभिप्रायाचा त्याने जाणून बुजून विपर्यास केला आहे. यांपैकी कोणती गोष्ट खरी समजणे अधिक औदार्याचे ठरेल हे आम्हाला कळत नाही... अपील अर्ज करणाराने मार्क्स, एंजल्स व लेनिन यांच्या खऱ्या शिकवणुकीसंबंधी दिशाभूल करून घेतली आहे, हे मात्र अगदी उघड आहे."]

ते कसेही असले तरी एवढे मात्र खरे की कम्युनिस्टांनी, व त्यांचे बोलणे ऐकून काही स्वयंसेवकांनीही पंडितजींनाही अनेकदा असा प्रश्न केला होता की आपल्या हिंदु-राष्ट्राचा ब्ल्यू प्रिन्ट कोणता ?

भारतातील वामपंथांच्या गतिविधीविषयी पुढे चर्चा करावयाची असली तरी वरील प्रश्नाविषयी इथे सुरुवातीलाच खुलासा करणे अधिक प्रयोजक होईल असे वाटते.

या प्रश्नाच्या अनुषंगाने लहानपणची अेक घटना मला आठवते. स्थानबद्धता संपल्यानंतरच्या पहिल्याच दौऱ्यात स्वा. सावरकर आमचे गावी, आर्वीला आले होते. संघचालक डॉ. आपटे यांचे घरी निवास होता. दुपारी १२॥ चे सुमाराला स्थानिक हायस्कूलचे २०-२२ विद्यार्थी काळे झेंडे हातात घेऊन तिथे आले व 'सावरकर गो बॅक' च्या घोषणा देऊ लागले. अशा प्रसंगी मारामारी होणे स्वाभाविक होते. परंतु तात्यारावांनी तसे घडू दिले नाही. उलटपक्षी त्या लहान विद्यार्थ्यांनाच आपल्या समोर बसवून त्यांनी विचारले की, "या 'गो बॅक'च्या घोषणा तुम्ही का दिल्यात ?" प्रश्न विचारण्याचाच अवकाश, नवव्या वर्गातील एक विद्यार्थी उभा राहिला व त्याने धिटाईने इंग्रजीत प्रश्न केला, "Mr. Sawarkar ! What is the blue-print of your Hindu nation ?"

["सावरकर महाशय, आपल्या हिंदुराष्ट्राचा तपशीलवार आराखडा आपण सांगू शकाल का ?"]

त्या मुलाचे वय व हा प्रश्न ध्यानात घेता हे कळायला वेळ लागला नाही की आमच्या हायस्कूलमधील अेका कम्युनिस्ट शिक्षकाने केलेला हा उपद्व्याप असावा.

तात्यारावांनी बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांकडे क्षणभर रोखून पाहिले व म्हटले, " मुलांनो, तुम्ही जिंकलात, मी हरलो. या प्रश्नाचे उत्तर मी तुम्हाला देऊ शकत नाही. "

नंतर बाजूला बसलेल्या आम्हा मंडळींकडे बघून त्यांनी बोलायला सुरुवात केली.

मध्यंतरी अेक कालखंड असा आला की जेव्हा तीन देशांतील तीन सुप्रसिद्ध क्रान्तिकारक लंडन शहरात आश्रय घेऊन होते. आयर्लंडचे इमॉन डी व्हॅलेरा, भारताचे सावरकर व रशियाचे लेनिन.

लेनिनच्या मागे रशियन गुप्तचरांचा ससेमिरा असे. भूमिगत अवस्थेत असताना लेनिनने तीन दिवस सावरकरांच्या इंडिया हाउसमध्ये आश्रय घेतला होता. रात्रीचे जेवणाचेवेळी केवळ सावरकर व लेनिन अेकत्र येत.

अेके रात्री सावरकर लेनिनला म्हणाले की, " तुमच्या 'इझम्' मध्ये मला रुची नाही. परंतु तुमच्या हाती सत्ता आली तर रशियाचा ब्ल्यू प्रिन्ट कसा असेल हे जाणण्याची मला इच्छा आहे." लेनिन हसले व म्हणाले की, " हा प्रश्न तुम्ही मला या वेळी कसा विचारीत आहात ? क्रियान्वयनाची क्षमता येईपर्यंत ब्ल्यू प्रिन्टचा विकास होऊ शकत नाही. तोपर्यंत कार्य करीत राहण्याकरता मार्गदर्शक सिद्धान्तांची आवश्यकता असते. सत्ता हाती आल्यानंतर त्या वेळच्या अेकंदर परिस्थितीचे स्वरूप ध्यानी घेऊन Blue-print हळूहळू विकसित करावयाचा असतो."

त्यानंतर पुन्हा मुलांच्याकडे बघून ते म्हणाले," हाच प्रश्न मला लेनिनने विचारला असता, तर मी त्याला प्रतिप्रश्न केला असता की त्या वेळी तुझ्या रशियाच्या ब्ल्यू-प्रिन्ट विषयी तू जे उत्तर दिले होतेस ते स्मरणात आहे काय ? लेनिनला तर मी हे विचारू शकलो असतो, परंतु मुलांनो, तुमच्या प्रश्नाचे उत्तर मी तुम्हाला देऊ शकत नाही. "

(यात आश्चर्य नाही की, सत्ता हाती आल्यानंतर अेका प्रश्नकर्त्याला उत्तर देताना लेनिन म्हणाले होते की, सध्याच्या स्थितीत माझा कम्युनिझम म्हणजे रशियाचे सोव्हियेटीकरण व विद्युतीकरण.)

ब्ल्यू प्रिन्टच्या इच्छेचा संसर्गजन्य रोग आमच्या देशातील समाजवाद्यांनाही लागला होता, असे दिसते. सन १९३४ मध्ये पाटणा येथे ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या अधिवेशनाचे वेळी काँग्रेसच्या अंतर्गत काँग्रेस सोशॅलिस्ट पार्टीची बैठक चालू असताना पार्टीचा प्रस्तावित कार्यक्रम मान्यवर जयप्रकाशजींनी महात्माजींना दाखविला. त्यांत अेक मुद्दा हाही होता की मार्क्सवादी घोषणेप्रमाणे ' प्रत्येकाकडून त्याच्या क्षमतेप्रमाणे व प्रत्येकाला त्याच्या आवश्यकतेप्रमाणे ' अशी व्यवस्था समाजरचनेत असावी. या वाक्यावर बोट ठेवून गांधीजी म्हणाले, ' Jai Prakash ! If you do that, I am with you - 100 % ' [" जयप्रकाशजी, आपण हे कराल तर मी शंभर टक्के आपल्याबरोबर आहे. '] सिद्धान्त उत्तम असला तरी निकट भविष्यात तो व्यवहार्य नाही असेच गांधीजींना सुचवावयाचे होते, हे जयप्रकाशजींच्या ध्यानात आले. स्वत: कार्ल मार्क्सने अर्थशास्त्राविषयी अेकही

शब्द लिहिला नाही असे लेनिनने लिहिले आहे. याचा अर्थ असा की, उत्पादनाच्या व वितरणाच्या एजन्सीज् कोणत्या असतील, त्यांचे परस्पर संबंध काय असतील, विनिमय व उपभोगाची व्यवस्था कशी असेल, विभिन्न आर्थिक हितसंबंधांतील परस्पर संबंधांचे नियंत्रण करणारी मशिनरी कोणती असेल आदी गोष्टींचे विवरण मार्क्सने केलेले नाही. मार्गदर्शक सिद्धान्त मात्र दिले आहेत आणि तेच व्यवहार्य व शहाणपणाचेही आहे.

ब्ल्यू प्रिन्ट मनोवृत्तीविषयी स्वत: कार्ल मार्क्सचे मत काय होते याचे विवरण वुल्फ गॅन्ड लिऑन हार्ड याने आपल्या ' Three Faces of Marxism ' या ग्रंथात पुढील प्रमाणे केले आहे.

" As for the detailed development of these phases and the solutions that would have to be found for individual practical questions, Marx and Engels declined all discussion, since they regarded this as Utopian speculation. " The working class (has) ····· no ready made utopias to introduce " par de'cret peuple," Marx declared, they have " no ideals to realise but to set free the elements of the new society with which the old collapsing bourgeois society already is pregnant, " It is not the task of Communists " to create utopian systems for the organisation of the future society, least of all in questions of details. ··To speculate on how a future society might organize the distribution of food and dwellings heads directly to Utopia. The people of the Communist Society of the future will not care a rap about what we to-day think they should do."

[" निरनिराळ्या अवस्थांतील परिवर्तनाचा तपशील आणि निरनिराळ्या लोकांच्या व्यवहार्य प्रश्नांना शोधावी लागणारी उत्तरे यांचा विचार यासंबंधी चर्चा करण्यास मार्क्स आणि एंजल्स यांनी स्पष्ट नकार दिला आहे. कारण त्यांना वाटत होते की अशा प्रकारची चर्चा म्हणजे शुद्ध कल्पनाविलास ठरेल. ' कामगारवर्गाजवळ अशी कोणतीही तयार कल्पनासृष्टी नाही की जी क्रांतिवादी लोकांना सांगावी. ' मार्क्स स्पष्टपणे म्हणतो की, ' त्यांच्यापुढे अन्य कोणतेही उद्दिष्ट नाही. त्यांचा हेतू नवसमाजाला जन्म देणाऱ्या ज्या शक्ती ढासळत्या बूर्ज्वा समाजाच्या पोटातच विद्यमान आहेत, त्या मुक्त कराव्या एवढाच आहे. ' " भावी समाजाच्या संघटनेसाठी कल्पनेने आदर्श पद्धती निर्माण करणे हे कम्युनिस्टांचे काम नाही. बारीक सारीक तपशीलाचा विचार तर त्यांना मुळीच कर्तव्य नाही. भावी समाजात अन्न किंवा घरे यांच्या वाटपाची व्यवस्था कशी असावी याचा विचार सरळ कल्पनारंजनाकडेच नेणारा ठरतो." " भावी कम्युनिस्ट समाजातील लोकांनी काय करावे यासंबंधी आम्हाला आज काय वाटते या गोष्टीला लवमात्र किंमत त्या समाजातील लोक देणार नाहीत. "]

नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ' Readings in Marxist Sociology ' या ग्रंथाचे

संपादक बूम टॉम बॉटमोर व पॅट्रिक गुड म्हणतात की, "समाजवादी समाज कसा असेल यासंबंधी मार्क्सवादी समाजशास्त्रात फारसे विवेचन नाही. खुद्द मार्क्सला पुढील समाजाविषयी भाकिते करण्यापेक्षा वर्तमान समाजाचे, परिस्थितीचे पृथक्करण करण्यात अधिक रस होता."

अशा या विषयावरील प्रश्नाला उत्तर देताना ठाण्याच्या बैठकीत श्रीगुरुजी म्हणाले की, " प्राप्त परिस्थितीच्या आवश्यकता ध्यानात घेऊन जशी योग्य वाटेल तशी समाजरचना करण्याचा हिंदूंना पूर्ण अधिकार आहे. अट अेवढीच आहे की कोणतीही रचना सनातन-धर्माच्या शाश्वत सिद्धान्तांच्या प्रकाशात, त्यांना अनुकूल अशी व्हावी. "

मद्रासला एका बैठकीत एका कॉलेज-विद्यार्थ्याने ब्ल्यू प्रिन्टविषयी असाच प्रश्न केला असता दीनदयाळजींनी प्रतिप्रश्न केला होता की, " Do you want to tie down the hands of future generations ? " [" भावी पिढ्यांचे हात बांधून टाकण्याची आपली इच्छा आहे काय ?"]

सारांश, ब्ल्यू प्रिन्टविषयीचा प्रश्न बालिशपणाचा आहे. पंडितजींनी असा कोणताही ब्ल्यू प्रिन्ट दिलेला नाही, व यावरून त्यांच्या विचारांची खोलीच सिद्ध होते.

७

आपण असे म्हणतो की, धर्माचा विचार दोन भागांत व्हावा. एकतर सनातन, शाश्वत, त्रिकालाबाधित व अपरिवर्तनीय सिद्धांत. दुसरा म्हणजे अशा सिद्धांतांच्या प्रकाशात वारंवार बदलणाऱ्या परिस्थितीला अनुकूल अखंड परिवर्तनशील समाजरचना.* सिद्धांत अपरिवर्तनीय आहेत; त्यांच्या प्रकाशातील समाजरचना परिस्थितिसापेक्ष व म्हणून परिवर्तनशील आहे. असाच काहीसा प्रकार थोर विचारकांच्या प्रकट विचाराविषयीही असतो. शाश्वत सिद्धांत परिस्थिति-निरपेक्ष असतात. परंतु त्यांचे स्पष्टीकरण किंवा त्यावरील भाष्य नेहमी परिस्थिति-निरपेक्ष असू शकत नाही. तत्त्व तेच असले तरी प्राप्त परिस्थितीतील बारकावे, समाजाचा स्तर व प्रवृत्ती इत्यादी अनेक गोष्टी ध्यानात ठेवूनच त्याचे प्रतिपादन करावयाचे असते. एकच मध्यम मार्ग सांगावयाचा असला तरी त्याचे विषदीकरण क्रूर समाजासमोर करताना जी शब्दरचना व विषयाची मांडणी असेल ती जशीच्या तशी भित्र्या लोकांच्या समुदायासमोर उपयुक्त व्हावयाची नाही. आशय एकच असला तरी आग्रहात फरक पडेल. यामुळेच असे आढळते की, एकाच तत्त्वप्रणालीच्या विभिन्न कालखंडात किंवा विभिन्न

---

* टॉलस्टॉयने धर्माचे तीन विभाग केले आहेत. (१) इस्सेन्शिअल्स ऑफ रिलिजन, (२) फिलॉसफी ऑफ रिलिजन व (३) रिच्युअल्स ऑफ रिलिजन.

भूभागात होऊन गेलेल्या प्रवक्त्यांच्या प्रकट वक्तव्यांत सकृद्दर्शनी विरोधाभास आहे. इतकेच नव्हे तर एकच श्रेष्ठ पुरुष प्रसंगाप्रसंगाने परस्परविसंगत किंवा परस्परविरोधी विचार प्रकट करतो आहे की काय असे वाटू शकते. भगवद्गीतेचा त्याग करून फूटबॉल खेळण्याचा विवेकानंदांचा उपदेश त्याच प्रकारात मोडतो. ज्या परिस्थितीत संभाषण, भाषण किंवा लेखन केले गेले तिचा संदर्भ व पार्श्वभूमी ध्यानात न घेता केवळ शब्दांच्या वाच्यार्थावरच गेल्याने गडबड होऊ शकते. कोणत्याही थोर व्यक्तीच्या विचारांचे दर्शन घेताना हा विवेक मनात ठेवणे आवश्यक आहे.

दुसऱ्या एका मुद्याचा ओझरता उल्लेख यापूर्वीच करण्यात आलेला आहे. पंडितजींच्या साहित्यात बहुतेक सर्व प्रचलित व संभाव्य समस्यांविषयी मार्गदर्शन आढळते. परंतु त्याचे स्वरूप दोन प्रकारचे आहे. एक तर मार्गदर्शक सिद्धांतांची केवळ सूत्ररूपाने मांडणी. दुसरे अशा सूत्रांचे विश्लेषणात्मक विषदीकरण. पंडितजींच्या साहित्यात उपर्युक्त स्वरूपाच्या सर्व समस्यांविषयी मार्गदर्शक सूत्रे आहेत. परंतु प्रत्येक सूत्राचे विशदीकरण असेलच असे नाही. एखाद्या तत्त्वाचे प्रतिपादन केले तरी त्याचे स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता वाटावी अशी परिस्थिती निर्माण झालेली नसेल तर मुद्दाम तसे स्पष्टीकरण देण्यात वेळ घालविणे व्यावहारिक कार्यकर्त्याला झेपण्यासारखे नसते. कारण त्याच्या प्रतिपादनाचा उद्देश डॉक्टरेटकरिता थिसिस लिहिण्याचा नसून समाजाला व्यावहारिक दिशादर्शन करण्याचा असतो. त्यामुळे ज्या प्रश्नावर वादळ, गोंधळ किंवा स्फोटक परिस्थिती निर्माण झाली असेल त्या प्रश्नात अन्तर्स्यूत असलेल्या तत्त्वाचे विशदीकरण तर असा विचारक न चुकता करील. परंतु परिस्थितीची आवश्यकता नसेल तर इतके विस्तृत स्पष्टीकरण देण्याच्या भरीला तो पडणार नाही. ज्या ज्या प्रश्नाविषयी, तत्त्वाविषयी असे स्पष्टीकरण देण्यात आले नाही त्या त्या प्रश्नाविषयी वा तत्त्वाविषयी विचारकाची भूमिका संदिग्ध होती किंवा तपशीलवार मार्गदर्शन करण्याची क्षमता त्याचे ठायी नव्हती, असे म्हणणे चुकीचे होईल. याच कारणामुळे काही महत्त्वाचे व जिव्हाळ्याचे प्रश्न असे आहेत की, त्यांचेविषयी पंडितजींनी सूत्रे मांडली परंतु भाष्य मात्र केले नाही. हा विषय स्पष्टपणे ध्यानात यावा म्हणून अशा प्रकारची एक संपूर्ण समस्या विचाराकरिता घेऊन सांगोपांग विवरण करणे उपयुक्त होईल असे वाटते.

अशी समस्या म्हणजे आमच्यासमोरील सामाजिक प्रश्न होत. याविषयी वरील नियमच लागू होतो.

'सिद्धांत व धोरण' या दस्तऐवजात मार्गदर्शक सिद्धांत म्हणून सामाजिक प्रश्नावरील तत्त्वे ग्रथित करण्यात आलेली आहेत व तत्त्व या दृष्टीने ती स्वयंपूर्ण आहेत. परंतु त्यांचे विस्ताराने विशदीकरण करण्याचा प्रसंग पंडितजींचे वेळी आला नाही. तत्त्वे नमूद करण्यात आली; परंतु विशदीकरण

आवश्यक वाटावे असा प्रसंग किंवा परिस्थिती निर्माण झालेली नव्हती. जॉन नॉक्सप्रमाणे प्रखर हल्ला चढविणारे पू. डॉ. आंबेडकर यांची चळवळ, मागण्या व धर्मांतर हे सर्व काही या कालखंडात झाले हे खरे, परंतु आंदोलनाची सूत्रे पू. बाबासाहेबांसारख्या जबाबदार प्रशिक्षित देशभक्ताच्या हाती असल्यामुळे सामाजिक प्रश्नावर सार्वजनिक चर्चा झाली तरी तिचे स्वरूप उग्र व चिंताजनक असे नव्हते.*

आरक्षणाच्या प्रश्नावर अलीकडील काळात कधी या तर कधी त्या बाजूकडून उग्र व प्रसंगी हिंसक आंदोलने झाली आहेत. एकूण सामाजिक परिस्थितीला अगदी अवांच्छनीय असे वळण मिळत आहे. नाजूक व जिव्हाळ्याचे प्रश्न सभागृहातून मोकळ्या रस्त्यावर येत आहेत. अशी स्थिती त्या वेळी नसल्यामुळे तत्त्वचिंतन अवश्य झाले, परंतु तत्त्वांचे विशदीकरण करण्याची पाळी आली नव्हती.**

पंडीतजी कोणत्याही क्षेत्रात यथास्थितिवादी नव्हते. समाजरचनेतील जुनी जळमटे झाडून टाकून समाजाला युगानुकूल नवीन वळण द्यावे, असे त्यांचे मत होते. सामाजिक विषयांत त्यांनी क्रांतीचा पुरस्कार केला नाही, तसा यथास्थितिवादाचाही केला नाही. त्यांचा मार्ग पुनःप्रबोधनाचा (Renaissance) होता, व त्याकरिता समाजातील सर्व घटकांत परस्पर सामंजस्य राखून धैर्यपूर्वक वाटचाल करीत राहणे आवश्यक आहे, असे ते मानीत. कोणत्याही बाजूने टोकाची भूमिका घेतली तर सर्वांचेच नुकसान होईल असे ते म्हणत. सामाजिक प्रश्न सोडवणे म्हणजे रेशमी धाग्याच्या गुंतागुंतीची उकल करणे होय. तलवारीने ' गारजियन नॉट ' कापणे हा त्याचा उचित मार्ग नव्हे. शतकानुशतके शोषित – पीडित – दलित व त्यामुळे मागासलेल्या स्थितीत राहिलेल्या समाजाच्या अंगाला शेष समाजाच्या बरोबर सवलती व संरक्षण देणे क्रमप्राप्तच आहे, व तसे करताना पुढारलेल्या वर्गांनी तक्रार करणे हे सामाजिक एकात्मतेच्या अभावाचेच लक्षण होय. परंतु त्याच बरोबर अशा सवलतींचा व संरक्षणाचा लाभ घेऊन शीघ्रातिशीघ्र स्वतःच्या पायावर उभे राहण्याची जिद्द मागासलेल्या वर्गात निर्माण न झाली, ' उद्धरेद् आत्मनाऽत्मानम् ' ही वृत्ति त्यांच्यात न बाणली व त्याऐवजी जातिवादावर आधारित संकुचित निहित स्वार्थीभाव त्यांचे ठायी जागृत झाला तर या सवलती व संरक्षणाचा पांगुळगाडा मागासलेल्यांना कायमचे पंगू करून टाकील असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. त्यामुळेच त्यांनी या गोष्टींना स्वतःच कालमर्यादा घालून दिली. त्यांच्या विचारसरणीतील मर्म मागासवर्गांनी ध्यानात न घेतल्यामुळे व त्यांनी दिलेल्या योजनेची अंमलबजावणी करण्यात राजकीय कारणांमुळे अनेक उणीवा व दोष निर्माण झाल्यामुळे आजचा अनवस्था प्रसंग आला आहे.

केवळ आरक्षणाच्याच प्रश्नाविषयी नव्हे तर इतरही सर्व सामाजिक प्रश्नांविषयी त्यांचे विचार राजा राममोहन रॉय ते डॉ. आंबेडकर या सुधारकांच्याच वळणाचे होते.

---

* परिशिष्ट क्र. १६ पहा.

** परिशिष्ट क्र. १७ पहा.

न्या. रानडे यांच्या पुढील उद्‌गारांत व्यक्त झालेल्या भावना पंडितजींच्या विचारांशी जुळणाऱ्या आहेत :–

" The change which we should all seek is thus a change from constraint to freedom, from credulity to faith from status to contract, from authority to reason, from unorganised to organised life, from bigotry to toleration, from blind fatalism to sense of human dignity. This is what I understand by social revolution both for individuals and for societies in this country."

[" अशा प्रकारे, आपण साऱ्यांनी जो बदल घडवून आणावयाचा आहे, त्याचे स्वरूप बद्धतेतून मुक्ततेकडे, भाबुकतेतून श्रद्धेकडे, प्रतिष्ठाभावनेतून देवाणघेवाणीकडे, अधिकार गाजविण्याच्या प्रवृत्तीतून तर्कशुद्धतेकडे, असंघटित जीवनातून संघटित जीवनाकडे, अतिरेकी आग्रहीपणातून सहिष्णुतेकडे, अंध दैववादातून मानवी प्रतिष्ठेच्या विचाराकडे नेणारे असेल. या देशातील निरनिराळे समाजगट आणि व्यक्ती या उभयतांच्याही दृष्टीने सामाजिक क्रांतीचा अर्थ मी हाच मानतो. "]

परंतु हे काम केवळ विद्वेषमूलक संघर्षाने होणार नाही किंवा केवळ कायदे केल्यानेही जमणार नाही. सामाजिक क्रांतीच्या कार्यात कायद्याचे स्थान कोणते असते याविषयी डॉ. आंबेडकरांनी काढलेल्या उद्‌गारांत पंडितजींचे विचार प्रतिबिंबित झाले आहेत. पूजनीय बाबासाहेब म्हणतात :–

" Rights are protected not by law but by the social and moral conscience of society. If social conscience is such that it is prepared to recognise the rights which law chooses to enact, rights will be safe and secure. But if the fundamental rights are opposed by the community, no law, no parliament, no judiciary can guarantee them in the real sense of the word. "

[" अधिकारांचे संरक्षण कायद्याने नव्हे तर समाजाच्या सामाजिक आणि नैतिक सदसद्‌विवेकबुद्धीने होते. कायदा जे अधिकार देण्याचे ठरवतो, ते मान्य करण्यास समाजाचे मन तयार असेल तर ते अधिकार अबाधित आणि सुरक्षित राहतील. पण मूलभूत अधिकारांना समाजाचा विरोध असेल तर कोणताही कायदा किंवा न्यायसंस्था त्यांची खऱ्या अर्थाने हमी देऊ शकणार नाही."]

या दृष्टीने सामाजिक सदसद्‌विवेकबुद्धी जागृत करण्याचे काम सर्वच देशहितेच्छूंनी करावे असे पंडितजींना वाटे व हिंदूंची ' Social and moral conscience' जागविण्याचा खरा प्रभावी मार्ग राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यपद्धतीत आहे अशी त्यांची श्रद्धा होती.

केवळ उदाहरण म्हणून व आजच्या स्थितीत महत्त्वाचे म्हणून या संपूर्ण प्रश्नाचे विस्तृत विवरण केले आहे. सामाजिक दुष्ट रीतींचाही याच वर्गात समावेश होतो. परंतु

अशा स्वरूपाचे इतर मुद्दे तोपर्यंत फारसे समोर आले नव्हते.

समाजसुधारणेविषयी बोलण्याचा अधिकार कोणाला आहे, याविषयी पंडितजींचे मत लोकमान्य टिळकांच्या मताप्रमाणेच होते. लोकमान्य म्हणत, " हिंदुधर्मात किंवा रीती-रिवाजांत ज्यास सुधारणा करावयाची असेल त्यास 'मी हिंदु आहे व मला हिंदु राहावयाचे आहे' असा पहिल्याने पूर्ण अभिमान पाहिजे. ल्यूथर वगैरे सुधारक अशा प्रकारचे होते." हे ध्यानात घेण्यासारखे आहे की, मार्टिन ल्यूथरची बायबलवर व जीजसवर पूर्ण श्रद्धा होती. *

आपल्या धर्मावर ज्याची दृढ श्रद्धा नाही, 'मी हिंदू आहे' याचा ज्याला अभिमान नाही, अशा व्यक्तीला हिंदू धर्मात व समाजात कोणत्या सुधारणा होणे इष्ट आहे हे सांगण्याचा नैतिक अधिकार नाही, असे पंडितजी म्हणत. **

प्रतिपाद्य विषय स्पष्ट व्हावा या हेतूने उदाहरण म्हणून एक विशेष समस्या घेऊन तिचे आतापर्यंत सविस्तर विवरण केले. गेल्या सतरा वर्षांत अशा आणखीही काही समस्या देशासमोर आल्या आहेत. आगामी काळात अशा समस्यांची संख्या उत्तरोत्तर वाढणार आहे. यांचा विचार करताना ध्यानात ठेवावयाची तत्त्वे पंडितजींच्या लिखाणात सूत्ररूपाने आहेत. त्यांचे विस्तृत विवरण मात्र नाही. तत्त्वांचे विशदीकरण करण्याकरिता लागणाऱ्या बौद्धिक क्षमतेचा अभाव हे त्याचे कारण नव्हते, असे विशदीकरण आवश्यक वाटावे या प्रकारची परिस्थितीच पंडितजींच्या जीवनकाळात निर्माण झाली नव्हती, हे त्याचे कारण आहे. तथापि भविष्यकाळात अशा समस्यांना तोंड देताना पंडितजींच्या अनुयायांनी त्यांचे मार्गदर्शक सिद्धांत दृष्टीसमोर ठेवून त्यांच्या आधारावरच प्राप्त समस्यांची उत्तरे शोधावयाची आहेत.

९ या ग्रंथाचे नाव 'विचारदर्शन' असे आहे. दीनदयाळजी एक श्रेष्ठ विचारक होते असे आपण म्हणतो. वास्तविक 'विचारक' या संज्ञेमुळे त्यांचेविषयी उचित तोच बोध व्हायला हरकत नसावी. पंडितजींना ओळखणाऱ्या मंडळींचे मनांत त्यांचेविषयी योग्य तीच, यथार्थप्रतिमा 'विचारक' या संज्ञेने निर्माण होते. परंतु तरीही या संज्ञेविषयी थोडे स्पष्टीकरण देणे सध्या आवश्यक झाले आहे. कारण गेल्या दोन दशकांत 'विचारवंत' (Intellectuals किंवा

---

* काल्विन, झ्विंगली, डेकार्ट, बेकन यांच्याविषयीही हेच म्हणता येण्यासारखे आहे.

** वेदोक्तबंदी, व्यवसायबंदी, स्पर्शबंदी, सिंधुबंदी, शुद्धिबंदी, रोटीबंदी व बेटीबंदी यांचे विरुद्ध झोड उठविणारे स्वातंत्र्यवीर सावरकर कट्टर हिंदुत्ववादी होते.

Academics) या शब्दांचे मानसिक साहचर्य देशातील व खासकरून राजधानीतील काही वेगळ्या प्रकारच्या बुद्धिवंतांशी झाले आहे. सरकारला किंवा विरोधी पक्षांना त्यांच्या धोरणांविषयी सल्ला देण्याची योग्यता व तत्परता ठेवणाऱ्या या मंडळींचे निरनिराळे वर्ग आहेत, परंतु श्रेणी एकच व ती म्हणजे 'विचारवंत' ही.

'Agenda for India' तयार करणारे सर्वश्री रजनी कोठारी, रोमेश थापर, जॉर्ज वर्गीज, बशीरुद्दिन अहमद, कुलदीप नायर व मृणाल दत्त चौधरी, 'दि सेन्टर फॉर दि स्टडी ऑफ डेवेलपिंग सोसायटीज्' मध्ये कोठारींबरोबर काम करणारे गिरी देशिंगकर, व डी. एल्. सेठ, 'दि सेन्टर फॉर पॉलिसी रिसर्च' चे भवानी सेनगुप्ता व प्राण चोपडा, पी. यू. सी एल्. व पी. यू. डी. आर्. मधील श्री. व्ही. एस्. तारकुंडे, व अरुण शौरी तसेच जे. डी. सेठी आदी लोक या श्रेणीत येतात. या मंडळींची योग्यता व त्यांच्या योगदानाचे महत्त्व सर्वांनाच मान्य करावे लागेल. प्रसंगी त्यांचेशी मतभेद असणाऱ्यांना सुद्धा 'विचारवंत' या नात्याने या सर्वांविषयी उचित सन्मान ठेवूनही हे स्पष्ट करणे आवश्यक वाटते की, दीनदयाळजींची श्रेणी या सर्वांहून भिन्न, 'परंतु या सम हा' अशी होती. उद्दिष्ट, जीवनकार्याचे स्वरूप, विचारांचा स्तर व पल्ला, या सर्व दृष्टींनी पंडितजींची श्रेणी भिन्न होती.

पंडितजी व त्यांच्यासारखे अन्य भारतीय दार्शनिक यांचे मानवाच्या वैचारिक इतिहासातील स्थान व श्रेणी यांचा शास्त्रशुद्ध विचार आणखीही एका दृष्टीने होणे आवश्यक आहे.

आमच्या विद्वानांच्या मनावरील पश्चिमी वर्चस्वाचा प्रभाव अद्यापी कायमच आहे. आपले ते ते त्याज्य व पाश्चिमात्यांचे ते ते उत्कृष्ट, ही त्यांची श्रद्धा आहे. त्यामुळे पश्चिमी तत्त्वज्ञान व तत्त्वज्ञ सर्वश्रेष्ठ आहेत, हा निष्कर्ष क्रमप्राप्तच आहे.

हल्ली बहुतेक सर्व प्रमुख भाषांतून पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा इतिहास कमी अधिक प्रमाणांत प्रकाशित झालेला आहे. ग्रीक तत्त्वज्ञानावर गॉम्पर्झ, बर्नेट, झेलर, कुशमन, विंडलबँड, अलिक, रॉस, हिक्स, थिली, स्टेस, रॉजर्स, टेलर तसेच रसेल, कॉपलस्टन आदी लेखकांचे साहित्य उपलब्ध आहे. पाश्चिमात्य जगातील सर्वप्रथम (अयोनियन) तत्त्वचिंतक थेलीस (Thales) ॲनॅक्झीमँडर व ॲनॅक्झीमेनिस यांचेपासून तो प्राचीन तत्त्वज्ञानाच्या संपूर्ण कालखंडावर प्रकाश टाकणारे साहित्य आता उपलब्ध आहे. यातील ग्रीक तत्त्वज्ञानाचा कालखंड ख्रिस्तपूर्व ६२५ पासून ख्रिस्तपूर्व ३२२ पर्यंतचा (म्हणजे ॲरिस्टॉटलच्या मृत्यूपर्यंतचा) आहे. सॉक्रेटीस, प्लेटो, ॲरिस्टॉटल यांचा हा काळ आहे. ॲरिस्टॉटलच्या मृत्यूपासून नवप्लेटो-वादाच्या अंतापर्यंत, म्हणजे ख्रिस्तपूर्व ३२२ ते इ. स. ४७६ पर्यंतच्या हेलेनिस्टिक म्हणजे रोमन तत्त्वज्ञानाच्या कालखंडाचीही गणती स्थूलमानाने याच 'प्राचीन तत्त्वज्ञाना'च्या कालखंडात होते. इ. स. ४७६ ते १४५३ हा कालखंड मध्ययुगीन तत्त्वज्ञानाचा मानला जातो. ऑगस्टीन, ओरिजेन, एरिजेना, रॉसेलिन, अन्सेल्म, ॲबेलॉर्ड, टॉमस ॲक्वायनस, डन्स स्कॉट्स, ओखॅम, एखार्ट, निकोलास, कुझनस हे या

काळातील प्रमुख तत्त्वज्ञ होते. इ. स. १४५३ पासून आजपर्यंतचा कालखंड अर्वाचीन तत्त्वज्ञानाचा आहे. यात इ.स. १४५३ ते १६९० हा कालखंड Renaissance (नवजीवन) या संज्ञेने ओळखला जातो. Renaissance म्हणजे नवजीवनाचे अग्रदूत म्हणून मानले जातात. निकोलस ऑफ कुसा, लिओनार्दो द व्हिन्सी, कोपरनिकस, ब्राहे, केप्लर, गॅलिलिओ, हायगेन्स, न्यूटन आदी वैज्ञानिक आणि फ्रान्सिस बेकन, टॉमस हॉब्स्, देकार्त, स्पिनोझा, लिब्निझ्, पॅरासेल्सस, ब्रूनो, कांपानेला, टेलेसिओ, मॅकीॲव्हेली, बोदँ, जेकब बोहम, थॉमस मूर, ग्रोशियस्, ॲल्थूसिअस, हर्बर्ट ऑफ चेर्बरी, आदी विचारक. इ. स. १६९० ते १७८१ पर्यंतचा (म्हणजे लॉकच्या निबंधापासून ते कांटच्या मीमांसेपर्यंतचा) कालखंड Enlightenment चा (प्रबोधनाचा) म्हणून मानला जातो. लॉक, बर्कले, ह्यूम, पिअरी, बायले, वाल्टेयर, रूसो हे या कालखंडातील प्रमुख तत्त्वज्ञ होते. [तांत्रिक दृष्टीने प्रबोधनाचा कालखंड इ. स. १७८१ मध्ये संपतो, असे मानण्यात येते. तरी याच्या प्रभावाची छाया १९ व्या शतकांतील जेरेमी बेन्थॅम, जॉन स्टुअर्ट मिल्, ऑगस्ट काँत (Auguste Comte), आणि २० व्या शतकातील विल्यम जेम्स, जॉन ड्यूई, जॉर्ज सान्तायना व बर्ट्रांड रसेल यांच्याही साहित्यावर पडलेली आढळते.] सन १७८१ ते १८३१ , म्हणजे कांटच्या मीमांसेपासून तो हेगेलच्या मृत्यूपर्यंत, हा कालखंड German Iedalism (जर्मन चिद्वाद) या संज्ञेने ओळखला जातो. राईनहोल्ड, मेमॉन (Maiman) (Schulze), शुल्झ बेक (Beck), हर्डर (Herder), जाकोबी, गटे, शिलर, हार्डेनबर्गनोवालिस, फिश्ट (Fichte), शेलिंग (Schelling), श्लायरमाकर (Schleiermacher) व हेगेल हे तत्त्वज्ञ या कालखंडातील आहेत. सन १८३१ पासूनच्या कालखंडाला वैकासिक किंवा आधुनिक असे म्हटले जाते. या कालखंडातील पाश्चात्य तत्त्वज्ञ व तत्त्वज्ञानांचे विविध प्रवाह यांची संपूर्ण माहिती भारतीय शिक्षितांना असल्यामुळे त्यांची नावे इथे नमूद न केली तरी चालण्यासारखे आहे. पूर्वी उल्लेखिल्याप्रमाणे या विषयांवरील साहित्य सर्व प्रमुख भाषांत उपलब्ध आहे. कॉपलस्टन्, बर्नार्ड, डेल्फगाऊ, एमिल ब्रेहिएल, आय. एम्. बॉचेन्स्की, व्हर्जिलिअस फर्म यांचे ग्रंथ या दृष्टीने सहाय्यक आहेत. पॉल एड्वर्डस्चा 'The Encyclopaedia of Philosophy' हा ग्रंथ या विषयावर प्रमाणभूत मानायला हरकत नाही. मराठी भाषेत श्री. गजानन नारायण जोशी यांचा 'पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा इतिहास' हा ग्रंथ अध्ययनपूर्ण, सर्वंकष व प्रमाणभूत असा आहे. तसाच तो अद्ययावतही आहे.

उपरिनिर्दिष्ट पाश्चात्य तत्त्वज्ञ व तत्त्वज्ञानप्रवाह यांची खरी थोरवी भारतीय मन समजू शकते. गेल्या काही शतकांत जागतिक घडामोडींचे केंद्र पश्चिमेत राहिल्यामुळे तिकडील प्रत्येक विचाराला तत्त्वज्ञान या दृष्टीने त्याच्या वास्तविक योग्यतेहून अधिक महत्त्व प्राप्त होत गेले हे स्वाभाविकच आहे. आमच्या विद्वानांना तर पश्चिमेबाहेरही काही तत्त्वज्ञान – सुसंस्कृत तत्त्वज्ञान आहे, याची जाणीवही नाही. त्यामुळे या विषयाचे वस्तुस्थितिनिष्ठ मूल्यांकन होणे आवश्यक आहे.

एक तर 'पाश्चात्य तत्त्वज्ञान' असा शब्दप्रयोग करणाऱ्यांच्या मनात फक्त युरोपखंड,

ग्रेटब्रिटन व युनायटेड स्टेट्समधील तत्त्वज्ञान-प्रणालीच असतात. सोव्हिएट रशियाच्या वैचारिक इतिहासालाही या परंपरागत 'पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या इतिहासा'त स्थान नसते. रशिया ही महाशक्ती असल्याने त्याने या उणीवेची भरपूर भरपाई स्वतःच करून घेतली आहे, ही गोष्ट निराळी. तसेच दक्षिण, लॅटिन अमेरिकेचाही विचार या इतिहासकारांच्या मनांत नसतो. पाश्चात्य इतिहासकारांच्या मनात जी गोष्ट नाही, ती सुशिक्षित भारतीयांचा मनात येणे शक्य तरी आहे काय? उदाहरणार्थ, ब्राझीलचे लुई पेरिरा बारेतो (Luis Pareira Barretto), मेक्सिकोचे गाबिनो बारेदा (Gabino Barreda), पेरूचे मारियानो कॉर्नेजो (Marriano Cornejo), चिलीचे लास्तारिआ (Lastarria), बोलिव्हियाचे बेंजामित फर्नांडिस, अर्जेंटिनाचे जे. आल्फ्रेडो फेरिरा (J. Alfredo Ferreira), व क्यूबाचे एन्रिक जोसे वॉरोना (Enrique Jose Varona), किंवा अगदी अलीकडील काळातील पेरूचे आलेयान्द्रो दुस्तुआ (Alejandro Deustua), उरुग्वेचे जोस एन्रिक रोडो (Jose Enrique Rodo), किंवा मेक्सिकोचे जुस्तो सीरा (Justo Sierra), ही नावे तरी आमच्या सुशिक्षित मंडळींच्या परिचयाची आहेत काय ? श्री. फुल्लर यांनी आपल्या 'A History of Philosophy' या ग्रंथात लॅटिन अमेरिकेकरिता दोन अध्याय खर्ची घातले आहेत. परंतु 'पाश्चात्य तत्त्वज्ञान' या कल्पनेतील एकांगीपणा दूर व्हायला ते पुरेसे नाही.

दुसरी गोष्ट ही की, हा पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा इतिहास केवळ अडीच हजार वर्षांचा आहे. स्थूलमानाने सांगावयाचे झाल्यास प्राचीन तत्त्वज्ञानाचा कालखंड एक हजार वर्षांचा, मध्ययुगीन एक हजार वर्षांचा व अर्वाचीन पाचशे साडे पाचशे वर्षांचा. भारतातील तत्त्वचिंतन वेदकाळातील नासदीय सूक्तांपासून सुरू झाले आहे व तेव्हापासून तत्त्वचिंतनाची गंगा अखंड समृद्ध होत राहिली आहे. हा एकंदर काळ किती हजार वर्षांचा असेल, हे ठरविले पाहिजे.

पश्चिमेतील विचारांचा बराचसा भाग प्राप्त परिस्थितीच्या प्रतिक्रियेच्या स्वरूपाचा आहे. भारतीय विचाराचा बराचसा भाग परिस्थितिनिरपेक्ष मूलभूत चिंतनाचा आहे. त्यामुळे शाश्वत स्वरूपाचा भाग त्यात अधिक आहे.

विशेषतः याविषयी संशोधन होण्याची आवश्यकता आहे की, पश्चिमेत ज्याप्रमाणे तत्त्वज्ञ (Philosopher) ही एक विशेष श्रेणी कल्पिली गेली व तत्त्वज्ञानविषयक विचाराची फार तर विज्ञानाशी जोड घालण्यात आली, त्याप्रमाणे भारतातही घडले होते की काय ? पश्चिमेचा विचार नेहमीच Compartmentalization चा राहिला आहे. आमच्या विचारात नेहमीच समग्रता (Integrated Approach) राहिली आहे. याचा परिणाम विचारकांच्या श्रेणी ठरवण्यावरही झाला आहे.

हा मुद्दा स्पष्ट करण्याकरिता एकच उदाहरण पुरेसे व्हावे. पश्चिमेतील देकार्त, स्पिनोझा, लिब्निझ, लॉक व हॉब्स ही मंडळी स्थूलमानाने समर्थ रामदासांच्या समकालीन होती. समर्थांना कोणीही समाजशास्त्रज्ञ (Sociologist) हे विशेषण लावलेले नाही. तत्त्वज्ञ

(Philosopher) असेही त्यांचे वर्णन करण्यात येत नाही. परंतु एक विद्वान् समर्थभक्त श्री. प्रभाकर पुजारी असे म्हणतात की, उपर्युक्त पाचही पाश्चात्य तत्त्वज्ञांनी समाज-शास्त्राविषयी जितके लिहिलेले आहे, त्याहून त्या शास्त्राविषयी कितीतरी अधिक व उच्च पातळीवरील विचार समर्थवाङ्मयात सापडतात. हिंदू पद्धतीप्रमाणे त्याला विचाराचा अलग भाग न मानता एकंदर समर्थसाहित्यात त्याची गुंफण करण्यात आली आहे. प्रश्न असा निर्माण होतो की, समर्थांना तत्त्वज्ञ या श्रेणीत टाकावे काय ? तत्त्वज्ञ या श्रेणीत त्यांना बांधून ठेवावे काय ? एकंदर जीवनाचे समग्र दर्शन घेण्याचा हिंदू परिपाठ ध्यानी घेता अशा प्रकारे त्यांना श्रेणीबद्ध करणे अनुचित वाटते.

उदाहरण म्हणून एका महापुरुषाचे नाव इथे घेतले असले तरी इतरही महापुरुषांची स्थिती यासारखीच आहे

हिंदूंचा 'दार्शनिक' हा शब्द वस्तुतः 'तत्त्वज्ञ' या शब्दापेक्षा अधिक खोल, उंच व व्यापक आहे. हल्ली भारतीय भाषांतून हे दोन्ही शब्द पर्यायवाची मानण्याची पद्धती पडत चालली आहे, ती शास्त्रशुद्ध नाही.

दार्शनिक व तत्त्वज्ञ या दोन भिन्न श्रेणी आहेत. आमचा असे म्हणण्याचा अभिप्राय नाही की, पहिल्या श्रेणीतील लोक भारताबाहेर, विशेषतः पश्चिमेत निर्माण होऊच शकत नाहीत. परंतु तिकडील विचारकांचे या दोन श्रेणींत स्पष्टपणे विभाजन करण्याचे काम अद्यापी झालेले नाही. कदाचित् हा दृष्टिकोनही त्यांना अद्यापी आला नसावा. ते कसेही असले तरी जोपर्यंत दोन श्रेणींमधील हा भेद ध्यानात ठेवण्यात येत नाही, तोपर्यंत पंडितजी व त्यांच्यासारख्या अन्य दार्शनिकांचे वैचारिक इतिहासांतील स्थान केवळ पश्चिमी परिभाषेत निश्चित करणे अन्यायाचे होईल. यांत कोण श्रेष्ठ व कोण कनिष्ठ हा मुद्दा नाही. दोन अलग श्रेणी आहेत. इतकेच सुचवावयाचे आहे.

१०

या ग्रंथाचे सहा भाग आहेत. एका अर्थाने प्रत्येक भाग स्वयंपूर्ण व स्वायत्त आहे. दुसऱ्या अर्थाने सर्व भाग मिळून एक समग्र मांडणी तयार होते व प्रत्येक भाग त्या समग्र मांडणीचे एक अंग आहे. निरनिराळ्या सर्व फोडी व त्यांना आवेष्टन करणारी साल हे सर्व मिळून संत्रे बनते. संत्र्याची प्रत्येक फोड स्वयंपूर्ण व स्वायत्त आहे. तशीच ती समग्र संत्र्याचे एक अंगही आहे. तसलाच हा प्रकार आहे.

पूर्वी लिहिल्याप्रमाणे या सर्व भागांचे लेखक सिद्धहस्त आहेत. त्यामुळे प्रत्येक विषयाची मांडणी जितकी अधिकाधिक सुबोध करता येईल तितकी करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. परंतु काही विषयांचे स्वरूपच असे आहे की, इथे करण्यात आले आहे

त्याहून अधिक सुबोध विवरण त्यांच्या बाबतीत शक्य नाही.

उदाहरणार्थ, 'संस्मरण' हा विषय मुळातच जितका उद्‌बोधक तितकाच सुबोधही आहे. राजकारण विषयक भाग सहजगम्य व्हावा, कारण हल्ली राजकीय जागृतीचे प्रमाण बरेच वाढले आहे. 'राष्ट्रविचार' तर गेल्या कित्येक दशकांपासून गरम सार्वजनिक चर्चेचा विषय होऊन राहिला आहे. त्या विषयाचे विविध पैलू जनतेसमोर आलेले आहेत. 'राजकीय वारसा' हा विषय जसा तात्त्विक तसा व्यावहारिकही आहे, व इथे करण्यात आलेले त्याचे प्रतिपादन स्वयम्‌–स्पष्ट असे आहे.

उरलेल्या दोन भागांची गोष्ट वेगळी आहे. 'एकात्म अर्थनीती' भावी आर्थिक रचनेच्या दिशेविषयी संकेत करणारी आहे. राजकीय प्रश्नांविषयी जशी व्यापक चर्चा आपल्या देशात आतापर्यंत झालेली आहे तशी आर्थिक प्रश्नांवर झालेली नाही. त्यामुळे त्यांचे वारकावेही तितक्या प्रमाणात जनतेसमोर आलेले नाहीत. 'एकात्म-मानव-दर्शन' तर जाणूनबुजून तात्त्विकच आहे. तत्त्वज्ञान हा विषय किती प्रमाणात सुबोध करता येईल याला काही अंतर्हित मर्यादा आहेत. त्यामुळे सामान्य वाचकाला हे दोन भाग थोडे क्लिष्ट वाटण्याचा संभव आहे.

प्रत्येक भागाचे समालोचन किंवा रसग्रहण करण्याचे हे स्थळ नव्हे. ते काम व तो अधिकार वाचकांचाच आहे. तथापि प्रतिपादनाचे क्वचित् काहीसे दुर्बोध भासणारे भाग समजून घेण्याकरिता वाचकांना मदत म्हणून या ठिकाणी काही लिहिणे अप्रस्तुत होणार नाही. उलटपक्षी, ते रसग्रहणाला पोषकच होईल असे वाटते.

अन्य प्रत्येक विषयाप्रमाणे 'एकात्म अर्थनिती' चाही कॅन्व्हास फार विस्तृत आहे. परंतु काही लोकप्रिय घोषणा सोडल्या, तर आर्थिक धोरणांविषयी लोकांना प्रशिक्षित करण्याचे प्रयत्न आपल्या देशात सहसा होत नाहीत. पक्षांचे घोषणापत्र हे एक कर्मकांड मात्र होऊन बसले आहे. त्यातील आर्थिक कार्यक्रमांचे विवेचन प्रत्यक्ष प्रचारमोहिमेत फारच थोड्या प्रमाणात, नाममात्रच होत असते. पक्षस्तुती अधिक, जन-शिक्षण कमी, अशीच या विषयाची स्थिती आहे. त्यामुळे या विषयाचे विवेचन आकलन करणे सामान्य माणसाला कठीण होऊन बसते.

या ग्रंथातील आर्थिक विषय नीट समजण्याचे दृष्टीने त्याची पार्श्वभूमी व मौलिक तत्त्वे ध्यानात घेणे उपयुक्त होईल. भारतीय संस्कृतीच्या प्रकाशात रचनेची युगानुकूल आर्थिक मूलभूत तत्त्वे श्रीगुरुजींनी सन १९७२ मध्ये ठाणे येथे झालेल्या अखिल भारतीय शिबिरात मांडली होती. ती ध्यानात ठेवली तर या ग्रंथातील आर्थिक विवरण समजून घेणे सुलभ होईल *

---

*परिशिष्ट क्र. १८ पहा.

' एकात्म मानव-दर्शन ' हे संपूर्ण अस्तित्वाच्या मूलगामी व सर्वव्यापी तत्त्वाचा वेध घेणारे ' दर्शन ' आहे. पंडितजी राजकीय क्षेत्रात काम करीत होते. त्या क्षेत्रात ism (वाद) हाच शब्द प्रचलित होता. व सर्वसामान्यांना हा सिद्धांत समजून सांगावयाचा होता. त्यामुळे पंडितजींना ' वाद ' हा शब्द मूलतः अभिप्रेत नव्हता तरी, सर्वसाधारण व्यक्तीच्या समजुतदारपणाच्या स्तराशी व्यावहारिक समझोता म्हणून पंडितजींनी आपल्या विचाराला ' वाद ' ही संज्ञा दिली, आणि तसे करीत असतानाच ही काळजी घेतली की, अशी व्यक्ती ज्या वेळी हा विचार किंवा ' वाद ' समजण्याच्या स्थितीत येईल त्याच वेळी तिच्या हेही ध्यानी यावे की, आपल्याला समजलेला हा विचार ' वादा ' च्या चौकटीत बसण्यासारखा सीमित व तात्कालिक नाही, हे एक सार्वदेशीय व सार्वकालिक ' दर्शन ' आहे. लहान मुलांना प्रारंभी आपण सांगतो की, चांदोबा समोरील झाडाच्या फांदीवर बसलेला आहे. त्यांतलाच हा प्रकार. परंतु वस्तुतः हे वादातीत, निर्विवाद ' दर्शन ' आहे. (' दर्शना ' ला पाश्चिमात्य भाषांत प्रतिशब्द नाही.)

एकमेवाद्वितीय तत्त्वाविषयी म्हटले गेले आहे, " यतो वाचा निवर्तन्ते अप्राप्य मनसासह । " तत्त्व जितके गहन तितकीच त्याची सूक्ष्मता अधिक. गहन तत्त्वाच्या सूक्ष्मतेला सीमा नाही. शब्दांद्वारे होणाऱ्या अभिव्यक्तीच्या सूक्ष्मतेला सीमा आहेत. शब्दांची अभिव्यक्तीची शक्ती मर्यादित आहे, ' दर्शना 'ची सूक्ष्मता अमर्याद आहे. अशा सूक्ष्म तत्त्वाच्या अभिव्यक्तिसाठी शब्दांनी केलेली धडपड केविलवाणी व क्लिष्ट वाटते.

याचा अर्थ असा नाही की, दर्शन हेच मुळात क्लिष्ट, कष्टदायक किंवा कंटाळवाणे आहे. क्लिष्टता प्रकटीकरणात आहे, दर्शनाच्या अनुभवात किंवा साक्षात्कारात नाही. ज्याने कधीही गूळ खाल्ला नाही त्याला शब्दांच्या माध्यमातून गुळाची चव समजावून सांगणे फार कठीण आहे, व सांगणारा व ऐकणारा या दोघांनाही कंटाळवाणे वाटणारे आहे. परंतु प्रत्यक्ष गुळाची चव घेणे हे कार्य कष्टदायक तर नाहीच, उलटपक्षी तो एक आनंददायक अनुभव आहे. ज्याने कधीही कमळ पाहिले नाही त्याला कमळाच्या सुगंधाची व सौंदर्याची योग्य कल्पना शब्दांच्या द्वारे देणे सोपे काम नाही, तसा प्रयत्न ऐकणाराला क्लिष्ट वाटेल. परंतु कमळाच्या सौंदर्याचा प्रत्यक्ष आस्वाद आल्हाददायकच वाटेल. एकात्म मानवदर्शनाचीही तीच गोष्ट आहे. मानवी चेतनेच्या उच्चतम विकासाचा वा स्वाभाविक आविष्कार म्हणजे एकात्म मानवदर्शन.* त्या अनुभूतीत परमसुख साठविलेले आहे. शब्दांद्वारे या दर्शनाचे होणारे विवरण मात्र उपर्युक्त कारणांमुळे अतिशय क्लिष्ट वाटण्याची शक्यता आहे. क्लिष्टता प्रकटीकरणात आहे, मूळ विषयात नाही. मूळ विषयाची प्रकृती प्रत्येक व्यक्तीला चिरंतन सुखाची हमी देणारी आहे. व हे सुख असेही लोक अनुभवू शकतात की ज्यांनी या दर्शनाचे नावही ऐकले नाही, परंतु ज्यांच्या चेतनेचा विकास मात्र झालेला आहे.*

---

* परिशिष्ट क्र. १९ पहा.

गॅरी झुकाव म्हणतात :–

" It is a common misconception (literally) to mistake the description of a state of being for the state itself. For example, try to describe happiness. It is imposible ····· Happiness and the description of happiness are two different things.

Happiness is a state of being. That means that it exists in the realm of direct experience. It is the intimate perception of emotions and sensations which, indescribable in themselves, constitute the state of happiness. The word ' happiness ' is the label or symbol, which we pin on this indescribable state. ' Happiness ' belongs to the realm of abstractions or concepts. A state of being is an experience. A description of a state of being is a symbol. Symbols and experience do not follow the same rules. "

[" जीवनातील एखाद्या अवस्थेच्या वर्णनाला ती स्थितीच मानण्याची चूक सामान्यत: केली जाते. उदाहरणार्थ, सुख म्हणजे काय याचे वर्णन करून पहा. ते अशक्य आहे··· सुख आणि सुखाचे वर्णन या दोन भिन्न गोष्टी आहेत.

सुखी असणे ही एक अवस्था आहे. याचा अर्थ सुख प्रत्यक्ष अनुभवाच्या पातळीवर असते. ज्यांचे वर्णन करताच येत नाही अशा भावना आणि संवेदना यांच्या पातळीवरील सुखाचा अतिनिकटचा अनुभव सुखाच्या अवस्थेत अंतर्भूत असतो. 'सुख' हा शब्द म्हणजे या वर्णनातीत अवस्थेवर चिकटवलेले केवळ एक लेबल किंवा प्रतीक होय. ' सुख ' ही अमूर्ताच्या किंवा संकल्पनेच्या कक्षेतील गोष्ट आहे. विशिष्ट अवस्था हा एक अनुभव असतो. त्या अवस्थेचे वर्णन हे प्रतीक मात्र असते. अनुभव आणि प्रतीक यांना सारखेच नियम लागू होत नाहीत. "]

इथे ' Happiness ' विषयी जे सांगण्यात आले तेच ' एकात्म-मानव-दर्शना- ' लाही लागू आहे.

या दृष्टीने पुढील उदाहरण उद्‌बोधक आहे.

एकात्म-मानवदर्शनावर या ग्रंथात सविस्तर विवेचन आले आहे. मनुष्याच्या चेतनेचा व्यक्तीपासून विश्वापर्यंतचा विकास हा या दर्शनाचा आधार आहे. (Growth of Consciousness) अशा मानसिक विकासाची प्रक्रिया स्वाभाविक व व्यवहार्य आहे काय, असा प्रश्न अनेकांच्या मनात उद्‌भवतो. या प्रक्रियेचे स्वरूप काय ? डॉ. जाकिर हुसेन यांनी पतियाळा येथे श्रीगुरुगोविंदसिंह-भवनाच्या कोनशिला-समारंभाचे प्रसंगी दि. २७ डिसेंबर १९६७ ला दिलेल्या भाषणात या प्रक्रियेचे स्वरूप स्पष्ट होते. ते म्हणतात,

" I think, a person only realises the true significance of his link with the motherland when he understands the connotation of the word 'home'. As it is, the concept has multiple and diverse ramifications. Thus, for a

child, it signifies the mother's warm and bounteous lap. As he grows up the parent's, hut or palace, as the case may be, becomes the symbol of home. gradually. as his consciousness expands, the entire street or hamlet or town begins to acquire that meaning in his mind. Then things in his neighbourhood - trees, plants, schools of sparrows, familiar faces, domestic animals etc. become the furniture and setting of his wonderful home. And thus as he graduates to higher reaches of awareness and knowledge, a man begins to see it as a precinct, that comprehends a variety of walls and threshholds, that embodies diverse ideals and dreams···· Religious fables and parables, art and literature, history and chronicle – all these and a great deal more, then becomes its paraphernalia and its embelishments. In short, very soon, the courtyard of the multidimensional edifice begins to grow and envelop the entire country and the natives of the land begin to appear as inmates of one 's house. The Country's political ldeals based on truth and justice, as also its priceless cultural treasures and traditions, its moments of greatness and gladness become an integral part of this superstructure. What started as a mother's lap has finally expanded to include not only the topography around, but also the vast panorama of national life. How wide is the circumference of one's home. '

[" मला वाटते की, माणसाला 'घर' या शब्दाचा नीट अर्थबोध झाला तरच त्याला मातृभूमीशी असलेल्या आपल्या संबंधांचे खरे महत्त्व आकलन होते. 'घर' या कल्पनेची अनेकविध अंगोपांगे आहेत. एखाद्या बालकाच्या दृष्टीने घर म्हणणे आईची प्रेमळ आणि सर्व काही देणारी कूस असते. जसजसा तो मोठा होतो तसतशी आई-वडिलांची झोपडी वा प्रासाद जे असेल ते, त्याच्या दृष्टीने घराचे प्रतीक बनते. हळूहळू, जाणीवेचा जसजसा विकास होतो, तसतसे, संपूर्ण रस्ता, किंवा वस्ती यांना त्याच्या मनात घराचा आशय प्राप्त होतो. मग साऱ्या आसमंतातील झाडे, वनस्पती, चिमण्या, ओळखीचे चेहरे, पाळीव प्राणी इत्यादी सभोवारच्या गोष्टी त्याच्या विलोभनीय गृहकल्पनेची शोभा बनतात. या प्रमाणे उच्च जाणीवांच्या आणि ज्ञानाच्या क्षेत्रात तो प्रवेश करतो तेव्हा कितीतरी गोष्टींचा समावेश असलेला परिसर या दृष्टीने तो घराकडे पाहू लागतो. त्यात घराच्या विविध भिती आणि उंबरठे असतात. नाना प्रकारची ध्येये आणि स्वप्ने यांचे जणू मूर्त रूपच त्यांनी धारण केलेले असते. धार्मिक कथा व रूपक कथा; कला आणि साहित्य; इतिहास व संस्मरणीय घटनांची मालिका इत्यादी व आणखी खूपशा गोष्टींची आकर्षक मांडामांड त्यात झालेली असते. थोडक्यात, अनेक अंगोपांगांनी ती वास्तू विकास पावते आणि सगळचा राष्ट्राला त्याच्या कवेत घेते. राष्ट्राचे सगळे निवासी आपल्या घरातील आप्त आहेत, असे वाटू लागते. सत्य आणि न्याय यांवर उभी असलेली राष्ट्राची राजकीय ध्येये, त्याचप्रमाणे त्याचे अनमोल

सांस्कृतिक धन आणि परंपरा, त्याच्या इतिहासातील आनंददायक व सोनेरी क्षण हे सारे घराच्या दर्शनी रचनेचे अविभाज्य भाग बनून जातात. प्रारंभी केवळ आईची कूस असलेले घर अखेर केवळ घरासभोवारच्या भौगोलिक परिसरापर्यंतच नव्हे तर राष्ट्रीय जीवनाच्या विशाल पटाचा समावेश होण्याएवढे विस्तारते. माणसाच्या घराचा परिघ केवढा तरी विस्तारलेला असतो !"]

यालाच आंतरराष्ट्रीय किंवा मानवी व वैश्विक अशा दोन मिती (Dimensions) जोडल्या की, पंडीतजींना अभिप्रेत असलेल्या मानसिक विकासाचे स्वरूप ध्यानात येते.

भारताच्या दुसऱ्या एका थोर पुत्राचे पुढील विचार पाहा. श्री. बिपिनचंद्र पाल म्हणतात,

" Nationality is inseperable from universal humanity. "

" The peculiar value and distinction of our concept of Swadheenata (Self-dependence) and Swatantrya (Self-Subjection) lies in the grandeur of the connotation of the word (Swa) or ' self '. The ' Swa ' is both the individual self and the Universal Self, and the two are really one. ····· ····· And man's range of real freedom or self dependence as we would call it, expands in proportion as he is able to realise his unity with the Universal Self. "

" The ideal end of civilisation is perfection of man, not merely in his physical and material, but equally also, in his moral and spiritual aspects. It is more, it is the perfection of a man as a social unit, as a limb and organ of the social whole."

" The great mission of this ancient land and its composite people among the modern nations of Europe, Asia and America, is to replace existing international competitions by international co-operation, to substitute the arbitrament of peaceful consultations and reasonable compromise through an impartial international Supreme court, for the arbitrament of murderous arms, in the settlement of all international disputes and differences, and thus to help forward the realisation of the poets dream of the millennium when the nations of the world shall be as One People living at peace with one another, working together for the furtherance of the common good and the revelation of God in man. The Indian rations builder must constantly keep this before him. "

" · · · ··· Hinduism was not merely a ' federal idea ', but it went further, so that India furnishes a model of that Universal Federation, the Federation of the World. "

[' राष्ट्रीयता ही जागतिक मानवतेपासून वेगळी करता येत नाही."

" स्वाधीनता आणि स्वातंत्र्य यांचे मूल्य आणि वैशिष्ट्य 'स्व' शब्दाच्या आशयातील भव्यतेत आहे. हा 'स्व' जसा व्यक्तिगत आहे तसा तो वैश्विकही आहे आणि वस्तुतः दोन्ही एकच आहेत. ..... आणि माणसाच्या खऱ्या स्वातंत्र्याची कक्षा तो वैश्विक 'स्व' शी स्वतःची एकता जेवढी अनुभवेल, त्या प्रमाणात विस्तारत असते. "

" सभ्यतेची अंतिम अवस्था म्हणजे माणसाची परिपूर्णता. केवळ शारीरिक वा भौतिक अर्थाने नव्हे तर नैतिक आणि आध्यात्मिक अंगांनीही परिपूर्णता. माणसाला समाजाचा एक घटक, संपूर्ण समाजाचा एक अवयव या नात्याने लाभणारी परिपूर्णता अधिक महत्त्वाची होय. "

"या प्राचीन भूमीचे व येथील जनसमाजाचे युरोप, आशिया आणि अमेरिका खंडांतील आधुनिक राष्ट्रांत हे जीवनकार्य आहे की सध्याच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेऐवजी आंतरराष्ट्रीय सहकार्याचे प्रवर्तन करावे, एखाद्या निःपक्षपाती व अधिकारसंपन्न सुप्रीम कोर्टाद्वारे राष्ट्राराष्ट्रांतील शांततापूर्ण विचारविनिमय व वाजवी तडजोडी यांना चालना द्यावी आणि आंतरराष्ट्रीय भांडणे व मतभेद विध्वंसक शस्त्रांच्या बळावर सोडविण्याच्या प्रवृत्तीला स्थान राहू देऊ नये. अशा प्रकारे, कवीने सगळे जगच एक राष्ट्र झाल्याचे जे स्वप्न पाहिले होते, ते साकार करण्यास सहायभूत व्हावे. सर्व लोक एकमेकांबरोबर शांततेने नांदत आहेत, सगळ्यांच्या समान हितासाठी सहकार्याने काम करीत आहेत आणि माणसातील देवत्वाचा आविष्कार घडवून आणण्यास उपकारक ठरत आहेत, असे युग प्रत्यक्षात आणण्यास हातभार लावावा. भारतीय राष्ट्राची उभारणी करणाराने ही गोष्ट सतत दृष्टीपुढे ठेवली पाहिजे."

" ..... हिंदुत्व ही केवळ एक 'फेडरल' कल्पना नाही ती आणखी पुढे गेलेली आहे. इतकी की भारत म्हणजे त्या जागतिक ऐक्याचे – जागतिक संघराज्याचे – कोणीही पाहावे असे प्रतीक झालेला आहे. "]

श्री. पाल यांच्या विचारांची दिशा तीच आहे. इतकेच की, पंडितजींचे एकात्ममानवदर्शन आणखी काही पावले याच दिशेने पुढे जाऊन संपूर्ण अस्तित्वाच्या एकात्मतेचा साक्षात्कार घडविण्याचा प्रयत्न करते. ऑक्टोबर १९७४ मध्ये प्रकाशित झालेल्या आपल्या 'Social and Political Ideals of Bipinchandra Pal' या पुस्तकात श्री. अमलेंदुप्रसाद मुकर्जी म्हणतात, "His was, indeed, a religion and philosophy of integral humanism." श्री. मुकर्जी त्यांना 'spiritual humanist' म्हणतात. (या ठिकाणी एक सूचना देऊन ठेवणे उचित होईल. 'एकात्म मानवा' विषयीचा संपूर्ण विचार श्री. राजाभाऊ नेने यांनी प्रस्तुत केलेलाच आहे. त्यातील 'मन' या भागाविषयी ही पुस्ती जोडणे आवश्यक आहे की, 'मन' विषयक पाश्चिमात्यांची कल्पना व आपली

कल्पना यांत फरक आहे. पाश्चिमात्य मानसशास्त्राने आतापर्यंत मनाच्या 'मूढ' व 'क्षिप्त' अवस्थांवरच शास्त्रीय संशोधन केले आहे त्यापुढील तीन अवस्था म्हणजे 'विक्षिप्त', 'एकाग्र' व 'निरुद्ध' यांचेपर्यंत ते अजून पोहोचले नाहीत. या सर्व पाच अवस्थांचे शास्त्रीय संशोधन हिंदू मानसशास्त्राला अभिप्रेत आहे. तसेच बुद्धी (Intellect) चे स्वरूप, कार्य व मर्यादा यांविषयीही आपल्या व पाश्चिमात्यांच्या कल्पनांत बराच फरक आहे. तीच गोष्ट आत्मा व Soul यांनाही लागू पडते.)

पंडितजींनी प्रतिपादिलेल्या आणखी एका कल्पनेविषयी स्पष्टीकरण देणे उपयुक्त होईल. वास्तविक हा विषय या ग्रंथात श्री. बाळासाहेब जोग यांनी उत्तम रीतीने हाताळला आहे. त्यांच्या विवेचनावरून हे स्पष्ट होते की, 'एकात्म शासनप्रणाली' या शब्दांचे भाषांतर वस्तुत: 'Integrated Form of Government' असे व्हावयास हवे होते; परंतु तोपर्यंत हा इंग्रजी शब्द प्रचलित नव्हता. त्यामुळे सर्वसाधारण नागरिकांना समजण्याच्या दृष्टीने त्याला पूर्वीपासून माहीत असलेला 'Unitary Form of Government' हा प्रतिशब्द योजण्यात आला. अर्थात् त्याचे काही दुष्परिणामही झाले. Unitary Form या शब्दाशी मानसिक साहचर्य असलेल्या नेहमीच्या संकल्पना 'एकात्म शासनप्रणाली' लाही चिकटणे स्वाभाविकच होते. त्यांतून काही गैरसमजही निर्माण झाले तरीपण आता हे सर्वांनाच ज्ञात झालेले आहे की, पंडितजींना अभिप्रेत असलेला प्रकार 'Intergrated' होता, – रूढार्थाने 'Unitary' असा नव्हता, आणि कालिकतच्या अधिवेशनात आपल्या अध्यक्षीय भाषणात पंडितजींनी एक तत्कालीन सामयिक समस्या म्हणून पश्चिम जर्मनीच्या Mixed System च्या धर्तीवर काही electoral reforms चा उल्लेख केला असला तरी तो अस्थायी स्वरूपाचा व सध्याच्या प्रचलित पद्धतीच्या चौकटीत सहजासहजी बसणारा – या नात्याने केला गेला होता, वास्तविक त्यांना अभिप्रेत होते घटनेतील आमूलाग्र परिवर्तन.

भारताची घटना ही जगातील सर्वांत लांब, सर्वांत मोठी व सर्वांत जाड अशी लिखित घटना आहे. अमेरिकन संयुक्त संस्थानांची घटना, त्यातील संशोधनांसहित, वीस (२०) पानांची आहे. सन १९४६ च्या चवथ्या फ्रेंच रिपब्लिकची घटना पंचवीस (२५) पानांची आहे. सन १९४७ ची इटालियन रिपब्लिकची घटना पस्तीस (३५) पानांची आहे. सन १९४९ची फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनीची घटना पंचेचाळीस (४५) पानांची आहे. भारताच्या घटनेची मूळ पृष्ठसंख्या अडीचशेच्या (२५०) च्या वर आहे.

घटना इतकी लांबलचक असूनही तिच्या स्वरूपाविषयी नक्सलवादी नागी रेड्डीपासून घटनापंडित कोटेश्वररावपर्यंत विभिन्न छटांच्या अनेक विचारवंतांनी निरनिराळ्या कारणांवरून असंतोष व्यक्त केला आहे. विशेष उल्लेखनीय हे आहे की, अशा मंडळींत डॉ. सच्चिदानंद सिन्हा, डॉ. राजेन्द्रप्रसाद व स्वत: डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचाही समावेश होतो. चिंतामणी व मसाणी (Indian Constitution at Work) यांनी तर टोकाला जाऊन असे विधान केले आहे की, ही घटना म्हणजे "a scheme which is a combination of the draw-backs of different systems."

पं दीनदयाळजींचा घटनेविषयी मुख्य आक्षेप हा होता की, तिचे स्वरूप भारतीय नाही. भारताची संस्कृती, परंपरा, मानसिकता, आजच्या आवश्यकता व भविष्यकालीन आकांक्षा यांचे प्रतिबिंब या घटनेत पडलेले नाही.

याचा अर्थ असा नाही की, घटनाकार भारतीय परंपरा व हिंदू कायदा यांविषयी अज्ञानी होते. आधारभूत साहित्य म्हणून मान्यता पावलेले वेद, वेदांगे, उपनिषदे यांत ग्रथित असलेले विधिनिषेध; मूळ विधिसाहित्य धर्मसूत्र – स्मृती; मीमांसा; रूढी लोकाचार-सदाचार; रामायण–महाभारत; निबंध; कौटिलीय अर्थशास्त्र; शुक्रनीती, – सारांश, श्रुतिस्मृतिपासून तो मित्र मिश्र यांच्या 'वीरमित्रोदया' पर्यंत सतत विकसित व म्हणून परिवर्तित होत गेलेला, हिंदू कायदा उत्तम रीतीने जाणणारे विद्वान् घटना-समितीत होते. शिवाय त्या वेळी महामहोपाध्याय डॉ. पां. वा. काणे यांच्यासारखे या विषयांवरील अधिकारी पुरुषही उपलब्ध होते. परंतु घटना तयार करताना या भारतीय विधि-साहित्याचा किंवा विधिज्ञांच्या ज्ञानाचा उपयोग करून घेण्यात आला नाही. या संपूर्ण परंपरागत साहित्याकडे घटनाकारांनी पाठ फिरविली होती.

आमची घटना मुख्यत: The Government of India Act 1935 यावर आधारलेली आहे. ब्रिटिश पार्लमेंटने पारित केलेला सर्वांत मोठा (लांबीच्या दृष्टीने) कायदा म्हणजे बहुधा हाच Act असावा. या Act पासून काही बाबतींत घटनेने भिन्न भूमिका घेतली असली * तरी प्रामुख्याने या Act चाच आधार घेऊन घटना तयार केली गेली आहे. घटनातज्ज्ञ श्री. बसू म्हणतात, "Three-fourths are based on the Govt. of India Act of 1935."

घटना बनविणाऱ्यांच्या मनात असे होते की, ब्रिटिश पद्धतीची सांसदीय लोकशाही हीच या देशाला उपयुक्त आहे. "Many of its ideas like the rule of law, Judicial review and responsible government are British." सन १९३५ चा कायदा इंग्रजी साम्राज्यसत्तेला सोयीस्कर असा होता, हे स्पष्टच आहे.

घटनाकर्त्यांच्या मनासमोर मुख्य मॉडेल ब्रिटिश लोकशाहीचे असले, तरी इतरही देशांच्या घटनांतून प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष उधारउसनवारी काही प्रमाणात झालेली आहे.

फार तपशिलात न शिरता ढोबळमानाने विचार केला तरी पुढील गोष्टी ध्यानात येतात. भारतीय घटनेतील Directive Principles of State Policy हे प्रकरण आयर्लंडच्या घटनेतील व जनरल फ्रॅन्कोपूर्वीच्या स्पेनच्या घटनेतील अशाच प्रकारच्या व्यवस्थेवर आधारलेले आहे. Fundamental Rights ची कल्पना युनायटेड स्टेट्स व आयर्लंड यांच्या घटनांतील तत्सम व्यवस्थांवर आधारित आहे. चौथ्या फ्रेंच रिपब्लिकच्या घटनेच्या Preamble मध्येही अशा प्रकारची घोषणा आहे. इटालियन रिपब्लिकच्या घटनेच्या पहिल्या भागात नागरिकांच्या अधिकारांविषयी व कर्तव्यांविषयी घोषणा आहे.

---

* परिशिष्ट क्र. २० पहा.

सन १९४९ च्या फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनीच्या घटनेतही मूलभूत अधिकारांची सूची देण्यात आलेली आहे.

भारताच्या आंतरराष्ट्रीय संबंधांविषयी व धोरणांविषयी Directive Principles of State Policy च्या Article 51 (Fiftyone) मध्ये दिग्दर्शन आहे. जवळजवळ तसल्याच प्रकारचे दिग्दर्शन चौथ्या फ्रेंच रिपब्लिकच्या घटनेच्या Preamble मध्ये, इटालियन रिपब्लिकच्या घटनेच्या Article 11 मध्ये व फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनीच्या घटनेमध्ये पहावयास मिळते.

सर्वांत महत्त्वाचा प्रश्न अर्थात् भारताच्या घटनेच्या स्वरूपाविषयी आहे. हे स्वरूप फेडरल असावे, असा एक सूर सुरुवातीलाच निघाला होता. घटनेचे स्वरूप परंपरागत अर्थाने युनिटरी ठेविले तर आपल्यावर हुकूमशाही प्रवृत्तीचा आरोप येईल अशी भीती राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या मनात होती. प. पू. श्रीगुरुजींनी फेडरल स्वरूपामुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांविषयी पूर्वसूचना दिली होती, हे अनेकांच्या स्मरणात असेल. घटनाकर्त्यांची मनःस्थिती द्विधा होती, हे स्पष्ट दिसते. निःसंदिग्धपणे 'युनिटरी फॉर्म' घेण्याची मनाची तयारी नाही, व 'फेडरल फॉर्म' पासून निघणारे दुष्परिणाम डोळ्यांसमोर आहेत, अशा मनःस्थितीत घटनाकार मंडळी होती. त्यामुळे त्यांनी अमेरिकन संयुक्त संस्थानांचा फेडरल फॉर्म स्वीकारला नाही, तर कॅनडातील रचनेचे अनुकरण केले. घटनेच्या शिल्पकारांनी जाणून बुजून 'Union' या संज्ञेचा प्रयोग केला. त्यांनी 'फेडरेशन' या संज्ञेचा प्रयोग केला नाही. या बाबतीत कॅनडाच्या घटनेचा आमच्या घटनाकारांच्या मनावर विशेष प्रभाव होता. कॅनडा संघराज्य होते, परंतु त्याला सशक्त केन्द्राची आवश्यकता होती. अमेरिकन यादवी युद्धाने त्यांना चांगलाच धडा शिकविला होता. त्यामुळे संघात्मक रचना ठेवूनही केन्द्र मजबूत राखणे त्यांना अपरिहार्य वाटत होते. भारताच्या इतिहासापासून निघणारा निष्कर्षही याच स्वरूपाचा होता. परंतु या द्विधा मनःस्थितीतून निर्माण झालेली रचना 'इदं च नास्ति -- परं न लभ्यते' अशा स्वरूपाची झाली. 'युनिटरी' व 'फेडरल' या दोन्ही रचनांतील हानी आमच्या पदरात पडली, दोन्ही रचनांतील लाभापासून आम्ही वंचित राहिलो.

या संदर्भात प्राध्यापक बॅनर्जी म्हणतात, " India's Constitution is federal in form with a pronounced unitary bias. "

प्राध्यापक K. C. Wheare म्हणतात, " It (i. e: the Constitution) establishes, indeed a system of government which is utmost quasi - federal almost devolutionary in character, a unitary state with subsidiary federal features rather than a federal state with subsidiary unitary features. "

[" भारताची राज्यघटना स्वरूपाने संघात्मक असली तरी तिचा स्पष्ट कल एकात्मकतेच्या बाजूने आहे. "

" घटनेने वस्तुतः अशी एक शासनप्रणाली अंमलात आणली आहे की जी अंशतः संघात्मक, बहुतांशी पार्लमेंटद्वारा नियुक्त संस्थांकडे कामे सोपवून देण्याच्या स्वरूपाची आहे. ती एकात्मक आहे, पण तिला संघात्मक उपांगे जोडली आहेत. संघात्मकतेला एकात्मकतेची उपांगे आहेत, असे म्हणता यावयाचे नाही. "]

घटनाकारांच्या गोंधळलेल्या मनःस्थितीतून* निर्माण झालेल्या घटनेचे स्वरूप ' न इधरके रहे -- न उधरके रहे ' असे होते. त्यामुळेच आज बळावत असलेल्या केन्द्र – राज्य विवादाला वाव मिळाला. भारताची परंपरा, इतिहास, सांस्कृतिक एकात्मता या सर्वांच्या पार्श्वभूमीवर घटनेचा विचार झाला असता तर हा अनैसर्गिक विवाद निर्माण झाला नसता, विभेदकारी प्रवृत्तींना बळ प्राप्त झाले नसते, राष्ट्रीय एकात्मतेला विविध बाजूंनी तडे गेले नसते, घटनेचे स्वरूप विशुद्ध भारतीय राहिल्यामुळे सामान्य भारतीय मनाला त्यांतून अतीताचा सार्थ अभिमान व भविष्याविषयीची उज्ज्वल आकांक्षा यांचा साक्षात्कार झाला असता व जनतेची शक्ती आपसांतील भांडणांत खर्च न होता, राष्ट्र पुनर्निर्माण-कार्याकरिता तिचा रचनात्मक उपयोग झाला असता. हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून भारतीय प्रकृतीच्या अनुषंगाने पं. दीनदयाळजींनी ' एकात्म शासनप्रणाली ' च्या कल्पनेचा सूत्रपात केला. आज केन्द्रराज्य-विवाद उग्र स्वरूप धारण करीत आहे. परंतु प्रचलित घटनेच्या चौकटीत राहून वेळोवेळी सामयिक, तात्कालिक राजकीय तडजोडी करून कशी तरी वेळ मारून नेणे हा त्यावरील स्थायी उपाय नाही. पं. दीनदयाळजींनी प्रतिपादिलेल्या ' एकात्म शासनप्रणाली 'चा तपशील विकसित करून तो अंमलात आणणे, हाच या समस्येवरील स्थायी व प्रभावी तोडगा होय. श्री. बाळासाहेब जोगांनी आतापर्यन्त विकसित झालेले या कल्पनेचे स्वरूप प्रस्तुत ग्रंथात सविस्तर दिलेलेच आहे.

११ पंडितजींच्या विचारांचे एका दृष्टीने दोन भाग पाडता येतात, काही तात्कालीन महत्त्वाचे व इतर सार्वकालीन महत्त्वाचे. सार्वकालीन विचारांची सत्यता परिस्थितिनिरपेक्ष असते. तरीपण ते विचार कोणत्या परिस्थितीत मांडण्यात आले होते हे कळल्याशिवाय त्यांचे मर्म पूर्णपणे समजणे शक्य नसते. पंडितजी

* पं. जवाहरलाल नेहरूंचे पुढील निरीक्षण पहा –

" When the world is in turmoil and we are passing through a very swift period of transition, what we may do to-day may not be wholly applicable tomorrow."

[" आज जगात खळबळ आहे आणि आपण वेगवान परिवर्तनाच्या काळातून जात आहोत; आज आपण जे करू ते उद्या संपूर्णतया लागू होईलच असे नव्हे."]

केवळ पुस्तकी विद्वान नव्हते. ते सार्वजनिक जीवनात अत्यंत सक्रिय होते. अशा क्रियाशील व्यक्तीच्याद्वारे मांडण्यात आलेले विचार सार्वकालीन महत्त्वाचे असले तरी अनेकदा अशा विचारांची अभिव्यक्ती कोणत्या ना कोणत्या घटनेच्या, प्रश्नांच्या किंवा परिस्थितीच्या प्रतिक्रियेच्या स्वरूपात असते. विचारांच्या अभिव्यक्तीकरिता कोणते तरी तात्कालिक निमित्त झालेले असते. त्या निमित्ताची, घटनेची, प्रश्नांची, किंवा परिस्थितीची पूर्ण माहिती नसली तर त्या विचाराची खरी महत्ता व विचारकाची खरी उंची ध्यानात येऊ शकत नाही. विचाराचे महत्त्व सार्वकालीन असो वा तात्कालीन असो. त्याच्या परिस्थितिजन्य पार्श्वभूमीच्या ज्ञानाचे स्वतःचे असे महत्त्व आहे. कोपर्निकसचा सिद्धांत आता सर्वमान्य आहे. परंतु कोपर्निकसला ते सत्यदर्शन झाले त्या वेळी संपूर्ण युरोपमध्ये व ख्रिस्ती जगतात कोणत्या मतांना दृढ मान्यता होती, व त्या मतांच्या मागे उभी असलेली पोपची सत्ता किती प्रबळ होती, हे ज्याला माहीत नसेल त्याला कोपर्निकसची वैचारिक उंची कळावयाचीच नाही. आयर्लंडच्या टेरेन्स मॅक्स्विनीचे विचार कुणाही ध्येयवादी मनाला उत्कट प्रेरणा देणारे आहेत. परंतु साम्राज्यविरोधी लढ्याच्या कोणत्या अवस्थेत ते विचार उत्स्फूर्तपणे प्रकट झाले हे जाणून घेतले तर त्यांचे स्वरूप अधिकच ज्वालाग्राही वाटेल. लॉजिकविषयी ॲरिस्टॉटलचे, लोकशाहीविषयी लिंकनचे, राष्ट्रीयत्वाविषयी मॅझिनीचे, किंवा मानवाच्या मूलभूत अधिकारांविषयी जेफरसनचे विचार सार्वकालीन महत्त्वाचे आहेतच, परंतु कोणकोणत्या विशिष्ट परिस्थितीत ते आग्रहपूर्वक मांडण्यात आले, याचे ज्ञान असेल तरच त्या विचारांचे खरे रहस्य व विचारकांचे खरे श्रेष्ठत्व मनावर बिंबू शकते. पायथागोरस, युक्लिड, दकार्ता, पास्कल, रूसो, वाल्टेयर, मार्क्स आदी मंडळींच्या विचारांसंबंधी हेच विधान करता येण्यासारखे आहे. विचाराचे महत्त्व आहेच, पण परिस्थितीच्या पार्श्वभूमीमुळे त्याचे मूल्य अधिक वाढते. हिऱ्याचे मूल्य आहेच, पण त्याला अनुरूप कोंदणात बसविल्यास त्याचे तेज व सौंदर्य अधिकच उज्ज्वल भासते. परिस्थितीच्या कोंदणाशिवाय विचारांची व विचारकाची खरी योग्यता प्रकट होऊ शकत नाही.

या ग्रंथाचे सहाही भाग पंडितजींच्या विचारांनी ओतप्रोत भरलेले आहेत, व प्रसंगाप्रसंगाने एकेका वेळेच्या परिस्थितीचेही विवरण यांत करण्यात आलेले आहे. परंतु यांत ग्रथित झालेल्या समग्र विचाराला कोंदणाप्रमाणे असलेली, या शतकाच्या पाचव्या दशकाच्या प्रारंभीची समग्र परिस्थिती विषयप्रवेश करण्याचे वेळी वाचकाच्या मनश्चक्षूसमोर नसेल तरविचारांची व विचारकाची वास्तविक योग्यता त्याच्या ध्यानात येऊ शकणार नाही. त्या दृष्टीने विषयप्रवेशापूर्वी तत्कालीन परिस्थितीचे सर्वंकष चित्र प्रस्तुत केले जावे हे आवश्यक वाटते.

१२

बहुतेक भूतपूर्व वसाहती-देशांना द्वितीय महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या दडपणामुळे स्वातंत्र्य देण्यात आले. क्रांतीच्या किंवा दुसऱ्या एखाद्या संघर्षाच्या तत्काल फलस्वरूप हे स्वातंत्र्य आलेले नव्हते. त्यापूर्वीच्या काळात विभिन्न देशात विभिन्न प्रयत्न किंवा चळवळी झाल्या असल्या तरी प्रत्यक्ष स्वातंत्र्यदानाच्या वेळी आंतरराष्ट्रीय परिस्थिती हेच प्रमुख कारण उपस्थित झाले होते. भारतही अशांपैकीच एक देश होता. तेथेही चळवळी अवश्य झाल्या होत्या. परंतु पंडित जवाहरलाल नेहरू यांनी पुढे मान्य केले त्याप्रमाणे सन १९४७ मध्ये काँग्रेसचे पुढारी इतके थकले होते की, देशविभाजन मान्य न केल्यास जो लढा पुन्हा द्यावा लागला असता त्याकरता त्यांची मानसिक तयारी नव्हती. प्रत्यक्ष सत्तेचे हस्तांतरण ब्रिटिश पार्लमेंटने पारीत केलेल्या Indian Independence Act च्या अनुसार झाले. अशीच स्थिती कमीअधिक प्रमाणांत नवस्वतंत्र अन्य वसाहती-देशांतही होती. परिणाम हा झाला की, स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही पाश्चिमात्य संस्कृतीचा पगडा या देशांच्या मनावर कायमच राहिला. त्यांच्या पुढाऱ्यांच्या मनांत एक प्रकारचा न्यूनगंड होता. प्रगती किंवा विकास यांचा जगात एकच नमुना आहे, पाश्चिमात्य पद्धतीची प्रगती हाच एकमात्र प्रगतीचा प्रकार आहे हे त्यांच्या मनाने घेतले. फ्रॅन्झ फॅनॉनने तिसऱ्या जगातील लोकांना 'The Damned of the Earth' अशी संज्ञा दिली. या स्थितीमुळे चीड उत्पन्न होण्याऐवजी लाचारीची भावना मात्र वाढीला लागली. आपल्यामुळे, आपले शोषण करून, साम्राज्यवादी देश आतापर्यंत स्वतःच्या वैभवाचा डोलारा उभारीत होते, हे सत्य ते विसरले; आणि आपल्या जुन्या मालकांच्या, श्वेत राष्ट्रांच्या मदतीशिवाय एक पाऊलही पुढे पडू शकणार नाही अशी असहायतेची भावना त्यांच्या मनांत निर्माण झाली. वास्तविक स्वातंत्र्य दिल्यानंतर भूतपूर्व साम्राज्यवादी उत्तरी राष्ट्रांची अवस्था फार विचित्र झाली. आतापर्यंतचे त्यांचे वैभव त्यांच्या स्वतःच्या साधनस्रोताच्या भरंवशावर नव्हते. कच्च्या मालाच्या स्वस्त पुरवठ्यासाठी आपल्या हुकमी वसाहतींचा उपयोग करावयाचा, तेथून आणलेला कच्चा माल आपल्या देशात पक्का बनवायचा व त्याच्या अधिक भावांत विक्रीसाठी मुख्य बाजारपेठ म्हणून पुन्हा आपल्या वसाहतींचा उपयोग करावयाचा, या शोषणचक्रातून त्यांचे वैभव उभे झाले होते. परिस्थितीच्या दडपणामुळे राजकीय स्वातंत्र्य प्रदान करावे लागले तरी आपल्या आर्थिक साम्राज्याची पॉकेट्स नवस्वतंत्र दक्षिणी देशांत आपण निर्माण न करू शकलो तर स्वतःचा आर्थिक ढाचा केवळ टिकवून धरणेसुद्धा आपल्याला कठीण जाईल याची स्पष्ट जाणीव साम्राज्यवादी उत्तरी राष्ट्रांना होऊ लागली होती व तदनुसार दक्षिणी देशात आर्थिक साम्राज्याची पॉकेट्स निर्माण करण्याकरिता निरनिराळ्या क्लृप्त्या योजण्याचे, आर्थिक संस्था निर्माण करण्याचे व विदेशी सहाय-करार घडवून आणण्याचे कार्य त्यांनी सुरूही केले होते. दक्षिणी देशांतील जनतेला या वस्तुस्थितीची

स्पष्ट जाणीव असती तर उत्तरी देशांचा डाव साधणे कठीण गेले असते. त्यामुळे त्यांना हे आवश्यक वाटू लागले की, ज्याप्रमाणे पूर्वी आपली साम्राज्यसत्ता टिकवून ठेवण्यासाठी वसाहतीतील लोकांच्या मनांत सांस्कृतिक भयगंड निर्माण करणे आवश्यक वाटत होते, त्याप्रमाणे आताही विदेशीयांचे आर्थिक साम्राज्य त्यांच्या गळी उतरविण्याकरिता तसलाच सांस्कृतिक भयगंड उत्पन्न करणे पुन्हा आवश्यक झाले आहे. या प्रयत्नांत त्यांना यशही प्राप्त झाले. कारण एकतर पूर्वी सांगितल्याप्रमाणे स्वातंत्र्यप्राप्ती तात्कालिक संघर्षाच्या फलस्वरूप नव्हती. दुसरे असे की, जवळ जवळ अशा प्रत्येक देशात सत्तेचे दान अशाच लोकांच्या हातांवर सोडण्यात आले की, जे पूर्वीपासून पश्चिमी संस्कृतीचे भक्त बनलेले होते व स्वदेशी संस्कृतीला पारखे झालेले होते.* याशिवाय स्वराज्याचा अनुभव नसल्यामुळे उपस्थित झालेल्या प्रश्नांची गंभीरता वास्तविकतेहून अधिकच वाटू लागली होती. विकासाला विविध पैलू, विविध आयाम व मिती असतात ही गोष्ट भयामुळे ते विसरले होते. समस्या अर्थात् होत्याच. प्रचंड बेकारी, गरजेच्या वस्तूंची टंचाई, बेफाम चलनवाढ, गरीबी. अल्पायुष्य, मृत्युसंख्येत वाढ व त्याहूनही अधिक प्रमाणात जनसंख्येत वाढ, निरक्षरता, आरोग्याच्या व स्वच्छतेच्या सामान्य नियमांचेही अज्ञान, साथींचे रोग, अतिवृष्टी, अवर्षण, निकृष्ट व पडलेली पिके, दुष्काळ, मागासलेली व देशस्थितीशी विसंगत तंत्रविद्या, सरंजामशाही संबंध, वंश, संप्रदाय, भाषा, प्रदेश यांच्यावर आधारलेल्या विघटनकारी प्रवृत्ती, जुन्या भोळसट रूढींचा जनमनावरील प्रभाव, वारंवार होणाऱ्या स्थानिक लढाया, सैनिकी क्रांत्या, राजकीय उलथापालथी, ही वसहाती-देशांची महत्त्वाची दुखणी होत. अशा परिस्थितीला तोंड देण्याचा प्रसंग स्वराज्यपूर्व काळात न आल्यामुळे नवीन सत्ताधाऱ्यांना त्याची भलतीच भीती वाटू लागली.

परंतु अशा स्थितीतही निराशेचे किंवा न्यूनगंडाचे काहीही कारण नाही असे आत्मविश्वासपूर्वक आवाहन देणारे महात्माजी, श्रीगुरुजी किंवा दीनदयाळजी यांच्यासारखे पुढारी भारतात होतेच. * * ज्याप्रमाणे गरीबीतून, त्याचप्रमाणे श्रीमंतीतून किंवा श्रीमंतीच्या प्रदर्शनातूनही समस्या निर्माण होतात. पाश्चिमात्य पद्धतीच्या तांत्रिक विकासातून स्वयंचलित यंत्रांमुळे व गणकयंत्रांमुळे बेकारीत बेसुमार वाढ होते. सुमारे पन्नास वर्षांपूर्वी कीन्स या अर्थशास्त्रज्ञाने ज्याला 'परिपूर्णतेचा पेचप्रसंग' (Crisis of

---

* परिशिष्ट क्र. २१ पहा.

* * अशियाच्या नवजागृतीचे नेतृत्व करणाऱ्या पुढाऱ्यांचा पूर्वी पुढीलप्रमाणे कालानुक्रमेण क्रमांक मानीत असत. राजा राममोहन राय, मेइजी मिकॅडो सुत्सुहिटो (Meiji Mikado Mutsuhito), सय्यद जमालुद्दिन (इराण), डॉ. सन् यत् सेन (चीन), व मुस्तफा केमाल पाशा (तुर्कस्थान). आफ्रिकेत हे सन्मान्य स्थान इजिप्तच्या श्री. झगलूल पाशांना देण्यात येत असे. हे सर्व थोर पुरुष पाश्चात्य भौतिक प्रगतीने प्रभावित होते, तरी त्यांच्या मनांची मुळे त्यांच्या स्वतःच्या राष्ट्रीय संस्कृतीत खोलवर रुजलेली होती.

Saturation) असे नाव दिले त्याला सामोरे जावे लागते. या पेचप्रसंगाचा आविष्कार निरनिराळ्या प्रकारे होतो. आर्थिक अवरोध, गतिरोध व भाववाढ (Stagnation), मंदी, वाहतुकीतील अडथळे व अपघात, घाई, काळजी व मानसिक तणाव व त्यांतून निर्माण होणारे न्युरेस्थेनिया, रक्तदाब, हृदयविकार, शिझोफ्रेनिया, असुरक्षिततेची व एकाकीपणाची भावना, भयगंड, बालगुन्हेगारी, उदासवाणे वाटणे, वैफल्याचा भाव, Self - alienation (परात्मभाव), व्यक्तिगत विघटन, आत्महत्येकडे नेणारी मानसिक विकृती, गुन्हेगारी व हिंसाचारी प्रवृत्ती, लैंगिक अविवेक व विकृती, Drug addiction, कामावर अनुपस्थित रहाण्याची प्रवृत्ती, उद्ध्वस्त कौटुंबिक जीवन व सर्वसाधारण सामाजिक तणाव ही सगळी पाश्चात्य संस्कृतीची दुखणी आहेत. पाश्चिमात्यांच्याच पद्धतीने तंत्रविद्येची पुढे प्रगती झाली तर एक असा नवीन प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण होणार आहे की, ज्याला तोंड देण्याकरिता आवश्यक असा सांस्कृतिक स्तर पश्चिमेने अजून प्राप्त करून घेतला नाही. हा प्रश्न म्हणजे अर्थात् फुरसतीच्या वेळेचा. आजची पश्चिमेची वस्तुनिष्ठ भौतिकताप्रधान वृत्ती व प्रचंड फुरसत यांतून मानवतेला खाली नेणारा भस्मासूर निर्माण न होणे कठीण आहे. सांस्कृतिक स्तर उंच असेल तर फुरसत हे ईश्वरी वरदानच होय. पातंजलीने म्हटल्याप्रमाणे 'निर्विचारवैशारद्यात् अध्यात्मप्रसादः' परंतु सांस्कृतिक स्तर उंच नसेल तर 'Empty mind is Devil's workshop' अशी स्थिती होईल. तांत्रिक प्रगतीच्या आहारी जाऊन निसर्गाचा खजिना रिता करण्याचा व समतोल विघडविण्याचा उपक्रम व त्यांतून निर्माण होणाऱ्या प्रदूषणादी पर्यावरणीय समस्या आजच पाश्चिमात्यांच्या सुखस्वप्नांचा भंग करीत आहेत. नवस्वतंत्र भारताच्या पाश्चिमात्य-प्रभावित पुढाऱ्यांना या सर्व गोष्टींचा शांतपणे अंदाज घेण्याइतकी क्षमता नव्हती. त्यामुळे पश्चिमेच्या भौतिक प्रगतीच्या झगमगाटाने त्यांचे डोळे दिपून गेले. त्या अवस्थेत दीनदयाळजी पुढील घटनाक्रमांचा नीट अंदाज घेऊन, प्रचलित परिस्थितीमुळे विचलित न होता देशानुकूल व युगानुकूल धोरणांचा विचार करू शकले हे त्यांचे द्रष्टेपणच होय. आज तीन दशकांनंतर आपल्यालाही पश्चिमेच्या विविध प्रश्नांचे भीषण आयाम ध्यानात येत आहेत. हिंसाचार व गुन्हेगारी यांची वाढ, हिप्पी, बीटनिक्स अशा नवीन पंथांचा उदय, उपभोक्ता समाज, समाजरचनेविरुद्ध विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांचे व श्रमिकांचे विद्रोह, भंगाराचे वाढते साठे, अखंड वाढत जाणारी उपनगरे, धूर व धुके (Smog), पर्यावरणीय प्रदूषण, विभिन्न औद्योगिक आजार, अती शहरीकरण व त्यातून निर्माण होणारे व्यक्तिगत व सामाजिक जीवनाचे प्रश्न, पाच दशकांपूर्वी प्रचाइडने ज्याला Malaise in civilisation अशी संज्ञा दिली त्याचीच ही सर्व लक्षणे होत. फुरसतीच्या प्रश्नाची भीषणताही डॅनिएल बेलच्या 'Post Industrial Society' वरून आज आपल्या ध्यानात येऊ शकते. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात होऊ घातलेल्या अशा घटनाक्रमांचा अचूक मागोवा घेऊन स्थिर चित्ताने स्वतः भारतीय संस्कृति-पद्धतीवर श्रद्धा ठेवणे व त्याच मार्गाने भारताचे पुनरुत्थान होणार आहे असे आश्वासन आपल्या देशवासीयांना ठामपणे देणे हे अलौकिक व्यक्तिमत्वाचे लक्षण होय.

विचारांचा ठामपणा व ते प्रकट करण्याचे साहस हे पंडितजींचे वैशिष्ट्य

टेक्नॉलॉजीच्या क्षेत्रातही दिसून येते. सन १९५४ मध्ये महाराष्ट्राच्या माझ्या दौऱ्यात एके ठिकाणी विचारवंतांच्या बैठकीत पंडितजींच्या टेक्नॉलॉजीविषयक दृष्टिकोनासंबंधी मला प्रश्न विचारण्यात आला होता व माझे उत्तर ऐकून प्रश्नकर्त्याने निष्कर्ष काढला होता की, या विषयावरील पंडितजींचे विचार बुरसटलेले व कालबाह्य आहेत. तोपर्यंत महात्माजींच्या या संबंधातील विचारांविषयीचे गैरसमज दूर झाले नव्हते. तसेच डॉ. शूमाकर यांचे बुद्धिस्ट अर्थशास्त्र, Small is beautiful, व Intermediate किंवा Appropriate Technology वरील विचार प्रकाशित झाले नव्हते. त्यावर आमच्या प्रश्नकर्त्याची पुढे काय प्रतिक्रिया झाली हे कळले नाही. आता तर क्लॉड अल्वारिस यांच्या 'Homo-faber' ने अशा विचारवंतांना धक्काच दिला आहे. भारत, चीन व पश्चिमेतील सन १५०० पासून आज-पर्यंतची टेक्नॉलॉजी व संस्कृती हा त्यांच्या ग्रंथाचा विषय आहे. यांतील प्रतिपादनाचे मर्म श्री. रजनी कोठारी आपल्या उपोद्घातात पुढीलप्रमाणे वर्णन करतात –

"This book points to the necessity of rejecting the western pretence of universalism and for non-western cultures to seek answers to their problems within; and in the process not only provide pluralism in techno-cultural system. but through such pluralism help westerners themselves in dealing with the new crop of problems they now encounter .... Such a transition from the global spread of one particularist culture and hence of one technological paradigm to a diversity of cultural and tehnological systems will not, however, be politically easy to bring about even if it is intellectually and morally appealing. And the author knows this."

["आपले ज्ञान सगळ्या जगाला लागू पडणारे असल्याचा पाश्चात्यांचा दावा झिडकारण्याची आणि पाश्चात्येतर देशांनी आपल्या समस्यांची उत्तरे आपल्याच ठायी शोधण्याची आवश्यकता या ग्रंथाने निदर्शनास आणून दिली आहे. या प्रक्रियेत तांत्रिक, सांस्कृतिक पद्धतींना बहुरंगी स्वरूप देण्याचेच नव्हे तर अशा बहुरंगी स्वरूपातून पाश्चात्यांनाच त्यांच्यापुढील नवनव्या समस्यांना उत्तर शोधण्यासाठी सहाय्यभूत होण्याची आवश्यकता प्रतिपादित केली आहे. एका विशिष्ट तंत्रसंस्कृतीच्या विश्वव्यापी प्रसाराकडून आणि अनुषंगाने तंत्रज्ञानाच्या एकाच नमुन्याकडून विविध सांस्कृतिक आणि तांत्रिक पद्धतींकडील हे संक्रमण घडवून आणणे राजकीय दृष्ट्या तितकेसे सोपे ठरणारे नाही. ते जरी बौद्धिक आणि नैतिक दृष्टीने पटणारे वाटले तरीही हे संक्रमण अवघडच जाईल. ग्रंथ-लेखकाला हे चांगले ठाऊक आहे."]

पंडितजींनाही या अडचणींची पूर्ण जाणीव होतीच. तरीपण आपल्या विचारसरणीला कोणकोणती क्षुद्र विशेषणे लावली जातील याची चिंता न करता पंडितजींनी आपली सुविचारित मते प्रकटपणे मांडली.

पश्चिमी तंत्रविद्येची अनियंत्रित प्रगती म्हणजेच मानवजातीची अनियंत्रित भौतिक प्रगती, असे मानण्याची प्रवृत्ती तीन दशकांपूर्वी प्रगमनशील लोकांची होती. मानवी प्रगतीचा सामग्र्याने विचार करणे हे बुरसटपणाचे लक्षण त्या वेळी मानले जात असे. आता हळूहळू ही प्रवृत्ती बदलत आहे. नुकतेच प्रसिद्ध झालेल्या आपल्या भाषणाचा समारोप करताना डॉ. वि. म. दांडेकर यांनी काढलेले पुढील उद्‌गार या दृष्टीने सूचक आहेत –

" परात्मभावाचे निराकरण यास आपण घटकाभर आत्मविकास म्हणू. हा आत्मविकास व आध्यात्मिक विकास एकच नाही. आधिभौतिक विकासाविना आध्यात्मिक विकास शक्य आहे तसा आत्मविकास शक्य नाही. केवळ जगण्याकरिताच सर्व श्रम खर्ची पडतात अशा अवस्थेत मानवाचा आत्मविकास शक्य नाही. त्याकरिता निसर्गावर विजय मिळवून किमान आधिभौतिक विकास साधणे गरजेचे आहे. परंतु मार्क्स म्हणतो – ज्या मानाने मानव निसर्गावर विजय मिळवितो त्या मानाने तो स्वतःमधील अमानवतेचा गुलाम होतो, असे दिसते. निदान आजवरच्या विज्ञानाने व तंत्रज्ञानाने तसे झालेले दिसते. म्हणून यापुढे मानवाची भौतिक उत्पादनशक्ती अव्याहत अमर्याद वाढवीत राहाणे हे विज्ञान व तंत्रज्ञान यांचे उद्दिष्ट असू नये. मानवातील मानव्य नष्ट होऊ न देता मानवाच्या आत्मविकासास आवश्यक तेवढा आधिभौतिक विकास कसा साधता येईल हे आता विज्ञान व तंत्रज्ञानापुढील आव्हान आहे. "

दीनदयाळजींच्या राष्ट्रीय जीवनाच्या प्राथमिक काळात अशा समतोल दृष्टीचा प्रगमनशील मंडळीत अभावच होता.

(हा एक योगायोगच होता की, जगातील काही प्रमुख बुद्धिवादी वैज्ञानिक, शिक्षणशास्त्रज्ञ व अर्थशास्त्रज्ञ यांच्या ' क्लब ऑफ रोम 'ने सन १९६८ मध्येच प्रकाशित केलेल्या आपल्या निवेदनात तांत्रिकीच्या विषयावर पंडितजींच्या मताला अनुकूल असा अभिप्राय प्रकट केला आहे.)

पाश्चिमात्य तंत्रविद्येविषयी पंडितजींनी प्रकट केलेला अभिप्राय पोथीवादी व बुरसटलेला आहे असे म्हणण्याकरिता आमच्या स्वस्त पुरोगामी मित्रांना वाव मिळाला याचे आणखीही एक कारण होते. पर्यावरणशास्त्रविषयक चर्चा आमच्या देशात त्या वेळी सुरूही झाली नव्हती. सन १९५३ मध्ये दिल्ली येथे काविळीची साथ आली होती. त्यानंतर या शास्त्राकडे आमच्या विद्वानांचे व शासकांचे ध्यान गेले. गेल्या शतकाच्या सातव्या दशकात थेम्सच्या पाण्याच्या प्रदूषणामुळे इंग्लंडमध्ये साथीचे रोग निर्माण झाले. इंग्लंडच्या सरकारने ताबडतोब ' रॉयल कमिशन ऑन सुएज डिस्पोजल 'ची नियुक्ती केली, व त्यानंतर श्री. विडल टेलर, श्री. थ्रेश, श्री. बील व श्री. सर्कलिंग या शास्त्रज्ञांनी सायन्सच्या या नवीन शाखेचा सूत्रपात केला. १९५६ मधील दिल्ली येथील काविळीच्या साथीचाही परिणाम झाला, व मुंबई महानगरपालिकेचे सिटी इंजिनियर श्री. एन्. व्ही. मोडक यांनी प्रदूषण – पर्यावरणाच्या प्रश्नाविषयी सरकारच्या व जनतेच्या उदासीन वृत्तीला पहिला धक्का दिला.

नागपूरच्या 'नॅशनल एन्व्हायरन्मेण्टल एंजिनियरिंग रिसर्च इन्स्टिटचूट 'चे श्री. मोडक संस्थापक-निर्देशक झाले, व आता श्री. आर. एस् मेहता, प्रा. एस्. जे. आरसीवाला, प्रा. एन्. मजुमदार, व डॉ. बी. वी. सुंदरेशन यांच्या मार्गदर्शनाखाली या शास्त्राने भारतात स्पृहणीय प्रगती केली आहे. पंडितजींचा उपहास करणाऱ्या पुरोगाम्यां (?)चा उथळपणा 'नारी 'च्या संशोधनामुळे आता स्पष्ट झाला आहे. परंतु ही सर्व प्रगती पुढील काळातील आहे. पंडितजींनी प्रचलित जनमताची पर्वा न करता पाश्चिमात्य तंत्रविद्येविषयी निर्भीडपणे आपले मत प्रकट केले त्या वेळी परिस्थिती आताहून अगदी भिन्न होती. (या शास्त्राच्या प्रगतीच्या दृष्टीने आज जपानचा क्रमांक एक आहे. युनायटेड स्टेट्स्चा दुसरा आहे, व युरोप तिसऱ्या क्रमांकावर आहे. भारताने एन्व्हायरन्मेण्टल एंजिनियरिंगच्या क्षेत्रात उशीरा पदार्पण केले तरी हळूहळू पण निश्चितपणे या शास्त्रात भारत पुढे जात आहे व या शास्त्राच्या दृष्टीने दक्षिणपूर्व आशियातील सर्वांत प्रगत राष्ट्र ही स्थिती भारताने आज प्राप्त करून घेतली आहे.)

१३

भारतीयांच्या मनांत सांस्कृतिक न्यूनगंड निर्माण करण्याच्या दृष्टीने पाश्चिमात्यांनी काही कल्पना-निर्मित सिद्धांत शोधून काढले व आमच्या नवशिक्षितांनी त्यांचा आंधळेपणाने स्वीकार केला. आमच्या स्वत्वापासून आम्हांला पारखे करण्याचा पाश्चिमात्यांचा उद्देश जवळजवळ सफल होत आला होता. सन १९४७ नंतरही ही बौद्धिक गुलामगिरी नष्ट झाली नाही. 'साहेबवाक्यं प्रमाणम् ' हाच खाक्या शिकलेल्यांचा राहिला. साहेबांनी प्रतिपादलेल्या सिद्धांतांच्याविरुद्ध बोलणे प्रतिगामित्वाचे लक्षण मानले जाऊ लागले. अशाही स्थितीत प्रतिगामित्वाचा दोष स्वीकारूनही ज्यांनी स्थिर बुद्धीने पाश्चिमात्य सिद्धांतांचा खोटेपणा चव्हाट्यावर आणला अशा थोड्या निवडक मंडळींत दीनदयाळजींची गणना करावी लागेल. असे करणे त्या वेळी किती साहसाचे होते याची कल्पना आज येऊ शकत नाही. परंतु बृहत् राष्ट्रहित डोळ्यासमोर ठेवून पंडितजींनी हे साहस केले व अशा कित्येक पाश्चिमात्य सिद्धांतांचे पितळ उघडे पाडले. नमुना म्हणून केवळ एका सिद्धांताचे उदाहरण घेऊ.

आम्ही इंग्रज इथे आक्रमक आहोत इतकेच नव्हे, तर मूळ हिंदूही येथील आदिवासी नव्हते, तेही आमच्याप्रमाणेच परकीय आक्रमक होत, फरक इतकाच की, आमचे आक्रमण आधुनिक काळातील आहे व हिंदूंचे आक्रमण हे ऐतिहासिक काळातील आहे, परंतु तत्त्वदृष्ट्या आम्ही व हिंदू दोघेही ह्या भूमीला सारखेच परके आहोत, या भूमीचे खरे आदिवासी पुत्र बिचारे अशा विभिन्न आक्रमकांच्या दडपणाखाली चिरडले भरडले गेले आहेत, हा एक सिद्धांत इंग्रजांनी प्रचलित केला. त्यातूनच पुढे द्राविडियन सिद्धांताचा

आपोआप उदय झाला. Bishop Caldwell यांनी सन १८५६ मध्ये आपल्या 'Comparative Grammer of the Dravidian Languages' या ग्रंथात भाषेच्या आधारावर द्राविडिअन सिद्धांताचे प्रतिपादन केले. Dr. Kittel, Dr. H. Gumdert, Mr. V. A. Smith आदींनी शास्त्रीय विश्लेषणाचे कष्ट न घेता कॉल्डवेलच्या कल्पनारंजनाला एक शास्त्रीय सत्य म्हणून मान्यता दिली. त्यावर कल्पनेचा इमला श्री. कनकसभाई पिले यांनी उभारला – द्राविड वेगळा भाषासमूह, जनसमुदाय व हिंदुमहासागरात निमज्जित Limurian Continent हा द्राविडांचा आदिदेश, आदी. संशोधक Francis Whyte Ellis व मिशनरी Beschi, Pope Robert Caldwell आदींनी द्राविड संस्कृतीची रूपरेखाही प्रकाशित केली व पुढे कारडचू, मुरे हॅमिक, एच्. एफ्. डब्ल्यु गिलिमन व सर लिनेल डेव्हिड्सन या आय्. सी. एस्. अधिकाऱ्यांच्या प्रोत्साहनाने सन १९१२ मध्ये 'मद्रास द्राविडियन असोसिएशन' स्थापन झाली. अर्थात् कॉल्डवेलने सुरू केलेल्या उपद्व्यापाचा दुष्परिणाम केवळ मद्रास इलाख्यापुरताच मर्यादित राहिला नाही. भारतभर त्याचे दुष्परिणाम झाले व एकसंध हिंदू समाजाला उभे आडवे तडे गेले. विशेषतः 'माता भूमिः पुत्रोऽहं पृथिव्याः' या हिंदूंच्या मनांतील जन्मजात एकात्मतेच्या संस्काराला त्यामुळे धक्का बसला व राष्ट्रीयत्वाचा पायाच उखडला गेला. इतके घोर दुष्परिणाम दृष्टीसमोर असूनही आर्यन आक्रमणाच्या सिद्धांताचे आग्रहपूर्वक खंडन करण्याची इच्छा आमच्या विद्वानांना झाली नाही. राष्ट्रप्रेमामुळे व सत्यवादित्वामुळे फार थोड्या मंडळींनी इंग्रजांचा हा डाव उधळण्याचे साहस केले. अर्थात् त्यांना प्रतिगामित्वाचे लांछनही सहन करावे लागले. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पू. श्रीगुरुजी व पंडित दीनदयाळजी यांची गणना अशा निवडक मंडळींत होते. त्या वेळी असे विधान करणे धाष्टर्याचेच मानले गेले होते. दीनदयाळजींच्या मृत्यूनंतर या विषयासंबंधी जी शास्त्रीय चर्चा विद्वानांनी केली त्यामुळे पंडितजींना या संबंधात दोष देणारांना पुनर्विचाराची आवश्यकता वाटावी अशी स्थिती निर्माण झाली आहे. परंतु त्यांच्या जीवनकालात त्यांची भूमिका धृष्टतेचीच मानली गेली.

कार्नेल विश्वविद्यालयाचे प्राध्यापक श्री. के. ए. आर्. केनेडी यांनी आपल्या 'A reassessment of the Theories of Racial origins of the people of the Indus Valley Civilisation from recent Anthropoligical Data' या निबंधात हे सिद्ध केले आहे की, सिंधु-खोऱ्यातील लोक आर्यन नव्हते, ते द्रविडिअन होते हे मत सर्वस्वी चुकीचे आहे. वांशिकदृष्ट्या उत्तर भारतीय व दक्षिण भारतीय यांच्या सांगाड्यांत (Distinctive Morphological Characteristics) वेगळेपणा नाही. श्री. केनेडी मॉर्फालॉजिस्ट आहेत. सुप्रसिद्ध अँथ्रॉपॉलॉजिस्ट (Anthropologist) लॅम्बर्ग कार्लोव्हस्की यांनी अभिप्राय प्रकट केला आहे की, सिंधू-खोऱ्यातील लोक आर्यन असण्याची शक्यता आहे. आपल्या 'Dravidian Theories' ह्या ग्रंथात श्री. एस्. स्वामीनाथ अय्यर यांनी पुराव्यानिशी हे सिद्ध केले आहे की, वेगळ्या द्राविडिअन भाषासमूहाविषयींचा बिशप कॉल्डवेल यांचा सिद्धांत पूर्णपणे निराधार आहे. 'The Aryans-a reappraisal' या आपल्या लेखात

श्री. बी. के. थापर, भूतपूर्व डायरेक्टर जनरल, आर्कियालॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, यांनी निःसंदिग्धरीत्या असे घोषित केले आहे की, पुरातत्त्वशास्त्राच्या दृष्टीने आर्यन भारताबाहेरून आले असे सिद्ध करणारा एकही पुरावा उपलब्ध नाही. उलटपक्षी आर्य हेच भारताचे मूळ निवासी होत.

या विभागाचे दुसरे एक भूतपूर्व डायरेक्टर जनरल प्रा. बी. बी. लाल यांनी आपल्या 'New Perspectives of Indus Civilisation' या ग्रंथात अग्निपूजेच्या प्रचलित चालीवरून हाच मुद्दा सिद्ध केला आहे.

'The Rise of Civilisation in India and Pakistan' या ग्रंथातील आर्यांविषयीच्या अध्यायात Allchin F. R. and Allchin B. या केंब्रिज विश्वविद्यालयाच्या प्राध्यापकांनी ह्या विषयासंबंधी असाच निष्कर्ष काढला आहे.

श्री. जी. एल्. पोसेल (Posscehl) द्वारा संपादित 'Harappan Civilisation' ह्या ग्रंथातील श्री. रॉबर्ट डायसनद्वारा लिखित शेवटच्या अध्यायातही हाच अभिप्राय व्यक्त करण्यात आला आहे. श्री. डायसन पेनसिल्व्हानिया विश्वविद्यालयाचे डायरेक्टर आहेत. या सर्व विद्वानांच्या व विशेषेकरून पाश्चिमात्य विद्वानांच्या उपर्युक्त अभिप्रायांमुळे डॉ. आंबेडकर, श्रीगुरुजी, पं. दीनदयाळजी आदींच्या प्रतिपादनाचा उपहास करणाऱ्यांना भलताच धक्का बसला आहे. अर्थात् पडलो तरी माझेच नाक वर हा प्रकार आणखी काही काळ चालेल. परंतु फार काळ चालू शकणार नाही. उपरिनिर्दिष्ट सर्व अभिप्राय पंडितजींच्या मृत्यूनंतर प्रकट झाले आहेत हे ध्यानात घेतले म्हणजे त्यांच्या तत्त्वनिष्ठेची व हिंमतीची यथार्थ कल्पना येऊ शकते.

वर उल्लेखिलेल्या विद्वानांव्यतिरिक्त आमच्या राष्ट्रीयत्वाला तडे देण्याचा निकराचा प्रयत्न जर कुणी केला असेल तर तो म्हणजे कम्युनिस्टांनी. पंडितजींच्या राष्ट्रविचाराला सर्वांत मोठे आव्हान कम्युनिस्टांनी दिले होते. सत्तेच्या हस्तांतरणापूर्वी कम्युनिस्ट पक्षाने असे सुचविले होते की, संपूर्ण भारताकरिता एक कॉन्स्टिटचुअंट असेंब्ली करण्याचेऐवजी कॉन्स्टिटचूशन बनविणाऱ्या १५ किंवा १७ संस्था निर्माण केल्या पाहिजेत, कारण हा देश म्हणजे १५ किंवा १७ विकसित राष्ट्रीय समूहांचा मित्र-संघ आहे. मार्क्सवादी सिद्धांत सांगतो की, प्रत्येक राष्ट्रीय सामाजिक समूहाला स्वयंनिर्णयाचा अधिकार प्राप्त झालाच पाहिजे. कम्युनिस्ट पक्षाची सूचना या सिद्धांतावर आधारलेली होती. त्यामुळे भारत हे एक राष्ट्र आहे हे मानायला कम्युनिस्ट तयार नव्हते. भारताच्या राष्ट्रीयत्वाला कोणते नाव द्यावे, 'भारतीय' की, 'हिंदू' की, दोन्ही हा प्रश्नच निराळा. मुळात हे एक राष्ट्रच नाही, भारताचे एकराष्ट्रीयत्व हे एक अवास्तविक स्वप्नरंजन मात्र आहे, असा कम्युनिस्टांचा दावा होता. त्या कालखंडात कम्युनिझमची प्रतिष्ठा सर्वत्र वाढती असल्यामुळे त्यांच्या प्रतिपादनाचा परिणाम हिंदुराष्ट्राच्या डळमळीत समर्थकांवरही पडत होता. मार्क्ससारखा श्रेष्ठ विचारक चुकीचा सिद्धांत कसा मांडेल ? 'भारतीय' की

'हिंदू' हा प्रश्नच असंबद्ध आहे. भारत हे मुळी एक राष्ट्रच नाही, अनेक राष्ट्रांचा संघ आहे, हा विचार त्या वेळी प्रबल होऊ लागला होता, व पंडितजींचा राष्ट्रविचार अशास्त्रीय आहे, केवळ भावनावेगावर आधारलेला आहे असे म्हणण्याची फॅशन सुशिक्षित लोकांत पडत चालली होती.

आज आपण निराळेच दृश्य बघत आहोत. राष्ट्रीयत्वाशी संबंधित मार्क्सच्या विचारांचा अर्थ लावण्यात त्या वेळी आपली चूक झाली होती असे कम्युनिस्ट म्हणायला लागले आहेत. आज सी. पी. आय्. व सी. पी. एम्. या दोन्ही ज्येष्ठ कम्युनिस्ट पक्षांनी खलिस्तानच्या मागणीचा, तसेच आसाममधील व पूर्वोत्तर भागातील पृथकतावादी तत्त्वांचा जोरदार विरोध करण्याची भूमिका निःसंदिग्धपणे घेतली आहे. अनेकांना त्यांच्या या नवीन भूमिकेचे आश्चर्य वाटले. पण त्यात आश्चर्य करण्यासारखे काही नाही. 'राष्ट्र' व राष्ट्रीयत्वाच्या स्वरूपाविषयीचे विचारमंथन कम्युनिस्ट वर्तुळात सन १९६२ पासूनच सुरू झाले आहे व त्याची काहीशी झलक 'करियार' या मल्याळम् मासिक-पत्रिकेच्या ऑक्टोबर १९८४ च्या अंकात प्रकाशित झालेल्या सी. अच्युत मेनन यांच्या लेखात पाहावयास मिळते. श्री. सी. अच्युत मेनन काही वर्षे केरळचे (सी. पी. आय्.) मुख्यमंत्री होते व कम्युनिस्ट पक्षाच्या उच्च विचारकांत त्यांची गणना होते. केरळबाहेरील वाचकांच्या सोयीकरिता त्रिवेंद्रमचे डॉ. एम्. आर्. गोपालकृष्णन् नायर यांनी या लेखाचे इंग्रजी भाषांतर प्रसृत केले आहे.

या लेखांत श्री. अच्युत मेनन यांनी राष्ट्रीयत्वाची त्रिविध मार्क्सवादी कसोटी दिलेली आहे. भौगोलिक एकात्मता, संस्कृतीची एकच ऐतिहासिक परंपरा व एकच बोल-भाषा.

भौगोलिक एकात्मतेच्या सिद्धांताला वाऱ्यावर सोडून विश्वामित्री सृष्टीप्रमाणे पाकिस्तानची निर्मिती करण्यात आली, असे मत त्यांनी प्रकट केले आहे. अखंड भारतात भौगोलिक एकात्मता साधत होती, उर्वरित आशिया खंडापासून भारताचे स्वतंत्र व वेगळे अस्तित्व आहे.

भारतात विविध भाषा प्रचलित आहेत हे खरे. व ती एक अडचणीचीही बाब आहे. परंतु संस्कृतीचा भाषेशी घनिष्ठ संबंध आहे, यद्यपि संस्कृतीचे क्षेत्र केवळ भाषे-पुरते मर्यादित नाही. भारतात प्राचीन काळापासूनसुद्धा आसेतु हिमालय सांस्कृतिक एकात्मता अखंड चालत आलेली आहे, असे श्री. मेनन आवर्जून सांगतात.

हे खरे आहे की, ब्रिटिश आमदनीपूर्वी, व्हिक्टोरिया राणीला भारताची सम्राज्ञी म्हणून घोषित करण्यापूर्वी, भारतात शासकीय व राजकीय एकता नव्हती. तरीपण राज्यांची विविधता भारताच्या सांस्कृतिक एकतेला* नष्ट करू शकली नाही. विविध

---

* परिशिष्ट क्र. २२ पहा.

राज्ये विद्यमान असूनही प्राचीन काळापासून सर्व भारतीयांच्या मनात ही दृढ भावना जागृत होती की, आपण सर्व एकाच परंपरेचे वारसदार आहोत.

" It appears that one factor which helped this cultural unity was the Hindu faith. I do not say Hindu religion. The reason for it is that Hindu religion is not a religion in its ordinary meaning. Another reason is that I include the Buddhist and Jain faiths also within the bounds of Hindu faith*..... ..... In strengthening unity, Vedic and Upanishadic literature as also the philosophy contained in them, and more than these, the mithologies, especially Ramayana and Mahabharatha, have helped considerably. "

" Another factor which helped the cultural unity was pilgrimage which was popular among Hindus from ancient times.... There was a feeling among the Hindus that from the Holy city of Beneres upto the Amarnath caves of Kashmir in the North West, Hrishikesh and Badrinath in the North, and Rameswaram and Kanya Kumari in the South were all parts of their country. Was not the establishment of the four main mathas at the four ends of India one of the major accomplishments of Shri Shankaracharya ? Are we not wonderstruck even today at the fact that this man who was to die at the early age of 32, reached the four boundries of India and hoisted the flag of victory of his ideas, at a time when travel in the country was risky and difficult because of the dense forests and attacks of robbers ? Is not the victory march of Shri Shankara the symbol of India's unity ? "

" This unity based on Hindu faith had to face obstruction with the muslim invasion. But it appears that in course of time Islam in India was also Indianised to a certain extent. "

[" असे दिसते की, हे सांस्कृतिक ऐक्य घडवून आणण्यात हिंदू जीवनश्रद्धेचा फार मोठा वाटा होता. मी हिंदुधर्म असा शब्दप्रयोग करीत नाही. याचे कारण असे की सर्वसामान्य अर्थाने हिंदू हा एक धर्म नाही. दुसरे कारण असे की बौद्ध आणि जैन संप्रदायांचा समावेश मी हिंदू जीवनश्रद्धांच्या अनुयायांतच करतो.....एकत्वाचे बंध दृढ करण्यात वैदिक आणि औपनिषदिक साहित्य, तसेच त्यांतील तत्त्वज्ञान आणि त्यापेक्षाही पुराणकथा – विशेषत: रामायण आणि महाभारत यांचा वाटा विशेष मोठा आहे. "

---

* वर्णाश्रमधर्माचे पुरस्कर्ते श्री. अप्रबुद्धसुद्धा जैन, बौद्ध, लिंगायत, महानुभाव, शीख व सनातनी यांना एकाच श्रेणीत गणतात.

" सांस्कृतिक एकतेच्या भावनेचे पोषण करणारी आणखी एक गोष्ट म्हणजे प्राचीन काळापासून हिंदूंत लोकप्रिय असलेल्या तीर्थयात्रा. हिंदूंची अशी धारणा होती की, श्रीक्षेत्र काशीपासून वायव्येकडील काश्मीरातील अमरनाथ गुंफेपर्यंत, उत्तरेस हृषिकेश आणि बद्रीनाथपर्यंत आणि दक्षिणेस रामेश्वर व कन्याकुमारीपर्यंत सगळे आपल्याच देशाचे भाग आहेत. श्री शंकराचार्यांनी चार प्रमुख मठांची स्थापना देशाच्या चार कोपऱ्यांत केली, ही त्यांची महत्त्वाची कामगिरी नव्हे काय ? ज्या वेळी घनदाट अरण्ये आणि दरवडेखोरांचे हल्ले यांमुळे भारतात प्रवास अतिशय अवघड आणि धोक्याचा होता अशा काळात, केवळ ३२ वर्षांचे आयुष्य लाभलेल्या या संन्याशाने देशाच्या चतुःसीमांपर्यंत मजल मारली आणि आपल्या तत्त्वविचारांचा दिग्विजयी ध्वज तेथे फडकावला, या नुसत्या कल्पनेनेच आजही आपण स्तिमित होऊन जात नाही काय ? श्री शंकराचार्यांची दिग्विजययात्रा हे भारताच्या ऐक्याचेच प्रतीक नाही काय ? "

" हिंदू जीवनश्रद्धेवर आधारलेल्या या ऐक्याला मुस्लिम आक्रमणाच्या काळानंतर अडथळ्यांना तोंड द्यावे लागले. पण असे दिसते की कालांतराने भारतातील इस्लामचेही काही प्रमाणात भारतीयीकरण झाले. "]

श्री. मेनन यांचा लेख विचारांना चालना देणारा आहे. परंतु तो सपूर्ण लेख इथे उद्धृत करणे शक्य नाही. समारोपादाखल श्री. मेनन यांनी असा निष्कर्ष दिला आहे की,

" To speak of Indian nationality is not merely not an illusion ····· ·····Indian nationalism is a reality. "

[" भारतीय राष्ट्रीयत्वाची भाषा बोलणे म्हणजे केवळ मिथ्या आभासाला सत्य मानणे नव्हे ····· भारतीय राष्ट्रीयत्व ही वास्तविकता आहे."]

आता तर वस्तुतः हा पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे की, आम्ही ज्याला ' राष्ट्रीयत्व ' म्हणतो, तो धारणापुंज व पाश्चिमात्य ज्याला ' Nationalism ' म्हणतात ती भावना यांत महत्त्वपूर्ण गुणात्मक अंतर आहे किंवा नाही ? याशिवाय हा प्रश्न पुन्हा वेगळाच आहे की, ' Nationalism ' ही सुद्धा एकाच प्रकारची व गुणात्मकतेची भावना आहे की, तिचेही, ऐतिहासिक विकासक्रमातील अंतरामुळे, निरनिराळे प्रकार विकसित झाले आहेत. या पैलूवर श्री. एल्. एल्. स्नायडर यांनी आपल्या ' Nationalism : Its meaning and History, Varieties of Nationalism ' या ग्रंथात केलेले विवरण अभ्यसनीय आहे.

युरोपातील Nationalism व आमचे राष्ट्रीयत्व यांच्या स्वरूपातील गुणात्मक अंतर विशद करताना श्री. बिपिनचंद्र पाल म्हणतात,– " This being the true Hindu conception, I would, therefore, describe Nationality rather as the **Personality** of a people, than, following Mazzini's lead. define it as their **Individuality** "

[* " ही खरीखुरी हिंदू कल्पना असल्यामुळे मी राष्ट्रीयत्वाचे वर्णन मॅझिनीच्या मताप्रमाणे विशिष्ट लोकांचे वेगळे व्यक्तित्व असे न करता, त्यांचे व्यक्तिमत्व असे करणे पसंत करीन. "]

पंडितजी जिवंत असताना ज्यांनी त्यांच्या एकराष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचा उपहास केला व भारताला बहुराष्ट्रीय राज्य घोषित केले, त्यांचा आतापर्यंतचा हा वैचारिक प्रवास पंडितजींच्या विचारांच्या शास्त्रशुद्धतेची खात्री पटविणारा आहे. आपला हा वैचारिक विजय बघण्याला पंडितजी आज आपल्यांत नाहीत, ही गोष्ट सर्वांनाच खटकणारी आहे.

१४

वस्तुतः पंडितजी अधिकारपदाच्या दृष्टीने केवळ एका राजकीय पक्षाचे महामंत्री होते. परंतु तो त्यांच्या विशाल व्यक्तिमत्वाचा अेक पैलू मात्र होता. त्यांची वास्तविक भूमिका तत्त्वद्रष्ट्याची होती. केवळ राजकीय दृष्टिकोनातून मानवतावादापर्यंत पोहोचणे शक्यही नाही व आवश्यकही नाही. आवश्यक याकरिता नाही की, मानवतावादाच्या पुरस्कारामुळे मतांची संख्या वाढेल असे नाही; व शक्य याकरिता नाही की, राजकीय क्षेत्रातील ते एक चलनी नाणे नाही.

मानवतावाद ही कल्पना बोलायला फार सोपी आहे. अतिस्वार्थी व्यक्तिसुद्धा ' ब्रह्मसत्यम् जगन्मिथ्या 'ची भाषा बोलू शकते. परंतु आजच्या जगात मानवतेकडे प्रवास करणे फार कठीण होऊन बसले आहे. De Maistre चे पुढील निरीक्षण या दृष्टीने उद्‌बोधक आहे –

" I have seen, in my time, Frenchmen, Italians, and Russians; I even know, thanks to Mantesquieu, that one may be a Persian; but as for **Man** I declare that I have never met him in my life ; if he exists, it is without my knowledge."

' The path of modern culture leads from humanity, through nationality, to beastiality ' (Grillparzer, 1848).

[" माझ्या जीवनकाळात मी फ्रेंच, इटालियन आणि रशियन लोक पाहिले आहेत. माँटेस्क्यू यांच्या कृपेने मला हेही कळते की एखादा माणूस पर्शियन असू शकेल. पण जोवर ' माणसा 'चा संबंध आहे तोवर मी असे प्रकटपणे सांगतो की, तो माझ्या जीवनात मला कधीच भेटलेला नाही. जर तो अस्तित्वात असेलच, तर ते मला ठाऊक असल्याविना होय. "

" आधुनिक संस्कृतीची वाटचाल मानवतेकडून राष्ट्रीयतेच्या मार्गाने पशुत्वाकडे होत आहे. " (ग्रिल पार्झर १८४८)]

या वातावरणात मानवतावादाचा पुरस्कार करणे साहसाचेच आहे. त्यातही धर्माधिष्ठित मानवतावादाचा पुरस्कार करणे हे तर अतिसाहसाचेच कार्य होते.

युरोपमध्ये मानवतावादाचे तात्त्विक व साहित्यिक आंदोलन चौदाव्या शतकाच्या उत्तरार्धात इटालीत सुरू झाले आणि पंधराव्या व सोळाव्या शतकांत ते इतर युरोपीय देशांत पसरले. अठराव्या शतकापर्यंत या मानवतावादाने युरोपातील विभिन्न समाजांवर बराच प्रभाव गाजविला व आधुनिक पश्चिमी संस्कृतीचे एक प्रमुख अंग असे त्याचे स्वरूप मानले गेले. तत्त्वज्ञान या दृष्टीने युरोपीय मानवतावाद 'स्वभाववादा' हून (naturalism) भिन्न होता. कारण तो सर्व जीवसृष्टीहून मानवाची अपूर्वता मानीत होता; तर दुसरीकडे तो अव्यक्त तत्त्व व कल्पनांपेक्षा प्रत्यक्ष दैनंदिन मानवी जीवनातील अनुभवांचेच श्रेष्ठत्व मानीत होता. साहित्यिक चळवळ या दृष्टीने युरोपीय मानवतावाद म्हणजे इटालियन पुनरुज्जीवनाचे (Renaissance) भावविश्वच होते. बौद्धिक स्वायत्तता व स्वतंत्रता या भावनेने ओतप्रत असे प्राचीन ग्रीस व रोमचे भावविश्व युरोपीय मानवतावादात प्रतिबिंबित झाले होते. या मानवतावादाने मध्ययुगीन ख्रिश्चन मनाला, तदन्तर्गत 'थिओक्रसी' ला, पोपच्या सत्तेला व व्हॅटिकन सिटीद्वारा पुरस्कृत परमेश्वराच्या सत्तेला आव्हान दिले. या मानवतावादाची मुळे प्राचीन ग्रीक विचारपद्धतीत होती. प्रोटॅगोरसचे (Protagoras) पुढील प्रसिद्ध वचन या मानवतावादाला आधारभूत होते.

" Man is the measure of all things, those that are, that they are, and those that are not, that they are not."

[" माणूस हेच सर्व गोष्टीचे – असलेल्या व ज्या स्वरूपात त्या आहेत त्या, नसलेल्या आणि त्यांचे जे स्वरूप नाही त्या – माप आहे."]

तसे पाहिले तर युरोपीय मानवतावादाचे विभिन्न आविष्कार आहेत व विभिन्न युरोपीय विचारप्रवाह मानवतावादाशी आपले नाते सांगतात. तथापि या सर्वांत पुढील धारणा समान आहेत –

मनुष्य हाच स्वतःचा भाग्यविधाता आहे. स्वतःचे भवितव्य निश्चित करण्याचे स्वातंत्र्य त्याला आहे. मनुष्य हाच विश्वाचे केंद्र आहे. स्वतःच्या स्वातंत्र्याबरोबरच इतरांच्याही स्वातंत्र्याचा व मनाचा आदर राखणे उचित आहे. पुनरुज्जीवनाने ज्या प्रत्यक्ष भौतिकावर भर दिला त्याच्या आधारावर कला, शास्त्र, तंत्रविद्या यांचा विकास करावयास पाहिजे. भोंगळ अध्यात्माच्या नादी न लागता, प्राचीन ग्रीक कालखंडाच्या प्रकाशात ऐतिहासिक दृष्टी विकसित केली पाहिजे. नग्न भोगवाद त्याज्य असला तरी मध्ययुगीन ख्रिश्चन निवृत्तिमार्ग (asceticism) तितकाच त्याज्य आहे. ग्रीस व रोमन साम्राज्यातील संतुलित उपभोगवादाचा स्वीकार केला पाहिजे – ज्याचे मार्गदर्शक सूत्र होते होरेस (Horace) चे वचन, 'कोणत्याही गोष्टीचा अतिरेक त्याज्य'. 'me quid nimis '(nothing to any excess), उपभोगाची नैतिक तत्त्वज्ञानाशी सांगड असली पाहिजे, मनुष्याचा

विचार सर्वांगीण सामग्र्याने झाला पाहिजे, जीवनाच्या सर्व अंगांचा संतुलित विचार व्हावा अशा प्रकारच्या विचारप्रणालीचा विकास युरोपीय मानवतावादाने केला. युरोपीय मानवतावादाचा उदय होण्यापूर्वी संपूर्ण युरोपवर ख्रिश्चन मताचे वैचारिक अधिराज्य होते. हल्ली एक नवीन संज्ञा प्रचारात आली आहे. ख्रिश्चन ह्यूमॅनिझम किंवा God-centred Humanism. येशू ख्रिस्ताचा मूळ उपदेश, नंतर सेंट पॉलने निर्मिलेली चर्चानिटी (Churchanity) व त्याहीनंतर युरोपीय समाजातील शोषक शक्तींशी चर्चने केलेले गठबंधन, हा सर्व क्रम ध्यानात घेतला तर Christian Humanism किंवा 'ईश्वरकेंद्रित मानवतावाद' या संज्ञेतील फोलपणा सहज कळण्यासारखा आहे.

मध्ययुगीन ख्रिश्चन मताहून (त्याला आज God-centred Humanism असे नवे नाव प्राप्त झाले तरी) हा मानवतावाद निश्चितच अधिक प्रगतीशील होता. परंतु मध्ययुगीन मतांची प्रतिक्रियाही यात समाविष्ट असल्यामुळे स्वाभाविकच या वादाचा लंबक दुसऱ्या टोकाला जाऊन पोहोचला. पोप व चर्चच्या अधिसत्तेच्याविरुद्ध बंड पुकारण्याच्या आवेशात या मानवतावादाने परमेश्वरालाच अमान्य केले.

Etienne Borne यांनी म्हटल्याप्रमाणे "Atheism marks itself out as a form of humanism"– ['नास्तिकवाद हा एक प्रकारचा मानवतावादच ठरतो.'] – तत्त्वज्ञ Feuerbach यांच्या प्रतिपादनानुसार, आधुनिक मानवतावादाने हे मानले आहे की, "..... in order for man to become all, God must be reduced to nothing."

["माणूसच सर्व काही बनावयाचा असेल, तर ईश्वराचे विसर्जन करावे लागेल."]

या टोकाच्या भूमिकेमुळेच हा मानवतावाद anthropocentric किंवा homocentric (मनुष्यजातीला अस्तित्वाचे केंद्र समजणारा) झाला आहे. अशा युरोपीय मानवतावादी homocentricism 'चे उत्तम प्रकटीकरण मॅक्झिम गॉर्कीच्या 'The Lower Depths' या लेनिनने प्रशंसिलेल्या नाटकातील एका पात्राच्या पुढील उद्गारात पहावयास मिळते.

"All things are part of man; all things are for man"; "man that is the truth."

["सर्व गोष्टी माणसाचाच भाग आहेत. सर्व गोष्टी माणसासाठीच आहेत. माणूसच केवळ सत्य आहे."]

भौतिकवादाचे अधिष्ठान व मानवकेंद्रितता (Homocentricism) ही दोन लक्षणे पश्चिमेतील मानववादाच्या सर्वच प्रकारांत आढळतात. Classical Humanism, Marxist Humanism, Existential Humanism व नवोदित Ecological Humanism या नियमाला अपवाद नाहीत.

गेल्या शतकाच्या मध्यात वामपंथी क्रांतिकार्य करणारांच्या मनोवृत्तिविषयीचे Daumer (डॉमर) चे पुढील उद्गार पहा –

" The frightful tortures that unfortunate beasts suffer at the tyrannous and cruel hand of man are for these barbarians ' rubbish ' that nobody should bother about. "

[" अभागी पशूंना जुलमी व क्रूर माणसाकडून ज्या भयानक यातना सहन कराव्या लागतात, त्या म्हणजे या रानटी लोकांच्या दृष्टीने ' केरकचऱ्यासारख्या ' होत व त्याची कोणी दखल घेण्याचेही कारण नाही. "]

मानवतेला प्राथमिकता वा कोणतेही स्थान न देणाऱ्या इतर सर्व संकुचित श्रद्धांपेक्षा वा तत्त्वज्ञानांपेक्षा भौतिकता-प्रधान युरोपचा मानवतावाद अधिक श्रेष्ठ वाटला तरी त्याचे हे मानव-केंद्रित विश्वदर्शन मनुष्याला अमानुषही बनवू शकते. ' Integral Humanism ' चा पुरस्कार करणारे Maritain आपल्या ' True Humanism ' मध्ये म्हणतात की –

" Any form of anthropocentric humanism is in its final analysis an ' inhuman humanism.' "

[" कोणत्याही स्वरूपात मानवजातीलाच अस्तित्वाचे केंद्र समजणारा मानवतावाद म्हणजे अखेर ' अमानुष मानवतावाद ' होय. "]

पंडितजींचा मानवतावाद या बाबतीत युरोपीय मानवतावादाहून भिन्न व श्रेष्ठ आहे.

मानवतावादाशी नाते सांगणाऱ्या आधुनिक ' पुरोगामी ' युरोपीय विचारप्रणालीही विशुद्ध भौतिकतावादी पायामुळे खऱ्या मानवतावादापर्यंत पोहोचू शकल्या नाहीत.

युरोपीय मानवतावादाच्या विकासाला काही परिस्थितीजन्य मर्यादा पडल्या होत्या. रॉबर्ट ओवेन, सेन्ट सायमन, इतकेच काय, पण स्वत: कार्ल मार्क्सचीही वैचारिक प्रेरणा Ethics मध्येच होती. Alienation व Dehumanization वर मार्क्सने हल्ला चढविला. युगोस्लाव विद्वान Veljko Korac म्हणतात :

" Marx's aim was true man– living under emancipated conditions of labour and not disintegrated by the division of labour."

[" मजुरीच्या जाचापासून मुक्त अवस्थेत राहाणारा खरा माणूस हे मार्क्सचे उद्दिष्ट होते. श्रमविभागणीने विच्छिन्न झालेला माणूस मार्क्सला मुळीच अभिप्रेत नव्हता. "]

या विचाराची प्रेरणा विशुद्ध भौतिकतावादातून मिळूच शकत नाही. हा Ethics चा प्रांत आहे. श्री. जयप्रकाश नारायण यांनी म्हटल्याप्रमाणे –

" Materialism as philosophical outlook could not provide any basis for ethical conduct and any incentive for goodness. "

[" नैतिक आचरण आणि चांगुलपणा यांसाठी प्रेरणा या नात्याने जडवादी तात्त्विक दृष्टिकोन कोणताही आधार पुरवू शकला नाही. "]

परंतु गेल्या शतकातील युरोपच्या मनात एक समीकरण बसलेले होते.* Ethics म्हणजे Religion, Religion म्हणजे चर्च; चर्च म्हणजे एक शोषक शक्ती, जिच्याविरुद्ध बंड केल्याशिवाय अंधश्रद्धेने जखडलेल्या मानवी मनाला मुक्तता प्राप्त होणार नाही – हे ते समीकरण ** होय. त्यामुळे मार्क्सने Ethics च्या पैलूला पार्श्वभूमीत टाकले व साधन म्हणून उपयोगात आणलेल्या अर्थनीतीलाच सर्वप्राधान्य दिले. विशुद्ध भौतिकतावाद हाच विचारांचा आधार ठरला. याच सुमारास विकसित झालेल्या युरोपीय सायन्सने जडद्रव्याला (Matter) बेसिक ठरविले व प्रचंड प्रगतीची संभावना मानवासमोर ठेवली. या दोन्ही गोष्टींचा संकलित परिणाम म्हणजे युरोपीय मानवतावादाचा निर्भेळ भौतिक आधार. यातून खऱ्या मानवतावादापर्यंत पोहोचणे प्रकृत्याच असंभव होते. Erich Fromm यांनी संपादिलेल्या ' Socialist Humanism ' या ग्रंथात ' alienation ' या शब्दाची सर्वांत अधिक पुनरुक्ती आहे. मार्क्स व अन्य विचारांच्या समाजवाद्यांनीही alienation व dehumanisation या विरुद्ध जिहाद पुकारला. परंतु कोणत्या समाजवादी वा कम्युनिस्ट देशात alienation व dehumanisation समाप्त झाले आहे ? या अपयशाची कारण-मीमांसा पंडितजींच्या मौलिक विचारपद्धतीची श्रेष्ठता प्रस्थापित करील.

पश्चिमेचे तत्त्वज्ञान व विश्वदर्शन पूर्णपणे विचारात घेऊन श्री. एम्. एन्. रॉय यांच्या भारतीय मनाने, भारतीय पद्धतीने मानवतावादाची रचना करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी ' आर्थिक मानव ' (economic man) ही कल्पना त्याज्य ठरविली. भांडवलशाही, समाज-वाद, कल्याणकारी राज्य, राजकीय पक्ष, कम्युनिझम्, formal democracy, मानवाची नैसर्गिक स्वार्थी वृत्ती, वर्गसंघर्षाची कल्पना, स्पर्धा या सर्व पश्चिमी संकल्पनांतील उणीवा स्पष्ट केल्या आणि घोषित केले की,

" Instinct is primitive reason. Man therefore is essentially a rational being ····· Rationality can subordinate man's selfishness to enlightened self-interest which is a social virtue ····· Reason is only sanction for morality ··· The crying need of the time is to harmonise ethics with a social philosophy and political practice····· The sovereignty of man···· can be deduced only from the fact that man is a moral entity ···· man

---

* अर्बन म्हणतो, " Ethics is the science that deals with conduct in so far as it is considered right or wrong, good or bad. "

[" नीतिशास्त्र म्हणजे माणसाचे आचरण जे बरोबर किंवा चुकीचे, चांगले अथवा वाईट म्हटले जाते त्याची मीमांसा करणारे शास्त्र."]

** परिशिष्ट क्र. २३ पहा.

is moral because he is rational. The universe is a moral order governed by laws inherent in itself. Man grows out of that background. Ethics must be the foundation of the moral philosophy which is the crying need of our time."

[" उपजत प्रवृत्ती म्हणजे प्राथमिक बुद्धी होय, म्हणून माणूस हा मूलतः बुद्धिवादी प्राणी आहे. ·· ·· बुद्धिवाद उदात्त आत्महिताच्या तुलनेने क्षुद्र स्वार्थ गौण लेखण्याची प्रवृत्ती माणसात निर्माण करू शकतो. ही प्रवृत्ती म्हणजे एक सामाजिक सद्गुण असतो.··· ·· बुद्धिप्रामाण्य हीच नैतिकतेला मान्यता प्राप्त करून देणारी शक्ती असते. ··· सामाजिक तत्त्वज्ञान आणि राजकीय व्यवहार यांचा नैतिकतेशी सुसंवाद साधणे ही आज काळाची निकड आहे. ··· माणूस हे एक नैतिक सत्य मानले तरच त्याच्या सार्वभौमत्वाला काही अर्थ प्राप्त होतो ····· माणूस नैतिक आहे कारण त्याला विचारशक्ती आहे. स्वतःच्या अंतर्गत कायद्यांचा अंमल असलेली विश्व ही एक नैतिक व्यवस्था आहे. त्या पार्श्वभूमीवर माणूस लहानाचा मोठा होत असतो. ····· नीतिशास्त्र हाच नैतिक तत्त्वज्ञानाचा पाया असला पाहिजे. आजच्या काळाची हीच परम आवश्यकता आहे. "]

सर्व पश्चिमी तत्त्वज्ञानांचे सखोल अध्ययन केलेल्या या भारतीय विचारकाने पश्चिमेचा एकूण दृष्टिकोनच सदोष व अपर्याप्त ठरविला. जडद्रव्याच्या dialecticism ला कल्पनांच्या dynamism ची जोड दिली व अशा रीतीने आपल्या Scientific, New किंवा Integral Humanism ला पश्चिमेपासून दूर भारताच्या निकट आणून बसविले. पश्चिमी विचारधारांविषयी त्यांचा अधिकाधिक भ्रमनिरास होत होता. तथापि कित्येक दशकांपासून मनावर दृढ झालेल्या भौतिकतावादाच्या संस्कारापासून मन पूर्णपणे मुक्त होण्यालाही काही अधिक काळ लोटण्याची आवश्यकता होती. तितका काळ त्यांना लाभला असता तर ते पंडितजींच्या मानवतावादापर्यंत अवश्य पोहोचले असते. असा निष्कर्ष काढण्याला भरपूर वाव आहे.*

१५ पंडितजींनी राजकारणात प्रवेश केला त्या वेळी कोणत्या ना कोणत्या तरी इझमचे समर्थक किंवा अनुयायी असणे ही एक फॅशन होऊन बसली होती व तो इझमसुद्धा पश्चिमेकडून उधार आणलेलाच असावयाचा. वास्तविक या विभिन्न वादांचे वैय्यर्थ्य विचारवंतांच्या ध्यानात यावे अशी स्थिती त्या वेळीही होती. परंतु स्वतःविषयीच्या न्यूनगंडामुळे व पाश्चिमात्य

* परिशिष्ट क्र. २४ पहा.

प्रगतीच्या झगमगाटामुळे इंग्रजी शिकलेल्या लोकांच्या मनांत अशी भावना निर्माण झाली होती की पाश्चिमात्यांचे अंधानुकरण म्हणजेच प्रगमनशीलता. हे वातावरण इतके प्रभावी झाले होते की, हिंदुत्ववादी पुढाऱ्यांनासुद्धा 'Hindu Socialism' हा शब्द वापरण्याचा मोह झाला होता व काही वेदांताच्या समर्थकांना असे म्हणण्याची इच्छा होत होती की आमचा वेदांत म्हणजे 'Spiritual communism' होय. यावरून दार्शनिक क्षेत्रातील आमच्या विचारवंतांची लाचारी स्पष्ट होते. अशा स्थितीत पंडितजींनी साहसपूर्वक सर्व पाश्चिमात्य विचारसरणींचा मोह टाळला व भारतीय संस्कृतीच्या आधारावर राष्ट्रपुनर्रचना करण्याचा निश्चय जाहीर केला.

पश्चिमेत औद्योगिक क्रांतीनंतर यंत्रयुगाच्या बरोबरच भांडवलशाही रचनेचा प्रारंभ झाला व मानवी प्रगतीचा निर्देशांक या नात्याने भांडवलशाहीच्या प्रगतीकडे लोक बघू लागले. कालांतराने या रचनेतील अंतर्विरोध स्पष्ट होत गेले.

Joseph Schumpeter यांनी आपल्या 'Capitalism, Socialism and Democracy' या पुस्तकात म्हटले आहे की, "(the) capitalist economy is not and cannot be stationary. Nor is it merely expanding in a steady manner. It is incessantly being revolutionized from within by new enterprise i.e., by the intrusion of new commodities or new commercial opportunities in the industrial structure as it exists at any moment. Any existing structures and all the conditions of doing business are always in the process of change. Every situation is being upset before it has had time to work itself out. Economic progress in capitalist society, means turmoil."

["भांडवलशाही अर्थव्यवस्था स्थिर नाही आणि ती कधीच स्थिर असू शकत नाही. किंवा ती संथ गतीने विस्तारही पावत नाही. नवनवीन औद्योगिक उपक्रमांनी तिच्यात आतून सतत एक परिवर्तन घडून येत असते. म्हणजे, नव्या उपभोग्य वस्तू बाजारात शिरतात किंवा विद्यमान औद्योगिक रचनेत नव्या संधी उपलब्ध होतात. अस्तित्वात असलेली कोणतीही व्यवस्था व उद्योगाचे नियम यांत एकसारखा बदल होत असतो. एखादी अवस्था परिणत होण्यापूर्वीच तिचा विचका होतो. भांडवलशाही समाजातील आर्थिक प्रगती म्हणजे गोंधळ!"]

भांडवलशाहीचे एक त्राते John Maynard Keynes यांनी स्वानुभवाच्या आधारावर असे उद्‌गार काढले की, "The decadent international but individualistic capitalism in the hands of which we found ourselves after the (first world) war is not a success. It is not intelligent. it is not beautiful, it is not just, it is not virtuous – and it doesn't deliver the goods. In short; we dislike it and we are beginning to despise it."

["महायुद्धानंतर (पहिल्या जागतिक) आपण ज्या पतनोन्मुख आंतर-

राष्ट्रीय पण व्यक्तिवादी भांडवलशाहीच्या आधीन झालो, ती यशस्वी ठरलेली नाही. ती बुद्धीने तीव्र नाही, सुंदर नाही, न्यायसंगत नाही, सद्‌गुणी नाही आणि समाधान-कारक निष्पत्ती तिच्याद्वारे, झालेली नाही. थोडक्यात, ती आपल्याला आवडत नाही, व आपण तिचा तिरस्कार करू लागलो आहोत."]

भांडवलशाही व त्यातून निर्माण झालेल्या साम्राज्यशाहीच्या दुष्परिणामांचे सप्रमाण विवरण श्री. दादामाई नवरोजी व न्या. रानडे यांनी प्रारंभिक काळातच करून ठेविले आहे. श्री. गो. कृ. गोखले व श्री. रमेशचंद्र दत्त यांनी हेच शोषक स्वरूपाचे विवरण पुढे अधिक तथ्यांच्या आधारावर सर्वांपुढे ठेविले. अर्थात् हे सर्व भारताच्या शोषणाच्या संदर्भात.

भांडवलशाहीविषयी हीच भावना सार्वत्रिक आहे व या दडपणाखाली या रचनेला स्वतःमध्ये अनेक बदल घडवून आणावे लागले.

भारतात पंडितजींच्या वेळी लोकप्रिय असलेल्या विचारधारा वामपंथीयच होत्या. त्यांच्या छटा फिक्क्या गुलाबीपासून गडद लालपर्यंत अलग अलग असतील. परंतु वाम-पंथीयत्व हा सर्वांचाच विशेष होता.* बऱ्याच लोकांचा असा गैरसमज आहे की, फॅशनेबल वामपंथी-विचारप्रणालीशी भारताचा संबंध अलीकडील आहे. हा समज बरोबर नाही. राजा राममोहन रॉय सतीच्या चालीच्या विरुद्ध इंग्लंडच्या संसद सदस्यांना आपली बाजू पटवून देण्याकरता इंग्लंडमध्ये गेले होते. त्या वेळी Robert Owen (रॉबर्ट ओवेन) या संस्थापक सोशॅलिस्ट पुढाऱ्याशी त्यांची गाठ घालून देण्यात आली होती. Dr. Arnot यांच्या घरी झालेल्या त्या भेटीचे इतकेच वृत्त आपल्यापर्यंत आलेले आहे की, चर्चेला प्रारंभ झाल्यानंतर ओवेन चिडले व आवेशात आपली बाजू जोरजोराने मांडू लागले. श्री. रॉय यांचे चरित्रकार Sohpia Collet ने लिहिले आहे की, त्या प्रसंगी राममोहन रॉय यांचा शांतपणा ढळला नाही. इंग्लंडमधून परत आल्यावर श्री. रॉय यांनी सोशॅलिझमचा प्रचार हाती न घेता आपली शक्ती ब्राह्मोसमाजाच्या कामात लावली, हे उल्लेखनीय आहे.

Proudhon द्वारा पुरस्कृत व Bakunin द्वारा समर्थित अराज्यवादाचे (अनार्कि-झमचे) Ideologue म्हणून प्रसिद्ध असलेले Prince Kropotkin यांच्या प्रमुख अनुयायांत सिस्टर निवेदितांची गणना होती. त्यांनी क्रोपोट्‌किन व विवेकानंद यांची भेट घडवून आणली. या भेटीतील बोलणे सौहार्दपूर्ण वातावरणात झाले. कारण हिंदू आदर्शही 'न राज्यम् नैव राजाऽऽसीत्' असाच राहिला आहे. तथापि हे ध्यानात घेण्यासारखे आहे की, सिस्टर

---

*प्रारंभापासूनच जागतिक वामपंथीयांचा वैचारिक अहंकार कसा शिगेला पोहोचला होता. हे ट्रॉट्‌स्कीच्या पुढील विधानावरून दिसून येते– Only in a socialist society can the average humanity rise to the level of a Plato and Marxs."

["केवळ समाजवादी समाजातच सामान्य माणसे प्लेटो किंवा मार्क्स यांच्या पातळीवर पोचू शकतात."]

निवेदितांनी आपले उर्वरित आयुष्य भारतात हिंदू आदर्शांची सेवा व प्रचार करण्यात घालविले.

कॅपिटॅलिझमच्या विकासानंतर प्रतिक्रियास्वरूप अनेक विचारधारा पश्चिमेत निर्माण झाल्या. फेबियन सोशॅलिझम किंवा गिल्ड सोशॅलिझमसारख्या थोड्या शाकाहारी विचारप्रणालींचा अपवाद वगळता त्यांपैकी बहुतेक हिंसाचारी होत्या. मार्क्सने रक्तरंजित क्रांतीची अपरिहार्यता स्पष्ट केली.

सिंडिकॅलिझमचा प्रणेता व ' Reflections on Violence ' चा लेखक जॉर्जेस सोरेल व समाजशास्त्रज्ञ पॅरिटो या दोघांनीही हिंसेची आवश्यकता प्रतिपादन केली. Will व Superman चा आदर्श पुढे ठेवणाऱ्या नित्शेने तसेच बर्गसनने (Bergson) आणि फिष्टे (FICHTE) ने हिंसाचाराचे उघड उघड समर्थन केले. बिस्मार्कच्या ' blood and iron ' सिद्धांताला प्रथम महायुद्धानंतर जर्मनीत विशेष प्रतिष्ठा प्राप्त झाली. त्यातच Gobineau व Houston Stuart Chamberlain व रोझेन्बर्ग यांच्या लिखाणाच्या आधारे ज्यूविरोधी वंशवाद जर्मनीत प्रखर करण्यात आला आणि वंशवाद, राष्ट्रीय समाजवाद व हिंसावादाचे एकत्रीकरण हिटलरच्या जर्मनीत झाले.

हिटलरच्या गुरुस्थानी असलेले फॅसिझमचे आद्यप्रणेते बेनिटो मुसोलिनी यांनी तर सर्व जनलज्जा बाजूला ठेवून घोषणा केली की " War alone brings to its highest tension all human enegry and puts the stamp of nobility upon the peoples who have the courage to meet it. "

["केवळ युद्धाच्या वेळीच माणसाच्या सर्व शक्ती तणावाच्या सर्वोच्च बिंदूवर पोहोचतात आणि ज्या लोकांना युद्धाला तोंड देण्याचे साहस आहे, त्यांच्यावरच उदात्ततेचा शिक्का उमटवितात."] *

Ku Klux Klan सारख्या वंशवादी असोत अथवा इटालीचा फॅसिस्ट पक्ष, जर्मनीचा नाझी पक्ष, स्पेनच्या फ्रँकोचा फॅलँगिस्ट पक्ष पोर्तुगालच्या सालाझारचा युनिटो नॅशनल्स पक्ष व अर्जेंटिनाचा पेरॉनिस्ट पक्ष यांच्या विचारधारांसारख्या उजव्या असोत** किंवा Syndicalism-anarchism सारख्या डाव्या असोत, नग्न हिंसाचारावर आधारलेल्या

---

* परिशिष्ट क्र. २५ पहा.

** आपल्या देशात, ' New Left ' आंदोलनाची लोकांना माहिती आहे. परंतु ' New Right आंदोलनाविषयी माहिती नाही. Alain de Benoist च्या प्रेरणेने फ्रान्समध्ये सुरू झालेली ' New Right ' Movement मानवी असामनतेला सन्माननीय मानते व अशी धारणा ठेवते की, समतावादी ख्रिश्चन मतांमुळे युरोपीय समाज भ्रष्ट होण्यापूर्वी ' इण्डो-युरोपीयन ' किंवा ' आर्यन ' संस्कृती सर्वश्रेष्ठ होती, ' आर्यन ' संज्ञेत त्या चळवळीचे समर्थक जर्मन, केल्ट (Celts), ग्रीक व रोमन यांचा समावेश करतात.

विचारसरणीला भारतासारख्या प्राचीन, प्रौढ व परिपक्व देशात वाव मिळणे संभवनीय नव्हते. तरीपण रशियातील यशस्वी बोल्शेव्हिक राज्यक्रांतीनंतर Communism चा भारतात प्रवेश झाला. १७ ऑक्टोबर १९२० या दिवशी ताश्कंद येथे कम्युनिस्ट पार्टीच्या भारतीय शाखेची स्थापना झाली व डिसेंबर १९२५ मध्ये कानपूर येथे पक्षाचे पहिले अखिल भारतीय अधिवेशनही झाले. वास्तविक भारतीय मनाला आकृष्ट करणारी गोष्ट म्हणजे कम्युनिझमचे तत्त्वज्ञान नव्हते. त्या तत्त्वज्ञानाविषयी माहिती व आस्था नसलेले वरेच तरुण कम्युनिस्ट पक्षाकडे ओढले गेले. याला कारण रशियन राज्यक्रांतीचे यश. महात्माजींच्या आंदोलन-पद्धतीवर गरम प्रवृत्तीचे तरुण रुष्ट होते. दुसरे पर्यायी नेतृत्व किंवा आंदोलन दृष्टीसमोर नव्हते. अहिंसात्मक नव्हे तर हिंसात्मक मार्गानेच स्वराज्य प्राप्त होऊ शकेल असा त्यांचा विश्वास होता. गांधीवादी आंदोलनांचा विकल्प ते शोधीत होते. रशियन राज्यक्रांतीच्या यशामुळे कम्युनिस्ट पंथ हा तो विकल्प आहे असे त्यांच्या मनाने घेतले व निरनिराळ्या प्रांतांत अशा जहाल मंडळींनी कम्युनिस्ट पक्षाची पताका उभारली.* ज्यांना कम्युनिझमचे तत्त्वज्ञान अतिरेकी वाटत होते व काँग्रेसच्या अंतर्गत राहून नेतृत्वावर खालून दडपण आणून आपण काँग्रेसच्या आंदोलनाची दिशा बदलवू शकू असा ज्यांना विश्वास होता अशा मंडळींनी १९३४ च्या मेमध्ये काँग्रेसच्या अंतर्गत काँग्रेस सोशॅलिस्ट ग्रुपची स्थापना केली. महात्माजींचा प्रभाव कितीही मोठा असला तरी काँग्रेस सोशॅलिस्ट ग्रुपजवळही ख्यातनाम लोकांची उणीव नव्हती. आचार्य नरेंद्र देव, जयप्रकाश नारायण, युसूफ मेहेरअली, अशोक मेहता, राम मनोहर लोहिया, कमलादेवी चट्टोपाध्याय, एस्. एम्. जोशी, ना. ग. गोरे, अच्युतराव पटवर्धन, मिनू मसानी, एम्. एल्. दांतवाला, अरुणा असफअल्ली, सुरेंद्रनाथ द्विवेदी, पुरुषोत्तम त्रिकमदास आदी नामवंत मंडळी या पक्षाच्या नेतृत्वस्थानी होती. त्यामुळे स्वराज्यप्राप्तीनंतर सोशॅलिस्ट मंडळींनी आपला पक्ष स्वतंत्रपणे स्थापन केल्यावर काँग्रेसला विकल्प म्हणून याच पक्षाचे स्थान जनमानसात निर्माण झाले होते. सर्वश्री जयप्रकाश नारायण, राममनोहर लोहिया व अशोक मेहता ही त्रैमूर्ती म्हणजे देशाचे नवे पर्यायी नेतृत्व असा समज बऱ्याच क्षेत्रांत पसरला होता. अशाप्रकारे दीनदयाळजींनी राजकारणात प्रवेश केला त्या वेळी सत्ताधारी काँग्रेस पक्षानंतर दुसरा महत्त्वपूर्ण पक्ष समाजवाद्यांचा होता व त्यानंतर अधिक सुसंघटित कम्युनिस्ट पक्ष हिंदी भाषिक प्रदेशांच्या बाहेर काही प्रांतांत आपले पॉकेट्स् निर्माण करून क्रमांक तीन वर होता. सोशॅलिझम व कम्युनिझम यांचा त्या वेळी सर्वत्र बोलबाला होता, अथपर्यंत की निकट भविष्यकाळात काँग्रेस पक्षालाही 'सोशॅलिस्ट पॅटर्न ऑफ सोसायटी' हे आपले ध्येय आहे अशी घोषणा करावी लागली. वामपंथाची इतकी व्यापक लोकप्रियता असल्यामुळे स्वतःला वामपंथीय म्हणून घोषित करण्याची इच्छा कोणत्याही राजकारणी पुढाऱ्याच्या मनात निर्माण होणे स्वाभाविक होते. परंतु पंडितजी अशा सवंग पुढाऱ्यांपैकी नव्हते. तत्कालीन वातावरणात डाव्या विचार-सरणीचा जयजयकार होत असला तरी स्वतःच्याच अंतर्विरोधामुळे या सर्व विचारधारा

---

* परिशिष्ट क्र. २६ पहा.

अपयशी ठरणार आहेत हा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यामुळे तत्कालीन वातावरणाने प्रभावित न होता राष्ट्राच्या दूरगामी उज्ज्वल भविष्याचे चित्र समोर ठेवून त्यांनी या भूमीत निर्माण झालेल्या दर्शनाचाच आविष्कार व पुरस्कार हिंमतीने केला. भविष्या-विषयींचा त्यांचा अंदाज खरा ठरत आहे हे पहाण्याकरिता आज दुर्दैवाने ते आपल्यांत नसले तरी त्यांच्या दर्शनाच्या विजयाची अपरिहार्यता हळूहळू प्रकट होऊ लागली आहे असे म्हणता येण्यासारखे आहे.

श्री. जयप्रकाश नारायण यांनी असे म्हटले होते की, " If European Communism has failed, European Socialism has been no conspicuous success either. "

[" जर युरोपातील साम्यवाद अपयशी ठरला असेल तर समाजवाद मोठा यशस्वी ठरला आहे, असाही दावा करता येत नाही. "]

योगायोगाची गोष्ट ही की जयप्रकाशांचे हे विधान भारतातील सोशॅलिस्ट पक्षालाही लागू पडते. त्यामुळे जयप्रकाशांनी पुढे असे निःसंदिग्धपणे घोषित केले की, " However, some years back it bacame clear to me that socialism, as we understand it today, cannot take mankind to the sublime goal of freedom, equality, brotherhood and peace. Socialism, no doubt gives promise to bring mankind closer to these goals than any other competing social pailosophy. But I am persuaded that unless socialism is transformed into Sarvodaya, those goals would remain beyond its reach; and just as we had to taste the ashes of independence, so future generation may have to taste the ashes of socialism. "

[" काही वर्षांपूर्वी माझ्या स्पष्टपणे निदर्शनास आले की आज ज्याला आपण समाजवाद समजतो तो मानवमात्राला स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि शांतता या उदात्त ध्येयाकडे नेण्यास असमर्थ आहे. हे मात्र निश्चित की इतर कोणत्याही प्रचलित सामाजिक तत्त्वज्ञानापेक्षा या ध्येयांच्या अधिक जवळ मानवजातीला नेण्याचे आश्वासन समाजवादातून लाभते. पण मी या निष्कर्षावर येऊन ठेपलो आहे की समाजवादाचे रूपांतर जोवर सर्वोदयात होत नाही, तोवर ही उद्दिष्टे त्याच्या आवाक्याबाहेर राहतील. आणि आपल्याला जसा स्वातंत्र्यानंतरच्या वैफल्याचा कटु अनुभव घ्यावा लागला तसा पुढील पिढीला समाजवादाचा अनुभव घ्यावा लागेल."]

पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पूर्वी सत्ताधारी पक्षाला विकल्प म्हणून पुढे आलेला समाजवादी पक्ष आज अस्तित्वातही नाही ही वस्तुस्थितीच पुरेशी बोलकी आहे.

या भूमीत जिची पाळेमुळे नाहीत अशी विचारसरणी, तिचे पुरस्कर्ते व्यक्तिशः कितीही श्रेष्ठ असले तरी, या देशात फार काळ टिकाव धरू शकत नाहीत याचेच प्रत्यंतर

समाजवादी पक्षाच्या आजच्या स्थितीवरून येते.* परंतु पंडितजींनी राजकीय कार्याला प्रारंभ केला त्या वेळी सोशॅलिझमची जी प्रतिमा जनमानसात होती ती ध्यानात घेता सोशॅलिझम या सर्वंग कल्पनेचा विनापरिश्रम स्वीकार करण्याचा मोह पंडितजींनी टाळला यात त्यांच्या प्रकृतिसिद्ध श्रेष्ठत्वाचे स्पष्ट दर्शन होते.

भारतातील कम्युनिझमची कहाणी निराळ्या प्रकारची आहे. समाजवादी पक्षाप्रमाणे, कम्युनिस्ट पक्षाची संपूर्ण वाताहत झालेली नाही. परंतु त्यांच्या अनेक चिरफळ्या झालेल्या आहेत. सरकारचे प्रतिवृत्त खरे मानले तर, एकट्या नक्सलवादी विचारसरणीच्या अनुयायांचे सव्वीस गट भारतात आहेत. म्हणजे कम्युनिझमच्या अनुयायांचे तीसहून अधिक गट देशात आहेत. संपूर्ण जगाला एका छत्राखाली आणण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या कम्युनिस्ट पक्षाची भारतात ही दुर्दशा व्हावी हे सकृद्दर्शनी आश्चर्यजनक वाटते, परंतु ते स्वाभाविकच आहे. भारतात सर्वच तत्त्वज्ञानांना नेहमीच पूर्ण वाव राहिला आहे. केवळ एक तत्त्वज्ञान म्हणून कम्युनिझम भारतात राहिला असता तर गोष्ट वेगळी होती. परंतु जिथे या पक्षाची स्थापनाच मुळी जागतिक कम्युनिस्ट पक्षाची भारतातील शाखा (कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया) या नात्याने झाली व प्रारंभापासून रशियाच्या परराष्ट्रीय धोरणाला अनुकूल अशी धोरणे पत्करणे पक्षाच्या नशिबी आले. भारतातील कम्युनिस्ट पुढाऱ्यांना स्थानीय परिस्थितीच्या प्रकाशात पक्षाचे ध्येय-धोरण ठरविण्याची मोकळीक असती तर अशी दुर्दशा इतक्या लवकर झाली नसती. कारण पक्षाजवळ समर्थ नेतृत्व व समर्पित कार्यकर्ते होते. परंतु रशियनधार्जिणेपणामुळे ते स्वतंत्रपणे आपली धोरणे ठरवू शकले नाहीत.

दीनदयाळजींनी सार्वजनिक जीवनाला प्रारंभ केला, त्या वेळी जागतिक पातळीवर कम्युनिझमची चढती कमान होती. दुसऱ्या महायुद्धात विजयी झालेल्या राष्ट्रांत रशियाही एक होता. आणि त्यानंतरच्या रचनेत पूर्व युरोपातील सर्व देश 'रशियन बायोनेटच्या' प्रभावाखाली आले होते. या सर्व देशांत रशियन टॅन्क्सच्या सहाय्याने कम्युनिस्ट सरकारे स्थापन झाली होती. त्यानंतर लागलीच जगातील सर्वांत अधिक लोकसंस्थेचा चीन कम्युनिस्ट शासनाखाली आला होता. महायुद्धानंतरच्या काळातील तिसऱ्या जगातील, परतंत्र देशांच्या स्वातंत्र्यलढ्यांना रशियाचे समर्थन प्राप्त होत होते व त्यामुळे तेथील राष्ट्रवादी मंडळींची सहानुभूती रशियाकडे स्वाभाविकपणेच वळत होती. (पुढे युनायटेड स्टेट्सच्या अगदी निकट क्यूबामध्ये आपले राज्य स्थापन करण्यात कम्युनिस्टांना यश प्राप्त झाले.) जागतिक स्तरावरील रशियाच्या या नेत्रदीपक यशामुळे भारतातही कम्युनिस्ट पक्षाची प्रतिष्ठा त्या वेळी वाढली होती. परंतु स्टॅलिनच्या मृत्यूनंतर हळूहळू कम्युनिस्ट जगतात विघटनाला प्रारंभ झाला. पूर्व युरोपातील कम्युनिस्टशासित देशांत झालेले शेतकरी-कामकऱ्यांचे विद्रोह रशियन टॅन्क्सच्या सहाय्याने दडपून टाकण्यात आले

---

*परिशिष्ट क्र २७ पहा.

अपयशी ठरणार आहेत हा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यामुळे तत्कालीन वातावरणाने प्रभावित न होता राष्ट्राच्या दूरगामी उज्ज्वल भविष्याचे चित्र समोर ठेवून त्यांनी या भूमीत निर्माण झालेल्या दर्शनाचाच आविष्कार व पुरस्कार हिंमतीने केला. भविष्या-विषयींचा त्यांचा अंदाज खरा ठरत आहे हे पहाण्याकरिता आज दुर्दैवाने ते आपल्यांत नसले तरी त्यांच्या दर्शनाच्या विजयाची अपरिहार्यता हळूहळू प्रकट होऊ लागली आहे असे म्हणता येण्यासारखे आहे.

श्री. जयप्रकाश नारायण यांनी असे म्हटले होते की, " If European Communism has failed, European Socialism has been no conspicuous success either. "

[" जर युरोपातील साम्यवाद अपयशी ठरला असेल तर समाजवाद मोठा यशस्वी ठरला आहे, असाही दावा करता येत नाही. "]

योगायोगाची गोष्ट ही की जयप्रकाशांचे हे विधान भारतातील सोशॅलिस्ट पक्षालाही लागू पडते. त्यामुळे जयप्रकाशांनी पुढे असे निःसंदिग्धपणे घोषित केले की, " However, some years back it bacame clear to me that socialism, as we understand it today, cannot take mankind to the sublime goal of freedom, equality, brotherhood and peace. Socialism, no doubt gives promise to bring mankind closer to these goals than any other competing social pailosophy. But I am persuaded that unless socialism is transformed into Sarvodaya, those goals would remain beyond its reach; and just as we had to taste the ashes of independence, so future generation may have to taste the ashes of socialism. "

[" काही वर्षांपूर्वी माझ्या स्पष्टपणे निदर्शनास आले की आज ज्याला आपण समाजवाद समजतो तो मानवमात्राला स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि शांतता या उदात्त ध्येयाकडे नेण्यास असमर्थ आहे. हे मात्र निश्चित की इतर कोणत्याही प्रचलित सामाजिक तत्त्वज्ञानापेक्षा या ध्येयांच्या अधिक जवळ मानवजातीला नेण्याचे आश्वासन समाजवादातून लाभते. पण मी या निष्कर्षावर येऊन ठेपलो आहे की समाजवादाचे रूपांतर जोवर सर्वोदयात होत नाही, तोवर ही उद्दिष्टे त्याच्या आवाक्याबाहेर राहतील. आणि आपल्याला जसा स्वातंत्र्यानंतरच्या वैफल्याचा कटु अनुभव घ्यावा लागला तसा पुढील पिढीला समाजवादाचा अनुभव घ्यावा लागेल."]

पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पूर्वी सत्ताधारी पक्षाला विकल्प म्हणून पुढे आलेला समाजवादी पक्ष आज अस्तित्वातही नाही ही वस्तुस्थितीच पुरेशी बोलकी आहे.

या भूमीत जिची पाळेमुळे नाहीत अशी विचारसरणी, तिचे पुरस्कर्ते व्यक्तिशः कितीही श्रेष्ठ असले तरी, या देशात फार काळ टिकाव धरू शकत नाहीत याचेच प्रत्यंतर

समाजवादी पक्षाच्या आजच्या स्थितीवरून येते.* परंतु पंडितजींनी राजकीय कार्याला प्रारंभ केला त्या वेळी सोशॅलिझमची जी प्रतिमा जनमानसात होती ती ध्यानात घेता सोशॅलिझम या सर्वंग कल्पनेचा विनापरिश्रम स्वीकार करण्याचा मोह पंडितजींनी टाळला यात त्यांच्या प्रकृतिसिद्ध श्रेष्ठत्वाचे स्पष्ट दर्शन होते.

भारतातील कम्युनिझमची कहाणी निराळ्या प्रकारची आहे. समाजवादी पक्षाप्रमाणे, कम्युनिस्ट पक्षाची संपूर्ण वाताहत झालेली नाही. परंतु त्यांच्या अनेक चिरफळ्या झालेल्या आहेत. सरकारचे प्रतिवृत्त खरे मानले तर, एकट्या नक्सलवादी विचारसरणीच्या अनुयायांचे सव्वीस गट भारतात आहेत. म्हणजे कम्युनिझमच्या अनुयायांचे तीसहून अधिक गट देशात आहेत. संपूर्ण जगाला एका छत्राखाली आणण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या कम्युनिस्ट पक्षाची भारतात ही दुर्दशा व्हावी हे सकृद्दर्शनी आश्चर्यजनक वाटते, परंतु ते स्वाभाविकच आहे. भारतात सर्वच तत्त्वज्ञानांना नेहमीच पूर्ण वाव राहिला आहे. केवळ एक तत्त्वज्ञान म्हणून कम्युनिझम भारतात राहिला असता तर गोष्ट वेगळी होती. परंतु जिथे या पक्षाची स्थापनाच मुळी जागतिक कम्युनिस्ट पक्षाची भारतातील शाखा (कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया) या नात्याने झाली व प्रारंभापासून रशियाच्या परराष्ट्रीय धोरणाला अनुकूल अशी धोरणे पत्करणे पक्षाच्या नशिबी आले. भारतातील कम्युनिस्ट पुढाऱ्यांना स्थानीय परिस्थितीच्या प्रकाशात पक्षाचे ध्येय-धोरण ठरविण्याची मोकळीक असती तर अशी दुर्दशा इतक्या लवकर झाली नसती. कारण पक्षाजवळ समर्थ नेतृत्व व समर्पित कार्यकर्ते होते. परंतु रशियनधार्जिणेपणामुळे ते स्वतंत्रपणे आपली धोरणे ठरवू शकले नाहीत.

दीनदयाळजींनी सार्वजनिक जीवनाला प्रारंभ केला, त्या वेळी जागतिक पातळीवर कम्युनिझमची चढती कमान होती. दुसऱ्या महायुद्धात विजयी झालेल्या राष्ट्रांत रशियाही एक होता. आणि त्यानंतरच्या रचनेत पूर्व युरोपातील सर्व देश 'रशियन बायोनेटच्या' प्रभावाखाली आले होते. या सर्व देशांत रशियन टँक्सच्या सहाय्याने कम्युनिस्ट सरकारे स्थापन झाली होती. त्यानंतर लागलीच जगातील सर्वांत अधिक लोकसंस्थेचा चीन कम्युनिस्ट शासनाखाली आला होता. महायुद्धानंतरच्या काळातील तिसऱ्या जगातील, परतंत्र देशांच्या स्वातंत्र्यलढ्यांना रशियाचे समर्थन प्राप्त होत होते व त्यामुळे तेथील राष्ट्रवादी मंडळींची सहानुभूती रशियाकडे स्वाभाविकपणेच वळत होती. (पुढे युनायटेड स्टेट्सच्या अगदी निकट क्यूबामध्ये आपले राज्य स्थापन करण्यात कम्युनिस्टांना यश प्राप्त झाले.) जागतिक स्तरावरील रशियाच्या या नेत्रदीपक यशामुळे भारतातही कम्युनिस्ट पक्षाची प्रतिष्ठा त्या वेळी वाढली होती. परंतु स्टॅलिनच्या मृत्यूनंतर हळूहळू कम्युनिस्ट जगतात विघटनाला प्रारंभ झाला. पूर्व युरोपातील कम्युनिस्टशासित देशांत झालेले शेतकरी-कामकऱ्यांचे विद्रोह रशियन टँक्सच्या सहाय्याने दडपून टाकण्यात आले

---

*परिशिष्ट क्र २७ पहा.

तरी या सर्व देशांत रशियाविरोधी असंतोष कायम राहिला व पुढे पोलंडमधील घटनांमुळे याची स्पष्ट प्रचितीही आली. पश्चिम युरोपातील कम्युनिस्ट पक्षांनी मार्क्सवादाच्या मूळ सिद्धांतांपासून क्रमशः फारकत घ्यायला सुरुवात केली व रशियन वर्चस्व झुगारून देण्याचा निश्चय जाहीर केला. एककेंद्रित कम्युनिस्ट जगताचे स्वप्न भंग पावले. चीनच्या 'माओ 'ने व युगोस्लाव्हियाच्या 'टीटो' ने रशियाविरुद्ध उघड भूमिका घेतली. कम्युनिस्ट-शासित जगाबाहेरील सर्वांत मोठी कम्युनिस्ट पार्टी अिटालीमध्ये होती. तिचे पुढारी Gramsci व Togliatti यांनी अिटालियन पार्टीच्या स्वायततेची घोषणा केली व हेच वारे पश्चिम युरोपातील सर्व कम्युनिस्ट पार्टींमध्ये शिरले. यालाच 'Euro—Communism' हे नामाभिधान प्राप्त झाले. कोणत्याही कम्युनिस्टशासित देशात मार्क्सवादाची अंमलबजावणी होऊ शकली नाही. त्यामुळे एकप्रकारे भ्रमनिरास होऊ लागला. अिटालियन कम्युनिस्ट पार्टीचे प्रमुख Enrice Berlinguer व स्पॅनिश कम्युनिस्ट पार्टीचे Carillo यांची अलीकडील वक्तव्ये अशा भ्रमनिरासाची साक्ष देत आहेत; आणि आता तर चीनच्या कम्युनिस्ट पक्षाने मार्क्सवादाला जबरदस्त धक्काच दिला आहे. चीनच्या कम्युनिस्ट पार्टीच्या केंद्रिय समितीने आपल्या बाराव्या बैठकीत (पक्षाच्या तिसऱ्या Plenary सेशनमध्ये) दि. २०-१०-१९८४ या दिवशी एकमताने एक डाक्युमेन्ट स्वीकृत केला. या डॉक्युमेन्टचे नाव होते A decision of the Central Committee of the Communist Party of China on Reform of the economic structure'. यातील निर्णय म्हणजे मार्क्सवादापासून उघडउघड पथभ्रष्टताच म्हटली पाहिजे. मार्क्सवादाला हळूहळू रामराम ठोकण्याचा विचार चिनी कम्युनिस्ट पुढाऱ्यांच्या मनात आहे की काय अशी शंका या डॉक्युमेन्टमुळे सर्वत्र निर्माण झाली. त्यातच दि. ७-१२-१९८४ रोजी चिनी कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र असलेल्या 'People's Daily' ने सर्व जगाला आश्चर्याचा धक्काच दिला. त्याच्या संपादकीयातील काही भाग वानगीदाखल पाहिला तरी संपूर्ण संपादकीयाच्या आशयाची यातून कल्पना येईल –

" Marx died 101 years ago, and his works were written more than a century ago." " Some of these works were simply conjecture at that time, and later underwent tremendous changes. Some of the conjectures were not necessarily allright. There were many things that Marx and Engels even Lenin, never experienced or had any contact with. We cannot expect the works of Marx and Lenin, at that time, to solve our modern-day problems, that is something we have to bear in the mind during our study." ..... 'Using certain assertions of Marxism to impose restrictions on the reality of modern line will only block the development of history" .....

["मार्क्सचा मृत्यू १०१ वर्षांपूर्वी झाला आणि त्याचे ग्रंथ त्याने एक शतकाहून अधिक काळापूर्वी लिहिले." "या ग्रंथांपैकी काही त्या वेळी केवळ अनुमानाच्या स्वरूपाचे होते आणि नंतर त्यात खूपच परिवर्तन घडून आले. मार्क्सचे काही अंदाज

निश्चितच सदोष होते. मार्क्सने, एंजल्सने किंवा लेनिननेही ज्यांचा अनुभव घेतला नाही व ज्यांच्या संपर्कात ते कधी आलेच नाहीत अशा अनेक गोष्टी होत्या. त्या वेळी त्यांनी जे काही लिहिले त्यात आपल्या आधुनिक समस्यांची उत्तरे असतील, ही अपेक्षाच करता येत नाही. आपल्या अभ्यासात ही वस्तुस्थिती आपण सदैव ध्यानात ठेवली पाहिजे."

" आधुनिक संदर्भांतील विचारावर मार्क्सच्या काही विधानांच्या आधारे मर्यादा घालण्याचा प्रयत्न केल्यास त्यामुळे इतिहासाचा विकास मात्र अवरुद्ध होईल."]

मार्क्सवादापासून घटस्फोट घेण्याची तयारी चिनी कम्युनिस्ट पार्टी करीत आहे, हे यावरून स्पष्ट होते. परंतु दीनदयाळजींनी आपल्या पक्षाची बांधणी करण्याला प्रारंभ केला त्या वेळी कम्युनिझमचा झगझगाट इतका मोठा होता की, पंडितजींचा नवीन पक्ष वैचारिक स्पर्धेत कसा काय टिकू शकेल असा संदेह अनेकांच्या मनात होता. काळाने हे दाखवून दिले आहे की, त्या परिस्थितीतही अविचल मनाने आपल्या भारतीय दर्शनावर स्थिर राहिलेल्या दीनदयाळजींनी वामपंथी विचारसरणींच्या पराभवाचे जे भविष्य वर्तविले होते ते प्रत्यक्षात उतरत आहे.

महाराष्ट्रातील एक श्रेष्ठ समाजवादी विचारवंत व मार्क्सवादाचे अधिकारी भाष्यकार श्री पां. वा. गाडगीळ यांनी आपल्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या ' वर्गकलह की सांसदीय समाजवाद ' या ग्रंथात कार्ल मार्क्स व जे. एम्. कीन्स या दोन्ही थोर पण परस्पर-भिन्न विचारसरणींच्या पुरस्कर्त्यांच्या शिकवणुकीच्या आधाराने साम्यवादी मंडळींना आपापल्या धोपटमार्गी विचारपद्धतीविषयी पुनर्विचार करण्याचे आवाहन केले आहे, हे समयोचितच आहे; मानसिक धैर्य दाखविल्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. परंतु असे श्रेष्ठ विचारकही त्या प्रारंभीच्या काळात वामपंथीयांच्या राजकीय यशामुळे दिपून गेले होते हे ध्यानात घेण्यासारखे आहे.

हिंदुस्थानात काही काळ लोकप्रिय झालेल्या समाजवाद–कम्युनिझम यांच्या व्यतिरिक्त इकडे फारशा प्रचलित न झालेल्या इतरही वामपंथी विचारधारांचा पंडितजींनी बारकाईने अभ्यास केला होता. 'Marx and Deendayal ' या प्रबंधात म्हटले गेले आहे त्याप्रमाणे ' It must, however, be noted that Deendayalji was well conversant with all the thought-currents of West including the recently evolved New left of Sartre and Herbert Marcuse.

Apart from Marxism, (and different versions of revisionists – from Edward Berstein to Tito) he was very well acquainted with the direct or indirect social experiments of Robert Owen, Fourier and Cabet; theories of Saint Simon; socialist militancy of Gracchus Babeuf; agrarian socialism of O' Connor; proletarian socialism of O' Brien; ' minority conscience ' theory of Blanqui ; evolutionary socialism of Louis Blanc;

the ' self-help ' doctrine of Schulze-Delitzsch ; and ' true socialism ' of the German trio, Bruno Bauer, Moses Hess. and Karl Grun. He had also studied Lassalle, Sismondi, Lamennais and Proudhon. He had critically analysed all the pre and post Marxian European thought-systems ranging from capitalism to anarchism and including all the varieties of Socialism."

[" सार्त्र आणि हर्बर्ट मार्क्यूज यांच्या अलीकडेच मांडल्या गेलेल्या ' न्यू लेफ्ट ' विचारांसह साऱ्या पाश्चात्य विचार प्रवाहांशी दीनदयाळजी उत्तम प्रकारे परिचित होते, हे विशेषत्वाने लक्षात घेणे आवश्यक आहे.

मार्क्सवादाव्यतिरिक्त (एडवर्ड बर्स टीन ते टिटोपर्यंत सारे फेरविचारवादी धरून) रॉबर्ट ओवेनचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सामाजिक प्रयोग, सिमॉनचे सिद्धांत, ग्रॅक्कस बाक्फचा (Gracchus Babchf) आक्रमक समाजेवाद, ओ कॉनेरचा कृषि समाजवाद, ओ क्रियेवचा गरीबांचा समाजवाद, ब्लांकीचा 'अल्पसंख्यांच्या विवेक-बुद्धी 'चा सिद्धांत, लुई ब्लांकचा उत्क्रांतीपर समाजवाद, शुल्झ - डेलिट्झेकचा ' स्वावलंबी ' सिद्धांत आणि ब्रुनी ब्रॉअर, मोझेस हेस आणि कार्ल ग्रन या जर्मन त्रिकुटाचा ' खरा समाजवाद ' या सर्व विचारांची चांगली माहिती पं. दीनदयाळ-जींना होती ... त्यांनी ल्लासेले, सिसमोंडी, लॅमेनाइझ आणि प्रौढन यांचाही अभ्यास केलेला होता. मार्क्सपूर्वीच्या आणि नंतरच्या सर्व युरोपीय विचारधारांचे गुणदोषात्मक विश्लेषण त्यांनी केले होते. यात भांडवलवादापासून अराज्यवादापर्यंत सर्वांचा आणि ' समाजवादा 'च्या सर्व प्रकारांचा समावेश होता."]

त्या व्यतिरिक्त डॉ. फ्रॉइड यांचा मनोविश्लेषकवाद, डॉ. वॉटसन यांचा वर्तनवाद व या दोहोंना पुढे फुटलेल्या शाखा या सर्वांचीही त्यांना पूर्ण माहिती होती.

पंडितजींच्या राजकारण प्रवेशापूर्वी – पाश्चिमात्य विचारप्रवाहांपासून मुक्त व भिन्न असा विचारप्रवाह हिंदुदर्शनाच्या आधारावर महात्माजींनी प्रस्तुत केला, ते म्हणाले –

" Socialism and Communism of the West are based on certain conceptions wich are fundamentally different from ours, One such conception is their belief in essential selfishness of human nature. I do not subscribe to it for I know that the essential difference between man and the brute is that the former can respond to the call of the spirit in him, can rise superior to the passions that he owns in common with the brute, and therefore, superior to selfishness and violence, which belong to the brute nature and not to the immortal spirit of man. That is the fundamental conception of Hinduism, which has years of penance of austerity at the back of discovery of this truth."

[" आमच्यापेक्षा मूलतःच भिन्न भिन्न अशा धारणांच्या आधारावर पाश्चा-

त्यांच्या समाजवादाची आणि साम्यवादाची उभारणी झाली आहे. मानवी स्वभावाचा अंगभूत स्वार्थीपणा ही त्यांपैकी एक धारणा आहे. मला ती मान्य नाही. कारण माणूस व पशू यांतील महत्त्वाचा फरकच मुळी हा आहे की माणूस आपल्यातील आत्मतत्त्वाच्या हाकेला ओ देतो. तो आणि पशु यांच्यात जे समान विकार असतात त्यांवर तो मात करू शकतो. स्वार्थ आणि हिंसा हे गुण पशु-स्वभावाचे असतात. माणसाच्या अमर आत्मतत्त्वाला ते लागू पडत नाहीत. म्हणून माणूस त्यांच्या वर उठू शकतो. ही सगळी जाण मला आहे. आत्मसंयमपूर्वक केलेल्या प्रदीर्घ तपाची पार्श्वभूमी हिंदूधर्माने लावलेल्या सत्याच्या शोधामागे आहे. ती हिंदूंची मूलभूत धारणा आहे."]

वरिल दोन विचारधारांविषयी गांधीजींनी जो अभिप्राय व्यक्त केला तो पश्चिमेच्या सर्वच वामपंथी विचारधारांना लागू पडतो. भारतीयांनी 'इझम' ला कधीही महत्त्व दिले नव्हते. प्रत्येक 'इझम' म्हणजे विचारांचे बंद पुस्तक. गांधीजींच्या परंपरेतील आचार्य कृपलानी आपल्या ·· ···· 'The Gandhian Way : या पुस्तकात म्हणतात की, ...

"···all isms come into existence, not at the initiative of those in whose names they are preached and promulgated, but as the result of limitations imposed upon the original ideas by the followers. Lacking the creative genius, the followers systematise and organise. In so doing they make the original doctrines rigid, inelastic, one-sided and fanatical, depriving them of their original freshness and flexibility, which are the signs of youth."

[···"ज्यांच्या नावाने एखादा वाद सांगितला जातो किंवा त्याचा प्रचार होतो, तो त्या लोकांच्या पुढाकाराने मात्र नव्हे तर त्या माणसाच्या अनुयायांनी मूळ विचारांवर घातलेल्या मर्यादांचा तो परिणाम असतो. नवनिर्माणक्षम प्रज्ञा नसल्यामुळे अनुयायी एक पद्धत ठरवितात व संघटित होतात. असे करताना मूळ तत्त्वांना ते साचेबंद लवचिकपणाचा अभाव असलेले, कडवे, एकांगी स्वरूप देतात. यौवनाचे निदर्शक असलेला ताजेपणा व जुळवून घेण्याची शक्ती हे त्यातील मूळचे गुण हिरावून घेतात."]

परंतु गांधीजींच्या शिष्यांनी त्यांच्या विचारपद्धतीचाच एक 'इझम' करून* टाकला. वास्तविक गांधीजी म्हणत की, "वाद म्हणजे विवाद", विवाद म्हणजे विखवाद (विघटन), त्यामुळे माझी अशी इच्छा आहे की, 'गांधीवाद' ही संज्ञा प्रचलित होऊ नये. दिनांक २० फेब्रुवारी १९४० या दिवशी ढाक्याच्या मलिकंदा भागात गांधी सेवा-संघाच्या अखिल भारतीय अधिवेशनाला संबोधित करताना गांधीजींनी हाच विचार

---

* परिशिष्ट क्र. २८ पहा.

आग्रहपूर्वक मांडला होता. परंतु त्यांच्या अनुयायांनी याच शब्दाचा योजनापूर्वक उपयोग करून घेतला.

पहिल्या निवडणुकीच्या वेळी व त्यानंतर आजपर्यंतही गांधीवाद या शब्दाच्या जादूचा भरपूर उपयोग काँग्रेसने करून घेतला. गांधीजींच्या हौतात्म्यामुळे या संज्ञेला अधिकच पावित्र्य व आकर्षण प्राप्त झाले होते.

गांधीजींच्या प्रेरणेने काम करणाऱ्या मंडळींचे दोन वर्ग होते. एक राजकारणी लोकांचा व दुसरा रचनात्मक कार्य करणाऱ्यांचा. पहिल्या वर्गातील मंडळींनी गांधीजी जिवंत असताना त्यांच्या इच्छेविरुद्ध देशविभाजनाचा निर्णय त्यांनी घेतला व आपल्या मृत्यूच्या-पूर्वी एक दिवस काँग्रेस बरखास्त करून लोकसेवक संघ निर्माण करण्याचा त्यांनी दिलेला सल्ला या वर्गातील मंडळींनी धुडकावून लावला. तथापि त्यांनी केलेली महात्माजींची ही अवज्ञा जनतेने विशेष मनावर घेतली नाही.

. . . . (मुस्लिम-अनुनयाव्यतिरिक्तही, 'हिमालयन ब्लंडर', भगतसिंह – राजगुरू – सुखदेव यांच्या फाशीविषयीची भूमिका, काँग्रेसशी अधूनमधून झालेले गांधीजींचे मतभेद, खरे-नरीमन-सुभाष-प्रकरणे व देशविभाजनाच्या प्रश्नांवरील नेतृत्वाची कोलांटीउडी, – या सर्व घटना विसरायला जनता तयार झाली होती.)

वास्तविक स्वराज्यप्राप्ती हे अनेक व्यक्तींच्या व व्यक्तिसमूहांच्या प्रयत्नांचे संकलित फळ आहे. प्रत्यक्ष काँग्रेसच्या स्थापनेची पार्श्वभूमी जनमनात तयार होण्याकरिता कितीतरी व्यक्तींचे व संस्थांचे परिश्रम कारण झाले. 'दि ब्रिटिश इंडियन ॲसोसिएशन इन बेंगाल' (१८५१) चे डॉ. राजेंद्रलाल मित्र व रामगोपाल घोष; 'बॉंबे ॲसोसिएशन 'चे दादाभाई नवरोजी, जगन्नाथ शंकर शेठ, मंगलदास नाथूभाई व नवरोजी फरदूनजी; 'ईस्ट इंडिया ॲसोसिएशन'; 'The Hndu' चे एम्. वीरराघवाचारियर, रंगय्या नायडू, जी. सुब्रह्मण्य अय्यर व एन्. सुब्बाराव पंतलू; 'पूना सार्वजनिक सभे 'चे सार्वजनिक काका, के. एल्. नूलकर व एस्. एच्. चिपळूणकर; 'सोशल कॉन्फरन्स 'चे न्या. म. गो. रानडे; 'इंडियन ॲसोसिएशन 'चे सुरेन्द्रनाथ बॅनर्जी व आनंदमोहन बोस; 'मद्रास महाजन सभा', 'बॉंबे प्रेसिडेन्सी ॲसोसिएशन 'चे फिरोजशहा मेहता, का. त्यं. तेलग व बद्रुद्दीन तय्यबजी; तसेच मद्रास येथील डॉ. ॲनी बेझंट यांच्या 'थिऑसॉफिकल कन्व्हेन्शन 'चे सतरा कार्यकर्ते – हे सर्व वस्तुतः काँग्रेसचे अग्रदूत होते; परंतु त्यांची स्मृती पुसली जावी असाच प्रयत्न सध्याच्या नेतृत्वाचा आहे. तसेच ब्राह्मोसमाज, आर्यसमाज, प्रार्थनासमाज, थिऑसॉफिकल सोसायटी, रामकृष्ण मिशन आदी संस्थांचे या बाबतीतील कार्यही आजच्या पिढीच्या ध्यानात नाही.

तसेच लिबरल पुढारी, देशातील क्रांतिकारक मंडळी, प्रथम महायुद्धाच्या वेळी विदेशात प्रयत्नशील असलेले क्रांतिकारक, आझाद हिंद सेना, विद्रोही नाविक, अन्य राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, सप्रू-जयकरांसारखे मध्यस्थ, प्रवासी भारतीयांची अमोल सेवा

करणारे सी. एफ्. अँड्रूजसारखे लोक, व खुद्द इंग्लंडमधील भारताविषयी सहानुभूतिपूर्वक प्रचार करणारी मंडळी हे सर्वच वस्तुतः या श्रेयात भागीदार आहेत. परंतु काँग्रेसबाहेरील सर्वच सक्रिय कार्यकर्त्यांना विस्मृतीच्या गर्तेत लोटण्याचें प्रयत्न झाले. काही क्रांतिकारकांचे योगदानच इतके तेजस्वी होते की, त्यांचे बाबतीत असे प्रयत्न सफल झाले नाहीत. परंतु इतर मंडळींची ही स्थिती नव्हती. उदाहरणार्थ. इंग्लंडमध्ये भारताच्या स्वातंत्र्याकरिता प्रचार व प्रयत्न करणाऱ्या आपल्या मित्रांचीं नावे कितीजणांना आज आठवतात ? गाय आल्फ्रेड, जॉर्ज डेव्हिड यूल, आल्फ्रेड वेब, सर विलीयम वेडरबर्न, सर हेन्री जे. एस्. कॉटन, चार्लस ब्रॅडलॉ, विलियम स्पोर्टसन केन, सर विलियम डिग्बी, डॉ. एच्. व्ही. रथरफोर्ड, डॉ. जी. बी. क्लार्क, जे. के. हार्डी, लॉर्ड सोरेन्सेन, लॉर्ड फेभर ब्रॉकवे ही मंडळी या श्रेणीत येतात. सत्ताधाऱ्यांच्या अशा वृत्तीमुळे स्वातंत्र्यसंग्रामाचा अधिकृत इतिहास अपूर्ण, विकृत व असंतुलित झाला आहे.

उलटपक्षी एकटचा काँग्रेसनेच स्वपराक्रमाने हे स्वराज्य आणले आहे, या प्रचारामुळे काँग्रेसची प्रतिमा जनमानसात प्रकर्षाने उज्ज्वल होती. आणि त्यातच महात्माजींच्या हौतात्म्याने व गांधीवाद या संज्ञेच्या प्रभावाने विषेष भर टाकली होती. कालांतराने जरी हे सिद्ध झाले की, ही राजकारणी मंडळी व्यवहारात गांधीजींच्या आदर्शापासून अधिकाधिक दूर जात आहेत तरी दीनदयाळजींनी जनसंघाचीं सूत्रे हातीं घेतली त्या वेळी जनतेचा भ्रमनिरास व्हायला प्रारंभही झाला नव्हता. उलटपक्षी जनतेचा विश्वास संपादन केलेले पटेल, नेहरू, राजेन्द्रबाबू, राजाजी, तसेच प्रत्येक प्रांतातील काँग्रेसचे क्षत्रप यांच्यामुळे काँग्रेस सर्वच प्रांतांत अजिंक्य झालेली दिसत होती. लोकप्रिय पुढाऱ्यांचा इतका मोठा व व्यापक संच दुसऱ्या कोणत्याही पक्षाजवळ नव्हता. शिवाय कुशल प्रशासक या नात्याने सर विश्वेश्वरय्या, सी. पी. रामस्वामी अय्यर, टी. माधवराव, किंवा मिर्झा इस्माईल यांच्या तोडीचे नसले तरी त्यांची आठवण ठेवणारे काहीं थोडे मंत्रीही त्या वेळीं काँग्रेस पक्षात होते. प्रत्यक्ष राजकारणात गुंतलेल्या पुढाऱ्यांबरोबरच जनमानसावर विशेष प्रभाव असणारी मंडळी म्हणजे रचनात्मक कार्यकर्ते* व राजकारणी लोक यांमधील द्वैत तोपर्यंत प्रकट झाले नव्हते. आचार्य विनोबा भावे यांच्या नेतृत्वाखाली हे सर्व लोक एकत्र होते व त्यांच्या पुण्याचा लाभही काँग्रेसलाच मिळत होता. अलीकडील काळात सरकारी पैशामुळे व आश्रयामुळे या कार्यकर्त्यांचा कस कमी झाला आहे व त्यांची प्रतिमाही पूर्वीइतकी उजळ राहिलेली नाही, हे खरे आहे.** श्री. गुलझारीलाल नंदा यांच्या भारत सेवक समाजाप्रमाणेच गांधीपंथीय रचनात्मक कार्यकर्त्यांचे जनमानसात अवमूल्यन झाले आहे.*** परंतु स्वराज्यप्राप्तीनंतरच्या काळात लोकांच्या मनात या कार्यकर्त्यांचे साहचर्य, भूदान व तत्सम अन्य

---

* परिशिष्ट क्र. २९ पहा.

** परिशिष्ट क्र. ३० पहा.

*** परिशिष्ट क्र. ३१ पहा.

चळवळींशी होते. आणीबाणीच्या काळातील यांपैकी काही मंडळींच्या लाचारीच्या भूमिकेची कल्पनाही करणे त्या वेळी शक्य नव्हते. गांधीजींनी उभा केलेला एकेक विधायक कार्यकर्ता जनतेला दीपस्तंभाप्रमाणे वाटत होता व अशा कार्यकर्त्यांची संख्याही मोठी होती. दादा धर्माधिकारी, काका कालेलकर, अप्पासाहेब पटवर्धन, झाकीर हुसेन, वियोगी हरी, जे. सी. व भारत कुमारप्पा, स. ज. भागवत, आचार्य भिसे, रविशंकर महाराज, साने गुरुजी, आचार्य जावडेकर, टी. एस्. अविनाशीलिंगम्, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, गोप बंधू चौधरी, नवकृष्ण चौधरी, आर्यनायकम् दांपत्य, ठक्करबाप्पा, बाबा राघवदास, मीराबेन, सरलाबेन, प्रेमा कंटक, सुशीला पै, बी बी अम्तुस्सलाम (Amtussalam), अमलप्रभा दास, बाळूभाई मेहता, चबलभाई मेहता, जी. रामचंद्रन्, केलप्पन आदी मंडळींच्या निःस्वार्थी कार्याचा किती प्रभाव जनतेवर होता ह्याची कल्पना नवीन पिढीला यावयाची नाही. या सर्वांचे पुण्य त्या वेळी काँग्रेसच्याच हिशोबात जमा होत होते.

अशा प्रकारचे व्यक्तित्वशाली कार्यकर्ते नवीन पक्षाजवळ असणे शक्यच नव्हते. अशा कार्यकर्त्यांची मालिका निर्माण करण्याच्या कठीण कार्याला प्रारंभ करावयाचा होता. जनसंघ पक्षाच्या प्रारंभिक काळात ही उणीव काँग्रेसच्या तुलनेने सर्वच विरोधी पक्षांना जाणवण्यासारखी होती. परंतु त्यांतील काही चतुर पक्षांनी गांधीजी व गांधीवाद या शब्दांवर आपला वारसाहक्क दाखवून ही उणीव भरून काढण्याचा प्रयत्न केला. त्यांपैकी बहुतेक काँग्रेसमधूनच फुटलेले असल्यामुळे या प्रयत्नात त्यांना आंशिक यशही प्राप्त झाले. जनसंघाच्या बाबतीत तशी शक्यता नव्हती व गांधीवाद हे चलनी नाणे असले तरी त्याचा स्वीकार न करण्याचा निर्णय पंडितजींनी घेतला. एकतर स्वतः महात्माजींनी म्हटल्याप्रमाणे गांधीवाद हा शब्द त्यांना चुकीचा वाटत होता. तसेच पाहिले तर गांधीजींच्या विचारपद्धतीशी त्यांचा मतभेद नव्हता. परंतु 'वाद' या संज्ञेमुळे गांधीप्रणीत विचारांचे प्रवाहित्व कुंठित होते, तसे करणे योग्य होणार नाही, असे पंडितजींना वाटत होते. गांधीजींना स्वतःला हिंदू व सनातनधर्मी म्हणवून घेण्यात धन्यता वाटत होती. सनातन धर्माच्या शाश्वत सिद्धांतांच्या प्रकाशात आधुनिक समस्यांची उकल करण्याचा गांधीजींचा प्रयत्न म्हणजेच तथाकथित गांधीवाद होय. त्यामुळे गांधीजींशी मूलभूत मतभेद निर्माण होण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता. परंतु त्यांच्या विचारपद्धतीला 'इझम'च्या चौकटीत बसविल्यामुळे भविष्यकाळातील त्याची उपयुक्तता समाप्त होईल असे पंडितजींना वाटे. 'इझम'च्या चौकटीत बंद न झालेला, सनातन धर्मावर आधारित, गांधीजींचा विचारप्रवाह मध्यंच कुंठित न करता, नवनवीन परिस्थितीतील नवनवीन समस्यांची नवनवीन उत्तरे शोधण्याला समर्थ अशा गतिशील विचार-पद्धतीत त्याचा विकास करावा असा पंडितजींचा मानस होता. समाजरचना धर्मानुकूल असावी व धर्म युगानुकूल असावा* याकरिता हे आवश्यकच होते. त्यामुळे त्यांनी गांधीवादाचा स्वीकार करण्याचा सोपा मार्ग सोडून,

---

* परिशिष्ट क्र. ३२ पहा.

गांधीजींच्याच प्रमाणे सनातन सिद्धांतांच्या प्रकाशात नवीन युगधर्म विकसित करण्याचा महान् उद्योग हाती घेतला.

१६ 'धर्म'* कल्पना समजून घेणे, पाश्चिमात्यांना कठीण आहे, हे खरे आहे. श्री. C.E.M. Joad म्हणतात, " This distinctively Hindu conception (i.e. Dharma) does not admit of summary description." [" ही जी खास हिंदू कल्पना (धर्माची) आहे, तिचे एका झटक्यात वर्णन करता येण्यासारखे नाही.]

जस्टिस श्री. राम जोईस म्हणतात, " Dharma is a Sanskrit expression of the widest import. There is no corresponding word in any other language. It would also be futile to attempt to give any definition to that word. It can only be explained. "

[" धर्म हा अतिशय व्यापक आशय असलेला संस्कृत शब्द आहे. या शब्दाला समानार्थी असा शब्द इतर कोणत्याही भाषेत नाही. त्या शब्दाची एखादी व्याख्या करण्याचा प्रयत्न देखील व्यर्थ होय. त्याचे केवळ स्पष्टीकरण करता येईल. "]

सिस्टर निवेदिता म्हणतात, " Hinduism is a fragment in a vast social-industrial - economic scheme called Dharma. A man may well and rightly be the servant of Dharma even without calling himself a Hindu. "

[" धर्म नामक अत्यंत विशाल सामाजिक – औद्योगिक – आर्थिक योजनेतील हिंदुत्व हा एक भाग आहे. स्वतःला हिंदू न म्हणविताही एखादा मनुष्य सार्थपणे स्वतःला धर्माचा सेवक म्हणवून घेऊ शकेल. "]

या पार्श्वभूमीवर हिंदूंना तरी सनातनधर्म ही कल्पना समजून घेण्याला अडचण नसावी. तथापि पाश्चिमात्य भौतिक प्रगतीच्या झगमगाटामुळे दिपून गेलेल्या आंग्लविद्या-विभूषित मंडळींच्या बाबतीत आमच्या सनातनधर्माच्या साक्षात्कारावर- आधारलेला कोणताही सिद्धांत बुरसटलेला व प्रतिगामी आहे, असे हिणविण्याची फॅशनच पडून गेली. आहे.* अशा फॅशनेबल व स्वस्त पुरोगामी पुढारी मंडळींना आश्चर्याचे धक्के देणारे पुढील साहित्य दीनदयाळजींच्या जीवनकालात भारतात लोकप्रिय झाले नव्हते.

Fritjof Capra यांचे ' The Tao of Physics ' व ' The Turning Point ';

---

* परिशिष्ट क्र. ३३ पहा.

* परिशिष्ट क्र. ३४ पहा.

Gary Zukav यांचे ' The Dancing Wu Li Masters '; Bob Taben यांचे ' Time, Space and Beyond '; Paul Davies यांचे ' God and the New Physics '; Fred Wolf यांचे ' Taking the Quantum Leep '; David Bohm यांचे ' Wholeness and the Implicate Order व Quantum Mechanics '; Dr. Larry Dossey यांचे ' Space, Time and Medicine '; Arthur Young यांचे ' The Reflexive Universe'; Izak Bentov यांचे ' The Stalking the Wild Pendulum '; Pamela Portugal यांचे ' A Place for Human Beings', त्याच-प्रमाणे श्री. एलन वॉन यांचे ' Incredible Coincidences '; श्री. कोस्लर यांचे ' The Roots of Coincidences '; श्री. Richard Bouk यांचे ' Nothing by Chance ', – हे सर्व साहित्य अलीकडेच प्रसारित झाले आहे. त्यामुळे पंडितजींच्या काळात अध्ययनविहिन पुरोगामित्वाची अधिक चलती होती.

महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांनी एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे, "खरे पाहता हजारो वर्षे अनुभवाच्या चाळणीतून चाळून निघालेले आमचे ऋषिप्रणित सिद्धांत नुकत्याच उदयास आलेल्या आणि त्या वेळी तरी यशस्वीही झालेल्या भौतिक शास्त्रांपुढे दिपून जाऊन आम्ही एकाएकी सोडावयास नको होते. काही घटनाच अशा असतात की, त्यांचे बरेवाईट परिणाम पुष्कळ काळ लोटल्यावर अनुभवास येऊ लागतात. म्हणून तात्कालिक परिणामांवरच सर्व मदार ठेवणे धोक्याचे असते. मानवी जीवन अत्यंत गुंतागुंतीचे असून लहानमोठ्या स्थूल, सूक्ष्म अनेक कारणपरंपरा त्यांतील कार्यांशी निगडित असतात. वरवर पाहून किंवा विचार करून बांधलेली अनुमाने पुष्कळदा फसवी ठरतात. अधिक काळ, अधिक अनुभव आणि अधिक विचार यांची जोड मिळाली म्हणजे पूर्वीची कच्ची अनुमाने टाकून द्यावी लागतात आणि अधिक पक्की वाटणारी अनुमाने स्वीकारावी लागतात. आम्ही आमच्या प्राचीन वैचारिक संपत्तीची सूक्ष्म आणि टिकाऊ परीक्षा केली असे निश्चयपूर्वक म्हणता येणार नाही. कारण आमच्या संस्कृतीसंबंधी पुढे अधिक परिचय आणि ज्ञान प्राप्त होताच प्रत्यक्ष पाश्चिमात्यांनीच प्रशंसोद्गार काढून आमचे वैभव आम्हास पुनः दाखविले."

हे सर्व असूनही आपली परधार्जिणी लाचारीची वृत्ती मुळीच न सोडण्याचा आमच्या आंग्लाळलेल्या पंडितांचा निर्धार त्यांच्या निश्चयी वृत्तीचाच परिपाक मानला पाहिजे. आणि दुर्दैवाने अशा पश्चिमेच्या मानसपुत्रांनाच 'प्रगमनशील' progressive, redical वगैरे मानण्याची प्रथा त्या वेळी होती व आजही आहे.

परंतु हे फार काळ चालणे शक्य नव्हते. उदाहरणार्थ, Autumn 1984 च्या The American Riview च्या अंकातील टी. एस्. अनंतु यांनी दिलेली माहिती या मंडळींना बेशुद्ध करील अशीच आहे. या स्वयंघोषित प्रगमनशील लोकांना म. गांधींचे अमेरिकन शिष्य Richard Gregg यांनी सन १९३६ मध्ये नामकरण केलेल्या ' Voluntary Simplicity Movement ' ची माहिती तरी आहे काय ? सन १९७६ पर्यंत या चळवळीची किती प्रगती झाली होती याविषयी Stanford Research Institute ने केलेल्या सर्वेक्षणाचे

प्रतिवृत्त वाचनीय आहे. Marilyn Ferguson आपल्या 'The Aquarian Conspiracy' या पुस्तकाचा प्रारंभ करताना म्हणतात, " A leaderless but powerful network is working to bring about redical change in the United States. Its members have broken with certain key elements of Western thought, and they may even have broken continuity with history .... Broader than reform, deeper than revolution, this benign conspiracy for a new human agenda has triggered the most rapid cultural realignment in history. The great shuddering, irrevocable shift overtaking us is not a new, political, religious or philosophical system. It is a new mind – the ascendence of a startling world view that gathers into its framework break-through science and insights from earliest recorded thought. "

["एक नेतृत्वहीन पण जबरदस्त संघटना अमेरिकेत क्रांतिकारक परिवर्तन घडवून आणण्याच्या प्रयत्नात आहे. तिच्या सदस्यांनी पाश्चात्य विचारातील काही मूलभूत गोष्टींचा त्याग केला आहे व त्यांनी इतिहासाचे सूत्र देखील सोडून दिले असावे..... सुधारणेपेक्षा विशाल, क्रांतीपेक्षा अधिक सखोल आणि मानवापुढे नवा कार्यक्रम ठेयण्यासाठी करण्यात येत असलेल्या या उपकारक कटाने इतिहासातील सर्वांत द्रुतगती सांस्कृतिक आघाडीच्या निर्मितीला जोराची चालना दिली आहे. हा जो हादरवून सोडणारा, अमोघ वदल आपल्याला झपाटचाने व्याप्त करीत आहे, त्याचे स्वरूप एखाद्या नव्या राजकीय, धार्मिक वा तात्त्विक व्यवस्थेचे नाही. हे एक नवे मन आहे – स्तिमित करून सोडणाऱ्या एका वैश्विक दृष्टीचा हा उदय आहे. विज्ञानाची नवी क्रांतिकारक झेप आणि तत्त्वद्रष्टचांचे लिखित स्वरूपातील विचार या दोहोंचाही समावेश होण्याएवढा त्याचा आवाका मोठा आहे. "]

हे 'startling' विश्वदर्शन एकात्मदर्शनाच्या दिशेने वाटचाल करणारे आहे, हे दाखविणारा तुलनात्मक तक्ता Duane Elgin यांनी प्रस्तुत केला आहे.

Voluntary Simplicity Movement च्या या वैचारिक विजयाला कारणीभूत ठरलेली सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे सायन्सच्या क्षेत्रात झालेली आधुनिक प्रगती.

सायन्सच्या उद्धत वृत्तीची पराकाष्ठा गेल्या शतकाच्या शेवटी व या शतकाच्या प्रारंभी दृष्टोत्पत्तीस आली. वास्तविक सायन्स म्हणजे ज्ञान (To seire To know). त्यामुळे विनम्रताच निर्माण व्हावी. मनुष्य म्हणजे केवळ काही Molecules चा समूह मात्र आहे,..... या molecules च्या दर्जावर त्याचे सुख, कर्तृत्व, स्वास्थ्य सर्व काही अवलंबून असते, असा सायन्सचा विचार आहे. त्यामुळे अिमर्सन, थोरो गांधी हे सर्व anti-scientific ठरले. भारतातील साधुसंतांच्या विश्वदर्शनाहून अगदी' भिन्न असे विश्वदर्शन आधुनिक सायन्सने प्रस्तुत केले. त्यामुळे हे सर्व संतमहात्मे कालबाह्य ठरविले गेले. परंतु पुढे सायन्सने काही नवीन theories विकसित केल्या. या शतकाच्या प्रथम चतुर्थकात Theoretical Physics ने दोन नवीन सिद्धांत दिले Relativity Theory व Quantum

Mechanics या दोन theories नी तोपर्यंतच्या सायन्सच्या विश्वदर्शनाला नवे आव्हान दिले व त्यानंतर सायन्समधून प्रकट होणारे विश्वदर्शन प्राचीन भारतीय विश्वदर्शनाच्या अधिकाधिक निकट येत आहे. विसाव्या शतकातील Physics च्या दोन प्रमुख प्रवक्त्यांची पुढील विधाने या दृष्टीने चिंतनीय आहेत.

श्री. Oppenheimer म्हणतात " The general notions about human understanding ·· which are illustrated by discoveries in atomic physics are not in the nature of things wholly unfamiliar, wholly unheard of, or new. Even in our own culture they have a history, and in Bddhist and Hindu thought, a more considerable and central place. What we shall find is an exemplification, an encouragememt, and a refinement of old wisdom." श्री. Niels Bohr म्हणतात, " For a paralled to the lesson of atomic theory ···· (we must turn) to those kinds of epistemological problems with which already thinkers like the Buddha and Lao Tsu have been confronted, when trying to harmonize our position as spectators and acters in the great drama of existence."

["आण्विक पदार्थविज्ञानातील संशोधनाने सोदाहरण स्पष्ट केलेल्या मानवी आकलनासंबंधीच्या काही कल्पना ह्या मूलतः पूर्णपणे अपरिचित, पूर्णतः नव्या वा पूर्वी कधीच न ऐकलेल्या अशा नाहीत. आपल्या (पाश्चात्य) संस्कृतीमध्येही त्यांना काही पूर्वपीठिका आहे. आणि बौद्धांच्या व हिंदूंच्या विचारात तर त्यांना खूप मोठे आणि मध्यवर्ती स्थान आहे. आपल्याला नव्या संशोधनात दिसते ते जुन्याच ज्ञानाचे प्रत्यक्ष विशदीकरण, त्याला उत्तेजन आणि त्याची अधिक ग्राह्य स्वरूपात मांडणी."

"आण्विक सिद्धांताच्या शोधाशी समांतर बोध शोधण्यासाठी आपल्याला त्या स्वरूपाच्या ज्ञानक्षेत्रातील (epistemological) प्रश्नांकडे वळावे लागेल की ज्यांना अस्तित्वाच्या या महान नाटचातील प्रेक्षक आणि नट या आपल्या भूमिकांचा समन्वय घालताना, बुद्ध आणि लाओत्सु यांच्यासारख्या विचारवंतांना यापूर्वीच तोंड द्यावे लागले आहे."]

मानवी स्वास्थ्याविषयींच्या प्राचीन भारतीय दृष्टिकोनाशी मिळताजुळता नवीन शास्त्रीय दृष्टिकोन विकसित करणारे Dr. Dossey, Dr. Elizabeth Kubler - Ross Dr. Michael Sabom, Dr. Raymond Moody व Dr. Kenneth Ring यांचे शास्त्रीय प्रयोग नवीन physics तसेच प्राचीन भारतीय कल्पनांशी सुसंगत ' morpho-genetic field ' ची Dr. Rupert Sheldrake यांची Biology मधील संकल्पना Karl Pribram व Dr. Robert Ornstein यांचे Brain Research मधील याच दिशेने जाणारे विचार; व Arthur Young यांचा उत्क्रांतिविषयक नवीन क्रांतिकारक सिद्धांत या सर्वांचा परामर्श घेऊन हा लेख म्हणतो, – " The following two quotes illustrate how this new view represents a confluence of modern American thinking with ancient Indian insights;

" So, approaching the question in different ways, relativity and quantum theory agree, in that they both imply the need to look on the world as an undivided whole, in which all parts of the Universe, including the observer and his instruments, merge and unite in one totality. In this totality, the atomistic form of insight is a simplification and an obstruction, valid only in some limited context ... "

In the very early phase of the development of civilization, man's views were essentially of wholeness rather than fragmentation. In the East (especially in India) such views still survive, in the sence that philosophy and religion emphasize wholeness and imply the futility of analysis of the world into parts. " David Bohm's ' Wholeness and the Implicate Order ! (Routledge and Kegan Paul, 1980)

Later Schroedinger would write, " What is Life ? " In an attempt to re-concide quantum physics and biology, in his two long essays, " My view of the World ", he revealed himself as a mystic much influenced by Eastern Views. In his first essay, which he wrote in 1925, before he created his equation, he stated :

> " This life of yours which you are living is not merely a piece of this entire existence, but is in a certain sense the ' whole ' ; only this whole is not so constituted that it can be surveyed in one single glance. This, as we know, is what the Brahmins express in that sacred, mystic formula which is yet really so simple and so clear, — ' Tat Tvam Asi ', ' this is you '. Or, again, in such words as " I am in the east and in the west, I am below and above, I am this whole world. "

Schroedinger was indeed prophetic, though his prophecy may have been a self-fulfilling one, since he created the mathematical means by which quantum physicists have come to view the world in this way.

I like to think of this statement. " I am this whole universe " as the initial postulate of quantum thinking. I think of it as the one mind seeing itself and accepting the paradoxes of its positions. That anything is at all, is reconciled with quantum jumps.

The position of wholeness taken by Schroedinger I call quantum solipsism. According to solipsism, the self is the only thing that can be known and verified. Nothing else is for sure. According to quantum solipsism, everything depend's on you. You create the whole universe; you are the ' universe '. Fred Alan Wolf. ' Taking the Quantum Leap ' (Harper and Row, 1981).

["पुढील दोन उतार्‍यांवरून स्पष्ट होईल की या नव्या दृष्टीत आधुनिक अमेरिकन विचार आणि प्राचीन भारतीय अंतर्दृष्टी यांचा कसा संगम झालेला आहे.

"तेव्हा निरनिराळ्या पद्धतींनी प्रश्नाचा विचार करणाऱ्या सापेक्षता आणि क्वान्टम सिद्धांताचा निष्कर्ष समान दिसतो. उभयतांच्या मते, जगताकडे एक अविभाज्य संपूर्ण घटक या नात्याने पहावयास हवे. या दृष्टीनुसार निरीक्षक वा त्याची उपकरणे यांच्यासह विश्वाची सारी अंगे एका समग्रतेत विलीन होऊन जातात. या समग्रतेत अणुसिद्धांताच्या (atomistic) स्वरूपाची अंतर्दृष्टी ही सुलभ व साररूप म्हणता येईल. पण केवळ काही मर्यादित संदर्भातच ती खरी ठरेल···

सभ्यतेच्या अगदी प्राथमिक अवस्थेत माणूस मूलतः तुकड्यातुकड्यांनी सृष्टीचा विचार न करता समग्रतेने विचार करीत असे. पूर्वेकडे (विशेषतः भारतात) हा समग्रतेचा विचार आजही जिवंत आहे. तो जिवंत या अर्थाने आहे की तिथे तत्त्वज्ञान आणि धर्म यांचा भर समग्रतेवर असून जगाचे भिन्न भिन्न तुकड्यांच्या स्वरूपात विश्लेषण करण्याची निरर्थकता त्यातून व्यक्त होते "– 'डेव्हिड बोहमाचे 'होलनेस अँड दि इम्प्लिकेट ऑर्डर' (रौटलेज आणि केगन पॉल १९८०)

नंतर स्क्रोएडिंजर – (Schroedinger) ने 'जीवन म्हणजे काय ?' या विषयावर लेखन केले. क्वान्टम फिजिक्स आणि जीवशास्त्र यांचा आपल्या दोन प्रदीर्घ प्रबंधांत मेळ घालण्याचा प्रयत्न त्याने केला. 'जगासंबंधीची माझी धारणा' या विषयावर लिहिताना त्याचे पौर्वात्य विचारांचा प्रभाव असलेले गूढवादी स्वरूप व्यक्त होते. विचारवंत आणि तत्त्वज्ञ या नात्याने प्रतिष्ठेचे स्थान लाभण्यापूर्वीच १९२५ साली त्याने लिहिले होते,

"तुम्ही जे जीवन जगता तो या संपूर्ण अस्तित्वाचा केवळ एक भाग आहे एवढे म्हणणे पुरेसे नाही. एका विशिष्ट अर्थाने तो अंशही 'संपूर्ण'च आहे. एकाच दृष्टिक्षेपात पाहता यावी अशी मात्र ती संपूर्णता नाही, हेच सत्य ब्राह्मण लोक 'तत्त्वमसि' या पवित्र व रहस्यमय सूत्राच्याद्वारे व्यक्त करतात. वास्तविक हे सूत्र किती सरळ आणि सुस्पष्ट आहे ! किंवा 'मी पूर्वेला आहे आणि पश्चिमेला आहे, मी वर आहे आणि खाली आहे. मी सगळे विश्व आहे' अशा शब्दांतही त्याच सत्याचा आविष्कार झाला आहे."

स्क्रोएडिंजर हा खरोखरच सत्यद्रष्टा होता. त्याचे हे द्रष्टेपण कदाचित् त्याच्याच उद्‌गारांची पूर्तता करणारे असेल. कारण क्वान्टम पदार्थविज्ञान-शास्त्रज्ञांना जगाकडे या दृष्टीने पाहाता येण्यासाठी गणिताचे साधन त्याने निर्माण करून दिले.

'मीच हे संपूर्ण विश्व आहे' हे विधान म्हणजे क्वान्टम विचारपद्धतीचे प्राथमिक आधारभूत प्रमेय आहे, असे मला वाटते. एकच मन स्वतःचे निरीक्षण करते, व आपल्या निरनिराळ्या अवस्थांतील विरोधाभासांचा स्वीकार करते, हा आशय

मी त्यात पाहातो. जे जे काही अस्तित्व आहे, त्याचा क्वान्टम झेपेशी समन्वय घातला जातो.

स्क्रोएडिंजरने संपूर्णत्वाची जी भूमिका स्वीकारली आहे तिला मी क्वान्टम सोलिप्सिझम असे म्हणतो. सोलिप्सिझम अनुसार आपण स्वत:हीच एक चीज आहे, की जिचे ज्ञान करून घेता येते व जी तपासून खात्री करून घेता येते. इतर कोणतीही गोष्ट सुनिश्चित मानता येत नाही. अशा या क्वान्टम प्रगतिवादात सर्व काही तुमच्यावरच अवलंबून असते. सगळे जग तुम्हीच निर्माण करता, तुम्हीच जग असता. – फ्रेड ॲलन वुल्फ 'टेकिंग दि क्वान्टम लीप,' (हार्पर ॲंड रो, १९८१).

आधुनिक सायन्सने त्याज्य ठरविलेला परंतु प्राचीन दर्शनांनी मानलेला
" We are one with nature " हा सिद्धांत

[" आपण निसर्गाशी एकरूप आहोत. "]

' a theory of self-organising systems. '

[" स्वत:च संघटित होणाऱ्या व्यवस्थांचा सिद्धांत. "]

विकसित करणारे नोबेल लॉरेट, बेल्जियन शास्त्रज्ञ Ilya Prigogine यांनी निष्कर्षरूपाने पुन्हा मांडला आहे.

आईनस्टिनचे पुढील वाक्य चिंतनीय आहे :

" A human being is a part of the whole, called by us ' Universe ', a part limited in space and time. He experiences himself, his thoughts and feelings as something separated from the rest, a kind of optical delusion of his consciousness. This delusion is a kind of prison for us, restricting us to our personal desires and to affection for a few persons nearest to us. Our task must be to free ourselves from this prison by widening our circle of compassion to embrace all living creatures and the whole of nature in its beauty. Nobody is able to achieve this completely, but the striving for such achievement, is, in itself, a part of the liberation and a foundation for inner security. "

[" ज्याला आपण ' विश्व ' म्हणतो त्या संपूर्णतेचा माणूस हा अवकाश आणि काल यांनी मर्यादित असलेला एक अंश असतो. इतरांपासून वेगळे विचार आणि भावना असणारा मी या नात्याने तो स्वत:संबंधी जो अनुभव घेतो, तो त्याच्या जाणीवेला झालेला एक प्रकारचा विभ्रम असतो. हा विभ्रम म्हणजे आपल्यासाठी एक प्रकारचा तुरुंगच असतो. आपल्या व्यक्तिगत इच्छांशी आणि जवळच्या वाटणाऱ्या फार थोडक्या लोकांविषयीच्या ममतेशी तो आपल्याला जखडून ठेवतो. सर्व जीवमान प्राणी आणि सौंदर्याने नटलेला निसर्ग यांच्यापर्यंत आपल्या सहानुभूतीच्या कक्षा

विस्तारून या तुरुंगातून मुक्तता करून घेणे हेच आपले कर्तव्य असले पाहिजे. हे पूर्णतः कोणालाही साध्य होत नाही, पण या उद्दिष्टांसाठी प्रयत्नशील असणे हाच मुक्ततेचा एक भाग आणि आंतरिक अमृतत्वाच्या आश्वासनाचा आधार असतो. "]

एकात्ममानवदर्शनाचाही याच स्वरूपाचा आदेश आहे हे वेगळे सांगावयास नको या विषयावरील Psychology चा अत्याधुनिक अभिप्रायही विचारणीय आहे.

मॉन्ट्रीयल मॅक्गिल युनिव्हर्सिटीचे डॉ. बर्नार्ड ग्राड यांचे निष्कर्ष, 'अमेरिका होलीस्टिक हेल्थ असोसिएशन' चे निष्कर्ष, तसेच काही सायकिक हीलर्सची प्रात्यक्षिके यामुळे पश्चिमेत पुनर्विचार सुरू झाला आहे. सायकिक हीलर्स, अमेरिकेचे इन्गो स्वान, एम्. एच्. टेस्टर, रॉलिंग थण्डर, हेनरी मॉडेल, रशियाचे व्हिक्टर क्रिवोरोटोव, इंग्लंडचे हॅरी एडवर्ड्स, ब्राझीलचे एरिगो. फिलीपाइन्समधील फेलीसा मकानास व जोसेफीना सीसन या सायकिक हीलर्सनी पाश्चिमात्य जगात खळबळ माजवून दिली आहे.

अमेरिकन शास्त्रज्ञ Dr. Robert Becker यांचे असे निरीक्षण आहे की, –
" ..... changes in Earth's magnetic fields are caused by the Sun, the Moon and the planets all of which in turn affect our nervous system and the spiritual radiation of the " Astral body and its aura. "

" ..... पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्रात सूर्य, चंद्र व ग्रहगोल यांच्या योगाने बदल घडून येतात. या सगळ्यांचा परिणाम आपल्या मज्जासंस्थेवर आणि 'अभौतिक देहाची' आत्मिक प्रभा व त्याचे प्रकाशवलय यांवर होत असतो. "

Dr. Leonard Ravitz हेही जवळजवळ याच मताचे आहेत.

सन १९५६ मध्ये रॉबर्ट ओप्पेनहायमरने इशारा दिला होता की, " the worst thing psychology might do would be to model itself after a physics which is not there anymore. which has been outdated. "

[" जे पदार्थविज्ञानशास्त्र आज अस्तित्वातच नाही, जे कालबाह्य होऊन गेले आहे, त्यानुसार आपली घडण करणे हा मानसशास्त्राकडून घडणारा सर्वांत मोठा प्रमाद ठरेल."]

सुप्रसिद्ध अमेरिकन शास्त्रज्ञ Cart Rogers तरुण मानसशास्त्रज्ञांना आवाहन करतात की," ... there may be a few who will dare to investigate the possibility that there is a lawful reality which is not open to our five senses ; a reality in which present, past and future are intermingled, in which space is not a barrier and time has disappeared; a reality which can be perceived and known only when we are passively receiptive, rather than actively bent on knowing. It is one of the most exciting challenges posed by psychology. "

["..... अशी शक्यता आहे की, आपल्या पंचज्ञानेंद्रियांच्या कक्षेबाहेरचे एक नियमबद्ध वास्तव आहे ; त्या वास्तवात वर्तमान, भूत आणि भविष्य एकमेकांत मिसळून गेले आहेत. तिथे अवकाशाचा अडसर नाही आणि काळ नाहीसा होऊन

गेलेला आहे ; आपण जाण्याचा हेतुपूर्वक अट्टाहास करण्यापेक्षा केवळ तटस्थपणे निरीक्षकाची भूमिका ठेवल्यासच ते पाहिले व जाणले जाऊ शकते. अशा वास्तवाच्या संभाव्यतेचा शोध घेण्याचे साहस दाखविणारे फार थोडे लोक कदाचित् असतील. मानसशास्त्राने उपस्थित केलेले हे अत्यंत उत्तेजक आव्हान आहे. "]

आधुनिक काळातील अनेक शास्त्रज्ञांचे साक्षात्कार मानवतेला एकात्ममानवदर्शनाच्या दिशेने नेणारे आहेत असे निःसंदिग्धपणे घोषित करता येते. आजच्या सायन्सचे निष्कर्ष आमच्या फॅशनेबल प्रोग्रेसिव्ह पुढाऱ्यांच्या घोषणांपासून दूर व एकात्ममानवदर्शनापासून जवळचे असेच आहेत.

हे साक्षात्कार केवळ गैरकम्युनिस्ट देशांतील शास्त्रज्ञांचेच आहेत, असे नाही. कम्युनिस्ट शास्त्रज्ञही हळूहळू याच दिशेने वाटचाल करीत आहेत.

भारतीय साहित्य व तत्त्वज्ञान यांविषयी रशियात निर्माण होत असलेले औत्सुक्य सर्वांच्या ध्यानात आहे. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत आदी ग्रंथांचे स्वागत रशियात झाले आहे व त्यावर अध्ययनही चालू झाले आहे. अगदी अलीकडच्या काळात मॉस्को विश्वविद्यालयाचे असोसिएट प्रोफेसर श्री. V. S. Kostyuchenkov यांनी प्रकाशित केलेल्या तीन ग्रंथांनी भारतीय विद्वानांचे लक्ष विशेष आकृष्ट केले आहे. त्यांनी सन १९७० मध्ये श्री अरविंदांवर व सन १९७७ मध्ये स्वामी विवेकानंदांवर ग्रंथ प्रकाशित केले. तेव्हापासून स्वामी विवेकानंदांना रशियात अधिकृतरीत्या मान्यता मिळू लागली व त्यामुळे भारतीय कम्युनिस्टही आता विवेकानंदांना मान्यता देऊ लागले आहेत. याच लेखकाने हल्लीच प्रकाशित केलेल्या ' The Classic Vedanta and Neo-Vedantism ' या ग्रंथात उपनिषदांपासून डॉ. राधाकृष्णन्पर्यन्तच्या भारतीय तत्त्वज्ञानपरंपरेचा परामर्श घेतला आहे. त्यामुळे भारतीय कम्युनिस्टांनाही ह्या विषयावरील आतापर्यन्तचे त्यांचे पूर्वग्रह बदलावे लागतील हे निश्चित आहे.

वरील तथ्य सर्वविदित आहे. परंतु या गोष्टींची भारतात अद्यापि माहिती नाही की, भारताच्या अभौतिक निष्कर्षांविषयी संशोधन करण्याकरिता रशियात सरकारी प्रेरणेने प्रयोगशाळा सुरू झाल्या आहेत. संशोधनाचे प्रमुख विषय आहेत : telepathy, telekineses, Kirlian effect, Kirlian photography as applied to medicine, psychic healing, extra terrestrial civilizations, hypnotherapy.

[दूरस्थातील विचारांची अतींद्रिय शक्तीने देवघेव, अतींद्रिय शक्तीने वस्तूंत गती निर्माण करणे, किर्लियन इफेक्ट, किर्लियन छायाचित्रणाचा वैद्यकशास्त्रातील वापर, मानसोपचार, ग्रहगोलांवरील संस्कृती, संमोहनाच्या साह्याने रोगावर उपचार.]

Shri. Henry Gris व William Dick यांनी आपल्या ' The New Soviet Psychic Discoveries ' या ग्रंथात या विषयाचे पूर्ण विवरण केले

आहे. शीला ऑस्ट्रेण्डर व लिन श्रोडर यांचे, 'सायकिक डिस्कव्हरीज बिहाइण्ड दी आयर्न कर्टन' हे पुस्तकही याच विषयावर आहे. वास्तविक सायन्सनेही कम्युनिझम व तदंतर्गत डायलेक्टिसिझमच्याच सेवेत असले पाहिजे असा रशियात सरकारी आग्रह आहे.* तथापि सरकारच्या आश्रयाखाली या प्रयोगशाळाही चालत आहेत. या सर्व प्रयोगांतील सर्वांत महत्त्वपूर्ण प्रयोग म्हणजे सन १९६५ मध्ये जोसेफ किरिलियन याने किरिलियन फोटोग्राफीच्या सहाय्याने घेतलेली मानवी आत्म्याची किंवा सूक्ष्म शरीरांची किंवा human aura ची छायाचित्रे होत. या शिवाय मॉस्को विश्वविद्यालयाचे Dr. Konstantin Kobyzev प्रतिपादन करतात की,

" The influence of large periodic radiations of energy from the sun on to the earth is an exactly established scientific fact."

["विशिष्ट काळाने मोठ्या प्रमाणात सूर्यापासून पृथ्वीवर होणारे ऊर्जेचे प्रक्षेपण ही विज्ञानाने सिद्ध झालेली वस्तुस्थिती आहे."]

ते पुढे म्हणतात की, " graphs drawn on the date of solar activity concur with mass movements of people."

[" सूर्यापासून होणाऱ्या या हालचालीमुळे पृथ्वीवर लोकांची मोठ्या प्रमाणावर हालचाल होत असल्याचे त्या दिवशीच काढलेल्या आलेखांवरून दिसून आले आहे."]

रशियन शास्त्रज्ञ ज्योतिषशास्त्राला 'Astrology' म्हणणे पसंत करीत नाहीत. त्याला त्यांनी संज्ञा दिली आहे ' Cosmic Biology '. Adwerd Nawmov यांनी सूर्यावरील स्पॉट्स्च्या मानवांच्या जीवना- मनावर होणाऱ्या परिणामांचे संशोधन चालविले आहे, तर Dr. Luna Kursley व Dr. Semashko या निष्कर्षावर पोहोचले आहेत की, " Planetary effects do cause changes in human behaviour and affects the human life on the earth."

["ग्रहांवरील घडामोडींमुळे मानवी व्यवहारांत बदल घडून येतात आणि पृथ्वीवरील मानवी जीवनावर परिणाम होतो."]

श्री. बी. व्ही. रमणद्वारा संपादित ' The Astrological Magazine ' च्या या वर्षीच्या विशेषांकात आलेला Dr. E. Vedavyasa यांचा ' Astrological Research in Communist countries ' हा लेख प्रगतशील (?) पुढाऱ्यांना आश्चर्याचा धक्का देणारा आहे. G. Kositsky व Kogan यांचे ' मानवी विचारांचा अंतराळावर होणारा परिणाम ' या विषयावरील पेपर्स ; याच विषयावरील Pavlita चे प्रयोग, Madical Astrology वरील रशियन व झेक संशोधन, झेक शास्त्रज्ञ Lemhenyi Zoltas याचे ' Connection between Astrology and Hatha-Yoga '; हंगेरियन लेखक

---

* परिशिष्ट क्र. ३५ पहा.

Kurl Kechnitz यांचा गर्भनिरोधावरील पेपर ; झेकोस्लोव्हाकियामधील Dr. Yonas आणि त्यांच्या Astra Research Centre ने केलेले संशोधन व काढलेले साहित्य ; Barna Balogh या हंगेरियन लेखकाचे ' Relation between Astronomy and Ancient Astrology " , आदी संशोधन-साहित्याचा उल्लेख करून श्री. वेदव्यास म्हणतात , " It looks as though the astrologers of the Communist countries have the greater sympathy with astrology and Yoga than our ' Asthikas ' of India. "

[" असे दिसते की कम्युनिस्ट देशांतील ज्योतिषांना भारतातील ' आस्तिकां '-पेक्षा ज्योतिषशास्त्र व योगशास्त्र या संबंधी अधिक सहानुभूती आहे. "]

' The Cycle of Heaven ' या आपल्या पुस्तकात Playfair व Scott Hill म्हणतात, " Whatever they choose to call it (bio-field, to-field, energy body or anisotrophic body)- the Soviets have put forward a concept that may give scientific support to many of man's traditional mystic beliefs. For instance, Hill learned in 1976 that they believe bio-plasma to be involved in energy transfer between healer and patient in the ' Laying on of hands ' process - - A great many laboratory experiments, have been carried to test the bio--plasma hypothesis .... The experiment, supervised by Inyustin demonstrated the apparent transfer from one living system to another through the bio-plasmic medium. " तसेच " Once again, it seems that the mystics of the East know more about Homoelectromagnetics than the scientists of the West. "

[" त्यांनी या शास्त्राला नाव कोणतेही दिले, (बायोफील्ड, टु-फील्ड, एनर्जी बॉडी किंवा ॲनिसॉट्रॉफिक बॉडी) तरी सोविएट शास्त्रज्ञांनी अशी एक कल्पना पुरस्कारिली आहे की, जिच्यामुळे माणसाच्या अनेक परंपरागत गूढवादी समजुतींना वैज्ञानिक आधार लाभतो. उदाहरणार्थ, १९७६ साली हिलने मान्यता दिली की रोग्यावर हस्तस्पर्शाने उपचार करण्याच्या प्रक्रियेत (लेइंग ऑन ऑफ हँड्स प्रोसेस) उपचार करणारा रोग्यात जी ऊर्जा संक्रमित करतो त्यात बायोप्लाज्माचा समावेश असतो. या संभाव्यतेची तपासणी करण्यासाठी प्रयोगशाळांत पुष्कळच प्रयोग करण्यात आले. इन्युस्तिनच्या देखरेखीखाली झालेल्या प्रयोगात हे दिसून आले की एका जीवमान घटकातून दुसऱ्या घटकात बायो-प्लाज्माच्या माध्यमाने ऊर्जा संक्रमित होऊ शकते. " तसेच, " पुन्हा एकदा प्रत्ययास आले आहे की पूर्वेकडील गूढवाद्यांना मानवामानवांतील विद्युत्चुंबकीय शास्त्राचे (होमोइलेक्ट्रोमॅग्नेटिक्स) पाश्चात्य शास्त्रज्ञांपेक्षा अधिक ज्ञान आहे. "]

आपल्या ' कुंडलिनीयोग ' पुस्तकात श्री. वाळिंबे म्हणतात, " भारतीय योगी जे शतकानुशतके करीत आले आहेत ते आज EEG, EKG, आणि EMG यांसारख्या आधुनिक

साधनांच्या योगाने पडताळून पाहणे शक्य झाले आहे. म्हणून आधुनिक शास्त्रज्ञ आणि सिद्धयोगी यांचा संबंध आला पाहिजे. आणि त्यांचे सहकार्य झाले पाहिजे. असे Playfair आणि Scott Hill यांनी आग्रहपूर्वक म्हटले आहे.

" Thanks to Space Age technology, this can now to at least some degree be done without lengthy training and one of the achievements of the biofeedback movement has been to bring Yogi and scientist together in the laboratory. "

[" अवकाशयुगातील तंत्रज्ञानाची ही कृपा आहे की अधिक काळ शिक्षण न देताही काही प्रमाणात असे सहकार्य घडवून आणता येईल. बायोफीडबॅक आंदोलनाचा एक लाभ असा झाला आहे की, प्रयोगशाळेत योगी आणि वैज्ञानिक एकत्र आले आहेत. "]

वेदांत, कम्युनिझम व क्रेमलिनॉलॉजीचे विद्वान् श्री. वा. नी. देशपांडे यांचा असा अभिप्राय आहे की, " The science of Yoga is the highest culmination of the philosophy and the laws of dialectics developed by the ancient sages of India in the field of the amazing powers of mind and body by consciously developing intuition as an instrument to superior knowledge and which has been given recognition by modern Soviet Science by establishing a new branch of scientific studies called psychotronics (or 'Yogatronics ').

[" योगशास्त्र ही तत्त्वज्ञानाची उच्चतम परिणती आहे. आणि भारताच्या प्राचीन ऋषींनी विरोधविकासाचे (डायलेक्टिक्स) जे नियम सिद्ध केले त्यांना आधुनिक सोव्हिएत विज्ञानाने मान्यता दिली आहे. 'सायकोट्रॉनिक्स' (किंवा योगट्रॉनिक्स) नामक शास्त्रीय अभ्यासाची जी शाखा त्यांनी निर्माण केली, त्यावरून ही मान्यता दिसून येते. प्राचीन ऋषींनी जे नियम सिद्ध केले त्यांचे क्षेत्र अंतःस्फूर्ती हे उच्च प्रतीच्या ज्ञानाचे साधन म्हणून जाणीवपूर्वक विकसित करण्याची मनाची आणि शरीराची अद्‌भुत शक्ती हे आहे. "]

सारांश, प्राध्यापक हक्सर म्हणतात त्याप्रमाणे, " At the highest level, scientific temper and spiritual attitude are one and the same. "*

[" उच्चतम पातळीवर वैज्ञानिक प्रवृत्ती आणि आध्यात्मिक मनोवृत्ती एकरूपच आहेत. "]

मुंबई विश्वविद्यालयाच्या तत्त्वावधानाखाली युनिव्हर्सिटी ग्रॅन्ट्स् कमिशनच्या निमंत्रणावरून सन १९८२ मध्ये डॉ. फ्रित्जॉफ कॅपरा यांनी दिलेल्या भाषणमालेतूनही हेच तथ्य अधिक स्पष्ट होते. कार्टेशियन व न्युटनियन सायन्स कालबाह्य झाले आहे. सृष्टीची मौलिक

---

* परिशिष्ट क्र. ३६ पहा.

एकात्मताच अत्याधुनिक सायन्स व भारतीय दर्शनातून आविष्कृत होते हे सांगताना श्री. कॅपरा यांनी क्वांटम थिअरीच्या प्रणेत्यांपैकी एक श्री. Werner Heisenberg व श्री अरविंद यांची, तसेच अॅटॉमिक फिजिसिस्ट श्री. Henry Stapp व नागार्जुन यांची समान उद्धरणे प्रस्तुत केली आहेत व डॉ. राधाकृष्णन् यांनी वर्णिलेले बौद्धमताचे गतिमान विश्वदर्शन आपल्यासमोर ठेविले आहे. चतुर्-आयामी (four dimensional) " space-Time-Continuum ' या कल्पनेशी सदृश अरविंदांचा साक्षात्कार व जपानी पंडित D. T. Suzuki यांचे महायान बौद्धमताच्या या Space-Time-Continuum पैलूवरील भाष्य त्यांनी नमूद केले आहे. क्वांटम थिअरी व सापेक्षता सिद्धांतातून आविष्कृत होणाऱ्या वैश्विक नृत्याचे (Cosmic Dance) काव्यमय सुंदर प्रकटीकरण म्हणजे नटराज शिवाचे नृत्य होय. कॅपेरा म्हणतात– " For the modern physicists, the dance of Shiva is the dance of subatomic matter. As in Hindu mythology, it is a continual dance of creation and destruction involving the whole cosmos; the basis of all existence and of all natural phenomena. The metaphor of the cosmic dance thus unifies ancient mythology, religious art and modern physics. It is, indeed, as Coomaraswami said, " Poetry, but none the less science."

[" आधुनिक पदार्थविज्ञानवाद्यांच्या दृष्टीने, शिवाचे नृत्य म्हणजे जाणीवेच्या कक्षेत नसलेल्या आण्विक पदार्थमात्राचे (सब अॅटॉमिक मॅटर) नृत्य होय. हिंदू पुराणकथांत म्हटल्याप्रमाणे विश्वव्यापी उत्पत्ती आणि संहार यांचे ते अखंड चालणारे नृत्य आहे. संपूर्ण अस्तित्व आणि सर्व नैसर्गिक घडामोडी यांना ते आधारभूत आहे. वैश्विक नृत्याच्या या रूपकात अशा प्रकारे प्राचीन पुराणकथा, धार्मिक कलाविकास आणि आधुनिक पदार्थविज्ञान ही एकत्र जोडली गेली आहेत. कुमारस्वामी यांनी म्हटल्याप्रमाणे खरोखरच, " हे काव्य आहे. पण तेवढेच विज्ञानही आहे. "]

त्यांच्या दुसऱ्या भाषणात (The Systems View of Life) श्री. फ्रित्जॉफ् कॅपरा म्हणतात," The world view of modern physics is holistic and ecological. It emphasises the fundamental interrelatedness and interdependence of all phenomena, and also the intrinsically dynamic nature of physical reality."

[" आधुनिक पदार्थविज्ञानाची जगाकडे पाहाण्याची दृष्टी उच्च नैतिकतेची (होलिस्टिक) आणि पर्यावरणाच्या नैसर्गिक शुद्धतेवर भर असलेली (इकॉलॉजिकल) आहे. सर्व घटनांतील परस्पर संबंध व परस्परावलंबित्व आणि वस्तुजाताचे अंगभूत गतिमानत्व यावर त्याचा भर आहे."]

' Systems View ' च्या दृष्टिकोनातून ते वर्णन करतात –

" An important aspect of living systems is their tendency to form multi-levelled structures of systems within systems. For example, the human body contains organ systems composed of several organs, each organ being made up of tissues and each tissue made up of cells. All these are

living organisms, or living systems, which consist of smaller parts and, at the same time, act as parts of larger wholes. Living systems, then exhibit a stratified order, and there are interconnections and interdependencies between all systems levels, each level interacting and communicating with its total environment.'

["सर्व जीवमान रचनांचा महत्त्वाचा विशेष म्हणजे अनेक स्तरांवर एका रचनेत दुसरी पोटरचना निर्माण करण्याची त्यांची प्रवृत्ती. उदाहरणार्थ, मानवी शरीरात अनेक अवयवांच्या आपापल्या व्यवस्था असतात. प्रत्येक अवयव नसांचा (टिश्यू) बनलेला असतो व प्रत्येक नस सूक्ष्म पेशींची (सेल्स) बनलेली असते. हे सर्व जीवमान घटक असतात. सुनियंत्रित जीवमान रचना या नात्याने त्यांचे अस्तित्व असते. अधिक छोट्या घटकांनी त्यांची घडण झालेली असते. त्याच वेळी हे घटक अन्य मोठ्या व्यवस्थेचे अंश म्हणूनही काम करीत असतात. तेव्हा जीवमान व्यवस्थेचे स्वरूप अनेकस्तरीय असल्याचे आणि प्रत्येक स्तरावर त्यांच्यात परस्परसंबंध व परस्परावलंबित्व असल्याचे निदर्शनास येते. प्रत्येक स्तरारील रचना सभोवारच्या एकूण वातावरणावर परिणाम करीत असते, वातावरणाचा तिच्यावर परिणाम होत असतो आणि असा सुसंवाद साधण्याची प्रक्रिया होत राहते."]

तसेच

" The Fact that the living world is organised in multilevelled structures means that there also exist levels of mind. In the human organism, for example, there are various levels of ' metabolic ' mentation involving cells, tissues, and organs, and then there is the neural mentation of the brain which, itself, consists of multiple levels corresponding to different stages of human evolution. The totality of these mentations constitutes what I would call the human mind, or psyche. In the stratified order of nature individual human minds are embedded in the larger minds of social and ecological systems these integrated into the planetary mental system, which in turn must participate in some kind of universal or cosmic mind. "

["जीवमान् विश्व अनेक स्तरांवरील रचनांद्वारे संघटित झाले आहे याचा अर्थ असा की, मनाचेही असे स्तर असले पाहिजेत. उदाहरणार्थ, मानवी शरीरात अनेक पातळ्यांवर नवनवीन व्यापार (मेटॅबॉलिक मेन्टेशन) होत असतो. त्यात पेशी, मज्जातंतू आणि निरनिराळे अवयव यांचा संबंध पोचतो. याशिवाय मेंदूतील रक्त-वाहिन्यांनी प्रेरित काही व्यापार असतात. मेंदूतही मानवी विकासाच्या पातळीनुसार अनेक पातळ्या असतात. या सर्व व्यापारांच्या समुच्चयाला मी मानवी मन म्हणेन. निसर्गाच्या बहुस्तरीय व्यवस्थेत व्यक्तींची मने सामाजिक आणि पर्यावरणाच्या विशाल रचनांत जडविलेली असतात. या सगळ्यांचा ग्रहगोलीय मनोव्यवस्थेत

लय होत असतो. ही मनोव्यवस्थादेखील कोठल्या तरी प्रकारच्या वैश्विक मनात सहभागी होत असलीच पाहिजे. "]

या भाषणाचा समारोप करताना ते म्हणतात –

" I hope that my presentation of the systems view of life has made it clear that the new vision of reality is an ecological vision in a sense which goes far beyond the immediate concern with environmental protection. It is supported by modern science, but it is rooted in a perception of reality that goes beyond the scientific framework to an intuitive awareness of the oneness of all life, the interdependence of its multiple manifestation and its cycles of change and transformation. When the concept of the human spirit is understood as the mode of consciousness in the individual feels connected to cosmos as a whole, it becomes clear that ecological awareness is truly spiritual. Indeed, the idea of the individual being linked to the cosmos is expressed in the Latin root of the word religion 'religare' (to bind strongly), as well as in the Sanskrit 'Yoga' which means union ····· we can say today with considerable confidence, that the ancient wisdom of the East provides the most consistent philosophical background to our modern scientific theories. "

[" सृष्टीचा हा जो व्यवस्थात्मक दृष्टिकोन मी पुढे ठेवला आहे, त्यावरून हे स्पष्ट झाले असेल की जगाकडे पाहण्याची नवी दृष्टी ही पर्यावरणात्मक आहे. एका अर्थाने, वातावरणाचे संरक्षण करण्याच्या तात्कालिक चिंतेपलीकडे फार दूरवर पोचणारी ही दृष्टी आहे. तिला आधुनिक विज्ञानाचा आधार आहे, पण विज्ञानाच्या चौकटीबाहेर झेपावून सर्व जीवनाचे एकत्व, जीवनाचा विविधतापूर्ण आविष्कार आणि बदल व रूपांतर यांचे चक्र या सगळ्यांची अंतःस्फूर्तीने येणारी जाण यात विश्वाच्या या नव्या दर्शनाचे बीज आहे. ज्या योगाने माणसाला वैश्विक पूर्णतेशी आपले नाते असल्याचे जाणवते असा जाणिवेचा प्रकार या दृष्टीने मानवी चैतन्याकडे पाहिले तर पर्यावरणविषयक जाणीव ही खरोखर आध्यात्मिक स्वरूपाची असते, हे स्पष्ट होते. वस्तुतः विश्वाशी माणूस जोडला गेला असल्याची कल्पना रिलिजन या शब्दाच्या मूळ लॅटिन धातूतूनच व्यक्त झाली आहे. 'रेलिगारे' (घट्ट बांधून ठेवणे) असा तो धातू आहे. त्याचप्रमाणे संस्कृत भाषेत 'योग' हा शब्द आहे. त्याचा अर्थ एकमेकांशी मीलन होणे असा होतो. पुरेशा विश्वासाने आपण आज म्हणू शकतो की पूर्वेकडील प्राचीन ज्ञान आपल्या आजच्या वैज्ञानिक सिद्धांतांना सर्वांत सुसंगत अशी तत्त्वज्ञानात्मक पार्श्वभूमी उपलब्ध करून देते. "]

अशारीतीने प्रगमनशील सायन्स हळूहळू एकात्मदर्शनाच्या दिशेने पुढे जात आहे. परंतु पंडितजी जिवंत असेपर्यंत ही वाटचाल तितकीशी सुस्पष्ट झाली नव्हती. तरीही

तथाकथित पुरोगाम्यांच्या उथळ, पण प्रखर टीकेची पर्वा न करता पंडितजींनी भारतीय संस्कृतीवर आधारित आपले दर्शन जगापुढे ठेविले, यावरून त्यांच्या आत्म-विश्वासाची व सनातनधर्मावरील दृढ श्रद्धेची प्रचीती येते. या दर्शनाच्या द्वारे पंडितजींनी दिङ्मूढ, हताश व संकटग्रस्त मानवतेला योग्य दिशादर्शन केले आहे. आज मानवजाती कुठे उभी आहे याविषयी कॅपरा यांनी अन्यत्र फार मार्मिक विवेचन केले आहे. ते म्हणतात —

The westerners so far favoured rational knowledge over intuitive wisdom, science over religion. competition over cooperation, exploitation of natural resources over conservation·····and that these factors among others, have led to a profound cultural imbalance which lies at the very root of our current crisis·····an imbalance in our thoughts and feelings, our values and attitudes, and our social and political structures." ' The current crisis is a transition from sensate culture. As individuals, as a society, as a civilization and as a planetary eco-system, we are reaching the turning point ····· what we need, then, is a new ' paradigm ' — a new vision of reality, a fundamental change in our thoughts, perceptions and values. "

["अंतःस्फूर्त ज्ञानापेक्षा बुद्धीने होणाऱ्या ज्ञानाची महती पाश्चात्यांनी आजवर अधिक मानली. धर्मापेक्षा विज्ञान, सहकार्यापेक्षा स्पर्धा, नैसर्गिक साधनसंपत्तीच्या रक्षणापेक्षा तिचे शोषण त्यांनी अधिक पसंत केले. इतर अनेक गोष्टींबरोबर या गोष्टींमुळे एक सांस्कृतिक असमतोल निर्माण झाला. तोच सध्याच्या संकटाच्या मुळाशी आहे. आपले विचार आणि भावना, आपली जीवनमूल्ये आणि प्रवृत्ती, आणि आपल्या सामाजिक व राजकीय रचना यांना व्याप्त करणारा हा असमतोल आहे. "

"सध्याचा संकटकाळ म्हणजे भोगवादी संस्कृतीचीच एक परिणती आहे. व्यक्ती म्हणून, समाज म्हणून, सभ्यता म्हणून किंवा एका ग्रहावरील पर्यावरणात्मक व्यवस्था म्हणून आपण एका परिवर्तनाच्या टप्प्यावर पोचत आहोत आपल्याला आज खरोखर काही आवश्यक असेल तर जीवनाचा नवा आशयपूर्ण नमुना – सृष्टीकडे पाहण्याची नवी दृष्टी. आपल्या विचारांत, पाहण्यांत आणि मूल्यांत मूलभूत परिवर्तन. "]

हा नवीन paradigm देणाऱ्याकरता पंडितजी मानवजातीच्या सध्याच्या ' turning point ' वर उभे आहेत.

१७

'हिंदुत्व' हीच विचार-आचाराची मूळ प्रेरणा असल्यामुळे संघ-प्रणेत्यांची दृष्टी स्वभावत:च राष्ट्रीय – आंतरराष्ट्रीय – मानवीय अशी राहिली आहे. व्यावहारिक भूमिकेवरून जमिनीवर घरटे बांधण्याची काळजी घेत असतानाच अंतिम लक्ष्य म्हणून अनंत अंतराळाचा वेध घेणारी त्यांची दृष्टी असे.

सन १९२० च्या नागपूर-काँग्रेसच्या अधिवेशनात स्वयंसैनिक-दलाचे प्रमुख म्हणून पू. डॉक्टर हेडगेवार यांनी काम केले होते याची माहिती अनेकांना आहे. परंतु बहुतेकांना हे माहीत नाही की, विषय-नियामक समितीकडे स्वागत-समितीने पाठविलेला एक महत्त्व-पूर्ण ठराव मुख्यत: पूज्य डॉक्टरांच्या प्रेरणेने संमत करण्यात आला होता. या ठरावात असे म्हटले होते की, "हिंदुस्थानचे प्रजासत्ताक निर्माण करून भांडवलशाही राष्ट्रांच्या जाचातून जगातील देशांची मुक्तता करणे हे काँग्रेसचे ध्येय आहे," या ठरावातील 'जगातील देशांच्या मुक्तते'च्या कल्पनेचा उपहास करून विषयनियामक समितीने तो ठराव मागे टाकला.

पुढील काळात हिंदू-संघटनेच्या जागतिक कार्याची दिशा विशद करताना पू. श्रीगुरुजी म्हणाले, "हिंदू समाजाला त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण राष्ट्रीय अस्मितेच्या आधारे पुन्हा संघटित करण्याचे जे कार्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने हाती घेतले आहे, ते भारताच्या यथार्थ राष्ट्रीय पुनरुत्थानाच्या प्रक्रियेतील एक भाग तर आहेच, परंतु त्याबरोबरच विश्वाचे ऐक्य व समस्त मानवजातीच्या कल्याणाचे स्वप्न साकार करण्याच्या प्रक्रियेतीलही ती एक अनिवार्य अशी पूर्व-अवस्था आहे. जागतिक एकतेसंबंधीचा हिंदूंचा विचार हाच विश्वबंधुत्वाचा स्थायी आधार होऊ शकेल; एकच अंतरात्मा सर्वांच्या ठायी भरून राहिलेला आहे, हे ज्ञानच मनुष्यमात्राच्या सुखासाठी झटण्याची दिव्य प्रेरणा माणसाच्या अंत:करणात निर्माण करू शकेल; पृथ्वीतलावरील समस्त जीवसृष्टीला स्वत:चा संपूर्ण विकास करण्याची पूर्ण आणि मुक्त संधीही हा हिंदू विचारच उपलब्ध करून देऊ शकेल ..... हे श्रेष्ठ जागतिक कार्य केवळ हिंदू समाजच पूर्ण करू शकेल."

पं. दीनदयाळजीही याच परंपरेतील होते. त्यामुळे याच प्रेरणेतून, याच दृष्टीने राष्ट्रीय – आंतरराष्ट्रीय – मानवीय स्तरांवरील आधिव्याधींचा शोध घेऊन त्यांच्या निरा-करणाचा मार्ग धुंडाळणे हे आपले जीवितकार्य आहे, अशी त्यांची श्रद्धा होती.

असे म्हणतात की, रोगाचे योग्य निदान होणे म्हणजे रोग अर्धा अधिक दूर होणेच होय. पंडितजींच्या पहिल्या वर्षश्राद्धाच्या प्रसंगी त्यांना श्रद्धांजली वाहणारा एक लेख 'Organiser' मध्ये प्रकाशित झाला होता. त्यात विभिन्न स्तरांवरील मानवतेच्या

रोगांचे पंडितजींनी केलेले निदान ग्रथित करण्यात आले होते. भाषांतराच्या प्रयत्नात मूळ विवरणावर थोडाही अन्याय होऊ नये या हेतूने* संबंधित भाग जसाच्या तसा उद्धृत करीत आहे :–

Panditji was a Seer – – A Drashta. He located and diagnosed the maladies of the humanity. Their solution was his life-mission.

Today the mankind is confronted with a number of basic and baffling problems. For example :

How to reconcile – – –

- Individual liberty with social discipline ;
- Incentive for individual development with urge for equality ;
- Economic growth with social justice ;
- Basic organic unity with apparent diversities ;
- State authority with industrial and civic self-governments ;
-- System with spontaneity ;
-- Social order with statelessness ;
-- Self-restraint with self-unfoldment ;
-- Rationalism with consciousness of the office and limitations of Reason ;
-- Specialisation with integrated view ;
-- Material advance with spiritual elevation ;
-- National self-reliance with international cooperation.

And, again, How to ensure - - -

-- Liberty without licentiousness ;
-- Discipline without regimentation ;
-- Status without privileges ;
-- Unity without uniformity ;
-- Stability without stagnation ;

---

*हे लिहिण्याची धृष्टता करताना मनासमोर दोन गोष्टी होत्या. एकतर, श्री. श्री. म. माटे यांचा 'अनुवाद अथवा भाषांतर' हा लेख व दुसरे, श्री. म. न. जोशी यांनी उद्धृत केलेले पुढील वचन– " A translation, if it is beautiful is not likely to be faithful and if it is faithful is not likely to be beautiful. "

[" एखादा अनुवाद जर सुंदर असेल तर तो मुळाबरहुकूम नसण्याचा संभव असतो आणि जर तो मुळाबरहुकूम असेल तर त्यात सौंदर्याचा अभाव संभवतो. "]

-- Dynamism without adventurism ;
-- State authority without Stateism ;
-- Technological advance without loss of humaneness ;
-- Material prosperity without crude ' materialism ';
-- Vertical arrangement of societies without their horizontal division;
-- Humanism without homo-centricism.

On national plane too there are a number of urgent and challenging problems. For example :
How to reconcile - - -

-- Expansion of employment opportunities with uptodate modern technology ;
-- Decentralised processes of production with increase in productivity ;
-- Nationalisation with public accountability ;
-- Pace of urbanisation with cultural background ;
-- Micro-planning at lower levels with macroplanning at national level;
-- Integration of various natural groups with the preservation of their distinct group characteristics;
-- Bharatiya values of life with the modern scientific and technological advance;
-- Demands of the modern age with the Sanatana ideals of Dharma.

How to achieve —

Evolution of the World State enriched by the growth and contribution of different national cultures ; and

Evolution of Manava Dharma enriched by the perfection of all the religions including ' materialism '

Needless to add that this enumeration is illustrative. not exhaustive.

[" पंडितजी हे द्रष्टे होते. मानवतेच्या दुखण्यावर त्यांनी नेमके बोट ठेवले. त्यावर उपाययोजना हे त्यांचे जीवनकार्य होते.

आज मनुष्यजातीपुढे अनेक मूलभूत आणि गोंधळात टाकणाऱ्या समस्या उभ्या आहेत. उदाहरणार्थ, पुढील गोष्टींचा मेळ कसा घालावा –

– व्यक्तिस्वातंत्र्य आणि सामाजिक अनुशासन;

– व्यक्तिगत विकासासाठी प्रेरणा आणि समतेची ओढ;
– आर्थिक विकास आणि सामाजिक न्याय;
– जीवनात अनुस्यूत मूलभूत एकता आणि बाह्यतः भासणारी विविधता;
– राज्यांची अधिसत्ता आणि औद्योगिक व नागरी स्वयं-शासन;
– व्यवस्था आणि उत्स्फूर्तता;
– सामाजिक सुव्यवस्था आणि राज्यविहीनता;
– बुद्धिवाद आणि बुद्धीचे कार्य व तिच्या मर्यादा यांची जाण;
– विशिष्ट विषयातील तज्ज्ञता व समग्र दृष्टी;
– भौतिक प्रगती आणि आध्यात्मिक उन्नती;
– राष्ट्रीय स्वावलंबन आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य;

शिवाय, पुढील वांछनीय गोष्टींची शाश्वती कशी निर्माण करता येईल, हाही प्रश्न आहेच –

– स्वातंत्र्य हवे पण स्वैराचार नको;
– अनुशासन हवे पण साचेबंदपणा नको;
– प्रतिष्ठा हवी पण त्यावरोवर सबलतींचे गाठोडे नको;
– एकता असावी पण एकरूपता नको;
– स्थैर्य असावे पण 'जैसे थे' अवस्था नको;
– गतिमानता हवी पण साहसवाद नको;
– शासनसत्ता असावी पण शासनच सर्वसमर्थ अशी स्थिती नको;
– तांत्रिक प्रगती हवी पण मानवी गुणांचा लोप नको;
– भौतिक समृद्धी इष्ट पण ओबडधोबड 'जडवाद' नको;
– समाजात खालपासून वरपर्यंत उभ्या श्रेणींची रचना हवी पण त्यात आडव्या पातळीवरील वर्गभेद नकोत;
– मानवतावाद स्पृहणीय पण मानवकेंद्रितता नको;

राष्ट्रीय पातळीवर देखील अनेक निकडीच्या आणि आव्हानात्मक समस्या आहेत.

उदाहरणार्थ –

पुढील गोष्टींचा मेळ कसा घालता येईल –

– रोजगाराच्या वाढत्या संधी आणि अद्ययावत् तंत्रज्ञान;
– उत्पादनाच्या विकेंद्रित पद्धती आणि अधिक उत्पादकता;
– राष्ट्रीयीकरण आणि सार्वजनिक उत्तरदायित्व;
– शहरीकरणाची गती आणि सांस्कृतिक वातावरण;
– खालच्या पातळीवर छोट्या छोट्या योजना आणि राष्ट्रीय पातळीवर सुसंवादी विशाल योजना;

– अनेकविध स्वाभाविक लोकसमूहांचे एकात्मीकरण आणि त्या त्या जनसमूहाच्या खास वैशिष्ट्यांचा सांभाळ;
– भारतीय जीवनमूल्ये आणि आधुनिक शास्त्रीय व तांत्रिक प्रगती;
– आधुनिक काळाच्या गरजा आणि सनातन धर्माचे आदर्श;

पुढील उद्दिष्टे कशी साध्य करावी –

निरनिराळ्या राष्ट्रीय संस्कृतींनी समृद्ध केलेले विश्वराज्य;

आणि ' जडवादा 'सहित सर्व धर्मांच्या परिपूर्णतेने समृद्ध अशा मानवधर्माची उत्क्रांती.

ही यादी केवळ उदाहरणादाखल आहे आणि परिपूर्ण नाही, हे सांगण्याची गरज नसावी.]

१८ पंडितजी भारताच्या प्राचीन ऋषिसंस्थेचे आधुनिक प्रतिनिधी होते. ज्याला आचार्य जावडेकर यांनी ' यतिवर्ग ' अशी संज्ञा दिली, आचार्य विनोबाजींनी ' आचार्य-कुल ' या नावाने संबोधिले व पू. श्रीगुरुजींनी ' ऋषिसंस्था ' म्हणून गौरविले, तो वर्ग-कल्पना-विरहित सज्जनसमूह ही हिंदुसमाजरचनेची विशेषता आहे. श्रीगुरुजी म्हणतात की, " समाजाच्या सर्व अवयवांच्या आवश्यकता ज्याला नीट समजतात, त्यांचे पारस्परिक संबंध जो नीट राखू शकतो व स्वतः निरपेक्ष, निःस्वार्थ असल्यामुळे सर्वांना एकसूत्रात बांधून ठेवण्याची ज्याची पात्रता आहे, असा एखादा समूह समाजधारणेकरिता अपरिहार्यच आहे."*

दुसऱ्या एका प्रसंगी श्रीगुरुजी म्हणतात, "आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही की, प्राचीन हिंदू-रचनेत राजसत्ता व धनसत्ता या दोन्ही शक्तींची देखरेख अशा प्रकारच्या व्यक्ती करीत असत की ज्यांचा कोणताही व्यक्तिगत स्वार्थ नसे. सत्ता आणि धन यांच्या प्रलोभनाच्या वर राहून आध्यात्मिक अधिकाराचा धर्मदंड धारण करीत सतत सावध राहणारे आणि या दोन्ही शक्तींपैकी कोणीही केलेल्या अन्यायाचे निराकरण करण्याची क्षमता असणारे लोक व त्यांची सतत परंपरा हीच आमच्या प्राचीन राष्ट्राच्या वैभवाचा आणि अमरतेचा वास्तविक प्राण राहिली आहे."** ही ऋषिपरंपरा भारतात अखंड चालत आलेली आहे. पंडित दीनदयाळजी याच वर्गातील होते आणि म्हणूनच अत्यंत

---

* परिशिष्ट क्र. ३७ पहा.

** परिशिष्ट क्र. ३८ पहा.

परिश्रमपूर्वक गहन, मनन, चिंतन करून त्यांनी मानवतेच्या रोगाचे अचुक निदान वर दिल्याप्रमाणे केले.

वरील सर्व प्रश्नांची उत्तरे शोधणे हे आपले जीवितकार्य आहे अशी त्यांची श्रद्धा होती. कारण त्यांची ही मान्यता होती की, वरील व अशाच अन्य समस्यांचे निराकरण करणे हे हिंदुराष्ट्राचे जीवितकार्य आहे. हिंदुराष्ट्राला स्वतःचे असे जागतिक मिशन आहे; विनाशाच्या कडेवर उभ्या असलेल्या मानव-जातीला सुरक्षिततेचा, सुखाचा व समृद्धीचा मार्ग दाखविणे हे ऐतिहासिक दायित्व नियतीने हिंदुराष्ट्रावरच सोपविले आहे आणि त्या दृष्टीने हिंदुराष्ट्रात वैचारिक सामर्थ्य निर्माण करणे ही येथील ऋषिसंस्थेची जबाबदारी आहे, असे ते मानीत. हिंदुराष्ट्राच्या या जागतिक मिशनचे स्वरूप स्वामी विवेकानंद, योगी अरविंद व श्रीगुरुजी यांनी निःसंदिग्ध शब्दांत घोषित केले आहे. इतकेच नव्हे तर, भविष्याचा वेध घेणाऱ्या काही पाश्चात्य विचारकांनीही या राष्ट्राच्या जीवनकार्याविषयी आपल्या कल्पना व अपेक्षा जवळजवळ अशाच शब्दांत प्रकट केल्या आहेत. या सर्वांच्या प्रतिनिधिस्वरूप म्हणून सुप्रसिद्ध इतिहासशास्त्रज्ञ अर्नाल्ड टॉयन्बी यांचे विचार संक्षेपाने इथे उद्धृत करणे उद्बोधक होईल.

" Here (in India) we have the attitude and the spirit that can make it possible for the human race to grow together into a single family and, in the atomic age, this is the only alternative to destroying ourselves. "

" Today we are still living in this transitional chapter of the world's history, but it is already becoming clear that a chapter which had a Western beginning will have to have an Indian ending if it is not to end in the self-destruction of the human race. In the present age, the world has been united on the material plane by Western technology. But this Western skill has not only ' annihilated distance '; it has armed the peoples of the world with weapons of devastating power at a time when they have been brought to point-blank range of each other without yet having learnt to know and love each other. At this supremely dangerous moment in human history, the only way of salvation for mankind is an Indian way. "

[" इथे (भारतात) आपणाला अशी मनोधारणा आणि चेतना दिसते की जिच्या आधारे मानवजातीला एक कुटुंब या नात्याने आपला विकास करून घेणे शक्य होईल. सध्याच्या अणुयुगात आपला सर्वनाश ओढवून घ्यावयाचा नसेल तर इतर कोणताही पर्याय नाही. "

" आज आपण अद्याप मानवी इतिहासातील एका संक्रमणयुगात आहोत. परंतु यापूर्वीच हे स्पष्टपणे दिसू लागले आहे की या युगाचा प्रारंभ जरी पश्चिमेकडे

झाला असला तरी त्याची समाप्ती मात्र भारतातून व्हावी लागेल, अर्थात्, मानव-जातीच्या आत्मविनाशात होणारा या युगाचा शेवट टाळावयाचा असेल तर ! सध्याच्या युगात पाश्चात्य तंत्रज्ञानाने जग भौतिक पातळीवर एकत्र आणले आहे. या पाश्चात्य तंत्राने 'अंतर' ही चीज केवळ नष्ट झाली, एवढेच नव्हे तर, जगातील देश एकमेकांच्या अगदी निकट आले असता त्यांना अत्यंत विध्वंसक शस्त्रांनी याच तंत्राने सुसज्ज केले आहे. एकमेकांना जाणण्यास व एकमेकांवर प्रेम करण्यास मात्र अद्याप ते शिकलेले नाहीत ! मानवी इतिहासातील या अतिशय धोक्याच्या क्षणी मानवतेचा बचाव व्हावयाचा असेल, तर तो केवळ भारतीय मार्गानेच होऊ शकेल. "]

" I want to take up three points ····· My first point is that India occupies a key position in the world, and has always done so, ever since civilization first began to fan out, east and west, from its original birth place in what is now Iraq. My second point is that India is an epitome of the present day world. Some of the principal problems confronting the whole human race today are conspicuously present inside India 's frontiers, and are being wrestled with today, as Indian national problems, by the people of India and by the Indian Government. My third point is that in India there is an attitude towards life, and an approach to the handling of human affairs, that answers to the needs of the present situation and this, not only inside India but in the world as a whole."

If India were ever to fail to live up to this Indian ideal which is the finest, and therefore, the most exacting, legacy in your Indian heritage, it would be a poor look-out for mankind as a whole. So a great spiritual responsibility rests on India. "

[" मला तीन गोष्टींकडे लक्ष वेधावयाचे आहे. ··· ·· पहिली गोष्ट ही की भारताचे स्थान जगात फार महत्त्वाचे आहे व ते सदैव तसेच राहात आलेले आहे. अगदी प्रथम संस्कृतीचा प्रसार आजच्या इराकमधील मूलस्थानापासून पूर्वेकडे आणि पश्चिमेकडे होण्यास प्रारंभ झाला, तेव्हापासून भारताचे स्थान असेच मोक्याचे राहात आलेले आहे. माझा दुसरा मुद्दा असा की भारत म्हणजे सध्याच्या जगाचे सारभूत स्वरूपच आहे. संपूर्ण जगाला भेडसावणारे अनेक प्रमुख प्रश्न आज भारतात ठळकपणे पुढे आले आहेत आणि त्यांचा उलगडा भारताचे राष्ट्रीय प्रश्न या नात्याने करण्याचा प्रयत्न चालू आहे. भारतातील जनता आणि भारत सरकार तो प्रयत्न करीत आहेत. तिसरी गोष्ट : भारतात जीवनाकडे पाहण्याची अशी एक दृष्टी आहे आणि मानवी व्यवहार सांभाळण्याची अशी एक भूमिका आहे की सध्याच्या परिस्थितीत जी अत्यंत उपकारक ठरेल, आणि ते देखील केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात !

" अतिसुंदर आणि म्हणूनच अत्यंत परिश्रमसाध्य अशा या आदर्शानुसार, जो आदर्श म्हणजे तुमच्या भारतीय परंपरेचा वारसा आहे तदनुसार जीवन उभे करण्यात जर भारताला कधीकाळी अपयश आलेच तर संपूर्ण मानवजातीच्या भावी कल्याणाला बाधा आल्याप्रमाणे होईल. भारतावर एवढे थोर आध्यात्मिक दायित्व आहे. "]

नियतीने सोपविलेले हे ऐतिहासिक, जागतिक दायित्व पार पाडण्याची क्षमता आपल्या हिंदुराष्ट्रात निर्माण व्हावी या करिताच पंडितजींची अखंड धडपड चाललेली होती. त्यांच्या बहु-आयामी (Multi dimensional) कार्याचे हेच लक्ष्य होते. याच उद्देशाने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जीवनाच्या विविध क्षेत्रांत मौलिक विचारांचा विकास करीत राहण्याचा त्यांचा प्रयत्न होता. या कार्याचे सूत्र पंडितजींनी जिथे खाली ठेवले तिथून ते उचलून पुढे चालवीत नेणे हीच त्यांना वहावयाची खरी श्रद्धांजली होय. या दृष्टीने प्रयत्नशील होण्याची प्रेरणा या ' विचारदर्शना 'मुळे काही निवडक विचारवंतांना मिळाली तरी त्यांतील लेखकांच्या परिश्रमांचे साफल्य झाले असे म्हणता येईल.

• • •



परिशिष्टे

---

१. जनसंघाच्या स्थापनेपूर्वीच्या या कालखंडातील लेखांतून पंडितजींची विश्लेषक दूरदृष्टी कशी स्पष्ट होते याचे बानगीदाखल पुढील उदाहरण पहा :

" काँग्रेस का यह संघर्ष भावी समाजवादी, साम्यवादी और राष्ट्रवादी संघर्ष को जन्म देगा । इनमें से कौन सा वर्ग काँग्रेस पर अधिकार करेगा, यह आज कहना कठिन है । यद्यपि दिखता यही है कि राष्ट्रवादी दल ही प्रभुत्वमें रहेगा । "

" यह कार्य काँग्रेसको भंग करके विचारधाराओके आधारपर नवीन राजनैतिक दल निर्माण करके किया जा सकता था. अथवा एक विचारधारा का काँग्रेस पर प्रभुत्व स्थापन करके, दूसरे को बाहर निकाल कर, काँग्रेस एवं काँग्रेसेतर राजनैतिक दलो की स्थापनासे हो सकता है । पहला मार्ग गांधीजीने सुझाया था, किन्तु काँग्रेस नेताओंने स्वीकार नहीं किया । फलतः दूसरा मार्ग काम में लाया जा रहा है । प्रत्येक दल काँग्रेसकी साख और शानसारूढ होने का लाभ उठाने की दृष्टि से काँग्रेस पर अधिकार करने को व्यग्र है । इनमेंसे कोई दल काँग्रेस पर अधिकार करे, किन्तु स्पष्ट दल होने तक दो पाटोंके बीच जनता को अवश्य पिसना पडेगा । जबतक कि यह दोनों को तिलांजलि देकर **अपना अलग संघटन न कर ले** । "

– राष्ट्रधर्म – वर्ष – २, अंक ८, भाद्रपद पूर्णिमा २००७
(आगस्त, सन १९५०)

२. यथे हे उल्लेखनीय आहे की, संघ पहिल्या दोन-सव्वादोन दशकांपर्यंत ' श्रुती-अवस्थे 'त होता. कार्यविस्तारामुळे येणारी ' स्मृती-अवस्थे 'ची अपरिहार्यता तावत्काल-पर्यंत निर्माण झाली नव्हती. संभाव्य आवश्यकतांचा विचार करून माननीय बाबासाहेब

आपटेप्रभृती श्रेष्ठींनी संघवर्तुळात अशा गुणवत्तेचा शोध घ्यायला सुरुवात केली होती, व श्री. भास्करराव निनावे, भिशीकर बंधू आदी मंडळींना प्रोत्साहन देणेही चालू केले होते; परंतु लेखक–साहित्यिकांचा मोठा गोट जमवून त्यांच्या द्वारे संघाचा प्रचार करावयाचा, ही कल्पना त्या वेळी अप्रस्तुत वाटत होती. तशी योजना असती तर ती अमलात आणणे कठीण होते असे नाही. कारण श्री. केशवराव वकील प्रभृतींच्या 'आकांक्षा' या हस्त-लिखित नियतकालिकाच्या स्तंभांतून उदीयमान, संघवर्तुळातील लेखकांची गोष्ट बाजूला ठेवली, तरी प्रखर हिंदुत्वनिष्ठ साहित्यिकांचा एक चांगला वर्ग त्या वेळी विदर्भात उपलब्ध होता. 'वागीश्वरी', 'सावधान' गटाचे सर्वश्री वासुदेवराव फडणवीस, रा. बा. मावकर, शं. बा. शास्त्री, रा. वि. काळी, तात्याजी काळीकर, (बाळाजी हुद्दार) ज. के. (बुवा) उपाध्ये, श्री. रा. बोबडे आदींचा यांत समावेश होता. (काही काळ श्री. पु. भा. भावेही याच गटात होते.) आणि पूजनीय डॉक्टरांचे या सर्वांशी घनिष्ट संबंधही होते. परंतु संघटनेच्या दृष्टीने त्या वेळी तशी अवस्था आलेली नव्हती. हा एक योगायोगच म्हटला पाहिजे की, पंडितजींनी प्रचारक-जीवनाला प्रारंभ केल्यानंतर थोड्याच अवधीत संघाने या 'स्मृती–अवस्थे'त प्रवेश केला.

३. श्री. सी. के. एन्. राजा आपल्या 'Acquitted by history' या लेखात लिहितात –

"'Dharma' in ancient Indian jurisprudence can not be considered a synonym for the Anglican word 'LAW' since the former has a wider connotation and application. However, in the absence of an exact equivalent for the word in English, 'Law' can be accepted as coming close to 'Dharma'".

["प्राचीन भारतीय न्यायशास्त्रातील 'धर्म' शब्द इंग्रजीतील 'कायदा' या शब्दाशी समानार्थक मानता येत नाही. कारण 'धर्म' शब्दाला अधिक व्यापक आशय आणि व्यावहारिक अर्थ आहे. पण इंग्रजी भाषेत दुसरा नेमका शब्द नसल्या-मुळे 'धर्म' शब्दाच्या जास्तीत जास्त जवळ येणारा शब्द म्हणून 'कायदा' या शब्दाचा स्वीकार करता येईल."]

४. भारतीय पारंपरिक शब्दांच्या वापराविषयी पंडितजींचा आग्रह असे. पंडितजींनी वापरलेल्या काही परिभाषा व कल्पना यांचे अधिकृत स्पष्टीकरण 'दैशिक शास्त्र' या ग्रंथात आढळते. 'चिती', 'विराट' आदी संज्ञांचे विवरण त्यात सापडते. 'अधिलवण अवधारणा' ही सुद्धा अशीच एक कुटुंबनियोजनविषयक (दैशिक शास्त्राची) पारिभाषिक संज्ञा आहे. 'अर्यायाम' हाही दैशिक शास्त्रातील असाच एक

शब्द आहे. संपत्तीचा अभाव व प्रभाव दोन्ही राहू नये अशा रचनेला ' अर्थायाम ' असे म्हटले आहे. ' मातृदायिका ' हा शब्दही असाच आहे. गावातील कौटुंबिकांना त्यांच्या त्यांच्या निर्वाहयोग्य चांगली पिकाऊ जमीन वाटून द्यावयाची; ही जमीन बक्षिस देण्याचा, गहाण ठेवण्याचा, लिलाव करण्याचा किंवा विकण्याचा अधिकार मात्र कुणालाही नसावयाचा. गृहस्थाच्या मृत्यूनंतर त्याची ती जमीन त्याच्या पत्नीकडे जायची, आणि पत्नीच्या निधनानंतर ती जमीन पुन्हा राज्याकडे परत जायची – हेतू हा की, ती पुन्हा गावातील दुसऱ्या कोण्या कुटुंबाला, त्याच्या निर्वाहाचे साधन म्हणून वापरण्यासाठी देता यावी, – या प्रथेला ' मातृदाय प्रथा ' म्हणत असत. श्री. बद्रीसाह टूलधरिया हे या ग्रंथाचे लेखक आहेत. या ग्रंथाविषयी लोकमान्य टिळकांनी ग्रंथकर्त्याला असे लिहिले होते की,

" My view is entirely in accord with yours and I am glad to find that it has been so forcibly put forward by you in Hindi. "

[" माझे मत तुमच्या मताशी अगदी जुळते आहे व आपण इतक्या समर्थपणे ते हिंदीतून पुढे मांडले, याचा मला आनंद होतो. "]

या ग्रंथाचा पुढे व्हावा तितका प्रचार झाला नाही. याचे गुणग्रहण कित्येक दशकांनंतर पंडितजींकडून व्हावयाचे होते.

' दैशिक शास्त्रा 'व्यतिरिक्त इतर शास्त्रांतूनही काही पारिभाषिक शब्द त्यांनी घेतले होते व त्यांचा वापर ते अभ्यासवर्गात करीत. उदाहरणार्थ,

' अदेवमातृका कृषि ' व ' अपरमातृक उद्योग ' पहिल्या शब्दाचा पारंपरिक अर्थ होतो – अशी शेती की जी पावसावर अवलंबून नाही. (अर्थात् कालवे वगैरेच्या व्यवस्थेमुळे). ज्या उद्योगांतील उत्पादनप्रक्रियेकरता अन्य देशांवर अवलंबून रहावे लागत नाही अशा उद्योगाला दुसरी संज्ञा प्राप्त होते. आधुनिक काळातही उपयुक्त अशा जुन्या पारंपरिक शब्दांना व संज्ञांना पुन्हा प्रचलित करण्याकडे त्यांचा कल होता.

५. या संदर्भात एक लहानशी घटना उद्‌बोधक आहे. जनसंघाच्या कानपूर अधिवेशनाचे वेळी, दि. ३१ डिसेंबर १९५२ ला, संघस्वयंसेवकांचे एकत्रीकरण झाले होते, व डॉ. मुखर्जी स्वयंसेवकांना संबोधित करीत होते. मध्येच पाऊस सुरू झाला. त्या वेळी एक स्वयंसेवक त्यांच्या डोक्यावर छत्री धरण्याकरिता पुढे आला. छत्री घेण्याचे नाकारीत डॉ. मुखर्जी म्हणाले, " Why can I not stand this rain when so many hundreds of swayamsevakas are sitting in rain? Do you not consider me a swayamsevak ?"

[" हे शेकडो स्वयंसेवक पावसात बसले आहेत, मग मीच हा पाऊस का सहन करू शकणार नाही ? तुम्ही मला स्वयंसेवक मानीत नाही काय ? "]

६. श्री. कुली (Cooley) यांनी याविषयी पुढील मत प्रकट केले आहे.–

" A State is a body politic, or society of men, united together for the purpose of promoting their mutual safety and advantage by the joint efforts of their combined strengh. The terms nation and state are frequently employed, both in law of nations and in common parlance, as importing, the same thing, but the term nation is more strictly synonymous with people, and while a single state may embrace different nations or peoples, a single nation will be sometimes so divided as to constitute several states. "

[" राज्य हा एक राजकीय घटक किंवा आपल्या संयुक्त शक्तीने परस्परांची सुरक्षितता व सोयी-सवलती साधण्याच्या हेतूने एकत्रित झालेला मानव समूह असतो. सर्वसाधारण बोलण्यात किंवा राष्ट्रांच्या कायद्यात समान अर्थाचे म्हणून राष्ट्र आणि राज्य हे दोन्ही शब्द वापरले जातात; पण राष्ट्र हा शब्द लोकांशी अधिक काटेकोरपणे जुळणारा आहे. एकाच राज्यात अनेक राष्ट्रे असू शकतात. किंवा एकाच राष्ट्रातील लोकांची कधी कधी अनेक राज्यांत विभागणी होऊ शकते. "]

अशा विश्लेषणात्मक विचाराच्या अभावी भारतातील स्थितीविषयी जस्टिस राम जोईस यांनी केलेले पुढील विधान समजणे कठीण आहे. ते म्हणतात :

" By virtue of the governance of the same laws on all matters including Rajadharma, the entire population of this country constituted themselves into one People or Nation notwithstanding the innumerable political divisions constituting separate and independent states or territories under different kings or rulers. Despite the rise and fall of several kingdoms over the centuries, and many devastating wars in the achivement of maintaining the entire population under one system of law and as one People for generations was the most remarkable achievement of Indian society and its leadership····· "

[' राजधर्मासह सर्व बाबतींत समान कायद्यांचा अंमल चालत असल्याने या देशातील समस्त जनतेने स्वत:चे एक राष्ट्र बनविले. निरनिराळ्या राजांच्या किंवा शासकांच्या सत्तेखालील भिन्न भिन्न आणि स्वतंत्र राज्यांच्या व प्रदेशांच्या रूपाने देशाची अगणित राजकीय घटकांत विभागणी झाली, तरी एकराष्ट्रीयत्वात त्यामुळे बाधा आली नाही. अनेक शतकांच्या ओघात कित्येक राज्यांचा उदय आणि अस्त झाला, अनेक विध्वंसक लढाया झाल्या तरी सर्व जनता पिढ्यान्‌पिढ्या एकाच कायदेप्रणालीखाली एक राष्ट्र या नात्याने राखण्यात आली, हे भारतीय समाज व त्याचे नेतृत्व यांचे अत्यंत लक्षणीय कर्तृत्व होते. "]

सारांश, राष्ट्र (Nation) व राज्य (State) या दोन्ही संकल्पना एकच नाहीत.

तसेच राज्य (State) या संकल्पनेचे स्वरूप व तिची परिभाषा याविषयीसुद्धा विचारकांत स्पष्टता व एकवाक्यता नाही याची जाणीव अनेकांना नाही. नमुन्यादाखल पुढील काही व्याख्या पहा :

" The state is a community of persons, more or less numerous permanently occupying a definite portion of territory, independent of external control and possessing an organized government to which the great body of inhabitants render habitual obedience." — (Garner).

" A particular portion of mankind viewed as an organized unit." (Burgess).

" A territorial society divided into government and subjects, claiming within an allotted physical area a supremacy over other institutions. " — (Laski).

" Wherever there can be discovered in any community of men a supreme authority exercising a control over the social actions of individuals and groups of individuals and itself subject to no such regulations then we have a State ". — (Willoughby).

" What is commonly implied in the current use of the term ' State ' is (i) that the aggregate of human beings, thus denoted, is united, if in no other way, by the fact of acknowledging permanent obedience to a common government and having through the permanence of the relations between government and governed a corporate life distinguishable from the lives of its members, (ii) that the government exercises control over a certain portion of the earth's surface, and (iii) that the society has a not inconsiderable number of members, though the number cannot be definitely stated." (Sidgwick).

" A state is numerous assemblage of human beings, generally occupying a certain territory, amongst whom the will of the majority or an ascertainable class of persons is by the strength of such majority or class, made to prevail against any of their numbers who oppose it. " (Holland).

" A State is a combination or association of men, in the form of government and governed, on a definite territory, united together into a moral, organized, masculine personality, or, more shortly, the state is the politically organized national person of a definite country. " (Bluntschli).

[" राज्य म्हणजे पुष्कळ व्यक्तींचा असा एक समूह की, एका सुनिश्चित भूभागावर जो कायमचा राहातो, बाह्य नियंत्रणांपासून जो मुक्त असतो, ज्याचे एक

सुसंघटित सरकार असते व या सरकारच्या आज्ञांना बहुसंख्य रहिवाशी नित्याच्या जीवनात पाळतात." (गार्नर).

"मनुष्य-समाजाचा एक विशिष्ट भाग की ज्याकडे एक सुसंघटित घटक या नात्याने पाहिले जाते." (बर्जेस).

"शासन आणि प्रजा अशी विभागणी झालेला एका भूप्रदेशावरील समाज. या विशिष्ट भूभागात इतर संस्थांपेक्षा या समाजाचे अधिक वर्चस्व असते." (लास्की).

"जिथे एखाद्या मानवसमूहात एक सर्वश्रेष्ठ सत्ता आढळेल की जी व्यक्तीच्या आणि व्यक्तिगटांच्या सामाजिक गतिविधींचे नियंत्रण करते व स्वतः मात्र या नियंत्रणांनी बद्ध नसते, तिथे राज्य आहे असे म्हणावे." (विलौघकी).

"सध्या ज्या अर्थाने सामान्यतः 'राज्य' हा शब्द वापरला जातो, त्यातून पुढील आशय व्यक्त होतो – (१) अशाप्रकारे निर्देशित केला जाणारा मानवसमूह संघटित आहे. इतर कोण्याप्रकारे नसला तरी किमान एका समान शासनाच्या आज्ञा नित्यासाठी पाळण्यास त्याची मान्यता असल्याने आणि शासक व शासित यांच्यातील कायम स्वरूपाच्या नात्यामुळे त्याचे एक नियमबद्ध समूहजीवन सिद्ध झालेले आहे. हे समूहजीवन त्याच्या सदस्यांच्या जीवनाहून वेगळे असल्याचे दिसू शकते. (२) तेथील सरकारचा विशिष्ट भूभागावर अंमल आहे. (३) त्या समूहाची सदस्य-संख्या उपेक्षणीय नाही. ती किती असावी हे मात्र नक्की सांगता येणार नाही." (सिडविक).

"राज्य म्हणजे विशिष्ट भूभागावर राहाणारा पुष्कळशा माणसांचा एक समूह. असा समूह की ज्यात बहुमताची इच्छा किंवा त्यातील स्पष्टपणे दर्शविता येऊ शकेल अशा विशिष्ट वर्गातील लोकांची इच्छा त्या बहुमताच्या वा वर्गाच्या बळावर विरोधी मताच्या लोकांना मान्य करावयास लावली जाऊ शकते." (हॉलंड).

"राज्य म्हणजे माणसांचे एकत्र येणे किंवा राहाणे. हे एकत्रित जीवन सुनिश्चित भूप्रदेशावर शासक आणि शासित या स्वरूपाचे असते. ते एका नैतिक, सुसंघटित आणि पौरुषसंपन्न व्यक्तित्वात बांधले जाते. किंवा थोडक्यात सांगावयाचे तर राज्य म्हणजे विशिष्ट देशाचे राजकीय दृष्टया संघटित असलेले राष्ट्रीय व्यक्तिमत्व." (ब्लंटश्ली).]

७. आपल्याकडील सर्वश्री पुरुषोत्तमदास टंडन, डॉ. मुखर्जी, डॉ. आंबेडकर, लालबहाद्दूर शास्त्री, रफी अहमद किडवाई, डॉ. संपूर्णानंद, डॉ. सी. डी. देशमुख आदी उदाहरणां-प्रमाणेच पश्चिमेतही अपवादभूत असे काही राजर्षी होऊन गेले. उदाहरणार्थ, ऑस्ट्रियाचे

जोसेफ – द्वितीय व प्रशियाचे फ्रेडरिक द्वितीय. तसेच पुढील उल्लेख पाहा – " In 1789, when he was elected President, George Washington told his friend, ' I go to the chair of government with feelings not unlike those of a culprit who is going to the place of his execution. "

[" १७८९ साली ज्या वेळी जॉर्ज वॉशिंग्टन यांची अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष या नात्याने निवड झाली, तेव्हा ते आपल्या मित्राला म्हणाले, ' आपल्या मृत्युदंडाच्या स्थानाकडे एखाद्या गुन्हेगाराने जावे तशाच भावनेने मी सत्तेच्या खुर्चीकडे जात आहे.' "]

इतिहासाचार्य राजवाडे म्हणतात, " शेकडो रामदास भारतात निर्माण झाले असते तर अखिल भारतीय राष्ट्रनिष्ठा येथे उदयास येऊन पोसली असती. "

८. श्री. पु. ग. सहस्रबुद्धे आपल्या ' इहवादी शासन ' या ग्रंथात म्हणतात, " पण युरोपात मार्सिग्लिओ, वायक्लिफ्, इरॅस्मस, ल्यूथर यांनी इहवादाचे जे तत्त्वज्ञान सिद्ध केले, तसे भारतात कोणी केले नाही····· त्या नव्या आचाराच्या समर्थनार्थ कोणी ग्रंथ लिहिले नाहीत. "

युरोपातील इहवाद (Secularism) च्या उदयाचा इतिहास ' The Rise and Influence of Rationalism in Europe ' या आपल्या ग्रंथात विलियन एडवर्ड लेकी या आयरिश ग्रंथकाराने दिला आहे.

९. सामान्यतया अशी धारणा दिसून येते की तथाकथित समृद्ध पाश्चात्य देशांत पूर्ण असे सेक्युलॅरिझम आहे. परंतु हे खरे नव्हे. एक विद्वान सोव्हिएट लेखक ए. बारमिनकोव्ह ' फ्रीडम ऑफ कॉनशियन्स इन दी यूएस्एस्आर् ' नावाच्या आपल्या ग्रंथाच्या पाचव्या अध्यायात म्हणतो, " अंतःकरणाचे स्वातंत्र्य, तसेच राज्यापासून चर्चला आणि चर्चपासून शिक्षणयंत्रणेला सिद्धांततः पृथक् करण्याची घोषणा करूनदेखील बुर्जुवा कधीही प्रत्यक्षात तसे करीत नाहीत. सत्ता हस्तगत केल्यानंतर त्यांनी नास्तिकांच्या विरुद्ध लढ्यात चर्चला समर्थन दिले. आजसुद्धा कित्येक भांडवलशाही देशांत नास्तिकतेपासून धर्माचा बचाव करण्यासाठी चर्चला शासनापासून वेगळे करून कवचरूपाने त्याचा उपयोग केला जातो. तसेच जसजशी नास्तिकता वाढत आहे आणि विभिन्न धर्म आपापला बेसूर राग आलापीत आहेत तसतसे शोषक वर्गाला तडजोडीची सवलत मिळवून देण्यासाठी चर्चचा उपयोग केला जात आहे. कित्येक भांडवलशाही देशांत चर्च हे राज्यतंत्राचे खरेखुरे आणि काही प्रसंगी वैधानिक रूपाने अंग आहे. राज्ये चर्चला आर्थिक मदत देतात आणि चर्चचा उपयोग वर्गहितासाठी करतात.

अधिकांश भांडवलशाही देशांतील संविधानांत इतर उपासनापद्धतींवर बंदी घालून एका विवक्षित उपासनापद्धतीला लाभ करून देण्याच्या हेतूने व्यवस्था केली गेली आहे. उदाहरणार्थ – एवेन्जेलिकल ल्यूथरन चर्च ही डेन्मार्क, नॉर्वे व स्वीडनमधील सरकारी उपासनापद्धती आहे. ग्रीसचे सरकार ईस्टर्न ऑर्थोडॉक्स चर्चचे समर्थन करते, तर ब्रिटनमध्ये चर्च ऑफ इंग्लंडचे प्रभुत्व आहे. स्पेनमध्ये रोमन कॅथॉलिक हे प्रस्थापित चर्च आहे. कुठल्या एका पंथाला सरकारी दर्जा दिल्याने इतर धर्म आणि पंथ स्वाभाविकपणे दुय्यम दर्जाचे ठरतात. आजच्या जगात थोड्याफार अंतराने असाच व्यवहार केला जात आहे. मध्यपूर्व, दक्षिणपूर्व एशिया आणि आफ्रिकेच्या सतरा देशांत इस्लामला कायद्याने विशेष दर्जा देण्यात आला आहे. चौदा युरोप व लॅटिन अमेरिकी देशांत रोमन कॅथॉलिक चर्चला लाभ देण्यासाठी पूर्ण व्यवस्था करण्यात आली आहे. विशिष्ट मान्यताप्राप्त चर्चचा सदस्यच बावीस देशांत राज्यप्रमुख बनू शकतो, अर्जेंटिना, लायबेरिया आणि इराणमध्ये पण सरकारी नोकरांसाठी अशीच योग्यता आवश्यक असते. मग अंतःकरणाच्या स्वातंत्र्याचा काय अर्थ ? उत्तर आयर्लंडच्या कॅथॉलिकांच्यावर राजकीय उद्देशासाठी ब्रिटनमधील सत्तारूढ वर्गाच्या पाठिंब्याने प्रॉटेस्टंट उग्रवादी हल्ले चढवितात. त्याच प्रकारे कॅथॉलिक स्पेनमध्ये प्रॉटेस्टंट लोकांचा रानटी छळ केला गेला होता. त्यांना कोठल्याही सरकारी विभागात रोजगार मिळत नसे आणि शाळेतून शिकविण्याची पण अनुमती नसे. तसेच सेवेत त्यांना अधिकाराच्या पदावर पदोन्नत केले जात नसे.

जरी अमेरिकेत अंतःकरणाच्या (आत्म्याच्या) स्वातंत्र्याची जाणि चर्चला राज्यापासून अलग केल्याची औपचारिक घोषणा केली गेली आहे, तरीपण अधिकांश सरकारी संस्थांत अजूनही धार्मिक रीती-पद्धतीप्रमाणे समारंभ साजरे करतात. अमेरिकन काँग्रेसचे सेशन इसाई प्रार्थना म्हणून आरंभ केले जाते. निव्वळ शासनाचे अधिकारीच नव्हेत, तर राष्ट्रपतिदेखील जेव्हा पदग्रहण करतात त्या वेळी त्यांना सुद्धा धार्मिक शपथ घ्यावी लागते. बेचाळीस देशांच्या घटनांतील प्रस्तावनेत ईश्वराची प्रार्थना केली गेली आहे. कैक देशांत न्यायाधीश नास्तिकांची साक्ष स्वीकारत नाहीत. नास्तिकांना सरकारी नोकरीत भरती करण्यात येत नाही. डेलावारे स्टेटच्या घटनेनुसार सगळ्या नागरिकांना सार्वजनिक प्रार्थनेत हजर रहाणे अनिवार्य आहे. अंतःकरणाचे (आत्म्याचे) स्वातंत्र्य भांडवलशाही देशांत आजदेखील फक्त पूजेचे अर्थात् उपासनापद्धती अंगिकारण्याचे स्वातंत्र्य मानले जाते. पण बऱ्याच ठिकाणी तसे देखील नाही.

नॉर्वेच्या घटनेप्रमाणे अशी व्यवस्था आहे की, सगळ्या नागरिकांनी आपल्या मुलांना प्रस्थापित एवेन्जेलिकल ल्यूथरन चर्चच्या भावनेप्रमाणेच शिक्षित केले पाहिजे. पश्चिम जर्मनीमध्ये चर्च बऱ्याच शिक्षणसंस्थांचे व शाळांचे चालक आहे. ग्रीसच्या कायद्याप्रमाणे माध्यमिक व प्राथमिक शाळांतील शिक्षण 'ग्रीक ख्रिश्चन संस्कृतीच्या वैचारिक आदर्शां' सहित राष्ट्रीय अस्मितेला अनुसरून असले पाहिजे. धार्मिक शिक्षणासाठी इस्राईलमध्ये एक राज्यपरिषद आहे. आणि यहुदीवादाला शासकीय उपासना-पद्धतीची मान्यता दिली गेली आहे. "

अर्थात् इथे हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही की, कम्युनिझममध्ये रिलिजनची सर्व लक्षणे उपस्थित आहेत. मार्क्स हा त्यांचा महंमद, दास कॅपिटल हे त्यांचे कुराण, कम्युनिझमचा उच्चतर चरण हा त्यांचा सातवा स्वर्ग व डायलेक्टिसिझम हा त्यांचा अल्लाह. त्यामुळेच विविध दर्शनांचे अध्ययन केलेले डॉ. सर सर्वपल्ली राधाकृष्णन् यांनी हा निष्कर्ष काढला आहे की, कम्युनिझम एक रिलिजन आहे.

येथे हेही उल्लेखनीय आहे की, सन १९४५ मध्ये स्टॅलिनने मास्को चर्चचे पुनरुज्जीवन केले होते व अलेक्सी या धर्माचार्याची मास्को पीठावर नेमणूक केली होती.

१०. आपल्या सुप्रसिद्ध उत्तरपाडा भाषणात श्री अरविंद म्हणतात, "आज मी हे म्हणत नाही की, राष्ट्रीयता हा एक विश्वास आहे, हा एक धर्म आहे, निष्ठा आहे, किंवहुना मी असे म्हणत आहे, की सनातन धर्मच आमच्याकरिता राष्ट्रीयता आहे. हिंदू राष्ट्र सनातन धर्माला घेऊनच निर्माण झाले आहे, त्याला घेऊनच चालले आहे आणि त्यालाच घेऊन वाढत आहे. जेव्हा सनातन धर्माची हानी होते, तेव्हा या राष्ट्राचीही अवनती होते; आणि जर सनातन धर्माचा विनाश संभवनीय असता, तर सनातन धर्माच्या बरोबरच या राष्ट्राचाही विनाश झाला असता. सनातन धर्मच आहे 'राष्ट्रीयता.'"

११. या विषयासंबंधी डॉ. मुखर्जींचा जीव कसा तिळतिळ तुटत होता व त्यामुळे ते कसे पोटतिडिकीने बोलत ह्याचा पुढील नमुना पहा –

दि. ७ ऑगस्ट १९५२ रोजी पाकव्याप्त काश्मीरविषयी लोकसभेत बोलताना ते म्हणाले, "Is there any possibility of our getting back this territory (Pak-occupied Kashmir)? We shall not get it through the efforts of UNO; we shall not get it through peaceful methods, – by negotiations with Pakistan. That means we loose it unless we use force and the Prime Minister is unwilling to do it. Let us face facts–are we prepared to loose it?

["हा प्रदेश (पाकव्याप्त काश्मीर) आपणास परत मिळेल अशी काही शक्यता आहे काय? यूनोच्या प्रयत्नांतून तो आपल्याला मिळणार नाही. शांततापूर्ण मार्गाने म्हणजे पाकिस्तानशी वाटाघाटी करून तो आपल्याला मिळणार नाही. याचा अर्थ असा की जर आपण बळाचा वापर करणार नाही तर हा प्रदेश आपल्याला कायमचा गमवावा लागेल. आणि पंतप्रधानांची तर बळाचा वापर करण्याची इच्छा नाही. आपण वस्तुस्थितीला सरळ तोंड देऊ या – आपण हा प्रदेश गमवाव-यास तयार आहोत काय?"]

१२. केवळ नमुना म्हणून एका लहान राज्याचे उदाहरण घेऊ. राज्यपुनर्रचनेपूर्वी त्याला मध्यभारत असे नाव होते. त्या वेळेपासून प्रमुख रूपाने काम करणारे काही कार्यकर्ते आजही सक्रिय राजकारणात प्रसिद्धीच्या प्रकाशात आहेत. त्यांचा अलग नामनिर्देश न केला तरी चालेल. काही यापूर्वीच दिवगंत झाले आहेत. श्री. मोरेश्वर गद्रे (इंदोर), श्री. राजाभाऊ महांकाळ (उज्जैन), श्री. हरिसिंह पवार (वदनावर), श्री. शास्त्री (ग्वाल्हेर) श्री. ठाकुरदास जेठवाणी, (उज्जैन), श्री. गजा महाराज, (मंदसौर), श्री. भय्यासाहेब बडे (सेन्धवा), श्री. प्रेमचंदजी जैन, (खांडवा), श्री. हजारीलालजी (साजापूर) हे मातबर कार्यकर्ते कालवश झाले आहेत. त्यांच्याशिवाय मा. दादासाहेब दवे, मा. मनोहरराव मोघे, श्री. माणिकचंद बाजपेयी (भिंड), श्रीमती राधाबाई निमा (इंदोर), श्री. नथुलालजी मंत्री (गुणा), श्री. मदनलालजी पांडे (साजापूर) व श्री. गोविंदराव दळवी मास्तर (ग्वाल्हेर) हे आज अन्य क्षेत्रांत सक्रिय असलेले कार्यकर्तेही त्या वेळी मध्यभारत जनसंघाच्या ' मास्टरमाइंड ' ग्रुपमध्ये होते. पंडितजींच्या मार्गदर्शनाखाली श्री. कुशाभाऊ ठाकरे यांनी सतत अविश्रांत परिश्रम करून हा ग्रुप तयार केला होता. या लहानशा राज्याच्या टीमचे वर्णन केवळ उदाहरणादाखल केले आहे. तीच प्रक्रिया सर्व राज्यांतून व सर्व स्तरांवर चालत रहावी या दृष्टीने पंडितजी अखंड प्रयत्न करीत असत.

१३. प्रजापरिषदेच्या स्थापनेपूर्वी काश्मीरमध्ये 'नॅशनल कॉन्फरन्स' होती, परंतु जम्मूमध्ये निरनिराळचा बिरादरींच्या सभा काम करीत होत्या. नाही म्हणायला ' हिंदुराज्य सभा ' ही संस्था काही काळ चालली, परंतु पुढे तिचे सर्व पदाधिकारी नॅशनल कॉन्फरन्समध्ये सामील झाले. परिस्थिती जसजशी विकट होत गेली तसतशी जम्मूच्या हिंदू नागरिकांत नवचेतना निर्माण होऊ लागली. माननीय माधवराव मुळे, प्रा. बलराज मधोक, डॉ. ओमप्रकाश मैंगी, जगदीश अब्रोल, डॉ. सूरजप्रकाश, श्यामलाल शर्मा, दुर्गादास वर्मा, राधाकृष्ण शर्मा, ही मंडळी पंडित प्रेमनाथजी डोग्रा यांच्या निवासस्थानावर वारंवार एकत्र येऊन नवीन संस्थेच्या स्थापनेविषयी चर्चा करू लागली. पुढे जम्मूच्या प्रतिष्ठित नागरिकांची एक सभा ब्राह्मण-सभेत बोलावण्यात आली व तीत ' प्रजापरिषदे 'च्या स्थापनेची घोषणा करण्यात आली. या सभेत प्रमुखपणे भाग घेणारे लोक होते सर्वश्री परशुराम नागर, रायजादा अमरचन्द, गोपालदत्त मैंगी, देवेन्द्रशास्त्री, प्रा. रामकृष्ण, कविराज विष्णुगुप्त, चतरुराम डोगरा, श्रीनिवास मंगोत्रा, हंसराज पन्दोत्रा, वजीर हरिलाल, शिवनाथ नंदा, इत्यादी. प्रजापरिषदेचे पहिले अध्यक्ष वजीर हरिलाल व मंत्री श्री. हंसराज पन्दोत्रा निवडले गेले.

सन १९४६ नंतर कॉलेजच्या पहिल्या राष्ट्रीय उत्सवात नॅशनल कॉन्फरन्सने तिरंगी ध्वजाऐवजी आपला नांगरयुक्त झेंडा फडकविका. त्या विरुद्ध विद्यार्थ्यांनी निदर्शने केली. त्यांची धरपकड झाली. विद्यार्थ्यांनी आमरण उपोषण सुरू केले. ३५ दिवसांच्या अन्न-सत्याग्रहानंतर त्यांची मुक्तता झाली. हे दीर्घ उपोषण करणारे विद्यार्थी होते सर्वश्री

चमनलाल गुप्ता, तिलकलाल शर्मा, वेदप्रकाश चौहान, वेदमित्र, हरदेव, विश्वपाल, रामस्वरूप चौधरी, कॅप्टन रामस्वरूप, सत्यपाल गुलाटी, पवनसिंह, ओम्प्रकाश गुप्ता, यशपाल पुरी, द्वारिकानाथ गुप्ता व घनश्याम.

विद्यार्थ्यांच्या या आंदोलनानंतर पं. प्रेमनाथजी डोगरा, धनन्तरसिंह सलाथिया, कविराज विष्णुगुप्ता, श्यामलाल शर्मा, शिवराम गुप्ता व शिवनाथ नन्दा या प्रजापरिषदेच्या पुढाऱ्यांना अटक करण्यात आली. याला उत्तर म्हणून सत्याग्रह-आंदोलन सुरू करण्यात आले. सत्याग्रहाचे संचालन श्री. रूपचंद नन्दा व श्री. दुर्गादास वर्मा यांनी केले. हा सत्याग्रह १० महिने चालला. सत्याग्रहाच्या शेवटच्या दिवसांत जम्मूच्या महिलांचे एक शिष्टमंडळ दिल्लीला आले. यात प्रा. शक्ती शर्मा व श्रीमती सुशीला मैंगी प्रमुख होत्या. शिष्टमंडळाने सत्ताधारी व विरोधी पक्षांच्या पुढाऱ्यांच्या भेटी घेतल्या. त्यानंतर पं. नेहरूंनी बक्शी गुलाम महंमद यांना पत्र दिले. त्याच्या परिणामस्वरूप प्रजापरिषदेचा सत्याग्रह समाप्त झाला व पकडण्यात आलेल्या सर्वांची सुटका करण्यात आली.

यानंतर डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जींच्या नेतृत्वाखाली झालेल्या रोमहर्षक संग्रामाचे वृत्त सर्वविदितच आहे. या सत्याग्रहात सुन्दरबनीचे तीन व ज्योडियांचे ७ सत्याग्रही हुतात्मे झाले. त्यांनी आपल्या आत्मबलिदानाने आपल्या जन्मस्थानालाही महान् प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. त्याशिवाय या सत्याग्रहात छंबचे मेलाराम, हिरानगरचे भीखमसिंह व बिहारीलाल, रामबनचे शिबूराम, देवीसरण व भगवानदास यांनीही हुतात्म्याचे मरण स्वीकारले. हे सर्व १६ वीर सरकारच्या बंदुकीच्या गोळ्यांना बळी पडले. प्रजापरिषदेच्या या सोळा हुतात्म्यांची नावे भारताच्या अखंडतेच्या संग्रामाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिली जातील.

स्वातंत्र्योत्तर काळात भारताची अखंडता कायम टिकविण्याकरिता प्रजापरिषदेने केलेल्या या संघर्षाचा संपूर्ण इतिहास अद्यापि प्रकाशात आलेला नाही. प्रा. बलराज मधोक यांच्या लिखाणांत याविषयी काही उल्लेख आहेत, परंतु संपूर्ण इतिहास लिहिला जाणे आवश्यक आहे.

१४. या भाषणाचे प्रतिवृत्त दीनदयाळ शोध संस्थानचे त्रैमासिक 'मन्थन' याच्या मार्च १९८० च्या अंकात आले आहे. वानगीदाखल त्यातील काही भाग येथे उद्धृत करीत आहोत ..... "..... महामंत्री म्हणून त्यांची निवड होण्याकरिता त्यांनी स्वयंसेवक व प्रचारक या नात्याने प्राप्त करून घेतलेले गुण व संस्कार कारणीभूत झाले..... संघाचा उत्तम कार्यकर्ता बनण्यासाठी लोकसंग्रह करण्याच्या गुणाची सर्वांत अधिक आवश्यकता आहे .. ... हा लोकसंग्रहाचा गुण प्राप्त करण्यासाठी एका विशेष जीवनशैलीची आवश्यकता आहे. निरहंकार, साधेपणा, प्रामाणिकपणा यांची आवश्यकता आहे. 'बोले तैसा चाले' अशी त्याची वागणूक असावी. उक्ती व कृती यांत जो मेळ ठेवू शकत

नाही, तो लोकसंग्रह करू शकत नाही. लोकांना एकत्र केल्यानंतर त्यांच्या जीवनाला एक विशिष्ट दिशा द्यावयाची असते. राष्ट्र व समाज यासाठी संपूर्ण समर्पणभावाचा गुण त्यांच्या अंत:करणांत रुजवावयाचा असतो. हे सर्व प्रचारकाच्या व्यक्तिगत जीवनातून व व्यवहारांतूनच घडू शकते. केवळ भाषणबाजीने व चलाखीने लोकसंग्रह होऊ शकत नाही. याच्या आधारावर मनुष्यनिर्मिती होऊ शकत नाही." ..... "यावेळी असे विचारण्याचा मोह कोणालाही होतो की, आज दीनदयाळजी जिवंत असते तर त्यांनी काय केले असते ? या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण आहे. कदाचित सध्याच्या राजकीय परिस्थितीत त्यांनी राजकारणसंन्यास घेतला असता. खरे पाहिले तर, त्यांना केव्हाही राजकारणाविषयी आवड नव्हती. जनता पार्टी निर्माण झाल्यानंतर, एकतर रागरंग पाहून, सत्तेच्या सर्व स्थानांपासून ते दूर राहिले असते. इतकेच केवळ नव्हे तर, ते त्यातून बाहेर पडले असते व परत संघकार्यात आले असते. जर यावरही त्यांना राजकीय क्षेत्रात राहणे भाग पडले असते तर त्यांनी ' दुहेरी निष्ठे 'चा प्रश्न उपस्थित होताच राजकारणाला रामराम ठोकला असता व स्पष्ट घोषणा केली असती की, " मी मुळात संघाचा स्वयंसेवक आहे, माझे प्रेरणाकेंद्र संघ आहे आणि आज मी जो काही आहे, तो संघामुळेच आहे. " परंतु समजा, परिस्थितीच्या दडपणामुळे अशाही स्थितीत राजकारणात काम करीत राहणे अपरिहार्य झाले असते तर त्यांनी आपला वेळ दिल्लीत व्यर्थ दवडला नसता. ते सतत फिरत राहिले असते, देशातील आपल्या असंख्य सहकाऱ्यांशी त्यांनी सतत संपर्क ठेवला असता व प्राप्त परिस्थिती व जनतेची मन:स्थिती यांविषयी आपले विचार व कल्पना त्यांना सतत समजावून सांगितल्या असत्या. कार्यकर्त्यांशी व जनतेशी ते कटाक्षाने अखंड संपर्क ठेवीत असत. सध्या चालू असलेल्या राजकारणात त्यांनी भाग घेतला नसता. उलटपक्षी हळू हळू त्यांनी उत्तम पक्षबांधणी केली असती. कारण ते राजकीय पक्षाला केवळ सत्ताप्राप्तीचे साधन मानीत नव्हते. तत्त्वांना तिलांजली देऊन सत्ता मिळवणे त्यांना मान्य नव्हते. सत्तेपासून दूर राहून त्यांनी तत्त्वाधिष्ठित, सुसंघटित पक्ष उभा केला असता, मग तो पक्ष सुरुवातीला कितीही लहान का असेना ! "

" राष्ट्राचे उत्थान घडवावयाचे असेल तर अशा नव्या पुढाऱ्यांची आवश्यकता आहे की, ज्यांना आपल्या नावलौकिकाची अथवा प्रसिद्धीची पर्वा नाही, जे प्रधानमंत्रीपदाची सुद्धा पर्वा करीत नाहीत."

१५. उदाहरणार्थ, पंडितजींची पुढील प्रतिक्रिया पहा –

" अभी हाल ही में स्वतंत्र दल के महामंत्री ने हैदराबाद मे यह घोषणा की है कि उनका दल जनसंघ से तब तक समझौता नहीं करेगा जब तक जनसंघ पाकिस्तान और काश्मीर के संबंध में अपनी नीति मे परिवर्तन न करे । मैं मसानी को धन्यवाद देता हूं कि उन्होंने अपना मंतव्य इतने स्पष्ट रूप से प्रकट किया । उनकी इस घोषणा से हमें चुनाव संबंधी उस समझौते के बन्धन से मुक्त कर दिया जो स्वतंत्र दल के नेताओं के पाक

और काश्मीर संबंधी वर्तमान नीति के कारण, हमारे लिए पर्याप्त परेशानी का कारण बन गया था। "

" ----- यह स्वाभाविक है कि जनसंघ किसी भी दल से कोई समझौता न करे जो देश के किसी भू-भाग को आक्रमणकारी के हाथ सौंपने का विचार रखता है। ---- अच्छाई-बुराई के संबंध में हमे श्री. मसानी के उपदेशों की आवश्यकता नहीं है। देश की एकता और अखण्डता का प्रश्न, हमारी श्रद्धा का विषय है और उस की प्राप्ति के लिए हम कोई भी कसर उठा नहीं रखेंगे। "

(पाञ्चजन्य : २७ जुलाई १९६४, पृष्ठ १०)

१६. डॉ. आंबेडकरांची भूमिका अशी होती :

"To say that this country is divided by castes and creeds, and that it cannot be one united self-governing community unless adequate safeguards for protection of minorities are made a part of Constitution, is a position to which there can be no objection. But Minorities must bear in mind that although we are to-day riven by sects and atomised by castes, our ideal is a United India. No demand from Minority should, willingly or unwillingly. sacrifice this ideal".

["हा देश जाती आणि संप्रदाय यांनी विघटित झाला आहे आणि अल्पसंख्याकांच्या संरक्षणासाठी घटनेत योग्य तरतूद केल्याखेरीज तो संघटित, स्वयंशासित समाज बनू शकणार नाही असे म्हणण्यात कोणाला काही आक्षेपार्ह वाटू नये, पण अल्पसंख्याकांनी ध्यानात ठेवले पाहिजे की आज आपण अनेक पंथांत विभागलो गेलो असलो व जातींमुळे आपले छोटे छोटे तुकडे पडले असले तरी आपले उद्दिष्ट भारताचे ऐक्य हेच आहे. अल्पसंख्याकांनी अशी कोणतीही मागणी स्वेच्छेने वा अनिच्छेने करू नये की जीमुळे या उद्दिष्टाची हानी होईल."]

१७. दि. ६ डिसेंबर १९५६ या दिवशी पूज्य बाबासाहेबांच्या महानिर्वाणानंतर 'अ. भा. शेड्यूल्ड् कास्ट्स् फेडरेशन' च्या राष्ट्रीय कार्यसमितीची बैठक दि. ३१-१२-१९५६ व १-१-१९५७ या दिवशी नगर येथे झाली. तीत बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांची अध्यक्षपदी निवड घोषित करण्यात आली, तसेच सर्वोच्च मध्यवर्ती मंडळाची स्थापना करण्यात आली. या प्रेसिडियममध्ये सर्वश्री बॅ. राजाभाऊ खोब्रागडे, दादासाहेब गायकवाड, जी. टी. परमार, एम्. रत्नम्, आर. डी. भंडारे, के. बी. तळवटकर आणि बी. सी. कांबळे ही मंडळी होती. त्यानंतर दि. ३-४ ऑक्टोबर १९५७ या दिवशी नागपूर येथे बोलाविण्यात आलेल्या खास अधिवेशनात हंगामी मध्यवर्ती कार्यसमितीची घोषणा करण्यात आली व तिची मुदत ३

ऑक्टोबर १९५८ पर्यंत आहे, असे जाहीर करण्यात आले. बॅ. खोब्रागडे यांनी ही मुदत ३ मार्च १९५९ पर्यंत वाढविली असल्याचे घोषित केले. ही गोष्ट काही पक्षश्रेष्ठींना मानवली नाही. बाबू हरिदास आवळे, एन्. एम्. कांबळे, दादासाहेब रूपवते व बी. सी. कांबळे यांनी अशी भूमिका घेतली की, ३ ऑक्टोबर १९५८ नंतर आता कोणीही पक्षाचा पदाधिकारी उरला नाही व म्हणून बॅ. खोब्रागडे यांनी दि. २७ ऑक्टोबर १९५८ रोजी बोलाविलेली जनरल कौन्सिलची बैठक बेकायदेशीर आहे. हा तांत्रिक विवाद पक्षाच्या विघटनेला निमित्त झाला. परंतु वस्तुतः व्यक्तिवादाच्या व जाती-उपजातीवादाच्या आधारावर पक्षात निरनिराळे गट तयार व्हायला आधीच प्रारंभ झाला होता. ही गटबाजी वाढता वाढता रिपब्लिकन पक्ष जवळजवळ १३ गटांत विभक्त झाला. प्रत्येक गटाचे धोरण अलग अलग ठरत राहिले, सर्व मिळून दलितांच्या मागण्यांसाठी लढा देण्याची प्रवृत्ती कमी व्हायला लागली. या सर्वांचा परिणाम म्हणून शे. का. फेडरेशन, रिपब्लिकन पक्ष व निळा झेंडा यांवर सर्वांचे प्रेम असूनही नेतृत्वाविषयीच्या पूर्वीच्या श्रद्धेला तडा गेला व त्यातूनच दलित पँथर सारख्या अतिरेकी चळवळीची भूमिका तयार झाली. हे सर्व असले तरी, श्री. नामदेव ढसाळ, राजा ढाले आदी मंडळींच्या नेतृत्वाखालील दलित पँथरचा प्रत्यक्ष उदय पंडितजी जिवंत असेपर्यंत झाला नव्हता. त्यामुळे दलित पँथरच्या परिणामस्वरूप निर्माण होणाऱ्या नाजुक परिस्थितीत हिंदुत्वनिष्ठांनी कोणत्या पद्धतीने वागावे, हे सांगण्याची पाळी पंडितजींवर आली नाही.

दलित पँथरच्या स्थापनेची घोषणा दि. ९ जुलै १९७२ रोजी सिद्धार्थनगर, बापटी रोड, मुंबई येथे एका बैठकीत करण्यात आली. त्या बैठकीत सर्वश्री नामदेव ढसाळ, राजा ढाले, लतीफ खाटीक, न. वि. पवार, अविनाश महातेकर, भाई शृंगारे ही मंडळी उपस्थित होती.

सन १९७२–७३ च्या सुमारालाच कर्नाटकात सर्वश्री बसवलिंगप्पा, व्ही. टी. राजशेखर शेट्टी, कृष्णप्पा, कृष्णस्वामी, सिद्दलिंगप्पा, डॉ. डी. आर. नागराज प्रभृतींची याच प्रकारची चळवळ सुरू झाली व तिच्या अंतर्गत सवर्ण-विरोधी भडक, उद्दीपक प्रचारही प्रारंभ झाला.

राजा ढाले ते राजशेखर शेट्टी ते दलित मुस्लिम सुरक्षा महासंघाचे नेते हाजी मस्तान मिर्झा हा चळवळीचा प्रवास फार द्रुत गतीने झाला.

परंतु हा सर्व घटनाक्रम सन १९६८ च्या नंतरच्या काळातील आहे. सन १९५६ ते १९६८ पर्यंतच्या दलित नेतृत्वातील प्रभावशाली व्यक्ती म्हणजे सर्वश्री दादासाहेब गायकवाड. दा. ता. रूपवते, रा. सु. गवई, वासुदेव गाणार, राजाभाऊ खोब्रागडे, हरिदास आवळे, ना. ह. कुंभारे, डी. ए. कट्टी, बी. सी. कांबळे, घनश्याम तळवटकर, रा. धों. भंडारे, एन्. शिवराज, सखाराम मेश्राम, श्रीमती शांताबाई दाणी, ईश्वरीबाई, ही मंडळी होती. सन १९६८ नंतरच्या काळात या मंडळींचा प्रभाव क्रमशः कमी होऊ लागला व दलित नेतृत्वाच्या क्षितिजावर नवीन व्यक्तींचा उदय होऊ लागला.

८. In his speeches at the Thana Meet in 1973, which constitute his 'Magnum Opus', Shri Guruji explained the basic Hindu view on economic problems. Deductions that naturally flow his enunciation are as follows :

1) The basic requirements of life must be made available to every citizen.

2) Material wealth is to be acquired, so that we can serve God in the form of society, in the best possible manner, and out of all that wealth, only the minimum should be used for selfsake the denial of which will hamper our capacity for service. To claim or to make a personal use of more than that is verily the act of theft against the society.

यावत् भियेत जठरं तावत् स्वत्वं हि देहिनाम् ।
अधिकं योऽभिमन्येत स स्तेनो दण्डमर्हति ।।

3) Thus we are only the trustees of the society. It is only when we become true trustees that we can serve the society best.

4) Consequently, there must be some ceiling on the individual accumulation, and no person has a right to exploit someone else's labour for personal profit.

5) Vulgar, ostentatious and wasteful expenditure is a sin when millions are starving. There must be reasonable restrictions on all consumption. 'Consumerism' is not compatiable with the spirit of the Hindu culture.

6) 'Maximum production and equitable distribution' should be our motto; national self-relience, our immediate goal.

7) The problem of unemployment and under-employment must be tackled on war-footing.

8) While industrialisation is a must, it need not be the blind imitation of the West. Nature is to be milked and not raped. Ecological factors, balance of nature and the requirements of the future generations should also be taken into account. There should be an integrated thinking on Ecology, Economics and Ethics.

9) Greater stress should be laid on the labour intensive rather than the capital-intensive industries.

10) Our technologists should be required to introduce, for the benefit of the artisans. reasonably adaptable changes in the traditional

techniques of production, without incurring the risk of increase in unemployment of workers, wastage of the available managerial and technical skills, and complete decapitalisation of the existing means of production, and to evolve our own indigenous technology with great emphasis on decentralisation of the processes of production with the help of power, with home instead of factory, as a centre of production.

11) It is necessary to reconcile efficiency with employment expansion.

12) Labour is also one form of capital in every industry. The Labour of every worker should be evaluated in terms of share, and workers raised to the status of shareholders contributing labour as their share.

13) Consumers' interest is the nearest economic equivalent of national interest. Society is the third, and more important party to all industrial relations. The current Western Concept of ' collective bargaining ' is not consistent with this view. It should be replaced by some other terms such as, National Commitment ' i. e., the commitment of both the employers and the employees to the Nation.

14) The surplus value of labour belongs to the Nation.

15) There need not be any rigidity about the patterns of industrial ownership. There are various patterns, such as, private enterprise nationalisation. co-operation, municipalisation, democratisation, self employment, joint industry, etc. For each industry the pattern of owner ship should be determined in the light of its peculiar characteristics and the total requirements of the national economy.

16) We are free to evolve any variety of socio-economic order provided it is in keeping with the basic tenets of Dharma.

17) But changes in the superstructure of society will be of no use if the mind of every individual citizen is not moulded properly. Indeed, the system works ill or well according to the men who work it out.

18) Our view of the relation between individual and society has always been, not one of conflict. but of harmony and co-operation, born out of consciousness of a single reality running through all the individuals. The individual is a living limb of the corporate social personality.

19) The Sanskaras of identification with the entire Nature constitute the real social infra-structure of any socio-economic order.

["श्रीगुरुजींच्या विचारांचा सर्वोच्च आविष्कार साररूपाने ठाणे येथे १९७३ साली त्यांनी केलेल्या भाषणात आढळतो. या भाषणात त्यांनी आर्थिक प्रश्नांकडे पाहण्याची मूलभूत हिंदू दृष्टी विशद केली. त्यांच्या प्रतिपादनातून स्वाभाविकपणेच जे निष्कर्ष निघतात ते पुढीलप्रमाणे आहेत.

(१) प्रत्येक नागरिकाच्या जीवनविषयक प्राथमिक गरजा पूर्ण केल्याच पाहिजेत.

(२) परमेश्वराची समष्टिरूपात उत्तमात उत्तम सेवा करता यावी म्हणून भौतिक समृद्धी प्राप्त करून घ्यावयाची असते. त्या संपत्तीपैकी कमीत कमी अंश आपल्या स्वत:साठी वापरावयाचा असतो. एवढाच अंश की जो नाकारला असता सेवा करण्याची आपली क्षमताच बाधित होईल. त्यापेक्षा अधिकावर हक्क सांगणे अथवा व्यक्तिगत उपयोगासाठी वापरणे म्हणजे समाजाविरुद्ध चोरीचाच गुन्हा होय.

यावत् भ्रियेत् जठरं तावत् स्वत्वं हि देहिनाम् ।
अधिकं योऽभिमन्येत स स्तेनो दंडमर्हति ।।

(३) याप्रकारे, आपण समाजाचे केवळ विश्वस्त आहोत. ज्या वेळेला आपण खरे विश्वस्त बनू त्याच वेळेला समाजाची उत्कृष्ट सेवा आपण करू शकू.

(४) अर्थातच, व्यक्तिगत संपत्ति-संचयावर काही कमाल मर्यादा असली पाहिजे. व्यक्तिगत लाभासाठी इतरांच्या श्रमांचा गैरवापर करण्याचा कोणालाही अधिकार नाही.

(५) लक्षावधी लोक उपासमारीने ग्रस्त असता अभद्र, भपकेबाज आणि उधळपट्टीचा खर्च करणे हे पाप आहे. सर्व उपभोगांवर न्याय्य निर्बंध असले पाहिजेत. 'उपभोक्तावाद' हिंदू संस्कृतीच्या आदर्शवादाशी जुळणारा नाही.

(६) 'जास्तीत जास्त उत्पादन व न्याय्य वितरण' हे आपले उद्दिष्ट असले पाहिजे. राष्ट्रीय स्वावलंबन हा त्याचा नजिकचा टप्पा समजावा.

(७) बेकारी व अर्धबेकारी या समस्यांच्या विरोधी उपाययोजना युद्धपातळीवर करावी.

(८) औद्योगीकरण अपरिहार्य असले तरी ते पाश्चात्यांचे अंधानुकरण असण्याची गरज नाही. निसर्गाचे दोहन करावयाचे असते, त्यावर बलात्कार करावयाचा नसतो. पर्यावरणविषयक बाबी, निसर्गाचा समतोल आणि भावी पिढ्यांच्या आवश्यकता याही हिशोबात घेतल्या पाहिजेत. पर्यावरणशास्त्र, अर्थशास्त्र आणि नीतिशास्त्र यांचा समग्र-विचार आवश्यक आहे, तुटक विचार नको.

(९) भांडवलप्रधान उद्योगांपेक्षा श्रमप्रधान उद्योगांवर अधिक भर देण्यात यावा.

(१०) आपल्या तंत्रविशारदांनी व्यावसायिकांच्या लाभासाठी परंपरागत उत्पादनतंत्रात सहज करता येण्यासारखे बदल घडवून आणावे. दृष्टी ही असावी की, कामगारांतील बेकारी वाढण्याचा धोका राहाणार नाही; उपलब्ध व्यवस्थापकीय आणि तांत्रिक कौशल्य वाया जाणार नाही. सध्याची उत्पादनसाधने भांडवल या नात्याने पूर्णतः निकामी बनणार नाहीत. तंत्रविशारदांनी आपले स्वतःचे स्वदेशी तंत्रज्ञान विकसित केले पाहिजे. त्यात उत्पादन-प्रक्रियांच्या विकेंद्रीकरणावर भर असावा. त्यासाठी विजेच्या शक्तीचे सहाय्य घेऊन कारखान्याऐवजी घर हेच उत्पादनाचे केंद्र बनविण्याचा प्रयत्न असावा.

(११) रोजगाराच्या वाढीबरोबर कार्यक्षमताही सांभाळणे आवश्यक आहे.

(१२) प्रत्येक उद्योगात श्रम हाही भांडवलाचाच एक प्रकार असतो. प्रत्येक कामगाराच्या श्रमाचे मूल्य भागभांडवलाच्या पद्धतीने करण्यात यावे आणि श्रमरूप भांडवल पुरविणाऱ्या भागधारकांचा दर्जा कामगारांना देण्यात यावा.

(१३) उपभोक्त्यांचे हितसंबंध व राष्ट्रीय हितसंबंध या आर्थिक क्षेत्रात जास्तीत जास्त पर्यायवाचक गोष्टी आहेत. सर्व औद्योगिक संबंधांत समाज हा तिसरा आणि अधिक महत्त्वाचा पक्ष असतो. 'सामूहिक सौदेबाजी'ची प्रचलित पाश्चात्य कल्पना या भूमिकेशी सुसंगत नाही. त्याऐवजी दुसरी एखादी शब्दयोजना उपयोगात आणली पाहिजे. उदाहरणार्थ, राष्ट्रीय बांधिलकी असे म्हणता येईल. कामगार व मालक या उभयतांचीही राष्ट्राशी काही वचनबद्धता यातून व्यक्त होते.

(१४) श्रमाचे अतिरिक्त मूल्य राष्ट्राच्या मालकीचे असते.

(१५) औद्योगिक मालकीचे काही साचेबंद प्रकार असण्याची आवश्यकता नाही. खाजगी उद्योग, राष्ट्रीयीकरण, सहकारीकरण, म्युनिसिपलायझेशन, लोकशाहीकरण, स्वयंरोजगार, संयुक्त उद्योग वगैरे अनेक प्रकार आहेत. प्रत्येक व्यवसायाची विशिष्ट प्रकृती आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या आवश्यकता ध्यानात घेऊन तेथील स्वामित्वाचा प्रकार ठरवावा लागेल.

(१६) धर्माच्या मूलभूत आदेशांशी सुसंगत अशी कोठलीही आर्थिक-सामाजिक रचना निर्माण करण्याची मोकळीक आपल्याला आहे.

(१७) पण जर प्रत्येक नागरिकाच्या मनाची घडण योग्य प्रकारे झाली नसेल, तर समाजाच्या बाह्य रचनेत वरवरचे व्यवस्थात्मक बदल करून काहीही उपयोग व्हावयाचा नाही. किंबहुना एखादी पद्धती राबविणारी माणसे जशी बरी किंवा वाईट असतील तशी ती पद्धती बरी किंवा वाईट निष्पन्न होते.

(१८) आपली धारणा सदैव अशीच राहात आलेली आहे की व्यक्ती आणि समाज यांच्यातील संबंध संघर्षाचे नसतात तर सुसंवादी व सहकार्याचे असतात.

एकच सत्तत्व सर्व व्यक्तींना व्यापून राहिलेले आहे, ही जाणीव या धारणेला आधारभूत असते. समग्र सामाजिक व्यक्तिमत्वाचा, प्रत्येक व्यक्ती हा एक जिवंत अवयव असतो.

(१९) संपूर्ण निसर्गाशी तादात्म्याचे संस्कार ही कोणत्याही सामाजिक - आर्थिक रचनेची खरी सामाजिक पूर्वसिद्धता असते.]

ठाणे-शिबिरात श्रीगुरुजींनी ज्या सामाजिक–आर्थिक पुनर्रचनेच्या आधारभूत सिद्धांतांची माहिती दिली त्यांची बऱ्याच प्रमाणात आठवण करून देणारी रचना युगोस्लाव्हियात आढळते. अर्थात् दोन्हींतील साम्य आंशिकच आहे हे उघड आहे. त्या रचनेचे अधिकृत प्रमुख सूत्र असे आहे –

" Self - management is basically a unified process of the integration of workers, their labour and resources, and the broadest possible basis for integrating all forms of human labour, all segments of society, for integrating the Yugoslav community on the basis of self-management and national and social equality. "

पं. दीनदयाळजींचे अनुयायी त्यांच्या याविषयींच्या कल्पना प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न करतील त्या वेळी एक आधारभूत प्रयोग म्हणून युगोस्लाव्हियाच्या ' The Associated Labour Act ' चा त्यांना फार उपयोग होण्यासारखा आहे.

१९. अशा मूलभूत दर्शनांची नैसर्गिक उत्तरोत्तर अभिव्यक्ती कोणत्या क्रमाने होते, या विषयी श्रीअरविंदांनी दिलेला पुढील अभिप्राय एकात्म मानवदर्शनालाही लागू पडतो.

" These (subjective) ideas are likely first to declare their trend in phylosophy, in psychological thinking, in the arts, poetry, painting, sculpture, music, in the main idea of ethics, in the application of subjective principles by thinkers to social questions, even, perhaps, though this is a perilous effort, to politics or economics, that hard refractory earth matter which most resists all but a gross utilitarian treatment."

[" या (व्यक्तिविशिष्ट) कल्पनांची दिशा प्रथम तत्त्वज्ञानात, मानसशास्त्रीय चिंतनात, कलाक्षेत्रात, काव्यात, चित्रात, शिल्पात, संगीतात, नीतीविषयक प्रमुख कल्पनेत, व्यक्तिगत तत्त्वे सामाजिक प्रश्नांना लागू करण्याच्या विचारवंतांकडून होणाऱ्या प्रयत्नांत प्रकट होते. आणि संभवतः – हा प्रयत्न अवघड असला तरी – राजकारण व अर्थकारण यांतही त्याचे प्रयोग केले जातात. प्रयत्न अवघड अशासाठी म्हणावयाचा की, राजकारण आणि अर्थकारण म्हणजे शुद्ध उपयुक्ततावादी उपचाराव्यतिरिक्त बाकी गोष्टी झिडकारणाऱ्या कठीण जड पदार्थांप्रमाणे असतात."]

२०. वरील ॲक्टपासून घटनेने केवळ पुढील बाबतींत भिन्न भूमिका स्वीकारली आहे·

The republican form of government.

The independence of Parliament from any kind of external control.

The complete responsibility of the executive to the legislature.

The inclusion of the princely states and the provinces within the same constitutional framework – and the adoption of the same democratic form of government to both alike.

The definition of citizenship.

The incorporation of the Fundamental Rights of citizens.

The declaration of the Directive Priciples of State Policy.

The abolition of separate electorates and the introduction of universal adult suffrage.

The vesting of the residuary powers in the federal government.

The power of the Union Parliament to amend the Constitution excepting some specified provisions, which require, in addition the consent of at least half the legislatures of the States.

[प्रजासत्ताक पद्धतीचे सरकार.

बाह्य नियंत्रणांपासून मुक्त अशी संसद.

सरकारच्या कार्यकारी अंगाचे विधानमंडळाला पूर्णपणे जबाबदार असणे.

राजेरजवाडयांच्या संस्थानांचा व राज्यांचा एकाच घटनात्मक चौकटीत समावेश आणि दोघांसाठीही एकाच प्रकारच्या लोकशाही शासनाला मान्यता.

नागरिकत्वाची व्याख्या.

नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचा समावेश.

सरकारी धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांची घोषणा.

वेगळ्या मतदारसंघांचे विसर्जन आणि सार्वत्रिक प्रौढ मतदानाच्या तत्त्वाचा अंगिकार.

शेष अधिकार संघ-शासनाकडे सुपूर्त करणे.

मध्यवर्ती संसदेला घटना दुरुस्तीचा अधिकार. काही विशिष्ट तरतुदींच्या बाबतीत मात्र संसदेच्या संमतिव्यतिरिक्त देशातील विधानसभांपैकी किमान अर्ध्या विधानसभांची मान्यता आवश्यक ठरविली आहे.]

२१. या संदर्भात हे सर्वज्ञातच आहे की, आपल्या देशात मेकॉलेच्या इंग्रजी शिक्षण-पद्धतीचे ध्येय " a class of persons, Indian in blood and colour, but English in taste, in opinions, word and intellect – –

[" रक्ताने आणि वर्णाने भारतीय पण अभिरुची, मते, भाषा आणि बुद्धी या सर्व बाबतींत इंग्रजी असलेल्या लोकांचा एक वर्ग "]

निर्माण करणे हे होते व त्यांनी गर्वाने असे उद्‌गार काढले होते की, " No Hindu who has received our English education, ever remains attached to his religion " ····· " India was not conquered on the battle-field of Plassy, but on the day when my bill of introducing English education in India was passed.

[" आपले इंग्रजी शिक्षण ज्याने घेतले आहे असा कोणीही हिंदू कधीही त्याच्या धर्मासंबंधी आपुलकी बाळगणार नाही. " ··· " भारतावर आपण विजय प्लासीच्या लढाईत संपादन केला नाही, तर माझे भारतीय शिक्षणासंबंधीचे विधेयक ज्या दिवशी संमत झाले, त्याच दिवशी भारत जिंकला गेला."]

स्वराज्य प्राप्तीनंतरच्या काळात या प्रकारच्या प्रयत्नांना खंड पडला नाही. उदाहरणार्थ, याच उद्दिष्टाच्या पूर्तीला पूरक असे कार्य श्री. Willex Adolf Visser't Hooft (विलेक्स ॲडॉल्फ विसेर्ट हुफ्ट) या डच गृहस्थाने सन १९४८ मध्ये स्थापन केलेल्या 'वर्ल्ड कौन्सिल ऑफ चर्चेस'नेही सर्वत्र चालू केले होते.

२२. " ज्ञातिराष्ट्रादिसंधानां साकल्यं चरितस्य यत् ।
व्यक्तं संस्कृतिशब्देन भाषाशास्त्रात्मकं ननु ।।

– ज्ञानकोशकार डॉ. श्री. व्यं. केतकर.

The word ' culture ' denotes a trend of impressions on the mind of a society which is peculiar to its own and which, again, is a cumulative effect of its passions, emotions, thoughts, speech and action throughout its history.

– ' Why Bharatiya Mazdoor Sangh '

" People sometimes ask, ' How do you define Hindu culture ? ' Well, we feel it, though we cannot define it. There are some who deny it altogether merely because they cannot define it. They say, " what is the use of a thing which we cannot define ?" But will this argument stand to reason ? Eor example, the entire course of medical science is evolved in order to protect life. But even the most modern scientists have not been able to define what ' life ' is. But that has not come in the way of the utility of medical science. The outward manifestation of ' life ' and its impact on men is sufficient to convince us of its actuality. "

– ' Bunch of Thoughts '

" Culture or Civilisation, taken in its wide ethnographic sense, is that complex whole which includes knowledge, belief, art, morals, custom, and any other capabilities and habits acquired by man as a member of society. "

British anthropologist E.B. Tylor.

" Culture is an historically derived system of ..... designs for living, which tends to be shared by ····· members of a group. "

– American anthropologist
Clyde Kluckhohn.

" धर्मके नियमोंके अनुसार जब प्रकृतिका परिष्कार होता है, तो उसे संस्कृति कहा जाता है। यह संस्कृति निश्चयही मानवजीवन की धारणा और उसके उदात्तीकरणमें समर्थ होगी। "

दीनदयाळ उपाध्याय

[' संस्कृती ' या शब्दाने समाजमानसावरील परिणामांची एकूण दिशा व्यक्त होते. ही दिशा खास त्याची असते आणि इतिहासाच्या ओघातील राग, लोभ, भावना, विचार, उच्चार आणि कृती यांच्या संकलित परिणामातून ती निष्पन्न झालेली असते.

– ' भारतीय मजदूर संघ का ? '

" लोक केव्हा केव्हा विचारतात, हिंदू संस्कृतीची तुमची व्याख्या काय ? " उत्तर एवढेच की व्याख्या करता येत नसली तरी आम्हाला ती जाणवते. संस्कृतीची व्याख्या करता येत नाही म्हणून ती नाकारणारेही अनेक जण आहेत. ते म्हणतात, ' ज्या गोष्टीची व्याख्याच करता येत नाही, त्या गोष्टीचा उपयोग काय ? पण हा युक्तिवाद तर्कसंगत म्हणता येईल काय ? उदाहरणार्थ, प्राण वाचविण्यासाठी सगळ्या वैद्यकशास्त्राचा विकास झाला. पण अगदी आधुनिक शास्त्रज्ञांना देखील ' प्राण ' म्हणजे काय याची व्याख्या करता आलेली नाही. परंतु वैद्यकशास्त्राच्या उपयुक्ततेत त्यामुळे कोणतीही बाधा आलेली नाही. ' जीवनाचा ' बाह्य आविष्कार व त्याचा मानवावरील परिणाम त्याच्या प्रत्यक्ष अस्तित्वाची खात्री पटविण्यास पुरेसा आहे. "

– ' बंच ऑफ थॉट्स '

" व्यापक वंशशास्त्रीय दृष्टीने विचार केल्यास, संस्कृती किंवा सभ्यता म्हणजे ज्ञान, श्रद्धाविषय, कला, नैतिक कल्पना, चालीरीती व समाजाचा घटक या नात्याने प्राप्त केलेल्या पात्रता व सवयी यांचा संमिश्र समुच्चय होय. "

– ई. बी. टेलर (एक ब्रिटिश वंशशास्त्रज्ञ)

" संस्कृती म्हणजे इतिहासातून निष्पन्न झालेला जीवनाचा एक आकृतिबंध. विशिष्ट लोकसमूहातील सदस्य त्यात सहभागी असतात. "

– क्लाइड क्लकहोहन (अमेरिकन वंशशास्त्रज्ञ)

२३. उदाहरणार्थ, फ्रेंच राज्यक्रांतीपूर्वी चर्चच्या पदाधिकाऱ्यांची मोठमोठी संस्थाने होती- फ्रान्समधील दीडलाख धर्माधिकाऱ्यांचे व्यक्तिगत उत्पन्न दरसाल चार ते पाच लाख- पर्यंत असे. शिवाय भाविक मंडळीकडून जवळजवळ तेवढीच रक्कम त्यांना मिळत असे. त्यांचे मठ राजवाड्यांसारखे सुखोपभोगाच्या सर्व साधनांनी युक्त असत. लोकांच्या उत्पन्नाचा सहावा भाग कर म्हणून चर्च वसूल करीत असे. चर्चचे वार्षिक उत्पन्न जवळजवळ पंधरा कोटींचे होते.

या पार्श्वभूमीवर मार्क्सची मनोवृत्ती समजण्यासारखी आहे, परंतु भारताची स्थिती याहून अगदी भिन्न होती. इथे संघटित चर्च कधीही राहिले नाही. व्यक्तिगत पुरोहित होते, परंतु युरोपप्रमाणे इथे पुरोहितशाही कधीच नव्हती. हे तथ्य ध्यानात न घेतल्यामुळे, पं. नेहरूंसारखे पुढारीही याच समीकरणाच्या प्रभावाखाली होते. त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट ही की, आपल्या आयुष्याच्या संध्याकाळी पं. नेहरूंनी धर्माविषयी पुनर्विचार करावयास प्रारंभ केला होता– ते प्रांजळपणे म्हणाले की, " In our efforts to ensure the material prosperity of the country, we have not paid any attention to the spiritual element in human nature. Therefore, in order to give the individual and the nation a sense of purpose, something to live for, and if necessary to die for, we have to revive some philosophy of life and give a spiritual background to our thinking. We talk of welfare state and of democracy and of socialism, but they hardly convey a clear and unambiguous meaning. Democracy and socialism are means to an end and not an end in-itself. "

" In considering these economic aspects of our problems we have to keep in view the Vedantic ideals of life-force which is the inner base of everything that exists."

[" देशाची भौतिक समृद्धी साधण्याच्या प्रयत्नात मानवी प्रकृतीतील आध्यात्मिक अंशाकडे आपण अजिबात लक्ष दिले नाही, म्हणून व्यक्तीला आणि राष्ट्राला जीवनहेतू देण्यासाठी, ज्याच्यासाठी जगायचे आणि ज्याच्यासाठी प्रसंगी प्राणही वेचायचे असे उद्दिष्ट त्यांच्यापुढे ठेवण्यासाठी, जीवनाच्या काही तत्त्वज्ञानाचा पुन्हा अंगीकार करावा लागेल, आपल्या चिंतनाला एक आध्यात्मिक बैठक द्यावी लागेल. आपण कल्याणकारी राज्य, लोकशाही समाजवाद इत्यादींसंबंधी बोलतो, पण त्यातून स्पष्ट आणि निःसंदिग्ध अर्थबोध होत नाही. लोकशाही व समाजवाद ही विशिष्ट उद्दिष्टाप्रत जाण्याची साधने आहेत, ती अंतिम उद्दिष्टे नव्हेत. "

" आपल्या समस्यांच्या या आर्थिक अंगाचा विचार करताना आपणाला वेदांतातील चैतन्यशक्तीचा आदर्श ध्यानात बाळगला पाहिजे. सर्व अस्तित्वाचा तोच आंतरिक आधार असतो. "]

Norman Cousins च्या ' Talks with Nehru ' मध्ये पं. नेहरू म्हणतात, " हिंदू तत्त्वज्ञान, धर्म आणि लोकशाही यांमध्ये विसंगत असे काहीच नाही. हिंदू धर्माच्या उदरात एक तेजस्वी विश्ववाद आहे. हिंदू धर्म कुठल्याही स्थित्यंतराशी मेळ घालू शकतो. निरनिराळ्या आणि परस्परविरोधी विचारांचा समावेश करण्याएवढा हिंदू धर्म विशाल आहे. भारतातील धर्म, लोकांचे सर्वसाधारण कल्याण ज्यात दृग्गोचर होईल ती नवीन स्थित्यंतरे करावयास चुकणार नाही. यापूर्वी हिंदू धर्माने मोठी स्थित्यंतरे पचविली आहेत. "

(पं नेहरूंमधील हे सायंकालीन परिवर्तन कुणालाही माओ–चीनच्या विशुद्ध भौतिक संस्कृतीमधून डेंग चीनच्या आध्यात्मिक संस्कृतीकडे होत असलेल्या (नवचीनच्या) सद्य:कालीन संक्रमणाचे स्मरण करून देईल.)

२४. उदाहरणार्थ, श्री. रॉय यांचे पुढील विचार पहा :–

1. " The crying need of the time is to harmonise ethics with a social philosophy and political practice. The Sovereignty of man · · · · can be deduced only from the fact that man is a moral entity. "

2. " · · · · until the intellectual, cultural, spiritual atmosphere of the country was changed, it was not possible to bring about a political and economic reconstruction of the country."

3. आपले ध्येयस्वप्न ते पुढील शब्दांत मांडतात, "· · a Social reconstruction of the world as a commonwealth and fraternity of free men by the co-operative endeavour of spiritually emancipated moral men."

[१. " नीती वा सामाजिक तत्त्वज्ञान आणि राजकीय व्यवहार यांच्याशी मेळ घालणे ही आज सर्वांत मोठी आवश्यकता आहे. माणसाचे सार्वभौमत्व त्याच्या नैतिक अस्तित्वातूनच निष्पन्न होते."

२. " ····· जोवर देशातील बौद्धिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक वातावरण बदलत नाही, तोवर देशाची राजकीय आणि आर्थिक पुनर्रचना घडवून आणणे अशक्य आहे. "

३ " ····· आध्यात्मिक दृष्ट्या स्वतंत्र झालेल्या नैतिक मानवांच्या सहकार्ययुक्त प्रयत्नांनी एक राष्ट्रकुटुंब व मुक्त मानवाचे बंधुत्वपूर्ण जीवन या नात्याने जगाची सामाजिक पुनर्रचना. "]

२५. संघाला बदनाम करण्याकरिता त्यावर 'फॅसिझम' चा निराधार आरोप करणाऱ्यांना श्री. टी. व्ही. आर. शास्त्री यांनी दिलेले उत्तर येथे नमूद करणे अप्रासंगिक होणार नाही.

" A Government or a State can be characterised as ' Fascist ', but not a private association to which no one is compelled to belong. "

["एखादे सरकार अथवा राज्य 'फॅसिस्ट' आहे, असे म्हणता येते." पण ज्या संस्थेत सामील होण्यास कोणास भाग पाडता येत नाही, अशी खाजगी संस्था फॅसिस्ट म्हणताच येत नाही."]

२६. रशियन राज्यक्रांतीच्या यशाच्या झगमगाटामुळे सर्वसामान्य तरुण मने प्रभावित झाली होती, हे खरे आहे. तथापि त्याही स्थितीत डोके शांत ठेवून भविष्याचा वेध घेणारे श्रेष्ठ विचारक भारतात होतेच. उदाहरणादाखल पुढील उद्‌गार पहा :–

लोकमान्य टिळक :–

" Bolshevism, as preached in the West, cannot succeed in India. Let us stick fast to our Vedanta and our desires shall be fulfilled."

बिपिनचद्रपाल :–

" It (i. e the induction of proletariat movement of communist design in India) will upset all the moral and spiritual values of life as understood by India's national genius and culture. "

चित्तरंजनदास :–

" The soul of Russia must struggle to free himself from the socialism of Karl Mark."

[" ज्या स्वरूपात बोल्शेविझम आज पाश्चात्य देशांत प्रमृत केला जात आहे, त्या स्वरूपात भारतामध्ये तो यशस्वी होणे शक्य नाही. आमण आपल्या वेदान्तालाच घट्ट चिकटुन राहूया आणि आपल्या इच्छा अवश्य पूर्ण होतील. "

– लो. टिळक

" तिच्यामुळे (म्हणजे कम्युनिस्ट प्रकारच्या श्रमिक आंदोलनाचा प्रादुर्भाव भारतात केल्यामुळे) भारताच्या राष्ट्रीय प्रतिभेला व संस्कृतीला अभिप्रेत असलेली सर्व नैतिक आणि आध्यात्मिक जीवनमूल्ये विकृत होऊन जातील.")

– बिपिनचंद्र पाल

" रशियाच्या आत्म्याने कार्ल मार्क्सच्या समाजवादापासून मुक्त होण्यासाठी संघर्ष केला पाहिजे. "

– चित्तरंजनदास.]

२७. समाजवाद्यांच्या अनेक अपयशांपैकी एक केवळ उदाहरण म्हणून उद्धृत करावयाचे झाल्यास श्री. लुई फिशर यांनी लो. जयप्रकाशजींच्या जवळ व्यक्त केलेल्या पुढील अपेक्षेचा उल्लेख करता येईल –

" At present, I need not tell you, the stratification of Indian society is vertical according to religion and caste. The Socialists must turn that vertical stratification over on its side and make it horizontal according to class and econonic interest. Only then will it be possible to take the emphasis off riligious division and pave the way for Indian social and economic progress."

[" आपणाला सांगण्याची आवश्यकता नाही की सध्या भारतीय समाजाचे जात व धर्म यांच्यानुसार उभे थर तयार झाले आहेत. समाजवाद्यांनी हे थर आडवे केले पाहिजेत. आणि त्यांना वर्ग व आर्थिक हितसंबंध यांचे स्वरूप असले पाहिजे. तरच धार्मिक भेदांवरील भर दूर करता येईल आणि भारताच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीचा मार्ग प्रशस्त होईल. "]

यावर भाष्य अनावश्यक आहे.

२८. तथाकथित गांधीवादी गांधीजींना किती प्रमाणात समजू शकले हा एक प्रश्न आहे. या दृष्टीने पं. नेहरूंनी दिलेले पुढील उदाहरण उद्बोधक आहे. ते म्हणतात,– " We were surprised to find later how much opposition there was to the Seva-Dal among leading congressmen. Some said that this was a dangerous departure, as it meant introducing a military element in the Congress ! Others seemed to think that the only discipline necessary was for the volunteers to obey orders issued from obove, and for the rest, it was hardly desirable for volunteers even to walk in step. At the back of the mind of some was the notion that the idea of having trained and drilled volunteers was some how inconsistent with the Congress Principle of non-violence. "

[" प्रमुख काँग्रेसजनांत नंतरच्या काळात सेवादलाला किती विरोध होता, हे पाहून आम्हाला आश्चर्य वाटले. काहीजण म्हणाले, काँग्रेसच्या ध्येयापासून हे दूर जाणे आहे. कारण याचा अर्थ काँग्रेसमध्ये लष्करी वृत्ती आणणे असा होतो.

इतर अनेकांना असे वाटत असावे की वरून आलेल्या आज्ञा पाळणे एवढीच स्वयंसेवकांना आवश्यक असलेली शिस्त. बाकी, स्वयंसेवकांनी पाय मिळवून चालणे देखील इष्ट नव्हे. काहींचा मनोमन समज असा होता की, प्रशिक्षित व कवायतीत तरबेज स्वयंसेवक असणे हे कोणत्या ना कोणत्या प्रकारे काँग्रेसच्या अहिंसेच्या तत्त्वाविरुद्ध आहे. '']

अर्थात् स्वातंत्र्यप्राप्तिनंतर सर्व परिवर्तन अहिंसात्मक, शांततामय, घटनात्मक मार्गांनीच व्हावे, हे तत्त्व निरपवादच होते. स्वतः स्वा. सावरकर अभिनव भारत सांगता समारंभाचे वेळी म्हणाले, '' स्वदेश स्वतंत्र होऊन स्वराज्य स्थापन होताच, आता आपले सर्वांचे पहिले राष्ट्रीय कर्तव्य हे असावयास पाहिजे की, क्रांतिकार्यातील आपणच राष्ट्रभर फैलावलेल्या राज्यविध्वंसक वृत्तींना नि साधनांना तत्काळ विसर्जून राष्ट्रात विधायक नि निर्बंधशील वृत्तीचे वर्चस्व स्थापिले पाहिजे. ''

२९. वास्तविक कोणत्याही राजकीय पक्षाच्या पंखाखाली न राहता समाजसेवा करणारे लोक पश्चिमेत आणि भारतातही निर्माण झालेले आहेत. ख्रिश्चन जगतातील प्राचीन काळातील ख्रिस्त, नाईट्स ऑफ सेंट लॅझॅरस, सेंट फ्रान्सिस ऑफ ॲसिसी आदी मंडळी सोडली तरी आधुनिक काळातही–उदाहरण म्हणून केवळ कुष्ठसेवेचे क्षेत्र घेतले तरी – फादर डॅमियन, फादर डट्टन, डॉ. हॅन्सेन, डॉ. आर. एच्. कोक्रेन (Cochrane), डॉ. पॉल ब्रॅन्ड, डॉ. एन्. एच्. ॲन्टिया, डॉ. ए. एफ्. कोएलचो या ख्रिश्चन समाजसेवकांप्रमाणेच आपल्या देशातही (महात्मा गांधींव्यतिरिक्त) सर्वश्री बाबा आमटे, डॉ. मनोहर दिवाण, डॉ. शिवाजीराव पटवर्धन, डॉ. वाडदेकर, डॉ. धर्मेन्द्र, डॉ. एच्. श्रीनिवासन्, डॉ. एस्. एम्. मुखर्जी, चांप्याचे श्री. कात्रे व श्री. बापट आदी लोक या क्षेत्रात उत्कृष्ट सेवा करीत आहेत व ही सर्व कामे केवळ सेवाबुद्धीने चालली आहेत. राजकीय पुढाऱ्यांप्रमाणे आपल्या सेवावृत्ताची काळजी न घेता केवळ सेवावृत्तीने संपूर्ण जीवन जगणारे महापुरुष इकडे व पश्चिमेतही आहेत. महाराष्ट्रातील संत गाडगेमहाराज, पश्चिमेतील आल्बर्ट श्वाइट्झर, लिव्हिंग्स्टन आदी लोक याच श्रेणीतले आहेत. श्री. बाबा आमटेंविषयी श्री. हार्ट म्हणतात, '' - - - - his achievements are far more significant than those of any political leader. ''

[''..... त्यांची कामगिरी कोणत्याही राजकीय नेत्याच्या कामगिरीपेक्षा अधिक आशयपूर्ण आहे.]

तथापी कोणत्याही व कुणाच्याही सत्कार्याचे श्रेय आपल्या पक्षालाच मिळालेले बरे, ही प्रवृत्ती राजकीय पुढाऱ्यात असणे स्वाभाविक आहे, व स्वातंत्र्योत्तर प्रारंभिक काळात या प्रवृत्तीचा जोर विशेष दिसून येत होता.

३०. श्री. समर्थ म्हणतात– " कार्यकर्ते होऊ नये – राजद्वारी । "

श्री. मॅक आयव्हर व पेत्र हे समाजशास्त्रज्ञ म्हणतात, " Cultural activity attains its ends more fully when it is free to organise itself, associations that are not dependent on the organisation of the political economic complex····· Thus the liberation of cultural association from the control of the prolitical economic organisation is a very significant aspect of social evolution." ···

[" राजकीय - आर्थिक क्षेत्रांतील संघटनांवर अवलंबून नसलेल्या स्वतंत्र संस्था काढण्यास जेव्हा सांस्कृतिक कार्याला मोकळीक असते तेव्हा आपली उद्दिष्टे अधिक परिपूर्णतेने साध्य करणे त्याला शक्य होते. म्हणून, सांस्कृतिक संस्थांची राजकीय – आर्थिक संघटनांच्या तावडीतून मुक्तता हे सामाजिक उत्क्रांतीचे एक महत्त्वाचे अंग आहे. "]

३१. श्री. एस्. के. डे आपल्या ' Power to the People ' मध्ये सर्वोदय-कार्यकर्ते व कम्युनिटी डेव्हलपमेंट खात्याचे कर्मचारी यांच्यातील सामंजस्याच्या अभावाचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करतात –

" (1) Sarvodaya workers could not get rid of their posture of self righteousness; व (2) Government Community Development workers " had been trained for specific jobs and belonged to a particular cadre with a certain amount of discipline " and could not understand the lack of practical sense of feeling of responsibility for public funds of the Gandhians."

[" (१) सर्वोदय कार्यकर्ते आपल्या नैतिक श्रेष्ठतेच्या कल्पनेतून मुक्त होऊ शकले नाहीत व (२) सरकारी कम्युनिटी डेव्हलपमेंट कर्मचारी विशिष्ट कामासाठी प्रशिक्षित करण्यात आले होते. काही शिस्त असलेल्या कार्यकर्त्यांच्या श्रेणीतील ते होते. गांधीवाद्यांतील व्यवहारबुद्धीचा अभाव किंवा सार्वजनिक पैशाच्या जबाबदारीची भावना ते समजू शकले नाहीत. "]

३२. पंडितजींना या विचारातील मर्म समजले होते की, –

History without. Futurology would be fruitless.
Futurology without History would be rootless.

[भविष्याचा वेध घेण्याच्या ज्ञानाविना इतिहास निरर्थक ठरेल,
इतिहासाविना भविष्याचा वेध घेण्याचे ज्ञान निर्मूल ठरेल.]

३३. तादृशोऽयमजुप्रश्नो यत्र धर्मः सुदुर्लभः ।
दुष्करः प्रतिसंख्यातुं तत्केनात्र व्यवस्यति ।।
प्रभवार्थाय भूतानां धर्मप्रवचनं कृतम् ।
यः स्यात्प्रभवसंयुक्तः स धर्म इति निश्चयः ।।
धारणाद् धर्ममित्याहुर्धर्मेण विधृताः प्रजाः ।
यः स्याद् धारणसंयुक्तः स धर्म इति निश्चयः ।।

(शान्तिपर्व)

धर्मे विश्वस्य जगतः प्रतिष्ठा ।
धर्मे सर्वं प्रतिष्ठितम् ।
तस्माद् धरमं परमं वदन्ति ।। (तैत्तिरीय संहिता)
यतोऽभ्युदयनिःश्रेयससंसिद्धिः सः धर्मः ।। (वैशेषिक)
अभ्युदय-निःश्रेयसे साधनत्वेन धारयति – इति धर्मः

(माधवाचार्य)

३४. आमच्या आंग्लविद्याविभूषित मंडळींनी स्वतःची स्वाभिमानशून्य लाचारीची मनोवृत्ती सर्व परिस्थितीत टिकवून ठेवण्याचे बाबतीत जी दृढता दाखविली ती खरोखर आश्चर्यजनकच होती. वस्तुतः पश्चिमेचा भारताशी प्रथम संबंध आला तेव्हापासूनच तिकडील काही निवडक विद्वानांचे मनात या देशाविषयी जिज्ञासा जागृत व्हायला प्रारंभ झाला होता. शॉपेन हॉवर, फ्रेडरिक श्लेगेल, मॅक्समुल्लर, विलियम जोन्स, पॉल डयूसेन आदी विद्वानांनी भारतीय संस्कृतीविषयी प्रशंसात्मक उद्‌गार काढायला सुरुवात केली होती. 'The Sacred Books of the East' पन्नास खंडांत प्रकाशित झाले होते. रॉथने वैदिक philology व फ्रांझ बॉप (Frang Bopp) ने तुलनात्मक philology संशोधनाकरिता घेतली होती. भारतीय व्युत्पत्ती-भाषा-शास्त्र (Philology), वंशशास्त्र (Ethnology) कला, इतिहास व इतिहासशास्त्र (Historiography); पुरातत्त्व शास्त्र (Archeology) आदी विविध शास्त्रांचे प्रारंभिक पाश्चात्य प्रवर्तक A, J. A. Dubois, Princep, फर्ग्युसन, कनिंगहॅम, ग्रिअरसन (Grierson), जेम्स बर्जेस (Jems Burgess) एम्. एल्फिन्स्टन् (M. Elphinston) व्हिन्सेंट ए. स्मिथ (Vincent A Smith), फ्लीट (Fleet), हल्श (Hultzsch), आदींचे बरेच अनुकूल अभिप्रायही प्रकाशित झाले होते. एड्विन ॲर्नाल्ड (Edwin Arnold), वॉल्ट व्हिटमन (Walt Whitman), थोरो (Thoreau), इमर्सन (Emerson) एडवर्ड कार्पेंटर (Edward Carpenter), पॉल ब्रन्टन (Paul Brunton), यांच्यावर पडलेला वेदांताचा प्रभाव स्पष्टपणे जाणवू

लागला होता. स्पिनोझाचा pantheism, लिबनित्झ (Leibnitz) चा pluralistic monadic idealism व स्विस विचारक स्वेडनबोर्ग (Swedenborg) यांचा pietism, या सर्वांची हिंदू तत्त्वज्ञानातील तत्सम विचारांशी असलेली समांतरता सर्वांच्या ध्यानात येऊ लागली होती. स्वामी रामतीर्थांनी हे स्पष्ट केले होते की, –

" Christian Science, theosophy and American spirituality represent the direct and the indireet legacy of Indian thought." सर्वश्री कोरोसी (Korosi) जी. टर्नवर (G. Turnour) फॉजबॉल (Fausboll), आर. सी. चाइल्डर्स (R. C. Childers), टी. डब्ल्यू. रीस डेव्हिड्स (T. W. Rhys Davids) सी. ए. एफ् रीस डेव्हिड्स (C. A. F. Rhys Davids), ओल्डेनबर्ग (Oldenberg), श्चेरबात्स्की (Stcherbatsky), पाऊझिन (Poussin), पॉल ढालके, (Paul Dahlke) आदी विद्वानांनी बौद्धमतावर गंभीरपणे संशोधन चालविले होते व टॉलस्टॉयसारखा श्रेष्ठ विचारक बौद्धमताने व वेदान्ताने प्रभावित झालेला होता, हेही सर्वांच्या ध्यानात येऊन चुकले होते. पाश्चिमात्य धर्ममतांवरील व विचारांवरील भारताचे ऋण कार्ल मार्क्सनेही मान्य केले होते.

(Whose country has been the source of our languages, our religions···':)

हिंदू दर्शनातून प्रेरणा प्राप्त करणाऱ्या कांट, शोपेनहावर व फिश्टे यांचा कार्लाईल व रस्किन यांच्या पद्धतीवर पडलेला प्रभाव सहज ध्यानात येत होता.

३५. सोव्हिएट सरकारच्या अधिकृत प्रकाशनाप्रमाणे,

" The General Secretary of the C.P.S.U. Central Committee, L. I. Breznev, in his speech at the ceremonial session in the Kremlin Palace of Congresses on 7th October 1975, devoted to the 250th anniversary of the USSR Academy of Sciences, said about the party commitment of Soviet Science, ' I would like to dwell especially on one most important question, the party commitment of our science. Whatever discipline the Soviet scientists work in, they are always characterised by a typical feature; their high communist consciousness and their Soviet patriotism. The Soviet scientist ····· bases his whole scientific activity on the scientific ideology of Marxism - Leninism, is an active champion of communism, fights any reactionary and obscurantist forces. Our scientists subject all their practical activity to the task of realisation of the noble communist ideals. "

स्टॅलिननेही जाहीरपणे सांगितले होते की, " वैद्यकशास्त्रज्ञांना बॉटनी, फिजिक्स ही शास्त्रे अवगत नसली तरी चालेल, पण विरोधविकासवादाचे ज्ञान मात्र त्यांना असलेच पाहिजे."

(" कम्युनिस्ट पार्टी ऑफ सोव्हिएत युनियनच्या केंद्रीय मंडळाचे सरचिटणीस एल्. आय्. ब्रेझनेव यांनी क्रेमलिन पॅलेस ऑफ काँग्रेसेसमध्ये दि. ७ ऑक्टोबर १९७५ रोजी केलेल्या भाषणात पक्षाच्या विज्ञानविषयक भूमिकेचा खुलासा केला. प्रसंग होता – रशियन अॅकेडेमी ऑफ सायन्सेसच्या २५० व्या वर्धापनदिनाचा. ते म्हणाले, 'पक्षाचे विज्ञानविषयक नेमके धोरण काय आहे या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नासंबंधी मला बोलावेसे वाटते. रशियन शास्त्रज्ञ कोणत्याही ज्ञानशाखेत काम करीत असोत, त्यांचे एक खास वैशिष्ट्य नेहमीच दिसून येते. त्यांची श्रेष्ठ प्रतीची कम्युनिस्ट जाणीव आणि सोव्हिएत देशभक्ती हे ते वैशिष्ट्य होय. सोव्हिएत शास्त्रज्ञ आपली विज्ञान-क्षेत्रातील सर्व हालचाल मार्क्सिझम्-लेनिनिझम्च्या वैज्ञानिक विचारप्रणालीनुसार करतो. तो कम्युनिझमचा सक्रिय पुरस्कर्ता असतो. प्रतिगामी आणि अंध परंपरावादी शक्तींशी तो संघर्ष करतो. उदात्त कम्युनिस्ट ध्येयांच्या सिद्धीसाठीच आमचे शास्त्रज्ञ आपापल्या क्षेत्रात सक्रिय असतात.' ")

३६. हे सर्व ध्यानात घेतले म्हणजे या वर्षीच्या मराठी विज्ञान साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात प्रा. भालबा केळकर यांनी प्रकट केलेल्या पुढील अभिप्रायाचे मर्मही आपोआपच ध्यानात येईल :

" प्राचीन काळापासून अगदी अर्वाचीन काळापर्यंत मागोवा घेतला, आणि त्याप्रमाणे पौर्वात्यापासून पाश्चात्यांपर्यंत मागोवा घेतला तर महान् वैज्ञानिक हे तत्त्वज्ञानीच आहेत असे दिसून येईल.

प्राचीन भारतीय वैज्ञानिक, धन्वंतरी, अश्विनीकुमार, कपिल, भोज, सोमदेव, सुश्रुत, चरक, कणाद, आर्यभट्ट, भास्कर, पतंजली, वाग्भट इत्यादी आणि अलीकडे डॉ. भाभा, डॉ. न. ना. गोडबोले, डॉ. विक्रम साराभाई, डॉ. भटनागर, डॉ. जगदीशचंद्र बोस, डॉ. करमरकर, डॉ. गोखले, डॉ. शिरोडकर, डॉ. खानोलकर, डॉ. के. के. दाते इत्यादी अर्वाचीन भारतीय वैज्ञानिक तत्त्वज्ञानीच.

प्राचीन पाश्चात्यांत ॲरिस्टॉटल, डेमॉक्ट्रेस, आर्किमिडिज, गॅलेन, हिपाक्ट्रिस, आणि अर्वाचीन डॉ. आइनस्टाइन, डॉ. ओपेनहायमर. न्यूटन, ऑटोहान फ्रेड हॉईल, जोसेफ लीस्टर, इत्यादी हे सारे वैज्ञानिक तत्त्वज्ञानीच. ..... वस्तुज्ञान, विज्ञान आणि अध्यात्म अशा पायऱ्यांनी मानवी जीवन विकसित होत जाते. "

याच चालीवर Gary Zukav म्हणतात –

" What dose physics have in common with enlightenment ? Physics and enlightenment apparently belong to two realms which are for ever separate. One of them (physics) belongs to the external world of physical

phenomena and the other of them (enlightenment) belongs to the internal world of perceptions. A closer examination, however; reveals that physics and enlightenment are not so incongruous as we might think ····· "

" ····· Now we shall see how quantum phenomena may be connected so intimately that things once dismissed as ' occult ' could become topics of serious consideration among physicists.

···· In short, both in the need to cast off ordinary thought processes (and ultimately to go " beyond thought " altogether), and in the perception of reality as one unity, the phenomenon of enlightenment and the science of physics have much in common ·····

····· The possibility that separate parts of reality (like you and I and tug boats) may be connected in ways which both our common experience and the laws of physics belie, has found its way into physics under the name of Bell's theorem ··· The second (Bells theorem) tells us that there is no such thing as " separate parts. " All of the ' parts ' of the universe are connected in an intimate and immediate way previously claimed only by mystics and other scientifically objectionable people."

·····Although most physicists have little patience (professionally) with metaphors, physics itself become a powerful metaphor, Twentieth century physics is the story of a journey from intellectual entrenchment to intellectual openness, despite the conservative prove - it - to - me nature of individual physicists ····· The Wu Li Masters know that physicists are doing more than " discovering the endless diversity of nature ". They are dancing with Kali, the Divine Mother of Hindu mythology. "

[" पदार्थविज्ञानाचे अध्यात्मज्ञानाशी कोणते साम्य आहे ? आपाततः असे दिसते की पदार्थविज्ञान आणि अध्यात्मज्ञान ही सदैव वेगळी राहणारी दोन क्षेत्रे आहेत. त्यांपैकी एक (पदार्थविज्ञान) दृष्य जगातील घटनांशी संबंधित आहे आणि दुसरे (अध्यात्मज्ञान) अंतर्मुख दृष्टीने दिसणाऱ्या गोष्टींचे असते. पण अधिक लक्षपूर्वक पाहिले तर आढळून येते की पदार्थविज्ञान आणि अध्यात्मज्ञान आपल्याला वाटतात तेवढी एकमेकांपासून भिन्न नाहीत. ·····"

" ··· ···· आता आपल्या ध्यानात येईल की क्वान्टम घटनेचा दोन्ही पक्षी खूप घनिष्ट संबंध असू शकतो. आणि ज्या गोष्टी पूर्वी ' अतींद्रिय ' म्हणून विचारबाह्य ठरविल्या त्या पदार्थविज्ञानशास्त्रज्ञांनी गंभीरपणे विचारात घ्याव्या, अशा असू शकतात. ··· थोडक्यात, सामान्य विचारप्रक्रिया बाजूस सारण्याच्या आवश्यकतेत

(आणि अखेर सर्वस्वी ' विचारांच्या पलीकडे ' जाण्याच्या) तसेच सृष्टीतील ऐक्य पाहण्याच्या दृष्टीत, अध्यात्मज्ञानाच्या दर्शनात आणि पदार्थविज्ञानशास्त्रात बरेच साम्य आहे.···

···सृष्टीचे निरनिराळे भाग (जसे तुम्ही, मी आणि होडचा) अशा प्रकारे परस्पर संबंध असू शकतात, की तो संबंध आपला सर्वसाधारण अनुभव आणि पदार्थविज्ञानाचे नियम यांच्या निकषावर खोटा ठरावा; पण या संबंधाला ' वेलचे प्रमेय ' या नावाने पदार्थविज्ञानात स्थान प्राप्त झाले आहे. वेलचे प्रमेय आपल्याला सांगते की ' वेगळा भाग ' नावाची गोष्टच नाही. जगाचे सगळे भाग एका आंतरिक आणि निकट प्रकारे जोडले गेले आहेत. पूर्वी केवळ गूढवादी आणि शास्त्रीय दृष्टचा आक्षेपार्ह ठरणारे इतर लोकच अशा संबंधाचा दावा करीत असत.

...बहुतेक पदार्थविज्ञानशास्त्रज्ञांना बहुधा (व्यावसायिक दृष्टचा) अलंकारिक भाषेचे वावडे असते, पण पदार्थविज्ञान म्हणजेच आता एक प्रभावी भाषालंकार बनून गेला आहे. विसाव्या शतकातील पदार्थविज्ञान ही बौद्धिक साचेबंदपणाकडून बौद्धिक खुलेपणाकडे झालेल्या प्रवासाची कहाणी आहे. ' मला प्रत्यक्ष पुराव्याने सिद्ध करून द्या. ' असे स्थितिशील पदार्थविज्ञानवेत्ते व्यक्तिशः म्हणत असले तरी हा प्रवास झालेला आहे. ···· वुली पंथीय ज्ञात्यांना ठाऊक आहे की, पदार्थ-विज्ञानाचे तज्ज्ञ केवळ ' निसर्गाची अनंत विविधता शोधण्यापलीकडे ' पुष्कळ काम करीत आहेत. ते हिंदू पुराणातील कालीबरोबर, जगन्मातेबरोबर नृत्य करीत आहेत. "

३७. चीनी तत्त्वज्ञ लाओ झे (Lao Tze) यांनी दिलेले पुढील विवरण पहा :–

" The Sage, wishing to be above the people, must by his words put himself below them, wishing to be before the people; must put himself behind them. In this way, though he has his place above them, the people do not feel his weight; though he has his place before them, they do not feel it as an injury. Therefore, all mankind delight to exalt him, and weary not of him. The sage expects no recognition for what he does, he achieves merit but does not take it to himself, he does not wish to display his worth. "

[" साधुपुरुषाने सर्वसामान्य जनतेपेक्षा उच्च स्थानाची इच्छा बाळगली तर आपल्या शब्दांनी मात्र त्याने लोकांनाच मोठेपणा दिला पाहिजे व स्वतः लहानपणा पत्करला पाहिजे. पुढे राहून लोकांचे मार्गदर्शन करण्याची इच्छा असली तरी लोकांच्या मागेच त्याने राहिले पाहिजे. अशा व्यवहारामुळे, त्याचे स्थान जरी वस्तुतः उच्च असले तरी लोकांना त्यांचे दडपण जाणवत नाही. तो सगळ्यांच्या पुढे असला तरी

कोणाचेही मन त्यामुळे दुखावत नाही. म्हणून सर्व मानवजात त्याचा उदोउदो करण्यात आनंद मानते आणि त्याचा उबग कोणाला येत नाही. आपण जे करतो त्याबद्दल लोकांनी पाठ थोपटावी अशी साधुपुरुषाची अपेक्षा नसते. तो थोर कार्य करून जातो, पण त्याचे श्रेय मात्र स्वतःकडे घेत नाही. आपल्या योग्यतेचे प्रदर्शन करावेसे त्याला वाटत नाही."]

३८. आजच्या या विषम परिस्थितीतही आर्थिक बाबींत सरकारचा किंवा भांडवलदारांचा मिंधेपणा न पत्करण्याचे कणखर धोरण स्वीकारणारे काही थोडे कार्यकर्ते शिक्षण-क्षेत्रात व रचनात्मक कार्याच्या क्षेत्रात, तसेच सुप्रीम कोर्टातील काही न्यायाधीश, आणीबाणीच्या काळात ज्यांना स्थानांतरण सहन करावे लागले असे सोळा (१६) हायकोर्ट जजेस् यांच्याप्रमाणे, रामशास्त्री प्रभुण्यांच्या परंपरेची आठवण ठेवणारे काही न्यायाधीश विभिन्न स्तरांवर होते व आहेत ही समाधानाची गोष्ट आहे. (सर अल्लादी कृष्णस्वामी अय्यर यांचे पुढील विधान पुस्तकी सिद्धांत या नात्याने खरे आहे. The Supreme Court in the Indian Union has more powers than any Supreme Court in any part of the world. "

(परंतु दि. २–५–१९७३ च्या श्री. मोहन कुमारमंगलम् यांच्या (संसदेतील) committed judiciary विषयीच्या निवेदनानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीत स्वतंत्र बाणा कायम ठेवणे, न्यायाधीशांना किती कठीण गेले व जात आहे याची सर्वांना कल्पना आहे.) अशा काही निवडक उदाहरणांमुळे ही आशा करण्याला वाव मिळतो की आजच्या वातावरणातही सांस्कृतिक जीवनमूल्ये प्रस्थापित करण्याचे पद्धतशीर प्रयत्न केले तर वर अभिप्रेत असलेल्या ऋषिसंस्थेचे पुनरुज्जीवन अनतिदूर भविष्यकाळात होऊ शकेल.

या शिवाय ऋषिसंस्थेविषयींच्या दृढ आशेचे प्रमुख कारण हे की, ती भारतीय संस्कृतीचे अंगच आहे. पं. नेहरूंनी डिसेंबर १९५९ मध्ये अध्यक्ष आयसेनहॉवर यांच्या स्वागतप्रसंगी सांगितले की,

" We in India have been conditioned throughout our history in a peculiar way. Our greatest leader of modern times was neither a man of wealth, nor of military power, nor of position; yet the millions of Indians bowed their heads before him and tried to follow his great lead. This is the type of man we honour, and I hope this is the type of man we shall always honour, even in the modern world."

[" संपूर्ण इतिहासकाळात आम्हा भारतीयांची मानसिक घडण एका विशिष्ट प्रकाराची झालेली आहे. आधुनिक काळातील आमचा सर्वांत थोर नेता श्रीमंत नव्हता, लष्करी बळ त्याच्याजवळ नव्हते किंवा सत्तेच्या कोणत्या पदावर तो नव्हता.

पण तरीही भारतातील दशलक्षावधी लोक त्याच्या पुढे नतमस्तक होत आणि त्याचे नेतृत्व स्वीकारीत. आणि अशाच प्रकारच्या माणसाचा आम्ही सन्मान करतो आणि मला वाटते की अशाच माणसाचा आम्ही अगदी आधुनिक जगात देखील नेहमीच आदर करीत राहू."]

या प्रकारच्या व्यक्तीलाच 'ऋषी' ही संज्ञा आहे

• • •

एकात्म मानव दर्शन

वि. वा. नेने

अनुक्रम

१	एकात्म मानव दर्शन	१६९
२	पाश्चिमात्य विचार-प्रवाह	१७५
३	व्यक्तिविचार – चतुर्विध सुख	१८७
४	व्यक्तिविचार – चतुर्विध पुरुषार्थ	२०६
५	समष्टिविचार - व्यक्ती व परिवार	२२५
६	समष्टिविचार – व्यक्ती आणि समाज	२२९
७	समष्टीचे पुरुषार्थ	२३७
८	एकात्म समाज-व्यवस्था	२५५
९	समष्टी ते परमेष्टी	२७२
१०	एकात्मदर्शन	२७८
११	यः क्रियावान सः पण्डितः	२८७

श्री. विनायक वासुदेव नेने

या ग्रंथातील एकात्म मानववादाचा विचार वाचकांना सादर करणारे श्री. विनायक वासुदेव तथा राजाभाऊ नेने हे एक साक्षेपी संघटक, चिकित्सक विचारवंत आणि यशस्वी पत्रकार आहेत. शिक्षण संपल्यानंतर बरीच वर्षे ते गुजरातेत रा. स्व. संघाचे प्रचारक होते. श्रीगुरुजींच्या Bunch of Thought चा मराठी अनुवाद ' विचारधन ' या नावाने त्यांनीच केला आहे. दीर्घकाळ त्यांनी मुंबईच्या ' विवेक ' साप्ताहिकाचे प्रमुख संपादक म्हणून काम केले. या ग्रंथाची मूळ कल्पना त्यांचीच. ती प्रत्यक्षात आणण्यासाठी सुमारे चार वर्षे त्यांना फार परिश्रम करावे लागले. लेखक-वर्ग निवडून त्यांच्याकरवी लिखाण करून घेण्याचे जिकीरीचे काम त्यांनी न कंटाळता जिद्दीने पूर्णतेस नेले. त्यांचे स्फुट लेखन विपुल आहे.

प्राक्कथन

'पं. दीनदयाळ उपाध्याय : विचारदर्शन' मालिकेतील 'एकात्म मानव दर्शन' या विषयाचे विवेचन या विभागात केलेले आहे.

या विषयावर लिहावयाचे ठरल्यानंतर पहिला प्रश्न उभा राहिला तो संदर्भ-साहित्याचा. जनसंघाच्या 'सिद्धान्त व नीती' मध्ये हा विषय सूत्ररूपाने आलेला आहे. मुंबई येथे या विषयावर पं. दीनदयाळजींची चार भाषणे झाली होती. त्यांपैकी एका भाषणात त्यांनी या विषयाचे धावते विश्लेषण केले होते. एका परीने ते 'एकात्म दर्शना' वरील भाष्य आहे. ते संक्षिप्त असले तरी स्वतः दीनदयाळजींच्याच तोंडून प्रकट झालेले असल्याने खूप मोलाचे. या विषयाचा गाभा आणि त्यांच्या मनात असलेले या विषयाचे विविध पैलू ध्यानात येण्यास त्या भाषणांच्या प्रतिवृत्ताची खूप मदत झाली. या भाषणांव्यतिरिक्त दीनदयाळजींनी खास या विषयावर असे काही लिहिलेले नाही. असलेच तर विविध ठिकाणी परिश्रमपूर्वक शोध घेऊनही ते उपलब्ध होऊ शकले नाही. प्रदीर्घ कार्यानुभव आणि सखोल चिंतनानंतर दीनदयाळजींनी मांडलेले हे दर्शन त्यांच्याच साक्षेपी आणि प्रासादिक लेखणीतून विस्ताराने उतरलेले उपलब्ध झाले असते तर या दर्शनाचे अधिकृत आणि सर्वांगपरिपूर्ण चित्र आपल्या हाती आले असते. परंतु त्यांचे अकाली अकस्मात निधन झाल्याने ते कार्य अपूर्णच राहिले. ही उणीव आणि खंत आता नेहमीसाठीच राहिली आहे.

अशा प्रकारे, दीनदयाळजींचे प्रत्यक्ष या विषयावरील लिखाण उपलब्ध नाही, हे स्पष्ट होताच अन्य दिशेने शोध सुरू केला. दिल्लीच्या 'दीनदयाळ शोध संस्थान' मध्ये जपून ठेवलेले काही साहित्य, पांचजन्य व राष्ट्रधर्म या

नियतकालिकांच्या धारिका, राष्ट्रचिंतन व राष्ट्रजीवनकी दिशा या दोन ग्रंथांत संकलित केलेले त्यांचे विविध विषयांवरील लेखन व भाषणे संघशिक्षावर्गातील त्यांचे बौद्धिक वर्ग आदी साहित्य डोळचांखालून घातले. प्रतिपाद्य विषयाचे अनेक पैलू स्पष्ट होण्यास या सर्व साहित्याचा बराच उपयोग झाला. याच विषयाच्या संदर्भात, दीनदयाळजींनी बद्रीसाल टुलधरिया याच्या ' दैशिक शास्त्र ' या हिंदी ग्रंथाचा मोठ्या आदराने उल्लेख केला आहे. तो मूळ ग्रंथ आणि प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांनी केलेला त्याचा अनुवाद काळजीपूर्वक वाचला. विषयाची बैठक अधिक स्पष्ट होण्याच्या दृष्टीने त्याचाही खूप उपयोग झाला.

हा विषय जनसंघाच्या विविध अभ्यास-सत्रांमध्ये वा चर्चाबैठकांमध्ये अंतिम आकार घेत होता. त्या कालात अशा बैठकांमध्ये सहभागी असलेल्या जुन्या कार्यकर्त्यांशी झालेल्या चर्चेचा उपयोग विशेष झाला. माननीय श्री. दत्तोपंत ठेंगडी, श्री. प्रभाकरपंत पटवर्धन, प्रा. गं. भा. कानिटकर, कै. रामदास कळसकर आदींचा या संदर्भात आवर्जून उल्लेख करावयास हवा. जे अशा बैठकांमध्ये नव्हते, परंतु ज्यांचे या विषयावरील चिंतन आणि अभ्यास सखोल आहे अशा काही सन्मित्रांची मदत मोलाची म्हणावी लागेल. माननीय श्री. बापूराव भिशीकर, प्रा. अशोक मोडक, विवेकचे भूतपूर्व सहसंपादक रा. द. पणशीकर आदींचा नामनिर्देश या संदर्भात महत्त्वाचा.

या सर्व प्रास्ताविकावरोबर प्रत्यक्ष लिखाणासंबंधीही दोन शब्द लिहिणे आवश्यक आहे. पहिली गोष्ट म्हणजे या दर्शनाचा उल्लेख सर्वसामान्यपणे ' एकात्म मानव वाद ' असा केला जात असला तरी प्रस्तुत पुस्तकात त्याऐवजी ' एकात्म मानव दर्शन ' असा शब्दप्रयोग केला आहे. प्रतिपाद्य विषयाचे स्वरूप, व्याप्ती आणि खोली लक्षात घेता याला ' वादा ' ऐवजी ' दर्शन ' म्हणणेच अधिक योग्य आहे असे वाटते.

अधिक यथार्थपणे बोलायचे तर हे केवळ ' मानव ' दर्शन नसून परिपूर्ण एकात्म दर्शन आहे, कारण मानवा-मानवांतील संबंधांबरोबरच मानव आणि मानवेतर सृष्टी यांचा जो अन्योन्य एकात्म संबंध आहे त्याचाही अंतर्भाव या एकात्म दर्शनात होतो. तथापि, मानवेतर सृष्टीचे व्यवहार स्वभावतःच या एकात्म प्रकृतिधर्मानुसार होत असतात. मानवाला मात्र हे एकात्मतेचे नाते जाणून घेऊन आणि ध्यानात ठेवून जाणीवपूर्वक या धर्माची जोपासना करावी

लागते. एकात्म दर्शनात अंतर्भूत असलेल्या मानवा-मानवांतील या संबंधाचाच येथून पुढे विस्ताराने आणि विशेषत्वाने विचार केलेला असल्याने त्याला एकात्म मानव दर्शन असे संबोधिले आहे.

विषयाचे विवेचन करताना पुढील ढोबळ सूत्र डोळ्यांसमोर ठेवले आहे. जे पैलू विषयाच्या दृष्टीने त्यातल्या त्यात अधिक महत्त्वाचे आहेत, त्यांचा काहीसा विस्ताराने ऊहापोह केला आहे. तुलनेने ज्या गोष्टी कमी महत्त्वाच्या आहेत वा बहुतेकांना सुपरिचित असण्याची शक्यता आहे, त्यांचा विचार काहीसा संक्षेपाने केला आहे. उदा., पुरुषार्थांचा विचार करताना तो व्यक्तिगत स्तरावर, समष्टीच्या स्तरावर आणि या दोहोंच्या संयुक्त स्तरावर अशा तिहेरी पदरांनी केला आहे. तुलनेने वर्णव्यवस्था व आश्रमव्यवस्था हा विषय थोडक्यात आटोपता घेतला आहे. सुखाच्या विविध प्रकारांचे वर्णन करताना शरीराचे सुख व मनाचे सुख यांची अनुभूती सामान्यपणे सर्वांना असल्याने त्याचा आवश्यक तेवढाच विचार केला आहे; उलट बुद्धीचे सुख, आत्म्याचे सुख, अध्यात्म, मोक्ष आदी कल्पना विस्ताराने स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. एकात्म मानव दर्शनाचे वेगळेपण आणि वैशिष्ट्य अधिक ठळकपणे ध्यानात यावे यासाठी या दर्शनाच्या विविध पैलूंची ओळख करून देत असतानाच आधुनिक म्हटल्या जाणाऱ्या पाश्चात्य विचारप्रणालींपैकी काही प्रमुख विचारप्रणालींचाही सूत्ररूपाने आढावा घेतला आहे.

हा एकूणच विषय प्रामुख्याने तात्त्विक स्वरूपाचा आहे. तथापि, दीनदयाळजींचा राष्ट्रविचार, त्यांचे अर्थचिंतन व राजकारण या दर्शनाच्या व्यापक अधिष्ठानावर उभे असल्याने हे अधिष्ठान जास्तीत जास्त यथातथ्य स्वरूपात वाचकांपुढे येणे आवश्यक वाटले. म्हणून विवेचन करताना दीनदयाळजींच्या केवळ विचारसूत्रांचा आणि अवतरणांचाच नव्हे तर त्यांच्या विशिष्ट पारिभाषिक शब्दांचाही जागोजागी मुक्तहस्ते वापर केला आहे. फोडिले भांडार । धन्याचा हा माल । मी तो हमाल । भारवाही ।
हे संतवचन या एकूण लेखनप्रपंचामध्ये याही दृष्टीने खरे आहे.

– वि. वा. नेने

१

एकात्म मानव दर्शन

पंडित दीनदयाळजी गेल्याला आता सव्वा तपाहून अधिक काळ उलटून गेला आहे १९५१ साली, नव्यानेच सुरू झालेल्या एका राजकीय पक्षाची धुरा त्यांच्या खांद्यावर येऊन पडली होती. राष्ट्र-उभारणीच्या अनेकविध कार्यांपैकीच एक कार्य या विशुद्ध भावनेने त्यांनी ती स्वीकारली आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही आपल्या प्रखर ध्येयनिष्ठेने, विशुद्ध चारित्र्याने, स्नेहपूर्ण व्यक्तिमत्वाने आणि असामान्य संघटन-कौशल्याने त्या पक्षाला अवघ्या पंधरा सोळा वर्षांच्या अवधीत, द्वितीय क्रमांकाच्या अखिल भारतीय पक्षाचे स्थान प्राप्त करून दिले. केवळ एक दोन वर्षांच्या अल्प परिचयातच, "मला आणखी असे दोन दीनदयाळ द्या, मी साऱ्या देशाचे चित्र पालटून दाखवीन" अशा शब्दांत डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींनी त्यांचा केलेला उल्लेख पूर्णतः सार्थ होता. "जनसंघाच्या कार्याचा अगदी पायाच्या दगडापासून प्रारंभ करून ते कार्य एवढ्या नावारूपाला आणण्याचे श्रेय जर कोणा एका व्यक्तीलाच द्यायचे झाले, तर ते पं. दीनदयाळजींनाच द्यावे लागेल" अशा शब्दांत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक पू. श्रीगुरुजी यांनी राजकीय क्षेत्रातील त्यांच्या कर्तृत्वाविषयी दिलेला निर्वाळादेखील या संदर्भात पुरेसा बोलका आहे.

दीनदयाळजींचे राजकीय क्षेत्रातील हे कर्तृत्व निःसंशय असामान्य आहे. परंतु त्यांच्या व्यक्तिमत्वाचा दुसरा एक पैलूही तेवढाच किंबहुना अधिक तोलामोलाचा आहे. यथार्थपणे सांगायचे तर, राजकीय क्षेत्रातील त्यांचे कर्तृत्व आणि डोळ्यांत भरणारे यश हा दुसऱ्या पैलूचाच एक आविष्कार आहे. तो पैलू

म्हणजे, ते अभिजात प्रतिभासंपन्न आणि मूलगामी चिंतक होते. त्यांचे चिंतन व्यक्तिजीवनापासून संपूर्ण मानवजातीपर्यंतचाच केवळ नव्हे, तर मानवेतर सृष्टी आणि त्याहीपुढे जाऊन परमेष्टीपर्यन्त सर्वांचा विधायक भूमिकेतून आणि समग्रपणे वेध घेणारे चिंतन आहे. 'एकात्म मानव दर्शन' ही त्यांच्या मूलगामी विधायक चिंतनाचीच अनमोल निष्पत्ती.

१९६५ च्या जानेवारी महिन्यात विजयवाडा येथे भरलेल्या जनसंघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेच्या अधिवेशनात पक्षाचा 'सिद्धांत व नीती'-विषयक जो प्रबंध स्वीकृत झाला त्या प्रबंधाचा प्रारंभ या 'एकात्म मानव दर्शना'नेच झालेला आहे. किंबहुना असे म्हणावे लागेल की, जनसंघाचे संपूर्ण ध्येय-धोरण या एकात्म मानवदर्शनाच्या अधिष्ठानावर उभे होते. मग ते धोरण राजकीय असो, सामाजिक असो, आर्थिक असो वा जीवनाशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने संबंधित असलेल्या अन्य एखाद्या विषयाचे असो.

विजयवाडा-अधिवेशनानंतर सुमारे तीन महिन्यांनी १९६५ च्या एप्रिल मध्ये मुंबई येथे 'जनसंघाचे सिद्धान्त व नीती' या विषयावर दीनदयाळजींची चार भाषणे झाली होती. त्यांपैकी पहिले प्रास्ताविक भाषण हे एका अर्थी 'एकात्म मानव दर्शना'च्या आविष्काराची पार्श्वभूमी विषद करणारे होते. त्या भाषणात ते म्हणाले होते –

"आपल्या देशावर इंग्रजांचे राज्य होते तोपर्यन्त देशात जेवढी म्हणून आंदोलने होत असत, जे राजकारण चालत असे, त्या सर्वांचे लक्ष्य स्वराज्य प्राप्त करणे एवढेच होते. स्वराज्य मिळाल्यानंतर आपले स्वरूप काय राहील, आपण कोणत्या दिशेने वाटचाल करणार आहोत यासंबंधी फारसा विचार झाला नाही. अजिबात विचार झाला नाही असे म्हणता येणार नाही. गांधीजींनी 'हिंद स्वराज्य' लिहून स्वातंत्र्यानंतर भारताचे चित्र कसे असेल या संबंधीचे स्वतःचे विचार नमूद केले होते. त्यापूर्वी लोकमान्य टिळकांनी 'गीतारहस्य' लिहून स्वातंत्र्य-आंदोलनामागील तात्त्विक भूमिकेचे विवेचन केले होते. शिवाय काँग्रेस व अन्य राजकीय पक्षांनी वेळोवेळी जें ठराव संमत केले होते, त्यांतही अशा स्वरूपाचे विचार आले होते. परंतु या विषयाचा जेवढ्या गांभीर्याने अभ्यास व्हावयास पाहिजे होता, तेवढा तो झाला नाही. त्याचे कारण, सर्वांपुढे असा विचार होता की, प्रथम इंग्रजांना येथून घालवू या, त्यानंतर आपले घर कसे उभारावयाचे याचा विचार करता येईल. स्वाभाविकपणेच, देश

स्वतंत्र होताच, आता देशाच्या वाटचालीची दिशा कोणती असावी हा विचार आपल्या डोळ्यासमोर यावयास पाहिजे होता. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की, या प्रश्नाचा जेवढ्या गंभीरपणे विचार व्हावयास पाहिजे होता तेवढा झाला नाही. आज देशाच्या स्वातंत्र्याला सोळा-सतरा वर्षे होऊन गेली तरीही देशाच्या भवितव्याच्या वाटचालीची दिशा ठरली आहे, असे ठामपणे म्हणता येणार नाही.

"इंग्रज निघून गेल्यावर देशाचे राजकारण, समाजव्यवस्था, जीवनादर्श यांवरील परकीय शासकांच्या विचारांचा पगडा खरे म्हणजे दूर व्हावयास पाहिजे होता; परंतु तो दूर होण्याऐवजी उत्तरोत्तर अधिकाधिक वाढतच चालला. तेथील वेशभूषा, रीतिरिवाज, भाषा आदी गोष्टी आपल्या देशात आल्या. समाजशास्त्र, नीतिशास्त्र, राज्यव्यवस्था, आदी विषयांतही त्यांचेच कित्ते आपल्या येथे प्रमाण मानले जाऊ लागले. वेद, उपनिषदे, स्मृती, गीता आणि पुराणे यांच्याऐवजी मिल, हेगेल, ॲडम स्मिथ, मार्क्स, एंजल्स यांची वचने आपल्याला प्रमाणभूत वाटू लागली.

"वस्तुतः प्रत्येक राष्ट्राने आपल्या 'स्व' त्वाचा विचार करणे आवश्यक असते. स्वत्वावाचून स्वराज्याला काही अर्थच नसतो. आपल्या प्रकृतीला अनुसरून प्रयत्न करून सुखी व संपन्न जीवन जगता यावे यासाठीच तर प्रत्येक राष्ट्र स्वातंत्र्याची अभिलाषा धरीत असते. स्वतःच्या प्रकृतीशी विसंवादी असलेल्या विचारप्रणालीचा वा कार्यपद्धतीचा आधार घेणाऱ्या राष्ट्रावर अनेक संकटे ओढवतात. आपल्या देशापुढील आजच्या संकटांचेही हेच प्रमुख कारण आहे."

आपल्या राष्ट्रजीवनासंबंधी दीनदयाळजींच्या मनात कोणत्या स्वरूपाचे विचारमंथन चालू होते हे ध्यानात यावयास ही अवतरणे पुरेशी आहेत असे वाटते. आरंभी म्हटल्याप्रमाणे राष्ट्रउभारणीच्याच कार्याचे एक अंग या निष्ठेने राजकीय क्षेत्रातील कार्याची जबाबदारी त्यांनी स्वीकारली असल्यामुळे राष्ट्र-कारण, त्यासाठी करावयाचे राजकारण, अर्थकारण आदी सर्व प्रश्नांसंबंधी त्यांनी सर्वांगांनी व मूलगामी चिंतन करावे हे स्वाभाविकच होते ; परंतु या दर्शनाचे वैशिष्ट्य असे की, ते केवळ राष्ट्र-विचारापुरतेच सीमित नाही, त्याची झेप त्याही पलीकडे आहे. ती काही अंशी ध्यानी यावी, यासाठी त्यांच्या त्याच भाषणातील आणखी एक परिच्छेद उद्धृत करण्यासारखा आहे. त्या

भाषणाचा शेवट करताना पं. दीनदयाळजी म्हणतात –

" याचबरोबर आपण असाही विचार केला पाहिजे की, किंकर्तव्यमूढ अवस्थेत असलेल्या आजच्या जगाला प्रगतिपथावर नेण्याच्या दृष्टीनेही आपण काही करू शकतो की नाही ? आपण जगावर भारभूत होऊन न राहता, तसेच केवळ आपल्याच स्वार्थाचा विचार न करता आपल्या संस्कृतीत व परंपरेत जगाला देण्यासारखे काय आहे, याचा विचार करून जागतिक प्रगतीच्या कार्यात सहभागी झाले पाहिजे. गेली हजार वर्षे आपले संपूर्ण लक्ष स्वातंत्र्यलढ्यात व स्व-संरक्षणात गुंतलेले असल्याने जगातील इतर राष्ट्रांच्या बरोबरीने आपण उभे राहू शकलो नाही. परंतु आता आपण स्वतंत्र झालो आहोत. ही कसर आपण भरून काढली पाहिजे. " एकात्म मानव दर्शनाचा आवाका, केवढा मोठा आहे, हे यावरून ध्यानात येऊ शकेल.

व्यक्ती, समाज, मानव यांचे सुख, उत्कर्ष, कल्याण हा विचार खरे म्हणजे तसा नवा नाही. अलीकडच्या काळात पाश्चात्य देशांत आणि आपल्याही देशात जे चिंतन झाले, विचारप्रणाली पुढे आल्या, प्रयोग झाले वा आजही त्या दिशेने प्रयत्न चालू आहेत, त्यांतून हे ईप्सित अपेक्षेनुसार साध्य झाल्याचे वा होत असल्याचे प्रत्ययास येत नाही. त्यातून त्या त्या कालखंडातील तात्कालिक प्रश्नांवर काही तोडगा सापडल्याचा आभास निर्माण झाला असला तरी मूळ प्रश्नांचे स्थायी निराकरण झाले नाही. उलट अधिक गुंतागुंतींच्या कित्येक नवीन समस्या उभ्या राहिल्या, असेच चित्र प्रायः सर्वत्र दृष्टोत्पत्तीस येत आहे. वैज्ञानिक प्रगतीमुळे माणूस आता चंद्रावर आणि त्याही पलीकडे जाऊन पोहोचला असला तरी या पृथ्वीच्या पाठीवर राहणारा बहुतांश मानवसमूह अभावग्रस्त, अशांत, भयभीत आणि भांबावलेलाच आहे. अशा परिस्थितीत दीनदयाळजींच्या या मूलगामी चिंतनाचा मागोवा निश्चितच मार्गदर्शक ठरेल.

एकात्म मानव दर्शनाचे सूत्र

एकात्म मानव दर्शन म्हणजे मानवी जीवनाच्या व संपूर्ण सृष्टीच्या एकात्म संबंधांचे दर्शन. मानवी जीवनाची विविध अंगोपांगे तसेच मानवेतर सृष्टीतील निरनिराळ्या सत्ता यांमध्ये विविधता असते हे खरे; परंतु ही विविधता म्हणजे आंतरिक एकतेचाच निरनिराळ्या रूपातील आविष्कार असतो. त्यामुळे या सर्वांमध्ये परस्परानुकूलता व परस्परपूरकता असते.

एकात्म मानव दर्शन व्यक्तिजीवनाचाही सर्वांगांनी व संकलित विचार करते. मनुष्यप्राणी हा शरीर, मन, बुद्धी, व आत्मा यांचे संकलित रूप आहे; त्यामुळे मानवाचा सर्वांगीण विचार म्हणजे त्याचे शरीर, मन, बुद्धी व आत्मा या सर्वांचा संकलित विचार होय. व्यक्तीच्या या चारही अंगांच्या समुचित गरजा भागाव्या, विविध कामना, इच्छा-आकांक्षा तृप्त होऊन तिचा सर्वांगीण विकास व्हावा – यात भौतिक प्रगतीबरोबरच नैतिक व आध्यात्मिक उन्नतीही अभिप्रेत आहे – आणि त्याचबरोबर समाजाचीही सुयोग्य धारणा व्हावी, प्रगती व्हावी, यासाठी भारतीय संस्कृतीने व्यक्तीसमोर कर्तव्यरूपाने चार पुरुषार्थांचा आदर्श ठेवला आहे.

धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे ते चार पुरुषार्थ होत. या चारही पुरुषार्थांची ओढ माणसामध्ये कमीअधिक प्रमाणात असते. त्यामुळे त्यांची उपासना केल्याने त्यास सुख प्राप्त होते. तथापि यांपैकी कोणत्याही एकाच पुरुषार्थाला मानवी कर्तृत्वाच्या प्रेरणेचे मूळ वा मानवी जीवनाच्या यशस्वितेचा माप दंड मानून चालणे चुकीचे ठरेल. भारतीय संस्कृतीने चारही पुरुषार्थांचा एकत्रित विचार केला आहे. त्यांपैकी धर्म हा आधारभूत पुरुषार्थ आहे. अर्थ आणि काम या पुरुषार्थांची साधना धर्माच्या आधारे केल्याने त्या पुरुषार्थांची प्राप्ती सुख देणारी होते, आणि ते व्यक्तीच्या विकासाला सहाय्यभूत होऊन अंतिम मोक्ष पुरुषार्थाचा म्हणजे जीवनलक्ष्याच्या सिद्धीचा मार्ग प्रशस्त होतो.

तथापि शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा यांचा समुच्चय असलेली व्यक्ती केवळ 'मी' पुरती मर्यादित नसून 'आम्ही' शीही निगडित असते. म्हणूनच व्यक्तीबरोबरच समष्टीचाही विचार केला पाहिजे.

समाज हा अनेक व्यक्ती मिळूनच बनलेला असला तरी समाजाचे स्वतःचे म्हणून एक स्वतंत्र व्यक्तिमत्व असते. समाजालाही शरीर, मन, बुद्धी, आत्मा असतात आणि त्यालाही धर्म, अर्थ, काम, मोक्ष या पुरुषार्थांची साधना करावी लागते. अर्थात् व्यक्ती व समाज एकात्मतेच्या बंधनांनी परस्परांशी निगडित असल्याने व्यक्तीची व समाजाची पुरुषार्थसाधना एकमेकांशी विसंगत वा विरोधी नसून एकमेकांना पूरक व पोषक असते.

व्यक्तीच्या व समष्टीच्या पुरुषार्थ-साधनेसाठी अनेक संस्था निर्माण करण्यात येतात. व्यक्ती यांपैकी अनेक संस्थांचे अंग असते. म्हणजेच व्यक्तीचे व्यक्तिमत्व एकांगी नसून विविधांगी असते. या विविध नात्यांमधील एकत्वाचे,

एकात्मतेचे भान ठेवून व्यक्ती विचार व व्यवहार करते तेव्हा तिचा समन्वित विकास होऊन ती सुखी होते. त्याबरोबर समाजही सुखी होतो.

आपल्या संपूर्ण विचाराचे व व्यवस्थांचे केंद्र असा पुरुषार्थ-चतुष्टयशील एकात्म मानव हे असले पाहिजे. ज्या व्यवस्थेमध्ये व्यक्तीचा विचार पुरुषार्थी मानवाऐवजी एखाद्या अजस्र यंत्राचा निर्जीव भाग म्हणून केला जातो, किंवा उलट समष्टीकडे दुर्लक्ष करणारा आत्मकेंद्री मानव म्हणून केला जातो, ती व्यवस्था अपूर्ण होय. त्या दोन्ही व्यवस्था अपूर्ण म्हणाव्या लागतील. त्याचप्रमाणे ज्या व्यवस्थेमध्ये मानवाचा विचार – त्याचे शरीर, मन, बुद्धी व आत्मा या सर्वांच्या भुका ध्यानात घेऊन करण्याऐवजी यांपैकी काही अंगांच्याच अनुषंगाने करण्यात येतो, ती व्यवस्थाही अपूर्णच होय. व्यक्तिजीवनाचा सर्वांगीण म्हणजे चारही पुरुषार्थांच्या अनुषंगाने विचार करणारा, त्यासाठी झटणारा आणि त्याचबरोबर व्यक्तीपासून विश्वमानवापर्यंत कुटुंब, राज्य आदी विविध एकात्म समूहांचे आणि त्याही पलीकडे सृष्टी-परमेष्टीचे प्रतिनिधित्व करण्याची क्षमता असलेला एकात्म मानव हा या दर्शनाचा आदर्श आहे. मानवाचा असा समग्र व समन्वित विचार करून जीवनाच्या सर्व अंगांचा व व्यवस्थांचा विचार केला, रचना केली तर समता, राष्ट्रीयता, मानवता, विश्वशांती आदी श्रेष्ठ आदर्शांच्या दिशेने करावयाच्या वाटचालीत सध्या अनुभवास येत असलेली विसंगती व अंतर्विरोध दूर होऊन ते एकमेकांना पूरक होतील, व मानवाला सोद्देश्य सुखी जीवन प्राप्त होऊन एकात्म मानव दर्शन साकार होईल.

• • •

२

पाश्चिमात्य विचार-प्रवाह

इंग्रजांच्या दीडशे वर्षांच्या राजवटीमुळे पाश्चात्यांची वेशभूषा, रीति-रिवाज यांबरोबरच अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र आदी क्षेत्रांतही त्यांची विचारप्रणाली व जीवनपद्धती यांचा आपल्या देशावर कसा प्रभाव पडला होता याचा उल्लेख मागील प्रकरणात आलेला आहे. एकात्म मानव दर्शनाच्या विवेचनाला प्रारंभ करण्यापूर्वी, त्यांपैकी काही प्रमुख विचारप्रणालींच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीची व स्वरूपाची तोंडओळख करून घेणे, या दर्शनाचे वेगळेपण आणि वैशिष्ट्य ध्यानात येण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल.

युरोप खंडाच्या अलीकडील इतिहासाचा प्रारंभ प्रबोधनपर्वापासून (Renaissance) म्हणजे पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून होतो. तेव्हापासून आतापर्यंतच्या कालखंडात राष्ट्रवाद, लोकशाही व समाजवाद या तीन प्रमुख विचारप्रवाहांचा युरोपच्या समाजजीवनावर विशेष प्रभाव पडला आहे.

पश्चिमेकडील राष्ट्रवादाचा उदय

युरोपातील राष्ट्रवादाचा उदय 'होली रोमन एंपायर'चे पतन आणि पोपच्या धार्मिक अधिसत्तेविरुद्ध झालेली उठावणी या पार्श्वभूमीवर झाला. ख्रिश्चन धर्माचा प्रमुख या नात्याने रोमच्या पोपची अधिसत्ता युरोपातील सर्व राज्यांवर चालत असे. पाखंडी लोकांना शिक्षा देण्याचा अधिकार या धर्मपीठाला आणि त्याच्या प्रतिनिधींना होता. साध्या कैदेपासून देहान्त दण्डा-पर्यंत विविध प्रकारच्या शिक्षा ते देऊ शकत असत. अर्थात् पाखंडी कोण हे

ठरविण्याचे अधिकारही धर्मगुरूंनाच होते. या काळात कितीतरी लोकांचा अमानुष छळवाद झाल्याचे व कित्येकांना ठार मारण्यात आल्याचे दाखले इतिहासात आहेत.

रोमच्या पोपच्या या पुरोहितशाहीविरुद्ध अनेक धर्मसुधारकांनी बंड पुकारले. मार्टिन ल्यूथर आणि कालव्हिन यांचा या संदर्भात विशेषत्वाने उल्लेख करावा लागेल. या बंडखोरांना 'प्रॉटेस्टंट' (विरोध वा निषेध करणारे) असे नाव पडले. यातूनच प्रॉटेस्टंट पंथाचा व पुढे राष्ट्रीय चर्चचा (National Church) उदय झाला. देवाच्या दरबारातील कॅथॉलिक धर्मगुरूंची दलाली व मक्तेदारी प्रॉटेस्टंटांना मान्य नव्हती.

पोपच्या अधिसत्तेला सुरू झालेला हा विरोध केवळ धार्मिक क्षेत्रापुरताच सीमित होता असे नाही. राजांच्या सत्तेची अधिमान्यता पोपच्या संमतीवर व आशीर्वादावर अवलंबून राहील असे रोमच्या पोपचे फर्मान असल्यामुळे युरोपातील राजे महाराजे पोपवर असंतुष्ट होते. त्याचप्रमाणे समुद्रापलीकडील जगाचा शोध लागून नव्याने उदयास आलेला व्यापारी भांडवलदारांचा वर्गही पोपची बंधने झुगारून देण्यास उत्सुक होता. नेमक्या याच कालखंडात वैज्ञानिक क्षेत्रात जे नवनवे शोध लागले त्यामुळे पोपच्या फर्मानावरील आजवरच्या श्रद्धेला तडा जाऊ लागला होता. अशा प्रकारे राजे-महाराजे, नव्याने उदयास येत असलेले व्यापारी भांडवलदार, आणि पोपच्या धर्मपीठाविषयीची अंधश्रद्धा दूर करून नव्या संकल्पना पसरविण्यास उत्सुक असलेला अभिजन वर्ग (ELITE) असे विविध क्षेत्रांतील लोक पोपविरुद्ध संघटित होऊ लागले होते. थोडक्यात असे म्हणता येईल की, केवळ धार्मिक बाबतीतच नव्हे, तर राज्यांतर्गत कोणत्याही बाबतीत देशबाह्य शक्तींना हस्तक्षेप करू द्यावयाचा नाही ही भावना बळावू लागली. युरोपातील राष्ट्रवादाच्या उदयाची पार्श्वभूमी ही अशी आहे. या पार्श्वभूमीमुळे राष्ट्र व राज्य या कल्पना हळूहळू एकरूप होत जाऊन युरोपमध्ये लहानमोठी-राष्ट्र राज्ये (Nation States) उदयास आली. युरोपचा गेल्या काही शतकांचा इतिहास हा अशा राष्ट्रांचा उदय व त्यांचे परस्पर संघर्ष यांचा इतिहास आहे. राष्ट्रीय सार्वभौमत्व आणि भौतिक समृद्धीसाठी विस्तारवादी साहसे यांनी तो प्रेरित आहे.

राष्ट्रवादाप्रमाणेच, युरोपच्या इतिहासावर प्रभाव पाडणारा महत्त्वाचा विचार म्हणजे लोकशाहीचा. वर म्हटल्याप्रमाणे राष्ट्रवादाच्या उदयामुळे

पोपची अधिसत्ता संपुष्टात आली हे खरे, परंतु हळूहळू राजाची अधिसत्ता सुरू झाली. आपण ईश्वरी अंश आहोत, प्रजेचे भाग्यविधाते आणि न्यायदेवतेचे आदिपीठ आपणच आहोत, असे राजे लोकांना वाटू लागले. ही भावना हळूहळू बळावत चालली. पूर्वी केवळ शासकीय सत्ता राजांच्या हाती होती. धर्मसत्ता पोपकडे म्हणजेच धर्मपीठाकडे असे. आता राजसत्ता आणि धर्मसत्ता या दोन्ही सत्ता एकाच व्यक्तीच्या हाती केंद्रित झाल्या. व्यापारी भांडवलदारांना नव्या-नव्या व्यापारी साहसांना परवानगी आणि अर्थसहाय्य यांसाठी राजसत्तेची अनुकूलता आवश्यक असल्याने अर्थसत्तेच्या नाड्याही राजांच्याच हाती गेल्या. या सर्वांचा परिणाम म्हणून राजसत्ता अधिकाधिक उद्दाम, निरकुंश व लहरी होत चालली.

राजसत्तेच्या या निरंकुशतेविरुद्ध स्वाभाविकपणेच जनतेमध्ये असंतोष पसरू लागला. कायद्याच्या बाबतीत राजाला राजा म्हणून कोणतेही विशेष अधिकार (PREROGATIVES) नाहीत, असता कामा नयेत, कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान आहेत, तसेच राजाला स्वतःच्या लहरीनुसार समाजावर बंधने घालण्याचा अधिकार नाही, व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे, आणि सार्वभौम सत्ता राजाच्या ठिकाणी नव्हे तर जनतेमध्ये असते हे विचार बळावू लागले. राजवंश एक तर नष्ट करण्यात आले, अथवा त्यांच्या अधिकारांवर वैधानिक शासनपद्धतीद्वारा मर्यादा घालण्यात आल्या. इंग्लंडमधील रक्तशून्य क्रांती, अमेरिकन क्रांती आणि फ्रेंच राज्यक्रांती या घटनाक्रमावरून व्यक्ति-स्वातंत्र्याचा म्हणजे लोकशाहीचा वाढता प्रभाव ध्यानात येऊ शकेल. हे व्यक्तिस्वातंत्र्य व समाजाची सार्वभौम सत्ता अबाधित रहावी यासाठी पुढे संसद व तत्सम संस्थांची निर्मिती करण्यात आली.

लोकशाहीने नागरिकांना व्यक्तिस्वातंत्र्य दिले हे खरे, परंतु याच सुमारास यंत्रयुगाचा जो उदय झाला, त्यामुळे समाजजीवनात एक नवीन समस्या उभी राहिली. उत्पादनाच्या नव्या यंत्रसामुग्रीमुळे पूर्वीच्या मानाने खूपच कमी मानवी श्रमांत प्रचंड प्रमाणात उत्पादन करणे सुलभ होऊ लागले. लोकशाहीने बहाल केलेल्या व्यक्तिस्वातंत्र्याचा व समान संधीचा फायदा घेऊन त्यांतल्या त्यात बुद्धिमान व धनसंपन्न असलेल्या लोकांनी धनोत्पादनाच्या साधनांवर आपला एकाधिकार प्रस्थापित केला. व्यापारी भांडवलशाहीचे औद्योगिक भांडवल-शाहीत रूपांतर झाले. हळूहळू या धनसत्तेच्या बळावर शासनयंत्रणाही त्यांनी

आपल्या मुठीत आणली. थोडक्यात म्हणजे, लोकशाहीने दिलेल्या व्यक्ति-स्वातंत्र्याचा प्रत्यक्ष व्यवहारातील अर्थ, सर्वसामान्य जनतेला आर्थिक दृष्टचा पिळून काढण्याचे व तिला आपले गुलाम बनवून ठेवण्याचे मूठभर लोकांना मिळालेले स्वातंत्र्य असा झाला.

यंत्रयुगाच्या उदयामुळे एका बाजूने मूठभर धनसंपन्न लोक अधिकाधिक गबर होत होते आणि त्याचबरोबर खेडोपाडी पसरलेला छोटचा कारागिरांचा व श्रमिकांचा वर्ग अक्षरशः देशोधडीला लागला होता. शेतीला व घरकामाला लागणारी लहानसहान अवजारेही शहरांतील मोठ्या कारखान्यांत तयार होऊन खेडोपाडी पोहोचू लागल्यावर आपल्याकडील खेडचांतील सुतार–लोहारांची जी स्थिती झाली, किंवा बाटाची निरनिराळ्या डिझाइनची व मापाची सुबक पादत्राणे खेडोपाडी देखील उपलब्ध होऊ लागल्याने तेथील चर्मकारांची जी वाताहात झाली तशीच काहीशी अवस्था पाश्चात्य देशांतील त्या काळातील ग्रामीण विभागांतील कारागिरांची झाली. आजवर स्वतःच्या घरात बसून स्वतंत्रपणे काम करणारा श्रमिक वा कारागीर आता शहरात येऊन तेथील कारखान्यात नोकर म्हणून राबू लागला. तेथे त्याच्या राहाण्याची सोय कमालीची निकृष्ट असे. मुंबई, कलकत्ता, अहमदाबाद यांसारख्या औद्योगिक शहरांतील प्रचंड झोपडपट्टचा पाहून त्याची काही कल्पना येऊ शकेल. कारखान्यात कामासंबंधी कोणतेही नियम नव्हते. कोरडचा पावाच्या तुकडचा-साठी दिवसभर राबणारा हा मजूर शरीराने थकलेला, मनाने पिचलेला आणि असंघटित होता. भरीस भर म्हणजे, त्याचे शोषण करणारा जो भांडवलदार वर्ग होता, त्याच्याच हाती शासनाची शेंडी होती. त्यामुळे राज्यकर्त्यांकडूनही त्यांना न्याय मिळण्याची आशा नव्हती.

समाजवाद

अशा प्रकारे, लोकशाहीने बहाल केलेले व्यक्तिस्वातंत्र्य आणि यंत्रयुगाचा उदय यांमधून जी अन्यायपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती, तिच्यात बदल घडवून आणण्याच्या जिद्दीने काही लोक पुढे सरसावले. ते स्वतःला समाजवादी म्हणवून घेऊ लागले. या समाजवाद्यांचे प्रामुख्याने दोन गट पडतात. पहिला गट मवाळ किंवा सनदशीर समाजवाद्यांचा आणि दुसरा उग्रपंथी समाजवाद्यांचा. सेंट सायमन, चार्लस फोरियर, रॉबर्ट ओवेन व लुई ब्लँक हे मवाळ समाजवादाचे अध्वर्यू होते असे म्हणता येईल. यांना मवाळ समाजवादी म्हणण्याचे कारण

असे की, समाज-परिवर्तनासाठी वर्गलढा अपरिहार्य आहे असे त्यांना वाटत नव्हते. राज्यसंस्थेला शोषित व पीडित नागरिकांविषयी खरी सहानुभूती वाटली पाहिजे. शासकांनी याबाबत उदासीन न राहता कामगारांच्या हिताचे कायदे केले पाहिजेत, यातून समाज-परिवर्तन शक्य आहे, ही समाजपरिवर्तनाच्या मार्गासंबंधी त्यांची भूमिका होती. उग्रपंथी समाजवादाचा प्रवर्तक कार्ल मार्क्स याला ही भूमिका मुळीच मान्य नव्हती. 'माझ्या पूर्वीच्या सर्व समाजवादी विचारवंतांचा विचार स्वप्नाळू होता, मी शास्त्रीय समाजवाद सांगतो आहे,' असा त्याचा दावा होता. मार्क्सने अर्थव्यवस्था व इतिहास यांचा प्रदीर्घ आणि सखोल अभ्यास करून आपला निष्कर्ष सिद्धांतरूपाने मांडला. मार्क्सच्या या विश्लेषणात्मक विवेचनामुळे समाजवादाला एक सैद्धांतिक बैठक प्राप्त झाली. एका अगदी वेगळ्या दृष्टिकोनातून समाजजीवनाच्या इतिहासाचे मार्क्सने केलेले प्रभावी विश्लेषण, त्या काळातील अभावग्रस्त आणि वैफल्यग्रस्त शोषित-वर्गाच्या मनात आत्मविश्वासाचे स्फुलिंग फुलविणारे क्रांतीचे शास्त्र व शस्त्र, आणि या क्रांतीच्या मार्गाने अखेर वर्गविहीन समाजजीवन निर्माण करण्याचे त्याने उभे केलेले स्वप्न या सर्वांमुळे केवळ शोषित वर्गालाच नव्हे तर त्याच्या हलाखीने द्रवित व अस्वस्थ झालेल्या अनेक बुद्धिमंतांनाही मार्क्सच्या विचारांनी झपाटून टाकले.

मार्क्सची भूमिका

मार्क्सने मांडलेल्या या शास्त्रीय समाजवादाचे मुख्य सूत्र असे की, मानवी इतिहास हा विरोध-विकासवादाचा इतिहास आहे. उत्पादनाचे शक्तिस्रोत व उत्पादन-संबंध यांवरून हा इतिहास आकार घेत असतो. उत्पादन-साधनांची खाजगी मालकी हेच श्रमिकांच्या शोषणाचे मूळ कारण आहे. मग ते साधन शेतजमिनीच्या स्वरूपात असो वा अन्य कोणत्या स्वरूपात असो, मूठभर व्यक्तींच्या हाती असलेली ही उत्पादन-साधने त्यांच्या हातून काढून घेऊन समाजाकडे सुपूर्द केली म्हणजे शोषणाची ही प्रक्रिया आपोआप संपुष्टात येईल. अर्थात् मार्क्सच्या सिद्धांतानुसार उत्पादन-साधने समाजाकडे सोपविणे म्हणजे समाजहितैषी शासनाच्या हाती सोपविणे. त्यासाठी प्रथम शासन शोषकवर्गाच्या मगरमिठीतून मुक्त करणे आवश्यक आहे, आणि ते पुनः केव्हाही त्यांच्या हाती जाणार नाही अशीही व्यवस्था करून ठेवणे आवश्यक आहे. यासाठी प्रथम श्रमिकांची एकाधिकारशाही (DICTATORSHIP OF THE PROLETARIAT)

स्थापन केली पाहिजे. समाजाने ही हुकूमशाही निमूटपणे सहन करावी म्हणून त्याच्यापुढे अशा एका आदर्श स्थितीचे चित्र ठेवण्यात आले की, शोषक-वर्ग समाप्त झाल्यावर, आणि त्याच्याकडून प्रतिक्रांतीची यत्किंचितही संभावना नाही, अशी स्थिती निर्माण झाल्यावर मग राज्यसंस्थेची गरजच उरणार नाही. यातून एक राज्यविहीन, वर्गविहीन आदर्श समाज निर्माण होईल.

पुढे रशियात मार्क्सवादी क्रान्ती झाली. परंतु लवकरच असे दिसून आले की, आलेली हुकूमशाही संपूर्ण शोषित जनतेची नसून एका पक्षाची आहे. त्यातही पुनः मूठभर पक्षपदाधिकाऱ्यांची आहे. ही अवस्था केवळ संक्रमण-काळापुरती आहे, प्रतिक्रांतीची यत्किंचितही शक्यता नाही अशी स्थिती निर्माण झाली की, मग ही अवस्था बदलून शोषितवर्गाची खरीखुरी अधिसत्ता सुरू होईल, या आशेने समाजाने मूठभर लोकांची ही निरंकुश जुलुमशाही काही काळ सहनही केली. परंतु लवकरच त्यांच्या ध्यानात आले की, एका व्यक्तीची किंवा मूठभर व्यक्तींची ही हुकूमशाही त्यांच्या कायमची बोकांडी बसली आहे. प्रतिक्रांतीला कोठेही जागा ठेवायची नाही या नावाखाली शासन अधिकाधिक निरंकुश होत आहे. वर्गविहीन समाज निर्माण होऊन शासनसंस्था अस्तंगत होईल ही घोषणा निव्वळ एक स्वप्नच ठरली आहे. साम्यवाद्यांनी धर्माच्या संदर्भात वापरलेल्या परिभाषेत बोलायचे तर शासनविरहित वर्गविहीन समाजाची कल्पना ही साम्यवादाने समाजाला दिलेली अफूची गोळीच ठरली.

मार्क्सवादाची प्रतिक्रिया

लोकशाहीच्या मुळावर आलेले समाजवादी क्रांतीचे रशियातील हे स्वरूप पाहून विचारवन्त समाजवादी चिन्ताक्रान्त झाले. भांडवलशाही व्यवस्थे-मुळे सर्वसामान्य श्रमिक जनता अमानुष दारिद्राच्या खाईत पिचत होती. या विपन्नावस्थेतून तिला बाहेर काढले पाहिजे हे त्यांचेही उद्दिष्ट होतेच. परंतु लोकशाहीने जे अधिकार मिळवून दिले होते, जी राजकीय समानता व स्वातंत्र्य दिले जाते, त्या गोष्टीही त्यांच्या दृष्टीने तितक्याच मोलाच्या होत्या. समाज-वादी क्रांतीकडून अपेक्षा अशी होती की, भांडवलशाही अर्थव्यवस्थेमुळे आर्थिक दृष्टचा अभावग्रस्त झालेल्या लोकांना तिने काही द्यावे. त्यांच्यापाशी आधीच असलेले अधिकार व स्वातंत्र्य हिरावून घ्यावे ही अपेक्षा नव्हती. परंतु काही देण्याऐवजी, शोषणरहित, राज्यविहीन समाजरचना आणण्याचे आमिष त्यांच्या

प्रत्यक्षात त्यांच्या हाती असलेले राजकीय स्वातंत्र्यही तिने हिरावून विचारमंथनातूनच, जो आजकाल लोकशाही समाजवाद या नावाने जातो, तो विचार पुढे आला. उत्पादनाच्या व वितरणाच्या सर्व शासनाची मालकी असली पाहिजे, हे लोकशाही समाजवाद्यांनाही मतपेटी आहेच. त्यांचा साम्यवाद्यांशी मतभेद आहे तो प्रामुख्याने एवढाच की, समाजवाद लोकशाही मार्गांनी अवतरला पाहिजे. (या बाबतीत चार्लस फ्युरियस, लुई ब्लॅक वा रावर्ट ओवेन यांच्या स्वप्नाळू समाजवादापेक्षा १९ व्या शतकाच्या शेवटी पुढे आलेल्या फेबियन समाजवादाशी लोकशाही समाजवादाचा तोंडवळा मिळताजुळता आहे.) एका दृष्टीने असे म्हणता येईल की, व्यक्तिसत्तावाद आणि समाजसत्तावाद यांचे संतुलन साधण्याचा हा प्रयत्न आहे. आहे. मुख्य प्रश्न असा आहे की, समाजवाद लोकशाही मार्गानी अवतरला तरी, समाजवाद आणि लोकशाही एकत्र नांदू शकतील काय ? कारण समाजवादाचे आग्रही प्रतिपादन आहे की, " समाजाच्या राजकीय, वैचारिक आणि सामाजिक जीवनाची जडणघडण उत्पादन-साधनांच्या स्रोतावरून, म्हणजेच त्यावर कोणाची मालकी आहे यावरून होत असते, म्हणून उत्पादनाची सर्व साधने व वितरणाची यंत्रणा शासनाच्या हाती असली पाहिजेत. " वस्तुतः शासनाचे कार्य, बाह्य शत्रूंपासून देशाचे रक्षण करणे, अंतर्गत शांतता व सुव्यवस्था ठेवणे हे आहे. सुव्यवस्थेच्या, सुखसमृद्धीच्या किंवा समाजपरिवर्तनाच्या नावाखाली जीवनाच्या सर्वच क्षेत्रांवर अधिकार प्रस्थापित करणे, ती आपल्या नियंत्रणाखाली घेणे हे शासनाचे काम नव्हे. परंतु आज ज्या समाजवादाची चर्चा सर्वत्र चालू आहे, आणि जेथे प्रत्यक्ष समाजवादी शासन आहे, तेथे अवस्था नेमकी हीच आहे. लोकशाही समाजवादाचीही या सिद्धान्तावर निष्ठा आहेच. शासनाचे असे सर्वंकष नियंत्रण असताना समाज शासनाविरुद्ध लोकशाही अधिकारांचा वापर निर्भयपणे कसा करू शकणार ? म्हणजेच समाजवाद व लोकशाही एकत्र कशी नांदू शकणार ?

लोकशाही, भांडवलशाही, समाजवाद आदी विचारप्रणालींचा इतिहास, त्यांतील एकांगीपणा व अपुरेपणा यांचा विचार आतापर्यंत आपण केला. परंतु हा विचार बऱ्याच अंशी भूतकाळातील क्रियाप्रतिक्रियांशी संबंधित आहे. एकात्म मानव दर्शन सादर करीत असताना, या विविध विचार-प्रणालींची आज प्रत्यक्ष व्यवहारात जी अवस्था आहे, तिचीही दखल घेणे आवश्यक आहे.

स्थापन केली पाहिजे. समाजाने ही हुकूमशाही निमूटपणे सहन करावी म्हणून त्याच्यापुढे अशा एका आदर्श स्थितीचे चित्र ठेवण्यात आले की, शोषक-वर्ग समाप्त झाल्यावर, आणि त्याच्याकडून प्रतिक्रांतीची यत्किंचितही संभावना नाही, अशी स्थिती निर्माण झाल्यावर मग राज्यसंस्थेची गरजच उरणार नाही. यातून एक राज्यविहीन, वर्गविहीन आदर्श समाज निर्माण होईल.

पुढे रशियात मार्क्सवादी क्रान्ती झाली. परंतु लवकरच असे दिसून आले की, आलेली हुकूमशाही संपूर्ण शोषित जनतेची नसून एका पक्षाची आहे. त्यातही पुनः मूठभर पक्षपदाधिकाऱ्यांची आहे. ही अवस्था केवळ संक्रमण-काळापुरती आहे, प्रतिक्रांतीची यत्किंचितही शक्यता नाही अशी स्थिती निर्माण झाली की, मग ही अवस्था बदलून शोषितवर्गाची खरीखुरी अधिसत्ता सुरू होईल, या आशेने समाजाने मूठभर लोकांची ही निरंकुश जुलुमशाही काही काळ सहनही केली. परंतु लवकरच त्यांच्या ध्यानात आले की, एका व्यक्तीची किंवा मूठभर व्यक्तींची ही हुकूमशाही त्यांच्या कायमची बोकांडी बसली आहे. प्रतिक्रांतीला कोठेही जागा ठेवायची नाही या नावाखाली शासन अधिकाधिक निरंकुश होत आहे. वर्गविहीन समाज निर्माण होऊन शासनसंस्था अस्तंगत होईल ही घोषणा निव्वळ एक स्वप्नच ठरली आहे. साम्यवाद्यांनी धर्माच्या संदर्भात वापरलेल्या परिभाषेत बोलायचे तर शासनविरहित वर्गविहीन समाजाची कल्पना ही साम्यवादाने समाजाला दिलेली अफूची गोळीच ठरली.

मार्क्सवादाची प्रतिक्रिया

लोकशाहीच्या मुळावर आलेले समाजवादी क्रांतीचे रशियातील हे स्वरूप पाहून विचारवन्त समाजवादी चिन्ताक्रान्त झाले. भांडवलशाही व्यवस्थे-मुळे सर्वसामान्य श्रमिक जनता अमानुष दारिद्र्याच्या खाईत पिचत होती. या विपन्नावस्थेतून तिला बाहेर काढले पाहिजे हे त्यांचेही उद्दिष्ट होतेच. परंतु लोकशाहीने जे अधिकार मिळवून दिले होते, जी राजकीय समानता व स्वातंत्र्य दिले जाते, त्या गोष्टीही त्यांच्या दृष्टीने तितक्याच मोलाच्या होत्या. समाज-वादी क्रांतीकडून अपेक्षा अशी होती की, भांडवलशाही अर्थव्यवस्थेमुळे आर्थिक दृष्ट्या अभावग्रस्त झालेल्या लोकांना तिने काही द्यावे. त्यांच्यापाशी आधीच असलेले अधिकार व स्वातंत्र्य हिरावून घ्यावे ही अपेक्षा नव्हती. परंतु काही देण्याऐवजी, शोषणरहित, राज्यविहीन समाजरचना आणण्याचे आमिष त्यांच्या



प्रत्यक्षात त्यांच्या हाती असलेले राजकीय स्वातंत्र्यही तिने हिरावून विचारमंथनातूनच, जो आजकाल लोकशाही समाजवाद या नावाने जातो, तो विचार पुढे आला. उत्पादनाच्या व वितरणाच्या सर्व शासनाची मालकी असली पाहिजे, हे लोकशाही समाजवाद्यांनाही मतपेटी आहेच. त्यांचा साम्यवाद्यांशी मतभेद आहे तो प्रामुख्याने एवढाच की, समाजवाद लोकशाही मार्गांनी अवतरला पाहिजे. (या बाबतीत चार्लस ह्युरियस, लुई ब्लॅक वा राबर्ट ओवेन यांच्या स्वप्नाळू समाजवादापेक्षा १९ व्या शतकाच्या शेवटी पुढे आलेल्या फेबियन समाजवादाशी लोकशाही समाजवादाचा तोंडवळा मिळताजुळता आहे.) एका दृष्टीने असे म्हणता येईल की, व्यक्तिसत्तावाद आणि समाजसत्तावाद यांचे संतुलन साधण्याचा हा प्रयत्न आहे. आहे. मुख्य प्रश्न असा आहे की, समाजवाद लोकशाही मार्गानी अवतरला तरी, समाजवाद आणि लोकशाही एकत्र नांदू शकतील काय ? कारण समाजवादाचे आग्रही प्रतिपादन आहे की, " समाजाच्या राजकीय, वैचारिक आणि सामाजिक जीवनाची जडणघडण उत्पादन-साधनांच्या स्रोतावरून, म्हणजेच त्यावर कोणाची मालकी आहे यावरून होत असते, म्हणून उत्पादनाची सर्व साधने व वितरणाची यंत्रणा शासनाच्या हाती असली पाहिजेत. " वस्तुतः शासनाचे कार्य, बाह्य शत्रूंपासून देशाचे रक्षण करणे, अंतर्गत शांतता व सुव्यवस्था ठेवणे हे आहे. सुव्यवस्थेच्या, सुखसमृद्धीच्या किंवा समाजपरिवर्तनाच्या नावाखाली जीवनाच्या सर्वच क्षेत्रांवर अधिकार प्रस्थापित करणे, ती आपल्या नियंत्रणाखाली घेणे हे शासनाचे काम नव्हे. परंतु आज ज्या समाजवादाची चर्चा सर्वत्र चालू आहे, आणि जेथे प्रत्यक्ष समाजवादी शासन आहे, तेथे अवस्था नेमकी हीच आहे. लोकशाही समाजवादाचीही या सिद्धान्तावर निष्ठा आहेच. शासनाचे असे सर्वकष नियंत्रण असताना समाज शासनाविरुद्ध लोकशाही अधिकारांचा वापर निर्भयपणे कसा करू शकणार ? म्हणजेच समाजवाद व लोकशाही एकत्र कशी नांदू शकणार ?

लोकशाही, भांडवलशाही, समाजवाद आदी विचारप्रणालींचा इतिहास, त्यांतील एकांगीपणा व अपुरेपणा यांचा विचार आतापर्यंत आपण केला. परंतु हा विचार बऱ्याच अंशी भूतकाळातील क्रियाप्रतिक्रियांशी संबंधित आहे. एकात्म मानव दर्शन सादर करीत असताना, या विविध विचार-प्रणालींची आज प्रत्यक्ष व्यवहारात जी अवस्था आहे, तिचीही दखल घेणे आवश्यक आहे.

स्थिरपद लोकशाहीचा आदर्श म्हणून सामान्यपणे इंग्लंड व[illegible] उल्लेख करण्यात येतो. इंग्लंडमध्ये अंतर्गत लोकशाही आहे, परंतु अग[illegible] परवापर्यंत त्या देशाचे जगातील फार मोठ्या भागावर साम्राज्य होते. 'साम्राज्यावर सूर्य कधीच मावळत नाही' असे मोठ्या दिमाखाने लोकशाहीवादी म्हणविणारे इंग्लंड सांगत असे. विविध देशांतील स[illegible] उठावांमुळे आणि दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणातील बदलल[illegible] परिस्थितीमुळे इंग्लंडला आपल्या साम्राज्याचे तंबू गुंडाळावे लागले. तरीही जेथे जेथे त्यांच्या वसाहतवादाचे अवशेष शिल्लक आहेत, तेथे आपली सत्ता काय[illegible] ठेवण्याचे इंग्लंडचे प्रयत्न आजही चालू आहेत. एवढी आंदोलने आणि रक्तम होऊनही आफ्रिकन देशांशी व्यवहार करताना रोमरोमांत भिनलेला वर्णत काळागोरा भेद, लोकशाहीवादी म्हणविणाऱ्या इंग्लंडला अजूनही सोष, आलेला नाही. अमेरिकेची अवस्था त्यापेक्षाही विचित्र आहे. तोंडाने जागता, शांततेचा, लोकशाही मूल्यांचा अखंड जप करीत असलेल्या अमेरिकेच्या लोकशाही खुंटीवर टांगून बसलेल्या पाकिस्तानसारख्या लष्करी राजवट असलेल्य देशांच्या अंगणात अत्याधुनिक विध्वंसक शस्त्रांचे ढीग ओतताना काहीही दिक्कत वाटत नाही. लाल चीनला शह देण्यासाठी व्हिएटनाममध्ये अब्जावधी डॉलर्सची शस्त्रास्त्रे पाठविणारी आणि लक्षावधी अमेरिकन सैनिकांचे बळी देणारी अमेरिका, जागतिक शांततेच्या नावाखाली रशियाला शह देण्यासाठी आता लाल चीनशी संधान बांधीत आहे. ही यादी आणखी खूप लांबविता येईल; परंतु स्वतःला लोकशाहीवादी म्हणविणाऱ्या या बडच्या देशांची लोकशाहीनिष्ठा किती बेगडी आहे हे स्पष्ट होण्यास एवढी उदाहरणे पुरेशी आहेत.

अन्य लोकशाही देशांचा विचार क्षणभर बाजूला ठेवून आपण आपल्या देशाकडे नजर टाकली तर येथे तरी काय दिसते ? स्वातंत्र्यानंतर बहुतेक सर्व संस्थाने उर्वरित भारतात विलीन झाली. अशा प्रकारे संस्थानांतील परंपरागत राजेशाही संपली, परंतु तिची जागा घराणेशाहीने घेतली. ही घराणेशाही औद्योगिक क्षेत्रात तर कित्येक वर्षांपासून आहेच. आता राजकीय क्षेत्रातही ती प्रतिष्ठित होऊ लागली आहे.

आपल्या देशातील लोकशाही ही जगातील सर्वांत मोठी लोकशाही समजली जाते. मतदारांची संख्या या निकषाने पाहता आपला देश हा सर्वांत मोठा लोकशाही देश आहे हे खरेच; परंतु Government of the people, by the


or the people हा जो लोकशाहीचा गाभा मानला जातो, किंवा विरोधी आदर, घटनेचा आदर, न्यायपालिकेचा आदर यांसारखे लोकशाहीचे ख संकेत आहेत त्या निकषांवर आपली लोकशाही तपासून पाहिली तर रा निराशाच येते. बहुसंख्य राजकीय पक्षांच्या दृष्टीने लोकशाहीचा अर्थ मतपेटीच्या माध्यमातून शासकीय सत्ता हस्तगत करण्याची व्यवस्था एवढाच असल्याने, सर्व सूक्तासूक्त मार्गांनी प्रतिस्पर्धी पक्षांच्या उमेदवारांना पराभूत करून सत्ता हस्तगत करणे, आणि हाती आलेल्या सत्तेला नाना क्लृप्त्या लढवून गोचिडीसारखे चिकटून राहाणे, एवढेच त्यांचे लक्ष्य असते. भांडवलशाहीत ज्याप्रमाणे आर्थिक सत्तेसाठी स्पर्धा, संघर्ष, 'सर्व्हायव्हल ऑफ दि फिटेस्ट' आदी गोष्टी केवळ क्षम्यच नव्हेत तर स्वाभाविक समजल्या जातात, तशीच काहीशी परिस्थिती राजकीय पक्षोपपक्षांच्या संबंधांची झाली आहे. लोकशाहीचा उदय मुळात राजेशाहीच्या निरंकुश सत्तेपासून प्रजेला मुक्त करण्यासाठी झाला; परंतु आज प्रत्यक्ष व्यवहारात लोकशाही ही सत्तारूढ बहुमतवाल्या व अनेकदा अल्पमतवाल्याही पक्षांच्या शासकांची एकाधिकारशाही व त्या पक्षाने पाळलेल्या, पोसलेल्या गोतावळ्याची पुंडशाही असल्याचे चित्र दिसत आहे.

साम्यवादाचे दारुण अपयश

लोकशाहीनंतर एक तत्त्वज्ञान या दृष्टिकोनातून आपण साम्यवादाचा विचार करू लागलो तर काय दिसते ? साम्यवादाचे एवढे प्रकार निर्माण झाले आहेत की, असली साम्यवाद कोणता आणि नकली साम्यवाद कोणता या प्रश्नांवर त्याच्या अनुयायांमध्येच रणे माजली आहेत.

'कम्युनिझम अपनीही कसौटी पर' या विषयावरील आपल्या भाषणात श्री. दत्तोपंत ठेंगडी यांनी साम्यवादी तत्त्वज्ञानाची परवड पुढीलप्रमाणे मोजक्या परंतु ठसठशीत शब्दांत मांडली आहे. "कम्युनिझम म्हणजे नेमके काय, याचा आता कम्युनिस्टांनाच विचार करण्याची पाळी आली आहे. आज कोणीही कम्युनिस्ट दुसऱ्या कम्युनिस्टाला खरा कम्युनिस्ट मानावयास तयार नाही. रशियाच्या दृष्टीने चीन पथभ्रष्ट (Daviationist) आहे; तर चीनच्या मते रशिया पथभ्रष्ट आहे. युगोस्लाव्हिया, रशिया व चीन या दोघांच्याही दृष्टीने पथभ्रष्ट आहे. उलट, युगोस्लाव्हिया, रशिया व चीन या दोघांना पथभ्रष्ट म्हणतो.

आपल्या येथे डांगे नंबुद्रिपादांना पथभ्रष्ट मानतात, नंबुद्रिपादांच्या मते

भाई डांगे पथभ्रष्ट आहेत. तथापी चारु मुजुमदार पथभ्रष्ट आहेत, य[illegible] डांगे व नंबुद्रिपाद या दोघांचे एकमत आहे. या सर्व कम्युनिस्टांनी एक[illegible] जी प्रमाणपत्रे बहाल केली आहेत. ती सर्व एकत्र करून निष्कर्ष काढ[illegible] असा निघेल की, जगातील यच्चयावत् कम्युनिस्ट पथभ्रष्ट झालेले आ[illegible]
(World communism is equal to world daviation.)

युरोपात गेल्या दोन दशकांत उदयास आलेल्या ' युरोकम्युनिझम ' आणि अगदी अलीकडच्या ' दी न्यू लेफ्ट ' यांनी तर जागतिक साम्यवादाच्या मुळावरच घाव घातला आहे,

एक तत्त्वज्ञान म्हणून साम्यवादाची सद्यःस्थिती काय आहे याचा विचार केल्यानंतर साम्यवादी देशांच्या प्रत्यक्ष व्यवहारासंबंधीही थोडा विचार करणे उपयक्त ठरेल. लोकशाही म्हटल्यानंतर ज्याप्रमाणे इंग्लंड व अमेरिका यांची नावे डोळ्यासमोर येतात, त्याचप्रमाणे साम्यवाद म्हटल्यानंतर रशिया व चीन ही दोन नावे प्रामुख्याने पुढे येतात. या देशांचे अंतर्गत समाजजीवन कसे आहे याचा बाह्य जगताला फारसा सुगावा लागणे कठीण असते, परंतु ' डार्कनेस ॲट नून ', ' गॉड डॅट फेल्ड ' किंवा ' दी न्यू क्लास ',' दी अन्परफेक्ट सोसायटी ' यांसारख्या मान्यवर ग्रंथांमधून तेथील समाजजीवनाचे जे चित्र दिसते ते मार्क्सच्या स्वप्नातील समाजाचे निश्चितच नव्हे. चीनच्या बाबतीतही तसेच म्हणावें लागेल. ' सांस्कृतिक क्रांती 'च्या वार्ता अधूनमधून त्या देशातून येत असतात, परंतु या सांस्कृतिक क्रांतीचा अर्थ सामूहिक शिरकाण असा असतो. ' शंभर फुले फुलू द्यात ' (Let hundred flowers blossom) ही घोषणाही चीनचीच. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात मात्र नव्याण्णव कळ्या खुडून टाकून फक्त एकाच फुलाला बहरण्याची संधी असते हे दिसून आले आहे.

साम्यवादी देशांतील समाजजीवनाचा विचार केल्यानंतर, आंतरराष्ट्रीय संबंधातील त्या देशांचे व्यवहार कसे आहेत हेही पाहण्यासारखे आहे. रशिया व चीन यांच्यामध्ये साम्यवादाचे वास्तविक स्वरूप व त्यांची वाटचाल या प्रश्नावरून तात्त्विक मतभेद असले तरी आंतरराष्ट्रीय राजकारणातील वाटचालीची दोघांचीही दिशा एकाच प्रकारची आहे. एका वाक्यात सांगायचे झाले तर दोघेही कट्टर साम्राज्यवादी आहेत. पंचशीलच्या घोषणा करीत चीन संपूर्ण तिबेट आणि भारताचा बराच भू-भाग गिळंकृत करून बसलेला आहे, तर रशियाचे रणगाडे पोलंड, हंगेरीमधील आपली कामगिरी (!) उरकून आता

[illegible] फघाणास्तानात आपली मोर्चेबंदी केली आहे.

[illegible] स्कृतीचा भस्मासूर

लोकशाही, भांडवलशाही, समाजवाद, साम्यवाद, आदी विचारधारांची आज प्रत्यक्ष व्यवहारात काय अवस्था आहे, या संबंधी आपण येथवर विचार केला. एकात्म मानवदर्शन प्रस्तुत करीत असताना या सर्व प्रवाहांबरोबरच मानवी जीवनावर विलक्षण प्रभाव पाडणाऱ्या आणखी एका प्रवाहाचीही दखल घेणे आवश्यक आहे. तो प्रवाह आहे, गेल्या दोन शतकांत उदयास आलेल्या यंत्रसंस्कृतीचा वा औद्योगिक संस्कृतीचा. या संस्कृतीने मानवासमोर काही आव्हाने उभी केली आहेत. युरोप, अमेरिका, आशिया या सर्वांसमोरच काही प्रश्न फेकले आहेत. प्राचीन युरोपीय संस्कृती आक्रमकांच्या टोळधाडींनी नष्ट झाल्या, परंतु हिंदू संस्कृती त्या आक्रमणांना तोंड देऊन टिकून राहिली, हा गतेतिहास गौरवास्पद आहे यात वाद नाही. परंतु या नव्या यंत्र-संस्कृतीचे आक्रमण कोण्या एका विशिष्ट संस्कृतीवर नसून जगातील सर्वच संस्कृतींवरील आक्रमण आहे. या संस्कृतीने प्राचीन व अर्वाचीन अशा सर्व मानवी संस्कृतींच्या विकासाचा मार्ग अवरुद्ध करून टाकला आहे. एवढेच नव्हे, तर त्यांची जीवनमूल्ये, आदर्श, आचारविचार, धर्मकल्पना, व्यक्तिगत, कौटुंबिक व सामाजिक जीवन या सर्वांमध्ये आपला शिरकाव करून घेतला आहे. या सर्व गोष्टी संपूर्णपणे उद्ध्वस्त करण्याच्या दिशेने तिची घोडदौड सुरू आहे.

दुसरा मुद्दा असा की, ही एखादी प्रादेशिक संस्कृती नसून जेथे जेथे विज्ञान व तंत्रज्ञान पोहोचले तेथे तेथे ही यंत्रसंस्कृती, पाऊस पडल्यावर आपोआप तण वाढावे तशी झपाट्याने वाढते. अठराव्या शतकात जेम्स वॅटने वाफेचा शोध लावल्यावर औद्योगिक संस्कृतीची गतिमानता व आक्रमकता वाढली, तर विसाव्या शतकात अणुविज्ञान व इलेक्ट्रॉनिक्स यांच्या योगे या संस्कृतीने गरुड-झेप घेतली. आज संपूर्ण जग या संस्कृतीच्या कवेत गेल्यासारखे असून इतर सर्व संस्कृती तिच्या बटिक झाल्यासारख्या दिसत आहेत. बरे, या संस्कृतीचा कोणी एक ऋषी, मुनी, आचार्य, व तत्त्वज्ञ प्रणेता नाही. आणि असे असूनही सर्वत्र जनसमुदाय तिच्याकडे वेगाने खेचला जात आहे. तेथे इच्छे-अनिच्छेचा प्रश्नच नसतो. भगवद्गीतेमध्ये विश्वरूप दर्शनाचे जे वर्णन आहे त्यातील पुढील श्लोक या संदर्भात प्रकर्षाने डोळ्यासमोर येतो.

यथा प्रदीप्तं ज्वलनं पतंगा
विशन्ति नाशाय समृद्धवेगाः
तथैव नाशाय विशन्ति लोका
स्तवापि वक्त्राणि समृद्धवेगाः। (भगवद्गीता, अध्याय, ११ श्लोक २९

(पेटलेल्या अग्नीमध्ये मरण्यासाठी मोठ्या वेगाने पतंग जसे उडया टाकतात, तद्वतच तुमच्याही अनेक जबड्यांत हे लोक मरण्यासाठी मोठ्या वेगाने शिरत आहेत.)

आज या यंत्र-संस्कृतीने मानवाची अशीच अवस्था करून ठेवली आहे.

या यंत्र-संस्कृतीने राजकीय व आर्थिक साम्राज्यवादाला विस्तारासाठी मोठी संधी मिळवून दिली आहे. एके काळी ज्याच्या हाती तलवार त्याचे साम्राज्य अशी स्थिती होती. पुढे ज्याच्या हाती तागडी त्याचे साम्राज्य असा एक काळ होऊन गेला. आज ही यंत्रसंस्कृती तागडी आणि तरवार ही दोन्ही आयुधे परजून सारे जग पादाक्रांत करावयास निघाली आहे.

आतापर्यन्त देशोदेशींची जनता जे अल्पस्वल्प सुख व शांती उपभोगीत होती ते या यंत्र-संस्कृतीबरोबर येणारे औद्योगीकरण व शहरीकरण यांनी हिसकावून घेतले आहे. या संस्कृतीने जीवन गतिमान केले, परंतु त्यातला जिव्हाळा आणि जिवन्तपणा संपुष्टात आणला. नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचा ऱ्हास सुरू झाला. जीवन धर्मप्रवणतेऐवजी अर्थप्रवण बनले. जुनी गुलामगिरीची पद्धत विचारवंतांनी व सुधारणावाद्यांनी संपविली; पण या औद्योगिक संस्कृतीने नव्या गुलामांची वेतनभोगी दास-संस्कृती निर्माण केली आहे. आपले भक्ष्य पकडण्यासाठी महत्प्रयासाने निर्माण केलेल्या जाळ्यात कोळी स्वतःच अडकून गुदमरून जावा तशी काहीशी अवस्था या यंत्र-संस्कृतीने मानवाची केली आहे.

अशा प्रकारे सारी मानवजात एका चमत्कारिक चक्रव्यूहात अडकून पडली आहे. या पार्श्वभूमीवर दीनदयाळजींनी एके ठिकाणी नम्रपणाने परंतु आत्मविश्वासाने असे म्हंटले आहे की, "भारतीय आणि भारताबाहेरील विविध विचारप्रवाहांचा सम्यक् विचार करून आणि त्या विचारातील सामर्थ्य, तसेच दुर्बलता ध्यानात घेऊन एकात्म मानव विचार असा एक मार्ग दाखवीत आहे की, जो मानवाला त्याचे आजवरचे चिंतन, अनुभव आणि सिद्धी या सर्व बाबतींत पुढे घेऊन जाईल."

त्या एकात्म विचाराचे विवेचन येथून पुढे केलेले आहे.

• • •

३

व्यक्तिविचार - चतुर्विध सुख

बऱ्याच वर्षांपूर्वी वाचनात आलेली छोटीशी बोधकथा.

एका बुद्धिमान् परंतु खोडकर मुलाच्या वडिलांनी, मुलाने काही काळ तरी एका जागी निमूट बसावे म्हणून एक प्रयोग केला. त्यांनी जगाचा एक मोठा नकाशा घेऊन त्याचे अनेक तुकडे केले. ते सर्व तुकडे मुलासमोर ठेवून ते त्याला म्हणाले, "हे सर्व तुकडे जुळवून तू नकाशा होता तसा करून दे पाहू."

मुलाला हे काम खूपच आवडले. त्याने ते सर्व कपटे घेऊन नकाशा जुळविण्यास प्रारंभ केला. परंतु बराच वेळ प्रयत्न करूनही नकाशा काही जमेना. योगायोगाने वाऱ्याची एक झुळूक येऊन त्यांतले काही तुकडे उलटे झाले. मुलाने त्या तुकड्यांकडे निरखून पाहिले, तेव्हा त्यावर त्याला माणसाच्या आकृतीचे काही भाग दिसले. मुलाच्या डोक्यात एक नवीनच कल्पना चमकून गेली. वडिलांनी सांगितलेले नकाशा जुळविण्याचे काम बाजूला ठेवून त्याने माणसाची आकृती जुळविण्यास सुरुवात केली. थोड्याच वेळात माणसाची आकृती पूर्ण झाली. सहज कुतूहल म्हणून त्याने ती आकृती उलटी करून पाहिली. आणि काय आश्चर्य ! जगाचा नकाशा व्यवस्थित जुळून गेला होता.

कथेचा आशय स्पष्ट आहे. एकदा माणसाची जुळणी नीट झाली म्हणजे जगाचा गाडा सुरळीत चालेल. आता स्वाभाविकपणेच प्रश्न उभा राहतो की, माणसाची जुळणी म्हणजे नेमके काय ? आणि या प्रश्नाचे उत्तर शोधू लागले म्हणजे प्रश्नांची एक भली मोठी मालिकाच समोर उभी राहते. उदा., मुळात

माणूस म्हणजे काय ? त्याची प्रकृती कोणती ? त्याच्या सहज प्रवृत्ती क[illegible] इच्छा-आकांक्षा कोणत्या ? गरजा कोणत्या ? त्याच्या जीवनात कधीकध[illegible] ना त्या प्रकारच्या विकृती निर्माण होतात, त्या कशामुळे ? त्याच्या जीवना[illegible] प्रयोजन काय ? त्याचे अंतिम लक्ष्य कोणते ? त्या लक्ष्याकडे जाण्याचा मार्ग कोणता ? हा मार्ग एकच आहे की, अनेक आहेत ? त्या मार्गाने वाटचाल करण्याच्या दृष्टीने पोषक गोष्टी कोणत्या ? त्या मार्गातील संभाव्य अडचणी कोणत्या ? धोके कोणते ? त्यावर मात कशी करावयाची ? माणसाच्या जुळणीचा विचार करावयाचा म्हणजे अशा असंख्य प्रश्नांचा विचार करावा लागेल.

हा सर्व विचार करीत असताना आणखीही एक गोष्ट ध्यानात धरावी लागेल. ती अशी की, या विश्वात माणूस काही एकटाच राहात नाही. इतर मानवही राहतात. त्याशिवाय जलचर–स्थळचर प्राणी आहेत. वृक्षवल्लरी, नद्या, पर्वत, समुद्र आहेत. आकाशस्थ ग्रहतारे आहेत. या सर्वांचे परस्परांशी काही संबंध आहेत काय ? असल्यास कशा प्रकारचे आहेत ? शत्रुत्वाचे आणि संघर्षाचे आहेत ? उदासीनतेचे आहेत ? की मूलतः सहकार्याचे, परस्परपूरक व परस्पर पोषक आहेत ?

या दृष्टीने विश्वाच्या एकूण पसाऱ्याच्या विचार करू लागले म्हणजे आणखी असेही दिसते की, येथे विलक्षण विविधता आहे. मानव-सृष्टी, मानवेतर प्राणिसृष्टी, वनस्पती-सृष्टी आणि अचेतन भासणारी सृष्टी यांमध्ये तर विविधता आहेच, परंतु माणसा-माणसांमध्ये, वनस्पती-वनस्पतींमध्ये आणि अचेतन वस्तूं-मध्येही केवढी विविधता आहे ! आणि एवढी विविधता असूनही विश्वाचे हे रहाटगाडगे त्या मानाने खूपच सुरळीतपणे चाललेले आहे. पाचपन्नास वर्षे, शे-पाचशे वर्षे नव्हे, तर अनादी काळापासून ! स्वाभाविकपणेच प्रश्न असा पडतो की, या सर्व दृश्य विविधतेमागे, या सर्वांना जोडणारे, त्यांचा समन्वय साधणारे आणि त्यांच्यांत संतुलन ठेवणारे एखादे अदृश्य तत्त्व वा शक्ती आहे काय ? असेल तर त्या तत्त्वाचा वा शक्तीचा या सर्वांशी असलेला संबंध कोणत्या प्रकारचा आहे ? हा संबंध हेच मानवाच्या आणि संपूर्ण विश्वाच्या एकात्मतेचे सूत्र असेल काय ?

जगाच्या नकाशावरील मानवाच्या जुळणीचा विचार करताना या सर्वच गोष्टींचा साकल्याने विचार करणे अपरिहार्य आहे. एकात्म मानव दर्शनाने भारतीय संस्कृतीच्या (तत्त्वज्ञानाच्या) प्रकाशात असा सर्वांगीण विचार केला

[redacted]वढेच नव्हे तर आधुनिक संदर्भात ते त्याचे अनन्य वैशिष्ट्य आहे.

[redacted]त्म सूत्र

आता माणसाच्या आदर्श परिपूर्ण जीवनासंबंधी विचार करावयाचा तर सामान्यपणे तो आहे कसा हे प्रथम ध्यानात घेणे आवश्यक आहे. हा विचार करताना पहिली गोष्ट ध्यानात येते ती अशी की, जगण्याची इच्छा ही माणसाची प्रमुख सहजप्रवृत्ती आहे. 'मरणं प्रकृतिः शरीरिणाम् विकृतिर्जीवनमुच्यते,' 'जीवन क्षणभंगुर आहे', 'संसार असार आहे,', 'सुख पाहता जवापाडे दुःख पर्वताएवढे' यांसारखी वचने प्रचलित असली तरी त्यामुळे माणसाची जगण्याची, दीर्घकाळ जगण्याची इच्छा काही सुटलेली नाही. शरीरामध्ये जे अनादी, अनंत अवध्य आत्मतत्त्व वास करीत असते, ते या सहजप्रवृत्तीचे कारण असावे. भारतीय संस्कृतीने माणसाची ही सहज प्रवृत्ती उपेक्षिलेली वा धिक्कारलेली नाही. उलट, 'जीवेत शरदः शतम्' असा तिचा उद्घोष आहे. गुरुजनांनी द्यावयाच्या आशीर्वादामध्ये 'दीर्घायुषदा भव', 'चिरंजीवी भव' यांसारख्या स्वस्ति वचनांचा प्रामुख्याने अंतर्भाव आहे, तोही या दृष्टीने अर्थपूर्ण आहे.

परंतु माणसाला केवळ दीर्घायुष्य समाधान देत नाही. ते दीर्घायुष्य सुखमय असावे अशी त्याची इच्छा असते. आयुष्यभर त्याची जी अखंड धडपड, धावपळ चाललेली असते ती सुखी जीवनासाठी. जीवनात जास्तीत जास्त सुख कसे हाती येईल या हिशेबानेच त्याचे सर्व विचार-व्यवहार चाललेले असतात. प्रकृती, वयोमान, संस्कार, मन-बुद्धीचा विकास, स्थळ-काळ-परिस्थिती यांनुसार सुखाविषयीच्या त्याच्या कल्पनांमध्ये व ते प्राप्त करण्यासाठी चाललेल्या त्याच्या प्रयत्नांच्या दिशेमध्ये फरक आढळत असेल; परंतु अधिकाधिक सुख निर्भेळ अविच्छिन्न सुख हेच त्याच्या धावपळीचे लक्ष्य असते हे निर्विवाद आहे.

सुखाची एकांगी कल्पना

अखंड, अपरिमित सुखाची ही कामना मानवी प्रकृतीला धरूनच आहे. परंतु सर्वसामान्यपणे असे दिसते की माणसाची सुखाची कल्पना प्रायः एकांगी असते. इंद्रियांद्वारे मिळणारे सुख – म्हणजेच शरीराचे सुख - हेच सुख-सर्वस्व होय अशी त्याची भावना असते. आणि त्यामुळे त्याची धाव या प्रकारचे हे सुख अधिकाधिक कसे मिळेल, या दिशेनेच असते. निरोगी शरीर, हाती भरपूर पैसा, राहण्यासाठी सर्व सुखसोयींनी सुसज्ज घर, सुस्वरूप पत्नी, मोजका आटोपशीर

परिवार, सुग्रास भोजन, तऱ्हेतऱ्हेचे उंची कपडे, नाटक-सिनेमा-रेडिओ, मोटार आदी गोष्टींची अनुकूलता आणि समाजात प्रतिष्ठा वा अधिकार सर्वसामान्यपणे माणसाच्या सुखी जीवनाविषयीच्या कल्पना असतात. थोडक्यात असे म्हणता येईल की, विविध विषयोपभोगाची पूर्तता म्हणजे सुखसर्वस्व असे त्याचे समीकरण असते. आता हे सुख जास्तीत जास्त कसे मिळेल ? भौतिक गरजा-इच्छा-वासनांची तृप्ती म्हणजेच सुख अशी सुखाची कल्पना ठरलेली असली, म्हणजे मग भौतिक गरजा अधिकाधिक वाढवीत जाणे, इच्छा-वासना अधिकाधिक चेतवीत जाणे, त्या पूर्ण करणारी अधिकाधिक साधने गोळा करणे आणि त्या साधनांसाठी अधिकाधिक संपत्ती मिळविणे हाच सुखाचा राजमार्ग होय, असे त्याचे उत्तरही ओघानेच येते. 'सुखी माणसाचा सदरा' या गोष्टीतील सुखाची कल्पना व साधना बाजूला राहून भौतिक सुखाची साधने व त्यासाठी लागणारी धन-संपत्ती ज्याच्यापाशी अधिक तो अधिक सुखी अशी कल्पना दृढ होऊ लागते, आणि मग ओघानेच अधिकाधिक धन गाठी बांधणे हेच जीवनाचे प्रमुख लक्ष्य होऊन बसते.

आता भौतिक सुखाचे स्वरूप असे असते की, सुखाची साधने आणि सुखाची कामना यांच्या गुणोत्तरावरून सुखप्राप्तीचे प्रमाण ठरत असते. गणिताच्या परिभाषेत बोलावयाचे तर सुखाची साधने भागिले सुखाची तृष्णा यांचा येणारा भागाकार म्हणजे सुख. आणि भौतिक काम्य सुखांच्या बाबतीत तर 'न जातु कामः काम्यानामुपभोगेन शाम्यति। हविषा वर्त्मन इव भूय एव विवर्धते ।।' (उपभोगाने वासनांचा उपराग होत नाही उलट आहुती दिल्याने अग्नी अधिक प्रज्वलित व्हावा त्याप्रमाणे उपभोगाने काम उत्तरोत्तर वाढत जातो, अथवा 'तृष्णा न जीर्णा वयमेव जीर्णाः' (शरीर जर्जर व गलितगात्र झाले, पण वासनांचा जोर कमी झाला नाही) अशी अवस्था असल्याने माणसाचे सुखाचे गणित नेहमीच अपूर्णांकात राहते. त्याचे सुखाचे मापटे कधी भरतच नाही 'सुख पाहता जवापाडे, दुःख पर्वताएवढे' असे त्याला वाटत राहते. ज्याच्यापाशी उदंड संपत्ती आहे, अशी माणसेही सुखी, तृप्त, समाधानी असतातच असे आढळत नाही. पूर्ण अखंड सुख तर माणसाला हवेहवेसे वाटत असते. त्याची सुखाची ही ओढ अगदी स्वाभाविक आहे. परंतु अंशस्थानी असलेली सुखाची साधने मर्यादित, तसेच सुखोपभोगाची व्यक्तीची क्षमता मर्यादित आणि छेदस्थानी


ची सुखलालसा तर भूमितीश्रेणीपेक्षाही द्रुतगतीने वाढत जाणारी. अशा अवस्थेत सुखाचा पूर्णांक त्याच्या हाती लागावा कसा ? यावर उपाय म्हणून गौतमबुद्धासारख्यांनी छेदस्थानी असलेल्या वासनांचा क्षय करावा असे उपदेशिले. छेद शून्यावर आला की, सुख पूर्णांक ओलांडून त्याची परिणती असीम सुखात होते हे सत्य सांगितले. परंतु सुखाचे हे समीकरण गणिताच्या परिभाषेत ठीक असले, तरी प्रत्यक्ष जीवनात वासनांचा संपूर्ण क्षय करणे सामान्य माणसाला प्रायः अशक्य आहे, अगदी निर्वाणसुख मिळवावयाचे म्हटले तरी, तेथवर पोहोचण्यासाठी किमान शरीरधारणा अपरिहार्य आहे. अर्थातच शरीराच्या म्हणून ज्या काही गरजा असतात, भुका असतात, त्या राहाणारच. म्हणजे वासनाक्षयाच्या मार्गाने विचार करू म्हटले तरी मूळ प्रश्न कायमच राहतो.

वासनांचे घोडे पूर्णपणे मोकाट सोडणे किंवा वासनांचा संपूर्ण क्षय करू पाहाणे हे दोन्ही टोकाचे विचार बाजूला ठेवून भारतीय संस्कृतीने सुखप्राप्तीचा समन्वित मार्ग दाखविला आहे. पुरुषार्थामध्ये अर्थ व काम या दोन पुरुषार्थांचा अंतर्भाव करून भौतिक सुखाचे मानवी जीवनातील स्थान व महत्त्व या संस्कृतीने मान्य केले आहे, परंतु ही संस्कृती केवळ (इंद्रियजन्य) भौतिक, सुखापाशी थांबत नाही. शारीरिक सुखांबरोबरच तिने मन, बुद्धी, आत्मा यांच्या उज्ज्वल सुखाचाही विचार केला आहे. मानवी जीवनाच्या परिपूर्णतेसाठी या सुखांची अपरिहार्यता प्रतिपादन करून तिने त्यांची दालने मानवासाठी खुली केली आहेत. इंद्रियजन्य सुखांपासून प्रारंभ करून मन, बुद्धी, यांचे उन्नयन करीत, त्याही सुखांची अनुभूती घेत घेत घनीभूत परमसुखापर्यंतचा म्हणजेच मोक्ष प्राप्तीपर्यंतचा प्रवास या संस्कृतीने आदर्श म्हणून मानवासमोर ठेवला आहे.

मनाचे सुख

जीवनात भौतिक सुखांचे महत्त्व निर्विवाद आहे. परंतु एखादी बाब महत्त्वाची असणे निराळे आणि तिलाच जीवनाचे सारसर्वस्व वा एकमेव लक्ष्य मानणे वेगळे. भौतिक वा इंद्रियजन्य सुखांच्या बाबतीतही हे खरे आहे. या सुखांना मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान आहे, परंतु शरीरसुख म्हणजे सुखसर्वस्व नव्हे, माणसाला शरीर असते त्याचबरोबर मनही असते. विविध इंद्रियांद्वारे त्या त्या विषयांच्या आस्वादातून लाभणाऱ्या सुखाची अनुभूती माणसाला त्याच्या

मनाद्वारेच होत असते हे खरे असले तरी, निव्वळ मनाचेच असे सुख-दुःख अ

पंडित दीनदयाळजी या संदर्भात एक मजेशीर गोष्ट सांगत. स्वतः साम्यवादी म्हणविणारा एक मनुष्य एकदा आपल्या मित्राला आग्रहपूर्वक असे पटवून देण्याचा प्रयन्न करीत होता की, मानवी जीवनात सर्वांत महत्त्वाचा किंवहुना एकमेव महत्त्वाचा प्रश्न भाकरीचा आहे. बराच वेळ या मित्राने त्याचे बोलणे ऐकून घेतले, परंतु त्याची चपर्टपंजरी काही थांबण्याचे लक्षण दिसेना. शेवटी वैतागून त्या मित्राने साम्यवादाच्या त्या भक्ताला म्हटले, " जगात केवळ भाकरीचाच प्रश्न महत्त्वाचा आहे असे तुला खरोखरच वाटते का ?" तो कम्युनिस्ट लगेच उत्तरला –" अलवत्." यावर तो मित्र त्याला म्हणतो, "ठीक आहे, तुझ्या भाकरीचा प्रश्न मी सोडवितो. उद्यापासून तू रोज माझ्या घरी येत जा. मी तुला पोटभर सुग्रास जेवू घालीन. पण त्याचवरोवर माझी एक अट मात्र आहे. संध्याकाळी याच जागी भर रस्त्यावर उभा राहून मी तुला चार जोडे मारीन." तो कम्युनिस्ट अवाक् होऊन पाहातच राहिला. तेव्हा त्या मित्राने उत्तर दिले," तुझ्यामते सर्वांत महत्त्वाचा प्रश्न भाकरीचा आहे ना ? तो प्रश्न मी सोडविला आहे. आता जाता जाता चार जोडेही तुला मारले तर तुझी तक्रार का असावी ? तुझ्या सुखात बाधा का यावी ?"

तात्पर्य, माणसाला शरीर असते, तसेच मनही असते. माणसाच्या सुखाचा विचार करताना या मनाचेही सुख असते हे विसरून चालणार नाही. दुर्गम सीमा-प्रदेशात गस्त घालीत असलेल्या सैनिकांचे मन गावाकडचे पत्र येताच मोहरून येते ते का ? प्रतिवर्षी लक्षावधी वारकरी उन्हा-पावसाची पर्वा न करता पंढरीला लोटतात ते कशासाठी ? आजारपणात सर्व अद्यावत् सुखसोयी आणि शुश्रूषेसाठी पगारी नर्स असूनही अंगावरून हात फिरविणारे कोणीतरी मायेचे माणूस जवळ असावे असे वाटते ते का ?

चांगले काम केल्यावर कोणी आपली पाठ थोपटली, कौतुकाचे चार शब्द ऐकायला मिळाले म्हणजे बरे वाटते. बालकाचे बोबडे बोल ऐकून मातेला परमानंद लाभतो. हे सुख श्रवणसुख म्हणजे इंद्रियजन्य सुख म्हणावयाचे काय ? सुरेल संगीत ऐकून होणारे सुख आणि वरील सुखे ही दोन्ही एकाच जातीची सुखे म्हणावयाची काय ? असे म्हणता येणार नाही. तसेच, कोणी आपल्याला अपशब्द बोलले तर दुःख होते, संताप येतो. असे का होते ? त्या अपशब्दांमुळे आपल्या शरीराला काही इजा होत नसते, आणि तरीही आपल्याला दुःख होते,



ी. हे कशामुळे घडते ? उलट कित्येकदा असेही आढळते की, सुखोपयोगाची सर्व साधने हाताशी असूनही आपले मन त्यांत रमत नाही. असे का होते ? सुख केवळ शरीराचे नसून मनाचेही असते हेच याचे उत्तर आहे.

बुद्धीचे सुख

परंतु मानवी सुखासंबंधी विचार करताना केवळ शरीराचा व मनाचा विचार करून भागणार नाही. माणसाला शरीर व मन असते, त्याचबरोबर बुद्धीही असते. सुख शरीराचे असते, मनाचे असते, तसेच बुद्धीचेही असते.

माणसाची बुद्धी इतर प्राण्यांच्या तुलनेने खूपच विकसित असते. मानवेतर प्राण्यांची बुद्धी आहार–निद्रा–भय–मैथुन वा तत्सम सुखांपुरती व गरजांपुरतीच मर्यादित असते. काल–आज–उद्या हा कालसंदर्भ, विचारांचे, आकांक्षांचे व जीवनातील अनुभूतींचे संकलन, त्यांचा कार्यकारण संबंध, त्यातून निघणारे काही आडाखे, त्या आडाख्यांनुसार करावयाच्या योजना, समोर दिसत असलेल्या सृष्टीच्या उत्पत्ती–स्थिती–विलयाचे कुतूहल आदी प्रश्न मानवेतर प्राण्यांसमोर नसतात. त्यामुळे त्यांचे बुद्धिजन्य सुखाचे क्षेत्रही मर्यादित असते, माणसाची बुद्धी मात्र अशा प्रकारच्या अनेक गोष्टींचा सतत वेध घेत असते. त्यामुळे त्याच्या शरीर–मनाच्या सुखाप्रमाणेच बुद्धीच्या सुखाचे क्षेत्रही खूप विशाल व व्यापक असते.

उदाहरणार्थ, अभ्यास करीत असताना वा शिक्षक वर्गात शिकवीत असताना विद्यार्थ्याच्या मनात एखादी शंका उपस्थित होते. त्याचे उत्तर त्याला हवे असते, पण ते सापडत नाही. कधी कधी गणितातल्या एखाद्या कूटप्रश्नावर तो अडून बसतो. उत्तर शोधण्यासाठी तो नानाप्रकारांनी उलटसुलट आकडेमोड करून पाहातो. तथापि प्रश्न उलगडत नाही. कधीकधी तर गुंता अधिक वाढतच जातो. तो अस्वस्थ होतो. आणि असे करता करता केव्हातरी त्याच्या प्रश्नाचे उत्तर त्याला मिळून जाते. तो प्रफुल्लित होतो. निःसंशय हे बुद्धीचे सुख असते.

बुद्धीच्या सुखाचे आणखीही काही प्रकार आहेत. एखादी गोष्ट आपल्याला चांगली माहीत असते. उदाहरणार्थ, व्यक्तीचे वा स्थळाचे नाव, कवितेची ओळ, घटनेचा वा वाक्याचा संदर्भ वगैरे. परंतु ऐन वेळी तिचे विस्मरण होते. डोके खाजवून आपण आठवण्याचा खूप प्रयत्न करतो. परंतु काही उपयोग होत नाही. आपण खूप बेचैन होतो. आणि मग अचानक केव्हातरी डोक्यात

प्रकाश पडतो. इतका वेळ चाललेली घालमेल लगेच संपते. कसे हलके वाटते. हे सुख बुद्धीचे सुख आहे हे उघड आहे.

बुद्धीच्या सुखाची अशी आणखीही उदाहरणे सांगता येतील. बुद्धिबळाचा डाव मांडलेला असतो. मध्येच एखाद्या खेळीवर डाव अडतो. आपण खूप डोके खाजवतो ; परंतु परिणाम शून्य. आणि मग अचानक एखादी अफलातून खेळी सुचते. प्रतिपक्षावर मात होते. 'जितं मया' चे समाधान लाभते. रणक्षेत्राची व्यूहरचना करताना तर बुद्धीच्या कसोटीची आणि तज्जन्य यशापयशाच्या सुखदुःखाची प्रचीती अनेक वेळेला येत असते. परंतु माणसाच्या बुद्धीची भूक दैनंदिन जीवनातील कूट प्रश्न सोडविण्यापुरतीच, तसेच बुद्धिबळाच्या खेळातील वा रणक्षेत्रावरील व्यूहरचनेपुरतीच मर्यादित असते असे नाही. या संपूर्ण विश्वावे कोडे उलगडण्याच्या दृष्टीनेही तिचा संचार चालू असतो. हे सारे विश्व कशामधून निर्माण झाले ? कसे निर्माण झाले ? कोणी निर्माण केले ? या विश्वामध्ये अनंत घडामोडी अहर्निश चालू असतात, त्यामागे एखादे निश्चित सूत्र आहे काय ? हे सूत्र स्वयंचलित आहे की, त्याचा कोणी नियंता आहे ? आपल्या या ज्ञात सृष्टीपलीकडे आणखीही एखादी सृष्टी, सृष्टिमालिका असेल काय ? आणि हे सर्व अवाढव्य चक्र कोठे चालले आहे ? त्याचा अंत होणार आहे काय ? कसा ? कधी ? अशा असंख्य प्रश्नांच्या उत्तरांची भूक माणसाच्या बुद्धीला असते. आणि त्या त्या प्रश्नांची उत्तरे मिळाली म्हणजे त्याला पराकोटीचे समाधान लाभते. तत्त्वज्ञ आणि वैज्ञानिक यांना त्यांच्या गहन प्रश्नांची उत्तरे सापडल्यावर होणारा आनंद हे बुद्धीचेच उच्चतर सुख होय. स्नानगृहात स्नानाला बसलेला आर्किमिडीज सापेक्ष घटनेचे कोडे उलगडताच 'युरेका युरेका' म्हणत तसाच स्नानगृहाबाहेर पडून धावत सुटला तो या बुद्धिसुखाने बेहोश झाल्यामुळेच.

बुद्धीच्या सुखाचा विचार करीत असताना आणखी एका पैलूची दखल घेणेही आवश्यक आहे. व्यवसायात्मिका असणे हे बुद्धीचे वैशिष्ट्य मानले गेले आहे. सोप्या शब्दात सांगायचे तर कार्य–अकार्यासंबंधी निश्चयात्मक निर्णय करणे हे बुद्धीचे काम आहे. मन 'संकल्पविकल्पात्मक' तर बुद्धी 'व्यवसायात्मिका' आहे. माणसाला परमेश्वराने जी बुद्धी दिली आहे, तिच्यामुळेच तो क्षणिक सुख आणि दीर्घ कालीन वा चिरंतन सुख, संकुचित सुख व व्यापक सुख यांमधील फरक जाणू शकतो ; आणि क्षणिक वा संकुचित सुखाच्या मोहाला बळी न

 चिरंतन व व्यापक सुखाचा मार्ग – तो कंटकाकीर्ण असला तरीही [illegible]रतो. ' जे दिव्य दाहक म्हणोनि असावयाचे, बुध्याचि वाण धरिले करि हे सतीचे ' या स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या काव्यपंक्ती या संदर्भात पुरेशा अर्थवाही आहेत.

गोस्वामी तुलसीदासांची कथा या संदर्भात उल्लेखनीय आहे. तुलसीदासांचे आपल्या पत्नीवर एवढे अलोट प्रेम होते की, त्यांना तिचा विरह क्षणकालही सहन होत नसे. एकदा ती माहेरी गेली. तुलसीदासांना राहवेना. ते पत्नीच्या गावी जायला निघाले. दिवस पावसाळ्याचे. वाटेत मोठी नदी. नदीला तुफान पूर. रात्रीची वेळ, होडी मिळेना. प्रवाहाबरोबर एक प्रेत वाहात येत होते. त्या प्रेताला धरून तुलसीदास नदी पार करून गेले. अंधारात ठेचकाळत कसेबसे श्वशुरगृही पोहोचले, पण दरवाजा बंद. वर जायचे कसे ? तेवढ्यात खिडकीतून एक जाड़जूड दोर लोंबत असलेला त्यांना दिसला. त्या दोराच्या सहाय्याने वर चढून ते खिडकीमार्गे पत्नीच्या शयनगृहात दाखल झाले. एवढ्या अपरात्री पावसा-पाण्यात तुलसीदासांना अचानक आलेले पाहून पत्नीला आश्चर्य वाटले. तिने विचारले, " एवढ्या वादळवाऱ्यात तुम्ही येथवर पोहोचलात तरी कसे ?" आपण नदी कशी पार केली, ती सारी कथा तुलसीदासांनी तिला सांगितली; आणि म्हटले, " आणि खिडकीतून वर येण्यासाठी दोर तर तूच बांधून ठेवला होतास." " दोर ? कसला दोर ? " पत्नीने चपापून विचारले. खिडकीपाशी जाऊन पाहाते तो एक भला मोठा साप पावसाने गारठून खिडकीच्या आधारे लोंबत असलेला तिला दिसला. तो काळसर्प पाहाताच सारा प्रकार तुलसीदासांच्या पत्नीच्या ध्यानात येऊन तिच्या पोटात धस्स झाले. तिने तुलसीदासांना म्हटले, " हाडामासाच्या या नाशवंत गोळ्यामागे तुम्ही एवढे पागल झालात, हेच वेड परमेश्वराविषयी लागले तर तुमचे जीवन कृतार्थ होईल ! " पत्नीचे हे शब्द ऐकून तुलसीदासांच्या विवेकबुद्धीची कवाडे सताड उघडली. श्रेयाच्या आड उभी असलेली पत्नीच्या विषयीच्या आसक्तीची भिंत क्षणात कोसळून पडली. चिरंतन परमसुखाचा, मोक्षाचा मार्ग मोकळा झाला. ते ' गोस्वामी ' बनले. ' तुलसीरामायण ' ही शतकानुशतके कोट्यवधी लोकांचे जीवन उजळून टाकणारी, महान् कृती म्हणजे त्यांच्याच प्रतिभेची निर्मिती.

आत्म्याचे सुख

तथापि भारतीय चिंतन केवळ बुद्धीच्या सुखापाशी थांबत नाही. या

चिंतनानुसार बुद्धीच्या सुखाहूनही श्रेष्ठतर असा सुखाचा एक प्रकार [redacted] सुख म्हणजे आत्मसुख. माणसाला शरीर, मन, बुद्धी यांबरोबरच आ[redacted] असतो. म्हणून माणसाच्या सुखाचा विचार करताना आत्मसुखाचाही विचा[redacted] करावा लागेल.

येथे कोणी अशी शंका उपस्थित करू शकेल की, आत्मा तर दिसत नाही, तो मुळात आहे हे कशावरून ? काही पाश्चात्य तत्त्वज्ञांनी आणि पौर्वात्य दार्शनिकांनी हा प्रश्न उपस्थित केलाही आहे. परंतु शरीर-मन-बुद्धी या त्रयीपैकी मन आणि बुद्धी यांचे अस्तित्व पंच ज्ञानेंद्रियांनी कोठे जाणवते ? तरीही ती आहेत असे गृहीत धरूनच आपण माणसाचा विचार करतो ना ? अशा प्रकारे मन-बुद्धीचे अस्तित्व जर आपण गृहित धरतो तर मग त्याच न्यायाने आत्म्याचे अस्तित्व स्वीकारण्यास तार्किक अडचण असण्याचे कारण नाही. परंतु खरी अडचण वेगळीच आहे. आत्मा आहे असे गृहित धरले तरी आत्मा म्हणजे खरोखर काय ? तो असतो कसा ? कोठे ? इत्यादी प्रश्न पुढे येतात. सर्वसामान्य मनुष्य या विषयात फारसा खोल शिरू इच्छित नाही. प्रपंचाच्या धकाधकीत आत्मविचाराची निकड त्याला वाटत नाही. त्याच्या मते आत्म्याचा विचार करायचाच असेल तर तो 'अंगं गलितं पलितं मुण्डं दशनविहिनं जातं तुण्डम्' किंवा 'कृतान्तकटकामलध्वजजरा दिसो लागली' अशी गलितगात्र अवस्था झाल्यावर करावयाचा. शिवाय आपल्या येथे आत्म्याचे वर्णन आहे ते असे की, तो अशरीरी, निर्गुण आणि निर्लेप असतो. रसायन-शास्त्रानुसार काही वायू रंगरहित, वासरहित, स्वादरहित (Colourless, Odourless, Testless) असतात तसा. त्यामुळे हा गुंता अधिकच वाढत जातो. स्वतः गीताकारांनीही 'इंद्रियाणि पराण्याहुः इंद्रियेभ्यः परं मनः मनसस्तु परा बुद्धिः यो बुद्धेः परतस्तु सः' असे आत्म्यासंबंधी म्हणून ठेवले आहे. अशा प्रकारे आत्म्याचा प्रांत पंचइंद्रिये, मन, बुद्धी यांच्या पलीकडे असल्याने सामान्य माणसाला तो अनाकलनीय वाटावा यात आश्चर्य नाही. परंतु ज्या गोष्टीचे सामान्य पंचज्ञानेंद्रियांना वा मनव-बुद्धीला आकलन होत नाही, तिचे अस्तित्वच नाकारणे तर्काला धरून नाही, अथवा ती कमी महत्त्वाची आहे असेही म्हणता येणार नाही. काही गोष्टी केवळ अतींद्रिय शक्तीच्या अनुभूतींच्या कक्षेत येणाऱ्या असतात. 'यतो वाचो निवर्तन्तेऽप्राप्य मनसा सह' असे ते आत्मस्वरूप अनुभवानेच जाणावे लागते. आपल्या येथील ऋषीमुनींनी आणि साधुसंतांनी त्याची अनुभूती घेतलेली आहे. भारतभूमी ही

साक्षात्कारांची भूमी म्हणून प्रसिद्ध आहे. इतकेच नव्हे, तर आत्मज्ञान हेच सर्वांत श्रेष्ठ कोटीचे ज्ञान आहे, तेच परमसुख आहे, असेही सांगितले आहे. 'आत्मा वा अरे द्रष्टव्यः, श्रोतव्यः, मन्तव्यः, निदिध्यासितव्यः' असे त्यांनी आग्रहाने प्रतिपादन केले आहे. श्री समर्थांनी ज्ञान म्हणजे अध्यात्म अशीच व्याख्या करून टाकली आहे.

पंडित दीनदयाळजींनी एके ठिकाणी या विषयाचे विस्तृत विवेचन केले आहे. दीनदयाळजी म्हणतात –

" माणसाचे जीवन म्हणजे केवळ प्राथमिक भौतिक गरजांची पूर्ती नव्हे. भौतिक गरजांबरोबरच माणसाच्या आधिभौतिक आणि आध्यात्मिक गरजाही असतात. निव्वळ श्वासोच्छ्वासाची क्रिया करीत राहाणे या पलीकडे मानवी जीवनाचे निश्चितच काही निराळे ध्येय असते. उपनिषदांनी ते ध्येय 'आत्मा वा अरे द्रष्टव्यः, श्रोतव्यः, मन्तव्यः, निदिध्यासितव्यः' या शब्दांत सांगितले आहे. परंतु आत्मा म्हणजे नेमके आहे तरी काय ? याबाबत विभिन्न मतप्रवाह आहेत. अनेक विचारवंतांनी या आत्म्याला विश्वाचे आदिकारण आणि त्याचा कर्ता-धर्ता-हर्ता, सर्व शक्तिमान्, सर्वव्यापी परब्रह्म परमेश्वर मानले आहे. तीच एकमात्र सर्व विश्वसंचालक शक्ती आहे. या परब्रह्माच्या ठायी परिपूर्णत्व असल्यामुळे, सत्यम्-शिवम्-सुंदरम् ची पूर्ण अभिव्यक्ती असल्यामुळे मनुष्य या गुणांकडे आकर्षित होत असतो; आणि जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात या गुणांची आंशिक अनुभूती घेत पूर्ण साक्षात्कारासाठी तो प्रयत्नशील असतो. परंतु काही विद्वानांचा या अदृश्य शक्तीवर विश्वास नाही. त्यांच्या मते केवळ दृश्य जगत हेच काय ते सत्य आहे. हे लोक भौतिक सुखसाधन-संपन्न-जीवनाला परमलक्ष्य मानून त्या सुखांच्या प्राप्तीसाठी करावयाच्या प्रयत्नांना मानवी जीवनाची इति-कर्तव्यता मानतात. या लोकांना ईश्वराचे अस्तित्वच मान्य नाही.

आत्मस्वरूप

पण जरा खोलात जाऊन विचार केला तर आपल्या असे लक्षात येईल की, मानवा-मानवांतील एकतेची अनुभूती आणून देणारी, तसेच सर्व मानवांचे जीवन सुखी व्हावे अशी जी इच्छा मानवाच्या ठायी आढळते तिची प्रेरक शक्ती निश्चितच या दृश्य जगतापेक्षा निराळे असे एखादे इंद्रियातीत परमतत्त्व असले पाहिजे. त्या तत्त्वाने हे दृश्य जगत व्यापले असून तेच प्राणिमात्राच्या अंतःकरणात संपूर्णतेची, एकात्मतेची भावना निर्माण करते. त्या शक्तीला तुम्ही नाव कोणतेही

चिंतनानुसार बुद्धीच्या सुखाहूनही श्रेष्ठतर असा सुखाचा एक प्रकार [illegible] सुख म्हणजे आत्मसुख. माणसाला शरीर, मन, बुद्धी यांबरोबरच आ[illegible] असतो. म्हणून माणसाच्या सुखाचा विचार करताना आत्मसुखाचाही विचा करावा लागेल.

येथे कोणी अशी शंका उपस्थित करू शकेल की, आत्मा तर दिसत नाही, तो मुळात आहे हे कशावरून ? काही पाश्चात्य तत्त्वज्ञांनी आणि पौर्वात्य दार्शनिकांनी हा प्रश्न उपस्थित केलाही आहे. परंतु शरीर-मन-बुद्धी या त्रयीपैकी मन आणि बुद्धी यांचे अस्तित्व पंच ज्ञानेंद्रियांनी कोठे जाणवते ? तरीही ती आहेत असे गृहीत धरूनच आपण माणसाचा विचार करतो ना ? अशा प्रकारे मन-बुद्धीचे अस्तित्व जर आपण गृहित धरतो तर मग त्याच न्यायाने आत्म्याचे अस्तित्व स्वीकारण्यास तार्किक अडचण असण्याचे कारण नाही. परंतु खरी अडचण वेगळीच आहे. आत्मा आहे असे गृहित धरले तरी आत्मा म्हणजे खरोखर काय ? तो असतो कसा ? कोठे ? इत्यादी प्रश्न पुढे येतात. सर्वसामान्य मनुष्य या विषयात फारसा खोल शिरू इच्छित नाही. प्रपंचाच्या धकाधकीत आत्मविचाराची निकड त्याला वाटत नाही. त्याच्या मते आत्म्याचा विचार करायचाच असेल तर तो ' अंगं गलितं पलितं मुण्डं दशनविहिनं जातं तुण्डम् ' किंवा ' कृतान्तकटकामलध्वजजरा दिसो लागली ' अशी गलितगात्र अवस्था झाल्यावर करावयाचा. शिवाय आपल्या येथे आत्म्याचे वर्णन आहे ते असे की, तो अशरीरी, निर्गुण आणि निर्लेप असतो. रसायन-शास्त्रानुसार काही वायू रंगरहित, वासरहित, स्वादरहित (Colourless, Odourless, Testless) असतात तसा. त्यामुळे हा गुंता अधिकच वाढत जातो. स्वतः गीताकारांनीही ' इंद्रियाणि पराण्याहुः इंद्रियेभ्यः परं मनः मनसस्तु परा बुद्धिः यो बुद्धेः परतस्तु सः ' असे आत्म्यासंबंधी म्हणून ठेवले आहे. अशा प्रकारे आत्म्याचा प्रांत पंचइंद्रिये, मन, बुद्धी यांच्या पलीकडे असल्याने सामान्य माणसाला तो अनाकलनीय वाटावा यात आश्चर्य नाही. परंतु ज्या गोष्टीचे सामान्य पंचज्ञानेंद्रियांना वा मनव-बुद्धीला आकलन होत नाही, तिचे अस्तित्वच नाकारणे तर्काला धरून नाही, अथवा ती कमी महत्त्वाची आहे असेही म्हणता येणार नाही. काही गोष्टी केवळ अतींद्रिय शक्तीच्या अनुभूतींच्या कक्षेत येणाऱ्या असतात. ' यतो वाचो निवर्तन्तेऽप्राप्य मनसा सह ' असे ते आत्मस्वरूप अनुभवानेच जाणावे लागते. आपल्या येथील ऋषीमुनींनी आणि साधुसंतांनी त्याची अनुभूती घेतलेली आहे. भारतभूमी ही

साक्षात्कारांची भूमी म्हणून प्रसिद्ध आहे. इतकेच नव्हे, तर आत्मज्ञान हेच सर्वांत श्रेष्ठ कोटीचे ज्ञान आहे, तेच परमसुख आहे, असेही सांगितले आहे. 'आत्मा वा अरे द्रष्टव्यः, श्रोतव्यः, मन्तव्यः, निदिध्यासितव्यः' असे त्यांनी आग्रहाने प्रतिपादन केले आहे. श्री समर्थांनी ज्ञान म्हणजे अध्यात्म अशीच व्याख्या करून टाकली आहे.

पंडित दीनदयाळजींनी एके ठिकाणी या विषयाचे विस्तृत विवेचन केले आहे. दीनदयाळजी म्हणतात –

" माणसाचे जीवन म्हणजे केवळ प्राथमिक भौतिक गरजांची पूर्ती नव्हे. भौतिक गरजांबरोबरच माणसाच्या आधिभौतिक आणि आध्यात्मिक गरजाही असतात. निव्वळ श्वासोच्छ्वासाची क्रिया करीत राहाणे या पलीकडे मानवी जीवनाचे निश्चितच काही निराळे ध्येय असते. उपनिषदांनी ते ध्येय 'आत्मा वा अरे द्रष्टव्यः, श्रोतव्यः, मन्तव्यः, निदिध्यासितव्यः' या शब्दांत सांगितले आहे. परंतु आत्मा म्हणजे नेमके आहे तरी काय ? याबाबत विभिन्न मतप्रवाह आहेत. अनेक विचारवंतांनी या आत्म्याला विश्वाचे आदिकारण आणि त्याचा कर्ता-धर्ता-हर्ता, सर्व शक्तिमान्, सर्वव्यापी परब्रह्म परमेश्वर मानले आहे. तीच एकमात्र सर्व विश्वसंचालक शक्ती आहे. या परब्रह्माच्या ठायी परिपूर्णत्व असल्यामुळे, सत्यम्-शिवम्-सुंदरम् ची पूर्ण अभिव्यक्ती असल्यामुळे मनुष्य या गुणांकडे आकर्षित होत असतो; आणि जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात या गुणांची आंशिक अनुभूती घेत पूर्ण साक्षात्कारासाठी तो प्रयत्नशील असतो. परंतु काही विद्वानांचा या अदृश्य शक्तीवर विश्वास नाही. त्यांच्या मते केवळ दृश्य जगत हेच काय ते सत्य आहे. हे लोक भौतिक सुखसाधन-संपन्न-जीवनाला परमलक्ष्य मानून त्या सुखांच्या प्राप्तीसाठी करावयाच्या प्रयत्नांना मानवी जीवनाची इति-कर्तव्यता मानतात. या लोकांना ईश्वराचे अस्तित्वच मान्य नाही.

आत्मस्वरूप

पण जरा खोलात जाऊन विचार केला तर आपल्या असे लक्षात येईल की, मानवा-मानवांतील एकतेची अनुभूती आणून देणारी, तसेच सर्व मानवांचे जीवन सुखी व्हावे अशी जी इच्छा मानवाच्या ठायी आढळते तिची प्रेरक शक्ती निश्चितच या दृश्य जगतापेक्षा निराळे असे एखादे इंद्रियातीत परमतत्त्व असले पाहिजे. त्या तत्त्वाने हे दृश्य जगत व्यापले असून तेच प्राणिमात्राच्या अंतःकरणात संपूर्णतेची, एकात्मतेची भावना निर्माण करते. त्या शक्तीला तुम्ही नाव कोणतेही

द्या. तिच्याशी एकरूप होण्याच्या दिशेने प्रत्येक मनुष्य कळत नकळत वाटचाल करीत आहे एवढे निश्चित. मानवमात्राच्या कल्याणाची भावना म्हणजे कोणत्यातरी स्वार्थी भावनेचा परिणाम नसून तो आत्मानुभूतीच्या इच्छेचा, जाणीवेचा परिणाम आहे. मनुष्य अज्ञानवश त्या आत्मशक्तीला संकुचित करण्याचा प्रयत्न करीत असतो; परंतु त्या परमतत्त्वाची सर्वात्मकता त्याचे हे अज्ञानपटल दूर करण्याचा सतत प्रयत्न करीत असते."

(राष्ट्रजीवनाची दिशा)

दीनदयाळजींच्या वरील अवतरणांवरून आत्म्याचे स्वरूप, आत्मसुखाची दिशा, आणि एकात्म मानव दर्शनातील या सुखानुभूतीचे अनन्य स्थान या-संबंधी बरीच स्पष्टता होण्यासारखी आहे. दीनदयाळजींच्या लिखाणात अन्यत्र एकदोन ठिकाणीही या संदर्भात पुढीलप्रमाणे उल्लेख आलेला आहे. " व्यक्ती ही शरीर, मन, बुद्धी व आत्मा यांचा समुच्चय आहे. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचा विचार करताना या चारही गोष्टींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. शरीर–मन–बुद्धी–आत्मा यांची ही सुखे अनुक्रमे उदरनिर्वाहाचे साधन, शांती, ज्ञान व तादात्म्य भाव या चार गोष्टींनी प्राप्त होतात." या ठिकाणी आत्म्याच्या सुखाचा संबंध तादात्म्य-भावाशी जोडलेला आहे. तो एकात्म मानव दर्शनाच्या संदर्भात ध्यानात घेण्यासारखा आहे. दुसऱ्या एका ठिकाणी ते म्हणतात, " बुद्धीचे सुख हेही अंतिम, चिरानंद सुख नव्हे. बुद्धीच्या सुखाहूनही श्रेष्ठ आहे आत्म्याचे सुख. माता आपल्या मुलाला मांडीवर घेऊन आत्मिक सुखच अनुभवीत असते. हे सुख आत्म्याच्या विशालतेचे सुख असते एकदा या सुखाची ओळख पटली की, मनुष्य त्याच्या शोधात अधिकाधिक विशालतेचा स्वीकार करीत जातो."

वरील उताऱ्यातील 'परम तत्त्वाची सर्वात्मकता', 'तादात्म्यभाव', 'अधिकाधिक विशालता' इत्यादी शब्दप्रयोगांवरून एकात्म मानव दर्शनाला दीनदयाळजींनी अध्यात्म विचारांचे अधिष्ठान दिले आहे हे स्पष्ट होते. शरीर, मन, बुद्धी म्हणजे 'मी' नसून त्या पलीकडे असलेला आत्मा हे माझे वास्तविक स्वरूप आहे हे अनुभवणे, म्हणजे आत्मज्ञान होणे, हेच आत्मसुख होय. एकात्म मानव दर्शनात ते अपेक्षित व आवश्यक आहेच. शिवाय ज्या परमतत्त्वाचा अंश माझ्यामध्ये आहे तेच इतरांच्याही ठायी आहे याची जाणीव, आणि त्या जाणिवेतून उद्भवणारा, त्या जाणिवेला अनुरूप असा शरीर–मन–बुद्धीचा स्वाभाविक व्यवहार या गोष्टीही भारतीय जीवनविचाराच्या अनुषंगाने या

दर्शनाट्. अभिप्रेत आहेत. अशा या स्वार्थनिरपेक्ष आणि स्वाभाविक व्यवहारातून लाभणारे आत्यंतिक सुख हे या आत्म्याच्या सुखाचे स्वरूप.

आत्मसुखाचे व्यापक स्वरूप

या आत्मसुखाचे 'सर्वात्मकता', 'तादात्म्यभाव' आणि 'अधिकाधिक विशालता' यांच्याशी नाते आहे ते असे. मला कोण किती शरीर–मन–बुद्धीचे सुख वा दुःख देतो, यावरून हे तादात्म्य व हा व्यवहार ठरत नसून अशा सर्व हिशेबांच्या पलीकडे असलेले ते खऱ्या अर्थाने आत्मीय सुख आहे. अधिकाधिक विशालतेच्या मार्गाने वाटचाल करीत करीत मनुष्य, सर्वात्मकतेच्या अवस्थेला पोहोचला म्हणजे, 'मी-तू' पणाचे, आपपरतेचे भाव संपुष्टात येतात. अशा द्वैतातील स्थितीत मन मानसिक अस्वस्थतेला कारणीभूत ठरणाऱ्या स्वार्थ आणि भीती या भावना निःशेष गळून पडतात; कामक्रोधादी षड्विकार हतबल बनतात, आणि एकदा स्वार्थमुक्त, भयमुक्त, विकाररहित झाल्यानंतर निरुपाधिक, निरुपम आनंदाव्यतिरिक्त काही शिल्लकच राहात नाही. 'आनंदाचे डोहि आनंद तरंग। आनंदचि अंग, आनंदाचे' असे या अवस्थेचे वर्णन आपल्या संतांनी केले आहे.

येथवर आपण माणसाच्या चतुर्विध सुखांचा विचार केला. निष्कर्षरूपाने असे म्हणता येईल की, माणसाला शरीर असते, त्याचप्रमाणे मन, बुद्धी आणि आत्मा या गोष्टीही असतात. सुख शरीराचे असते तसे मन, बुद्धी, आत्मा यांचेही असते. भुकेच्या वेळी सुग्रास भोजनाने वा भर उन्हातून आल्यावर थंड पाणी प्यावयास मिळाल्याने लाभणारे सुख, समाधान, प्रिय स्वजनांच्या पत्राने, भेटीगाठीने होणारा आनंद, उत्तम शास्त्रीय ग्रंथाच्या वाचनाने मिळणारा आनंद आणि साक्षात्कारी सत्पुरुषांच्या कृपेने लाभणारा परमानंद या सुखांचे प्रकार भिन्न आहेत हे उघड आहे. परंतु याचा अर्थ असा नव्हे की, ही विविध सुखे कप्पेबंद असतात. ती परस्परांशी निगडित असतात. आणि हे अगदी स्वाभाविकही आहे. कारण शरीराच्या एका कोपऱ्यात मन, दुसऱ्या कोपऱ्यात बुद्धी, तिसऱ्या कोपऱ्यात आत्मा अशी विभागणी नसते. त्यामुळे त्यांचे सुखही कप्पेबंद असू शकणार नाही, असत नाही. भुकेल्या माणसाला आपण आपल्याजवळच्या अर्ध्या भाकरीतील चतकोर भाकरी देतो तेव्हा ती घेणाऱ्याला शारीरिक व मानसिक तृप्ती लाभते, आणि देणाऱ्यालाही, जवळचे काही प्रत्यक्षतः गमावून देखील एक सात्त्विक समाधान मिळते. माता जेव्हा आपल्या भुकेल्या तान्हुल्याला

द्या. तिच्याशी एकरूप होण्याच्या दिशेने प्रत्येक मनुष्य कळत नकळत वाटचाल करीत आहे एवढे निश्चित. मानवमात्राच्या कल्याणाची भावना म्हणजे कोणत्यातरी स्वार्थी भावनेचा परिणाम नसून तो आत्मानुभूतीच्या इच्छेचा जाणीवेचा परिणाम आहे. मनुष्य अज्ञानवश त्या आत्मशक्तीला संकुचित करण्याचा प्रयत्न करीत असतो; परंतु त्या परमतत्त्वाची सर्वात्मकता त्याचे हे अज्ञानपटल दूर करण्याचा सतत प्रयत्न करीत असते."

(राष्ट्रजीवनाची दिशा)

दीनदयाळजींच्या वरील अवतरणांवरून आत्म्याचे स्वरूप, आत्मसुखाची दिशा, आणि एकात्म मानव दर्शनातील या सुखानुभूतीचे अनन्य स्थान या-संबंधी बरीच स्पष्टता होण्यासारखी आहे. दीनदयाळजींच्या लिखाणात अन्यत्र एकदोन ठिकाणीही या संदर्भात पुढीलप्रमाणे उल्लेख आलेला आहे. " व्यक्ती ही शरीर, मन, बुद्धी व आत्मा यांचा समुच्चय आहे. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचा विचार करताना या चारही गोष्टींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. शरीर–मन–बुद्धी–आत्मा यांची ही सुखे अनुक्रमे उदरनिर्वाहाचे साधन, शांती, ज्ञान व तादात्म्य भाव या चार गोष्टींनी प्राप्त होतात." या ठिकाणी आत्म्याच्या सुखाचा संबंध तादात्म्य-भावाशी जोडलेला आहे. तो एकात्म मानव दर्शनाच्या संदर्भात ध्यानात घेण्यासारखा आहे. दुसऱ्या एका ठिकाणी ते म्हणतात, " बुद्धीचे सुख हेही अंतिम, चिरानंद सुख नव्हे. बुद्धीच्या सुखाहूनही श्रेष्ठ आहे आत्म्याचे सुख. माता आपल्या मुलाला मांडीवर घेऊन आत्मिक सुखच अनुभवीत असते. हे सुख आत्म्याच्या विशालतेचे सुख असते एकदा या सुखाची ओळख पटली की, मनुष्य त्याच्या शोधात अधिकाधिक विशालतेचा स्वीकार करीत जातो."

वरील उताऱ्यातील 'परम तत्त्वाची सर्वात्मकता', 'तादात्म्यभाव', 'अधिकाधिक विशालता' इत्यादी शब्दप्रयोगांवरून एकात्म मानव दर्शनाला दीनदयाळजींनी अध्यात्म विचारांचे अधिष्ठान दिले आहे हे स्पष्ट होते. शरीर, मन, बुद्धी म्हणजे 'मी' नसून त्या पलीकडे असलेला आत्मा हे माझे वास्तविक स्वरूप आहे हे अनुभवणे, म्हणजे आत्मज्ञान होणे, हेच आत्मसुख होय. एकात्म मानव दर्शनात ते अपेक्षित व आवश्यक आहेच. शिवाय ज्या परमतत्त्वाचा अंश माझ्यामध्ये आहे तेच इतरांच्याही ठायी आहे याची जाणीव, आणि त्या जाणिवेतून उद्भवणारा, त्या जाणिवेला अनुरूप असा शरीर–मन–बुद्धीचा स्वाभाविक व्यवहार या गोष्टीही भारतीय जीवनविचाराच्या अनुषंगाने या

दर्शनात अभिप्रेत आहेत. अशा या स्वार्थनिरपेक्ष आणि स्वाभाविक व्यवहारातून लाभणारे आत्यंतिक सुख हे या आत्म्याच्या सुखाचे स्वरूप.

आत्मसुखाचे व्यापक स्वरूप

या आत्मसुखाचे 'सर्वात्मकता', 'तादात्म्यभाव' आणि 'अधिकाधिक विशालता' यांच्याशी नाते आहे ते असे. मला कोण किती शरीर–मन–बुद्धीचे सुख वा दुःख देतो, यावरून हे तादात्म्य व हा व्यवहार ठरत नसून अशा सर्व हिशेबांच्या पलीकडे असलेले ते खऱ्या अर्थाने आत्मीय सुख आहे. अधिकाधिक विशालतेच्या मार्गाने वाटचाल करीत करीत मनुष्य, सर्वात्मकतेच्या अवस्थेला पोहोचला म्हणजे, 'मी-तू' पणाचे, आपपरतेचे भाव संपुष्टात येतात. अशा द्वैतातील स्थितीत मन मानसिक अस्वस्थतेला कारणीभूत ठरणाऱ्या स्वार्थ आणि भीती या भावना निःशेष गळून पडतात; कामक्रोधादी षड्विकार हतबल बनतात, आणि एकदा स्वार्थमुक्त, भयमुक्त, विकाररहित झाल्यानंतर निरुपाधिक, निरुपम आनंदाव्यतिरिक्त काही शिल्लकच राहात नाही. 'आनंदाचे डोहि आनंद तरंग। आनंदचि अंग, आनंदाचे' असे या अवस्थेचे वर्णन आपल्या संतांनी केले आहे.

येथवर आपण माणसाच्या चतुर्विध सुखांचा विचार केला. निष्कर्षरूपाने असे म्हणता येईल की, माणसाला शरीर असते, त्याचप्रमाणे मन, बुद्धी आणि आत्मा या गोष्टीही असतात. सुख शरीराचे असते तसे मन, बुद्धी, आत्मा यांचेही असते. भुकेच्या वेळी सुग्रास भोजनाने वा भर उन्हातून आल्यावर थंड पाणी प्यावयास मिळाल्याने लाभणारे सुख, समाधान, प्रिय स्वजनांच्या पत्राने, भेटीगाठीने होणारा आनंद, उत्तम शास्त्रीय ग्रंथाच्या वाचनाने मिळणारा आनंद आणि साक्षात्कारी सत्पुरुषांच्या कृपेने लाभणारा परमानंद या सुखांचे प्रकार भिन्न आहेत हे उघड आहे. परंतु याचा अर्थ असा नव्हे की, ही विविध सुखे कप्पेबंद असतात. ती परस्परांशी निगडित असतात. आणि हे अगदी स्वाभाविकही आहे. कारण शरीराच्या एका कोपऱ्यात मन, दुसऱ्या कोपऱ्यात बुद्धी, तिसऱ्या कोपऱ्यात आत्मा अशी विभागणी नसते. त्यामुळे त्यांचे सुखही कप्पेबंद असू शकणार नाही, असत नाही. भुकेल्या माणसाला आपण आपल्या-जवळच्या अर्ध्या भाकरीतील चतकोर भाकरी देतो तेव्हा ती घेणाऱ्याला शारीरिक व मानसिक तृप्ती लाभते, आणि देणाऱ्यालाही, जवळचे काही प्रत्यक्षतः गमावून देखील एक सात्त्विक समाधान मिळते. माता जेव्हा आपल्या भुकेल्या तान्हुल्याला

द्या. तिच्याशी एकरूप होण्याच्या दिशेने प्रत्येक मनुष्य कळत नकळत वाटचाल करीत आहे एवढे निश्चित. मानवमात्राच्या कल्याणाची भावना म्हणजे कोणत्यातरी स्वार्थी भावनेचा परिणाम नसून तो आत्मानुभूतीच्या इच्छेचा जाणीवेचा परिणाम आहे. मनुष्य अज्ञानवश त्या आत्मशक्तीला संकुचित करण्याचा प्रयत्न करीत असतो; परंतु त्या परमतत्त्वाची सर्वात्मकता त्याचे हे अज्ञानपटल दूर करण्याचा सतत प्रयत्न करीत असते."

(राष्ट्रजीवनाची दिशा)

दीनदयाळजींच्या वरील अवतरणांवरून आत्म्याचे स्वरूप, आत्मसुखाची दिशा, आणि एकात्म मानव दर्शनातील या सुखानुभूतीचे अनन्य स्थान या-संबंधी बरीच स्पष्टता होण्यासारखी आहे. दीनदयाळजींच्या लिखाणात अन्यत्र एकदोन ठिकाणीही या संदर्भात पुढीलप्रमाणे उल्लेख आलेला आहे. " व्यक्ती ही शरीर, मन, बुद्धी व आत्मा यांचा समुच्चय आहे. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचा विचार करताना या चारही गोष्टींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. शरीर–मन–बुद्धी–आत्मा यांची ही सुखे अनुक्रमे उदरनिर्वाहाचे साधन, शांती, ज्ञान व तादात्म्य भाव या चार गोष्टींनी प्राप्त होतात." या ठिकाणी आत्म्याच्या सुखाचा संबंध तादात्म्य-भावाशी जोडलेला आहे. तो एकात्म मानव दर्शनाच्या संदर्भात ध्यानात घेण्यासारखा आहे. दुसऱ्या एका ठिकाणी ते म्हणतात, " बुद्धीचे सुख हेही अंतिम, चिरानंद सुख नव्हे. बुद्धीच्या सुखाहूनही श्रेष्ठ आहे आत्म्याचे सुख. माता आपल्या मुलाला मांडीवर घेऊन आत्मिक सुखच अनुभवीत असते. हे सुख आत्म्याच्या विशालतेचे सुख असते एकदा या सुखाची ओळख पटली की, मनुष्य त्याच्या शोधात अधिकाधिक विशालतेचा स्वीकार करीत जातो."

वरील उताऱ्यातील 'परम तत्त्वाची सर्वात्मकता', 'तादात्म्यभाव', 'अधिकाधिक विशालता' इत्यादी शब्दप्रयोगांवरून एकात्म मानव दर्शनाला दीनदयाळजींनी अध्यात्म विचारांचे अधिष्ठान दिले आहे हे स्पष्ट होते. शरीर, मन, बुद्धी म्हणजे 'मी' नसून त्या पलीकडे असलेला आत्मा हे माझे वास्तविक स्वरूप आहे हे अनुभवणे, म्हणजे आत्मज्ञान होणे, हेच आत्मसुख होय. एकात्म मानव दर्शनात ते अपेक्षित व आवश्यक आहेच. शिवाय ज्या परमतत्त्वाचा अंश माझ्यामध्ये आहे तेच इतरांच्याही ठायी आहे याची जाणीव, आणि त्या जाणिवेतून उद्भवणारा, त्या जाणिवेला अनुरूप असा शरीर–मन–बुद्धीचा स्वाभाविक व्यवहार या गोष्टीही भारतीय जीवनविचाराच्या अनुषंगाने या

दर्शनात अभिप्रेत आहेत. अशा या स्वार्थनिरपेक्ष आणि स्वाभाविक व्यवहारातून लाभणारे आत्यंतिक सुख हे या आत्म्याच्या सुखाचे स्वरूप.

आत्मसुखाचे व्यापक स्वरूप

या आत्मसुखाचे 'सर्वात्मकता', 'तादात्म्यभाव' आणि 'अधिकाधिक विशालता' यांच्याशी नाते आहे ते असे. मला कोण किती शरीर–मन–बुद्धीचे सुख वा दुःख देतो, यावरून हे तादात्म्य व हा व्यवहार ठरत नसून अशा सर्व हिशेबांच्या पलीकडे असलेले ते खऱ्या अर्थाने आत्मीय सुख आहे. अधिकाधिक विशालतेच्या मार्गाने वाटचाल करीत करीत मनुष्य, सर्वात्मकतेच्या अवस्थेला पोहोचला म्हणजे, 'मी-तू' पणाचे, आपपरतेचे भाव संपुष्टात येतात. अशा द्वैतातील स्थितीत मन मानसिक अस्वस्थतेला कारणीभूत ठरणाऱ्या स्वार्थ आणि भीती या भावना निःशेष गळून पडतात; कामक्रोधादी षड्विकार हतबल बनतात, आणि एकदा स्वार्थमुक्त, भयमुक्त, विकाररहित झाल्यानंतर निरुपाधिक, निरुपम आनंदाव्यतिरिक्त काही शिल्लकच राहात नाही. 'आनंदाचे डोहि आनंद तरंग । आनंदचि अंग, आनंदाचे' असे या अवस्थेचे वर्णन आपल्या संतांनी केले आहे.

येथवर आपण माणसाच्या चतुर्विध सुखांचा विचार केला. निष्कर्षरूपाने असे म्हणता येईल की, माणसाला शरीर असते, त्याचप्रमाणे मन, बुद्धी आणि आत्मा या गोष्टीही असतात. सुख शरीराचे असते तसे मन, बुद्धी, आत्मा यांचेही असते. भुकेच्या वेळी सुग्रास भोजनाने वा भर उन्हातून आल्यावर थंड पाणी प्यावयास मिळाल्याने लाभणारे सुख, समाधान, प्रिय स्वजनांच्या पत्राने, भेटीगाठीने होणारा आनंद, उत्तम शास्त्रीय ग्रंथाच्या वाचनाने मिळणारा आनंद आणि साक्षात्कारी सत्पुरुषांच्या कृपेने लाभणारा परमानंद या सुखांचे प्रकार भिन्न आहेत हे उघड आहे. परंतु याचा अर्थ असा नव्हे की, ही विविध सुखे कप्पेबंद असतात. ती परस्परांशी निगडित असतात. आणि हे अगदी स्वाभाविकही आहे. कारण शरीराच्या एका कोपऱ्यात मन, दुसऱ्या कोपऱ्यात बुद्धी, तिसऱ्या कोपऱ्यात आत्मा अशी विभागणी नसते. त्यामुळे त्यांचे सुखही कप्पेबंद असू शकणार नाही, असत नाही. भुकेल्या माणसाला आपण आपल्या-जवळच्या अर्ध्या भाकरीतील चतकोर भाकरी देतो तेव्हा ती घेणाऱ्याला शारीरिक व मानसिक तृप्ती लाभते, आणि देणाऱ्यालाही, जवळचे काही प्रत्यक्षतः गमावून देखील एक सात्त्विक समाधान मिळते. माता जेव्हा आपल्या भुकेल्या तान्हुल्याला

पाजीत असते तेव्हा बालकाला त्याची भूक शमल्यामुळे शारीरिक सौख्य तर लाभतेच, परंतु त्याचबरोबर वात्सल्य-भावनेच्या सुखसमाधीचा आनंद दोघेही एकाच वेळी अनुभवीत असतात.

मानवाच्या ठिकाणी असलेली ही विविध सुखांची भूक ध्यानात घेऊन, परंतु शरीर, मन, बुद्धी, आत्मा या अंगाने तिचा विचार न करता आपल्या येथील (दैशिक) शास्त्रकारांनी एका वेगळ्या दृष्टिकोनातून या विषयाचे विवेचन केले आहे. त्यांचे म्हणणे थोडक्यात असे की आहार, निद्रा, मैथुन आदींमुळे जी सुखानुभूती होते ती मनुष्यप्राणी आणि पशुपक्षी या दोहोंमध्ये सारखीच असते. मानव आणि मानवेतर प्राणी यांमध्ये मुख्य फरक असा की, माणसासमोर काही ना काही उन्नत जीवनलक्ष्य असते. हे लक्ष्य हेच माणसाचे मनुष्यत्व, होय. आहार, निद्रा इत्यादींतच रमणारा ध्येयहीन मनुष्य म्हणजे निव्वळ पशूच होय. स्वतःच्या लक्ष्यसिद्धीसाठी मनुष्य प्रयत्न करीत असतो. लक्ष्यसिद्धी नजीक दिसू लागते, तसतसे त्याला अधिकाधिक समाधान लाभते. ते साध्य झाले म्हणजे त्याला कृतार्थ झाल्यासारखे वाटते; साध्य झाले नाही तर त्याला दुःख होते.

माणसाचे हे जीवनलक्ष्य तात्कालिक असेल, दीर्घकालीन असेल, वा उभयविध असेल. शरीर, मन, बुद्धी व आत्मा या सर्वांशी निगडित असेल, वा यांपैकी काहींशीच विशेष संबंधित असेल; एका व्यक्तीच्या, व्यक्तिसमूहाच्या भल्याबुऱ्याशी संबंधित असेल, वा संपूर्ण मानवजातीच्या हिताहिताशी संबंधित असेल. आता जसे लक्ष्य तसा जीवनव्यवहार; आणि त्या व्यवहाराचे एकूण उत्तर हे ओघानेच आले. जीवनाचे लक्ष्य उदात्त व व्यापक असेल तर शरीर-मन-बुद्धीचे सर्व व्यवहारही जीवनाच्या सर्वांगीण व एकात्म विकासाला पोषक असे ठरतील, उलट लक्ष्य संकुचित व एकांगी असेल, स्वतःचे वा स्वतःच्या कुटुंबाचे जास्तीत जास्त भौतिक सुख प्राप्त करणे एवढेच असेल, तर शरीर-मन-बुद्धीच्या सर्व शक्ती त्या एकाच दिशेने कार्यान्वित होतील. आणि जीवनाचा सारा समतोलच नाहीसा होईल.

एकात्म मानव दर्शनाच्या संदर्भात सांगायचे तर हे लक्ष्य व्यक्तीबरोबर समस्त मानवसमूह आणि मानवेतर सृष्टी या उभयतांच्या एकात्म जीवन-विकासाला पोषक असले पाहिजे. तसे ते आहेही. धर्माला अविरोधी भौतिक सुखांबरोबरच आध्यात्मिक सुखाचीही अनुभूती हे

या दर्शनातील मानवाचे व्यक्तिगत पातळीवरचे लक्ष्य आहे; आणि व्यक्तीच्या आत्मीयतेच्या व्यवहाराच्या कक्षा 'अहं' कडून 'वयं' च्या दिशेने वाढवीत विश्वमानवापर्यंत आणि पुढे जड-अजड सृष्टीला व्यापून उरलेल्या परमेष्टीपर्यंत नेऊन भिडविणे, हे समष्टीच्या अंगाने विचार-आचारांचे चरम लक्ष्य आहे.

भौतिक प्रगतीबरोबरच आध्यात्मिक उन्नती हे या दर्शनाचे एक महत्त्वाचे अंग असल्यामुळे यासंबंधी थोडे स्पष्टीकरण करणे उचित होईल. आत्मा या शब्दाप्रमाणेच अध्यात्म शब्दासंबंधीही अनेकांची विपरीत धारणा असते. त्या शब्दाभोवती एक गूढ वलय निर्माण झाले असल्याचे आढळून येते. अध्यात्म म्हणजे ध्यानधारणा, सर्वसंग-परित्याग, म्हणून सामान्य माणसाचे ते काम नव्हे, अशी अध्यात्मासंबंधी सर्वसामान्यपणे कल्पना झाली आहे. आध्यात्मिक प्रगती करू इच्छिणाऱ्या साधकाच्या दृष्टीने ध्यानधारणा, जपजाप्य आदी गोष्टींना महत्त्व असतेच. परंतु अखेर ही सर्व अधिकाधिक अनुभूतीची साधने आहेत. यासाठी अध्यात्म म्हणजे नेमके काय, ते पाहाणे उपयुक्त ठरेल. भगवद्-गीतेच्या आठव्या अध्यायाच्या प्रारंभी अर्जुनाने 'किं तद् ब्रह्म' या प्रश्नाबरोबरच 'किमध्यात्म' (अध्यात्म म्हणजे काय?) असा एक प्रश्न श्रीकृष्णांना विचारला आहे. आणि भगवान् श्रीकृष्णांनी 'स्वभावोऽध्यात्ममुच्यते' (प्रत्येक वस्तूचा जो मूळ भाव, स्व-भाव त्यास अध्यात्म म्हणतात) असे अर्जुनाच्या त्या प्रश्नाचे उत्तर दिले आहे. यावरून मानवाच्या संदर्भात आध्यात्मिक उन्नती याचा अर्थ त्याचा जो मूळ 'भाव' किंवा 'स्वरूप' म्हणजेच, निर्गुण-निराकार, सर्वव्यापी, परमतत्त्व – त्याची अधिकाधिक जाणीव होत जाणे असा होईल. अशा प्रकारे व्यक्तीला आपल्या देहातील मूळ स्वरूपाची जाण होऊ लागली की, ज्या परमात्म तत्त्वाचा अंश माझ्यामध्ये आहे, त्याचाच एक एक अंश इतरांच्या ठायीही आहे ही जाणीवही अनुषंगाने, निर्माण होऊ लागते. मग हळू हळू 'जे जे देखीजे भूत । ते ते मानिजे भगवंत' अशी मनाची अवस्था होऊ लागते. समाज म्हणजे त्या सर्वव्यापी परमेश्वराचेच चालते-बोलते स्वरूप आहे, याची साक्ष पटू लागते, आणि त्या समाजपुरुषाची सेवा ही त्या पुरुषोत्तमाचीच, परमेश्वराचीच सेवापूजा होय, ही खूणगाठ पक्की होते. आध्यात्मिक उन्नती ती हीच. या सर्व विवेचनावरून हे स्पष्ट होईल की, एकात्म मानव दर्शनाचे व्यक्तिगत पातळीवरचे लक्ष्य आणि समष्टी पातळीवरचे

लक्ष्य या दोन स्वतंत्र, भिन्न गोष्टी नसून एकाच जीवनपटाचे उभे-आडवे धागे आहेत.

स्थूलाकडून सूक्ष्माकडे

माणूस म्हणजे नुसते शरीर नव्हे; शरीरावरोबरच त्याला मन, बुद्धी, आत्मा या गोष्टीही असतात, आणि सुख शरीराचे असते तसेच मनाचे, बुद्धीचे वा आत्म्याचेही असते, याचे सविस्तर विवेचन आपण आत्तापर्यंत केले. परंतु माणसाची सारी धावपळ प्रामुख्याने इंद्रियजन्य भौतिक सुखांच्या प्राप्तीसाठीच चाललेली असल्याचे दिसते. असे का? वस्तुतः आहार, निद्रा, मैथुन आदी शारीरिक भुकांच्या तृप्तीतून लाभणाऱ्या सुखांसाठी नाना प्रकारच्या बाह्य साधनांची जमवाजमव करावी लागते. त्या मानाने मन, बुद्धी, आत्मा यांच्या सुखासाठी उत्तरोत्तर कमी कमी साधनांची जरूर असते. दुसरे म्हणजे शारीरिक भुकांच्या तृप्तीतून प्राप्त होणारे सुख – म्हणजेच इंद्रियजन्य सुख – हे तात्पुरते म्हणजेच अल्पजीवी असते. उलट दुसऱ्या कोटींतील सुखे उत्तरोत्तर अधिकाधिक दीर्घकाळ टिकणारी आणि अंतिमतः चिरंतन सुखात परिणत होणारी असतात. असे असूनही माणसाची धाव 'तुझे आहे तुजपाशी, परी जागा चुकलासी' या उक्तीप्रमाणे बव्हंशी बाहेरच्या स्थूल विषयांपासून प्राप्त होणाऱ्या इंद्रियजन्य सुखांकडेच का? याचे प्रमुख कारण असे आहे की, शारीरिक सुखांच्या भुकेची जाणीव माणसाला आपोआपच होत असते. बारा वाजले की, पोटात कावळे ओरडू लागतात; वयात आल्यावर रतिसुखाची ओढ तीव्रतेने जाणवू लागते; आणि शरीर थकून गेले की, झोप अनावर होते. या भुका तृप्त झाल्या की, त्या त्या वेळी माणसाला बरे वाटते, सुख लाभल्यासारखे वाटते. दुसरे म्हणजे ही सुखे अल्प प्रयत्नांनी साध्य होणारी असतात. ती अल्पजीवी असली तरी त्यांची अनुभूती तात्काळ येत असते. वेगळ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे या सुखांसाठी केलेली धडपड सद्यः फलदायी असते.

मन, बुद्धी, आत्मा यांची भूकही वस्तुतः नैसर्गिकच असते. परंतु तिची जाणीव सर्वांना उपरिनिर्दिष्ट भुकांएवढी सहज आणि उत्कट असत नाही. ती ज्ञान, अभ्यास आणि सत्संस्कारांनी जागृत करावी लागते. म्हणजे ही सुखे काही काळाच्या अभ्यासाने, तपश्चर्येने प्राप्त होत असतात. असे असले तरी मानवी जीवनाचा समग्र दृष्टीने विचार करताना आहार, निद्रा, मैथुन आदी क्रियांमधून प्राप्त होणाऱ्या सुखांबरोबरच, या दुसऱ्या कोटीतील सुखांचाही विचार करणे

अगत्याचे आहे. कारण पहिल्या कोटीतील सुखांनी माणसाला शरीर-धारणा, शरीरस्वास्थ्य, तात्कालिक सुखसमाधान आदी गोष्टी लाभत असतात, तर दुसऱ्या कोटीतील सुखसाधनेतून त्याचे पशुत्वाकडून मानवत्वाकडे, व्यष्टी-कडून समष्टीकडे आणि पुढे परमेष्टीच्या म्हणजेच परमात्म तत्त्वाच्या दिशेने उन्नयन होत असते. ज्या प्रमाणे माणसाच्या शरीराची धारणा व विकास होणे आवश्यक असते, त्याचप्रमाणे त्याचे मन–बुद्धी–आत्मा यांचाही विकास होणे त्याच्या सर्वांगीण संतुलित विकासासाठी आवश्यक असते. अथांग पाण्यातून नौकाप्रवास करीत असताना नौकेतील सर्व प्रवाशांनी तिच्या एकाच कोपऱ्यातील विशिष्ट जागा पटकाविण्यासाठी झुंबड केली तर नौका कलंडून त्या नौकेची व तिच्यामध्ये वसलेल्या प्रवाशांची जी अवस्था होईल तीच अवस्था मन, बुद्धी, आत्मा यांच्या सुखाची दालने बंद ठेवून, निव्वळ भौतिक इच्छा-आकांक्षांच्या मागे बेफामपणे धावत सुटलेल्या मानवी जीवनाची होईल. अशी व्यक्ती समाजांतर्गत प्रत्येक गोष्टीचा, घटनेचा, साधनसामुग्रीचा विचार स्वतःला अधिकाधिक भौतिक सुखोपभोग कसे प्राप्त होतील याच दिशेने करील. मग खरेखोटे, योग्य-अयोग्य, यासंबंधीचा विवेक हळूहळू सुटत जातो, आणि 'विवेक-भ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखैः' अशी त्या व्यक्तीची अवस्था होते. अशी व्यक्ती समाजालाही उपद्रवकारकच ठरते. आज भोवताली प्रायः हेच चित्र दिसत आहे. माणसाची सारी धडपड केवळ भौतिक सुखांसाठी चाललेली आहे. आपल्याला शरीराबरोबरच केवळ मन, बुद्धी नव्हे तर आत्माही आहे याचे जणू त्याला विस्मरण झाले आहे.

एकात्म मानव दर्शनाची सुखाची कामना अशी एकांगी नाही. ते व्यक्तीचा समग्र दृष्टीने विचार करते एवढेच नव्हे तर माणसातील सत्प्रवृत्तीचे उन्नयन करते, विकास करते. या दर्शनाला वावडे सुखाचे नाही. व्यक्तीच्या व समाजाच्या अधःपाताला कारणीभूत ठरणाऱ्या सुखलोलुपतेचे आहे. भोगातील सुखाचा येथे सरसकट निषेध नाही, पण संयमात आणि त्यागातही उच्च पातळीवरचे अमर्याद सुख असते, याची जाणीव करून देणारे हे दर्शन आहे. अधिकाराची आकांक्षा येथे त्याज्य मानलेली नाही, पण तो अधिकार कर्तव्याच्या कोंदणात बसविलेला असावा असा आग्रह मात्र आहे. 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्' हे खरेच असल्याने शरीराच्या जोपासनेचे, बलोपासनेचे महत्त्व या दर्शनाला मान्य आहे; परंतु त्याबरोबरच या उक्तीमधील 'धर्मसाधनम्' या उद्दिष्टाची कदापी विस्मृती

होऊ नये यावर या दर्शनाचा विशेष भर आहे. त्यामुळे प्रसंग येताच समष्टीच्या हितासाठी स्वतःच्या अस्थी हसतमुखाने समर्पित करणारे दधीची ऋषी किंवा 'हे काय बंधु असतो जरी सात आम्ही। त्वत्स्थंडिलीच दिघले असते बळी मी' या स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या काव्यपंक्तींतून व्यक्त होणारी समर्पणवृत्ती हा या बाबतीतला या दर्शनाचा आदर्श आहे.

थोडक्यात म्हणजे शरीराबरोबरच मन–बुद्धी–आत्मा यांचे, उपभोगाबरोबरच संयमाचे आणि समर्पणाचे, अधिकाराबरोबरच कर्तव्याचे, व्यक्तीबरोबरच समष्टी–सृष्टी–परमेष्टीचे अखंड अवधान ठेवून चालणारे एकात्म सुख या दर्शनाला अभिप्रेत आहे. प्रयत्न करावयाचा आहे, पुरुषार्थ करावयाचा आहे तो हे सर्वांगीण सुख प्राप्त करण्याच्या दिशेने. कारण त्यातूनच एकात्म मानव दर्शनाचे लक्ष्य – व्यक्तीची व समष्टीची समन्वित भौतिक व आध्यात्मिक उन्नती साकारणार आहे.

शरीर-सुखाबरोबरच मन, बुद्धी व आत्मा यांच्याही सुखांचा विचार करणे मानवी उत्क्रांतीच्या वाटचालीशी पूर्णपणे सुसंगत आहे. श्रीगुरुजींनी या विषयासंबंधी केलेले पुढील विवेचन पहाण्यासारखे आहे. ते म्हणतात,–"मानवी उत्क्रांतीच्या वाटचालीत जडवाद ही अगदी प्रारंभीची अवस्था आहे. उत्क्रांतीचा प्रवास स्थूलाकडून सूक्ष्माकडे होत असतो. अगदी प्राथमिक अवस्थेत माणसाला केवळ स्थूल भौतिक वस्तूंचे आकर्षण असते. त्याचा संपूर्ण वेळ आणि शक्ती भौतिक सुखांच्या मागे धावण्यात, शारीरिक सुखांची तृप्ती करून घेण्यात खर्च होत असतात. या वाटचालीत प्रगती करीत तो जरा वरच्या पातळीवर जातो तेव्हा आपल्या भावनिक आशा आकांक्षा पूर्ण करून मानसिक सुख प्राप्त करण्याची त्याला ओढ लागते. खरे म्हणजे येथूनच त्याच्या सांस्कृतिक विकासाची वाटचाल सुरू होते. त्याच्या सौंदर्यदृष्टीला चालना मिळते. तो नाना प्रकारच्या कलाकृती निर्माण करतो. त्यानंतर एक पाऊल पुढे टाकून तो त्या कलाकृतींमधील अज्ञात सौंदर्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न करू लागतो. या अवस्थेत त्याला बौद्धिक सुखाची अनुभूती येऊ लागते. अथांग ज्ञानसागरात बुडी मारण्यात त्याला आनंद वाटू लागतो. विज्ञान आणि तत्त्वज्ञान ही क्षेत्रे त्याच्या संशोधक बुद्धीला आव्हान देत असतात. परंतु तेवढ्यावरही त्याचे समाधान होत नाही. आणखी पुढे जाण्याची तळमळ त्याला लागते. आपल्या बुद्धीच्या पलीकडे झेप घेऊन आपल्या अस्तित्वाचे रहस्य उलगडण्याचा

तो प्रयत्न करू लागतो. आता तो आत्मतत्त्वाच्या क्षेत्रात प्रवेश करतो. आणि अखेर त्याला सर्वव्यापी व सूक्ष्म अशा सच्चिदानंद परमतत्त्वाची म्हणजेच परमेश्वराची प्राप्ती होते.

मानवी उत्क्रांतीची वाटचाल ही अशी आहे. जडाकडून चैतन्याकडे !"

('विचारधन', द्वितीय आवृती, पृष्ठ ४४९.)

• • •

४

व्यक्तिविचार - चतुर्विधपुरुषार्थं

आता प्रश्न असा उपस्थित होतो की, मानवाला हे चतुर्विध सुख प्राप्त कसे होईल ? ढोबळ मानाने असे म्हणता येईल की, प्रयत्नाने साध्य होणारे निर्वाहसाधन, मनःशांती, ज्ञान व विवेक, आणि सुयोग्य जीवनलक्ष्य या चार गोष्टी शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा यांच्या सुखासाठी आवश्यक आहेत. या भुका तृप्त होऊन माणसाचा सर्वांगीण व संतुलित विकास व्हावा यासाठी भारतीय संस्कृतीने व्यक्तीसमोर कर्तव्यरूपाने चार पुरुषार्थांचा आदर्श ठेवला आहे. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे ते चार पुरुषार्थ होत.

काम

शरीर, मन, बुद्धी, आत्मा यांच्या भूका तृप्त झाल्या म्हणजे माणसाला सुख वाटते. या भुकांना काम अशी संज्ञा आहे. माणसामध्ये त्या निसर्गतःच असतात हे खरे ; पण शरीर, मन, बुद्धी निरोगी व कार्यक्षम नसतील, या ना त्या कारणाने त्यांच्या भुका मंद असतील, त्यामध्ये विकृती शिरली असेल, तर तद्द्वारा मिळणारे सुखही माणसाला पूर्णांशाने उपभोगता येणार नाही. दुर्बल वा रोगग्रस्त शरीराचा, कोणत्याही कार्यासाठी आवश्यक असलेली मनाची उभारी नसलेला आणि मंद वा विकृत बुद्धीचा मनुष्य आहार, निद्रा, मैथुन यांसारख्या प्राथमिक स्तरावरील भौतिक सुखांचा देखील नीट उपभोग घेऊ शकणार नाही. मग श्रेष्ठ आध्यात्मिक सुखसंपदेची गोष्ट तर दूरच राहिली. सुदृढ व निरोगी शरीर, अनुकूल गोष्टींचा लाभ घेऊन आणि प्रतिकूल परिस्थिती-

वर मात करून आपले जीवनलक्ष्य गाठण्याची धमक बाळगणारे मन, आणि उपलब्ध साधनांचा व उपभोग्य वस्तूंचा योग्य प्रकारे उपयोग करण्याची क्षमता असलेली विवेकबुद्धी या गोष्टी असतील तरच मनुष्य या विविध सुखांची अनुभूती घेऊन आत्मोन्नती करू शकेल. अशा पौरुषसंपन्नतेची, कामना, साधना व तज्जन्य सुखांची प्राप्ती या पुरुषार्थाला आपल्या येथे काम-पुरुषार्थ म्हटले आहे.

तथापि या काम-पुरुषार्थासंबंधी अनेकांची एकांगी, संकुचित आणि क्वचित् विकृतही कल्पना असल्याचे आढळून येते. काम म्हणजे स्त्री–पुरुषांची समागमाची इच्छा व ती तृप्त झाल्याने शरीर–मनाला होणाऱ्या सुखसंवेदना हाच अर्थ सर्वसामान्यपणे घेतला जातो. काम पुरुषार्थामध्ये स्त्री–पुरुष संबंधाचा अंतर्भाव अवश्य होतो, परंतु त्या पुरुषार्थाचा आशय निव्वळ रतिसुखापेक्षा खचितच खूप व्यापक आणि उदात्त आहे. ' न ज्ञातु कामः काम्यानामुपभोगेन शाम्यति ' या सुप्रसिद्ध वचनातील काम म्हणजे स्त्रीपुरुषांची शरीरसुखाची वासना एवढाच खचितच नाही. त्यामध्ये सर्वच इंद्रियांच्या विषयांचा समावेश आहे, ' न त्वहं कामये राज्यं, न स्वर्गं नापुनर्भवम्। कामये दुःखतप्तानां प्राणिनामार्तिनाशनम्। किंवा ' धर्माऽविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ। (गीता–७)' यांसारख्या वचनांवरूनही काम-पुरुषार्थातील आशयाची उंची, व्याप्ती ध्यानात येऊ शकेल. थोडक्यात असे म्हणता येईल की, माणसाच्या मनात उद्भवणाऱ्या विविध कामना, इच्छा, आकांक्षा या सर्वांचा अंतर्भाव काम-पुरुषार्थामध्ये होतो.

माणसाला कर्मप्रवृत्त करणारा हा पुरुषार्थ आहे. 'अकामा वा क्रिया क्वचित्' असे मनूने म्हटले आहे, ते खरेच आहे. फार कशाला ? या संपूर्ण विश्वाची उत्पत्तीच मुळी 'एको ऽहम् बहुःस्याम्' या आदी कामनेतून झाली आहे. काम-पुरुषार्थावाचून केवळ धर्म व अर्थ या पुरुषार्थांचीच नव्हे तर मोक्ष पुरुषार्थाचीही आराधना नीट होऊ शकणार नाही. मोक्ष-स्थिती प्राप्त झाल्यानंतर माणसाला प्राप्तव्य म्हणजे काम्य असे काही उरत नाही. मोक्षप्राप्ती हा चिरंतन सर्वश्रेष्ठ सुख प्राप्त करून देणारा पुरुषार्थ आहे, त्यातच मानवी जीवनाचे साफल्य आहे. हे खरे आहे. पण इतर सर्व सुखांवर प्रसंगी लाथ मारूनही या पुरुषार्थाची साधना करण्याची उत्कट कामना अंतःकरणात असेल तरच मनुष्य मोक्षमार्गाकडे वळणार आणि मोक्ष त्याच्या हाती लागणार !

काम हा मनाचा गुणविशेष आहे; आणि मन हे तर चंचल आहे, संकल्प-विकल्पात्मक आहे. ते नाना प्रकारच्या कामनातरंगांवर स्वार होऊन इतस्ततः

संचार करीत असते. मनाची तुलना आपल्या येथे ओढाळ जनावराशी केली आहे. ते अनेकदा भलत्याच ठिकाणी भटकत असते. करू नये त्या गोष्टी करण्यास इंद्रियांना प्रवृत्त करीत असते. इतकेच नव्हे तर, विषयवासनांमागे फरफटत जाते. इतस्ततः भटकणारे हे मन श्रेष्ठतम जीवनलक्ष्यावर एकाग्र झाले तरच मनुष्य त्या लक्ष्याच्या दिशेने निष्ठापूर्वक वाटचाल करू शकेल, ते लक्ष्य गाठू शकेल. इंद्रियांचे गुलाम बनलेले मन अखेर दुःखाला आणि अधोगतीला कारणीभूत होते, उलट इंद्रियांना आपल्या ताब्यात ठेवणारे ईश्वराभिमुख मन सुखाचे आणि उन्नतीचे साधन बनते. मनाला लक्ष्यानुगामी ठेवण्याचे काम बुद्धीचे आहे. 'आत्मानं रथिनं विद्धि, शरीरं रथमेव तु। बुद्धिं तु सारथिं विद्धि मनः प्रग्रहमेव च' या उपनिषदातील वचनात (कठोपनिषद, अध्याय १, वल्ली ३, श्लोक ३) बुद्धीचे हे कार्य स्पष्टपणे नमूद केलेले आहे.

अर्थात् यासाठी बुद्धी इष्टानिष्ट विवेकक्षम असली पाहिजे, व्यवसायात्मिका असली पाहिजे. बुद्धीला विवेक-पथावर ठेवण्याचे काम धर्माचे आहे. धर्म हा आधारभूत पुरुषार्थ म्हटले आहे, ते याच अर्थाने.

अर्थ

काम-पुरुषार्थाच्या पूर्तीसाठी लागणारी विविध साधने संपादन करणे हा अर्थ-पुरुषार्थ होय. शरीराच्या केवळ सुखासाठीच नव्हे, तर धारणेसाठीही अन्नवस्त्रादींची आवश्यकता असते, आणि या गोष्टींची प्राप्ती अर्थावर अवलंबून असते. म्हणजे अत्यावश्यक भौतिक गरजांच्या पूर्तीसाठी तरी अर्थ-पुरुषार्थाची साधना जीवनात आवश्यक ठरते.

या पुरुषार्थातील 'अर्थ' या शब्दाचा आशय नीट ध्यानात घेणे आवश्यक आहे. सुखप्राप्तीसाठी ज्या ज्या गोष्टींची आवश्यकता असते त्या सर्वांचाच 'अर्था'मध्ये अंतर्भाव होत नाही. तर त्यांपैकी ज्या गोष्टी प्राप्त करण्यासाठी काही ना काही उद्योग करावा लागतो त्यांनाच अर्थ ही संज्ञा लागू आहे. उदाहरणार्थ, हवा, पाणी, सूर्यप्रकाश आदी गोष्टी सुखी जीवनासाठी अन्न–वस्त्रापेक्षाही महत्त्वाच्या आहेत. परंतु या सर्व गोष्टी निसर्गानेच उपलब्ध करून ठेवलेल्या आहेत. त्या प्राप्त करण्यासाठी माणसाला काही उद्योग वा परिश्रम करावे लागत नाहीत. त्यामुळे अर्थ-पुरुषार्थामध्ये या गोष्टींचा समावेश होत नाही. परंतु अन्न, वस्त्र, निवारा, आदी गोष्टी प्राप्त करण्यासाठी परिश्रम करावे लागतात. त्यामुळे अशा गोष्टींचा 'अर्था' मध्ये समावेश होतो. या दृष्टीने शरीर,

भूमी, जन आणि सुखेच्छा या चार गोष्टी प्रामुख्याने अर्थ-पुरुषार्थाशी निगडित आहेत. शरीर, भूमी आणि जन ही अर्थ-निर्मितीची साधने आहेत; आणि सुखोपभोगाची इच्छा अर्थ-निर्मितीमागची प्रेरणा आहे.

अर्थाचेही दोन भाग आहेत; १) मुख्य अर्थ आणि २) गौण अर्थ. जी वस्तू जीवनाचा आधार असते, अथवा जीवनावश्यक वस्तू निर्माण करते तिला मुख्य अर्थ अथवा धन अशी संज्ञा आहे. उदा., भूमी, पशुधन, वस्त्र इत्यादी. या जीवनावश्यक वस्तूंची देवाणघेवाण एखाद्या वस्तूच्या माध्यमातून होत असेल तर त्या विनिमयाच्या साधनाला गौण अर्थ वा द्रव्य म्हणतात. या अर्थाने पैसा हा गौण अर्थ आहे. शेतकरी शेतात राबून मुख्य अर्थ निर्माण करतो आणि आपली उपजीविका चालवितो, तर नोकरी करणारा पगारदार नोकर वा मजूर वेतन-रूपाने मिळणाऱ्या गौण अर्थाच्या सहाय्याने जीवनावश्यक वस्तू म्हणजे मुख्य अर्थ खरेदी करीत असतो. म्हणजे कोणत्याही अर्थाने पाहिले तरी सुखासाठी अर्थाची आवश्यकता असतेच. कसावयास जमीन नसलेला शेतकरी, आणि नोकरी वा अन्य व्यवसाय नसलेला बेकारीग्रस्त मनुष्य यांचा अर्थप्राप्तीचा स्रोतच बंद असतो. अशा अकिंचिन माणसाला उदरभरण देखील अशक्य होऊन बसते. तात्पर्य, सुखासाठी अर्थाची आणि अर्थासाठी आजीविकेची व्यवस्था असणे अपरिहार्य आहे.

सुखाच्या संदर्भात आजीविकेचा विचार करीत असताना आणखीही काही गोष्टी विचारात घेतल्या पाहिजेत. उदाहरणार्थ, हा उपजीविकेचा व्यवसाय शक्यतो व्यक्तीच्या आवडीचा असला पाहिजे, आणि तो सुसाध्यही असला पाहिजे. उपजीविकेच्या साधनामध्ये माणसाला रुची नसेल तर त्याचे शरीर आणि मन यांमध्ये अंतर्विरोध निर्माण होईल. त्याचे मन त्याच्या कामात पूर्ण-पणे रमणार नाही. त्यामुळे त्याचे काम तर चांगले होणार नाहीच, त्याच-बरोबर त्याला त्याच्या कामातून निर्मितीचे आणि कर्तव्यपूर्तीचे जे पूर्ण समाधान लाभावयास पाहिजे तेही लाभणार नाही. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे अशी आजीविका त्या व्यक्तीला सर्वांगीण व परिपूर्ण सुख देऊ शकणार नाही. तिच्या व्यक्तिमत्वाच्या विकासाला सहाय्यक होऊ शकणार नाही; प्रतिमास पगार हाती पडत असल्यामुळे त्याचा भाकरीचा प्रश्न सुटेल. पण मन अतृप्त आणि निरुत्साहीच राहील. हा मुद्दा स्पष्ट करताना पंडित दीनदयाळजी म्हणतात – " माणसाच्या कमाईच्या साधनांचे स्वरूप असे ठरविले पाहिजे की,

जेणेकरून त्याचे काम व प्रत्यक्ष जीवन यांमध्ये एखादी भिंत असणार नाही. हे स्वरूप ठरविताना आपल्याला हृदय, बुद्धी आणि शरीर तिघांचीही भूक असलेला हाडामासांचा माणूस डोळ्यासमोर ठेवावयास हवा. अन्यथा कामाच्या आठ तासांचा मानवी सद्‌गुणांना मारक (Dehumanising) जो प्रभाव असतो तो दूर करण्यातच त्याचे उरलेले सोळा तास निघून जातील; आणि ते संपताच तो पुन्हा: आठ तासांच्या चक्रात अडकेल. " (राष्ट्रचिंतन पृष्ठ ८९.)

तथापि व्यवसाय म्हणजे केवळ आजीविका उपलब्ध करून देणारे साधन नसते. मनुष्य आपल्या कामाद्वारे आत्माविष्कार करीत असतो. त्याच्या आत्म्याचा संपूर्ण व्यक्तिमत्वाचा तो आविष्कार असतो. चित्रकाराला म्हटले की, तू चित्र काढू नकोस, कवीला म्हटले की, तू कविता करू नकोस, तर त्यांच्या जीवनांत काही रामच राहणार नाही. शेतकरी शेती करून शेतावरोबरच आपलेही जीवन फुलवीत असतो. शेतीचे लहानमोठे प्रत्येक काम हे त्याचे जीवनच असते. त्याच्या जीवनाचे अभिन्न अंग असते. विणकऱ्याच्या हातातील कौशल्य, सतार-वादकाच्या बोटांची सतारीवर चपळाईने होणारी फिरत, किंवा नृत्यकाराचा लयबद्ध पदन्यास यांतून त्यांचे जीवनच प्रकट होत असते.

ही आजीविकाही कोणाची मेहेरवानी म्हणून नव्हे, तर कर्तव्याभिमुख अधिकार म्हणून प्राप्त झालेली असणे आवश्यक आहे. भाटगिरी वा लाळघोटे-पणा करून मिळणारी लाचारीची भाकरी आणि भिकेची भाकरी दोन्ही सारख्याच त्याज्य होत. पुढ्यात फेकण्यात आलेले तुकडे चघळून पशुपक्षी संतुष्ट होत असतील, पण माणसाला मात्र त्यातून समाधान लाभणार नाही. आर्थिक स्वातंत्र्याला वंचित झालेला मनुष्य मनाने मिंधा असतो आणि ज्याचे मन मिंधे झालेले असते. त्याची बुद्धीही अगतिक बनते. परमेश्वराने माणसाला पोट दिले आहे, त्याचबरोबर हातपायही दिले आहेत. उदरभरणासाठी आवश्यक असलेली मीठ-भाकरी माणसाने स्वकष्टाने प्राप्त करून ताठ मानेने चालावे हाच या मागचा हेतू आहे. खरे म्हणजे अर्थार्जन अशा पद्धतीने होते तेव्हाच त्याला पुरुषार्थ ही संज्ञा प्राप्त होते.

आजीविका सुसाध्यही असली पाहिजे, याचा अर्थ असा की, माणसांवर निव्वळ पोटाची खळगी भरण्यासाठी दहादहा बारावारा तास ढोरासारखे राबण्याची पाळी येऊ नये. कारण अशा आजीविकेतून प्राप्त होणारा अर्थ त्याच्या

अंगी लागणार नाही. माणसाला पोट म्हणजे शरीर असते हे खरे, परंतु त्याच-बरोबर त्याला मन, बुद्धी, आत्मा या गोष्टीही असतात. सुख शरीराचे असते, तसेच मन, बुद्धी, आत्मा यांचेही असते. सुखाच्या या दालनातही त्याला प्रवेश करावयाचा असतो. कारण त्यातूनच त्याचे पशूहून वेगळे, वरचे असलेले मानवत्व सार्थ व्हावयाचे असते. आजीविका सुसाध्य असेल तरच त्याला दिवसाकाठी काही मोकळा वेळ मिळू शकेल, व त्या वेळाचा सदुपयोग करून तो या दिशेने चिंतन व वाटचाल करू शकेल. 'दिवस सरे, पोटाची खळगी न भरे' अशी त्याची अवस्था असेल तर अशा ओढग्रस्तीच्या जीवनात आहार–निद्रा–मैथुनादी प्राथमिक सुखेही त्याला निर्बंधपणे उपभोगता येणार नाहीत.

अर्थाचा अभाव – प्रभाव

अर्थाचा या प्रकारचा अभाव धर्माला (व्यक्तिधर्म आणि समष्टिधर्म दोघांनाही) हानिकारक ठरतो. सदैव अर्थाच्या चणचणीत असणारा मनुष्य स्वतःच्या शरीर, मन, बुद्धीची समुचित धारणा करू शकणार नाही, आणि समष्टीचा घटक या नात्याने जी विविध कर्तव्ये असतात तीही नीट पार पाडू शकणार नाही. अशी व्यक्ती जीवनधर्माचे यथोचित पालन करू शकत नाही; एवढेच नव्हे तर, अधर्म करण्यासही प्रवृत्त होते. 'बुभुक्षितः किं न करोति पापम्।' असे म्हटले आहे ते उगाच नव्हे. मुळात सत्पवृत्त आणि पापभीरू असणारी माणसेदेखील लाच, चोरी, दरोडेखोरी, जुगार यांसारख्या गुन्हेगारीकडे वळताना दिसतात किंवा संस्कारी कुटुंबात, वाढलेल्या भगिनी अनीतीच्या मार्गाला लागतात, त्याची जी अनेकविध कारणे आहेत; त्यांमध्ये अर्थाचा अभाव हेही एक प्रमुख कारण असते.

तथापि अर्थाचा केवळ अभावच धर्माला हानिकारक ठरतो असे मात्र नाही. अर्थाच्या अभावाप्रमाणे अर्थाचा प्रभावही धर्माला बाधक ठरतो. अर्थाचा प्रभाव म्हणजे अर्थाचे निव्वळ आधिक्य वा वैपुल्य एवढाच आशय नाही. संपत्ती-विषयी अत्यधिक आसक्ती असणे, शेवटी अर्थ हेही एक साधन आहे, साध्य नव्हे याचे विस्मरण होऊन जास्तीत जास्त अर्थार्जन हेच जीवनाचे लक्ष्य बनणे हे अर्थाच्या प्रभावाचे प्रमुख लक्षण आहे. सुखोपभोगाची नवनवीन साधने मिळविण्यासाठी अर्थामागे होणारी धावपळ समजण्यासारखी आहे; परंतु हा साध्य-साधन संबंध सुटून कवडी-कवडी माया जमविणे, तिचा अधिकाधिक संचय करण्यातच सुख वाटणे हा अर्थाचा प्रभाव होय. ग्रीक राजा मिडास याची कथा

प्रसिद्ध आहे. या राजाला सोन्याची एवढी जबरदस्त हाव होती की, हात लावीन त्याचे सोने व्हावे असा वर त्याने परमेश्वरापाशी मागून घेतला. सुखोपभोगाच्या साधनांची त्याला कमतरता होती म्हणून नव्हे, तर सोन्याच्या निव्वळ हव्यासापायी त्याने अविवेकीपणाने असा विचित्र वर मागून घेतला, आणि शेवटी त्याची लाडकी कन्याच सोन्याची निर्जीव पुतळी बनून गेली तेव्हा तो पस्तावला. 'माणसाला जमीन लागते तरी किती ?' ही टॉल्स्टॉयने लिहिलेली कथाही अर्थाचा प्रभाव दाखवणारीच आहे. या कथेतील माणूस सूर्योदयाच्या वेळी निघून सूर्यास्तापर्यंत जेवढ्या जमिनीला वळसा घालून निघाल्या जागी येऊन पोचेल त्या परिघात येणारी सर्व जमीन त्याला फुकट मिळणार होती. जास्तीत जास्त जमीन पदरात पाडून घेण्याच्या अती लोभापायी त्या माणसाने एवढा दूरवरचा वळसा घेतला की सूर्यास्तापूर्वी तो मूळच्या ठिकाणी येऊन पोहोचू शकला नाही. नियतस्थळी पोहोचण्यापूर्वी उन्हाने नि अतिश्रमाने तो रस्त्यातच गतप्राण होऊन पडला. शेवटी पुरण्यासाठी लागणारी साडेतीन हात जमीन तेवढी त्याला मिळाली. तेवढीच त्याची गरज होती.

परंतु सर्वसाधारणपणे माणसाच्या मनावर अर्थाचा जो अत्यधिक प्रभाव असतो तो अशा निव्वळ कोरड्या आसक्तीमुळे नसून, अर्थाच्या द्वारे प्राप्त होऊ शकणाऱ्या अनेकविध भौतिक सुखांच्या लालसेमुळे असतो. प्रारंभी मनुष्य जीवनाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि नंतर काही किमान उपभोग प्राप्त करण्यासाठी म्हणून अधिक अर्थ संपादन करण्याच्या मागे लागतो. परंतु हळूहळू हे चित्र पालटू लागते. उपभोगाचे, विलासाचे अधिकाधिक प्रकार आणि विषय त्याला सुचू लागतात; आणि ते सुख-विलास हस्तगत करण्यासाठी अधिकाधिक पैसा मिळवण्याच्या मागे तो लागतो. सुखाला चटावलेल्या अशा माणसाला मग अर्थप्राप्तीचा कोणता मार्ग अवलंबावा, कोणता अवलंबू नये याचा विधिनिषेध राहात नाही; इंद्रियजन्य सुखांची तृष्णा ही उपभोगाने शांत होण्याऐवजी अधिकाधिक प्रज्वलित होत असल्यामुळे एवढा आटापिटा करूनही अशा 'कामकामी' माणसाला नेहमी अर्थाचा अभावच जाणवत राहातो आणि गीताकारांनी म्हटल्याप्रमाणे शांती तर त्याला कधीच लाभत नाही. अशांत माणसाची सुखाशी गाठ पडत नाही, हेही गीतेने सांगितलेच आहे.

अर्थाच्या या प्रभावाविषयी दीनदयाळजी म्हणतात– "जेव्हा संपत्तीमध्ये, संपत्तीद्वारा प्राप्त होणाऱ्या भोगविलासांमध्ये आसक्ती निर्माण होते, तेव्हा

संपत्तीचा प्रभाव निर्माण झाला असे म्हणतात. ज्याला केवळ पैशाचीच धून लागलेली असते असा मनुष्य देश, धर्म, जीवनातील सुख आदी सर्व गोष्टी विसरून जातो. त्याचप्रमाणे विषयासक्त मनुष्य पौरुषहीन होऊन स्वतःच्या आणि इतरांच्याही नाशाला कारणीभूत होतो. संपत्तीच्या प्रभावाच्या पहिल्या प्रकारात संपत्ती हे साधन न राहता साध्य होऊन जाते. दुसऱ्या प्रकारात संपत्ती हे धर्माचरणाचे साधन न राहता विषयोपभोगाचे साधन बनते. विषयतृष्णा ही अमर्याद असल्याने विषयासक्त व्यक्तीला नेहमी अर्थाचा अभावच जाणवत राहातो. आणि पौरुषहीनतेमुळे त्याची अर्थोत्पादनाची क्षमताही उत्तरोत्तर कमी होऊन जाते." (भारतीय अर्थनीती)

अर्थ प्रभावाच्या या दोन्ही प्रकारांपासून दूर राहिले पाहिजे. धर्माच्या प्रभावाने हे साधता येईल.

धर्म

कामाच्या प्रभावामुळे उद्‌भवणाऱ्या दुष्परिणामांपासून मुक्त राहून त्या पुरुषार्थाचा उपयोग व्यक्तीला जीवनलक्ष्याच्या दिशेने पुढे जाण्यासाठी करता यावा म्हणून माणसाचे मन आणि बुद्धी धर्मानुगामी असणे कसे आवश्यक आहे, याचा विचार यापूर्वी झाला आहे. काम-पुरुषार्थ आणि अर्थ-पुरुषार्थ या दोहोंची विशेष गट्टी असल्यामुळे, आणि सामान्यपणे अर्थ-पुरुषार्थ काम-पुरुषार्थामागे फरफटत जात असल्याने अर्थाच्या प्रभावापासून मुक्त राहण्यासाठीही शिक्षण, सत्संस्कार, सदाचार यांची म्हणजेच धर्माची कास धरणे आवश्यक आहे. अर्थ-व्यवस्थेची योग्य रचना हा अर्थप्रभावापासून मुक्त राहण्याच्या दृष्टीने उपयुक्त असा एक उपाय आहे; परंतु कोणती व्यवस्था योग्य हे ठरविण्याचे काम माणसाच्या मन–बुद्धीचेच असल्याने शेवटी या व्यवस्थेचा प्राणही धर्मच असतो. अशा प्रकारे जीवनात धर्माचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असल्याने या पुरुषार्थाचा अधिक साकल्याने विचार करावयास पाहिजे. दुर्दैवाने आपल्या येथे धर्म या कल्पनेसंबंधी बराच गोंधळ आणि गैरसमज असल्याचे दिसते. धर्म हा बहुआयामी आणि खूप व्यापक आशय असलेला शब्द आहे. पदार्थाचा विशेष गुणधर्म, प्रकृतीचा आधारभूत नियम, जीवनाचे पायाभूत नीतिनियम व कर्तव्ये आदी अनेक आशय धर्म शब्दातून व्यक्त होत असतात. उदाहरणार्थ, प्रवाहित्व हा पाण्याचा, उष्णता वा दाहकता हा अग्नीचा, तरलता हा वायूचा, सुगंध व शीतलता हा चंदनाचा धर्म असतो. या ठिकाणी धर्म शब्दाचा उपयोग प्राकृतिक

गुणविशेष या अर्थी केलेला आहे. पितृधर्म, पतिव्रताधर्म, मातृधर्म. यांसारख्या शब्दांमधील धर्म शब्द त्या त्या व्यक्तीवरील नीतिनियमांसहित जबाबदारीचा निदर्शक आहे, तर राजधर्म, समष्टिधर्म आदी शब्दांनी प्रामुख्याने कर्तव्य सूचित केलेले आहे.

व्युत्पत्तिशास्त्रानुसार धृ (धारणा करणे) या धातूपासून धर्म शब्द सिद्ध होतो. धर्म शब्दाच्या व्याख्यांपैकी एक व्याख्या ' धारणात धर्ममित्याहुः धर्मो धारयते प्रजाः' अशी आहे. म्हणजे धर्माचा संबंध संबंधित वस्तूच्या वा घटकाच्या धारणेशी आहे. धारणा करतो तो धर्म. धारणेमध्ये अस्तित्व, परिपालन व संवर्धन या तिन्ही गोष्टींचा अंतर्भाव होतो. सृष्टीची धारणा करतो तो सृष्टिधर्म, समष्टीची धारणा करतो तो समष्टिधर्म, व्यक्तीची धारणा करतो तो व्यक्तिधर्म. या अनुषंगाने व्यक्ती आणि समष्टी यांचा विचार करता व्यक्ती व समाज यांची भौतिक, नैतिक आणि आध्यात्मिक उन्नती व्हावी, त्यांचा जीवनक्रम सुरळीत चालावा, त्यांच्यामधील सामंजस्य टिकावे व वृद्धिगत व्हावे आणि त्यांना सतत आपापल्या जीवनलक्ष्यांचे, अवधान राहून त्या दिशेने मार्ग-क्रमण करणे शक्य व सुलभ व्हावे यासंबंधीचे जेवढे मूलभूत सिद्धांत, नियम, भाव व व्यवस्था असतात त्या सर्वांचा समावेश धर्मामध्ये होतो. यालाच पं. दीनदयाळजींनी धर्माचे सार्वभौमत्व असे म्हटले आहे.

धर्माचा आशय वास्तविक एवढा व्यापक आहे. पण अनेकदा अगदी गौण गोष्टींनाच धर्म समजण्यात येते. धर्म म्हणजे कोणत्यातरी देवदेवतेची उपासना व पूजाअर्चा, सोवळेओवळे, जपजाप्य, उपासतापास, व्रतवैकल्ये, पापपुण्याचा हिशेब, मरणोत्तर उत्तम गती प्राप्त व्हावी यासाठी वरील मार्गांनी या जन्मी करावयाची तरतूद अशाच कल्पना असल्याचे सर्वसामान्यपणे आढळते. नित्य-नेमाने मंदिरात जाऊन वा घरीच पूजापाठ, भजन-पूजन करणारा मनुष्य मोठा धार्मिक समजला जातो. या सर्व गोष्टींचा व्यक्तिधर्माशी कमीअधिक संबंध आहे, परंतु हे अशाप्रकारचे कर्मकाण्ड म्हणजेच धर्म असे मानणे मात्र चुकीचे आहे.

अनेकदा प्रार्थनास्थान व धर्म यांची सांगड घातली जाते. म्हणजे असे की, मंदिरात जाणाऱ्या व्यक्तीचा धर्म वेगळा, मशीदीत जाणाऱ्यांचा वेगळा, आणि चर्चमध्ये जाणाऱ्यांचा आणखी निराळा. वस्तुतः धर्माचा संबंध केवळ मंदिर वा मशिदीशी नाही. ईश्वरोपासना व्यक्तिधर्माचे एक अंग असू शकेल;

आणि त्या दृष्टीने धर्माचा मंदिराशी, मशिदीशी वा चर्चशी संबंध आहे. परंतु म्हणून धर्म ही मंदिर, मशीद वा चर्चच्या भिंतींत बंदिस्त राहणारी बाब नव्हे. मंदिर, मशीद वा चर्च हे लोकांना नैतिक व धार्मिक शिक्षण आणि संस्कार देण्याचे प्रभावी माध्यम असू शकते. परंतु ज्या प्रमाणे रोज शाळेत जाणारा विद्यार्थी अज्ञानी असू शकतो, त्याचप्रमाणे रोज मशिदीत वा चर्चमध्ये जाणारा मनुष्य केवळ धर्मविहिनच नव्हे तर धर्मविरोधी वा धर्माचा शत्रूही असू शकतो. मंदिर, मशीद, वा चर्च या सर्व गोष्टी प्रामुख्याने उपासना-पद्धतीशी म्हणजेच पंथाशी निगडित आहेत.

धर्म आणि पंथ

धर्माचे पंथाहून वेगळे, व्यापक स्वरूप समजून घेण्यासाठी पंथ म्हणजे काय हे ध्यानात घेणे उपयुक्त होईल. थोडक्यात असे म्हणता येईल की, पंथ म्हणजे व्यक्तीला परमेष्टीशी – परमेश्वराशी – जोडणाऱ्या अनेकविध मार्गांपैकी एक मार्ग. श्री. विश्वनाथ लिमये यांनी आपल्या 'मैं या हम' ग्रंथात या विषयाचे मोठे नीटस् विश्लेषण केले आहे. श्री. लिमये म्हणतात – " संपूर्ण चराचर विश्व ही एक योजनाबद्ध रचना आहे. या विश्वात सृजन आणि विनाश ही क्रिया अखंड चालू असते. परंतु या नित्य परिवर्तनशील ब्रह्मांडाबरोबरच एक अपरिवर्तनीय चित् तत्त्वही विद्यमान आहे. त्याला शास्त्रज्ञ 'स्वयं विकसनशील कारण' (Self Evolving Cause) असे म्हणतात. आपल्या येथील ऋषींनी यालाच ब्रह्म ही संज्ञा दिली आहे. त्यांच्या मतेही ब्रह्म हेच सत्य आहे. अर्थात् पंच ज्ञानेंद्रियांनी ज्ञात होणारे विश्व असत्य नाही ; तर सापेक्ष सत्य आहे. ब्रह्म हे सर्वथा निरपेक्ष सत्य आहे.

आता मानव हा देखील या रचनेचाच एक अंश असल्याने त्याच्या ठिकाणीही या चित्तत्त्वाची दोन्ही रूपे (सापेक्ष सत्य आणि पूर्ण सत्य) विद्यमान असतात. या सापेक्ष सत्याला पूर्ण सत्याशी जोडणारा पूल किंवा मार्ग म्हणजे पंथ होय. RELIGION या शब्दाची व्युत्पत्तीही हेच दर्शविते. RE म्हणजे पुनः आणि Ligo म्हणजे बांधणे, भेटणे, जोडणे ; परंतु धर्म हा सापेक्ष सत्य, निरपेक्ष पूर्ण सत्य आणि या दोहोंना जोडणारे विविध मार्ग या सर्वांना व्यापणारा असतो.

पंथाची निर्मिती सामान्यपणे एखाद्या विशिष्ट जनसमूहाच्या संदर्भात झालेली असते. त्यामुळे तो विशिष्ट समूह, त्या समूहाची विकासाची पातळी,

सामाजिक परिस्थिती, त्या विशिष्ट कालखंडातील खास समस्या आदी गोष्टी ध्यानात घेऊन सांगितलेले काही नीतिनियम, विधिनिषेध, ईश्वरोपासनेची पद्धती यांसारख्या गोष्टींवर पंथाचा विशेष भर असतो. या सर्व आचारविचारांचा जो उद्‌गाता असतो, त्याला प्रेषिताचे वा अवतारी पुरुषाचे, आणि त्याच्या उपदेश-वचनांच्या संग्रहाला त्या पंथाच्या पवित्र ग्रंथाचे स्थान प्राप्त होते. उदाहरणार्थ, येशू ख्रिस्त व महंमद पैगंबर हे अनुक्रमे ख्रिस्ती व इस्लाम पंथाचे प्रेषित आहेत, आणि बायबाल व कुराण हे त्यांचे पवित्र ग्रंथ आहेत.

परंतु धर्म अशा प्रकारे स्थल-काल-परिस्थितीने बंदिस्त नसतो. एक प्रेषित, एक ग्रंथ, आणि काही विधिनिषेधात्मक आदेश सूत्रे (Commandments) यांच्या चौकटीत पंथ बसू शकतो, धर्म अशा चौकटीत बसणार नाही. आपल्या येथील उदाहरण देऊन सांगायचे तर शिख, बौद्ध, जैन, शैव, वैष्णव हे सर्व रिलिजन म्हणजेच पंथ वा संप्रदाय आहेत. परंतु या सर्वांचा धर्म एकच – हिंदू धर्म म्हणून ओळखला जाणारा धर्म आहे.

'यतोऽभ्युदयनिःश्रेयससिद्धिः स धर्मः' ही धर्माची सर्वमान्य व्याख्या आहे. म्हणजे धर्माला केवळ निःश्रेयसच (मोक्ष) नव्हे, तर ऐहिक अभ्युदयही अभिप्रेत आहे. आणि अभ्युदय म्हणजे नुसता उदय नव्हे, तर अभितः उदय, सर्व बाजूंनी उन्नती, सर्वांगीण आणि सर्वांची उन्नती. धर्माच्या या व्याख्येत अभ्युदयाला प्रथम स्थान देण्यात आले आहे हेही ध्यानात घेतले पाहिजे.

पंथ प्रामुख्याने परमेश्वराकडे जाणाऱ्या मार्गाशी निगडित असतो. धर्म परमेश्वराकडे पाठ फिरवीत नाही, परंतु त्याचा व्यक्तीच्या व समष्टीच्या दृष्ट आणि अदृष्ट जीवनाची सम्यक् धारणा व विकास यावर प्रमुख भर आहे. ईश्वराकडे जाणाऱ्या मार्गाचा विचार करणे सोडाच, परंतु ईश्वराचे अस्तित्व मानणेही धर्म अनिवार्य समजत नाही. तुम्ही ईश्वराचे अस्तित्व माना वा मानू नका. इहलौकिक जीवन सुव्यवस्थित चालविण्यासाठी धर्माचा अधिकांश भाग तुम्हाला मानावाच लागेल. ईश्वराचे अस्तित्व मानणे न मानणे या बाबतीत धर्म व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य देतो. परंतु चोरी, खून, दरोडे, द्वेष, ईर्ष्या, अनीती यांचे स्वातंत्र्य कोणालाही असू शकत नाही. तुम्ही जपजाप्य, व्रतवैकल्ये करा वा करू नका; पापपुण्याच्या रूढ कल्पना माना वा मानू नका; सामाजिक जीवनाचे नियम, व्यवस्था, संकेत, विधिनिषेध सर्वांना पाळावे लागतील.

धर्मकल्पनेतील विकृतीची मीमांसा

धर्माचे वास्तविक स्वरूप इतके व्यापक असताना, वर उल्लेख केल्याप्रमाणे त्याला एवढा संकुचित, विकृत आशय चिकटला कसा ? दीनदयाळजींच्या मते इंग्रजी भाषेतील 'रिलिजन' शब्द बऱ्याच अंशी या गोंधळाला कारणीभूत आहे. इंग्रज येथे आल्यावर त्यांनी आपला धर्म शब्द ऐकला. आपल्या धर्म शब्दाला जो व्यापक धारणात्मक आशय आहे तो व्यक्त करू शकेल असा समर्पक शब्द त्यांच्या भाषेत नाही. तेव्हा त्यांनी त्याचा अनुवाद रिलिजन असा केला. दुर्दैवाने, आपणही 'हिंदू धर्म' या शब्दप्रयोगाचा अनुवाद 'हिंदू रिलीजन' असा करू लागलो. भारतीय धर्मकल्पनेचे आणि एकूण भारतीय जीवनाचे आपले अज्ञान हे याचे एक प्रमुख कारण होते. परिणाम असा झाला की, खूप व्यापक आशय असलेल्या हिंदू धर्माला आपण एका पंथ-संप्रदायाच्या (रिलिजनच्या) पंक्तीला नेऊन बसविले.

आपल्या येथे इंग्रजांनी रूढ केलेल्या शिक्षणपद्धतीत पाश्चात्य जीवन व इतिहास यांविषयीच अधिक माहिती देण्यावर जो भर देण्यात आला तोही या विकृतीला बऱ्याच अंशी कारणीभूत आहे. शिक्षणाचा परिणाम असा झाला की, 'रिलिज़न' शब्दाशी ज्या ज्या वाईट गोष्टी युरोपीय इतिहासात निगडित झाल्या होत्या, त्या सर्व आपण येथे धर्माच्या डोक्यावर लादू लागलो. युरोपमध्ये व अन्यत्र 'रिलिजन'च्या नावाखाली जे अवन्वित अन्याय, अत्याचार झाले, रक्तपात झाले, तसेच हिंदुस्थानातही घडले असते हे त्यांनी गृहीत धरले. त्यामुळे आपल्या येथील तथाकथित प्रगतिवादी लोकांनी धर्माचा एवढा धसका घेतला की, धर्मयुद्ध आणि रिलिजनची लढाई यांतील फरक ध्यानात न घेता ते एक तर 'आम्ही निधर्मी आहोत, धर्मातीत वा धर्मनिरपेक्ष आहोत' असे म्हणून धर्मास सोडचिठी द्यावयास निघाले, किंवा धर्म ही केवळ व्यक्तिगत जीवनाची बाब आहे असे प्रतिपादन करू लागले.

धर्मासंबंधीच्या अढीचे, विपरीत धारणेचे कारण इंग्रजी शासनामुळे धर्माची तयार झालेली विपरीत व विकृत प्रतिमा एवढेच केवळ नव्हे, तर त्याची इतरही कारणे आहेत; बलवत्तर कारणे आहेत. आजवर हिंदू समाजाचे अंग असलेले काही लोक हिंदू धर्माचा परित्याग करून अन्य धर्मांत प्रवेश करीत असल्याच्या वार्ता अधूनमधून खेड्यापाड्यांतून येत असतात. याचे कारण काय ? धर्म व रिलिजन या कल्पनांची गल्लत हे त्याचे कारण निश्चितच नव्हे.

त्याचे कारण असे आहे की, ज्यांचा धर्माशी काडीमात्र संबंध नाही, नव्हे त्या निश्चितपणे धर्माविरोधीच आहेत, अशा अनेक गोष्टी शेकडो वर्षे धर्माच्या नावाखाली सर्रास चालू आहेत. धर्माची रूढीशी गल्लत करण्यात येते एवढेच नव्हे, तर 'शास्त्रात् रूढीर्बलीयसी' ठरून ती धर्मावर स्वार होऊन बसते. अस्पृश्यतेचे उदाहरण पाहा ना. अस्पृश्यतापालन हे धर्माचेच एक अंग आहे, आणि धर्माचे उल्लंघन हे तर महत्पाप आहे, अशी प्रामाणिक धारणा असलेले लोक आजही ठिकठिकाणी आहेत. केवळ अशिक्षित, अज्ञानी लोकांचाच नव्हे तर स्वतःला धर्माचार्य म्हणविणाऱ्या काही महाभागांचाही यांत समावेश आहे. धर्माच्या नावाखाली प्रचलित झालेल्या अमानुष रूढींचे चटके ज्यांना बसतात ते स्वाभाविकपणेच म्हणतात, "अशा धर्मापासून आम्हांला वाचवा." अनेकांची स्वाभाविक चीड संतापाच्या मार्गानेही व्यक्त होऊ लागते. हे सर्व पाहून ज्यांचे अंतःकरण व्यथित होते, त्यांनाही असे वाटू लागते की, साधी माणुसकीची चाड नसलेल्या या धर्मापासून दोन पावले दूर राहिलेले बरे !

परंतु अशाने प्रश्न सुटत नाहीत. उलट परिस्थिती अधिक बिकट होते. धर्म सोडून चालणार नाही, आणि सोडू म्हटल्या सुटणारही नाही. कोणाला आपली उपास्य देवता वा उपासनापद्धती सोडता येईल, बदलता येईल; पंथ सोडता – बदलता येईल; इतकेच काय प्रत्यक्ष परमेश्वरालाही सोडचिठ्ठी देता येईल परंतु धर्माशी फारकत कदापि घेता येणार नाही. कारण अखेर व्यक्तीची आणि समष्टीची धारणा धर्ममुळेच होत असते. काही लोकांनी धर्माला विकृत स्वरूप दिले असेल, धर्माचा दुरुपयोगही केला असेल; परंतु म्हणून धर्मालाच अरिष्ट मानून त्याचा त्याग करणे हा उपाय नव्हे. धर्माचे सत्य व वास्तविक स्वरूप समजून घेऊन खऱ्या धर्माचे आचरण करणे, तो सु-प्रतिष्ठित करणे हा उपाय आहे. मुळात चांगल्या असलेल्या गोष्टीमध्ये या ना त्या कारणाने काही अनिष्ट गोष्टी घुसल्या असतील, काही विकृती निर्माण झाल्या असतील, तर त्या अनिष्ट गोष्टी आणि विकृती दूर करून मूळ चांगल्या गोष्टींचे ग्रहण, जतन आणि संवर्धन करणे हेच शहाणपणाचे लक्षण होय.

'धारणात् धर्ममित्याहुः' किंवा 'यतो अभ्युदयनिःश्रेयससिद्धिः स धर्मः' या धर्माच्या व्याख्येतील धर्मामध्ये व्यक्तिधर्म, समष्टिधर्म, सृष्टिधर्म आदी सर्वांचाच समावेश होतो. परंतु एकात्म मानव दर्शनाच्या संदर्भात येथून पुढे व्यक्तिधर्म आणि समष्टिधर्म यांचाच विशेषत्वाने विचार करण्यात आला आहे.

अर्थात् व्यक्तिधर्म आणि समष्टिधर्म परस्परांपासून भिन्न नाहीत. एकाच व्यापक धर्माचे ते दोन पैलू आहेत. विवेचनाच्या सुकरतेसाठी व्यक्तिधर्म आणि समष्टि-धर्म अशा दोन अंगांनी विचार करावयाचा एवढेच !

व्यक्तीच्या जीवनाची धारणा करणारे व जीवनलक्ष्याच्या दिशेने तिच्या विकासाला सहाय्यभूत ठरणारे जेवढे म्हणून नियम असतात त्यांचा समुच्चय म्हणजे व्यक्तिधर्म होय. हा धर्म माणसाच्या प्रकृतीतच असतो. माणसाला जन्मतः प्राप्त होणाऱ्या गोष्टी, त्याचे शरीर, पंच ज्ञानेंद्रिये, मन आदी प्रायः प्रकृतिधर्मानुसार कार्य करीत असतात. वेगळ्या शब्दांत सांगावयाचे तर सर्व-सामान्यपणे मनुष्यप्राणी प्रकृतिधर्मानुसार म्हणजेच धारणेला अनुकूल अशा रीती-नेच विचार आणि व्यवहार करीत असतो, आणि म्हणूनच त्याची जीवनधारणा होत असते, जीवनयात्रा चालत असते. परंतु अनेकदा सुखलोलुपतेमुळे, आळसा-मुळे वा खोट्या अहंकारापायी मनुष्य या प्रकृतिधर्माची उपेक्षा वा उल्लंघन करतो. उदाहरणार्थ, माणसाची जीवनयात्रा शरीरावर अवलंबून असते. शरीर अन्नावर अवलंबून असते. म्हणून शरीरधारणेसाठी अन्न सेवन करणे हा व्यक्तीचा शरीरधर्म झाला. अर्थात् शरीरस्वास्थ्याला उपयुक्त असे व एवढेच अन्न ग्रहण केले पाहिजे, जे शरीराला अपायकारक असेल ते त्याज्य समजले पाहिजे, हा विधिनिषेधही ओघानेच येतो. परंतु कधीकधी, मी आठ आठ दिवस झोपेशिवाय राहू शकतो, किंवा अन्नाचा कण वा पाण्याचा थेंबही न घेता तीन दिवस काम करू शकतो हा प्रौढीचा विषय वाटू शकतो; किंवा बसल्या बैठकीत पन्नास बटाटेवडे फस्त करू शकतो, साठसाठ कप चहा ढोसू शकतो, पंचवीस तास अखंड धूम्रपान करू शकतो हेही बढाईचे विषय होऊन बसतात. खोट्या अहंकारातून प्रकृतिधर्मावर असा अत्याचार केल्यास त्यातून शरीरात विकृती निर्माण होणारच. माणसाचे शरीर प्रकृतिधर्मानुसार सुरळीत चालावे, त्यात अकाली काही विकृती निर्माण होऊ नये यासाठी वैद्यकशास्त्राने आहार-विहारासंबंधी काही नियम, विधि-निषेध सांगितले आहेत. हे नियम आणि विधि-निषेध म्हणजे शरीरधर्माचेच नियम होत. शरीर हे व्यक्तिधर्माचे आणि समष्टिधर्माचे अत्यंत महत्त्वाचे साधन असल्याने या शरीरधर्माचे निग्रहाने पालन करणे, शारीरिक क्षमता टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक आहे.

परंतु माणसाची धारणा म्हणजे त्याच्या केवळ शरीराची धारणा नव्हे. शरीरस्वास्थ्याबरोबर मन–बुद्धीचेही स्वास्थ्य या धारणेत अभिप्रेत आहे. 'धृतिः

क्षमा दमोऽस्तेयं शौचमिन्द्रियनिग्रहः। धीर्विद्या सत्यमक्रोधोदशमं धर्मलक्षणम् ।। या श्लोकात धर्माची जी दहा लक्षणे सांगितली आहेत ती शरीराबरोबरच मन–बुद्धीच्या स्वास्थ्याशीही निगडित आहेत. शरीरस्वास्थ्याइतकेच मन-बुद्धीचे स्वास्थ्यही जीवनास आवश्यक आहे. निर्बुद्ध माणसासमोर जगातील अत्याधुनिक सुखोपभोगाची सामुग्री आणून ठेवली तरी त्याला तिचे काय होय ? माकडाच्या हाती दिवा दिला तर ते ज्याप्रमाणे तो फेकून देईल किंवा 'माकडाच्या हाती कोलीत' ही म्हण सार्थ करील, त्याचप्रमाणे तो ती सर्व सामुग्री फेकून देईल, तिची मोडतोड करील, किंवा समाजाला हानिकारक काही उत्पात करील !

बुद्धी नीट असली पाहिजे, विकृतिरहित असली पाहिजे, एवढेच नव्हे तर, ती सद्‌बुद्धी असली पाहिजे, सुसंस्कारित असली पाहिजे. जागृत–अर्धजागृत मनामध्ये काही विकृती असू शकतात त्याप्रमाणे बुद्धीच्या ठिकाणीही काही विकृती असू शकतात, ही गोष्ट आता पाश्चात्यांनीही मान्य केली आहे. बुद्धी नीट नसेल तर माणसाला बुद्धीचे सुख अनुभवता येणार नाही. नित्य–अनित्य, श्रेय-प्रेय योग्य-अयोग्य, ग्राह्य-अग्राह्य, कार्य-अकार्य यांचा विवेकही करता येणार नाही.

शरीर-मन-बुद्धीचे हे स्वास्थ्य व त्यांचे सुख या तिन्ही गोष्टी धर्मानुसार असतील तरच लाभू शकेल. युक्त व मित आहारविहार, ध्यानधारणा, योगासनांसारखा काही व्यायाम, संयम, सत्संग, चांगल्या ग्रंथांचे वाचन-मनन, काही निरपेक्ष समाजसेवाकार्य आदी गोष्टींची शरीर-मन-बुद्धीचे हे स्वास्थ्य लाभण्यास खूप मदत होते.

अर्थात् त्याबरोबरच व्यक्तीसमोर एखादे श्रेष्ठ, व्यापक जीवनलक्ष्यही असणे आवश्यक आहे. हे जीवनलक्ष्य असे असले पाहिजे की, ज्यामुळे संपूर्ण जीवनाला म्हणजे शरीर-मन-बुद्धीला योग्य दिशा लाभेल, इंद्रियजन्य सुखांचा सोस उत्तरोत्तर कमी होत जाईल, मन-बुद्धीच्या विकृती दूर होत जातील, मन-बुद्धी-आत्म्याच्या चढत्या श्रेणीच्या सुखांची अधिकाअधिक अनुभूती येईल, आणि संपूर्ण जीवन कृतार्थ होईल. धर्मामध्ये या सर्व गोष्टींचा समावेश आहे, किंवहुना धर्माच्या अधिष्ठानाविना सार्थ मनुष्यजीवन असंभव आहे.

मोक्ष

व्यक्तीचा विचार करताना आपण येथवर काम, अर्थ आणि धर्म या तीन पुरुषार्थांविषयी विचार केला. या विवेचनाच्या ओघात एके ठिकाणी

असा उल्लेख आलेला आहे की, माणसाचे जीवन सर्वार्थाने कृथार्थ होण्यासाठी त्याच्यासमोर श्रेष्ठतम असे एखादे लक्ष्य असले पाहिजे. आपल्या संस्कृतीचे असे सांगणे आहे की, मोक्ष हेच मानवी जीवनाचे सर्वश्रेष्ठ लक्ष्य आहे. पुरुषार्थाच्या मालिकेतही स्वाभाविकपणेच मोक्ष हा परमश्रेष्ठ पुरुषार्थ मानला गेला आहे.

तथापि, चतुर्विध पुरुषार्थांपैकी धर्म, अर्थ आणि काम या पुरुषार्थांचे आकलन आणि आचरण त्या मानाने सोपे आहे. मोक्ष-पुरुषार्थाचे तसे नाही. पहिल्या तीन पुरुषार्थांचा संबंध प्रत्यक्ष या जीवनाशीच असतो. मोक्ष-पुरुषार्थाचीही साधना जीवनभर करावयाची असली तरी मृत्यूनंतरही तो जीवात्म्याची सोबत करीत असतो. या अर्थाने की, आपल्या चिदानंद स्वरूपाची अनुभूती घेत असलेला जीवात्मा परमात्म-स्वरूपात विलीन होतो. देहाची खोळ गळून पडताच चैतन्य चैतन्यात विलीन होते. घट फुटताच घटाकाश व्यापक आकाशाशी एकरूप होऊन जाते. याप्रमाणे मग जन्ममृत्यूचा फेरा उरत नाही, त्यांतून मुक्तता लाभते.

मोक्ष शब्द मुच् म्हणजे सोडणे, मुक्त करणे या संस्कृत धातूपासून सिद्ध झालेला आहे. मोक्ष म्हणजे सर्व प्रकारच्या बंधनांतून मुक्ती. विशेषतः अर्थ व काम यांच्या आसक्तीच्या बंधनात माणसाने अडकून राहू नये, त्यातून मुक्त व्हावे, अनासक्त व्हावे, हा या पुरुषार्थाचा एक पैलू आहे. त्याच्याही पुढे जाऊन जन्माबरोबर मिळालेला आणि मृत्यूपर्यंत साथ देणारा माझा देह म्हणजेच मी ही भावना आणि या भावनेभोवती गुंफलेली देहासक्ती, राग, लोभ, आशा, तृष्णा आदी विकार गळून पडावे हा याच पैलूचा दुसरा भाग आहे. परंतु मोक्षाची कल्पना केवळ नकारात्मक नाही, ती भावात्मकही आहे; किंबहुना ती भावात्मकच आहे. प्रथम माझ्यातील शरीर-मन-बुद्धीच्या पलीकडे असलेला शाश्वत आत्मस्वरूप, 'मी' ओळखावयाचा आणि त्या आधारे 'मी-माझे' च्या जाणीवेच्या कक्षा वाढवीत सर्व चराचराला व्यापून राहिलेल्या परमात्म्याशी एकरूप व्हावयाचे हा या पुरुषार्थाचा वास्तविक अर्थ आहे. मनुष्य म्हणजे निव्वळ पंचमहाभूतांचा संघात नसून 'ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः' या वचनानुसार ईश्वरी चैतन्याचा अंश असल्यामुळे त्या ईश्वरी अंशाची व त्या अनुषंगाने सर्वव्यापी परमात्म्याशी असलेल्या आपल्या एकात्म नात्याची जाण व अनुभूती व्हावी, आणि शेवटी द्वैताची मोहपटले दूर होऊन 'मैं नहीं तूही'

ही परमानंदरूप अवस्था प्राप्त व्हावी असा व्यापक आणि विधायक आशय या मोक्ष-पुरुषार्थामध्ये आहे. असा हा मोक्ष हे आपल्या येथे मानवी जीवनाचे अंतिम लक्ष्य मानले गेले आहे. लोकमान्य टिळक यासंबंधी म्हणतात – "मनुष्य या पृथ्वीतलावर निर्माण झाल्यादिवसापासून सर्व दृश्य व नाशिवंत सृष्टीचे मूलभूत अमृत तत्त्व काय आहे, व ते मला कसे प्राप्त होईल याचा विचार तो एकसारखा करीत आला आहे. आधिभौतिक शास्त्राची किती जरी प्रगती झाली तरी मनुष्याची अमृत-तत्त्वाच्या ज्ञानाकडील ही स्वाभाविक प्रकृती कधीही कमी व्हावयाची नाही. आधिभौतिक शास्त्रे कितीही वृद्धिगत होवोत, सर्व आधिभौतिक सृष्टिविज्ञान बगलेत मारून तत्त्वज्ञान नेहमीच त्याच्यापुढे धाव घेत राहणार ! दोन-चार हजार वर्षांपूर्वी हीच स्थिती होती व आता पाश्चिमात्य देशांतूनही तोच प्रकार नजरेस येत आहे.

(गीतारहस्य : पृष्ठ १०१)

धर्म, अर्थ, काम, मोक्ष, या चतुर्विध पुरुषार्थांपैकी धर्म हा आधारभूत पुरुषार्थ आहे, तर मोक्ष हा परम पुरुषार्थ आहे. शरीर, मन, बुद्धी, आत्मा यांच्या सुखासाठी ज्या चतुर्विध पुरुषार्थांची योजना आहे, त्यांपैकीच हा एक पुरुषार्थ आहे हे ध्यानात ठेवले पाहिजे. म्हणजे मोक्ष-पुरुषार्थही सुखप्राप्ती-साठीच आहे. त्याहीपुढे जाऊन असे म्हणता येईल की, मोक्ष-पुरुषार्थाची सिद्धी म्हणजे घनीभूत परमसुखाची अखंड अनुभूती देणारी अवस्था आहे.

चतुर्विध पुरुषार्थांची एकात्मता

मोक्षप्राप्तीसाठी कर्ममार्ग, भक्तिमार्ग आणि ज्ञानमार्ग असे तीन प्रमुख मार्ग सांगितलेले आहेत. त्यांपैकी कर्ममार्ग शरीराशी, भक्तिमार्ग मनाशी आणि ज्ञानमार्ग बुद्धीशी विशेष संबंधित आहे हे खरे असले तरी, याचा अर्थ मोक्ष-पुरुषार्थाच्या या तीन अगदी स्वतंत्र समांतर वाटा आहेत असा मुळीच नाही. भक्तिसमन्वित, ज्ञानयुक्त, निष्काम कर्म हा मोक्षाचा मार्ग आहे. कर्मविरहित भक्ती केवळ भावुक असते. भक्तिविरहित कर्म शुष्क असते, ज्ञानविरहित कर्म आंधळे असते, आणि भक्ती व कर्म विरहित ज्ञान पंगू असते. सुखाचा विचार करताना शरीर, मन, बुद्धी व आत्मा यांचा जसा विचार केला पाहिजे तद्वतच मोक्ष म्हणजे परमसुख असल्याने त्या सुखाकडे जाणारा मार्गही एकात्म असावा हे स्वाभाविकच आहे.

या चारी पुरुषार्थांचे एकात्म स्वरूप स्पष्ट करताना दीनदयाळजी म्हणतात – "अशा प्रकारे आपल्या संस्कृतीने मानवाची प्रकृती ध्यानात घेऊन त्याचे शरीर, मन, बुद्धी व आत्मा या सर्वांचा विचार डोळ्यासमोर ठेवला आहे. माणसाची सर्व प्रकारची भूक भागविण्याची व्यवस्था केली आहे. परंतु एक भूक भागविण्याच्या प्रयत्नात दुसरी भूक शमविण्याचा मार्ग बंद होणार नाही वा तिसरी एखादी विपरीत भूक निर्माण होणार नाही याचीही खबरदारी घेतली आहे. भारतीय संस्कृतीने चारी पुरुषार्थांचा संकलित विचार केला आहे.

हे चारी पुरुषार्थ परस्परांशी संलग्न आहेत. आता हे खरे आहे की, काही प्रसंगी अनेक वस्तूंपैकी एखादीला विशेष महत्त्व द्यावे लागते, तुलनेने इतर वस्तू गौण वाटतात; तर दुसऱ्या प्रसंगी अन्य एखाद्या वस्तूचे महत्त्व विशेष भासते. माणसाला अन्न आणि पाणी दोन्ही गोष्टी अत्यावश्यक आहेत; परंतु तहान लागली असता अन्नापेक्षा पाण्याची गरज अधिक असते, उलट भूक अनावर झाली असता पाण्यापेक्षा अन्नाचीच निकड अधिक जाणवते. त्याचप्रमाणे कधी अर्थाला, कधी धर्माला, कधी कामाला तर कधी मोक्षाला प्राधान्य द्यावे लागते. परंतु विचार सर्वच पुरुषार्थांचा करावयाचा असतो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शारीरिक कार्यक्रमातील षट्पदी नावाचा एक प्रकार आहे. षट्पदी-मध्ये आपली दृष्टी चारी मोहोऱ्यांवर फिरत असते. परंतु समजा कोणी तिसऱ्या मोहऱ्यावरून चढाई केली तर आपल्याला त्याच मोहऱ्यावर पाय रोवून उभे राहून आक्रमणाचा प्रतिकार करावा लागेल. मला कोणी विचारले की, 'तुम्ही कोणता वाद मानता ?' तर मी त्याला सांगेन की, 'आम्ही षट्पदीवाद मानतो.' आम्ही केवळ एकाच मोहोऱ्यावर नव्हे तर चारी मोहोऱ्यांवर सावध राहणारे आहोत. आम्ही पूर्णतावादी, एकात्मवादी आहोत. ही पूर्ण मानवाची, एकात्म मानवाची कल्पना हे आपले आराध्य आहे. आपल्या सर्व आराधनेचा निकष आणि साधन आहे. अलीकडे पाश्चात्य देशांमध्ये ज्या विविध विचारप्रणाली उदयास आल्या, आणि त्या अनुरोधाने सामाजिक, आर्थिक वा राजकीय व्यवस्था उभ्या करण्यात आल्या त्या मानव कल्याणाचे, मानवाच्या उन्नतीचे उद्दिष्ट साध्य करू शकल्या नाहीत याचे प्रमुख कारण हेच की, त्यांनी शरीर-मन-बुद्धी-आत्मा यांनी युक्त असलेला पुरुषार्थ-चतुष्टयशील मानव डोळ्यासमोर ठेवण्याऐवजी मानवाची एकांगी आणि अनेकदा विकृतही प्रतिमा डोळ्यासमोर ठेवून त्यांची आखणी केली."

माणसाचे शरीर, मन, बुद्धी, आत्मा यांच्या भुका तृप्त होऊन त्याचा सर्वांगीण व संतुलित विकास व्हावा यासाठी भारतीय संस्कृतीने व्यक्तीसमोर कर्तव्यरूपाने जे चार पुरुषार्थ ठेवले आहेत, त्यांचा विचार येथवर झाला. या चतुर्विध पुरुषार्थांनी युक्त असा पूर्ण मानव, हा एकात्म मानव दर्शनाचा केंद्रबिंदू आहे. परंतु या जगात माणूस काही एकटाच राहात नाही. इतर माणसेही राहातात. परिवार, जात, राष्ट्र, संपूर्ण मानवसमाज अशा विविध स्तरांवर व्यक्तीचा या इतर मानवांशी संबंध येत असतो. मानवा-मानवांचे हे संबंध व व्यवहार सुरळीत चालण्यासाठी आणि त्याचे व्यक्तिगत व समष्टिजीवन सर्वांगाने उन्नत व सुखी व्हावे यासाठी ज्या निरनिराळ्या संस्था, व्यवस्था निर्माण करण्यात येतात त्यांमध्ये या मानवाला सहभागी व्हावयाचे असते. त्या त्या संबंधातील व व्यवस्थेतील प्राप्त कर्तव्य पार पाडावयाचे असते. या माणसाचीच दृष्टी एकांगी संकुचित वा विकृत असेल तर त्याला आपले हे कर्तव्य नीटपणे पार पाडता येणार नाही. आतापर्यंत चतुर्विध सुखांचे व पुरुषार्थांचे जे विवेचन केले आहे ते या मानवाने आपली तयारी किती अंगांनी, कसकशी करावयाची आहे, हे ध्यानात यावे याच हेतूने होय. असा हा पूर्णत्वाचा साधक मानव उत्तरोत्तर अधिकाधिक मानव-समूहांच्या संपर्कात येतो, तेव्हा त्याच्या मनाची घडण कशी असते, त्याचा प्रत्यक्ष व्यवहार कसा असतो, असला पाहिजे याचा विचार येथून पुढे करावयाचा आहे. पंडित दीनदयाळजींनी म्हटल्याप्रमाणे 'असा चतुर्विध पुरुषार्थी पूर्ण मानव' हाच आपल्या आराधनेचा निकष आणि साधन आहे. आदर्श पूर्ण मानवाचे हे चित्र आपल्या मनात पक्के ठसलेले असले म्हणजे मग एकात्म मानवाच्या दिशेने त्याची होणारी वाटचाल ध्यानात येणे सुलभ होईल. एकदा माणसाची जुळणी नीट झाली म्हणजे पृथ्वीचा नकाशा आपोआप जुळून जाईल, असे जे प्रारंभी म्हटले आहे. त्याचा आशयही अधिकाधिक उलगडत जाईल.

• • •



५

समष्टिविचार - व्यक्ती आणि परिवार

चतुर्विध पुरुषार्थांची साधना करणारी व्यक्ती उत्तरोत्तर अधिकाधिक व्यापक जनसमूहाच्या संपर्कात येते, तेव्हा तिचा विचार, व्यवहार कसा असतो, कसा असावा यासंबंधी आपण विचार करू लागतो, तेव्हा कुटुंब, जात, स्वभाषिक समाज, राष्ट्र आदी विविध घटक आपल्या डोळ्यासमोर येतात. या चढत्या भांजणीमध्ये कुटुंबाचा क्रम पहिला येतो. व्यक्ती आणि समष्टी यांना जोडणारा तो अत्यंत महत्त्वाचा व प्रभावी दुवा आहे. ही कुटुंबसंस्था पृथ्वीच्या पाठीवरील प्रायः सर्वच समाजांमध्ये खूप प्राचीन काळापासून चालत आली असल्याचे दिसते.

कुटुंबसंस्था मानवी जीवनाच्या इतिहासात केव्हा, कोणत्या परिस्थितीत उदयास आली, तसेच एवढा प्रदीर्घ काळ ती टिकून कशी राहिली हा समाज-शास्त्राच्या अभ्यासाचा विषय आहे. याची कारणमीमांसा कोणतीही असो, एकात्म मानव दर्शनाच्या दृष्टीने कुटुंबसंस्थेचे महत्त्व खूपच आहे. कारण व्यक्तीला 'अहं' कडून 'वयं' कडे वाटचाल करण्याचे, म्हणजेच समष्टि-जीवनाचे, पहिले पाठ कुटुंबातच लाभत असतात. कुटुंबाला परिवर असाही एक प्रतिशब्द आहे. परिवारात अनेक व्यक्ती असतात. पति–पत्नी, लेकी–सुना, नातवंडे, भाऊ-बहिणी, सासरची व माहेरची माणसे आदी सगळ्यांचा समावेश परिवारात होतो. या सगळ्यांशी आत्मीयतेचे संबंध प्रत्यक्षात अनुभवता येतात. घरात एखादे मंगल कार्य निघाले म्हणजे लहान-मोठ्या कामांत परिवारातील सर्वांचा हातभार लागत असतो. कुटुंबावर एखादी आपत्ती ओढवते तेव्हा सर्व-जण मिळून तिला तोंड देतात, मार्ग काढतात.

जीवनातील अनेक कटकटींच्या मुळाशी पैसा हे प्रमुख कारण असते. कुटुंबात काही व्यक्ती मिळवत्या असतात, काही नसतात. कोणी आजारी असते, क्वचित् अपंगही असते. परंतु घरात येणाऱ्या पैशांचा विनियोग या सर्वांचे सुख, गरजा विचारात घेऊन होत असतो. घरातील कर्ती मंडळी स्वतःच्या आवडी-निवडी, गरजा बाजूला ठेवून प्रथम इतरांच्या गरजांकडे, आवडीनिवडींकडे लक्ष पुरवीत असतात. याचे सत्संस्कार इतर लहानथोर सर्वांवरच कमी-अधिक प्रमाणात होत असतात. कुटुंबातील व्यक्तीच्या या व्यवहारासंबंधी एखादी नियमावली वा घटना तयार केलेली नसते. सर्व व्यवहार परस्पर समजुतीने, अगदी सहजपणे चाललेला असतो. हे सर्व कशातून घडते ? आपण सारे एका कुटुंबाचे, एकाच रक्ताचे आहोत या जाणीवेतून, आत्मीयतेच्या भावबंधातून ही किमया घडत असते.

पाश्चात्य देशांत या परिवार-संस्थेला वेगाने तडे जात आहेत. दुर्दैवाने, आपल्या येथेही परिवाराचा उत्तरोत्तर संकोच होत चाललेला दिसतो. अशा परिस्थितीत ' पुढच्यास ठेंच मागचा शहाणा ' या न्यायाने पाश्चात्यांचे या संदर्भातील अनुभव नजरेखालून घालण्यासारखे आहेत. पाश्चात्य देशांत कुटुंबसंस्थेची मोडतोड पुढील तीन प्रमुख कारणांमुळे होत असलेली दिसते. १) व्यक्तिस्वातंत्र्याची एकांतिक कल्पना, २) साम्यवादी देशांतील कम्यून्स, ३) समाजवादी शासन वा कल्याणकारी राज्य. या तिन्ही कारणांचा परामर्श थोडक्यात घेऊ.

व्यक्तिस्वातंत्र्य – कोणतीही संस्था सुरळीत चालण्यासाठी अनुशासन अपेक्षित असते. कुटुंबसंस्थाही त्याला अपवाद नाही. कुटुंबसंस्थेत व्यक्तीला स्वातंत्र्य असले तरी कुटुंबाच्या सुखासाठी, हितासाठी व्यक्तीला काही वेळा कमीअधिक प्रमाणात स्वतःच्या स्वातंत्र्याला मुरड घालावी लागते. वडीलधाऱ्या मंडळींचे ऐकावे लागते. सुखोपभोगावर मर्यादा येऊन पडतात. अशा मर्यादा म्हणजे व्यक्तिगत स्वातंत्र्यावर गदा आहे, अशी भावना पश्चिमेकडील अनेक देशांत बळावू लागली आहे. कमावणारा मुलगा लग्न होताच आईवडिलांपासून वेगळा होतो. आईवडिलांनी एकमेकांच्या सोबतीने उर्वरित जीवन कंठावे, वा वृद्धाश्रमाची वाट धरावी ! अगदी क्षुल्लक कारणांवरून होणाऱ्या बेसुमार घटस्फोटांमुळे तर कुटुंबसंस्थेबरोबरच संस्कारक्षम बालकांचे सारे भावविश्वच उद्ध्वस्त होत आहे.

कम्युन्स – मार्क्सवादी विचारसरणीनुसार कुटुंब ही एक कृत्रिम संस्था आहे. त्यांच्या मते ती भांडवलशाही समाजव्यवस्थेचे अपत्य आहे. व्यक्ती व मानव यांच्यामध्ये कुटुंबसंस्था हा मोठा अडसरच आहे. म्हणून कुटुंबसंस्था नष्ट केली पाहिजे. रशियाने व चीनने अशी अनेक कम्यून्स स्थापनही केली. (कुटुंबहीन समाजव्यवस्था उभी करण्याची ही दिशा साम्यवाद्यांना अनुभवान्ती सोडून द्यावी लागली व माणसाच्या नैसर्गिक प्रवृत्तींना वाव देणे अपरिहार्य झाले.)

समाजवादी शासन : कल्याणकारी राज्य – व्यक्तिस्वातंत्र्याची टोकाची कल्पना आणि साम्यवादी 'कम्यून्स' यांमुळे कुटुंबसंस्थेला बसलेले हादरे समजण्यासारखे आहेत. परंतु 'कल्याणकारी राज्य' कुटुंबसंस्थेच्या मुळावर येऊ शकते, ही गोष्ट सहज ध्यानात येणारी नाही. मात्र वस्तुस्थिती तशी आहे. थोडक्यात असे सांगता येईल की, व्यक्तीच्या उदरनिर्वाहाचे साधन, शिक्षण, आरोग्य आदी बहुतेक सर्व गरजांची जबाबदारी कल्याणकारी राज्यात शासनाने घेतलेली असते. सर्वसामान्यपणे ही जबाबदारी कुटुंबाची असते. आता ती जबाबदारी शासनाने उचलली असल्याने व्यक्तीला कुटुंबसंस्थेची काही गरजच भासेनाशी झाली आहे. श्री. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी आपल्या 'समृद्धीचा शाप' या लेखात या समस्येचे विचारपूर्वक विवेचन केले आहे, श्री. सहस्रबुद्धे म्हणतात –

"मनुष्य कार्यप्रवण होतो, कष्ट करतो, चिंता वाहतो, परिस्थितीशी झगडा करतो, काही मनोनिग्रह करतो, संयम करतो, आपल्या काही भुका मारतो, वासना दडपतो, हे केव्हा घडते ? त्याच्यावर काही जबाबदारी असेल तर ! बायकामुलांचे पोषण करावयाचे आहे, त्यांच्या व आपल्या पुढील आयुष्याची तरतूद करावयाची आहे. यातून वेळ–शक्ती–धन शिल्लक राहिल्यास काही सामाजिक कार्य करावयाचे आहे. आपल्या बांधवांना सहाय्य करावयाचे आहे, अशा तऱ्हेची जबाबदारी मनुष्याच्या शिरावर असली तर तो कष्ट करतो, संयम करतो, वाटेल ती झीज सोसतो व प्रसंगी आत्मबलीदानही करतो.

"समाजवादी समाजरचना व कल्याणकारी राज्य यांनी आपणा नागरिकांना या सर्व जबाबदाऱ्यांतून मुक्त केले आहे. मूल जन्माला येताच शासनाकडून अनुदान सुरू होते. त्याच्या शिक्षणाची जबाबदारी शासनावर असते. त्याचा रोजगार निश्चित आहे. घरातल्या सर्व माणसांना वैद्यकीय मदत मोफत मिळते. म्हातारपणची सर्व व्यवस्था शासनच करते. मग प्रपंचातील

कर्त्या पुरुषावर जबाबदारी कसली ? इतर देशांत शिक्षण चालू असतानाच विद्यार्थ्यांवर जबाबदाऱ्या येऊन पडतात. आपली धाकटी भावंडे, आपले मातापिता, यांची जबाबदारी हळूहळू आपल्यावर येणार आहे ही जाणीव या वयातच त्यांच्याठायी निर्माण होते. कौटुंबिक कर्तव्याची ही आच समाजवादी समाजरचनेत आणि कल्याणकारी राज्यात मनुष्याच्या मनाला नसते. मग समाजऋणाची आच कोठली ? (' माझे चिंतन ', दुसरी आवृत्ती, लेखक पु. ग. सहस्रबुद्धे)

कुटुंब ही व्यक्तीला समष्टिजीवनाचे पहिले पाठ देणारी संस्था आहे. असे वर म्हटले आहे, ते किती सार्थ आहे हे वरील अवतरणावरून अधिक स्पष्ट होऊ शकेल. परस्परांविषयी स्नेह, एकमेकांसाठी झीज सोसायची प्रवृत्ती, सोशिकता अशा कितीतरी समाजधारक सद्‌गुणांचे संस्कार पारिवारिक जीवनामध्ये आपल्यावर सहजगत्या होऊन जातात. परिवाराचीही कल्पना अधिकाधिक विशाल करीत जाणे, ती समाजव्यापी आणि विश्वव्यापी बनविणे हीच आत्मिक विकासाची दिशा होय. हीच एकात्म मानव दर्शनाचीही मध्यवर्ती संकल्पना आहे.

समाज, राष्ट्र, विश्व, मानव, सृष्टी, परमेष्टी ही एकात्म मानव दर्शनाची अधिकाधिक विशाल होत जाणारी दालने म्हणजे जोडाक्षरे म्हटली, तर कुटुंबजीवनातील पाठ ही मूळाक्षरे होत. मूळाक्षरांचे वळण बरोबर साधले म्हणजे जोडाक्षरे जड जात नाहीत. व्यक्तिजीवनापासून प्रारंभ करून ' अहं '-कडून ' वयं '- कडे वाटचाल करीत शेवटी संपूर्ण चराचराशीही एकात्मता प्राप्त करण्याचा जो आदर्श भारतीय संस्कृतीने मानवासमोर ठेवला आहे त्याचे वर्णनही ' वसुधैव कुटुंबकम् ' याच शब्दांनी केले आहे.

• • •

६

समष्टिविचार - व्यक्ती आणि समाज

आपण येथवर मनुष्याचा व्यक्ती या नात्याने विचार केला. व्यक्तीच्या समन्वित विकासाच्या दृष्टीने चारी पुरुषार्थांचाही विचार केला. परंतु शरीर, मन, बुद्धी व आत्मा यांचा समुच्चय असलेली व्यक्ती केवळ एकवचनी 'मी'-पुरती मर्यादित नसून ती बहुवचनी 'आम्ही' शीही अपरिहार्यपणे निगडित असते. या जगात माणूस कधी एकटा राहात नाही, राहू शकत नाही. समाजापासून दूर गिरिकंदरात बसून परमेश्वर प्राप्तीसाठी तपश्चर्या करणारे काही योगीपुरुष आजही आहेत, परंतु त्यांनाही मनुष्यदेहाची प्राप्ती आणि पूर्वायुष्यात पालन–पोषण, संस्कार आदी गोष्टी समाजामुळेच प्राप्त झालेल्या असतात. व्यक्ती व समाज यांचे संबंध असे अतूट असल्याने व्यक्तीचा विचार करताना समाजाचाही विचार करणे अपरिहार्य आहे.

समाजाविषयी विचार करू लागलो म्हणजे पहिला प्रश्न असा उपस्थित होतो की, समाज – व्यक्तींचा समूह असलेला समाज – निर्माण कसा होतो ? व्यक्ती व समाज यांचे नाते काय ? यासंबंधी पाश्चात्यांची भूमिका अशी आहे की, व्यक्ती एकत्र येऊन परस्परांच्या हितसंबंधांचे रक्षण व्हावे या हेतूने समाज निर्माण करतात. याला 'सोशल काँट्रॅक्ट थिअरी' असे पाश्चात्य देशांत नाव आहे. या भूमिकेतूनच तिकडील राजकीय व सामाजिक जीवनाची जडण-घडण झाली आहे. तेथील विविध विचारप्रणालींमध्ये 'समाज' शब्दाचा उल्लेख होत असला, तरी आपापला स्वार्थ पूर्ण व्हावा या हेतूने परस्पर समजुतीने काही बंधने, काही संदेश स्वीकारून एकत्र राहाणाऱ्या व्यक्तींचा समूह म्हणजे

समाज हीच समाजाविषयी त्यांची धारणा आहे. तेथील विचारवंतांमध्ये मतभेद असतो तो एकाच मुद्याबाबत. तो मुद्दा असा की, व्यक्तींनी एकत्र येऊन समाजाची निर्मिती केली आहे, तर मग अवशेष सत्ता (Residuary Power) कोणाच्या हाती राहावी ? समाजाच्या की व्यक्तीच्या ? व्यक्तीला समाजावर काही नियंत्रणे घालण्याचा अधिकार आहे काय ? उलटपक्षी, समाज व्यक्तीवर निर्बंध घालू शकतो काय ? की या बाबतीत व्यक्ती पूर्णपणे स्वतंत्र आहे ?

समाजनिर्मितीसंबंधीच्या या धारणेतून अनेक भिन्नभिन्न आणि परस्पर-विरोधी विचारप्रणालींना जन्म देणारे अनेक प्रश्न निर्माण होतात. पहिला प्रश्न म्हणजे समाज व व्यक्ती यांमध्ये श्रेष्ठ कोण ? समाज की व्यक्ती ? काहींचे म्हणणे असे की, ज्या अर्थी व्यक्तींनी एकत्र येऊन समाज निर्माण केला आहे, त्या अर्थी ओघानेच निर्माता या नात्याने व्यक्ती समाजापेक्षा श्रेष्ठ आहे. समाजाचे अस्तित्वही तिच्या सुरळीत आणि सुखी जीवनासाठीच असते. यावर प्रतिपक्षाचे म्हणणे असे की, व्यक्तीला समाजाची निर्मिती करणे अपरिहार्य झाले, या एका गोष्टीवरूनच समाज हा व्यक्तीपेक्षा केव्हाही श्रेष्ठ आहे, हे आपोआपच सिद्ध होते. अर्थात् व्यक्ती आणि समाज यांमध्ये द्वैत आहे, एकाला दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ वा कनिष्ठ मानले पाहिजे, या मुद्यावर दोघांचे एकमत आहे.

यातून दोन विचारगट निर्माण झाले. पहिल्या गटाने व्यक्तीला सार्वभौम समजून समाजाला व्यक्तीच्या ऐहिक इच्छापूर्तीचे साधन मानले. व्यक्तीचे अनिर्बन्ध, निरपवाद स्वातंत्र्य हा त्यांच्या समाजरचनाविषयक भूमिकेचा, समाजिक आंदोलनांचा केंद्रबिंदू झाला. आता जर समाजातील दोन व्यक्तींच्या स्वातंत्र्यामध्ये, विसंवाद, विरोध वा संघर्ष उद्‌भवला तर त्या संघर्षातून मार्ग कसा काढावयाचा ? यावर या गटाच्या समर्थकांचे उत्तर असे की, यावर काही उपाय नाही. हा जीवनातील सनातन संघर्ष आहे. ज्याच्यापाशी अधिक ताकद असेल तो या संघर्षात टिकेल. जे अधिक बलवान असतील त्यांचे अस्तित्व राहावे, इतरांनी नष्टप्राय व्हावे (Survival of the Fittet) हा मुळी सृष्टीचा नियमच आहे. छोटा मासा मोठ्या माशाचे भक्ष्य बनणारच. व्यक्तिसत्तावाद असे या विचारप्रणालीचे थोडक्यात वर्णन करता येईल.

दुसऱ्या मतप्रवाहानुसार समाज हा व्यक्तीपेक्षा केव्हाही श्रेष्ठ आहे. व्यक्तिसत्तावादाशी तुलना करावयाची तर याला ' समाजसत्तावाद ' असे नाव देता येईल. समाजसत्तावादाचे प्रतिपादन असे की, व्यक्तीचे भवितव्य समाजा-

वरच अवलंबून असल्यामुळे तिचे सर्व व्यवहार समाजाला सुदृढ, बलसंपन्न बनविण्यास पोषक असले पाहिजेत. हेच समाजव्यवस्थेचे एकमेव उद्दिष्ट असले पाहिजे. असे करीत असताना व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा काही अंशी संकोच करावा लागला तरी हरकत नाही. समाज संघटित व सुखी असेल तर व्यक्ती आपोआपच चांगली व सुखी होईल. म्हणून व्यक्तीने, व्यक्ती या नात्याने स्वतःच्या भाव-भावना, आवडी-निवडी, आशा-आकांक्षा यांचा वेगळा विचार न करता केवळ समाजाच्या गरजांचा विचार करून तदनुरूप आपला आचारविचार ठेवला पाहिजे.

आज पाश्चात्य देशांत या दोन्ही विचारप्रणाली रूढ आहेत. पहिल्या श्रेणीतील लोक व्यक्तिस्वातंत्र्याच्या नावाखाली समाजहिताची उपेक्षा करतात, तर दुसऱ्या गटातील लोक समाजाला सर्वसत्ताधीश बनविण्याच्या धुंदीत व्यक्तीचे बहुरंगी व्यक्तिमत्व मारून टाकतात. भांडवलशाही समाजव्यवस्था हे पहिल्या विचारप्रणालीचे अपत्य आहे, तर समाजवादी व साम्यवादी समाजरचना ही समाजसत्तावादाची निष्पत्ती आहे.

व्यक्तीच्या वा समाजाच्या वर्चस्वाचा हा वाद खरे म्हणजे व्यक्तींनी एकत्र येऊन समाज निर्माण केला या गृहीत विचाराचीच दोन परस्परविरोधी टोके आहेत. त्यांच्या ओढाताणीत हाती लागतो फक्त तणाव. एका विचारसरणीत समाजाच्या जिवावार व्यक्ती परिपुष्ट होऊ पहाते, तर दुसऱ्या विचारप्रणालीत वस्तुतः ज्या व्यक्तीमुळे समाजाला समाज ही संज्ञा व सर्व प्रकारचे बल प्राप्त होत असते, त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्वच दडपून टाकण्यात येते. हे दोन्ही विचार एकांगी आहेत. या विचारातून समाजांतर्गत एखादा वर्ग, एखादा गट बलिष्ठ होऊ शकेल. परंतु समाजजीवनाच्या अनेक क्षेत्रांत तणाव, संघर्ष सुरू होऊन नवनव्या समस्या निर्माण होतील. समाजजीवन अस्वस्थच राहील. व्यक्तिसत्तावादातून उदयास आलेली भांडवलशाही, समाजसत्तावादातून उदयास आलेला समाजवाद व साम्यवाद यांचा अलीकडचा भीषण इतिहास पाहिला तर हा मुद्दा ध्यानात येईल.

पाश्चात्यांच्या समाजजीवनात आज जीवघेणी स्पर्धा, तणाव, रक्तरंजित संघर्ष आदी गोष्टी दिसतात, त्याचे एक प्रमुख कारण त्यांनी आधारभूत मानलेली 'सोशल कॉन्ट्रॅक्ट थिअरी' हे आहे. श्रीगुरुजींनी पुढीलप्रमाणे मोजक्याच शब्दांत या मुद्याचे विवेचन केले आहे – " व्यक्ती जर असे म्हणू

लागली की, ' शेवटी हा व्यक्ती-व्यक्तीमधील केवळ करार आहे; यामागे कोणतेही पवित्र अधिष्ठान नाही, त्यामुळे हा करार माझ्या स्वार्थाला पोषक नसेल तर तो झुगारून देण्याचे स्वातंत्र्य मला आहे, ' तर यावर समाजापाशी समाधानकारक असे काहीही उत्तर नाही. आणि ज्यांनी हा करार केला त्या व्यक्तीच तो मोडीत काढावयास निघाल्या म्हणजे एकतेचे अधिष्ठान कोलमडून पडते. ओघानेच समाज म्हणून ओळखली जाणारी वस्तू छिन्न भिन्न होऊन जाईल, नष्ट होईल. आणि समाजजीवनच उद्ध्वस्त झाले म्हणजे मग सुखासाठी चाललेल्या व्यक्तीच्या धावपळीचे फलित काय होईल याची कल्पना करण्यासाठी फार मोठ्या बुद्धिमत्तेची आवश्यकता आहे असे नाही. ''

(विचारधन : दुसरी आवृत्ती, पृष्ठ १२.१३)

एकात्म मानव दर्शनाची भूमिका अशी आहे की, समाज व्यक्तींनी निर्माण केला ही पाश्चात्यांची मूळ धारणाच चुकीची आहे. समाज हा व्यक्तींचा समूह असतो हे खरे असले, तरी व्यक्ती एकत्र जमल्या आणि त्यांनी समाज वनविला असे कोठेच आढळत नाही. समाज म्हणजे काही एखादा क्लब नव्हे, जॉइन्ट स्टॉक कंपनी नव्हे, किंवा सहकारी संस्थाही नव्हे. समाज कृत्रिम रीतीने तयार करता येत नाही. पाच-दहा लाख वा पाचपन्नास कोटी लोक एकत्र जमले, त्यांनी ' आर्टिकल ऑफ असोसिएशन ' (समाज वनविण्यासंबंधीचे निवेदन) प्रसिद्ध केले, सर्वांची सभा बोलावण्यात आली, त्याचे रजिस्ट्रेशन झाले, आणि तेव्हापासून त्या जनसमूहाला समाज म्हणून संबोधले जाऊ लागले, असे कधी कोठे होत नाही. समाज ही निसर्गतःच होणारी एक जीवमान निर्मिती असते.

समाज स्वतःच्या रक्षणासाठी, जीवनादर्शांच्या आविष्कारासाठी व विकासासाठी अनेक प्रकारच्या व्यवस्था व संस्था निर्माण करीत असतो. शिक्षणासाठी गुरुकुल-संस्था, देशाच्या अंतर्बाह्य रक्षणासाठी राज्यसंस्था, व्यक्तीच्या व समाजाच्या विकासासाठी वर्णाश्रम-व्यवस्था आदी प्राचीन भारतीय संस्थांचा या संदर्भात उल्लेख करता येईल. विधिमंडळ, नगरपालिका, सहकारी संघटना, संयुक्त राष्ट्रसंघ या आधुनिक काळातील अशाच स्वरूपाच्या काही संस्था आहेत. फार तर त्यांच्या बाबतीत सोशल कॉंट्रॅक्ट थिअरी लागू होत असेल, परंतु कोणताही समाज अशा कृत्रिम पद्धतीने निर्माण होत नसतो. समाज ही एक ' आधिजीविक सृष्टी ' (Living Organism) आहे. कृत्रिम समूह आणि आधिजीविक सृष्टी यांत मूलभूत फरक असतो. केवळ वरवर विचार करून हा

फरक ध्यानात येणार नाही. उदाहरणार्थ, मोटार धावते आणि घोडाही धावतो. परंतु दोहोंमध्ये फरक असा आहे की, मोटारगाडी ही अनेक सुटे भाग एकत्र जोडून कारखान्यात तयार होते, घोडा कारखान्यात तयार होत नाही, तो जन्माला येतो. मोटारीची धावण्याची क्षमता, वेग आदी गोष्टी बाहेरून निर्माण व नियंत्रित केलेल्या असतात, घोड्याची शक्ती ही त्याची स्वतःची आंतरिक शक्ती असते. जीवमान वस्तू व कृत्रिम वस्तू यांमध्ये हाच फरक असतो. वृक्ष जमिनीतून उगवतात, त्यांचा विकास आतून होत असतो. बाहेरून फांद्या, पाने, फुले चिकटवून झाड तयार होत नसते.

व्यक्ती एकत्र येऊन त्यांनी समाज निर्माण केला ही पाश्चात्यांची 'सोशल कॉंट्रॅक्ट थिअरी' चुकीची आहे, हे मान्य केले तरी समाजाची निर्मिती कशी होते, आणि व्यक्ती व समाज यांचे वास्तविक नाते कोणते हे प्रश्न शिल्लक राहतातच.

आपल्या दैशिक शास्त्रानुसार (देश व देशभक्ती यासंबंधीच्या शास्त्रीय विवेचनानुसार) 'समाज' ही सहज, सावयव, आधिजीविक सृष्टी आहे. कृत्रिम मानवी उपायांनी ती तयार होत नाही वा नष्टही होत नाही. ज्या कारणांमुळे व ज्या पद्धतीने सजीव सृष्टीची उत्पत्ती व लय होत असतो, त्याच कारणांनी व पद्धतीने भिन्न भिन्न समाजांचा उदयास्त होत असतो.

वरील प्रतिपादनाचा थोडक्यात आशय असा की, समाज म्हणजे अनेक व्यक्तींनी एकत्र येऊन उभी केलेली एखादी संस्था नसून कोणत्याही सजीव प्राण्याप्रमाणे समाजही जन्माला येतो. त्यामुळे शरीर व शरीराचे अवयव यांचा जो परस्पर संबंध असतो किंवा वृक्ष व त्याची शाखा-पाने-फुले यांचा जो अन्योन्य संबंध असतो तोच संबंध समाज व व्यक्ती यांचा असतो. समाज व व्यक्ती यांचे नाते हे असे 'अवयव-अवयवी' स्वरूपाचे असल्यामुळे समाज मोठा की, व्यक्ती मोठी, हा प्रश्नच मुळात निरर्थक आहे.

व्यक्ती व समाज यांच्या या संबंधाचा अनुभव आपल्याला जीवनात अनेक प्रकारांनी येत असतो. मनुष्य जन्मतःच काही गोष्टी स्वतःबरोबर घेऊन येतो. उदा., त्याचे आई-बाप. जन्माला येणाऱ्या जीवाला आपल्या आईवडिलांची निवड करण्याचे स्वातंत्र्य नाही. त्याचा प्रत्यक्ष जन्म होण्यापूर्वीच त्याचे आई-वडील ठरलेले असतात. जन्मानंतर व्यक्तीचा नामकरणविधी होतो. व्यक्तीचे हे नाव देखील तिचे ज्या विशिष्ट समाजाशी नाते असते त्यावरूनच बहुधा

ठरत असते. उदा., एखाद्याचे नाव ज्ञानदेव असेल, तर हेच नाव का ठेवण्यात आले ? कोणी म्हणेल की, त्याच्या आई-बापांनी ठेवले म्हणून ! परंतु आई-वडिलांनी तरी हेच नाव का निवडले ? डेव्हीड का नाही ? दाऊद का नाही ? रशियन, चिनी, वा जपानी नाव का ठेवावेसे वाटले नाही ? याचे उत्तर स्पष्ट आहे की, ज्या समाजाची ती व्यक्ती घटक आहे, तद्नुरूप तिचे नाव ठेवले गेले. पुढे व्यक्तीला बोलता येऊ लागले. तिची ती भाषाही तिला समाजापासूनच मिळाली. आधी समाजाने जन्मदात्री माता दिली. नंतर मातृभाषा दिली. पुढे समाजानेच शिक्षण दिले. सत्संस्कार दिले. योगक्षेमाचे साधन तर समाजच पुरवितो. परंतु अन्न, वस्त्र यांसारख्या जीवनावश्यक वस्तू, सुखोपभोग आणि मनोरंजनाची विविध साधने, बुद्धीचा तसेच मनाचा विकास करणारी नानाविध क्षेत्रे समाजच पुरवीत असतो. सुखदुःखाच्या प्रसंगी समाजाचे आपल्या जीवनातील महत्त्व आणि स्थान विशेषत्वाने जाणवते. घरात लग्न, मुंज वा सणवार यांसारखे आनंदाचे प्रसंग असले, म्हणजे असे स्वाभाविकपणे वाटते की, चार लोकांना बोलावून आनंद द्विगुणीत करावा. अपेक्षित मंडळी येऊन गेली म्हणजे कृतकृत्य वाटते. त्यांपैकी काही आली नाहीत तर काहीतरी कमी पडल्याची चुटपुट लागते. असे नाही मनात येत की बरे झाले चार लोक कमी आले; तेवढीच खाद्यपेय पदार्थांची बचत झाली ! आपत्तीच्या प्रसंगी तर समाजाची गरज विशेष जाणवते. काही नाही तर निदान सांत्वनपर दोन शब्द कोणी बोलले तरी तेवढ्याने मन हलके होते. एखादे चांगले काम केल्यावर समाजातील चार लोकांनी त्याचे कौतुक केले तर बरे वाटते.

व्यक्तीच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांचा आविष्कार आणि विकास समाजामुळेच होत असतो. विविध विद्या आणि कला यांचे धडे व्यक्तीला गुरुजनांकडून म्हणजे समाजाकडून मिळत असतात, आणि त्या त्या क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व्यक्तीचे कौतुक करून प्रोत्साहनही समाजच देत असतो. विद्यार्थ्यांवाचून शिक्षक, श्रोत्यांवाचून वक्ता, प्रेक्षकांशिवाय नट किंवा अनुयायांशिवाय पुढारी ही नुसती कल्पनादेखील आपल्याला किती चमत्कारिक वाटते ! फार कशाला अन्न, वस्त्र, निवारा, औषधोपचार यांसारख्या जीवनाच्या प्राथमिक गरजाही समाजच भागवीत असतो. व्यक्ती स्वतःचे कर्तृत्व व गुण यांच्या बळावर समाजाच्या फार तर चार-दोन गरजा पूर्ण करीत असेल; परंतु समाज व्यक्तीच्या त्याहून कितीतरी पटींनी अधिक गरजा भागवीत असतो.

अपंग व आजारी व्यक्ती, लहान मुले, वृद्ध यांची चिंता आणि पालनपोषणही समाजच करीत असतो.

व्यक्ती आणि समाज यांच्या संबंधाचा आणखी एक पैलूही ध्यानात घेण्यासारखा आहे. आपल्या देशाच्या संदर्भात बोलायचे तर राम, कृष्ण, भीष्म, बुद्ध, भीम, गुरु गोविंदसिंग असे कितीतरी थोर पुरुष आणि सावित्री, लक्ष्मीबाई, पन्नादाई अशा अनेक महान् स्त्रिया येथे होऊन गेल्या. स्थलकालाच्या दृष्टीने त्यांच्यांत व आपल्यांत खूपच अंतर असते. परंतु बंधुप्रेमाचा आदर्श राम-लक्ष्मणाचा, प्रतिज्ञा भीष्माची, पराक्रम भीमाचा, औदार्य कर्णाचे, बलिदान गुरु गोविंदसिंगाचे किंवा हकीकतरायाचे, शौर्य राणी लक्ष्मीबाईचे, त्याग पन्नादाईचा, पातिव्रत्य सती सावित्रीचे हे आदर्श आजही आपण आपल्या मुलाबाळांसमोर ठेवीत असतो. हजारो मैलांचे आणि सहस्रावधी वर्षांचे अंतर तोडून हे आदर्शांचे पाठ आपल्या पिढीपर्यंत पोहोचविण्याची ही किमया कोणी केली ? ही अद्‌भुत किमया समाजाची आहे. प्रत्येक पिढीला या श्रेष्ठ आदर्शांनी संस्कारित करून त्या परंपरेचा वारसा पुढील पिढीच्या हाती सोपविण्याचे काम समाजच करीत असतो. श्रेष्ठ आदर्शांच्या अशा अखंड संस्कारपरंपरेतूनच समाज जिवंत आणि एकात्म राहून पुढे प्रगती करीत असतो.

व्यक्ती आणि समाज यांचा हा परस्पर संबंध स्पष्ट करताना दीनदयाळजी म्हणतात– "आपण आपल्या व्यक्तिगत हिताहिताचा विचार करीत असतानाच, समाजाच्याही हिताहिताचा विचार करणे हीच उचित अवस्था होय. व्यक्तीचे हित व समाजाचे हित या दोहोंमध्ये विरोध नाही, संघर्ष नाही. लोक आम्हाला विचारतात की, तुम्ही व्यक्तिवादी आहात की, समाजवादी ? तेव्हा आमचे उत्तर असे की, आम्ही व्यक्तिवादी आहोत आणि समाजवादीही आहोत. भारतीय विचारप्रणालीला अनुसरून आम्ही व्यक्तीची उपेक्षा करीत नाही, आणि समाजहिताचाही विचार दृष्टिआड होऊ देत नाही. आम्ही समाजाच्या हिताचा विचार करतो म्हणून आम्ही समाजवादी आहोत, परंतु त्याच बरोबर आम्ही व्यक्तीचीही उपेक्षा करत नाही म्हणूनच आम्ही व्यक्तिवादीही आहोत. परंतु आम्ही व्यक्तीला सर्वेसर्वा मानीत नाही, त्यामुळेच आम्ही म्हणतो की, आम्ही व्यक्तिवादी नाही. परंतु समाजाला व्यक्तीचे सर्व प्रकारचे स्वातंत्र्य अपहृत करण्याचा अधिकार आहे, तिला एखाद्या विशिष्ट चौकटीत बंदिस्त करून तिला निर्जीव यंत्राप्रमाणे राबवून घेण्याचा अधिकार आहे, असेही आम्ही

मानीत नाही. म्हणून आम्ही समाजवादीही नाही. आम्ही असे मानतो की, व्यक्तिशिवाय समष्टीची कल्पनाही करता येणार नाही ; आणि समष्टिशिवाय व्यक्तीचे मूल्य शून्य आहे. भारतीय संस्कृतीने व्यक्ती व समाज या दोहोंचे समन्वित कल्याण साधण्याच्या दृष्टीने विचार केला आहे. ''

• • •

७

समष्टीचे पुरुषार्थ

व्यक्तीप्रमाणेच समाज हाही एक जीवमान घटक आहे, असे म्हटल्यावर स्वाभाविकपणेच असा प्रश्न उपस्थित होतो की, त्यालाही शरीर, मन, बुद्धी व आत्मा असतात काय ? समाज ही जर काही लोकांनी करार करून उभी केलेली कृत्रिम वस्तू नसेल, ती एक सजीव सत्ता असेल, तर मग एखाद्या जीवमान घटकाप्रमाणे समाजालाही शरीर, मन, बुद्धी, व आत्मा असले पाहिजेत हे ओघानेच आले. पंडित दीनदयाळजींनी दैनंदिन जीवनातील एक परिचित उदाहरण देऊन या मुद्याचे विवेचन केले आहे. ते म्हणतात – " समूहालाही शरीर, मन, बुद्धी, आत्मा या गोष्टी असतात. उदाहरणार्थ – चाळीस लोकांचा एक क्लब आहे. हे चाळीस लोक मिळून त्या क्लबचे शरीर तयार होते. आपल्याला एकत्र येऊन, एकत्र राहून क्लब बनवावयाचा आहे, ही इच्छा वा संकल्प हे त्या क्लबचे मन होय. ही इच्छा नसेल तर क्लब जन्मालाच येणार नाही ; ही इच्छा संपली की, क्लबही बरखास्त होईल. ही इच्छा मूर्त स्वरूपात येऊन क्लबचा कारभार सुरळीत चालावा यासाठी काही व्यवस्था लागतात. सभासदत्व, पदाधिकाऱ्यांच्या निवडणुका, वर्गणी आदीसंबंधी बुद्धिपूर्वक काही नियम बनवावे लागतात. या नियमांमुळे क्लबचा कारभार सुरळीत चालू शकतो. परंतु क्लब बनविण्याची इच्छा सर्वांच्या मनात असणे आणि त्यासाठी विचार-पूर्वक काही नियम बनविणे एवढेच पुरेसे नाही. क्लबचा काही उद्देशही असतो. तो उद्देश निव्वळ मनोरंजनाचा असेल, मनोरंजनाबरोबरच सेवेचा असेल, वा अन्य कोणता असेल, क्लबचा कारभार शेवटी हे उद्दिष्ट, हे ध्येय डोळ्यासमोर ठेवूनच चालत असतो. हे उद्दिष्ट, लक्ष्य म्हणजेच त्या क्लबचा आत्मा होय."

केवळ मनोरंजनाचे वा तत्सम मर्यादित उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून चालणाऱ्या क्लबसारख्या छोट्याशा संस्थेला देखील शरीर, मन, बुद्धी व आत्मा असतात, तर मग पिढ्यान्‌पिढ्या एकत्र नांदणाऱ्या एकसंध, एकरस समाजाच्या बाबतीत – राष्ट्रजीवनाच्या बाबतीत – तर या गोष्टी कितीतरी अधिक प्रबळ आणि उत्कट स्वरूपात अस्तित्वात असल्याच पाहिजेत.

पहिली गोष्ट म्हणजे राष्ट्राचे शरीर. त्या राष्ट्राची भूमी आणि त्या भूमीत पिढ्यान्‌पिढ्या पुत्ररूपाने नांदत असलेला जनसमूह हे त्या राष्ट्राचे शरीर होय. आपल्या येथील प्राचीन परिभाषेत याला 'देश' अशी संज्ञा आहे. या जनसमूहाची इच्छा म्हणजे सामूहिक जीवनाचा संकल्प हे त्या राष्ट्राचे मन होय. तिसरी गोष्ट म्हणजे या समाजाचे, राष्ट्राचे जीवन नीट चालावे यासाठी, म्हणजेच त्याची धारणा करण्यासाठी काही नियम असतात, काही व्यवस्था असतात, या नियम-व्यवस्था म्हणजे त्या राष्ट्राचा समष्टिधर्म आणि चौथी गोष्ट म्हणजे त्या राष्ट्राचे जीवनध्येय वा जीवनहेतू, हा त्या राष्ट्राचा आत्मा होय. या चारांच्या रसायनातून राष्ट्र उभे राहाते. थोडक्यात असे म्हणता येईल की, ज्याप्रमाणे शरीर, मन, बुद्धी, व आत्मा मिळून समग्र व्यक्ती बनते त्याचप्रमाणे देश (भूमी, जन), सामूहिक संकल्प, धर्म व जीवनध्येय मिळून राष्ट्र तयार होते.

व्यक्तीप्रमाणेच समाजालाही शरीर, मन, बुद्धी असतात. एवढेच नव्हे तर, समाजाचे म्हणून एक स्वतंत्र व्यक्तिमत्वही असते. दीनदयाळजी म्हणतात – व्यक्तींची शक्ती, बुद्धी, भावना, यांची बेरीज म्हणजे समाजाची शक्ती, बुद्धी, मन, असे नव्हे. समाजाची बुद्धी, भावना, क्रियाशक्ती या सर्व मुळातच वेगळ्या असतात. त्यामुळे कधीकधी असे अनुभवास येते की, एखादी व्यक्ती व्यक्तिशः दुर्बल असूनही समाज या नात्याने खूप पराक्रमी निघते. व्यक्ती म्हणून ज्या गोष्टी सहन केल्या जातात, त्या गोष्टी समाज म्हणून सहन केल्या जात नाहीत. उदाहरणार्थ, तुम्ही एखाद्या व्यक्तीला चार शिव्या दिल्या तर कदाचित् ती व्यक्ती स्वतःच्या मानापमानाची फारशी फिकीर करणार नाही, परंतु समाजाच्या नावे कोणी अपशब्द बोलले तर ती व्यक्ती खवळून उठेल. तसेच व्यक्ती म्हणून एखादी व्यक्ती चांगली असू शकेल, पण समाज या नात्याने वाईट असू शकेल. याउलट समाज म्हणून कोणी व्यक्ती चांगली असेल, परंतु एक व्यक्ती म्हणून वाईट असू शकेल.

एकदा श्री. विनोबाजी भावे यांच्या बरोबर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक श्रीगुरुजी यांची चर्चा चालू असताना असा एक प्रश्न निघाला की, हिंदूंची विचार करण्याची पद्धत व मुसलमानांची विचार करण्याची पद्धत यांत फरक कोठे असतो ? गुरुजींनी विनोबांना म्हटले, की, " चांगली–वाईट माणसे दोन्ही ठिकाणी आढळतात. हिंदु व मुसलमान दोहोंमध्येही चांगली, इमानदार, दुसऱ्याची सेवा करणारी माणसे असतात, त्याचप्रमाणे गुंड माणसेही दोन्ही समाजांत आढळतात. त्यामुळे चांगली व वाईट माणसे ही एखाद्या विशिष्ट समाजाची मिरासदारी आहे असे म्हणता येणार नाही. परंतु असे दिसते की, व्यक्ती या नात्याचे गुंड, बदमाश असलेली हिंदू माणसे जेव्हा समूहाच्या रूपात एकत्र येतात तेव्हा ते चांगल्या गोष्टींचाच विचार करतात. त्या वेळी त्यांच्या मनात कसले पाप येत नाही. परंतु याउलट जेव्हा दहा मुसलमान एकत्र येतात, तेव्हा ज्या गोष्टी व्यक्ती या नात्याने मुसलमान व्यक्तीनेही चांगल्या मानलेल्या नाहीत, अशा गोष्टी समूहात जमलेले मुसलमान चांगल्या म्हणतात. अशा प्रसंगी त्यांची विचार करण्याची पद्धत काही वेगळीच असते, असा अनुभव आहे." विनोबाजींनी ही वस्तुस्थिती मान्य केली. परंतु याचे कारण काय हे मात्र त्यांनी सांगितले नाही.

व्यक्तीप्रमाणेच समाजालाही एक वेगळे शरीर, मन, बुद्धी व आत्मा असतात. हे म्हणणे आता काही पाश्चात्य मनोवैज्ञानिकांनाही पटू लागले आहे. मॅगडुगलने 'समूह-मन' यासंबंधी जे विचार मांडले आहेत त्यांत त्याने समाज हा 'ऑर्गॅनिझम ऑफ ऑर्गॅनिझम्स्' असल्याचे म्हटले आहे. अर्थात् हे समाजाचे मन तयार होण्यास बराच कालावधी लागतो. एखाद्या लोकसमूहाचे बऱ्याच काळापासून एकत्र रहाणे, समान परंपरा, समान हितसंबंध, समान जीवनमूल्ये, समान जीवनोद्दिष्ट या सर्वांमधून त्या लोकसमूहाची समाज म्हणून घडण होत असते, आणि समाज-मन तयार होत असते.

व्यक्तीप्रमाणे समाजालाही शरीर, मन, बुद्धी व आत्मा असल्याने ज्याप्रमाणे व्यक्तीच्या समग्र व संतुलित विकासासाठी धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चारही पुरुषार्थांचा विचार करणे आवश्यक असते, त्याचप्रमाणे समष्टीच्या, राष्ट्राच्या संदर्भातही त्यांचा विचार आवश्यक आहे.

समाज हा शेवटी अनेक व्यक्तींचा समुच्चय असल्याने 'धृतिः क्षमा दमोऽस्तेयम्' इत्यादी सामान्य धर्मलक्षणे आणि व्यक्तीच्या धर्मपुरुषार्थाचे सांगितलेले

विधिनिषेध यांचा समष्टिधर्मात अंतःर्भाव होतोच. व्यक्तींनी या गोष्टींना सोडचिठ्ठी दिली तर व्यक्तीची धारणा व विकास होऊ शकणार नाही, आणि समाज व्यक्तींचाच बनलेला असल्याने या गोष्टींचा परिणाम समष्टिजीवनावरही होणारच.

समष्टीचा धर्म

परंतु समष्टिधर्माच्या संदर्भात प्रामुख्याने विचार करावयाचा आहे तो 'धर्मो धारयति प्रजाः' या सूत्रातील धर्माचा. ज्या सहज प्रवृत्तीमुळे, संकेतामुळे वा समजूतदारपणामुळे, नियम-उपनियमांमुळे आणि व्यवस्थांमुळे व्यक्ती-व्यक्तीमध्ये, व्यक्तिसमूहांमध्ये, राष्ट्राराष्ट्रांमध्ये परस्पर सामंजस्य राहून त्यांचे जीवन सुव्यवस्थित चालते, त्या सर्व गोष्टींचा समष्टिधर्मात अंतर्भाव होतो. समाजात विविध प्रकारच्या, विविध प्रकृतींच्या, विकासाच्या दृष्टीने वेगवेगळ्या स्तरांवर असणाऱ्या, भिन्न भिन्न प्रकारची कामे करणाऱ्या व्यक्ती आणि व्यक्तिसमूह असतात. समाजाच्या धारणेसाठी त्या सर्वांमध्ये सहकार्य व सामंजस्य आवश्यक असते. हे काम धर्म करीत असतो. धर्माची ही धारणाशक्ती केवढी प्रचंड होती, याचे वर्णन महाभारतात अ-राज्य कल्पना स्पष्ट करताना पुढीलप्रमाणे केले आहे –

न राज्यं न राजाऽऽसीत्
न दण्डो नच दाण्डिकः।
धर्मेणैव प्रजाः सर्वाः
रक्षन्ति स्म परस्परम्॥

धर्माच्या या धारणाशक्तीचा अनुभव दैनंदिन जीवनात आपल्याला पदोपदी येत असतो. अगदी कुटुंबाचेच उदाहरण घ्याना. कुटुंबात निरनिराळ्या प्रकृतीची, वयाची माणसे असतात. परंतु सर्व व्यवहार परस्पर सामंजस्याने, सहकार्याने चालत असतो. या व्यवहाराची एखादी लिखित नियमावली नसते. तरी सर्व व्यवहार शक्यतो गुण्यागोविंदाने चालू असतात. कुटुंबाला समाधान आणि स्वास्थ्य लाभते.

कुटुंबाप्रमाणेच समष्टिजीवनातही अनेक कामे अशी असतात की, जी एकटा मनुष्य करूच शकत नाही, अनेक लोक मिळूनच ती होऊ शकतात. उदा., परचक्रापासून स्वदेशाचे रक्षण करण्याचे काम. हे काम एकटी व्यक्ती – ती

कितीही मोठी असली तरी – करू शकत नाही. युद्धाचे संचालन करणारे सेनाधिकारी, रणांगणावर प्रत्यक्ष काम करणारे सैनिक, सत्तारूढ शासनकर्ते, युद्ध-साहित्याचे उत्पादन करणारे तंत्रज्ञ व कर्मचारी आणि नानाप्रकारची लहानमोठी असंख्य कामे करणारे, अशा सगळ्यांचे सहकार्य या कामी लागते. राष्ट्राची भौतिक समृद्धी वाढविणे हेही एकट्यादुकट्याचे काम नाही. असंख्य हात त्यासाठी राबावे लागतात.

जीवनाच्या अत्यावश्यक प्राथमिक गरजांचा विचार करू लागलो तर तेथेही असेच दिसते की, स्वतःला लागणाऱ्या सर्व गोष्टी कोणीही मनुष्य स्वतः निर्माण करू शकत नाही. शेतकरी धान्योत्पादन करतो, परंतु त्याच्या कपड्याची गरज विणकर भागवीत असतो. शेतीला आणि विणकामाला लागणाऱ्या अवजारांसाठी दोघांनाही तिसऱ्या कोणावर तरी अवलंबून राहावे लागते. गवंडी व सुतार शाळेची वास्तू तयार करतात, परंतु या दोघांच्याही पाल्यांना शिक्षण व संस्कार देण्याचे काम शिक्षकरूपाने तिसराच कोणीतरी करीत असतो. अशा देवाणघेवाणीतूनच व्यक्तीच्या व समाजाच्या विविध गरजा पूर्ण होत असतात. खरे म्हणजे आपले संपूर्ण जीवन अशा सहकार्याच्या, देवाणघेवाणीच्या आधारेच चालत असते. ही माणसाची प्रकृतीच आहे. माणसामाणसांमधील परस्पर सहकार्याची ही भावना वृद्धिंगत व्हावी, तिच्यामध्ये काही विकृती निर्माण होऊ नये, यासाठी काही नियम बनविणे, काही व्यवस्था उभ्या करणे, काही संस्कार करणे आवश्यक असते. समष्टिधर्मात या सर्व गोष्टींचा समावेश आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की, ज्यामुळे व्यक्तीची व समाजाची धारणा होते, ज्यामुळे माणसाला योगक्षेम म्हणजे उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध होते, परंतु त्या व्यवसायाचे वा कर्माचे स्वरूप निव्वळ उदरभरणाचे साधन असे न राहता त्याला कर्तव्याची संज्ञा प्राप्त होते, ज्यामुळे व्यक्ती स्वतःची उन्नती करीत असताना समाजाच्या उन्नतीला सहाय्यभूत होऊ शकते अशा सर्व नियम, व्यवस्था, संस्कार आणि त्यामागे असलेला भाव म्हणजे समष्टीची धारणा करणारा धर्म होय.

राष्ट्रासंबंधी विचार करताना आपण पाहिले की, कोणताही राष्ट्रीय समाज दोन प्रमुख स्नेहबंधांनी बांधलेला असतो. एक म्हणजे तो समाज ज्या भूमीवर राहात आलेला असतो त्या भूमीविषयीची अनन्य भक्ती. भाषा, रहाणी, वेशभूषा, पंथ-संप्रदाय आदी गोष्टींमध्ये विविधता असूनही, मातृभूमीविषयीची

उत्कट भक्ती हा त्या समाजघटकांना जोडणारा महत्त्वाचा दुवा असतो. समाजातील घटकांना परस्परांशी जोडणारा आणखीही एक दुवा असतो. समान इतिहास, समान संस्कृती, समान परंपरा, समान जीवनादर्श आदी गोष्टींच्या रसायनातून हा दुवा तयार झालेला असतो. 'धर्मो धारयति प्रजाः' या सूत्रातील धर्म शब्दाला 'राष्ट्र' कल्पनेच्या संदर्भात असा दुहेरी आशय आहे. तेव्हा धर्म-पुरुषार्थाच्या उपासनेचा या समष्टीच्या संदर्भातील अर्थ मग या दोन्ही दुव्यांची प्राणपणाने जपणूक करणे, त्याबाबत यत्किंचितही तडजोड न करणे, त्यात शिथिलता येऊ न देणे, त्याला बाधक जे जे काही अस्तित्वात असेल वा निर्माण होऊ पहात असेल त्याचे निर्मूलन करणे, आणि जे जे म्हणून पोषक असेल त्याचे आस्थेने संवर्धन करणे असा होईल. आपल्या राष्ट्रजीवनाच्या संदर्भात या पुरुषार्थाचे स्वरूप व दिशा 'अखंड भारत', 'हिंदू राष्ट' यांसारख्या शब्दांनी व्यक्त करता येईल. या शब्दांनी व्यक्त होणाऱ्या भावभावनेला केवळ व्यवहारातच नव्हे तर तत्त्वतः देखील कोठे धक्का लागत असेल तर समष्टिधर्माला तेवढ्या प्रमाणात क्षती पोहोचेल. विषय स्पष्ट होण्याच्या दृष्टीने आपल्या घटनेचे उदाहरण पहाण्याजोगे आहे. आपल्या घटनेचे पहिलेच कलम 'इंडिया' अर्थात् भारत हा राज्यांचा संघ असेल असे आहे. म्हणजे भारत हा निरनिराळी स्वतंत्र राज्ये एकत्र करून तयार झालेला संघ अशी परिभाषा आहे. वस्तुतः संपूर्ण भारत देश एक आहे. एकात्म आहे, आणि केवळ राज्यकारभाराच्या सोयीसाठी लहानमोठी राज्ये बनविण्यात आली आहेत. ही एकात्मतेची भावना सहस्रावधी वर्षांपासून येथील समाजाने जोपासली आहे; आणि इतिहासकाळात परकीयांची अनेक आक्रमणे व बाह्य जीवनात विविध प्रकारची स्थित्यंतरे होऊनही ती आंतरिक एकात्मता शाबूत राहिली आहे. परंतु घटनाकारांनी मात्र ती एकात्मता दुर्लक्षून भारताला संघराज्य बनवून टाकले. व्यक्तींनी एकत्र येऊन समाज निर्माण केला अशी जी 'सोशल काँट्रॅक्ट थिअरी' आहे, तिच्याशी 'भारत हा राज्यांचा संघ असेल' या कल्पनेचा चेहरा पूर्णतया जुळणारा आहे. समाजाच्या निर्मितीसंबंधीची सोशल काँट्रॅक्ट थिअरी कशी चुकीची आहे, आणि चुकीच्या धारणेतून केवढी अनर्थमालिका ओढवते याचा ऊहापोह यापूर्वी केलेला आहे. संघराज्याच्या कल्पनेतून स्पर्धेची आणि संघर्षाची अशी विषारी फळे निर्माण होणे असंभव नाही, शासनसंस्था ही राष्ट्रजीवनातील अनेक संस्थांपैकी एक संस्था आहे, आणि 'भारत हे संघराज्य असेल' हे विधान मूलतः राज्यव्यवस्थेच्या संदर्भात आहे, राष्ट्राच्या संदर्भात नव्हे,

असा युक्तिवाद यावर करता येईल, तात्त्विक दृष्टचा तो बरोबरही असेल; परंतु प्रत्यक्ष व्यवहारात आज शासनसंस्था एवढी प्रभावी आणि सर्वंकष झाली आहे की, या संघराज्य-कल्पनेमुळे येथील एकात्म राष्ट्रजीवन खिळखिळे झाल्याशिवाय राहाणार नाही. निरनिराळचा राज्यांकडून अधिकाधिक स्वायत्ततेसाठी होत असलेली मागणी, त्यासाठी अधूनमधून होणारी आंदोलने, आणि काही प्रसंगी या आंदोलनांना येत असलेले 'केन्द्र विरुद्ध राज्य' अशा लढचाचे स्वरूप यावरूनच हा धोका आता प्रत्यक्ष जाणवूही लागला आहे.

अर्थात् घटनाकारांनी घटनेची इमारत 'संघराज्या'च्या पायावर उभी केली असली तरी या गोष्टीतील धोका ज्यांना कळतो, जाणवतो असे समाज-धुरीण समष्टिधर्माला, एकात्म राष्ट्रजीवनाला बाधक ठरणाऱ्या या गोष्टी निपटून काढण्यासाठी पुढे सरसावतात, आणि समाजही त्यांच्या हाकेला समरसून प्रतिसाद देतो. "एक देशमें दो विधान, दो निशान, दो प्रधान नहीं चलेंगे" ही घोषणा घेऊन, जम्मू-काश्मीर राज्याचे घटनेतील वेगळेपण रद्द करण्यासाठी झालेले आंदोलन आणि डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींनी त्या आंदोलनात केलेले आत्म-बलिदान, "अखंड भारत हा आमच्या संपूर्ण जीवनाचा मूलाधार आहे. भारत व पाकिस्तान यांचे वेगळे अस्तित्व नाहीसे करून त्यांना एकत्र आणण्यात येईल." हे भूतपूर्व जनसंघाने स्वतःसमोर ठेवलेले ध्येय, दादरा-नगरहवेली-मुक्तिसंग्राम, भागानगर-सत्याग्रह, गोवा-मुक्ती-आंदोलन, कच्छकरार-विरोधी ऐतिहासिक मोर्चा आणि 'आसाम बचाओ'चा प्रदीर्घ लढा आदी घटना म्हणजे या देशाचा समष्टिधर्म अजून शाबूत असल्याच्या गमक होत.

अर्थात् समष्टिधर्माचे रक्षण, पालन आणि संवर्धन केवळ आपत्तीच्या प्रसंगी अथवा मातृभूमीच्या स्वातंत्र्य-संग्रामप्रसंगी करावयाचे असते, असे मात्र नाही. या धर्माची उपासना आणि जोपासना नित्य, सर्वांनी आणि सर्वांगांनी करावयाची असते. रामायण, महाभारतादी ग्रंथांचे पठण-मनन, अवतारी व थोर पुरुषांचे जयंति–पुण्यतिथी उत्सव, संक्रांत, दसरा, दिवाळी, होळी, रक्षाबंधन यांसारखे सामूहिक सांस्कृतिक सण, यात्रांमध्ये देशाच्या चारी दिशांना असलेल्या तीर्थस्थानांच्या यात्रेला देण्यात आलेले विशेष महत्त्व, ज्ञानप्रसाराच्या कीर्तन-प्रवचनादी संस्था, अशा अनेकविध मार्गांनी समष्टिधर्माच्या रक्षणाची आणि संवर्धनाची व्यवस्था भारतीय संस्कृतीने केली आहे.

जेव्हा समाजाला एकत्र बांधणाऱ्या जुन्या व्यवस्था कोलमडून पडतात,

शिथिल होतात वा कालबाह्य होतात, तेव्हा समाजाला एकसूत्री राखण्यासाठी कालानुरूप नव्या व्यवस्था उभ्या करणे समाजधारणेच्या दृष्टीने अपरिहार्य होते. समाजाचा आत्मा शाबूत असला म्हणजे अशा व्यवस्था उभ्या करणारे थोर पुरुष समाजात वेळोवेळी निर्माण होत असतात. आपल्या देशात तर धर्माचे सनातन सूत्र न सोडता कालानुरूप नव्या व्यवस्था उभ्या करणाऱ्या महापुरुषांची परंपराच चालत आलेली आहे. समाजाची धारणा करणारे भाव-बंध जेव्हा शिथिल होतात, म्हणजेच जेव्हा धर्माला ग्लानी येते, तेव्हा राष्ट्राच्या चितीने म्हणजेच विशुद्ध चैतन्यशक्तीने प्रेरित झालेले युगपुरुष अवतीर्ण होतात, आणि त्या चितीच्या प्रकाशात धर्माचे ते बंध पुनः सुदृढ करतात. त्या महा-पुरुषांच्या शब्दांमध्ये संजीवनी मंत्राचे सामर्थ्य असते. त्यांच्या शब्दांना धर्म-वचनांचे स्थान, आणि माहात्म्य प्राप्त होते. 'वंदे मातरम्', 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे', किंवा, 'वयं हिन्दुराष्ट्रांगभूताः' यांसारखी वचने ही खरे म्हणजे आजच्या युगातील धर्मवचनेच होत. जेव्हा आपले राष्ट्र या समष्टि-धर्माच्या व्यापक अधिष्ठानावर उभे राहून वाटचाल करील तेव्हाच ते अर्थ आणि काम या पुरुषार्थांची सम्यक् उपासना करून आपले नियत जागतिक कार्य समर्थपणे आणि नीटपणे पार पाडू शकेल.

समष्टीचा अर्थ

व्यक्तीप्रमाणेच समाजालाही अर्थ-पुरुषार्थाची गरज असते. पुरेशा प्रमाणात अर्थोत्पादन नसेल तर समाजाचा योगक्षेम सुरळीत चालणार नाही.

अर्थाच्या अभावा-प्रभावामुळे व्यक्तिधर्माला कसे ग्रहण लागते याचे विवेचन यापूर्वी येऊन गेले आहे. अर्थाचा अभाव-प्रभाव समष्टिगत होतो तेव्हा समष्टिसमोरही असंख्य समस्या उभ्या राहतात. आर्थिक दृष्टचा अभावग्रस्त असलेल्या देशांना संरक्षण व अन्न, वस्त्र यांसारख्या मूलभूत गरजांसाठीही परक्या देशांवर अवलंबून राहावे लागते. अशा परावलंबी देशाला धनको देशाच्या ताटाखालच्या मांजराचे स्थान प्राप्त होते. कोणत्याही जागतिक प्रश्नावर निःपक्षपणे आणि ठामपणे सत्य ते सांगण्याचे मनोधैर्य त्या देशापाशी राहात नाही; त्या सत्याचा पाठपुरावा करून ते प्रस्थापित करणे, इतरांना ते मानावयास लावणे तर दूरच राहिले.

अर्थाच्या अभावाप्रमाणेच अर्थाचा प्रभाव समष्टिगत झाल्यानेही नाना प्रकारच्या समस्या निर्माण होतात. अर्थाचा प्रभाव म्हणजे अर्थाचे केवळ वैपुल्य

नव्हे. जेव्हा केवळ पैसा हाच व्यक्तीच्या सामाजिक प्रतिष्ठेचा विषय बनतो तेव्हा ते अर्थाचा प्रभाव निर्माण झाल्याचे लक्षण असते. 'सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ते' ही उक्ती प्रत्ययास येऊ लागते. मान, सन्मान, अधिकारपदे, सामाजिक प्रतिष्ठा आदी गोष्टी गुणी वा पात्र व्यक्तींना प्राप्त न होता ज्यांच्यापाशी विपुल पैसा आहे त्यांनाच प्राप्त होतात. असे झाले म्हणजे मग बहुतेक लोक पैशाच्याच मागे लागतात. बरेवाईट, खरेखोटे, पापपुण्य यासंबंधीचा विवेक नाहीसा होतो. कोणत्याही मार्गाने पैसा मिळवावयाचा, त्या पैशाच्या बळावर समाजजीवनातील अधिकाधिक अधिकाराची, प्रतिष्ठेची, आर्थिक लाभाची पदे काबीज करावयाची, विलासात डुंबायचे, त्या स्थानाचा व अधिकाराचा फायदा घेऊन आपल्या नातवंडा–पणतवंडांना पुरून उरेल एवढी संपत्ती गाठी बांधावयाची असे दुष्टचक्र यातून सुरू होते.

अशा समाजजीवतात हळूहळू कोणत्याही वस्तू वा व्यक्ती पैशाच्या बळावर विकत घेता येते, ही भावना व प्रवृत्ती बळावू लागते; दृढमूल होत जाते. बुद्धिमंतांची बुद्धीही स्वतंत्र न राहता सत्ता, संपत्ती व उपभोग यांची बटीक बनते. विद्वान्, आमदार, खासदार, सरकारी अधिकारी, न्यायमूर्ती, मंत्री आणि मंत्रिमंडळेही सौदेबाजीचे विषय बनतात. पूर्वीच्या एका आर्येत 'न दिसे एकहि वस्तू विद्येनेही असाध्य आहे जी' अशा शब्दांत विद्येची महती वर्णन केलेली आहे. जेव्हा समाजात अर्थाचा अत्यधिक प्रभाव निर्माण होतो तेव्हा वरील आर्येतील विद्येचे स्थान अर्थाने घेतलेले असते.

पुरुषार्थांचा व्यक्तीच्या संदर्भात विचार करताना आपण पाहिले की, चतुर्विध पुरुषार्थांपैकी अर्थ हा एक महत्त्वाचा पुरुषार्थ असला तरी, निव्वळ अर्थोपार्जन हे व्यक्तिजीवनाचे साध्य नव्हे. ते केवळ एक साधन आहे. हा साध्यसाधन विवेक सुटला तर व्यक्तीचे अधःपतन होते. समष्टीच्या बाबतीतही हे सत्य आहे. समाजाचा समाज म्हणून व व्यक्तीचा त्या समाजाचा घटक म्हणून शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकास हे समष्टीच्या अर्थ-पुरुषार्थाचे साध्य आहे. म्हणून समष्टीच्या अर्थ-पुरुषार्थाची साधना अशा प्रकारे झाली पाहिजे की समाजघटकांच्या वैयक्तिक व सामूहिक नीतिमत्तेचा, कर्तव्यभावनेचा, कर्तृत्वाचा, परस्पर सामंजस्याचा विकास होईल. वेगळ्या शब्दांत असे म्हणता येईल की, समाजाची आर्थिक प्रगती समाजाच्या सर्व घटकांच्या कर्तृत्वातून, प्रामाणिक परिश्रमातून साध्य झाली पाहिजे.

सध्याच्या युगात आर्थिक नियोजनाचा समाजाच्या आर्थिक विकासाशी म्हणजेच अर्थ-पुरुषार्थाशी घनिष्ट संबंध असतो. त्यामुळेच, समाजाच्या अर्थ-पुरुषार्थाचा खऱ्या अर्थाने विकास साधावयाचा असेल तर प्रत्येक सक्षम व्यक्तीला निर्वाहक्षम काम मिळेल अशा प्रकारे नियोजनाची आखणी केली पाहिजे, असा दीनदयाळजींचा आग्रह असे. यातून व्यक्तीचा विकास होतो. देशाच्या आर्थिक समृद्धीत भर पडते, आणि समाजाची सामूहिक कर्तृत्वशक्ती वृद्धिंगत होते.

पं. दीनदयाळजींनी म्हटले आहे –

"समाजातील प्रत्येक व्यक्तीला तिच्या जीवनविकासासाठी काही किमान गोष्टींची हमी मिळाली पाहिजे हे निर्विवाद आहे. आता प्रश्न असा उभा राहतो की हे किमान सर्वांना द्यावयाचे तर ते येईल कोठून? याचे स्पष्ट उत्तर असे आहे की, प्रत्येक सक्षम व्यक्तीने, ते स्वतःच्या प्रयत्नातून व पुरुषार्थाने निर्माण करावयाचे आहे. पुरुषार्थहीन म्हणजे उत्पादक कर्म न करणारी सक्षम व्यक्ती समाजावर केवळ बोजारूप होय. ज्या समाज-व्यवस्थेमध्ये वा अर्थ-व्यवस्थेमध्ये व्यक्तीच्या किमान गरजा पूर्ण होतात, परंतु व्यक्तीच्या पुरुषार्थाला वाव नाही, अशा व्यवस्थेतील व्यक्तीचा विकास एकांगीच राहील. माणसाला परमेश्वराने पोट आणि हात दोन्ही दिले आहेत. हातांना काम नसेल तर पोटाला अन्न मिळूनही व्यक्ती सुखी होणार नाही. निपुत्रिक स्त्रीला ज्याप्रमाणे स्वतःच्या जीवनातील अपूर्णतेची व्यथा बोचत राहाते, तशीच बेकार म्हणजे पुरुषार्थहीन व्यक्ती अपूर्ण राहील. (एकात्म मानववाद पृ. ६५)

Mass Production नव्हे तर Production by Masses पाहिजे. याबाबत पंडितजींचा (आणि म. गांधींचाही) जो विशेष आग्रह होता त्यामागे संपूर्ण समष्टीचा अर्थ-पुरुषार्थ जागृत करण्याचीच भावना होती. काही मूठभर व्यक्तींच्या वा एखाद्या विशिष्ट वर्गाच्या कर्तबगारीतून किंवा अत्याधुनिक यंत्रसामुग्रीच्या सहाय्याने देशाच्या आर्थिक समृद्धीत होणारी वाढ ही समष्टीच्या अर्थ-पुरुषार्थाची सिद्धी होय असे म्हणता येणार नाही.

परंतु आपल्या देशात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनेक पंचवार्षिक योजना होऊनही बेकारांची संख्या कमी होण्याऐवजी उत्तरोत्तर वाढतेच आहे. यावर उपाय म्हणून काही राज्यांत बेकार-भत्त्याची योजना पुढे आली आहे. तिचे कोडकौतुकही चालू आहे. प्रत्येक धडधाकट व्यक्तीला निर्वाहक्षम काम हमखास

मिळेल, अशा प्रकारे देशाचे आर्थिक नियोजन आखण्याऐवजी बेकार-भत्त्याची तरतूद करणे म्हणजे समाजाचा अर्थ-पुरुषार्थ जागृत करण्याचे सोडून त्याला ऐतखाऊ आणि पुरुषार्थविहीन बनविण्याचाच प्रकार होय.

अर्थ-पुरुषार्थाची उपासना धर्माला अनुसरूनच केली पाहिजे. असे पथ्य व्यक्तिजीवनातील चतुर्विध पुरुषार्थांचे विवेचन करताना सांगितलेले आहे. समष्टीच्या अर्थ-पुरुषार्थाच्या बाबतीतही, हे पथ्य पाळणे अत्यावश्यक आहे. दुर्दैवाने, हा विवेक आपल्या येथे राहिलेला दिसत नाही. उदाहरणार्थ, परकीय चलन मिळविण्याच्या हव्यासाने आपल्याला एवढे पछाडले आहे की, त्यासाठी गायींच्या आतड्यांपासून बेडकांच्या तंगड्यापर्यंत जे हाती लागेल ते निर्यात करण्याचा सपाटा आपण सुरू केला. याबाबत कोणताच विधिनिषेध राहिलेला नाही. अवकारी कराचे उत्पन्न बुडेल म्हणून आपण दारुबंदी करावयास तयार नाही. समाजाचा सर्वांगीण विकास करावयाचा हे 'कल्याणकारी शासनाचे' कर्तव्य मानले जाते. परंतु एकीकडे दारू तयार करण्याच्या कारखान्यांना मुक्त हस्ते परवाने देऊन लक्षावधी कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त करावयाचे, आणि दुसरीकडे त्या दारूपासून मिळणाऱ्या अबकारी कराच्या उत्पन्नातून समाज-कल्याण-योजना आखावयाच्या या धोरणाला कल्याणकारी धोरण कसे म्हणावयाचे? पुरुषार्थ करून पैसा मिळविण्याचे पाठ देण्याऐवजी आठवड्याची व रोजची सोडत सुरू करून एका रात्रीत लाखोपती होण्याचे अमिष लोकांपुढे ठेवणाऱ्या शासनाला समष्टीच्या अर्थ-पुरुषार्थाचे संवर्धन करणारे शासन कसे म्हणावे? पंडित दीनदयाळजींनी 'भारतीय अर्थविकासाची दिशा' या आपल्या पुस्तकाच्या प्रारंभीच आपल्या देशातील या स्थितीचे जे विवेचन केले आहे ते पहाण्यासारखे आहे. ते म्हणतात –

"स्वातंत्र्यापूर्वी आपण प्रत्येक प्रश्नाकडे राजकीय दृष्टिकोनातून पाहात असू. आता प्रत्येक प्रश्नाकडे आपण निव्वळ आर्थिक दृष्टिकोनातून पहायला लागलो आहोत. देशाचा आर्थिक विकास हेच आमचे एकमेव उद्दिष्ट होऊन बसले आहे. मानवी जीवनाची वास्तविकता, त्याचे उद्देश व हेतू, त्या जीवनाचे उच्चतम आदर्श यांसारख्या अतिशय महत्त्वाच्या गोष्टींबाबत एका एकांगी आणि विकृत दृष्टिकोनाचा सर्वत्र प्रसार होऊ लागला आहे. साध्य आणि साधन यासंबंधीचा विवेक खलास होत चालला आहे. अर्थोत्पादन ही जीवनातील एक अत्यावश्यक बाब न रहाता अर्थोत्पादन हेच जीवन होऊन बसले आहे. मानवी जीवनाचे

लक्ष्य व त्या जीवनातील अर्थाचे स्थान यासंबंधी निश्चित कल्पना डोळ्यासमोर नसल्यामुळे, ज्या मार्गाने गेल्याने पैसा आणि समृद्धी या दोहोंचा धर्मानुकूल उपभोग घेता येईल असा मार्गही आपण निश्चित करू शकलो नाही. मंदिराच्या बाह्य स्वरूपाचा सर्व प्रकारे विचार करीत असतानाही मंदिराचे मंदिरत्व हे तेथील प्रतिष्ठापित मूर्तीमुळे असते, या सत्याचे आपल्याला विस्मरण झाले तर आपले सर्व प्रयत्न व्यर्थ ठरतील."

(भारतीय अर्थनीती)

समष्टीच्या अर्थ-पुरुषार्थामध्ये अर्थनीतीबरोबरच दण्डशक्तीचा म्हणजेच शासनव्यवस्थेचाही समावेश होतो. अर्थशक्तीप्रमाणेच दण्डशक्तीचाही अभाव वा प्रभाव समष्टिधर्माला हानिकारक ठरतो. शासन क्षीणदण्ड म्हणजे ढिले असेल, अकार्यक्षम असेल, सत्प्रवृत्तींना संरक्षण देण्यास आणि असत्प्रवृत्तींचा बंदोबस्त करण्यास असमर्थ असेल तर समाजात मात्स्यन्याय सुरू होईल. उलट शासन उग्रदण्ड असेल तर त्यामुळेही समाजाचे स्वास्थ्य आणि संतुलन समाप्त होऊन अनर्थपरंपरा ओढवेल. अशा परिस्थितीत कर्तव्यरूप धर्मशासनाऐवजी दण्डुकेशाहीचे 'अनुशासन-पर्व' सुरू होते. दण्डशक्तीचा हा प्रभाव समाजजीवनाला निश्चितच हानिकारक ठरतो.

वस्तुतः शासन म्हणजे राज्य हे राष्ट्राच्या रक्षणासाठी असते. राष्ट्राचा आत्मा म्हणजे चिती. या चितीच्या अभिव्यक्तीचे, व्यवहाराचे नियम म्हणजे राष्ट्रधर्म होय. या राष्ट्रधर्माच्या मार्गातील अडथळे दूर करणे, चितीच्या अभिव्यक्तीचा मार्ग सुकर करणे, यासाठी शासन असते. या राजधर्माचे काटेकोरपणे पालन करणे, त्याच्या मर्यादांचे उल्लंघन न करणे हे शासनाचे कर्तव्य असते. हे कर्तव्य नीट पार पाडता यावे यासाठीच समाजाने काही अधिकार शासनाच्या हाती दिलेले असतात. शासनाने या समाजदत्त अधिकारांचा निव्वळ कर्तव्यबुद्धीने विवेकपूर्वक वापर करावयाचा असतो.

परंतु अनेकदा शासकांना या कर्तव्यांचे विस्मरण होते. चतुर्विध पुरुषार्थांच्या परिभाषेत म्हणावयाचे तर अर्थपुरुषार्थाची धर्माशी फारकत होते; आणि मग ओघानेच सत्ताधीशांचे नैतिक अधःपतन सुरू होते. भ्रष्टाचारातून प्रतिष्ठाने उभी राहतात. सत्ता हे समाजसेवेचे साधन न राहता अधिकाधिक सत्ता, अधिकाधिक शक्तिकेंद्रे हस्तगत करण्याचे साधन म्हणून तिचा सर्रास वापर सुरू होतो. दण्डशक्तीच्या प्रभावाचे हे लक्षण होय. आणि एकदा उच्च-

पदस्थांचाच असा व्यवहार सुरू झाला म्हणजे मग 'यथा राजा तथा प्रजा' या न्यायाने खालच्या श्रेणीवरचे शासकीय कर्मचारीही त्यांचाच कित्ता गिरवू लागतात.

आर्य चाणक्यांनी दण्डशक्तीच्या या अभाव–प्रभावाविषयी म्हटले आहे–

" दण्डशक्तीचा अजिबात उपयोग न केल्यास मात्स्यन्याय सुरू होतो. उलट नेहमी दण्डशक्तीचाच वापर केल्यास प्रजा त्रस्त होते. दण्डाचा यथोचित वापर केला तर प्रजा धर्म, अर्थ आणि काम या तीन पुरुषार्थांची उपासना करू शकते. उलट कोठलाही विवेक न ठेवता अज्ञानामुळे अथवा कामक्रोधाला बळी पडून दण्डशक्तीचा वापर केला गेल्यास वानप्रस्थी व संन्याशी देखील खवळतील. मग गृहस्थाश्रमी खवळतील यात नवेल ते काय ? (कौटिलीय अर्थशास्त्र – अधिकरण पहिले, भाग चौथा.)

धर्माच्या अधिष्ठानावर जागृत, निग्रहानुग्रहक्षम संघटित समाजजीवन उभे करणे हा दण्डशक्तीच्या अभाव-प्रभावाच्या दुष्परिणामांपासून मुक्त राहण्याचा श्रेयस्कर मार्ग आहे.

समष्टीचा काम

धर्म आणि अर्थ या पुरुषार्थांप्रमाणेच काम-पुरुषार्थही समष्टीच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. समाजाचा उत्कर्ष–अपकर्ष याचे निर्णायक उत्तर शेवटी समष्टीच्या मनोबळावरून ठरत असते. समाजाचे मन जिवंत असेल तर तो सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितीवरही मात करू शकतो. राखेतून नंदनवन उभे करू शकतो. अक्षरशः वाळवंटाचे नंदनवन करून दाखविणारा चिमुकला इस्राएल, दुसऱ्या महायुद्धकाळातील इंग्लंड, युद्धोत्तर काळातील जपान व जर्मनी, ही समष्टीच्या काम-पुरुषार्थाची काही उदाहरणे आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आपण ब्रिटिश शासनाविरुद्ध विविध मार्गांनी केलेला यशस्वी संघर्ष, किंवा चिनी व व पाकिस्तानी आक्रमणांच्या वेळी आपापसांतील हेवेदावे व लहान-मोठे मतभेद बाजूला ठेवून समरांगणावर शत्रूशी लढणाऱ्या सैनिकांमागे खंबीरपणे उभी राहिलेली भारतीय जनता हीही समष्टीच्या काम-पुरुषार्थाचीच उदाहरणे आहेत. समाजाची ही सामूहिक आकांक्षा जागृत ठेवणे, फुलविणे हे त्या त्या काळातीत समाज-धुरीणांचे कर्तव्य असते. 'हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा आहे' किंवा 'स्वराज्य हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे व आम्ही तो मिळवणारच' या

शब्दांनी तत्कालीन समाजमनावर केवढी जादू केली होती याला इतिहास साक्षी आहे.

पंडित दीनदयाळजींच्या एका वार्ताहर-परिषदेत झालेली प्रश्नोत्तरे या संदर्भात उद्धृत करण्यासारखी आहेत. वार्ताहराने दीनदयाळजींना प्रश्न विचारला, " देशाची स्थिती सुधारावी यासाठी देशातील सर्व नागरिक प्रयत्नांची शर्थ करीत आहेत असे तुम्हाला वाटते का ? या दृष्टीने सर्वत्र एकूण शैथिल्यच आहे, असे तुम्हाला नाही वाटत ?" दीनदयाळजी म्हणाले – " लोकांसमोर एखादे श्रेष्ठ राष्ट्रीय लक्ष्य असेल तर ते वाटेल तेवढे परिश्रम करावयास तयार होतील. " यावर त्या वार्ताहराने प्रतिप्रश्न केला – " असे कोणते लक्ष्य असू शकेल ? " दीनदयाळजींनी लगेच उत्तर दिले, " भारत पुन्हा अखंड करणे हे एक लक्ष्य होऊ शकेल. चीनने बळकावलेल्या आपल्या प्रदेशातून चिन्यांची हकालपट्टी करणे हे असेच आणखी एक लक्ष्य असू शकते." समाजाचे मन एका जबरदस्त राष्ट्रीय महत्त्वाकांक्षेने भारून टाकणारे हे उद्गार आणि शत्रूने आपल्या भूप्रदेशावर सैनिकी आक्रमण केले असताही, " लडाखचा प्रदेश वैराण आहे. तेथे गवताचे पानदेखील उगवत नाही," हे देशाच्या माजी पंतप्रधानांचे उद्गार या दोहोंमधील फरक सहज ध्यानात येण्यासारखा आहे. आणि परिणाम तर इतिहासात नमूद आहेत.

समाजाचे स्वातंत्र्य, तसेच संघटित, स्वावलंबी, समर्थ आणि स्वस्थ जीवन शेवटी समाजाच्या सामूहिक काम-पुरुषार्थावरच अवलंबून असते, हे खरे आहे. परंतु समष्टिगत काम-पुरुषार्थालाही धर्माचे – व्यापक मानवधर्माचे - अधिष्ठान नसेल तर हा पुरुषार्थ राक्षसी महत्त्वाकांक्षेमध्ये परिणत होण्याचा संभव असतो.

भगवद्गीतेमध्ये – 'इदमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथम् ।
इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम् ।।
असौ मया हतः शत्रुर्हनिष्ये चापरानपि ।
ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान् सुखी ।।
(गीता अध्याय १६, १३–१४)

असे जे आसुरी संपत्तीचे वर्णन केलेले आहे, ते मग अनुभवास येऊ लागते. समष्टीच्या या धर्मविहीन काम-पुरुषार्थाला जर दुर्दैवाने धर्मविहीन अर्थ-पुरुषार्थाची जोड मिळाली तर ' आधीच मर्कट तशातही मद्य प्याला ' अशी

त्या समाजाची अवस्था होऊन त्याच्या त्या मर्कटलीलांनी सारा मानवसमाज संत्रस्त होऊन जातो. उलट या समष्टिगत पुरुषार्थांना धर्माचा आधार असला म्हणजे हेच पुरुषार्थ साऱ्या जगाचे नंदनवन करू शकतात. एकीकडे एका हातात तरवार आणि दुसऱ्या हातात पेट्रोडॉलर्स घेऊन संपूर्ण जगाच्या नकाशावर हिरवा रंग फासावयास निघालेला इस्लामी पुनरुज्जीवनवाद, वर्गविहीन समाजरचना उभी करण्याच्या गोंडस नावाखाली स्वतंत्र देशांत रणगाडे घुसवीत चाललेला रशिया-चीनचा लाल साम्राज्यवाद, किंवा 'विकासार्थ आर्थिक मदती'च्या मिषाने पुढे सरकत असलेला अमेरिकेसारख्या संपन्न देशाचा आर्थिक साम्राज्यवाद, आणि दुसरीकडे "भूभाग नही, शतशत मानवहृदय जीतने का मेरा निश्चय" अशी ग्वाही देत 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' या विशुद्ध भावनेने कार्यरत झालेला हिंदू संस्कृतीचा विश्वसंचार ही दोन चित्रे डोळ्यासमोर आणली म्हणजे धर्मविहीन समष्टिगत काम-पुरुषार्थ आणि धर्माधिष्ठीत काम-पुरुषार्थ यांमधील फरक सहज स्पष्ट होतो. व्यक्तिगत अर्थ-काम या पुरुषार्थाप्रमाणेच समष्टिगत अर्थ-काम या पुरुषार्थांनाही धर्माचे भक्कम अधिष्ठान असले पाहिजे असे जे एकात्म मानव दर्शनाचे आग्रही प्रतिपादन आहे, त्याचे रहस्य हेच होय.

समष्टीचा मोक्ष

समाजाला धर्म, अर्थ, काम असतात. समाजाला मोक्षही असतो काय ? होय असतो. प्रत्येक राष्ट्राला त्याचा आत्मा असतो, आणि त्याला चिती म्हणतात हा उल्लेख मागे येऊन गेला आहे. व्यक्तीसमोर ज्याप्रमाणे सर्वव्यापी परमात्मतत्त्वाचा साक्षात्कार करून घेणे हे सर्वश्रेष्ठ लक्ष्य असते, त्याचप्रमाणे चितीचा साक्षात्कार आणि अभिव्यक्ती हे राष्ट्राचे स्वाभाविक लक्ष्य असते, असले पाहिजे. आपल्या दैशिक शास्त्रानुसार "प्रत्येक जाति (राष्ट्र) भगवती प्रकृतीच्या कोणत्या ना कोणत्या कार्यविशेषासाठीच उत्पन्न होते." (दैशिक शास्त्र, पृष्ठ १६) या मुद्याचे स्पष्टीकरण करताना पंडित दीनदयाळ उपाध्यायांनी म्हटले आहे– "प्रत्येक राष्ट्र सर्वसत्तेने नेमून दिलेले जीवनकार्य घेऊन जन्माला येते. या कार्याच्या पूर्तीसाठी आपल्या सर्व शक्तिनिशी प्रयत्न करणे हीच त्या राष्ट्राच्या विकासाची सर्वोत्तम व एकमेव साधना आहे."

(राष्ट्रचिंतन : पृ. १३२, १३३)

स्वराज्य म्हणजे पारतंत्र्यातून मुक्ती ही या आत्माविष्कारासाठी पहिली आवश्यकता असते. स्वराज्याशिवाय राष्ट्र आपल्या आत्म्याची, जीवनकार्याची

अभिव्यक्ती करू शकणार नाही; उन्नती करू शकणार नाही. राष्ट्राच्या जीवनात स्वराज्य हे असे साधन व अशी एक सामाजिक अवस्था असते की, ज्यामुळे ते राष्ट्र आपल्या ध्येयाकडे अप्रतिहतपणे आणि विवेकाने वाटचाल करू शकते. अर्थात् यासाठी हे स्वराज्य केवळ राजकीयच नव्हे तर आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्टचाही 'स्व' राज्य असले पाहिजे.

कोणत्याही समष्टीच्या मोक्ष-पुरुषार्थाचे म्हणजे तिच्या जीवनकार्याचे स्वरूप तिच्या चितीवरून ठरत असते. अर्थात् समष्टीच्या मोक्ष-पुरुषार्थाची सिद्धी समष्टीचा घटक असलेल्या व्यक्तीच्या माध्यमानेच व्हावयाची असल्याने समष्टीचा मोक्ष-पुरुषार्थ स्वाभाविकपणेच व्यक्तीच्या चतुर्विध पुरुषार्थांशी निगडित असतो. आमसुखाचा, विचार करताना आपण असे पाहिले की, आत्मा–अनात्मा या विषयासंबंधी सर्वसामान्य माणसाची कल्पना प्रायः एकांगी, अपूर्ण वा क्वचित् विपर्यस्तही असते. मोक्षाच्या बाबतीतही काहीशी अशीच अवस्था आहे. मोक्ष हा निव्वळ व्यक्तिगत मामला आहे, आणि त्याची वाटचाल जगाकडे पाठ फिरवून, अज्ञानात कोठेतरी दृष्टी लावून केवळ एकान्तात करावयाची असते, अशी समजूत रूढ झालेली दिसते. मोक्षासंबंधीची ही धारणा निश्चितच एकांगी आहे, चुकीची आहे. एकात्म मानव दर्शनातील मोक्ष-पुरुषार्थ जगाकडे पाठ फिरविणारा नाही. एवढेच नव्हे तर, व्यक्ती, कुटुंब, जमात, राष्ट्र या क्रमाने संपूर्ण मानवसमूहाला आत्मीयतेच्या कवेत घेऊन परमसुखाच्या मार्गावर घेऊन जाणारा क्रियाशील पुरुषार्थ आहे.

पं. दीनदयाळजी या विषयाचे विवेचन करताना म्हणतात :– "मुक्ती ही कधी व्यक्तिगत नसते, ती समष्टिगतच असते. समाज दुरवस्थेत असला तरी त्याला तशाच अवस्थेत ठेवून मी एकटा मोक्ष प्राप्त करू शकेन अशी कित्येकांची चुकीची समजूत असते. समाज मुक्त होईल, त्याचा स्तर उंचावेल, तो उन्नत होईल तेव्हाच व्यक्तीला शांती मिळू शकेल, याच कार्यासाठी परमेश्वर पुनःपुन्हा अवतार धारण करीत असतो. परमेश्वराने अवतार घेतला आणि तो कोठेतरी गिरिकंदरात जाऊन स्वतःच्या मुक्तीसाठी तप करीत बसला, असे वर्णन आपल्याला आपल्या कोणत्याही पुराणात आढळत नाही.

केवळ व्यक्तिगत मोक्षाची आकांक्षा ठेवून एखाद्याने योगाभ्यास आदी गोष्टी केल्या, तरी त्याला मुक्ती मिळणार नाही. मुक्ती एवढी लहानसहान गोष्ट नाही, की जी समाजाला तसाच ठेवून, सोडून एकान्तात जाऊन बसून

कोणाला प्राप्त व्हावी. अशा साधकाला फार तर एखादी सिद्धी प्राप्त होईल. परंतु जोवर त्या सिद्धीचा उपयोग आपल्या आजूबाजूला पसरलेल्या समाज-बांधवांना उन्नत करण्यासाठी होत नाही, तोवर ती सिद्धीही निरर्थक होय.

(राष्ट्रजीवनाची दिशा)

आपल्या या प्राचीन हिंदुराष्ट्राच्या संदर्भात या समष्टिगत काम–मोक्ष या पुरुषार्थांचे लक्ष्य शब्दबद्ध करावयाचे झाले तर ते 'यतोभ्युदयनिःश्रेयससिद्धिः स धर्मः' या सूत्राच्या अधिष्ठानावर उभे राहून येथे चतुर्विध पुरुषार्थसंपन्न असे संघटित, समृद्ध व समर्थ हिंदुराष्ट्र पुनः उभे करणे आणि 'एतद्देशप्रसूतस्य सकाशाद् अग्र जन्मनः स्वे स्वे चरित्रं शिक्षेरन् पृथिव्या सर्वमानवाः' हे स्वप्न साकार करून समस्त मानवजातीसंबंधीचे आपले ईश्वरदत्त कर्तव्य पार पाडणे असे करता येईल.

हे लक्ष्य म्हणजे स्वप्नरंजन किंवा समष्टिगत अहंकार नसून जगाची आपल्या देशाकडून तशी अपेक्षा आहे. कोण्या भारतीय विद्वानांची नव्हे तर पाश्चात्य विद्वानांची अवतरणे पुढे देत आहे. एक अवतरण ख्यातनाम इतिहास-कार श्री. अर्नाल्ड टॉयन्बी यांचे आहे. दुसरे जर्मन पंडित फ्रेडरिक मॅक्स मुल्लर यांचे आहे.

"या प्रदीर्घ इतिहासाचा प्रारंभ पश्चिमेपासून झाला असला तरी मानव-जातीचा संपूर्ण विनाश टाळावयाचा असेल तर त्याचा शेवट भारतापाशीच करावा लागेल. मानववंशाच्या इतिहासक्रमातील अत्यंत भयावह अशा सध्याच्या काळात भारतीय जीवनादर्श हाच मुक्तीचा एकमेव मार्ग आहे. हा जीवनादर्श म्हणजे सम्राट आशोक व महात्मा गांधी यांनी दाखविलेला अहिंसेचा मार्ग आणि स्वामी रामकृष्ण परमहंसांनी दिलेला सर्वधर्मसमन्वयाचा संदेश होय. आपण सारे एका विशाल कुटुंबाचे घटक आहोत ही भावना समस्त मानवांमध्ये रुजविण्यासाठी जी मनोभूमिका व मनोवृत्ती आवश्यक असते ती या जीवना-दर्शांमध्येच आहे. आजच्या या अणुयुगात आत्मनाश टाळण्याचा हाच एकमेव पर्याय आहे." [(अर्नाल्ड टॉयनबी)–भारतीय संस्कृतीचा अमोल ठेवा – नानी पालखीवाला]

"मला कोणी विचारले की, परमेश्वराने मानवी मनाला ज्या अद्भुत शक्ती प्रदान केल्या आहेत, त्याचा परिपूर्ण विकास पृथ्वीच्या पाठीवर कोणी

केला आहे ? जीवनाच्या प्रत्येक जटिल प्रश्नाविषयी सखोल चिंतन करून त्या पैकी अनेकांची उत्तरे कोणी शोधून काढली आहेत ? तर मी भारताकडेच अंगुलिनिर्देश करीन. आपणा युरोपवासियांचा पिंड मुख्यत्वे ग्रीक, रोमन आणि ज्यू या एका सेमेटिक वंशांच्या विचारांवर वाढलेला आहे. या विचारातील उणीवा दूर करून आपले अंतर्जीवन अधिक परिपूर्ण, अधिक विशाल, अधिक उदार, थोडक्यात म्हणजे अधिक मानवी व्हावे, केवळ या आयुष्यापुरतेच नव्हे तर एक नवे चिरंजीव जीवन प्राप्त व्हावे यासाठी आपण कोणाकडे अपेक्षेने पहावे असे मला कोणी विचारले तर त्याचे उत्तर म्हणूनही मी भारताचेच नाव घेईन. (भारतीय संस्कृतीचा अमोल ठेवा.)

• • •

८

एकात्म समाज-व्यवस्था

समष्टीच्या चतुर्विध पुरुषार्थांचा विचार आपण येथवर केला. तत्पूर्वी व्यक्तीच्या संदर्भातही या चार पुरुषार्थांचे स्वरूप आपण पाहिले. विवेचनाच्या सोयीसाठी आपण अशी विभागणी केली असली तरी समाज व व्यक्ती यांचे नाते शाखा–पर्णांसारखे किंवा शरीर व शरीराचे अवयव यांसारखे असल्यामुळे त्यांचे हे पुरुषार्थही एकमेकांना पूरक असतात, असले पाहिजेत. "व्यक्ती व समाज या उभयतांना परस्परांशी निगडित ठेवण्याचे कार्य ज्याच्यामुळे होते त्यालाच आपल्या येथे पुरुषार्थ अशी संज्ञा देण्यात आली आहे" असे दीनदयाळजींनी पुरुषार्थाचे विवेचन करताना एके ठिकाणी म्हटले आहे. त्याचा आशय हाच आहे.

व्यक्ती व समष्टीच्या पुरुषार्थांच्या परस्पर संबंधाविषयी सूत्ररूपाने असे म्हणता येईल की, शिक्षण, कर्म, उपभोग व यज्ञ या चार गोष्टींनी व्यक्ती व समाज परस्परांशी जोडलेले असतात. समाजाने दिलेल्या शिक्षणामुळे, संस्कारामुळेच मनुष्य 'मनुष्य' बनतो. समाज आपल्याला बोलायला, लिहायला, वाचायला शिकवितो. आपल्या विचारप्रक्रियेला समाजच गतिमान करीत असतो. मातापिता, गुरुजन, शिक्षणसंस्था आदींकडून जे शिक्षण व्यक्तीला मिळते, त्याच्या आधारेच व्यक्ती स्वतःसाठी व समाजासाठी कर्म म्हणजे उद्योग, व्यवसाय करू शकते. व्यक्तीने केलेल्या कर्माचे फल म्हणून समाज व्यक्तीच्या योगक्षेमाची आणि उपभोगाची व्यवस्था करीत असतो. चतुःसूत्रीतील चौथा भाग म्हणजे यज्ञ. यज्ञाचा संबंध कर्माशी आणि त्या कर्मापाठीमागील भावनेशी आहे. व्यक्ती

जो उद्योग, व्यवसाय म्हणजे कर्म अरीत असते, त्या द्वारे ती समाजाशी जोडली जाते. वरवर पाहाता असे वाटते की, मनुष्य केवळ स्वतःसाठीच उद्योग करीत असतो. परंतु वस्तुतः तो समाजासाठीही काम करीत असतो. उदाहरणार्थ, शेतकरी धान्य पिकवितो. पिकविलेले सर्व धान्य तो स्वतः थोडेच वापरतो ? गरजेपुरते ठेवून उरलेले तो योग्य मोबदला घेऊन समाजाला देतो. समाजाने त्याला शेतीचे शिक्षण दिले, तो समाजाला धान्य पिकवून देतो. समाजाने विणकराला वस्त्रे विणावयास शिकविले, तो वस्त्रे विणून समाजाची एक गरज भागवितो. शिक्षक विद्यार्थिदशेत असताना कुटुंबातील वडीलधाऱ्या मंडळींकडून, गुरुजनांकडून व समाजाकडून संस्कार ग्रहण करतो; आणि पुढे नव्या पिढीतील विद्यार्थ्यांना ज्ञान आणि संस्कार देण्याचे कार्य करीत असतो.

विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या अशा कर्मांमधूनच समाजाच्या नानाविध गरजा पूर्ण होऊन त्याची धारणा होते. शिक्षण, कर्म, योगक्षेम व यज्ञ हे धारणाचक्र अखंड चालू राहाते. अर्थात् हे कर्म निव्वळ आवश्यक योगक्षेमाची



म्हणजेच उपभोगाची दृष्टी न ठेवता कर्तव्यबुद्धीने, समर्पणवृत्तीने केले म्हणजे तो सर्वार्थाने यज्ञ होतो. कर्तव्यभावनेने केलेल्या अशा कर्मयज्ञामुळे व्यक्तीचा योगक्षेम तर उत्तम प्रकारे चालेलच, पण त्याबरोबरच तिची नैतिक व आध्यात्मिक उन्नतीही होईल. शिवाय ते ते कर्म उत्तम होऊन समाजही सर्वांगांनी पुष्ट व उन्नत होईल.

अशा प्रकारे शिक्षण, कर्म, उपभोग (योगक्षेम) व यज्ञ या चार गोष्टींनी व्यक्ती व समाज परस्परांशी जोडलेले असतात. एका घनाकृतीच्या द्वारे हे संबंध स्पष्ट करता येतील. शिक्षण समाजाकडून व्यक्तीकडे, कर्म व्यक्तीकडून समाजाकडे, उपभोग समाजाकडून व्यक्तीकडे, आणि यज्ञ व्यक्ती-कडून समाजाकडे, अशी ही रचना आहे. म्हणजे व्यक्ती व समाज यांना जोडणाऱ्या चार गोष्टींपैकी दोन गोष्टींची जबाबदारी समाजाकडे आहे, आणि उरलेल्या दोहोंची जबाबदारी व्यक्तीवर आहे.

समाजाकडून व्यक्तीला योग्य शिक्षण मिळत नसेल, शिक्षण मिळूनही कर्म (उद्योग-व्यवसाय) उपलब्ध होत नसेल, आणि उद्योग-व्यवसाय मिळूनही आवश्यक तेवढा योगक्षेम समाजाकडून प्राप्त होत नसेल तर समाज कर्तव्यच्युत झाला असे म्हणावे लागेल. याचे अनिष्ट परिणाम व्यक्ती व समाज या दोघांनाही भोगावे लागतील. या उलट समाजाने शिक्षण-संस्कारांची तरतूद करून कर्माद्वारे योगक्षेमाची व्यवस्था केली असताही, व्यक्तीने आपले व्यवसाय-कर्म सचोटीने, यज्ञभावनेने केले नाही तर समष्टिधर्माच्या अशा उपेक्षेमुळे, कदाचित तिची भौतिक हानी झाली नाही तरी, नैतिक दृष्टीने तिची ही अधोगतीच म्हणावी लागेल. परिणामतः समाजाच्या धारणेलाच कीड लागेल. परंतु समाज व व्यक्ती या दोघांनीही आपापली जबाबदारी कसोशीने आणि कर्तव्यभावनेने पार पाडली तर व्यक्ती व समाज यांचे एकात्म स्वरूप साकार होईल.

शिक्षण, कर्म, योगक्षेम व यज्ञ या चतुःसूत्रीने निर्दिष्ट केलेले समाज व व्यक्ती यांचे हे अन्योन्यपूरक संबंध निरनिराळ्या संस्थांच्या माध्यमातून व्यक्त होत असतात. व्यक्तीचे समाजाविषयीचे कर्तव्य आणि समाजाचे व्यक्तीविषयीचे दायित्व या विविध संस्थांमार्फतच क्रियान्वित होत असते. कुटुंब ही अशा संस्थांमधील एक प्रमुख संस्था आहे. त्यानंतर आपली जात, पंथ, व्यवसाय-क्षेत्रातील संस्था, संघटना, भाषिक-संघटना, शिक्षण-संघटना अथवा संस्था-राजकीय पक्ष, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रांत सेवा करणाऱ्या संस्था, शासन,

संस्था, अशा विविध संस्थांचा निर्देश या संदर्भात करता येईल. एका बाजूने व्यक्तीचा सर्वांगीण एकात्म विकास आणि दुसऱ्या बाजूने समाजाच्याही सर्व गरजा पूर्ण होऊन त्याची सर्वांगीण उन्नती असे या संस्थांचे दुहेरी कार्य असते. अर्थात् संस्थांचे संचालन कोणी ना कोणी व्यक्तीच करीत असल्याने अशा संस्थांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तीनी ही जाणीव जागरूकपणे आणि सातत्याने ठेवणे आवश्यक आहे. कारण एका व्यक्तींच्या शक्तीपेक्षा संस्थेची संघटित शक्ती केव्हाही अधिकच असणार. अशा परिस्थितीत संस्थाचे समाजजीवनात जे प्रयोजन असते, समाजजीवनाशी जे नाते असते त्याचेच विस्मरण झाले तर त्यातून व्यक्तिसत्तावाद व समाजसत्तावाद यांच्यासारखाच संस्थासत्तावाद उदयास येईल, आणि ती संस्था व्यक्तीच्या व समाजाच्या उत्कर्षाला सहाय्यभूत ठरण्याऐवजी विघटनेला आणि अधोगतीला कारणीभूत ठरेल. संस्था हा व्यक्ती व समाज या उभयतांना जोडणारा एक दुवा आहे. तिघांचा असा एकात्म संबंध असल्यामुळे ती गोष्ट अन्ती समाजाच्या हिताची असेल तीच व्यक्तीच्या व संस्थेच्याही हिताची ठरेल. उलट, जी गोष्ट समाजाच्या हिताची नाही ती समाजांतर्गत व्यक्तीच्या व संस्था-संघटनेच्याही हिताची असू शकणार नाही. राजकीय पक्ष, कामगार-संघटना, विद्यार्थि-संघटना किसान-संघटना, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रांत कार्य करणाऱ्या संघटना, ध्येयधोरणाच्या व कार्याच्या इष्टानिष्टतेचा, यशापयशाचा निकष हाच असू शकतो. शेवटी व्यक्ती, संस्था व समाज हे तिन्ही घटक पृथगात्म नसून परस्परावलंबी एकात्म घटक आहेत. आणि म्हणून त्यांनी परस्परानुकूल राहाण्यातच त्यांचा खरा पुरुषार्थ आहे, त्यांचे हित आहे.

या एकात्म धर्माची विस्मृती होऊन पृथगात्म विचार सुरू झाला, तर ही वाकडी वाट समाजाला कोणत्या खड्ड्यात नेऊन टाकील हे सांगता येणार नाही. एकदा असा विचार सुरू झाला की, वर्गावर्गांचे संघर्ष (स्पृश्य विरुद्ध अस्पृश्य, दलित विरुद्ध दलितेतर, कारखानदार विरुद्ध कामगार इत्यादी), किंवा वर्गांतर्गत गटांचे संघर्ष (राजकीय पक्षांचे आपसातील हेवेदावे, निरनिराळचा कामगार वा छात्र संघटनांची आपसांतील रोगट स्पर्धा) जुनी पिढी व नवी पिढी यांमधील संघर्ष, अशा स्वरूपाचे संघर्ष अपरिहार्यपणे उद्‌भवणारच. ही यादी आणखी खूप लांबविता येईल. परंतु त्याची गरज नाही. कारण या सर्व हेव्यादाव्यांचे, संघर्षाचे चटके आपण नित्य अनुभवीत आहोत.

अशा पृथगात्म दृष्टिकोनामुळे आपल्या देशाच्या राजकारणाला आणि परिणामी काही अंशी समष्टिजीवनालाही जे विपरीत वळण लागले त्याचे विश्लेषण करताना पंडित दीनदयाळजींनी म्हटले आहे- " भारतीय राजकारण्यांची सर्वांत मोठी चूक ही आहे की, ते भारतात भाषिक, धार्मिक, आर्थिक आदी समाजजीवनाच्या विविध क्षेत्रांत स्वतंत्र निरनिराळ्या वर्गांचे अस्तित्व गृहीत धरतात. आतापर्यंतचे त्यांचे सारे प्रयत्न स्वतंत्र अस्तित्व मानलेल्या या निरनिराळ्या वर्गांमध्ये एकता व सामंजस्य कसे निर्माण होईल या दिशेनेच झाले. या वर्गांचे स्वतंत्र अस्तित्व गृहीत धरून आणि त्यांच्या तुष्टीकरणाचे धोरण अवलंबून राजकीय क्षेत्रातील मंडळी त्यांच्या अहंकाराला व स्वार्थाला खतपाणी घालत राहतील तोपर्यंत राजकारण चुकीच्या दिशेनेच जात राहील. सत्य तर हे आहे की, संपूर्ण भारत एक आहे, भारताची सारी जनता एक आहे आणि तिने या एकतेचा अनुभव घेत येथे नांदावयाचे आहे. अनेक अवयव जोडून शरीराची निर्मिती होत नसून एका शरीराचे अनेक अवयव असतात. पहिल्या विचारात अनेकांना सत्य मानून एकाची कल्पना करण्याचा प्रयत्न आहे, तर दुसऱ्या विचारात एकाला सत्य मानून अनेक केवळ त्या एकाचीच विविध रूपे आहेत हा दृष्टिकोन आहे. " (राष्ट्रचिंतन पृ. ११-१४)

आश्रम-व्यवस्था

येथवरच्या विवेचनात आपण पाहिले की माणसाच्या सुखाचा व त्या सुखाच्या प्राप्तीसाठी करावयाच्या पुरुषार्थांचा विचार एकांगी वा तुकड्या-तुकड्यांनी करून भागणार नाही. तो सर्वांगांनी व साकल्याने केला पाहिजे. त्याचप्रमाणे आपण हेही पाहिले की, व्यक्ती व समाज यांचे अस्तित्व, सुख:दुख, हिताहित, परस्परांशी केवळ निगडितच नव्हे तर परस्परावलंबीही असते, आणि हे दोन घटक शिक्षण, कर्म, योगक्षेम व यज्ञ या चार गोष्टींनी परस्परांशी जोडलेले असतात. तथापि व्यक्तिजीवनाच्या व समष्टिजीवनाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि व्यक्ती व समाज यांमधील एकात्मतेचे बंध सुदृढ करण्यासाठी काही व्यवस्थाही असाव्या लागतात. कारण प्रत्यक्ष जीवनाशी निगडित असलेल्या एखाद्या विषयाचे केवळ तात्त्विक विश्लेषण आणि विवेचन करून भागत नाही. ते विश्लेशण कितीही वस्तुनिष्ठ असले, त्यातून निघणारे निष्कर्षही अचूक असले तरी त्याला अनुरूप आचारविचाराच्या व्यवस्थेचीही जोड आवश्यक असते. समजा, आपल्याला आपल्या जमिनीत एखादे झाड

लावावयाचे आहे. तर त्यासाठी, ज्या जमिनीत ते झाड लावावयाचे आहे तिची मशागत कशी करावी, रोप केव्हा कसे लावावे, खते कोणती घालावीत, कोणती टाळावीत, पाणी केव्हा किती द्यावे, अनावश्यक फाद्यांची वा बांडगुळांची छाटणी केव्हा करावी, त्या झाडाच्या वाढीचा परिसरातील इतर उपयुक्त झाडांना उपद्रव तर होणार नाहीना, ज्या जातीचे ते झाड असेल त्याच्या पाना–फुला–फळांचे गुणधर्म कोणते इत्यादी कितीतरी गोष्टींचा विचार करावा लागतो आणि तदनुषंगाने व्यवस्थाही करावी लागते. या सर्व गोष्टी एखाद्या वनस्पतीच्या बाबतीत जेवढ्या आवश्यक आहेत, तेवढ्याच किंबहुना त्याहूनही अधिक शरीर, मन, बुद्धी, आत्मा यांनी युक्त असलेल्या व्यक्ती-समष्टीच्या विकासाच्या बाबतीत आवश्यक आहेत. माणसाची प्रवृत्ती, त्याच्या भावभावना, आकांक्षा, त्याचा विकासक्रम, तो ज्या समाजाचा घटक आहे, त्या समाजाची चिती, त्या समाजाचा घटक या नात्याने व्यक्तीचे कर्तव्य, जीवनाचे अंतिम लक्ष्य आदी गोष्टींचा समग्र विचार करणे आणि तदनुसार नियम, व्यवस्था निर्माण करणे आवश्यक असते.

या सर्व गोष्टींचा सकल्याने विचार करून, व्यक्तिजीवन व समष्टिजीवन सुसमन्वित चालावे या उद्देशाने आपल्या येथे आश्रम-व्यवस्था व वर्ण-व्यवस्था अशा दोन प्रमुख व्यवस्था केलेल्या आढळतात. आश्रम-व्यवस्थेचा उद्देश प्रामुख्याने व्यक्तीची धारणा व विकास हा आहे, तर वर्णव्यवस्था ही मुख्यतः समष्टीची धारणा डोळ्यासमोर ठेवून करण्यात आली. अर्थात् व्यक्तिधर्म आणि समष्टि-धर्म परस्परपूरक असल्याने आश्रम-व्यवस्थेची रचना करताना समष्टीचे अवधान ठेवण्यात आले आहे.

ब्रह्मचर्याश्रम

ब्रह्मचर्याश्रम म्हणजे विद्याध्ययनाचा काळ. हा काळ सुमारे बारा वर्षांचा मानलेला होता. व्यक्तीच्या भावी जीवनाची शारीरिक, मानसिक व बौद्धिक पायाभरणी करण्याचा हा काळ होता. आजही आपण मानतो की मुलामुलींवर विद्यार्थिदशेत जे संस्कार होतात, तदनुसार त्यांच्या भावी जीवनाला दिशा मिळते. माणूस कसा घडावा याचे काही एक मानचित्र आश्रम-व्यवस्थेची उभारणी करणाऱ्या आणि राबविणाऱ्या विचारवंत धर्मवेत्त्यांनी दृष्टीपुढे ठेवलेले होते. व्यक्तिगत दृष्टचा विकसित, निश्चित जीवनलक्ष्य असलेला आणि त्याच वेळी समाजाच्या सुखसमृद्ध धारणेला उपकारक ठरणारा माणूस भारतीय विचार-

वंतांना, ऋषीमुनींना अभिप्रेत होता. म्हणून त्यांनी अशी प्रथा निर्माण केली की, विद्याभ्यास करावयाचा तो गुरुकुलात किंवा गुरूच्या नित्य सान्निध्यात राहून करावयाचा. माणूस गरीब असो की श्रीमंत, त्याचा वर्ण कोणताही असो ; गुरुकुलात सर्वांना एकाच शिस्तीत रहावे लागे आणि समान वागणूक मिळे. श्रीकृष्ण आणि सुदामा यांचे अध्ययन एकत्र झाले. सत्यकाम जाबाला-सारखा पित्याचे नाव ठाऊक नसलेला मुलगा सगळ्यांच्या बरोबरीने शिकला. गुरूचा सहवास आणि त्यांच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव यामुळे खरेखुरे जीवन-शिक्षण मुलांना सहज मिळून जात असे.

शास्त्रग्रंथांच्या अध्ययनामुळे पुस्तकी ज्ञान या विद्यार्थ्यांना अर्थातच मिळत असे. पण शिक्षणात एकांगीपणा मात्र नव्हता. व्यायाम व शरीरश्रमाची कामे यामुळे शरीर सुदृढ होई. आणि स्वावलंबनाचे पाठ सहज मिळत. यम-नियमांच्या पालनामुळे मनाला स्थैर्य येई व स्वधर्माची हेळसांड सहसा होत नसे. शरीर, मन, बुद्धीची ही तयारी म्हणजे भावी जीवनाची शिदोरीच. या स्वरूपातील आश्रमीय शिक्षण आता आधुनिक संदर्भात देता येणे अवघड आहे. निसर्गाच्या परिसरात, घरापासून दूर राहणे, तपःपूत जीवन व्यतीत करीत असलेले आणि ज्ञानदानाला वाहून घेतलेले गुरू लाभणेही सुलभ राहिलेले नाही. परंतु समृद्ध आणि सुसज्ज निवासी (रेसिडेन्शिअल) शिक्षणसंस्था उपयुक्त ठरत आहेत. शिक्षणाचा व्यापक प्रसार स्वागतार्ह आहे, पण त्याला जे निव्वळ पोटार्थी स्वरूप प्राप्त झाले आहे, त्यामुळे मात्र अनेक समस्या आपल्या सामाजिक जीवनात निर्माण होत आहेत. धर्मज्ञ, चारित्र्यसंपन्न, तेजस्वी आणि जीवनात आत्मविश्वासाने पाऊल टाकणारा तरुणवर्ग सध्या दिसेनासा झाला आहे. ब्रह्मचर्याश्रमाची मूळ उद्दिष्टे दृष्टिआड होऊ न देता नव्या परिस्थितीत शिक्षणाचे स्वरूप ठरविणे हे खरे तर विचारवंत आणि शासक यांच्या पुढील मोठे आव्हान आहे. या दृष्टीने जुन्या भारतीय शिक्षणपद्धतीतील ग्राह्यांश शोधून सध्याच्या निर्जीव शिक्षणात जिवंतपणा आणण्याचा प्रयत्न अपेक्षित आहे. शिक्षण नव्या आधुनिक इमारतीत मिळते, की गुरूच्या आश्रमात मिळते हा प्रश्न गौण असून शिक्षणाचा आत्मा शाबूत राखणे आणि ब्रह्मचर्याश्रमाची उद्दिष्टे सफल करणे हा प्रश्न खरा महत्त्वाचा आहे.

गृहस्थाश्रम

'धन्यो गृहस्थाश्रमः' असे एक वचन आहे आणि ते सार्थ आहे. पूर्वीच्या

आश्रम-व्यवस्थेत गुरुगृही शिक्षण पूर्ण झाल्यानंतर गृहस्थाश्रमाचा अधिकारी म्हणून विद्यार्थी स्वगृही परत येंत असे. त्याच्यावर कर्तव्यनिष्ठेचे, सामूहिक जीवनातील समतेचे, चारित्र्यगुणांचे आणि यज्ञप्रधान जीवनदृष्टीचे संस्कार झालेले असत. जीवन इंद्रियजन्य सुखांच्या अनिर्बंध उपभोगासाठी नसून त्याचे अंतिम लक्ष्य आपल्या अविच्छिन्न आनंदमय स्वरूपात प्रविष्ट होणे हेच आहे हे विद्यार्थि-दशेतच त्याला गुरुमाउलीने समजावून सांगितलेले असे. आत्मिक चैतन्य मानवी देहाच्या आश्रयाने राहते व त्या चैतन्याचा साक्षात्कार करून घेणे मानवजन्मातच शक्य असते, म्हणून मानवदेहाचे महत्त्व. शरीर, मन, बुद्धी यांचे सहाय्य जीवनलक्ष्याकडे जाताना अपरिहार्य ठरते. म्हणून त्यांच्या गरजा व त्यांचा विकास याची व्यवस्था विचारवंतांनी गृहस्थाश्रम या दुसऱ्या आश्रमाच्या रूपाने केली. धर्माला अनुकूल अशा प्रकारे उपभोग याच आश्रमात माणूस घेऊ शकतो. समाजातील विविध उपक्रमांना आधारभूत ठरणारा हाच आश्रम आहे. धर्माचरणानेच अभ्युदय आणि निःश्रेयस ही जीवनाची दोन्ही अंगे पुष्ट होतात. ते एकदेशी न राहता समग्र वनते. असे तृप्त, शांत आणि समग्र जीवन समष्टीलाही स्थैर्य, शांती आणि सुख-समृद्धी प्राप्त करून देते.

भारतीय संस्कृतीचे थोर अभ्यासक आणि भाष्यकार डॉ. राधाकृष्णन् यांनी आपल्या 'पूरब और पश्चिम' (इस्टर्न रिलिजन्स अँड वेस्टर्न थॉट्स) या ग्रंथात भारतीय संस्कृतीचे हे वैशिष्ट्य उत्तम प्रकारे स्पष्ट केले आहे. ते म्हणतात – " आत्मा शरीराहून वेगळा आहे असे आपण म्हणतो व ते सत्य आहे. पण त्याबरोबरच हेही सत्य आहे की शरीर व आत्मा यांचा एकमेकांशी अत्यंत घनिष्ठ संबंध आहे. काही आध्यात्मिक बाबी अशा आहेत की, ज्या शरीराची सुखोपभोगेच्छा तृप्त होण्यावरच अवलंबून असतात. जीवनाचे शारीरिक व आर्थिक पैलू सर्वाधिक महत्त्वाचे नसतील, पण आध्यात्मिक वाट-चालीत या उभय पैलूंना निश्चितच अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे." (पृ. ४१६)

स्त्री-जीवनाच्या दृष्टीने गृहस्थाश्रमाचे असलेले खास महत्त्व देखील ध्यानात घेतले पाहिजे. स्नेह, प्रेम, ममता ही 'नारी 'ची फार प्रबळ प्रेरणा असते. 'गृहिणी' या नात्याने तिच्या या स्वाभाविक प्रेरणेला गृहस्थाश्रमात मुक्त वाव मिळतो. केवळ शारीरिक वासनातृप्तीचा समाजमान्य राजमार्ग एवढीच विवाहसंस्काराची किंवा गृहस्थाश्रमातील प्रवेशाची कल्पना आपल्या सांस्कृतिक परंपरेने ठेवलेली नाही. स्त्री आणि पुरुष – वधू आणि वर – यांच्या

आत्मिक मीलनाचा आणि विकासाचा हा पवित्र संस्कार आपण मानलेला आहे. भारतीय संस्कृतीत 'स्त्री' ही उपभोग्य वस्तू नाही, तर माता हे तिचे आदर्श स्वरूप आहे. पातिव्रत्य हा धर्म आहे, मातृत्व हे दायित्व आहे. नारी हे नराचे अर्धांग आहे. ती पतीची सहधर्मचारिणी आहे. स्त्री ही गृहस्वामिनी आहे. 'धर्मे च अर्थे च कामे च नातिचरामि' या अभिवचनासह पुरुष तिचा स्वीकार करीत असतो, हे कटाक्षाने ध्यानात घेणे जरूर आहे. स्त्री आणि पुरुष ही एकाच रथाची दोन चाके अशी समानता आहे. प्रसन्न, तृप्तिदायक आणि समाजाभिमुख गृहस्थाश्रम हे एकात्म मानव दर्शनाचे एक महत्त्वाचे आणि गौरवशाली दालन आहे. माणूस घडविणारी ही गृहस्थाश्रम-संस्था जेवढी निरोगी आणि कार्यक्षम असेल, तेवढा समाज सुस्थितीत राहतो.

व्यक्तिस्वातंत्र्याचा स्वैराचारात परिणत होणारा अतिरेक किंवा माणसाचे व्यक्तित्व नष्ट करून त्याला साचेबंद पद्धतीचा गुलाम बनविण्याचा शासन-संस्थेचा प्रयास अशा दोन्ही प्रकारांनी कुटुंबसंस्था संकटात सापडू शकते. पण जागतिक अनुभवच असा आहे की जेव्हा जेव्हा असा अतिरेक होतो तेव्हा मानवी सुख, शांती आणि प्रगती यांना गंभीर धोका निर्माण होतो, अमर्याद व्यक्तिस्वातंत्र्याकडे झुकलेल्या पाश्चात्य समाजांची धारणा डळमळित झाली आहे. देहसुख आणि उपभोग यांनी झपाटलेल्या मनात अतृप्तता आणि विफलता घर करून बसतात, घरे मोडतात आणि अनंत सामाजिक समस्या उद्‌भवतात. या विकृती विशेषत्वाने सामाजिक स्वरूपाच्या असतात. दुसरीकडे रशियाने कुटुंब ही संस्थाच उद्‌ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला. पण तो यशस्वी होऊ शकला नाही. आणि या दिशेने उचललेली पावले रशियाला मागे घ्यावी लागली. सुखी परिवार ही माणसाची अनिवार्य शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक गरज आहे. ही गरज ओळखून व्यक्तिगत प्रपंच न करता समाजाचा प्रपंच ज्यांनी केला अशी माणसे विरळा. जिथे सामूहिक प्रमाणावर गृहस्थाश्रमाकडे पाठ फिरविण्याचा प्रयत्न झाला तिथे अनीती व दंभाचार यांचे प्राबल्य झाल्याचा अनुभव आहे. हिप्पी, नन, बौद्ध भिक्षू आणि भिक्षुणी किंवा आपल्याकडील बालविधवा यांचे दाखले अनैसर्गिक बंधनांमुळे निर्माण होणारी कुचंबणा निदर्शनास आणून देण्यास पुरेसे आहेत. म्हणून गृहस्थाश्रम सर्व-सामान्य लोकांना श्रेयस्कर मानला गेला आहे व तो उत्कृष्ट होण्यासाठी अनेक यम–नियम पूर्वसूरींनी सांगितले आहेत. शाश्वत मानवी प्रकृतिधर्माशी

त्यांची संगत साधली आहे.

थोडक्यात समाजात गृहस्थाश्रम धर्माधिष्ठित असला तर समाजाला सुखसमृद्धी, कर्तव्याभिमुख नागरिक आणि अन्य समाजोपयोगी संस्थांचे संवर्धन यांचा बहुमोल लाभ होतो. समाजाचा खऱ्या अर्थाने विकास होतो.

संन्यास आणि वानप्रस्थाश्रम

आश्रम-व्यवस्थेतील हे दोन अंतिम आश्रम व्यवहारतः लुप्त झाल्यासारखेच दिसतात. कारण वानप्रस्थ म्हणजे प्रपंचाच्या व्यापातून निवृत्त होऊन वनात प्रस्थान करणे. नागरजीवनापासून दूर जो काळ व्यतीत करावयाचा, त्यात चित्त परमेश्वराकडे जास्तीत जास्त लावण्याचा प्रयत्न अभिप्रेत होता. हा आश्रम पत्नीसह स्वीकारता येत असे. निवृत्ती अंगी पूर्णपणे बाणली की संन्यास घ्यावयाचा. म्हणजे ममत्वाचे सारे बंध तोडून टाकावयाचे, घरादारावर तुळशीपत्र ठेवावयाचे आणि भगवी वस्त्रे परिधान करून कुठेही मन गुंतू न देता अखंड संचार करावयाचा. त्याच अवस्थेतून पुढे योगबळाने देहत्यागही करावयाचा ! गृहस्थ आणि वानप्रस्थ हे दोन आश्रम पूर्ण करून नंतर चतुर्थ आश्रम स्वीकारावयाचा, असाही कडक नियम नव्हता. ज्या क्षणी कडकडीत वैराग्य निर्माण होऊन सर्व-संग-परित्यागाची इच्छा होई त्या क्षणी संन्यासग्रहणास अनुमती होती. एकदम संन्यासाश्रम स्वीकारलेल्या कितीतरी महापुरुषांची उदाहरणे आपल्याला गतकाळात पहावयास मिळतात. ज्यांनी भारतवर्षात पुनश्च अद्वैत वेदान्ताचे सार्वभौमत्व प्रस्थापित करून विविध प्रकारे समन्वयाद्वारे राष्ट्रीय एकात्मतेचे बंध दृढ केले त्या श्रीमत् आद्य शंकराचार्यांनी वयाच्या आठव्याच वर्षी संन्यास घेतला होता. अगदी अलीकडे स्वामी विवेकानंद आणि त्यांचे तरुण सहकारी यांना श्री रामकृष्ण परमहंसांनीच संन्यासदीक्षा दिली होती. विवेकानंदांनी रामकृष्ण मिशनमध्ये संन्यासी सेवकांची परंपरा (Sanyasi Order) चालू केली परंतु सर्वसंगपरित्यागी तरुणवर्ग रामकृष्ण मिशनला अपेक्षेप्रमाणे उपलब्ध झाला नाही ही वस्तुस्थिती आहे. सध्या ते अवघडही आहे. म्हणून सामाजिक दृष्टीने वर्तमानकाळाच्या गरजा ध्यानात घेऊन वानप्रस्थ व संन्यास या दोन्ही आश्रमांचा काही नवा आशय पुढे ठेवला पाहिजे.

वानप्रस्थाश्रमाचा अरण्यवासाशी संबंध जोडण्याचे आता काही कारण

नाही. गृहस्थाश्रमातील जबाबदाऱ्या उत्तम प्रकारे पार पाडल्यानंतर नव्या पिढीच्या स्वाधीन कारभाराची सारी सूत्रे करून आणि मनाने प्रपंचातून निवृत्त होऊन आपला बव्हंश वेळ समाजसेवेसाठी व्यतीत करण्याची निरपेक्ष सेवावृत्ती हा आता वानप्रस्थाश्रमाचा गाभा बनला पाहिजे. अनेक सेवाकार्यांना अनुभवी आणि प्रौढ माणसे हवी असतात. तिथे या वानप्रस्थींनी गेले पाहिजे व ती कामे मार्गी लावली पाहिजेत. उपजीविकेच्या व्यवसायातून निवृत्त झालेला एक मोठा सेवानिवृत्तांचा वर्ग आता समाजात उभा झाला आहे. त्यांनी जर असे सेवेचे व्रत घेतले तर फार मोठ्या कार्याला देशात गती मिळू शकेल. शक्य तेथे पति-पत्नींनी मिळून ही कामे करणे अधिक चांगले. ' विश्व हिंदु परिषद ' वनवासी कल्याण आश्रम, वसतिगृहे, रुग्णालये, ध्येयवादी शिक्षणसंस्था, सहकारी संस्था इत्यादी अनेक क्षेत्रांत निःस्वार्थी, प्रामाणिक, परिश्रमी आणि विशुद्ध सेवाभावाने काम करणाऱ्या माणसांची आज निकड आहे. ही गरज भागली पाहिजे.

संन्यासी-जीवनाचा संबंध भगव्या रंगाचे कपडे वा एकांत समाजविमुख कालक्रमणा यांच्याशी अपसमजाने जोडला जातो. त्याचे निराकरण पं. दीनदयाळजी यांनी केले आहे, आणि संन्याशांनी आजवर केलेल्या थोर कामगिरीला गौरविले आहे. ते लिहितात– " लोकांना असे वाटते की संन्यासी म्हणजे आपला देश, आपला समाज आदी कशाचाही विचार न करता समाजापासून दूर कोठे तरी एका कोपऱ्यात धुनी पेटवून बसणारी व्यक्ती. परंतु संन्याशासंबंधीची ही धारणा चुकीची आहे. संन्यास निष्क्रियतेचे प्रतीक नसून महान् कार्याचे प्रेरणास्थान आहे. संन्यास म्हणजे अखंड कर्मयोग.

आपल्याकडील साधुसंन्यासी जीवनातील सर्व मोहांकडे पाठ फिरवून आपले संपूर्ण जीवन देशाच्या, समाजाच्या सेवेसाठी खर्च करीत असत. त्यांचा सर्वत्र संचार असे. तीन दिवसांपेक्षा अधिक काळ ते एका जागी रहात नसत. आपल्या परंपरागत पद्धतीने या समाजाला ज्ञानसंपन्न, समर्थ, सुखी बनविण्यासाठी हे संन्यासी अखंड कर्मशील असत. देशातील नवनव्या पिढीला राष्ट्रीयत्वाचे पाठ देण्याचे काम संन्याशांनीच केले. त्यांचा त्याग, परिश्रम आणि सेवा यांमुळे आसेतुहिमाचल संपूर्ण भारत एकतेच्या सूत्राने बांधला गेला आहे. ऐहिक बंधनांपासून मुक्त असलेले त्यांचे त्यागमय जीवन सर्व प्रांतांतील लोकांना, सर्व भाषाभाषिकांना आदरणीय, वंदनीय झाले. आजच्यासारखी प्रवासाची सुगम साधने उपलब्ध नसलेल्या काळात त्यांनी भगीरथ प्रयत्नांनी हे कार्य करून दाखविले."

तेव्हा बाह्यतः चारचौघांप्रमाणे रहाणी आणि वेष ठेवूनही वृत्ती संन्याशाची असू शकते. पं. दीनदयाळजींनी संन्याशाचे जे गुणविशेष सांगितले आहेत आणि त्यांच्या ज्या श्रेष्ठ कार्याचा उल्लेख केला आहे, तदनुसार जीवन असलेले हजारो संन्यासी आजही समाजजीवनाच्या विविध क्षेत्रांत कार्य करीत असलेले आपल्याला दिसतात. त्यांच्या अंगावर भगवी वस्त्रे असण्याचा वा नसण्याचा प्रश्न गौण आहे. पं. दीनदयाळजी स्वतः अशा प्रकारचे श्रेष्ठ कोटीचे संन्यासी कर्मयोगी होते हेही या संदर्भात उल्लेखनीय आहे. हिंदु तत्त्वज्ञ आणि समाज-शास्त्रज्ञ यांनी संन्याशाच्या रूपाने एक प्रकारे मानवी जीवनाची भव्योदात्त संकल्पनाच पुढे ठेवली आहे असे म्हणावयास प्रत्यवाय नाही. भारताचा हा आदर्श मानव, ग्रीसचा उदारधी मानव किंवा मध्य-युगीन युरोपचा दुर्दान्त पराक्रमी योद्धा पुरुष यांच्यापेक्षा मूलतःच वेगळा आहे. या भारतीय आदर्शाचे स्वरूप सांगताना डॉक्टर राधाकृष्णन् म्हणतात - " आत्म्याची स्वतंत्रता आणि निर्भयता, अडचणीच्या व पराभवाच्या विचारांना देखील थारा नसलेले धैर्य, साऱ्या विश्वाला व्यापून राहिलेल्या परमेश्वरी सत्तेवर श्रद्धा, सर्वांभूती निरपेक्ष अमृतमय प्रेम आणि स्वतःच्या जीवनासंबंधी 'मैं नहीं तू ही' ही संन्याशाची विशेष लक्षणे होत."

अशा संन्यस्त वृत्तीच्या महाभागांची समाजात सर्वकाळी आवश्यकता राहाणारच.

आश्रमांची परस्परपूरकता

सारांश, आश्रमव्यवस्था प्रामुख्याने व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी असली, तरी सामाजिक विकासाला ती प्रत्येक पायरीवर पूरक ठरावी अशीही योजना असे. व्यक्ती व समष्टी यांची परस्परपूरकता हा पं. दीनदयाळजींच्या एकात्म मानव दर्शनाचा महत्त्वाचा भाग असल्यामुळे या दृष्टीने थोडी संगती ध्यानात घेणे उपयुक्त ठरेल.

पहिला आश्रम ब्रह्मचर्याश्रम. या आश्रमात व्यक्तीने शारीरिक व मानसिक दृष्टीने जीवनाची पायाभरणी करावयाची असते हे तर खरेच, पण त्याबरोबर समाजाच्या या ना त्या गरजा पूर्ण करण्याचे शिक्षणही घ्यावयाचे असते. या काळातील अभ्यास-विषयात 'वर्णधर्मात नैपुण्य' या विषयाचाही समावेश करण्यात आला आहे. या विषयाचे विशेष महत्त्व असे की, अध्ययन संपवून स्वगृही परतल्यानंतर निश्चितच गृहस्थाश्रम स्वीकारावा लागत असे. या

आश्रमात पारिवारिक जीवनातील सुखांचा आस्वाद घेत असतानाच चरितार्था-साठी वर्णधर्मानुसार कर्म (आजच्या परिभाषेत उद्योग-व्यवसाय) करणे आवश्यक असे. हे कर्म अर्थातच समाजाच्या काही गरजा पूर्ण करण्यासाठी असे. कोणी अध्ययन-अध्यापन करी, कोणी शेती-व्यापार करी, कोणी समाज व राष्ट्र यांच्या संरक्षणासाठी शस्त्रधारी होई, तर कोणी शारीरिक सेवेची कामे अंगीकारी. 'शिक्षण समाजाकडून व्यक्तीकडे आणि कर्म व्यक्तीकडून समाजाकडे' या सूत्रानुसार समाजाकडून शिक्षण घेतल्यानंतर समाजाच्या विविध आवश्यकता ओळखून त्यांपैकी काहींची पूर्तता आपल्या प्रकृतीनुसार करण्यासाठी कर्मशील बनणे हे व्यक्तीचे समष्टिधर्मानुसार कर्तव्यच ठरते.

या सूत्राचा उत्तरार्ध म्हणजे 'योगक्षेम समाजाकडून व्यक्तीकडे आणि यज्ञ व्यक्तीकडून समाजाकडे' म्हणजे व्यक्तीला उपजीविकेचे साधन समाजाकडून लाभते. पण त्याबरोबर समाजऋणाची फेड करण्यासाठी निरपेक्षपणे समाजाला काही देण्याचे म्हणजे 'इदं न मम' म्हणून समाजाला काही समर्पण करण्याचे कर्तव्य ओघानेच प्राप्त होते. या समर्पणाचेच दुसरे नाव यज्ञ. ब्रह्मचर्य, वानप्रस्थ व संन्यास या तीन्ही अन्य आश्रमांचा आधार मुख्यतः गृहस्थाश्रम असतो. धर्मसंमत उपभोग व उपलब्ध साधनांपैकी काही भागाचा समाजासाठी विनियोग असे हे चक्र आहे. यात समाजाची धारणा आणि व्यक्तीचा विकास या दोन्ही गोष्टी एकाच वेळी साध्य होतात. वानप्रस्थ आणि संन्यास या आश्रमांत व्यक्तीच्या गरजा कमी कमी होतात आणि समाजाकडून काही मागावे अशी भूमिकाच नसते. आत्मीयतेच्या कक्षा कुटुंबाच्या भिंती ओलांडून विशाल बनतात. 'हे विश्वचि माझे घर । ऐसी मति जयाची स्थिर। किंबहुना। चराचर आपण जाहला ॥' या अनुभूतिपर्यंत माणूस जाऊन पोचतो. अशा तादात्म्याने सेवाशील बनतो. व्यक्तिगत दृष्टचा वासनामुक्त व सामाजिक दृष्टचा ऋणमुक्त होण्याची ही परिपक्व अवस्था असते.

वर्णव्यवस्था

व्यक्तिजीवन व समष्टिजीवन सुसमन्वित चालावे, त्यांचा विकास व्हावा, या दृष्टीने निर्माण झालेल्या दोन प्रमुख व्यवस्थांपैकी मुख्यत्वे व्यक्तिजीवनाशी निगडित असलेल्या आश्रम-व्यवस्थेसंबंधी विचार येथवर झाला. आता प्रामुख्याने समष्टिजीवनाशी संबंधित असलेल्या वर्णव्यवस्थेचा विचार करू.

या संदर्भात पहिली गोष्ट ध्यानात येते ती अशी की, ही वर्णव्यवस्था मूळ स्वरूपात आज अस्तित्वात नाही. परंतु असे असूनही तो एक वादंगाचा विषय झालेला आहे. आजवर अनेकदा या प्रश्नावरून रणे माजली आहेत, आणि अजूनही तो विषय अधूनमधून उसळी मारून वर येतच असतो. याचे प्रमुख कारण हे आहे की, या वर्णव्यवस्थेतील 'व्यवस्था' हा महत्त्वाचा भाग संपला आहे. आणि वर्ण हा भाग जातिसंस्थेशी निगडित होऊन उच्चनीचतेच्या विकृत कल्पनांच्या स्वरूपात विद्यमान आहे.

वर्णव्यवस्थेच्या एकांतिक समर्थकांचे म्हणणे असे असते की, ही व्यवस्था ईश्वरनिर्मित आहे. म्हणजेच ती एखादी रूढी वा मानवनिर्मित व्यवस्था नसून तो सनातन धर्माचाच एक भाग आहे. दुसरे म्हणजे व्यक्तीला प्राप्त होणारा वर्ण हा तिच्या पूर्वजन्मातील कर्मानुसार ठरत असल्याने ही व्यवस्था जन्माधिष्ठित आहे, म्हणजेच ती कुलाधिष्ठितही आहे. वर्णव्यवस्थेला अनेकांचा तात्त्विक विरोध आहे तो याच मुद्यावर.

आजच्या विज्ञानाच्या, व्यक्तिस्वातंत्र्याच्या आणि सामाजिक समतेच्या युगात, अज्ञात पूर्वजन्मातील पापपुण्याच्या आधारे व्यक्तीला जन्मतःच – आणि जन्मभर – एखाद्या चौकटीत जखडून ठेवणाऱ्या आणि अशा प्रकारे समाजात विभेद निर्माण करणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध काहूर उठावे यात आश्चर्य नाही.

वर्णव्यवस्थेला विरोध करणाऱ्यांचा दुसरा गट आहे तो स्वार्थसाधू पुढाऱ्यांचा. मग ते पुढारी समाजवादी क्षेत्रात पुरोगामी म्हणून प्रतिष्ठा मिळवू पाहाणारे असतील, किंवा या प्रश्नाचे भांडवल करून सत्तेचे राजकारण खेळणारे असतील. त्यांनी धारण केलेला मुखवटा सैद्धांतिक विरोधाचाच असला तरी त्यांचा अंतःस्थ हेतू स्वतःचा स्वार्थ साधणे हाच असतो. अशा प्रकारे जे लोक निव्वळ स्वतःच्या या ना त्या स्वार्थासाठीच वर्णव्यवस्थेतील विकृतीचे भांडवल करीत असतात, त्यांचा विचार येथे प्रस्तुत नाही. परंतु या व्यवस्थेला ज्यांचा तात्त्विक वा मानवतावादी भूमिकेतून विरोध आहे त्यांची दखल घेणे आवश्यक आहे.

या वर्णव्यवस्थेच्या सद्यःस्थितीसंबंधी दीनदयाळजी म्हणतात– "शतकानुशतकांच्या दीर्घ कालखंडातून सामाजिक उत्थानपतनरूपी लाटांच्या आघातांमुळे ही व्यवस्था आज दुर्बल झाली आहे. या व्यवस्थेतील दोष शोधू पहाणाऱ्यांच्या मनात ही व्यवस्थाच समाप्त करण्याचा विचार यावा इतके दोष आज

या व्यवस्थेत शिरले आहेत. या व्यवस्थेमध्ये आज अनेक विकृती शिरल्या आहेत, आणि त्या विकृती आपल्याला दूर कराव्या लागतील हे अगदी खरे आहे. म्हणजे वर्णव्यवस्थेला काही लोकांचा सद्हेतूतून जो विरोध आहे, त्याच्याशी पं. दीनदयाळजी सहमत आहेत. परंतु एखाद्या व्यवस्थेमध्ये काही कारणाने दोष निर्माण झाले म्हणून लगेच ती संपूर्ण व्यवस्थाच त्याज्य ठरते या निष्कर्षाशी ते सहमत नाहीत. त्यांच्या मते एखाद्या व्यवस्थेचे मूल्यांकन एवढ्या उथळपणे करणे बरोबर नाही. या संबंधात त्यांनी एक मौलिक विचार मांडला आहे. ते म्हणतात–"व्यवस्थेसंबंधी आपण एक सत्य नीट समजून घेतले पाहिजे. व्यवथेची दोन अंगे असतात. एक आंतरिक व दुसरे बाह्य. आंतरिक भावना आणि बाह्य चौकट या गोष्टी प्रत्येक व्यवस्थेत असतातच. आंतरिक तत्त्वाच्या आविष्कारासाठी कोणतीतरी बाह्यचौकट आवश्यकच असते. परंतु आंतरिक तत्त्व हेच शेवटी महत्त्वाचे आहे हे आंतरिक तत्त्व हाच त्या व्यवस्थेचा पाया असतो. ते तत्त्व जाणून घेणे म्हणजेच त्या व्यवस्थेचे रहस्य समजून घेणे होय."

आता चातुर्वर्ण्य हीही एक व्यवस्थाच असल्याने तिचे यथार्थ स्वरूप आणि मूल्य समजून घेण्यासाठी आपल्याला याच दृष्टीने विचार करावा लागेल. असा विचार करू लागले म्हणजे स्वाभाविकपणेच असा प्रश्न उपस्थित होतो की, या व्यवस्थेमागचे आंतरिक तत्त्व कोणते ? दीनदयाळजींनी 'सामंजस्यपूर्व समाज-व्यवस्था' या लेखात त्याचे पुढीलप्रमाणे विस्ताराने विवेचन केले आहे.

"समाजजीवनाच्या विविध आवश्यकतांपैकी या ना त्या आवश्यकता पूर्ण करण्यामध्ये सहभागी होऊन व्यक्तीला समष्टिधर्माचे पालन करता यावे, आणि त्याच बरोबर स्वतःचाही विकास करीत तिला समाजसेवेसाठी अधिकाधिक समर्थ बनता यावे या दृष्टीने आपल्या येथे वर्ण-व्यवस्था उदयास आली. समाजाच्या गरजा विविध प्रकारच्या असतात. काही बौद्धिक स्वरूपाच्या असतात, अंतर्बाह्य संरक्षणविषयक असतात; शेती, पशुपालन, हस्तोद्योग, कला, जीवनावश्यक विविध वस्तूंचे उत्पादन व वितरण अशी कितीतरी कामे समाजात सुरळीतपणे चालावी लागतात. समाजाच्या या सर्व गरजा व्यक्तीच्या परिश्रमातूनच पूर्ण व्हायच्या असतात. व्यक्तीला आपल्या गुणकर्मानुसार समाजाची सेवा करता यावी, तिच्यातील श्रेष्ठ गुणांचा आविष्कार आणि विकास व्हावा, आणि ही प्रक्रिया होत असताना समाजानेही दोन पावले पुढे सरकावे या दृष्टीने समाजांतर्गत केलेल्या व्यावहारिक व्यवस्थेला वर्णव्यवस्था हे नाव देण्यात आले. या

व्यवस्थेमुळे व्यक्तीला तिच्या जीवनाचे कार्यक्षेत्र व उपजीविकेचे साधन प्राप्त होत असे, आणि समाजाच्या विविध गरजाही पूर्ण होत असत.

ज्यांच्या ठिकाणी पोरुष, पराक्रम, साहस आदी गोष्टी होत्या ते समाजाच्या संरक्षणासाठी पुढे सरसावले. ज्यांचा ज्ञानसाधनेकडे कल होता त्यांनी ज्ञानविज्ञानात प्रगती करण्याचे, तसेच अध्ययन–अध्यापनाचे क्षेत्र स्वीकारले. कला, विद्या, वाणिज्य, व्यापार, गोपालन इत्यादी गोष्टींत पारंगत असलेल्या लोकांनी समाजाच्या भरणपोषणाची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली. ज्यांना यांपैकी कोणत्याही गोष्टी विशेष जमण्यासारख्या नव्हत्या त्यांनी समाजाच्या लहानसहान गरजांची पूर्ती करण्याचे उत्तरदायित्व स्वीकारले.

वर्ण-व्यवस्थेत जे लोक श्रेष्ठ–कनिष्ठ असा भेद पहातात ते खरोखरच अंध आहेत. वर्णव्यवस्था म्हणजे भेद नसून ती एक एकात्म व्यवस्था आहे. एका व्यक्तीच्या ठिकाणी जशी एकात्मता असते तशीच या समाजपुरुषाच्या ठायीही असली पाहिजे या भावनेने ही व्यवस्था निर्माण करण्यात आली. संपूर्ण समाजाला सर्व प्रकारची भौतिक आणि आध्यात्मिक सुखे सुलभतेने प्राप्त करून देणारी ही व्यवस्था आहे." (राष्ट्रजीवनाची दिशा)

वर्णव्यवस्थेचे मूल्यांकन करताना, त्या व्यवस्थेचे हे आंतरिक तत्त्व आणि मूलभूत स्वरूप समजून घेणे अत्यावश्यक आहे. कोणताही व्यवसाय हा एका बाजूने व्यक्तीच्या योगक्षेमाचे साधन असतो. त्याबरोबर तो एकात्म समाजजीवनाचाही भाग असतो, समाज पुरुषाच्या सेवेचे माध्यम असतो, ही जाणीव आणि भावना असली म्हणजे मग कर्माला रूढीमुळे, अज्ञानामुळे वा विकृत अहंकारामुळे चिकटलेले, चिकटविले गेलेले श्रेष्ठ-कनिष्ठतेचे भाव आपोआप गळून पडतील, मग प्रत्येक कर्म श्रेष्ठच वाटू लागेल. अशा भावनेने केलेल्या कर्मातून व्यक्तीची व समाजाची ऐहिक, प्रगती तर होईलच. शिवाय 'यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम्। स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः।।' या गीतावचनानुसार तिच्या आध्यात्मिक उन्नतीचीही वाटचाल सुकर होईल.

अर्थात् त्याचबरोबर हेही तितकेच खरे आहे की, एके काळी व्यक्ती आणि समाज यांच्या धारणेला, उन्नतीला अत्यंत उपयुक्त ठरलेली वर्णव्यवस्थेची प्राचीन चौकट आज कालबाह्य झाली असेल तर तिला कवटाळून बसण्याचे वा तिच्या नावाने अश्रू ढाळण्याचे काहीच कारण नाही. शेवटी चौकट चित्रासाठी असते, चित्र चौकटीसाठी नसते. जपावयाचे असते ते चित्र. त्याच न्यायाने

वर्णव्यवस्थेच्या बाबतीत जपावयाचे आहे ते त्या व्यवस्थेचे समाजधारक प्राणतत्त्व. एकात्म समाजजीवनाची दृष्टी. जुनी चौकट जीर्णशीर्ण झाली असेल तर कालानुरूप नवी चौकट उभी करता येईल; केली पाहिजे. ती उभी करणे हाच युगधर्म ठरेल. परंतु जुनी चौकट नष्ट करण्याच्या आवेशात या आंतरिक तत्त्वाचीच मोडतोड झाली तर नवी चौकट कितीही सुबक आणि नक्षीदार असली तरी तिची किंमत लाकडाच्या निष्प्राण बाहुलीएवढीच असेल.

• • •

९

समष्टी ते परमेष्टी

पुरुषार्थ चतुष्टयसंपन्न व्यक्तिजीवनापासून प्रारंभ करून पुढे परिवार, समाज, राष्ट्र आणि संपूर्ण मानव समाज या वाढत्या कक्षांचा आणि त्यांच्या-मधील परस्पर एकात्म संबंधांचा विचार आपण आतापावेतो केला. परंतु भारतीय संस्कृतीच्या भूमीत फुललेले हे एकात्म दर्शन केवळ मानवापाशी येऊन न थांबता निसर्गातील मानवेतर प्राणिसृष्टी, वनस्पतिसृष्टी आणि इतर प्रकृति-दत्त इतर गोष्टींचाही विचार करते. मानवी जीवनाचा सर्वांगीण विचार करीत असताना या सर्व गोष्टींचाही त्यात अंतर्भाव करणे हे एक परिपूर्ण एकात्म दर्शन या नात्याने युक्त आणि अपरिहार्य आहे. हवा, पाणी, सूर्यप्रकाश, वनस्पती, अन्य प्राणी, खनिज संपत्ती आदी आपल्या जीवनाशी एवढ्या निगडित आहेत की, त्याविना जीवनातील केवळ सुखोपभोगच नव्हे तर प्रत्यक्ष जीवनही अशक्यप्राय होऊन बसेल. प्राणिसृष्टी आणि वनस्पतिसृष्टी यांच्यामध्ये अहर्निश चालू असलेली ऑक्सिजन व कार्बन–डाय–ऑक्साइड वायूंची देवाणघेवाण आणि या देवाणघेवाणीवर अवलंबून असलेले त्या उभयतांचे जीवन हे एक उदाहरण देखील हा मुद्दा स्पष्ट करण्यास पुरेसे आहे. निसर्गदत्त वस्तूंपैकी हवा आणि पाणी यांचा पुरवठा विपुल आहे. (विविध प्रकारच्या यंत्रोद्योगांच्या अनिर्बंध वाढीतून आणि केंद्रीकरणातून निर्माण होणाऱ्या प्रदूषणामुळे शुद्ध हवा आणि शुद्ध पाणी यांचा पुरवठा हाही आता चिंतेचा विषय होऊन बसला आहे.) त्या मानाने वनस्पतिसृष्टी, मानवतेवर प्राणिसृष्टी, खनिज द्रव्ये यांसारख्या गोष्टी मर्यादित असतात. त्यामुळे त्यांचा उपयोग संयमानेच कराव-

यास हवा. परंतु भौतिक सुखोपभोगाच्या, चैनीच्या अधिकाधिक वस्तू उपलब्ध करण्याच्या धुंदीत माणूस या निसर्गदत्त संपत्तीचा बेछूटपणे वापर करीत आहे. या मर्यादित संपत्तीचा आपण असा अनिर्बन्ध वापर करीत राहिलो तर ती आपणांस किती काळ पुरेल हा प्रश्नच आहे. साधनसामुग्रीच्या निसर्गदत्त साठ्यालाही शेवटी मर्यादा असतेच हे विसरून चालणार नाही.

तथापि, नैसर्गिक संपत्तीच्या वापराचा विचार, तिचा साठा किती कमी वा अधिक आहे, आणि तो किती काळ वापरण्यासारखा आहे, केवळ याच एका दृष्टिकोनातून करून चालणार नाही. निसर्गातील वेगवेगळ्या वस्तूंमध्ये एक प्रकारचा परस्परावलंबी संबंध (सायक्लिक रिलेशनशिप) आणि समतोल असतो, तोही विचारात घेतला पाहिजे. सुखोपभोगाच्या हव्यासापायी आपण या नैसर्गिक साधनसामुग्रीची स्वैर उधळपट्टी करू लागलो तर हा समतोल ढासळून त्याचे भीषण दुष्परिणाम भोगावे लागणारच !

नैसर्गिक संपत्तीच्या अविचारी उधळपट्टीचे उदाहरण म्हणून सध्या आपल्या देशात चालू असलेल्या बेसुमार जंगलतोडीकडे अंगुलिनिर्देश करता येईल. याबाबत केलेल्या एका सर्वेक्षणाच्या अहवालानुसार भारताच्या एकूण तेहतीस कोटी हेक्टर भूभागापैकी सुमारे सात कोटी हेक्टर म्हणजे एक पंचमांश भूभागावर जंगले अस्तित्वात आहेत. देशातील एकूण भूक्षेत्रापैकी एक तृतीयांश क्षेत्र वनाखाली असावे आणि त्यापैकी साठ टक्के वने डोंगर–टेकड्यावर असावीत अशी शिफारस राष्ट्रीय वनधोरण समितीने १९५२ साली केली होती. परंतु वनखात्याच्याच आकडेवारीनुसार प्रतिवर्षी सुमारे ४५ लाख हेक्टर जमिनीवरील जंगलाची तोड होत आहे.

या जंगलतोडीचे दुष्परिणाम पावसाची अनियमितता, जमिनीच्या सुपीक अशा वरच्या थराची प्रचंड प्रमाणावर होणारी धूप आदी रूपाने देशातील शेती-उत्पादनाला जाणवू लागले आहेतच, परंतु अन्य क्षेत्रांतही याचे दुष्परिणाम दृष्टोत्पत्तीस येऊ लागले आहेत. उदा., देशाचा झपाट्याने आर्थिक विकास व्हावा या उद्देश्याने बांधलेल्या मोठ्या धरणांच्या जलाशयातील गाळ साठण्याचा वेग गेल्या काही वर्षांत चौपट झाला आहे. जंगलतोडीमुळे जमिनीची जी धूप होत असते तिचे हे फलित आहे. त्यामुळे या जलाशयांच्या उपयुक्ततेची मुळात गृहीत धरलेली कालमर्यादा बरीच कमी होत चालली आहे.

मानवेतर प्राणिसृष्टीच्या संहाराची कथाही अशीच आहे. परकीय

चलनाच्या हावेपोटी वाघ, साप, माकडे, मोर आदी वन्य प्राण्यांचा अनिर्बंध संहार चालू आहे. बेडकांच्या तंगड्यांच्या निर्यातीसाठी बेडकांची जी हत्त्या होते त्यामुळे खोडकिड्यांचा उपद्रव वाढून, ठाणे व रायगड जिल्ह्यांतील भात-शेतीचे अपरिमित नुकसान होत आहे. हा विषय विधानसभेतच नव्हे तर लोकसभेतही जाऊन पोहोचला आहे.

मानवाने निसर्गाचे हे जे बेछूट शोषण चालविले आहे त्यासंबंधी पं. दीनदयाळजी म्हणतात – "सोद्देश्य, सुखी, विकासशील जीवनासाठी ज्या भौतिक साधनांची गरज असते, ती साधने आपणास अवश्य मिळाली पाहिजेत. ईश्वराने निर्माण केलेल्या सृष्टीचा नीट अभ्यास केला तर असे आढळेल की, किमान एवढी तरतूद ईश्वराने निश्चितच केलेली आहे. परंतु ईश्वराने माणसाला केवळ उपभोगासाठी निर्माण केले आहे असे समजून आपण आपली सारी शक्ती व उपलब्ध साधनसंपत्ती बेछूटपणे खर्च केली तर ते योग्य ठरणार नाही. इंजिन चालविण्यासाठी कोळशाची जरूरी असते; परंतु कोळसा खपविण्यासाठी इंजिन तयार केलेले नसते. कमीतकमी जळणाचा वापर करून जास्तीतजास्त शक्ती कशी निर्माण करता येईल यासाठी आपण प्रयत्नशील असतो. हाच योग्य दृष्टिकोन आहे. त्यामुळे मानवी जीवनाचा उद्देश दृष्टिआड होऊ न देता किमान इंधनातून जास्तीत जास्त गती निर्माण करून आपण आपल्या ध्येयाप्रत पोचू शकू अशी व्यवस्था केली पाहिजे. ही व्यवस्था माणसाच्या जीवनाच्या एखाद्या पैलूचा विचार न करता संपूर्ण जीवनाचा व अंतिम लक्ष्याचा विचार करणारी असली पाहिजे. ही व्यवस्था निसर्गाचे शोषण करणारी न राहता त्याच्या पोषणास मदत करणारी असली पाहिजे.

"वास्तविक निसर्गापासून आपण एवढीच सामुग्री व तीही अशा पद्धतीने घेतली पाहिजे की, जिची भरपाई निसर्गात आपोआपच होत असते. उदा., झाडापासून बी घेण्याने झाडाची हानी होत नाही, उलट लाभच होतो. परंतु जमिनीपासून जास्त उत्पन्न घेण्याच्या लोभामुळे आपण असे प्रयोग करीत आहोत की, ज्यामुळे काही काळानंतर जमिनीची उत्पादनक्षमता संपून जाईल.

अलीकडील पाश्चात्य संस्कृती ही प्रामुख्याने भौतिकतावादी, भोगप्रधान संस्कृती असल्यामुळे या सृष्टीमध्ये मनुष्यप्राणी हाच सर्वश्रेष्ठ आहे, मानवेतर सृष्टी केवळ त्याच्या सुखसेवेसाठी आहे, मानवाने निसर्गावर विजय मिळवून (Conquest of Nature) त्याला आपल्या सेवेला जुंपायचे आहे, अशी त्यांची

भूमिका आहे. माणसाच्या जीवनामध्ये व विकासामध्ये निसर्गाचा वाटा फार मोठा आहे हे भारतीय संस्कृतीलाही मान्य आहे. परंतु निसर्गाशी युद्ध करून, त्याला हतबल करून, त्याचे शोषण करण्याची तिची भूमिका नाही, निसर्गाचे शोषण नव्हे तर दोहन करून मानवाने आपला विकास साधावा, नैसर्गिक संपत्तीचे मानवाने पोषण-संवर्धन करावे, निसर्गाने मानवाचे पालनपोषण व संवर्धन करावे, अशी परस्पर पूरकतेची ही भूमिका आहे.

तथापि भारतीय संस्कृतीची ही भूमिका म्हणजे केवळ उपयुक्ततावादातून सुचलेले शहाणपण नसून आत्मीयतेच्या वाढत्या कक्षांचाच तो विलोभनीय आविष्कार आहे. भारतीय संस्कृतीने मानवेतर सृष्टीला आपल्या परिवारातच सामावून घेतले आहे. सण, उत्सव, धार्मिक विधी, साहित्य, आदी गोष्टींमध्ये या मानवेतर सृष्टीला मानाचे आणि आत्मीयतेचे स्थान आहे. वानगीदाखल काही उदाहरणे पाहण्यासारखी आहेत. आपल्या येथे परमेश्वराचे दहा प्रमुख अवतार मानलेले आहेत. त्यांपैकी पहिले तीन अवतार मत्स्य, कूर्म, वराह हे मानवेतर प्राण्यांच्या स्वरूपात आहेत. चौथा नारसिंह हाही अर्धा नर, अर्धा सिंह असा आहे. विविध देवदेवतांच्या वाहनांचेही या संदर्भात निरीक्षण करण्यासारखे आहे. 'निर्गुणाचा मूळारंभ' आणि त्याचबरोबर 'सर्व गुणांचा ईश' असलेल्या विघ्नहर्त्या गणेशाचे वाहन उंदीर आहे. लंबोदर गणेश मूषकध्वज आहेत, आणि त्यांचे पिताजी वृषभारूढ आहेत. आधी नंदीला नमन केल्याशिवाय सदाशिवाच्या गाभाऱ्यात प्रवेश करावयाचा नाही. महालक्ष्मी व्याघ्रारूढ आहे. योगीश्वरी सरस्वती हंसवाहिनी, भक्तांचे कैवारी भगवान विष्णू भक्ताची हाक ऐकून येणार ते 'गरुडावर बैसोन येणार.' अर्थात् देवांच्या आणि मानवांच्या परिवारात सामील होण्याचा मान लाभलेला गरुड हा काही एकुलता एक पक्षी नाही. इतर पक्षिगणही आहेत. लहान मुलांच्या कथाविश्वाचा प्रारंभच मुळी 'एक होता कावळा, एक होती चिमणी' या कथेने व्हावयाचा. 'राष्ट्रीय पक्षी' हे गौरवाचे स्थान मोराला आता आता प्राप्त झाले. पण भारतीय संस्कृतीच्या बालविश्वात तो कधीपासूनच ठाण मांडून आहे. 'इथे इथे बस रे मोरा, बाळ घाली चारा' या काव्यपंक्तीतला मोर पंक्तीला हजर असल्याशिवाय बाळराजांचे भोजन सहसा होतच नाही. 'इथे इथे बस रे काऊ, बाळ घाली जेवू' या काव्याने कावळ्याला चिमण्या राजांचा मित्र बनवून टाकले आहे. व्यक्तीला मरणोत्तर सद्गती प्राप्त झाली की नाही, हे तिच्या

आप्तेष्टांना सांगण्याचे कामही कावळ्याचेच. रंगाने शार काळा, सर्व प्रकारचे अभक्ष्य भक्षण करणारा हा कावळा. पण भारतीय संस्कृतीने त्याला असे आपल्या परिवारात सामावून घेतले आहे.

आणि वनस्पति-सृष्टी ? तीही मागे नाही. भारतीय संस्कृतीतला परमेश्वर भक्तीने अर्पण केलेल्या ' पत्रं पुष्पं फलं तोयं ' ने प्रसन्न होणारा आहे. शंकराला बिल्वपत्र प्रिय, गणपतीला दुर्वा, विष्णूला तुळस, साऱ्या द्वारकेतील दागिन्यांनी श्रीकृष्णाची तुला पूर्ण होऊ शकली नाही ती रुक्मिणीच्या एका तुळशीपत्राने झाली. येथे वड-पिंपळाची मुंज आहे. शमीचे पूजन आहे, आणि तुळशीचे लग्नही आहे. पूजेला सुपारी हवी, नारळ हवा, नीरांजनाला वा नंदादीपाला वात कापसाची हवी. मंगल प्रसंगाला अशोकाच्या नाहीतर आंब्याच्या पानांचे तोरण हवे.

येथे भूमी ही भोगभूमी नसून धर्मभूमी, पुण्यभूमी, वत्सल मातृभूमी आहे. भूमाता आहे. नद्या या पिण्यासाठी वा शेतीसाठी पाणी पुरविणाऱ्या जलवाहिन्या नसून लोकमाता आहेत. गाय ही केवळ उपयुक्त पशू नसून ती गोमाता आहे. ही सारी जणू त्या जगज्जननीचीच विविध रूपे. निसर्गाकडे पहाण्याची भारतीय संस्कृतीची दृष्टी भोगवासनेने बरबटलेली नव्हे, तर अथांग भक्तिभावनेने, आत्मीयतेच्या भावनेने ओथंबलेली आहे.

आणि आकाशस्थ ग्रह ? या ग्रहांच्या भ्रमणाचे मानवी जीवनावर होणारे इष्टानिष्ट परिणाम हे आपल्या येथे खूप प्रगत झालेले शास्त्र आहे. प्राचीन शास्त्रांमध्ये ज्योतिष-शास्त्राचाही समावेश आहे. परंतु येथे तो संदर्भ अभिप्रेत नाही. सूर्य हा साऱ्या जगाचा यथार्थाने आत्मा मानला गेलेला आहे. (सूर्य आत्मा जगतस्तस्थुषः) अशा या सूर्याला अर्घ्यप्रदान हा नित्य नियम सांगितलेला आहे. रथसप्तमीच्या दिवशी दुपारी सूर्याला शर्करामिश्रित दुधाचा नैवेद्य दाखवावयाचा, कोजागिरी पौर्णिमेच्या रात्री चंद्राला. वनस्पतींचा अधिपती चंद्र त्या नैवेद्याचा स्वीकार करून त्यात अमृतबिंदूने सिंचन करतो. विज्ञानाच्या सहाय्याने माणूस आता चंद्रावर पोचून तेथील दगडगोटे वेचून आणू लागला आहे ; पण शरदाचा पूर्णचंद्र चांदण्याच्या बरसातीबरोबरच भूतलावरील 'अमृतपुत्रांसाठी' अमृतवर्षाव करतो ही कल्पना त्या विज्ञानसिद्धीपेक्षा शतपटींनी हृद्य आहे. चंद्राला 'चंदामामा' बनवून तर भारतीय संस्कृतीने त्याला सुहृद आप्तजनांच्या मालिकेतच आणून बसविले आहे. ज्यांना रक्ताचा

भाऊ नाही अशा सर्व भगिनींना भाऊबीजेसाठी या संस्कृतीने चांदोबा भाऊ देऊन ठेवला आहे ; आणि आईचा भाऊ या नात्याने तिच्या लहानग्यांसाठी तो चंदामामाही झाला आहे !

चिऊताई, मनी मावशी, गोमाता, लोकमाता, भूमाता ... किती म्हणून उदाहरणे सांगावी ? एकात्मतेची जिवंत जाण आणि अनुभूती व्यक्ती, परिवार, राष्ट्र या चढत्या वाढत्या क्रमाने समस्त मानवसमूहाला जाऊन भिडते, परंतु एवढ्यावरच कृतकृत्यता मानून न थांबता मानवेतर प्राणिसृष्टी, वनस्पतीसृष्टी यांनाही आपल्या कवेत सामावून घेत त्या सर्वांचे आदिकारण असलेल्या परमेष्टीच्या दिशेने झेपावत आहे. एकात्म दर्शनाची झेप एवढी उत्तुंग आहे- व्यष्टीपासून परमेष्टीपर्यंत !

• • •

१०

एकात्म दर्शन

एकात्म मानव दर्शनाच्या महत्त्वाच्या पैलूंचे विवेचन आणि विश्लेषण येथवर झाले. तत्पूर्वी, सुरुवातीला काही प्रमुख पाश्चात्य विचारप्रणालींचाही मागोवा घेतला होता. या दोहोंच्या काही ठळक वैशिष्ट्यांचे तुलनात्मक पुनर्निरीक्षण केले तर एकात्म दर्शनाची श्रेष्ठता अधिक स्पष्ट होऊ शकेल.

पाश्चात्य विचारप्रणालींच्या वैशिष्ट्यांपैकी एक वैशिष्ट्य असे की यांपैकी बहुतेक सर्व विचारप्रणाली प्रतिक्रिया म्हणून उदयास आल्या. रोमच्या धर्मपीठाच्या एकाधिकारशाहीची प्रतिक्रिया म्हणून युरोपातील राष्ट्रवाद उदयास आला. निरंकुश जुलमी राजेशाहीची प्रतिक्रिया म्हणून लोकशाहीचा उदय झाला ; आणि लोकशाहीचा हात धरून जन्माला आलेल्या भांडवलशाहीची प्रतिक्रिया या रूपाने समाजवाद व साम्यवाद जन्माला आला.

प्रतिक्रिया आणि संघर्ष बहुधा हातात हात घालून वाटचाल करीत असतात. पोपच्या एकाअधिकारशाहीविरोधी प्रतिक्रिया, निरंकुश राजेशाही-विरुद्ध झालेली प्रतिक्रिया आणि भांडवलशाहीविरुद्ध क्रांतीच्या रूपाने झालेली प्रतिक्रिया, संघर्ष आणि रक्तपात बरोबर घेऊनच आली. त्या त्या परिस्थितीत संघर्ष काही प्रमाणात अपरिहार्य ठरला असेल; परंतु पुढे या संघर्षाचे तत्त्वज्ञान बनले. प्रक्रिया आणि संघर्षांची मालिका समाप्त कशी करता येईल याचा विचार करण्याऐवजी असा संघर्ष विकास प्रक्रियेमध्ये अपरिहार्य असतो असा सिद्धान्त पुढे आला. म्हणजे जो वस्तुतः आपद्धर्म होता असे फार तर म्हणता येईल, त्याला

शाश्वत धर्माची – म्हणजे त्रिकालाबाधित सिद्धांताची, तत्त्वज्ञानाची प्रतिष्ठा देण्यात आली. मानवाचा विकास संघर्षातून होत आला आहे हे या सिद्धांताचे मुख्य सूत्र आहे. डार्विनने प्राणिशास्त्राचे, हेगेलने तत्त्वज्ञानाचे आणि मार्क्सने इतिहासाचे विश्लेषण याच आधारे केले आहे. भांडवलशाही अर्थशास्त्र स्पर्धेच्या व संघर्षाच्या सिद्धान्तालाच ध्रुव सत्य व शास्त्रीय सिद्धान्त मानते. भांडवलशाहीविरोधी संघर्षाला संघटित स्वरूप देऊन क्रांतीच्या सहाय्याने एक वर्ग नष्ट करून वर्गविहीन समाजरचना उभी करण्याचे स्वप्न डोळ्यासमोर ठेवून साम्यवादाने आपली पावले टाकली.

या पार्श्वभूमीवर एकात्म मानव दर्शनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य नजरेत भरते ते हे की, हे दर्शन एखाद्या विशिष्ट काळातील विशिष्टविचाराची, घटनेची, परिस्थितीची वा वादाची प्रतिक्रिया म्हणून उदयास आलेले नाही. त्यामुळे प्रतिक्रियेतून निर्माण झालेल्या विचारप्रणालींमध्ये, जो एकांगीपणा असतो, दुराग्रह असतो, असहिष्णुता असते त्यापासून हे दर्शन सर्वथा मुक्त आहे. हे एक पूर्णतया भावात्मक आणि विधायक दर्शन आहे.

'संघर्षातून जीवनविकास' या सिद्धांताचा फोलपणा स्पष्ट करताना पंडित दीनदयाळजी म्हणतात –

"जर मानवाचा स्वभाव खरोखरच मुळात संघर्षाचा असेल, त्याच्या प्रत्येक कृतीमागची प्रेरणा दुसऱ्याला गिळंकृत करून स्वतः जगण्याची असेल, तर आपण त्याला दुसऱ्यासाठी जगणे व दुसऱ्यावर प्रेम करणे शिकवू शकणार नाही. यदाकदाचित् प्रेम आणि सहकार्य यांना एखादा आधार असलाच तर तो एखाद्या अधिक प्रबळ अशा शत्रूसमोर स्वतःची दुर्बलता आणि पराभवाच्या भावनेतूनच निर्माण होईल. तो आधार तात्पुरता असेल. त्यामुळे माणसामध्ये सद्भावना, त्याग, सेवा, सहिष्णुता, अनुशासन आदी ज्या गुणांची निर्मिती होईल ती केवळ एक धोरण म्हणून होईल. ते गुण मानवाच्या जीवनाचे अंग बनू शकणार नाहीत. संघर्षाच्या भूमिकेतून स्वेच्छापूर्वक आणि चिरस्थायी सहकार्याची सद्भावना निर्माण होऊ शकणार नाही.

जगात आपण स्नेह, सहकार्य, सहिष्णुता पाहतो, त्याचप्रमाणे असहिष्णुता वैर, संघर्ष या गोष्टीही दिसतात. परंतु असहिष्णुता, वैर, संघर्ष यांना आपण जीवनाच्या आधारभूत प्रवृती मानत नाही. सृष्टी संघर्षाच्या नव्हे, तर सहयोगाच्या आधारे टिकून आहे. आपण विकासवादी असू तर सृष्टीचा हा नियम

आपल्याला स्वीकारावा लागेल. असहिष्णुता, वैर आणि संघर्ष या ऐवजी परस्परावलंबन, परस्परानुकूलता, परस्परपूरकता आणि सहयोगाच्या भूमिकेतून जीवनाच्या समग्र क्रियाकलापांचे विश्लेषण केले पाहिजे, आणि त्याची भावात्मक दिशा निर्धारित केली पाहिजे."

पाश्चात्य विचारप्रणालींचे दुसरे वैशिष्ट्य असे की, त्यांनी पूर्ण व एकात्म मानवाचा विचार करण्याऐवजी त्या त्या वेळी मानवी जीवनाच्या एकेका पैलूचा विचार केला. जेथे लोकशाही आंदोलन झाले तेथे माणसाचा एक राजकीय प्राणी (Political Animal) म्हणून विचार करण्यात आला. भांडवलशाहीने त्याचा निव्वळ 'अर्थपरायण व्यक्ती' म्हणून विचार केला. मार्क्सनेही मानवी जीवनाचा केवळ आर्थिक हितसंबंधांच्या दृष्टिकोनातूनच विचार केला. मानवी जीवनाचा असा तुकड्यातुकड्यांनी विचार करण्याच्या पद्धतीमुळेच, समाजहित डोळ्यासमोर ठेवून पुढे आलेल्या चांगल्या विचारांमध्येही त्यांना सामंजस्य निर्माण करता आले नाही. फ्रेंच राज्यक्रांतीने उद्घोषिलेल्या स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या त्रिसूत्रीची प्रत्यक्षात पुढे जी परिणती झाली ती पाहिल्यावर या विधानातील सत्यता सहज स्पष्ट होऊ शकेल.

जीवनात एकमेकांशी घनिष्ट संबंध असलेल्या आणि परस्परांवर परिणाम घडविणाऱ्या अनेक गोष्टींपैकी एकेक गोष्ट वेगळी काढून ती सर्वथैव स्वतंत्र आहे असे समजून तिचा अभ्यास करणे व त्यावरून समग्र जीवनाचा निष्कर्ष काढणे शास्त्रीय दृष्ट्या कदाचित सोयीचे असले तरी, अशा पद्धतीने काढलेले निष्कर्ष बरोबर व उपयुक्त ठरत नाहीत. पं. दीनदयाळजींनी एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे पाश्चात्यांपुढील अनेक समस्यांचे प्रमुख कारण जीवनाचा तुकड्यातुकड्यांनी विचार करणे आणि मग हे तुकडे जोड लावून सांधण्याचा प्रयत्न करणे हे आहे.

केवळ व्यक्तिजीवनाचाच नव्हे तर समष्टि-जीवनातील परिवार, राष्ट्र, विश्वमानव आदी बृहत् घटकांचाही विचार पाश्चात्यांनी पृथक् पृथकच केला. या सर्व एककांचा त्यांनी खूप बारकाईने अभ्यास केला आहे हे खरे, परंतु वरवर पहाता वेगळे दिसणाऱ्या या सर्व एककांना जोडणारा जो एक मजबूत आंतरिक दुवा असतो तो त्यांनी विचारात घेतला नाही. उदाहरणार्थ, व्यक्तिसंबंधी विचार करताना त्यांनी माणसाचे शरीर, मन, बुद्धी यासंबंधी खूप विचार केला आहे. परंतु असा विचार करताना व्यक्ति ही परिवार, राष्ट्र, मानवजात,

मानवेतर सृष्टी या एककांचाही अंगभूत घटक असते ही वस्तुस्थिती त्यांनी विचारात घेतली नाही. परिवार विरुद्ध व्यक्ती; एक राष्ट्र विरुद्ध दुसरे राष्ट्र, मानवजात विरुद्ध राष्ट्र, निसर्ग विरुद्ध मानव असे संघर्ष होत राहिले आणि आजही चालू आहेत, त्याचे प्रमुख कारण या एकात्म सूत्राच्या जाणीवेचा अभाव हेच आहे.



संकेन्द्री रचना

पाश्चात्यांची ही विचार-पद्धती एका संकेंद्री (CONCENTRIC) वर्तुळ-समूहाच्या आकृतीने स्पष्ट करता येईल. या आकृतीत केंद्रस्थानी एक बिंदू आहे. हा बिंदू म्हणजे व्यक्ती समजू या. त्या बिंदुभोवती एक वर्तुळ आहे, हे कुटुंबाचे, परिवाराचे वर्तुळ. त्या वर्तुळाबाहेर, त्याच्यापेक्षा मोठे आणखी एक वर्तुळ आहे. व्यक्तीच्या जमातीचे (COMMUNITY). याच क्रमाने पुढे राष्ट्राचे, त्याच्यापुढे विश्वमानवाचे अशी वाढत्या त्रिज्येची वर्तुळे आहेत.

या संकेन्द्री रचनेत व्यक्ती केंद्रबिंदू आहे, आणि ते केंद्र धरूनच उत्तरोतर वाढत्या त्रिज्येची वर्तुळे काढण्यात आली आहेत. यावरून परिवार, जमात, राष्ट्र, विश्वमानव आदी एककांचा विचार व्यक्तीला केंद्रस्थानी ठेवून त्यांनी केला आहे हे उघड आहे. परंतु या रचनेचा आणि त्यामागे असलेल्या विचार-पद्धतीचा दोष असा की ही सर्व वर्तुळे संकेंद्री असली तरी परस्परांपासून स्वतंत्र आहेत. ती अधिकाधिक व्यापक होत जाणारी वर्तुळे आहेत, हे त्यांनाही

मान्य आहे. परंतु त्याचा परस्परांशी आंतरिक संबंध आहे, ती सर्वथैव स्वतंत्र वर्तुळे नसून मानवाच्या अंत:करणातील इतरांविषयीच्या आत्मीयतेच्या विकासाचे हे टप्पे आहेत हे त्यांनी ध्यानात घेतले नाही. समाज-निर्मिती-संबंधीची त्यांची 'सोशल काँट्रॅक्ट थिअरी' तसेच गेल्या शे–पाचशे वर्षांत पोपशाही विरुद्ध राष्ट्रीय चर्च, राजेशाही विरुद्ध लोकशाही, भांडवलशाही विरुद्ध समाजवाद असे निरनिराळ्या स्तरांवर झालेले संघर्ष यामुळे त्यांच्या विचार करण्याच्या पद्धतीमध्ये ही पृथगात्मता विशेषत्वाने आली असावी. भौतिक क्षेत्रातील प्रगतीच्या व प्रभुत्वाच्या सुसाट घोडदौडीमध्ये अध्यात्माचा – म्हणजेच या सर्व एककांना सांधणाऱ्या एकात्म सूत्राचा अंतर्मुख होऊन शोध घेण्याची बुद्धीच आजवर त्यांना झाली नाही, हे त्याचे दुसरे कारण असू शकेल.

मानवी जीवनाचा असा तुकड्यातुकड्यांनी विचार करण्याच्या पद्धतीमुळे, भारताबाहेर पूर्वी आणि अलीकडच्याही काळात मानवी एकतेसाठी जे मोठमोठे प्रयत्न झाले तेही माणसाला प्राय: कोणत्या ना कोणत्या एका पैलूच्या साच्यात ठोकून बसविण्याच्या दिशेनेच झाले. इस्लाम आणि ख्रिस्ती संप्रदाय यांचा या संदर्भात उल्लेख करता येईल. या दोन्ही पंथांचा विस्तार खूप दूरवर झालेला आहे हे खरे, परंतु त्यांचे सारे प्रयत्न सर्व मानवांना एक प्रेषित आणि एक पवित्र ग्रंथ यांच्या चौकटीत बसविण्याच्या भूमिकेतून झाले. या प्रयत्नांतून एकता निर्माण होत असल्यासारखे दिसले, परंतु तो केवळ आभासच होता.

अलीकडच्या काळात मानवी एकतेच्या दिशेने जे प्रयत्न झाले, त्यांमध्ये मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागेल. मार्क्सच्या नजरेसमोर भांडवलशाहीच्या चरकात पिळला जाणारा शोषित वर्ग होता. राजकीय, आर्थिक आणि सामाजिक भेद नष्ट करून वर्गविहीन समाजरचना उभी करण्याचे मार्क्सचे स्वप्न होते. No nation. no religion, no private property, no marriage, no family या पंचसूत्रीवरून मार्क्सच्या स्वप्नातील वर्गविहीन समाजाची कल्पना येऊ शकेल.

वस्तुत: सामाजिक, आर्थिक व राजकीय बाबींव्यतिरिक्त इतरही अशा अनेक गोष्टी असतात की ज्यांचा प्रभाव व्यक्तीच्या जीवनावर होत असतो. उदाहरणार्थ, त्याचे कुटुंब असते, धर्म असतो, काही श्रद्धास्थाने असतात, त्याचा देश असतो, त्या देशाचा इतिहास असतो, काही परंपरा असतात, शत्रुमित्र असतात. या सर्व गोष्टींचे त्याच्या जीवनावर विविध प्रकारे परिणाम होत

असतात आणि त्यातून त्याचे जीवन आकार घेत असते. वर्गविहीन समाज निर्माण करण्याच्या धुंदीत मार्क्सनेही ही वस्तुस्थिती विचारात घेतली नाही.

मानवी एकतेसाठी मानवामानवांत समता व सामंजस्य निर्माण करण्यासाठी झालेल्या या विविध प्रयत्नांमागे मुळात सद्भावनाच होती हे मान्य केले तरी हे प्रयत्न यशस्वी झाले नाहीत, उलट त्यातून भीषण संघर्षच उभे राहिले. याचे कारण अगदी उघड आहे. एकतेसाठी वा समतेसाठी म्हणून केलेले हे प्रयत्न साचेबंद एकरूपता आणि ठोकळेबाज समानता लादण्याच्या दिशेने झाले.

वस्तुतः मानवी एकतेसाठी प्रयत्न करीत असताना व्यक्ति-व्यक्तींमध्ये तसेच व्यक्तिसमूहांमध्ये एकतेबरोबरच विविधताही असते हे सत्य ध्यानात घेणे आवश्यक असते. कोणत्याही दोन व्यक्ती अगदी एकसारख्या नसतात. त्यांचा तोंडावळा वेगळा असतो, विचार करण्याची पद्धत वेगळी असते, स्वभाव वेगळा असतो, आवडी-निवडी वेगळ्या असतात.

व्यक्तिप्रमाणेच कुटुंब, राष्ट्र, यांचेही स्वतःचे असे एक व्यक्तिमत्त्व असते. उदा., कुटुंबाचे एखादे कुलदैवत असते, कुलाचार असतो, कुलपरंपरा असते. राष्ट्राचा विचार करू लागले तर प्रत्येक राष्ट्रालाही त्याचा इतिहास असतो, भूगोल असतो, काही परंपरा असते, जीवनादर्श असतात. या सर्वांमधून त्या राष्ट्राचे इतर राष्ट्रांहून एक वेगळेपण तयार झालेले असते.

तात्पर्य, व्यक्ती, परिवार, राष्ट्र या विविध मंडळांपैकी प्रत्येक मंडळाचे स्वतःचे असे वैशिष्ट्य असते एक क्षेत्र असते. आणि अंगभूत सामर्थ्यही असते. एकतेसाठी प्रयत्न करताना ही वस्तुस्थिती ध्यानात घ्यावीच लागेल. प्रत्येक मंडळ आपापल्या वैशिष्ट्यांचे जतन करीत इतर मंडळांना पूरक कसे बनेल या दृष्टिकोनातून विचार केला तरच खरी एकता निर्माण होईल. 'विविधतेतील एकता' हे या एकतेच्या प्रयत्नांचे आधारसूत्र असेल. याउलट विविधता विचारात न घेता वा ती खच्ची करून एकतेसाठी साचेबंद एकरूपता साधण्याचा प्रयत्न केला तर त्यातून एकतेऐवजी कटुता आणि संघर्षच निर्माण होईल. इस्लाम, ख्रिश्चॅनिटी आणि साम्यवाद यांचा रक्तरंजित इतिहास याला साक्षी आहे.

मानवी एकतेचा विचार भारतीय संस्कृतीनेही केला आहे. केवळ मानवी एकतेचाच नव्हे, तर संपूर्ण प्राणिमात्राच्या, चराचर सृष्टीच्या एकतेचा केला आहे. परंतु हा विचार पृथगात्मतेच्या भूमिकेतून केलेला नसून विविधतेच्या

मुळाशी असलेल्या एकतेच्या आधारे केला आहे. या विश्वात बाह्यत: कितीही विविधता दिसत असली तरी त्या विविधतेमागे एकता आहे आणि सृष्टीतील विविधता म्हणजे त्या आंतरिक एकतेचाच आविष्कार आहे हा भारतीय संस्कृतीचा मुख्य विचार आहे. विविधतेने नटलेल्या समस्त सृष्टीला एकच चैतन्य तत्त्व व्यापून राहिले आहे हे या विविधतेतील एकतेचे प्रमुख सूत्र आहे. एकतेचे हे सूत्र ध्यानात घेऊन त्या आंतरिक एकतेच्या अनेकरूपी आविष्कारांमध्ये असलेली परस्परपूरकता ओळखून त्यांच्यावर परस्परानुकूलतेचे संस्कार करणे, ती एकता परिपुष्ट करणे हीच खरी संस्कृती होय. भारतीय संस्कृती एकात्मवादी आहे असे म्हटले जाते त्यामागचा आशय हा असा व्यापक आहे.



अखंड मंडलाकार रचना

एकात्म जीवनविषयक भारतीय संस्कृतीची ही धारणा एखाद्या आकृतीद्वारे स्पष्ट करावयाची झाली तर ती वरील रचनाकृतीच्याद्वारे दाखविता येईल. या रचनेला कुंडलिन, सर्पिन वा मंडलाकार रचना अशी संज्ञा आहे. या रचनेतील प्रत्येक मंडल मागच्या पुढच्या मंडलाशी संबंध ठेवूनच विकसित होत असते. याही रचनेचा प्रारंभ व्यक्तीपासूनच होत असतो. मात्र ही व्यक्ती केवळ भौतिक सुखाच्या म्हणजेच अर्थ-कामाच्या मागे लागलेली व्यक्ती नसून धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चारही पुरुषार्थांचा म्हणजेच समग्र व सर्वांगीण जीवनाचा विचार करणारी आणि त्या पुरुषार्थांच्या सिद्धीसाठी धडपडणारी व्यक्ती आहे. व्यक्तीनंतर पुढचे मंडल कुटुंबाचे आहे. कुटुंबाचे हे मंडल व्यक्तीपासून निघते.

परंतु तिचा संबंध न तोडता, तिचा सर्व बाजूंनी विकास करीत पुढे सरकत जाते, आणि जमातीच्या मंडलाचा सूत्रपात करते. जमातीचे मंडल विकसित होत पुढे राष्ट्रमंडलात परिणत होते, आणि याच क्रमाने पुढे सरकत संपूर्ण मानव-समूहाचे व विश्वाचे मंडल तयार होते.

परंतु भारतीय चिंतन येथेच थांबत नाही. या चिंतनाने यापुढेही आणखी एका मंडलाचा विचार केलेला आहे. हे मंडल म्हणजे परमेष्टी तत्त्वाचे मंडल. हे मंडल तत्पूर्वीच्या सर्व मंडलांना आपल्या परिघात समाविष्ट करते एवढेच नव्हे तर, त्यांना व्यापतेही. कारण हे परमेष्टी तत्त्व सर्वातीत आहे, त्याचप्रमाणे सर्वव्यापी, सर्वांतर्यामी आणि म्हणूनच सर्वमयही आहे. सर्वांतर्यामी, सर्वव्यापी परमतत्त्व हा एकात्म मानव दर्शनाचा गाभा आहे.

या अखंड मंडलाकार रचनेत एका एककामधून दुसरा एकक निघतो, दुसऱ्यातून तिसरा, तिसऱ्यातून चौथा, आणि अशा प्रकारे ही प्रक्रिया शेवटपर्यंत चालू रहाते. प्रत्येक एककाची उत्तरोत्तर विकसित होण्याची ही प्रक्रिया असल्याने तिच्यामध्ये अधिकाधिक व्यापकता आणि विशालता आहे, परंतु या एककांच्या हितसंबंधांमध्ये परस्पर विरोध नाही. छोटचा एककाची मोठचा एककाकडून कोंडी होणे, त्यामुळे उभयतांमध्ये संघर्ष निर्माण होणे या गोष्टींना या रचनेत स्थान नाही. व्यक्ती, कुटुंब, जमात, राष्ट्र, मानवता हे सर्व अखंड मंडलाकार विकासपथावरचेच टप्पे असल्याने त्यांच्या हितसंबंधांमध्ये विरोध तर नाहीच, पण परस्परपूरकताच आहे.

मानवी जीवनाचा विकासक्रमही असाच आहे. मूल जेव्हा लहान असते, तेव्हा त्याच्या मनोविश्वाच्या कक्षा खूप मर्यादित असतात. ते प्रायः आत्मकेंद्री असते. या अवस्थेत त्याच्या विश्वात एकच अस्तित्व असते. अहम् ! ते जसजसे मोठे होत जाते तसतसे ते आईवडील, भाऊबहीण यांना ओळखू लागते. कुटुंब-घटकापर्यंत त्याची प्रगती होते. याचा अर्थ 'अहम् 'ची त्याला विस्मृती होते. अहम् नष्ट होतो असा नाही. मी आहे, कुटुंबही आहे. ते आणखी मोठे होते. त्याच्या गुणकर्माचा विकास होतो. समान गुणधर्माच्या लोकांशी संबंध निर्माण होतात. त्यांच्याशीही तो एकात्म होतो. समान गुण-शील-कर्म असलेल्या त्या समूहाच्या सुखदुःखाचा तो विचार करू लागतो. मी सत्य, माझे कुटुंब सत्य, माझी जातजमातही सत्य याच क्रमाने विकास करीत करीत तो असा विचार करू लागतो की, केवळ माझी जात जमात नव्हे, तर संपूर्ण राष्ट्र माझे आहे.

मी राष्ट्राचा घटक आहे. आणि राष्ट्र हे माझेच बृहत्तर रूप आहे. हळूहळू तो 'स्वदेशो भुवनत्रयम्' या भूमिकेतून संपूर्ण मानवसमूहाचा विचार करू लागतो. आणि शेवटी याच्याही पुढे जाऊन चराचर सृष्टीशी तादात्म्य पावतो.

आत्मकेंद्रित शैशवावस्थेपासून प्रारंभ करून विश्वमानवापर्यंतच्या प्रदीर्घ प्रवासाचे वर्णन करताना श्री. दत्तोपंत ठेंगडी म्हणतात – "कुटुंबापासून संपूर्ण विश्वापर्यंत निरनिराळ्या संस्थांमध्ये माणसाचे होणारे दर्शन हे वस्तुतः त्याच्या आत्मचेतनेच्या विकासाचेच बाह्य दर्शन असते. व्यक्तीची ही चेतना जेवढी उन्नत असेल तेवढ्या प्रमाणात व्यक्तीशी संबंधित असलेली ती संस्था व्यापक व उच्चस्तरीय होईल. परंतु ही आत्मपरस्त विकासाची प्रक्रिया असल्याने चेतनेचा उच्चस्तर आपल्या पूर्वीच्या भिन्न श्रेणीशी संबंध-विच्छेद करीत नाही. या रचनेची विशेषता ही आहे की, ती पृथगात्म विचार करणारी नाही. केवळ काही घटकांचाच विचार करून इतरांना वगळणारी नाही. ती सर्वसमावेशक आहे. पृथक् चा आशय असा होतो की, मी जर परिवाराशी एकरूप असेन तर माझे स्वतःवर प्रेम नाही ; समाजाशी एकरूप असेन तर मी परिवाराचा तिरस्कार केला पाहिजे. अखंड मंडलाकार रचनेत अशी पृथकता नाही. ती सर्व समावेशक रचना आहे. म्हणजे माझा मनोविकास समाजापर्यंत झाला असेल तर मी समाजावर प्रेम करतो, आणि त्याचबरोबर कुटुंबावरही करतो, स्वतः-वरही करतो. माझ्या मनोविकासाची कक्षा मानवजातीपर्यंत पोहोचली असेल तर मी माझ्या जातीवर प्रेम करतो, राष्ट्रावरही प्रेम करतो. याही पुढे जाऊन मी चराचर विश्वाशी एकात्म असेन तर राष्ट्राशीही एकात्म आहे. मी एका स्तरावर व्यक्तीशी, दुसऱ्या स्तरावर कुटुंबाशी, तिसऱ्या स्तरावर राष्ट्राशी, पुढील स्तरावर संपूर्ण मानवजातीशी, त्यानंतर चराचर सृष्टीशी आणि शेवटी परमेष्टीशी असा सर्वांशी एकाच वेळी एकरूप असू शकतो.

आता हे संपूर्ण दर्शन एकदम सर्वांना आकलन होणे आणि जीवनात उतरणे असंभव आहे. म्हणूनच संपूर्ण दर्शन नजरेसमोर ठेवूनही, त्याचे ज्ञान आणि अनुभूती ही क्रमाक्रमाने देणे – होणे आवश्यक आहे. यालाच प्रगमनशील विकास (Progressive unfoldment) म्हणतात. मूळ कल्पना मनाशी पक्की ठेवून तिचा क्रमशः आविष्कार होणे, हे अगदी स्वाभाविक आणि शास्त्रीय आहे."

• • •

११

यः क्रियावान् स पण्डितः

वस्तुतः मागील प्रकरणाबरोबरच एकात्म मानव दर्शनाचे विवेचन पूर्ण झाले आहे. अशा वेळी सहज एक प्रश्न उपस्थित होतो की, या विवेचनाचे श्रुतिफल काय ? सुदैवाने स्वतः दीनदयाळजींनीच याचे अपेक्षित उत्तर पुढील शब्दांत सांगून ठेवले आहे. ते म्हणतात – " भारतीय आणि भारताबाहेरील विविध विचारप्रवाहांचा सम्यक् विचार करून आणि त्या विचारांतील सामर्थ्य तसेच दुर्बलता ध्यानात घेऊन एकात्म मानव विचार असा एक मार्ग दाखवीत आहे की, जो मानवाला त्याचे आजवरचे चिंतन, अनुभव आणि सिद्धी या सर्व बाबतींत पुढे घेऊन जाईल.

हे श्रुतिफल अशा स्वरूपाचे असणे अगदी स्वाभाविकही आहे. कारण एकात्म मानव विचार म्हणजे एखाद्या शास्त्रीय प्रमेयाचे केवळ तात्त्विक विवेचन नसून ते एक प्रत्यक्ष जगण्याचे तत्त्वज्ञान आहे. त्याचा आपल्या आचार-विचारांशी प्रत्यक्ष संबंध आहे. काही शास्त्रीय सिद्धांत असे असतात की, ज्यांचा मानवी जीवनाशी संबंध असतो, परंतु त्या बाबतीत माणसाचे कर्तव्य असे काही नसते. उदाहरणार्थ, अंतरिक्षातील असंख्य ग्रह-तारे – यांत आपल्या पृथ्वी-चाही समावेश आहे – गुरुत्वाकर्षणाच्या नियमानुसार आपापल्या कक्षेत भ्रमण करीत असतात, आणि मानवी जीवनावर परिणाम करीत असतात. परंतु या नियमांच्या बाबतीत माणसाने करणीय – अकरणीय असे काहीच नसते. माणसाने गुरुत्वाकर्षणाचा हा नियम जाणणे न जाणणे, मानणे न मानणे यावर ग्रहांचे हे परिभ्रमण व त्याचे होणारे परिणाम अवलंबून नसतात. त्याचप्रमाणे प्राणि-

सृष्टीने सोडलेला कर्बद्विप्राणिल वायू वनस्पतींनी आपल्या पोषणासाठी वापरावा आणि वनस्पतींनी मुक्त केलेल्या प्राणवायूच्या आधारे प्राणिसृष्टीचे जीवन चालावे हा निसर्गातील परस्पर सहकार्याचा व्यवहार अनंत काळापासून चालू आहे. माणूस त्याची जाण ठेवो वा न ठेवो, परंतु माणसाच्या मनाचे, बुद्धीचे, भावविश्वाचे व्यवहार विज्ञानाच्या नियमासारखे कर्तव्याकर्तव्य-निरपेक्ष नसतात. त्यामुळे एकात्म मानव धर्म मानवाच्या मूळ प्रकृतीशी आणि एकूण सृष्टिधर्माशीही सुसंगत असला तरी प्राधान्यत: तो कर्तव्यरूप आहे.

हा कर्तव्यरूप धर्म म्हणजे स्वार्थनिरपेक्ष वृत्तीने व्यक्तिगत व समष्टिगत चतुर्विध पुरुषार्थांसाठी करावयाचे नित्यनैमित्तिक कर्म. धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चारही पुरुषार्थांची उपासना करीत जीवनाचा सर्वांगीण संतुलित विकास करणे हे या कर्तव्यांचे व्यक्तिगत स्तरावरचे सूत्र आहे, आणि स्वत:ची अशी जडणघडण करीत असताना समष्टीचेही हित डोळ्यासमोर ठेवून समष्टीच्या चतुर्विध पुरुषार्थाशी सुसंवादी व त्याला पोषक अशा रीतीने समाजजीवनाच्या अन्यान्य क्षेत्रांत सर्व शक्तिनिशी समर्पणवृत्तीने कार्य करीत रहाणे हे या कर्तव्यरूप धर्माचे समष्टिविषयक व्यवहाराचे सूत्र आहे.

हा धर्म कर्तव्यरूप असल्यामुळे तो जाणीवपूर्वक प्रयत्नांनी, संस्कारांनी स्थिरपद करावा लागतो. 'धर्मो रक्षति रक्षित:' हे सूत्र या एकात्म मानव दर्शनाच्या बाबतीतही खरे आहे. कारण जीवन दर्शनाचे काम जीवनाचे यथार्थ स्वरूप उलगडून सांगणे, आणि तदनुषंगाने सुखी, स्वस्थ, उन्नत व कृतार्थ जीवनाकडे जाणारा नेटका मार्ग दाखविणे एवढेच असते. त्या मार्गाने वाटचाल करीत ते दर्शन प्रत्यक्ष जीवनात उतरविणे हे काम ज्याचे त्यानेच करावयाचे असते. 'असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी' या स्वरूपाच्या अकर्मण्यतेला किंवा 'शेवटी नशिबात असेल ते होईल,' अशा दैववादी अगतिकतेला या दर्शनात स्थान नाही. हे जरतरी वा विध्यर्थी प्रयोगाचे दर्शन नसून निश्चयार्थी पुरुषार्थाचे दर्शन आहे.

संस्कारकेंद्रांची निवड

अशा निश्चयार्थी पुरुषार्थाला आवश्यक असलेली शरीर – मन – बुद्धीची तयारी मानवी जीवनाचे सर्वांगीण स्वरूप व इतिकर्तव्यता यांचे ज्ञान आणि तदनरूप नित्य संस्कार यांनीच होऊ शकते. कुटुंब-संस्था, शिक्षण-संस्था, मंदिरे,

धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रांत कार्य करणाऱ्या संस्था, संत व थोर सत्पुरुषांचा सहवास, त्यांची चरित्रे व बोधवचने ही फार मोठी संस्कार-कार्यक्षमता असलेली केन्द्रे आहेत, पवित्र आणि पुरुषार्थी जीवनाचे, भगवद्भक्तीचे, देशभक्तीचे संस्कार करून व्यक्तीला यथार्थाने धर्मप्रवण आणि कर्तव्योन्मुख बनविणारी असंख्य लहान-मोठी केन्द्रे देशभर आजही आहेत. त्यांपैकी काहींची चेतना व कर्तव्यक्षमता क्षीण झाली असेल. ती एकात्म मानव दर्शनाच्या जाणीवपूर्वक स्पर्शाने पुनः रसरशीत करून आणि आवश्यक तेथे त्यांत युगानुरूप परिवर्तन करून त्यांची कार्यशक्ती या दर्शनाच्या एकात्म आविष्काराच्या दिशेने प्रवाहित करता येईल. अर्थात् उपयुक्त जुन्या केंद्रांचे व व्यवस्थांचे कालानुरूप पुनरुज्जीवन करीत असताना युगानुरूप नवी केंद्रेही उभी करावी लागतील. या संदर्भात एक उदाहरण म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखांचा उल्लेख करता येईल.

एकात्म मानव दर्शन हे समग्र जीवनदर्शन आहे. म्हणून, एका बाजूने समाज घटकांना या दर्शनाच्या सर्वांगांनी सुसंस्कारित करीत असताना, जीवनाच्या भौतिक अभ्युदयाशी संबंधित जेवढी म्हणून कार्यक्षेत्रे आहेत तेथे, म्हणजे राजकारण, अर्थकारण, समाजकारण आदी समाजजीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये या दर्शनाचे संजीवक संस्कार पोचवावे लागतील. पंडित दीनदयाळजींनी एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे कोणत्या कार्यक्षेत्रावर केव्हा, किती भर द्यावयाचा हे तारतम्याने ठरवायचे आहे ; परंतु दृष्टी आणि चढाई सर्वच मोहऱ्यांवर असली पाहिजे.

अर्थात् या विविध क्षेत्रांत कार्य करीत असताना आपली पावले पूर्ण व एकात्म मानव दृष्टी पुढे ठेवूनच पडत आहेत ना, याचे अवधान अखंड ठेवावे लागेल. त्या त्या क्षेत्रातील आपली धोरणे, कार्यक्रम आणि उपक्रम, आघाड्या, आंदोलने यांचे यशापयश यांचे मूल्यमापन मापदंडाने करावे लागेल. एक भूक तृप्त करीत असताना दुसरी विपरीत भूक निर्माण होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे हा दीनदयाळजींनी दिलेला इशारा जीवनाच्या विविध क्षेत्रांत हे दर्शन पोचवीत असताना सदैव ध्यानात ठेवावा लागेल.

साध्य–साधन विवेक

एकात्म मानव दर्शनाची भूमिका केवळ 'सर्वेषामविरोधेन 'च नव्हे, तर परस्पर सहकार्याची, परस्परानुकूलतेची असली तरी या दर्शनाचा मार्ग सर्वथा

विरोधशून्य वा निष्कंटक असेल असे नाही. या दर्शनाच्या प्रसाराने आणि प्रभावाने ज्यांच्या संकुचित स्वार्थाला धक्का पोहोचण्याचा संभव आहे, अशी मंडळी आपल्या सर्व शक्तिनिशी या दर्शनाला विरोध करावयास उभी ठाकतील. अशा परिस्थितीत संघर्ष अपरिहार्य होऊन बसेल. तथापि स्वतः दीनदयाळजींनीच म्हटल्याप्रमाणे, अशा संघर्षात होणारा अपरिहार्य विनाश हे नवनिर्मितीच्याच कार्यातील पहिले पाऊल असते.

या दर्शनाच्या विवेचनामध्ये समन्वय, संयम, परस्परानुकूलता आदी शब्द त्या त्या विशिष्ट संदर्भात आलेले आहेत. हा संयम, पुरुषार्थी व्यक्तीचा, पुरुषार्थी समाजाचा आहे. संयम म्हणजे असत्याशी, अन्यायाशी, दांडगाईशी तडजोड नव्हे; किंवा सौजन्य म्हणजे उद्दंडापुढे शरणागतीही नव्हे. दीनदयाळजी सौजन्यशील होते, सहिष्णू आणि संयमीही होते. परंतु असत्याशी, अन्यायाशी कधी तडजोड त्यांनी केली नाही. उलट अन्यायाविरुद्ध समाजाला संघटितपणे उभे करून अन्याय निपटून काढणारे पुरुषार्थी व्यक्तिमत्त्व त्यांचे होते. त्यांचे राजकारण, राष्ट्रचिंतन, अर्थचिंतन, आदी सर्व गोष्टींमध्ये आदर्श आणि व्यवहार यांचा यथोचित समन्वय साधणारा साध्य-साधन विवेक ठसठशीतपणे पाहावयास मिळतो. एकात्म मानव दर्शनाचे नीट आकलन आणि आचरण होण्यासाठी त्यांच्या व्यक्तिमत्वाचे हे दोन्ही पैलू ध्यानात असणे आवश्यक आहे.

एका अर्थी हे 'योगः कर्मसु कौशलम्' आहे. पंडित दीनदयाळजींनी हा योग आचरून दाखविला आहे. त्यांचे संपूर्ण जीवन या बाबतीत दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणारे आहे. 'राजकारणी मनुष्य पुढील निवडणुकीचा विचार करतो, परंतु दूरदर्शी मुत्सद्दी पुढील पिढीचा विचार करीत असतो.' अशा आशयाची इंग्रजी भाषेत एक म्हण आहे. एका वर्धमान राजकीय पक्षाची धुरा दीनदयाळजींच्या खांद्यावर होती. त्यामुळे त्यांना प्रत्येक निवडणुकीचा विचार करणे भागच होते, आणि तो त्यांनी केलाही. नाना प्रकारची अभियाने केली. लहानमोठी आंदोलने केली. मोर्चे काढले. सत्याग्रह केले, परंतु हे सर्व करीत असताना पूर्ण आणि एकात्म मानवाचे लक्ष्य त्यांच्या नजरेसमोरून कधीही हालले नाही. इतकेच नव्हे तर एकात्म मानवाची आणि या दर्शनाची कल्पना अधिकाधिक रेखीव व परिपूर्ण होत गेली. कालोचित परिपूर्ण जीवनदर्शनाच्या स्वरूपात त्यांचे हे समग्रचिंतन आपल्यापर्यंत आले आहे. संभ्रांत आधुनिक जगताला या दर्शनाची आज नितांत गरज आहे.

तथापि कोणत्याही जीवन दर्शनाची प्रतिष्ठापना, ते दर्शन तात्त्विक दृष्टचा निर्दोष असल्याचे दाखवून किंवा अन्य तत्त्वज्ञानातील व विचारप्रणालीतील उणीवा स्पष्ट करून होत नसते. त्याचप्रमाणे त्या दर्शनाच्या उद्‌गात्याचे, त्याच्या कर्तृत्वाचे पोवाडे गाऊनही होत नसते. त्यासाठी परिश्रम आणि पुरुषार्थ करून व्यवहारात त्याची रोकडी प्रचिती आणून द्यावी लागते. त्या दर्शनाचे वारस आणि त्याच्या उद्‌गात्याचे अनुयायी म्हणविणाऱ्यांवर स्वाभाविकपणे येऊन पडणारी ती नैतिक जबाबदारी असते.

मुंबईच्या भाषणमालेचा समारोप करताना पंडित दीनदयाळजींनी जवळजवळ हेच विचार पुढील शब्दांत व्यक्त केले होते, त्यांची आठवण येथे प्रकर्षाने होते. ते म्हणाले होते, – " गेल्या चार दिवसांत आपण मानवतेचा समग्र व संकलित स्वरूपात विचार केला. आपण हे तात्त्विक विवेचन केले, परंतु आपण काही पोथीपंडित नाही. आपण राष्ट्राला बलशाली, समृद्ध व सुखी बनविण्याचा संकल्प केला आहे. म्हणून या वैचारिक अधिष्ठानावर आपल्याला राष्ट्रपुनर्रचनेचे कार्य करावयाचे आहे. आपण आपल्या प्राचीन संस्कृतीचा विचार केला, परंतु आपण काही पुराणमतवादी नाही. आपल्याला काही एखाद्या पुरातत्त्व संग्रहालयाचे पहारेकरी बनावयाचे नाही. आपले ध्येय संस्कृतीचे रक्षण करणे एवढेच नसून तिला गती देऊन कार्यक्षम बनविणे हे आहे.

आपल्याला असा भारत उभा करावयाचा आहे की जो आपल्या पूर्वजांच्या भारताहून अधिक गौरवशाली असेल आणि येथे जन्मलेला प्रत्येक मनुष्य स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास करीत केवळ सबंध मानव जातीशीच नव्हे तर संपूर्ण सृष्टीबरोबर एकात्मतेचा साक्षात्कार करीत नराचा नारायण बनण्यास समर्थ होईल. '

या सर्व गोष्टी ध्यानात घेऊन आपण वाटचाल केली तर भारतीय संस्कृतीच्या शाश्वत मूल्यांबरोबरच राष्ट्रीयता, लोकशाही, समता व जागतिक ऐक्य हे आदर्श एका समन्वित स्वरूपात आपण जगासमोर ठेवू शकू. या आदर्शांमध्ये सध्या दिसणारा विरोध नाहीसा होऊन ते परस्पर पूरक होतील व मानव आपली हरवलेली प्रतिमा परत मिळवून जीवनाचे उद्दिष्ट गाठू शकेल."

• • •

दीनदयाळजींचा राजकीय वारसा

भा. कृ. केळकर

अनुक्रम

१	संघविचाराचे बीज	२९५
२	जनसंघाची जन्मकथा	३१४
३	जनसंघाचे राष्ट्रीय जीवनदर्शन	३३३
४	दीनदयाळजी : एक मूलगामी विचारवंत	३४१
५	पक्ष-संघटक	३६०
६	जन-आंदोलने	३७६
७	निवडणुकींच्या आखाड्यात	३८६
८	राष्ट्रवादी राजकारणाचे तत्त्वचिंतक	४०७
९	दीनदयाळजींचा वारसा	४२४

श्री. भालचंद्र कृष्णाजी केळकर

एक सिद्धहस्त मराठी पत्रकार, व्यासंगी ग्रंथकार व दिल्लीतील महाराष्ट्र परिचयकेंद्राचे संस्थापक, संचालक म्हणून श्री. भा. कृ. केळकर हे वाचकांना सुपरिचित आहेत. नवशक्ति, विवेक, तरुण भारत या वृत्तपत्रांत प्रचलित विषयांवर भरपूर लेखन त्यांनी केले. १९८३ मध्ये सरकारी सेवेतून निवृत्त झाल्यावर स्वतंत्र पत्रकार म्हणून प्रासंगिक लेखन ते करीत आहेत. सुभाष चरित्र, सावरकर दर्शन, टिळक विचार, समाजसुधारक सावरकर इत्यादी ग्रंथ त्यांनी लिहिले आहेत. शिवाय गोपाळ कृष्ण गोखले स्मारक ग्रंथ, समग्र टिळक, यशवंतराव चव्हाण स्मृतिग्रंथ यांचे संयोजन व संचालन हे त्यांचे मोठे कार्य आहे.

' पं. दीनदयाळ उपाध्याय - राष्ट्रीय वारसा ' हे त्यांचे प्रस्तुत ग्रंथातील लिखाण त्यांच्या चिंतनशील आणि मूलग्राही लेखनप्रवृत्तीची साक्ष पटवील.

१

संघ-विचाराचे बीज

भारत स्वतंत्र झाल्यावर आपल्या राजकारणाचे स्वरूप पालटले. स्वातंत्र्यलढ्यात विविध विचारसरणींचे नेते व अनुयायी २५ वर्षे महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली एकत्र आले होते. गांधीजींना विरोध करून स्वतःचे नेतृत्व व विचार प्रस्थापित करण्याचा प्रयत्न झाला. मानवेंद्रनाथ रॉय, सुभाषचंद्र बोस, स्वातंत्र्यवीर सावरकर, हे त्यांत प्रमुख होते. पण १९४२ च्या लढ्यानंतर भारतीय स्वातंत्र्यलढ्यास क्रांतिकारक वळण मिळाले. गांधीजींचे नेतृत्व पुन्हा प्रस्थापित झाले. त्यानंतर वेगाने राजकीय घटना घडत गेल्या. फाळणी झाली. फाळणीनंतरचे प्रश्न आले. संस्थानांचे विलीनीकरण झाले. उत्तराधिकारी व स्थित्यंतर-पक्ष म्हणून ब्रिटिशांनी काँग्रेसच्या स्वाधीन सत्ता केली होती. पण त्यानंतर सत्तेलाच चिकटून राहण्याची, सत्ता केंद्रित करण्याची प्रवृत्ती काँग्रेस-मध्ये निर्माण झाली. स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटिश सत्ता हेच दारिद्र्य, बेकारी, हिंदु-मुस्लिम संघर्ष आदी सर्व प्रश्नांचे मूळ कारण आहे असा सोपा युक्तिवाद भारतीय नेते करीत असत. त्यात सत्य होते. पण ते अर्धसत्य होते. खरे म्हणजे प्रखर ब्रिटिशविरोध हेच आपल्या राष्ट्रभक्तीचे एकमेव सूत्र होते. त्यामुळे आपल्या राजकीय नेतृत्वाची तऱ्हाच वेगळी होती. ब्रिटिश गेल्यावर जे राजकारण सुरू झाले त्यात पुनर्रचना, सामाजिक व आर्थिक विचारसरणी, राष्ट्रनिर्मितीचे प्रयत्न आदींचा विचार केलेले व त्यासंबंधीचा स्वतःचा आराखडा असलेले राजकीय पक्ष व नेतृत्व निर्माण झाले.

१९५० मध्ये भारतीय राज्यघटना संमत होऊन तिच्यानुसार १९५२

साली पहिल्या सार्वत्रिक निवडणुकी झाल्या. १९५०–५२ या दोन वर्षांत जे राजकीय नेतृत्व उदयाला आले ते काँग्रेसला प्रतिस्पर्धी म्हणून राजकीय आखाड्यात उतरलेले नेतृत्व होते. स्वातंत्र्यलढा चालू असता मुख्यतः कम्युनिस्ट, कॉ. रॉय व स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी काँग्रेसेतर पक्ष म्हणून तीन स्वतंत्र विचारप्रणालींचे नेतृत्व केले होते. समाजवादी पक्ष, किसान मजदूर प्रजा पक्ष, भारतीय जनसंघ आदी भारताच्या पुनर्रचनेची स्वतःची विचारप्रणाली असलेले राजकीय पक्ष निर्माण झाले.

भारतीय जनसंघ ऑक्टोबर १९५१ मधे स्थापन झाला. त्याची जन्म-कथा पुढील प्रकरणात सांगितली आहे.

१९५१ साली पं. दीनदयाळजींनी भारतीय जनसंघाचे उत्तर प्रदेशातील संघटक कार्यवाह म्हणून राजकारणात प्रवेश केला. १९६८ मध्ये ते जनसंघाचे अध्यक्ष झाले. १९५१ – ६८ या सतरा वर्षांत जनसंघाची उभारणी केली. हे त्यांचे १७ वर्षांचे राजकीय जीवन व कार्य हा या पुस्तकाचा विषय आहे. पण दीनदयाळजी १९३८ ते १९५१ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते होते. जनसंघात प्रवेश करण्यापूर्वी उत्तर प्रदेशाचे रा. स्व. संघाचे सहप्रांत प्रचारक होते. त्यांच्या व्यक्तित्वाची घडण व विचारसरणीचे बीजारोपण ही रा. स्व. संघाने केली होती. म्हणून त्यांच्या राजकीय कार्याचा व नेतृत्वाचा अभ्यास करताना रा. स्व. संघाचा बीज-विचार दीनदयाळजींनी कसा मांडला व संघस्वयंसेवकत्वाची त्यांची स्वतःची व त्या काळातील सरसंघचालक श्रीगुरुजी यांची संकल्पना कोणती होती हे समजून घेतले पाहिजे. कारण दीनदयाळजींची प्रारंभिक वैचारिक व व्यक्तित्वाची घडण संघाने केली होती. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाचा पोतच वेगळा झाला. त्यांच्या वैचारिक प्रक्रिया व प्रतिक्रिया इतर राजकीय नेत्यांपेक्षा वेगळ्या झाल्या.

किंबहुना असे म्हणता येईल की, संघाच्या मुशीत घडविले गेलेले नेतृत्व व व्यक्तित्व संघाबाहेरच्या जगात कसे बहरते किंवा त्याचे नवे उन्मेष दिसतात याचा प्रयोग दीनदयाळजींना राजकीय क्षेत्रास देऊन रा. स्व. संघाने केला. म्हणूनच दीनदयाळजी हे सत्यशोधक, सर्जनशील, विचारवंत म्हणून राजकारणात आले. सत्ताशोधक म्हणून नव्हे. त्यांची भूमिका व उद्दिष्ट स्पष्ट होते.

संघालाही परिवर्तन हवे आहे

स्वातंत्र्यलढा संपून भारताचे लोकशाही राजकारण सुरू झाले. या

स्थित्यंतराविषयी दीनदयाळ यांनी संघकार्य करीत असतानाही काही विचार व्यक्त केले होते. त्यावरून स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी पुढे जे राजकारण केले त्याची वैचारिक पार्श्वभूमी कळण्यास मदत होते. जनसंघ स्थापन होण्यापूर्वी उत्तरप्रदेशचे सहप्रांतप्रचारक म्हणून मीरत येथे केलेल्या एका भाषणात दीनदयाळ यांनी स्वातंत्र्य हे साध्य नाही, साधन आहे व स्वातंत्र्योत्तर काळात कोणते कार्य करावयाचे आहे यासंबंधी विचार मांडले होते. ते म्हणाले होते, "संघावर तो पुराणमतवादी, प्रगतीविरोधी किंवा प्रतिक्रियावादी आहे असा नेहमी आरोप करण्यात येतो. पण जगात नेहमी परिवर्तन होत असते हे सर्वांना माहीत आहे. पण हे परिवर्तन होताना शाश्वत तत्त्व नष्ट होत नाही. आम्हालासुद्धा नवरचना हवी आहे. पण या नवरचनेसाठी जे शाश्वत तत्त्व आहे, ते आम्ही सोडू इच्छीत नाही. आम्ही जिवंत असेपर्यंत गौरवपूर्ण रीतीने जगू इच्छितो. जीवनाच्या शाश्वत तत्त्वाचा विकास करीत असताना होणारे सर्व परिवर्तन आम्हाला हवे आहे. पण आमच्या अस्मितेचा आविष्कार आम्ही या जगात करू इच्छितो. त्याचे रक्षण, विकास व उन्नती यांच्यासाठी लागणारे अत्याधुनिक असे परिवर्तन आम्ही करू. ज्ञान, विज्ञान व संस्कृती या सर्व क्षेत्रांत आमचा विकास होण्यासाठी जो बदल आवश्यक असेल त्याचा स्वीकार आम्ही करू. शरीर जसे अनेक बाह्य वस्तूंचा आपल्या पोषणासाठी, आपल्या कुवतीनुसार स्वीकार करते तसेच आम्ही करू. अंगावरचे कातडे बदलत असते, पण ते सहजपणे अस्वाभाविक व कृत्रिम मार्गांनी नाही. शरीरात केवळ नाविन्याच्या हौसेने बदल करणे अनिष्ट असते. तसेच केवळ नाविन्याच्या मागे लागून आपले शाश्वत तत्त्व सोडणे घातक असते. आम्ही तसे करणार नाही. तसे केल्याने आमचे जीवन नष्ट होईल. आम्ही नाविन्याचे विरोधक नाही. प्राचीनतेच्या अभिमानाने आम्ही आमच्या रूढींचे किंवा मृत परंपरांचे संरक्षण करू इच्छीत नाही. आपल्या मृत पित्याचे आणि आजोबांचे शरीर त्यांचेविषयी आपल्याला आदर असूनही, आपण जपून ठेवत नाही; उलट त्याचे दहन करून अस्थी विसर्जन करतो.

पण नाविन्याच्या आपल्या हौसेमुळे अनेक परदेशी तत्त्वप्रणालींचा प्रवेश आपल्या देशात झाला आहे. ही प्रवृत्ती घातक आहे. त्या प्रणाली केवळ परदेशी आहेत म्हणून आम्ही त्यांना विरोध करीत नाही. परदेशापासून प्रेम, सहकार्य, सद्भावना यांनी आमच्या जीवनासाठी अनेक गोष्टी शिकू शकतो. (पाञ्चजन्य)

सारांश, आधुनिक भारताला आधुनिक जगात जगावयाचे आहे, याचे भान ठेवून, मूळ प्रकृती कायम ठेवून आपल्यात बदल करावयाचा, हे सूत्र संघात असतानाच दीनदयाळजींनी आपल्या मनात पक्के केले होते.

सांस्कृतिक स्वातंत्र्य आवश्यक

भारत स्वतंत्र झाल्यावर संघाचे कार्यक्षेत्र काय याचे उत्तरही दीनदयाळजींनी दिले होते. हे भाषण 'पांचजन्य' साप्ताहिकाच्या भाद्रपद कृष्ण ९, २००६ च्या (ऑगस्ट–सप्टेंबर १९४८) अंकात आलेले आहे. याचा अर्थ ते जनसंघ स्थापनेपूर्वीचे आहे. त्या भाषणात प्रत्येक राष्ट्राला आपले व्यक्तित्व असते, त्याची काही गुणवैशिष्ट्ये असतात. त्यांच्या विकासासाठी स्वातंत्र्य आवश्यक असते असे सांगून दीनदयाळ म्हणाले होते," १५ ऑगस्ट १९४७ ला एक लढाई आपण जिंकली. आपल्या विकासातील अडथळे दूर करण्यासाठी आपणाला स्वातंत्र्य हवे होते. आपल्या आत्मानुभूतीचा मार्ग मोकळा झाला. आता मानवाच्या प्रगतीला आम्हाला मदत करावयाची आहे. आपल्या आत्म्याने इंग्रजी राजवटीविरुद्ध बंड केले ते केवळ इंग्रज होता म्हणून नव्हे तर आमच्या दैनंदिन जीवनात इंग्रजी रीतीरिवाज, विदेशी दृष्टिकोन स्थिर होत होता. त्यामुळे सारे वातावरण दूषित होऊ लागले होते. म्हणून आता इंग्रज जाऊन त्याचे जागी आमच्याच रक्ता–मांसाच्या लोकांचे राज्य झाले आहे, याचा आम्हाला आनंद आहे. पण आता आमची अपेक्षा ही की, ज्या समाजाने त्यांना घडविले आहे, त्या समाजाच्या भावनांचे स्पंदन त्यांच्या हृदयात झाले पाहिजे. त्या समाजाच्या विकासाला अनुकूल, त्याची प्रकृती व स्वभाव यांना अनुरूप अशा पद्धती निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला पाहिजे. असे जर झाले नाही तर अद्यापही स्वातंत्र्याची लढाई पुरी व्हावयाची आहे असेच आम्हाला म्हणावे लागेल.

आम्हाला आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक स्वातंत्र्य हवे आहे. स्वातंत्र्यात आत्मानुभूती येणे हे महत्त्वाचे आहे. कारण संस्कृती ही शरीरातील प्राणाप्रमाणे राष्ट्रजीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात अनुभवता येते. निसर्गावर विजय मिळवताना मानव आपल्या ज्या जीवनदृष्टीने रचना करीत असतो, ती त्याची संस्कृती असते. संस्कृती कधीही गतिशून्य होत नाही. नदीच्या प्रवाहासारखी ती असते. त्या प्रवाहित्वाबरोबरच तिची काही वैशिष्ट्ये निर्माण होतात. हा सांस्कृतिक दृष्टिकोन त्याचे साहित्य, कला, तत्त्वज्ञान, स्मृतिशास्त्रे व सामाजिक इतिहास या सर्वांत व्यक्त होत असतो. आपण स्वतंत्र झालो

असू तर हा संस्कृती-प्रवाह पुन्हा चालू झाला पाहिजे. राष्ट्रभक्तीची भावनाही याच संस्कृतीतून जन्माला येते व हीच संस्कृती राष्ट्राच्या सीमा ओलांडून मानवजातीशी त्या राष्ट्राचे एकात्मतेचे नाते जोडते. म्हणून सांस्कृतिक स्वातंत्र्य अत्यावश्यक आहे. त्याविना स्वातंत्र्य निरर्थक ठरेल व ते टिकणारही नाही." (पांचजन्य, भाद्रपद कृष्ण ९, २००६)

अनिर्बंध व्यक्तिस्वातंत्र्य व हुकूमशाही

"समाजवाद व मुक्त अर्थव्यवस्था या दोन्हींतून हुकूमशाही येते. ती दोन्ही आम्हाला टाळावयाची आहेत" असे विचारही संघाच्या व्यासपीठावरून दीनदयाळजींनी व्यक्त केले होते. ते म्हणाले होते, "प्रत्येक व्यक्ती आपल्या कुवतीनुसार काम करील व त्याच्या गरजेइतके धन त्याला दिले जावे यासाठी एक विचार-संप्रदाय पश्चिमेत निर्माण झाला; पण या संप्रदायातूनही हुकूमशाही निर्माण झाली होती. कारण हे गृहीत तत्त्व मानवी स्वभावाविरुद्ध आहे. काम कमी करावयाचे व उपभोग जास्त घ्यावयाचा असे वाटणे, हा मानवी स्वभाव आहे. मग जनतेच्या गरजा सक्ती करून कमी केल्या जातात, त्या हुकूमशाही मार्गाने. भारतीय तत्त्वज्ञान स्वतः होऊन इच्छांचे नियंत्रण करण्याचे आहे. संन्याशाच्या गरजा कमी असतात व समाजासाठी जो जास्त कष्ट करतो त्याला जास्त मान दिला जातो. भारतीय कटुंबातही जो प्रमुख असतो तो आपल्या गरजा किमान ठेवतो पण त्याचा मान जास्त ठेवला जातो. आमच्या गरजा आम्ही भागवू, पण त्यांचे दास होणार नाही."

सारांश, व्यक्तिवाद हा भांडवलदारांची गुलामी लादतो व समाजवाद मानवाचे व्यक्तित्वच नष्ट करतो. भारताला या दोहोंचा समन्वय हवा आहे. तेच भारतीय विचारप्रणालीला धरून होईल. अशा रीतीने नवनिर्मितीची ऊर्मी व आमच्या जीवनाच्या शाश्वत तत्त्वाचे अभारतीय तत्त्वापासून रक्षण दोन्हीही आम्ही साध्य करू शकू." (पांचजन्य, आश्विन कृष्ण ९ सं. २००७)

या दोन्ही उताऱ्यांवरून वैचारिक दृष्टचा राजकारणात प्रत्यक्ष प्रवेश करण्यापूर्वी स्वातंत्र्योत्तर भारताच्या पुनर्रचनेच्या प्रश्नाबाबत दीनदयाळजी एका ठाम भूमिकेवर उभे होते व ती भूमिका रा. स्व. संघाच्या विचारांतून तयार झालेली होती हे दिसून येईल.

हिंदू विचाराचा अंतःस्रोत

दीनदयाळजींच्या समग्र राजकीय, सामाजिक विचाराचा पाया हिंदू विचार हा होता. या हिंदू विचारांचे संस्कार रा. स्व. संघात त्यांच्यावर झाले होते. किंबहुना त्यांच्या राष्ट्रविचाराची घडण संघविचारानेच केली होती. दिल्लीत झालेल्या अखेरच्या बौद्धिक वर्गातील त्यांचे राष्ट्रवादाचे विश्लेषण हा त्यांचा पायाभूत विचार म्हणून मानता येईल. या व्याख्यानास श्रीगुरुजी उपस्थित होते. दीनदयाळ हिंदू राष्ट्रवादाचे विवेचन करताना म्हणाले," प्रत्येक गोष्टीला कोणता तरी केंद्रबिंदू पाहिजे. पैसा आहे, विद्या आहे, बुद्धीही आहे, शरीरात शक्ती आहे – पण हे सर्व कशासाठी आहे हे सांगणारे केंद्रीय तत्त्व नाही. आपली हीच स्थिती आहे. आपल्या जीवनाचे केंद्रीय तत्त्व कोणते याचा पत्ता नाही. आपणा सर्वांना एकत्र जोडणारे तत्त्व कोणते ? प्रत्येक देशाला ते असते. तो केंद्रबिंदू म्हणजे राष्ट्र. राष्ट्र हा केंद्रबिंदू मानण्याऐवजी आमच्या लोकांसमोर व्यक्ती हा केंद्रबिंदू ठेवला गेला. येथेच घोटाळा झाला. लोक व्यक्तिनिष्ठ विचार करू लागले. आपणाला आर्थिक विकासाच्या दृष्टीने काम करावयाचे आहे असेही सांगितले गेले. आर्थिक विकास कोणाचा करावयाचा ? व्यक्तीचा. म्हणून त्यांच्या राहणीचा दर्जा वाढविण्याचा विचार त्याबरोबरच आला. राष्ट्राचे राहणीमान वाढले की व्यक्तीचे वाढेल असा विचार मांडला गेला नाही.

आज गरज आहे ती आपल्या जीवनाचा ध्येयबिंदू कोणचा हे निश्चित करण्याची. 'एकदा हा ध्येयबिंदू जर कळला तर सर्व लोक त्या दिशेने जाऊ लागतील. त्या ध्येयाकडे पोहोचण्याचे मार्ग वेगवेगळे असू शकतील. पण हे राष्ट्र आमचे आहे, हा आमचा देश आहे, हा विचार आज सर्वांत महत्त्वाचा आहे. एकदा राष्ट्रदेवतेच्या मंदिराकडे जावयाचे हे ठरल्यावर बाकी गोष्टींचा मेळ त्या ध्येयसाधनेसाठी घातला जाईल.

राष्ट्र म्हणजे काय ? भारत म्हणजे येथील केवळ नद्या, पर्वत काय ? आपण भारताचा विचार म्हणजे त्यातील समाजाचा विचार असे मानतो. पण आपण सर्वजण राष्ट्रासाठी विचार करू असे जेव्हा म्हणतो तेव्हा ही भावना अंतरीची असते. आपण इंग्रजांविरुद्ध लढत होतो ते याच अंतरीच्या ऊर्मीने. इंग्रज गेल्यावर आपले राज्य चालविण्याची जबाबदारी आपल्यावर आली. पण आम्ही म्हणजे कोण याचा गंभीरपणे विचार त्या काळात झाला नाही.

इंग्रज गेल्यावर आपल्याला राज्य मिळाले, पण 'आपले' राज्य म्हणजे कोणाचे राज्य ? या देशाचा वंशवृक्ष कोणता ? या देशातील राष्ट्रजीवन कोणी निर्माण केले ? आपण एका सत्याचा स्वीकार केला पाहिजे – ते हे की, आमचे राष्ट्रजीवन हिंदू राष्ट्रजीवन आहे. आणखी कोणी येथे आले तर त्यांना या हिंदू राष्ट्रजीवनाशी जुळवून (ॲडजस्ट) घ्यावे लागेल. असे करावयास मूळ स्टँडर्ड ठरले पाहिजे. त्यानंतरच अधिक (प्लस) उणे (मायनस) होऊ शकेल. तपमान घेताना आपण थर्मामीटर पाहातो. त्यात 'नॉर्मल' ची रेषा असते. प्रत्यक्ष तपमान त्या रेषेच्या वर किंवा खाली असा आपण हिशेब करतो. तसेच भारताची स्टँडर्ड रेखा हिंदू राष्ट्र ही आहे. हे सत्य प्रत्येकास माहीत आहे. ''कोणी ते प्रत्यक्ष म्हणो वा न म्हणो, आपले राष्ट्रसूत्र हिंदू सूत्र आहे. या संपूर्ण देशाला एकत्र जोडणारे हे सूत्र प्राचीन काळापासून आहे.''

धर्माचा विचार

राष्ट्रवादाप्रमाणे दीनदयाळजींच्या एकूण राजकीय विचारात नैतिकता व धर्म यांना प्राधान्य दिलेले आहे. त्यांचे म्हणणे भारत हा धर्मप्रधान देश आहे. धर्म हा भारताचा प्राण आहे हे त्यांनी रा. स्व. संघात झालेल्या भाषणांतून स्वतः सांगितले. उत्तरप्रदेशात अलीगढ येथे संघातर्फे झालेल्या भाषणात दीनदयाळजी म्हणाले होते, ''भारताला अधार्मिक राज्य (सेक्यूलर) घोषित करून देशाच्या आत्म्यावर घाव घालण्यात आला आहे. अधार्मिक राज्यात सदैव दुःखच नांदते. रावणाच्या अधार्मिक लंकेत सोने होते, पण रामराज्य तेथे निर्माण होऊ शकले नाही.''

धर्माचे विवेचन करताना 'रिलिजन' म्हणजे धर्म नव्हे, असे दीनदयाळ सांगत. धर्माचे सुबोध विवेचन करताना त्यांनी म्हटले होते, 'धर्म हा संघर्षात नसतो. समजूतदारपणात असतो. एकाचे दुसऱ्याशी नाते समान स्वार्थाचे नसते तर एकांच आत्म्याचे असते असे धर्म सांगतो. महाभारतात धर्म-अधर्माची अत्यंत सोपी व्याख्या दिली आहे. 'मम' हा अधर्म आहे. 'न मम' हा धर्म आहे. 'माझे काही नाही सर्व काही तुझे आहे' ही धर्मामागची भावना असते; आणि 'सारे काही माझे आहे' अशी धारणा असणे हा अधर्म आहे. याचा परिणाम असा होतो की माणूस स्वतःला केंद्र समजून सर्व समाजाचा विचार करतो. जग सुखी करायचे असेल तर 'न मम' या संकल्पनेचाच विचार करावा लागेल. व्यक्तीचे स्वातंत्र्य व समाजाचे हित या दोहोंचा संतुलित मेळ घातला पाहिजे.

व्यक्तिस्वातंत्र्य असलेच पाहिजे. त्यावर बंधने असता कामा नयेत. पण त्या स्वातंत्र्याचा उपयोग मनुष्य केवळ स्वत:साठी करीत असेल तर ते चूक ठरेल. व्यक्तीने आपल्यासाठी नव्हे तर समाजासाठी जगले पाहिजे. असे झाले तरच तो समाजसेवा करील."

हिंदु-संघटन धर्माधिष्ठित वैभवासाठी

राजस्थानमध्ये झालेल्या एका बौद्धिक वर्गात (जून १९६५) दीनदयाळजींनी हिंदू संघटन कशासाठी या विषयाचे विवेचन केले होते. ते म्हणाले, "संघाच्या प्रार्थनेत हे राष्ट्र परमवैभवाला न्यावयाचे आहे असे म्हटले आहे. याचा अर्थ हे वैभव परत मिळविण्यासाठी जे करावयास पाहिजे, त्यास जे उपयुक्त ठरेल ते सर्व आपण करणार आहोत असा आहे. तसेच आपण धर्माच्या रक्षणाचाही उल्लेख करतो. मग संघाला नेमके काय करावयाचे आहे ? संघटना, धर्मरक्षण की राष्ट्राची वैभव-प्राप्ती ? वस्तुत: या सर्व गोष्टी एकमेकांना जोडलेल्या आहेत. प्रकाशासाठी वीज हवी, पण विजेचा दिवाही हवा तसे हे आहे. आपण परमेश्वराजवळ आशीर्वाद मागतो की आमची संघटित कार्यशक्ती धर्मरक्षण करून राष्ट्राला परमवैभवाकडे नेवो. या एका वाक्यात सर्व काही समाविष्ट आहे."

संघ एकात्मवादी आहे

"आम्हाला जेव्हा कोणी विचारतात की तुम्ही व्यक्तिवादी आहात की समाजवादी ? तेव्हा मी सांगतो की आम्ही दोहोंचा विचार करतो. आम्ही पूर्णतावादी, एकात्मवादी, आत्मवादी, संघवादी आहोत. आम्ही सर्वत्र एक चैतन्य – एकच आत्मा आहे असे मानतो. हिंदू समाजाचे संघटन करणे म्हणजे एकाच चैतन्याने त्याला भारून टाकणे, एकात्म जीवनाचा विचार करणे." (उदेपूर येथील अधिकारी शिक्षण वर्गातील भाषण – ५ जून १९६४.)

व्यक्ती व समाज

संघाच्या विचारसरणीत व्यक्ती आणि समाज यांचे संबंध, व्यक्ती ही समाजनिष्ठ असावयास हवी हा आग्रह यांना महत्त्वाचे स्थान आहे. व्यक्तित्व नामशेष न करता ते समाजाला अर्पण करावयाचे ही संघाची भूमिका दीनदयाळ सतत मांडत असत. व्यक्तिप्रधान राजकारणात दीनदयाळजींसारखे आत्मविलोपी नेतृत्व संघाच्या या भूमिकेतून निर्माण झाले होते म्हणून त्यांच्या या विषयींच्या विचारांना महत्त्व आहे. दीनदयाळ म्हणत असत, "शरीर, मन, बुद्धी आत्मा

यांचा एकत्र निवास म्हणजे व्यक्ती होय. सुख म्हणजे ह्या सर्वांचे सुख. यांपैकी कोणत्याही एकाचा विचार केला तर तो अपूर्ण विचार होईल. आमच्याकडे तर पूर्वजन्माचाही विचार केला जातो. एकाच व्यक्तीच्या सुखाचा विचार करताना आपण जसा या चारही घटकांचा विचार करतो, तसेच समाजाच्या सुखाचा विचार करताना या चारही गोष्टींचा विचार केला पाहिजे. व्यक्ती जेव्हा जन्माला येते तेव्हा तिचे सुख समाजावर अवलंबून असते."

व्यक्ती आणि समाज यांचा पहिला संबंध शिक्षणात येतो. भाषा प्रथम आई शिकविते. ती भाषा आईची नसते, समाजाची असते. बरे-वाईट संस्कार समाजामुळे होतात. स्तुती-निंदा समाज करतो. दुसरे असे की सुख–दुःख हे केवळ वैयक्तिक असत नाही. सामूहिक असते. व्यक्तीने सामूहिक सुखदुःखाचा विचार करायला शिकले पाहिजे. कारण आपला आर्थिक, राजकीय, आध्यात्मिक व नैतिक विकास समाजाशी जोडलेला आहे. परमेश्वराचे अवतारही समाजाच्या हितासाठी झाले आहेत. कौरव पक्षात एकाहून एक महारथी होते. पण त्या अलग अलग व्यक्ती होत्या, समूह नव्हता. पांडव हे एक होते. श्रीकृष्णाला त्यांनी आपला नेता मानले होते. ते सर्व समष्टिवादी होते. समष्टिवाद हा धर्म आहे. राष्ट्रवाद हा धर्म आहे. त्यासाठी काहीही केले तरी ते धर्म्य ठरते. सैनिक माणसेच मारतो पण त्याला परमवीरचक्र मिळते. दुसऱ्या एखाद्या व्यक्तीने नरहत्या केली तर तो फासावर लटकविला जाईल. एकाचे कृत्य राष्ट्रासाठी, दुसऱ्याचे स्वतःसाठी हा फरक आहे. आपली लोकशाही आहे म्हणून राजकीय पक्ष आहेत, पण ते राष्ट्रासाठी. राष्ट्राला आपण विसरलो तर सर्व गोष्टींची किंमत राहाणार नाही. पण या राष्ट्रभावनेचे सतत संस्कार होण्याची गरज आहे. तरच राष्ट्र आपल्या डोळ्यासमोर राहील."

भारतीय व पाश्चात्य विचार

भारतीय व पाश्चमात्य विचारसरणींत जो फरक आहे तो स्पष्ट करताना दीनदयाळजींनी सांगितले होते, "भारताची सर्व विचारसरणी सहयोग व परस्परपूरकता यांना प्राधान्य देते. पाश्चिमात्यांची सर्व विचारसरणी संघर्षावर आधारलेली आहे. स्पर्धा हे त्यांच्या जीवनाचे आधारभूत तत्त्व आहे. आमची प्रत्येक सामाजिक संकल्पना व्यक्तीच्या पूर्णत्वाचा विचार करते. पाश्चात्य विचारसरणीत माणसाच्या शरीराचा विचार प्रमुख मानला जातो. भारतीय विचारसरणीत माणसाच्या बौद्धिक, मानसिक व आध्यात्मिक गरजांना प्राधान्य

देण्यात आले आहे. पश्चिमेचा संघर्षावर भर आहे. व्यक्ती व समाज यांच्यात संघर्षाचे प्रसंग येतात. पण ही स्थिती स्वाभाविक नसते. अपवादरूप असते. हा धर्म नाही. ही विकृती असते.

संघर्षाचे हे मूलतत्त्व आधारभूत असल्यामुळे पाश्चिमात्य विचारवंतही दोन प्रकारचे झाले आहेत. एक प्रकार व्यक्तीला प्रमुख मानणाऱ्या विचारवंतांचा व दुसरा प्रकार समाजाला प्राधान्य देऊन व्यक्तीला गौणत्व देणारा. पहिल्या प्रकारचे विचारवंत समाजहिताच्या मर्यादेत व्यक्तिहित बसवितात व दुसऱ्या प्रकारचे विचारवंत व्यक्तिहित व व्यक्तिस्वातंत्र्य पूर्णपणे नाकारतात.

'बलवानच शेवटी जिंकतात' या डार्विनच्या सिद्धांतावर पाश्चात्यांनी आपल्या जीवनाची रचना केली. त्यामुळे स्वार्थासाठीच संघर्ष होतो. एकाचा दुसऱ्यावर विश्वास असत नाही. दोन व्यक्ती एकमेकांशी संबंध ठेवतात याचे कारण त्यांचा समान स्वार्थ असतो. राष्ट्राशी असलेले व्यक्तीचे संबंधही स्वार्थावर आधारलेले असतात. समान स्वार्थ असलेल्या व्यक्तींचे राष्ट्र बनते, हा त्यातला भाव आहे.

कर्तव्याची प्रेरणा

पश्चिमेत प्रत्येक व्यक्ती आपल्या अधिकारांच्या रक्षणासाठी प्रयत्न करीत असते. पती-पत्नीच्या अधिकारांची भांडणे होतात. प्रेमविवाह होत असतात. पण संघर्ष चालूच असतो. ज्या ठिकाणी खरे प्रेम असते तेथे संघर्ष संभवतच नाही.

आमची प्रेरणा अधिकाराची नसते, कर्तव्याची असते. कर्तव्याच्या विचारावर आमचा भर आहे. त्यामुळे सेवेचा विचार प्रमुख असतो. त्यामुळे एकात्मता व सहिष्णुता यांचा सामाजिक अनुभव आपल्या देशात येतो.

समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात समाजाशी त्याची एकात्मता असली पाहिजे. असे झाल्याने व्यक्तित्व नष्ट होत नाही, ते व्यापक होते. समाजापासून मी वेगळा आहे असे जर माणूस म्हणू लागला तर संघर्ष होईल. समुद्राच्या पाण्याची वाफ होते, त्याचे ढग बनतात व त्यातून पाऊस पडून पुन्हा ते पाणी समुद्रास मिळते. याच निसर्ग-नियमाप्रमाणे माणसाने वागले पाहिजे. याच नियमामुळे सृष्टी टिकली आहे. ही भावना जर सर्व समाजात रुजली तर मानवी जीवन सुखी होईल व आमच्या तत्त्वज्ञानाचा उपयोग जागतिक स्थैर्य निर्माण करण्यासाठी होऊ शकेल."

रा. स्व. संघात शिकविला व संस्कारिला जाणारा हा सामाजिक विचार वरील विचारांत सारांशरूपाने व्यक्त झाला आहे. ' व्यक्तीच्या सामाजिकतेचे तत्त्वज्ञान, असे थोडक्यात त्याचे वर्णन करता येईल. दीनदयाळजी त्याचे भाष्यकार तर होतेच. मूर्तिमंत आदर्शही होते. त्यांच्या दृष्टीने व्यक्तीची ही आचारसंहिता होती. ती त्यांनी स्वतःच्या जीवनात आचरली, म्हणूनच त्यांचा गौरव ' आदर्श स्वयंसेवक ' असा श्रीगुरुजींनी केला होता.

चिरंतन स्वयंसेवकत्व

रा. स्व. स्वसंघाच्या स्वयंसेवकत्वाची दीनदयाळजींची कल्पना काय होती हे स्वतः त्यांनी 'स्वयंसेवक' या विषयावर दिलेल्या भाषणात स्पष्ट केले होते. ते म्हणाले होते, सामान्यतः ' स्वयंसेवक ' म्हणजे फुकट काम करणारा मजूर असा अर्थ केला जातो. किंवा एखाद्या कार्यक्रमासाठी गोळा केलेले कार्यकर्ते असतात. तो कार्यक्रम संपला की त्यांचे स्वयंसेवकत्व संपते. आम्ही समाजाच्या पुनर्रचनेसाठी पत्करलेले स्वयंसेवकत्व आहे. आम्ही फार मोठे कार्य अंगावर घेतले आहे. आम्हाला समाजाची संघटना करावयाची आहे.

" आम्ही स्वतःला हिंदू म्हणवतो. त्याचा अर्थ काय ? आमच्या जीवन पद्धतीचे नाव हिंदू आहे. त्यामुळे आमचे स्वयंसेवकत्व जीवनभर चालणारे आहे. ते हंगामी नाही. डॉ. हेडगेवारांनी समाजासाठी जगणारे स्वयंसेवक निर्माण केले. आमचे हिंदुत्व हैच आमचे स्वयंसेवकत्व आहे. आपला व्यवहार असा असला पाहिजे की लोकांना वाटावे की हिंदू असा तेजस्वी असतो. "

(नैरोबी येथे केलेले भाषण, १९६५)

आदर्श स्वयंसेवक

रा. स्व. संघाचे सरसंघचालक व तत्त्वद्रष्टे श्रीगुरुजी यांनी आपल्या ३३ वर्षांच्या कार्यकालात संघाचे स्वयंसेवक कसे असावेत, त्यांची कार्यपद्धती, स्वभाव, प्रेरणा इत्यादी कशा असाव्यात याचे वेळोवेळी मार्गदर्शन केले होते. त्या विचारांचे सारसंकलन पुढे केले आहे. हेतू हा 'आदर्श स्वयंसेवकाच्या अंगी' कोणते गुण असले पाहिजेत याची अधिकृत कल्पना यावी. दीनदयाळजींचे व्यक्तिमत्व संघसंस्कारांतून, संघविचारांतून जन्मलेले होते. ते समजून घेण्यासाठी व त्यांची गुणसंपदा काय होती हे समजून घेण्यास श्रीगुरुजींच्या या विचारांचा उपयोग होईल.

शुद्ध चारित्र्य

"नाण्याला जशा दोन बाजू असतात त्याचप्रमाणे आपल्या जीवनालाही दोन बाजू असतात. एक पैलू व्यक्तिगत चारित्र्याचा आहे. हे चारित्र्य शुद्ध असले पाहिजे. दुसरा पैलू म्हणजे राष्ट्राच्या दृष्टीने, समाजाच्या दृष्टीने आपला जो व्यवहार आहे, तो पैलू म्हणजे आपला स्वार्थ आटोक्यात ठेवून, राष्ट्राला प्रमुख मानून त्यासाठी आपल्या जीवनाची सर्व शक्ती आणि अनुकूल असेल ते ते सर्व राष्ट्रासाठी खर्ची घालण्याची सदैव तत्परता आणि त्यात कष्ट झाले तर त्या कष्टांतच आनंद मानून काम करण्याची क्षमता, आपल्या जीवनातील नित्य व्यवहारात आणणे हा दुसरा पैलू होय. त्यालाच राष्ट्रीय चारित्र्य म्हणतात. जी व्यक्ती चारित्र्याच्या या दोन्ही पैलूंनी युक्त आहे तीच व्यक्ती चांगली. रुपयाच्या नाण्याची एक बाजू चांगली असेल आणि दुसरी खराब झालेली, गुळगुळीत झालेली असेल तर तो रुपया खोटा ठरतो. तो बाजारात चालत नाही. तो चालवतो म्हटले तर कारावासात जाण्याची पाळी येते. म्हणून आपले चारित्र्य व्यक्तिगत आणि राष्ट्रसमर्पित जीवनाच्या दृष्टीने परिपूर्ण असले पाहिजे. अशा विशुद्ध मनात विशुद्ध धैर्याचा संचार होईल आणि आपल्या शरीराच्या शक्तीशी ते धैर्य जोडले जाऊन आपली कार्यशक्ती प्रचंड अशी होईल."

(श्रीगुरुजी समग्र दर्शन : खंड ५, पान १७)

अंतःप्रेरणेने राष्ट्रसेवा

एक ध्येय आणि त्यासाठी सामर्थ्यसंचयाच्या दृष्टीने दैनंदिन चालणाऱ्या आपल्या कार्याचे स्वरूप या दोन बाबी आपल्यापुढे आल्या आहेत. हाच संघ या शब्दाचा भावार्थ आहे. या दोहोंना जोडणारा शब्द आहे स्वयंसेवक. ही संघशक्ती उत्पन्न करण्याचे कार्य कोण करील ? भाडयाने आणलेली माणसे करू शकतील काय ? भाडयाचे तट्टू हे काम करू शकणार नाही. आपल्या राष्ट्रावर ज्याचे नितांत प्रेम आहे आणि जो असा विचार करतो की, हा माझा समाज आहे, हे माझे राष्ट्र आहे, हा माझा धर्म आहे, ही माझी संस्कृती आहे आणि ही माझी मातृभूमी आहे ; आणि परमेश्वराने मला जे जे दिले आहे ते ते सर्व मी यासाठीच खर्च करीन, तोच हे कार्य करू शकेल. कोणाच्या सांगण्यामुळे नव्हे, कुणाच्या दडपणामुळे नव्हे किंवा एखाद्या लोभाला किंवा मोहाला बळी पडूनही नव्हे. तसेच एखादे बाह्य कारण

हे काम करण्याची प्रेरणा देते म्हणूनही नव्हे, तर मातृभूमी, धर्म, राष्ट्र, समाज यांच्याविषयी, तसेच समग्र राष्ट्रशरीराविषयी माझ्या अंतःकरणात जी भक्ती आहे, तीच हे काम करण्याची माझी स्फूर्ती आहे, त्याच अंतःप्रेरणेने मी आपल्या राष्ट्राची सेवा करीन आणि ती सेवा अशा प्रकारे करीन की, ज्यामुळे या राष्ट्राचे संघटित आणि अभेद्य सामर्थ्य साऱ्या जगाच्या अनुभवाला येऊ शकेल. या प्रकारच्या अंतःप्रेरणेने कार्य करण्याची सिद्धता करून, कार्यात आपले सर्व स्वार्थ नियंत्रित करून जो पुढे येतो त्यालाच लोकांनी स्वयंसेवक म्हटलेले आहे.

(श्रीगुरुजी समग्र दर्शन : खंड ५, पान १२)

माता भूमिः पुत्रोऽहं पृथिव्याः

"या भूमीला पवित्र मानणारा, तिला आपली माता, आपला पिता, रक्षक, गुरू, सर्वश्रेष्ठ आणि तीच जगताचा मूलाधार आहे असे मानणारा तिचा पुत्ररूप हिंदू-समाज आहे. हाच हिंदू वेदकाळापासून गर्जना करीत आला आहे की, ही माझी माता आहे आणि मी तिचा पुत्र आहे –'माता भूमिः पुत्रोऽहं पृथिव्याः' या हिंदु समाजजीवनाची गेल्या अनेक शतकांची स्थिती जर आपण लक्षात घेतली तर आपल्याला असे दिसून येईल की, आपल्या देशातील लहान-मोठे सर्व पंथ ज्यात समाविष्ट होतात, असा एक सर्वव्यापी धर्म आणि त्या धर्माच्या अनेक संस्कारांनी सुसंस्कृत बनलेली अंतःकरणे असल्यामुळे निर्माण झालेला एक व अत्यंत श्रेष्ठ पवित्रमय असा जीवनप्रवाह, ज्याला आपली संस्कृती असे म्हटले जाते, तो आपल्या सर्वांना समान आहे, आपला एक इतिहास आहे. रामचंद्र आदी महापुरुषांपासून तो अर्वाचीन काळातील श्रेष्ठ त्यागमय जीवन व्यतीत करणाऱ्या राष्ट्रभक्तांपर्यंत एकच मालिका आपणां सर्वांसमोर मार्गदर्शकाच्या रूपात उभी आहे. अशा या मालिकेसमोर नतमस्तक होऊन जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत आम्ही त्यांच्यापासून प्रेरणा प्राप्त करीत असतो."

(श्रीगुरुजी समग्र दर्शन : खंड ५ – पान ७)

कर्मरत जीवन

"आपण आपले दैनंदिन जीवन जगत असताना आपापले व्यवहार सांभाळताना, आपल्या राष्ट्रविषयक चिंतेचा आपल्या अंतःकरणावर किती प्रमाणात परिणाम आढळतो आणि त्यानुसार आपण कितपत कृती करतो, या सर्व बाबींचा आपण विचार केला पाहिजे. आपल्या अंतःकरणात जर फक्त

तात्त्विक विचारच असेल आणि त्या विचारांना कर्माची जोड नसेल तर तो विचार विफल होतो, तसेच केवळ कार्य केले पण त्याचा काही विचार अंतःकरणात विद्यामान नाही असे झाले तर ते कर्म कित्येकदा विकर्म बनून जाते. या दोन्ही प्रकारच्या आपत्ती नीटपणे ध्यानात आणून योग्य विचारांसह आपण आपले कर्मजीवन आखले आहे की नाही, यावर विचार करणे आवश्यक आहे."

(श्रीगुरुजी समग्र दर्शन : खंड ४, पान २–३)

अनुशासनबद्ध जीवन

"अनुशासनाची दोन रूपे आपल्यासमोर आहेत. पहिले असे की, ज्या प्रकारचा आदेश असेल तसे त्याचे पूर्णांशाने पालन करणे; आणि दुसरे रूप असे की, पालन करणारे अनेक असल्यामुळे सर्वांनी एकसाथ सूत्रबद्ध होऊन पालन करणे, म्हणजेच एक रूप आदेशाचे व्यक्तिशः पालन आणि दुसरे रूप संघशः पालन." (श्रीगुरुजी समग्र दर्शन : खंड ४, पान १२)

"चित्ताची व्यवस्थितता हे अनुशासनाचे मानसिक स्वरूप आहे. जे जे कार्य आपण करतो त्याचे चिंतन, मनन आणि सर्व शक्तीचे त्यावर केंद्रीकरण करण्याचा हा मानसिक गुण जर आपल्यात नसेल तर अडचणींचा अनुभव येईल. जर हा गुण असेल तर शरीराकडून अनुचित व्यवहार होणार नाहीत. या दृष्टीने व्यक्तिगत आणि संघबद्ध जीवनात अनुशासनाचा गुण मनात खोलवर पोहोचणे, मन अव्यवस्थित नसणे आणि एकाग्रतेने काम करण्याची प्रवृत्ती असणे याचा अभ्यास स्वतः करणे आणि इतरांकडून करवून घेणे आवश्यक आहे. असे झाले तरच आपल्या अनुशासनाची जी कीर्ती आहे ती नीट होईल आणि आपल्याला त्यात यथार्थ समाधान प्राप्त करण्याचे भाग्य लाभेल."

(श्रीगुरुजी समग्र दर्शन : खंड ४, पान १४)

"गुरुगृही राहून विद्या संपादन केल्यानंतर शिष्य जेव्हा आपल्या घरी परतण्यास निघतात तेव्हा आचार्यांकडून त्यांना जो काही उपदेश केला जातो आणि काही सूचना दिल्या जातात, तो उपदेश आणि त्या सूचना यांना एका उपनिषदात 'इदम् अनुशासनम्' असे म्हटलेले आहे. त्यात असे सांगितले आहे की, जो सिद्धांतरूपी धर्म आहे त्या धर्मानुसार वागा. तसेच, जे सत्याला अनुसरून असेल ते कधीही सोडू नका, इत्यादी मौलिक सिद्धांत त्यात सांगितलेले आहेत. परंतु विशिष्ट प्रकारानेच वागले पाहिजे. ज्याला इंग्रजीत 'रिजिडिटी'

म्हणतात, असा आदेश किंवा उपदेश त्यात नाही; तर केवळ इतकेच सांगितले आहे की, आपल्या शास्त्रांनी प्रत्येक बाबतीत नीट मार्गदर्शन केलेले आहे ते लक्षात घ्या आणि एखादी समस्या जर उपस्थित झाली तर आपले जे श्रेष्ठ, निःस्वार्थी, तपःपूत विद्वान् आहेत ते अशा प्रसंगी ज्या प्रकारे वागताना दिसतील तसे वागा. विशिष्ट अशी नियमावली काही सांगितलेली नाही. बुद्धीचे स्वातंत्र्य दिले आहे. आणि या स्वातंत्र्याचा मौलिक अशा सिद्धांतांशी समन्वय जोडून त्यालाच अनुशासन म्हटले. आपल्याकडे अनुशासन या शब्दात व्यक्तीचे स्वातंत्र्य, व्यक्तीचे सूत्रबद्ध जीवन आणि समष्टीत तिचे विलीनीकरण या दोहोंचा अंतर्भाव आहे." (श्रीगुरुजी समग्र दर्शन : खंड ४, पृ. १५.)

समाजात विलिन झालेले व्यक्तित्व

"प्रत्येक व्यक्ती राष्ट्रभक्त बनावी, निरहंकारी बनावी, गुणसंपन्न बनावी, समष्टित व्यक्तित्व विलीन करण्याची क्षमता असणारी बनावी, हेच आवश्यक आहे. व्यक्ती सैनिकच बनावी, हे आवश्यक नाही. व्यक्ती सैनिक, राजकारणी, व्यापारी, शेतकरी, भंगी किंवा आणखी कोणतेही काम करणारी बनू शकते. राष्ट्राच्या दृष्टीने सर्वगुणसंपन्नता तिच्या ठिकाणी येऊ शकते. या प्रकारच्या लवचिक अनुशासनाच्या सूत्रात गुंफलेला म्हणजेच आपल्या स्वतंत्र प्रतिभेने, आणि आपली आवड व आपला प्रकृतिधर्म या अनुसार स्वतःच्या विकासासाठी परिपूर्ण असे वातावरण तयार करीत आणि त्याचबरोबर आपल्या व्यक्तित्वाला समष्टीत ढाळण्याचा सत्संस्कार हृदयात नित्य जागृत ठेवून व्यक्तीने वागावे. हेच आवश्यक आहे. हेच अनुशासन आहे." (श्रीगुरुजी समग्र दर्शन : खंड ४, पृ. २०.)

निरहंकारी स्वभाव

"कधी कधी आपल्या नकळत आपल्या कार्याला घातक असा अहंकार आपल्या मनात प्रवेश करीत असतो. अहंकार ही एक अत्यंत दुष्ट वस्तू आहे. मला मुळीच अहंकार नाही, याही गोष्टीचा अहंकार होत असतो. संत ज्ञानेश्वरांनी असे म्हटले आहे की, हा जो अहंकार आहे तो जाणूनबुजून जे लोक अज्ञानीच आहेत त्यांच्यामागे काही लागत नाही; पण जे स्वतःला खूप ज्ञानी समजतात त्यांच्या मात्र तो खांद्यावर जाऊन बसतो आणि त्यांना कधी कधी फार मोठ्या संकटात टाकतो."

"नवल अहंकाराची गोठी । विशेषे न लगे अज्ञानापाठी । सज्ञानाचे झोंबे

कंठी । नाना संकटे नाचवी ॥ १३ अ. ८२ ॥ आणि एकदा हा अहंकार आला की त्याच्या पाठोपाठ सर्व दुर्गुणांची सेनाही घुसलीच म्हणून समजावे. हा अहंकार केव्हा येऊन खनपटीला बसेल हे सांगता येत नाही. या बाबतीत कृतकृत्यता मानणे किंवा खोटा आत्मविश्वास बाळगणे ही आत्मवंचना करणे होय. म्हणून या सर्व विकारांपासून मुक्त होण्यासाठी आणि मुक्त राहण्यासाठी आपण सर्वांनी आपली ही उपासना अत्यंत एकाग्र चित्ताने सुरू ठेवणे आवश्यक आहे." (श्रीगुरुजी समग्र दर्शन : खंड ४, पृ. ४३.)

खरा ज्ञानी पुरुष

" ज्ञानी माणसाची व्याख्या 'सर्वभूतहिते रतः' या शब्दांत केलेली आहे. जो सर्वांमध्ये स्वतःला पाहात नाही, जो सर्वांच्या सुखासाठी तळमळत नाही, प्रयत्नशील असत नाही, कष्ट करीत नाही तो ज्ञानी नव्हे. आपण राष्ट्राच्या प्रकृतीस या सर्व गुणांनी ओतप्रोत केलेले आहे. हा सर्व व्यवहार आपल्यासाठी 'शास्त्र' आहे. ऐहिक जीवनात तथाकथित पारमार्थिक गोष्टींचा हस्तक्षेप होऊ देऊ नये असा विचार आपण करू नये. "

(श्रीगुरुजी समग्र दर्शन : खंड ४, पृ. ४६.)

" जे पारमार्थिक आहे ते अव्यवहार्य आहे असा विचार करणे उचित नव्हे. म्हणून आपण असे म्हणतो की, जे सिद्धांतरूप श्रेष्ठ गुण आपल्याकडे सांगितले आहेत, ते सर्व आपल्या दैनंदिन जीवनात बाणवून आपल्या या राष्ट्रासाठी एक विशुद्ध, धर्मप्रवण, शुचिर्भूत आणि नित्य राष्ट्रसेवेत निमग्न अशी बृहत् समाज-व्यापी शक्ती व्यवहारात आणण्यासाठी आपल्याला आज प्रयत्न करावयाचा आहे. यासाठी आपले व्यक्तिगत जीवन जास्तीत जास्त लक्ष देऊन आपण घडविले पाहिजे." (श्रीगुरुजी समग्र दर्शन : खंड ४, पृ. ४६)

संघ-कार्यकर्त्याचे गुण

कार्यकर्ते तयार करणे यास संघकार्यात फार महत्त्वाचे स्थान आहे. सामान्य व्यक्तींना गुणसंपन्न बनवून त्यांच्यांत नेतृत्वाची क्षमता उत्पन्न करणे हेच संघाचे कार्य आहे. हे कार्य कसे केले जाऊ शकते याचे विस्तृत विवेचन श्रीगुरुजींनी निरनिराळ्या बैठकांतून अतिशय रोचकपणे केले आहे त्यांनी म्हटले आहे –

" जो निःसंग आणि निर्लेप आहे, ज्याच्या ठिकाणी अहंकार नाही, जो

धैर्यवान आहे, ज्याच्या मनात आकांक्षा आणि उत्साह आहे, तसेच जो कर्माच्या सिद्धीने वा असिद्धीने किवा लाभहानीने विचलित होत नाही त्यालाच सात्त्विक कार्यकर्ता म्हटलेले आहे.

उत्तम कार्य करावयाचे म्हणजे आपण जनतेच्या विश्वासास पात्र ठरले पाहिजे. आपले वर्तन जर शुद्ध असेल तरच जनता आपला विश्वास बाळगील. आपले वैयक्तिक जीवन इतके निष्कलंक असावे की, कुणाच्या मनात, स्वप्नात सुद्धा आपल्याविषयी शंका यावयास नकोत. कोणे एके काळी आपला हा समाज शीलचारित्र्यसंपन्न होता. आजही खेडचापाडचांतून आपल्याला सच्छीलतेची कित्येक उदाहरणे आढळून येतात.

ध्येयाशी आपण जितके एकरूप होऊ, उठता-बसता, जागृतीत, सुषुप्तीत सदासर्वकाळ आपल्या अंतःकरणात, आपल्या जीवनात आपल्या ध्येयाचेच स्पंदन चालत राहिले तर आपल्या प्रत्येक शब्दात सामर्थ्य येईल. ज्यांच्याशी आपण बोलू ते आपले बोलणे मानतील, ज्याला काही करावयाला सांगू तो ते करावयास तयार होईल. ज्याच्यापुढे आपण आपले सिद्धांत ठेवू तो ते सिद्धांत मान्य करील. आपण म्हटले पण आपल्यापुढे जो बसला आहे तो जर आपले सिद्धांत मान्य करीत नसेल तर आपली तपश्चर्या कमी पडली आहे, ती वाढविली पाहिजे, आपले ध्येयचिंतन काहीसे मंदावले आहे, दुबळे झाले आहे ते तेजस्वी आणि बलवान केले पाहिजे हे आपण समजून घेतले पाहिजे. दुसऱ्यांना दोष देऊ नये. आपल्यात कोणत्या उणीवा आहेत याचा विचार केला पाहिजे."

(श्रीगुरुजी समग्र दर्शन : खंड ५, पृ. २३, ५२, ५३, ५४.)

मधुर वाणी व स्नेह

" वाणी कशी मधुर हवी. खरे आणि चांगले परंतु मधुर बोलले पाहिजे. कटुसत्य असेल ते बोलू नये. मी फार ताठर माणूस आहे आणि मी उद्दामपणे बोलेन, असे म्हणू नये. साफ तर बोललेच पाहिजे पण ते अशा गोड शब्दांत बोलावयास हवे की, ऐकणाऱ्याच्या अंतःकरणास जखम न होता तो ते सत्य ऐकेल.

" अजूनपर्यंत जे लोक आपल्या संपर्कात आले नाहीत, त्यांच्याजवळ आपल्याला जायचे आहे, त्यांच्याबरोबर बोलावयाचे आहे, त्यांच्याशी सहानुभूतीची, निष्कपट स्नेहाची वागणूक अंतःकरणपूर्वक प्रस्थापित करावयाची आहे. त्यांच्यात आणि आपल्यात एकात्मभाव व्यक्त होत राहील अशी अवस्था

निर्माण करावयाची आहे. समाजाशी जेव्हा आपला संपर्क येतो तेव्हा आपण याचा विचार केला पाहिजे की, जर आपल्यात काही अवगुण असतील तर समाजातील व्यक्तींशी आपण योग्य प्रकारे व्यवहार करू शकणार नाही, त्यांच्याबरोबर बोलूही शकणार नाही. आणि त्यांच्यावर आपल्या बोलण्याचा काही परिणामही होणार नाही. म्हणूनच आपली वागणूक चांगली आणि स्नेहपूर्ण बनवावी लागते. सर्व प्रकारची मदत करण्याची आणि कष्ट वेचण्याची नित्य तत्परता ज्यात आहे अशा प्रकारच्या जीवनपद्धतीचा स्वीकार करून आपल्याला चालावे लागते. तेव्हाच सर्व लोकांच्या अंतःकरणांत आपणास जागा मिळू शकेल. आणि तेव्हाच आपले विचार आपण सर्वांच्या अंतःकरणांत उतरवून त्यांना आपले सहकारी म्हणून कार्यात सामील करून घेऊ शकू."

(श्रीगुरुजी समग्र दर्शन : खंड ५, पृ. २०–२१.)

रा. स्व. संघाच्या संस्कारांतून कशा प्रकारचे व्यक्तित्व घडावे याविषयींच्या कल्पनांचा हा आलेख आहे. दीनदयाळजींचे व्यक्तित्व या आदर्शातून घडले आहे. प्रा. हेरल्ड लास्की या ब्रिटिश राज्यशास्त्रज्ञाने म्हटले होते की, लोकशाहीचा खरा प्रश्न चांगल्या माणसांचा आहे. (The problem of democracy is the problem of good men.) माणसांच्या गुणवत्तेवर लोकशाहीचे यश अवलंबून असते. दीनदयाळजींनी राजकारणात प्रवेश केला तो अशी चांगली व ध्येयवादी माणसे निर्माण करणाऱ्या रा. स्व. संघासारख्या संघटनेतून. त्यामुळे जनसंघास आकार देण्यासाठी लागणारी संघटन-प्रतिभा, तत्त्वद्रष्टेपण व कार्यकर्ते तयार करण्याचे कौशल्य ते घेऊन आले होते.

संकल्पनांची चौकट

दीनदयाळजींचे नेतृत्व वेगळ्या वैचारिक प्रवाहातून, वेगळ्या सामाजिक प्रेरणांतून आलेले होते. राजकीय इतिहासाच्या दृष्टीने संघविचारांचे मूल्य-मापन व चिकित्सा येथे करावयाची नाही. तो संशोधनाचा व अभ्यासाचा स्वतंत्र विषय आहे. पण दीनदयाळजींच्या राजकीय जीवनाचा व व्यक्तित्वाचा अभ्यास करण्यापूर्वी त्याचा अंतस्रोत म्हणून संघविचाराची मूलतत्त्वे कोणती हे समजून घेतले पाहिजे. यासाठी हे विवेचन केवळ उदाहरणादाखल केले आहे. संघाने जशी आपल्या कार्यपद्धतीतून व्यक्तिजीवने घडविली, संस्कारित सामाजिक व्यक्तित्वे निर्माण केली तशीच व्यक्तींची वैचारिक घडणही केली,

हे स्पष्ट करण्यासाठी हे विवेचन केले. १९२५–५० या काळात संघविचाराची एक परिभाषा तयार झाली. राष्ट्रीय व सामाजिक दृष्टचा एक तत्त्वदृष्टी (Approach) त्यातून विकसित झाली. दीनदयाळजी हे या संघ-विचाराचे प्रतीक होते. हाती आलेल्या त्यांच्या संघातील बौद्धिकवर्गांतूनच वरील विचार-संकलन केले आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरचा काळच दीनदयाळजींच्या संदर्भात विचारात घ्यावयाचा असल्याने त्या काळातील दीनदयाळजींचे विचार-प्रतिपादन येथे एकत्रित केले आहे. ही संकल्पनांची चौकट (Conceptual Frame) व संघसंस्कारांतून घडणारे व्यक्तित्व जाणणे दीनदयाळजींचे राजकीय जीवन व कार्य समजून घेण्यासाठी आवश्यक आहे म्हणून त्यांची चर्चा प्रारंभीच केली आहे.

• • •



२

जनसंघाची जन्मकथा

---

१५ ऑगस्ट १९४७. आधुनिक भारताच्या इतिहासाचे एक सोनेरी पान त्या दिवशी लिहिले गेले. पण ते पान रक्तलांच्छितही होते. ब्रिटिश सत्तेपासूनच्या मुक्तीचा अमर्याद आनंद आणि मातृभूमीच्या फाळणीचे अपार दुःख भारतीय जनता त्या दिवशी एकाच वेळी अनुभवीत होती. सत्तांतराच्या दिवशी गांधीजी कलकत्त्यात होते. त्यांनी भारतीयांची ही मनःस्थिती दि. १४ ऑगस्ट १९४७ ला केलेल्या भाषणात शब्दरूप केली होती. ते म्हणाले, " उद्यापासून आपण ब्रिटिश सत्तेच्या पाशातून मुक्त होणार आहोत, पण आज मध्यरात्री भारताची फाळणीही होणार आहे. तेव्हा उद्याचा दिवस आनंदोत्सवाचा असेल तसाच दुःखाचाही असेल. " (महात्मा – डी. जी. तेंडूलकर, खंड ५, पृ. ७७.)

ब्रिटिशांनी प्रातिनिधिक उत्तराधिकारी पक्ष म्हणून काँग्रेसच्या हाती भारताच्या सार्वभौम सत्तेची सूत्रे दिली. ती एक ऐतिहासिक अपरिहार्यता होती. वस्तुतः काँग्रेस हे दादाभाई नौरोजी, लोकमान्य टिळक, लाला लजपत राय, सुरेंद्रनाथ बानर्जी, महात्मा गांधी, नेहरू, पटेल, सुभाषचंद्र बोस आदी राष्ट्रीय नेत्यांनी चालविलेले राष्ट्रमुक्तीचे आंदोलन होते. सत्ता मिळताच काँग्रेस सत्ताधारी राजकीय पक्ष झाला. स्वातंत्र्यासाठी उघडलेल्या आघाडीचे रूपांतर पक्षात झाले. राजकीय सत्ता मिळाली की माणसाचे मानस बदलते तसेच पक्षाचेही बदलते. विचाराभोवती, प्रबळ व्यक्तित्वाभोवती राजकीय गट निर्माण होतात. त्यांचे दबाव गट बनतात. काँग्रेसचे हेच झाले. आंदोलनातील त्यागाची ऊर्मी जाऊन भोगाची लालसा निर्माण झाली. काँग्रेस हे सत्ता

मिळविण्याचे माध्यम झाले. गांधीजींनी असे काँग्रेसचे स्वरूप हेरून तिचे 'लोक सेवक संघात' रूपांतर करा अशी जाहीर सूचना केली होती.

काँग्रेसमध्ये जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल ही दोनच प्रभावी व्यक्तित्वे होती. त्यामुळे काँग्रेसमध्ये स्वाभाविकपणे या दोघांचे गट निर्माण झाले. नेहरू व पटेल हे दोन भिन्न पिंडांचे पुरुष होते. नेहरूंमध्ये पाश्चात्य उदारमतवाद व कम्युनिस्ट रशियाचा साम्यवाद या दोन प्रमुख राजकीय प्रेरणा एकत्र आल्या होत्या. त्यांचा गांधीवाद हा केवळ भावनिक होता. नेहरूंना उत्तराधिकारी म्हणून तुम्ही का निवडले असा प्रश्न गांधीजींना एका विख्यात पत्रकाराने विचारला, तेव्हा गांधीजी म्हणाले होते," माझ्या बाजूचे ते एकमेव 'इंग्रज' आहेत."* यातील खोच स्पष्ट आहे. स्वतः नेहरूंनी स्वतःबद्दल असेच म्हटले होते. उलट सरदार पटेल हे या देशाच्या परंपरेचा आदर करणारे, कणखर, कर्मठ आणि संघटनेचे कौशल्य असणारे नेते होते. नेहरू पंतप्रधान व पटेल उपपंतप्रधान म्हणून एकत्र नांदले. पण सरदार पटेलांचा व नेहरूंचा काँग्रेस स्वतःच्या वर्चस्वाखाली आणण्याचा आपसांत अंतस्थ संघर्ष चालू होता.

या दोघांचे मतभेदाचे जे विषय होते त्यांत हिंदुत्ववाद्यांविषयीचे धोरण हा एक होता. नेहरूंना 'हिंदू' या शब्दाचीच घृणा होती. हिंदुत्ववाद्यांबद्दल तिरस्काराची भावना होती. पण याबाबत सरदार पटेल हे अधिक उदार व समंजस होते. सरदार पटेलांनी रा. स्व. संघाच्या स्वयंसेवकांना ते देशभक्त आहेत असे म्हणून त्यांनी काँग्रेसमध्ये यावे असे प्रकट निमंत्रण दिले. हे भाषण लखनौ येथे दि. ६ जानेवारी १९४८ रोजी झाले. त्यात त्यांनी म्हटले होते, " काँग्रेसमध्ये जे सत्तेवर आहेत त्यांना सत्तेने रा. स्व. संघाला दडपून टाकता येईल, असे वाटते. पण जबरदस्तीने कोणतीही संघटना चिरडता येत नाही. लाठी (डंडा) ही चोरासाठी वापरतात. रा. स्व संघाचे अनुयायी हे काही चोर व दरोडेखोर नाहीत. त्यांचे देशावर प्रेम आहे. फक्त त्यांचा विचारप्रवाह वेगळा आहे. काँग्रेसजनांनी त्यांना प्रेमाने जिकले पाहिजे." ही सरदार पटेलांची संघाविषयीची भूमिका होती. पण गांधीजींच्या खुनामुळे नेहरूंना संघाला दडपून टाकण्याची संधी मिळाली. ती त्यांनी साधली. याचा उल्लेख श्री काकासाहेब गाडगीळांनी एका लेखात केला होता. " गांधीजींच्या वधानंतर दि. ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी १९४८ या दिवशी दिल्लीत राज्यपालांची परिषद होती.

(* दुर्गादास 'फ्रॉम कर्झन टु नेहरू')

सरदार पटेल त्यावेळी उपस्थित होते. त्यांच्या सांगण्यावरून मी या बैठकीस उपस्थित राहिलो. या बैठकीत हिंदुमहासभा व रा. स्व. संघ यांच्याबद्दल कडक धोरण पत्करावे असे मत व्यक्त केले गेले. दुसरे दिवशी मंत्रिमंडळाची बैठक होती.या प्रश्नाविषयी ज्या वेळी या बैठकीत चर्चा झाली त्या वेळी मीं सांगितले की, 'फक्त खुनी व त्यांचे सहकारी यांच्याविषयी कडक धोरण स्वीकारावे. हिंदुसभेवर बंदी घालण्याने व त्यांच्या पुढाऱ्यांना अटक केल्याने आपण राजकीय सूडबुद्धीने वागत आहोत असा समज होईल. सरदार पटेलांनी माझ्या म्हणण्यात बराच सत्यांश असल्याचे सांगितले.' असे श्री. गाडगीळांनी म्हटले होते. (श्री. काकासाहेब गाडगीळ यांचा लेख – लोकसत्ता, मुंबई दि. ८ जून १९६०.) डॉ. आंबेडकर त्या वेळी कायदामंत्री होते. त्यांनीही नेहरूंच्या आग्रहावरूनच वीर सावरकरांना गांधी-खून खटल्यात गोवले असल्याची माहिती त्या वेळी श्री. ल. ब. भोपटकर यांना दिल्लीत सांगितली होती. (काळ, पुणे – दि. २२ जून १९८३) याचा निष्कर्ष असा की हिंदुत्ववाद्यांना नेहरू जवळ करू इच्छीत नव्हते आणि सरदार पटेल त्यांना आपलेपणाने वागवू इच्छीत होते. काँग्रेसमध्ये पटेलांच्या बाजूने डॉ. राजेंद्र प्रसाद, कन्हय्यालाल मुन्शी, डॉ. संपूर्णानंद आदी नेते होते तर नेहरूंच्या गोटात मौलाना आझाद, रफि महंमद किडवाई आदी नेते होते. त्यामुळे 'काँग्रेसमध्ये असलेला राष्ट्रीय मुसलमान' असे पटेल नेहरूंबद्दल खोचकपणे बोलत तर गांधीजी त्याना 'इंग्रज' म्हणत. त्यामुळे नेहरू–पटेल संघर्ष हा केवळ व्यक्तींचा संघर्ष राहिला नव्हता. तो दृष्टिकोनांचा व प्रवृत्तींचा संघर्ष झाला होता. स्वाभाविकच सरदार पटेलांनी हिंदुत्ववाद्यांविषयी दाखविलेली सहानुभूती केवळ राजकीय गटबाजीतील एक चाल नव्हती. त्याला देशाच्या भविष्याच्या दृष्टीने अधिक खोल अर्थ होता. राजकीय ध्रुवीकरणाची ती एक अवस्था होती.

गांधी-हत्येनंतरची ससेहोलपट

गांधीजींची हत्या ही एक हिंदुत्वनिष्ठांचे शिरकाण करण्याची उत्तम राजकीय संधी होती. तिचा फायदा घेऊन रा. स्व. संघावर १९४८ मध्ये बंदी घालण्यात आली. या बंदीकाळात काय झाले हा एक मोठा विषय आहे. रा. स्व. संघाने सत्याग्रह केला. सुमारे ८० हजार स्वयंसेवक संघावरील बंदी तोडून तुरुंगात गेले. 'जनाधिकार-समिती' स्थापन करून तिच्यामार्फत नागरिक स्वातंत्र्याचा भाग म्हणून संघबंदी उठविण्यासाठी सुजाण लोकमत संघटित करण्याचा प्रयत्न केला.

जुलै १९४९ मध्ये संघावरील बंदी उठली पण ती उठवण्यापूर्वी, वाटाघाटीचे, सरकारची समजूत पटविण्याचे सर्व प्रयत्न संघनेत्यांनी केले. एक प्रकारची अगतिकता सर्वांना भासू लागली होती. तथापि संघनेत्यांनी संयम सोडला नाही. पण संघाचा सामान्य कार्यकर्ता हताशही झाला नाही. बंदीकाळात ज्येष्ठ संघनेत्यांचे विचारमंथन चालू होते. दिल्लीच्या 'ऑर्गनायझर' साप्ताहिकात नोव्हेंबर–डिसेंबर १९५० मध्ये संघाने राजकारणात पडावे अशा आशयाचे चार लेख 'कमल' नावाने श्री. के. आर्. मलकानी यांनी प्रसिद्ध केले होते. पण त्या आधी ऑक्टोबर १९४९ मध्ये काँग्रेस कार्यकारिणीने एक ठराव करून रा. स्व. संघाच्या स्वयंसेवकांना काँग्रेसचे दरवाजे उघडले. काँग्रेस सरकारने जानेवारी १९४८ पासून २० महिने चालविलेली संघविरोधी मोहीम अशा रीतीने संपुष्टात आली. संघाने राजकारणात प्रत्यक्ष भाग कधीच घेतला नाही. काँग्रेसशी त्याचे वैर नव्हते. संघ स्थापन करण्यापूर्वी आद्य सरसंघचालक डॉ. हेडगेवार हे नागपूर प्रांतिक काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस होते. जंगल-सत्याग्रहात आपल्या तुकडीसह त्यांनी भाग घेतला होता. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात चिमूर येथे जे हुतात्मे झाले, त्यांत संघाचे स्वयंसेवक होते. (ऑर्गनायझर अग्रलेख – दि. ११ ऑक्टोबर १९४९.) १९४७ साली सत्ता हाती आल्यावर काँग्रेसची संघाकडे पाहण्याची दृष्टी बदलली.

संघ आणि काँग्रेस

मध्यंतरी ऑक्टोबर १९४९ मध्ये काँग्रेस कार्यकारिणीने संघाविषयी केलेल्या ठरावामुळे राजकीय क्षेत्रात खळबळ माजली. समाजवादी नेत्यांना वाटत होते की नेहरूनंतर समाजवादी म्हणून उत्तराधिकाराने आपल्या हाती सत्ता येईल. खुद्द काँग्रेसमध्ये जे संघ-विरोधक होते त्यांना सत्तास्पर्धेतील वाटेकरी वाढल्याचे दुःख झाले. कम्युनिस्टांच्या अपेक्षित प्रतिक्रिया झाल्या. संघाच्या स्वयंसेवकांना या निर्णयामुळे फारसा आनंदही झाला नाही. पण संघाविरुद्ध होणाऱ्या अपप्रचाराची धार कमी होईल व संघ–काँग्रेस यांच्या सहकार्याने समाजहिताची काही कामे करता येतील अशी त्यांना आशा वाटू लागली. 'आर्गनायझरने' हा सत्याचा असत्यावर, नैतिक शक्तीचा शस्त्र-शक्तीवर झालेला विजय आहे असे लिहिले. (दि. ११ ऑक्टोबर १९४९). वर उल्लेखिलेला काँग्रेसचा ठराव नेहरूंच्या अनुपस्थितीत झाला. नेहरूंनी परदेशातून परत येताच तो ठराव बदलून घेतला. कारण संघ-स्वयंसेवक मोठ्या प्रमाणात काँग्रेसमध्ये आले तर

पटेल-गटाचा काँग्रेसमध्ये वरचष्मा वाढेल अशी नेहरूंना भीती वाटत होती. संघनेत्यांची यासंबंधीची प्रतिक्रिया काय होती, हे सांगण्यासाठी श्री. बाबासाहेब आपटे यांचे उद्‌गार येथे देणे उचित ठरेल. ते म्हणाले होते, " बंद करून घेता येतील अशी आमच्या संघटनेला दारेच नाहीत. दारे कशाला, आम्हाला भिंती देखील नाहीत. आम्ही उघड्या मैदानावर खेळणारी माणसे आहोत."

(दी आर्. एस्. एस्. स्टोरी – मलकानी, मराठी अनुवाद, पृ. १८५.)

११ जुलै १९४९ मध्ये संघावरील बंदी उठली त्याच दिवशी श्री. वेंकटराम शास्त्री यांनी मध्यस्थ या नात्याने जे अखेरचे पत्र भारत सरकारला लिहिले त्यात संघाचे स्वयंसेवक राजकीय पक्ष काढू शकतात असे स्पष्टपणे म्हटले होते. श्री. शास्त्रींनी लिहिले होते– " आमची बिनराजकीय संघटना आहे, असे हे लोक सांगत असले तरी ते एका रात्रीत राजकीय संघटनेत रूपांतर करू शकतील असा शेरा माझ्या वाचण्यात आला आहे. ते राजकीय संघटना उभारू शकतात हे तर खरेच आहे. पण उद्या समजा तसे त्यांनी केले तर तो काही गुन्हा ठरणार नाही. "

बंदीकाळात संघाच्या ज्येष्ठ नेत्यांत बंदी न उठल्यास राजकीय पक्ष काढण्याच्या पर्यायाचाही विचार चालू होता. त्याचा सुगावा सरकारला लागला व स्वतः होऊन एक राजकीय प्रतिस्पर्धी निर्माण करणे नको असाही विनाअट संघबंदी उठवण्यामागे सुप्त हेतू असू शकेल.

तरीही बंदीकाळात हिंदुत्वनिष्ठांची व संघ-कार्यकर्त्यांची जी ससेहोलपट झाली, तिच्या प्रतिक्रिया संघकार्यकर्ते विसरले नव्हते. बंदीकाळात असंख्य स्वयंसेवकांना तुरुंगवास घडला. जे बाहेर होते ते संघाची बाजू घेऊन ' जनाधिकार-समिती ' स्थापन करून वा प्रत्यक्ष जनसंपर्कातून संघाची भूमिका समजावून देण्याचा प्रयत्न करीत होते. पण या काळात वृत्तपत्रांनी सुद्धा संघाबद्दल उदासीनतेची वृत्ती दाखविली. तेव्हा संघ-कार्यकर्त्यांच्या हे लक्षात आले की राजकारणात संघाला सहानुभूती दाखविणारा मित्र नाही. जे अधिक खोल व दूरचा विचार करणारे होते त्यांना वाटू लागले की गांधीजींच्या निधनानंतर भारतीय राजकारणात युगांत होत आहे व नव्या युगाचा आरंभ होणार आहे. अशा काळात रा. स्व. संघाने हिंदुत्वाचा जो बीजविचार १९२५ पासून असंख्य

कार्यकर्त्यांमध्ये रुजविला आहे, त्याला देशाच्या राजकीय विचारप्रवाहात आणले पाहिजे. यासाठी स्वतःचा राजकीय पक्ष काढला पाहिजे.

या राजकीय पक्षाची दोन उद्दिष्टे असतील. एक ज्या अभारतीय किंवा भारतीयताविरोधी संकल्पना वा निर्णय भारताच्या राजकारणात घेतले जातील त्यांना विरोध करणे व त्यासाठी जनमत संघटित करणे आणि दुसरे भारतीय जीवनपद्धतीवर आधारलेली भारताच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय पुनर्रचनेची म्हणजे हिंदुत्वावर आधारलेली विचारप्रणाली व कार्यप्रणाली देशापुढे मांडून लोकशाही मार्गाने परिवर्तनासाठी सत्ता जिंकण्याचा प्रयत्न करणे. म्हणजे या पक्षाचे कार्य रा. स्व. संघाच्या राजकीय संरक्षणासाठी काढलेली आघाडी असे राहाणार नाही. तर देशापुढे रचनात्मक पर्याय ठेवणारा व त्यासाठी राजकीय संघटना उभारणारा, हिंदुत्वाला जीवनदर्शन मानणारा राजकीय पक्ष असे राहील. भारताचे प्रश्न केवळ राजकीय व आर्थिक नाहीत, ते सामाजिक व सांस्कृतिक आहेत. भारतीय राष्ट्रवादाचा जन्म त्याच्या सांस्कृतिक एकतेतून झालेला आहे. या देशातील राष्ट्रजीवन हिंदूंनी निर्माण केले आहे तेव्हा राष्ट्र म्हणून त्याच्या सर्वांगीण पुनर्रचनेची प्रक्रिया पश्चिमेच्या वा अन्य कोणाच्याही अंधानुकरणाने न करता स्वतःच्या मूल्यांवर, अनुभवांवर व प्रतिभेवर अधिष्ठित अशा विचारप्रणालीवर आधारली पाहिजे हा विचार रा. स्व. संघाच्या संस्कारांमुळे ज्यांच्या मनात दृढ झाला होता असे शेकडो कार्यक्षम, निष्ठावान, प्रज्ञावन्त स्वयंसेवक संघात होते. दीनदयाळजी त्या वेळी तुरुंगात होते. श्री. वसंतराव ओक हे दिल्लीतील संघकार्याचे मुख्य सूत्रधार होते. तुरुंगात त्यांच्याशी चर्चा करताना भारतात धर्मराज्य (Rule of Law) स्थापन झाले पाहिजे, ही आपली कल्पना त्या वेळीच दीनदयाळजींनी मांडली होती.

स्वयंसेवकांचे प्रकट विचारमंथन

या स्वयंसेवकांची मनःस्थिती त्या वेळी काय होती, देशस्थितीविषयी कोणते विचार त्यांच्या मनात उद्‌भवले होते याची कल्पना त्या वेळच्या वृत्तपत्रांतील लेखांवरून येण्यासारखी आहे. वर उल्लेखिलेले 'ऑर्गनायझर'चे भूतपूर्व संपादक श्री. के. आर्. मलकानी, प्रा. बलराज मधोक, रा. स्व. संघाचे ज्येष्ठ नेते श्री. दादाराव परमार्थ यांच्या लेखांचा संदर्भ याबाबत देता येईल.

'कमल' या टोपण नावाने लिहिलेल्या चार लेखांत त्या वेळच्या

परिस्थितीचे पूर्ण विश्लेषण आले होते. शेवटच्या लेखात श्री. के. आर्. मलकानी यांनी म्हटले होते, " संघाविरुद्ध काँग्रेसने पुकारलेल्या युद्धात सरकारने जी दुष्कृत्ये केली त्याविरुद्ध कोणाही विधानसभेतील प्रतिनिधीने निषेधाचा एक शब्दही उच्चारला नाही. भारतातील लोकशाहीबद्दलचे ते बोलके भाष्य होते. भारतातील लोकशाही-परंपरा गर्भावस्थेतच मृत झाल्याचे त्यामुळे स्पष्ट झाले होते. राष्ट्रीय संस्कृती, राष्ट्रीय परंपरा, नागरिक स्वातंत्र्य या सर्व गोष्टी पक्षश्रेष्ठींबाबत दाखवावयाच्या निष्ठेपुढे कःपदार्थ आहेत हेच त्यामुळे स्पष्ट झाले आहे. पक्षीय सरकार जसे वाटेल तसे वरे-वाईट राज्य करू शकते हे यावरून उघड झाले आहे. प्रत्यक्ष एकाधिकारशाहीच या देशात आहे हेच त्यावरून दिसते. " असे संघविरोधी वातावरणाचे वर्णन करून लेखात पुढे म्हटले होते, " संघाने केवळ स्वतःच्या रक्षणासाठी नव्हे तर अभारतीय व भारतीयताविरोधी सरकारी धोरणाला आळा घालण्यासाठी शासनाच्या माध्यमातून प्रयत्न केला पाहिजे. आजचा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न केवळ आर्थिक वा राजकीय नसून विचारप्रणालीचा व आदर्शाचा आहे. आपणाला धरणे, कारखाने सर्व हवे आहे. पण आज सर्वांत जास्त गरज आहे ती आपल्या प्राचीन आदर्शांशी सुसंगत असे जीवनाचे तत्त्वज्ञान या देशाला देण्याची. राष्ट्रीय पुनरुत्थानासाठी भारतीय ध्येयवादाची गरज आहे. ही पुनरुत्थानाची तत्त्वदृष्टी मिळाली तर या राष्ट्रातील सुप्त शक्ती जागृत होतील. अशी क्रांतिक्षम तत्त्वदृष्टी काँग्रेसजवळ नाही. ती देण्यास काँग्रेस असमर्थ आहे. म्हणून आज राजकारण हे केवळ आत्मरक्षणासाठी नको आहे, तर भारतीय सांस्कृतिक मूल्ये व भारताच्या राष्ट्रीय संस्कृतीची जीवनप्रणाली यांच्या आधारे आजचे राजकीय, आर्थिक प्रश्न सोडविण्याचा मार्ग दाखविण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे." (ऑर्गनाझर – दि. १४ डिसेंबर १९४९.) या आधी ६ सप्टेंबर, १९४९ च्या ऑर्गनायझरच्या अंकात प्रा. बलराज मधोक यांनी संघाकडे नेतृत्वासाठी देश अपेक्षेने पहात आहे व हा निर्णय घेण्याची वेळ आली आहे, असे आग्रहाने प्रतिपादणारा लेख लिहिला होता. या लेखात त्यांनी म्हटले होते, " संघाने राष्ट्राला परं वैभव प्राप्त करून देण्याचे ध्येय ठेवले आहे. पण राष्ट्रजीवनाचा सर्वांगीण विचार व उद्धार केल्याविना हे घडून येणे असंभवनीय आहे. आज लाखो स्वयंसेवकांना कोणत्याही राजकीय पक्षात जाण्याची मोकळीक संघाने ठेवली आहे, पण त्यांना या देशात भारतीय आदर्शांना व परंपरेला मानणारा असा कोणताही राजकीय पक्ष दिसत नाही की ज्यात ते जाऊ शकतील. ते राजकारणापासून अलिप्तही

लेखकाचे मनोगत

पं. दीनदयाळ उपाध्याय यांचे राजकीय जीवनविचार व व्यक्तित्व यांचा हा अभ्यास आहे. दीनदयाळजींनी राजकारणात प्रवेश केल्यापासून घडलेल्या घटनांची ही जंत्री किंवा सूची नाही. जनसंघ-निर्मिती ही भारतीय राजकारणातील महत्त्वाची घटना होती. १९५१ ते ७७ या २६ वर्षांत एक स्वतंत्र राजकीय विचारप्रणाली, तत्त्वदृष्टी जनसंघाने स्थिर केली. पक्ष म्हणून तो राजकीय जीवनात स्थिरपद झाला. या सर्वाचे विधाते पं. दीनदयाळजी होते. हा सर्व राजकीय इतिहास समग्रपणे लिहिला जाणे आवश्यक आहे. तो लिहिला गेला तर दीनदयाळजींचे राजकीय स्थान उंचावेल. हे पुस्तक म्हणजे अशा प्रकल्पाची रूपरेखा आहे. ' दीनदयाळ-विचारदर्शना 'च्या या उपक्रमात तो समाविष्ट केला गेला तो याच दृष्टीने.

कोणत्याही चरित्रग्रंथाला अस्सल चरित्र-साधने आवश्यक असतात. ' विचार-दर्शना 'तील हा विभाग तयार करताना तशी साधने मिळाली नाहीत. जनसंघाचे कागदपत्र, दीनदयाळजी जनसंघाचे महामंत्री असताना त्यांनी केलेला पत्रव्यवहार, प्रसिद्ध केलेली पत्रके, कार्यकर्त्यांसमोर केलेल्या भाषणांचे वृत्तांत, त्यांच्या मित्रांच्या, सहकाऱ्यांच्या आठवणी हे सर्व संदर्भ-साहित्य आवश्यक होते. पण १९७५ च्या आणीबाणीत जी पांगापांग झाली, जनसंघ-नेत्यांना तुरुंगात डांबले गेले, झडत्या झाल्या, दैनंदिन्या, पत्रव्यवहार पोलिसांनी जप्त केले, त्यामुळे भूकंपाने जसा उद्ध्वस्तपणा येतो तसे झाले. त्यामुळे हे पुस्तक लिहिताना तयार साहित्य मिळाले नाही. म्हणून १९४७ ते ६८ या काळातील ' ऑर्गनायझर ', ' पांचजन्य ' यांच्या धारिणी (फाइल्स) हाच

एक भूतकाळाच्या फेरजुळणीचा आधार होता. दीनदयाळजींचे सहकारी व मित्र यांना भेटलो. दीनदयाळ संशोधन संस्थेने काही साहित्य जमविले आहे. ते पहावयास मिळाले. या खेरीज जनसंघाची प्रकाशने, त्यांची सर्व प्रकाशित पुस्तके या सर्व संदर्भ-साधनांचा उपयोग करून हा प्रबंध तयार केला.

आदरणीय सर्वश्री बाळासाहेब देवरस, राजेंद्रसिंहजी, दत्तोपंत ठेंगडी, भाऊराव देवरस, बापूराव मोघे या सर्व रा. स्व. संघनेत्यांशी चर्चा केली. जनसंघाशी संबंधित असलेल्या सर्वश्री नानाजी देशमुख, लालकृष्ण अडवाणी, बलराज मधोक, वैद्य गुरुदत्त, सुंदरसिंग भंडारी, वसंतराव ओक, जगदीशप्रसाद माथुर, डॉ. मुरलीमनोहर जोशी, कै. रामदास कळसकर या नेत्यांनी दीनदयाळजींच्या राजकीय कार्याची स्वानुभवावर आधारलेली माहिती दिली.
दीनदयाळजींच्या सहवासात आलेले श्री. के. आर्. मलकानी, विश्वनाथजी लिमये, श्री. तिवारी आदींनी काही आठवणी सांगितल्या. श्री. बापूराव लेले, चमनलाल, भानुप्रसाद शुक्ल, महेशचंद्र शर्मा यांनी संदर्भ-साहित्य दिले. दीनदयाळ संशोधन संस्थेचे सहाय्य बहुमोलाचे आहे. श्री. नानाजी देशमुखांनी याही बाबत खूपच मदत केली. या संस्थेचे संचालक श्री. देवेंद्र स्वरूप, ग्रंथपाल श्री. जनार्दनन् यांनी संदर्भ साहित्य आपुलकीने मिळवून दिले. ऑर्गनायझरचे संपादक श्री. भाटिया व पाञ्चजन्यचे संपादक श्री प्रवाल मैत्र यांनी जुन्या अंकांचे बांधीव खंड देऊन माहितीचा खजिनाच उपलब्ध करून दिला. या सर्वांचे मनःपूर्वक आभार. श्री. दत्तोपंत ठेंगडींचा त्यांनी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल मी ऋणी आहे. वर उल्लेखिलेल्या सर्वांच्या भेटीगाठींतून दीनदयाळजींचे विचार व व्यक्तित्व समजून घेण्यास बहुमोल मदत झाली व अवघड वाटणारे काम सोपे होत गेले.

या उपक्रमाचे संयोजक व मुख्य संपादक श्री. वि. वा. नेने यांनी दीनदयाळजींचा राजकीय अभ्यास करण्याची संधी दिली याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. ही मुद्रणप्रत करण्यासाठी श्री. श्याम नाईक यांनी तत्परतेने केलेल्या मदतीबद्दल त्यांना धन्यवाद !

भा. कृ. केळकर

नवी दिल्ली.
६ मार्च १९८५

राहू शकणार नाहीत, कारण लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक नागरिक मतदार असतो आणि त्याला देशाच्या राजकारणाबद्दल बेफिकिरीने राहाता येणार नाही. भारतीय संस्कृतीचे अधिष्ठान मान्य करणारा राजकीय पक्ष झाला तर संघाचे सांस्कृतिक कार्यासाठी सदस्य राहून स्वयंसेवकांना राजकीय रीत्या या पक्षात प्रवेश करता येईल. सांस्कृतिक पुनरुत्थान, समाजोद्धार यांसाठी संघाचे कार्य चालूच राहील." (ऑर्गनायझर – दि. ६ सप्टेंबर १९४९.)

संघ व भारतातील राजकीय पक्ष

रा. स्व. संघाचे त्या वेळचे मद्रास प्रांताचे प्रचारक श्री. दादाराव परमार्थ यांनी एक लेख लिहून देशातील विविध राजकीय पक्षांविषयी आपली मते व्यक्त केली होती. काँग्रेसने लोकांच्या अपेक्षा पुऱ्या केलेल्या नाहीत व सत्तेवरच लक्ष ठेवणारा तो एक पक्ष झाला आहे, असे सांगून समाजवादी, कम्युनिस्ट, हिंदुमहासभा या पक्षांचे वर्णन करून हा सामना चौरंगी आहे असे त्यांनी म्हटले होते. रा. स्व. संघ हा तटस्थच राहील. पण ती संतुलन ठेवण्यास मदत करणारी नैतिक शक्ती आहे व वेळ येईल तेव्हा देशाला अंदाधुंदी व अराजकापासून ती वाचवील. संघाची ही भूमिका लक्षात ठेवण्यासारखी आहे. म्हणून संघ हा पक्षातीत राहिला पाहिजे. ही दादारावांची भूमिका होती.

संघ व राजकारण

१९४९ साली बंदी उठल्यावर रा. स्व. संघ काय करतो याकडे काँग्रेसचे लक्ष होतेच. संघाने राजकारणापासून अलिप्त राहाण्याची भूमिका सुरुवातीपासून घेतली आहे. आद्यसरसंघचालक डॉ. हेडगेवार यांची एक आठवण या संदर्भात सांगण्यासारखी आहे. गांधीजींचे निकटचे सहकारी श्री. जमनालाल बजाज हे दि. ३१ जानेवारी १९३४ रोजी डॉ. हेडगेवारांना भेटावयास गेले. काँग्रेसच्या नियंत्रणाखाली संघ चालावा अशी आपली इच्छा त्यांनी डॉक्टरांजवळ व्यक्त केली. तेव्हा डॉक्टरांनी नम्रपणे त्यांना सांगितले, "रा. स्व. संघाने आपल्या अंगच्या सामर्थ्यावरच स्वतंत्रपणे विकसित व्हावे असा माझा ग्रह आहे. आपल्या राष्ट्रजीवनाचे सर्व पैलू विचारात घेऊ शकणारे आणि देशाला स्वसामर्थ्याच्या बळावर प्रगतिपथावर पुढे नेणारे स्वयंसेवक तयार व्हावेत हा माझा हेतू आहे. हे काम सध्या कोणताच पक्ष किंवा राजकीय नेता करू शकणार नाही." (दी आर्. एस्. एस्. स्टोरी – मराठी अनुवाद – के. आर्. मलकानी, पृ. १७९.)

राजकारणाविषयीची तात्त्विक भूमिका

श्रीगुरुजींनाही व्यक्तिशः सत्तेच्या राजकारणात रस नव्हता. त्या-संबंधीची त्यांची तात्त्विक भूमिका त्यांनी अनेकदा मांडली होती. स्वयंसेवकांना ते सांगत असत, " आजकाल राजनीतीखेरीज अन्य काहीच कोणाला दिसत नाही. राजनीती हे जीवनाचे एक छोटेसे अंग आहे, हे आम्ही विसरून गेलो आहोत. राजनीतीपेक्षा जीवन हे उच्च आणि विशाल आहे. जीवनाचे प्रमुख अंग राज-नीती नसून संस्कृती आहे. भारतीय संस्कृतीमध्ये, भौतिक गरजा भागवण्याचे एक लहानसे खाते म्हणजे राजनीती असे मानले आहे. राजनीतीलाच सर्वव्यापी समजणे हे भारतीय राष्ट्राच्या आत्म्याला वगळून विचार करण्या-सारखे आहे. केवळ राजकीय जीवनातून भेदभाव आणि पक्षोपपक्ष निर्माण होतात व देशामध्ये असहिष्णुतेचा फैलाव होतो. हे सर्व पक्ष एका सामान्य भूमिकेवर येऊ शकणार नाहीत काय ? खरोखरच आज दुसऱ्याच्या मताबद्दल आदर दाखविण्याची शुद्ध भावनाच नष्ट झाली आहे आणि फक्त असहिष्णु-ताच वाढू लागली आहे. 'आमच्या पक्षामध्ये राहा, नाहीतर शत्रू बना ' अशा प्रकारची अभारतीय वृत्ती आज राजकीय क्षेत्रात दिसून येते."

(श्रीगुरुजी समग्र दर्शन : खंड २, पृ. ७९.)

संघशक्तीचा राजकीय उपयोग ?

काँग्रेसमधील अंतर्गत संघर्षाचे नेहरू व पटेल हे दोन नेते होते. सरदार पटेल प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे हा संघर्ष जिद्दीने चालवू शकत नव्हते. गांधी-हत्येबद्दल संघालाच नव्हे तर सरदारांनाही दोष दिला जात होता. सरदार पटेलांची त्या वेळी श्री. एकनाथजी रानडे यांनी संघबंदी उठविण्याआधी काही दिवस भेट घेतली. एकनाथजींना पटेल म्हणाले, " नेहरूंसारखे आमचे काही भाईबंद वेगळ्या विचाराचे आहेत. संघटन किंवा संस्कृती वगैरे शब्द उच्चारले तरी त्यांच्या रागाचा पारा वर चढतो. हे खरे असले तरी ते बदलतील. खरा मुद्दा आहे तो हा की तुम्ही माझे हात बळकट करणार की नाही ? " शेवटी सरदारांनी सांगितले " सर्वत्र अराजक माजावे, कायद्याचे राज्य मोडून पडावे असे वाटणारे काही हितसंबंधी लोक आहेत. म्हणूनच समविचारी लोकांनी एकत्र येऊन काम करण्याची आज खरी गरज आहे." (दी आर्. एस्. एस्. स्टोरी– मराठी अनुवाद – पृ, ९२.) अशाच प्रकारचे विचार सरदार पटेलांनी

श्री. वसंतराव ओक यांचेजवळ व्यक्त केले होते.

याचा अर्थ संघ ही भारताच्या राजकारणास इष्ट ते वळण देऊ शकणारी शक्ती आहे असा विश्वास पटेलांना वाटत होता, म्हणून त्या दिशेने ते पावले टाकत होते. याचाच एक भाग म्हणून नेहरू परदेशाच्या दौऱ्यावर असताना पटेलांनी संघाला काँग्रेसची दारे मोकळी करण्याचा ठराव केला होता. याचा उल्लेख या प्रकरणात आरंभी आलाच आहे.

शक्ति-कसोटीचा सामना

२७ ऑगस्ट १९५० रोजी काँग्रेसच्या अध्यक्षपदाची निवडणूक व्हावयाची होती. त्यासाठी पटेलांच्या गटातर्फे बाबू पुरुषोत्तमदास टंडन उभे होते व शंकरराव देवांना नेहरू-गटाचा पाठिंबा होता. आता हा सामना शक्ति-कसोटीचा झाला होता. यातील ध्येयधोरणासंबंधीचा फरक आता स्पष्ट झाला. भारतीय मुसलमान, पाकिस्तान व कम्युनिस्ट यांच्या मनधरणीचे धोरण नेहरू पुरस्कारीत होते, तर सरदार पटेल याबाबत दूरदर्शी शहाणपणाचे धोरण स्वीकारावे या मताचे होते. टंडनना हिंदुत्वनिष्ठांची सहानुभूती होती व टंडन निवडून आले तर आपण काँग्रेस सोडू अशी धमकी नेहरू देत होते. किडवाईंना घेऊन नेहरू नवा राजकीय पक्ष काढण्याच्या पवित्र्यात होते. किंबहुना तशी पोस्टर्स छापून तयार होती. अखेर टंडनच प्रचंड बहुमताने निवडून आले. सरदार पटेलांनी शक्ति-कसोटीचा हा सामना जिंकला. पण दुर्दैवाने सरदार पटेलांची प्रकृती त्यांच्या ध्येयवादाला व ईर्ष्येला साथ देत नव्हती. सरदार पटेलांचा अंत झाला आणि काँग्रेस-संघटना व सरकार दोन्ही नेहरूंच्या प्रभुत्वाखाली आले. नेहरू सर्वेसर्वा झाले. गांधीजींच्या निधनानंतर नेहरू जरी त्यांचे राजकीय वारस झाले तरी काँग्रेस-संघटनेवर त्यांचे वर्चस्व नव्हते. सरदार पटेलांनी टंडनना काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडून आणवून आपले वर्चस्व सिद्धच केले होते. पण पटेलांच्या निधनानंतर हिंदुत्ववाद राजकीय दृष्ट्या अधिक निराधार झाला होता. भारतीय राजकारणात एक नवी पोकळी निर्माण झाली होती. म्हणूनच संघाच्या काही स्वयंसेवकांनी व्यक्तिशः राजकीय सेवाक्षेत्रात प्रवेश करण्याचा निर्धार केला.

संघाचे वैचारिक कुल

सारांश जनसंघाची स्थापना ही काही संघ-स्वयंसेवकांनी सुरू केलेली,

राजकीय सेवाक्षेत्र निश्चित करणारी घटना समजली पाहिजे. तिला नैमित्तिक कारण हिंदुत्ववाद्यांची कोंडी हे असले तरी मूलतः ती राजकीय व वैचारिक गरजेतून झाली होती. संघाच्या वैचारिक कुलाची परंपरा मानणारा, संघाची मूल्ये व निष्ठा यांत मुरलेल्या स्वयंसेवकांचा तो राजकीय क्षेत्रात नव्या युगाचा आरंभ करण्यासाठी कटिबद्ध झालेला समुदाय होता.

भारतीय राजकारणात नेहरू निधर्मी राष्ट्रवाद व ऐहिक मानवतावाद रुजविण्याचा प्रयत्न करीत होते. समाजवादी व कम्युनिस्ट यांचे गोत्र त्या बाबतीत नेहरूंशी जुळणारे होते. तेव्हा हिंदुत्ववादावर जातीयतेचा शिक्का मारून त्याला राजकीय क्षेत्रातून नामशेष करण्याचे प्रयत्न सुरू झाले. भारतीय संस्कृतीतून जन्मलेला गांधीवाद व त्यांचा आध्यात्मिक मानवतावाद हा बेवारशी झाला होता. सांस्कृतिक राष्ट्रवाद व हिंदुत्व विचार यांचे राजकीय अस्तित्व नाममात्र होते. यांचा प्रभाव देशावर पाडावयाचा असेल तर राजकारणात त्याचे स्वतःचे व्यासपीठ असणे आवश्यक होते. रा. स्व. संघाच्या बीजविचाराचे संस्कार झालेल्या अनेक कार्यकर्त्यांनी हे कार्य अंगावर घेण्याचे ठरविले. राष्ट्रीय विचारप्रवाहात संघविचाराचा हा राजकीय प्रवेश होता.

वैचारिक पार्श्वभूमी

संघाच्या प्रमुख विचारवंतांपैकी एक प्रमुख दीनदयाळ होते. ते त्या काळी कोणते विचार मांडीत होते याचा काही उल्लेख पाहिल्या प्रकरणात केलाच आहे. याच सुमारास लखनौ येथे 'राष्ट्रधर्म' नावाचे मासिक संघ-कार्यकर्त्यांनी सुरू केले होते. त्याच्या पहिल्या अंकात 'भारताच्या राष्ट्र-जीवनाच्या समस्या' नावाचा दीनदयाळजींचा लेख प्रसिद्ध झाला होता. त्यात 'आज एकसंस्कृतिवाद द्विसंस्कृतिवाद, सांप्रदायिकता व बहुसंस्कृतिवाद या चार विचारप्रणालींमध्ये भारतातील जनता विभागली आहे' असे म्हटले आहे. "एक संस्कृतिवादाचा पुरस्कार रा. स्व. संघ, पुरुषोत्तमदास टंडन यांच्यासारखे काँग्रेसजन व बहुसंख्य भारतीय जनता करीत आहे. दुसरा गट बहुसंस्कृतिवादी पक्षाचा आहे. यात कम्युनिस्ट आहेत. तिसरा गट द्विसंस्कृतिवादी लोकांचा आहे. काँग्रेसचे काही नेते, मुस्लिम लीग आदी लोकांचा हा गट आहे. चौथा गट सांप्रदायिकतावाद्यांचा आहे. यात मुल्ला मौलवी येतात. पंथाच्या आधारावर भारताची पुनर्रचना ते करू इच्छितात. हे वर्ग म्हणजे चार प्रवृत्ती आहेत. अर्थवादी, राजनैतिकवादी, संप्रदायवादी व संस्कृतिवादी असे त्यांचे वर्णन करता येईल. पण भारत हे एक

संस्कृती असलेले एक राष्ट्र आहे. संस्कृती हा भारताचा आत्मा आहे. आपली संस्कृतीच भारतीयतेचे रक्षण व विकास करू शकेल."

या विवेचनाचा अर्थ, देशाचे सर्व प्रश्न सोडविताना देशभक्ती व संस्कृतिनिष्ठा ही आधारभूत तत्त्वे मानली जावी असा दीनदयाळजींचा आग्रह होता.

(राष्ट्रधर्म – शरद पौर्णिमा, संवत् २००६)

एकपक्षीय लोकशाहीचा धोका

भारताच्या राजकीय परिस्थितीची राजकीय दृष्टिकोनातून मांडणी केली जात होती. ती म्हणजे काँग्रेस हा केवळ सत्तावादी संधिसाधूंचा पक्ष होईल. विरोधी पक्षांचा वचक नसेल तर ती एकपक्षीय हुकूमशाहीच ठरेल. राजकीय विचारवंत हा इशारा देत होते. राजकीय पक्षपद्धतीत प्रतिपक्षांना राज्यकर्त्या पक्षाइतकेच स्थान आहे. एकच पक्ष राज्यावर फार काळ राहिला तर तो स्वतःला राज्य करण्याचा जणू जन्मसिद्ध अधिकार आहे असे मानू लागतो.

गांधीजींचे नैतिक दडपण

भारतीय परिस्थितीचा विचार गांधीजींच्या संदर्भात होणे त्या वेळी अपरिहार्य होते. कारण गांधीजींच्या रूपाने २८ वर्षे अस्तित्वात असलेला मार्गदर्शक प्रकाश लुप्त झाला होता. म्हणून गांधीजींनी दाखविलेल्या मार्गांची व त्यांनी सतत दिलेल्या शिकवणीची आठवण होणे अपरिहार्य होते. स्वातंत्र्याचा अर्थ स्वदेशी सरकारचे निरंकुश शासन असा नाही – होता कामा नये. नैतिकतेचे अनुशासन समाजाने, व्यक्तीने मानले पाहिजे तसेच राज्यानेही मानले पाहिजे, ही भारतीय परंपरा आहे. 'रामराज्या' चा व्यावहारिक अर्थ तोच आहे. गांधीजींच्या कल्पनेतील रामराज्याचा आदर्श हाच होता. भारतीय लोकशाही सरकार या आदर्शांना विसरले काय, हा प्रश्न अंतर्मुख होणारे राजकीय नेते व विचारवंत या काळात विचारीत होते. म्हणून भारताच्या राजकारणावर त्या काळी तरी गांधीजींच्या नैतिक आदर्शांचे अप्रत्यक्ष दडपण असे.

सारांश, त्या वेळी भारतातील राजकीय विचारांचे सांस्कृतिक भारतीयता, लोकशाही मूल्ये, गांधीवादी नैतिक मूल्ये आणि मार्क्सवाद हे चार महत्त्वाचे घटक होते. अर्थात् याच्या संदर्भातच भारताच्या पुनर्रचनेचा विचार होत होता.

भारताचे राजकीय पक्ष व त्यांचे तत्त्वज्ञान या चार संदर्भातच विचारात घेतले पाहिजेत. सत्ता ही नवी राजकीय वास्तवता होती. राजकीय पक्ष हे नवे माध्यम होते. सत्ताकारण हे लोकशाहीचे अपरिहार्य अंग आहे. त्याचाही विचार करावयाचा होता. काँग्रेस हे सत्ता भोगण्याचे व मिळविण्याचे नवे साधन काँग्रेस नेत्यांच्या हाती आले होते. ते निरंकुश झाले, ध्येयहीन झाले, नीतिशून्य झाले तर देशाचा अधःपात वेगाने होईल ही भीती वाटू लागली होती. म्हणून काँग्रेसला वेसण घालण्यासाठी पर्यायी पक्षांची निकड भासू लागली होती. या सर्व कारणांनी भारताच्या राष्ट्रीय जीवनात राजकारण हा महत्त्वाचा घटक झाला होता. भारतीय जनसंघाच्या स्थापनेची ही राजकीय पार्श्वभूमी आहे.

डॉ. मुखर्जींची कुचंबणा

स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळात गुणवंतांचा समावेश केला जावा हे स्वाभाविक होते. त्या दृष्टीने डॉ. आंबेडकर व डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींना नेहरूंनी मंत्रिमंडळात घेतले होते. ही दोन्ही स्वतंत्र व्यक्तित्वे होती. नेहरूंचे व त्यांचे वैचारिक दृष्ट्या जमत नव्हते व पुढे काँग्रेस पक्षीय राज्य झाल्यावर त्यांना मंत्रिमंडळात राहाणेही अशक्य झाले असते. नेहरूंशी या दोघांचे मतभेद होऊ लागलेच होते. मुद्दे वेगवेगळे असले तरी काँग्रेसच्या साच्यात बसू न शकणारे हे दोघेही नेते होते. त्यामुळे दोघांनाही मंत्रिपदे सोडावी लागली. दोघांनीही स्वतंत्र राजकीय पक्ष काढले.

डॉ. श्यामाप्रसाद हे कट्टर हिंदुत्वनिष्ठ होते. ते हिंदुमहासभेचे अध्यक्ष होते. तिचे प्रतिनिधी म्हणूनच ते मंत्रिमंडळात गेले होते. काश्मीर व पूर्वबंगाल यासंबंधीच्या धोरणाविषयी त्यांचे नेहरूंशी मतभेद होते. श्यामाप्रसाद सत्ताकारणी नव्हते तर तत्त्वाग्रही लोकशाहीवादी होते. त्यामुळे पूर्व बंगालच्या हिंदूंचे स्थानांतर होत असताना असहाय्यपणे व खोट्या निधर्मी धोरणाच्या पांघरुणाखाली स्वतःचा भेकडपणा लपविणाऱ्या भारत सरकारमध्ये ते राहू इच्छीत नव्हते. फाळणीच्या वेळी मुखर्जींनी पूर्व बंगालच्या हिंदूंना आश्वासन दिले होते की तुमच्या नागरी हक्कांवर पाकिस्तान सरकारने आघात केला तर तो हताशपणे स्वतंत्र भारताचे सरकार पाहात बसणार नाही. आता नेमके तेच होत होते. म्हणून मंत्रिपद सोडण्याखेरीज दुसरा पर्याय मुखर्जींपुढे नव्हता. सरदार पटेलांना दुःखी व व्यथित अंतःकरणाने त्यांनी आपला विचार सांगितला तेव्हा सरदार त्यांना म्हणाले, " मी हैद्राबादच्या हिंदूंना वाचवू शकलो

पण पूर्व बंगालच्या हिंदूंचे संरक्षण मी करू शकत नाही याचे मला दु:ख होते. माझ्या असमर्थतेचे कारण तुम्ही जाणताच. पण तुम्ही जाण्याने माझी बाजू कमजोर होईल. " (प्रस्तुत लेखकाशी झालेली चर्चा)

पण सरदार केवळ काँग्रेसच्या दृष्टीतून व नेहरू-पटेल संघर्षाच्या संदर्भात विचार करीत होते. मुखर्जींना असा विचार करणे शक्य नव्हते. सरदारांची प्रकृती लक्षात घेता त्यांची उत्सुकता समजण्यासारखी होती. परंतु नेहरूंचा हिंदुत्वासंबंधीचा तिरस्कार लक्षात घेता त्यांच्या विकृत निधर्मीपणाशी उघड सामना देणेच इष्ट होते. काँग्रेसमधील हिंदुत्वनिष्ठा ही 'सत्ता प्रथम नंतर हिंदुत्व' याच जातीची निघणार हे उघड होते. म्हणून हिंदु-हिताचा निर्भय पुरस्कार करणारा परंतु सर्व भारतीयांना खुला असलेला लोकशाहीवादी पक्ष काढणे हाच एकमेव मार्ग आहे असे डॉ. मुखर्जींना वाटले आणि नव्या पक्षाच्या स्थापनेचे विचार घोळत असतानाच त्यांनी मंत्रिपदाचे त्यागपत्र दिले – दि. १९ एप्रिल १९५०. त्या दिवशी संसदेत निवेदन करताना त्यांनी पूर्व बंगालच्या हिंदु निर्वासितांची समस्या हेच मुख्य कारण सांगितले. त्याआधी झालेला नेहरू-लियाकत-करारही पूर्व बंगालच्या हिंदु-हिताला बाधक होता.

ज्या दिवशी मुखर्जींनी त्यागपत्र दिले त्याच दिवशी त्यांचा दिल्लीतील नागरिकांतर्फे सत्कार करण्यात आला. दिल्लीचे संघचालक लाला हंसराज गुप्त, संघ-प्रचारक श्री. वसंतराव ओक, पंजाब नॅशनल बँकेचे अध्यक्ष श्री लाला योधराज यांचा या सत्कारात पुढाकार होता. त्या वेळी मुखर्जींना दिलेल्या मानपत्रात सध्या देशाला धैर्यशाली नेतृत्वाची गरज असून ते तुम्ही द्याल अशी आशा व्यक्त केली होती. यासंबंधी मुखर्जींनी कुठलेही आश्वासन दिले नाही.

मुखर्जींचा संघ-कार्यकर्त्यांशी संपर्क होताच. राजकीय पक्ष काढण्यात पुढाकार घेणारे संघ-कार्यकर्ते मुखर्जींनी नव्या पक्षाचे नेतृत्व करावे, अशा मताचे होतेच. समसमा सयोग होण्याचा योग केव्हा येतो याची वाट पाहात होते. तेव्हा अखिल भारतीय पक्ष काढण्याचा निर्णय एकदम घेण्यात आला. जास्तीत जास्त प्रांतांत पक्षाचे काम आधी सुरू करावे व नंतर अखिल भारतीय पक्ष स्थापन करावा, असे त्या वेळी संघ-कार्यकर्त्यांनी ठरविले.

या निर्णयानुसार मे १९५१ मध्ये कलकत्ता व जालंधर येथे प्रादेशिक स्तरावर नव्या पक्षाची स्थापना करण्यात आली. नाव पीपल्स पार्टी (भारतीय

जनसंघ) असे ठेवण्यात आले. अध्यक्षपदी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींची निवड झाली. नव्या पक्षाचा आठ कलमी कार्यक्रम ठरविण्यात आला. त्यात अखंड भारत, पाकिस्तानची मनधरणी न करता जशास तसे धोरण ठेवणे, भारताच्या हिताला प्राधान्य देऊन वास्तववादी परराष्ट्रनीती अवलंबणे, पूर्व बंगालमधील स्थलांतरितांचे योजनाबद्ध पुनर्वसन, सर्व भारताचे भारतीय संस्कृतीच्या आधारावर सांस्कृतिक पुनरुज्जीवन, सर्व नागरिकांना समान हक्क, सामाजिक व आर्थिक दृष्टचा मागासलेल्या सर्व समाजघटकांना विकासाची समान संधी, पश्चिम बंगालच्या सीमांची प्रशासकीय व आर्थिक दृष्टचा न्याय्य आखणी हे सर्व विषय समाविष्ट केले होते. यात लक्षात ठेवण्यासारखे आहे ते हे की या पक्षाने प्रादेशिक प्रश्न हाती घ्यावयाचे ठरविले असले तरी सांस्कृतिक पुनरुज्जीवनाची व सामाजिक–आर्थिक पुनर्रचनेची अखिल भारतीय दृष्टी ठेवली होती.

अशीच प्रांतस्तरीय पक्षाची स्थापना मे १९५१ मध्ये जालंधर येथे झाली. त्यात पंजाब, पेप्सू, हिमाचल प्रदेश, दिल्ली यांचा समावेश होता. या भागातले सुमारे २०० नेते व कार्यकर्ते पक्षस्थापनेच्या परिषदेसाठी आले होते. फाळणी-नंतर प्रथमच एवढी मोठी राजकीय परिषद झाली. समाजातील सर्व थरांचे, गटांचे प्रतिनिधी आले होते. सामान्य जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी ही परिषद बोलाविली होती. हिंदु–शीख ऐक्य व सत्तांध काँग्रेसला विरोध हेही हेतू योजकांच्या मनात होते. नव्या राजकीय पक्षाचे रचनात्मक प्रगतिशील सिद्धांत तयार करणे व प्रबळ प्रतिपक्षाची आखणी करणे ही उद्दिष्टे ठेवण्यात आली होती.

अशा प्रकारच्या प्रांतिक परिषदा उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश या प्रांतांमध्ये, जून-जुलै १९५१ मध्ये भरविण्यात आल्या. लखनौ येथील परिषदेत उत्तरप्रदेश जनसंघाचे कार्यवाह म्हणून दीनदयाळजींची निवड झाली.

अशा सर्व प्रादेशिक परिषदा झाल्यावर या सर्व परिषदांचे अध्यक्ष, कार्यवाह यांची बैठक दिल्लीत १९ सप्टेंबर १९५० या दिवशी झाली. श्री. बलराज मधोक यांना भारतीय जनसंघाची रीतसर स्थापना करण्यासाठी दि. २१ ऑक्टोबर १९५१ या दिवशी दिल्लीत व्हावयाच्या अधिवेशनाचे निमंत्रक कार्यवाह म्हणून निवडण्यात आले. दि. २१ ऑक्टोबरच्या परिषदेच्या आधी उत्तरेतील व पूर्वेतील विंध्यप्रदेश व आसाम सोडून सर्व प्रांतांत प्रादेशिक जनसंघ स्थापन करण्यात आले. जनसंघाने अशा रीतीने तळापासूनच पक्ष-बांधणीस प्रारंभ

केला. हे त्याचे वैशिष्टच मानता येईल. 'आधी कळस मग पाया' असे न करता व्यापक पाया तयार करून मग अखिल भारतीय पक्ष स्थापन करण्यात आला.

या पक्षाचे नेतृत्व डॉ. मुखर्जींनी करावे अशी स्वाभाविकच देशातील सर्व ठिकाणच्या कार्यकर्त्यांची इच्छा होती. म्हणून त्यांना रीतसर विनंती करण्यासाठी व पुढील कार्यक्रम ठरविण्यासाठी दि. २१ ऑक्टोबर १९५१ या दिवशी संघ-नेते व राजकीय कार्यकर्ते भेटले. (संदर्भ – ए पोर्ट्रेट ऑफ ए मार्टिर – बलराज मधोक, पृष्ठ १००–१०३) मुखर्जींनी मोठ्या नम्रतेने सांगितले, "तुम्ही माझ्यावर फार मोठी जबाबदारी टाकत आहात. माझ्या मातृभूमीची सेवा म्हणून ती कर्तव्यबुद्धीने पार पाडण्याचा प्रयत्न मी करीन. पण ती स्वीकारण्यापूर्वी या नव्या संघटनेच्या स्वरूपासंबंधी एक दोन गोष्टी माझ्या मनाच्या समाधानासाठी स्पष्ट करून घेतल्या पाहिजेत ! एक म्हणजे या पक्षाचा इतर राष्ट्रवादी पक्षांशी संबंध कसा राहील हे स्पष्ट झाले पाहिजे; व दुसरे म्हणजे भारताशी एकनिष्ठ असलेल्या व त्याच्या संस्कृतीवर निष्ठा असलेल्या सर्व भारतीय नागरिकांना या पक्षात प्रवेश मिळाला पाहिजे. कारण हा पक्ष म्हणजे सर्व राष्ट्रवादी शक्तींचे एकत्रीकरण करणारी प्रभावी राजकीय संघटना झाली पाहिजे अशी माझी कल्पना आहे." अर्थातच या कल्पनेत मतभेद होणे शक्यच नव्हते. तरी जे संघाचे स्वयंसेवक या पक्षाची संघटना उभी करणार होते त्यांची भूमिका स्वतः श्रीगुरुजींनी मुखर्जींना याच वेळी झालेल्या भेटीत स्पष्ट केली होती. मुखर्जींच्या मृत्यूनंतर स्वतः श्रीगुरुजींनी १९५६ साली 'ऑर्गनायझर' मध्ये लिहिलेल्या लेखात ही हकीकत दिली होती. तोच जनसंघाच्या स्थापनेपूर्वी रा. स्व. संघाशी झालेल्या वाटाघाटीचा विश्वसनीय वृत्तांत समजला पाहिजे. ('ऑर्गनायझर' २५ जून, १९५६.)

त्या लेखात श्रीगुरुजींनी म्हटले होते – "सरकारमधून राजीनामा देऊन बाहेर पडल्यानंतर डॉ. मुखर्जींना सध्या अस्तित्वात असणारा कोणताही पक्ष सोयिस्कर न वाटल्यामुळे ते नवा पक्षा काढण्याच्या विचारात होते. त्याच संदर्भात माझा सल्ला व सहकार्य घेण्यासाठी ते मला भेटले." असे सांगून श्रीगुरुजींनी पुढे लिहिले होते, "विषय महत्त्वाचा असल्यामुळे आम्ही वारंवार भेटलो आणि सर्व संबंधित मुद्यांची तपशीलवार चर्चा केली. रा. स्व. संघाला राजकारणाच्या रिंगणात खेचता येणार नाही. राष्ट्राच्या खऱ्याखुऱ्या सांस्कृतिक पुनरुत्थानाच्या कार्यात गुंतलेली कोणतीही संघटना राजकीय पक्षांच्या

हातातली बाहुली बनली तर ती कधीच यशस्वी ठरणार नाही आणि म्हणूनच संघ कोणत्याही राजकीय पक्षाचे वर्चस्व मानणार नाही हे मी त्यांना प्रारंभीच स्पष्ट करून सांगितले. त्यांना आमची भूमिका समजली आणि ती बरोबर असल्याचे त्यानी मान्य केले. त्याच वेळी त्यांनीही हे स्पष्ट केले की,' नवा पक्ष जर योग्य रीतीने विकसित व्हायचा असेल तर तोदेखील दुसऱ्या कोणत्याही संघटनेशी दुय्यम दर्जाच्या नात्याने संबंध ठेवू शकणार नाही.'

रा. स्व. संघ आणि प्रस्तावित पक्ष यांच्यातील संबंधांबाबतच्या या मूलभूत मुद्यावर आमचे एकमत झाल्यानंतर विचारात घ्यावयाचा महत्त्वाचा मुद्दा होता तो नव्या पक्षाच्या ध्येयवादाबद्दलचा. ' रा. स्व. संघाची ध्येयधोरणे आणि कार्यपद्धती पूर्वीच निश्चित झालेली होती. त्यामुळे अशा संघटनेच्या कोणत्याही सभासदाचे सहकार्य हवे असेल तर त्या राजकीय पक्षाच्या ध्येयवादात संघाच्या ध्येयधोरणांचे प्रतिबिंब पडलेले असायला हवे. '

या बाबतीतही आमचे पूर्ण एकमत झाले. एका पत्रकार परिषदेत डॉ. मुखर्जींनी असे मत व्यक्त केले होते की, हिंदुमहासभेचा हिंदुराष्ट्रावर विश्वास असल्यामुळे ती जातीय आहे. त्याचा उल्लेख करून मी त्यांना असे सांगितले की, भारतीय राष्ट्र हे हिंदुराष्ट्रच आहे असे रा. स्व. संघ मानीत आला आहे. त्यामुळे हिंदुमहासभेइतकेच संघालाही तुम्ही दूर ठेवले पाहिजे ; आणि हिंदू राष्ट्राची पुन्हा स्थापना करण्याचे ध्येय बाळगून त्यासाठी अविरत धडपडणाऱ्या माझ्या सहकाऱ्यांपैकी कुणाचीही सहानुभूती किंवा मदत तुम्ही गृहीत धरू नये. त्यावर त्यांनी तो अभिप्राय चुकीने व्यक्त केला गेल्याचे मान्य केले. हिंदू राष्ट्राची आमची संकल्पना आपल्याला मान्य असल्याचे त्यांनी सांगितले. भारतीय राष्ट्रीयत्व स्पष्ट करण्यात राज्यघटना अपयशी ठरल्याचे मत व्यक्त करून ते असेही म्हणाले की, ' हिंदू राष्ट्राची पुन्हा एकदा संपूर्ण वैभवात प्रस्थापना करण्याचे ध्येय लोकशाही राज्याच्या आधुनिक संकल्पनेशीही विसंगत नाही. जोपर्यंत बिगर हिंदू जमातीचे लोक अराष्ट्रीय कारवाया करीत नाहीत किंवा सत्ता हस्तगत करून वैभवशाली मार्गावरून राष्ट्राला मागे खेचण्याची कटकारस्थाने रचत नाहीत, तोपर्यंत त्यांना पूर्ण नागरी स्वातंत्र्य आणि राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रांत समान दर्जा मिळेल अशी हमी हिंदू राष्ट्राच्या संकल्पनेत अभिप्रेत आहेच. नव्या राजकीय पक्षाच्या धोरणविषयक मसुद्यात ही वस्तुस्थिती जाहीरपणे स्पष्ट करण्याची तयारीही डॉ. मुखर्जींनी दाखविली."

" जेव्हा असे एकमत झाले तेव्हा मी माझे काही सहकारी, निष्ठावंत आणि विश्वासू कार्यकर्ते निवडले. नवा पक्ष स्थापन करण्याची जबाबदारी जे निःस्वार्थीपणे व अविचल निष्ठेने पेलू शकतील, अखिल भारतीय स्वरूपाच्या लोकप्रिय राजकीय पक्षाचा व्यापक व भक्कम पाया जे घालू शकतील असे कार्यक्षम कार्यकर्ते मी डॉ. मुखर्जींना दिले आणि मग त्यांनी भारतीय जनसंघ या नावाच्या पक्षाची स्थापना करून आपली महत्त्वाकांक्षा साकार करून दाखवली. " त्या लेखात पुढे श्रीगुरुजींनी लिहिले होते की, " माझ्या कार्यकर्त्यांचा एक संच डॉ. मुखर्जींना देऊन टाकल्यावर आमच्या धोरणाप्रमाणे मी जनसंघाच्या पुढील सर्व कार्यक्रमांपासून आपणहून अलिप्त झालो आणि हिंदूंची सांस्कृतिक संघटना बांधण्याच्या कार्यावरच माझे सर्व लक्ष केंद्रित केले. " (दी आर्. एस्. एस्. स्टोरी– मराठी अनुवाद – पृष्ठ १८६–१८७–१८८).

मनाचे समाधान झाल्यावर मुखर्जींनी अत्यंत निष्ठेने आपले सर्वस्व जनसंघाच्या उभारणीच्या कामास लावले. जनसंघाचे उद्दिष्ट, कार्यक्रम यासंबंधी चर्चा सुरू झाली. डॉ. मुखर्जी कट्टर हिंदुत्वनिष्ठ होते, उदारमतवादी होते. मंत्री म्हणून केलेल्या कामाचा अनुभव, सरकारात राहिल्यामुळे देशस्थितीचे अचूक ज्ञान व देशाच्या प्रश्नांविषयींची जाण यांचा लाभ जनसंघाला झाला. राजकीय क्षेत्रात नव्या पक्षाला उठाव मिळणे सामान्यतः कठीण जाते. पण मुखर्जींची उंची व व्यक्तिप्रभा इतकी मोठी होती की जनसंघ हा वेगळ्या पातळीवरचा पक्ष होणार असे राजकीय निरीक्षकांना वाटू लागले.

दिल्लीचे भव्य अधिवेशन

दिल्लीत २१ ऑक्टोबर १९५१ या दिवशी दिल्लीतील सुमारे १००० नागरिकांच्या उपस्थितीत व अखिल भारतातून आलेले ५०० कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत नवा राजकीय प्रवाह या देशात आणावयाचा या निर्धाराने भारतीय जनसंघाची स्थापना घोषित करण्यात आली. अध्यक्ष डॉ. मुखर्जी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात अनेक प्रचलित प्रश्नांसंबंधीची जनसंघाची भूमिका स्पष्ट केली.

प्रथमच मुखर्जींनी हे स्पष्ट केले की आता येणाऱ्या निवडणुकीसाठी जनसंघ स्थापन करण्यात येत नाही किंवा काँग्रेसवर केवळ टीका करणे हाच आमचा उद्देश नाही. आम्हाला अधिक सुखी व समृद्ध भारत निर्माण करावयाचा आहे. काँग्रेसने लोकांची निराशा केली आहे. प्रचंड सदिच्छा घेऊन स्वातंत्र्योत्तर

काळात काँग्रेसने सुरुवात केली पण आज ती लोकांची सदिच्छा गमावून बसली आहे. काँग्रेसला हुकूमशाही जोपासणाऱ्या पक्षाचे स्वरूप आले आहे. त्याचे कारण तिच्यावर नियंत्रण ठेवू शकणारा व स्वतः पर्यायी सरकार देऊ शकणारा प्रतिपक्ष आज देशात नाही हे आहे. आज जनसंघाचा प्रारंभ होत आहे तो प्रमुख प्रतिपक्ष म्हणून राजकीय संघटना उभी करण्यासाठी.

काँग्रेसने निधर्मी राजकारणाच्या नावाखाली मुस्लीम अनुनयाचे राजकारण आजही चालू ठेवले आहे. किंबहुना हिंदूंच्या भावना दुखवण्यात नेहरू आनंद मानतात. जनसंघाचे असे मत आहे की प्रामाणिकपणे हिंदू, शीख, बौद्ध, ख्रिश्चन मुसलमान आदींना आपापला धर्म पाळूनही कट्टर भारतीय राहता येते. भारतीय जनसंघाची अशी दृढ श्रद्धा आहे की भारतीय संस्कृती व सभ्यता यांच्यावर श्रद्धा ठेवून व त्यांचा योग्य तो आदर करून भारताचा भविष्यकाळ उज्ज्वल होईल."

शेवटी मुखर्जी म्हणाले, "आमचा असा दृढ विश्वास आहे की जनसंघाच्या स्थापनेने आशेचे नवे युग सुरू होईल. श्रद्धा, धैर्य आणि आशा ही बरोबर घेऊन आम्ही आमचा प्रवास सुरू करीत आहोत. भारताची जीवनशक्ती आपणाला पुन्हा जागृत करावयाची आहे. भारताच्या पुनर्रचनेचे कार्य करावयाचे आहे. ही कार्ये आपली वाट पाहात आहेत."

राष्ट्रजीवनाकडे पाहण्याचा भारतीय दृष्टिकोन, राष्ट्रवादी सांस्कृतिक परंपरा घेऊन भारतीय राजकारणात भारतीय जनसंघ जन्मला. डॉ. मुखर्जींचे सुविद्य, सुसंस्कारित व कट्टर उदारमतवादी लोकशाहीवरच्या श्रद्धेचे नेतृत्व हे त्यांच्या यशाची ग्वाही देणारे होते.

• • •

३

जनसंघाचे राष्ट्रीय जीवनदर्शन

Political doctrines and social theories are deduced from a philosophy having a comprehensive view of life.

– M. N. Roy (Political, Party and Power).

भारतीय राजकारणाला नवी दिशा लावण्यासाठी जनसंघ स्थापन झाला होता. तो केवळ सत्तावादी पक्ष नव्हता. भारताच्या भूमीशी व त्याच्या संस्कृतीशी नाते प्रस्थापित करणारा पक्ष म्हणून त्याचे स्वागत राजकीय समीक्षकांनी केले होते. जनसंघाच्या निर्मात्यांनी देशाचे तातडीचे प्रश्न कोणते याचा विचार केला होताच. पण त्यांना एक समग्र राष्ट्रीय जीवनदर्शन भारताला द्यावयाचे होते. श्री. मानवेंद्र रॉय यांनी म्हटले आहे की राजकीय तत्त्वप्रणाली आणि सामाजिक सिद्धांत हे जीवनाच्या सर्वस्पर्शी तत्त्वातून निर्माण झालेले असतात. राजकारण आणि समाजकारण ही राष्ट्रजीवनाची उपांगे असतात. जनसंघाच्या निर्मात्यांना याची जाणीव होती. म्हणून राजकारणापेक्षा, सत्ताकारणापेक्षा त्यांनी राष्ट्र-कारणाला प्राधान्य देण्याचे ठरविले. आणि मग राजकारण, समाजकारण व अर्थकारण यांविषयींचे सिद्धांत व नीती निश्चित केली. हे त्यांचे वैशिष्टच मानले पाहिजे. हे करताना प्राचीन मूल्यांचे त्यांना भान होते तसेच युगानुकूल परिवर्तन केले पाहिजे याची जाणही होती.

जनसंघाच्या राष्ट्रीय जीवनदर्शनाची सूत्रे कोणती होती ? प्रथमच हे सांगितले पाहिजे की, दीनदयाळजी हे प्रारंभापासून जनसंघाचे तत्त्वद्रष्टे होते. त्यांची भूमिका जनसंघाचे विचारक, संघटक व प्रचारक अशी तिहेरी होती.

तेव्हा या राष्ट्रीय जीवनदर्शनाची सूत्रे ठरवताना दीनदयाळजींच्या मूलगामी व समन्वयशील चिंतनाचा लाभ झाला होता. एकात्म मानववाद हे त्याचे फल आहे. दीनदयाळजींनी 'जनसंघ का ?' (पांचजन्य, २५ जानेवारी, १९६०) या लेखात जनसंघाच्या जन्महेतूची चर्चा करताना म्हटले होते, "जोपर्यंत आपल्या सर्व कार्याचा आधार मग ते कार्य वैयक्तिक असो किंवा सामाजिक असो – धर्म होत नाही तोपर्यंत माणसाच्या मूलप्रवृत्तीत बदल होणार नाही किंवा समाजाची गरज व व्यक्तीची आकांक्षा यांच्यात समंजस संबंध निर्माण होणार नाहीत. भारतीय राज्यकर्ता पक्ष वा विरोधी पक्ष या दोघांनीही या मूलभूत तत्त्वाकडे दुर्लक्ष केले आहे. म्हणून भारतीय जनसंघाला यासाठी जन्म घ्यावा लागला. स्वधर्म आणि स्वराज्य यांची फारकत करता येणार नाही. येथे धर्म शब्दाचे उपासना, पंथ वा संप्रदाय आदी अर्थ अभिप्रेत नाहीत. समाजधारणा करणारे तत्त्वज्ञान असा त्याचा अर्थ आहे. म्हणून जनसंघ हा तात्कालिक सत्ताकारण करण्यासाठी जन्मला नसून भारताच्या प्राचीन सांस्कृतिक मूल्यांच्या आधारे युगानुकूल परिवर्तन त्याला करावयाचे आहे."

संस्कृतिनिष्ठा

संस्कृतिनिष्ठा हे जनसंघाच्या राष्ट्रीय जीवनदर्शनाचे पहिले सूत्र होते. भारत हे प्राचीन राष्ट्र आहे. ब्रिटिश येण्यापूर्वीच हे राष्ट्र होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर फक्त नवीन पर्व सुरू झाले आहे. भारतात नवे राष्ट्र जन्मलेले नाही. भारतभूमीवर निवसणारा व तिच्याविषयी ममत्व असलेला मानवसमूह हे एक जन आहेत. त्यांची जीवनपद्धती, त्यांची कला, साहित्य, तत्त्वज्ञान ही सर्व भारतीय संस्कृती आहे. भिन्न भिन्न जातींचे, धर्मपंथांचे, एकजीव एकजिनसी स्वरूप म्हणजे भारतीय राष्ट्र आहे. भारत जसा अखंड आहे तशी त्याची संस्कृतीही संमिश्र नसून एकात्म आहे. म्हणून भारतीय राष्ट्रवादाचा आधार ही संस्कृती आहे. या संस्कृतीवर निष्ठा असली तरच भारत एकात्म राहील. सारांश, संस्कृती हा भारत भूमीवरच्या राष्ट्रीय एकात्मतेचा पाया आहे.

दुसरे सूत्र, भारतीय संस्कृती ही एकात्मवादी असल्यामुळे भारताचा जीवन-दृष्टिकोनही एकात्मवादी आहे. म्हणून मानवाच्या वा समाजाच्या विकासाचा विचारही याच दृष्टीने जनसंघ करतो. व्यक्ति-केंद्रित एकांगी विकासाचा किंवा मानव हा आर्थिक व राजकीय पशू आहे हा पाश्चात्य विचार जनसंघाला मंजूर नाही. माणसाच्या शरीर – बुद्धी – आत्मा या सर्वांचा विकास

झाला तर मानवाचा पूर्ण विकास होईल. हा पूर्णतावाद हा भारतीय जीवन-दृष्टीचा मुख्य विचार आहे.

तिसरे सूत्र, व्यक्ती आणि समाज यांच्या हिताचा विचार संघर्षाच्या दृष्टीतून न करता समन्वयाच्या वृत्तीने केला पाहिजे, हे आहे. व्यक्ती व समाज ही परस्परावलंबी असल्याने त्यांचे संबंध परस्परपूरक, परस्परानुकूल व परस्पर सहकार्याचे असले पाहिजेत. सर्व सृष्टी ही याच तत्त्वावर चालते. म्हणून जनसंघ वर्गवाद, सांप्रदायिकता यांना टाकून सर्वोत्कर्षवादी, सर्वात्मता-वादी विचार करतो.

चौथे सूत्र व्यक्ती व समाज यांच्या संबंधाविषयीचे आहे. 'अहं' बरोबरच 'वयम्' मी आणि आम्ही यांचा विचार झाला पाहिजे. व्यक्ती हे समाजाचे साधन आहे, ज्ञानतंतू आहेत. व्यक्तींचा नाश झाला तर समाज पंगू होईल. व्यक्तीचे पूर्णत्व हे समाजाच्या पूर्णत्वाचे माप आहे. म्हणून व्यक्ति-स्वातंत्र्य व समाजहित यांत परस्परविरोध नाही.

पाचवे सूत्र, व्यक्तीच्या विकासासाठी चार पुरुषार्थ भारतीय सामाजिक तत्त्वज्ञानात मानले आहेत. धर्म, अर्थ, काम व मोक्ष. समाजधारणेचे हे सिद्धांत धर्मात समाविष्ट केले आहेत. हा धर्म सनातन आहे व त्याचे व्यवहारात रूपांतर कालमानाप्रमाणे बदलते. म्हणून धर्म हाच समाजाचा नियंता आहे.

सहावे सूत्र, जनसंघाचा विश्वास धर्मराज्य हे आदर्श राज्य असते असा आहे. पण जनसंघाने कल्पिलेले धर्मराज्य असांप्रदायिक राज्य आहे. कायद्याचे राज्य (रूल ऑफ लॉ) आहे; निरंकुश किंवा हुकूमशाही राज्य नाही किंवा लोकशाहीचे स्वच्छंद राज्य नाही. अधिकारापेक्षा कर्तव्यावर भर देणारे राज्य आहे. नुसत्या हक्काने त्यांची लालसा निर्माण होते. अधिकारावर भर देणाऱ्या राज्यात कर्तव्याची उपेक्षा होते. अधिकाराचा मद चढतो. त्यातून संघर्ष व स्पर्धा चालू होतात. अधिकारमूलक राज्याचे हे सर्व दुष्परिणाम आहेत. कर्तव्य-प्रधान धर्मराज्यात या गोष्टींना जागा नसते. कर्तव्यप्रधान राज्यातही शासन, न्यायसंस्था, लोकप्रतिनिधी-सभा हे नियमानुसार चालतात. सर्व व्यक्ती व संस्था यांना फक्त धर्माचे बंधन असते.

लोकशाहीवर श्रद्धा हे जनसंघांच्या जीवनदर्शनाचे सातवे सूत्र आहे. लोकशाही हे लोकांचे हक्क, प्रतिष्ठा रक्षिण्याचे साधन आहे. जनसंघाला

केवळ राजकीय क्षेत्रात नव्हे, तर आर्थिक व सामाजिक क्षेत्रांतही लोकशाही हवी आहे. वस्तुतः लोकशाही ही अविभाज्य संकल्पना आहे. एका क्षेत्रात लोकशाही नसेल तर त्याचा परिणाम दुसऱ्या क्षेत्रावरही होतो.

सहिष्णुता, व्यक्तीची प्रतिष्ठा व समाजाशी समरसता हे सर्व लोकशाहीला प्राणभूत असतात. याखेरीज लोकशाहीचे केवळ औपचारिक रूप हे निष्प्राण देहासारखे असते. लोकांत चैतन्य असले तरच लोकशाहीचे स्वरूप देशकाल-परिस्थितीनुसार बदलू शकते. प्रातिनिधिक लोकशाहीमध्ये आपले प्रतिनिधी निवडण्याचा व प्रतिनिधित्वासाठी निवडणूक लढविण्याचा अधिकार हे प्रमुख तत्त्व मानले जाते. आर्थिक लोकशाहीसाठी व्यवसायाचे स्वातंत्र्य व ग्राहकाचे स्वातंत्र्य ही मूलभूत आहेत. व्यक्तीची प्रतिष्ठा व संधींची समानता ही सामाजिक लोकशाहीची मूल तत्त्वे आहेत. एकाचा अधिकार दुसऱ्याला पोषक असेल, विनाशक नसेल हे मात्र पाहावे लागेल.

स्वातंत्र्य हे तर लोकशाहीचे नव्हे तर मानवाचे व राष्ट्राचे प्राणतत्त्व आहे. लोकशाहीप्रमाणे स्वातंत्र्य ही सुद्धा अविभाज्य संकल्पना आहे. राजकीय स्वातंत्र्याखेरीज आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्य असंभवनीय आहे. आर्थिक स्वातंत्र्य नसेल तर राजकीय स्वातंत्र्य, सामाजिक स्वातंत्र्य मानवाला उपभोगता येणार नाही, आणि सामाजिक स्वातंत्र्य नसेल तर अर्थाचा अभाव व प्रभाव मानवाला परतंत्र करील. म्हणून राजकीय, आर्थिक व सामाजिक या तीन्ही स्वातंत्र्यांची मानवाला गरज असते. सारांश, स्वातंत्र्य हा जनसंघाच्या राष्ट्रीय जीवनदर्शनाचा आठवा सिद्धांत आहे.

जनसंघाने वर उल्लेखिलेल्या आठ सिद्धांतांवर आधारलेले आपले राष्ट्रीय तत्त्वज्ञान पुरस्कारले. राष्ट्रीय प्रश्नाकडे पहाण्याची राष्ट्रीय तत्त्वदृष्टी (ॲप्रोच) त्यातून विकसित झाली व त्याची नीती तयार झाली. दीनदयाळजींच्या अखंड चालणाऱ्या राष्ट्र-चिंतनातून, अभ्यासातून व समीक्षणातून जनसंघाला मार्गदर्शन मिळत गेले. जनसंघाचे आर्थिक व सामाजिक तत्त्वज्ञान सारांशरूपाने येथे दिले आहे. जनसंघ हा परिवर्तनवादी पक्ष होता. त्या परिवर्तनाचे स्वरूप यावरून कळून येईल व दीनदयाळजींच्या वैचारिक प्रेरणा समजण्यास मदत होईल.

आर्थिक विचार

भारतीय जीवनसरणीनुसार मूल्याधिष्ठित अर्थकारणाची आखणी करणे

हे जनसंघाच्या अर्थकारणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. ही आखणी करताना भारतीय संस्कृती मानव हा केवळ अर्थपरायण आहे असे मानत नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. म्हणून जगात रूढ असलेल्या भांडवलशाही व कम्युनिस्ट अर्थ-व्यवस्था जनसंघाने नाकारल्या. कारण या पद्धती मुळात एक आहेत. एका पद्धतीने मनुष्य संपत्तीचा दास होतो व दुसऱ्या पद्धतीने स्वत:चे स्वातंत्र्य गमावून शासनसंस्थांचा दास बनतो. दोन्ही पद्धती माणसाला भौतिकवादी पशूच बनवतात. म्हणून दोहोंतही मानव उपेक्षित राहिला आहे. यासाठी मानवाचे स्वातंत्र्य व त्याच्या व्यक्तित्वाचा विकास यांची ज्यात हमी आहे अशी, इतकेच नव्हे तर, ही दोन्ही साध्य करण्याची संधी देणारी अर्थव्यवस्था जनसंघाने पुरस्कारली.

हे उद्दिष्ट विकेंद्रित अर्थव्यवस्थेतच साध्य होऊ शकते. म्हणून अर्थकारणाचे ते स्वरूप असावे असे जनसंघाने प्रतिपादले. लोकशाही व मानवी स्वातंत्र्य यांना अर्थसत्तेचे केन्द्रीकरण धोकास्पद होते. म्हणून भौगोलिक व व्यावसायिक दोन्ही दृष्टींनी विकेंद्रीकरण झाले पाहिजे. अर्थात् हे करताना आधुनिकीकरणही केले पाहिजे. आधुनिक विज्ञानाच्या सहाय्याने सहकारी तत्त्वावर छोट्या यंत्राच्या सहाय्याने औद्योगक विकास केला पाहिजे. मोठ्या उद्योगांना किमान प्राथमिकता दिली पाहिजे.

स्वदेशी व स्वावलंबन

जनसंघाने स्वदेशी व स्वावलंबन ही देशाच्या अर्थनीतीची मार्गदर्शक सूत्रे झाली पाहिजेत असे प्रतिपादन केले होते. त्याचे म्हणणे असे की आधुनिकी-करणाच्या नावावर आपल्या देशाचे पाश्चात्यीकरण होत आहे. त्या पाश्चात्यी-करणाबरोबरच उपभोग-लालसा वाढते आहे. यामुळे सामाजिक समस्या तर निर्माण झाल्या आहेतच, पण आर्थिक क्षेत्रातही अनिष्ट प्रवृत्ती वाढत आहेत. आपण अधिक परावलंबी होत चाललो आहोत. म्हणून स्वदेशी व स्वावलंबन या मंत्राची पुन्हा देशाला दीक्षा दिली पाहिजे. त्यामुळे आवश्यक तेवढेच परदेशी भांडवल येईल व त्याच्यावर अवलंबून राहण्याचा मोह टळेल.

नियोजनाचे स्वरूप

राष्ट्राच्या संपत्तीसाधनांचा किमान कालात जास्तीत जास्त उपयोग करण्यासाठी आर्थिक नियोजन हवे. पण योजना हे साधन आहे साध्य नाही हे

मात्र अवश्य लक्षात ठेवले पाहिजे. आपल्या मूलभूत निष्ठा व मूल्ये यांची जपणूक करणारी आर्थिक योजना असली पाहिजे. किंबहुना त्यांचे संवर्धन करणे हे आर्थिक नियोजनाचे उद्दिष्ट असले पाहिजे. आर्थिक विकासाची प्रेरणा केवळ आर्थिक उद्दिष्टांतून मिळत नाही. जनतेत योजनेच्या यशस्वितेसाठी जनतेची निष्ठा जागृत केली पाहिजे.

भारतात लोकशाही पद्धतीला अनुकूल असेच आर्थिक नियोजन असले पाहिजे. तरच लोकशाही पद्धतीने त्याची अंमलबजावणी करता येईल. राष्ट्रीय संरक्षण, पूर्ण रोजगारी, संपत्तीची विषमता कमी करणे, प्रत्येक कुटुंबाचे राहणीमान उंचावण्याचा प्रयत्न इत्यादी आपल्या योजनेची उद्दिष्टे असली पाहिजेत. शेती, उद्योग, व्यापार, समाजकल्याण या सर्वांचा संतुलित विकास व्हावा म्हणून त्यांचा अग्रक्रम निश्चित केला पाहिजे.

संपत्तीच्या मालकीसंबंधीही जनसंघाला स्वतःचा असा विचार होता. खाजगी मालकी हा निर्विवाद हक्क आहे असे काही विचारप्रणालीत मानले जाते. दुसऱ्या टोकाला संपत्ती, साधनांची खासगी मालकी नष्ट केली पाहिजे असे मानणारी प्रणाली आहे. याखेरीज सर्व संपत्ती ईश्वराची आहे माणसाने 'विश्वस्त' म्हणून ती सांभाळावयाची आहे असा एक तिसरा विचार आहे. विश्वस्त कल्पना नैतिक विचार म्हणून चांगली आहे पण प्रत्यक्ष व्यवहारात या विश्वस्तावर कोणत्या नियमांचे बंधन घालावयाचे व ते कोणी घालावयाचे हा प्रश्न शिल्लक राहातो.

परंतु हेही खरे की, संपत्तीमुळेच माणसाला प्रतिष्ठा मिळते, सुरक्षिततेची समाधानाची भावना निर्माण होते. म्हणून जनसंघ संपत्तीचा हक्क पूर्णपणे नष्ट करू इच्छित नाही. पण तो हक्क समाज-सापेक्ष आहे व म्हणून तो निर्विवाद व अनिर्बंध हक्क कधीच असत नाही.

दुसरे असे की संपत्तीसंबंधीचे धोरण आपल्या सांस्कृतिक मूल्यांवर आधारले पाहिजे. व्यक्तीच्या गरजा त्या मूल्यांशी निगडित असतात. म्हणून संपत्तीची मर्यादा ठरविताना त्या मूल्यांचाही विचार झाला पाहिजे. संपत्ती अफाट असेल तर मनुष्य आळशी व विलासी होतो व ती नसेल तर परतंत्र होतो. म्हणून संपत्तीचे नियमन आवश्यक आहे असे जनसंघ मानतो.

सामाजिक नीती

भारतीय जनता एक आहे या श्रद्धेने भारताच्या सामाजिक नीतीचा विचार केला पाहिजे. ही मूलभूत एकता दृढ करण्यासाठी प्रयत्न करावे लागतील.

पण या एकतेला बाधा आणणारे उच्च-नीच, स्पृश्य-अस्पृश्य आदी सर्व सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी शैक्षणिक सुधारणा व आंदोलनात्मक कार्य हाती घेणे आवश्यक आहे. जाती किंवा वर्ग यांच्या आधारावर सामाजिक प्रतिष्ठा मिळता कामा नये व भेदभावही असता कामा नये. शेकडो वर्षे शिक्षण, संस्कार यात मागे राहिलेले आणि द्रारिद्रचाने पीडीत अशा लोकांना आपल्या प्रगतीसाठी विशेष सोयी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत, पण त्या-बरोबरच मागासलेपणा हाच स्वार्थ साधण्याचा मार्ग होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

तसेच सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक क्षेत्रांत पुढे येण्यासाठी स्त्रियांसाठी विशेष उद्योग सुरू केले पाहिजेत. त्यामुळे घर, समाज व राष्ट्र यांच्याविषयींची त्यांची जबाबदारी त्यांना पार पाडता येईल. समाजजीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांना समान संधी मिळाली पाहिजे. हुंडा व पडदापद्धती, विषम-विवाह आदी अनिष्ट प्रथा नष्ट केल्या पाहिजेत.

मातृत्वाची प्रतिष्ठा हीच भारतीय संस्कृतीची प्रतिष्ठा मानली पाहिजे. मातृकल्याणाचे कार्यक्रम हा समाजकल्याणाचा महत्त्वाचा कार्यक्रम मानला पाहिजे. वेतन व मालमत्ता यात स्त्री पुरुषांना समान अधिकार असले पाहिजेत.

विवाह, दत्तक विधान, वारसा यांच्या नियमनाचे सर्व भारतीय जनतेचे व्यावहारिक नियम एकच असले पाहिजेत.

अल्पसंख्यांकावद्दल सहिष्णुता व त्यांना अभेद वृत्तीने दिली जाणारी वागणूक हा लोकशाहीचा अनिवार्य भाग आहे. भारतातील सर्व अल्पसंख्य लोकांना हे जनसंघाचे आश्वासन आहे. परंतु धर्माच्या आधारावर अल्पसंख्य व बहुसंख्य असा भेदभाव करणे जनसंघाला मंजूर नाही. असे करणे निधर्मी किंवा असांप्रदायिक राज्याच्या सिद्धांताविरुद्ध आहे. राजकारण वा प्रशासन यांच्यात असा भेदभाव करणे व धोरण आखणे हे राष्ट्रीयत्वाच्या शुद्ध कल्पनेच्या विरुद्ध आहे.

प्रशासनाचे नवे रूप

स्वराज्य आल्यानंतर वस्तुतः सुराज्याचा अधिक जागरूकतेने व तपशीलात जाऊन विचार व्हावयास हवा. जनसंघाने प्रशासनाच्या पुनर्रचनेचा व सुधारणेचा आग्रह प्रारंभापासून धरला. सामान्य जनतेच्या दृष्टीने स्वराज्याचा प्रत्यक्ष अनुभव प्रशासनात येतो. म्हणून दक्ष, कार्यक्षम व लोकानुकूल प्रशासन ही स्वराज्याची महत्त्वाची गरज आहे. राष्ट्राच्या पुनर्रचनेच्या कार्यात सहभागी होण्याची भावना सरकारी नोकरांत निर्माण करणे आवश्यक आहे. तसेच सरकारी नोकरांना राजकारणात भाग घेण्यास सध्या मनाई आहे. असे करणे लोकशाहीच्या विरुद्ध आहे. म्हणून पोलिस, सुरक्षा-सेवा, अधिकारी वर्ग व सामान्य प्रशासन या खेरीज इतर सरकारी नोकरांना राजकारणात भाग घेण्याची परवानगी असली पाहिजे.

जनसंघाने न्यायालयीन स्वातंत्र्य हे मूलभूत मानले होते. न्यायदान त्वरित व्हावे, न्याय मिळविणे स्वस्त व्हावे, इंग्रजी न्यायपद्धतीचे अनुकरण करणे बंद व्हावे या कल्पना जनसंघाने पुरस्कारल्या.

सारांश, जनसंघाच्या राष्ट्रीय जीवनदर्शनाचे उद्दिष्ट स्वतंत्र भारताच्या पुनर्रचनेच्या प्रयत्नांसाठी अस्सल भारतीय तत्त्वदृष्टी देणे हे होते. दीनदयाळजींनी याचे सूत्र 'भारतीयो भूत्वा भारतं यजेत।' असे सांगितले होते. आर्थिक प्रगतीचा निकष सर्वांत वरच्या थरातला मनुष्य नसून सर्वांत खालच्या थरातला मनुष्य हा आहे. शासनाची व्यवस्था, योजना, नियम या दृष्टीने जोखले पाहिजेत. या देशातील अडाणी पददलित लोक हाच आमचा नारायण आहे अशी जनसंघाची भावना व सिद्धांत होता. हाच सामाजिक वा मानवी धर्म आहे अशी त्याची धारणा होती. कोट्यवधी लोक निराश्रित निरक्षर आहेत. आपल्या मुलांचे भविष्य काय, हा क्रूर प्रश्न कोट्यवधी आईबापांपुढे आहे. जेव्हा या कोट्यवधी लोकांना आपले चारही पुरुषार्थ साध्य करण्याची संधी मिळेल तेव्हाच एकात्म मानव ही कल्पना साकार होईल.

(संदर्भ – 'भारतीय जनसंघ – घोषणाएँ' प्रस्ताव भाग ३)

• • •

४

दीनदयाळ : एक मूलगामी विचारवंत

भारतीय जनसंघ हा निवडणुकी लढविण्यासाठी जन्मास आलेला पक्ष नव्हता किंवा काँग्रेसशी मतभेद होऊन बाहेर पडलेल्या राजकीय नेत्यांनी वा कार्यकर्त्यांनी काढलेला पक्ष नव्हता. एक स्वतंत्र राष्ट्रीय जीवनदर्शन देण्यासाठी निर्माण केलेला पक्ष होता, हे आपण पाहिले. काँग्रेस हा सत्तावादी पक्ष झाला होता. गांधीजींची पुण्याई व नेहरूंची जनसंमोहनाची किमया ही त्यांच्या सत्ताकारणाची शस्त्रे होती. शुद्ध चारित्र्याचे नेते व कार्यकर्ते, प्रखर राष्ट्रभक्ती, संस्कृतिनिष्ठा यांखेरीज जनसंघाजवळ काहीच नव्हते. विचारांच्या दृष्टीने नेहरूंचा समाजवाद आणि निधर्मी राष्ट्रवाद आणि कम्युनिझम असे राजकीय ध्रुवीकरण त्या वेळी होत होते. कम्युनिस्टही राजकीयदृष्ट्या तेवढे प्रभावी व प्रबळ नव्हते. म्हणून एकतंत्री एकपक्षीय लोकशाहीचे रूपच भारतीय राजकारणात स्थिर होऊ पहात होते. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींनी जनसंघाच्या प्रारंभिक अधिवेशनात तत्कालीन राजकीय परिस्थितीचे वर्णन करताना सांगितले होते, "चार वर्षांपूर्वी सदिच्छेचा वारसा घेऊन काँग्रेस सत्तेवर आली. पण आश्चर्याची गोष्ट अशी की ती सदिच्छा आज काँग्रेस गमावून बसली आहे. बहुसंख्य लोकांचा पाठिंबा तिला मिळत नाही आणि दुराचारी मार्गांनी सत्ता टिकवून धरावी लागते. काँग्रेसमधील हुकूमशाहीचे एक मुख्य कारण म्हणजे आज देशात सुसंघटित विरोधी पक्ष नाहीत. अशा विरोधी पक्षांमुळे बहुमतवाला पक्ष काबूत ठेवता येतो व देशात दुसऱ्या पक्षाचे सरकार निर्माण होऊ शकेल हा दिलासा देशाला मिळतो." सारांश, शिस्तबद्ध राजकीय पक्ष असणे ही भारतीय लोकशाहीची त्या वेळची राजकीय गरज होती. तसे म्हटले तर, प्रजासमाजवादी

पक्षही त्या वेळी होता. पण त्याचे स्वरूप काँग्रेसच्या चुका दाखविणे किंवा नेहरूंवर समाजवादाच्या दृष्टिकोनातून टीका करणे (करेक्शनल पॉलिटिक्स) एवढेच होते. त्यांना सत्तेची आकांक्षा होती, पण मूलगामी अशी पर्यायी विचारप्रणाली त्यांचेजवळ नव्हती.

पर्यायी विचारप्रणालीची गरज

नेहरूंचा तथाकथित निधर्मी राष्ट्रवाद, त्यांचे रशियानुकूल परराष्ट्रीय धोरण, हिंदुत्वाविषयीचा तिरस्कार, समाजवादाबद्दलचे दिखाऊ आकर्षण, भारतीय संस्कृतीविषयीचा परभाव हे सर्व पसंत नसलेला फार मोठा वर्ग देशात त्या वेळी होता. डॉ. संपूर्णानंद (माजी मुख्यमंत्री, उत्तरप्रदेश) यांनी या परिस्थितीचे उत्तम वर्णन त्या वेळी केले होते. त्यांनी म्हटले होते, "सामाजिक, आर्थिक विघटनाबरोबरच आमची प्राचीन जीवनमूल्येही स्थानभ्रष्ट होत आहेत. या प्राचीन परंपरेच्या राष्ट्राच्या हजारो वर्षांच्या स्मृती आहेत, त्या आशा-आकांक्षांचे प्रतिबिंब झालेल्या आहेत. त्या परंपरेची आम्ही उपेक्षा करीत आहोत, एवढेच नव्हे तर तिच्याकडे पाठ फिरवीत आहोत." तेव्हा ही जी राजकीय पोकळी होती तिचा फायदा कम्युनिस्ट घेत होते. तीच एक पर्यायी विचारप्रणाली भारताला तारक ठरेल असे वातावरण देशात त्या वेळी निर्माण झाले होते.

अशा संक्रमणकाळात भारतीय जनसंघावर दुहेरी जबाबदारी पडली होती. एक तर काँग्रेसला तुल्यबळ असा देशव्यापी पर्यायी पक्ष संघटित करणे व दुसरी कम्युनिझमला तोडीसतोड अशी भारतीय जीवनमूल्यांचा पुनर्जन्म ठरावी अशी विचारप्रणाली निर्माण करून त्यासाठी जनमत संघटित करणे. म्हणजे जनसंघाला केवळ राजकीय पोकळी भरून काढावयाची नव्हती तर भारताच्या सर्वांगीण पुनर्रचनेचे तत्त्वज्ञान द्यावयाचे होते.

दीनदयाळजींची भूमिका

अर्थात् जनसंघाला हे ऐतिहासिक कार्य करावयाचे असले तरी ते ठराव करून होणारे कार्य नव्हते. रा. स्व. संघाचा बीजविचार, त्याची तत्त्वदृष्टी, देशभक्ती, निःस्वार्थ समाजहितबुद्धी, संघटनकौशल्य यांचे भांडवल बरोबर घेऊन हजारो कार्यकर्ते जनसंघात आले होते. राजकारणाचे मैदान त्यांना नवीन होते. सत्ताकारणातील डावपेचांत ते अनभिज्ञ होते. एका दृष्टीने ती कोरी पाटी

होती. देशाचे विधिलिखित त्यावर लिहावयाचे होते. डॉ. मुखर्जींना त्यांचे सहकारी म्हणून दीनदयाळजींना दिले. कारण दीनदयाळजींची बुद्धिमत्ता, कार्यक्षमता, मधुर वाणी, संघटनकौशल्य व बौद्धिक व भावनिक समतोलपणा हे उत्कृष्ट संघटकाला लागणारे गुण श्रीगुरुजींना माहीत होते. लहानपणापासून स्वयंसेवक म्हणून दीनदयाळजींचा झालेला विकास त्यांनी पाहिला होता. विचारवंत म्हणून त्यांचे गुणवर्णन करताना त्यांच्या मृत्यूनंतर श्रीगुरुजींनी सांगितले होते, "आमच्या दीनदयाळजींचे एक उल्लेखनीय वैशिष्ट्य असे की, कोणत्याही विषयाबद्दल बोलताना वा लिहिताना त्याची ते ध्येयप्रणालीच्या दृष्टीतून मांडणी करीत. ही पातळी त्यांनी कधी सोडली नाही. कोणत्याही प्रश्नाचा केवळ तात्कालिकदृष्ट्या विचार करणे त्यांच्या स्वभावातच नव्हते. मूलगामी विचारांचा अभ्यासक म्हणून मी त्यांना ओळखत असे. किंबहुना, कोणत्याही नैमित्तिक विषयावर लिहिताना वा बोलताना त्यामागे असलेल्या चिरंतन तत्त्वाचा विसर त्यांना कधी पडला नाही."

अशा तऱ्हेची बौद्धिक क्षमता व शिस्त असलेला विचारवंत नेताच भारताच्या समस्यांचा विचार करून नवे दर्शन देण्यासाठी आवश्यक होता. भारताच्या व जनसंघाच्या सुदैवाने दीनदयाळजींच्या रूपाने विचारवंत, संघटक व आदर्श कार्यकर्ता त्यांना मिळाला. एवढेच नव्हे तर, आपल्या कर्तृत्वाबद्दल अहंकार नसणारे, समाजात विलीन झालेले दीनदयाळजींचे व्यक्तित्व होते. राजकारण हे त्यांच्या दृष्टीने राष्ट्रसेवेचे नवे क्षेत्र होते. समर्थ रामदासांनी जो हिंदू आदर्श आपल्या दासबोधात वर्णन केला आहे त्याचे दीनदयाळ हे जिवंत प्रतीक होते. रामदास म्हणतात,

सकल सुखांचा त्याग । करोन साधिजे हा योग ।
राज्य साधनाची लगबग । केली पाहिजे ॥

दीनदयाळजींनी जनसंघ हा उद्याचा सत्ताधारी पक्ष व्हावा म्हणून पक्षबांधणी केली व त्या पक्षाला राष्ट्रीय जीवनदर्शन दिले. जनसंघाचे ते विचारदाते झाले. चारित्र्याचे, संघटनकौशल्याचे आदर्श झाले.

सैद्धांतिक बैठक

जनसंघाला तीन बाजूंनी आपले विचार निश्चित करावयाचे होते. (१) काँग्रेसने जे निर्णय घेतले होते त्यांच्या अनुषंगाने विचार करणे भाग होते.

(२) स्वतंत्र भारताने जे जे पायाभूत सिद्धांत मानले होते त्यांचा भारतीय दृष्टीने विचार करावयाचा होता. (३) स्वतःची नवी विचारप्रणाली देशापुढे मांडावयाची होती.

काँग्रेस सरकारने तीन महत्त्वाचे निर्णय घेतले होते. पहिला निर्णय कोणत्याही सत्ता-करारात वा सैनिकी करारात सहभागी न होता अलिप्ततेचे धोरण ठेवावयाचे. दुसरा निर्णय म्हणजे आर्थिक नियोजनाचा. तिसरा निर्णय संमिश्र अर्थव्यवस्थेचा. जनसंघाने तीन्ही संबंधाने विचार करून आपली भूमिका पक्की केली. ती वेळोवेळी ठराव करून सरकारपुढे व जनतेपुढे मांडली.

या सर्व विचार-प्रतिपादनात दीनदयाळजींचाच पुढाकार असे. जनसंघाचे पूर्ण अर्थाने ते गुरू होते. वैचारिक गुरू तर होतेच होते. विजयवाडा येथे १९६५ मध्ये झालेल्या जनसंघाच्या अधिवेशनात त्यांच्या एकात्म मानववादाचा प्रकटपणे स्वीकार करण्यात आला. भाषा, संस्कृती, भारत–पाक संबंध, संविद मंत्रिमंडळे, निवडणुकीविषयीची नीती, आर्थिक नीती, पंचवार्षिक योजना, विकेंद्रीकरण आदी विषयांसंबंधीचे जनसंघाचे धोरण आणि विचार हे दीनदयाळजींचेच असत. श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी जनसंघाच्या आर्थिक धोरणाविषयींच्या ठरावांचे संकलन केलेल्या पुस्तिकेत,"जनसंघाच्या आर्थिक धोरणाचे रचनाकार" असा दीनदयाळजींचा स्पष्ट उल्लेख प्रस्तावनेत केला आहे. ('Economic Policy Resolution of BJS' published by BJS Bombay, April 1964.)

म्हणून जनसंघाच्या विविध विषयांवरच्या सैद्धांतिक मूलगामित्वाचा शोध घेणे आवश्यक आहे. हा शोध आजही उद्‌बोधक व मार्गदर्शक ठरेल. कारण आजही त्या समस्या अनिर्णित आहेत. उलट अधिक गोंधळ माजला आहे. याचे मुख्य कारण आपला सर्व विचार तात्पुरता (ॲड्‌हॉक्) किंवा हंगामी पद्धतीने चालू आहे. राजकारणी हा त्या त्या बेळेपुरता विचार करणारा व नजीकचे हित पाहणारा असतो. लोकशाहीत कटू सत्य बोलण्याची हिंमत नसते. म्हणून लोकप्रिय ठरणारे राजकारण हेच आपले राजकारण होत आहे. दीनदयाळजींची असे राजकारण करण्याची प्रकृतीच नव्हती. लोकहित, राष्ट्रहित व सांस्कृतिक मूल्ये ही त्यांच्या विचारांची मार्गदर्शक सूत्रे होती. पक्षाचे राजकारण करताना हे तीन निकष लावून विचार करणे किंवा धोरण आखणे अनेकदा फायद्याचे ठरत नाही. म्हणून आपली धोरणे लोकप्रिय होणाऱ्या घोषणांवर आधारलेली असतात. त्यामागे भविष्यवेधी विचार नसतो. वस्तुस्थितीचा अभ्यास नसतो. दीनदयाळजींची

चिंतनपद्धती प्रश्नांच्या बुडाशी जाणारी होती. प्रत्यक्ष अनुभवावर आधारलेली होती. जनसंघाचे आर्थिक ठराव करण्याची जबाबदारी त्यांच्यावर पडल्याने ते स्वतः सामान्य माणसाची दुःखे, त्याचे प्रश्न समक्ष समजून घेण्याचा प्रयत्न करीत. यासंबंधीची त्यांची प्रवृत्ती स्पष्ट करणारी एक घटना येथे सांगण्यासारखी आहे.

आठवण लखनौची आहे. एकदा गोहत्या प्रतिबंधाचे आंदोलन चालू असता दीनदयाळजी लखनौला गेले. सकाळचे सात वाजले होते. त्यांना केस कापून घ्यावयाचे होते. त्यासाठी एक तास त्यांनी मोकळा ठेवला होता. न्हावी आला नाही. एक दोन सलूनमध्ये ते गेले, तेथे गर्दी होती. जवळच्या फूटपाथवर एक न्हावी बसला होता. तो रिकामाच होता. त्याच्यापुढे केस कापण्यासाठी ते जाऊन बसले. परत आल्यावर ज्यांच्याकडे उतरले होते, त्यांनी विचारले, "केस कोठे कापून घेतलेत ?" "फिरत्या सलूनमध्ये !" दीनदयाळजींनी हसत हसत उत्तर दिले. त्यांनी तेवढ्या वेळात त्या न्हाव्याच्या आर्थिक परिस्थितीची चौकशी केली होती. अशाच प्रकारे ते रिक्षावाले, हातगाडीवाले, झोपडपट्टीवाले आदींची स्थिती नित्य समजून घेत. सामान्य माणसाच्या अडचणी, दुःखे प्रत्यक्ष त्यांना भेटून समजून घ्यावयाची त्यांची पद्धत होती. भारताचे आर्थिक प्रश्न अभ्यासण्यासाठी दीनदयाळजींनी पुस्तके तर वाचलीच, पण समाजजीवनाचा ग्रंथही त्यांनी वाचला.

प्रस्थापित विचारसरणींचा अभ्यास

सामान्य माणसाचे सुख हे आर्थिक विकासाचे मुख्य उद्दिष्ट आहे. पण त्याच्यासाठी ज्या आर्थिक विचारसरणी व पद्धती निर्माण झाल्या, ज्यांचे प्रयोग जगात झाले व भारतात चालू होते त्यांचा तौलनिक अभ्यास दीनदयाळजींनी केला. श्री. नानाजी देशमुख हे त्यांचे निकटचे सहकारी होते. त्यांनी यासंबंधी लिहिले आहे, "राष्ट्रवाद, लोकशाही, समाजवाद, साम्यवाद या सर्व समानतेवर आधारलेल्या पद्धती आहेत. यांपैकी कोणतीही विचारप्रणाली पूर्ण नाही. प्रत्यक्ष व्यवहारात त्या एकमेकींविरुद्ध जातात. राष्ट्रवादाने जागतिक शांतता धोक्यात येते. लोकशाहीला भांडवलशाही ग्रासते आणि त्यातून शोषण केले जाते. समाजवाद भांडवलशाहीचा नाश करतो पण त्यामुळे लोकशाहीचाही नाश होतो व व्यक्तिस्वातंत्र्य धोक्यात येते. या सर्वांचा परिणाम असा झाला आहे की, आज पश्चिमी राष्ट्रांपुढे या सर्व पद्धतींचा परस्परपूरक असा मेळ कसा घालता येईल असा प्रश्न निर्माण झाला आहे. या कारणासाठी कालसंगत, व्यवहार्य व

सर्वांगीण असे जीवनदर्शन आपणाला हवे असे दीनदयाळजींना तीव्रतेने वाटू लागले. म्हणून त्यांनी अभ्यास व चिंतनाला प्रारंभ केला. त्यातून 'एकात्म मानववादा' चा जन्म झाला. जनसंघाने आपली ध्येयप्रणाली म्हणून त्याचा स्वीकार केला. दीनदयाळजी कोणत्याही विचारसंप्रदायाबद्दल किंवा व्यक्ती-बद्दल पूर्वग्रह वाळगून विचार करीत नसत. प्रत्येक तत्त्वज्ञानाचे वास्तविक मूल्य शोधून काढणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते."

अशा रीतीने दीनदयाळजींचा वैचारिक शोध सुरू झाला. त्यांच्यावर दयानंद, लोकमान्य टिळक, डॉ. हेडगेवार यांचे संस्कार झालेलेच होते. श्री. गुरुजींचे मार्गदर्शन त्यांना लाभत असे. त्या दोघांची तत्त्वचर्चा, विचारविनिमय हे नेहमीच होत असे. एकदा श्रीगुरुजींनी दीनदयाळजींना 'दैशिक शास्त्र' हे पुस्तक वाचावयास दिले. ते पुस्तक लोकमान्य टिळक असतानाच लिहिले गेले होते. त्याला टिळक प्रस्तावनाही लिहीत होते. तसे त्यांनी लेखकाला पत्रही पाठविले होते. या पुस्तकाचे लेखक होते श्री. बद्रीसाह टुलधरिया. या पुस्तकाच्या मराठी अनुवादाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे, "पं. दीनदयाळ उपाध्याय यांनी 'एकात्म मानववादा' चे प्रतिपादन करताना या ग्रंथाचा आधार घेतला होता." हा ग्रंथ ६५ वर्षांपूर्वी हिंदी भाषेत लिहिला गेला. लो. टिळकांनी लेखकाला त्याचे हस्तलिखित वाचून लिहिले. "मी आपले 'दैशिक शास्त्र' फार आनंदाने वाचले. माझे मत तंतोतंत तुमच्या मताप्रमाणेच आहे." या पुस्तकाचा विषय 'देशभक्तीचे शास्त्र' असा आहे. या ग्रंथात 'चिती', 'विराट' ह्या संकल्पना श्री. टुलधरिया यांनी स्पष्ट केल्या आहेत. दीनदयाळजींनी हे शब्द पुन्हा रूढ केले. भारतीय राष्ट्र हे अनादिकालापासून 'राष्ट्र' म्हणून ओळखले जाते, त्याचे सांस्कृतिक एकत्व हेच त्याचे राष्ट्रीय एकत्व आहे व त्या एकत्वाची जाणीव पुन्हा सर्व भारतीयांत निर्माण केली पाहिजे, हा सिद्धांत दीनदयाळजींनी आपल्या विचारसरणीचा आरंभबिंदू बनविला होता. जुलै–ऑगस्ट १९४७ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'राष्ट्रधर्म' मासिकाच्या पहिल्या अंकात त्यांनी 'भारतीय राष्ट्रधारा का पुण्यप्रवाह' या शीर्षकाचा लेख लिहिला होता. त्याचे सूत्र हेच होते की, एका संस्कृतीच्या आधारावरच भारताची राष्ट्रीयता उभी आहे. याच अखंड राष्ट्रीयतेला आपण पुन्हा आवाहन केले पाहिजे. तसेच 'पांचजन्य'-च्या २४ ऑगस्ट १९५९ च्या अंकात दीनदयाळजींनी 'लोकमान्य के सपनोंका भारत' या शीर्षकाखाली 'दैशिक शास्त्र' या पुस्तकावरील आपला

अभिप्राय दिला आहे. त्यात 'एकात्म मानववादा' चे बीज आढळेल. त्यात पं. दीनदयाळजींनी म्हटले आहे, "जे राष्ट्रवादी, समन्वयवादी व पूर्णतावादी आहेत, ते असे समजतात की पश्चिमेच्या भौतिकतेचा भारताच्या आध्यात्मिकतेशी मेळ घातला पाहिजे. भौतिक व आध्यात्मिक अशा वेगवेगळ्या कप्प्यांत जीवनाचा विचार करता येत नाही. व्यक्तीने आचरण करून ज्या मूल्यांच्या द्वारे समाजधारणा होते, त्या मूल्यांचा आधार एक चिद्शक्ती असते. ती मूल्ये समाजाच्या समन्वित जीवनातून निर्माण होतात, विस्तार पावतात. एखादे यंत्र जसे त्याचे सुटे भाग एकत्र करून उभे करता येते तसे समाजजीवन निर्माण होत नाही. आपण जर पाश्चिमात्य भौतिक मार्गाने जाणार नसू तर आपला मार्ग कोणता, हा प्रश्न प्रत्येक कर्मशील व्यक्तीपुढे उभा राहातो. आपल्या मार्गाची माहिती नसते. आणि आपला मार्ग आपण शोधून काढू हा आत्म-विश्वास नसल्याने पश्चिमी प्रचारतंत्राचे आपण बळी होतो आणि त्याचे अनुकरण करू लागतो. 'दैशिक शास्त्र' या पुस्तकाची प्रेरणा श्री. बद्रीसाह ठुलधरिया यांना लोकमान्य टिळकांच्या 'कर्मयोग-शास्त्रातून' (गीतारहस्य) मिळाली. लोकमान्य टिळकांनी गीतेच्या आधारे कर्मयोग सांगून भारताच्या आध्यात्मिकतेला निवृत्तीकडून प्रवृत्तीकडे खेचले. भारतीय संस्कृतीच्या शाश्वत तत्त्वांना हिमालयाच्या गुहेतून बाहेर काढून जीवनाच्या खुल्या मैदानात आणले. भारताच्या राष्ट्रीय आंदोलनाला शक्तीचा अंतहीन स्रोत दिला. 'दैशिक शास्त्र' व कर्मयोग-शास्त्र हे परस्पर पूरक ग्रंथ आहेत. राष्ट्रनिर्मितीच्या कामास वाहून घेतलेल्या प्रत्येक व्यक्तीने हे दोन्ही ग्रंथ वाचले पाहिजेत. आपल्या सर्व समस्यांचे निदान व निराकरण करण्यास त्यांतून मदत मिळेल."

('पांचजन्य' २४ ऑगस्ट १९५९.)

सारांश, भारताच्या नव्या जीवनदर्शनाची बीजे किंवा मूलभूत सिद्धांत या दोन ग्रंथांत आहेत असा दीनदयाळजींचा निष्कर्ष होता.

आद्य शंकराचार्यांचे धर्मसंजीवन

दीनदयाळजींच्या बौद्धिक व वैचारिक प्रेरणांचा शोध घेताना खूप मागे गेले पाहिजे. आद्य शंकराचार्यांनी गौतम बुद्धाच्या तत्कालीन आव्हानांना कसे उत्तर दिले, सर्व भारतात पुन्हा वैदिक धर्माची कशी प्रस्थापना केली, परंपरा न सोडता कसे युगानुकूल परिवर्तन घडवून आणले याचे उत्तम विश्लेषण दीनदयाळजींनी आद्य शंकराचार्यांच्या त्यांनी लिहिलेल्या चरित्रात

केले होते. याच विषयासंबंधीचे त्यांचे विचार त्यांनी 'राष्ट्रधर्म' मासिकाच्या पहिल्या अंकात (जुलै-ऑगस्ट १९४७) प्रस्तावनेत मांडले होते. त्यावरून त्यांच्या विचारांचा अंदाज घेणे शक्य आहे. कारण दीनदयाळजी परंपरेत मुरलेले होते. तरीही परिवर्तनाची आस त्यांच्या मनात होतीच. त्यामुळे पूर्वेतिहासात हिंदूमध्ये परिवर्तने कशी घडून आली व ती कोणी घडवून आणली याचा त्यांचे मन शोध घेत होते. आद्य शंकराचार्य व गौतम बुद्ध यांच्या विषयींच्या लेखात दीनदयाळजींनी म्हटले आहे, "शंकराचार्य हे हिंदु धर्माच्या समन्वय वृत्तीचे ज्वलंत उदाहरण आहे. त्यांनी गौतम बुद्धाच्या बंडाचा अर्थ ओळखला. कालगती ओळखली. त्या बंडामुळे देशाचे नुकसानही झाले. त्या काळी धर्मचिंतकांपुढे मुख्य प्रश्न होता तो वैदिक धर्माला सर्व दृष्टीने समर्थ व कालानुकूल रूप कसे द्यावयाचे हा. शाश्वत जीवनतत्त्वाबद्दल हिंदू धर्माचा आग्रह हाच होता की, जीवन परिपूर्ण करण्यासाठी जी साधने असतात त्यांच्यांत कालमानाप्रमाणे बदल करताना खळखळ करावयाची नाही.

शंकराचार्यांनी प्राचीन मूल्यांचे रक्षण करून नवीन बदल घडविले, पण राष्ट्राच्या आत्म्याला धक्का लावला नाही. हिंदू धर्माचे स्वरूप बदलले, पण आत्मा तोच राहिला. राष्ट्रीय भावना दृढमूल करणाऱ्या विविध धर्ममतांचा व संप्रदायांचा समन्वय करण्याची वृत्तीही या काळात प्रबळ झाली. या समन्वयाचे श्रेय पुष्कळसे शंकराचार्यांना दिले पाहिजे. 'कर्म, भक्ती व ज्ञान या तीन विचारधारांचा संगमही याच काळात झाला. त्याचे श्रेयही शंकराचार्यांनाच आहे."

भारतीय परिभाषा

लोकशाही, समाजवाद, आदी संकल्पनांचा व त्या मागच्या तात्त्विक सिद्धांतांचा विचार दीनदयाळजी करीत होते. भारतीय जीवनमूल्ये हा त्यांचा कसोटीचा दगड होता. सनातन मूल्ये ही नव्या परिस्थितीत, नव्या परिभाषेत पुनः पुन्हा मांडावी लागतात हे त्यांच्या विचार-प्रपंचाचे सूत्र होते. म्हणून शंकराचार्य, लोकमान्य टिळक, स्वामी दयानंद यांच्या 'विचार-सृष्टीचा' त्यांच्या मनात सदैव संदर्भ असे. कारण कोणतेही परिवर्तन होताना परिस्थिती हा जसा महत्त्वाचा घटक असतो तसे मनावरचे, बुद्धीवरचे संस्कारही कारणीभूत होत असतात. दीनदयाळजींच्या विचारांचा अभ्यास करताना त्यांची विचार-प्रक्रिया समजून घेणे आवश्यक आहे. म्हणून हा शोध घेतला. 'दैशिक शास्त्र' या

ग्रंथातही श्री. टुलधरियांनी देशभक्ती, राष्ट्रीयत्व, स्वातंत्र्य व भारताचे प्रश्न यांचा विचार भारताच्या प्राचीन विचारांच्या संदर्भात केला आहे. उदाहरणार्थ, 'देशभक्ती' या पहिल्याच प्रकरणातील महत्त्वाचे मुद्दे देताना अनुक्रमणिकेतच भारताच्या स्थितीचा उल्लेख आहे. व्यक्तिगत हिताची उपेक्षा करून देशहित साधण्याच्या इंग्लंडच्या प्रवृत्तीचाही उल्लेख आहे. यासाठी 'चिती', 'विराट' आदी शब्दही वापरले आहेत. सर्व प्रयत्न भारतीय परिभाषेत तत्कालीन प्रश्न व प्राचीन विचार यांची सांगड घालण्याचा आहे. शब्द हे एखादी संकल्पना (Concept) व्यक्त करण्यासाठी रूढ होतात. त्या संकल्पनेमागे त्या समाजाची, त्या व्यक्तीची तत्त्वदृष्टी असते. म्हणून दीनदयाळजींनी 'चिती','विराट' हे शब्द पुन्हा रूढ केले असेच केवळ नव्हे, तर प्राचीन भारतीय तत्त्वदृष्टी स्वीकारून नव्या परिभाषेत ती संकल्पना पुन्हा समाजापुढे मांडली. दीनदयाळजींचे हे वैचारिक कार्य आहे, म्हणून त्यांच्या विवेचनात, प्रतिपादनात नेहमीच प्राचीन शब्द, प्राचीन संदर्भ येतात. भारतीय परिस्थितीचा विचार करताना किंवा नव्या पाश्चात्य प्रयोगांची वा संकल्पनांची चर्चा करताना दीनदयाळजी हीच पद्धती अवलंबतात.

'चिती' चा प्रकाश

उदाहरणादाखल 'राष्ट्रधर्म' नोव्हेंबर–डिसेंबर १९४७ मध्ये (कार्तिक पौर्णिमा संवत् २००७) 'चिती' या शीर्षकाखाली लिहिलेल्या लेखात दीनदयाळजींनी राष्ट्राचा आत्मा व त्याचे पुनर्रचनेत महत्त्व याची चर्चा केली आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचा हा लेख आहे. त्यावरून दीनदयाळजींचे विचार-मंथन कोणत्या दिशेने चालले होते ते या लेखावरून दिसते. भारताचे स्वातंत्र्य ही एक युगप्रवर्तक राजकीय घटना होती. पण स्वातंत्र्य मिळेपर्यंत देशभक्ती म्हणजेच ब्रिटिशविरोध असे साधे समीकरण होते. आमची आर्थिक दुःस्थिती आदी सर्व समस्यांचे मूळ कारण ब्रिटिश राज्य होय असे समजून आपण चालत होतो. पण देशभक्तीला विधायक किंवा भावात्मक रूप देण्याचा विचार झाला नाही. पण दीनदयाळजींनी असे म्हटले आहे, "राष्ट्राच्या कल्पनेतच देशभक्तीचे मर्म दडले आहे. आपण सर्व राष्ट्राचा विचार का करतो ? कारण आपली अशी धारणा असते की, राष्ट्राच्या वैभवातच आपले व्यक्तिगत वैभव समाविष्ट आहे. पण एवढी स्वार्थमूलक प्रेरणाच देशभक्ती असते काय ? तसे असेल तर दरोडेखोरांचे ऐक्य आणि आपले स्वार्थप्रेरित ऐक्य यांत काही फरकच उरणार

नाही. राष्ट्रावर भक्ती याचा अर्थ राष्ट्रात जो समाज असतो त्याच्याशी समरस होणे. संपूर्ण राष्ट्रीय समाजाविषयीचे ममत्व म्हणजे देशभक्ती होय. ही ममत्वाची भावना त्या समाजाचा व आपला आत्मा एक आहे, त्यामुळे निर्माण होते. व्यक्तीला जसा आत्मा असतो तसा राष्ट्रालाही असतो. त्या आत्म्याच्या अस्तित्वामुळेच सर्व राष्ट्र एकात्म होते. राष्ट्राच्या या आत्म्याला आपल्या शास्त्रकारांनी 'चिती' असे संबोधिले आहे. भिन्न भिन्न राष्ट्रांची चिती वेगवेगळी असते. 'चिती' हेच राष्ट्रत्वाचे चिन्ह आहे. या चितीमुळेच प्रत्येक राष्ट्राच्या संस्कृतीला वेगळे व्यक्तिमत्व प्राप्त होते. साहित्य, कला, धर्म, भाषा ही सर्व या चितीचीच व्यक्त रूपे आहेत. शरीराचे सर्व अवयव जसे या आत्म्यामुळे एकमेकांशी निगडित असतात, तसेच संस्कृती, धर्म, भाषा आदी गोष्टी राष्ट्रीय आत्मतत्त्वाशी संबंधित असतात. या तत्त्वामुळेच या सर्वांचे पोषण होते. राष्ट्रातील समाजाची एकता, त्याचे समष्टिजीवन राष्ट्राच्या या आत्म्यामुळेच – चितीमुळेच – जाणवते. चितीच्या प्रकाशानेच राष्ट्राचा अभ्युदय होतो. चितीच्या विनाशामुळे राष्ट्राचा अधःपात होतो. भारताचे उत्थान करावयाचे असेल तर राष्ट्राच्या या चितीचे – आत्म्याचे – स्वरूपदर्शन भारतीयांना घडविले पाहिजे. केवळ बाह्यांग सजवून राष्ट्राला वैभव प्राप्त होणार नाही. आजच्या रचनात्मक देशभक्तीचे उद्दिष्ट हेच असले पाहिजे.

(राष्ट्रधर्म – कार्तिक पौर्णिमा, संवत् २००७, अंक ३ – ४,)

'विराट' चा उदय

चिती म्हणजे राष्ट्राचा आत्मा. राष्ट्राच्या प्राणशक्तीला दीनदयाळजींनी विराट असे म्हटले आहे. ते राष्ट्रचैतन्य सर्व शरीरात सळसळत असते. लोकशाहीचे यशही जागरूक विराटावर अवलंबून असते. हे चैतन्यच राष्ट्रीय जीवनाचा सर्वांगीण विकास घडवून आणते. चितीमुळे जागृत होणारी शक्ती म्हणजे विराट होय.

प्रकृती, धर्म व प्रतिकृती

दीनदयाळजींच्या विचारसरणीची बैठक चिती आणि विराट याप्रमाणेच प्रकृती, धर्म, संस्कृती, 'मी' आणि 'आम्ही' या त्यांच्या कल्पनेवर आधारलेली आहे. दीनदयाळजींच्या पायाभूत विचारसरणीचे वर्णन करावयाचे झाल्यास ती समाजशास्त्रीय आहे असे म्हटले पाहिजे. पण भारताची आध्यात्मिक परिभाषा

त्यांनी वापरली असल्याने पाश्चात्य समाजशास्त्रीय धाटणीची नाही. पण त्यांनी विचारांती घेतलेले सर्व प्रश्न मूलतः सामाजिक आहेत. राष्ट्रवादाचा विचारही ते संस्कृती, धर्म यांच्या संदर्भात करतात. उदाहरणार्थ, 'पांचजन्य'-मध्ये (१३ जुलै, १९५९) प्रकृती, धर्म, संस्कृती या नावाचा एक लेख त्यांनी लिहिला होता. त्यात संस्कृतीचे विवेचन करताना दीनदयाळजी म्हणतात, " व्यक्ती व समष्टी या दोहोंशी संस्कृतीचा संबंध येतो. पण संस्कृती ही मुळात सामाजिक आहे. संस्कृतीमध्येच समाजाचा आत्मा प्रकट होतो. अर्थात् ब्रह्म ज्याप्रमाणे सर्व व्यापून दशांगुळे उरते तसेच समाजाला स्वतःचे अलग अस्तित्व असते. पण समाजाचे व्यक्त स्वरूप व्यक्तीतच पहावयास मिळते. तसेच संस्कृती ही सामाजिक असूनही व्यक्ती-व्यक्तीत प्रतिबिंबित होते. हिंदू विचाराप्रमाणे व्यक्ती व समाज ही अभिन्न असतात. भारतीय विचारसरणीनुसार समाज-निरपेक्ष व्यक्तीचे अस्तित्वच संभवत नाही.

व्यक्ती व समाज यांच्या हितात मेळ घालणे, ते दोन्ही एकमेकांना छेद देणार नाहीत अशी व्यवस्था करणे हे कार्य संस्कृती करते. माणसाचे शरीर, मन, इंद्रिये आदी त्याच्या प्रकृतिनुसार कामे करतात. त्याचे काही नियम असतात. त्यालाच धर्म म्हणतात. पण त्या नियमांचे उल्लंघन झाले किंवा वागण्यात 'अतिरेक' झाला की विकृती झाली असे आपण म्हणतो. हा अतिरेक किंवा विकृती टाळणे आवश्यक असते. ते काम धर्माचे असते. म्हणून धर्माच्या आधारे संस्कृती आपले काम करते. धर्म हाच समाजाची धारणा करतो असे मानले जाते. किंबहुना, समाजाचे नियमबद्ध अस्तित्व धर्मामुळेच शक्य होते. जसे माणसाने आहार-व्यायाम नियमाप्रमाणे केला तर शरीर निरोगी राहाते तसेच धर्मपालनामुळे समाज व्यवस्थित चालतो. एका माणसाचे दुसऱ्याशी व्यवहार ठीक प्रकारे चालतात.

म्हणून धर्माला सामाजिक अंगही असते. माणूस स्वतःला लागणाऱ्या सर्व वस्तू एकटा तयार करू शकत नाही. त्यासाठी अनेकांची मदत लागते. देवाण-घेवाण करावी लागते. या व्यवहारात संघर्ष येणार नाही अशी व्यवस्था असावी लागते. या व्यवस्थेचा आधारही 'धर्म' असेल तर हा संघर्ष न येता सुव्यवस्थितपणे समाजातील व्यवहार चालतात. म्हणून वैयक्तिक आचरण व सामाजिक व्यवहार ही दोन्ही धर्माच्या आधारे चालतात. त्यालाच समाजाची धारणा असे आपण म्हणतो.

"अशा रीतीने माणूस हा केवळ स्वार्थी न बनता, समाजविरोधी आचरण न करता आपले जीवनव्यवहार करील असे वातावरण समाजात निर्माण करणे हे कार्य 'संस्कृती' करते. धर्माची ही दुसरी पायरी आहे. सगळा मानवी व्यवहार स्वार्थाच्या प्रेरणेने चालत नाही. दुसऱ्याचे हित – परहितही – पहावे लागते. माणसाला किंवा समाजाला ही प्रेरणा संस्कृतीपासून मिळते."

सारांश, धर्म व संस्कृती यांचा विचार दीनदयाळजी वैयक्तिक व सामाजिक नीती किंवा आचरण-संहिता म्हणून करतात. म्हणून भारतात धर्मराज्य असले पाहिजे असे जेव्हा ते सांगत तेव्हा त्याचा अर्थ इतका व्यापक व सखोल असे. यावरून असे दिसून येईल की, दीनदयाळजींची चिंतन-पद्धतीच मूलगामी होती. याच दृष्टीने त्यांनी समाजवाद, लोकशाही, मानवतावाद या सर्वांचा विचार केला. म्हणून त्यांची समीक्षा ही अस्सल भारतीय समीक्षा असे. केवळ एखादा विचार नवा आहे म्हणून ते स्वीकारीतही नसत किंवा परकीय आहे म्हणून त्याज्यही मानत नसत. पण स्वतःच्या चिंतनपद्धतीने त्या संकल्पनेची किंवा विचारप्रणालीची चिकित्सा करून निष्कर्ष काढीत, अशाप्रकारे दीनदयाळजी हे विधायक टीकाकार होते व सर्जनशील विचारवंतही होते.

समाजवाद, लोकशाही व मानवतावाद

दीनदयाळजींनी समकालीन विचारप्रणालींचा भारतीय दृष्टिकोनातून चिकित्सक अभ्यास केला. काही स्वतःचे निष्कर्ष काढले. ते लोकांपुढे मांडले होते. ते एका समग्र जीवनदर्शनाच्या शोधात होते. पुढे त्यांनी 'एकात्म मानववाद' या नावाने ते जीवनदर्शन प्रसृत केले. पण त्याआधी १९६१ मध्ये त्यांनी 'समाजवाद, लोकशाही व मानवतावाद' या विषयावर 'पांचजन्य' मध्ये (दि. २ जानेवारी, १९६१) या वादांची चर्चा केली होती. जनसंघाच्या अभ्यास-शिबिरात या वादाविषयी बोलत असता एकदा त्यांनी डॉ. राममनोहर लोहियांनाच जनसंघाच्या अभ्यासशिबिरात समाजवादावर भाषण करण्यासाठी बोलावले होते. ते आलेही होते.

स्वतःला समाजवादी म्हणवून घेणे ही एक फॅशन झाली आहे व राजकीय पक्षात समाजवादी होण्याची स्पर्धा लागली आहे असे सांगून दीनदयाळ म्हणतात "युरोपखंडात समाजवादाचे अनेक प्रकार प्रचलित आहेत. हिटलर, मुसोलिनी, स्टॅलिन हे सर्वच स्वतःला समाजवादी मानीत असत. भारतातही सर्व प्रकारचे

समाजवादी आहेत. काही नेते युरोपीय समाजवादाला भारतीय रूप दिले पाहिजे असे सांगत असतात. एम्. एन्. रॉय यांनी आयुष्याच्या शेवटी समाजवादाचा त्याग करून क्रांतिकारी मानवतावाद प्रचलित करण्याचा प्रयत्न केला.

स्वामी विवेकानंदांनीही एका वेगळ्या संदर्भात 'मी समाजवादी आहे' असे म्हटले होते. भुकेल्यांबद्दल सहानुभूती व त्यांना समाजात समान दर्जा व सन्माननीय स्थान देण्याची इच्छा ही प्रत्येक समाजवाद्याची प्रेरणा असते. ही त्याची सदिच्छा प्रशंसनीय आहे. दुःख, कष्ट, छळ, पीडा, शोषण, भूक, गुलामी व अभाव हे सर्व पाहून ज्याला कोणाला मानवी अंतःकरण आहे त्याच्यात ही समाजवादी वृत्ती निर्माण होणारच. पण समाजवाद केवळ एवढ्यापुरता मर्यादित नाही. समाजवादाला ही दुःस्थिती नष्ट करावयाची आहे. त्याने दारिद्र्याची कारणमीमांसा केली आहे. रोगाचे निदान केले आहे. याबाबत त्याला मार्क्सचे शिष्यत्व स्वीकारावे लागते. मार्क्सशी मतभेद असलेले लोकही त्याची ही मीमांसा नाकारू शकत नाहीत. बोल्शेविक क्रांतीनंतरचा आतापर्यंतचा इतिहास ती पद्धती अपूर्ण आहे हेच सांगतो.

समाजवादाचा पहिला हल्ला लोकशाहीवर होतो. मार्क्सने वर्गहीन समाजाची घोषणा केली. थोडा काळ मजुरांची हुकूमशाही येईल असे सांगितले. पण प्रत्यक्षात झाले वेगळेच. जी राजकीय समता मानवाला मिळाली होती तीच नष्ट झाली. प्रिन्स क्रोपोटकिनने २८ एप्रिल, १९१९ रोजी पश्चिम युरोपच्या कामगारांना उद्देशून लिहिलेल्या पत्रात हे स्पष्टपणे मान्य केले होते की, पक्षीय हुकूमशाही वा पोलादी नियंत्रणाखाली समर्थ केंद्रशासन असलेले कम्युनिस्ट प्रजाराज्य निर्माण करण्याची ही कल्पना शेवटी अयशस्वी होणार आहे.

या अपयशामुळेच आज लोकशाही समाजवादाची संकल्पना पुढे आली आहे. पण समाजवादी पद्धतीतही उत्पादनाची साधने राज्यसंस्थेच्याच मालकीची असतात. पण ही राज्यसंस्था आर्थिक क्षेत्रातच आपले वर्चस्व गाजविते असे नाही. लोकांच्या राजकीय हक्कावरही ती आक्रमण करते, तेव्हा समाजवादी बंदुकीची पहिली गोळीही लोकशाहीवरच झाडली जाते. समाजवाद व लोकशाही हे एकत्र नांदूच शकत नाहीत. वाघ आणि शेळीचे सह-अस्तित्व असंभाव्य आहे. प्रत्येक समाजाची संस्कृती, समाजरचना यांचा विचार आर्थिक विकासाबरोबरच करावयाचा असे म्हटले तर हा गुंता आणखीनच वाढत जातो. तो उकलणे अशक्य वाटू लागते. या समाजवादी वैचारिक भ्रमाचा परिणाम जेथे

भांडवलशाही पद्धती आहे त्यांच्यावरही झाला आहे. तेथे समाजवादी राज्या-ऐवजी कल्याणकारी राज्याची कल्पना उदयाला आली आहे.

आजचा पेचप्रसंग असा आहे की, लोकशाही राष्ट्रांत आपल्या चुका सुधारण्याची, नव्या गोष्टींचा स्वीकार करण्याची मानसिक सिद्धता विशिष्ट लोकशाही पद्धतीमुळे निर्माण होते. पण समाजवादी विचार-प्रणालीत हा लवचिकपणा नसतो. अंधश्रद्धेवर आधारलेल्या धर्माच्या अनुयायांसारखेच कट्टर समाजवादी स्वतंत्र विचारापासून दूरच राहू इच्छितात. कम्युनिस्टांच्या शब्दकोशात 'स्वतंत्र' विचारवंतांसाठी अनेक शिव्या समाविष्ट केलेल्या आहेत. परंतु विचारी मनुष्य कधीही विचारशून्य होऊ शकणार नाही.

आज भारतातला समाजवाद राष्ट्रीयीकरणाच्या कल्पनेवरच भर देतो आहे. अविकसित अर्थव्यवस्थेत सरकारला स्वतःच्या हाती काही उद्योग ठेवावे लागतात हे खरे. खाजगी उद्योगपतींना पूर्णपणे खुले मैदान सोडता येत नाही. स्पर्धेचे नियंत्रण करावेच लागते. या दोन विभागांत संतुलन राखण्याची गरज असते. लोकशाही व समाजवाद या दोन वेगवेगळ्या प्रणाली आहेत. त्यांची तुलना होऊच शकत नाही. आमच्या दृष्टीने या दोन संकल्पना वैकल्पिक नाहीत. या प्रणाली ही साधने आहेत, साध्ये नाहीत. म्हणून कोठे जावयाचे हे आधी ठरविले पाहिजे. मग मार्ग निश्चित करावा लागेल !

यंत्राची गुलामी

" आपल्याला या मनुष्यत्वाचे रक्षण करावयाचे तर त्याला प्रथम यंत्राच्या गुलामीतून मुक्त केले पाहिजे. आज माणूस यंत्रावर राज्य करीत नसून यंत्र माणसावर राज्य करते आहे. या यंत्रप्रेमामागे माणसाची आपल्या गरजा जास्तीत जास्त वाढविण्याची व तृप्त करण्यासाठी धडपडण्याची आस आहे. म्हणून संपूर्ण मानवी जीवनाचा विचार करून आपण उत्पादन, वाटप व उपभोग यांचा एकत्रित विचार केला पाहिजे. उत्पादन व उपभोग या दोन्ही गोष्टी माणसाने सार्थ जीवन जगून साधावयाच्या आहेत. अशी अर्थव्यवस्था आपण केली पाहिजे.

हिंदुत्ववाद हवा

धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थांवर आधारलेले हिंदू-जीवनदर्शन आपल्याला सध्याच्या संकटातून निवारून नेईल. विश्वाच्या समस्यांचे उत्तर

समाजवाद हे नाही, हिंदुत्ववाद हे आहे. हिंदुत्ववाद हे असे एक जीवनदर्शन आहे की, ते जीवनाचा साचेबंद रीतीने विचार करीत नाही. या जीवनदर्शनाला जुन्या निष्प्राण कर्मकांडाशी जोडून हिंदुत्वाची गल्लत करता कामा नये. हिंदुत्व वैज्ञानिक प्रगतीच्या विरुद्ध आहे असे समजणेही चुकीचे आहे. विज्ञान व तंत्रज्ञान यांचा उपयोग आमच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाला अनुरूप होईल अशा पद्धतीने झाला पाहिजे. आपल्याला राजनैतिक, आर्थिक, सामाजिक आणि सैद्धांतिक आघाड्यावर यंत्रवादाशी सामना द्यावा लागेल. म्हणून धर्म-राज्य, लोकशाही, सामाजिक समानता आणि आर्थिक विकेंद्रीकरण ही आपली ध्येये ठेवली पाहिजेत. या सर्वांना समाविष्ट करील असा ' वाद ' आम्हाला पाहिजे. मग त्याला हिंदुत्ववाद, मानवतावाद काहीही नावाने संबोधा !"

दीनदयाळजींचे हे विश्लेषण नुसते नकारात्मक टीका करणारे नाही, तर पुढची दिशा दाखविणारे आहे. दीनदयाळजी हीच तत्त्वदृष्टी ठेवून आर्थिक, सामाजिक, राजकीय घटनांचा, संकल्पनांचा विचार करताना आढळतात. त्यात आर्थिक नियोजनही येते. आर्थिक विचार व उद्दिष्टेही येतात. मानवी मूल्यांचे, सांस्कृतिक मूल्यांचे रक्षण व पोषण यांचा ध्यास त्यांच्या आर्थिक चिंतनामागे आहे. केवळ अर्थशास्त्रीय विश्लेषण वा मीमांसा नाही.

दीनदयाळजींच्या विचारांची दिशा कम्युनिझमपलीकडे लोकशाही मार्गाने, पण सनातन मूल्ये न सोडता पोहोचण्याची आहे. भारताची सर्वांगीण पुनर्रचना हेच ध्येय आहे. त्यांच्या काळात कम्युनिझमचे वैचारिक आव्हान जास्त प्रबळ होते, म्हणून अर्थनीतीवर भर देणे आवश्यक होते. ' भारताची अर्थनीती : विकासाची नवी दिशा ' या दीनदयाळजींच्या प्रबंधात त्यांचे आर्थिक विचार आहेत. सूत्र रूपाने ते येथे सांगता येतील.

भारतीय जीवनाचा नियंता धर्म आहे. पण हा धर्म केवळ आध्यात्मिकही नाही. चाणक्याने म्हटले आहे, ' सुखस्य मूलं धर्मः । धर्मस्य मूलं अर्थः । ' सुख धर्माधिष्ठित असले पाहिजे. अर्थाविना धर्म टिकणार नाही. येथे धर्माचा समाजधारणेची व्यवस्था असा अर्थ आहे. याचा अर्थ अर्थाचा प्रभावही असता कामा नये. अर्थ हाच जीवनाचा मापदंड झाला की अर्थ हे साधन राहात नाही साध्य होते. भोगविलास हेच जीवनाचे ध्येय बनते. भोगविलासाने मनुष्य पौरुषहीन बनतो. वासनेच्या मागे लागतो. जीवनातील संतुलन नाहीसे होते, मग आचरणाची मूल्ये बदलतात. साधने शुद्ध असावीत असा आग्रह राहात

नाही. धर्माचरण सुटते. धनलोभ हाच वर्चस्व गाजवितो.

अर्थाचा प्रभाव जसा असता कामा नये तसा अभावही असता कामा नये, कारण व्यक्तीची सामाजिक प्रतिष्ठा, सुखी चरितार्थ, राजनैतिक महत्त्व, सामाजिक व्यवहार आदी गोष्टी पैशावरच अवलंबून असतात. दारिद्र्यही माणसाचे नैतिक अधःपतन घडविते. अर्थ हेच दरिद्री माणसाचे वांछित असते. त्यामुळे त्याच्याही जीवनातील तोल ढळतो.

म्हणून भारतीय अर्थशास्त्राने धर्माचा प्रभाव व अभाव दोन्हीही नष्ट करणारी संतुलित अर्थव्यवस्थेची कल्पना पुरस्कारली आहे. याला 'अर्थायाम' असे म्हटले आहे. अशा तऱ्हेची अर्थव्यवस्था निर्माण करावयाची असेल तर समाजाचे मानदंड बदलावे लागतील. अर्थमूलक समाजव्यवस्था चालणार नाही. आर्थिक मानव हा अर्थमूलक समाज घडवील म्हणून तत्त्वतःच आर्थिक मानव ही कल्पना चुकीची आहे. सैनिक शौर्यासाठी जगतो. ज्ञानपिपासू मनुष्य ज्ञान हेच धन मानतो. शौर्याची, ज्ञानाची किंमत पैशांत किंवा श्रमांत करता येणार नाही. श्रमाला प्रतिष्ठा त्याला मिळणाऱ्या मूल्यावर अवलंबून नसते. ती त्याच्या धर्मत्वावर – हेतूवर अवलंबून असते. येथेच पाश्चात्य जीवनदृष्टी व भारतीय जीवनदृष्टी यांत मूल्यांचा फरक आहे. म्हणून पाश्चात्य अर्थव्यवस्था भारताला उपयुक्त नाही. कारण दोहोंचे मूल्य-सिद्धांत स्वतंत्र व विरोधी आहेत. भारतीय मूल्य-सिद्धांत धर्माशी निगडित आहे. पाश्चात्य मूल्य-सिद्धांत अर्थकारणाशी संलग्न आहे.

पाश्चात्य अर्थशास्त्राचा प्रभाव

म्हणूनच भारताच्या आर्थिक विकासाचा मार्ग वेगळा पाहिजे. पण आम्ही पश्चिमी अर्थशास्त्री मार्शल व मार्क्स यांच्या संकल्पनांशी इतके जखडले गेलेलो आहोत की त्यांच्या परिघाबाहेर पडूच शकत नाही. आपले अर्थशास्त्री पाश्चात्य अर्थ-सिद्धांतांचे अनुकरण करतात; स्वतःचे भारतीय अर्थ-सिद्धांत काढू शकत नाहीत. गांधीवादी अर्थशास्त्रविचार केवळ आंदोलनाच्या रूपाने पुढे आला. पश्चिमी अर्थव्यवस्थेच्या वाईट बाजूवर त्यांनी टीका केली पण नवी भारतीय अर्थव्यवस्था ते देऊ शकलेले नाहीत.

तसेच भारतात पाश्चात्य अर्थव्यवस्थेचा समर्थक विद्वानांचा व पाश्चात्य उद्योगपतींशी ज्यांचा स्वार्थ जोडलेला आहे असा फार मोठा वर्ग आहे. हे दोन्ही

एकमेकांचे पूरक आहेत. सरकारी नियोजन-पद्धतीही 'भारतीय' नाही. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळातही भारताचे शोषण होत राहिले. आपलेच उद्योगपती व कारखानदार पाश्चात्य शोषणपद्धतीचे एजंट म्हणून काम करीत आहेत. आपली स्वदेशी चळवळ फक्त खादीच्या टोपीपुरतीच मर्यादित राहिली आहे. बाकी सर्व परदेशी झाले आहे."

नियोजनावरील टीका

दीनदयाळजींची भारताच्या नियोजन-पद्धतीवरील टीकाही मौलिक असे. त्यांनी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेवर टीका करताना म्हटले होते की, "दुसरी योजना ही मूलतः अभारतीय आहे. भारतीय समाजरचनेच्या वैशिष्ट्यांची त्यात दखल घेण्यात आलेली नाही. आर्थिक पुनर्रचना हवेत करता येणार नाही. स्वावलंबन हे आपल्या नियोजनाचे मुख्य आचारसूत्र असावयास हवे. जगाच्या एका भागातील औद्योगिक विकास दुसरीकडे रुजविता येणार नाही. शेती व उद्योगधंदे यांविषयींचा आपला स्वतःचा दृष्टिकोन हवा. तंत्रविद्या आयात करण्याऐवजी आपल्या परिस्थितीला अनुरूप असे तंत्रविज्ञान शोधून काढणे आवश्यक आहे. सर्वांना रोजगार देईल व प्राप्तीतील विषमता कमी करील असे तंत्रविज्ञान आपणाला हवे. त्यामुळे लोकांचे राहणीमानही वाढेल. अगदी अलीकडे पाश्चात्य देशातील तंत्रविज्ञानाचा विकासही याच दिशेने होत आहे. आर्थिक मंदीपूर्वीचे तंत्रविज्ञान व आर्थिक कल्पना यांच्यावर दुसरी पंचवार्षिक योजना आधारलेली आहे." (ऑर्गनायझर, २९ सप्टेंबर १९५८). याच लेखात दीनदयाळजींनी नियोजन-पद्धती, नियोजन-मंडळ व राष्ट्रीय विकास-मंडळ यांच्यात बदल करा असे सुचविले आहे. त्यांचे म्हणणे असे, "योजनेचा अवधी वाढविला पाहिजे. दुसऱ्या योजनेचे विकासाचे टप्पे बदलले पाहिजेत. योजनेत अनेक अविभाज्य विकास-योजना आहेत. त्यांत काटछाट करणे अनिष्ट असते व ते सोपेही नसते. अनेक वेळा पैसाही पुरेसा नसतो. त्यामुळे विकासातील अग्रक्रम बदलावे लागतात. म्हणून योजना ही पाच वर्षांपुरती मर्यादित ठेवता येत नाही. आर्थिक विकास ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. म्हणून त्याच्या योजना कालबद्ध करता येत नाहीत. साध्य करावयाचे इष्टांक ठरविण्याने खर्चही जास्त होतो. इष्टांक साध्य झाले नाहीत की निराशा येते. शिवाय भारतातील पंचवार्षिक योजना पंचवार्षिक निवडणुकीशी जोडल्या गेल्या आहेत. ही जर कालयोजना बदलली तर सर्व जनतेचे सहकार्य व

सहभाग मिळविणे शक्य होईल. हा प्रश्न सरकारी प्रतिष्ठेचा न मानता हे बदल करावेत. राष्ट्रीय विकास-मंडळात गेल्या मे महिन्यामध्ये जी चर्चा झाली ती वास्तवता व जबाबदारी यांना सोडून झाली. भारतातील नियोजन हे निष्ठेने व जबाबदारीने होण्याऐवजी राजकारणातले खेळणे झाले आहे. म्हणून प्रथम नियोजन-मंडळाची पुनर्रचना करावयास हवी. राष्ट्रीय विकास-मंडळाची रचनाही बदलली पाहिजे. नियोजन-पद्धती खाली खेड्यांपर्यंत नेली पाहिजे. सर्वपक्षीय सल्लागार-मंडळे हवीत. योजना प्रत्यक्ष आर्थिक स्थितीचा विचार करून तयार व्हावी. एखाद्या विचारप्रणालीनुसार नाही. ब्रिटनने १९४८ साली आपली आर्थिक विकास-योजना तयार करताना जी मार्गदर्शक सूत्रे निश्चित केली होती, त्यांत राजकीय व आर्थिक वस्तुस्थिती या दोहोंचाही विचार करण्यात आला होता.'' असेही दीनदयाळजींनी या लेखात म्हटले आहे.

भारतीय अर्थरचनेची राष्ट्रीय ध्येये

भारताच्या अर्थव्यवस्थेत कोणती उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवली जावीत याचे विवेचन करताना दीनदयाळ म्हणतात, ''आपल्या देशाला प्रदीर्घ प्रयत्नांनंतर स्वातंत्र्य मिळाले आहे हे लक्षात घेता कोणतीही व्यवस्था आपले राजकीय स्वातंत्र्य सुरक्षित राखील अशीच पाहिजे. हे पहिले उद्दिष्ट. दुसरे म्हणजे आपली लोकशाही पद्धती धोक्यात येईल किंवा तिला बाधक ठरेल असे आर्थिक नियोजन असता कामा नये. तिसरे उद्दिष्ट, आपली सांस्कृतिक मूल्ये आपल्या राष्ट्रजीवनाला नव्हे तर जगालाही अत्यंत उपयुक्त आहेत, त्यांचे रक्षण करणे हे हवे. आपली संस्कृती गमावून आपण आर्थिक समृद्धी आणली तर ती निरर्थक ठरेल. चौथे उद्दिष्ट, सैनिकी दृष्टीने आपण स्वसंरक्षणक्षम राहू असे असले पाहिजे. पाचवे उद्दिष्ट, आर्थिक स्वावलंबनाचे असले पाहिजे. जे राष्ट्र दुसऱ्यावर आर्थिक दृष्टचा अवलंबून असते त्याचा स्वाभिमान नष्ट होतो. स्वाभिमानशून्य राष्ट्र आपल्या स्वातंत्र्याचे कधीही रक्षण करू शकत नाही. राजकीय स्वातंत्र्य राखावयाचे असेल तर आर्थिक स्वातंत्र्य आवश्यक आहे. आर्थिक स्वातंत्र्यासाठी आर्थिक स्वालंबन हवे. सहावे उद्दिष्ट, लोकशाहीत जसा प्रत्येक प्रौढ नागरिकाला मताधिकार असतो तशी प्रत्येकाला काम देणारी अर्थव्यवस्था हवी. कामाप्रमाणेच किमान वेतन, न्याय्य मिळकत व त्याचे वाटप यांचीही सामाजिक हितासाठी गरज असते. यासाठी मिळकतीवर मर्यादा असणेच आवश्यक आहे. उपभोगाचे अनिर्बंध स्वातंत्र्य देणे अशक्य आहे. व्यक्तिस्वातंत्र्य

किंवा व्यक्तिसाहस याचा भांडवलदार किंवा कारखानदार करीत असलेला अर्थ त्यांचे स्वतःचे स्वातंत्र्य असा असतो. आम्हाला टाटा-बिर्लांचे स्वातंत्र्य नको. कोट्यवधी मानवांचे स्वातंत्र्य हवे आहे. म्हणूनच केंद्रीकरणास आमचा विरोध आहे. भांडवलशाहीत मुक्त व्यक्तिस्पर्धा हळूहळू नाहीशी होते व आर्थिक शक्ती काही व्यक्तींच्या हाती केंद्रित होते. समाजवादात ही आर्थिक शक्ती राज्याच्या ताब्यात जाते व शेवटी ती राज्यातील नोकरशाहीच्या हाती जाते. यामुळे मानवी जीवन यंत्रासारखे होते. दोन्ही पद्धतींमध्ये माणसाचा विचार एक आर्थिक साधन म्हणून होतो, माणूस म्हणून नव्हे. म्हणून भांडवलशाही व समाजवाद यांपासून मुक्त होऊन मानवतावादाचा विचार केला पाहिजे. तंत्रज्ञानाचा उपयोगही मानवासाठी झाला पाहिजे. यासाठी विकेंद्रित अर्थव्यवस्था हवी. प्रत्येक माणसाच्या गरजा, त्याचे गुण यांचा विचार करून त्याला योग्य ते काम देण्यानेच माणसाचा विकास होतो. विकेंद्रित अर्थव्यवस्थेतच ते शक्य आहे. कारण एकदा मोठे कारखाने सुरू झाले की ते बंद करण्यासाठी अनेक गोष्टींचा विचार करावा लागतो. म्हणून पुढचे पाऊल उचलण्यापूर्वीच या दिशेने आधी विचार केला पाहिजे.

थोडक्यात, संरक्षण, पूर्ण रोजगार, माणसाच्या किमान गरजा भागविल्या जाण्याची सोय व विकेंद्रीकरण ही जनसंघाच्या अर्थरचनेची उद्दिष्टे आहेत.

सारांश, दीनदयाळजींची चिंतनपद्धती जशी मूलगामी, विश्लेषक होती तशी एकात्मही होती. मानवी जीवनाच्या भौतिक व आध्यात्मिक या दोन्ही अंगांचे सुयोग्य पोषण ज्या पद्धतीत होईल अशी पद्धत त्यांना हवी होती. मूल्यविचार, मूल्यनिष्ठा व मूल्यांना धरून सामाजिक व वैयक्तिक जीवनरचना हे दीनदयाळजींच्या विचाराचे सार आहे.

• • •

५

पक्ष-संघटक दीनदयाळजी

दीनदयाळजी हे जनसंघाचे विचारदाते होते. स्वतः ते मूलगामी विचारवंत कसे होते याची चर्चा मागच्या प्रकरणात केली. पण १९५२ मध्ये दीनदयाळ जनसंघाचे मुख्य चिटणीस झाले. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींचा त्यांनी विश्वास संपादन केला. जनसंघाची पक्ष-संघटना उभी करण्याचे कार्य दीनदयाळजींवर सोपविण्यात आले. कार्यक्षेत्र नवीन व त्यांच्या कर्तृत्वाला आव्हान देणारे होते. रा. स्व. संघात १३ वर्षे कार्य केलेले असल्यामुळे संघटन-कौशल्य त्यांच्या रक्तातच होते.

जनसंघाची स्थापना १९५१ मध्ये झाली. स्वातंत्र्य मिळून चार वर्षे झाली होती. काँग्रेस सत्तेवर होती. राजकीय पक्ष म्हणून काँग्रेस संघटित कधीच झाली नव्हती. ते एक आंदोलन होते. लोकशाहीमध्ये ध्येयवादी पक्ष, पक्ष-शिस्त पाळणारे कार्यकर्ते आवश्यक असतात. ध्येयाप्रमाणे कार्यक्रम तयार केला जातो. तो कार्यक्रम घेऊन लोकांपुढे जायचे असते. काँग्रेसने ध्येयाचा मुखवटा घेतला आणि कार्यक्रमही तयार केला. पण ध्येयवादी पक्ष-संघटना व कार्यकर्ते त्यांचे जवळ नव्हते. निवडणुकी लढविण्यासाठी एकत्र यावयाचे, सत्ता मिळाली की ती वाटून घेण्यासाठी स्पर्धा सुरू व्हावयाची. सत्तास्पर्धेचे राजकारण सुरू व्हावयाचे. गांधीजींची पुण्याई काही वर्षे पुरली. नंतर नेहरूंची लोकप्रियता हेच काँग्रेसचे निवडणुकीचे भांडवल होते. काँग्रेसचे ध्येयात्मक परिवर्तन कधीच झाले नाही. बाजारबुणगे हे कधीही कार्यकर्ते होऊ शकत नाहीत. त्यामुळे काँग्रेस हे एक सत्ता मिळविण्याचे यंत्र झाले. ह्यातून काँग्रेसचा अधःपात सुरू

झाला. मग सत्ता मिळविण्यासाठी जात, भाषा, धर्म, प्रदेश आदी संबंधितांच्या संकुचित निष्ठा जोपासल्या जाऊ लागल्या. धार्मिक अल्पसंख्यांची मनधरणी हे काँग्रेसचे ब्रीद झाले. त्यांची मते मिळवून देणारे कंत्राटदार निर्माण झाले. सत्तेचा जनतेशी संबंध उरला नाही. त्यामुळे लोकशाही म्हणजे एकपक्षीय लोकशाही असे समजले जाऊ लागले. त्याच्या जोडीला व्यक्तिस्तोम माजले. तत्त्वाकडून व्यक्तीकडे देश जात होता. व्यक्तीची पूजा हाच सत्ता मिळवण्याचा मार्ग आहे हे काँग्रेसवाल्यांना कळले. नेहरूंना खूष ठेवायचे व आपली दुष्कर्मे करावयाची हा प्रघात पडला. दरबारी राजकारण सुरू झाले. एखाद्या खेळाच्या सामन्यात प्रेक्षकांची जी भूमिका असते तीच पाच वर्षे पुढे निवडणूक होईपर्यंत सामान्य मतदारांची असावयाची. लोकशाहीचे हे भ्रष्ट रूप होते.

या सर्व स्थितीला मुख्य कारण देशात ध्येयवादी विरोधी पक्ष नव्हते हे आहे. लोकशाहीमध्ये सामान्य जनतेत काही गुण असावे लागतात. त्याशिवाय ती यशस्वी होत नाही. भारतीय समाज या दृष्टीने प्रगत झालेला नव्हता. राजकारण हे व्यक्तीचा, जातीचा, स्वार्थ साधण्याचे साधन झाले. स्वातंत्र्यासाठी लढताना जे गुण समाजात निर्माण झाले त्यांपेक्षा वेगळे गुण लोकशाही पद्धती यशस्वी करण्यासाठी लागतात. याचे भान आपल्याला राहिले नाही. त्यामुळे लोकशाहीची यंत्रणा आली, पण ती यशस्वी करण्यासाठी लागणारे गुण निर्माण झाले नाहीत. किंबहुना, ते निर्माण व्हावे असे प्रयत्नही कुणी केले नाहीत. चारित्र्य हे जसे वैयक्तिक आचरणात हवे तसे सामाजिक आचरणातही आवश्यक असते. शिस्त ही जशी माणसाच्या जीवनात आवश्यक असते तशी समाजाच्या व्यवहारातही आवश्यक असते. प्रामाणिकपणा, सचोटी हे जसे वैयक्तिक गुण आहेत तसेच ते सामाजिकही गुण आहेत. राजकारण हा शेवटी समाजाचा व्यवहार असतो. तो नीट चालावयाचा असेल तर या सर्व गुणांची आवश्यकता असते. काँग्रेसने हे गुण निर्माण करण्याचा प्रयत्न कधीच केला नाही. उलट समाजातील भेदांचा, भांडणांचा फायदा घेऊन सत्ता मिळवली.

दीनदयाळजींची पक्ष-कल्पना

दीनदयाळजी उपाध्याय यांची राजकीय पक्षासंबंधीची काही निश्चित मते होती. ते म्हणत, " आज भारतात जे राजकीय पक्ष आहेत त्यांत बऱ्याच उणीवा आहेत. पक्ष या दृष्टीने काँग्रेस सर्वांत कमी दर्जाचा पक्ष आहे. आज राजकीय पक्ष कुठल्याही ध्येयासाठी संघटित केला जात नाही. तो व्यक्ती किंवा

एखादा गट यांच्या आधारावर संघटित केला जातो. नुसता ध्येयवाद असूनही उपयोगी नसतो. तो ध्येयवाद राष्ट्रहिताशी निगडित झालेला पाहिजे. नाहीतर कम्युनिस्टांना ध्येयवाद आहे पण तो लोकशाहीच्या मुळावर आघात करणारा आहे. शिस्तबद्ध पक्ष आणि निष्ठावान व देशभक्त नेतृत्व यांची आज गरज आहे. स्वतंत्र वृत्तपत्रे, स्वतंत्र न्यायपद्धती, स्वच्छ आणि कार्यक्षम प्रशासन यांची यशस्वी लोकशाहीसाठी गरज आहे. अर्थात् लोकशाहीमध्ये एकापेक्षा जास्त पक्ष असणारच. पण या पक्षांनी एक प्रकारची आचारसंहिता किंवा पंचशील पाळले पाहिजे. पक्षांतराला त्यांनी उत्तेजन देता कामा नये तरच देशात स्थिर शासन येईल आणि बेजबाबदार राजकारण चालणार नाही." (ऑर्गनायझर, २७ फेब्रुवारी १९६१.)

दीनदयाळजींनी जनसंघाची भूमिका स्पष्ट करताना १९५६ मध्ये म्हटले होते, "आम्हाला देशात शांततामय मार्गांनी आर्थिक व सामाजिक क्रांती करावयाची आहे. पण ती करण्यास आजचे खानदानी नेतृत्व उपयोगी पडणार नाही. कारण अशा क्रांतीमुळे आपणच स्थानभ्रष्ट होऊ अशी भीती त्या नेतृत्वाला वाटते म्हणून ते काळाबरोबर पुढे जाणाऱ्या ध्येयवादाच्या मार्गापासून मागे फिरले. शिवाय हे नेते एका विशिष्ट वयाचे आहेत. हे नव्या व जुन्या पिढीचे भांडण आहे. खरे म्हणजे अशा कलहानेच प्रगती होते. आम्ही हे जाणतो की सध्याचे वृद्ध नेतृत्व या क्रांतिकार्याला पाठिंबा देणार नाही. जनसंघाचे कार्यकर्ते नवे नेतृत्व निर्माण करण्यास उत्सुक आहेत हे खरे आहे. जनसंघाला या देशाला नवीन नेतृत्व द्यावयाचे आहे. पण नेतृत्व निर्माण करण्याचे जुने मार्ग आता बदलले पाहिजेत. त्यासाठी जवळचा मार्ग असणार नाही. म्हणून चुकीच्या मार्गांऐवजी अधिक प्रयत्न करून योग्य मार्गांनी आपण पुढे गेले पाहिजे. घोषणा, मिरवणुकी, जयजयकार यांची झिंग चढते. त्यामुळे खरा लोकनेता निर्माण होत नाही. नेतृत्व आपोआप वर येऊ द्या. ते कृत्रिम उपायांनी वर येऊन उपयोग नाही.

म्हणून आपण लोकशाहीच्या यशासाठी व आपल्या पक्षाच्या हितासाठी सामान्य माणूस हेच आपले उद्दिष्ट ठेवले पाहिजे. अडाणी वाटणारा सामान्य मनुष्य हा अतिशय शहाणा असतो आणि शूरापेक्षाही अधिक शूर असतो. भारतीय जनसंघ हा सामान्य जनतेची संघटना व्हावी असे मला वाटते." (जनसंघ विशेषांक १९५६ –ऑर्गनायझर).

सर्वस्वी नवीन कार्यक्षेत्र

जनसंघाचा प्रारंभ हा एका अर्थाने राजकीय क्षेत्रात पक्षनिष्ठेने, लोकशाहीच्या चौकटीत, शिस्तीत व ध्येयवादाच्या पायावर भारतीय जनता संघटित करण्याचा पहिला प्रयत्न होता. कम्युनिस्टांची पद्धती लोकमत प्रक्षुब्ध करून, आंदोलने करून जनसंघटना उभी करण्याची होती. वैयक्तिक शुद्धाचरणापेक्षा, सामाजिक सदाचारापेक्षा, वैयक्तिक 'करडी' शिस्त, अभ्यास व सामुदायिक असंतोष यांवरच त्यांची कार्यपद्धती अवलंबून असते. क्रांतीच्या उन्मादक धुंदीत अफूच्या व्यसनाप्रमाणे व्यक्तीला व लोकांना काम करावयास लावणे, त्यागाची सिद्धता करावयास लावणे, जहाल भाषेत हा उन्माद व्यक्त करणे ही कम्युनिस्ट कार्यशैलीची वैशिष्ट्ये आहेत. त्याला एक जागतिक स्वरूपही आहे. शुद्धाचरण, शुद्ध साधनांचा आग्रह कम्युनिस्टांत नसतो. गांधींनी सत्याग्रही आंदोलने केली. पण चिरंतन समाजसेवेची दीक्षा घेतलेले जीवनव्रती किंवा सत्याग्रही त्यांतून मोठ्या संघटितरीत्या निर्माण झाले नाहीत. काँग्रेस हा तर सत्तावाद्यांचाच पक्ष होता व आहे. प्रजासत्ताक राज्यपद्धती लोकहितबुद्धीने चालवावयाची असेल तर त्यासाठी राजकारण हे लोकसेवेचे व्रत आहे असे मानणाऱ्या व तशी कडकडीत निष्ठा असणाऱ्या कार्यकर्त्यांचा फार मोठा वर्ग पाहिजे. लोकांवरील या श्रद्धेने सामान्य जनतेचे नेतृत्व करणारे संघटक कार्यकर्ते पाहिजेत. स्वतः दीनदयाळजी असे होते. संघजीवनात कार्यकर्ते निर्माण करण्याचा अनुभव त्यांचेजवळ होता. फक्त आता चांगुलपणाला, सत्प्रवृत्तीला सदैव आव्हान देणाऱ्या राजकीय क्षेत्रात असे कार्यकर्ते आता त्यांना निर्माण करावयाचे होते. स्वातंत्र्यासाठी लढताना निर्माण होणारा आवेश देणारे युद्धप्रसंग परकीय शत्रूबरोबरचे होते. तोही एक त्याग करावयास लावणारा, शुद्धाचरण करावयास लावणारा उन्माद असतो. त्यातही 'झिंग' असते. पण लोकशाहीत राजकारण करणाऱ्याला पहिला संघर्ष करावा लागतो तो स्वतःच्या मनात वसत असलेल्या काम, क्रोध, लोभ व लोकेषणा या शत्रूंशी. तुकारामांनी म्हटल्याप्रमाणे "रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग। अंतर्बाह्य जग आणि मन" असे या संघर्षाचे स्वरूप असते. हा संघर्ष न संपणारा असतो. दीनदयाळजींना असे कार्यकर्ते जनसंघासाठी निर्माण करावयाचे होते. आदर्श कार्यकर्त्यांच्या त्यांच्या दोन मुख्य कल्पना होत्या. एक म्हणजे तो निर्वैर वृत्तीने वागणारा असावा. दुसरे

म्हणजे तो लोकमित्र, लोकशिक्षक व लोकांचा हितरक्षक असावा. दीनदयाळजी म्हणत, "जनसंघाचा राष्ट्रीय विचार सर्वत्र भरून राहावा. आजचा विरोधक उद्याचा मतदार व्हावा, उद्याचा मतदार परवाचा सदस्य व्हावा; आणि परवाचा सदस्य सक्रिय कार्यकर्ता व्हावा."

दुसरे सूत्र 'इदं न मम' या वृत्तीने समाजातील हीनदीनांबद्दल ममत्व असणाऱ्या सामाजिक बांधिलकीचे होते. तिसरे सूत्र, समाज-परिवर्तनाचे होते. जनसंघाचे संघटक व कार्यकर्ते या तीन सूत्रांप्रमाणे तयार करण्याचा दीनदयाळजींनी संकल्प केला.

पद्धतशीर अभ्यास

'अभ्यासेचि प्रकट व्हावे' हे रामदासांचे वचन दीनदयाळजी नेहमी पाळत. एखाद्या विषयाचा अभ्यास करावयाचा म्हणजे त्याच्या सर्व बाजू अभ्यासावयाच्या. जनसंघाची घटना तयार करण्याची, पक्षाची कार्यपद्धती ठरविण्याची जबाबदारी त्यांचेवर पडताच त्यांनी भारतातल्या व जगातील सर्व महत्त्वाच्या राजकीय पक्षांच्या घटना, कार्यपद्धती यांचा अभ्यास केला. मनात जनसंघाचा जो आराखडा होता तो लक्षात घेऊन इतरांचे जे चांगले आहे ते उचलण्याचे ठरविले. काँग्रेसची निधी जमवण्याची पद्धत त्यांना पसंत नव्हती. ती टाळावयाची हे ठरविले. कम्युनिस्टांची अभ्यासशिबिरांची प्रथा त्यांना आवडे. रा. स्व. संघाच्या गुरुदक्षिणेच्या प्रथेतील सामान्य माणसाचा स्वयंस्फूर्त सहभाग त्यांना अनुकरणीय वाटला. प्रादेशिक संघटन मंत्री ही संस्थाही अशीच निर्माण झाली. निष्ठावान व कार्यक्षम संघटक कार्यवाह असला की, अध्यक्ष बदलले तरी संघटनेची चौकट कायम राहते. गांधीजींप्रमाणे हरिजन व स्त्रिया यांना संघटनेत सहभागी करून घेतलेच पाहिजे हा त्यांचा आग्रह होता. दीनदयाळजींनी जनसंघाच्या घटनेमध्ये तशी तरतूद आग्रहाने करवून घेतली होती.

कार्यकर्त्यांचा पक्ष

दीनदयाळजी हे हजारो कार्यकर्त्यांशी वैयक्तिक संबंध ठेवणारे नेते होते. मनाने कार्यकर्त्यांच्याबरोबर ते असत पण विचाराने पुढेच असत. कार्यकर्त्यांचे नेते (ग्रास रूट लीडर) असे दीनदयाळजींचे वर्णन केले तर चुकणार नाही.

दीनदयाळजी पक्षसंघटनेचा भव्य प्रयोग करीत होते. कार्यकर्ता हा जनतेशी

संपर्क ठेवणारा, संवाद करणारा नेता असला पाहिजे, ही त्यांची मुख्य कल्पना होती. दीनदयाळजींनी राजकीय पक्ष-संघटनेला मानाचे स्थान मिळवून दिले. कार्यकर्त्यांशी सतत संपर्क ठेवणाऱ्या दीनदयाळजींचे या बाबतीत जे कार्य होते त्यासंबंधी विस्तृत चर्चा श्री. ब. ना. जोग यांनी आपल्या पुस्तकात (राष्ट्र-कारणासाठी राजकारण) केली आहे. त्यांनी म्हटले आहे, " दीनदयाळजी विचाराने आणि वृत्तीने पूर्णपणे स्वतंत्र होते. स्वातंत्र्य ही त्यांची आंतरिक ऊर्मी होती आणि त्यांच्या पावलागणिक व शब्दागणिक याचा प्रत्यय येत असे. पक्षकारणात, राजकारणात, आणि राष्ट्रकारणात कोणाचेही दडपण येऊ नये यावर त्यांचा भर असणे अगदी स्वाभाविक होते. त्यांना सत्ता मिळवायची होती, कल्याणकारी योजना राबवायच्या होत्या पण त्या जनता व नोकरशहा यांच्यांत नवीन दलाल निर्माण करून नव्हे तर जनतेशी, पक्षाशी, तत्त्वाशी आणि देशाशी बांधिलकी असलेल्या कार्यकर्त्यांच्या सहाय्याने. नोकरशाहीमार्फत जनकल्याण (वेल्फेअर ब्युरॉक्रसी) ही गोष्ट त्यांच्या कल्पनेतच बसत नव्हती. त्यांना कार्यकर्ते निर्माण करावयाचे होते आणि त्या कार्यकर्त्यांच्या बळावर देशाचे चित्र बदलायचे होते. काँग्रेसच्या हाती सत्ता म्हणजे दुर्योधनाच्या हाती सत्ता असे ते मानत. या कार्यकर्त्यांच्या बळावर आणि जनतेच्या सहकार्याने त्यांना भारताचे चित्र बदलावयाचे होते. पक्ष, राजकारण, सत्ता ही साधने होती.

" दीनदयाळजींना निवडणुकीतील उमेदवार किंवा पक्षाचा कार्यकर्ता यांनी जनसेवेला वाहून घेतलेले असले पाहिजे असे वाटे आणि पक्षाचा सदस्य या नात्याने त्याने पक्षशिस्त पाळून पक्षाचे कार्य एकाग्रतेने केले पाहिजे असे ते म्हणत, त्याचा अर्थ एवढा व्यापक होता. आजकाल (अथवा त्या वेळीही) काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता ही जनतेची सरकारातील कामे करून देणारा एक दलाल बनला आहे. जे काही मिळवायचे ते 'त्वयार्धं मयार्धम्' या न्यायाने नोकरशाही आणि पक्षयंत्रणा यांनी वाटून घ्यावयाचे असे जणू आपल्या घटने-तीलच मार्गदर्शक तत्त्व झाले आहे असे वाटण्यापर्यंत हा व्यवहार सुरळीत चालू झाला आहे. दीनदयाळजींना जो निःस्वार्थी कार्यकर्ता तयार करावयाचा होता तो भ्रष्टाचाराची गटारे स्वच्छ करण्यासाठी. निवडणूक-निधी मोठ्या रकमांनी उभा केला म्हणजे वरपासून भ्रष्टाचार सुरू होतो म्हणून कार्यकर्त्यांनी ज्यांना जनसंघ त्याच्या ध्येयधोरणांसह सत्तेवर यावा असे वाटत होते त्यांच्याकडूनच निवडणुकीचा निधी जमवावा असे ते आग्रहाने सांगत.

" कार्यकर्ता तयार करताना ते त्याच्या घडणीकडे अशा प्रकारे अगदी बारकाईने लक्ष देत असत. कार्यकर्त्याने कार्य करताना जातीपातीच्या विचारांना थारा देऊ नये असा त्यांचा कटाक्ष असे, एवढेच नव्हे तर, निवडणुकीत उमेदवार उभा करताना किंवा मतदारसंघाचा विचार करतानाही जातीपातीचा विचार करू नये यावर त्यांचा भर होता. ' उमेदवाराच्या लायकीचाच विचार केला पाहिजे आणि तो सर्व दृष्टींनी लायक असला तर त्याची जात कोणती याचा विचारही मनात आणू नये ' असे आग्रहाने सांगताना त्यांनी डॉ. राममनोहर लोहियांच्या निवडणुकीचे उदाहरण दिले. डॉ. लोहियांना उत्तर प्रदेशातील एका मतदार संघात उमेदवारी नाकारण्यात आली कारण त्या मतदार-संघावर ज्या जातीचे वर्चस्व होते त्या जातीचे डॉ. लोहिया नव्हते.

" परंतु कार्याकिडे आणि स्वतःला उद्याचा भारत कसा निर्माण करावयाचा आहे याकडे सावधपणे लक्ष असणाऱ्या कार्यकर्त्यांना दीनदयाळजींनी अनावर होऊ दिले नाही. अर्थातच त्यांचा एवढा संयम अमान्य असणारे कार्यकर्ते त्यांना नाना प्रश्न विचारत असत. पण " या संतापाचे रूपांतर कार्यात करा. तुमच्या अस्वस्थतेचे लोण जनतेत पोचवा " असे दीनदयाळजी परोपरीचा युक्तिवाद करून कार्यकर्त्यांना समजावून सांगत. तेव्हा ' राजकीय असंतोषाचे जनक ' अशी टीका टिळकांवर ब्रिटिशांनी केली आणि तेच त्यांचे भूषण ठरले. टिळकांनंतर पन्नास वर्षांनी दीनदयाळजीही काँग्रेसविरुद्धच्या असंतोषाचे जनक ठरले."

पक्षाची संकल्पना

भारतीय जनसंघ हा राजकीय अनुभवाच्या दृष्टीने नवीन असला तरी त्याचेजवळ राजकीय कल्पकता होती. दीनदयाळजींनी त्याला जसा विचार दिला, पक्ष-संघटना घडविली तसेच राजकीय पक्ष कसा असावा यासंबंधीच्या स्वतःच्या कल्पनाही दिल्या, व्यवहारात आणल्या. मानवेंद्र रॉयही या वेळेस पक्षातीत राजकारणाचे तत्त्वज्ञान मांडीत होते. मानवतावादी राजकारण त्यांना हवे होते. तसेच सत्तेचे राजकारण न करता स्वातंत्र्याचे राजकारण आम्ही करू इच्छितो असे रॉय सांगत होते. सत्तेची आकांक्षा न ठेवता राजकारण करता येते हे त्यांना सिद्ध करावयाचे होते.

ध्येय म्हणून अर्थातच हे स्वप्नरंजन ठीकच आहे, दीनदयाळजींची पक्ष-कल्पना हेही एक प्रकारचे स्वप्नरंजनच होते. पण त्यात पुरुषार्थ व प्रयत्न होता.

त्यांनी म्हटले होते, " चांगला पक्ष कोणता ? अर्थात् पक्ष म्हणजे नुसता व्यक्तींचा समुदाय नव्हे, तर केवळ सत्ताकांक्षी नसलेला, विशिष्ट ध्येयवादाने प्रेरित झालेला समूह म्हणजे राजकीय पक्ष होय. अशा पक्षाच्या सदस्यांच्या मते सत्ता हे साध्य नसून विशिष्ट उद्दिष्टांसाठी हाती घेतलेले साधन असते. समर्पणाची भावना त्यात प्रबळ असते. या भावनेतून अनुशासन येते. अनुशासन म्हणजे केवळ बाह्य कठोर नियमांचे पालन नव्हे. ते वरून लादण्यापेक्षा अंतःप्रेरित असेल तरच टिकते. धर्माचे जे समाजात स्थान असते तेच पक्षाच्या जीवनात अनुशासनाचे असते. समर्पणवृत्ती किंवा भक्ती व अनुशासन या दोन्ही गोष्टी पक्षात असतील तर त्यात गटबाजी उद्भवणार नाही, तट पडणार नाहीत. जेव्हा स्वहिताला पक्षहितापेक्षा प्राधान्य मिळते तेव्हा गटबाजी सुरू होते. विकृत व अहंमन्य वृत्तीचे ते सामाजिक प्रकटीकरण असते. पक्षात गटबाजी असली की तो निष्प्रभ होत जातो. तिसरा गुण म्हणजे कोणताही पक्ष विशिष्ट ध्येयप्रणाली-साठी अस्तित्वात आला पाहिजे. पक्षाची धोरणे त्या ध्येयप्रणालीच्या अनुषंगाने ठरविण्यात आली पाहिजेत. राजकीय सोय आणि संधिसाधू वृत्ती म्हणजे वास्तवता नव्हे. ध्येयावरील निष्ठा हा तत्त्वाग्रही माणसाचा गुण असतो; संधिसाधू व विवेकशून्य माणसाचा नव्हे. राजकीय पक्ष व त्यांचे नेते प्रत्यक्ष आचरणाने राजकीय जीवनाची मूल्ये निर्माण करीत असतात. समाजाने कसे वागावे याचे नियम त्यातून ठरतात. स्वाभाविकपणेच ते जी धोरणे आखतात ती मूल्यांना धरून असली पाहिजेत. लोकशाही म्हणजे केवळ निवडणुका नव्हेत. त्यासाठी सुसंघटित लोक लागतात. सुसंघटित व ध्येयवादी राजकीय पक्षच राजकीय आचाराच्या चांगल्या प्रथा घालून देऊ शकतात."
(ऑर्गनायझर – ११ डिसेंबर १९६१)

राजकीय पक्षाची दोन अंगे

जनसंघ हा एक बांधेसूद, शिस्तबद्ध व समर्पित वृत्तीचा राजकीय पक्ष व्हावा अशी दीनदयाळजींची कल्पना होती. त्यांनी सांगितले होते, " आपल्याला हे दाखवून द्यावयाचे आहे की जनसंघ इतर पक्षांहून वेगळा पक्ष आहे. सत्तेसाठी सिद्धांत गुंडाळून ठेवणाऱ्या पक्षांचा आपल्या देशात तुटवडा नाही. आपल्यालाही सत्ता हवी आहे आणि आपण ती मिळवूही. परंतु आपली नजर खुर्चीच्या पलीकडेही आहे. ती नजर हटविणार नाही. ध्येय सोडणार नाही." (विजयवाडा-अधिवेशनातील भाषण, जानेवारी ६५.)

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राजकीय पक्षांनी विकासाचे कार्यक्रम तयार केले. निवडणुकीत त्याचा प्रचार केला जाई. काँग्रेसने पंचवार्षिक योजना तयार केली. सर्व सरकारी यंत्रणा त्यासाठी राववण्यात येऊ लागली. राजकारणाला विकासाची नवी बाजू निर्माण झाली. लोकहिताचे कायदे विधानसभेमध्ये होऊ लागले. या सर्व हालचालींवर देखरेख ठेवणे आवश्यक होते. त्यामुळे लोक-प्रतिनिधी म्हणून निवडले जाणारे कार्यकर्ते हा राजकीय पक्षाचा एक नवा विभाग झाला. परंतु सगळेच पक्ष-कार्यकर्ते आमदार किंवा खासदार होऊ शकत नाहीत. पक्षाचे संघटन करणारे कार्यकर्तेही लागतात. सरकारशी संबंध येत असल्यामुळे विधानसभा किंवा संसद यांना समाजात व सरकारात प्रतिष्ठा मिळू लागली. स्वाभाविकच राजकीय पक्षांमध्ये एक प्रकारची मानसिक कटुता व स्पर्धा निर्माण होऊ लागली. लोकप्रतिनिधींचा वर्ग हा शिरजोर होऊ लागला. काँग्रेसमध्ये तर दोन तट पडले. याचे कारण सत्ता ही लोकसेवेसाठी आहे हे कार्यकर्ते विसरले व सत्तेमुळे मिळणारे मान, मरातब आणि प्रतिष्ठा यांमुळे त्यांच्यामध्ये अहंकार निर्माण झाला. जनसंघामध्ये ही भांडणे होऊ नयेत व कार्यकर्त्यांची सेवाबुद्धीही कायम राहावी म्हणून दीनदयाळजींनी सुरुवातीपासूनच काळजी घेतली. विधानकर्ते व विधायक कार्यकर्ते हे पक्षसंघटनेचे दोन विभाग आहेत. त्या दोघांची प्रतिष्ठा सारखीच मानली पाहिजे. लोकसेवा हे दोघांचे ब्रीद असले पाहिजे. हे दोन्ही विभाग एकमेकांना पूरक व्हावेत अशी दीनदयाळजींची इच्छा होती. आमदारांना समाजाच्या प्रश्नांची माहिती देण्याचे काम विधायक कार्यकर्त्यांनी केले पाहिजे. कारण त्यांचा समाजाशी नित्य संपर्क येतो. समाजाची सुख-दुःखे त्यांना कळतात. ती सरकार पुढे मांडण्यासाठी व शक्यतो काही उपाययोजना करण्यासाठी आमदारांनी खटपट केली पाहिजे. या उलट पक्षाचे तत्त्वज्ञान व कार्यक्रम लोकांपर्यंत पोहोचविणे हे पक्ष-कार्यकर्त्यांचे काम आहे. ही जाणीव दीनदयाळजींनी त्या दोन्ही विभागांना सतत करून दिली. त्यामुळे पुनर्रचनेचा ध्येयवाद सतत पक्षापुढे राहिला.

दीनदयाळजी हे स्वतः जनतेच्या अनेक प्रश्नांचा अभ्यास करीत. पक्ष-नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी अभ्यास सतत केला पाहिजे असा त्यांचा आग्रह असे. किंबहुना, स्वतः ते अनेकांना विषय वाटून देत आणि अभ्यास करायला सांगत असत. उदाहरणार्थ, श्री. नानाजी देशमुखांना शेतीचा अभ्यास करावयास त्यांनी सांगितले होते. राजकीय कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण-वर्ग सुरू केले होते. त्यांत

आणि अभ्यास-शिबिरांत देशातील विविध विचारप्रणालींचा अभ्यास होत असे. अनेकदा तज्ज्ञांना भाषण देण्यासाठी बोलावले जाई.

कार्यकर्त्यांचा गुणात्मक दर्जा वाढविण्यावर दीनदयाळजींचा भर असे. कार्यकर्त्यांच्या आचरणाचे काही सिद्धांत ते सतत सांगत असत. पहिला सिद्धांत असा की, देशहित पक्षहितापेक्षा श्रेष्ठ आहे असे प्रत्येकाने मानले पाहिजे. दुसरा सिद्धांत म्हणजे, कार्यकर्त्याने कार्यक्रमावर व पक्ष-सिद्धांतावर निष्ठा ठेवावी. व्यक्तिनिष्ठा नसावी. तिसरा सिद्धांत, ध्येय, सिद्धांत व तत्त्वज्ञान हे राजकीय पक्षाचे महत्वाचे अंग असले तरी जनतेची सेवा हेच त्याचे चिरकाल टिकणाऱ्या यशाचे मर्म आहे. चौथा सिद्धांत असा की, कार्यकर्त्यांनी आदर्शवादी असले पाहिजे. काँग्रेस हा आदर्शवाद विसरली म्हणून तिच्यामध्ये संधिसाधूपणा व लोभ शिरला. जनसंघाला केवळ काँग्रेसला विरोध करावयाचा नाही किंवा तिला सत्ताभ्रष्ट करावयाचे नाही, तर देशाला नवा आदर्शवाद द्यावयाचा आहे व राजकीय संस्कृती द्यावयाची आहे. काँग्रेस-संस्कृती म्हणून आज जी ओळखली जाते ती लोकशाहीच नष्ट करून टाकणारी कीड आहे. लोकशाहीला जडलेली राजकीय विकृती आहे. जनसंघाला संस्कृती निर्माण करावयाची आहे, हे ध्येय डोळ्यासमोर ठेवले. त्यासाठी दीनदयाळजींनी अनेक विधायक सूचना केल्या व तसे आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न केला. किंबहुना, राजकारणाची बैठकच सुसंस्कृत असली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. पक्ष-कार्यकर्त्यांना या दृष्टीनेच ते स्वतःच मार्गदर्शन करीत असत. जनसंघाचे अनेक अध्यक्ष झाले पण दीनदयाळजी १९५१ ते १९६८ या काळात एखाद्या दीपस्तंभासारखे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करीत होते. दुसरे असे की, राजकारणात वैयक्तिक द्वेष असू नये. विरोधी पक्षाचा नेता आक्रस्ताळी व विरोधासाठी विरोध करणारा नसावा. स्वतः दीनदयाळजींची वाणी मधुर होती. तसेच माधुर्य कार्यकर्त्यांजवळ असले पाहिजे असे त्यांना वाटे. त्यांनी अनेक विरोधी मतांच्या नेत्यांशी संबंध ठेवला. त्यांत राजाजींसारखे काही ज्येष्ठ नेते होते. पण दीनदयाळजी मताचे पक्के व आग्रही होते पण मृदू व सुस्वभावी होते. ते म्हणत, "जनसंघाला ठाम मते चांगल्या रीतीने मांडावयाची आहेत म्हणून तात्कालिक विरोधापेक्षा चिरकालीन संबंधांना तो महत्त्व देतो."

बहुपक्षीय राजकारण

दीनदयाळजींना भारतात बहुपक्षीय पक्षपद्धती येईल असे वाटे. लोकशाही-

मध्ये एकापेक्षा जास्त पक्ष असावेत; इतकेच नव्हे तर वेगवेगळचा ध्येयप्रणालींच्या प्रसारासाठी वेगवेगळे पक्ष पाहिजेत. मात्र या पक्षांची स्पर्धा निकोप असावी. पक्षांतराला उत्तेजन देऊ नये. अर्थात् ध्येयप्रणाली पटली नाही तर पक्ष सोडावा; पण सत्तेच्या लालसेने राजकीय पक्ष बदलतात ते ध्येयासाठी नाही, म्हणून भारताने आपली स्वतःची स्वतंत्र राजकीय पक्षपद्धती निर्माण केली पाहिजे. इंग्लंडसारखी द्विपक्षीय पद्धती आपल्याला चालणार नाही. आपल्याला अनुकूल अशीच पद्धती काढली तरच स्थिर शासन देशाला देता येईल व राजकीय पक्षांची बेशरम स्पर्धा कमी होईल. म्हणून दीनदयाळजींनी राजकीय पक्षांना आचारसंहिता असावी असे सांगितले. काँग्रेसने चांगल्या वर्तनाचा धडा घालून द्यावा असे त्यांनी सुचवले. पण काँग्रेस असा आदर्श देण्यास असमर्थ होती. काँग्रेसमधून बाहेर पडलेले अनेक गट किंवा व्यक्ती यांनी नवे पक्ष काढले होते. त्यामुळे काँग्रेस आणि काँग्रेस मधून बाहेर पडलेले गट असाच मुख्यतः देशातील राजकीय रंगमंच होता. जे स्वतंत्र ध्येयप्रणाली असलेले पक्ष होते त्यांनी देशातील राजकारण नैतिक मार्गाने चालावे यासाठी प्रयत्न केले पाहिजेत असे दीनदयाळजींनी सुचवले. तसेच सरकारच्या ध्येयात बदल करण्यासाठी जी आंदोलने करावी लागतात त्यासाठीही एक आचारसंहिता असावी असे दीनदयाळजींनी सुचवले. पक्षनिष्ठ सरकार असल्यामुळे सरकारचे निर्णय सत्ताधारी पक्षालाच फायदेशीर ठरतात. विरोधी पक्षांना जनतेच्या प्रश्नांसाठी सतत धरणी धरावी लागतात. राजकीय पक्षांनी जनतेची गाऱ्हाणी मांडण्यासाठी आंदोलने केली तर सरकाने त्या प्रश्नांमध्ये ताबडतोब लक्ष घालावे. दोन निवडणुकांमध्ये असे जे प्रश्न निर्माण होतात त्यासाठी सत्याग्रह घेराव अन्नसत्याग्रह इत्यादी गोष्टी करण्याची पाळी यावी हेच या देशाचे दुर्दैव आहे. सरकार याबाबतीत बेफिकिर असते आणि सत्याग्रह केला तर ते नमते असा निष्कर्ष लोक काढतात. यासाठी काही तरी सर्वसंमत मार्ग काढला पाहिजे असे दीनदयाळजींनी सुचवले होते. किरकोळ प्रश्नांवर सरकार बदलण्याची धमकी दिली जाते हे गैर आहे, मोठे प्रश्न निवडणुकीत मांडावेत व किरकोळ प्रश्न सोडविण्यासाठी सर्वपक्षीय यंत्रणा असावी अशी दीनदयाळजींची कल्पना होती.

राजकीय पक्षांची डावे-उजवे अशी वर्गवारी केली जाते त्याचे कारण आपण पाश्चिमात्य पद्धतीने राजकीय पक्षांचा विचार करतो हे आहे. ते वर्गीकरण

भारतीय राजकारणाचे खरे स्वरूप स्पष्ट करीत नाही. आपण असे गृहीत धरतो की डावा व उजवा या दोन टोकांमध्ये सर्व तत्त्वप्रणालींची वाटणी होते. या परिभाषेप्रमाणे काँग्रेसने समाजवाद स्वीकारल्यामुळे तोही डावा पक्ष ठरतो. पण वस्तुस्थिती तशी नाही. काँग्रेसला भांडवलदारांचे सहाय्य होत असते, याउलट जनसंघ उजवा पक्ष समजला जातो. कारण त्याने पोथीनिष्ठ समाजवाद स्वीकारलेला नाही. पण त्याचे कार्यक्रम व कार्यकर्ते हे तथाकथित जहाल पक्षांपेक्षा अधिक परिवर्तनवादी आहेत. आपण जर ही पाश्चात्य परिभाषा सोडली तर आणखी एका प्रकारे वर्गीकरण करता येईल ते म्हणजे त्यांचा ध्येयवाद कोठून आयात झाला आहे त्यावरून केलेले वर्गीकरण. असे वर्गीकरण केले तर काँग्रेस, कम्युनिस्ट, समाजवादी हे सर्वच पक्ष एका गटात मोडतात. हे सर्व पक्ष परदेशी विचारप्रणाली भारतात रूजवू पाहात आहेत. आपल्या देशाची मूल्ये, परिस्थिती, यांचा विचार करून भारतात राजकीय चिंतन होतच नाही. भारतीय पार्श्वभूमीवर काढलेले पाश्चात्य राजकीय चित्र असेच या राजकीय पक्षांचे स्वरूप आहे. आणखी एक वर्गीकरण करणे शक्य आहे. ते म्हणजे परिवर्तनवादी आणि परिवर्तनाचे विरोधक. उदाहरणार्थ, रामराज्य परिषद ही सनातनी अपरिवर्तनीय तत्त्व-प्रणाली असलेला पक्ष आहे. सर्व सामाजिक, आर्थिक परिवर्तनाला त्यांचा विरोध आहे. या उलट जनसंघ स्वामी दयानंद व लोकमान्य टिळक यांच्याप्रमाणे परंपरा कायम ठेवून सामाजिक व आर्थिक क्षेत्रातही परिवर्तन करावे अशा मताचा आहे." सारांश, सध्याची राजकीय पक्षपद्धती व त्यांचे वर्गीकरण याविषयी वरील मूलगामी विचार दीनदयाळजी मांडत होते.

जनसंपर्क व विचार-प्रसार

दीनदयाळजींनी जनसंघ हा पक्ष नव्हे तर ते एक राष्ट्रीय आंदोलन आहे अशी भूमिका सतत मांडली होती. राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतःची भारतीय संस्कृतीवर आधारलेली विचारप्रणाली असलेला पक्ष म्हणून जनसंघ ओळखला जावा ही त्यांची इच्छा होती. जनसंघ हा नुसता राजकीय सोयीसाठी व सत्तेसाठी निर्माण झालेला पक्ष नाही. म्हणून केवळ राजकीय पक्ष म्हणून नव्हे, तर मूलगामी परिवर्तन करणारे राष्ट्रीय आंदोलन आहे, अशी जनसंघाची प्रतिमा लोकमानसात उभी राहावी ही दीनदयाळजींची इच्छा होती. या दृष्टीनेच निवडणुकीमध्ये जास्तीत जास्त जागा लढविणे आणि जास्तीत

जास्त मते मिळविणे हे जनसंघाचे धोरण असले पाहिजे, असा दीनदयाळजींचा आग्रह होता. कारण त्या निमित्ताने मतदारांपुढे जनसंघाची विचारसरणी मांडता येते असे त्यांना वाटे. दुसरे माध्यम स्थानिक प्रश्नांवरील आंदोलनांचे होते. या दृष्टीने जनतेचे प्रश्न घेऊन छोटी छोटी आंदोलने करावीत असा कार्यकर्त्यांना त्यांचा आग्रह असे. याचा हेतू जनसंपर्क व जनप्रबोधन हाच होता.

पक्षांतर्गत लोकशाही

दीनदयाळजींची कार्यपद्धती कार्यकर्त्यांशी खुला विचारविनिमय व सविस्तर चर्चा करण्याची होती. यासाठी ते बैठकीमध्ये कार्यकर्त्यांना बोलते करीत. त्यात स्वतःचे विचार ते मांडत; पण विरोधी टीकाही होऊ देत. याची अनेक उदाहरणे सांगता येतील. उदाहरणार्थ, दीनदयाळजी स्वतः शाकाहारी होते पण मासे हे पूरक अन्न म्हणून ओळखले जावे व त्याच्या उत्पादनाची व्यवस्था सरकारने करावी असा त्यांचा आग्रह असे. तसेच दीनदयाळजींनी दारूला स्पर्शही केला नाही आणि दारुबंदीला त्यांचा विरोध होता. दारुबंदीचे दुष्परिणाम त्याच्या फायद्यापेक्षा जास्त भयंकर असतात असे त्यांचे म्हणणे होते. तथापि अशा सर्व विषयांवर कार्यकर्ते मोकळेपणाने विचार मांडत असत. एकात्म मानवतावादावरही अशीच मोकळी चर्चा त्यांनी घडवून आणली होती.

तत्त्वाग्रहाची दोन उदाहरणे

पक्ष-संघटक म्हणून दीनदयाळजी जसे मृदु होते, तत्त्वचर्चेस मोकळे होते, तितकेच कठोर तत्त्वाग्रही होते. राजकीय पक्षाची शिस्त ही केवळ वरून लादून चालत नाही. ध्येयवादाशी सुसंगत असा आचार हाही पक्षशिस्तीचा भाग आहे. जनसंघात ध्येयसंगत आचरणाला महत्त्व होते. दीनदयाळजींच्या कारकीर्दीत त्यांच्या तत्त्वाग्रही शिस्तीची दोन लख्ख उदाहरणे देता येतील. १९५३ मध्ये राजस्थानमध्ये जनसंघाने नुकसानभरपाई न देता जहागिरदारी नष्ट करावी असा ठराव केला होता. राजस्थानमध्ये त्या वेळी जहागिरदारांचे राजकारणावर प्रभुत्व असे. तेव्हा त्यांना अनुकूल नसलेल्या सहा आमदारांनी जनसंघाच्या भूमिकेशी विसंगत असे वर्तन केले. तेव्हा दीनदयाळजींनी त्यांना पक्षातून हाकलून दिले. दुसरा प्रसंग जनसंघाचे त्या वेळचे अध्यक्ष पं. मौलिचंद्र शर्मा यांना पक्ष सोडावयास लावले हा. पं. मौलिचंद्र शर्मा नेहरूंना भेटून काहीतरी तडजोड करीत होते असा त्यांच्यासंबंधी संशय होता. शेवटी ते

काँग्रेसमध्ये गेलेच. कार्यकर्त्यांनी त्यांच्याविरुद्ध ठराव करून त्यांना अध्यक्षपद सोडण्यास भाग पाडले. तत्त्व व आचरण यांतील विसंगती दीनदयाळजींनी सहन केली नाही.

मजूर-चळवळीला नवी दिशा

भारतातील मजूर-चळवळ ही कम्युनिस्ट, काँग्रेस व इतर डावे पक्ष यांच्या ताब्यात होती. जनसंघाला आपल्या विचारप्रणालीचा जर देशावर प्रभाव पाडावयाचा असेल तर शेतकरी, कामगार, विद्यार्थी, महिला आदी सर्व क्षेत्रांत त्याचा प्रभाव पडला पाहिजे. याची जाणीव दीनदयाळजींना होती. यासाठी मजूर-संघटनेबद्दल १९५५ च्या जानेवारीत त्यांनी श्री. दत्तोपंत ठेंगडी यांच्याशी चर्चा केली. दोघांचे स्फूर्तिस्थान राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे श्रीगुरुजी होते. त्यामुळे विचारसाधर्म्य होतेच. या चर्चेमध्ये काही निष्कर्ष काढण्यात आले. पहिला निष्कर्ष असा की, राजकीय पक्षापलीकडे जाणारी आणि खऱ्या कामगारहिताची जाणीव असलेली व भारताच्या राष्ट्रीय व सांस्कृतिक परंपरेशी जोडलेली कामगार-संघटना उभी केली तरच भांडवलशाही व साम्यवाद या दोन्ही प्रणालींचा निर्णायक पराभव करता येईल, अशी दोघांची धारणा होती. म्हणून दीनदयाळजींना कामगार-संघटना राजकीय प्रभाव व संधिसाधूपणा यांतून मुक्त करण्याची गरज आहे असे वाटे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय स्तरावर एखादी कामगार-संघटना तातडीने स्थापन केली पाहिजे असे दीनदयाळजींचे मत होते. अशा संघटनेची मार्गदर्शक सूत्रे त्यांनी श्री. ठेंगडींबरोबर चर्चा करून निश्चित केली. ती सूत्रे पुढीलप्रमाणे :

१. संकल्पित कामगार-संघटनेने वर्ग-संकल्पनेच्यावर उठून राष्ट्रीय विचार केला पाहिजे.

२. कामगार-चळवळीला भांडवलशाही व हुकूमशाही या अभारतीय तत्त्वांपासून मुक्त करून व्यक्ती व समाज यांमधील पारंपरिक एकात्म-भावनेची प्रतिष्ठापना केली पाहिजे.

३. कामगार-चळवळीतील कार्यकर्त्यांना भावात्मक नेतृत्व देणे व त्याच-बरोबर कामगार-चळवळीचे मूलभूत हक्क टिकतील अशी दक्षता घेणे. उदा. – कामगार-संघटना उभी करण्याचा हक्क असणे, जगण्याकरिता किमान वेतन असणे व वाढत्या महागाईच्या प्रमाणात ते वाढणे, नोकरीतील सुरक्षितता,

कामाचा हक्क, व्यवस्थापनात आणि फायद्यामध्ये कामगारांचा सहभाग व सर्व उपाय थकल्यानंतरच अखेरचे अस्त्र म्हणून संप करण्याचा हक्क.

४. कामगारांच्या मनामध्ये सेवाभाव, ऐक्य व त्यागाची भावना निर्माण करणे. त्यांच्यामध्ये देशाबद्दल व उद्योगाबद्दल जबाबदारीचा भाव निर्माण करणे.

५. कोणत्याही राजकीय प्रभावापासून मुक्त राहून सर्व कामगार-संघटनांना बरोबर घेऊन त्यांचे राष्ट्रीय महासंघटन उभे करणे.

(मनहर मेहता यांचा लेख – विवेक – दि. २४ जुलै १९८३)

महिला-आघाडीचे कार्य

महिलांसाठीही वेगळे कार्य सुरू करावे, या कल्पनेने जनसंघाने आपली महिला-आघाडी सुरू केली. राजकारणात पुरुषांप्रमाणेच महिलांनाही महत्त्व दिले पाहिजे, देशाच्या उभारणीत त्यांचाही हातभार लागला पाहिजे, असे दीनदयाळजींना सतत वाटे. कुटुंबासाठी कुटुंबप्रमुखाच्या बरोबरीने कष्ट करण्याची भारतीय स्त्रीची परंपरा आहे. राजकीय क्षेत्रात कार्य करणाऱ्यांनी जर महिलांचा, त्यांच्या समस्यांचा, त्यांच्या शक्तीचा विचार केला नाही तर समाजाच्या निम्म्या विभागाकडे दुर्लक्ष केल्यासारखे होईल. असे दुर्लक्ष करून नवभारताची उभारणी कदापि होऊ शकणार नाही असे त्यांचे ठाम मत होते. त्यामुळे त्यांनी जनसंघाची महिला-आघाडी स्थापन करण्याच्या कामी विशेष लक्ष घातले. जनसंघाच्या केवळ रचनात्मक कार्यक्रमातच नव्हे, तर आंदोलनात्मक कार्यक्रमातही या महिला-आघाडीचा सहभाग फार मोठा आहे.

प्रसिद्धी व प्रचार

जनसंघाचा भर वैयक्तिक व क्षेत्रशः संबंध वाढवण्यावर होता. काँग्रेसच्या तुफानी प्रचारामुळे जनसंघ जनमनात मूळ धरेल की नाही याची सर्वांना शंका होती. पण निष्ठेने, दीर्घ उद्योगाने व वैयक्तिक संबंधांनी त्याने सर्व देशात आपले जाळे विणले. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या नेतृत्वाने त्याला राजकीय प्रसिद्धी लवकर मिळाली. डॉ. मुखर्जी विनोदाने म्हणत की, "पं. नेहरू हे जनसंघाचे उत्तम प्रचारक आहेत. कारण ते जनसंघावर सतत जाहीर आरोप करीत असतात. त्यामुळे स्वाभाविकच जनसंघाला प्रसिद्धी मिळते." जनसंघाचा प्रसार करणारी 'ऑर्गनायझर 'सारखी काही साप्ताहिके आणि दैनिके होती. तसेच जनसंघाचे सदस्य लोकसभेत आल्यावर श्री. अटलबिहारी वाजपेयी

यांच्यासारख्या प्रभावी वक्त्यामुळे जनसंघाची मते लोकांपुढे येऊ लागली. स्वतः दीनदयाळजी हे आपली राजकीय दैनंदिनी (पोलिटिकल डायरी) ऑर्गनायझर-मध्ये लिहीत. तो एक प्रकारे कार्यकर्त्यांशी व जनतेशी केलेला साप्ताहिक संवाद होता. त्याचाही जनसंघाला विचारप्रसारासाठी व प्रचलित विषयांच्या चर्चेसाठी उपयोग झाला. शोभायात्रा हे जनसंघाचे खास वैशिष्ट्य सांगता येईल. याशिवाय राष्ट्रीय व स्थानिक प्रश्नांवर जी आंदोलने होत त्याचाही प्रसाराला उपयोग होई. प्रतिकूल परिस्थितीतही निवडणुका लढवून १९५२ ते १९६७ या काळात स्वतंत्र विचारप्रणालीचा राजकीय पक्ष म्हणून जनसंघाने नाव कमावले.

पहिल्याच निवडणुकीत जनसंघाला अखिल भारतात ३.१ टक्के मते मिळाल्यामुळे अखिल भारतीय पक्ष म्हणून निवडणूक-मंडळाने मान्यता दिली. नंतरच्या १६ वर्षांत जनसंघाने जी मते निवडणुकीत मिळविली ते त्याच्या राजकीय प्रभावाचे चिन्ह होते असे मानावे लागेल. दीनदयाळजींचा या सर्व प्रसारात फार मोठा वाटा होता. दिल्लीतील राजकीय वर्तुळात जनसंघाच्या राष्ट्रवादी विचारांचा सुप्त प्रभाव होता. केवळ मतांच्या संख्येवर वैचारिक प्रभाव अवलंबून नसतो. विचारातील ताजेपणा, वेगळेपणा व खोली यांनाही महत्त्व असते. राष्ट्रवादी विचारसरणींचा प्रतिनिधी म्हणून जनसंघाने राजकीय प्रतिष्ठा तर मिळविलीच पण भारतीय राजकारणातील स्थिर ध्रुव (स्टेबल पोल) म्हणून तो ओळखला जाऊ लागला. जनसंघाच्या विचार-प्रसाराचे व वैचारिक प्रभावाचे ते उत्तम फळ मानले पाहिजे. पक्षसंघटनेचा आदर्श दीनदयाळजींनी घालून दिला तो केवळ जनसंघाचा नव्हे तर भारतीय राजकारणाचा असे म्हटले पाहिजे. अनुशासित पक्षच अनुशासनबद्ध राष्ट्र निर्माण करू शकतो हेच दीनदयाळजींचे मार्गदर्शक सूत्र होते.

• • •

६

जन-आंदोलने

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वतंत्र भारताचे सरकार व जनता यांचे संबंध एका प्रकारे पालक आणि पाल्य असे होते. फरक एवढाच की पालक निवडणूकीत निवडला जातो. त्याने कसे वागावे याचे नियम राज्य-घटनेत ठरलेले असतात. परंतु सत्ताधारी झाल्यावर सत्ताधिशांचे 'मानस' बदलते, लोभ सुटतो, दुराचाराची प्रवृत्ती वाढते.

अशा वेळी विरोधी पक्षांचा चाबकासारखा उपयोग होतो. दीनदयाळजींची विरोधी पक्षांच्या सरकारविरोधी आंदोलनांसंबंधी स्वतःची अशी निश्चित भूमिका होती.

त्यांचे खरे तर म्हणणे असे होते की सभा, मिरवणुका, निवेदने या गोष्टीच अधिक प्रभावी बनविल्या पाहिजेत. शासनानेही या मार्गाने व्यक्त होणाऱ्या जनभावनांची उपेक्षा करून परिस्थिती निष्कारण अधिकाधिक तंग होऊ देऊ नये. हे दीनदयाळजींचे पहिले सूत्र होते.

दुसरे सूत्र असे की, स्वतंत्र देशात आंदोलनांची गरजच पडू नये. अशी आंदोलने लोकांना करावी लागतात यावरून एवढेच सिद्ध होते की, सरकार अद्यापी लोकशाहीचा किंवा लोकमताचा आदर करावयास शिकलेले नाही. जनसंघाचे आंदोलन हे 'क्रीड' (creed) नाही, पण गरज निर्माण झाली की, नाइलाजाने जनसंघ या शस्त्राचा उपयोग करील.

हिंसाचार व आंदोलन

" जनतेचे मत आणि भावना समजून तदनुसार व्यवहार करण्याऐवजी आंदोलने व प्रजा यांना दडपून टाकण्याचा शासन प्रयत्न करते. ही आंदोलने दडपून टाकणे यातच आपली प्रतिष्ठा आहे, असे शासनाला वाटते आणि मग ते दडपशाही करते. त्यामुळे प्रजेमध्ये सरकारविरुद्ध असंतोष पसरतो. या असंतोषामुळे विरोधी पक्षांचा तात्कालिक लाभ होत असेल, परंतु देशाच्या राजकीय जीवनावर त्याचा खूपच विपरीत व विघातक परिणाम होत असतो. जनतेचा विरोध दडपून टाकण्यासाठी सरकारने दमनचक्र सुरू केले की, लोकही हिंसाचार करू लागतात. हे प्रकार शासनाला शोभास्पद नाहीत. म्हणून शासनाने व सर्व विरोधी पक्षांनी संयुक्तपणे विचार करून जनतेच्या गाऱ्हाण्यांची कशा प्रकारे दाद लागेल, त्यांचे निवारण कसे होईल याचा मार्ग काढला पाहिजे. "
(गुजराती ' साधना ' साप्ताहिक ११ जानेवारी १९५९)

भ्रष्टाचाराविरुद्ध आंदोलन

जनसंघाने स्थानिक राज्य-सरकारांविरुद्ध त्यांतील भ्रष्टाचार व दुःशासन यांचे निर्मूलन करण्यासाठी आंदोलने करावीत असे दीनदयाळजी सांगत असत. केरळमध्ये १९५९ मध्ये तेथील कम्युनिस्ट सरकारविरुद्ध आंदोलन झाले. ते सरकार किती अन्याय करीत आहे ते जनआंदोलन करून सिद्ध करणे आवश्यक होते. अर्थात् काँग्रेसमधील भ्रष्टाचार हा खासगी कारणासाठी असतो तर कम्युनिस्टांचा भ्रष्टाचार हा संघटित पक्षीय असतो; त्यांचा हेतू देशात पक्षीय हुकूमशाही आणण्याचा असतो, असे दीनदयाळजींचे मत होते. (ऑर्गनायझरला दिलेली मुलाखत – १५ ऑगस्ट १९५९.) दीनदयाळजींनी दिल्लीच्या एका सत्कार-समारंभात याविषयी बोलताना म्हटले होते, " भ्रष्टाचारी व जनताविरोधी शासनकर्त्यांविरुद्ध आंदोलन करणे हा जनतेचा मूलभूत अधिकार आहे. "
" उत्तर प्रदेशात तेथील दुष्काळग्रस्त जनतेच्या चार प्रमुख मागण्यांसाठी जनसंघाने सत्याग्रह केला होता. दुष्काळी भागातील सारावसुली बंद करावी, दर पाच हजार वस्तीसाठी स्वस्त धान्याचे दुकान असावे, दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना फी माफ करावी व जे सर्वस्वी असहाय्य आहेत त्यांना मोफत अन्नधान्य द्यावे, या त्या चार मागण्या होत्या. या आंदोलनाच्या निमित्ताने दीनदयाळजींनी इतर पक्षांचे आंदोलन आणि जनसंघाची आंदोलने यांतील फरक स्पष्ट करताना सांगितले, " प्रजा समाजवादी पक्षाने सरकारी गुदामे

६

जन-आंदोलने

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वतंत्र भारताचे सरकार व जनता यांचे संबंध एका प्रकारे पालक आणि पाल्य असे होते. फरक एवढाच की पालक निवडणुकीत निवडला जातो. त्याने कसे वागावे याचे नियम राज्य-घटनेत ठरलेले असतात. परंतु सत्ताधारी झाल्यावर सत्ताधिशांचे 'मानस' बदलते, लोभ सुटतो, दुराचाराची प्रवृत्ती वाढते.

अशा वेळी विरोधी पक्षांचा चाबकासारखा उपयोग होतो. दीनदयाळजींची विरोधी पक्षांच्या सरकारविरोधी आंदोलनांसंबंधी स्वतःची अशी निश्चित भूमिका होती.

त्यांचे खरे तर म्हणणे असे होते की सभा, मिरवणुका, निवेदने या गोष्टीच अधिक प्रभावी बनविल्या पाहिजेत. शासनानेही या मार्गाने व्यक्त होणाऱ्या जनभावनांची उपेक्षा करून परिस्थिती निष्कारण अधिकाधिक तंग होऊ देऊ नये. हे दीनदयाळजींचे पहिले सूत्र होते.

दुसरे सूत्र असे की, स्वतंत्र देशात आंदोलनांची गरजच पडू नये. अशी आंदोलने लोकांना करावी लागतात यावरून एवढेच सिद्ध होते की, सरकार अद्यापी लोकशाहीचा किंवा लोकमताचा आदर करावयास शिकलेले नाही. जनसंघाचे आंदोलन हे 'क्रीड' (creed) नाही, पण गरज निर्माण झाली की, नाइलाजाने जनसंघ या शस्त्राचा उपयोग करील.

हिंसाचार व आंदोलन

" जनतेचे मत आणि भावना समजून तदनुसार व्यवहार करण्याऐवजी आंदोलने व प्रजा यांना दडपून टाकण्याचा शासन प्रयत्न करते. ही आंदोलने दडपून टाकणे यातच आपली प्रतिष्ठा आहे, असे शासनाला वाटते आणि मग ते दडपशाही करते. त्यामुळे प्रजेमध्ये सरकारविरुद्ध असंतोष पसरतो. या असंतोषामुळे विरोधी पक्षांचा तात्कालिक लाभ होत असेल, परंतु देशाच्या राजकीय जीवनावर त्याचा खूपच विपरीत व विघातक परिणाम होत असतो. जनतेचा विरोध दडपून टाकण्यासाठी सरकारने दमनचक्र सुरू केले की, लोकही हिंसाचार करू लागतात. हे प्रकार शासनाला शोभास्पद नाहीत. म्हणून शासनाने व सर्व विरोधी पक्षांनी संयुक्तपणे विचार करून जनतेच्या गाऱ्हाण्यांची कशा प्रकारे दाद लागेल, त्यांचे निवारण कसे होईल याचा मार्ग काढला पाहिजे." (गुजराती 'साधना' साप्ताहिक ११ जानेवारी १९५९)

भ्रष्टाचाराविरुद्ध आंदोलन

जनसंघाने स्थानिक राज्य-सरकारांविरुद्ध त्यांतील भ्रष्टाचार व दुःशासन यांचे निर्मूलन करण्यासाठी आंदोलने करावीत असे दीनदयाळजी सांगत असत. केरळमध्ये १९५९ मध्ये तेथील कम्युनिस्ट सरकारविरुद्ध आंदोलन झाले. ते सरकार किती अन्याय करीत आहे ते जनआंदोलन करून सिद्ध करणे आवश्यक होते. अर्थात् काँग्रेसमधील भ्रष्टाचार हा खासगी कारणासाठी असतो तर कम्युनिस्टांचा भ्रष्टाचार हा संघटित पक्षीय असतो; त्यांचा हेतू देशात पक्षीय हुकूमशाही आणण्याचा असतो, असे दीनदयाळजींचे मत होते. (ऑर्गनायझरला दिलेली मुलाखत – १५ ऑगस्ट १९५९.) दीनदयाळजींनी दिल्लीच्या एका सत्कार-समारंभात याविषयी बोलताना म्हटले होते, " भ्रष्टाचारी व जनता-विरोधी शासनकर्त्यांविरुद्ध आंदोलन करणे हा जनतेचा मूलभूत अधिकार आहे." " उत्तर प्रदेशात तेथील दुष्काळग्रस्त जनतेच्या चार प्रमुख मागण्यांसाठी जनसंघाने सत्याग्रह केला होता. दुष्काळी भागातील सारावसुली बंद करावी, दर पाच हजार वस्तीसाठी स्वस्त धान्याचे दुकान असावे, दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना फी माफ करावी व जे सर्वस्वी असहाय्य आहेत त्यांना मोफत अन्नधान्य द्यावे, या त्या चार मागण्या होत्या. या आंदोलनाच्या निमित्ताने दीनदयाळजींनी इतर पक्षांचे आंदोलन आणि जनसंघाची आंदोलने यांतील फरक स्पष्ट करताना सांगितले, " प्रजा समाजवादी पक्षाने सरकारी गुदामे

काबीज करण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. परंतु अशा कार्यक्रमांमुळे राज्यात अराजकता पसरण्याचा पुरेपूर संभव आहे. त्यामुळे जनसंघाने 'घेरा डालो' हा कार्यक्रम हाती घेतला आहे. सरकारी कचेऱ्यांना घेराव घालणे आणि सरकारी कर्मचाऱ्यांना कार्यालयात जाण्यापासून परावृत्त करणे हे या कार्यक्रमाचे स्वरूप आहे. अन्न-समस्या तातडीने सरकारने सोडवावी हे सरकारच्या लक्षात आणून देणे हा त्या आंदोलनामागचा आमचा हेतू आहे. समांतर सरकार निर्माण करण्याचा नाही." (गुजराती 'साधना' साप्ताहिक २८ सप्टेंबर १९५८.)

राष्ट्रव्यापी आंदोलने

जनसंघाने राष्ट्रीय प्रश्न व स्थानिक प्रश्न अशी दोन प्रकारची आंदोलने केली. दीनदयाळजींचे मत असे की, राष्ट्रीय प्रश्नावरील आंदोलन एकतेची भावना निर्माण करते. सामान्य माणसात राष्ट्रीय प्रश्नाविषयी आस्था निर्माण होते. दुर्दैवाने सरकारच्या धोरणामुळे अशा आंदोलनास संघर्षाचे स्वरूप येते. शासन अशा आंदोलनांना सरकारविरोधी कट समजते. दीनदयाळजी अशा आंदोलनाकडे सर्जनशील क्रांतीचे माध्यम म्हणून पहात असत. मात्र असे आंदोलन हिंसात्मक व दुःसाहसी होऊ नये असे त्यांना वाटे.

काश्मीर-आंदोलन

प्रारंभीच्या काळात म्हणजे पहिल्या पाच वर्षांत जनसंघाने अशी दोन राष्ट्रीय आंदोलने केली. एक काश्मीरमधील शेख अब्दुल्लांच्या भारतविरोधी राजवटीविरुद्ध व दुसरे गोवामुक्तीसाठी. शेख अब्दुल्लांविरुद्ध उभे राहणे हे फार मोठे राजकीय साहस होते. कारण त्यांना नेहरूंचा पाठिंबा होता. शेख अब्दुल्ला त्यामुळे उन्मत्त झाले होते. जनसंघ व जम्मूची प्रजापरिषद या दोघांनी हे राजकीय साहस केले. डॉ. मुखर्जींचे नेतृत्व या आंदोलनाला मिळाल्यामुळे त्याला एक उंची आली व नेहरूंविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य आले. ऑक्टोबर १९५१ मध्ये मुखर्जींनी नेहरूंविरुद्ध काश्मीर-प्रश्नावर प्रखर टीकेस सुरुवात केली होती. दिल्लीत झालेल्या एका सभेत डॉ. मुखर्जी म्हणाले, "पं. नेहरू म्हणतात, मी काश्मीरच्या प्रश्नावर पाकिस्तानशी युद्धसुद्धा करीन. पण सध्या त्यांनी जनसंघाविरुद्ध ते पुकारले आहे. म्हणे काश्मीरसाठी युद्ध करणार. मग नेहरू कशासाठी थांबले आहेत? काश्मीरची एक फूट जमीन जरी गेली तरी ते युद्धाचे कारण होऊ शकेल, असे ते म्हणतात. आता तर काश्मीरचा एक तृतीयांश

भाग हा पाकव्याप्त प्रदेश आहे. नेहरू त्यासाठी काय करीत आहेत ? खरे म्हणजे नेहरूंना काहीही करावयाचे नाही. पाकिस्तान सैनिक-तळ उभारीत आहे तरी नेहरूंनी काय केले ?" ('ऑर्गनायझर' ८ ऑक्टोबर १९५१.) जनसंघाने याआधी देशभर काश्मीरदिन पाळून लोकांपुढे हा प्रश्न मांडला. जनसंघानेच काश्मीरविषयी देशात जागृती केली. जम्मू–काश्मीरमध्ये हजारो लोकांनी सत्याग्रह केला. जनसंघाच्या अनेक कार्यकर्त्यांना अब्दुल्लांनी तुरुंगात पाठविले आणि १४ जणांना गोळ्या घालून ठार केले. (प्रा. मधोक यांचा लेख – 'ऑर्गनायझर' २२ ऑक्टोबर १९५८). डॉ. मुखर्जींना याच लढ्यात मरण आले. जनसंघाची प्राणशक्तीच हरपली असे लोकांना वाटले. पुढे अब्दुल्लांना अटक झाली, यावरून जनसंघाचे आंदोलन न्याय्य होते हेच सिद्ध झाले.

गोवा-मुक्ती-आंदोलन

'एक देश, एक संस्कृती' हा दीनदयाळजींचा आग्रह गोवा-मुक्ती-आंदोलनाच्या वेळीही दिसून आला. १९४७ साली इंग्रजी शासनातून भारत मुक्त झाला, तरी गोमंतकातून पोर्तुगीज गेले नाहीत. गेल्या चार शतकांत गोमंतकावर ख्रिश्चन धर्माचा प्रभाव पडला असला, तरी गोमंतक मूलतः हिंदू संस्कृतीचा उपासक आहे, गोव्याची संस्कृती ही चर्च वा कॅथेड्रलची संस्कृती नसून शांता दुर्गा व मंगेश यांची हिंदू संस्कृती आहे. स्वाभाविकपणेच 'एक देश, एक संस्कृती'चा उपासक या नात्याने जनसंघाच्या कार्यकर्त्यांनीही गोवा-मुक्ती-आंदोलनात हिरीरीने व मोठ्या संख्येने भाग घेतला. सत्याग्रहींच्या एका तुकडीला निरोप देताना " गोवा-मुक्ती आंदोलनाचा कार्यक्रम हा अखंड भारताच्या दिशेने करावयाच्या वाटचालीतलाच एक कार्यक्रम आहे" असे उद्‌गार पं. दीनदयाळजींनी काढले होते, तेही खूपच बोलके आहेत.

सहकारी शेतीला विरोध

जनसंघाच्या केंद्रीय कार्यकारिणीने सहकारी शेती, ग्रामपंचायत जमिनीची मालकी या बाबतीत काँग्रेसने जो ठराव केला होता त्याला विरोध करण्यासाठी एक देशव्यापी प्रचारमोहीम सुरू करण्याचे ठरविले. काँग्रेसचा हा ठराव नागपूरला करण्यात आला होता. हा ठराव किंवा सहकारी शेतीची कल्पना लोकशाहीच्या विरुद्ध आहे असे दीनदयाळजींचे मत होते. सहकारी

शेतीने ग्रामीण जीवनातील सर्व लोकशाही व्यवस्था नष्ट होईल अशी त्यांना भीती वाटत होती. ते असे म्हणत की, "शेती हा कौटुंबिक व्यवसाय आहे. सहकारी तत्त्वाला आमचा विरोध नाही; पण कौटुंबिक शेतीत प्रत्येक लहान मोठा घटक आपल्या कुवतीप्रमाणे काम करतोच. कुटुंबाचा कर्ता मनुष्य हा मतांनी निवडला जात नाही, त्याचा प्रशिक्षण-वर्ग नसतो. आपल्या वाडवडिलांनी घालून दिलेल्या पद्धतीने तो शिकतो. पण सहकारी शेती झाली की नाना प्रकृतींचे लोक एकत्र येतात. समजा त्यांनी शेती केली तरी उत्पन्न वाटून घेण्याचा प्रश्न राहतोच. ते वाटप सारख्या व न्याय्य प्रमाणात कसे करावयाचे हा प्रश्न उरतोच. सहकारी शेतीत नेतृत्वाचाही प्रश्न येतो. सगळ्या शेतकऱ्यांना एकत्र आणणार कोण ? कारण त्यात जमीनदार आणि शेतमजूर हे दोन्ही असणार. या प्रश्नावरील चर्चा चालू असताना केरळमध्ये कम्युनिस्टांनी तेथील सहकारी शेती-संस्थांवर आपल्याला हवे ते नेते वरून लादले. जे आज कम्युनिस्ट केरळमध्ये करीत आहेत ते काँग्रेसवाले इतरत्र करतील ही खरी भीती आहे. नेहरूंना सहकारी शेतीच्या योजना अंमलात आणण्याची इतकी घाई झाली आहे की या तपशीलाचा ते विचारच करीत नाहीत. शेतकऱ्यांचे हक्क, नेतृत्वाचा प्रश्न इत्यादी गोष्टी अनिर्णित ठेवून हा प्रयोग करणार कसा ?" असा दीनदयाळजींचा सवाल होता. असाच प्रश्न सिंचनासंबंधी निर्माण होईल. जमीनसुधारणेसाठी व सिंचनासाठी दीनदयाळजींनी पुढील व्यवहारिक सूचना केल्या होत्या.

१. भविष्यकाळात जमिनीपासून होणाऱ्या प्राप्तीची कमाल मर्यादा ठरविली पाहिजे. २. जमिनीचे सिंचन शेतकरी स्वतः करतील. फक्त त्यांना सवलतीने पैसे फेडण्याची मुभा दिली पाहिजे. ३. ज्यांच्याजवळ जास्त जमीन आहे त्यांनी ती तीन वर्षांत विकली पाहिजे असे बंधन घालावे. जमीन खरीदणाऱ्या शेतकऱ्याला सहकारी किंवा इतर बँकांकडून कर्ज मिळावे. जमिनीची किंमत दोन हप्त्यांत देण्याची सोय असली पाहिजे. ४. संपूर्ण गावाचे पूर्ण नियोजन करावे व जमिनीची तुकडेबंदी करावी. ५. कर्ज, विक्री आदी बाबतींत व्यवहार करण्यासाठी समिती असावी.

शेतकऱ्यांच्या या महत्त्वाच्या प्रश्नांवर उत्तर प्रदेशात गावोगावी हिंडून जनसंघ कार्यकर्त्यांनी ही भूमिका मांडली. जनसंघाने आर्थिक प्रश्नावर केलेले हे अत्यंत महत्त्वाचे आंदोलन होते. या आंदोलनामुळे अनेक जातींशी जनसंघाचा

संबंध आला. त्याचा सुपरिणाम पुढच्या निवडणुकीत दिसून आला. जनसंघाच्या मागे शेतकरीवर्ग मोठ्या प्रमाणात उभा राहिला. हा नुसताच जनसंपर्काचा कार्यक्रम नव्हता, तर जनसंघाची दृष्टी बदलवणारा व त्याला आर्थिक बाजू देणारा हा क्रांतिकारक कार्यक्रम ठरला. दीनदयाळजींच्या आग्रहामुळेच हे परिवर्तन घडले.

महागाईविरुद्ध आंदोलन

जनसंघाने ऑगस्ट १९५८ मध्ये महागाईविरुद्ध देशव्यापी आंदोलन केले. या वेळी जनसंघाच्या श्री. अटल बिहारी वाजपेयी व श्री. दत्तोपंत ठेंगडी आदी खासदारांनी एक निवेदन देऊन सरकारला इशारा दिला की, किंमती खाली आल्या नाहीत तर सरकार खाली येईल. असेच आंदोलन मुंबई, नागपूर, लखनौ, भोपाळ, इंदूर, कानपूर, अंबाला, जोधपूर, कलकत्ता, भागलपूर इत्यादी सर्व शहरांत झाले. या आंदोलनात स्थानिक जनसंघ नेत्यांची व आमदारांची शिष्टमंडळे सरकारी अधिकाऱ्यांना भेटली आणि त्यांनी हा प्रश्न किती गंभीर आहे हे सांगितले. "कालचा दिवस काँग्रेसचा होता, उद्याचा दिवस जनसंघाचा असेल" हे या सर्व आंदोलनाचे सूत्र होते. आर्थिक प्रश्नावर जनसंघाने केलेले हे दुसरे राष्ट्रव्यापी आंदोलन होते.

जमीन-मालकी

शेतजमीनीची मालकी व कुळांचे अधिकार हे भारतीय शेतीचे जुने अनिर्णित प्रश्न आहेत. राजकीय पक्षनेता व अर्थशास्त्राचे अभ्यासक म्हणून दीनदयाळजींची एक भूमिका होती. त्यांनी ऑक्टोबर १९५८ च्या ऑर्गनायझर-मध्ये जनसंघाचे महामंत्री या नात्याने लेख लिहून ती मांडली होती. काँग्रेस-सरकारने जमीनविषयक कायदे करूनही अंतर्गत विरोधामुळे जमीनमालकीच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यात फारशी प्रगती झाली नव्हती. जनसंघ हा जमीन-दारांचे वर्चस्व असलेला पक्ष आहे असा काँग्रेसवाल्यांनी प्रचार केला असल्यामुळे जनसंघाची या प्रश्नाविषयी नीती स्पष्ट करून सांगणे आवश्यक होते. वार्ताहर-परिषदा घेऊन किंवा भाषणांतून या प्रश्नाची चर्चा दीनदयाळजी करीत असत. त्यांत दोन मुद्दे ते स्पष्ट करीत. एक म्हणजे कसणाऱ्यांचीच जमिनीवर मालकी असली पाहिजे व दुसरा जमिनीपासून होणाऱ्या उत्पन्नाची मर्यादा प्रतिवर्षी १० हजार रुपये ठरवून त्यानुसार जमिनीचे कमाल धारणाक्षेत्र ठरविले

पाहिजे. या सुधारणा करताना शेतकी-अर्थव्यवस्था ढासळणार नाही अशी काळजी घेतली पाहिजे. जमीनसुधारणेची हाकाटीच जास्त चालू असते. जनसंघाचे असे मत आहे की ५ एकर सिंचित जमीन ही कमाल मर्यादा ठरवावी. जनसंघाचा सहकारी शेतीस का विरोध होता याची चर्चा याआधी केलीच आहे.

अमेरिकन गहू नको

अन्न-स्वावलंबनाच्या व राजकीय स्वातंत्र्याच्या दृष्टिकोनातून पी. एल्. –४८० या नावाने ओळखला जाणारा करार करण्यास जनसंघाने विरोध केला. दीनदयाळजींचाच यासंबंधी आग्रह होता. कारण त्यांचे मत असे होते की, "अमेरिका या कराराचा उपयोग भारतावर पाकिस्तानच्या बाजूने काश्मीरविषयी दडपण आणण्यासाठी करीत आहे. अर्थात् अमेरिका गहू देते ती त्यांच्या अर्थकारणासाठीच. कारण अमेरिकेत अर्थकारणाला प्राधान्य आहे. या कराराने राजकीय हेतू व आर्थिक फायदा दोन्ही साध्य होतात. पण भारताने स्वतःचे राजकीय स्वातंत्र्य आणि अन्न-स्वावलंबन या दोन्ही दृष्टींनी अमेरिकन गव्हाच्या आयातीवर बहिष्कार घालण्याची वेळ आलेली आहे."

जनसंघाचे विराट रूप

जनसंघाने स्थापनेपासून लोकसंपर्क, लोकप्रबोधन, लोकसंघर्ष यासाठी जी राष्ट्रीय व स्थानिक प्रश्नांवर जनआंदोलने केली त्यात राजकीय व राष्ट्रीय दृष्टया अत्यंत परिणामकारक व जनसंघाची सर्व पक्षवैशिष्ट्ये जनतेला व भारत सरकारला दाखविणारे निदर्शन 'कच्छ-मोर्चा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मोर्चाने दिल्लीत १६ ऑगस्ट १९६५ रोजी संसदेसमोर झाले. "भारतीय जनतेचे हे विराट रूप आहे." असे अटल बिहारी वाजपेयींनी त्याचे यथार्थ वर्णन केले होते. या मोर्चासाठी सर्व भारतातून ५ लाखांपेक्षा अधिक (बी. बी. सी. चा आकडा) लोक दिल्लीत आले. दीनदयाळजींनी या मोर्चात भाषण करताना असे सांगितले की सरकारांनी या मोर्चात सहभागी होण्यास येऊ इच्छिणाऱ्या लोकांच्या मार्गात अडथळे आणले नसते तर यापेक्षा कितीतरी जास्त संख्येने निदर्शक आले असते. सहा मैल अंतर चालून दिल्लीतील लाल किल्ल्यापासून संसद मार्गावर असलेल्या सरदार पटेल चौकापर्यंत अत्यंत शिस्तबद्ध रीतीने जनसंघाने शांततामय निदर्शनाचा आदर्श लोकांपुढे ठेवला. त्याचा जनमनावर इतका प्रभाव पडला की, काँग्रेसचा सतत पुरस्कार करणाऱ्या

दिल्लीच्या 'हिंदुस्तान टाइम्स' ने दि. १९ ऑगस्ट १९६५ च्या संपादकीय लेखात म्हटले, "सर्व निदर्शने इतकी सुव्यवस्थित व शिस्तीने झाली की, कोणताही अनुचित प्रकार घडण्यास वावच राहणार नाही. काँग्रेसने जनसंघापासून याबाबत शिकण्यासारखे आहे. बेशिस्त निदर्शनापासून फक्त गुंडांचा फायदा होतो व जनतेला त्यासाठी नुकसान सोसावे लागते." 'टाइम्स ऑफ इंडिया' (दिल्ली) ने म्हटले होते. "गेल्या सोमवारी भगवा रंग हाच दिल्लीचा रंग झाला होता." याउलट विख्यात व्यंगचित्रकार शंकर यांच्या इंग्रजी साप्ताहिकाने म्हटले होते, "या मोर्चाची योग्य कल्पना देणारा वृत्तांत वृत्तपत्रांनी दिलाच नाहीं."– संसदेमध्ये अनेक सदस्यांनी – संयुक्त समाजवादी पक्ष, रिपब्लिकन पक्ष व निःपक्ष सभासद यांनी जनसंघाच्या या प्रचंड मोर्चाचा उल्लेख करून 'कच्छ-करार रद्द करा' अशी मागणी केली. कच्छपासून कामरूपपर्यंत, काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंतचे निदर्शक या मोर्चासाठी आले होते. महिलाही फार मोठ्या प्रमाणावर आल्या होत्या.

दीनदयाळजींनी मोर्चाच्या वेळी झालेल्या विराट सभेत केलेल्या भाषणात हेही स्पष्ट केले की, 'केवळ कच्छ-करार रद्द करा' ही मागणी करण्यासाठी हा जनसमुदाय येथे जमलेला नाही, तर सरकारने उद्या आक्रमणाविरुद्ध युद्ध सुरू केले तर आमचे पूर्ण सहकार्य राहील असे आश्वासन देण्यासाठी हा प्रचंड जनसमुदाय येथे जमला आहे. या मोर्चाच्या वेळीच दुसरी एक आनंदाची बातमी प्रसृत झाली, ती म्हणजे भारतीय सैन्यास 'आगे बढो' चा आदेश भारत सरकारने दिला असून काश्मीरमधील टिटवाल क्षेत्रातील पाकिस्तानची तीन नाकी भारतीय सैन्याने जिंकली आहेत. काश्मीर व कच्छमधील पाकिस्तानी सैनिकी हालचालींचा भारतीय जनमनावर किती खोल व प्रक्षोभक परिणाम होत होता व भारत सरकारकडून आता कणखर व लढाऊ धोरणाची जनता अपेक्षा करीत असे हे जनसंघाने या मोर्चाने स्पष्ट केले. जनसंघाच्या राष्ट्रवादी भूमिकेला मिळालेला हा जनतेचा प्रतिसाद होता.

कच्छसाठी झालेल्या मोर्चाच्या पुढचा भाग म्हणून एप्रिल १९६८ मध्ये जनसंघाने तेथे सत्याग्रह सुरू केला. त्या सत्याग्रहालाही प्रचंड प्रतिसाद मिळाला. हजारो सत्याग्रहींनी त्यात भाग घेतला. सरकारने अर्थात् तो दडपण्याचा प्रयत्न केला. गांधीजींच्या दांडीमोर्चाची आठवण करून देणारा ५ हजार लोकांचा हा मोर्चा होता. जनसंघाने केलेल्या जागृतीचा तो परिणाम होता, नव्या

राजकीय जागृतीचे ते चिन्ह होते.

आंदोलने : एक समीक्षा

दीनदयाळजींनी १९५१ पासून जनसंघाची संघटना बांधण्याचा जो भगीरथ प्रयत्न केला त्याचे यश त्यांनी १९६६ मध्ये सादर केलेल्या वार्षिक अहवालात मिळते. १९६६ मध्ये देशांतील ३५० जिल्ह्यांपैकी २६८ जिल्ह्यांत जनसंघाच्या शाखा होत्या. जनसंघाचे स्थायी सभासद एका वर्षात गतवर्षीच्या दुप्पट झाले. त्या वेळी ही संख्या १३ लाख होती. या सभासद-संख्येच्या वाढीबरोबरच ज्या नागरी निवडणुका झाल्या त्यांतही जनसंघाला वाढते यश मिळत गेले. उदाहरणार्थ, बंगालमध्ये १३ ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जनसंघ निवडून आला. भारत-पाकिस्तान-युद्धामध्ये जनसंघाने सहकार्याचा हात दिला होता. सरकारच्या युद्ध-प्रयत्नांत मदतीसाठी जनसंघ अग्रेसर होता. पंजाब, जम्मू आदि ठिकाणी जवानांच्यासाठी जनसंघाने अनेक उपहारगृहे चालवली. तसेच जखमी झालेल्या जवानांसाठी वैद्यकीय मदत पोहोचवण्यासाठी शेकडो स्वयंसेवक काम करीत होते. जनतेमध्ये उत्साह निर्माण व्हावा व तिचे नीतिधैर्य टिकावे म्हणून जनसंघाने सर्व देशात सुमारे ५०,००० मेळावे आयोजिले होते.

प्रभावी राजकीय शक्ती

जनसंघाच्या संघटनकार्याचा व वेळोवेळी केलेल्या आंदोलनांचा परिणाम असा झाला की जनसंघ ही भारताची प्रभावी राजकीय शक्ती होत आहे असे लोकमत वृत्तपत्राद्वारे प्रकट होऊ लागले. उदाहरणार्थ–'टाइम्स ऑफ इंडिया 'ने जनसंघाच्या जालंधर-अधिवेशनासंबंधी पुढील लेख लिहिला होता. "या अधिवेशनात संमत झालेले ठराव हे वस्तुनिष्ठ होते. सर्व प्रश्नांचा आंदोलनात्मक विचार न करता ते राष्ट्रीय प्रश्न आहेत या जाणीवेने नेत्यांनी विचार केला. उदाहरणार्थ, पंजाबच्या पुनर्रचनेसंबंधी झालेल्या ठरावात कटुता नव्हती. उलट सरकारी धोरण अमलात आणण्यासाठी मदत करण्याची बुद्धी होती." कलकत्त्याच्या 'स्टेट्समन 'ने ५ मे १९६६ च्या अंकात लिहिले होते, "जालंधरच्या अधिवेशनात हे स्पष्टपणे दिसून आले की जनसंघ हा आता वयात आला आहे. जनसंघ हा राजकीय दृष्टचा परिपक्व असलेला पक्ष आहे हे निश्चितपणे दिसून येते. इतक्या थोडच्या अनुभवाने जनसंघाची भूमिका इतकी समंजस व समजूतदारपणाची झाली आहे, हेच महत्त्वाचे आहे. जनसंघाने आत्तापर्यंत तीन

निवडणुका लढविल्या. त्यांत त्याला वाढते यश मिळत गेले. या अधिवेशनात ज्या विविध चर्चा झाल्या व ज्या पद्धतीने नेत्यांनी त्या चालविल्या त्यावरून ते परिपक्व होत आहेत हेच दिसून आले. ठरावांत जहाल भाषा वापरण्याचे नेत्यांनी टाळले. यावरून त्यांचा समजूतदारपणा दिसून आला." लखनौच्या 'पायोनियर' दैनिकाने म्हटले होते, "या सर्व अधिवेशनात शिखांना दुखावणारी भाषा मुळीच वापरली गेली नाही."

या सर्व वृत्तपत्रीय अभिप्रायावरून पंधरा वर्षांत स्वतंत्र विचारसरणीचा नव्या नेतृत्वाचा, नव्या आदर्शांचा, नव्या जनसंपर्क-तंत्राचा पक्ष म्हणून जन-संघाने राजकीय प्रतिष्ठा मिळविली होती हेच दिसून येते. दीनदयाळजींचा ठसा या सर्वांवर स्पष्टपणे दिसून येत होता. लोकशाहीत संयम, शिस्त पाळून केलेली जनआंदोलने ही किती परिणामकारक होऊ शकतात हे कच्छ-करारावर दिल्लीत ऑगस्ट १९६५ मध्ये झालेला लक्षावधी निदर्शकांचा मोर्चा व त्यानंतरचा सत्याग्रह यांनी सिद्ध केले.

• • •

७

निवडणुकींच्या आखाड्यात

भारतीय जनसंघाने राजकारणात प्रवेश केला त्या वेळी काँग्रेसचा पर्यायी पक्ष म्हणून प्रवेश केला. दीनदयाळजी अनेक निवडणुकींच्या सभांमध्ये काही काही मूलभूत सिद्धांत मतदारांपुढे मांडत. कार्यकर्त्यांनासुद्धा आपला पक्ष ध्येयवादी पक्ष आहे तेव्हा तुमची निष्ठा ध्येयावर पाहिजे असे सांगत. निवडणुक ही मतदारांपर्यंत आपला ध्येयवाद व कार्यक्रम घेऊन जाण्याची संधी असते. ते एक प्रकारचे राजकीय शिक्षण असते असे दीनदयाळजी सांगत. त्यामुळे निवडणुकीत यश मिळणे आवश्यक असले तरी निवडणुकीत जागा आणि मते या दोघांना महत्त्व आहे असे ते म्हणत असत. महाराष्ट्र प्रदेशच्या बाराव्या अधिवेशनात नाशिक येथे बोलताना दीनदयाळजी म्हणाले होते, " निवडणुकीत जागा आणि मते या दोन्ही गोष्टींना महत्त्व असल्यांमुळे जास्तीत जास्त जागा लढवण्याचा विचारच योग्य आहे. निवडणुकीत अपयश आले तरीसुद्धा मिळालेल्या मतांचा पुढील कामाच्या दृष्टीने उपयोग होत असतो. म्हणून जागा सोडण्याचा विचार योग्य नाही. आपल्या क्षेत्रातील संपूर्ण भाग आपण कामाने व्यापला पाहिजे. तसे न करण्यात धोका आहे. कोणतेही विधानसभा-क्षेत्र असे राहू नये की जेथे पैसा गोळा झाला नाही. तसेच प्रत्येक क्षेत्रात अशा व्यक्ती शोधून काढा की त्या २१ ऑक्टोबर पासून (जनसंघ-स्थापनादिवसापासून) रोज १० पैसे तरी देऊ शकतील. "

दिल्लीच्या निवडणुकीच्या प्रचार-मोहिमेचे ऑक्टोबर १९६१ मध्ये उद्घाटन करताना दीनदयाळजींनी जनसंघाची सैद्धांतिक बाजू लोकांपुढे मांडली

होती. ते म्हणाले, " आजचा खरा संघर्ष राष्ट्रवाद व कम्युनिझम या ध्येय-प्रणालींत आहे. चीनी आक्रमणानंतर कम्युनिस्टांचे अंतरंग उघडे पडले त्यामुळे आता ते वेष बदलून काँग्रेसमध्ये घुसत आहेत. आणि हे काँग्रेसवाले त्यांचे स्वागत करीत आहेत. सध्याची काँग्रेस ही सरदार पटेल किंवा पुरुषोत्तमदास टंडन यांच्या वेळेची काँग्रेस नव्हे. सध्याची काँग्रेस मेनन व मालवीय यांची आहे. राष्ट्रवाद व लोकशाही जिवंत रहावी असे वाटत असेल तर काँग्रेस व कम्युनिस्ट यांच्याविरुद्ध उभे राहिले पाहिजे. म्हणूनच सर्व देशभक्तांना जनसंघ आवाहन करीत आहे. जनतेने या संघर्षाचे स्वरूप समजून घेतले पाहिजे. काँग्रेसला सत्ताभ्रष्ट करावयाचे असेल तर व्यापक पायावर दुसरी संघटना उभी केली पाहिजे. केवळ तात्कालिक फायद्यासाठी निवडणुकीत समझोते केल्यामुळे काँग्रेसचा अधःपात झाला आहे. काँग्रेसचा पराभव करावयाचा असेल तर तो कार्यक्रम आणि सिद्धांत यांच्या आधारावरच झाला पाहिजे. म्हणून जनसंघाने मतदारांकडे या दोन गोष्टी घेऊन जाण्याचे ठरवले आणि सर्व संधिसाधू तड-जोडी आणि संयुक्त आघाड्या यांचा मोह टाळला. ज्यांना आपले खरे स्वरूप लपवावयाचे असेल त्यांना संयुक्त आघाडी उपयोगी पडते. आम्हाला ही नीती योग्य व फायदेशीर आहे असे वाटत नाही. जनसंघ हा केवळ सत्तेसाठी लढत नसून सिद्धांतासाठी लढतो. लोकांना या सिद्धांताभोवती, निश्चित धोरणा-भोवती शिस्तबद्ध रीतीने संघटित करण्यातच लोकशाहीचे यश आहे." (ऑर्गनायझर)

काँग्रेसच्या सत्तेच्या मक्तेदारीस आव्हान

काँग्रेसने देशात अनिर्बंध सत्ता भोगल्यामुळे त्यांच्यात सत्तेच्या मक्ते-दारीची भावना निर्माण झाली होती. या मक्तेदारीला केरळमध्ये कम्युनिस्टांनी व दिल्लीत जनसंघाने आव्हान दिले व ती तोडली. केरळमध्ये कम्युनिस्ट सरकार आले आणि दिल्लीतही काँग्रेसचा पराभव झाला. दिल्ली महापालिकेच्या निवडणुकीपासून (मार्च १९५८) काँग्रेसच्या पराभवास सुरुवात झाली. जनसंघाने त्या वर्षी महापालिकेच्या ८० जागांपैकी काँग्रेसच्या खालोखाल म्हणजे २५ जागा मिळविल्या. या निवडणुकीची प्रचारमोहीम सुरू करताना श्री. अटल बिहारी वाजपेयी म्हणाले, " निवडणुकीत पराभव हीच भाषा राज्य करणाऱ्यांना समजते. देशात किती असंतोष आहे हे जर काँग्रेसला दाखवावयाचे असेल तर तिचा पराभवच केला पाहिजे. " दिल्ली महानगर-

पालिकेच्या या निवडणुकीमुळे जनसंघाची दिल्लीवर पकड बसली, त्यामुळे आपोआप अनेक आरोपांना उत्तर मिळाले. पहिली गोष्ट अशी की, मुसलमानांची मते काँग्रेसलाच मिळतात असा एक समज होता. पण या निवडणुकीत काही मतदार-संघात जनसंघाच्या उमेदवारांना मुसलमानांची मते मिळाली. हीच गोष्ट शिखांच्या मतांची. काही शिखांची मतेही मिळाली. तसेच जनसंघाने राखीव जागांसाठी ७ उमेदवार उभे केले होते, त्यांपैकी तीन यशस्वी झाले. याचा अर्थ असा की काँग्रेसची मक्तेदारी ज्या समाजगटात होती तिथेही जनसंघाचा शिरकाव झाला. जनसंघाचे जे २५ उमेदवार यशस्वी झाले त्यांपैकी बहुतेक सर्व कार्यकर्ते होते. या निवडणुकीत जनसंघाच्या कार्यकर्त्यांचे संघटन-कौशल्य व प्रचार-कौशल्य कसोटीला उतरले. या निवडणुकीनंतर जनसंघाची जी अभिनंदन-सभा झाली त्यात भाषण करताना दीनदयाळजी म्हणाले, "भारतात इंग्लंड किंवा अमेरिकेसारखी द्विपक्षीय पद्धती उपयोगी पडणार नाही तर स्वतःची बहुपक्षीय पद्धती तयार करावी लागेल. तसेच पक्षांतर होऊ नये म्हणून काहीतरी नियम करावे लागतील." दिल्लीतील वृत्तपत्रांनी या निवडणुकीवर जे अभिप्राय व्यक्त केले त्यावरून जनसंघ हा नवा राजकीय तारा प्रकाश देण्यासाठी उदयाला आला आहे, हीच भावना व्यक्त होते. उदाहरणार्थ, हिंदुस्तान टाइम्सने आपल्या निवडणूक-वार्तापत्रात म्हटले होते, (२४ मार्च १९५८) " जनसंघाने ज्या पद्धतीने निवडणुक-यंत्रणा उभी केली त्यावरून हेच सिद्ध झाले की, उत्साही तळमळीच्या कार्यकर्त्यांची त्यांना उणीव नाही." एक काँग्रेस कार्यकर्ता म्हणाला, " निवडणुकीच्या दिवशी एखाद्या टोळधाडीसारखे ते तुटून पडले. आणि सतत फिरत होते. या उलट काँग्रेसची स्थिती होती. काँग्रेसचे कार्यकर्ते विभागलेले, संकुचित निष्ठा असलेले व भित्रट होते." यावरून जनसंघाचा निवडणुकीवर कसा परिणाम व्हावयास कशी सुरुवात झाली होती हे दिसून येईल.

दीनदयाळजींच्या कारकीर्दीत चार सार्वत्रिक निवडणुका झाल्या. त्यांपैकी १९५२ ची निवडणुक ही प्रारंभिक होती. त्यात जनसंघाने लोकसभेच्या उमेदवारांना ३.१ टक्के मते मिळवून अखिल भारतीय पक्ष म्हणून मान्यता मिळविली. १९५७, १९६२, १९६७ या तीन निवडणुकांचे वृत्तांत स्वतः दीनदयाळजींनी वार्षिक अधिवेशनात दिले होते. ते वाचल्यावर जनसंघाच्या निवडणुक-धोरणाचे यश व त्याचा झालेला राजकीय परिणाम याची कल्पना

येते. १९६७ मधील निवडणुक-नीती व त्यातील यश यासंबंधी अंबाला-अधिवेशनात सादर केलेल्या अहवालात दीनदयाळजींनी म्हटले होते, "काँग्रेस, प्रजा समाजवादी पक्ष यांनी नेहमीप्रमाणे मुसलमानांच्या मनधरणीचे धोरण ठेवले. जातिवादाचा काँग्रेसने नेहमीप्रमाणे फायदा घेतला. जनसंघाने कुठल्याही अखिल भारतीय पक्षाशी निवडणूक-करार केला नाही. फक्त स्थानिक परिस्थितिनुसार जागा वाटून घेतल्या. जनसंघाने आपल्या निवडणूक-प्रचारात देशाचे संरक्षण व दुसरी पंचवार्षिक योजना यांचाच मुख्यत: समावेश केला. माझा निष्कर्ष असा आहे की, राष्ट्रवाद व लोकशाही यांच्यावरच जनसंघाची श्रद्धा असल्यामुळे एक प्रकारे राजनीतीच्या ध्रुवीकरणाला भारतात सुरुवात झाली आहे. हीच प्रक्रिया आपण जोराने पुढे चालविली पाहिजे. (ऑर्गनायझर, १४ एप्रिल १९५८).

१९६२ च्या निवडणुकीसंबंधी कोटा येथे केंद्रीय कार्यकारिणीस आपला वृत्तांत सादर करताना दीनदयाळजींनी सांगितले की, "आपण पूर्वी ठरल्या-प्रमाणे जनसंघाचे सिद्धांत व कार्यक्रम यांच्या आधारावरच व पक्ष-संघटनेला शक्य असेल तेथेच निवडणुकी लढविल्या. संयुक्त आघाडीत जनसंघ सामील झाला नाही, किंवा निवडणूक-करारही केले नाहीत. फक्त काही जागांची देवाण-घेवाण केली. या वेळी विधानसभेसाठी ११६२ उमेदवार व लोकसभेसाठी १९८ उमेदवार जनसंघाने उभे केले. ओरिसा राज्यात निवडणुकीत प्रथमच भाग घेतला. या निवडणुकीत जनसंघाला विधानसभेमध्ये ५.५५ व लोकसभेत ६.४४ टक्के मते मिळाली. लोकसभेत १४ जागा मिळाल्या. १९५७ मध्ये ४ जागा मिळाल्या होत्या. एक उल्लेखनीय गोष्ट म्हणजे आपल्या कार्यकर्त्यांनी आचारसंहितेचे नियम काटेकोरपणाने पाळले. जनतेला जनसंघाचा कार्यक्रम व सिद्धांत निवडणुकीच्या निमित्ताने समजावून देण्याचे धोरण ठेवले होते. जनसंघावर अनेक आरोप होऊनसुद्धा त्याला उत्तर देण्याचे टाळले. कम्युनिस्ट जनसंघाविरुद्ध काँग्रेसला मदत करतात हे पुन्हा एकदा अनुभवास आले." (२८ मे १९६२) १९६७ हे भारतीय राजकारणातील क्रांतिकारी वर्ष होते. या वर्षी झालेल्या निवडणुकीसंबंधी आधी एक लेख दीनदयाळजींनी लिहिला होता. त्यात म्हटले होते, "काँग्रेसच्या मतांचे प्रमाण २५ टक्क्यांपर्यंत खाली आले व राष्ट्रवादी मत ३५ टक्के झाले तर मला आश्चर्य वाटणार नाही. लोकांना काँग्रेस आवडत नाही आणि ते कम्युनिस्टांनाही मते देत नाहीत. तेव्हा

राष्ट्रवाद्यांनीच राष्ट्रीय पर्याय दिला पाहिजे." फेब्रुवारीच्या निवडणुकीनंतर त्याच्या निकालांचे पृथक्करण करताना दीनदयाळजींनी लिहिले होते, "जनसंघाने विधानसभांच्या २००२ जागा लढवल्या व एकूण मतांपैकी ८·९४ टक्के मते पडली. लोकसभेमध्ये ६·४४ टक्के मते पडली व २४९ जागा लढवल्या. हरलेल्या जागांपैकी १५ जागा सुमारे ५००० मतांच्या फरकाने गमावल्या. या निवडणुकीत जनसंघाला काही नेत्रदीपक विजय मिळाले. पैकी उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, हिमाचल प्रदेश, हरियाणा या राज्यांत तो सर्वांत मोठा पक्ष ठरला. मध्य प्रदेशात ध्रुवीकरण झाले. काँग्रेसला ४०·६६ टक्के मते पडली तर विरोधी पक्षात जनसंघाला सर्वांत जास्त म्हणजे २८·२८ टक्के मते मिळाली. उत्तर-प्रदेशामध्ये जनसंघाच्या आमदारांची संख्या ४९ वरून ९८ वर गेली. तेथे काँग्रेसला ४२५ पैकी २०० जागा मिळाल्या.

क्रमांक दोनचा प्रश्न

" जनसंघाने आपल्या स्थापनेपासून काँग्रेसचा पर्यायी पक्ष होण्याची आकांक्षा धरली होती. निवडणुक-करार, समझोते किंवा विलिनीकरण यांचा अवलंब केल्याविना काँग्रेसला पर्याय देता येणार नाही अशी राजकीय निरीक्षकांची कल्पना होती. पण जनसंघाला मात्र दृढ सिद्धांत, निश्चित कार्यक्रम यांच्या आधारेच पर्यायी पक्ष निर्माण करावयाचा होता, म्हणून पक्ष-बांधणीला तळा-पासून सुरुवात करायला लागली. अशा राजकीय पक्षाला जनतेचा पाठिंबा तर हवाच. पण समर्पित, शिस्तबद्ध कार्यकर्त्यांचे दलही हवे. निवडणुकीतील कराराने तात्पुरते काम भागते, पण ध्येयवादाची स्फूर्ती कार्यकर्त्यांना मिळत नाही. अशी स्फूर्ती असेल तरच सेवा, त्याग व परिश्रम करण्याची कार्यकर्त्यांची तयारी होते. म्हणून जनसंघाने निवडणुकी या केवळ सत्तेसाठी नाहीत तर जनतेच्या राजकीय शिक्षणासाठी आहेत असे सदैव मानले. चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस खिळखिळी झाली आहे आणि जनसंघ हा क्रमांक दोनचा पक्ष झाला आहे." (ऑर्गनायझर)

मतदारांचे शिक्षण

दीनदयाळजींनी निवडणूक ही राजकीय शिक्षणाची संधी असते असेच नेहमी मानले. या दृष्टीने मतदारांना देशाच्या विविध प्रश्नांची माहिती व्हावी म्हणून १९६२ च्या निवडणुकीआधी ' तुमचे मत ' या शीर्षकाची एक लेखमाला ऑर्गनायझरमध्ये लिहिली होती. त्यात देशाची संरक्षण-व्यवस्था, विविध पक्षांच्या

आर्थिक धोरणांचा तुलनात्मक अभ्यास, नियोजनाविषयी व्यवहारी दृष्टिकोन, शेती व शेतकरी इत्यादी विषयांचा परामर्श घेतला होता व जनसंघाचे त्याविषयीचे धोरण स्पष्ट केले होते. उदाहरणार्थ, सैन्याचे आधुनिकीकरण, राष्ट्राचे सैनिकीकरण, यासंबंधी दीनदयाळजींनी म्हटले होते, "संरक्षण-प्रश्नाच्या तीन बाजू आहेत. पहिली सीमा-संरक्षण, दुसरी, शत्रूच्या ताब्यात गेलेल्या प्रदेशांची मुक्ती, तिसरी देशाची संरक्षण-व्यवस्था अधिक बळकट करणे व सैनिकांचे प्रश्न सोडवणे." जनसंघाखेरीज इतर कोणत्याही पक्षाने सीमा-संरक्षण कसे करावे व शत्रूची घुसखोरी कशी थांबवावी यासंबंधी काही सूचना केलेल्या नव्हत्या.

जनसंघाने सीमासंरक्षणासाठी केंद्राने स्वतंत्र सुरक्षादल स्थापन करावे अशी सूचना एका ठरावात केली होती. यामुळे घूसखोरी व तस्करी यांना पायबंद बसेल असेही त्यात म्हटले होते. शिवाय हेरखात्याचे आधुनिकीकरण करावे म्हणजे परदेशी हेरांवर पाळत ठेवता येईल. पाकिस्तानातून आसाम-काश्मीरमध्ये होणारी घूसखोरी टाळण्यासाठी तातडीची उपाययोजना करणे आवश्यक आहे, इत्यादी सूचना केल्या होत्या.

शत्रुव्याप्त प्रदेश

"पोर्तुगाल, पाकिस्तान, कम्युनिस्ट चीन यांच्या ताब्यात जो भारतीय प्रदेश आहे त्याच्या मुक्तीचे प्रयत्न केले पाहिजेत." इतर पक्षांच्या याविषयीच्या ठरावांची माहिती देताना दीनदयाळजींनी या लेखात म्हटले होते, "काश्मीर-मधील शत्रुव्याप्त प्रदेशाबद्दल स्वतंत्र पक्षाने मौन राखले आहे. प्रजा समाजवादी पक्षाने परराष्ट्रीय धोरणाचा भाग म्हणून त्याचा उल्लेख केला आहे. कम्युनिस्ट पक्षाने शत्रुव्याप्त कश्मीर मुक्त केला पाहिजे असे म्हटले आहे, चीनने बळकाव-लेल्या भारतीय प्रदेशाबद्दल सौम्य भाषा वापरली आहे. काँग्रेसने शत्रुव्याप्त प्रदेश मुक्त केला जाईल अशी फक्त आशा व्यक्त केली आहे. भारतीय जनसंघाचे मत याबाबत अगदी स्पष्ट, निर्णायक व निःसंदिग्ध आहे. पाकिस्तान व चीन या दोघांच्या ताब्यात गेलेला भारतीय प्रदेश मुक्त करण्यात आला पाहिजे अशी त्याची मागणी आहे. भारतीय जनसंघ या मुक्तीसाठी वचनबद्ध आहे."

राष्ट्राचे सैनिकीकरण

"संरक्षण-दलासंबंधी काँग्रेस आणि कम्युनिस्ट यांचे मौन आहे. प्र. स.

पक्ष व जनसंघ यांनी 'राष्ट्रीय संरक्षण-मंडळ' स्थापन करा अशी मागणी केली आहे. आज संरक्षण-सिद्धतेची अत्यंत गरज आहे. म्हणून 'राष्ट्राचे सैनिकीकरण', 'सैन्याचे आधुनिकीकरण' हे आपले ध्येय असले पाहिजे. आक्रमकांना भारतीय प्रदेशातून हाकलले पाहिजे. आपणाला लढाऊ लोकांची गरज आहे, केवळ निषेधकांची नाही. भारताचे प्रादेशिक अखंडत्व राखण्यासाठी कचखाऊ व द्विमनस्क नेतृत्वाचा उपयोग नाही. मातृभूमीसाठी अंतिम त्याग करण्यास तयार असलेले सश्रद्ध व स्वाभिमानी नेतृत्व आता हवे."
(ऑर्गनायझर – २५ डिसेंबर १९६१)

अल्पसंख्याक संकल्पना चूक

दीनदयाळजींनी निवडणुकीत सतत उपस्थित केलेला विषय म्हणजे मुसलमानांच्या मनधरणीचे राजकारण. याविषयी तौलनिक चर्चा करणारा लेख त्यांनी ऑर्गनायझरमध्ये लिहिला होता. (१ जानेवारी १९६१). या लेखात काँग्रेस पक्ष हा जात व जमात यांच्या दृष्टिकोनातूनच निवडणुकीची व्यूहरचना करतो असे सांगून पुढे म्हटले आहे– "काँग्रेस ही बहुसंख्य व अल्पसंख्य या परिभाषेत बोलते. त्यांच्यासाठी वेगवेगळे निकष तयार करून त्याप्रमाणे धोरण ठरविते. उलट जनसंघाची एकराष्ट्रीयत्वावर दृढ श्रद्धा आहे." दीनदयाळजींनी जनसंघाचा दृष्टिकोन स्पष्ट करताना म्हटले आहे, "भारतीय जनसंघ बहुसंख्य व अल्पसंख्य या संकल्पना अमान्य करतो. एकच संस्कृती असलेल्या राष्ट्रीयत्वावर त्याचा विश्वास आहे. धर्माचा आधार असलेल्या इतर संस्कृतींचे अस्तित्व जनसंघ मानीत नाही. एक देश, एक संस्कृती, एक राष्ट्र या सिद्धांताचा जनसंघाने स्वीकार केला आहे. काही ऐतिहासिक कारणांमुळे आपल्या देशातील काही लोक अलग झाले हे खरे, पण तो अलगपणा जोपासणाऱ्या गोष्टी करण्यापेक्षा तो अलगपणा नाहीसा करणारे उपाय करावेत असे जनसंघाचे मत आहे. राष्ट्रीयत्व हे राजकीय देवाणघेवाणीतून निर्माण होत नाही, तर समान निष्ठेतून निर्माण होते, असे जनसंघाला वाटते. कारण राष्ट्र ही चैतन्यमय कल्पना आहे. जनसंघ उपासना व पूजा यांचे स्वातंत्र्य मान्य करतो; पण त्याच्या आधारावर विशेष हक्क मागण्याच्या व देण्याच्या पद्धतीस त्याचा विरोध आहे."

जनसंघाचा आर्थिक मार्ग

प्रत्येक निवडणुकीत जनसंघाने आपला विशिष्ट आर्थिक दृष्टिकोन

मतदारांपुढे मांडला. दीनदयाळजींचे आर्थिक विचारच त्यात बहुतांशाने समाविष्ट होत असत. किंवहुना, १९६२ नंतर आर्थिक विषयांची चर्चा जास्त होऊ लागली. रूढ अर्थाने जनसंघाचा उजव्या पक्षात समावेश होई. दीनदयाळजींना डावे-उजवे असे वर्गीकरणच अमान्य होते. १९६२ च्या निवडणुकीआधी प्रसिद्ध झालेल्या एका लेखात त्यांनी म्हटले होते, " विविध राजकीय पक्षांच्या आर्थिक कार्यक्रमाची उद्दिष्टे सामान्यतः एकसारखीच असतात. फरक असतो तो ती साध्य करण्याच्या मार्गामध्ये. सर्वांनाच सामान्य माणसाचे राहणीमान उंचवावयाचे असते. उत्पन्नांतील व संपत्तीतील विषमता कमी करावयाची असते. समाजवादी पक्षांना राज्यसंस्थेच्या मदतीने ही उद्दिष्टे साध्य करावयाची असतात. बिगर-समाजवाद्यांना माणसाच्या सर्जनशील विधायक कर्तृत्वाला उत्तेजन देऊन पण अर्थशक्तीचे केंद्रीकरण टाळून व सामाजिक गरजा भागवून हे करावयाचे असते.

भारतीय जनसंघ हा समाजवाद किंवा भांडवलशाही यांपैकी कशाचाही स्वीकार करीत नाही. लोकांचे आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी त्याने स्वतंत्र तत्त्वज्ञान निर्माण केलेले नाही. खासगी व सार्वजनिक उद्योगक्षेत्र यांच्यातील पोथीनिष्ठ भेद नष्ट करावा असे त्याचे स्पष्ट मत आहे. आपल्या लोकांच्या गरजा भागतील एवढी उत्पादन-वाढ हवी आहे. तसेच राष्ट्राच्या संरक्षणविषयक गरजाही पुऱ्या केल्या पाहिजेत. ही उत्पादन-वाढ करताना अर्थशक्तीचे केंद्रीकरण टाळावे व आर्थिक विषमता आणखी वाढणार नाही अशा धोरणांची आखणी करावी. विषमतेमुळे गरजेच्या वस्तूंचा बाजार संकुचित होतो. आणि बाजारपेठ मंद झाली की उत्पादन कमी होते. स्वाभाविकच त्यामुळे बेकारी वाढते. सर्वांना काम देणारी योजना केली व वेतन योग्य प्रमाणात दिले तर बाजारपेठेतील माल खपेल. सामाजिक व आर्थिक असमतोलही कमी होईल."

अस्सल भारतीय नियोजन हवे

नियोजनाचा भारतात प्रारंभ झाल्यावर ठराविक पठडीच्या प्रतिक्रिया व्यक्त होऊ लागल्या. पण दीनदयाळजींची टीका नेहमीप्रमाणे विशेष तत्त्वांचा आग्रह धरणारी होती. तीच जनसंघाच्या निवडणूक-जाहीरनाम्यात अंतर्भूत केली होती. नियोजनाची गरज त्यांनी अर्थातच मान्य केली होती. पण भारतीय जनसंघाने, जलद उद्योगीकरणामागे न लागता, पाश्चात्य धर्तीचे उद्योगीकरण न करता भारताचे स्वतःचे तंत्रविज्ञान शोधून काढले पाहिजे असे सुचविले. आपली सांस्कृतिक परंपरा, सामाजिक मूल्ये व आपल्या भौतिक गरजा या सर्व

गोष्टींचा एकत्रित विचार झाला पाहिजे. विदेशी तंत्र जसेच्या तसे स्वीकारण्याने आपले प्रश्न सुटणार नाहीत किंवा स्वावलंबी व स्वयंपूर्ण अर्थ-व्यवस्थाही त्यातून निर्माण होणार नाही. आपल्या उत्पादन-व्यवस्थेचा कुटुंब हा एक घटक मानून तिचे विकेंद्रीकरण करण्याचा जनसंघ प्रयत्न करील. उत्पादन जास्तीत जास्त वाढविण्याचा प्रयत्न तर केला जाईलच, पण त्याचबरोबर न्याय्य वाटप, उत्पन्न व संपत्ती यांचे न्याय्य वितरण यांचीही व्यवस्था केली जाईल असे जनसंघाने सुचविले. भारतीय नियोजन सोव्हिएट धर्तीचे असल्याची जनसंघाची टीका होती. नियोजन-मंडळाची पुनर्रचना करावी व राष्ट्रीय विकास-मंडळ हेही अधिक प्रातिनिधिक असावे या जनसंघाच्या महत्त्वाच्या सूचना होत्या. नियोजनात प्राथमिकता शेतीला दिली जावी म्हणजे देश अन्नदृष्टचा स्वावलंबी होईल व छोटचा उद्योगधंद्यांना कच्चा माल मिळत राहील.

शेती आणि शेतकरी

जनसंघ हा सरंजामशाहीचा पुरस्कर्ता आहे अशी नेहमी टीका होत असे. जनसंघाने आपल्या निवडणूक-जाहीरनाम्याद्वारे त्याला उत्तर दिले होते. १९६२ च्या निवडणुकीआधी लिहिलेल्या एका लेखात (ऑर्गनायझर २९ जानेवारी १९६२) दीनदयाळजींनी या धोरणाचे विश्लेषण केले होते. "जनसंघाने जमीन-सुधारणेचा वास्तव व व्यापक कार्यक्रम सुचविला आहे. जनसंघाला मध्ययुगीन अर्थव्यवस्था पुनरुज्जीवित करावयाची आहे, असा गोबेल्स-तंत्राचा प्रचार चालू आहे. त्याला यामुळे उत्तर मिळेल. घोषणाबाजी न करता जनसंघ हा कार्यक्रम हाती घेईल. सध्याच्या कायद्यात ज्या उणीवा आहेत, त्या दूर करून जनसंघाला शेतकऱ्यालाच जमीनमालक करावयाचे आहे. कुळापासून जमिनी काढून घेण्याचे सर्व प्रकार जनसंघ थांबवील. पण ज्यांच्याजवळ कमाल धारणा-क्षेत्रापेक्षाही कमी जमीन आहे त्यांच्या जमिनींना हात लावणार नाही. जमिनी कुळांना देण्याची मर्यादा ५ एकरांची राहील. विधवा, अपंग, मुक्त सैनिक, धर्मादाय संस्था, पोरकी मुले यांच्या जमिनी या मर्यादेत येणार नाहीत. शेतीचे यांत्रिकीकरण या देशात चालू शकणार नाही. सहकारी शेतीला जनसंघाचा विरोध आहे. सरकारने द्यावयाच्या शेतीविषयक सवलती व मदत सर्व शेतकऱ्यांना भेदभाव न करता दिली जाईल. ५ एकरांची सिंचित जमीन शेतकऱ्याला कुटुंबपोषणासाठी पुरेशी असल्यामुळे सर्व शेतकऱ्यांना इतकी जमीन मिळेल असे नियोजन जनसंघ करील. जमिनीचा सारा कमी झाला पाहिजे असे

जनसंघाला वाटते. पंचायतींना या साऱ्याची रक्कम मिळाली पाहिजे. ग्रामीण जनतेकडून पुरेसे कर वसूल करण्यात येत नाहीत असा गैरसमज व चुकीचा सिद्धांत प्रसूत करण्यात आला आहे. भारतीय जनसंघाला लहान प्रकल्पांवर भर देऊन शेतीचा विकास करावयाचा आहे. म्हणून जनसंघाला मत देणे म्हणजे लहान शेतकरी स्वतंत्र व समृद्ध व्हावा या संकल्पनेस मत देणे आहे." इतक्या स्पष्ट रीतीने दीनदयाळजी शेती व शेतकरी यांविषयींच्या योजना मांडत होते. (ऑर्गनायझर – २९ जानेवारी १९६२).

जनतेला बदल हवा आहे

सारांश, देशात असे वातावरण निर्माण होत होते की, काँग्रेसची सत्तेची मक्तेदारी नष्ट करण्यास जनता उत्सुक झाली आहे असे वाटावे. दीनदयाळजींनी ही भावना १९६२ मध्येच व्यक्त करावयास प्रारंभ केला होता. काँग्रेसला मिळणारी मते ही जातपात, जमातवाद, व्यक्तिमोहिनी, प्रस्थापित राजकीय परंपरा यांमुळे मिळालेली मते असतात. काँग्रेस लोकांना पसंत असते म्हणून लोक तिला मत देत नाहीत, तर इतर पक्ष निवडणूक-तंत्रात व संघटनेत कमी पडतात हे त्याचे कारण आहे असे दीनदयाळजी म्हणत असत. लोकांची समज वाढेल आणि एक काळ असा येईल की काँग्रेस सत्ताच्युत होईल हे भविष्य दीनदयाळजींनी १९६२ च्या निवडणूक-निकालावरून वर्तविले होते.

संयुक्त आघाडीत जनसंघ का नाही ?

जनसंघाच्या निवडणूक-धोरणाचे महत्त्वाचे मार्गदर्शी सूत्र म्हणजे विरोधी पक्षांच्या काँग्रेसविरोधी आघाडीत सामील न होता लोकसभा-विधिमंडळे यांच्या जागांसाठी जुळवणी (अँडजस्टमेंट) करण्याची खटपट करणे. काँग्रेस सत्तेवरून गेली पाहिजे व तिला घालविले पाहिजे हे दीनदयाळजींचेही मत होते; पण काँग्रेसविरोध हे पुनर्रचनेचे आधारतत्त्व होऊ शकणार नाही. काँग्रेसची निरंकुश सत्ता नाहीशी करण्यातली ती एक पायरी आहे. त्यानंतर पुनर्रचनेचे सिद्धांत व मार्ग अलग होतात. सत्तेची पोकळी राहू शकत नाही. म्हणून संयुक्त आघाडी न करता संमिश्र सरकार निर्माण करावे लागते. मतदारांना काँग्रेस नको आहे. पण देशात सरकार असावेच लागते. म्हणून मतदारांच्या नकारात्मक मताची विधायक बाजू म्हणजे बहुपक्षीय सरकारे होत. काँग्रेसला पराभूत करण्यासाठी निवडणुकीत जागांची जुळवणी करावी लागते. लोकांच्या बहुपक्षीय

सरकारबद्दल अपेक्षाही कमी असतात. सुशासनाची किमान तत्त्वे एकपक्षीय किंवा एकतंत्री सरकारइतकीच बहुपक्षीय सरकारला पाळावी लागतात. तसेच काँग्रेसपेक्षा वेगळी तत्त्वदृष्टी ठेवून विकासाचा कार्यक्रम आखून त्यावर विविध पक्षांचे ऐक्य होऊ शकते. त्याची बांधिलकी असू शकते. जनसंघाची हीच भूमिका १९६७ सालच्या निवडणुकीत दीनदयाळजींनी पुन्हा मांडली.

निवडणूक-निकालांचा अन्वयार्थ

" जनसंघ हा सुस्पष्ट तत्त्वज्ञान, खंबीर धोरण व निश्चित कार्यक्रम असलेला त्यागी, समर्पित आणि शिस्तबद्ध कार्यकर्त्यांचा आणि विशेष म्हणजे ध्येयवादाच्या – सत्तेच्या नव्हे – ध्रुवताऱ्याकडे सतत लक्ष असलेला पर्यायी पक्ष म्हणून जगू इच्छितो. जनतेची नेमकी हीच अपेक्षा पूर्ण करण्यासाठी जनसंघाचा जन्म झाला आहे. " ही एक प्रकारे जनसंघाची प्रतिज्ञा होती. निवडणूक हा लोकमताचा आरसा असतो. दीनदयाळजींच्या कारकीर्दीत १९५२, १९५७, १९६२, १९६७ या चार वर्षी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांत जनसंघाची अशी प्रतिमा बनली. वैचारिक व धोरणाच्या दृष्टीने व संघटनात्मक दृष्टचा दीनदयाळजी जनसंघाचे या सर्व काळात मार्गदर्शक व योजक होते. मग वर उल्लेखिलेले जनसंघाचे उद्दिष्ट या काळात कितीसे साध्य झाले ? या चार निवडणुकांत जनसंघ हा ध्येयवादी, लोकहितदक्ष व लोकांच्या वतीने संघर्ष करणारा पक्ष म्हणून किती यशस्वी झाला ? वैचारिक दृष्टचा जनसंघ कोणते सिद्धांत वा संकल्पना भारतीय राजकारणात १९५१–६७ या दीनदयाळजींच्या कार्यकालात रूढ करू शकला, बद्धमूल करू शकला याचा विचार पुढच्या प्रकरणात करावयाचा आहे. परंतु या प्रकरणात राजकीय पक्षाच्या प्रभावाचे गमक म्हणून निवडणुकीत किती यश जनसंघाने मिळविले हे सारांशरूपाने पहावयाचे आहे. उपेक्षा, निंदा, अपप्रचार, विरोध, संघर्ष या सर्व अवस्था यशस्वीपणे ओलांडल्यानंतर सामाजिक वा राजकीय संघटना यशस्वी होत असतात. जनसंघालाही या पाचही अवस्थांतून जावे लागले होते.

१९५२ च्या निवडणुकीत डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींचे नेतृत्व, कर्तृत्व आणि राजकीय प्रतिष्ठा व असंख्य निष्ठावान कार्यकर्त्यांचा निर्धार व प्रयत्न एवढेच जनसंघाचे भांडवल होते. या निवडणुकीतील यशाचे मूल्यमापन थोडक्यात करावयाचे झाल्यास असे म्हणता येईल. या निवडणुकीत ३.१ टक्के अखिल भारतात मते मिळवून एक अखिल भारतीय पक्ष म्हणून जनसंघाने

निवडणूक-मंडळाची मान्यता मिळविली. लोकसभेत ३ जागा व विधिमंडळात ३४ जागा मिळविल्या. राज्यसभेत एक जागा मिळाली. विधिमंडळात जनसंघाला २८, ६६, ५६६ मते व लोकसभा-मतदार-संघात ३२, ४६, २८८ मते मिळाली. या निवडणुकीत सर्व देशात संघटनेचे जाळे पसरविले तर मते मिळतील इतका विश्वास कार्यकर्त्यांत निर्माण झाला. (प्रजासत्ताक विशेषांक १९६२ – ऑर्गनायझर – श्री. जगदीशप्रसाद माथूर केंद्रीय कार्यालय-प्रमुख यांच्या समीक्षात्मक लेखातून).

१९५७ च्या निवडणुकीत जनसंघाला मिळालेल्या मतांचे लोकसभा-मतदार-संघातील प्रमाण ५.९३ झाले व ४ जागा मिळाल्या, विधिमंडळात १९५२ मध्ये ३५ जागा मिळाल्या व या निवडणुकीत ४६ मिळाल्या. मतांचे प्रमाण २.७६ चे ४.०३ झाले.

१९६२ च्या निवडणुकीत लोकसभेत १४ जागा मिळाल्या. १९५७ साली ४ मिळाल्या होत्या व मतांचे प्रमाण ६.२१ पडले. विधिसंडळात १९५७ मध्ये ५१ जागा मिळाल्या होत्या. १९६२ मध्ये ११६ जागा मिळविल्या. मतांचे प्रमाण ४.०३ वरून ६. २१ झाले.

१९६७ मध्ये विधिमंडळात जनसंघाने २६८ जागा मिळविल्या व मतांचे प्रमाण ८.९४ झाले. लोकसभा-मतदारसंघात जनसंघाला ९.३३ टक्के मते मिळाली आणि ३५ जागा मिळाल्या. जनसंघ क्रमांक दोनचा पक्ष ठरला. जनसंघाच्या बाजूचे मतदार मागच्या निवडणुकीपेक्षा दुप्पट झाले. दीनदाळजींनी या निवडणुकीसंबंधीच्या अहवालात तीन महत्त्वाचे निष्कर्ष काढले होते. १. भारतीय जनसंघाची निवडणुकीची व्यूहरचना यशस्वी झाली. २. काँग्रेसची मते कमी झाली व डाव्या पक्षांचा राजकीय प्रभाव कमी झाला. ३. जनसंघाची वाढ दुपटीने झाली.

१९६७ च्या निवडणूक-निकालाबद्दल जनसंघाने आपले समाधान एका ठरावाने व्यक्त केले. त्या ठरावात म्हटले होते, " या निवडणुकीने काँग्रेसची सत्तेची मक्तेदारी नष्ट केली आहे. निवडणुकीच्या निकालातून जनमनात काँग्रेसविषयी किती असंतोष आहे हे सिद्ध झाले आहे. काँग्रेसच्या विघटनामुळे देशात पर्यायी पक्षाची गरज अधिक तीव्रतेने भासू लागली आहे. हा संभव जनसंघाने निवडणुकीआधीच लक्षात घेतला होता. म्हणून विधायक पर्यायाच्या आधारेच जनसंघाने स्वत:च्या बळावर निवडणुकी लढविल्या होत्या. कोणत्याही

आघाडीत तो सामील झाला नाही. जनसंघाची या निवडणुकीत मते व जागा या दोहींच्या संख्येत वाढ झाली आहे. सर्व काँग्रेसेतर पक्षांत जनसंघाला जास्त मते मिळाली आहेत. जनसंघावर जनतेने जो विश्वास प्रकट केला आहे तो लक्षात घेऊन पर्यायी पक्ष म्हणून संघटित होण्याचा व त्यात वाढ करण्याचा जनसंघ निर्धार करीत आहे." सारांश, १९६७ च्या निवडणुकीत जनसंघाने जी प्रगती केली त्यावरून जनसंघाचा जनमनावरील राजकीय प्रभाव निश्चितपणे वाढत होता व पर्यायी पक्ष म्हणून एकाकी निवडणुकी लढविण्याचे दीनदयाळजींचे धोरण यशस्वी होऊ लागले होते हेच सिद्ध होते.

जनसंघ आणि मुसलमान

जनसंघाच्या निवडणुकीतील मतांची अमेरिकन लेखक बॅक्स्टर यांनी जनसंघावरील आपल्या पुस्तकात आणखी दोन दृष्टिकोनांतून पाहाणी केली आहे – एक म्हणजे जनसंघ आणि मुस्लिम मते व दुसरी ग्रामीण व शहरी मते. जनसंघाला मुसलमानांची मते मिळत नसत असा समज होता. याबाबत बॅक्स्टर यांचे म्हणणे असे : जास्त मुस्लिम संख्या असलेले जिल्हे हिंदी भाषिक प्रदेशात नसून बंगाल, आसाममध्ये आहेत. तेथे रा. स्व. संघाचा फारसा प्रसार झालेला नाही हे एक व जनसंघाचे हिंदीला अनुकूल धोरण ही दोन कारणे असू शकतात. उत्तरप्रदेशमध्ये जास्त मुस्लिम संख्या असलेले १० जिल्हे आहेत. तेथे जनसंघाला १९६२ व १९६७ च्या निवडणुकीत जी मते मिळाली आहेत त्याला निश्चित घाट (पॅटर्न) नाही. (जनसंघ–बॅक्स्टर – पृष्ठ २३४–२३५) जनसंघाबद्दल दुसरा ग्रह म्हणजे हा शहरी मते मिळविणारा पक्ष असा होता. १९५७ व १९६२ या वर्षांतील निवडणुकीतील निकालांचा अभ्यास केला असता असा निष्कर्ष निघतो की १९५७ मध्ये जनसंघाने उत्तर प्रदेशात ग्रामीण भागातील विधानसभांच्या जागा लढविल्या. तेथे त्याला १६.६९ टक्के मते मिळाली. १९६२ मध्ये याच राज्यांतील ४३ ग्रामीण जागा लढविल्या व तेथे २२.५९ टक्के मते मिळाली. १९६२ मध्ये जनसंघाने ग्रामीण भागात चांगली मते मिळविली. १९६२ मध्ये जनसंघाला मिळालेल्या मतांत शहरांत ३६ टक्के वाढ झाली तर ग्रामीण भागातील मते ७८ टक्क्यांनी वाढली.

(जनसंघ – बॅक्स्टर पृष्ठ–२३६)

चार निवडणुकींतील प्रगती

भारतीय जनसंघाने जम्मू-काश्मीरखेरीज सर्व राज्यांत चार निवडणुकींत

वाढते यश मिळविले. उदाहरणार्थ, १९६२ साली हरयाणात १४.४४ टक्के मते मिळाली, पंजाबमध्ये ९.३७, हिमाचलमध्ये १५.२१, बिहारमध्ये २.७६ वरून १०.३३ वर पोहोचली तर मध्यप्रदेशात १६.७९ वरून २१.५३ पर्यंत गेली. सारांश, १९६७ च्या निवडणुकीत जनसंघ सर्व अंगांनी वाढला. पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणात मुसलमान, ख्रिस्ती आदी संप्रदायांच्या मतदारांनी जनसंघाला मते दिली. वनवासी क्षेत्रातही जनसंघाचा प्रवेश झाला आहे. मुस्लिम मते ही काँग्रेसची हुकमी मते असत. ही परिस्थिती बदलली.

"पर्यायी पक्ष म्हणून जनसंघ हळूहळू आकार घेत असल्याचा निष्कर्ष जनसंघाच्या प्रतिनिधी-सभेच्या ठरावात काढण्यात आला होता. ध्रुवीकरणाची प्रक्रिया सुरू झाली असून दिल्ली, मध्यप्रदेशात ते पूर्ण झाले आहे. उत्तरप्रदेशात ते अखेरच्या टप्प्यात आहे. हरयाणा, हिमाचल, महाराष्ट्र, जम्मू-काश्मीरात जनसंघ आव्हान स्वीकारण्यास सबळ झाला आहे." (ऑर्गनायझर – ३० एप्रिल १९६७).

सत्तासंक्रमणाच्या दोन पायऱ्या

१९६२ साली दीनदयाळजींनी काँग्रेसच्या पराभवाचे भविष्य वर्तवले, पण १९६७ मध्ये केंद्राखेरीज ८ राज्यांत काँग्रेसचा प्रत्यक्ष पराभव झाला. काँग्रेसची सत्तेची मक्तेदारी नाहीशी करता येते हे त्या वेळी सिद्ध झाले. सत्तेची पोकळी राहणे शक्यच नसते. दीनदयाळजींनी काँग्रेसला सत्ताच्युत केल्यावर सत्तासंक्रमणाच्या दोन अवस्था कल्पिल्या होत्या. एक बहुपक्षीय संमिश्र सरकार व दुसरी विविध विरोधी पक्षांची एकपक्षीय सरकारे.

१९६७ मध्ये सत्तासंक्रमणाची ही पहिली अवस्था देशास पहावयास मिळाली. त्यासंबंधीचे विश्लेषण करताना दीनदयाळजींनी निवडणुकीआधीच जनसंघाच्या जाहीरनाम्यात म्हटले होते, "स्वतंत्र भारताच्या राजकीय इतिहासात नवे पर्व सुरू करण्यास जनता उत्सुक आहे. या जनतेस निवडणुका म्हणजे मोठीच संधी असून आव्हानही आहे. गेली वीस वर्षे काँग्रेस अधिकारावर आहे आणि आता तिने जनतेचा विश्वास गमवला आहे. जनतेचा स्वाभिमान लक्षात घेऊन काँग्रेस सरकारने काहीही केलेले नाही. खरे म्हणजे जनतेच्या खऱ्या सामर्थ्याचा आविष्कारच सरकारला करता आला नाही. जनतेच्या श्रमांचे चीजही या सरकारने केलेले नाही. जनतेच्या आणि जवानांच्या धैर्याचे व

स्वार्थत्यागाचे प्रतिबिंब सरकारी धोरणात पडलेले नाही. देशाचे मूलभूत ऐक्य आणि एकात्मता याकडे सरकारने दुर्लक्ष केले, जनतेच्या भावभावनांची कदर केली नाही. जनतेच्या कल्याणाकडे मुळी लक्षच दिले नाही. सर्वस्पर्शी स्वावलंबन, समृद्धी आणि स्वाभिमान यांनी रसरसलेले जीवन अनुभवण्याऐवजी काँग्रेसच्या राजवटीत देश आर्थिक दिवाळखोरी, राजकीय दास्य आणि राष्ट्रीय अवहेलना यांच्या काठावर उभा राहिला आहे. स्वराज्यातच होणारी स्वदेश, स्वधर्म आणि स्वातंत्र्य यांची ही गळचेपी यापुढे सहन करता येणार नाही. जनता आता काँग्रेसची ही राजवट चालू देणार नाही ती बदललीच पाहिजे. "

संमिश्र मंत्रिमंडळास मान्यता

जनसंघाने संमिश्र सरकारांत भाग घ्यावा अशी शिफारस करताना दीनदयाळजी म्हणतात, " अशीं सरकारे बनवली नाहीत तर सर्वांत मोठा पक्ष म्हणून त्या त्या राज्यात काँग्रेस पक्षाला सरकार बनविण्यासाठी बोलावण्यात येईल. तसे सरकार विधानसभेचा विश्वास प्राप्त करू शकले नाही तर राष्ट्रपती-राजवट येणे अपरिहार्य ठरेल. याचा अर्थ काय होईल ? त्यामुळे ज्या लोकमताने काँग्रेसने पुन्हा राज्यावर येऊ नये असा स्पष्ट आदेश दिला आहे, त्या लोकमताला आपण धुडकावून लावले असा होईल. एवढेच नव्हे तर, आपण आपल्या मताच्या जोरावर सरकार बदलण्याची लोकशाही क्रांती करू शकतो असा जो विश्वास जनतेच्या मनात निर्माण झाला आहे त्यालाच धक्का पोचवण्याचे कृत्य आपण केले असे होईल. ही गोष्ट लोकशाहीच्या विकासाला पोषक ठरणार नाही. ज्यांचा लोकशाहीवर विश्वास नाही अशा लोकांचे मात्र त्यामुळे फावेल." अशी लोक-मताची बूज राखण्यासाठी जनसंघाने निवडणुकीनंतर संमिश्र मंत्रिमंडळे बनवण्याचे प्रस्थान ठेवले. मात्र मंत्रिमंडळात कोठपर्यंत राहावयाचे याचा निर्देश करताना जनसंघाच्या केंद्रीय कार्यकारिणीने आदेश दिला, " जनसंघाचे सिद्धान्त आणि कार्यक्रम यांना धरून जनतेची परिणामकारक सेवा जोपर्यंत करता येईल तोपर्यंत मंत्रिमंडळात राहावे. आणि मंत्रिमंडळात भाग घेत असतानाही जनसंघ संसदीय पक्षाने आपली स्वतंत्र संघटना कायम ठेवून पक्षाच्या घटनेप्रमाणे काम करीत राहावे. "

दिल्ली येथे जनसंघाची अखिल भारतीय प्रतिनिधी-सभेची बैठक एप्रिल महिन्यात झाली. त्या बैठकीत संमिश्र मंत्रिमंडळासंबंधीची आपली भूमिका स्पष्ट करताना दीनदयाळजी म्हणाले, " राज्यांच्या संमिश्र मंत्रिमंडळांत जनसंघ

सामील होईल. परंतु आगामी निवडणुकांमध्ये विरोधी पक्षांबरोबर निवडणूक-समझोता (म्हणजे युती) करणार नाही. "

" गेल्या निवडणुकीत जनसंघाने इतर विरोधी पक्षांबरोबर निवडणूक-समझोता केला असता तर जनसंघाला आज जेवढ्या जागा मिळाल्या आहेत तेवढ्या मिळाल्या नसत्या. त्याचप्रमाणे काही काही मतदारसंघात जनसंघाने उमेदवारीसंबंधी जी देवाणघेवाण केली ती केली नसती तर काँग्रेसला खूप अधिक जागा मिळाल्या असत्या."

" त्याचबरोबर हेही लक्षात ठेवले पाहिजे की विरोधी पक्षांबरोबर संयुक्त मंत्रिमंडळे स्थापन करण्यात जनसंघाने सहकार्य केले नसते (खरे म्हणजे पुढाकार घेतला नसता) तर काँग्रेस सत्तेवर आली असती. जनसंघ आणि साम्यवादी यांच्या ध्येयधोरणांबावत निवडणुकीत जनतेने स्वतंत्रपणे आपला निर्णय दिला असला तरीही निवडणुकीनंतर दोघांनी एकत्र येऊन (एकाच संमिश्र मंत्रिमंडळात येऊन) काम करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे."

अंतिम लक्ष – राष्ट्रीय लोकशाहीचा पर्याय

राष्ट्रवाद व लोकशाही यांच्यावर श्रद्धा असलेल्या भारताच्या सांस्कृतिक मूल्यांना कायम राखून आर्थिक, सामाजिक, राजकीय पुनर्रचना करू इच्छिणारा, सामान्य माणसाला आपले दैवत मानणारा पर्यायी राजकीय पक्ष म्हणून जनसंघ प्रगती करीत होताच. अंतिम ध्रुवीकरण होईपर्यंत इतर समविचारी पक्षांबरोबर संमिश्र मंत्रिमंडळात सहभागी होण्याचा निर्णय घेतला होताच, पण १९६७ साली निवडणूक-जाहीरनाम्याबरोबर जनसंघाने 'राष्ट्रीय लोकशाहीचा पर्याय' जनतेसमोर मांडणारा ठराव केला. काँग्रेसला सत्ताभ्रष्ट करण्याच्या निर्णायक उपायांचा आणि व्यूहरचनेचा, हा ठराव म्हणजे उत्तम नमूना आहे. त्यात निवडणुकीचा आराखडा तयार करताना म्हटले आहे, "काँग्रेसच्या भ्रष्ट शासनाची इतिश्री करण्यास जनता किती उत्सुक आहे हे विचारात घेता आणि काँग्रेस-शासनाची जागा घेईल असा पर्यायी पक्ष असण्यानेच ही शक्यता आहे हे ध्यानात घेता आणि जनसंघाची निवडणुकीची तयारी व संघटनात्मक प्रगतीचा आढावा घेता आम्हास असे वाटते की 'उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, हरयाणा आणि हिमाचल प्रदेश या राज्यांतील सर्व जागा लढवाव्या, अन्य राज्यातील निवडणुका लढवताना ज्या मतदारसंघात गेली पाच वर्षे जनसंघ भरपूर

कार्यरत आहे आणि जेथे तो सत्तारूढ पक्षाला परिणामकारक आव्हान देऊ शकेल असे वाटते त्या मतदार-संघातच निवडणुका लढवाव्यात.

"ज्या राज्यांत अन्य राष्ट्रीय लोकशाही पक्ष सरकार बनवण्याची ईर्ष्या बाळगतील त्या राज्यात जनसंघ त्यांना सहकार्याचा हात देईल. उलट जनसंघ अशी अपेक्षा करतो की ज्या राज्यात जनसंघ सरकार बनवू शकत असेल त्या राज्यात जनसंघाला सरकार बनवण्यास अशा राष्ट्रीय लोकशाही पक्षांनी सहाय्य करावे."

अपरिहार्य टप्पा

१९६७ च्या निवडणुकीनंतर अस्तित्वात आलेल्या संमिश्र सरकारांकडे दोन दृष्टींनी पाहिले पाहिजे. 'एक तर काँग्रेसला सत्ताभ्रष्ट करावयाच्या निर्धारामुळे जनतेने विरोधी पक्षांना मते दिली. म्हणजे एक प्रकारे हे मत नकारात्मकच होते. पण याचा संलग्न भाग म्हणजे काँग्रेसला टाळून समविचारी पक्षांचे सरकार होऊ शकते काय?' तसे शक्य नसेल तर कार्यक्रमबद्ध पण जनमताची बूज राखणारे बहुपक्षीय सरकार हाच व्यवहार्य पर्याय ठरतो. संमिश्र मंत्रिमंडळाबाबत दीनदयाळजींची भूमिका स्पष्ट होती. जनसंघाला सत्ताधिष्ठित करण्यासाठी संमिश्र मंत्रिमंडळे ही एक अपरिहार्य पायरी आहे अशी खूणगाठ त्यांनी मनाशी बांधली होती. अशी संमिश्र मंत्रिमंडळे बनवणे हा लोकमताचा आदर करण्याचा एक शास्त्रपूत मार्ग आहे आणि त्या मार्गाचा अवलंब आपण केला नाही तर जनतेने आपणावर टाकलेल्या विश्वासाचा आपण घात केला असा त्याचा अर्थ होईल. याविषयीही त्यांच्या मनात शंका नव्हती. दुसरे म्हणजे अशी संमिश्र मंत्रिमंडळे बनवून आपण एक मोठेच सत्कार्य, राष्ट्रकार्य करतो आहोत असे समाधान मिळणार होते. कारण आपण संमिश्र मंत्रिमंडळ बनवण्यामुळे सत्ताभ्रष्ट होणारी काँग्रेस सरकारे ही 'भ्रष्टाचारी, जनतेच्या स्वाभिमानाशी प्रतारणा करणारी, जनतेला जीवनही सुखाने उपभोगू न देणारी सर्वथैव जनताविरोधी' सरकारे असल्यामुळे ती नष्ट करणे हेच मुळात मोठे राष्ट्रकार्य होते.

संमिश्र सरकारे ही गोष्ट लोकशाहीत नवीन नाही. एकाच पक्षाचे सरकार असले तरच ते लोकशाहीला मंजूर असते असे नाही. ज्या वेळी एखादा नेता आपणामागे विधानसभेतील सदस्यांचे बहुमत आहे असा दावा करून तशी

यादी राज्यपालांना सादर करतो त्या वेळी ते सदस्य कोठल्या पक्षाचे आहेत हा विचार गौण असतो. किंबहुना त्या गोष्टीचा विचार करण्याचे कारण नसते. म्हणजेच विधानसभेत या नेत्याच्या नवीन 'संसदीय' पक्षाला बहुमत असले म्हणजे त्याला अधिकारावर राहाण्याचा हक्क प्राप्त होतो; आणि असे बहुमत असेपर्यंत हा प्राप्त झालेला अधिकार कायम रहातो. दीनदयाळजींनी याच संसदीय पद्धतीस धरून संमिश्र मंत्रिमंडळे बनवली आणि ती बनवत असतानाच त्या मंत्रिमंडळाचे आयुष्य फार नाही याची जाणीव ठेवली.

या मंत्रिमंडळांची सुरुवात होत असतानाच त्यांनी जाहीर केले की, "सध्याची परिस्थिती आणि संमिश्र सरकारच्या घडणीचा अंगभूत असलेल्या त्याच्या मर्यादा लक्षात घेता मंत्रिमंडळे काही चमत्कार करून दाखवतील अशी कल्पना करणे चुकीचे ठरेल. काही नेत्रदीपक करून दाखवावे या मोहापायी या सरकारांनी एखादे साहसी पाऊल टाकणे हे अयोग्य ठरेल असा इशाराही याच वेळी या सरकारांना आणि सरकारात सामील झालेल्या घटक पक्षांना आम्ही देऊन ठेवतो. सध्याची दुरवस्था दूर करण्यासाठी कोणती गोष्ट आवश्यक असेल तर ती म्हणजे अथकपणे आणि कार्यनिष्ठेने सतत काम करणे. याच गोष्टीची जाणीव ठेवून जनसंघ संमिश्र मंत्रिमंडळात सामील झाला आहे आणि म्हणूनच मंत्रिमंडळ टिकवून जनतेचे अधिकाधिक हित करण्यासाठी जनसंघ आपली धोरणे घिसाडघाईने पुढे रेटणार नाही."

संमिश्र मंत्रिमंडळाचे यशापयश

संमिश्र मंत्रिमंडळाची घडण होऊन सात महिने झाल्यावर (आणि ती संपुष्टात येण्यास तेवढाच अवधी असताना) दीनदयाळजींनी या मंत्रिमंडळांसंबंधी केलेले भाष्य चिंतनीय आहे. २१ ऑक्टोबर १९६७ ला औरंगाबाद येथे प्रकट सभेत भाषण करताना ते म्हणाले, "परवाच्या निवडणुकीत अनेक राज्यांत काँग्रेसचा पराभव झाला. वीस वर्षे राज्य केलेली काँग्रेस जात आहे. जाऊ द्या. काळजी करण्याचे कारण नाही. जाणाऱ्याला निरोप द्या. काँग्रेस गेली आणि त्या जागी जनतेच्या मतांची संमिश्र मंत्रिमंडळे आली. मंत्रिमंडळात जनसंघही सामील आहे. संमिश्र सरकारात कम्युनिस्टांबरोबर जनसंघ आहे म्हणून काही लोकांना आश्चर्य वाटते. काही लोक टीका करतात. विचार करा जनसंघ अशा मंत्रिमंडळात सामील होत नाही म्हणाला असता तर काय झाले असते ? उत्तर सरळ

आहे. काँग्रेसने मंत्रिमंडळे बनवली असती. अल्पमतात असूनही काँग्रेस अधिकारावर आली असती. जनतेचा लोकशाहीवर विश्वासच त्यामुळे राहिला नसता. समजा, अशा प्रकारे काँग्रेसच सत्तेवर रहाती तर जनतेला वाटले असते, सरकार काही मतांनी बदलत नाही. आता हाती शस्त्रच असले पाहिजे आम्ही मंत्रिमंडळे बनवल्यामुळे जनतेचा लोकशाहीवरील विश्वास वाढलाच, पण स्वत:वरही विश्वास वाढला.

" संमिश्र मंत्रिमंडळातही पुष्कळ तणाव आहेत, पण हे मान्यच करावे लागेल की या सरकारांनी जनतेसाठी पुष्कळच चांगले काम केले आहे. जनसंघासंबंधी विचार करता लोकांना स्पष्टपणे जाणवले ते म्हणजे जेथे सरकारात जनसंघ आहे आणि जेथे जनसंघ नाही त्या दोन ठिकाणचा फरक. जनसंघाचे कार्य नि:संशय मौलिक आहे. बंगाल, केरळ येथे केंद्राच्या विरोधात बंड करण्याची भाषा सुरू झाली आहे. बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश येथे तशी भाषा वापरली जात नाही हे जनतेला बरोबर समजते. तेथे ' सरकार बंद ' ची घोषणा होत नाही. सरकारचे काम ' बंद ' करणे हे नसून जे बंद आहे ते चालू करण्याचे आहे. "

काँग्रेसला दूर ठेवा

भारतीय जनसंघाचे त्या वेळचे सरचिटणीस श्री. नानाजी देशमुख यांनी संमिश्र मंत्रिमंडळातील घटक पक्षांना उद्देशून सांगितले की," विविध राज्यांतील संमिश्र मंत्रिमंडळे जर यशस्वी झाली पाहिजेत, काँग्रेसला जर सत्तेपासून दूर ठेवावयाचे असेल तर विविध राज्यातील संमिश्र मंत्रिमंडळे यशस्वी झालीच पाहिजेत म्हणून काँग्रेसला पुन्हा सत्ता मिळेल असे आपण करता कामा नये. असे झाले तर ते लोकांच्या इच्छेविरुद्ध केलेले वर्तन ठरेल. "

पहिली निष्ठा लोकांची

जनसंघाच्या प्रतिनिधीसभेत एप्रिल १९६७ मध्ये बोलताना सभासदांनीही अशीच इच्छा व्यक्त केली होती. भारतात आता स्थित्यंतराचे राजकारण सुरू झाले आहे. जनसंघ या सत्तास्पर्धेत मागे राहिला तर तो मागेच राहील असा इशाराही काही प्रतिनिधींनी दिला. पण संमिश्र मंत्रिमंडळाचा प्रयोग निष्ठेने यशस्वी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. लोकशाहीच्या यशासाठी याची गरज आहे. असाच सर्व चर्चेचा मुख्य सूर होता.

राजकीय पक्ष हे माध्यम

लोकशाहीत सरकार चालविण्याचे एक साधन म्हणून राजकीय पक्षांना महत्त्व असते. लोकमताचे प्रकट रूप संघटित करणे, लोकांच्या हक्कावर अतिक्रमण झाल्यास त्याचा प्रतिकार करणे, लोकांची दुःखे–गाऱ्हाणी सरकारपुढे मांडून त्यांचे निवारण करणे, ही सर्व कामे राजकीय पक्षांची असतात. भारतातील राजकीय पक्ष हे सत्ता मिळवणे, सत्ता गाजविणे, सत्ता भोगणे, सत्ता टिकविणे यांतच गुंतलेले असतात. दीनदयाळजी हे ध्येयवादी व लोकनिष्ठ राजकारणी होते. त्यामुळे १९६७ साली काँग्रेस पदच्युत झाल्यावर त्यांनी काँग्रेसची एकपक्षीय हुकूमशाही मोडून काढण्यासाठी टाकलेले पहिले पाऊल या दृष्टीने संमिश्र मंत्रिमंडळांकडे पाहिले. काँग्रेसविरोधी लोकमताला विधायक स्वरूप देण्याची गरज आहे असे त्यांना वाटे. म्हणून केवळ काँग्रेसद्वेष वा विरोध त्यांना पसंत नव्हता. ते रचनात्मक ध्येय होऊ शकत नाही असे त्यांचे मत होते. हे करताना पुनर्रचनेचे ध्येय महत्त्वाचे आहे. भारतात एकपक्षीय लोकशाहीनंतर द्विपक्षीय लोकशाही येणार नाही. म्हणून बहुपक्षीय लोकशाही ही अपरिहार्य अवस्था आहे असे दीनदयाळजी म्हणत असत. पण राजकीय पक्षांनी परस्पर संबंध सौहार्दाचे ठेवले पाहिजेत व लोकसेवेचे माध्यम म्हणून राजकीय पक्ष संघटित केले जातात या मूलतत्त्वाचे भान सदैव ठेवले पाहिजे.

निकोप पक्ष-संबंधाची गरज

दीनदयाळजींची ही विचारसरणी राजकीय गरजेतून निर्माण झालेली नव्हती. लोकशाहीच्या पक्षीय व्यवहारासंबंधी त्यांचे स्वतंत्र विचार होते. त्याचा उच्चार त्यांनी राजकारणात प्रवेश केल्यापासूनच केला होता. १९५२ साली राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी जी काही शेवटी तीन-चार भाषणे केली त्या निमित्ताने लिहिताना दीनदयाळजींनी म्हटले होते, "आज एका राजकीय पक्षाचे दुसऱ्या राजकीय पक्षाशी असलेले संबंध इतक्या खालच्या पातळीवर गेले आहेत की त्याची आपणाला लाज वाटावी. आज भारतातील राजकीय पक्ष आपापसांत लढत आहेत. ते परस्परांना टाळण्याचा इतका प्रयत्न करतात की आजची स्थिती अशीच चालू राहिली तर या समाजात नवीन जाती निर्माण होतील. प्रकटपणे सर्व राजकीय पक्ष जातिवादाचा धिक्कार करतात, पण जातिवादाचे राजकीय रूप ते पोषीत असतात. सामाजिक अस्पृश्यता ही तर दुष्ट पद्धती आहेच पण राजकीय अस्पृश्यता त्यापेक्षा भयंकर आहे."
(ऑर्गनायझर – २८ मे १९५२).

संमिश्र मंत्रिमंडळे आली तर ही राजकीय अस्पृश्यता घालविण्यासाठी त्यांचा उपयोग होईल. म्हणून दीनदयाळजींनी त्यांचा पुरस्कार केला.

आचारसंहितेचा आग्रह

नियमबद्ध शुद्धाचरणावर दीनदयाळजी भर देत. पहिल्या निवडणुकीत विविध राजकीय पक्षांनी स्वतःची आचारसंहिता करावी असा प्रयत्न करण्यात आला होता. लोकशाहीची नैतिकता जतन करण्यासाठी ही आचारसंहिता आवश्यक असते असे दीनदयाळजींचे मत होते. पण १९६७ साली संधी आल्याबरोबर जनसंघाने शुद्धाचरणाचा आदर्श घालून द्यावा या इच्छेने दीनदयाळजींनी सरकारात सामील होणाऱ्या जनसंघाच्या सदस्यांसाठी एक आचारसंहिता प्रतिनिधिसभेकडून एप्रिल १९६७ मध्ये संमत करून घेतली. ती अशी – १. जनसंघाचे मंत्री दरमहा १००० रु. पेक्षा जास्त वेतन घेणार नाहीत. २. मुख्यमंत्री व पक्षाचे संसदीय मंडळ यांचेकडे स्वतःच्या मालमत्तेची माहिती मंत्र्यांनी दिला पाहिजे. ३. जनसंघाच्या मंत्र्यांनी मेजवान्यांना उपस्थित राहू नये व राहाणी साधी ठेवावी. ही आचारसंहिता सभेपुढे मांडताना दीनदयाळजी म्हणाले, " जनसंघाच्या मंत्र्यांनी कार्यक्षमता व सचोटी यांचा आदर्श घालून द्यावा. आपल्या मतदारसंघाची काँग्रेसचे मंत्री घेतात तशी ' खास काळजी ' त्यांनी घेऊ नये. काँग्रेसमंत्र्यांचे आचरण हा आदर्श नसावा, धोक्याची सूचना समजावी. शिवाजी व चाणक्य यांचे आचरणाचे आदर्श जनसंघाच्या मंत्र्यांनी ठेवावेत. दीनदयाळजींचा शुद्धाचरणाचा आग्रह यावरून लक्षात यावा.

संविद सरकारे – एक संधी

सारांश, १९६७ साली ' काँग्रेस हटाव ' मोहीम यशस्वी झाली आणि जनतेने विरोधी पक्षांना सत्तेची संधी दिली. पण व्यक्तिस्वार्थ, गटबाजी, ध्येयशून्यता हे भारतीय राजकारणातील दोष अंगात इतके मुरले होते की, गुणात्मक परिवर्तन झाल्याखेरीज व लोकसेवेची आच असल्याविना संयुक्त सरकारे यशस्वी होणे अशक्य होते. तसेच १९६७ मध्ये झाले. पण जनतेच्या काँग्रेसविरोधी मतांचे प्रदर्शन झाले व काँग्रेसला जनमताच्या बळावर सत्ताच्युत करता येते हा आत्मविश्वास लोकांमध्ये निर्माण झाला. संमिश्र मंत्रिमंडळाचे हे दोन राजकीय लाभ होते.

• • •

८

राष्ट्रवादी राजकारणाचे तत्त्वचिंतक

दीनदयाळजी हे रा. स्व. संघ व जनसंघाच्या राष्ट्रवादी शक्तीचे व विचारसरणीचे प्रतिनिधी म्हणून स्वातंत्र्योत्तर भारताच्या राजकारणात तत्त्वचिंतक व पक्षघटक म्हणून आले. त्यांच्या राजकीय जीवनात (१९५१–६८) निर्माण झालेल्या स्वतंत्र भारताच्या राजकीय, सामाजिक समस्यांना राष्ट्रवाद, लोकशाही यांच्या संदर्भात उत्तर देणे हे इतिहासाने त्यांच्यावर सोपविलेले कार्य होते. जनसंघ हे त्यांना आकार द्यावयाचे माध्यम होते. कार्यक्षेत्र नवीन होते. आव्हाने विविध प्रकारची होती. हाती होते फक्त निष्ठावंत, चारित्र्यसंपन्न, लोकसेवेची तळमळ असलेले, पण राजकारणात अनभिज्ञ असलेले कार्यकर्ते. नेहरूंसारख्या आंतराष्ट्रीय कीर्तीच्या लोकप्रिय व गांधीजींचा राजकीय वारसा घेतलेल्या नेत्याविरुद्ध व काँग्रेसच्या राष्ट्रव्यापी, बद्धमूल संघटनेविरुद्ध उभे राहून एक प्रतिपक्ष व पर्यायी जीवनप्रणाली त्यांना देशाला द्यावयाची होती. विचारक, प्रचारक, संघटक, राजकीय नियोजक या चार भूमिका राजकारणात एकाच वेळी दीनदयाळजींना करावयाच्या होत्या. या भूमिकांत ते किती यशस्वी झाले आणि भारतीय राजकारणात जनसंघाने कोणती वैचारिक परंपरा निर्माण केली हे पाहिले म्हणजे दीनदयाळजींनी या देशाला जनसंघामार्फत दिलेली तत्त्वदृष्टी व नवी राजकीय संस्कृती कोणती याची कल्पना येईल. कारण सिद्धांत पुस्तकात राहातात. त्या सिद्धांतांना बांधलेले, ती तत्त्वदृष्टी असलेले व त्याचे आचरण करणारे कार्यकर्तेच त्या सिद्धांतांची प्रतीके बनून समाजाच्या जीवनाला वळण लावत असतात. म्हणून दीनदयाळजींनी जनसंघाला जी तत्त्वदृष्टी दिली, त्या द्वारे जे सिद्धांत प्रतिपादन केले व

जी राजकीय संस्कृती दिली हाच खरा दीर्घकाल टिकणारा त्यांचा संदर्भ आहे. जीवनातील समस्यांना उत्तर शोधण्यासाठी लोकमान्य टिळक हे गीतेचा सदैव संदर्भ मनात ठेवत असत व दिनदर्शिकेत आपण जसा दिनांक व महिना पहातो तसा गीतेचा श्लोक टिळकांना उपयोगी पडे.(संदर्भ – दादासाहेब खापर्डे यांची प्रस्तावना – लो. टिळकांच्या आठवणी व आख्यायिका-खंड ३) याच दृष्टीने दीनदयाळजींचा विचार केला तर जनसंघामार्फत त्यांनी प्रसृत केलेले कोणत्या विषयाबद्दलचे कोणते विचार आपल्या राष्ट्राला आजही मार्गदर्शन करतात याचा विचार या प्रकरणात करावयाचा आहे. दीनदयाळजी हे राष्ट्रवादी राजकारणाचे निःसंशय तत्त्वचिंतक होते; पण त्याहीपुढे जाऊन ते मानवतावादी होते हे महत्त्वाचे आहे. म्हणून दीनदयाळजींच्या सर्व तत्त्वचिंतनाला आध्यात्मिक, सांस्कृतिक, राष्ट्रवादी व मानवतावादी बैठक (Total Vision) होती. हे सर्व एकात्म होते, परस्पर संलग्न होते. स्वतंत्र भारताच्या समस्यांकडे या एकात्म दृष्टीने दीनदयाळजी पहात. न्या. रानडे म्हणत, " तुम्ही अंशतः उदारमतवादी असू शकत नाही. " तसेच दीनदयाळजींची चिंतनपद्धती समग्र अभ्यासली पाहिजे, कारण ती मूलगामी व सर्वांगीण होती.

स्वतंत्र भारताच्या समस्या

स्वतंत्र भारताच्या समस्या कोणत्या होत्या ? त्यांचे स्वरूप काय होते ? त्यांचे मूळ कशात होते ? त्या सोडविण्यासाठी दीनदयाळजींनी जनसंघामार्फत कोणते उपाय सुचविले ? प्रजासत्ताक भारताला स्वराज्य चालवावयाचे होते. समाजाची राजकीय, आर्थिक पुनर्रचना करावयाची होती. स्वातंत्र्याबरोबरच आलेल्या समस्या सोडवावयाच्या होत्या. हे करीत असताना स्वप्न व सत्य, घोषणा आणि व्यवहार्यता, उंचावलेल्या आशा-अपेक्षा व रोकडी वस्तुस्थिती यांचा मेळ जुन्या नेतृत्वाला घालावयाचा होता. विद्यमान जागतिक प्रवाह आणि भारताचे राष्ट्रीय जीवन यांच्यात तोल साधावयाचा होता. हे सर्व एकटचा काँग्रेस-नेतृत्वाला करावयाचे होते. भारतीय राजकारणात सत्ता हा सर्वस्वी नवीन घटक होता. लोकशाहीमुळे सत्तेचा मोहक स्पर्श सर्वांना होत होता. अनासक्त राजयोगी होऊनही भागणारे नव्हते. तेव्हा अधःपतनाला रोखून धरील, सत्ता-लोलुपता आवरील अशी ध्येयनिष्ठा काँग्रेसजवळ नव्हती. त्यामुळे समाजातील सर्व थरांचे, गटांचे, जातींचे पेंढार काँग्रेसमध्ये जमा होऊ लागले. काँग्रेसची संस्कृतीच बदलत चालली. अधःपात शतमुखांनी होतो, तसेच काँग्रेसचे झाले.

काँग्रेस हा शिस्तबद्ध व बांधेसूद राजकीय पक्ष कधीच नव्हता. तेव्हा नवीन समस्या, नवी आव्हाने व असंघटित व सत्ताशोधक राजकीय पक्षाचे माध्यम अशी १९५१ ची राजकीय स्थिती होती.

स्वतंत्र भारताच्या समस्यांचे वर्गीकरण केल्यास असे दिसते की पाच प्रकारे त्या समस्या सोडवावयाच्या होत्या. पहिली समस्या समाजाच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक प्रबोधनाची होती. दुसरा प्रकार पुनर्रचनेच्या समस्यांचा होता. तिसरा गट समन्वयामुळे सुटणाऱ्या समस्यांचा होता. जगात व भारतात दोन टोकांच्या जीवनप्रणाली अस्तित्वात होत्या. त्यांपैकी कोणत्याही एका जीवनप्रणालीचा पूर्ण स्वीकार करणे हितकारक नव्हते. चौथा समस्यांचा प्रकार सामाजिक तणावांचा होता. हिंदू-मुसलमान, हरिजन-वनवासी व अन्य समाज यांच्यातील तणाव, सामाजिक संमीलनामुळे व समरसतेमुळेच नाहीसे करून एकजिनसी भारतीय समाज निर्माण करणे शक्य होते. कारण सामाजिक तणावाची कारणे कायम ठेवून सामाजिक शांतता निर्माण होणे अशक्य असते. पाचवा प्रकार प्रशासनात्मक पुनर्रचनेच्या प्रश्नांचा होता. स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर करणे याची अत्यंत निकड होती. भारतीय लोकशाहीची व राजकीय स्वातंत्र्याची ती रोज अनुभवास येणारी कसोटी होती. जनसंघ व दीनदयाळजी यांचे या सर्व प्रकारच्या समस्यांबद्दल काय विचार होते, त्यांत काही वेगळेपण व अस्सल भारतीय होते काय हे पाहिले म्हणजे दीनदयाळजींचे विचार आजही मार्गदर्शक ठरणारे आहेत काय हे आपोआप सिद्ध होईल.

अखंड भारत

भारतीय राष्ट्रवाद हा मूलतः एक जन, एक देश, एक संस्कृती यांवर आधारलेला राष्ट्रवाद असल्यामुळे धार्मिक बहुसंख्येच्या जातीयवादी तत्त्वावर पराभूत नेतृत्वाने केलेली भारताची फाळणी जनसंघाने मान्य केली नव्हती. या दृष्टीने १९५३ च्या १५ ऑगस्टला भारतीय प्रतिनिधीसभेने केलेला ठराव अखंड भारतावरची जनसंघाची श्रद्धा प्रकट करणारा होता. या ठरावात म्हटले होते, " भारताची फाळणी भारताच्या मूलभूत संस्कृतीविरुद्ध होती. फाळणीने प्रश्न सुटण्याऐवजी इतर भीषण प्रश्न निर्माण केले आहेत. एक देश, एक राष्ट्र, एक संस्कृती या तत्त्वांवर जनसंघाचा विश्वास आहे व त्यांच्या आधारे आपली

उन्नती होऊ शकेल असा जनसंघाचा विश्वास आहे. म्हणून हा आदर्श पुढे ठेवून अखंड भारतासाठी जनसंघ प्रयत्न करीत राहील. " या संकल्पाचे स्पष्टीकरण करताना दीनदयाळजींनी सांगितले होते, " काँग्रेस द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांतापुढे शरण गेली. पण जनसंघ मानसिक दृष्टचा फाळणीचा स्वीकार करू शकत नाही. " (ऑर्गनायझर – मे १९५८) जनसंघाची अखंड भारत ही घोषणा हिंसेवर आधारलेली नाही. पाकिस्तानी जनतेला आपली चूक कळून येईपर्यंत जनसंघ वाट पाहील. १९४७ च्या राजकीय परिस्थितीमुळे फाळणी अपरिहार्य ठरली हे खरे मानले तरी आपली चूक सुधारण्याची काँग्रेस भाषाही करीत नाही, पण पुन्हा ही दोन राष्ट्रे एक होतील, अखंड भारत पुन्हा निर्माण होईल अशी आशा जनसंघ बाळगून आहे असे स्पष्टीकरण दीनदयाळजी करीत असत. १७ ऑगस्ट १९६५ ला केलेल्या ठरावात जनसंघाच्या प्रतिनिधी-सभेने अखंड भारत व हिंदु-मुस्लिम ऐक्य यांच्यावरील आपली श्रद्धा त्यासंबंधीच्या भूमिकेसह पुन्हा प्रकट केली होती. भारत-पाकिस्तान युद्ध या वर्षी झाले होते हे लक्षात ठेवण्या-सारखे आहे. किंबहुना जनसंघ १५ ऑगस्ट हा दिवस ' अखंड भारत दिवस ' म्हणून पाळत असे. भारताच्या सांस्कृतिक एकात्मतेच्या पायावर ' अखंड भारत ' निर्माण होणे शक्य आहे असा या ठरावाचा अर्थ आहे. पाकिस्तानशी भारताचे संबंधही मनधरणीचे असू नयेत असे या ठरावात म्हटले आहे. मुस्लिम समस्येचे मूळ मनधरणीच्या या काँग्रेस-नीतीत आहे असे स्पष्ट करताना या ठरावात म्हटले आहे, " जोपर्यंत विभाजन कायम आहे तोपर्यंत भारत आणि पाकिस्तान यांत शांतता निर्माण होणार नाही. पाकिस्तानच्या गुंडगिरीपुढे नमण्याने किंवा त्याची मनधरणी करण्याच्या नीतीने दुरावा वाढत आहे. भारतातील अनेक मुसलमान भावनेने पाकिस्तानशी जोडलेले आहेत. ही परिस्थती बदलण्यासाठी दुहेरी उपाययोजना केली पाहिजे. एक म्हणजे पाकिस्तानशी संबंध ' जशास तसे ' या तत्त्वावर आधारलेले हवेत. ज्या दिवशी पाकिस्तानला हे कळेल की संपूर्ण भारत जिंकण्याचे आपले स्वप्न साकार होणे अशक्य आहे, त्या दिवशी पाकिस्तान अंतर्मुख होईल व फाळणीची चूक त्याला समजून येईल. पण त्याला उपाय ' शठं प्रति शाठ्यम् ' ही नीती अवलंबणे हाच आहे. दुसरा उपाय भारतातील मुसलमानांना खूष ठेवण्यासाठी त्यांच्याशी राजकीय सौदेबाजी करता कामा नये. भारताच्या असांप्रदायिक राज्यात त्यांचे सर्व हक्क सुरक्षित आहेत. पण मुसलमानातील पाकिस्तानी प्रवृत्ती प्रकट करणाऱ्या सर्व गोष्टी सहन न करता या दृष्टिकोनाचे भारतीयीकरण केले पाहिजे. " (भारतीय जनसंघ – घोषणा व प्रस्ताव–पृष्ठ

७५–७६) जनसंघाची हीच भूमिका होती. पुढे डॉ. लोहिया व दीनदयाळजी यांनी भारत व पाकिस्तान महासंघाची कल्पना पुरस्कारली. त्या विषयीच्या एप्रिल १९६४ मध्ये काढलेल्या संयुक्त पत्रकात तिचे स्पष्टीकरण केले होते.

" हिंद व पाक ही फाळणी संपूर्णपणे कृत्रिम आहे असे आमचे स्पष्ट मत आहे. परस्परांशी संबंधित प्रश्न अर्धवट सोडविण्याच्या आणि एकेका प्रश्नाचा अलग अलगपणे विचार करण्याच्या या दोन्ही देशांच्या सरकाराच्या धोरणामुळेच आज या दोन राष्ट्रांचे संबंध बिघडलेले आहेत. या पद्धतीचा त्याग करून सर्वच प्रश्नांची सम्यक् दृष्टीने आणि खुलेपणाने चर्चा झाली पाहिजे. यामुळे भारत-पाकमधील तंट्याच्या प्रश्नांचे निराकरण होऊन पूर्वी वर्षानुवर्षे त्यांच्यात असलेली सद्भावना पुन्हा निर्माण होईल, आणि त्यातूनच कोणत्या ना कोणत्या स्वरूपाचे हिंद-पाक महासंघराज्य प्रस्थापित होण्याच्या प्रक्रियेस प्रारंभ होईल.

भारतीयांनी आपल्या मनाच्या आजच्या प्रक्षुब्धावस्थेत राष्ट्रीय जीवनाच्या आधारभूत व खऱ्या तत्त्वांचा कधीही विसर पडू देऊ नये. पाकिस्तानातील अल्पसंख्य हिंदू व अन्यधर्मीयांच्या मालमत्तेचे आणि प्राणांचे भारत सरकारने रक्षण केले पाहिजे किंवा करविले पाहिजे. हे अल्पसंख्य पाकिस्तानचे नागरिक आहेत ही सबब लंगडी व धोकादायक आहे. या कारणास्तव भारत सरकार पाकमधील अल्पसंख्याकांबाबतच्या आपल्या कर्तव्याला विसरले तर त्याचा परिणाम पाक व भारतात अधिक मोठ्या प्रमाणावर मानवी हत्त्या होण्यात होईल, हे निश्चित. भारत सरकारने हे आपले कर्तव्य बजाविले नाही म्हणून हिंदी जनतेला संताप येणे स्वाभाविक होय.

जे सरकार आपल्या नागरिकांच्या जगण्याच्या हक्काचे रक्षण करू शकत नाही आणि जे राष्ट्र आपल्या शेजारच्या नागरिकांचा हा हक्क रक्षू शकत नाही ते सरकार व ते राष्ट्र जंगली होय. सर्व नागरिकांच्या स्वातंत्र्याचे व सुरक्षिततेचे संरक्षण करणे ही आमची पवित्र परंपरा आहे.

भारतामधील प्रत्येक मुसलमान नागरिकाला आम्ही याबाबत आश्वासन देतो. प्रत्येक हिंदू कुटुंबात हा संदेश पोचविणे आणि प्रत्येकाने त्या संदेशाप्रमाणे वागणे हे आपले अगदी प्राथमिक व राष्ट्रीय कर्तव्य आहे असे मानले पाहिजे अशी आमची इच्छा आहे. " (संदर्भ – भारतीय फाळणीचे गुन्हेगार – पृष्ठ १३५–१३६ प्रेस्टीज प्रकाशन. डॉ. राममनोहर लोहिया)

राष्ट्रीय एकात्मता व मुसलमान

या आधी १९ डिसेंबर १९६१ मध्ये झालेल्या राष्ट्रीय एकात्मता परिषदेत जनसंघाचे यासंबंधीचे विचार श्री. अटलविहारी वाजपेयींनी स्पष्टपणे मांडले होते. "भारतीय राष्ट्रवादाच्या निर्मितीसाठी केलेल्या प्रयोगात भारतातील मुसलमानांचे मोठ्या प्रमाणात सहकार्य मिळाले नाही असे खेदाने म्हणावे लागते. राजकारण व धर्म एकच आहेत असे समजून त्यांनी सर्व प्रयत्न केले. परक्या सत्तेशी एकरूप झाल्यामुळे त्यांच्या जीवनात अशी विकृती निर्माण झाली. तिचा धर्माशी काहीही संबंध नाही. भारतीय समाजापासून आपण वेगळे आहोत हे सिद्ध करण्यासाठी आपली राहाणी, प्रथा, रीतीभाती स्वतंत्र करण्याचा प्रयत्न केला व या भूमीशी जोडलेल्या समाजापासून स्वत:ला वेगळे केले. रामकृष्णांना आपले पूर्वज मानण्यास ते तयार नव्हते व ज्या सणावारांचा धर्माशी काहीही संबंध नाही तेही हे लोक मानीनासे झाले व त्यापासून दूर राहिले.

"मुसलमान वा ख्रिश्चन हे काही बाहेरून आलेले लोक नाहीत. त्यांचे पूर्वज हिंदूच होते. धर्म बदलला म्हणजे राष्ट्रीयत्व बदलत नाही, किंवा संस्कृतीही बदलत नाही. धर्माच्या आधारावर मुसलमान किंवा ख्रिश्चनांना अल्पसंख्य मानणे म्हणजे राजकारण, अर्थकारण व सामाजिक जीवन यांच्यात धर्माच्या आधारे विभाजन करण्यासारखे आहे. हे तर प्रच्छन्न द्विराष्ट्रवाद किंवा बहुराष्ट्रवाद यांचा स्वीकार करण्यासारखे आहे.

"वस्तुत: राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न हा मूलत: संकुचित निष्ठांचा त्याग करून राष्ट्रनिष्ठा स्वीकारण्याचा प्रश्न आहे. यासाठी लोकांच्या अंत:करणांतून व बुद्धीतून संकुचित निष्ठा काढून टाकण्याचा प्रयत्न झाला पाहिजे."

१९५६ साली जनसंघ व मुसलमान यासंबंधी दिलेल्या एका मुलाखतीत श्री. वाजपेयी म्हणाले होते, "जे लोक श्रद्धेने मुक्तीचा मार्ग म्हणून इस्लाम वा ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करतात त्यांना स्वत:च्या विवेकाप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. भारतात राहाणारे व येथे जन्मलेले मुसलमान हे या देशाचे पुत्र वा कन्या आहेत. काँग्रेसने त्यांना लाच देऊन राष्ट्रीय करण्याचा प्रयत्न केला. या स्पर्धेत काँग्रेसने ब्रिटिशांवर मात केली आहे. इंग्रजांनी त्यांना एक स्वतंत्र राज्य दिले, तर काँग्रेसने ते ३० टक्के असून ५० टक्के जागा देण्यास मान्यता दिली. फाळणीची पुनरावृत्ती होऊ नये असे वाटत असेल तर

हे मुसलमानांच्या मनधरणीचे राजकारण बंद केले पाहिजे." (ऑर्गनायझर – दिवाळी विशेषांक १९५६).

काश्मीरचे एकीकरण

शेख अब्दुल्ला हे स्वतःच्या अनन्य स्थानाचा व नेहरूंशी त्यांच्या असलेल्या वैयक्तिक स्नेहसंबंधाचा गैरफायदा घेऊन, काश्मीर हे स्वतंत्र ठेवण्याचे व त्याला भारतीय संघराज्यात वेगळे स्थान मिळवून देण्याच्या प्रयत्नात होते. जम्मू-प्रजापरिषदेच्या आंदोलनास जनसंघाने पाठिंबा दिला. एवढेच नव्हे तर, त्यासाठी स्वत: सत्याग्रह केला. या सत्याग्रहातच डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींना मरण आले. शेख अब्दुल्लांच्या भारतविरोधी कारवाया जनमंघाने उघडकीस आणल्या. राज्यघटनेचे ३७० वे कलम रद्द करण्याचा आग्रह धरणारा व त्यासाठी झगडणारा जनसंघ हाच एकमेव पक्ष होता. २९ जून १९५२ हा 'काश्मीर दिवस' म्हणून जनसंघाने पाळला व काश्मीरच्या प्रश्नावर लोकमत जागृत करण्याचा उपक्रम केला. जनसंघाच्या प्रतिनिधीसभेने २९ जून १९५२ हा दिवस 'काश्मीर दिवस' म्हणून पाळला. काश्मीरच्या प्रश्नाबद्दल सर्वांगीण माहिती देण्यासाठी याचा उपयोग करण्यात आला. काश्मीर हा भारताचा अविभाज्य घटक आहे तेव्हा घटनेत त्याला स्वतंत्र घटनात्मक स्थान देणारे ३७० वे कलम आहे ते रद्द करण्यात यावे. तरच देशाच्या राष्ट्रीय व राजकीय प्रवाहात काश्मीर सामील होऊ शकेल. काश्मीर-सरकार आपला अलगपणा कायम करण्याचा प्रयत्न करीत आहे. काश्मीरमधील भारतविरोधी प्रवृत्तीचे मूळ कारण हा अलगपणा हे आहे म्हणून ३७० वे कलम रद्द करणे हे अत्यंत निकडीचे आहे. १९५२ पासून काश्मीरच्या एकीकरणाची मागणी जनसंघ सतत करीत होता. काश्मीरचे राजकारण ही अब्दुल्लांची मक्तेदारी नव्हे किंवा नेहरूंचा तो वैयक्तिक सुभा नव्हे हे भारतीय राजकारणात निग्रहाने, सातत्याने मांडण्याचे कार्य जनसंघाने केले. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींचे त्यासाठी झालेले बलिदान हे भारताच्या लोकशाहीचे व राष्ट्रीय एकतेचे भावात्मक प्रतीक मानावे लागेल.

आसामच्या प्रश्नाची दखल

अस्वस्थ आसामची अस्वस्थता भारतीय राजकारणात प्रकट करण्याचे कार्य जनसंघाने केले. १९६१ साली सुंदरसिंह भंडारींच्या अध्यक्षतेखाली आसाम

प्रदेश जनसंघाचे अधिवेशन झाले. त्यात असाममध्ये पाकिस्तान्यांची जी घूसखोरी चालू होती ती थांबवावी अशी मागणी करणारा ठराव केला. आसाममध्ये २२ लाख वनवासी असून त्यांतले ९ लाख डोंगराळ प्रदेशात राहतात. आसाममध्ये डोंगरी राज्याची कल्पना ब्रिटिशांनी उचलून धरली व त्यांचा अलग भाव पद्धतशीरपणे पोसला. परकीय मिशनऱ्यांना हद्दपार केल्याविना या अलगवादी चळवळीचे मूळ उपटले जाणार नाही. सारांश, आसाममध्ये पूर्व पाकिस्तानातून होणारी घुसखोरी व ख्रिस्ती मिशनऱ्यांची अलगवादी चळवळ या दोहोंमुळे आसामला असलेला धोका जनसंघाने सतत मांडला. राष्ट्रीय एकात्मतेला बाध आणणाऱ्या राजकीय चळवळींचे व प्रवृत्तींचे निर्मूलन केले पाहिजे हे जनसंघाच्या राष्ट्रवादी राजकारणाचे प्रथमपासून सूत्र होते.

हिंदु-मुस्लीम जातीय दंगे

जनसंघाची हिंदु–मुस्लिम प्रश्नाविषयीची भूमिका काँग्रेसशासनाने कधी समजून घेतली असे वाटत नाही. हिंदुत्ववाद हा काँग्रेसला समजावून घ्यावयाचा नव्हता. हिंदू असणे हेच या देशात पाप असल्याने हिंदुत्वाचा राजकीय मत म्हणून पुरस्कार करणे महापाप आहे. त्यामुळे हिंदु–मुसलमान दंगा झाला की रा. स्व संघ व जनसंघ यांच्यावर त्याचे खापर फोडणे हीच काँग्रेस सरकारची नीती राहिली आहे. तथापी जनसंघाने अनेकदा आपली मते स्पष्टपणे मांडली आहेत. १४ जून १९६८ रोजी गोहाटी येथे केलेला ठराव अधिक सविस्तर आहे. त्यात म्हटले आहे, " जातीयतेचे विषारी बीज स्वातंत्र्यपूर्व काळातील आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश सत्ता या दंग्यामागे असते असा तर्क केला जाई. यामुळेच जातीय त्रिकोण हा शब्द रूढ झाला. त्यामुळे फाळणीनंतर जातीय दंगे थांबतील अशी आशा वाटत होती. पण ही समजूत किती चुकीची व उथळ होती हे आताच्या अनुभवावरून कळून येत आहे. याचा अर्थ या समस्येची कारणमीमांसा अधिक इतिहासनिष्ठ दृष्टिकोनातून करण्याची गरज आहे.

भारतीय जनसंघाने दंग्यांची कारणमीमांसा करण्यासाठी स्वतःची उपसमिती नेमली होती. त्या समितीला असे आढळून आले आहे की, बहुधा दंग्याची नैमित्तिक कारणे क्षुद्र असतात, पण त्याची तयारी आधीपासून केलेली असते. थोड्याच अवधीत श्रीनगर, करीमगंज, अलाहाबाद यांसारख्या दूरदूरच्या शहरांत दंगा पसरतो, याचा अर्थ हाच की दंगा पसरविणाऱ्या शक्ती

आधीच या देशात आहेत व त्या फक्त निमित्ताची वाट पहात असतात. प्रत्येक राजकीय विचारप्रणालीचा पक्ष आपल्या पक्षहितासाठी जातीय दंग्यांना उत्तेजन देणे किंवा इतरांवर जातीयतेचा आरोप करणे हा फार धोकास्पद खेळ खेळत आहे. तो बंद करणे यातच राजकीय पक्षांचे हित आहे. राष्ट्रीय एकात्मता हे मूल्यवान तत्त्व आहे. राजकारणाच्या वेदीवर त्याचा बळी देता कामा नये. जनसंघाने जातीय दंगे कमी करण्यासाठी ज्या विधायक सूचना केल्या होत्या त्यांत कायदा-सुव्यस्था यांना धोक्यात आणणाऱ्या सर्वांना अटक केली पाहिजे, या बाबतीत राजकीय नेत्यांना हस्तक्षेप करू देऊ नये ही महत्त्वाची सूचना होती. हिंदुमुस्लीम दंगे कमी होण्यासाठी शैक्षणिक उपायही योजले पाहिजेत असा जनसंघाचा आग्रह होता. दंग्यामागे परदेशांचा हात असण्याचा संभव असतो हेही लक्षात ठेवले पाहिजे, असे म्हटले होते.

राष्ट्रीय एकात्मतेचे माध्यम भाषा

भारताच्या भाषानीतीचा प्रश्नही राष्ट्रीय एकात्मतेची दृष्टी ठेवून जनसंघाने हाताळला. राष्ट्रीय एकात्मता परिषदेत बोलताना सप्टेंबर १९६१ मध्ये श्री. अटलबिहारी वाजपेयींनी राष्ट्रभाषा हिंदी, प्रादेशिक भाषा व संस्कृत यांचा पुरस्कार केला होता. दीनदयाळजींनी मे १९६० मध्ये लिहिलेल्या एका लेखात जनसंघाचे भाषाविषयक धोरण विशद केले होते. इंग्रजीविषयींचे दुटप्पी व दुहेरी धोरण टाकून देऊन 'त्रिभाषा सूत्रा' ची प्रामाणिकपणे अंमलबजावणी केली पाहिजे असे म्हटले होते. त्यात म्हटले होते, "माझ्या मते सर्व दृष्टींनी त्रिभाषा धोरणच सर्वांत उपयुक्त ठरणारे आहे. तीन भाषांना एकच दर्जा देणे आवश्यक नाही. मातृभाषेला सर्वोच्च स्थान दिले गेले पाहिजे. माध्यमिक शिक्षण संपेपर्यंत मातृभाषेत शिक्षणाची व्यवस्था हवी. भारतासारख्या बहुभाषी देशात प्रत्येक विद्यार्थ्याने दोन भाषा शिकण्याची गरज आहे. सर्व भारतीय भाषांनी जर देवनागरी लिपीचा स्वीकार केला तर प्रादेशिक भाषाही शिकणे अवघड नाही. एक परकीय भाषा म्हणून इंग्रजी भाषा शिकविण्याची सोय झाली पाहिजे. रशिया, जपान, जर्मनीतही इंग्रजी मोठ्या प्रमाणात शिकतात. पण ते इंग्रजीचे गुलाम झालेले नाहीत किंवा प्रशासनाचे माध्यम म्हणून त्यांनी इंग्रजीचा स्वीकार केलेला नाही. व्यापारधंदा, शैक्षणिक माध्यम म्हणून इंग्रजी त्या देशात उपयोगात आणली जात नाही. आपण या क्षेत्रातून जर इंग्रजीची हकालपट्टी

केली तर ती फार महत्त्वाची कामगिरी ठरेल. प्रशासनात जोपर्यंत इंग्रजी आहे तोपर्यंत विद्यार्थी इंग्रजी शिकणारच. त्याऐवजी प्रादेशिक भाषा हे जर प्रशासनाचे भाषा-माध्यम झाले तर इतर भाषांपेक्षा तीच भाषा विद्यार्थी शिकतील." (ऑर्गनायझर – २८ मे १९६७)

सारांश, राष्ट्रीय एकात्मतेचा ध्यास जनसंघाने सुरुवातीपासून घेतला. संस्कृती हा भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेचा आधार आहे हे ठामपणे जनसंघाने मांडले, एवढेच नव्हे तर, राजकीय, सामाजिक, आर्थिक समस्यांचा त्या दृष्टिकोनातून सतत वेध घेतला. दीनदयाळजींच्या सर्व विचारसरणीचा गाभा राष्ट्रवाद व संस्कृतिनिष्ठा आहे. हाच दृष्टिकोन त्यांनी जनसंघाला दिला. भारताच्या सर्व समस्यांचे निदान या दृष्टिकोनातून केले. दीनदयाळजींची ही तत्त्वदृष्टी हा भारतीय राजकारणाचा चिरंतन संदर्भ आहे.

राष्ट्रवादी अर्थकारणाची आधारसूत्रे

स्वतंत्र भारताच्या समस्यांचे जे पाच प्रकार प्रारंभी सांगितले त्यांपैकीच एक म्हणजे पुनर्रचनेच्या समस्या. सामाजिक, राजकीय पुनर्रचनेप्रमाणेच आर्थिक पुनर्रचना करावयाची होती. सर्व भारताचे म्हणून काही आर्थिक प्रश्न आहेत, स्वतंत्र अर्थव्यवस्था आहे याची जाणीव न्या. महादेव गोविंद रानडे यांनी एकोणिसाव्या शतकात निर्माण केली. भारताचे दारिद्र्य व ब्रिटिश साम्राज्यशाही करीत असलेले द्रव्यशोषण ही दोन आर्थिक सत्ये आर्थिक राष्ट्रवादाच्या बुडाशी होती. गांधीजींनी खादी, ग्रामोद्योग व ग्रामोदय या नवीन संकल्पना देऊन आर्थिक राष्ट्रवादाला भारतीय अधिष्ठान दिले, पण या पुनर्रचनेत आधुनिक विज्ञान, तंत्रविज्ञान, यंत्रविज्ञान, नवी आर्थिक उपकरणे यांचा विचार करणे आवश्यक होते. नेहरूंनी आर्थिक नियोजनाचे पर्व या देशात सुरू करून जगातील अर्थकारणाशी भारतीय अर्थकारणाचा मेळ घालण्याचा प्रयत्न केला. पण हे करीत असताना रशिया व अमेरिका यांचे नमुने (मॉडेल्स) पुढे ठेवल्यामुळे भारतातील दारिद्र्य कमी न होता त्यात अंतर्गत शोषण करणारा नवा वर्ग निर्माण झाला व कोट्यवधी लोक दारिद्र्यरेषेखाली ढकलले गेले. त्यामुळे उत्पादन वाढूनही आर्थिक विषमता वाढली. समाजवादी वा कम्युनिस्ट विचारप्रणालीच्या पक्षांनी या मूलभूत आर्थिक दोषांकडे लक्ष दिले नाही. कारण उत्पादन-साधनांचे राष्ट्रीयीकरण म्हणजे समाजवाद हीच कल्पना त्यांच्या मनात घट्ट मूळ धरून बसली होती. गांधीजींचे आर्थिक सिद्धांत व त्यामागची भारताच्या

आर्थिक वस्तुस्थितीची व गरजांची जाणीव या महत्त्वाच्या गोष्टी नेहरूही विसरले व डावे पक्षही विसरले. म्हणून 'अन्धेन नीयते अन्धाः' अशी आपल्या देशाची स्थिती झाली. डॉ. लोहियांनी 'छोटे यंत्र' ही संकल्पना मांडून गांधीवादी आर्थिक विचाराला नवी दिशा देण्याचा एक प्रयत्न केला.

दीनदयाळजींनी भारताच्या अर्थकारणाला स्वदेशी, विकेंद्रीकरण, संरक्षण व विकास यांचा संयुक्त विचार, परदेशी कर्जापासून मुक्ती व आर्थिक स्वयंपूर्णता या पाच संकल्पना जनसंघाच्या माध्यमातून भारताला देण्याचा प्रयत्न केला. आर्थिक पुनर्रचनेची राष्ट्रवादी तत्त्वदृष्टीही दीनदयाळजींची देणगी समजली पाहिजे. ही देणगी म्हणजे भारतीय अर्थकारणाची चिरकालीन आधारसूत्रे समजली पाहिजेत. राजकीय पक्ष हे समाजपरिवर्तनाचे माध्यम आहे असे दीनदयाळजी समजत असत. म्हणूनच परिवर्तनाचे साधन व माध्यम म्हणून त्यांनी जनसंघाचा विचार केला. १९७७ मध्ये राजकीय गरज म्हणून जनसंघाचे राजकीय विलीनीकरण जनता पक्षात झाले असले तरी त्यांनी पुरस्कारलेली राजकीय, सामाजिक व आर्थिक आधारसूत्रे चिरकालीन समजली पाहिजेत व त्यांचा पुरस्कार करीत राहिले पाहिजे.

स्वच्छ व लोकाभिमुख प्रशासन

स्त्रीच्या जीवनात शील व चारित्र्य यांना जे महत्त्व असते तेच महत्त्व प्रशासनात निष्कलंकता व कार्यक्षमता यांना असते. भारताला स्वराज्य मिळाल्यावर त्याचे धर्मराज्य वा रामराज्य व्हावे असे स्वाभाविकपणेच लोकांना वाटले. दीनदयाळजींनी धर्मराज्याचा पुरस्कार केला याचे कारण हेच होते. जनसंघाने प्रशासनाची शुचिता व दक्षता यांचे महत्त्व वर्णन केले होते. इतर कोणत्याही राजकीय पक्षाने प्रशासनाचा पुनर्रचनात्मक व मौलिक विचार केला नव्हता. सत्ताधारी पक्षाची राजनीती हे या देशातील भ्रष्टाचाराचे मूळ आहे असे खणखणीतपणे २५ जानेवारी १९६६ रोजी जनसंघाच्या आठव्या अधिवेशनात मांडले. त्यात म्हटले होते, "राष्ट्रीय एकता, लोकशाही, स्वच्छ व दक्ष प्रशासन हे राजकीय प्रगतीचे आधार आहेत असे जनसंघ मानतो." (भा. ज. घोषणा प्रस्ताव पृ. १६५). पाण्याचे शुद्धीकरण करण्यासाठी जशी कायमची व्यवस्था लागते तसेच प्रशासनाच्या शुद्धीकरणाचे आहे. राज्यकर्ता पक्ष बदलला तरी तो स्वच्छ प्रशासन देईल अशी खात्री नसते. कारण प्रशासन माणसे चालवितात आणि माणसे लोभाने केव्हाही भ्रष्टाचारी होऊ शकतात.

तेव्हा शुद्धीकरणाची प्रक्रिया निरंतर चालू ठेवावी लागते. या दृष्टीने कोणतीही राज्यपद्धती असली तरी प्रशासनाचे शुचिता, दक्षता व लोकाभिमुखता हे मौलिक गुण आहेत.

लोकशाहीची आचार-संहिता

लोकशाही ही जीवनपद्धती आहे, नुसती राज्यपद्धती नाही. त्यामागे सामाजिक विचार आहे, समाजनिष्ठा आहे. भारताने लोकशाहीचा स्वीकार केला खरा, पण तो औपचारिक लोकशाहीचा (फॉर्मल डेमॉक्रसी) स्वीकार होता. समाजनिष्ठ व्यक्ती निर्माण न होता लोकशाही सत्ता आल्यामुळे समाजात जो जातिवाद, व्यक्तिवाद होता, त्यांचे हाती ती सत्ता गेली. काँग्रेसकडे सत्ता गेली, समाजातील संघटित स्वार्थी गटांनी ती बळकावली. सत्तेला सामाजिक ध्येय राहिले नाही. म्हणून दीनदयाळजींनी जनसंघ हा सामान्य जनांचा (Common Man) पक्ष झाला पाहिजे असे सुरुवातीलाच सांगितले. भारतीय राजकारण हे समाजनिष्ठ राहिले नसून व्यक्तिनिष्ठ झाले आहे अशी टीका ते करीत. जनसंघाच्या राजकारणात सामान्य माणूस हे आपले दैवत झाले पाहिजे, हा दीनदयाळजींचा जनसंघीयांना संदेश होता.

त्यामुळे राजकीय पक्ष केवळ सत्तार्जनाचे साधन न होता लोकसेवेचे व व परिवर्तनाचे माध्यम झाले पाहिजे हा त्यांचा आग्रह असे. कारण काँग्रेसच्या सत्तासंस्कृतिपेक्षा वेगळी राजकीय संस्कृती निर्माण करणे दीनदयाळजींचे उद्दिष्ट होते.

या ध्येयनिष्ठ दृष्टिकोनामुळे राजकीय पक्ष हे केवळ सत्तास्पर्धेतले स्पर्धक न होता लोकसेवेतील स्पर्धक व्हावेत असे दीनदयाळजींना वाटे. सारांश, राजकारणाचे व्यक्तिवादी व सत्तावादी स्वरूप पूर्णतया बदलून जनवादी व राष्ट्रवादी दिशा जनसंघाने द्यावी हे दीनदयाळजींचे राजकीय उद्दिष्ट होते. असे स्वरूप जर राजकारणाला मिळाले तरच ते मूल्यवादी व सत्तानिरपेक्ष होईल असा दीनदयाळजींचा मुख्य राजकीय विचार होता.

राजकीय पक्ष हे लोकसेवेचे, सामाजिक पुनर्रचनेचे साधन झाले तरच पक्षीय राजकारणाचे स्वरूप पालटेल असे दीनदयाळजींना वाटे. या त्यांच्या भूमिकेमुळेच त्यांनी राजकीय पक्षाची आचारसंहिता हवी अशी सूचना केली होती. राजकीय पक्ष ही राजकीय जमात होत होती ही दीनदयाळजींची खंत

होती. या राजकीय जातिवादातून राजकीय अस्पृश्यता निर्माण होते असे ते म्हणत. राजकीय पक्ष मुक्त विचाराचा, पण शिस्तबद्ध, ध्येयवादी, व जनवादी असावा हे त्यांनी जनसंघ या धर्तीवर संघटित करून दाखवून दिले. लोकशाहीचा नुसता प्रबंध त्यांनी लिहिला नाही तर आदर्श राजकीय पक्ष निर्माण केला. गांधीजींनी काँग्रेसचे विसर्जन करून 'लोकसेवक संघात' रूपांतर करा अशी सूचना केली. काँग्रेसचे विसर्जन तर झाले नाहीच पण तो सत्ता-बुभुक्षितांचा पक्ष बनला. दीनदयाळजींनी जनसंघाला सत्तावादी पक्ष होऊ न देता लोकपक्षाचे रूप देण्याचा प्रयत्न केला.

लोकशाहीचे भारतीय स्वरूप

दीनदयाळजींच्या राजकीय श्रद्धांपैकी राष्ट्रवाद व लोकशाही या दोन श्रद्धा पायाभूत होत्या. या दोहोंच्या आधारे, पाश्चात्य अर्थ पूर्णपणे न स्वीकारता त्यांनी त्यांना भारतीय अर्थ देण्याचा प्रयत्न केला. कारण 'भारतीयो भूत्वा भारतं यजेत्' भारतीय होऊन भारताची सेवा करा हे त्यांच्या जीवन-तत्त्वज्ञानाचे सार होते.

भारताने संसदीय लोकशाहीचा स्वीकार केल्यावर पाश्चात्य विचाराचा प्रतीक असलेला, पाश्चात्य विचारप्रणालीचा संवाहक पक्ष म्हणून भारतात राजकीय जीवन संघटित न करता अस्सल भारतीय मतांशी इमान राखणारा, भारतीय जीवनमूल्यांच्या आधारे पुनर्रचना करणारा राजकीय पक्ष म्हणून जनसंघ संघटित करावा हे त्यांचे ध्येय होते. लोकशाहीचे भारतीय स्वरूप या पक्षाच्या माध्यमातून दीनदयाळजींना लोकांपुढे ठेवावयाचे होते.

म्हणून दीनदयाळजींनी प्रथमपासून इतर राजकीय पक्षांशी सख्यत्वाचे संबंध जोडावेत असा प्रयत्न केला. त्यासाठी अनेक नवे उपक्रम त्यांनी सुरू केले, सुचविले व नव्या संकल्पना रूढ करण्याचा प्रयत्न केला. उदाहरणार्थ, पं. नेहरू हे काँग्रेसचे अध्यक्ष झाल्यावर त्यांना पत्र लिहून अशी सूचना केली की, प्रत्येक पक्षाने आपल्या अधिवेशनासाठी निरीक्षक म्हणून इतर पक्षांचे काही प्रतिनिधी बोलाविण्याची प्रथा पाडावी. दुसरे असे की प्रत्येक पक्षाने आपली विचारसरणी व कार्यक्रम निश्चित करून एक आचारसंहिता तयार करावी. तिसरी सूचना अशी की सार्वजनिक निवडणुकीमध्ये राष्ट्रीय समस्यांचा विचार केला जावा व त्या सोडविण्याचा आपला मार्ग मतदारांपुढे प्रत्येक पक्षाने

मांडावा. दोन निवडणुकींच्या मधील मध्यंतरात जनतेचे प्रश्न सरकारपुढे मांडण्यासाठी निवेदने इत्यादी लोकशाही माध्यमे लोकशाहीमध्ये पुरेशी परिणामकारक व्हावीत. आंदोलने झाली तर त्यासाठी सत्तारूढ सरकारने आंदोलकांशी चर्चा करावी व आंदोलनांचीही एक आचारसहिता असावी. हिंसा टाळावी. कच्छ-कराराच्या निषेधार्थ दीनदयाळजींनी जो मोर्चा दिल्लीत संघटित केला होता तो त्यांच्या शिस्तबद्ध निषेधतंत्राचा नमुना होता. चौथी सूचना, निवडणुकीसाठी निधी उभा करतानाही कार्यकर्त्यांनी प्रत्येक मतदारसंघात पैसा जमवावा, असा दीनदयाळजींचा आग्रह असे. पाचवी संकल्पना म्हणजे पक्ष-संघटनेचे, पक्ष-कार्यकर्त्यांचे राजकारणातील स्थान उंचावणे. असे अनेक उपक्रम करून किंवा करावयास सुचवून भारतीय लोकशाहीला स्वतंत्र घाट (पॅटर्न) देण्याचा प्रयत्न दीनदयाळजींनी जनसंघाच्या द्वारे केला. आजही हे सर्व प्रयत्न चालू ठेवण्यासारखे आहेत. किंबहुना विधायक लोकशाही वृत्तीचा विरोधी-पक्षनेता ही दीनदयाळजींची प्रतिमा व भारतीय लोकशाहीचे भारतीयपण दाखविणाऱ्या त्यांच्या संकल्पना आजही आचरणीय आहेत.

स्वतंत्र परराष्ट्र नीती

दीनदयाळजी सर्व क्षेत्रांत भारताने स्व-तंत्राने चालले पाहिजे असे म्हणत. आर्थिक नियोजनाबाबत त्यांनी स्वदेशी नियोजनाचा जसा पुरस्कार केला तसाच स्वतंत्र परराष्ट्र-नीतीचा आग्रह ते धरत असत. पाकिस्तानबाबतची त्यांची भूमिका जशी भारतनिष्ठ तशीच अमेरिका व रशिया या दोन सत्ता-गटांविषयीचीही होती. जनसंघ हा अमेरिकेला अधिक अनुकूल आहे असा समज प्रसृत करण्याचा प्रयत्न चालू होता. दोन्ही लोकशाही राष्ट्रे असल्याने अमेरिकेबद्दल 'नरम' धोरण ठेवावे असे जनसंघातील काही लोकांना वाटे हे खरे आहे. यासंबंधी आपली भूमिका स्पष्ट करताना दीनदयाळजी म्हणत, "अमेरिकेला भारतातील लोकशाहीचे संरक्षण करण्यापेक्षा जगात आपले वर्चस्व वाढविण्यात जास्त रस आहे. म्हणून भारताचा एक सत्ता म्हणून विकास होऊ नये असेच प्रयत्न ती करील.' (श्री. दीनदयाळ उपाध्याय – ए प्रोफाइल – जगदीश प्रसाद माथूर यांचा लेख, पृष्ठ ६३.)

तिबेटवर चीनने आक्रमण केले त्या वेळी तिबेटच्या स्वातंत्र्याचा दीनदयाळजींनी पुरस्कार केला. तेव्हा त्यांनी सांगितले होते, "स्वतंत्र तिबेट हा आशियातील शांततेसाठी आवश्यक आहे. ज्यांना भारताने याबाबत नमते धोरण

पत्करावे असे वाटते त्यांना दोन समान राष्ट्रांतील स्नेहाचे संबंध नको असून कम्युनिस्टांची गुलामी पत्करावी असे वाटते. असे वाटणे हा देशद्रोह आहे." (ऑर्गनायझर – २५ मे १९५९). याच विषयावर लोकसभेत भाषण करताना श्री. अटल बिहारी वाजपेयींनी सांगितले होते, "आम्हाला चीनच्या अंतर्गत कारभारात ढवळाढवळ करावयाची नाही. पण तिबेटचे स्वातंत्र्य ही मागणी ही चीनचा अंतर्गत प्रश्न नाही असे आमचे स्पष्ट मत आहे. मी एका लहान पक्षाचा प्रतिनिधी आहे. पण तिबेटच्या स्वातंत्र्याला आमचा पूर्ण पाठिंबा आहे (ऑर्गनायझर २५ मे १९५९). जनसंघ हा त्या वेळी लहान पक्ष होता, पण प्रखर राष्ट्रवादी धोरणामुळे त्याला राजकीय गोटात मान्यता होती. राष्ट्रवादी दृष्टीतून परराष्ट्र-नीतीकडे पहाण्याचा त्याचा सतत प्रयत्न असे. जनसंघाने भारतीय राजकारणात अलिप्ततावादी, प्रखर राष्ट्रवादी (Non-aligned nationalist approach) भूमिकेमुळे स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले हे निःसंशय.

हिंदु-विरोधी पूर्वग्रहाचे खच्चीकरण

पाकिस्तानची मनधरणी व भारतीय मुसलमानांबद्दल नरमाईचे, किंबहुना, त्यांचा जातीयवाद पोसणारे धोरण हे नेहरू-नीतीचे वैशिष्ट्य होते. हिंदू विचार, हिंदू हित व हिंदू संस्कृती यांना बहुसंख्य हिंदू असलेल्या या देशात त्यांचे न्याय्य स्थान स्वतंत्र भारताच्या राज्यकर्त्यांनी कधीही दिले नाही. उलट ते हिंदू विचार व हिंदू आचार हा चेष्टेचा विषय करीत होते व आहेत. गांधीजी स्वतःला सनातनी हिंदू म्हणत, पण त्यांना जातीय म्हणण्याचे धाडस कोणी केले नाही. या सर्व काँग्रेसी सेक्युलरवादाचा परिणाम राजकारणावर झाला. 'हिंदू' या शब्दाबद्दल एक प्रकारची राजकीय घृणा निर्माण झाली. जनसंघाच्या असंख्य कार्यकर्त्यांचे वैचारिक कुल रा. स्व. संघ हे असल्याने त्यांनाही हिंदु-विरोधी राजकीय पूर्वग्रहाशी व अस्पृश्यतेशी सामना करावा लागला. जनसंघाने काही प्रमाणात या सामन्यात यश मिळविले आणि जनसंघाला 'हिंदू राष्ट्रवादी पक्ष' असे खोचकपणे सेक्यूलर भारतीय व पाश्चात्य राजकीय समीक्षक जरी म्हणत असले, तरी त्याचे राष्ट्रवादी स्वरूप मान्य होऊ लागले. दीनदयाळजींनी रा. स्व. संघाशी त्यांचा असलेला संबंध कधीही सोडला नाही. (त्यांचे निधन दि. ११ फेब्रुवारी १९६८ या दिवशी झाले. त्यांचा रा. स्व. संघातील शेवटचा बौद्धिक वर्ग दि. ४ फेब्रुवारी १९६८ रोजी

उत्तरप्रदेशात बरेली येथे झाला.) सारांश, जनसंघामुळे हिंदु-हित-विरोधी काँग्रेसी राजकारणाला आळा बसला. भारतीय राजकारणात हिंदुहिताची उपेक्षा करून चालणार नाही, हिंदू विचार हा सर्वांगीण पुनर्रचनेचा आधार होऊ शकतो हे दीनदयाळजींनी सिद्ध केले.

शिस्तबद्ध पक्ष, शिस्तबद्ध राष्ट्र

सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट म्हणणे ' शिस्तबद्ध पक्षच राष्ट्रात शिस्त निर्माण करू शकतो ' हा सिद्धांत भारतात लोकशाही यशस्वी करण्यासाठी महत्त्वाचा आहे. १९५७ सालच्या निवडणूक–दौऱ्यात आंध्रमध्ये असताना दीनदयाळजींना तेथील जनसंघाच्या कार्यकर्त्यांनी सांगितले की " जनसंघाला संसदीय राजकारणाबाहेर ठेवण्यासाठी ' राष्ट्रीय पक्ष ' म्हणून मान्यता मिळविण्यासाठी लागणाऱ्या किमान मतांची टक्केवारी वाढवून घेण्याचा काँग्रेस प्रयत्न करीत आहे. आपण त्याला विरोध केला पाहिजे. " तेव्हा दीनदयाळ शांतपणे म्हणाले, " आपण विरोध करणार नाही. त्यांना पाहिजेत तेवढी मते आपण मिळवून मान्यता मिळवू. " " काँग्रेसने मुस्लीम लीगशी समझोता केला आहे. आपण तसे का करू नये ? " असे कार्यकर्त्यांनी सुचविले तेव्हा दीनदयाळजी म्हणाले, " आपण मतांसाठी काँग्रेससारखा सौदा करणार नाही. काँग्रेसने स्वतःच्या राजकीय हेतूसाठी हिंदु–मुसलमानांतला भेदभाव वाढविला आहे. आपण निश्चितपणे जातीय नाही. काँग्रेस जातीय आहे. बिगर-हिंदूंशी, ते राष्ट्रनिष्ठ असले तर आमचे मतभेद नाहीत. आपण मुसलमानांत राष्ट्र-भावना वाढीस लावली पाहिजे. त्यांच्याशी मैत्री केली पाहिजे. पण आपण मतासाठी काही करणार नाही. वाटेल ते होवो आपण शिस्त मोडणार नाही. ' राजकारणात सर्व काही क्षम्य असते ' हा समज आपण खोटा ठरवू. राज-कारणातही शिस्त असू शकते हे सिद्ध करण्यासाठीच जनसंघ राजकारणात आला आहे." (दीनदयाळ उपाध्याय- ए प्रोफाइल– पृष्ठ १२६).

जनसंघाने राजकारणात शिस्त आणण्यासाठी किती संयम पाळला होता हेच दीनदयाळजींच्या या उद्‌गारांचे मर्म आहे. ' कार्यकर्त्यांचा पक्ष ' असे जनसंघाचे वर्णन केले जाई. कारण नेता आणि अनुयायी असा प्रकार तेथे नव्हता. ध्येयवादाचे व राष्ट्राचे सेवक असा समानतेचा दर्जा त्यात होता. त्या मुळे लोकशाही म्हणजे गोंधळ, गावगुंड असे काँग्रेसी राजकारणाने निर्माण केलेले समीकरण जनसंघाने बदलले व राजकीय कार्यकर्त्याला राजकीय

पक्ष-संघटनेत मानाचे व कर्तृत्वाचे स्थान मिळवून दिले. त्यामुळेच मूल्याधिष्ठित राजनीती ही कविकल्पना न राहाता व्यवहार्य कल्पना ठरली. त्यासाठी जनसंघाला राजकीय निंदा सहन करावी लागली, तरी राजकारणात सभ्यता व वचनबद्धता असू शकते हे त्याने सिद्ध केले. भारतीय राजकारणाचे गुणात्मक रूप जनसंघाच्या रूपाने जनतेला दिसले. दीनदयाळजी हे या नव्या गुणात्मक परंपरेचे शिल्पकार होते.

तेव्हा भारतीय तत्त्वदर्शन, भारतनिष्ठ नीती, सामान्य माणसाशी इमान व मूल्यनिष्ठ राजनीती ही जनसंघाची भारतीय राजकारणाला देणगी होती व या सर्वांचे प्रेरणास्थान दीनदयाळजी होते. म्हणून दीनदयाळजींच्या निधनानंतर त्यांचे परममित्र व सहकारी श्री. सुंदरसिंग भंडारी यांनी म्हटले होते की, "डॉ. मुखर्जींनी जनसंघाची स्थापना केली व दीनदयाळजींनी त्याची प्राणप्रतिष्ठा केली," हे अक्षरशः खरे आहे.

• • •

९

दीनदयाळजींचा वारसा

भारताच्या राजकारणात त्याच्या सनातन संस्कृतीचे आधुनिक रूप दाखविणे हे दीनदयाळजींच्या राजकीय जीवनाचे उद्दिष्ट होते. नियतीने अचानक घाव घालून ते जीवन तोडले. नंतर दीनदयाळजींचे अंत्यदर्शन घेण्यासाठी श्री-गुरुजी गेले होते. अंत्यदर्शनासाठी जमिनीवर ठेवलेले दीनदयाळजींचे शव दिल्लीस घेऊन जाण्यासाठी विमानात ठेवण्यात आले. श्रीगुरुजींना राहवले नाही. पुन्हा विमानात जाऊन त्यांनी दीनदयाळजींचे अंतिम दर्शन घेतले. तेव्हा त्यांच्या तोंडून जे उद्‌गार निघाले 'मेरा सब कुछ चला गया' (जनसंघाचे कार्यालय-प्रमुख श्री. जगदीश प्रसाद माथूर यांनी सांगितलेली आठवण) त्यात एका स्थितप्रज्ञाची आर्तता होती. जनसंघाच्या व रा. स्व. संघाच्या हजारो कार्यकर्त्यांचे दुःख व दीनदयाळजींच्या क्रूर हत्येने झालेल्या त्यांच्या वेदना या उद्‌गारांत व्यक्त झाल्या, पण श्रीगुरुजींनीच आपल्या शोक-संदेशात त्या वेळी म्हटल्या-प्रमाणे, "संघाने निर्माण केलेल्या परंपरेतून आणखी नररत्ने पुढे येतील व दीनदयाळजींचा वारसा पुढे चालवितील."

हा दीनदयाळजींचा वारसा कोणता ? आणि तो पुढे चालवावयाचा म्हणजे काय करावयाचे ? राजकारणात सत्तेचा वारसा मिळविण्यासाठी कपट-कारस्थाने केली जातात, कट होतात, पण दीनदयाळजींचा वारसा हा शुद्धाचरणाचा, त्यांना अभिप्रेत असलेल्या नव्या राजकीय संस्कृतीचा, तत्त्वाग्रही राजकारणाचा वारसा आहे. सध्या भारताचे जे राजकीय चित्र आहे ते बदलण्यासाठी व भारताच्या ज्या न सुटलेल्या समस्या आहेत त्या

सोडविण्यासाठी दीनदयाळजींनी दिलेल्या तत्त्वविचारांचा, तत्त्वदृष्टीचा उपयोग होईल का याचा विचार केला पाहिजे. भारताच्या न सुटलेल्या समस्या कोणत्या? त्या सोडविण्यासाठी दीनदयाळजींच्या राजकीय विचारांचा व व्यक्तित्वाचा उपयोग होईल काय ? हा दुसरा प्रश्न आहे. या संबंधात आपले कार्य कोणते? हा तिसरा प्रश्न. दीनदयाळजींची कृतिशील परंपरा पुढे चालवावयाची तर या तीन प्रश्नांची उत्तरे शोधली पाहिजेत.

राष्ट्रीय एकात्मतेचे अधिष्ठान

भारतीय राष्ट्र हे नवीन निर्माण झालेले राष्ट्र नाही. एका प्राचीन संस्कृतीचा पाया असलेल्या भारताचा फक्त नवा आविष्कार झाला आहे. ज्या संघकुलातून दीनदयाळजी राजकारणात आले त्याचा हा आद्य सिद्धांत आहे. आजही भारताच्या राष्ट्रजीवनात संघर्ष, तणाव, फुटीरता आदी सर्व राष्ट्रबाधक गोष्टी आहेत. 'एक देश, एक जन, एक संस्कृती' या राष्ट्र-कल्पनेला हादरा देणाऱ्या घटना प्रत्यही घडत आहेत. सुजाण लोक एकमेकांना हा प्रश्न विचारीत असतात. भारत कोठे चालला आहे ? भूकंपाचे हादरे बसत असताना लोकांची जी भयाकुल मनःस्थिती असते तशी काहीशी आज भारतीयांची अवस्था आहे. अशा अवस्थेत असताना 'हा समाज एकाच सांस्कृतिक परंपरेने बांधलेला आहे, हा देश व हे राष्ट्र एक आहे ही भावना हेच आपल्या राष्ट्रीय एकात्मतेचे अधिष्ठान आहे,' असा आत्मबोध देणारी सांस्कृतिक एकतेची चळवळ करणे हाच या राष्ट्रात आत्मविश्वास निर्माण करण्याचा एकमेव मार्ग आहे.

पण गेल्या ३५ वर्षांच्या आत्मविस्मृत राष्ट्रीय, आर्थिक व सामाजिक धोरणांमुळे या भारतीय समाजाचे विभाजन झाले आहे. समृद्धी वाढली तरी दारिद्र्यही वाढले आहे. आर्थिक विषमताही वाढली आहे. विसंगती व विरोधाभास ही भारतात जितक्या तीव्रतेने भासतात तसे इतर देशांत होत नाही. पंचतारांकित संस्कृती व झोपडपट्टीतील संस्कृती हे आज भारतात दिसणाऱ्या विसंगतीचे भीषण दर्शन आहे. या संस्कृतीने आपली सामाजिक संवेदनक्षमता बोथट केली आहे. दीनदयाळजी हे भारताच्या पुनर्रचनेचा सतत विचार करणारे संवेदनाशील नेते होते.

आजच्या बोथट झालेल्या सामाजिक संवेदना पुन्हा जागृत करण्यासाठी नुसते आर्थिक तत्त्वज्ञान वा समृद्धीच्या भौतिक प्रेरणा पुऱ्या पडणार नाहीत.

'बुडती हे जन । देखवे न डोळा' अशा प्रकारची सामाजिक करुणा त्यासाठी हवी. दीनदयाळजींनी मानव हा आर्थिक प्राणी आहे, या सिद्धांताला व व्यक्ति-स्वातंत्र्य हिरावून घेणाऱ्या साम्यवादाला विरोध करून एकात्म मानववादी अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला होता तो याचसाठी. प्रत्येकाला मत हे जसे राजकीय लोकशाहीचे गमक मानले जाते तसे प्रत्येक हाताला काम व त्याला उचित दाम हे आर्थिक लोकशाहीचे मार्गदर्शक सूत्र आहे. दीनदयाळजींच्या आर्थिक तत्त्वज्ञानाचे हे सार आहे.

धर्मराज्य हवे

आज या देशात सामाजिक नीतिमत्ता उरलेली नाही. राजकीय नैतिकता तर नाहीच, पण घटनात्मक नैतिकताही लयास जात आहे. राजकारण हे फक्त सत्ताकारण झाले आहे. अधर्म हाच आजचा धर्म झाला आहे. अशा स्थितीत नुसती आर्थिक समृद्धी हा शाप ठरेल. दीनदयाळजी एकदा म्हणाले होते. 'लंकेत सोन्याच्या विटा असतील पण तेथे रामराज्य असणार नाही.' त्यांना धर्मराज्य हवे होते. धर्मराज्य म्हणजे नीतीचे राज्य. राजकारणावर धर्माचे म्हणजे नीतीचे नियंत्रण हवे ही भारताची प्राचीन परंपरा आहे. त्या धर्माची पुनःस्थापना झाल्याविना समाज सुखी व निर्भय होणार नाही. धर्म म्हणजे विशिष्ट मत वा संप्रदाय नव्हे, तर समाजाचे धारण करणारा तो धर्म अशी हिंदू परंपरेतील धर्माची व्याख्या आहे. ही धर्मतत्त्वे सनातन व अपरिवर्तनीय असतात. कारण ती नैतिक आचरणाची तत्त्वे असतात. भारतात अशा नैतिक राज्याची निर्मिती झाल्याविना येथे सुख-समाधान नांदणार नाही.

निःसंग नेतृत्वाची गरज

भारताचे प्रश्न केवळ राजकीय, सामाजिक, आर्थिक वा सांस्कृतिक नाहीत तर या सर्व प्रश्नांची सोडवणूक करणारी जीवनमूल्ये समाजामध्ये प्रस्थापित व्हावयास हवी आहेत. तेव्हा हा मूल्यविचार व मूल्य-निर्णय हा मुख्य प्रश्न आहे. मूल्ये ही रक्तदाबासारखी समाजजीवनाचे संतुलन करतात. आज हे अंतर्गत संतुलन बिघडले आहे. त्यामुळे अस्वस्थता आहे, बेचैनी आहे. समाज भरकटल्यासारखा वागतो आहे. राजकीय हिंसाचार वाढला आहे. स्त्रीचे शील असुरक्षित आहे. विद्येची, ज्ञानाच्या पवित्र समजल्या जाणाऱ्या क्षेत्रांची बाजारपेठ झाली आहे. या सर्वांचे मूळ कारण राजकारणातील भ्रष्टाचार हे आहे. म्हणून राजकारणात गुणात्मक परिवर्तन झाल्याविना चांगल्या लोकांनी चालविलेले

सुराज्य निर्माण होणार नाही. हे घडवून आणावयाचे असेल तर निःसंग, सत्ता-निरपेक्ष राजकीय नेतृत्व निर्माण झाले पाहिजे. दीनदयाळजी हे अशा राजकीय नेतृत्वाचे आदर्श होते. 'राजा हा राज्याचा उपभोगशून्य स्वामी आहे.' हा त्रिकालाबाधित सिद्धांत आहे. लोकशाही स्वतंत्र करण्यासाठी अशा स्वार्थ जाळून कृतार्थ होणाऱ्या राजकीय नेतृत्वाची गरज आहे. अर्थात् असे साधू मोठ्या प्रमाणात निर्माण होणार नाहीत हेही खरे. पण सर्व शरीरात शुद्ध रक्ताचा पुरवठा करणारे हृदय लहानच असते. असे सत्तानिरपेक्ष राजकीय नेतृत्व राजकारणात हृदयाचे कार्य करते. दीनदयाळजींचा हा वारसा आहे. तो सांभाळणे कठीण असले तरी सांभाळणे आवश्यक आहे.

लोकशाहीचा आचारधर्म

भारतीय लोकशाहीचे संस्थात्मक स्वरूप संसद, विधानसभा, जिल्हा व ग्रामपंचायती हे आहे. पण गेल्या ३५ वर्षांचा या संस्थांचा कारभार, त्यांची निर्मिती व उपयोग यांचा अभ्यास केल्यास दोन निष्कर्ष निघतात. एक जात व जमात यांच्या हिताचे रक्षण व त्यांच्या नेत्यांचा वैयक्तिक लाभ यांच्यासाठीच लोकशाही सत्तायंत्रणा राबविली जात आहे. दुसरा निष्कर्ष असा की एकात्म, एकजिनसी भारतीय समाज निर्माण होण्याऐवजी अंतर्भग्न, विभक्त, स्वार्थी समाजच यातून निर्माण होत आहे व समाजातील विविध सत्तागटांची सत्ता-स्पर्धा म्हणजे भारताचे आजचे राजकारण झाले आहे. त्यामुळे आपले राजकारण नावाला सिद्धांतवादी व व्यवहारतः संधिसाधूंचे सत्ताकारण झाले आहे. लोकशाहीचे हे मूल्यभ्रष्ट रूप आहे. दीनदयाळजींनी सांगीतलेला 'सामान्य मनुष्य हे भारतीय राजकारणाचे आराध्य दैवत झाले पाहिजे' हा निकष लावून सध्याच्या राजकारणाला लोककारणाचे अधिष्ठान दिले पाहिजे. आपल्या राज्यघटनेच्या पहिल्या संकल्पात (प्री-ॲम्बल) 'आम्ही भारतीय जन' असे शब्द-प्रयोग आहेत. त्याचबरोबर ही राज्यघटना 'भारतीय जनतेने स्वतःला अर्पण केली आहे.' याचा अर्थ ती 'स्वयं स्वीकृतम्' स्वतः आचरण्यासाठी स्वतः निर्माण केलेली आहे. तेव्हा ती घटना, तिने निर्माण केलेली सत्ता-रचना, तिच्या कार्यवाहीसाठी प्रतिज्ञाबद्ध असलेले शासन व ते शासन लोकहितासाठी वापरले जाईल या ध्येयवादाने व राजकारणात अस्तित्वात असलेले राजकीय पक्ष हे सर्व लोकांसाठी आहे. ही जाणीव सतत जागृत राहिली तरच भारतीय लोकशाही ही लोकशाही राहील. नाहीतर सत्तालोलुपांच्या कळपांच्या ताब्यात गेलेली ती

निवडणुकीच्या नाटकातून निर्माण होणारी सत्तायंत्रणा होईल.

दीनदयाळजींनी राजकीय पक्ष व जनता यांचे संबंध स्पष्ट करून सांगितले होते. ते म्हणाले होते, "तुम्ही लोकशाहीवादी असाल तर स्वतः सदसद्‌विवेकबुद्धीच्या आदेशाप्रमाणेच वागा, इतर कोणतेही प्रमाण मानू नका. राजकीय पक्ष हे जनतेचे प्रतिनिधी म्हणून निर्माण केले जातात. लोकशक्ती हाच त्यांचा आधार असतो. लोकांनीच त्या पक्षांना सामर्थ्य द्यावयाचे असते. लोक हेच राजकीय पक्षांचे शिल्पकार असतात व आपल्या राजकीय भवितव्याची निर्मिती पक्षाच्या माध्यमातून लोकच करीत असतात. म्हणून राजकीय पक्ष हा नुसता सत्ताबुभुक्षितांचा मेळावा असत नाही. ती ध्येयवादी, समर्पित व्यक्तींची व विशिष्ट विचारप्रणालीसाठी प्रयत्नशील राहणारी, सांघिक अस्तित्व असलेली, शिस्तबद्ध संघटना असते." लोकशाहीचा व्यवहार व आचारधर्म कसा असला पाहिजे यासंबंधीचे दीनदयाळजींचे हे विचार भारतात आज असलेल्या व पुढे येणाऱ्या राजकीय पक्षांना मार्गदर्शक ठरावेत इतके मौलिक आहेत.

राजकारण हे राष्ट्रासाठी

भारतीय राजकारणाला लोककारणाचा पाया जसा असला पाहिजे तसेच राजकारण हे राष्ट्रासाठी असले पाहिजे, हा दुसरा सिद्धांत आहे. राष्ट्रकारण हे राजकाणाचे अंतिम साध्य असले पाहिजे. १९६२ व १९६५ साली भारत-चीन, भारत-पाक यांच्याशी झालेल्या युद्धाचे वेळी जनसंघाने सरकारला सहकार्य दिले हे त्यांच्या पक्षातील राष्ट्रभक्तीचे उत्तम उदाहरण होते. राष्ट्रहित हे पक्षहितापेक्षा नेहमी श्रेष्ठ मानले पाहिजे. हा दंडक दीनदयाळजींनी घालून दिला होता. जसे व्यक्तीने स्वहितासाठी राष्ट्रहितावर निखारे ठेवू नयेत तसेच पक्षानेही करू नये म्हणून राष्ट्र हा दीनदयाळजींच्या राजकारणाचा केंद्रबिंदू होता. स्वराज्याचे कोणतेही धोरण राष्ट्रहित ध्यानात घेऊनच ठरविले पाहिजे हा दीनदयाळजींचा मार्गदर्शक सिद्धांत होता. म्हणूनच त्यांच्या सर्व विचाराला राष्ट्रवादी बैठक आहे.

स्वदेशी आणि विकेंद्रीकरण

भारतीय जनसंघ स्वातंत्र्यानंतर भारतात जन्मला. परंतु स्वातंत्र्य-आंदोलनातील चार मार्गदर्शक सूत्रांचा त्याने व्रत म्हणून स्वीकार केला. ती चार मार्गदर्शक ध्येयसूत्रे – एकात्म राष्ट्रवाद, लोकशाही, सामाजिक समता आणि

स्वदेशी. भारतीय राष्ट्रजीवनाची ही चार ध्येयसूत्रे चिरंतन स्वरूपाची आहेत. दीनदयाळजींचा राजकीय, आर्थिक विचार या ध्येयसूत्रांना आत्मसात करणारा विचार आहे. दीनदयाळजींनी म्हटले आहे. "स्वदेशी व विकेंद्रीकरण या दोन शब्दांत आजच्या परिस्थितीला उपयुक्त ठरणाऱ्या अर्थनीतीचे वर्णन करता येईल." आज 'स्वदेशी' ही प्रतिगामी व कालबाह्य कल्पना झाली आहे. आपण मोठ्या गर्वाने परदेशी मदत स्वीकारतो. विचारात, व्यवस्थापनात, भांडवलात, उत्पादनात सर्वत्र परकीय मदत आपण घेतो. उपभोग्य वस्तूंच्या खपाचा (Consumption) आदर्श परकीयच ठेवतो. हा आपल्या प्रगतीचा व विकासाचा मार्ग निश्चित नव्हे. स्वत्वाचे विस्मरण घडविणारी ही गुलामी वृत्ती आहे. तिचे आपण दास बनत चाललो आहोत. खरे म्हणजे स्वदेशीच्या संकल्पनेत जी विधायक बाजू आहे ती आपल्या अर्थकारणाची कोनशीला व्हावयास हवी."

आज समाजवाद हे सर्वभक्षी राज्यवादाचे (स्टेटिझम) दुसरे नाव झाले आहे. दारिद्र्य निवारणाच्या योजना या शासनाची गुलामी लादणाऱ्या योजना होत आहेत. अशा वेळी पंचायतराज्य व विकेंद्रित अर्थव्यवस्था यामुळेच व्यक्तिस्वातंत्र्य, व्यक्तिप्रतिष्ठा, लोकशाही यांचे संरक्षण होऊ शकेल. गरजा वाढविणारे अर्थकारण भारतासारख्या देशाला उपयोगी नाही. तसेच सत्तेचे केंद्रीकरण करणारी राज्यव्यवस्थाही चालणार नाही. दीनदयाळजींचा राजकीय व आर्थिक वारसा या दोन संकल्पनांत आहे. लोकशाहीच्या सत्तारचनेचा ताबा सैनिकी व स्वार्थी राजकीय गटांच्या ताब्यात जाण्याचा धोका भारतात निर्माण झाला आहे. अशा वेळी लोकमत या दोन संकल्पनांभोवती संघटित करून जनशक्ती प्रतिकारासाठी संघटित करणे हाच एकमेव लोकशाही-रक्षणाचा मार्ग आहे.

संक्रमणकालीन राजनीती

लोकशाहीचे झुंडशाहीत रूपांतर होण्याची शक्यता निर्माण झाली असता काय करावयाचे हा खरा भारतापुढे आज प्रश्न आहे. निरंकुश सत्तावाद विरुद्ध सुजाण-नीतिमान लोकशाही असा हा संघर्ष आहे. यात लोकमताला नरसिंह रूप धारण करावे लागेल. भारतीय औपचारिक लोकशाहीला हे दिव्य करावे लागणार आहे. यासाठी संमिश्र सरकार बनविताना दीनदयाळजींनी स्वीकारलेले धोरण अवलंबिण्याची आज गरज आहे. त्या धोरणामागे दोन

तत्त्वे होती. एक, राजकीय अस्पृश्यतेची भावना टाकून मर्यादित सहकार्याचे धोरण स्वीकारणे. दुसरे तत्त्व, लोकांनी काँग्रेसला सत्ताच्युत केले ते त्यांना काँग्रेसेतर पक्षांचे सरकार हवे म्हणून. तेव्हा काँग्रेसकडे पुन्हा सत्ता जाईल असे कोणतेही कृत्य करणे हा लोकद्रोह ठरेल. त्यासाठी काँग्रेसेतर पक्षांनी लोकहिताचा सर्वसामान्य कार्यक्रम तयार करून त्याची अंमलबजावणी करणारे सरकार निर्माण केले पाहिजे. काँगेसविरोध हे राजकारणाचे रचनात्मक तत्त्वज्ञान होऊ शकत नाही. राष्ट्रवादी लोकशाही पक्षांचे काँग्रेसविरोधी ऐक्य हे काँग्रेसला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी आवश्यक आहे. पण ते सहकार्य कार्यक्रमावर आधारले पाहिजे. संयुक्त आघाडीपेक्षा संमिश्र सरकार अधिक टिकाऊ ठरेल. आता भारतात संमिश्र मंत्रिमंडळाचे पर्व सुरू होत आहे. अशा काळांत लोकमताशी इमान राखणारे आणि लोकहित व राष्ट्रहित यांच्यावर आधारलेल्या किमान कार्यक्रमाची बांधिलकी असलेले कार्यक्षम व स्वच्छ प्रशासन निर्माण करणे कांग्रेसेतर पक्षांचे नैतिक व राजकीय कर्तव्य आहे. १९७७ साली संक्रमण झाले. पण राजकीय नेते संक्रमणकालातील कर्तव्य विसरले, स्वप्रतिष्ठा, स्वतःचे पद व पक्ष यांचीच भांडणे करीत बसले. इतिहासाची पुनरावृत्ती होऊ नये असे वाटत असेल तर आपली सत्ता लोकांच्या मतातून निर्माण होते हे राजकीय नेत्यांनी विसरू नये. दीनदयाळजींनी सांगितलेले लोकशाहीत मिळणाऱ्या मतांचे महत्त्व मार्गदर्शक ठरावे. "मत हा लोकांनी त्यांच्या आशा अंमलात आणण्याचा आदेश समजला पाहिजे." लोकशाहीचा हा मूलमंत्र त्यांनी सांगितला होता.

इतिहासाच्या वळणावर

आधुनिक भारताच्या इतिहासातील संक्रमणकाल संपलेला नाही. गेल्या ३५ वर्षांचा स्वराज्याचा व पुनर्रचनेचा आपल्याला आलेला अनुभव, झालेल्या चुका, या काळात आलेली संकटे, निर्माण झालेले सामाजिक तणाव, राजकीय नेतृत्वाने व पक्षाने केलेली अपेक्षा-पूर्ती व अपेक्षाभंग या सर्वांचा ताळेबंद या पिढीला मांडावयाचा आहे आणि राष्ट्रीय पुनर्रचनेची उद्दिष्टे व मार्ग निश्चित करावयाचा आहे. एकोणीसाव्या व विसाव्या शतकांत पाश्चात्य विचार, पाश्चात्य मूल्ये, पाश्चात्य राष्ट्रांचे यश या तीन्ही आधुनिक भारताची प्रेरणा होत्या. 'स्व' ला विसरून 'स्वराज्य' चालविण्याचा उपक्रम आपण केला. आता इतिहासाच्या एका वळणावर आपले राष्ट्र उभे आहे. अध्यात्म व विज्ञान ही परस्पर विरोधी

नाहीत. त्यांचा समन्वय घालूनच मानवी जीवन सुखी व निरामय होऊ शकेल. अध्यात्मिक असणे म्हणजे भौतिक सुखाविषयी उदासीन राहणे असा भारतीय संस्कृतीचा चुकीचा अर्थ लावल्यामुळे विज्ञानात प्रगत झालेल्या सर्व पाश्चिमात्य गोष्टींचे आपण सर्वांगीण अनुकरण केले. या अनुकरणात डोळसपणा नव्हता. आजच्या भारताचे बरेचसे प्रश्न या अंधानुकरणाने निर्माण झाले आहेत. सिंधू संस्कृतीच्या उदयापासून गांधीजींच्या सर्वोदयापर्यंत नाना सामाजिक प्रयोग भारताने केले आहेत. आता एकात्म मानववाद व सांस्कृतिक राष्ट्रवाद यांच्या आधारे आधुनिक भारताचे नवे राष्ट्रजीवन संघटित करण्याची गरज आहे. 'प्राप्तकाल हा विशाल भूधर। सुंदर लेणी तयात खोदा। निजनामे त्यावर ती नोंदा।' हा केशवसुतांचा संदेश अनुसरण्याचा हा काळ आहे. दीनदयाळजींचे राजकीय जीवन, त्यांचे विचारधन व त्यांचे पारदर्शी व्यक्तित्व या तीन्हींपासून समाजाला, राजकीय पक्षांना, कार्यकर्त्यांना, समाजसेवकांना सतत स्फूर्ती मिळेल यांत शंका नाही.

विराट जागृत ठेवा

भारताचे सर्वांगीण परिवर्तन व्हावे हे प्रत्येक देशभक्ताचे स्वप्न आहे. 'परं वैभवं नेतुमेतत् स्वराष्ट्रम्' अशी रोज प्रार्थना करणाऱ्या संघशाखेत दीनदयाळजींचे व्यक्तित्व उमलले. त्यासाठी भारतीय राष्ट्राचा आत्मा – चिती – कोणता आहे याची जाणीव झालेल्या चैतन्ययुक्त समाजाचे – ज्याला दीनदयाळजींनी विराट् म्हटले – त्यांनी स्वप्न पाहिले. शरीरात प्राणामुळे जसे चैतन्य निर्माण होते तसेच या जागृत विराटामुळे राष्ट्रजीवन संपन्न होते. शरीरात प्राण असला म्हणजे त्याचे सगळे अवयव परस्पर सहकार्याने शरीराचे सर्व व्यापार चालवितात, तसेच हा विराट जागृत असेल तर राष्ट्रजीवन सुरळीत चालेल. प्रत्येक राष्ट्राला स्वतंत्र सांस्कृतिक अस्तित्व असते. कम्युनिझम, इस्लाम, ख्रिश्चन धर्म, बौद्ध धर्म यांचा स्वीकार केलेली एकच विचारप्रणाली असलेली राष्ट्रेसुद्धा स्वतःची व्यक्तिमत्वे जतन करतात. त्याची जोपासना करतात. भारतीय राष्ट्रही प्राचीन काळापासून स्वतःचे सांस्कृतिक व्यक्तिमत्व असलेले राष्ट्र आहे. त्याला स्वतःची जीवनदृष्टी, जीवनसरणी व तत्त्वदृष्टी आहे. ती एकात्म आहे. दीनदयाळजींनी भारताचे सांस्कृतिक व्यक्तित्व पुन्हा प्रगट झाले पाहिजे असा आग्रह धरला. त्यासाठी तत्त्वदृष्टी दिली. एकात्म मानवदर्शन हे त्याचे नाव आहे. भारताचे राष्ट्रीय उत्थान ही भारताचीच नव्हे तर मानवतेची गरज

आहे. राजकारण हे त्याचे साधन आहे. हा त्याचा व्यवहार आहे. शुद्ध बीजापोटी येणाऱ्या वृक्षास रसाळ व गोमटी फळे येतील. दीनदयाळजींनी भारतीय जनांच्या स्वाधीन केलेले शुद्ध बीज त्यांच्या राजकारणाचा वसा घेतलेल्यांनी व सुजाण भारतीयांनी जपले पाहिजे. हे बीज यथाकाल अंकुरेल, फळेल हे निश्चित !

• • •

एकात्म अर्थनीती

श. अ. कुळकर्णी



अनुक्रम

१	तिसऱ्या पर्यायाचा शोध	४३५
२	भारतीय संस्कृतिप्रणीत अर्थनीती	४४४
३	शेती व स्वावलंबन	४८१
४	औद्योगिकरणाची दिशा	४९६
५	विदेशी भांडवलाचे स्वदेशीला ग्रहण	५१२
६	चलननीती आणि अर्थसंकल्पीय नीती	५२९
७	भांडवलाची उधळपट्टी	५३८
८	नियोजन	५४५
९	उपसंहार	५५१

श्री. शरद अनंत कुळकर्णी

श्री. श. अ. कुळकर्णी हे जळगावचे रहिवासी असून जळगावी त्यांचे ऑटोमोबाइल स्पेअर पार्टस्‌चे दुकान व वर्कशॉप आहे. बालपणापासून रा. स्व. संघाचे ते स्वयंसेवक असून जळगाव जिल्ह्याच्या कार्यवाहपदाची जबाबदारी त्यांनी काही वर्षे सांभाळली. आणीबाणीच्या काळात ते नाशिकरोड कारागृहात स्थानबद्ध होते. ते एम्. कॉम्. असून आय्. ए. एस्. झाले आहेत. ' विवेक ', ' ऑर्गनायझर ' या साप्ताहिकांतून आर्थिक विषयावर त्यांचे लेख प्रसिद्ध झाले असून ' विशाल ' प्रकाशनाच्या पुस्तकामध्ये त्यांचे लिखाण आहे.

लेखकाचे मनोगत

कोणतेही राष्ट्र परक्यांचे अंधानुकरण करून स्वाभिमानी, स्वावलंबी आणि संपन्न जीवन प्राप्त करू शकत नाही. आपल्या देशाची आज प्रायः अशीच अवस्था झालेली आहे. आपल्या अनुभवसिद्ध हिंदू जीवनदर्शनाकडे पाठ फिरवून आपण पाश्चात्यांच्या बेगडी प्रगतीच्या, तथाकथित आधुनिकतेच्या मागे धावत सुटलो आहोत हे याचे मुख्य कारण आहे. आपल्या परंपरेचा, जीवनमूल्यांचा आणि परिस्थितीचा विचार न करता पाश्चात्यांसारखे अजस्र यंत्रप्रधान नियोजन व त्या अनुषंगाने केंद्रीभूत उद्योगीकरण यांचा अवलंब केल्यामुळे बेसुमार चलनवाढ, महागाई, बेकारी, विषमता यांसारख्या अनेक आर्थिक समस्या आपल्यासमोर उभ्या राहिल्या, आणि त्या उत्तरोत्तर अधिकाधिक बिकट होत चालल्या आहेत. पाश्चात्य विचारप्रणालींची अपूर्णता आणि विफलता स्पष्टपणे डोळ्यासमोर दिसत असताना आपण अजूनही त्याच मार्गाने वाटचाल करण्यात गौरव मानीत आहोत. अशा परिस्थितीत, 'हमे तो अपनी राह बनानी है, हम जिस ओर चलेंगे वही रास्ता बनेगा' असे आत्मविश्वासपूर्वक सांगणाऱ्या पंडित दीनदयाळजींनी दाखविलेल्या अर्थकारणाची दिशा समजून घेणे, राष्ट्रहिताच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे असे वाटते.

साऱ्या जगापुढे उभ्या असलेल्या समस्यांच्या निराकरणासाठीही दीनदयाळजींच्या अर्थचिंतनाची अपरिहार्यता स्पष्ट होऊ लागलेली आहे. भांडवलशाहीने माणसाला निव्वळ अर्थदास बनवून टाकले, तर राजसत्ता व अर्थसत्ता यांचे केंद्रीकरण करणाऱ्या समाजवाद-साम्यवादाने मानवाची

सृजनशीलता, प्रेरणा आणि सर्वांगीण स्वातंत्र्य ह्यांची क्रूर अवहेलना करून त्याला निर्जीव कळसूत्री बाहुले बनवून टाकले आहे. अर्थाच्या अभावामुळे गरीब व अविकसित देशांतील जनतेचा विकास कुंठित झाला आहे, तर दुसऱ्या बाजूला संपन्न राष्ट्रे अर्थाच्या प्रभावाच्या नशेत साऱ्या मानवजातीचे जीवन उद्ध्वस्त करावयास निघाली आहेत. सारी मानवजात भयभीत होऊन स्वतःच्या अस्तित्वाच्या कोंडीतच (crisis of survival) सापडली आहे. अशा वेळी, भूतकाळात त्या त्या वेळच्या अनेक कूट प्रश्नांचे व समस्यांचे निराकरण करणारी आणि वर्तमानकाळातही आपली उपादेयता सिद्ध करणारी भारतीय संस्कृती, तिची अर्थनैतिक जीवनमूल्ये, आदर्श जीवनाचे मानदंड आणि अर्थाच्या अभाव-प्रभावाच्या यक्षप्रश्नांची सोडवणूक करणारे अर्थवैज्ञानिक स्वरूप यांचे पंडित दीनदयाळजींनी प्रस्तुत केलेले सांगोपांग विवेचन मोठे वरदान ठरेल असे वाटते. त्यांचे ते मौलिक चिंतन वाचकांपुढे ठेवण्याचा हा यथामती प्रयास आहे.

हे ऋषिऋण फेडण्याची संधी 'पं. दीनदयाळ विचारदर्शन' प्रकल्पाचे चिंतन व उभारणी करणाऱ्या श्री. राजाभाऊ नेने यांच्यामुळेच मला उपलब्ध होऊ शकली. त्यांचे या बाबतीतील योगदान अतिशय मोलाचे आहे.
त्याचप्रमाणे या विषयाची माहिती विविध ठिकाणांहून गोळा करणे, संदर्भ शोधणे, अनेक मुद्यांची नीट जुळवाजुळव करणे आदी कार्यांत मुंबईच्या अलकाताई सावरकर आणि वि. ना. जोशी यांची झालेली मदत खूपच महत्त्वाची. हे सर्व साहित्य प्रकाशित करून वाचकांपर्यंत पोचविण्याची महत्त्वाची जबाबदारी समर्थपणे पार पाडणाऱ्या 'भारतीय विचार साधना पुणे,' या संस्थेचे सहकार्य तर अजोडच म्हणावे लागेल. या सर्वांचा आणि ज्या इतरही अनेकांनी या कार्यात आपुलकीने सहकार्य केले त्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे.

शरद अ. कुळकर्णी

१

तिसऱ्या पर्यायाचा शोध

आर्थिक समृद्धीमागे सुसाट धावत सुटलेले जग आज एका अभूतपूर्व शृंगापत्तीत सापडले आहे. उत्पादन-यंत्रतंत्रात अनेक नवनवे शोध लागले, निसर्गसंपत्तीचे नवनवीन स्रोत उपलब्ध झाले, उत्पादनातही प्रचंड वाढ झाली आणि एवढे असूनही ती कोंडी कायमच आहे, वाढते आहे. जे अभावग्रस्त आहेत त्यांच्यापुढे तर समस्या आहेतच, परंतु ज्यांच्यापाशी समृद्धी अमाप आहे त्यांच्याहीपुढे काही नव्याच समस्या उभ्या राहिल्या आहेत. समृद्ध आणि सुखी जीवनासाठी आसुसलेला मानव आज संभ्रांत, किंकर्तव्यमूढ होऊ गेला आहे. या शृंगापत्तीतून कसा मार्ग काढावा हे भले मोठ प्रश्नचिन्ह त्याच्यापुढे उभे आहे.

या प्रश्नाचे उत्तर शोधण्यापूर्वी अलीकडच्या काही दशकांत आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने कोणी कसकसा विचार केला, कोणते प्रयोग केले, त्याचे फलित काय झाले, याचा मागोवा घेणे उद्‌बोधक ठरेल. पाश्चात्य देशांत आज भांडवलशाही आणि साम्यवाद व समाजवाद या प्रमुख आर्थिक विचारप्रणाली प्रस्थापित झालेल्या दिसतात. भांडवलशाही तिच्या मूळ स्वरूपात आता अस्तित्वात राहिलेली नाही, आणि समाजवाद व साम्यवाद यांचेही अनेक प्रकार निर्माण झाले आहेत हे खरे असले तरी, या अर्थव्यवस्थांच्या संकल्पना मात्र पुष्कळांशी त्याच राहिलेल्या आढळतात. अडॅम स्मिथ, रिकार्डो, मिल, मार्क्स, हॉब्सन, व्हेब्लेन, केन्स, बर्नहॅम, शुम्पिटर आदी श्रेष्ठ शास्त्रज्ञांनी अलीकडच्या काळात अनेक अर्थशास्त्रीय सिद्धांत मांडले आहेत. अविकसित देशांच्या अर्थ-व्यवस्थेवर प्रा. मिर्डाल, प्रा. जेकब विनर, प्रा. जॉन, मेलॉर आदी अर्थशास्त्रज्ञांनी

केलेले चिंतनही विचारप्रवर्तक आहे. तथापि अलीकडच्या काळातील जागतिक आर्थिक घडामोडींवर लॉर्ड केन्स आणि कॉर्ल मार्क्स यांच्या विचारांचा विशेष प्रभाव पडलेला आहे.

त्यांच्या अर्थचिंतनाकडे नजर टाकल्यास काय दिसते ? लॉर्ड केन्स म्हणतो, " पुढील किमान शंभर वर्षे तरी जर खरेपणा उपयोगी नसेल आणि खोटेपणाच उपयुक्त असेल, तर आपण खऱ्याला खोटे व खोट्याला खरे मानले पाहिजे. अधिकाधिक धन मिळविण्याची भूक, अधिकाधिक नफा मिळविण्यासाठी स्पर्धा आणि त्यासाठी घ्यावयाची पूर्व खबरदारी ही आणखी काही काळ तरी आपली दैवते आहेत. हीच आपल्याला आर्थिक गरजांच्या अंधकारमय बोगदयातून बाहेर काढून प्रकाशाकडे नेतील. "

दुसऱ्या महायुद्धानंतर लॉर्ड केन्स यांचे अर्थशास्त्रावरील प्रभुत्व पाश्चात्य जगात सर्वमान्य झालेले आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेला बेकारी व मंदी यांच्या अधूनमधून उद्भवणाऱ्या भीषण परिस्थितीतून बाहेर काढण्याचा एक क्रांतिकारी मार्ग केन्सने शोधून काढला. ' केन्सचे अर्थशास्त्र ' या नावाने तो ओळखला जाऊ लागला. भांडवलशाहीला संजीवनी मिळाली. पाश्चात्य जग समृद्धीच्या शिखरावर पोचल्याचे दिसू लागले.

पण लॉर्ड केन्सच्या आर्थिक संकल्पनांमधून गरुडभरारी घेणाऱ्या राष्ट्रांच्या आर्थिक विकासाने प्रत्यक्षात काय साधले हे पाहणे उपयुक्त ठरेल. उत्पादन-वाढीतील जीवघेणी स्पर्धा व भौतिक सुखोपभोगांची असीम लालसा यापायी अमेरिका पृथ्वीवरील अमूल्य खनिजे व नैसर्गिक संपत्ती यांचा अनिर्बंध वापर करून साऱ्या जगासमोर संकट उभे करीत आहे. मॅसिच्युटिस् इन्स्टिटचूट ऑफ टेक्नॉलॉजी या अग्रगण्य संस्थेने दाखवून दिले आहे की, अमेरिकेची भांडवलशाही अर्थव्यवस्था व उत्पादनप्रणाली त्या देशाच्या आर्थिक विकासासाठी जगातील ४२% ॲल्युमिनियम, ४४% कोळसा, ३३% तांबे, २८% लोखंड, ६३% नैसर्गिक गॅस, ३३% पेट्रोलजन्य पदार्थ, २४% टिन, ३८% निकेल अशा पुनर्निर्मित होऊ न शकणाऱ्या खनिजांचा फडशा पाडीत आहे. सत्ता आणि समृद्धीच्या हव्यासापोटी एवढ्या मोठ्या प्रमाणात नैसर्गिक संपत्तीची उधळपट्टी करणाऱ्या अमेरिकेची लोकसंख्या जगाच्या लोकसंख्येच्या ५.६% एवढीच आहे हे या संदर्भात लक्षात ठेवले पाहिजे.

निसर्गसंपत्तीचा बेछूट वापर व त्यातून उद्‌भवणाऱ्या भीषण टंचाईचा प्रश्न याबरोबरच भरमसाट यांत्रिकीकरणामुळे पाश्चात्य देशांतील आणि आता आशियातीलही प्रगत राष्टांपुढे बेकारीची समस्या उभी राहिली आहे. मानवी शक्तीऐवजी काँप्युटरचा सर्वत्र वाढता वापर हे या बेकारीचे एक प्रमुख कारण आहे. उदाहरणार्थ, अमोनिया बनविणाऱ्या अमेरिकेतील, जगातील सर्वांत मोठ्या कारखान्यातील हजारो कामगार काँप्युटर्समुळे बेकार होऊन घरी बसले आहेत. हा प्रचंड कारखाना अवघे २७ लोक चालवीत आहेत. अमेरिकेपाठोपाठ ब्रिटन, फ्रान्स, पश्चिम जर्मनी येथेही बेकारीची प्रचंड लाट उसळली आहे. पूर्वीच्या साम्राज्यवादाचे दिवस संपले असल्याने बाजारपेठा काबीज करून मंदी हटविणे शक्य राहिलेले नाही. तेव्हा या बेकारांना काम देण्यासाठी अधिकाधिक शस्त्रनिर्मिती करणे आणि ती खपविण्यासाठी राष्ट्रा-राष्ट्रांत भांडणे लावीत बसणे हा संपन्न राष्ट्रांचा एक खेळ होऊन बसला आहे.

समृद्धीच्या या सोसातून आणखीही एक फार मोठी डोकेदुखी निर्माण झाली आहे. ती म्हणजे बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या निरनिराळ्या देशांत चालू असलेल्या कारवाया. या बहुराष्ट्रीय कंपन्या आपल्या अफाट संपत्तीच्या बळावर निरनिराळ्या देशांतील अर्थव्यवस्थेत घुसून तेथे दबावाचे राजकारण खेळत असतात. इक्सॉन (Exxon) ही अशा बहुराष्ट्रीय कंपन्यांपैकी एक कंपनी. या कंपनीचे वार्षिक उत्पन्न जगातील कित्येक राष्ट्रांच्या वार्षिक उत्पन्नापेक्षा अधिक आहे. अशा कंपन्यांचे दबावाचे राजकारण किती प्रभावी असू शकेल याची कल्पना त्यांच्या या सांपत्तिक स्थितीवरून करता येईल.

बरे, एवढे करूनही या श्रीमंत राष्ट्रांनी साधले काय ? अमेरिकेएवढे खून, बलात्कार, घटस्फोट व आत्महत्त्या यांचे प्रमाण इतरत्र आढळत नाही. दर पाचांपैकी एक अमेरिकन त्याच्या आयुष्यात केव्हातरी काही काळ मनोरुग्णांच्या दवाखान्यात घालवीत असतो. कुटुंबसंस्था झपाट्याने उद्‌ध्वस्त होत आहे. साधी झोप येण्यासाठी अमेरिकेतील बहुसंख्य लोकांना गोळ्यांचे डोस घ्यावे लागतात. व्यसनांचे प्रमाण एवढे वाढलेले आहे की, तुर्कस्थानसारख्या देशातील अफूचे प्रचंड साठे एकट्या अमेरिकेत फस्त होतात. Wealth accumulates and Men decay असे वर्णन अर्थतज्ज्ञ प्रा. गॅलब्रेथ सारख्या विचारवंताला करावे लागले आहे. ब्रिटन, फ्रान्स यांसारख्या युरोपीय राष्ट्रांची अवस्थाही कमी-अधिक प्रमाणात तशीच आहे. तरुण वर्गातील हिप्पींचे वाढते प्रमाण तेथील सरकारला

व समाजचिंतकांना सतावीत आहे. पश्चिम जर्मनीच्या सरकारला तरुणांच्या उग्र आंदोलनापुढे नमून टी. व्ही. वर ब्लू फिल्म्स दाखविण्यास परवानगी द्यावी लागलेली आहे.

उद्योगांच्या केंद्रीकरणामुळे अवाढव्य शहरे निर्माण झालेली असून तेथील जनजीवन निसर्गापासून तर दूर गेलेच आहे, पण नैतिक दृष्ट्याही अधिकाधिक अधःपतित होत चालले आहे. सर्वच प्रगत राष्ट्रांना हा अनुभव येत आहे. तथापि एवढ्या कटू अनुभवानंतरही तेथील काही शास्त्रज्ञ अधिकाधिक आर्थिक विकास, अजस्र उद्योगधंदे व प्रचंड शहरांची निर्मिती यांचाच पाठपुरावा करीत आहेत. युरोपियन एकॉनॉमिक कम्युनिटी या अवाढव्य संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. मॅनशॉल्ट तर म्हणत आहेत की, " तरुणांनी खेडी सोडून, शेतीला रामराम ठोकून शहराकडे वाटचाल केली पाहिजे. कारण तेच अर्थ-विकासाचे गमक आहे." यासाठी त्यांची संख्या आर्थिक सहाय्यही द्यावयास तयार आहे. पाश्चात्य अर्थतज्ज्ञांची मती पूर्ण बधिर झाल्याचेच हे लक्षण होय.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील दुष्परिणामांची प्रतिक्रिया म्हणून मार्क्सवादी अर्थविचार पुढे आला. " उत्पादनसाधनांचे केंद्रीकरण आणि श्रमशक्तीचे सामाजिकरण ही दोन्ही अशा बिंदूपर्यंत येऊन ठेपतात की, भांडवलशाहीच्या आवरणाशी ती विसंवादी ठरतात. खाजगी भांडवली मालमत्तेची विनाशसूचक यमघंटा वाजू लागते. हिरावून घेणाराकडून हिसकावून घेतले जाते. The expropriators are expropriated असा क्रांतीकारक विचार कार्ल मार्क्स या अर्थतज्ज्ञाने जगासमोर मांडला. या क्रांतिकारक अर्थविचाराचे नेतृत्व रशियाने केले व त्यानंतर तो चीन तसेच पूर्व युरोपातील राष्ट्रांना व्यापून जगातील अनेक राष्ट्रांवर प्रभुत्व गाजवीत असल्याचे दिसत आहे. निरनिराळ्या राष्ट्रांत मार्क्सवादी अर्थविचारांचे स्वरूप निरनिराळे दिसत असले तरी संकल्पना मात्र तीच आहे. तेथील दृश्य काय दिसते ? उत्पादन-साधनांचे केंद्रीकरण भांडवलशाही अर्थ-व्यवस्थेत मूठभर व्यक्तींकडे होते, तसेच केंद्रीकरण साम्यवादी अर्थरचनेत राज्यसंस्थेच्या हाती झालेले आहे. राजसत्ता व अर्थसत्ता या दोहोंच्या केंद्रीकरणामुळे भांडवलशाही अर्थव्यवस्थेपेक्षा अधिक भयानक दुष्परिणाम साम्यवादी देशांमध्ये झालेले दिसत आहेत. लोकशाही, विचार-स्वातंत्र्य, लेखन-स्वातंत्र्य यांचा बळी गेला. हुकूमशाहीची पकड घट्ट बसली. माणसाचे भावविश्व कोसळून पडले. सत्ता-संघर्ष, जीवनावश्यक वस्तूंची

तीव्र टंचाई, तरुण पिढीतील वाढती व्यसने व वाढते घटस्फोट, उद्योगधंद्यांची अकार्यक्षमता, नव्या स्वरूपात उभी राहिलेली विषमता (त्याचे वर्णन युगोस्लाव्हिया या कम्युनिस्ट राष्ट्राचे दिवंगत उपपंतप्रधान जिलास यांनी 'द न्यू क्लास' या ग्रंथात केलेले आहे.) आदी गोष्टींमुळे कम्युनिस्ट देशांतील व्यक्तिजीवनाला व समष्टिजीवनाला सर्वांगांनी अवकळा प्राप्त होऊन ते साचेबंद आणि नीरस झाले आहे. प्रारंभी कम्युनिस्ट विचारांनी खूप भारावून गेलेल्या, पण नंतर प्रत्यक्ष परिस्थिती पाहून भ्रमनिरास झालेल्या ऑर्थर कोसलरने 'डार्कनेस ॲट नून' मध्ये मानवाच्या मुक्तीची बिरुदावली मिरविणाऱ्या साम्यवादी अर्थरचनेत मानवाचे भावविश्व व आत्मा यांची कशी क्रूर अवहेलना होते ते साऱ्या जगापुढे मांडले आहे.

येथेही तीच कथा

आपला देशही आर्थिक प्रश्नांबाबत अशाच संभ्रांत अवस्थेत उभा आहे. या संदर्भात स्वातंत्र्योत्तर भारताच्या विकासाची दिशा आणि गती पाहणे उद्‌बोधक ठरेल. सहा पंचवार्षिक योजना राबवूनही आपल्या देशाच्या आर्थिक परिस्थितीचे चित्र निराशाजनक आहे. नियोजन-काळात देशाचे राष्ट्रीय उत्पन्न व औद्योगिक उत्पादन यांच्या वाढीचे प्रमाण, तसेच दरडोई उत्पन्न व खर्चाची क्षमता यांचे प्रमाण वाढण्याऐवजी उत्तरोत्तर घसरत चालले आहे. खेडी ओस पडत आहेत, तर शहरांतून प्रचंड झोपडपट्ट्या वाढत आहेत. बेकारांची संख्या सारखी वाढते आहे. केवळ सुशिक्षित बेकारांची संख्या एक कोटीच्या घरात पोहोचलेली आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती सतत वाढत आहेत आणि रुपयाची किंमत मात्र घसरत आहे. रुपयाची १९६० सालची किंमत १०० पैसे धरली, तर ती १९८० मध्ये २५ पैशांवर आली आणि १९८४ अखेर केवळ १० पैशांवर येऊन पोहोचली. अन्न, वस्त्र, यांसारख्या मूलभूत गरजाही नीटपणे भागवू न शकणाऱ्या, म्हणजेच दारिद्र्यरेषेखालील विपन्न जीवन जगणाऱ्यांची संख्या ४२ कोटीच्या घरात पोहोचलेली आहे.

आपल्या देशाच्या आर्थिक विकासाची दिशा ठरविताना येथील परिस्थिती, साधनसामुग्री व जीवनमूल्ये विचारात न घेता आपण पाश्चात्य विचार-प्रणालीचे व अर्थव्यवस्थांचे अंधानुकरण करीत सुटलो त्याचे हे फलित आहे !

The world is standing at the cross roads of confusions. असे पंडित दीनदयाळजींनी म्हटले आहे, ते खरेच आहे. सारे जग आज संभ्रांत, अगतिक, किंकर्तव्यमूढ अवस्थेत उभे आहे. या चक्रव्यूहातून सोडवू शकेल असा एखादा तिसरा पर्याय आहे काय ? पं. दीनदयाळजी मोठ्या आत्मविश्वासाने सांगतात की भारतीय संस्कृतीच्या एकात्म मानव दर्शनांतर्गत एकात्म अर्थनीती हा तिसरा पर्याय देऊ शकेल !

एकात्म दर्शनाचे सूत्र

एकात्म अर्थनीतीच्या विस्तृत विवेचनाला प्रारंभ करण्यापूर्वी त्या दर्शनाचे या संदर्भातील सूत्र ध्यानात घेणे उपयुक्त ठरेल. एकात्म मानव दर्शन म्हणजे मानवाचा केवळ 'आर्थिक मानव' या एकांगी दृष्टिकोनातून विचार न करता, जीवनाच्या समग्र पैलूंचा विचार करून, तसेच अशा मानवाचा इतर मानवांशी व मानवेतर सृष्टीशी जो परस्परपूरक एकात्म संबंध असतो तो ध्यानात घेऊन समृद्ध, सुखी व कृतार्थ जीवनाच्या वाटचालीची दिशा दाखविणारे जीवनदर्शन.

एकात्म मानव दर्शन हे भारतीय संस्कृतीचे जीवनदर्शन आहे. भारतीय संस्कृती एकात्मवादी आहे. त्यामुळे शरीर, मन, बुद्धी व आत्मा यांनी युक्त असलेला; धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थांची साधना करणारा, आणि एकाच वेळी परिवार, जमात, राष्ट्र, मानवजात आदी विविध एकात्म समष्टींचे प्रतिनिधित्व करण्याची क्षमता असलेला मानव हा या दर्शनाचा केंद्रबिंदू आहे.

पाश्चात्य देशांत मानवतावाद या नावाने अनेक विचारप्रणाली प्रचलित आहेत. परंतु यांपैकी बहुतेक विचारधारा केवळ भौतिकवादी आहेत. त्यामुळेच त्या मानवीकरणाच्या दृष्टीने यशस्वी ठरल्या नाहीत. जीवनाचा सर्वांगीण विचार हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. म्हणूनच अर्थ आणि काम या पुरुषार्थांना तिने मानवाचा विकास साधणाऱ्या धर्म आणि मोक्ष या पुरुषार्थांच्या कोंदणात बसविले आहे.

अर्थनीतीचा विचार करताना आर्थिक बाबींबरोबरच काही अनार्थिक गोष्टींचाही विचार करावा लागतो. परंतु बहुसंख्य पाश्चात्य अर्थशास्त्रज्ञांनी या आर्थिकेतर बाबींचा विचारच केल्याचे दिसत नाही. नाही म्हणायला, काही

तुरळक पाश्चात्य विचारवंतांना ही उणीव जाणवू लागली आहे. उदाहरणार्थ, जे. एस्. मिल म्हणतात – "सर्व आर्थिक प्रश्न केवळ अर्थशास्त्राच्या आधारे सोडविता येतील असे म्हणता येणार नाही. अनेक आर्थिक प्रश्नांना महत्त्वपूर्ण अशा राजकीय आणि नैतिक बाजूही असतात, आणि त्यांची उपेक्षा करून चालत नाही." प्रा. जेकब विनर लिहितात – "केवळ अधिक भांडवल, अधिक जमीन, अधिक कोळशाच्या खाणी यांच्या आधारे आर्थिक प्रगती होऊ शकत नाही. चांगले शिक्षण, चांगले संस्कार, चांगले राजकीय व सामाजिक संघटन, श्रमाच्या प्रतिष्ठेची जपणूक यांचीही त्यासाठी आवश्यकता असते." प्रा. गन्नर मिर्डाल यांनीही थोड्या वेगळ्या शब्दांत हाच विचार व्यक्त केला आहे. ते म्हणतात, "उत्पादक घटकांचे गुणधर्म म्हणून अर्थशास्त्रज्ञ ज्यांचे वर्णन करतात त्यांच्याशी आर्थिकेतर घटकांचा पुष्कळच संबंध असतो म्हणून आर्थिक घटकांबरोबरच आर्थिकेतर घटकांचाही विचार करणारे अर्थशास्त्र आपल्याला विकसित करावे लागेल."

परंतु अजून तरी या विचारवंतांनी मांडलेल्या विचारांची अवस्था अरण्यरुदनासारखीच आहे. आज पाश्चात्य अर्थशास्त्र, विज्ञानाचा अधिकाधिक विचार करून मानवाची केवळ भौतिक समृद्धी वाढविण्याच्याच दिशेने विचार करीत आहे. अर्थशास्त्र असो, औषधी विज्ञान असो, निसर्गशास्त्र असो, की मानसशास्त्र असो, साऱ्यांचा भर याच एका गोष्टीवर आहे. आल्विन टॉफ्लर आपल्या 'फ्यूचर शॉक' या पुस्तकात म्हणतात, "Modern Economic analysis is defective as it is highly econocentric with it's total emphasis on money utility and value." ज्या अर्थशास्त्राला मानवाच्या समग्र जीवनाचे, आणि त्याच्या आर्थिक घटकांप्रमाणेच आर्थिकेतर घटकांचे जे संबंध असतात त्यांचे अवधान रहात नाही, ते मानवाला शाश्वत कल्याणाची योग्य दिशा कदापि दाखवू शकणार नाही.

तात्पर्य, आज जग विकासाच्या एका टप्प्यावर उभे आहे. भौतिक समृद्धीबरोबरच मानसिक स्वास्थ्य व समाधान प्राप्त करून देणारी संजीवनी त्याला हवी आहे. दीनदयाळजींनी मांडलेले एकात्म मानव दर्शन आणि तदंतर्गत एकात्म अर्थनीती यांतून या संजीवनीची अनुभूती प्राप्त होऊ शकेल.

• • •

२

भारतीय संस्कृतिप्रणीत अर्थनीती

माणूस हा केवळ शारीरिक गरजा तृप्त करण्यासाठी जन्माला आलेला नाही. माणसासमोर एक जीवनलक्ष्य असते. आणि ते साध्य करण्यासाठी त्याला शरीराबरोबरच मन, बुद्धी व आत्मा या गोष्टीही दिलेल्या आहेत. हे लक्ष्य गाठणे यातच मानवी जीवनाचे सार्थक आहे. अशी भारतीय संस्कृतीची शिकवण आहे.

साध्य-साधन-विवेक

आर्थिक समृद्धी प्राप्त करण्याच्या धुंदीत आपण ही शिकवणूक विसरून गेलो आहोत हे सांगताना पं. दीनदयाळजी म्हणतात, – "स्वातंत्र्यप्राप्तिपूर्वी आपण प्रत्येक प्रश्नाकडे राजकीय दृष्टिकोनातून पहात होतो. आता आपण प्रत्येक प्रश्नाकडे केवळ आर्थिक दृष्टिकोनातून पहावयास लागलो आहोत. साध्य आणि साधन यांचा विवेकच शिल्लक राहिलेला नाही. पैसा कमविणे ही जीवनातील एक क्षुल्लक महत्त्वाची बाब न रहाता या प्रश्नाने आपले सारे जीवनच व्यापून टाकले आहे. पैसा मिळविण्यापलीकडे अधिक महत्त्वाचे जीवनात काही असते याची जाणीवच आपल्या मनातून समूळ नष्ट झाली आहे."

साध्य-साधन-विवेक यासंबंधी विवरण करताना पं. दीनदयाळजी तत्कालीन एका विचारसरणीतील विकृतीचे उदाहरण देत असत. "देशाच्या आर्थिक विकासासाठी भांडवल हवे म्हणून आपण आपली शस्त्रसज्ज सेना विसर्जित करावी व संरक्षणावरील खर्च पूर्णतः आर्थिक नियोजनाकडे वळता

करावा " असा विचार प्रसृत केला जात होता. ह्या विचारास ' आत्मघातकी ' असे संबोधून पं. दीनदयाळजी म्हणत, " असे केल्यावर आपण आपले स्वातंत्र्य जर सैनिकी सामर्थ्याच्या अभावी गमावले तर मग आर्थिक विकास कोणाचा करणार ? पारतंत्र्याच्या शृंखला आपल्याला कधीतरी प्रिय होतील काय ? "

" मानवी जीवनाचा उद्देश आणि जीवनातील संपत्तीचे स्थान यांबाबतची कल्पना निश्चित केल्याशिवाय आर्थिक विकासाची व त्यासाठी लागणाऱ्या साधनांची निश्चिती करता येणार नाही. " असे सांगून दीनदयाळजी म्हणतात – " मंदिराच्या बाह्य स्वरूपाचा संपूर्ण विचार करून सुद्धा आपल्याला निश्चितपणे असेच म्हणावे लागेल की, मंदिराला त्याच्या बाह्य स्वरूपामुळे नव्हे, तर त्या मंदिराच्या गाभाऱ्यात स्थापन केलेल्या मूर्तीमुळेच मंदिरत्व प्राप्त होत असते. ज्या पाश्चात्य दृष्टिकोनाचे अंधानुकरण करून आपण आपल्या अर्थनैतिक मूल्यांची प्रतिष्ठापना करावयास निघालो आहोत त्या दृष्टिकोनात अशा सर्वांगीण विचाराला स्थान नसते."

अर्थव्यवस्थेचा निकष मानवाचा सर्वांगीण विकास हाच असला पाहिजे. मानवी सुख हे अर्थोत्पादनाचे प्रमुख साध्य आहे आणि मानवी शक्ती हे त्याचे प्रमुख साधन आहे. मानवाची शक्ती बेकार ठेवून त्याचा विकास होणार नाही, हे ध्यानात ठेवूनच उत्पादन-तंत्र विकसित केले पाहिजे. ज्या अर्थव्यवस्थेमुळे समृद्धी वाढते परंतु मानवतेच्या अन्य अंगोपांगांचा विकास कुंठित होतो, ती व्यवस्था कल्याणकारी होऊ शकणार नाही. मानवाचा सर्वांगीण विकास हे आपल्या अर्थनीतीचे आणि अर्थव्यवस्थेचे लक्ष्य असले पाहिजे.

परंतु आज सर्वत्र एक वेगळेच चित्र दिसत आहे. अर्थोत्पादनासाठी मानवी श्रमाऐवजी अत्याधुनिक यंत्रांचा अधिकाधिक वापर सुरू झाल्यामुळे असंख्य लोक बेकारीच्या खाईत फेकले जात आहेत. १९६० साली अमेरिकेत गणक-यंत्रांचे युग सुरू झाले. त्यावेळी पं. दीनदयाळजींनी, " यातून महाभयंकर यंत्र-बेकारीचे आव्हान अमेरिकेसमोर उभे राहील " असे म्हटले होते. १९७० पर्यंत अमेरिकेची आर्थिक समृद्धी खूप वाढली, पण या समृद्धीबरोबर रोजगारात वाढ झाली नाही. उलट बेकारांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली. आज तेथे हजारो कुशल व अर्धकुशल कामगार सरकारच्या धर्मादाय मदतीवर मिन्धेपणाने गुजराण करीत आहेत. साध्यसाधन-विवेक विसरल्याची आणि " साधनांनी साध्यावर मात केली तरी चालेल, पण आर्थिक विकास साधला पाहिजे " या

लॉर्ड केन्स सारख्या अर्थतज्ज्ञांच्या शिकवणुकीची ही भीषण शोकांतिका आहे.

१९७३ मध्ये सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. शूमाकर यांनी 'स्मॉल इज ब्युटिफुल' हा ग्रंथ लिहून पाश्चात्य अर्थशास्त्राला फेरविचाराचे आव्हान दिले. डॉ. शूमाकर लिहितात – "अधिकाधिक मोठे उद्योगधंदे, प्रचंड प्रमाणावर स्वयंचलित यंत्रे यांच्या आगमनामुळे ज्यांच्यापाशी केवळ श्रम हेच भांडवल आहे, त्यांची पूर्ण अवहेलना होत आहे. आर्थिक विकास घडविण्यासाठी जे अर्थशास्त्र साकार करण्यात आले आहे ते या गरीब श्रमजीवींनाच डावलून लावीत आहे. खरे म्हणजे अर्थशास्त्राने या गरीबांसाठीच विकासाची कामधेनू आणावयास हवी."

पण घडते आहे ते उलटेच म्हणून एक नवे अर्थशास्त्र उदयास यायला हवे आहे. या अर्थशास्त्राचा केंद्रबिंदू संपत्ती नव्हे, तर माणूस असेल. आपण माणसाची नीट काळजी घेतली म्हणजे संपत्ती व आर्थिक विकास यांचे मानवी जीवनातील स्थान व स्वरूप आपोआप निश्चित होईल.

माणसाला केंद्रबिंदू मानल्यावर साध्यसाधनांबाबतचा विवेक दृष्टिपथात येऊ लागतो. अर्थात् एक गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे ती ही की, माणसाचा विकास म्हणजे केवळ आर्थिक विकास नव्हे, तर सर्वांगीण विकास. त्यासाठी शरीराबरोबरच माणसाचे मन, बुद्धी व आत्मा यांचाही विचार करावयास हवा. आर्थिक विकासातून जर मनःशांती नष्ट होणार असेल, तर तो विकास कामाचा नाही. विज्ञानाचे शोध व तंत्रज्ञानातील प्रगती यामुळे अनेक राष्ट्रांची आर्थिक भरभराट झालेली दिसते. परंतु त्यातूनच प्रचंड शहरीकरण, निसर्गाला वंचित झालेले शहरी जनजीवन, कमालीच्या तणावाखाली जगणारे श्रमिक व कर्मचारी यांचीही वाढ तेथे झाली आहे. फ्रान्समधील विद्यापीठांतील तरुणांनी या भयानक मानसिक तणावाला कंटाळून पॅरिसमध्ये मोर्चा काढला होता. त्यांची घोषणा होती– 'Death to Technocrats!'

अर्थाचा अभाव

'सुखस्य मूलम् धर्मः। धर्मस्य मूलम् अर्थः।' असे आर्य चाणक्यांनी म्हटले आहे. सुख धर्ममूलक आहे, तर धर्म अर्थमूलक आहे. ज्या व्यवस्थेमुळे व्यक्तीचे व समाजाचे भरणपोषण होत असते, तसेच जी त्यांच्या भौतिक व आध्यात्मिक उन्नतीला सहाय्यक होत असते. ती व्यवस्था व तिच्यामागील भाव म्हणजे धर्म होय, असा भारतीय संस्कृतीचा दृष्टिकोन आहे. असा हा धर्म संपत्तीविना टिकू

शकणार नाही. ही बाब व्यक्ती आणि समाज दोघांनाही लागू आहे.

माणसाचा जीवनातील बहुतांश वेळ आणि शक्ती पैसा मिळवण्यासाठीच खर्च होत असल्याचे दिसते. द्रव्यार्जनासाठी माणसाची एवढी धावपळ चालू असते ती का ? या प्रश्नाचे सरळ उत्तर असे आहे की, जीवनातील बहुतेक सर्व भौतिक सुखे संपत्तीच्या साहाय्याने प्राप्त होत असतात. माणसाच्या भौतिक गरजा पूर्ण होणे आवश्यक आहे यात वाद नाही. भौतिक गरजा आणि जीवनाचा सर्वांगीण विकास यांचा फार निकटचा संबंध आहे. तथापी, मानवाच्या केवळ सर्वांगीण विकासासाठीच नव्हे, तर जीवन-धारणेसाठीही किमान अर्थाची आवश्यकता असतेच. किमान अर्थाचाही अभाव असेल तर माणसाला अन्न-वस्त्राचीही विवंचना रहाते. त्याचा अधिकांश वेळ आणि शक्ती या गोष्टी उपलब्ध करण्यातच खर्च होतात. जीवनातील सुख-समाधान त्याला दुर्मिळ होते.

अर्थाच्या अभावामुळे व्यक्तीला कर्तव्यरूप धर्माचे पालन करणे अवघड होऊन बसते. 'बुभुक्षितः किं न करोति पापम्' या उक्तीप्रमाणे त्याची पावले वाम-मार्गाकडे वळू लागतात. मूलभूत गरजांसाठीही धनसंपन्न लोकांवर विसंबून रहावे लागत असल्याने त्यांच्या दुराचाराकडे डोळेझाक करावी लागते. प्रसंगी समर्थनही करावे लागते. या सर्व परिस्थितीचा वैताग येऊन केव्हा केव्हा तर जीवनच नकोसे होऊन जाते.

अर्थाचा हा अभाव समष्टिगत असेल तर त्या समाजातील सद्‌गुणांचा हळूहळू लोप होत जातो. समाजातील त्यांतल्या त्यांत बलदंड असलेले लोक बलहीनांचे शोषण करू लागतात. अशा समाजांना, म्हणजेच देशांना अन्य संपन्न देशांची लाचारी करावी लागते. यातूनच पुढे आर्थिक आणि त्यामागोमाग राजकीय दास्यही येते.

अर्थाचा प्रभाव

संपत्तीच्या केवळ अभावामुळेच नव्हे, तर अत्यधिक प्रभावामुळेही धर्माचा ऱ्हास होतो. संपत्तीच्या या प्रभावाचा पाश्चात्यांनी विचारच केलेला दिसत नाही. संपत्तीच्या प्रभावाचा अर्थ स्पष्ट करताना पंडित दीनदयाळजी म्हणतात," जेव्हा प्रत्यक्ष संपत्तीसंबंधी किंवा त्यायोगे प्राप्त होणाऱ्या वस्तूंसंबंधी आणि भोग-विलासासंबंधी आसक्ती निर्माण होते, तेव्हा ते संपत्तीच्या अत्यधिक प्रभावाचे लक्षण समजावे. ज्या व्यक्तीला केवळ संपत्तीची हाव सुटलेली असते अशी

व्यक्ती देश, धर्म, मानवी जीवनाचे परमसुख इत्यादी महत्त्वाच्या सर्व गोष्टी विसरून जाते. अशा प्रकारे संपत्तीची हाव सुटल्याने विषयासक्त झालेली व्यक्ती विवेकहीन बनून स्वतःच्या व समाजाच्या विनाशाला कारणीभूत होते. संपत्तीच्या प्रभावाच्या पहिल्या प्रकारात संपत्ती साधनरूप न रहाता ती एकमेव साध्य बनते. दुसऱ्या प्रकारात संपत्ती धर्माचरणाचे साधन न राहता विषयोपभोगाचे साधन बनते. आणि विषयोपभोगाला सीमा नसल्यामुळे अशी व्यक्ती अगर असा समाज शेवटी नष्ट होतो."

समाजाच्या व व्यक्तीच्या प्रतिष्ठेचा, मोठेपणाचा संपत्ती हाच एकमेव निकष होऊन बसतो, तेव्हा तेही संपत्तीच्या अत्यधिक प्रभावाचेच लक्षण होय. अशा अवस्थेत मानसन्मान, अधिकारपदे, सामाजिक प्रतिष्ठा आदी गोष्टी केवळ धनवानांनाच प्राप्त होतात. अशा प्रकारे समाजातील सर्वच घटक धनपरायण झाले म्हणजे लहान मोठ्या प्रत्येक कामासाठी अधिकाधिक पैशाची गरज निर्माण होते. अर्थाच्या अशा प्रभावामुळे सर्वसामान्य लोकांच्या जीवनात हळूहळू अर्थाचा अभाव निर्माण होतो.

जेव्हा एखाद्या राष्ट्रामध्ये संपत्तीचा अत्यधिक प्रभाव निर्माण होतो तेव्हा त्याचा इतर देशांनाही उपसर्ग सुरू होतो. दुसऱ्या देशात आर्थिक साम्राज्य निर्माण करण्यासाठी अर्थशक्तीचा वापर करणे, जबर सत्ताभिलाषा निर्माण होऊन दुसऱ्या देशांतील संपत्ती वाममार्गाने स्वतःकडे वळविणे, गरीब देशांची श्रमशक्ती स्वतःच्या समृद्धीसाठी नाममात्र श्रममूल्य देऊन राबवीत रहाणे, अस्मानी संकटांनी वा अन्य कारणांनी कात्रीत सापडलेल्या गरीब देशांची खनीज व नैसर्गिक संपत्ती तुटपुंजे अर्थसहाय्य देऊन हडप करण्याचा प्रयत्न करणे हे सर्व अर्थाच्या प्रभावाचेच प्रकार होत.

अर्थायाम

अर्थाचा म्हणजेच संपत्तीचा अभाव व प्रभाव या दोहोंपासून समाजजीवन मुक्त ठेवून समाजात संपत्तीसंबंधी एक योग्य व्यवस्था निर्माण करणे याला भारतीय संस्कृतीत 'अर्थायाम' म्हटले आहे. अर्थाचे जीवनातील वास्तविक स्थान कोणते या संबंधीची योग्य व सुस्पष्ट धारणा आणि अर्थाचे उत्पादन, मालकी, वितरण व उपभोग यांची समुचित संतुलित व्यवस्था हे अर्थायामाचे प्रमुख पैलू आहेत. त्यामुळे अर्थायामाचा विचार करताना या सर्व गोष्टींचा विचार करावा लागेल.

हा अर्थायाम कसा निर्माण होईल ? अर्थतंत्रात शासनाच्या 'अहस्त-क्षेपाचा' सिद्धांत या बाबतीत उपयोगाचा नाही. अहस्तक्षेपाचा (लेसे फेअर) आर्थिक सिद्धांत पाश्चात्य भांडवलशाही अर्थरचनेच्या प्रारंभीच्या काळात सर्वमान्य झाला होता. व्यक्तिगत अर्थव्यवहारात शासनाने हस्तक्षेप करता कामा नये हे या सिद्धांताचे प्रमूख सूत्र असल्याने, 'बळी तो कानपिळी' या न्यायाने आर्थिक व्यवहार होऊन आर्थिक विषमता व आर्थिक शोषण वाढत गेले. हा मात्स्य न्याय आजतागायत पाश्चात्य विचारसरणीच्या मानगुटीवर या ना त्या स्वरूपात बसलेला आहे.

पं. दीनदयाळजी अर्थायाम कल्पना मांडताना या 'लेसे फेअर' सिद्धांताशी सहमत होत नाहीत, आणि Survival of the fittest या अर्थ-विचाराला 'जंगलचा न्याय' असे संबोधून ते बाजूला सारतात. 'प्राणायाम' जसा मनुष्याच्या आरोग्यास हितकारक आहे तसा 'अर्थायाम' देशाच्या अर्थ-व्यवस्थेस आवश्यक आहे असे दीनदयाळजी मांडत.

अर्थिक स्वातंत्र

अर्थाचे उत्पादन, वितरण, आणि उपभोग यांच्या संतुलनासाठी म्हणजेच अर्थायामासाठी अनेक प्रकारच्या व्यवस्था व संस्था उभ्या कराव्या लागतात. राज्याचीही या बाबतीत महत्त्वाची जबाबदारी असते. परंतु सर्व उद्योग किंवा उत्पादनाची साधने राज्याच्या मालकीची होणे किंवा राज्याच्या व्यवस्थे-खाली येणे म्हणजे आर्थिक व राजकीय शक्तीचे केंद्रीकरण करणे होय. असे केंद्रीकरण अर्थायामाला मंजूर नाही. तथापी आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचा प्रारंभ व्हावा, अर्थव्यवस्थेत अनुशासन यावे, तसेच देशाच्या मूलभूत गरजा पुऱ्या व्हाव्यात यासाठी आर्थिक क्षेत्रांत सामान्यतः नियोजन, निर्देशन, नियमन आणि नियंत्रण यांची जबाबदारी शासनाने स्वीकारणे आवश्यक असते. अर्थायामासाठी विशेष परिस्थितीत अवजड आणि मूलभूत उद्योगांची मालकी व व्यवस्थापन यांचीही जबाबदारी राज्याला स्वीकारावी लागेल.

स्वातंत्र्य ही मानवाची व राष्ट्राची स्वाभाविक आकांक्षा असते. जनतेच्या आकांक्षांची प्रतिष्ठा राखली जावी आणि लोकांना आपापल्या कर्तव्याचे पालन करता यावे यासाठी स्वातंत्र्याबरोबर लोकशाहीदेखील असणे आवश्यक आहे. केवळ राजकीयच नव्हे तर आर्थिक व सामाजिक क्षेत्रांतही लोकशाही असली पाहिजे. व्यक्ती व समष्टी यांच्या स्वाभाविक हितामध्ये

शासनाने हस्तक्षेप न करता नेहमी त्यास अनुकूल असे वर्तन करणे ही राजकीय स्वतंत्रता होय. अर्थाचा अभाव वा प्रभाव निर्माण होऊन व्यक्तिहितास बाधा न येणे ही आर्थिक स्वतंत्रता होय. समाजाने व्यक्तीच्या हितास बाधक न होता पोषक होणे ही सामाजिक स्वतंत्रता होय. लोकशाहीप्रमाणेच स्वातंत्र्यही अविभाज्य असते. राजकीय स्वातंत्र्याशिवाय आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्य प्राप्त होऊ शकत नाही. आर्थिक स्वातंत्र्याशिवाय मनुष्याला सामाजिक व काही अंशी राजकीय स्वातंत्र्य मिळू शकत नाही. तसेच सामाजिक स्वातंत्र्य नसेल तर त्याला आर्थिक व राजकीय स्वातंत्र्य नीटपणे उपभोगता येणार नाही. म्हणूनच पं. दीनदयाळजी म्हणतात की, "यासाठी लोकशाही व स्वतंत्रता यांची अर्थायामाद्वारे जपणूक होईल अशीच अर्थव्यवस्था उभी करणे आवश्यक आहे."

हा विषय अधिक स्पष्ट करताना पं दीनदयाळजी म्हणतात, "आर्थिक लोकशाही म्हणजे काय ? ज्या शासनपद्धतीत प्रत्येक व्यक्ती व्यापक समष्टि-हिताला बाध येणार नाही हे पथ्य सांभाळून स्वतःच्या इच्छेनुसार उत्पादन व उपभोग करू शकत असेल, त्या शासनपद्धतीत आर्थिक स्वातंत्र्य आहे असे आपण म्हणू शकू. साम्यवादी अर्थव्यवस्थेत उत्पादन आणि उपभोग या दोन्ही बाबतींत व्यक्तीला स्वातंत्र्य नसते. आर्थिक स्वातंत्र्य प्रत्यक्ष व्यवहारात साध्य करावयाचे असेल तर प्रत्येक व्यक्तीला काम करण्याचा अधिकार (Right to work) असला पाहिजे. काम करू शकणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला काम उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी असली पाहिजे. या बरोबरच उपभोगाचे स्वातंत्र्यही (Freedom to consume) प्रत्येक व्यक्तीला – सामाजिक चौकटीत राहून – उपभोगता यावयास हवे हे देखील आर्थिक लोकशाहीचे गमक आहे. एखादी व्यक्ती उत्पादन करू शकत नसेल वा शासन त्या व्यक्तीला काम उपलब्ध करून देऊ शकत नसेल तरीही तिच्या किमान जीवनावश्यक गरजा पूर्ण झाल्या पाहिजेत. आर्थिक व लोकशाहीमध्ये हा अधिकार सुरक्षित असला पाहिजे.

तथापि आर्थिक लोकशाहीला अत्यधिक महत्त्व देऊन लोकांची उपभोग-क्षमता वाढवीत जाऊन आपण इतर सर्व प्रकारची लोकशाही गमावून बसणार नाही, याची खबरदारी घेतली पाहिजे. रशियातील साम्यवादी शासनाने व्यक्तीला रोजगाराची हमी दिली परंतु तिची इतर स्वातंत्र्ये हिरावून घेतली. भाकरीचा अधिकार बहाल करून तिच्या इतर अंगांचा विकास कुंठित करणे हे

आर्थिक लोकशाहीला मारक आहे. सत्ता व संपत्ती यांचे केंद्रीकरण म्हणजे आर्थिक लोकशाहीची गळचेपी. अशा केंद्रीकरणामुळे उत्पादनात स्वातंत्र्य व उपभोगस्वातंत्र्य ही दोन्ही स्वातंत्र्ये नष्ट होतात. मग इतर स्वातंत्र्येही टिकू शकत नाहीत. या उलट आत्यंतिक स्पर्धा, टोकाचा मात्स्यन्याय यामुळे भांडवलशाही अर्थरचनेत संपत्तीचा प्रभाव व आधिपत्य निर्माण होते. परिणामी आर्थिक लोकशाही केवळ नाममात्र उरते.

रेनेफ्लुप या विचारवंताने म्हटले आहे की, "लोकशाहीने मानवाला अनेक स्वातंत्र्ये उपलब्ध करून दिली. पण त्याचबरोबर तिने एक 'आर्थिक मानव' निर्माण केला आहे. समाजवाद आणि लोकशाही या दोघांनीही मानवाला संपन्न बनवण्याच्या खटपटीत त्याचे मनुष्यत्व व सुख हिरावून घेतलेले दिसते. या संदर्भात 'राष्ट्रजीवनाची दिशा' या पुस्तकात पं. दीनदयाळजी म्हणतात, " समाजवाद आणि लोकशाही या दोघांनीही मानवाच्या भौतिक स्वरूपावर व गरजांवरच आपले लक्ष केंद्रित केले आहे. दोघांचीही आधुनिक विज्ञानावर आणि यांत्रिक प्रगतीवर अमाप श्रद्धा आहे. या आधुनिक आविष्कारांचे ते अगदी गुलाम झालेले आहेत. याचा परिणाम असा झाला आहे की, उत्पादनवाढ फार मोठ्या प्रमाणात होत आहे, परंतु ती मानवाच्या वास्तविक गरजा व कल्याण यांचा विचार न करता होत आहे. उत्पादनासंबंधीच्या निर्णयाची सूत्रे माणसाकडून यंत्राकडे गेली आहेत. "

आर्थिक स्वातंत्र्याचा वास्तविक अर्थ उलगडून दाखवताना पं. दीनदयाळजी म्हणतात, " अजस्र यंत्रसामुग्रीचा सोस असलेल्या लोकांच्या मते आर्थिक स्वातंत्र्याचा अर्थ अमाप उत्पादनवाढ एवढाच असतो. परंतु हा दृष्टिकोन एकांगी व हानिकारक आहे. आपण अशी खबरदारी घेतली पाहिजे की एकाच्या स्वातंत्र्यामुळे दुसऱ्याचे स्वातंत्र्य अपहृत होणार नाही. अमाप उत्पादनाच्या एकाच्या स्वातंत्र्यामुळे दुसऱ्याच्या पानातील भाकरी हिरावून घेतली जाता कामा नये. कुठल्याही केंद्रीकरणात नेमके हेच घडते. " या मुद्याच्या स्पष्टीकरणार्थ दीनदयाळजींनी अनेक उदाहरणे दिलेली आढळतात. उदा., मोठमोठ्या शहरांत उभारलेल्या कापडगिरण्यांनी लक्षावधी विणकरांचा धंदा बुडवला. तेलगिरण्यांनी तेली लोकांना ग्रामीण भागातून उठवले.

भांडवलशाही आणि समाजवाद या दोन्ही पद्धतींमध्ये काही थोड्या व्यक्तींच्या हाती शक्ती केंद्रित होते. मजुराचा विचारही केवळ उत्पादनाचे

एक साधन (Factor of production) याच दृष्टिकोनातून होतो. स्वतंत्रपणे काम करणारा कुशल कारागीर-वर्ग आणि मामुली नफा घेऊन समाजाची सेवा करणारा लहान व्यापाऱ्यांचा वर्ग या पद्धतीत नष्ट होतो. यामुळे आर्थिक स्वातंत्र्य व आर्थिक लोकशाही ह्यांची जपणूक करणारा 'अर्थायाम' अर्थ-व्यवस्थेत प्रस्थापित करता आला पाहिजे, असे दीनदयाळजी मांडत.

लोकशाही व आर्थिक स्वातंत्र्य यांची जपणूक होईल अशी अर्थव्यवस्था उभी करणे आवश्यक आहे. अशी व्यवस्था उभी करावयाची म्हणजे आपल्याला १) संपत्तीच्या स्वामित्वाचा प्रश्न, २) अर्थव्यवस्थेची प्रेरणा, ३) उत्पादनाच्या मर्यादा आणि ४) अर्थव्यवस्थेचा मानवी उद्देश या चार गोष्टींचा विशेष विचार करावा लागेल.

संपत्तीचे स्वामित्व

संपत्तीच्या स्वामित्वाचा प्रश्न महत्त्वाचा आहे. अर्थायामाच्या संदर्भात तर या प्रश्नाचा विचार करणे अपरिहार्य आहे. भांडवलशाही अर्थप्रणालीत संपत्तीवर व्यक्तीचा अनिर्बंध अधिकार असावा, त्यात शासनाने हस्तक्षेप करू नये, अशी अपेक्षा असते. स्वामित्वाच्या या त्यांच्या कल्पनेत त्या संपत्तीच्या उपभोगाचाही अनिर्बंध अधिकार समाविष्ट आहे. साम्यवाद खाजगी संपत्ती हेच सर्व प्रकारच्या आर्थिक दुरवस्थेचे मूळ कारण मानतो व म्हणून खाजगी संपत्ती संपुष्टात आणतो. (काही तत्त्वचिंतक विशेषतः महात्मा गांधींसारखे नेते संपत्ती ही ईश्वराची आहे असे समजून मनुष्याने विश्वस्त या नात्याने तिचा वापर करावा असे सुचवितात. दीनदयाळजी म्हणतात की, "सिद्धांत म्हणून विश्वस्त-कल्पना ठीक आहे. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात विश्वस्तासंबंधी कोणते नियम असावेत आणि ते कोणी करावेत हा प्रश्न उरतोच.")

पंडित दीनदयाळजी सुचवितात की, खाजगी संपत्ती पूर्णपणे नष्ट करणे अयोग्य आहे. असे केल्याने व्यक्तीची प्रतिष्ठा, सुरक्षितता, समाधान आणि उद्यमशीलता नष्ट होतात. त्यामुळे साम्यवादी मार्ग अत्यंत अयोग्य आहे.

परंतु त्याचबरोबर संपत्तीचा अनिर्बंध अधिकार व तिचा अनिर्बंध उपभोग हा भांडवलशाही अर्थविचारही त्यांना अयोग्य वाटतो. कारण या परिस्थितीत संपत्ती एकाचे तिच्या प्रभावाने आणि दुसऱ्याचे तिच्या अभावामुळे अधःपतन करील. म्हणून ते म्हणतात की, "संपत्तीच्या अधिकाराला मर्यादा

असल्या पाहिजेत ; आणि या मर्यादा व्यक्ती व समाज यांच्या समुचित गरजा व जीवनमूल्ये यांच्या आधारे ठरविण्यात याव्यात.

मानवी जीवनाला भौतिक संपत्तीची आवश्यकता असते. विशिष्ट मर्यादेपलीकडे संपत्तीची वाण भासू लागली म्हणजे मनुष्याची नीतिमत्ताही ढासळू लागते. भौतिक उन्नती ही विशिष्ट मर्यादेपर्यंत आत्मिक उन्नतीला आवश्यक व पोषक असते हे जसे खरे आहे, त्याचप्रमाणे भौतिक सुखांचा उपभोग प्रमाणाबाहेर गेल्यास तो मानवी जीवनास व नीतिमत्तेस बाधक होतो हेही खरे आहे. भांडवलशाही अर्थरचनेच्या पुरस्कर्त्यांना या मूलभूत बाबीचे नीट आकलन झालेले नाही. तसेच अर्थसत्ता व राजकीय सत्ता यांचे एकत्रीकरण करून अर्थरचना चालविणाऱ्या साम्यवादी व समाजवादी विचारवंतांना दुसऱ्या एका मुलभूत गोष्टीचे नीट आकलन होऊ शकले नाही. ही दुसरी बाब म्हणजे कुठलेही केंद्रीकरण हे विघातक असते व जो अनुभव संपत्तीच्या प्रभावाचा येतो तोच अनुभव आर्थिक व राजकीय सत्तेचे एकाच ठिकाणी सर्वंकष केंद्रीकरण झाल्याने अधिक भीषण स्वरूपात प्रत्ययास येतो.

म्हणून पंडित दीनदयाळजी म्हणत, "भौतिक सुखांचा अमर्याद उपभोग तसेच राजकीय सत्तेचा अनियंत्रित वापर या गोष्टी व्यक्तीच्या व समष्टीच्या मानसिक, बौद्धिक आणि आत्मिक अवनतीला व ऱ्हासाला कारण होत असतात. अर्थ व राजकीय सत्ता जेथे हातात हात घालून चालत असतात तेथे तर हा ऱ्हास भयानक स्वरूप धारण करू शकतो."

संपत्तीचे मानवी जीवनातील स्थान व प्रयोजन कोणते हे तपासून पाहिल्याशिवाय अर्थशास्त्राची मांडणी होऊ शकणार नाही. म्हणून पंडित दीनदयाळजी म्हणत असत की, "संपत्तीविषयक समस्यांचा विचार करताना अर्थशास्त्राला नीतीशास्त्रात व राज्यशास्त्रात शिरावे लागले तरी ते आवश्यक व अपरिहार्य आहे. भांडवलशाही अर्थशास्त्रात संपत्तीच्या उत्पादनाचा व विनियोगाचा विचार केवळ व्यापारी व कारखानदार यांच्या नफ्यातोट्याच्या दृष्टीतून केला जातो, तर समाजवादी अर्थशास्त्रात तो राजकीय नेतृत्वाच्या सत्ता दृढमूल करण्याच्या व अहंकार पोसण्याच्या पद्धतीतून केला जात असतो. खरे म्हणजे या प्रश्नाचा विचार अशा प्रकारे न करता मानवी जीवनाच्या विकासाच्या दृष्टीने केला पाहिजे; कारण मानवी जीवनाचा सर्वांगीण व संतुलित विकास करणे हेच संपत्तीचे आद्य प्रयोजन असते. संपत्तीचे मूल्य व

उपयुक्तता याच निकषावर ठरविली पाहिजे, आणि तिचा विनियोगही याच दृष्टीने व्हावयास हवा. संपत्तीचे उत्पादन, वितरण, विभाजन (Allocation) व उपभोग या सर्व बाबतींत अनियंत्रित व्यक्तिवादाचे, तसेच अमर्याद केंद्रीकरणाचे तत्त्वज्ञान बाजूला सारून सामाजिक नियंत्रणाचे, न्यायप्रस्थापनाचे व संपूर्ण विकेंद्रीकरणाचे तत्त्व स्वीकारले पाहिजे."

संपत्तीचा उपभोग ह्या संदर्भात संयमित उपभोगाचा विचार मांडताना दीनदयाळजी संपत्तीचा विनियोग हा आवश्यकता, सुखसोई आणि चैन यांबाबतचे तारतम्य ठेवून करावयास हवा असा विचार मांडीत असत. हे तारतम्य समाजाने ओळखावे असे वाटत असेल तर नैतिक व सांस्कृतिक मूल्यांची शिकवण समाजाच्या अंगी बाणवावयास हवी असते. तसे संस्कार करावे लागतात. या दृष्टीने भारतीय संस्कृतीची शिकवणूक साऱ्या जगाला मार्गदर्शक ठरू शकते.

मागणीप्रमाणे पुरवठा अगर राज्यसत्तेच्या लहरीनुसार उत्पादन या सूत्रानुसार चालणाऱ्या अर्थव्यवस्थेत जीवनाचा विविध अंगांनी ऱ्हास करणाऱ्या वस्तूंचे उत्पादन वाढू लागते. समाजाची श्रमशक्ती अशा वस्तूंच्या निर्मितीकडे खर्ची पडते. सामाजिक अवनतीची ही प्रवृत्ती रोखण्यासाठी संपत्तीचे मूल्यमापन तसेच उत्पादनाचे ध्येय केवळ लोकांच्या उपभोगलालसेवर व राज्यकर्त्यांच्या लहरीवर अवलंबून ठेवणे युक्त नाही.

अर्थव्यवस्थेची प्रेरणा

संपत्तीचे स्थान, विश्वस्त-कल्पना, संपत्तीच्या स्वामित्वाचा प्रश्न, संपत्तीचे घातुक केंद्रीकरण व त्याचे होणारे दुष्परिणाम, संपत्तीचे योग्य मूल्यनिदान आदी गोष्टींचे विवरण करून दीनदयाळजी अर्थव्यवस्थेच्या मूलभूत प्रेरणा व स्वरूप यांविषयीचे विश्लेषण करताना म्हणतात– "अर्थव्यवस्था कशी असावी ? आपली अर्थव्यवस्था अशी असावी की, ज्यामुळे मनुष्यत्व विकसित होईल, ते नष्ट होणार नाही, वा त्यावर विपरीत परिणाम होणार नाही, आणि ज्यायोगे आपण मानवत्वाकडून देवत्वाकडे जाऊ शकू. हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून नियोजन, नियमन, नियंत्रण आणि आर्थिक संस्थांची निर्मिती व्हावयास हवी. यासाठी अर्थव्यवस्थेच्या मर्यादाही तपासल्या पाहिजेत.

लोकांचे पालन-पोषण, जीवनाचा विकास, तसेच राष्ट्राची धारणा व

विकास यासाठी जी मूलभूत साधने आवश्यक असतात त्यांचे उत्पादन करणे हे अर्थव्यवस्थेचे प्रमुख लक्ष्य असले पाहिजे, यात वादच नाही. परंतु या किमान मर्यादेनंतर अधिक समृद्धी व सुख यांसाठी अर्थोत्पादन करावे की नाही, हा स्वाभाविक प्रश्न उभा रहातो. पाश्चिमात्य अर्थशास्त्रज्ञांनी गरजा वाढवीत जाणे व त्या वाढत्या गरजा, उत्पादन अधिकाधिक वाढवीत जाऊन अखंड पुरवीत राहणे ही वाव इष्ट मानली. सामान्यपणे प्रथम इच्छा निर्माण होतात व त्या पूर्ण करण्यासाठी साधने निर्माण केली जातात. परंतु आता अशी स्थिती आली आहे की, जे काही उत्पादन केले जाते त्याचा उपयोग करण्यासाठी इच्छा निर्माण केली जाते. पूर्वी उत्पादन उपभोगाचे अनुसरण करीत असे, आता उपभोग उत्पादनाच्या मागे धावत आहे. बाजारातील ग्राहकांसाठी माल तयार करण्याऐवजी तयार केलेल्या मालासाठी बाजारपेठा शोधणे, नाना क्लृप्त्या लढवून त्या निर्माण करणे हे आजच्या अर्थनीतीचे अंग बनले आहे.

अर्थव्यवस्थेचा उद्देश जर मनुष्यत्व विकसित करणे असेल तर साहजिकच आपल्याला मूलभूत निकडीच्या गरजा भागविणाऱ्या उत्पादनाला अग्रक्रम द्यावा लागेल. गरिबांच्या गरजांना प्राधान्य द्यावे लागेल. परंतु पाश्चात्य अर्थ-शास्त्रज्ञ अर्थव्यवस्थेचा उद्देश अधिक धन, अधिक नफा हाच मानीत असल्याने त्या अर्थव्यवस्थेत उत्पादनावर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण असत नाही. श्रीमंतांची क्रयशक्ती मोठी असल्याने अर्थव्यवस्था, उत्पादनयंत्रणा व सामुग्री त्यांच्यासाठी अधिक वापरली जाते. बड्यांच्या मुक्त स्पर्धेत लहान उद्योगधंदे बंद पडत जातात. यातून निर्माण होणारी मक्तेदारी व केंद्रीभूत मोठे उद्योग उत्पादनाची साधनसामुग्री व उत्पादनाच्या किंमती यांबाबत बेबंद मनमानी करू लागतात. सर्वसामान्यांच्या अर्थस्वातंत्र्याचा संकोच होतो. उत्पादन केवळ नफ्याकडे पाहते. या विषयाची मानवताविहीन बाजू स्पष्ट करताना दीनदयाळजी म्हणतात, अशा अर्थशास्त्रज्ञांची ग्राहकाकडे पाहण्याची दृष्टी त्याच्या रास्त गरजा किंवा इच्छा यांकडे नसून त्याच्या खिशाकडे म्हणजेच त्याच्या क्रयशक्ती-कडे असते. परिणामी श्रीमंतांचे चोचले पुरविणारी नाना प्रकारची उत्पादने बाहेर पडतात. गरिबांच्या संस्काराला लागणाऱ्या अत्यावश्यक गोष्टीही उत्तरोत्तर दुर्मिळ होत जातात."

अशा प्रकारची आर्थिक यंत्रणा जितकी अधिक यशस्वी तितके हे उत्पादन श्रीमंतांच्या विलासी राहणीमानाकडे झुकत असल्याचे आढळते. प्रा.

गॅलब्रेथ यांनी म्हटल्याप्रमाणे," असा आर्थिक विकास आपल्या गरजांच्या जुन्या वातावरणातून अधिकाधिक वैपुल्याच्या नव्या जगात घेऊन जातो. एक काळ असा होता की, प्रत्येक उत्पादन-प्रक्रियेमुळे सामाजिक संपत्तीच्या तुटपुंज्या साठ्यात काही आवश्यक वस्तूंची भर पडे, परंतु उत्पादन-प्रक्रिया जसजशी केवळ क्रयशक्तीच्या संचित साठ्याकडे लक्ष देऊन पुढे सरकू लागते तसतसे उत्पादन श्रीमंतांच्या चैनीच्या वस्तूंच्या पाठीमागे धावत जाते."

प्रा. गॅलब्रेथ आपल्या 'ॲफ्लुअंट सोसायटी' या पुस्तकात लिहितात – " यापेक्षाही वाईट गोष्ट अशी की, अधिकाधिक श्रीमंती जीवनाच्या वस्तूंची आपण जसजशी रास रचीत जातो तसतशा सर्वसामान्य माणसाच्या जीवनाला आवश्यक असणाऱ्या वस्तू आणि सेवा मागे पडत जातात. "

अर्थशास्त्रज्ञ ऑर्थर सेसिल पिगू यांनी त्यांच्या 'सोशिॲलिझम् व्हर्सेस कॅपिटॅलिझम्' या पुस्तकात हेच विचार मांडताना लिहिले आहे – " अनर्जित उत्पन्न मिळविणाऱ्या श्रीमंतांचा एक वर्ग असतो. त्यांना काम करण्याची गरज नसते व खरोखरच ते काम करीतही नाहीत ··· विलासी पण अनैसर्गिक व मूर्खपणाचा जीवनक्रम प्रत्यक्षात आणण्यासाठी जगातील धनिक वर्ग आघाडीवर राहाण्यास उत्सुक असतो. समाजाला उपलब्ध होणाऱ्या एकूण वस्तू व सेवांपैकी बराच मोठा हिस्सा असे धनाढ्य लोक फस्त करीत असतात."

आपल्यासारख्या अर्धविकसित देशामध्येही प्रायः हेच चित्र आढळते. आपल्या येथे दुधाच्या तुलनेने बिअरचे उत्पादन खूपच वाढलेले आहे. सुती कापडाच्या तुलनेने टेरेलिन कापड बाजारात अधिक प्रमाणात आलेले दिसते. उत्तम फळफळावळ पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाही, परंतु रेडिओ–टीव्ही–व्हीडिओ मात्र ठिकठिकाणी विक्रीसाठी दुकानात ठेवलेले दिसतात. प्रा. पिगू म्हणतात," उत्पादन-सामुग्रीचे आवश्यक वस्तू व चैनीच्या वस्तू यांच्या उत्पादनात होणारे असे असंतुलित वितरण ही अत्यंत अनुचित गोष्ट आहे. त्यामुळे उत्पादन-साधनांचा वापर कमी निकडीच्या गरजा भागविणाऱ्या वस्तू व सेवा यांच्या निर्मितीसाठी होत रहातो व खरोखरीच्या निकडीच्या गरजांकडे दुर्लक्ष होते. "

भांडवलशाही अर्थव्यवस्थेप्रमाणेच साम्यवादी अर्थव्यवस्थेतही उत्पादनाबाबत सामान्य जनांची उपेक्षाच होते. याचे स्वरूप मात्र वेगळे असते. उत्पादन-साधने खाजगी मालकीची नसल्याने त्या अर्थव्यवस्थेत उत्पादनतंत्राचा चैनीच्या वस्तूंच्या निर्मितीकडे धावण्याचा प्रकार नसतो. तथापि सर्व उत्पादनसाधने

सरकारच्या मालकीची असल्यामुळे दैनंदिन वस्तूंची टंचाई निवारण्यासाठीच उत्पादनतंत्र वापरले गेले पाहिजे असा अंकुश राज्यकर्त्यांवर नसतो. त्यामुळेच रशियासारखा देश एका बाजूने चंद्रावर माणूस पाठवितो, अवकाशात उपग्रहामागून उपग्रह सोडतो, आणि त्याच वेळी अन्नासाठी रांगा लावणाऱ्या श्रमिकांवर गोळ्या झाडताना दिसतो.

यासाठीच उत्पादनप्रणाली व एकूण अर्थव्यवस्था मानवी उद्देशांवर आधारलेली असली पाहिजे असा दीनदयाळजींचा विशेष आग्रह होता.

उत्पादनाच्या मर्यादा

उत्पादन-प्रणालीचे तंत्र व अंतिम उद्देश यांबरोबरच उत्पादनाच्या मर्यादांचाही विचार केला पाहिजे असे दीनदयाळजींचे म्हणणे असे. त्यांच्या मते उत्पादनाच्या मर्यादांविषयी पाश्चात्य अर्थशास्त्रज्ञांनी विचारच केलेला दिसत नाही. उलट पक्षी अधिकाधिक उत्पादन, त्यासाठी अवाढव्य उद्योगधंदे व अजस्र शेतीकेंद्रे हीच आदर्श रचना आहे असे पाश्चात्य अर्थशास्त्रज्ञ व समाजधुरीण मानीत आले आहेत.

नैसर्गिक साधनसामुग्री

ॲडॅम स्मिथ, मार्शल यांच्यापासून तर लॉर्ड जॉन केन्स, डॉ. हेन्स, शुम्पिटर यांच्यापर्यंत बहुतेक सर्व पाश्चात्य अर्थशास्त्रज्ञांनी 'आर्थिक विकास' या विषयाचे दोन पायाभूत सिद्धांत गृहीत धरलेले आहेत. १) अमर्याद आर्थिक उत्पादन व समृद्धी हेच अर्थव्यवस्थेचे लक्ष्य असले पाहिजे. २) अद्यावत विज्ञानाचा वापर करून आणि व्यापक प्रमाणावर उद्योगीकरण करून हा आर्थिक विकास घडविणे शक्य आहे.

पं. दीनदयाळजींच्या मते हे दोन्ही सिद्धांत चुकीचे आहेत. यांपैकी पहिल्या सिद्धांतामध्ये असे गृहीत धरण्यात आले आहे की, माणसाच्या सर्व भौतिक गरजा पूर्ण करणे शक्य आहे; आणि अशा प्रकारे माणसाच्या गरजा पूर्ण झाल्या म्हणजे तो सुखी होईल. प्रत्यक्ष अनुभव असा आहे की, उपभोग जेवढे अधिक घ्यावेत तेवढी त्यांची चटक आणि हाव वाढतच जाते. त्यामुळे माणसाच्या भौतिक सुखाच्या सर्व गरजा पूर्ण होणे असंभव आहे. भौतिक गरजांना कोठे तरी मर्यादा घातली तरच मानवाचा सुखाचा मार्ग मोकळा होईल.

दुसरे म्हणजे तंत्रज्ञान कितीही विकसित झाले तरी आर्थिक विकासाचीही एक मर्यादा असतेच. आर्थिक विकासासाठी दोन प्राथमिक गोष्टींची गरज असते. १) मूलभूत द्रव्ये व खनिजे, आणि २) ऊर्जा (Energy). निसर्गात या दोन्ही गोष्टींचे साठे मर्यादित आहेत. आपण उत्पादन बेसुमार वाढवीत गेलो तर नैसर्गिक साधनसामुग्री कोठवर पुरी पडणार ? म्हणून उत्पादनाचा विचार करताना – मग ते शेती-उत्पादन असो वा औद्योगिक उत्पादन असो – ज्याप्रमाणे समाजाच्या गरजांचा यथायोग्य व सांस्कृतिक दृष्टिकोनातून विचार केला पाहिजे, त्याचप्रमाणे पृथ्वीवरील साधनसामुग्री, निसर्गातील समतोल इत्यादी गोष्टींचाही विचार केला पाहिजे.

दीनदयाळजी म्हणतात – " ज्या नैसर्गिक साधनांचा उपयोग करून आपण नवीन वस्तू निर्माण करतो ती साधने मर्यादित आहेत. माणसाने जरी आपल्या बुद्धिमत्तेने एकाच वस्तूच्या निर्मितीसाठी अनेक साधनांचा वापर केला असला तरी अशा रीतीने अविचाराने ही मर्यादित साधनसंपत्ती वाटेल तशी खर्च करणे हे काही शहाणपणाचे होणार नाही.

निसर्गात एक प्रकारचा समतोल असतो. या समतोलामुळेच नित्य परिवर्तनशील आणि गतिशील जगातसुद्धा वेगवेगळ्या शक्तींमध्ये, क्रिया व त्यांच्या प्रतिक्रियांमध्ये एक प्रकारचे संतुलन ठेवले जाते. निसर्ग आपल्या पद्धतीने, त्याची होणारी झीज भरून काढीत असतो. परंतु मानव संपूर्ण विश्व जणू काही स्वतःसाठीच निर्माण झाले आहे अशा भावनेने नैसर्गिक साधनसामुग्रीचा एवढ्या वेगाने नाश करीत आहे की, त्या वेगामुळे झालेली झीज निसर्ग भरून काढू शकत नाही आणि त्यामुळे निसर्गातील संतुलन टिकू शकत नाही.

अधिकाधिक भौतिक समृद्धीसाठी उद्योगीकरण व शेती-उत्पादन या दोन्ही क्षेत्रांत विक्रमी वाढ करण्याच्या धुंदीत या गोष्टीकडे लक्षच राहिले नाही.

पुनर्निर्मिती होऊ न शकणाऱ्या वस्तूंमध्ये इंधनाची समस्या हा साऱ्या जगभर चिंतेचा विषय होऊन बसला आहे. एक पर्याय म्हणून अणुशक्ती विकसित करण्याचे प्रगत राष्ट्रांनी ठरविले व विकासासाठी ' अणुशक्ती ' ही घोषणाही सर्वत्र निनादली. परंतु अणुशक्तीच्या या वापरामुळे किरणोत्सर्गी पदार्थांचे प्रदूषण एवढ्या झपाट्याने वाढत आहे की, साऱ्या मानवजातीचे भवितव्य धोक्यात येत आहे. ' रेडिओ ॲक्टिव्ह वेस्टच्या ' साठ्याचा प्रश्नही

एक फार मोठी डोकेदुखी होऊन बसली आहे. अणुयुगाचे प्रणेते आइन्स्टीन लिहितात – " शास्त्रज्ञांना सामाजिक जबाबदारीची जाण खूपच कमी असते. त्यामुळे संशोधनाची यथायोग्य दिशाच त्यांना सापडू शकली नाही. "

पुननिर्मिती होऊ न शकणाऱ्या निसर्गसंपत्तीचा उत्पादनाच्या मर्यादांशी जो संबंध असतो त्याचा विचार केल्यानंतर दीनदयाळजी पुननिर्मिती होऊ शकणाऱ्या निसर्गसंपत्तीच्या उपयोगांकडे वळतात.

" वास्तविक निसर्गापासून आपण एवढीच साधनसामुग्री व तीही अशा प्रकारे घ्यावी की झालेली झीज निसर्ग स्वतःच भरून काढू शकेल. उदा., झाडापासून पाने घेतल्याने झाडाची हानी होत नाही. उलट लाभच होतो. परंतु जमिनीपासून जास्तीत जास्त उत्पन्न घेण्याच्या लोभापायी आपण असे प्रयोग करीत आहोत की, ज्यामुळे काही काळानंतर जमिनीची उत्पादनशक्ती संपून जाईल. कारखानदार मशीन वगैरे साठी घसारानिधीची व्यवस्था करतात. निसर्गाच्या या कारखान्यासाठी मात्र आपण कसल्याही घसाऱ्याची तजवीज करीत नाही. हे कसे चालेल ? या दृष्टीने विचार केला तर असे म्हणावे लागेल की आपल्या अर्थव्यवस्थेचा उद्देश अमर्याद उपभोग हा न ठेवता संयमित उपभोग हाच असला पाहिजे निसर्गाच्या स्तनातून दोहन करून आपण जगावे– शोषण करून नव्हे. "

अर्थशास्त्राला भौतिक उद्दिष्टांबरोबरच नैतिक जीवनमूल्यांचाही विचार करावा लागेल असे दीनदयाळजी आग्रहाने सांगत असत, आणि संयमित उपभोगाचा आग्रह धरीत असत, तेव्हा त्यांना सांस्कृतिक मूल्यांबरोबरच अर्थशास्त्रीय सिद्धांतांचाही संदर्भ अभिप्रेत होता हे यावरून स्पष्ट होईल.

प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ डॉ. शूमाकर (यांना पंडित जवाहरलाल नेहरूंनी आग्रहाने बोलावून भारताच्या अर्थव्यवस्थेसंबंधी सल्ला देण्यास सुचविले होते.) आपल्या ' स्मॉल इज ब्युटिफुल ' या ग्रंथात म्हणतात –

" Far larger is the capital provided by Nature and not by man. We do not even recognise it as such and treat it as valueless. Even the great Dr. (Karl) Marxs fell into this error when he formulated the labour theory of value. " शूमाकर यांनी पं. दीनदयाळजींसारखेच ' निसर्ग-संपत्तीच्या घसारानिधी 'संबंधी विचार या पुस्तकात मांडले आहेत. त्यांनी म्हटले आहे –

" आजच्या युगातील वैज्ञानिक व अर्थतज्ञ या भ्रमात आहेत की, उत्पादनाचे प्रश्न सुटलेले आहेत ..... निसर्गसंपत्ती या अनिवार्य भांडवलाचा मानवजात एवढ्या वेगाने उपभोग घेत आहे की, जणू ते भांडवल नसून कमावलेले उत्पन्न आहे ! "

बहुतांश पाश्चात्य अर्थशास्त्रज्ञांचे या महत्त्वाच्या बाबीकडे लक्षच गेलेले नाही आणि त्यामुळेच आज मानवापुढे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. स्थिर भांडवलावर घसारा काढला जातो. निसर्गाच्या संदर्भात या शब्दाचा वापर करून निसर्ग हाही उत्पादनाचा फार मोठा घटक आहे, हे दीनदयाळजींनी स्पष्ट केले आहे. पाश्चात्य अर्थशास्त्रज्ञ भांडवल व उत्पादन यांचा विचार करताना जर या महत्त्वाच्या घटकाला विसरले असतील तर त्यांचे विचार अपूर्ण आहेत असेच म्हणावे लागेल.

दीनदयाळजी म्हणत असत की, मानवाचे अस्तित्व आणि विकास या साठी निसर्गाची साथ अपरिहार्य आहे. गेल्या काही दशकांत विज्ञानाची प्रगती भरपूर झालेली असली तरी निसर्गाचे मानवी जीवनातील स्थान यत्किंचितही कमी झालेले नाही.

याच कालावधीत मानवाने निसर्गावर जे आक्रमण केले, त्याचा विनाश सुरू केला त्याचे दुष्परिणाम सर्वत्र दिसून येऊ लागलेले आहेत. पर्यावरण-विषयक समस्येचा सविस्तर आढावा घेणारे एक पुस्तक 'स्टेट ऑफ दी वर्ल्ड १९८४' अमेरिकेच्या वर्ल्ड वॉच इन्स्टिटचूटने नुकतेच प्रसिद्ध केले आहे. वर्ल्ड वॉच इन्स्टिटचूट ही एक स्वतंत्र संशोधन संस्था आहे. जागतिक महत्त्वाच्या प्रश्नांवर शोध-निबंधांद्वारे लोकशिक्षण करण्याचे महत्त्वाचे कार्य ही संस्था करीत असते. या संस्थेला संयुक्त राष्ट्र संघ तसेच रॉकफेलर, डॉज यांसारख्या मोठ्या प्रतिष्ठानांतर्फे आर्थिक सहाय्य मिळत असते. या संस्थेने वरील पुस्तकात काढ-लेला निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहे. " बेसुमार जंगलतोड, जमिनीची अमर्याद धूप, इंधनाची उधळपट्टी, नद्यासागरांचे तसेच वातावरणाचे वाढते प्रदूषण आदी गोष्टींद्वारे निसर्गाचा विनाश भयानक वेगाने सुरू आहे. हा विनाश असाच चालू राहिला तर काही दशकांतच ही पृथ्वी मानवी जीवनाच्या धारणेसाठी आवश्यक असलेली आपली क्षमताच गमावून बसेल ! वरील अहवालात आपल्या गंगा नदीच्या पाण्याच्या वाढत्या प्रदूषणाचाही निर्देश करण्यात आलेला आहे.

खूप उशीरा का होईना, पाश्चात्य देशांना उत्पादनांच्या मर्यादांची थोडी तरी जाणीव झालेली दिसते. उद्योगीकरणाला मर्यादा घातल्या पाहिजेत, पृथ्वीवर होणारे प्रदूषण थांबविले पाहिजे, निसर्गसंपत्ती जपली पाहिजे, खनिजांच्या साठ्यांचा वापर जपून केला पाहिजे हे विचार आता त्यांच्याही डोक्यांत येऊ लागले आहेत. 'संयमित उपभोग हे उद्दिष्ट ठेवून, निसर्गाचे शोषण नव्हे तर दोहन करून मानवाने आपल्या विकास साधावा' हा दीनदयाळजींनी तीन तपांपूर्वी मांडलेला विचार किती महत्त्वाचा व दूरदर्शी आहे हे यातून अधिक स्पष्ट होते.

अर्थव्यवस्थेचा मानवी उद्देश

अर्थव्यवस्थेबाबत मानवी उद्देश ठेवला तर आर्थिक प्रश्नाकडे पाहाण्याची आपली दृष्टी बदलेल या बाबतचे विवरण करताना दीनदयाळजी 'एकात्म मानववाद' मध्ये म्हणतात, "पाश्चिमात्य अर्थव्यवस्थेत – मग ती भांडवलवादी असो वा समाजवादी असो – Value ला – Monetary Value ला फार महत्त्वाचे व मध्यवर्ती स्थान प्राप्त झाले आहे. त्यांच्या चारी दिशांना सतत आर्थिक विचार घिरट्या घालीत असतो. मूल्यासंबंधी केवळ उपयुक्ततेच्या दृष्टिकोनातून केलेल्या विश्लेषणावर आधारित जीवनाचे जे दर्शन घडते ते फारच अपूर्ण, अमानवी आणि काही अंशी नीतिविहीनही (unethical) आहे."

या मुद्याचे विवरण करताना दीनदयाळजी एक समर्पक उदाहरण देत. ते म्हणत, 'आजकाल जो कमवील तो खाईल' अशी घोषणा केली जाते. साधारणपणे ही घोषणा कम्युनिस्ट करीत असतात. पण भांडवलवादीही या घोषणेमागच्या मूळ सिद्धांताशी असहमत नाहीत. या दोघांत तंटा असेल तर तो कमाईत अधिक वाटा कोणाचा, या मुद्यावर असतो. भांडवलवादी भांडवलाला व औद्योगिक साहसाला अधिक महत्त्व देत असल्याने कमाईत त्यांचा वाटा मोठा असावा असे ते मानतात. उलट कम्युनिस्ट कामगाराला संपत्तीचा निर्माता समजतात आणि म्हणून संपत्तीवर खरा अधिकार त्याचाच आहे असे मानतात. पण हे दोन्ही विचार योग्य नाहीत. वास्तविक 'जो कमवील तो खाऊ घालील' व 'जो जन्मला तो खाईल' अशी घोषणा असावयास पाहिजे. कारण खाण्याचा हक्क जन्मतःच प्राप्त होतो. कमावण्याची योग्यता शिक्षणाने येते. समाजात जे कमवीत नाहीत त्यांनाही खायला लागतेच. मुले, वृद्ध, रुग्ण-अपंग या सर्वांची काळजी समाजास करावी लागते. प्रत्येक समाज हे कर्तव्य करीत असतो.

हे कर्तव्य पार पाडण्याची क्षमता निर्माण करणे हेच अर्थव्यवस्थेचे काम आहे. पाश्चात्य अर्थशास्त्र या कर्तव्याच्या प्रेरणेचा विचार करीत नाही.'

दीनदयाळजी वरील मुद्दा आणखी एका उदाहरणाने स्पष्ट करीत. आपल्या देशात कामगारांची उत्पादन-क्षमता फार कमी आहे. यंत्राच्या साह्याने ती वाढविता येईल. तशी ती वाढविणे आवश्यकही आहे. परंतु जर ते यंत्र चालविण्यास कमी माणसांची जरूरी लागल्याने इतर काही कामगार बेकार होणार असतील, तर असली यंत्रे आपल्या उपयोगाची नाहीत. दीनदयाळजी म्हणतात, "ज्याप्रमाणे कारखान्याची पूर्ण क्षमता उपयोगात आणली नाही तर ते आर्थिक दृष्टचा योग्य नाही, त्याचप्रमाणे देशातील लोकांची श्रमशक्ती बेकार ठेवणे आतबट्टचाचे होईल. रिकामे यंत्र केवळ भांडवलच अडकवून ठेवते, पण बेकार मनुष्याला रोज खायला प्यायला लागते. म्हणून आज 'कमावणारा खाईल' या ऐवजी 'खाणारा कमवील' असा उद्देश ठेवून देशाची अर्थरचना करावी लागेल. चरख्याऐवजी यंत्र जरूर हवे, पण सगळ्याच कामासाठी स्वयंचलित यंत्रे कामाची नाहीत. आपण उत्पादनाचा विचार संपूर्ण रोजगारीचे लक्ष्य डोळ्यासमोर ठेवूनच केला पाहिजे."

पाश्चात्य देशात गणक-यंत्रे व यंत्रमानव यांच्या वाढत्या वापरामुळे लक्षावधी कामगार बेकार होत आहेत. आता जपानही त्याच मार्गाने जात आहे. याचे कारण एकच आहे. त्यांचे अर्थशास्त्र केवळ आर्थिक नफ्याचा विचार करीत असते. वस्तुतः आर्थिक प्रश्नांचा विचार करताना नैतिक मूल्यांचाही विचार करणे आवश्यक आहे. असे होत नसेल तर दीनदयाळजी म्हणतात त्याप्रमाणे ते अर्थशास्त्र अपूर्ण तर आहेच, पण नैतिक दृष्टचाही अपंग व पांगळे आहे. या संदर्भात डॉ. शूमाकर लिहितात, "आधुनिक अर्थशास्त्राचे निष्कर्ष व निर्णय अपूर्ण असतात. कारण अर्थशास्त्रीय संकल्पनांच्या पलीकडे जी परिस्थिती असते व जी मूल्ये विचारात घ्यावयाची असतात त्यांचा हे अर्थशास्त्र कुठलाच विचार करीत नाही. Modern Economics supplies only one judgement whether a thing yields a money profit to those who undertake it, or not."

या विचारसरणीमुळे पाश्चात्य अर्थतज्ज्ञांना भारतातील गोवंशहत्या-बंदी, संयुक्त कुटुंबपद्धती, अद्वैत तत्वज्ञानाची बैठक, निसर्गाची पूजापद्धत यांसारख्या विषयांचे आकलनच होत नाही. अर्थकारणातील आर्थिकेतर घटकांचा विचार न करणारे अर्थशास्त्र निश्चितच अपूर्ण ठरते. असे असमतोल अर्थशास्त्र

मानव्याचे रक्षण करण्याच्या दृष्टीने अर्थरचनेची उभारणी करण्यास असमर्थ ठरत असते, असेही पं. दीनदयाळजी प्रतिपादित असत.

निसर्गाशी नाते

माणूस निसर्गाच्या मदतीखेरीज उत्पादन करू शकणार नाही. निसर्ग त्याला साधनसामुग्री पुरवितो. निसर्गाकडून मिळालेल्या साधनांनी या साधन-सामुग्रीवर माणूस प्रक्रिया करतो. चित्रकाराला जसा चित्रफलक तसा माणसाला निसर्ग. माणसाला त्याच्या गरजा काही ना काही हालचाल करण्यास प्रवृत्त करतात आणि या भागविण्यासाठी तो श्रम करून उत्पादन करतो.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत काम करणारे कामगार आणि त्यांच्याकडून काम करवून घेणारे मालक अशी ढोबळमानाने विभागणी झालेली असते. ज्या यंत्रांच्या साहाय्याने कामगार उत्पादन करतात ती त्यांची नसतात. तसेच जो कच्चा माल ते वापरतात तोही त्यांचा नसतो. उलट भांडवलदाराची मात्र या दोन्ही गोष्टींवर मालकी असते. यंत्र काय किंवा कच्चा माल काय शेवटी संस्कारित वा संस्कारक्षम निसर्गच. म्हणजे भांडवलशाहीतील खाजगी मालकीच्या कल्पनेमुळे कामगार निसर्गापासून दुरावला जातो.

भांडवलशाहीत खाजगी मालकीबरोबरच भांडवलदाराचा हेतूही येत असतो. वस्तुतः उत्पादनाचा हेतू जीवनाच्या गरजा भागविणे हा असला पाहिजे. परंतु भांडवलशाहीत भांडवलदाराचा हेतू स्वतःची आर्थिक समृद्धी वाढविणे हा असल्याने गरजपूर्तीची भाषा जाऊन नफ्याची भाषा सुरू होते. बाजारपेठांची स्थिती, किंमतीतील चढउतार आदी गोष्टींचे हिशेब होऊन त्या आधारे उत्पादन ठरविले जाते. या हिशेबांशी कामगार आपले नाते सांगू शकत नसतो. म्हणजेच ज्याप्रमाणे कामगार व निसर्ग यांच्यात अंतर निर्माण होते, त्याचप्रमाणे कामगार आणि त्याने बनविलेल्या वस्तू, केलेले उत्पादन यांमध्येही दुरावा निर्माण होतो. म्हणजेच भांडवलशाही अर्थव्यवस्थेत कामगारांचे व्यक्ति-मत्त्व दुभंगलेले असते. गरज भागविण्यासाठी श्रम करून उत्पादन करणे आणि केलेल्या उत्पादनाचा उपभोग घेणे या दोहोंमध्ये जिवंत नाते असते म्हणजेच उपभोक्ता आणि श्रमिक एकच असतात तेव्हा मानव आणि निसर्ग यांच्यात अंतर पडत नाही. दुसऱ्याच्या जमिनीत केवळ मजुरीसाठी काम करणारा शेतमजूर आणि स्वतःची जमीन स्वपरिश्रमाने कसणारा शेतकरी या दोहोंच्या

भूमिकांतील फरक ध्यानात घेतला म्हणजे वरील मुद्दा सहज स्पष्ट होईल.

एखाद्या उदाहरणाने हा मुद्दा स्पष्ट करता येईल. समजा एखाद्या गावात कोणा सधन माणसाला एक भव्य इमारत बांधावयाची आहे. त्या ठिकाणी अनेक लोक काम करीत असतात. परंतु प्रत्येकाची नजर त्या कामातून त्याला मिळणाऱ्या मजुरीकडे असते. त्यांचे आपसांत काहीच नाते नसते. परंतु हेच लोक जेव्हा साऱ्या गावासाठी एकादे मंदिर, शाळा वा विहीर बांधण्यासाठी परिश्रम करीत असतात तेव्हा त्या सर्वांचे त्या श्रमाशी आणि परस्परांशी एक वेगळेच नाते निर्माण होते.

यंत्रे आणि कच्चा माल यांवर तावा मिळवून भांडवलदार कामगारांना परात्म बनवितो. कामाचे अधिकाधिक यांत्रिकीकरण करण्यात येते आणि यंत्रांच्या रूपाने असलेल्या निर्जीव श्रमाचे जित्या जागत्या श्रमिकांवरचे नियंत्रण वाढत जाते. भरड निसर्गातून वस्तू बनविताना माणूस आपल्या श्रमाद्वारे त्यात प्राण ओतत असतो. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत याच वस्तू कामगारापासून विलग होतात आणि यंत्रशक्तीच्या अधिकाधिक वापरामुळे कामगारांच्याच वैरी ठरतात. भांडवलशाही उत्पादनप्रणाली श्रमिकांना भौतिक आणि मानसिक अशा दोन्ही प्रकारच्या दारिद्र्याकडे हळूहळू घेऊन जाते. अशा प्रकारे निसर्गाला स्वतः बनविलेल्या वस्तूंना आणि आर्थिक समृद्धीला दुरावलेले कामगार त्यांचे मनुष्यपणच हरवून बसतात.

गरजा भागविण्यासाठी उत्पादन करणे आणि केलेल्या उत्पादनाचा विनियोग करणे या दोन्ही भूमिका एकच माणूस करू शकतो. असे नाते प्रत्येक माणसाचे असते, आणि तेच नाते एकमेकांशीही असते, म्हणजेच परस्परांच्या गरजा भागविण्यासाठी सर्वांनी स्वेच्छेने व सहकार्याने श्रम केलेले असतात तेव्हा माणूस व निसर्ग आणि माणूस आणि मानवता यांमध्ये दुरावा राहात नाही.

भांडवलशाहीविषयी कामगारांच्या मनात धुमसणाऱ्या असंतोषाची कारणमीमांसा करताना भांडवलशाहीत होणारी कामगारांची पिळवणूक, त्यातून निर्माण होणारे भीषण दारिद्र्य, यंत्राच्या अती हव्यासापायी निर्माण होणारी बेकारी, इत्यादींचा उल्लेख कार्ल मार्क्सने केला असला तरी या असंतोषाच्या मुळाशी भांडवलशाही उत्पादनव्यवस्थेत कामगारांचे व्यक्तिमत्त्व हरवते, स्वतःच केलेल्या उत्पादनाला ते परके होतात, नव्हे तेच उत्पादन

भांडवल म्हणून त्यांचा शत्रू बनून उभे राहते. त्यांच्या मानव्याचा ऱ्हास व लोप होतो. हीच कारणपरंपरा अधिक मूलगामी म्हणून सांगितली आहे. या प्रक्रियेला मार्क्सने 'एलीअनेशन' (परात्मभाव) असा शब्द वापरलेला आहे.

मार्क्सचे प्रतिपादन असे की, भांडवलशाही उत्पादन-व्यवस्थेत औद्योगिक कामगारात उद्‌भवणाऱ्या परात्म भावाच्या मुळाशी या उत्पादन-व्यवस्थेत कामगार स्वतःच्या उत्पादनाला परका होतो ही घटना आहे. या घटनेच्या मुळाशी त्या उत्पादनाची साधने कामगाराच्या मालकीची नसतात ही वस्तु-स्थिती असते. उत्पादनाची सर्व साधने सार्वजनिक मालकीची केली तर कामगारात उद्‌भवणारा हा परात्मभाव नाहीसा होऊन त्यांच्यातील 'मानव' जागृत होईल आणि मानव म्हणून सारे श्रमिक प्रगतिपथाला लागतील असे मार्क्सचे प्रतिपादन होते.

दरम्यान भांडवलशाही अधिकाधिक प्रगत होत गेली. कामगारांचे जीवनमान उंचावत होते, कारण त्यांची उत्पादनशक्ती वाढत होती. याचे कारण कामगारांच्या श्रमशक्तीला विज्ञान व तंत्रज्ञान यांची जोड दिली जात होती. त्याचबरोबर औद्योगिक व्यवस्थापनशास्त्रही विकसित होत होते. इतके सर्व होऊनही कामगारांचा परात्मभाव मात्र वाढतच चालला होता.

पाश्चात्यांना या प्रश्नाची उकल करणे कठीण होऊ लागले. दरम्यान रशियात कम्युनिस्ट क्रांती झाली. या क्रांतीमधून एक नवी अर्थव्यवस्था निर्माण झाली. या व्यवस्थेत उत्पादनाची सर्व साधने सार्वजनिक मालकीची करण्यात आली. तथापि भांडवलशाही उत्पादन-व्यवस्थेत कामगारात उद्‌भवणारा परात्मभाव संपून, त्यांच्या मानव्याचा होणारा ऱ्हास थांबून कामगार मानव म्हणून प्रगतीपथाला लागेल अशी जी मार्क्सवादाची अपेक्षा होती ती सफल झाली नाही. या दृष्टीने समाजवादी अर्थव्यवस्था व भांडवलशाही अर्थव्यवस्था या दोहोंमध्ये लक्षणीय असा काहीही फरक राहिला नाही.

औद्योगिक संस्कृतीत मानवात उद्‌भवणारा परात्मभाव एक वस्तुस्थिती आहे. परंतु ती अपरिहार्य मात्र नाही. तिचे निराकरण करणे शक्य आहे. मार्क्सने केलेले परात्मभावाचे विश्लेषण मौलिक स्वरूपाचे आहे. पण केवळ उत्पादनाची साधने सार्वजनिक मालकीची केल्याने परात्मभावाचे निराकरण होऊ शकेल हे मार्क्सचे म्हणणे बरोबर नाही. कारण कोणत्याही अर्थव्यवस्थेत

मग ती भांडवलशाही अर्थव्यवस्था असो वा साम्यवादी वा समाजवादी असो, प्रचंड यंत्रसामुग्रीचा वापर करून उत्पादनशक्ती वाढविण्याचा हव्यास आणि अमर्याद उपभोगलालसा याच गोष्टी परात्मतेला आणि मानव्याच्या ऱ्हासाला प्रामुख्याने कारणीभूत ठरत असतात. या प्रक्रियेत परात्मभाव निर्माण होणे अपरिहार्य आहे. या संदर्भात उत्पादन-साधनांच्या मालकीचा प्रश्न गौण ठरतो.

' राष्ट्रजीवनाची दिशा ' या पुस्तकामध्ये अर्थव्यवस्थेचा मानवी उद्देश व परात्म भावाचे निराकरण या प्रश्नाची चर्चा करताना दीनदयाळजी म्हणतात " दोघेही वाट चुकलेले आहेत. "

परात्मभावाचे निराकरण अगर मानव्याचा विकास याला 'आत्मविकास' असे संबोधता येईल. हा आत्मविकास व आध्यात्मिक विकास या दोन गोष्टी भिन्न आहेत. अधिभौतिक विकासाविना आध्यात्मिक विकास शक्य आहे. तसा आत्मविकास शक्य नाही. केवळ जगण्याकरताच सर्व श्रम खर्ची पडतात अशी अवस्था असेल तर व्यक्तीचा आत्मविकास होणे शक्य नाही. आत्म-विकासासाठी किमान आधिभौतिक विकास आवश्यक असतो. या बाबत डॉ. वि. म. दांडेकर लिहितात, " ज्या मानाने मानव आपल्या गरजांच्या पूर्तीसाठी श्रम करून निसर्गावर विजय मिळतो. त्या मानाने तो स्वत:मधील अमानवतेचा गुलाम होतो, हे मार्क्सचे म्हणणे बरेचसे वस्तुस्थितिनिदर्शक आहे. निदान आजवरच्या विज्ञान व तंत्र ज्ञानाने आणि अर्थरचनेच्या स्वरूपाने तसे झालेले दिसत आहे. म्हणून यापुढे मानवाची भौतिक उत्पादनशक्ती अमर्याद व अव्याहत वाढवीत राहणे हे विज्ञान व तंत्रज्ञान यांचे उद्दिष्ट असू नये. मानवातील मानव्य नष्ट होऊ न देता मानवांच्या आत्मविकासाला आवश्यक तेवढा अधि-भौतिक विकास कसा साधता येईल हे आता विज्ञान व तंत्रज्ञानापुढील आव्हान आहे. "

भौतिक गरजा अधिकाधिक वाढवावयाच्या व त्या भागविण्यासाठी उत्पादन-साधनांची उत्पादनशक्ती वाढवावयाची हा मार्ग भांडवलशाहीने अव-लंबिला. समाजवादालाही हाच मार्ग अभिप्रेत आहे. फरक एवढाच की हा मार्ग चोखाळताना भांडवलशाहीची भूमिका, इतरांचे काही होवो, स्वत:च्या गरजा वाढवीत जाऊन त्या पूर्ण करण्याच्या व्यक्तीच्या स्वार्थी भावनेला उत्तेजित करावयाचे ही असते; तर उत्पादनाच्या साधनांची सरकारी मालकी असल्याने हे

उद्दिष्ट शासनामार्फत साध्य व्हावे, यात व्यक्तीची मिरासदारी नको, असे समाजवादाला वाटते. उत्पादन-साधनांची उत्पादन-शक्ती वाढविली पाहिजे आणि अधिकाधिक उपभोग भोगले पाहिजेत या मुद्यावर भांडवलशाही व समाजवाद यांचे एकमत आहे.

उत्पादन-साधनांची शक्ती वाढविण्याचा हव्यास सुरू झाला म्हणजे माणसाला आर्थिक स्वातंत्र्य गमवावे लागते, कारण आतापर्यंतचा अनुभव असा आहे की, उत्पादनाचे प्रमाण व उद्योगधंद्याचा आकार खूप वाढविल्याशिवाय, तसेच श्रमविभागाचे तत्त्व आत्यंतिक टोकाला नेऊन पोचविल्याशिवाय साधनांची उत्पादनशक्ती वाढत नाही; आणि मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाबरोबरच आर्थिक सत्तेचे केंद्रीकरणही अपरिहार्यपणे होते. यंत्रशक्तीचा खूप मोठ्या प्रमाणावर वापर सुरू होतो. माणसाला त्या अफाट यंत्रसृष्टीत एका लहानशा निर्जीव खिळ्याचे स्थान प्राप्त होते. पराकाष्ठेचे परावलंबन, मानव्याचा ऱ्हास आणि नीरस जीवन माणसाच्या वाट्याला येते. आत्यंतिक श्रमविभागणीवर आधारलेल्या यांत्रिक उत्पादनाने संपूर्ण आर्थिक व्यवस्थेला एक प्रकारे अजस्र यंत्राचे स्वरूप येते आणि माणसाचे मनुष्यत्व झाकाळून जाते.

तात्पर्य, केंद्रीभूत विशाल उद्योग, अमर्याद उत्पादनवाढीचा हव्यास आणि माणसाच्या केवळ भौतिक गरजा अधिकाधिक पुऱ्या करण्याचा ध्यास धरणारे अर्थशास्त्र, याने मानवाचे प्रश्न सुटू शकणार नाहीत. उलट यातून त्याचे मनुष्यत्व कुंठित होते. म्हणूनच लहान उद्योगधंदे, लघुयंत्राधिष्ठित उत्पादनप्रणाली, संयमित उपभोग, समाजाच्या गरजांच्या पूर्तीसाठी उत्पादन, उत्पादनाचे समुचित वितरण, अर्थनैतिक मूल्यांचा विचार करणारे अर्थशास्त्र आणि विकेंद्रित अर्थव्यवस्था याबाबत दीनदयाळजींचा विशेष आग्रह होता.

संयमित उपभोग

नैसर्गिक साधनसामुग्रीच्या, तसेच अर्थव्यवस्थेच्या मर्यादांचा ऊहापोह यापूर्वी येऊन गेला आहे. आता 'संयमित उपभोग' याबद्दल दीनदयाळजींचे विचार पाहू या. दीनदयाळजी म्हणतात, "एका बाजूने आपण नवनव्या इच्छा पूर्ण करण्यासाठी नवनवी साधने शोधीत आहोत आणि दुसऱ्या बाजूने अनेक नवे प्रश्न निर्माण होऊन संपूर्ण मानवता नष्ट होण्याचा धोका निर्माण होत आहे, तेव्हा आपला अर्थव्यवस्थेचा उद्देश अमर्याद उपभोग हा न ठेवता संयमित उपभोग हा असला पाहिजे."

" अर्थशास्त्राला भौतिक उद्दिष्टांबरोबरच आध्यात्मिक उद्दिष्टांचाही विचार करावा लागेल " असे दीनदयाळजी म्हणत असत. वरील उताऱ्यात पंडितजी 'संयमित उपभोगाचे' प्रतिपादन करतात तेव्हा ते खरे म्हणजे अर्थनैतिक मूल्यांचीच जाणीव करून देत असतात.

मार्शल व केन्स या जगविख्यात अर्थशास्त्रज्ञांच्या मालिकेत बसणारे ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ प्रा. ऑर्थर पिगू यांनी आपल्या 'समाजावाद की भांडवलशाही' या विषयावर लिहिताना एक महत्त्वाचा विचार मांडला आहे. ते म्हणतात, " विचार करताना मला अनेकदा असे वाटत आले आहे की, जीवनात विशेष संधी मिळालेल्या सर्व लोकांनी आपण दरिद्री लोकांचे विश्वस्त आहोत, याच वृत्तीने वागले पाहिजे." पं. दीनदयाळजींनी हेच सांगितले आहे.

उत्पादन व उपभोग यांमध्ये संयम आणि देशहिताचे भान ठेवणे आवश्यक आहे. देश आत्मनिर्भर होण्यासाठी संयमित उपभोग हेच धोरण असले पाहिजे. अर्धविकसित देश सतत कर्जाच्या चक्रात अडकण्याचे कारण वरील उद्देशाकडे होणारे दुर्लक्ष हे आहे. डॉ. शूमाकर लिहितात– "For more serious is the dependence created when a poor country falls for the production and consumption patterns of the rich." म्हणजे आधुनिक अर्थशास्त्राने गृहीत धरलेल्या 'अमर्याद उपभोग' या सिद्धांताला पं. दीनदयाळजींप्रमाणेच डॉ. शूमाकर हेही आव्हान देताना दिसतात.

'संयमित उपभोग' ह्या पं. दीनदयाळजींच्या अर्थविचाराने अमेरिकेसारख्या अतिश्रीमंत भांडवलशाही देशालाही नवविचारास प्रवृत्त केलेले आहे.

कच्च्या मालाचा तुटवडा, भडकत्या तेल-किंमती, सततचा चलनफुगवटा, वाढती बेकारी, जीवघेणी स्पर्धा, भयानक शस्त्रास्त्रनिर्मिती, डॉलरची घसरगुंडी, मानसिक तणाव, गुणवत्तेचा भीषण ऱ्हास आदी गोष्टींनी अमेरिकेच्या तरुण व मध्यम पिढीतील अनेकांना जाग आली. ह्या जागृत जनतेने काटकसर चळवळ सुरू केली. आज अमेरिकेत पन्नास लक्ष नागरिक 'संयमित उपभोग' ह्या व्रताची जीवनात अनुभूती घेत आहेत. ह्या व्रताचे आचरण करणाऱ्या ह्या नवप्रवाहामागील कारणांचा शोध अमेरिकेतील सुप्रसिद्ध 'स्टॅनफोर्ड रिसर्च इन्स्टिटच्यूट' ह्या संस्थेने घेतला. साधी रहाणी, उच्च विचारसरणी, चिंतन-मननासाठी अवसर, मूल्यघसरणाला अटकाव अशा विविध कारणांसाठी 'संयमित उपभोग' या विचारसरणीमागे अमेरिकेची जनता वळत आहे असे

या संस्थेला आढळून आले.

या साऱ्या नवप्रवाहांवर 'लुई हॅरिस' या जगप्रसिद्ध जनमतचाचणी संस्थेने लोकमत अजमाविले. त्याचे निष्कर्ष असे– "अनिर्बंध आर्थिक वृद्धीच्या राष्ट्रीय क्षमतेसंबंधी अमेरिकन जनतेत संशय निर्माण झाला आहे. अशा समृद्धीमुळे होणाऱ्या फायद्यांबाबत जनता साशंक होत आहे. माणसामाणसांतील सामाजिक संबंध सुधारण्याला जास्त महत्त्व द्यावे असे सामान्य जनतेला वाटू लागले आहे. उच्च राहणीमानापेक्षा समाधानी जीवन महत्त्वाचे असे वाटू लागलेले आहे. जीवनमान उंचावण्यापेक्षा जीवनाचा कस वाढवावा व त्यासच अग्रक्रम दिला जावा असे अमेरिकेतील जनतेला वाटू लागले." लुई हॅरिस संस्था समारोपात म्हणते – "अमेरिकेत एक मूल्य-क्रांती घडून येत आहे. 'संयमित उपभोग' हा नवप्रवाह अमेरिकेच्या आर्थिक जीवनाचे अंग बनू पहात आहे."

आपल्या देशाचे जीवनमान तर खूपच खाली आहे, ते उंचावले पाहिजे याबाबत सर्वांचे एकमत आहे. त्यासाठी उत्पादनात वाढ होणे आवश्यक आहे. त्यानंतर वाढलेल्या उत्पादनाचे योग्य वाटप झाले तरच सामान्य माणसाचे जीवनमान उंचावू शकेल. याशिवाय आणखीही एका पैलूचा विचार करावयास हवा हे पं. दीनदयाळजींनी साधार मांडलेले आढळते. तो पैलू म्हणजे वस्तूचा-उत्पादनाचा उपभोग. अधिक उत्पादन आणि न्यायोचित वितरण यांबरोबरच उपभोगातील संयम या गोष्टीचीही आवश्यकता आहे असे दीनदयाळजी ठामपणे मांडत. २८ जून १९५९ मधील एका भाषणात पं. दीनदयाळजी म्हणतात– "लोकांसमोर उपभोगातील संयमाची कल्पना मांडली नाही, तर माणसाला अधिकाधिक वस्तू मिळूनही सुखसमाधान लाभणार नाही. उपभोगात संयम आला तरच सुख मिळेल. उत्पन्न शंभर रुपयांचे असेल आणि गरज सव्वाशे रुपयांची असेल तर पंचवीस रुपयांचे दुःखच वाटचाला येईल. आणि उत्पन्न जर दीडशे रुपयांपर्यंत वाढले व दरम्यान उपभोग जर दोनशे पर्यंत नेला गेला तरीही दुःखच भागीदार होईल. म्हणून उत्पन्न आणि गरजा ह्यांचे अंतर कमी करणे आवश्यक आहे. त्यासाठी मर्यादेत राहूनच उपभोग करावा. ..... उत्पादनवाढीसाठी अधिक भांडवलाची आवश्यकता लागणार, कारण अधिक भांडवल नसेल तर उत्पादनात वाढ होऊ शकणार नाही. उत्पादन आणि उपभोग यांच्यामध्ये बचत येते. उपभोगात संयम नसेल तर बचत नाही, भांडवल

नाही, उत्पादनात वाढ नाही.

उत्पादनवाढ, न्यायोचित वितरण आणि संयमित उपभोग या तीन्ही गोष्टींचा साकल्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. या तिन्ही गोष्टी एकाच वेळी सुरू रहातील – म्हणजे उत्पादनात वाढ होईल, योग्य वितरण होईल आणि संयमित उपभोगामुळे उत्पादन-वाढीसाठी आवश्यक ते अधिक भांडवलही उपलब्ध होत जाईल – असे चक्र सुरू करणे आवश्यक आहे."

म्हणूनच पं. दीनदयाळजी असे प्रतिपादन करीत असत की, समाज सुखी व समाधानी रहावयाचा असेल तर ग्राहकाभिमुख वितरणव्यवस्था, वितरणाभिमुख उत्पादन व तेही पुरेशा प्रमाणात झाले पाहिजे. यासाठी सामाजिक गरजांची परिपूर्ती हे उत्पादनाचे उद्दिष्ट असावयास हवे आहे हा त्यांचा आग्रह होता. याबाबत पं. दीनदयाळजी लिहितात– " उत्पादनवाढ आवश्यक आहे हे खरे– परंतु कोणत्या वस्तूंचे उत्पादन वाढवावयाचे याबाबतही सखोल विचार करणे आवश्यक आहे. पोलाद, सिमेंट या वस्तूंचे उत्पादन वाढविले पाहिजे– यावरच देशाची उन्नती अवलंबून आहे अशा घोषणा चालू आहेत. अमेरिका प्रतिवर्षी १०६ दशलक्ष टन पोलाद निर्माण करते, आपले उत्पादन केवळ तीन दशलक्ष टन आहे – आपण कितीतरी मागासलेले आहोत असा प्रचार केला जातो. परंतु हा अगदी एकांगी विचार झाला.

आपल्या देशाला अमेरिकेप्रमाणे प्रचंड सिमेंट व पोलाद ह्यांची गरज पडू शकत नाही. कारण आपल्या गरजा, आपली रहाणी व विचारसरणी आणि सामान्य जनतेचा जीवनस्तर अगदी निराळे आहेत. आज भांडवलशाही अर्थव्यवस्थेत नफा ही उत्पादनाची प्रेरक शक्ती, हे उद्दिष्ट मानले जाते. त्यामुळे श्रीमंतांच्या चैनीसाठी उत्पादन राबविले जाते व गरीबांच्या जीवनावश्यक वस्तूंची टंचाई व त्या वस्तूंची उत्पादनात घसरलेली गुणवत्ता ह्यांचा अनुभव सर्वत्र येत आहे. याउलट दलितांचे कैवारी म्हणून ज्या कम्युनिस्ट राजवटी पुढे आल्यात तेथे सत्ता मिळविणे, टिकविणे आणि विस्तारणे हाच उत्पादनाचा व एकूण सर्व अर्थव्यवस्थेचा प्रधान हेतू बनलेला दिसतो.– परिणामी अफगाणिस्थान मध्ये रणगाडे घुसवून जगाला धाक दाखविण्याची क्षमता आली तरी पोलंडमध्ये अन्नासाठी होणारी बंडाळी काही कम्युनिस्टांना रोखता आलेली नाही हे दिसून येते. यामुळे सामाजिक गरजांची परिपूर्ती व सामान्य जनताभिमुख वितरणव्यवस्था, तसेच संयमित उपभोगातून आर्थिक विकासासाठी भांडवलनिर्मिती से

ही पं. दीनदयाळजींनी मांडलेली त्रिसूत्री फारच मोलाची ठरते.

यानंतर दीनदयाळजींच्या अर्थव्यवस्थेच्या अंगभूत घटकांच्या परस्पर संबंधांविषयीचे विचार तपासणे उद्‌बोधक ठरेल.

श्रमाची प्रतिष्ठा जपणारी अर्थरचना

" आर्थिक आधारावर विचार करणारे लोक समाजाची निरनिराळ्या वर्गांत विभागणी करतात. जमीनदार आणि शेतकरी, भांडवलदार आणि मजूर, शोषक आणि शोषित अशाप्रकारे वर्गीकरण करून एक तर ते यांपैकी एकाला दडपून दुसऱ्याचे प्रभुत्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात, अथवा फार तर दोहोंमध्ये सामंजस्य करण्याचा प्रयत्न करतात. परंतु निरनिराळ्या वर्गांत विभागणी हा त्यांच्या विचारांचा पाया आहे." (राष्ट्रचिंतन)

हा विचारांचा पाया एकांगी आहे असे स्पष्ट प्रतिपादन पं. दीनदयाळजी करीत असत.

मालमत्ता म्हणजे उत्पादन-साधनांवरील खाजगी मालकी असा अर्थ लावून मार्क्सवादाने भांडवलशाही अर्थरचनेतील वर्गकलहाचे निदान मांडलेले आहे. उत्पादनसंबंध हे वर्ग ठरविणारे घटक असतात. भांडवलदारांकडे कारखाने, यंत्रे यांची खाजगी मालकी असते. कामगारांची एकमेव मालमत्ता – त्यांची श्रमशक्ती – हे भांडवलदार विकत घेतात. भांडवलदार उत्पादनसाधनांच्या सहाय्याने अतिरिक्त मूल्ये निर्माण करण्यासाठी व स्वतःचे आर्थिक वर्चस्व वाढविण्यासाठी कामगारांची श्रमशक्ती विकत घेतात. भांडवलदारांना वेगळा आर्थिक हितसंबध असतो – तो म्हणजे ' नफा ', आणि हे नफ्याचे प्रमाण उत्पादन-संबंधावर अवलंबून असते. विरोधी वर्गाशी असलेले शत्रुत्व, उत्पादन, राजकारण व संघटन, यंत्र-संस्कृती या सर्व क्षेत्रांत इतर वर्गांशी विरोध इत्यादी बाबींचे प्रतिपादन करून मार्क्स वर्गकलह, वर्गसंघर्ष आणि उत्पादनसंबंधांतील शत्रुत्व व वर्गीय हितसंबंध यांवर भर देऊन अर्थव्यवस्थेची पुर्नमांडणी करण्याची तरफदारी करतो.

" पाश्चिमात्यांनी द्वैताचा पदर घट्ट धरला आहे." पं. दीनदयाळजी ' राष्ट्रजीवनाची दिशा ' या पुस्तकात वरील उद्‌गार काढून वरील अर्थविचार एकांगी आहेत असे प्रतिपादन करतात. पाश्चिमात्यांची विचारसरणी चुकीच्या

मार्गाकडे का वळली त्याचे विवरण करताना दीनदयाळजी लिहितात –

" आधुनिक युगात आर्थिक समस्या अत्यंत विकट बनली आहे. पाश्चिमात्य विद्वानांनी ही समस्या सोडविण्यासाठी विविध मार्ग सांगितले आहेत. पण या सर्वांचा दृष्टिकोन एकांगीच आहे. उत्पादनावर अधिक भर दिल्यामुळे अमेरिका इत्यादी देशांमध्ये भांडवलशाहीचा प्रसार झाला. प्रगत यंत्रज्ञान या वृद्धिगत उत्पादनाचे कारण बनले व या यंत्रांचे स्वामी उत्पादनाचे मालक बनलेत. नफ्यामध्ये श्रमिकांना हिस्सा मिळाला नाही. तेव्हा त्या विरुद्ध प्रतिक्रियास्वरूप एका नवीन प्रणालीचा – समाजवाद किंवा साम्यवादाचा – विकास झाला. त्यामध्ये वितरणावरच अधिक भर दिला गेला व त्यासाठी राज्याकडून व्यक्तीला तुडविले गेले.

पण उत्पादन व वितरणांचे मूळ केंद्र गरज हे असूनही त्याकडे पाश्चात्य विद्वानांचे मुळीच लक्ष गेले नाही. पाश्चिमात्य देशांनी अधिकाधिक उपभोगाचा आपला जुना सिद्धांतच पुढे चालविला. त्यामध्ये संशोधनाची जरूरी त्यांना भासली नाही. खरे पाहिले असता अधिकाधिक -उपभोगांचा सिद्धांतच मनुष्याच्या दुःखांना कारणीभूत झाला आहे. उपभोगाची लालसा जितकी पूर्ण करावी तितकी ती वाढतच जाते. संपूर्ण समाजवाद ज्यावर आधारित आहे तो वर्गसंघर्ष अशा अमर्याद उपभोगांमुळेच निर्माण होतो. भारतीय तत्त्वज्ञान जेव्हा वर्गसंघर्षाचे खंडन करते तेव्हा त्याचा अर्थ हाच होतो की भारताने उपभोगावर नियंत्रण घातले आहे आणि अधिकाधिक उपभोगाऐवजी संयमित उपभोगाचा आदर्श प्रस्थापित केला आहे. मनुष्याच्या स्वाभाविक प्रवृत्तींवर संस्कार करून त्यांत अधिकाधिक उत्पादन, समान वितरण व संयमित उपभोग अशी वृत्ती निर्माण करणे हेच आर्थिक क्षेत्रातील संस्कृतीचे कार्य होय. यातच तिघांचे संतुलन साधले जाईल. " (राष्ट्रचिंतन – पृ. ८५)

अशा प्रकारच्या आर्थिक संस्कृतीत समष्टीच्या हितासाठी व्यक्तित्वाचा विकास होत रहातो व व्यक्ती व समष्टी परस्परपूरक होऊन सर्वांनाच खराखुरा विकास घडला जातो. त्यामुळे संघर्ष, कलह व शत्रुत्व हे द्वैताचे पदर पुसले जातात.

हा विचारांचा धागा उलगडून दाखवताना दीनदयाळजी पुढे म्हणतात – " मूलतः असाच विचार करावा लागेल की, कलह किंवा संघर्ष हे विकृतीचे

आणि अव्यवस्थेचे लक्षण आहे. विकार उत्पन्न झाला की अनारोग्यता येते आणि बुद्धी पांगुळल्यासारखी होते. अशा परिस्थितीत उत्पन्न झालेला विरोध स्थायी मानावयाचा काय ? आणि तो स्थायी कल्पून नवे नियम आखणे आणि सगळी व्यवस्था बदलणे योग्य होईल काय ? ... ज्या समाजाची सतत कलह, शत्रुत्व व संघर्ष अशी मनोरचना असेल तेथे निरंतर यादवीच माजेल. ह्या द्वैतातून मार्ग निघणे आहे. ... म्हणूनच विपुल चिंतन केल्यानंतर भारतवर्ष या निर्णयाप्रत पोहोचला आहे की, व्यक्ती आणि समाज यांना परस्पर विरोधी मानणे हेच मुळी चुकीचे आहे. विकृती आणि अव्यवस्था ह्या अपवादात्मक अवस्था आहेत. त्या प्राप्त झाल्या असता, कडक उपाय योजणे आवश्यक असू शकेल. परंतु सामान्यतः व्यक्ती आणि समाज अभिन्न आणि अविभाज्य आहेत, हेच मूलभूत सत्य आहे. जेथे व्यक्ती स्वतःची काळजी करीत असतानाही समाजाची काळजी बाळगते, तेथील समाजाची अवस्था सुसंस्कृत आहे असे मानावे. तेथे दोघांचेही जीवन परस्परावलंबी आणि परस्परपूरक असते. "

(राष्ट्रजीवनाची दिशा : पृ. ७०, ७१)

श्रममूल्यांत तफावत पडणे, त्यांच्या वेगवेगळ्या श्रेणी पडणे, वेगवेगळ्या श्रमांची वेगवेगळी गरज रहाणे, भिन्नभिन्न कार्यक्षमता रहाणे, ह्या बाबी अनिवार्य आहेत. आपली संस्कृती असे मानते की, सामाजिक गरजांची परिपूर्ती करणारी सर्व कर्मे सारखीच प्रतिष्ठित आहेत व प्रतिष्ठेचे मूल्यमापन हे संपत्ती-वरून न ठरता सामाजिक गरजांच्या आशयातून ठरविले गेले पाहिजे. त्यामुळे आत्यंतिक टोकाची (crude) आर्थिक समता हे ध्येय नसावे, तसेच वर्गकलह व संघर्षही नसावा, तर सामाजिक घटकांचे संबंध संपूर्ण आत्मीयतेच्या आधारावर विकसित व्हावेत.

समाजात सगळ्यांच्या गरजा सारख्या नसतात. व्यक्ती तितक्या प्रकृती आणि प्रकृती तितके व्यक्तींचे स्तर असतात. सामाजिक गरजांची पूर्ती करणारे सारे श्रम सारखेच प्रतिष्ठित समजावयास हवेत. कर्तव्यबुद्धीच्या आधारे सर्वांच्या आवश्यकतांची पूर्ती करावयास हवी. पं. दीनदयाळजी म्हणत – " संपूर्णाचा विचार आणि आत्मीयतेचा व्यवहार हे आमचे आधारसूत्र आहे. म्हणूनच आमच्या दृष्टीने समाज आणि व्यक्ती परस्परपूरक, सहाय्यक आणि अभिन्न आहेत. "

म्हणजेच श्रममूल्यांत तफावत पडणे, श्रममूल्यांचे निरनिराळे स्तर निर्माण होणे, सामाजिक गरजांच्या परिपूर्तीसाठी निरनिराळ्या प्रकारचे

श्रमांचे प्रकार पडणे हे स्वाभाविक, अनिवार्य आणि गुणवत्तेच्या परिपुष्टतेसाठी आवश्यक आहे हे सांगून दीनदयाळजी ' न्यूनाधिक श्रममूल्यांच्या सिद्धांताकडे वळतात. त्यासाठी प्रथम ते अतिरिक्त मूल्यांच्या अर्थसिद्धांताचा विचार मूलभूत दृष्टीने उलगडून, विकेंद्रित अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करून अतिरिक्त मूल्यांच्या विभाजनाचा समुचित मार्ग दाखवितात. त्याचप्रमाणे श्रममूल्य हे नेहमीच अतिरिक्त असू शकणार नाही – ते न्यूनतमही होऊ शकते. अशा वेळी त्याचा समाजाने कसा विचार करावा हाही दृष्टिकोन समोर मांडून त्याबाबतचे मौलिक चिंतन समाजापुढे मांडतात.

अतिरिक्त मूल्यांचा विचार

" भांडवल निर्माण करण्यासाठी आवश्यक बाब म्हणजे संपूर्ण उत्पादन वापरून संपविण्याऐवजी त्यातील काही थोडा भाग पुढील उत्पादनासाठी वापरला पाहिजे. कार्ल मार्क्स ज्या अतिरिक्त मूल्यांची चर्चा करतो ती मूल्येच भांडवलाचा आधार होत. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उद्योगपती या अतिरिक्त मूल्यांच्या आधारे भांडवल निर्माण करतात. समाजवादी व्यवस्थेत हेच काम राज्य करते. दोन्ही पद्धतींत संपूर्ण उत्पादनमूल्यांचे वितरण कामगारांमध्ये होतच नाही. जर उत्पादनपद्धत मोठ्या मापाची व केंद्रित असेल तर – आणि भांडवलवादी अर्थव्यवस्थेत आणि समाजवादी अर्थव्यवस्थेत ती तशीच असते – भांडवलनिर्मितीसाठी कामगारांनी केलेल्या त्यागाचे व संयमाचे चीज होत नाही. विकेंद्रीकरणाचा फायदा असा की अतिरिक्त मूल्यांचा भांडवल म्हणून उपयोग करण्यात कामगारांचाही हात रहातो." – पं. दीनदयाळ उपाध्याय

भांडवलशाही व समाजवादी या दोन्ही अर्थव्यवस्थांमध्ये कामगारांच्या श्रमांच्या अतिरिक्त मूल्याचा लाभ कामगाराला कसा मिळत नाही, आणि उपाय कोणता याचे सूत्ररूपाने विवेचन वरील अवतरणात आले आहे. दीनदयाळजींच्या या प्रतिपादनाचा आशय नीट ध्यानात येण्यासाठी अतिरिक्त मूल्याची मार्क्सची कल्पना तपासून पहाणे आवश्यक आहे.

अतिरिक्त मूल्याची मार्क्सची मीमांसा अशी : उत्पादनाचे मूल्य हे उत्पादनासाठी उपयोगात आलेल्या श्रमशक्तीवर अवलंबून असते. उत्पादनसाधनांची मालकी स्वतःकडे ठेवणारा भांडवलदार कामगारांचे जादा श्रम राबवून घेऊन 'अतिरिक्त मूल्य' निर्माण करतो आणि उत्पादन-साधनांची मालकी स्वतःकडे आहे या सबबीखाली ते अतिरिक्त मूल्य आपल्या खिशात घालतो.

भांडवलदार उत्पादन-साधनांच्या मालकीमुळे अतिरिक्त मूल्य गिळंकृत करतो आणि यामुळेंच कामगारांची पिळवणूक होते या कारणास्तव उत्पादन-साधनांचेच राष्ट्रीयीकरण केले पाहिजे असा मार्क्सचा आग्रह होता. परंतु राष्ट्रीयीकरणानंतर उत्पादन-साधनांची खाजगी मालकी संपुष्टात येऊन राज्याची मालकी आली तरी भांडवलशाही अर्थव्यवस्थेत असलेली केंद्रित उत्पादनपद्धती व त्यामुळे उत्पादनसंबंधही कायमच राहिले. त्यामुळे तेथेही श्रमिक अतिरिक्त मूल्यांना वंचितच राहिला. दीनदयाळजींच्या वरील विचारांशी डॉ. राम मनोहर लोहिया सहमत होते. ते म्हणत असत की, "टाटांच्या पोलाद कारखान्यातील कामगार जसे अतिरिक्त मूल्यांना वंचित रहातात तीच परिस्थिती सरकारच्या भिलाई व रूरकेला या पोलाद कारखान्यांतील कामगारांची होत असते. फक्त पात्रे निराळी असतात एवढेच !"

यासाठी लघुयंत्राधिष्ठित विकेन्द्रित अर्थव्यवस्था हीच कामगारांना न्याय देऊ शकते असे पं. दीनदयाळजी म्हणत असत व त्यांचे हे मत अर्थशास्त्रीय सिद्धान्तावरही टिकणारे होते.

अतिरिक्त मूल्यांच्या निर्मितीचा सिद्धांत मांडणारा कार्ल मार्क्स तत्कालिन औद्योगिक क्रांतीच्या पलीकडील समाजमनाची अवस्था समजू शकला नाही, तर भांडवलशाहीला वाचविणाऱ्या केन्सला औद्योगिक व्यवस्थापनाच्या पलीकडे पाहता आले नाही. त्यामुळे या दोघांनाही कृषिऔद्योगिक, श्रमप्रधान पण लघुयंत्राधिष्ठित विकेंद्रित अर्थरचनेतील सर्वांगीण, संतुलित आर्थिक विकास सुचला नाही.

उत्पादनाच्या तत्कालीन पद्धतीमुळे मार्क्सने मांडलेला अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत बरोबर आहे असे वाटण्यासारखी स्थिती काही दशके होती. परंतु नंतरच्या काळात व्यवस्थापनशास्त्र व तंत्रशास्त्र यांत खूपच प्रगती होत गेली. भांडवलशाहीत मजुरांचे शोषण होते व अतिरिक्त मूल्ये भांडवलदार स्वतःच्या खिशात घालतात हे खरे असूनही केवळ मजुरांच्या श्रमांनाच अतिरिक्त मूल्यांचे श्रेय देणे उत्तरोत्तर कठीण होऊ लागले. जेम्स बर्नहॅमने आपल्या 'मॅनेजेरियल रीव्होल्युशन' या पुस्तकात असे दाखवून दिले आहे की कामगारांच्या श्रमापेक्षा प्रगत व्यवस्थापन व तंत्रशास्त्र यांच्यामुळे अधिक प्रमाणात अतिरिक्त मूल्ये निर्माण होऊ लागली आहेत.

मजुरांच्या श्रमाचा कमीत कमी उपयोग करून प्रगत तंत्रशास्त्राच्या व गतिमान व्यवस्थापनशास्त्राच्या आधारावर अधिकाधिक उत्पादन कसे काढता येईल हाच विचार प्रामुख्याने पाश्चिमात्य औद्योगिक प्रगत देशांत दिसून येतो. या प्रगत राष्ट्रांच्या सहकार्याने विकसनशील देशांत जी नवी कारखानदारी उभी राहात आहे त्यातही हीच प्रवृत्ती दिसून येत आहे. दीनदयाळजींनी म्हटल्याप्रमाणे, "परकीयांचे आर्थिक सहाय्य स्वतःबरोबर परकीय उत्पादनपद्धतीही आणीत असते," हा अनुभव सर्वत्र येत आहे. त्यामुळे अतिरिक्त मूल्यनिर्मितीत मानवी श्रमाचे महत्त्व झपाट्याने कमी होत आहे व मार्क्सचा सिद्धांत मागे पडू लागला आहे. अर्थात् हे मात्र आजही खरे आहे की, सामान्यतः मजुराला त्याच्या श्रमांचा पूर्ण मोबदला मिळू शकत नाही व त्याचे शोषण चालू राहते. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत अतिरिक्त मूल्यांची वाटणी आणि व्यवस्थापन या दोन्ही बाबी भांडवलदारांच्या हातात असतात, तर साम्यवादी अर्थव्यवस्थेत या गोष्टी सरकारच्या हातात जातात. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत अतिरिक्त मूल्यांचा अपहार थांबविण्याची श्रमिकांमध्ये कुवत नसते, तर साम्यवादी पद्धतीत सर्वेसर्वा शासनापुढे श्रमिक अगतिक असतो.

म्हणूनच दीनदयाळजी म्हणतात – "मजुरांच्या शोषणाच्या दृष्टीने पाहता वरील दोन्ही अर्थरचना सारख्याच आहेत. अतिरिक्त मूल्यांच्या समुचित विभाजनासाठी (appropriation) व उत्पादनातील सहभागासाठी लघुयंत्राधिष्ठित श्रमप्रधान विकेंद्रित अर्थव्यवस्थाच आवश्यक आहे."

औद्योगिक क्रांतीनंतर उत्पादित मालाचे मूल्य आणि त्या उत्पादन-प्रक्रियेतील श्रममूल्ये यांत बरीच तफावत पडत गेली. त्यानंतर अतिरिक्त मूल्यांचा सिद्धांत मांडला गेला व या अतिरिक्त मूल्यावर अधिकार कोणाचा, संचालकांचा की श्रमिकांचा, असा वादही निर्माण झाला. श्रममूल्य व उत्पादनाचे मूल्य यांतील तफावत पंडित दीनदयाळजींनी उलगडून दाखविली होती. उत्तरोत्तर होणाऱ्या तांत्रिक व व्यवस्थापकीय प्रगतीच्या झेपेमुळे ही तफावत वाढतच जाणार असे त्यांचे ठाम मत होते. व ते अगदी यथार्थ होते. परंतु उत्पादनाचे मूल्य श्रममूल्यापेक्षा नेहमी अधिकच असते असे नाही, कधीकधी ते कमीही असू शकते व त्याची भरपाई करण्याची जबाबदारी समाजाने उचलली पाहिजे, असे दीनदयाळजींचे म्हणणे होते. एखाद्या शेतकऱ्याने आपल्या शेतात भरपूर मेहनत केली, पण अवर्षणाने वा

दुसऱ्या एखाद्या नैसर्गिक आपत्तीमुळे त्याच्या उत्पादनात घट आली तर त्यामुळे त्याच्या श्रमाचे आर्थिक मूल्य कमी मानावयाचे काय? असा प्रश्न उपस्थित करून दीनदयाळजी म्हणत की, शेतीचा धंदा फायदेशीर ठरत नाही म्हणून शेतकऱ्याने धान्य पिकवायचे बंद केले तर केवढी दुरवस्था ओढवेल याचा सर्वांनी विचार करावा.

त्याचप्रमाणे ज्या तांत्रिक, यांत्रिक नि व्यवस्थापकीय प्रगतीमुळे अतिरिक्त मूल्य निर्माण होते त्या प्रगतीवर वस्तुतः कोणाही एका व्यक्तीचा अगर व्यक्तिसमूहाचा अधिकार नाही. कारण ही प्रगती सर्व मानवी समाजाच्या पिढ्यान्‌पिढ्यांच्या सामूहिक परिश्रमांचा परिणाम असल्याने तिच्यातून निर्माण होणाऱ्या अतिरिक्त मूल्यांवरही केवळ तत्कालीन संचालकवर्ग अगर कर्मचारी यांचा अधिकार नसून समष्टीचा अधिकार असणे न्यायोचित ठरेल, असे दीनदयाळजींचे प्रतिपादन असे.

आज एकीकडे अतिरिक्त मूल्यांवर अधिकार कोणाचा यावरून संचालक व कर्मचारी यांत झगडा होतो; अधिकाधिक वाटा आपल्याकडे यावा या प्रश्नावरून कटुता व तीव्र संघर्ष निर्माण होताना दिसतात, तर दुसरीकडे दुष्काळ, अतिवृष्टी, अनावृष्टी यांसारख्या अस्मानी संकटांनी आणि जाचक सरकारी नियमांनी बेजार झालेल्या शेतकरीवर्गाला न्यूनतम मूल्याबाबत जबाबदार धरण्यात येत आहे.

न्यूनाधिक श्रममूल्याबाबत समाजानेही काही पथ्ये पाळावयास हवीत असे दीनदयाळजी म्हणत असत. श्रममूल्य वजा जाता उरलेले अतिरिक्त मूल्य हे उत्पादित कामातील गुंतवणूक, संशोधनादी सामाजिक उपयुक्ततेची कामे याद्वारा परत समष्टीकडे अधिक गुणोत्तर प्रमाणात जावयास हवे; तसेच न्यून मूल्याची परिपूर्तीही उत्पादनाला मदत करून, उत्पादनखर्च कमी करून अगर कर्जमाफी, अनुदान याद्वारे करून देण्याची जबाबदारी शासनाने म्हणजेच समाजाने स्वीकारली पाहिजे.

अर्थव्यवस्थेचे विकेंद्रीकरण

भांडवलशाही आणि समाजवाद या दोहोंची परिणती संपत्तीचे अफाट केंद्रीकरण आणि एकाधिपत्य (मोनापॉली) यात होते. एकामध्ये मालकी खाजगी भांडवलदाराकडे असते, तर दुसऱ्यात राज्याकडे असते एवढाच फरक

दोन्ही व्यवस्थांमध्ये मानवाची उपेक्षाच होते म्हणून दीनदयाळजी म्हणतात, " ज्यात व्यक्तीची उपक्रमशीलता कायम राहील तसेच समाजातील व्यक्तींच्या परस्पर संबंधात मानवतेचा, आत्मीयतेचा विकास होईल, अशी अर्थव्यवस्था आपणास हवी. विकेंद्रित अर्थव्यवस्थेनेच हे उद्दिष्ट साध्य होऊ शकेल. "

शक्तीचे केंद्रीकरण हे लोकशाहीला व मानवी स्वातंत्र्याला बाधक आहे. राष्ट्रीय एकात्मतेला यत्किंचितही बाध येणार नाही अशी खबरदारी घेऊन राजकीय आणि आर्थिक शक्तींचे भौगोलिक आणि व्यवसायात्मिक दृष्टीने विकेंद्रीकरण व्हावयास हवे. दीनदयाळजी मोठ्या आत्मविश्वासाने म्हणतात, " माणसाचे व्यक्तिमत्त्व कायम राहून त्याचा सर्वांगीण विकास अशा विकेंद्रित अर्थव्यस्थेतूनच होऊ शकेल. "

अशा अर्थव्यवस्थेचे केंद्र माणूस असेल, आधार आत्मीयता असेल, उत्पादन श्रमाची व मानवाची प्रतिष्ठा वाढविणारे असेल, आर्थिक विकास साध्य-साधन विवेक सांभाळणारा असेल आणि तंत्र मनुष्यत्व विकसित करणारे असेल !

आर्थिक केंद्रीकरणाचे स्वरूप व कारणे ध्यानात घेतली तर विकेंद्रीकरणाची दिशाही दृष्टिपथात येऊ शकेल. लाखो लोक परिश्रम करून जे उत्पादन करतात त्याचा विनियोग आणि वितरण करण्याची सत्ता व व्यवस्था काही थोड्या लोकांच्या हाती केंद्रित झाल्याचे चित्र आज दिसते. त्याऐवजी उत्पादन, वितरण आणि उपभोग या तीन्ही जबाबदाऱ्या व्यक्तीवर सोपविल्या पाहिजेत. उत्पादन करणारानेच वितरण करावे आणि संयमित उपभोगाद्वारे बचत करून भांडवल-निर्मिती करावी. आज मिलमध्ये काम करणाऱ्या माणसाला भांडवलनिर्मितीची फिकिर नसते. या गोष्टीकडे, तिच्या महत्त्वाकडे त्याचे लक्षही नसते. परंतु या कामगाराच्या जर ध्यानात आले की त्याला मिळणाऱ्या रुपयातल्या चार आण्याची त्याने बचत केली तर त्या भांडवलाच्या आधारे अधिक उत्पादन करून तो स्वतःच्या समृद्धीत भर घालू शकेल, तर तो बचत करावयास निश्चित तयार होईल.

विकेंद्रीकरणाची संकल्पना

पाश्चिमात्यांचे प्रचंड प्रमाणावर चाललेले औद्योगीकरण व आपणाला अभिप्रेत असलेले विकेंद्रीकरण या दोन्ही गोष्टी एकाच वेळी अमलात आणता

येणार नाहीत. काही लोकांना विकेंद्रीकरण हा केवळ स्थानसंबंधित विचार वाटतो. विकेंद्रीकरण म्हणजे उद्योगधंद्यांचे स्थानांतर अशी त्यांची कल्पना असते. मुंबई, अहमदाबाद यांसारख्या मोठ्या शहरांतील काही कारखाने उचलावयाचे आणि एखाद्या जिल्ह्याच्या किंवा तालुक्याच्या ठिकाणी नेऊन ठेवावयाचे की झाले विकेंद्रीकरण असे त्यांना वाटते. याला खरे विकेंद्रीकरण म्हणता येणार नाही. समाजवादी कोणत्याही रूपारंगाचे असोत ते सगळे पाश्चिमात्य पद्धतीच्या वृहत् केंद्रीभूत औद्योगीकरणावर अविचल श्रद्धा ठेवणारे आहेत. त्यांना विकेंद्रीकरण अभिप्रेत नाही. आपले युद्ध यंत्रांशी नसून यंत्रांच्या मालकांशी आहे, मालकांकडून यंत्रे काढून घेऊन ती शासनाच्या स्वाधीन केली की आपले काम संपले असे ते मानतात.

सर्वोदयवाद्यांचा एक वेगळाच विचार आहे. त्यांनी यंत्रातील दोष पाहिले आणि यंत्रावर बहिष्कार टाकला. व्यक्तिगत स्वामित्वाच्या कल्पनेतील दोष पाहिले आणि ते नष्ट करण्याचा विडा उचलला. समाजवादी व्यवस्थेतील राज्याची निरंकुश सत्ता पाहून तिला त्यांनी त्याज्य ठरविले. समाजाला शासनमुक्त करावयाचे असे म्हणत त्यांनी ग्रामपंचायतीच्या हाती सगळी शक्ती बहाल करावयाचे ठरविले. हे सर्व अगदी अव्यावहारिक आहे. विकेंद्रीकरणाच्या वरील सर्व प्रकारांना पं. दीनदयाळजींनी 'विकेंद्रीकरणाचे विडंबन' असे संबोधिले आहे.

पाश्चिमात्य जगातील औद्योगिक क्षेत्रात उत्पादनवाढीच्या हव्यासापायी प्रचंड उद्योगधंदे उभारण्यात आले. परिणामस्वरूप तेथे मनुष्याला बृहत् यंत्रामधील निर्जीव यंत्रभागाचे स्थान प्राप्त झाले. व्यक्तिगत स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या लोकशाहीने व भांडवलशाहीने अर्थलोलूप असा एक 'आर्थिक मानव' उत्पन्न केला, तर साम्यवाद-समाजवादाने माणसाचे व्यक्तिमत्त्व कुंठित करणारा बिनचेहऱ्याचा, साचेबंद माणूस उत्पन्न केला. सर्वोदयवाद्यांनी नकारात्मक आणि भावविश्वात रमणाऱ्या मानवाची कल्पना डोळ्यासमोर ठेवली.

पं. दीनदयाळजी सारांशरूपाने म्हणतात, "रोग दूर करण्याऐवजी रोग्यालाच खलास करणारी ही प्रक्रिया आहे!"

आर्थिक विकेंद्रीकरणाचे घटक

उत्पादनाच्या साधनांवरील मालकीहक्काचा फरक सोडला तर साम्यवाद

व भांडवलशाही या दोन्ही पद्धतींत विशेष फरक नाही. दोन्ही पद्धतींत मूठभर लोकांचाच (Chosen few) विकास होतो; सर्वसामान्य लोकांना आर्थिक आणि राजकीय स्वातंत्र्य नाममात्रच मिळते. दीनदयाळजींचा हा निष्कर्ष मागील विवेचनातून स्पष्ट झालेला आहे. त्यामुळे आर्थिक विषमतेचा, व्यक्तीच्या सृजनशीलतेच्या विकासाचा प्रश्न निराळ्याच मार्गाने सोडवावा लागेल.

या संदर्भात दीनदयाळजी 'भारतीय अर्थनीती 'मध्ये म्हणतात, "सर्व कारणमीमांसा तपासल्यावर आपल्याला असे म्हणावे लागेल की, वरील समस्या अर्थव्यवस्थेचे विकेंद्रीकरण करूनच सुटू शकतील. व्यक्ती व कुटुंब हे या आर्थिक विकेंद्रीकरणाचे मूलभूत घटक आहेत. व्यक्तीच्या प्रयत्नांतून आणि कुटुंबाच्या स्वामित्वाच्या आधारावर जर संपत्ती निर्माण झाली तर आर्थिक विषमतेचा व आर्थिक शोषणाचा प्रश्नच उरणार नाही. जेव्हा मनुष्य उत्पादनाच्या या मर्यादांचा भंग करून पुढे गेला, वा रशियाप्रमाणे सामूहिक पद्धतीवर किंवा अमेरिकेप्रमाणे मोठमोठ्या कॉर्पोरेशनद्वारा उत्पादन करून अधिकाधिक आर्थिक शक्ती आपल्या हाती केंद्रीत करीत गेला तेव्हाच आर्थिक विषमतेच्या आणि आर्थिक शोषणाच्या प्रवृत्ती बळावू लागल्या. या प्रवृत्ती अगदी मुळापासून नाहीशा करावयाच्या असतील तर सर्वसामान्यपणे व्यक्ती व कुटुंब या दोन घटकांना उत्पादनाचे मूलभूत निर्माते घटक समजून उत्पादन करावयास हवे. हे सर्व प्रत्यक्षात आणण्यासाठी कुटुंबाच्या आधारावर चालणाऱ्या उत्पादन-प्रणालीचाच अवलंब करावा लागेल." वरील निकष पं. दीनदयाळजी अर्थ-व्यवस्थेतील शेती व उद्योग या उत्पादनाच्या दोन्ही प्रमुख घटकांना लावीत व म्हणून अर्थरचनेत भूस्वामी कृषी व लघुयंत्राधिष्ठित उद्योग यांना प्राधान्य द्यावयास हवे असा रास्त आग्रह धरीत.

व्यक्ती आणि परिवार हा विकेन्द्रीकरणाच्या संकल्पनेतील घटकांचा मूळ अर्थ आणि आधार आहे, या आधाराने निर्माण झालेल्या स्वामित्वाला कधीही व्यापक विषमतेचे अथवा अन्यायी शोषणाचे स्वरूप येऊ शकत नाही. अशा-प्रकारच्या विकेन्द्रित लघुयंत्राधिष्ठित लहान उद्योगांचा व्यापक पाया ही आधारशिला कल्पून त्यासाठी आवश्यक अशी उत्तमांतली उत्तम यंत्रे, मध्यम-स्तरीय तंत्रज्ञान व विद्युत्शक्ती ह्यांचा उपयोग करून घेतला पाहिजे असा पं. दीनदयाळजी आग्रह धरीत.

हा पाया ठरल्यानंतर उरलेल्या क्षेत्रात सरकारी उद्योगधंदे, खाजगी

मोठे उद्योगधंदे, मिश्र क्षेत्रातील उद्योगधंदे, सहकारी क्षेत्रातील प्रकल्प, संयुक्त भांडवली क्षेत्रातील उद्योग असा विस्तार केला गेला पाहिजे असे मांडून पं. दीनदयाळजी म्हणत की, यासाठी योग्य ते क्षेत्रविभाजन, समुचित दिशा, कृषि-उद्योग-क्षेत्रातील समन्वय इत्यादी बाबींची सांगड घातली गेली पाहिजे.

या स्वरूपाची अर्थरचना जगाला भेडसावणाऱ्या आणखी एका समस्येचीही सोडवणूक करू शकेल. या समस्येने विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सर्वांनाच त्रस्त करून सोडले आहे. उत्पादन-तंत्रातील यांत्रिक व तांत्रिक प्रगती आणि केंद्रीभूत नियोजनाची अर्थरचना यांमुळे भांडवलशाही व समाजवाद या दोन्ही व्यवस्थांमध्ये काही थोड्या व्यक्तींच्या हाती अमर्याद अधिकार एकवटले जातात. यातच भर पडते ती शस्त्रास्त्रसामर्थ्य वाढविण्याच्या राष्ट्राराष्ट्रांतील स्पर्धेची. शस्त्रास्त्रांच्या या प्रचंड निर्मितीमुळे शासन सर्वेसर्वा बनू लागते.

या समस्येचा गुंता कसा सोडविता येईल ? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी आपल्याला उत्पादन-तंत्रातील प्रचंड बदल, शासकीय हस्तक्षेपाची वाढती गती आणि शस्त्रास्त्र-निर्मितीचे जीवघेणे प्रयोग या गोष्टींचा विचार करणे क्रमप्राप्त होते.

उत्पादन-तंत्रातील प्रचंड परिवर्तनातून समाजातील उत्पादन-संबंधात तीव्र तणाव वाढत जातील, त्यामुळे समाजाच्या उत्पादन-साधनांच्या मालकीची चौकट मोडून पडेल आणि अखेरीस समाजवादी उत्पादनप्रणाली अस्तित्वात येईल अशी मार्क्सची धारणा होती. परंतु या संदर्भातील एक महत्त्वाची बाब मार्क्सच्या लक्षात आली नाही. उत्पादनपद्धती जसजशी मोठी होत जाईल, अर्थशक्तीचे व राजसत्तेचे जसजसे अधिकाधिक केंद्रीकरण होत जाईल, तसतसे राज्यसत्ता आपले आसन अधिकाधिक मजबूत करीत जाईल. या अजस्र उत्पादन-पद्धतींत जसजशी तांत्रिक प्रगती होईल तसतशी अधिकाधिक संहारक शस्त्रास्त्र-निर्मितीतही वाढ होत जाईल. मार्क्स, एंजल्स व लेनिन यांच्या हा प्रवाह ध्यानात येऊ शकला नाही. ज्या राज्यसत्तेच्या हाती अशी प्रचंड संहारक शस्त्रसामुग्री आणि केंद्रीभूत अर्थव्यवस्था दिली जाईल ती मानवजातीच्या स्वातंत्र्यावर गोळ्या आणि रणगाडे घालून आपले आसन स्थिर करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करील हे त्यांना सुचलेच नाही. आजही रशिया, युरोपातील कम्युनिस्ट राष्ट्रगट अगर चीनसारखे मोठे राष्ट्र यांमध्ये वर्गविहिन समाज, मानवी स्वातंत्र्य, समता तसेच समान न्यायालयीन हक्क, राज्यसत्तेवर

न्यायालये व जनतेचे प्रतिनिधी यांचे नियंत्रण या सर्व महत्त्वाच्या बाबींची संपूर्ण गळचेपीच झालेली पहावयास मिळते.

अमेरिकेसारख्या समृद्ध राष्ट्रात लोकशाही शासनपद्धती आहे. परंतु शासनाच्या हाती संहारक अण्वस्त्रांचे व इतर विविध अद्यावत शस्त्रास्त्रांचे प्रचंड साठे आहेत. तसेच स्वत:ची प्रभावी लॉबी निर्माण करून दडपणे आणणाऱ्या प्रचंड कॉर्पोरेशन्स् व धनदंड भांडवलदार ही जोडगोळी – ज्याला अध्यक्ष आयसेन हॉवर (Military Industrial Complex) म्हणत असत – अमेरिकन जनतेच्या जीवनात धुडगुस घालीत आहे. आयसेन हॉवर यांनी पुढे म्हटल्याप्रमाणे ही प्रक्रिया साऱ्या जगाला ग्रहण लावू पहात आहे.

अशा प्रकारे रशिया व अमेरिका येथील त्यांच्या प्रभावाखालील राष्ट्रांतील शासनाची लोकजीवनावरील पकड अप्रतिहतपणे वाढते आहे ; आणि त्याला अजस्र उत्पादनप्रणाली, अर्थरचनेचे केंद्रीकरण आणि त्यातून निर्माण होणारा अर्थसत्तेचा अत्यधिक प्रभाव याच गोष्टी कारणीभूत आहेत.

म्हणूनच दीनदयाळजी म्हणतात – " आपण भांडवलशाही व समाजवादाच्या चक्रातून मुक्त होऊन मानववादाचा विचार करू या. मानवी जीवनाच्या सर्व बाजूंचा विचार करून आर्थिक क्षेत्रामध्ये उत्पादन, वितरण व उपभोग यांची साधने आणि व्यवस्था करू या. यासाठी विकेंद्रित अर्थव्यवस्थाच हवी. "

१९५२ मध्ये अमेरिकेत डॉ. लोहिया यांनी जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. आइन्स्टाइन यांची भेट घेतली असता डॉ. आइन्स्टाइन ह्यांनीही हाच विचार व्यक्त केला होता.

आता वीज खेडोपाडी पोहोचत असल्याने तर अशी लघुयंत्रावर विकसित विकेंद्रित अर्थरचना उभी करणे अतिशय सोयीचे झाले आहे हा मुद्दा पंडित दीनदयाळजी आवर्जून मांडीत असत. आता जगभर इलेक्ट्रॉनिक्सची क्रांती झालेली आहे. १९८५ साली श्री. आल्विन टॉफ्लर या पाश्चात्य भविष्यवेधी विद्वानाने प्रदीर्घ अभ्यास करून असा निष्कर्ष काढला की, या पुढील काही दशकांतच इलेक्ट्रॉनिक्समुळे साऱ्या जगभर लघुयंत्राधिष्ठित विकेंद्रित अर्थरचना साकार होऊ शकेल व तीच अर्थव्यवस्था संपूर्ण मानवजातीला वरदान ठरेल.

• • •

३

शेती आणि स्वावलंबन

भारतीय संस्कृतिप्रणित अर्थनीतीच्या संदर्भात साध्य-साधन विवेकापासून प्रारंभ करून अर्थव्यवस्थेच्या विकेंद्रीकरणापर्यंतचे दीनदयाळजींचे विचार आपण येथवर पाहिले. शेती, औद्योगीकरण, श्रमप्रधान उत्पादन-पद्धती, लघु-यंत्राधिष्ठित समुचित तंत्रज्ञान, स्वदेशीचा महामंत्र, परकीय आर्थिक मदतीचा चक्रव्यूह, भांडवल-उभारणी, अर्थ-संकल्पीय नीती, नियोजनाची मूलतत्त्वे आदी विषयांसंबंधीचे त्यांचे विचार येथून पुढे पहावयाचे आहेत.

अर्थव्यवस्थेची क्रमवारी : शेती

अर्थव्यवस्थेत अर्थायाम प्रस्थापित करावयाचा असेल तर आर्थिक नियोजनाची काही क्रमवारी ठरविणे आवश्यक असते. आपल्या देशाच्या प्रकृतीचा व एकूण परिस्थितीचा विचार करता दीनदयाळजींच्या मते शेती, उद्योगधंदे, वाहतूक व व्यापार आणि समाज-सुरक्षा-सेवा हा क्रम सर्व दृष्टींनी उपयुक्त आहे. अर्थात् ही सर्वच क्षेत्रे परस्परांशी एवढी निगडित आहेत की, आपल्याला यांपैकी कोणत्याही एका क्षेत्राचा विचार अन्य क्षेत्रांना वगळून करता येणार नाही.

अविकसित राष्ट्रांनी एकदम औद्योगीकरणाच्या मागे न लागता प्रथम शेतीचा विचार केला पाहिजे, तरच त्यांचे आर्थिक प्रश्न सुटू शकतील असे दीनदयाळजींचे मत होते. अशाच प्रकारचे विचार प्रा. गन्नर मिर्डाल, प्रा. जॉन मेलॉर या जागतिक कीर्तीच्या अर्थ-शास्त्रज्ञांनी मांडलेले आहेत.

वरील क्रमवारी बदलून म्हणजे शेतीला अग्रक्रम न देता ज्या अविकसित राष्ट्रांनी नियोजन आखले त्या घाना, इंडोनेशिया, ब्रह्मदेश, इत्यादी देशांना खराखुरा आर्थिक विकास साधता आला नाही. आपल्या देशाचाही हाच अनुभव आहे. आपण दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून शेतीची उपेक्षा करून पाश्चात्य पद्धतीच्या औद्योगीकरणावर भर देऊन आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यातून विकास साधण्याऐवजी दारिद्र्य व बेकारी वाढलेली दिसली.

कोणतेही राष्ट्र निसर्गाचा सर्वसाधारण वरदहस्त असल्यास व योग्य रीतीने नियोजन केल्यास अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होऊ शकते. तसे करणे आवश्यकही असते. शेतीची उपेक्षा करून प्रचंड प्रमाणावर केलेले औद्योगीकरण अनेकदा घातक ठरते. त्यातून शेती मागे पडते व स्वावलंबनही ढासळते. अर्जेंटिनाला प्रे. पेराँच्या कारकीर्दीत हाच अनुभव आला. त्यांचे शेती-उत्पादन तर घटलेच, पण चलनवाढ होऊन महागाई भडकली व पाया नीट घातला गेला नसल्याने औद्योगीकरणाचा पिरॅमिड कोसळून पडला.

व्हेनेज्युवेलाने तेलाच्या निर्यातीतून मिळविलेले १०० कोटी पौंड, विजेची देशात पुरेशी मागणी नसताना अजस्र जलविद्युत्-प्रकल्प उभारण्यात, आणि पुरेसा कोळसा नसताना पोलादाचा कारखाना विकत घेण्यात उधळून टाकले. परिणामी या अविकसित देशाला आपल्या दैनंदिन गरजांसाठीही अन्य राष्ट्रांकडे मदतीची याचना करावी लागली.

आपला देश शेतीप्रधान आहे. आपल्या राष्ट्रीय उत्पन्नापैकी सुमारे ६० टक्के उत्पादन शेतीमधूनच होते, तसेच सुमारे ७० टक्के रोजगारही शेतीक्षेत्रामधून उपलब्ध होतो. त्यामुळे शेतीचा सर्व बाजूंनी विकास झाल्याशिवाय देशाचे आर्थिक प्रश्न मार्गी लागणार नाहीत ही पक्की खूणगाठ दीनदयाळजींनी मनाशी बांधली होती. त्याचबरोबर देशाचे औद्योगीकरण विस्तृत भक्कम पायावर उभे करावयाचे असेल तर त्यासाठीही कृषिविकास मजबूत करावा लागेल हेही त्यांनी ओळखले होते. उद्योगधंद्यांचा विकास, भांडवल व कच्च्या मालाचा पुरवठा या बरोबरच ग्राहकांच्या प्रभावी मागणीवर (Effective demand) अवलंबून असतो. आपल्या येथील शेतकरी हा केवळ अन्नधान्याचा व उद्योगधंद्याला लागणाऱ्या कच्च्या मालाचा उत्पादक नसून कारखान्यांत तयार होणाऱ्या पक्क्या मालाचा फार मोठा ग्राहकही आहे. शेतकऱ्याचे उत्पादन आणि उत्पन्न जेवढ्या प्रमाणात वाढेल तेवढ्या प्रमाणात त्याची क्रयशक्ती वाढेल आणि

तेवढचा अधिक प्रमाणात तो उद्योगधंद्यांमध्ये तयार होणारा माल विकत घेऊ शकेल हे पं. दीनदयाळजींचे या विषयासंबंधीचे सूत्र होते.

पी. एल्. ४८० चा खोडा

अन्नधान्य उत्पादनाच्या बाबतीत आपण पूर्ण स्वावलंबी झाले पाहिजे असा दीनदयाळजींचा विशेष आग्रह होता. शेतीला अग्रक्रम दिल्यास हे स्वावलंबन आपल्याला गाठता येईल असे ते म्हणत. याबाबत आपण उदासीन राहिलो तर प्रसंगी आपले स्वातंत्र्यच धोक्यात येईल असा इशारा ते देत असत. तसे पाहिले तर १९५१ साली पं. नेहरूंनीही, 'यापुढे परदेशांतून अन्नधान्य आणावयाचे नाही' अशी घोषणा केली होती. (पं. नेहरू त्या वेळी देशाचे पंतप्रधान होते. नियोजन-मंडळाचे अध्यक्षही तेच होते.) परंतु ही घोषणा केवळ हवेतच राहिली. १९५४ ते १९६६ या बारा वर्षांच्या काळात कोटचवधी रुपयांचे अन्न-धान्य अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडा इत्यादी देशांमधून आयात करण्यात आले. ऑगस्ट १९५६ ते मे १९६० या पावणेचार वर्षांच्या काळात एकटचा अमेरिकेतून एक हजार सदुसष्ट कोटी रुपयांची धान्य-आयात करण्यात आली. (आपली संपूर्ण पहिली पंचवार्षिक योजना दोन हजार कोटी रुपयांची होती.) अन्नासाठी हाती कटोरा घेऊन दाही दिशा फिरणाऱ्या आपल्या देशाचे हे चित्र दीनदयाळजींना खूपच अस्वस्थ करीत असे. वस्तुतः एक स्वतंत्र व सार्वभौम देश या नात्याने भारत सरकारने अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी होण्याच्या दिशेने धडक कार्यक्रम हाती घ्यावयास पाहिजे होता. त्याऐवजी सरकारने अन्नधान्याच्या प्रचंड आयातीचा दीर्घ मुदतीचा करार करून टाकला. या कराराचे नाव आहे, पी. एल्. ४८० (पब्लिक लॉ ४८०).

अशा करारामुळे आपल्या अर्थव्यवस्थेवर अमेरिका व जागतिक अर्थसंस्था यांचे कायमचे दडपण राहून त्या दडपणाखाली आपल्याला देशाच्या आर्थिक हिताला बाधक ठरणारे निर्णयही मुकाटचाने घ्यावे लागतील, तसेच अन्नधान्या-सारख्या महत्त्वाच्या बाबतीत दुसऱ्यावर अवलंबून राहण्यामुळे आपल्या देशाची कोणत्याही प्रसंगी कोंडी होऊ शकेल, असा इशारा दीनदयाळजींनी दिला होता. त्यांचा तो इशारा अक्षरशः खरा ठरला. पुढील दोन घटना या संदर्भात विशेष उल्लेखनीय आहेत.

६ जून १९६६ रोजी तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्री श्री. सचिन चौधरी यांनी, भारत सरकारने रुपयाचे ३६.५ टक्के अवमूल्यन केल्याचे घोषित केले.

हे अवमूल्यन अमेरिका व जागतिक बँकेच्या दडपणामुळे करण्यात आले होते. हा रहस्यस्फोट पं. दीनदयाळजींनीच केला होता.

दि. २६ जानेवारी १९६७ च्या 'न्यूयॉर्क टाइम्स'च्या अग्रलेखात त्या पत्राचे मुख्य संपादक लिहितात –

"The United States has used its food and economic aid to press Indian Government for some important policy changes to grant concession to foreign investors in fertiliser industries·· to liberative imports and to devalue the Rupee."

जागतिक अर्थसंस्थांचे सल्लागार प्रा. जॉन मॅलॉर यांनीही अमेरिकेच्या या दडपणाचा स्पष्टपणे उल्लेख केला आहे, १९७७ साली लिहिलेल्या एका लेखात ते म्हणतात – "अमेरिकेच्या जॉन्सन-सरकारने भारताला अन्नधान्याची जहाजे मुद्दामच उशीरा व अनिश्चिततेची टांगती तलवार ठेवून रवाना करण्याचे धोरण ठेवले होते. जॉन्सनसाहेब भारताची नाकेबंदी करून, भारतावर सर्व प्रकारे दडपण आणून अमेरिकेची सौदेबाजीची शक्ती वाढविण्याची कसरत करीत होते."

कोणतीही परकीय मदत नीटपणे वापरली, तिचा उपयोग देशाला स्वयंपूर्ण बनविण्याकडे केला, तर त्या मदतीचा योग्य उपयोग केला असे म्हणता येईल. असे झाले नाही तर परकीय देश अशा मदतीचा उपयोग आपले दबावाचे राजकारण पुढे रेटण्याकडे करतात.

'पी. एल्. ४८०'च्या बाबतीत असेच घडले. या धान्याचा कशाप्रकारे वापर करावयाचा यासंबंधी सरकारने एक धोरण ठरविले होते. देशात जागोजागी शिलकी धान्याचे साठे करावे, त्यासाठी देशात तयार झालेले व परदेशांतून आयात केलेले धान्य वापरावे, शेतकऱ्याला किमान भावाची हमी देऊन शेतमालाचे उत्पादन वाढवावे, भाव पडताहेत असे दिसल्यास सरकारने किमान हमी भावाने धान्य खरेदी करावे व हे धान्य स्वस्त भावाने विकून किंमतीची पातळी स्थिर राखावी. अन्नधान्याचे भाव स्थिरावले की इतर वस्तूंचे भावही स्थिरावतात. अशा प्रकारे शेतकऱ्यांना शेतीला व संसाराला लागणाऱ्या वस्तू व सेवा स्थिर किंमतीत मिळू लागल्या म्हणजे शेतकरी उत्साहाने उत्पादन वाढवून देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी बनवतील, अशी ही एकूण योजना होती.

तथापि या धोरणाची अंमलबजावणी नीटपणे झाली नाही. त्यामुळे या अन्नधान्य-आयातीतून अपेक्षित असलेले तुटपुंजे लाभही पदरात पडू शकले नाहीत. तात्कालिक आणि दूरगामी दुष्परिणाम मात्र चांगलेच भोवले !

१९६५ च्या भारत-पाक युद्धात स्वातंत्र्यानंतरच्या अठरा वर्षांच्या काळात प्रथमच लालबहादूर शास्त्रींच्या नेतृत्वाखाली भारत सरकारने पाकिस्तानी आक्रमणाला प्रतिचढाई करून उत्तर देण्याचे धोरण अवलंबिले. भारतीय सेना थेट लाहोरपर्यंत जाऊन धडकल्या. तेव्हा मदतीसाठी पाकिस्तानने अमेरिकेचा धावा केला. या हाकेला प्रतिसाद देऊन अमेरिकेने भारताची सर्व अन्नधान्य-मदत थांबविल्याचे जाहीर केले. गव्हाने भरलेली जहाजे परत फिरविली. पाकिस्तानशी युद्ध चालू असेपर्यंत सर्व आर्थिक मदत बंद करण्याचा निर्णय घोषित केला, आणि शास्त्रींची संकल्पित अमेरिका-भेट लांबणीवर टाकण्याची एकतर्फी घोषणा करून साऱ्या भारतीयांच्या जखमेवर मीठ चोळले. यावर शास्त्रीजींनी बाणेदारपणे अमेरिकेचा दौरा रद्द करून टाकला. अन्नधान्याच्या मदतीचीही गरज नाही असे अमेरिकेला सांगितले.

शास्त्रीजींच्या या निर्णयाचे दीनदयाळजींनी स्वागत केले व इतरही सर्वच देशांतून अन्नधान्य-आयात थांबविल्यास भारतातील शेतकरी भगीरथ प्रयत्न करून देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनवितील असा विश्वास व्यक्त केला. हा त्यांचा विश्वास नंतरच्या कालखंडात सार्थ ठरलेला दिसला.

शेती-उद्योगाची बेकारी-निवारण-क्षमता

नियोजनाच्या या क्रमवारीमध्ये पं. दीनदयाळजींनी शेतीला अग्रक्रम दिला आहे, त्याच्या इतर अनेक कारणांपैकी अल्प भांडवल गुंतवून तुलनेने अधिक रोजगार उपलब्ध करून देण्याची शेती-उद्योगाची क्षमता हेही एक प्रमुख कारण आहे. याशिवाय शेती-उद्योगात उत्पादन थोड्या अवधीत हातात येते हाही एक महत्त्वाचा पैलू आहेच. प्रा. महालनोबीस यांनी या संदर्भात दिलेली पुढील आकडेवारी पाहाण्यासारखी आहे. (संख्या नियतकालिक)

विभाग	भांडवल रु.	रोजगार मिळालेल्या व्यक्ती
शेती-उत्पादन	५७ लाख	४०००
उपभोग्य वस्तूंचे उत्पादन	३३ लाख	११५०
मोठे औद्योगिक प्रकल्प	१९ लाख	५००

हे अवमूल्यन अमेरिका व जागतिक बँकेच्या दडपणामुळे करण्यात आले होते. हा रहस्यस्फोट पं. दीनदयाळजींनीच केला होता.

दि. २६ जानेवारी १९६७ च्या 'न्यूयॉर्क टाइम्स'च्या अग्रलेखात त्या पत्राचे मुख्य संपादक लिहितात –

"The United States has used its food and economic aid to press Indian Government for some important policy changes to grant concession to foreign investors in fertiliser industries·· to liberative imports and to devalue the Rupee."

जागतिक अर्थसंस्थांचे सल्लागार प्रा. जॉन मॅलॉर यांनीही अमेरिकेच्या या दडपणाचा स्पष्टपणे उल्लेख केला आहे, १९७७ साली लिहिलेल्या एका लेखात ते म्हणतात – "अमेरिकेच्या जॉन्सन-सरकारने भारताला अन्नधान्याची जहाजे मुद्दामच उशीरा व अनिश्चिततेची टांगती तलवार ठेवून रवाना करण्याचे धोरण ठेवले होते. जॉन्सनसाहेब भारताची नाकेबंदी करून, भारतावर सर्व प्रकारे दडपण आणून अमेरिकेची सौदेबाजीची शक्ती वाढविण्याची कसरत करीत होते."

कोणतीही परकीय मदत नीटपणे वापरली, तिचा उपयोग देशाला स्वयंपूर्ण बनविण्याकडे केला, तर त्या मदतीचा योग्य उपयोग केला असे म्हणता येईल. असे झाले नाही तर परकीय देश अशा मदतीचा उपयोग आपले दबावाचे राजकारण पुढे रेटण्याकडे करतात.

'पी. एल्. ४८०'च्या बाबतीत असेच घडले. या धान्याचा कशाप्रकारे वापर करावयाचा यासंबंधी सरकारने एक धोरण ठरविले होते. देशात जागोजागी शिलकी धान्याचे साठे करावे, त्यासाठी देशात तयार झालेले व परदेशांतून आयात केलेले धान्य वापरावे, शेतकऱ्याला किमान भावाची हमी देऊन शेतमालाचे उत्पादन वाढवावे, भाव पडताहेत असे दिसल्यास सरकारने किमान हमी भावाने धान्य खरेदी करावे व हे धान्य स्वस्त भावाने विकून किंमतीची पातळी स्थिर राखावी. अन्नधान्याचे भाव स्थिरावले की इतर वस्तूंचे भावही स्थिरावतात. अशा प्रकारे शेतकऱ्यांना शेतीला व संसाराला लागणाऱ्या वस्तू व सेवा स्थिर किंमतीत मिळू लागल्या म्हणजे शेतकरी उत्साहाने उत्पादन वाढवून देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी बनवतील, अशी ही एकूण योजना होती.

तथापि या धोरणाची अंमलबजावणी नीटपणे झाली नाही. त्यामुळे या अन्नधान्य-आयातीतून अपेक्षित असलेले तुटपुंजे लाभही पदरात पडू शकले नाहीत. तात्कालिक आणि दूरगामी दुष्परिणाम मात्र चांगलेच भोवले !

१९६५ च्या भारत-पाक युद्धात स्वातंत्र्यानंतरच्या अठरा वर्षांच्या काळात प्रथमच लालबहादूर शास्त्रींच्या नेतृत्वाखाली भारत सरकारने पाकिस्तानी आक्रमणाला प्रतिचढाई करून उत्तर देण्याचे धोरण अवलंबिले. भारतीय सेना थेट लाहोरपर्यंत जाऊन धडकल्या. तेव्हा मदतीसाठी पाकिस्तानने अमेरिकेचा धावा केला. या हाकेला प्रतिसाद देऊन अमेरिकेने भारताची सर्व अन्नधान्य-मदत थांबविल्याचे जाहीर केले. गव्हाने भरलेली जहाजे परत फिरविली. पाकिस्तानशी युद्ध चालू असेपर्यंत सर्व आर्थिक मदत बंद करण्याचा निर्णय घोषित केला, आणि शास्त्रींची संकल्पित अमेरिका-भेट लांबणीवर टाकण्याची एकतर्फी घोषणा करून साऱ्या भारतीयांच्या जखमेवर मीठ चोळले. यावर शास्त्रीजींनी बाणेदारपणे अमेरिकेचा दौरा रद्द करून टाकला. अन्नधान्याच्या मदतीचीही गरज नाही असे अमेरिकेला सांगितले.

शास्त्रीजींच्या या निर्णयाचे दीनदयाळजींनी स्वागत केले व इतरही सर्वच देशांतून अन्नधान्य-आयात थांबविल्यास भारतातील शेतकरी भगीरथ प्रयत्न करून देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनवितील असा विश्वास व्यक्त केला. हा त्यांचा विश्वास नंतरच्या कालखंडात सार्थ ठरलेला दिसला.

शेती-उद्योगाची बेकारी-निवारण-क्षमता

नियोजनाच्या या क्रमवारीमध्ये पं. दीनदयाळजींनी शेतीला अग्रक्रम दिला आहे, त्याच्या इतर अनेक कारणांपैकी अल्प भांडवल गुंतवून तुलनेने अधिक रोजगार उपलब्ध करून देण्याची शेती-उद्योगाची क्षमता हेही एक प्रमुख कारण आहे. याशिवाय शेती-उद्योगात उत्पादन थोड्या अवधीत हातात येते हाही एक महत्त्वाचा पैलू आहेच. प्रा. महालनोबीस यांनी या संदर्भात दिलेली पुढील आकडेवारी पाहाण्यासारखी आहे. (संख्या नियतकालिक)

विभाग	भांडवल रु.	रोजगार मिळालेल्या व्यक्ती
शेती-उत्पादन	५७ लाख	४०००
उपभोग्य वस्तूंचे उत्पादन	३३ लाख	११५०
मोठे औद्योगिक प्रकल्प	१९ लाख	५००

आपल्या देशात उद्योगधंद्यासाठी खर्च होणाऱ्या एकूण इंधनापैकी (ऊर्जेपैकी) जेमतेम दहा टक्के इंधन शेती-उद्योगावर खर्च होते. शेती-उद्योगाचा हा पैलूही क्रमवारीच्या संदर्भात उल्लेखनीय आहे.

१९७६–७७ मध्ये ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ प्रा. जॉन मेलॉर यांनी भारतीय अर्थव्यवस्थेवर प्रदीर्घ संशोधन करून 'दि न्यू इकॉनॉमिक्स ऑफ ग्रोथ' हा प्रबंधवजा ग्रंथ लिहिला. प्रा. मेलॉर हे 'इंटरनॅशनल बँक फॉर रिकन्स्ट्रक्शन ॲन्ड डेव्हलपमेंट' या जागतिक अर्थसंस्थेचे तसेच युनोच्या 'फूड अँड ॲग्रिकल्चरल ऑर्गनायझेशन' या संस्थेचे प्रमुख आर्थिक सल्लागार होते. त्यांनीही पं. दीनदयाळजींनी सांगितलेली शेतीला अग्रक्रम देणारी क्रमवारीच पुरस्कारिली आहे. आशिया व आफ्रिकेतील गरीब व अर्धविकसित देशांनी आर्थिक विकासाच्या पाश्चात्य संकल्पना बाजूस सारून स्वतःचा मार्ग आखला पाहिजे असा इशाराही त्यांनी दिला आहे.

आपल्या देशाने पं. दीनदयाळजी, डॉ. गन्नार मिर्डाल, प्रा. जॉन मेलॉर यांसारख्या विचारवंतांनी शेतीला अग्रक्रम देण्याचा मांडलेला विचार डावलून नियोजन आखले. परिणामी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून देशाची आर्थिक क्षेत्रात पीछेहाट सुरू झाली.

देशाच्या नियोजन-आखणीत कृषीक्षेत्राला अत्यंत गौण स्थान देण्यात आल्याने संपूर्ण अर्थव्यवस्थेत असमतोल निर्माण झाला. शेतीला दिलेले गौण स्थान एका लहानशा उदाहरणानेही चटकन लक्षात येऊ शकेल. आपल्या देशातील लागवडीखालील एकूण जमिनीपैकी सुमारे एकचतुर्थांश जमीन अशा अवस्थेला येऊन पोचलेली आहे की तिची धूप थांबविणे निकडीचे आहे. परंतु या अतिशय महत्त्वाच्या बाबीसाठी १९५१ ते १९७३ या २२ वर्षांमधील पंचवार्षिक योजनांमधून अवघे सत्तेचाळीस कोटी रुपये खर्ची पडलेले आहेत. या उलट भिलाई, दुर्गापूर, बोकारो या पोलाद-कारखान्यांच्या विस्तारासाठी पाचव्या योजनेत दोन हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली होती. विशेष म्हणजे या पोलाद-कारखान्यांची उपलब्ध असलेली उत्पादन-क्षमता देखील अत्यंत अल्प प्रमाणात वापरली जात असताही त्यांच्या विस्तारासाठी एवढ्या प्रचंड रकमेची तरतूद करण्यात आली.

शेतीक्षेत्राला सापत्न वागणूक दिली जात असल्याची कहाणी फार मोठी आहे. येथील शेतकऱ्याच्या उसाला टनाला साधारणपणे १५० रुपये दिलेला

भाव म्हणजे किलोला १५ पैसे पडतो. आज वर्तमानपत्राच्या रद्दीचा भाव किमान ३ रुपये किलो आहे, तर राखेचा भाव ८० पैसे किलो आहे. सरकार येथील शेतकऱ्याकडून १८० रुपये क्विंटल या भावाने गहू खरेदी करते, तर अमेरिकेहून येणाऱ्या गव्हाला २५० ते ३०० रुपये क्विंटल भाव देण्यास तयार होते. आपल्या येथील शेतकऱ्याला मिळणारे ऑईल इंजिन सुमारे चार ते पाच हजार रुपयांच्या घरात जाते, तर हेच इंजिन अरब राष्ट्रातील शेतकऱ्याला येथून अवघ्या सहाशे रुपयांना निर्यात होत आहे. येथील लोकांना साखर पाच ते सहा रुपये किलो दराने खरेदी करावयास सरकार सांगते, तर हीच साखर परदेशात ऐशी पैसे किलो दराने पाठविली जात आहे. ' आपल्या शेतकऱ्याच्या सर्व बाजूंनी होणाऱ्या दुर्दशेला आपली संपूर्ण अर्थव्यवस्थाच जबाबदार आहे ' हा दीनदयाळजींचा निष्कर्ष किती यथार्थ आहे !

शेती-विकासाच्या संदर्भात विचार करताना सुधारित शेतीतंत्रे, सामूहिक वा सहकारी शेती, सुधारित बी-बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, ट्रॅक्टर, वा नांगर, पाणी पुरवठ्याच्या योजना आदी गोष्टी स्वाभाविकपणेच डोळ्यासमोर येतात. या सुधारित तंत्राला व साधनांना दीनदयाळजींचा विरोध नव्हता. परंतु त्याचा विचार करताना आपण आपल्या देशाची विशिष्ट परिस्थिती, तसेच पाश्चात्य देशांचे या सुधारित तंत्रांसंबंधीचे अनुभव यांचाही नीट विचार केला पाहिजे, असे त्यांचे म्हणणे होते. विज्ञानाचे फायदे भारतीय शेतकऱ्यापर्यंत पोहोचले पाहिजेत, परंतु त्याच बरोबर या प्रयोगांचे दूरगामी परिणामही तपासून पाहिले पाहिजेत.

शेती आणि पाणी-पुरवठा

आपण प्रथम पाणी-पुरवठ्याच्या प्रश्नाचा विचार करू. स्वातंत्र्यानंतर शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी मोठमोठे धरण-प्रकल्प हाती घेऊन पूर्ण करण्यात आले व त्या प्रकल्पांचे उत्पादनवाढीच्या दृष्टीने काही तात्कालिक फायदेही झाले. परंतु या प्रश्नाचा सर्व बाजूंनी विचार करता शेती-विकासाला मोठ्या धरणांपेक्षा लहान धरण-योजनाच अधिक उपयुक्त ठरतील अशा निष्कर्षाप्रत दीनदयाळजी येऊन पोहोचले होते. आपल्या ' भारतीय अर्थनीती ' या पुस्तकात त्यांनी १९५१ ते १९५६ या काळात निरनिराळ्या धरण-योजनांमुळे शेती-उत्पादनांत किती वाढ झाली याची आकडेवारी सादर केली आहे. त्यावरून असे दिसते की, मोठ्या धरण-योजनांवर बजेटमध्ये मंजूर झालेल्या

रकमेपैकी ९२ टक्के रक्कम खर्च होऊनही त्या काळात शेती-उत्पादन केवळ ४७ टक्क्यांनी वाढले, तर लहान धरण-योजनांवर त्याच काळात ६३ टक्के खर्च होऊन शेतीचे उत्पादन ९१ टक्क्यांनी वाढले. दीनदयाळजींनी आकडेवारीनिशी हेही दाखवून दिले आहे की, लहान धरणयोजनांमुळे साठविलेल्या पाण्याच्या ९५ टक्के पाणी शेतीच्या उपयोगी येऊ शकते, तर मोठ्या धरण-योजनांमुळे फक्त ५५ टक्केच पाणी उपयोगात येऊ शकते.

मोठ्या धरण-योजनांमुळे ज्या जमिनीला पाणी पुरवठा होतो, त्या जमिनीच्या पोटात असलेली पाण्याची पातळी थोड्याच दिवसांत वाढते (वॉटर लॉगिंग). अशा प्रकारे जमिनीखालील पाण्याची पातळी वाढल्याने जमिनीतील विविध क्षार पृष्ठभागावर येतात, आणि त्यामुळे लागवडीखाली असलेली जमीन देखील पडीक बनते. मोठ्या धरणांमुळे उभी रहाणारी दुसरी मोठी समस्या म्हणजे पाण्याचा निचरा नीटपणे होऊ शकत नाही, कारण जमिनीची पाणी शोषण करण्याची क्षमता कमी झालेली असते. ही क्षमता कमी झालेली असल्याने थोडासा पाऊस झाला तरी. आसपासच्या प्रदेशात मोठ्या प्रमाणावर पूर येतात. पंजाबमधील भटिंडा, अमृतसर, फिरोजपूर, आणि गुरुदासपूर इत्यादी जिल्ह्यांत व उत्तर प्रदेशातील मुझफ्फरनगर, मिरजापूर, गाजीपूर या जिल्ह्यांत पुराच्या पाण्याची समस्या उत्तरोत्तर अधिकाधिक बिकट होत चालली आहे.

दुसरे म्हणजे मोठ्या धरणयोजना मुख्यतः भांडवलप्रधान असतात. त्यांचे खर्च व ती पूर्ण होण्याचे वेळापत्रक या गोष्टी मारुतीच्या शेपटीप्रमाणे वाढतच जातात. शिवाय मोठ्या धरणयोजना अनेक बाबतींत परदेशांतून आयात केलेल्या साधनांवर अवलंबून असतात. लहान धरणयोजना आयात होणाऱ्या साधनांवर विशेष अवलंबून नसतात. त्यामुळे त्या पूर्ण करताना परदेशी साधनसामुग्रीसाठी व परकीय तंत्रासाठी तिष्ठत रहावे लागत नाही. निष्कर्षरूपाने दीनदयाळजी लिहितात – "भारत सरकारने पाश्चात्यांची नक्कल करून शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी अजस्र धरणे बांधण्याचा कार्यक्रम हाती घेतला असला तरी सर्व दृष्टींनी विचार करता पाणी-पुरवठ्याच्या लहान लहान योजनाच आपल्याला अधिक उपयोगी आहेत." (भारतीय अर्थनीती)

दीनदयाळजींच्या विचारांची दखल त्या काळी आपल्या शासनाने घेतली नाही. कारण त्या वेळचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या डोळ्यांवर

पाश्चात्यांच्या नियोजनविषयक कल्पनांची भुरळ होती. परंतु सर्व दृष्टींनी विचार करता लहान धरण-योजनाच शेती-विकासाला उपयुक्त ठरतात ही गोष्ट अनुभवान्ती मान्य होऊ लागली आहे. संशोधक श्री. भारत डोग्रा यांनी १९ एप्रिल १९८२ च्या 'इंडियन एस्क्प्रेस' मध्ये लेख लिहिला आहे. प्रचंड धरणांमुळे आपल्या देशाचे जे नुकसान झाले त्याची माहिती त्यांनी त्या लेखात दिली आहे. श्री. डोग्रा लिहितात – "Nearly six million hectares are affected by waterlogging, 4. 5 million hectares by saline soils and 2·50 million hectares by alkali soils."

श्री. डोग्रा त्या लेखात पुढे म्हणतात की," या अजस्र योजना त्यांच्यावरील भांडवल देखील वसूल करून देऊ शकत नाहीत. तसेच या धरणांच्या पाण्याचा लाभ घेणाऱ्या जमिनीची उत्पादनक्षमता कमी असून हेक्टरी अवघे १.७ टन एवढेच शेती-उत्पादन या जमिनी देऊ शकत आहेत." सहाव्या पंचवार्षिक योजनांच्या समीक्षणवजा सरकारी अहवालात वरील नुकसान मान्य करण्यात आले आहे.

मोठ्या धरणांसाठी लागणारे प्रचंड भांडवल आणि अद्ययावत् तंत्रज्ञान यांसाठी प्रगत व श्रीमंत राष्ट्रांवर अवलंबून रहावे लागत असल्याने गरीब व अर्धविकसित देशांची अवस्था कशी होते हे पुढील काही उदाहरणांवरून ध्यानात येऊ शकेल.

सिंधू नदीवर बांधलेल्या तरबेला धरणाच्या बांधकामात जागतिक बँकेच्या मदतीच्या आवरणाखाली, इटली, फ्रान्स, जर्मनी व स्वित्झर्लंड या देशांतील धरण बांधणाऱ्या कंपन्यांनी कोटचवधी रुपयांची कंत्राटे घेऊन पाकिस्तानची अर्थव्यवस्था तर परावलंबी केलीच, शिवाय या धरणांमुळे उत्पादनाचे दीर्घकालीन नुकसानही झाले.

श्रीलंका या देशाचा अनुभवही असाच आहे. वस्तुतः लंकेला लहान लहान एक हजार मातीच्या धरणांची गरज होती. परंतु मातीच्या अशा लहान धरणांत परदेशी कंपन्यांना काहीच लाभ नसल्याने जागतिक बँकेने या योजना अव्यवहार्य असल्याची लॉबी लंकेच्या सेनेटमध्ये तयार करविली, आणि परकीय प्रचंड कर्जे मंजूर करून त्या देशाला फारशी उपयुक्त न ठरणारी महाबेला बंदरावरील अजस्र धरण-योजना गळ्यात बांधली.

मध्य प्रदेशच्या होशिंगाबाद जिल्ह्यातील तावा धरण-योजनेचा अनुभवही

वेगळा नाही. या धरण-योजनेचे प्रचंड खर्चाचे काम सुरू होण्यापूर्वी तेथील शेत-जमिनीची जी उत्पादनक्षमता होती, ती धरणाचा पाणीपुरवठा सुरू झाल्यावर कमी झाल्याचे आढळून आले. जागतिक बँकेचे माजी अध्यक्ष श्री. रॉबर्ट मॅकनामारा यांनीही वरील परिस्थिती सत्य असल्याचा निर्वाळा दिलेला आहे.

रोजगार-निर्मिती-क्षमतेच्या दृष्टीनेही मोठ्या धरणांपेक्षा लहान धरण-योजनाच आपल्याला अधिक उपयुक्त आहेत. लहान धरण-योजनेखाली १० रुपये भांडवल गुंतवणूक केली तर त्यातून प्रत्यक्षपणे ५ मानवदिन रोजगाराची व अप्रत्यक्षपणे २.४ मानवदिन रोजगाराची निर्मिती होते. मोठ्या धरण-योजनेत तेवढीच गुंतवणूक केली तर १ मानवदिन एवढ्या रोजगाराची प्रत्यक्ष-पणे व ३ मानवदिन रोजगाराची अप्रत्यक्षपणे निर्मिती होते असे प्रमाण पडते.

खतांचा प्रश्न

पाणीपुरवठ्यानंतर शेतीच्या दृष्टीने दुसरा महत्त्वाचा प्रश्न खतांचा. शेतमालाचे उत्पादन वाढविण्यासाठी आणि जमिनीचा कस टिकविण्यासाठी खतांची गरज असते. दीनदयाळजींच्या मते खतांचा वापर आवश्यक असला तरी, जमिनीचे नीट परीक्षण करून उत्पादनाची पद्धती, पिकाचे स्वरूप, पाणी-पुरवठ्याची साधने आदी गोष्टींचा विचार करूनच उपयुक्त खतांचा योग्य त्या प्रमाणात वापर करावयास हवा. आपल्या देशात अलीकडे कृत्रिम रासायनिक खतांचा वापर खूप मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. रासायनिक खतांमुळे काही वर्षांनंतर जमिनीचा कस कमी होतो म्हणून ही खते मर्यादित प्रमाणात आणि शेतासारख्या सेंद्रिय खताबरोबर मिसळून वापरली पाहिजेत. आपल्या देशात सुमारे ८ लाख टन शेण उत्पादन होते असा अंदाज आहे. यापैकी किमान निम्मे शेण गोवऱ्या बनवून जळणाच्या कामी वापरले जाते. शेणाचा जळणासाठी होणारा वापर बंद करून गोबर-गॅस प्लँट बसवून जळण आणि खत असा त्याचा दुहेरी उपयोग केला पाहिजे. त्यामुळे लक्षावधी खेड्यांचा इंधनाचा प्रश्न सुटण्यास मदत होईल, आणि रासायनिक खतांमुळे होणारी जमिनीची धूपही थांबेल. आपल्या देशाच्या परिस्थितीचा विचार करता हाच मार्ग योग्य आहे, असे दीनदयाळजी आग्रहपूर्वक सांगत असत.

रासायनिक खतांचे जमिनीच्या कसावर होणारे दुष्परिणाम हळूहळू सर्वत्र प्रत्ययाला येऊ लागले आहेत. रासायनिक खते व मोठ्या धरणांमुळे

मिळणारे मुबलक पाणी यांच्या अनिर्बंध वापरामुळे खुद्द अमेरिकेत लक्षावधी हेक्टर जमीन पडीक होत चालली आहे. आपल्याकडेही पंजाब, आंध्र या प्रांतांना आणि महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापूर आदी जिल्ह्यांना हा प्रश्न भेडसावू लागला आहे.

शेती व पशुधन

शेणखताचा प्रश्न पशुधनाशी निगडित आहे. त्याचप्रमाणे 'नांगर की ट्रॅक्टर' हा प्रश्नही पशुधनाशी निगडित आहे. आपल्या देशाची विशेष सांस्कृतिक परंपरा व शेती-पद्धती यांचा विचार करून गोवंश-रक्षा व नांगर यांना दीनदयाळजींनी प्राधान्य दिले आहे. या प्रश्नाविषयीचे त्यांचे प्रतिपादन थोडक्यात असे : " आपल्या देशातील शेते आकाराने अतिशय लहान आहेत, त्यामुळे यांत्रिकी पद्धतीने म्हणजेच ट्रॅक्टरने नांगरणी करणे जमणार नाही. शिवाय ट्रॅक्टरचा वापर सुरू केला तर बैल निरुपयोगी ठरतील व मग देशात नैसर्गिक खताची तसेच जळणाची समस्या निर्माण होईल.

सध्या आपल्या देशात शेतीसाठी दर हेक्टरी छत्तीस शतांश अश्वशक्ती ऊर्जेचा वापर होतो. यांत यंत्रशक्ती, मनुष्यशक्ती, पशुशक्ती आदींचा समावेश आहे. या पैकी ५०.८ टक्के ऊर्जाशक्ती बैल व अन्य जनावरांपासून उपलब्ध होते. यावरून (शेण) खत व (गोबर गॅस) इंधन पुरवठ्याप्रमाणेच ऊर्जाशक्तीच्या दृष्टीनेही आपल्या देशातील शेती-उद्योगामध्ये पशुधनाचा वाटा केवढा मोठा आहे हे स्पष्ट होईल. "

भूस्वामी कृषी

आपल्या देशातील लोकशाहीचे संवर्धन, देशातील वाढत्या बेकारीचे निराकरण करण्याची आवश्यकता, शेतीचे दर एकरी उत्पादन वाढविण्याची गरज, भारतीय शेतकऱ्याला जमिनीविषयी वाटत असलेले प्रेम आणि आपली जीवनमूल्ये आदी गोष्टींचा विचार करता सहकारी शेती नव्हे, तर भूस्वामी कृषी-पद्धत उपयुक्त आहे, असे दीनदयाळजींचे ठाम मत होते. सहकारी शेतीचा दुराग्रह धरण्याऐवजी सेवा-सहकारी-संस्थांना (Service co-operative societies) उत्तेजन देऊन, शेतकऱ्यांना लहान यंत्रसामुग्री, बी–बियाणे, स्प्रे–पंप, चांगली जनावरे, अत्यल्प व्याजाने कर्ज, आदी गोष्टी पुरविल्या, तसेच त्यांनी उत्पादन केलेला माल योग्य भावाने विकला जाण्याची व्यवस्था केली, (सहकारी खरेदी-

विक्री-संघ) तर ते शेती विकासाच्या दृष्टीने आधिक फलदायी ठरेल, असे त्यांचे म्हणणे होते. यांपैकी सहकारी शेतीची कल्पना शासनाने केव्हाच सोडून दिली; आणि सेवा-सहकारी-संस्थांची कल्पना विलक्षण लोकप्रिय (आणि राजमान्यही) होऊ लागली आहे.

पंडित दीनदयाळजी जिचा एवढ्या आग्रहाने पुरस्कार करीत होते ती भूस्वामी कृषीपद्धत म्हणजे नेमके काय आहे ? भूस्वामी कृषीपद्धत म्हणजे ज्या पद्धतीमध्ये जमीन कसणारा शेतकरी हाच त्या जमिनीचा स्वामी म्हणजेच मालक असतो अशी व्यवस्था. आपल्या येथील शेतीच्या व्यवस्थेत निरनिराळ्या ऐतिहासिक कारणांमुळे अनेक मध्यस्थांचा समावेश होत गेला आहे. या मध्यस्थांपैकी जमीनदार व जहागिरदार आता समाप्त झाले आहेत. परंतु रयतवारी पद्धत अजूनही काही ठिकाणी आहे. ते आपली जमीन स्वतः न कसता ती दुसऱ्याला खंडाने देतात आणि शेतकऱ्याच्या उत्पन्नातील निम्या वाटचापासून सहाव्या वाटचापर्यंतचा भाग घेतात.

आपल्या येथे जमीन व शेतकरी यांचा संबंध मायलेकरासारखा असतो. आपल्याला जमिनीवरून काढून टाकले जाणार नाही अशी खात्री शेतकऱ्याला असावयास हवी. अशी खात्री असली तरच तो शेतजमिनीत सुधारणा करील व जास्तीत जास्त परिश्रम करून अधिकाधिक पीक काढील.

आपल्या देशात शेती-विकासासाठी भूस्वामी कृषी पद्धतच सर्व दृष्टींनी उपयुक्त आहे हा दीनदयाळजींचा विचार म्हणजे एखादा भावुक विचार नसून आर्थिक दृष्टीनेही यथार्थवादी (pragmatic) आहे. या संदर्भात 'जमिनीचे वाटप' व 'कसेल त्याची जमीन' यासंबंधी त्यांची भूमिका पहाण्यासारखी आहे. जमिनीच्या वाटपासंबंधी ते म्हणतात –

जमिनीचे वाटप

"सामाजिक न्यायाच्या स्थापनेसाठी एका शेतकऱ्याकडे असणाऱ्या जमिनीवरील मर्यादा (कमाल जमीनधारणा) निश्चित करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. एकदा अशी मर्यादा निश्चित केल्यानंतर त्या मर्यादेपेक्षा अधिक असलेली जमीन त्या शेतकऱ्यांकडून काढून घेता येईल. परंतु आज या भूमिहीन शेतकऱ्यांपैकी बहुसंख्य शेतकरी हरिजन असल्यामुळे जमीन-वाटपाच्या या प्रश्नाला आर्थिक बाजूबरोबरच सामाजिक व राजकीय परिमितीही प्राप्त झाली

आहे. त्यामुळे भूमिहीनांना जमीन देणे हा एक अत्यंत विवाद्य विषय होऊन बसला आहे.

जमिनीच्या वाटपासंबंधी ज्या काही निरनिराळ्या कल्पना आहेत त्या सर्व कल्पना आपल्याला आपली अर्थव्यवस्था स्थिर (static) ठेवावयाची आहे या मूलभूत धारणेवर आधारलेल्या आहेत. आपण आपली अर्थव्यवस्था गतिशील (dynamic) केली, आणि समाजातील सर्व वर्गांना जर त्यांच्या उपजीविकेसाठी विविध साधने उपलब्ध करून दिली तर समाजामध्ये जमिनीच्या मालकीसंबंधी एवढी भूक निश्चितच रहाणार नाही. यानंतर सामाजिक सुरक्षिततेच्या सबलतीच्या सहाय्याने आपण जर सामाजिक समता प्रस्थापित केली आणि शेतमजुराला योग्य ती मजुरी देण्याची व्यवस्था केली तर मग प्रत्येकाजवळ स्वतःच्या मालकीची काहीना काही जमीन असलीच पाहिजे असे नाही.

या दृष्टीने जमिनीचे वाटप करताना ज्यांच्याजवळ लहान-लहान शेते असल्याने त्यांच्या निर्वाहाला लागणारा खर्च त्या जमिनीतील उत्पादनातून निघत नाही अशा शेतकऱ्यांना, ज्यांच्यापाशी अजिबात जमीन नाही अशा भूमिहीन शेतकऱ्यांपेक्षा, अग्रहक्क देण्यात यावा. असे केले नाही तर भारतीय शेतीला शापरूप असलेली अधिकाधिक शेते निर्माण होतील.

कसेल त्याची जमीन

'कसेल त्याची जमीन' – या तत्त्वाचे विश्लेषण करताना ते म्हणतात –

"कसेल त्याची जमीन याचा अर्थ असा करता येणार नाही की जो नांगराची मूठ धरेल तोच जमिनीचा मालक बनेल, आणि शेतकऱ्याला त्याच्या स्वतःच्या श्रमाव्यतिरिक्त इतरांच्या श्रमाचा थोडासाही उपयोग करून घेता येणार नाही. प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या आवश्यकतेनुसार मजूर ठेवण्याचा व त्यांच्याकडून काम करून घेण्याचा अधिकार असला पाहिजे. 'जमीन कसणारा' याचा अर्थ सामान्यपणे पुढीलप्रमाणे असू शकेल. शेतीत होणाऱ्या फायद्यातोट्याची जवाबदारी स्वीकारून शेतीत भांडवल गुंतविणारा आणि शेतीची व्यवस्था पहाणारा मनुष्य शेतीच्या निरनिराळ्या कामांपैकी तो स्वतः किती करतो आणि किती कामे मजुरी देऊन इतरांकडून करवून घेतो या गोष्टीला फार महत्त्व देणे योग्य होणार नाही.

शेतमालाचे भाव

शेतकरी हा केवळ अन्नधान्याचा व कच्च्या मालाचा उत्पादक नसून उद्योगधंद्यांत तयार होणाऱ्या मालाचा फार मोठा ग्राहकही असल्यामुळे, शेतकऱ्याला त्याच्या शेतमालाचा रास्त भाव मिळालाच पाहिजे, तसेच औद्योगिक मालाच्या व कृषी मालाच्या किंमतीत समतोल असला पाहिजे या मुद्यावर दीनदयाळजींचा विशेष भर होता. आपल्या 'Two plans : Promises, Performance and Prospects' या पुस्तकात ते म्हणतात –"Lack of parity between the prices of agricultural commodities and manufactured goods has imposed heavy sacrifices on the part of primary producers and labourers."

या गरीब शेतकऱ्यांना व शेतमजुरांना लुबाडण्यामध्ये उद्योगपती, व्यापारी शासनाची वित्त महामंडळे, कृषीमूल्य आयोग, अन्न महामंडळ आदी सर्वजण सहभागी आहेत.

ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्याचा खाजगी व सहकारी साखर कारखान्याविषयीचा, तसेच कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्याचा 'कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया' वा इतर 'मार्केटिंग फेडरेशन्स' विषयीचा या बाबतीतला अनुभव असाच आहे. ऊस व साखर, भुईभूग व त्याचे तेल, कापूस आणि तयार कापड यांच्या किंमतींतील प्रचंड तफावत 'आपल्या देशाचे औद्योगीकरण शेतकऱ्याचा बळी देऊनच झालेले आहे' या दीनदयाळजींच्या विधानाला पुष्टी देणारीच आहे.

आपल्या संसदेच्या ज्या विविध समित्या आहेत, त्यांमध्ये 'पब्लिक अंडरटेकिंग कमिटी' ही एक फार महत्त्वाची समिती समजली जाते. केंद्र-सरकारच्या अखत्यारीत असलेल्या विविध उद्योगांच्या पहाणीचे ताळेबंदीचे अहवाल या समितीपुढे येत असतात. ही समिती या सरकारी प्रकल्पांवर देखरेखही करीत असते. १९७८ साली या समितीचे अध्यक्ष खासदार ज्योतिर्मय बसू हे होते. त्यानी अत्यंत परिश्रमपूर्वक सरकारी क्षेत्रातील काही उद्योगांचे अहवाल तयार केले आहेत. त्यांतील एक अहवाल देशातील एका मोठ्या उद्योगासंबंधीचा म्हणजे ताग पिकविणाऱ्या शेतकऱ्यासंबंधीचा आहे. (तागाच्या उत्पादनात सुमारे ४० लाख छोटे शेतकरी गुंतलेले आहेत.) विशेषत: केंद्र-सरकारने स्थापन केलेल्या 'ज्यूट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया'च्या कामासंबंधीचा हा अहवाल आहे. खासदार बसू अत्यंत उद्वेगाने लिहितात– "लहान व गरीब असंघटित ताग-उत्पादकांना मध्यस्थ दलाल व व्यापारी यांच्या तावडीतून

सोडविण्याचा ज्यूट कॉर्पोरेशनचा उद्घोषित सरकारी हेतू केवळ कागदावरच राहिला आहे !"

खरेच, सारे काही कागदावरच आहे ! अशा परिस्थितीत टॉलस्टॉय यांनी सांगितलेल्या एका विदारक कथेची आठवण होते. एका गरीब, गांजलेल्या, ग्रामीण माणसाच्या पाठीवर एक सधन, शिक्षित आणि हाती अधिकार असलेला शहरी माणूस बसलेला असतो. पाठीवर बसून उंच डोंगर चढत असताना तो शहरी माणूस त्या ग्रामीण माणसाला मानभावीपणाने म्हणतो –"I want to relieve you of your burdens, trials and tribulations by doing any thing except by lifting myself from your back !"

सारांश

अर्थशास्त्रज्ञ प्रा. मायकेल लिप्टन यांनी १९८२ मध्ये प्रदीर्घ संशोधनांती प्रसिद्ध केलेले एक अर्थशास्त्रीय पुस्तक या बाबत सर्व जगाला विचार करावयास लावणारे आहे. पुस्तकाचे नाव आहे – 'Why poor people stay poor – A study of urban bias in world development' या पुस्तकात जगातील विविध राष्ट्रांचे आर्थिक विकासाचे प्रश्न, त्या प्रश्नांच्या सोडवणुकीचे झालेले प्रयत्न व तदनुषंगिक पाश्चात्य अर्थशास्त्रीय संकल्पना यांचा सविस्तर आढावा घेण्यात आलेला आहे. प्रा. मायकेल लिप्टन निष्कर्षरूपाने या पुस्तकात म्हणतात, "अप्रगत व अविकसित राष्ट्रांनी शेतीचा कोंडमारा करून झटपट औद्योगीकरणाच्या मागे लागू नये. गरीब राष्ट्रांनी तर प्रथम शेती-विकासच साधला पाहिजे. त्यातूनच त्यांचे दारिद्र्य निवारणाचे प्रश्न मार्गी लागू शकतील, होणारे औद्योगीकरण मजबूत पायावर उभे राहू शकेल आणि आर्थिक विकास संतुलित पद्धतीने होऊ शकेल. पाश्चात्य अर्थतज्ञांचे विचार अपूर्ण व एकांगी असल्याने भांडवलशाही व साम्यवादी या दोन्ही विचारप्रणालींतील राष्ट्रांनी शेतकऱ्यांची घोर उपेक्षा व गळचेपी केली. त्यामुळे अशा राष्ट्रांतून झालेले औद्योगीकरण मानवतेचा, गरीब शेतकऱ्यांचा आणि श्रमशक्ती हेच भांडवल असलेल्या मजूरवर्गाचा अनादर व अवहेलना करूनच साकार झालेले आहे. आर्थिक विकासाचा हा कदापि आदर्श होऊ शकणार नाही."

पं. दीनदयाळजींनीही आपल्या अर्थचिंतनातून यापूर्वीच ही दिशा दाखविलेली आहे.

• • •

४

औद्योगीकरणाची दिशा

शेतीनंतर आपल्याला उद्योगधंद्यांचा विचार करावा लागेल. औद्योगीकरण केल्याशिवाय उपजीविकेसाठी संपूर्णपणे शेतीवरच अवलंबून असलेल्या लोकांचे प्रमाण आपल्याला कमी करता येणार नाही. तथापी शेतीवर वाजवीपेक्षा जास्त असलेला भार कमी करण्यासाठीच केवळ नव्हे तर, शेतीचा योग्य विकास व्हावा यासाठी देखील औद्योगिकरणाची नितांत आवश्यकता आहे. आपल्या खेड्यांत काही दिवस असे असतात की, जेव्हा कोणीही बेकार असत नाही ; उलट काम करणाऱ्यांचीच कमतरता असते. परंतु उरलेल्या दिवसांत मात्र लोकांना खूपच कमी काम असते. आपण उद्योगधंद्यासाठी खेड्यांतील धडधाकट लोकांना कायमचे दुसरीकडे हलविले तर, शेतीची पूर्ण आबाळ होऊन देशाची अर्थव्यवस्था कोलमडून पडेल. आपल्याला खेड्यांतील लोकांना त्यांच्या परिसरातच छोटे उद्योगधंदे उभे करून पूर्ण वेळ काम देता येईल, आणि शेतीकडेही पूर्ण लक्ष दिले जाईल.

या शिवाय वाढत्या लोकसंख्येच्या उपभोग्य वस्तूंच्या गरजा भागविण्यासाठीही औद्योगीकरणाची गरज आहे. आतापर्यंत आपला भर प्रामुख्याने कच्च्या मालाच्या उत्पादनावर होता. पक्क्या मालासाठीं आपण अन्य देशांवर अवलंबून राहिलो. या दृष्टीने स्वावलंबी होण्यासाठीही औद्योगीकरणाची निकड आहे.

औद्योगीकरणाचा विचार करताना मोठे उद्योग व छोटे उद्योग, त्यांचे प्रमाण, त्यांची कार्यक्षेत्रे, त्यांचे परस्पर संबंध, त्यांचे गुणदोष, आदी अनेक

प्रश्न उपस्थित होतात. विकसनशील देशांच्या संमिश्र अर्थव्यवस्थेमध्ये या दोन्ही प्रकारच्या उद्योगांना स्थान असले तरी, मुख्य भर छोटच्या उद्योगांवर असला पाहिजे असे दीनदयाळजींचे ठाम मत होते.

आपल्या देशाची जीवनमूल्ये, परंपरा व परिस्थिती ध्यानात घेता मोठे उद्योगधंदे कसे सोयीचे नाहीत याची दीनदयाळजींनी नमूद केलेली काही प्रमुख कारणे अभ्यसनीय आहेत.

१) मोठच्या उद्योगधंद्यांची स्थापना करणे म्हणजे आपल्या देशात आधीपासून असलेल्या छोटच्या उद्योगांचे उच्चाटन करणे होय.

२) आपल्या येथे बेकारीची समस्या फार मोठी आहे. यंत्रप्रधान मोठे उद्योग-धंदे देशातील प्रत्येक माणसाला काम देऊ शकणार नाहीत. उलट अशा धंद्यांमुळे बेकारीत वाढ होईल.

३) मोठे उद्योगधंदे आयातीवर अधिक अवलंबून असतात.

४) मोठच्या उद्योगधंद्यांमुळे त्यांत काम करणारा मजूर त्याच्या गावापासून, कुटुंबापासून अलग होतो. जमातीपासून अलग होतो. मानवी मूल्यांपासून दूर असलेल्या वातावरणात मजूर हा केवळ मजूरच राहतो. केवळ पैसा मिळविणे या व्यतिरिक्त अन्य सर्व मूल्यांचा नाश झाल्याने त्याच्या व्यक्तित्वाचा विकास होऊ शकत नाही.

५) छोटच्या उद्योगधंद्यांच्या तुलनेने मोठच्या उद्योगांत गुंतवलेल्या भांडवलाचा गुणक-प्रभाव खूपच कमी असतो.

६) मोठच्या उद्योगांशी शेतीचा प्रत्यक्ष व निकटचा संबंध प्रत्यापित करणे कठीण असते. त्यामुळे या दोन प्रमुख उद्योगांमध्ये अनेक प्रकारचे मध्यस्थ (दलाल) निर्माण होतात.

७) आपल्या देशातील शेती श्रमप्रधान आहे. त्यामुळे शेतीच्या निरनिराळच्या कामांसाठी फार मोठच्या प्रमाणावर मजुरांची वेळोवेळी गरज पडते. खेडचातील शेतमजूर उद्योगधंद्यांसाठी आपले गाव सोडून शहरात आले म्हणजे शेतीची आबाळ होते.

८) औद्योगिक केंद्रीकरणामुळे वाहतुकीवर अतिशय ताण पडतो ; आणि उत्पादन-खर्चात या खर्चाचीही भर पडल्यामुळे कच्च्या व पक्क्या मालांच्या किंमतीमधील असमतोल अधिक वाढतो. वस्तूंचे भाव वाढतात.

९) मोठमोठ्या उद्योगधंद्यांच्या संचालनासाठी अपरिहार्य मानल्या गेलेल्या मजूर-संघटनांमुळे आणि तद्विषयक कायद्यांमुळे आपल्या येथे मजुरीचे दर वाढले आहेत. व मजूर काही प्रमाणात बेजबाबदार झाले आहेत मजुरीचे दर वाढविण्याचे औचित्य एक वेळ मान्य होऊ शकेल ; परंतु देशाच्या उत्पादनात वाढ होण्याच्या आधीच मजुरीचे दर वाढविले तर त्याचा भार कारखानदारांपेक्षा सर्वसामान्य ग्राहकांवरच पडतो.

औद्योगिक उत्पादनाचे पैलू

औद्योगिक उत्पादन हे मुख्यतः दोन प्रकारच्या वस्तूंचे होत असते.

१) उपभोग्य वस्तू, आणि २) उत्पादक वस्तू. ज्या वस्तूंचा आपण प्रत्यक्ष उपभोग घेत असतो, अशा वस्तूंना उपभोग्य वस्तू म्हणतात. आणि ज्या वस्तूंचा उपयोग उपभोग्य वा चैनीच्या वस्तू निर्माण करण्यासाठी करण्यात येतो अशा वस्तूंना उत्पादक वस्तू म्हणतात. उदा., कापड ही उपभोग्य वस्तू आहे, तर कापड तयार करणारे यंत्र ही उत्पादक वस्तू आहे. एखाद्या अर्थव्यवस्थेत जर आवश्यक उपभोग्य वस्तूंच्या निर्मितीसाठी आवश्यकतेपेक्षा अधिक उत्पादक वस्तूंची निर्मिती करावी लागत असेल, तसेच नियोजनाच्या चुकीच्या दिशेमुळे वा चुकीच्या अंमलबजावणीमुळे धनसत्तेचे केंद्रीकरण होऊन उत्पादक वस्तू वा चैनीच्या वस्तू यांचे उत्पादन अधिक होत असेल तर ती अर्थव्यवस्था हितकर नाही. तिला स्थैर्यही लाभू शकणार नाही. तसेच ज्या अर्थव्यवस्थेत दुर्बल घटकांची क्रयशक्ती वाढविण्याला प्राधान्य नसेल, त्या अर्थव्यवस्थेत असमतोल निर्माण होईल व तेथे समृद्धीचा केवळ आभासच असेल. म्हणून खऱ्या अर्थाने अर्थव्यवस्थेत गतिमानता व विकसनशीलता आणावयाची असेल तर देशातल्या गरीब जनतेची क्रयशक्ती वाढवीत नेली पाहिजे. उत्पादक वस्तूंच्या उत्पादनाचे नियमन अशा प्रकारे केले पाहिजे की, जीवनावश्यक उपभोग्य वस्तूंचे उत्पादन वेगाने व सातत्याने वाढत राहील. त्याचबरोबर शेतकऱ्याला त्याच्या शेतमालाची रास्त किंमत देऊन त्याची क्रयशक्ती वाढविली पाहिजे आणि ग्रामीण भागात लहानलहान उद्योगधंदे वाढवून ग्रामीण भागात पैसा खेळता ठेवला पाहिजे. दीनदयाळजी म्हणतात," ही वाढलेली क्रयशक्ती गुणक-प्रभावाने अनेक उद्योगधंद्यांना व साऱ्या अर्थव्यवस्थेला गतिमान करील." दीनदयाळजींचे प्रतिपादन असे होते की, यातूनच देशाचे राष्ट्रीय उत्पन्न व राष्ट्रीय उत्पादन या दोहोंमध्ये वाढ होऊन संपूर्ण अर्थव्यवस्था आत्मनिर्भर व गतिमान होईल.

आपल्या सरकारचा सारा भार राष्ट्रीय उत्पादन वाढविण्यावर होता. पण लवकरच असे लक्षात आले की, राष्ट्रीय उत्पादन वाढवूनही जनतेचे दारिद्र्यही झपाट्याने वाढते आहे. अविकसित देशांत उत्पादक वस्तूंचे तसेच श्रीमंत वर्गाच्या चैनीच्या वस्तूंचे कारखाने भरमसाठ वाढत असल्याने राष्ट्रीय उत्पादन वाढत असल्याचे दिसते, पण दुसऱ्या बाजूला सर्वसामान्य जनतेचे दारिद्र्य वाढत आहे आणि त्यामुळे त्यांची क्रयशक्तीही घसरत आहे. आपल्या देशातील मोटर-कार उद्योगाच्या उदाहरणावरून हा मुद्दा स्पष्ट होऊ शकेल. सध्या आपल्या येथे स्टँडर्ड, फियाट आणि अँबेसडर या तीन प्रकारच्या मोटारगाडचा बनविणारे कारखाने आहेत. त्यांची स्थिती आज अशी आहे की, त्यांच्या उत्पादनक्षमतेपैकी केवळ वीस टक्के उत्पादनक्षमता प्रत्यक्ष उपयोगात येते. अशा परिस्थितीत, सरकारी तिजोरीतील आठशे कोटी रुपये ओतून, बंद पडलेला मारुती कारखाना सुरू करण्यात आला आहे. या कारखान्यात तयार होणाऱ्या मोटारींमुळे राष्ट्रीय उत्पादनात अर्थातच वाढ होईल. परंतु ही उत्पादनवाढ जनतेचे दारिद्र्य कमी करू शकणार नाही. चुकीच्या नियोजनामुळे राष्ट्रीय उत्पादन वाढूनही देशातील दारिद्र्य वाढत आहे ही वस्तुस्थिती नियोजन-मंडळाच्या पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात नमूद करण्यात आली आहे. परंतु त्याची दखल घेण्यात आली नाही. तसेच उत्पादनासंबंधीच्या पाश्चात्यांच्या कल्पना बाजूला सारून ग्रामीण उद्योगधंदे, श्रमप्रधान उत्पादनपद्धती व विकेंद्रित उद्योगरचना यांचा पाठपुरावा करावा लागेल, हेही स्पष्ट झाले होते. पण हे घडू शकले नाही.

१९६१ च्या जुलै महिन्यात एका परिसंवादात बोलताना प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ आणि नियोजन-मंडळाचे माजी उपाध्यक्ष डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी हाच विचार मांडलेला आढळतो. ते म्हणतात, "धंद्यांचे विकेंद्रीकरण केले पाहिजे; ते विखुरले पाहिजेत. उपभोग्य मालाचे कारखाने विकेंद्रित पद्धतीने ग्रामीण भागात उभारले पाहिजेत. उपभोग्य मालाचे उत्पादन करणाऱ्या धंद्यांना लागणारी यंत्रे निर्माण करणारे कारखाने अधिक न वाढविता ग्रामीण धंद्यांतच आधुनिक यंत्र व तंत्र वापरून त्यांच्यामार्फत उपभोग्य मालाची अधिकांश गरज भागवावी..... चैनीच्या वस्तूंची निर्मिती अत्यंत मर्यादित राहील, याची खास काळजी घेतली पाहिजे."

नियोजनाची क्रमवारी चुकत गेल्याने व उपभोग्य वस्तूंचे उत्पादन मागे

पडून उत्पादक वस्तूंच्या उत्पादनाला अग्रक्रम मिळाल्याने, तसेच चैनीच्या वस्तूंच्या निर्मितीवर नियंत्रण न ठेवल्याने आपल्या येथे उत्पादनक्षमतेचा गैरवापर झाला. चलनस्फितीमुळे खऱ्या कृषि औद्योगिक उत्पादनात उद्योजकांना रस राहिला नाही. सटोडिये, मध्यस्थ दलाल, स्मगलर यांचीच चलती झाली. याची अनेक उदाहरणे देता येतील. ऊस पिकविणाऱ्या लाखो शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचा योग्य भाव न देता कर्जबाजारी करून देशातील साखर-कारखानदारी उभी राहिली. या साखर-कारखानदारीतून निर्माण झालेली समृद्धी ग्रामीण उद्योगधंदे उभारण्यात खर्च करण्याऐवजी त्यातून देशी दारू, बिअर, व्हिस्की यांचेच उत्पादन भरमसाठ वाढले. १९६४ साली बिअरचे उत्पादन ५४ लाख लिटर होते. ते वाढत वाढत १९७४ पर्यंत जवळ जवळ चार कोटी लिटर्सपर्यंत जाऊन पोहोचले. दरम्यान लहान मुलांची दूध-भुकटी व त्यातून बनविलेली बेबी-फूड्स यांचे उत्पादन घसरले. त्यांचे भाव तिपटीने वाढले. याच काळात गोर-गरिबांच्या सुती कापडाचे उत्पादन नाममात्र वाढले. क्रयशक्तीच्या अभावी त्यांचे साठे पडून राहिले, तर टेरिलिन, टेरिवुल कापडाचे उत्पादन खूपच वाढले. धनसत्तेच्या विशिष्ट वर्गाच्या मक्तेदारीमुळे ते सतत वाढतच आहे. माल-वाहतुकीला लागणारे ट्रक्स व उतारू-वाहतुकीसाठी लागणाऱ्या एस्. टी. गाडया यांच्या तुलनेने जिप्स् व मोटारगाडया यांचे उत्पादन खूप वाढले. घरबांधणीसाठी आवश्यक असणाऱ्या विटा व सिमेंट यांच्या उत्पादनात लक्षणीय वाढ झाली नाही; पण श्रीमंत वर्गाला लागणारे कूलर्स व फ्रीझ सर्वत्र दिसू लागले. आजही देशातील जवळजवळ पन्नास टक्के जनता दारिद्र्यरेषेखाली जगत आहे. सुमारे तीन लाख खेडयांना बारमास पिण्याचे पाणी उपलब्ध नाही. परंतु कोला, रंगीत टिव्ही, व्हीडीओ सेट्स् यांच्या उत्पादनाला सरकारने भरपूर प्रोत्साहन दिले आहे.

औद्योगिक विकासाचे धोरण

औद्योगिक विकासाचे धोरण ठरविताना आपल्याला आपली व्यापक सामाजिक उद्दिष्टे ध्यानात घ्यावी लागतील. दीनदयाळजींच्या मते ही उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत. १) राष्ट्राची संरक्षणशक्ती वाढविणे. २) उपभोग्य आणि उत्पादक वस्तूंचे उत्पादन वाढविणे, ३) प्रत्येकाला निर्वाहक्षम रोजगार देणे, ४) जीवनाचे किमान राहणीमान सर्वांना प्राप्त करून देणे. ५) अर्थव्यवस्थेचे विकेंद्रीकरण करून आर्थिक विषमता कमी करणे.

अर्थात् औद्योगिक विकासाचे धोरण ठरवीत असताना आपण अगदी कोऱ्या पाटीवर लिहीत नाही, ही गोष्टही ध्यानात ठेवली पाहिजे. आपल्या देशात दोन प्रकारचे उद्योगधंदे आधीपासूनच चालू आहेत. एका बाजूला पूर्णपणे सुसंघटित व अद्यावत तंत्रविज्ञानाचा उपयोग करणारे थोडे उद्योगधंदे आहेत, तर दुसऱ्या बाजूला परंपरेने शतकानुशतके चालत आलेले विकसित, अर्धविकसित तसेच लहानलहान उद्योगधंदे व ग्रामोद्योग आहेत. नवीन यंत्रतंत्र आणताना त्यांचाही विचार व्हावयास हवा.

आपल्याला या परंपरागत उद्योगधंद्यांची मोडतोड करून चालणार नाही. या उद्योगधंद्यांत परिस्थितिमुळे निर्माण झालेले दोष व जाणवणाऱ्या उणीवा दूर करून, त्यांना आर्थिक दृष्टया सुदृढ बनविणे अधिक युक्त होईल. आपल्या येथील खेड्यांमधील छोटया छोटया उद्योगांच्या बाबतीत असे परिवर्तन अगदी शक्य आणि सुलभ आहे.

आपण उत्पादनाची एखादी नवीन पद्धती दाखल करतो, तेव्हा त्यांचा परिणाम जुन्या व्यवसायांवर व त्या व्यवसायांत काम करणाऱ्या कामगारांवर सुद्धा होत असतो. आपण सर्वस्वी नव्या आधुनिक यंत्रसामुग्रीवर भर दिला तर जुनी यंत्रसामुग्री बाजूला पडते व पर्यायाने त्यावर गुंतवलेले भांडवल अनुत्पादक होते. ही गोष्ट आपल्याला परवडणारी नाही. कारण आपल्या येथे भांडवलाची मुळातच टंचाई आहे. दुसरी गोष्ट म्हणजे या आधुनिक यंत्रसामुग्रीने सुसज्ज कारखाने चालविण्यासाठी केवळ यंत्रसामुग्रीच नव्हे तर अनेकदा कच्चा मालही परदेशांतून आयात करावा लागतो, आणि आपल्या देशातील कच्चा माल पडून राहतो. जुन्या कारखान्यांचे शोषण सुरू होऊन त्या कारखान्यांत गुंतविलेले भांडवल अनुत्पादक होते, आणि कारागीरही बेकार होतात.

या संदर्भात उदाहरण म्हणून हातमाग वा यंत्रमाग यांचे अर्थकारण पहाण्यासारखे आहे. या हातमागांशी व यंत्रमागांशी त्या त्या भागाचे अर्थकारण निगडित असते. परंतु या भागांना लागणारा सूत आदी कच्चा माल, नियमित व पुरेसा वीजपुरवठा आणि सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणजे आर्थिक पतपुरवठा आदी गोष्टी नियमितपणे उपलब्ध होत राहिल्या तर ग्रामीण भागातील हे उद्योग उत्तम प्रकारे चालू शकतील. परंतु आज प्रत्यक्षात घडते आहे ते असे की, शहरांतील मोठ्या कापड-गिरण्यांना कच्चा माल, वीज आणि भांडवल यांचा पुरवठा अग्रक्रम देऊन केला जातो, आणि यंत्रमाग व हातमाग या धंद्यांची

बेवारशी पोरासारखी हेळसांड होत असते. असाच प्रकार चर्मकारांच्या बाबतीतही घडतो. बाटा, फ्लेक्स यांनी यंत्रांच्या सहाय्याने पादत्राणे बनविण्यास सुरुवात केल्याने, आणि कोणत्याही नंबराचा तयार जोडा मिळू लागल्यामुळे पादत्राणे बनविणारा खेड्यातील छोटा कारागीर अक्षरशः देशोधडीला लागला आहे. पं. दीनदयाळजी म्हणतात –

"पाश्चात्य पद्धतीच्या अवजड व गुंतागुंतीच्या यंत्रप्रधान उत्पादन-प्रणालीमुळे उत्पादन फार मोठ्या प्रमाणावर (Mass Production) होऊ शकत असले तरी त्यामुळे देशातील संपूर्ण अर्थव्यवस्थेत कायम स्वरूपाचा आणि क्रांतिकारक परिवर्तन करणारा एखादा प्रवाह निर्माण होऊ शकणार नाही. त्यासाठी शेतजमिनीवरील सध्याचा भार कमी करू शकणाऱ्या आणि शेतीशी सुसंवादी होऊ शकणाऱ्या उद्योगधंद्यांची आपल्याला कायम स्वरूपाची व्यवस्था करावी लागेल. त्यासाठी मोठमोठ्या उद्योगधंद्यांऐवजी आपल्याला लहान उद्योगांना प्राधान्य द्यावे लागेल. आजच्या परिस्थितीत आपल्याला थोड्या कामगारांनी आणि छोट्या अवजारांनी चालणारे लहान उद्योग अधिक उपयुक्त ठरतील. यासाठी आपल्याला देशात चालू असलेल्या ग्रामोद्योगांना, लहान उद्योगांना व त्यांत काम करणाऱ्या कामगारांना आधारभूत मानून त्यांच्या विकासाची योग्य व्यवस्था करावी लागेल." (भारतीय अर्थनीती)

या संदर्भात गांधींच्या 'सर्वोदयी' व 'ग्रामोद्योगी' अर्थकारणाचा मागोवा घेणे उपयुक्त ठरेल. प्रत्येक व्यक्तीला काम मिळविण्याचा अधिकार आहे. त्याच्यावर बेकारी लादता येणार नाही. भांडवल व यंत्र या दोहोंपेक्षा श्रमिक हा अधिक महत्त्वाचा आहे असे महात्माजींचे आग्रही प्रतिपादन असे. आर्थिक विकासाचे सुपरिणाम समाजातील सर्व घटकांना अधिक समानतेने मिळाले पाहिजेत. ज्यामुळे सर्वांचा विकास होईल तीच सर्वोत्कृष्ट अर्थव्यवस्था होय असे त्यांचे मत होते. यालाच ते सर्वोदय म्हणत असत.

शेतीखालोखाल महात्माजी ग्रामोद्योगांना अग्रक्रम देत असत. मोठे कारखाने आणि शहरे वाढवून देशातील दारिद्र्य दूर होणार नाही व बेकारीही दूर होणार नाही, त्यासाठी देशभर श्रमप्रधान, विकेंद्रित ग्रामोद्योग सुरू केले पाहिजेत, असे त्यांचे ठाम मत होते. ते म्हणत असत की, अगदी उत्कृष्ट चालणाऱ्या मोठ्या गिरण्यांचे जाळे देशभर पसरलेत तरी त्यातून देशाच्या दारिद्र्यनिवारणाचा प्रश्न सुटणार नाही. या दृष्टीनेच त्यांनी कापड-निर्मितीचा

व चरख्याचा संबंध जुळवून दिला होता. देशात कोटचवधी लोक अर्धबेकार आहेत आणि आणखी कोटचवधी लोक सक्तीच्या बेकारीत खितपत पडले आहेत. कारण शेतीला पूरक असा जोडधंदा त्यांना मिळू शकत नाही. महात्मा गांधी म्हणत,"चरख्यापेक्षा चांगला पर्याय तुम्हांला सापडला तर तुम्ही चरखा जाळून टाका, पण लाखो ग्रामवासियांना त्यांच्या घरांतून, गावांतून न हलविता, त्यांच्या छोटचाशा जमिनीपासून त्यांची ताटातूट न करता त्यांना निर्वाहक्षम रोजगार चरखाच पुरवू शकतो."

महात्माजींच्या वरील विचारांशी पं. दीनदयाळजींचे विचार बऱ्याच अंशी जुळणारे आहेत. तथापि ग्रामोद्योगांच्या बाबतीत दीनदयाळजी यंत्राचे एकांतिक विरोधक नव्हते. ज्या यंत्रांमुळे बेकारी निर्माण होणार असेल व वाढणार असेल, अशाच यंत्रांना त्यांचा विरोध होता. ऑईल इंजिन, विजेवरील मोटर्स, यांसारख्या गोष्टींनाही महात्माजींच्या ग्रामोद्योगात अजिबात स्थान नव्हते. दीनदयाळजी यंत्रांचे असे एकांतिक विरोधक नव्हते. उदाहरणार्थ, खेडचांतील चर्मकारांना चामडे कापण्यासाठी व शिवण्यासाठी आधुनिक काच्या, यंत्रे देण्यास त्यांचा विरोध नव्हता. उलट हे साहित्य त्यांना मिळाले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. त्यांचा विरोध होता तो, हा ग्रामोद्योग मारून टाकणाऱ्या बाटा कंपनीसारख्या कंपन्यांना उत्तेजन देण्याला. श्रमप्रधान उत्पादन-पद्धती म्हणजे यंत्रांवर संपूर्ण बहिष्कार अशी दीनदयाळजींची धारणा नसून ' आधुनिक लघुयंत्राधिष्ठित उत्पादनपद्धती ' अशी होती.

या दृष्टीने पाहाता दीनदयाळजींचे या प्रश्नासंबंधीचे विचार डॉ. राम मनोहर लोहिया यांच्या विचारांशी जुळणारे आहेत. " विकसनशील देशांना आर्थिक विकासासाठी लघु यंत्राधिष्ठित आधुनिक तंत्रच अधिक उपयुक्त आहे. " असे त्यांचे मत होते. आपले हे मत पंचमढी येथे १९६३ साली भरलेल्या सोशालिस्ट पार्टीच्या अधिवेशनात त्यांनी मांडलेही होते.

१९५१ साली डॉ. लोहिया अमेरिकेला गेले असता त्यांनी डॉ. आइन्स्टिन यांची भेट घेतली. या भेटीत वरील प्रश्नांवर दोघांची चर्चा झाली. डॉ. लोहिया यांनी या भेटीबाबत असे म्हटले आहे की, " जगातील त्या श्रेष्ठ शास्त्रज्ञालादेखील लघुयंत्राधिष्ठित औद्योगिक विकेंद्रीकरणाच्या नव्या उत्पादन-पद्धतीची कल्पना स्वीकारार्ह वाटली. इतकेच नव्हे तर, अशा श्रमप्रधान अल्प-प्रमाण यंत्रावर आधारित, समुचित यंत्रज्ञानावर विकसित झालेल्या नव्या

औद्योगीकरणाची संभाव्यताही त्यांनी मान्य केली. डॉ. आइन्स्टिन यांनी पुढे असेही मत व्यक्त केले की, जगातील दोन तृतीयांश दारिद्र्यपीडित लोकांना तर हा मार्ग संजीवनी देणारा ठरेलच, परंतु समृद्ध पाश्चात्य जगालाही दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करू शकेल."

श्रमप्रधान उत्पादन-पद्धती

आपल्या देशात उपलब्ध असलेल्या साधन-सामुग्रीचा विचार केला तर असा निष्कर्ष निघतो की आपली उत्पादन-पद्धती श्रमप्रधान असावयास हवी. आपल्या येथे श्रमशक्ती भरपूर आहे. त्या मानाने भांडवलाची खूप कमतरता आहे. जे काही तुटपुंजे भांडवल आपण जमवितो त्याचा विनियोग आपण स्थिर भांडवलासाठी म्हणजे यंत्रसामुग्री विकत घेण्यासाठी करतो. तेव्हा ते भांडवल यंत्रसामुग्रीच्या किमतीच्या रूपाने परदेशांत जाते. पाश्चात्य पद्धतीच्या उत्पादन-तंत्राचे वैशिष्टच असे की त्याला भांडवल खूप लागते. त्यामानाने उपलब्ध होणारा रोजगार फार कमी असतो. त्यामुळे गुणक प्रभावाने लोकांची क्रयशक्ती वाढावयास पाहिजे तेवढचा प्रमाणात ती वाढत नाही. म्हणजे एकूण औद्योगीकरणाचा पायाच ठिसूळ रहातो. शेतीशी सुसंवादी होऊ शकणाऱ्या आणि शेतजमिनीवरील भार कमी करू शकणाऱ्या उद्योगधंद्यांची आपल्याला कायम स्वरूपात व्यवस्था करावयाची असेल तर त्यासाठी अवजड यंत्रसामुग्रीच्या सहाय्याने चालणाऱ्या मोठ्या उद्योगांऐवजी दीनदयाळजी म्हणतात, त्याप्रमाणे लहान उद्योगधंद्यांनाच प्राधान्य द्यावे लागेल. आजच्या परिस्थितीत आपल्याला थोडचा भांडवलाने सुरू होऊ शकणारे व साध्यासुध्या अवजारांनी चालणारे लहान कुटिर-उद्योगच उपयुक्त ठरू शकतील.

त्यामुळे, स्वाभाविकपणेच यंत्रांमध्ये भांडवल-गुंतवणूक करताना ती विचारपूर्वक करावी लागेल. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर यंत्राची निवड आपल्याला अत्यंत काळजीपूर्वक करावी लागेल. सद्य:स्थितीत आपल्याला लहान, सोपी आणि काही प्रमाणात स्वयंचलित असलेली यंत्रेच अधिक उपयोगी ठरतील. अवघड, अद्यावत परदेशी यंत्रसामुग्री महाग तर पडतेच, परंतु ती विकत घेतल्यानंतर (कच्च्या मालाबरोबरच) सुटचा भागांसाठी तसेच तंत्र-ज्ञानासाठीही अन्य देशांवर अवलंबून रहावे लागते. म्हणजे अशा यंत्रसामुग्रीच्या नुसत्या खरेदीसाठीच नव्हे तर, 'मेंटेनन्स' साठीही सतत परकीय चलन खर्च करावे लागते.

आपल्यापाशी उत्पादनाच्या विविध घटकांपैकी भांडवल हा घटक दुर्मिळ आहे. म्हणून आपल्या अर्थव्यवस्थेतील प्रत्येक व्यवसायात या दुर्मिळ घटकाची म्हणजेच भांडवल म्हणून गुंतविलेल्या प्रत्येक रुपयाची सीमांत उत्पादनक्षमता जास्तीतजास्त करावी लागेल. यासाठी आपल्याला उत्पादन-तंत्र व उत्पादन यांचा असा मेळ घालावा लागेल की, ज्यात उत्पादनाच्या सर्व घटकांची उत्पादनक्षमता जास्तीत जास्त असेल. असा विचार करावयाचा म्हणजे वरील उद्दिष्ट गाठण्यासाठी केवळ यंत्रामध्ये बदल करून भागणार नाही. तर भांडवल, मानवी श्रम, व्यवस्थापन, उत्पादन-प्रक्रिया वगैरे उत्पादनाच्या सर्व घटकांची शास्त्रीय आधारावर पुनर्रचना करावी लागेल. जपानचा औद्योगीकरणाचा नमुना या दृष्टीने आदर्शाजवळ पोहोचणारा आहे, असे दीनदयाळजी म्हणत असत. समुचित तंत्रज्ञान, तसेच मध्यमस्तरीय तंत्रज्ञान जपान केवळ उदयोगधंदयांतच वापरीत नसून शेतीतही वापरीत आहे, आणि त्यामुळे शेती व औदयोगीकरण या दोन्ही क्षेत्रांत जपानने क्रांती करून दाखविली आहे.

जपानचा अनुभव

औदयोगीकरणाचे जपानमधील स्वरूप रशिया व युरोपमधील अन्य राष्ट्रांपेक्षा सर्वस्वी भिन्न होते. जपानने लघुउदयोग, कुटिरोदयोग, लघुयंत्रा-धिष्ठित मध्यम उदयोग, यांची विकेंद्रित पद्धतीने ग्रामीण भागातून देशभर उभारणी केली. भरपूर लोकसंख्या असलेल्या जपानने अवजड यंत्रे आयात करण्याऐवजी श्रमशक्तीचा योग्य वापर करून भांडवलाचा संचय केला. उत्पादन वाढविले, बेकारीही दूर केली.

नियोजनात अशा प्रकारचे धोरण अवलंबिल्यामुळे रशियाप्रमाणे जपानला औदयोगिक विकासासाठी प्रचंड भांडवलाची गुंतवणूक करावी लागली नाही. इंग्लंड व जपानची तुलनात्मक पहाणी केल्यावर असे आढळून आले की, समान भांडवल-गुंतवणुकीवर जपानच्या दरडोई उत्पन्नातील वाढ इंग्लंडमधील दरडोई उत्पन्नाच्या दुष्पट किंवा त्याहूनही अधिक होती. युरोपात आर्थिक विकास होताना हजारो शेतकरी त्यांच्या गावापासून, शेतजमिनीपासून दूर फेकले गेले. जपानने आपल्या सामाजिक जीवनाच्या चौकटीतच आर्थिक पुनर्रचना गुंफून टाकली.

ज्या विकेंद्रित अर्थव्यवस्थेची संकल्पना दीनदयाळजी मांडीत होते, तिचा केंद्रबिंदू त्यांच्या विचारांनुसार व्यक्ती व कुटुंब हा आहे. जपानमध्ये याचे प्रत्यक्ष दर्शन घडते. जपानच्या आर्थिक विकासाचा केंद्रबिंदू 'कुटुंब' हा आहे. आजही जपानच्या एकूण श्रमिकांपैकी ३५ टक्के श्रमिक आपापल्या घराजवळच लहानलहान यंत्रांवर काम करीत असलेले दिसतात. अमेरिकेत हे प्रमाण दोन टक्के आहे, तर इंग्लंडमध्ये त्याहूनही कमी आहे. असे असूनही जपानच्या उत्पादनांचा दर्जा अमेरिका व इंग्लंडपेक्षा वरचा आहे.

श्रमप्रधान उत्पादन-पद्धतीचे अधिक विवरण करताना दीनदयाळजींनी श्री. लोकनाथन यांचे १९४३ सालचे पुढील अभ्यासपूर्ण निष्कर्ष उद्धृत केले आहेत. त्यांचा निष्कर्ष असा की, मोठ्या गिरणीत शंभर रुपयांचे कापड तयार करण्यासाठी १६४६ रुपयांचे भांडवल आणि १.५४ मानवी श्रम लागतात. तितकेच कापड तयार करण्यास स्वयंसंचालित मागावर ११२५ रुपये भांडवल व १२.५ मानवी श्रम लागतात ; आणि हातमागावर ७७८ रुपये भांडवलाची आणि २२.२ मानवी श्रमाची आवश्यकता पडते.

यावरून असे स्पष्ट दिसून येते की, १) मोठ्या गिरणीत उत्पादन अधिक होते, परंतु तेवढेच भांडवल गुंतविल्यास लघु उद्योगात व यंत्रमागात चौपट लोकांना काम मिळते. २) लघु उद्योगात व यंत्रमागात भांडवलाच्या एका घटकामागे गिरणीपेक्षा २३ टक्के अधिक उत्पादन होते. आपल्या देशात भांडवल-प्रधान बड्या उद्योगधंद्यांपेक्षा लघुयंत्रे वापरून उत्पादन करणारे उद्योगच उभारले पाहिजेत, असा दीनदयाळजींचा आग्रह का होता, हे यातून स्पष्ट होईल. लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्याही विचारांचे दीनदयाळजींच्या या विचारांशी खूपच साम्य आढळते. १९७५ साली तुरुंगात लिहिलेल्या 'स्वगत' या आपल्या दैनंदिनीत जेपी लिहितात, " भारताचा औद्योगिक विकास मध्यम उद्योग, लघु उद्योग, ग्रामीण औद्योगिक वाढ या मार्गांनी व्हायला हवा. त्यासाठी ग्रामीण आणि लघु उद्योगांसाठी वापरल्या जाणाऱ्या तंत्रविज्ञानांचा दर्जा वाढविणे आवश्यक आहे."

आपला अनुभव

प्रचंड भांडवलाची तसेच परकीय चलनाची जागा श्रमशक्ती कशी घेऊ शकते, याचे एक उद्‌बोधक उदाहरण शोनफिल्ड या अर्थशास्त्रज्ञाने भारताच्याच

बाबतीतले दिले आहे. आग्रा शहरात पादत्राणे तयार करणारे जे चाळीस हजार कामगार आहेत त्यांनी बनविलेले बूट रशियात खूपच लोकप्रिय झाले. आपल्या देशातून या बुटांची रशियात मोठ्या प्रमाणावर निर्यात होते व त्याच्या बदल्यात रशिया आपल्याला उपयुक्त यंत्रसामुग्री पाठवीत असतो. आपल्या देशात या बुटांना क्रयशक्तीच्या अभावी म्हणा, किंवा 'बाटा, फ्लेक्स क्रेझ' मुळे म्हणा, फारशी मागणी नाही. शोनफिल्ड लिहितो, "आग्रा शहरातील या चर्मकारांजवळ केवळ एक लाकडी ठोकळा, एक हातोडा, व थोडी किरकोळ उपकरणे असतात. आणि तरीही ते भारताला परकीय चलन मिळवून देतात." भांडवलाची जागा स्वस्त व भरपूर श्रमसंपत्ती घेऊ शकते हे यावरून स्पष्ट होते. हाच अनुभव काश्मिरी गालिचे, मुंबईचे रेडिमेड कपडे, सुरतचे हिरे, राजकोट भागातील सोन्याच्या कारागिरीचे दागिने, इत्यादी उद्योगांत आलेला आहे.

याउलट 'कोलॅबोरेशन'च्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर परकीय भांडवल व तंत्रज्ञान आयात करून, त्यांच्या भरवशावर पाश्चात्य धर्तीचे मोठमोठे प्रकल्प उभारणाऱ्या भारतीय भांडवलदारांच्या खाजगी कंपन्यांनी देशात फारसे उत्साहवर्धक औद्योगिक वातावरण निर्माण केल्याचे दिसत नाही. या संदर्भात देशातील सर्वांत मोठ्या असलेल्या टाटा व बिर्ला उद्योग-स ांची उदाहरणे तपासून पहाणे उद्‌बोधक ठरेल.

परकीय भांडवलाच्या सहभागामुळे आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या आयातीमुळे भारतीय उद्योग-कंपन्यांची निर्यातक्षमता वाढू शकेल असा युक्तिवाद अनेकदा मांडण्यात येतो. परंतु वस्तुस्थिती अगदी वेगळीच असल्याचे आढळते. मक्तेदारी-आयोगाकडे नोंद केलेल्या टाटा व बिर्ला उद्योगसमूहांच्या काही प्रमुख कंपन्यांच्या कारभारावरून ही गोष्ट उघडकीस आली आहे. बिर्ला-गटाच्या बारा मोठ्या कंपन्यांना १९७५ साली व्याज, तंत्रज्ञानासाठी रॉयल्टी, यंत्रसामुग्रींची आयात, कच्च्या मालाची आयात, सुटचा भागांची आयात अशा विविध कारणांसाठी एकूण ३३ कोटी रुपयांचे परकीय चलन खर्च करावे लागले, तर याच बिर्ला-कंपन्यांनी निर्यातीपोटी केवळ २१ कोटी रुपयांचे परकीय चलन मिळविले. टाटा-उद्योगसमूहाचे हेच आकडे अनुक्रमे ४४ कोटी २० लक्ष व २० कोटी ७० लक्ष रुपये असे होते. म्हणजे १९७५ मध्ये टाटा व बिर्ला या प्रमुख उद्योग-समूहांनी परकीय भांडवली सहभाग व प्रगत परकीय तंत्रज्ञान यापायी देशाला

३६ कोटी रुपयांचा भुर्दंड घातला. गेल्या काही वर्षांतील आकडेवारी हीच दाखवते. भारताने आपला औद्योगिक विकास लहान उद्योगधंदे, लघुयंत्रे, स्वदेशी उत्पादनतंत्र यांच्यावर मदार ठेवूनच केला पाहिजे हा दीनदयाळजींचा विचार किती रास्त होता हे यावरून स्पष्ट होते.

उद्योगांची परस्परपूरकता

काही वेळा वरील प्रकारच्या उद्योगांना आर्थिक मदत वा सूट देऊन सरकार त्यांची भरपाई करदात्यांकडून करून घेते. आजही सरकार खादी ग्रामोद्योगांतर्गत होणाऱ्या उत्पादनांना 'सब्सिडी' देऊन पर्यायाने तो बोजा जनतेवर टाकीत असते. दीनदयाळजींच्या मते अशा मदतीला मर्यादा असतात व ही पद्धत फार काळ व्यवहार्य ठरू शकत नाही. ते म्हणतात – "सरकारी मदतीवर अवलंबून राहून हे ग्रामोद्योग कसेबसे टिकून आहेत. या उद्योगधंद्यांना एका व्यापक आणि नवीन औद्योगिक कार्यक्रमाचा आधार बनवून त्यांचा विकास करण्याची आवश्यकता आहे. ··· आधुनिक उत्पादन-पद्धतीने आपल्या गरजा पुऱ्या करणारे लहानलहान उद्योगधंदे अजूनही आपल्या देशात अपेक्षितच आहेत."

तात्पर्य, पंडित दीनदयाळजींचा भर समुचित तंत्रज्ञान व मध्यमस्तरीय तंत्रज्ञान यांवर मदार असणारे छोटे उद्योगधंदे निर्माण करण्यावर होता. अर्थात् आवश्यक तेथे आणि मूलभूत व अवजड यंत्रसामुग्रीचे कारखाने मोठ्या क्षेत्रात व सरकारी क्षेत्रात असावेत या मुद्याशी तेही सहमत होते.

सर्व उत्पादक-घटकांचा जास्तीत जास्त उपयोग करून घेऊन अर्थव्यवस्था सुदृढ आणि गतिमान करण्यासाठी मोठे उद्योग आणि विकेंद्रित लहान उद्योग अशी विभागणी करण्यात आली असली तरी या दोन्ही विभागांमध्ये केवळ परस्पर संबंधच नव्हे तर परस्पर पूरकता असणे आवश्यक आहे.

ही परस्परपूरक कार्यविभागणी दोन प्रकारांनी साधता येईल. १) उत्पादक वस्तू मोठ्या उद्योगधंद्यांत तयार करण्यात याव्यात व उपभोग्य वस्तू लहान उद्योगांत तयार केल्या जाव्यात. उदा., प्लास्टिकची पावडर, रेयॉनचे तंतू, पोलादी पत्रे, लोखंडी तारा वगैरे माल मोठ्या कारखान्यांनी तयार करून पुरवावा व त्याच्या साह्याने लहान कारखान्यांनी निरनिराळ्या प्रकारच्या उपभोग्य वस्तू बनवाव्या. २) एखाद्या मोठ्या वस्तूच्या उत्पादनासाठी

आवश्यक असणारे सुटे भाग लहान प्रमाणावर वेगवेगळ्या ठिकाणी तयार करावे व त्यांची फक्त जोडणी करण्याचे काम मोठ्या कारखान्यांनी करावे. मोठ्या व छोट्या उद्योगांची सांगड अशा प्रकारे घालण्यात आली तर आपल्याला दैनंदिन व्यवहारात लागणाऱ्या वस्तूंपैकी ९० टक्के वस्तू लहान कारखान्यांत तयार होऊ शकतील.

लहान व मोठ्या उद्योगांचे हे परस्पर संबंध विशद करून सांगताना दीनदयाळजी स्वित्झर्लंडच्या घड्याळ-उद्योगाचे उदाहरण देत. स्वित्झर्लंडमध्ये घड्याळाचे लहान सुटे भाग कारागीर आपल्या घरात तयार करतात व मोठ्या कारखान्यांत त्या भागांची जुळणी करून घड्याळे तयार करण्याचे काम होते. जपानचेही उदाहरण या दृष्टीने पहाण्यासारखे आहे. तेथे रेल्वेसाठी लागणारे ७० टक्के सुटे भाग आणि मोटारीसाठी लागणारे ६१ टक्के सुटे भाग लहान उद्योगकेंद्रांत तयार होत असतात.

आपल्या देशात मात्र विदेशी प्रभाव अधिक असल्याने सुटे भाग देखील परदेशांतून आयात करण्यात येतात. सरकारच्या आणि उद्योगजकांच्या कोलॅबोरेशन क्रेझमुळे लहान स्वयंचलित मोपेडपासून मारुती कारपर्यंत परकीय सहकार्य घेण्याची जणू स्पर्धाच सुरू आहे. परिणामी देशाचे परावलंबन वाढले आहे, आणि मोठ्या व लहान उद्योगधंद्यांचे संबंध परस्परपूरक राहिले नाहीत.

यासाठी दीनदयाळजींनी लहान व मोठ्या उद्योगधंद्यांच्या क्षेत्र-विभाजनाची व राष्ट्रीय क्षेत्राची कल्पना मांडली आहे. भारतासारख्या अर्धविकसित देशाला संमिश्र अर्थव्यवस्था आवश्यक असून सार्वजनिक क्षेत्र विरुद्ध खाजगी क्षेत्र अशा स्वरूपाच्या वादांनी देशाचे नुकसान होत रहाते असे त्यांचे मत होते. त्यांनी देशाच्या औद्योगीकरणाबाबत 'सिद्धांत व नीती' मध्ये जे विचार सूत्ररूपाने मांडले आहेत ते या संदर्भात पहाण्यासारखे आहेत.

क्षेत्रविभाजन

लहान व मोठ्या उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांची विभागणी केली पाहिजे. सामान्यपणे उपभोग्य वस्तूचे उत्पादन छोट्या उद्योगांद्वारा व्हावे, आणि उत्पादक व मूलभूत वस्तूंचे उत्पादन मोठ्या उद्योगांद्वारे करावे.

मोठ्या उद्योगांची मालकी खाजगी असावी की सरकारी हा वादाचा

विषय आहे. भांडवलशाही व समाजवाद आपापल्या सिद्धान्ताच्या आधारे आपापल्या बाजूचे समर्थन करीत असतात. वर्तमान परिस्थितीत आपल्या देशात विकासाला व विस्ताराला भरपूर क्षेत्र उपलब्ध असताना, आणि सार्वजनिक व खाजगी क्षेत्र या दोहोंची शक्ती आर्थिक विकासाला अपुरी पडत असताना सार्वजनिक क्षेत्र विरुद्ध खाजगी क्षेत्र हा वाद अप्रस्तुत आहे. आपल्याला एक राष्ट्रीय क्षेत्र कल्पून प्रत्येकाला आपापल्या क्षमतेनुसार कार्य करू दिले पाहिजे.

आधारभूत नि सार्वजनिक-सेवा-उद्योगांमध्ये भांडवल एवढ्या मोठ्या प्रमाणात लागते व त्याची फलप्राप्ती एवढ्या उशीरा होते की राज्याने त्या क्षेत्रात प्रवेश केल्याशिवाय ते उद्योग स्थापित होणे दुरापास्त असते. म्हणून या उद्योगांची स्थापना सरकारनेच केली पाहिजे. त्याचप्रमाणे खाजगी क्षेत्रासमोर एक आदर्श उभा करण्यासाठी, तसेच त्यास पूरक म्हणूनही सरकारला काही क्षेत्रांत पदार्पण करावे लागते.

ग्रामोद्योग

परंपरागत ग्राम व कुटिरोद्योगांपैकी बहुतांश उद्योग आज आतबट्ट्याचे झाले आहेत. त्यांना स्वतःच्या पायावर उभे करावे लागेल. वीज आणि यंत्र यांच्या साह्याने त्यांना लघुउद्योगाच्या पातळीवर आणावे लागेल. या उद्योगांची उत्पादनक्षमता वाढविल्याशिवाय ते टिकू शकणार नाहीत. प्रारंभीच्या काळात त्यांना संरक्षण द्यावे, पण तो स्थायीभाव होता कामा नये.

खेड्यांतील कारागिरांचे ग्रामीण अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान असते. अर्थव्यवस्थेच्या आधुनिकीकरणात हे कारागीर विस्थापित होत आहेत. नवीन अर्थव्यवस्थेत त्यांना उचित स्थान मिळेल अशी व्यवस्था करावयास हवी.

त्याचबरोबर आणखी एका महत्त्वाच्या बाबीकडे दीनदयाळजी लक्ष वेधताना म्हणतात. यंत्रांशी आणि उपकरणांशी मजुरांचा घनिष्ठ संबंध असतो. त्यावर त्यांची उपजीविका अवलंबून असते. आजकाल अनेक कारखाने संयुक्त भांडवली संस्थांद्वारे चालविले जातात. त्यांतील भागधारकांचा केवळ लाभांश (डिव्हिडंड) घेण्यापलीकडे कारखान्याशी काहीच संबंध नसतो. तरीही ते कारखान्याच्या मालकीत सहभागी धरले जातात. पण श्रमिक मात्र उपरे मानले जातात." या गोष्टीला आपला असलेला विरोध व्यक्त करताना

दीनदयाळजी म्हणतात "भागधारकांबरोबरच मजुरांनाही कारखान्यात स्वामित्वाचे अधिकार दिले गेले पाहिजेत. त्यांना लाभांश मिळाला पाहिजे. संचालन-मंडळावरही त्यांचे प्रतिनिधी घेतले पाहिजेत. जमिनीवर प्रत्यक्ष राबणाऱ्या शेतकऱ्याला 'कसेल त्याची जमीन' हे तत्त्व लावले जाते, तर कारखान्यातील मजुरांनाही कारखान्याच्या स्वामित्वाच्या अधिकारात सहभागी करून घेणे तेवढेच उचित आहे. यातून उत्पादन-वाढ आणि औद्योगिक शांतता या दोन्ही गोष्टी साधण्यास खूप मदत होईल."

• • •

५

विदेशी भांडवलाचे स्वदेशीला ग्रहण

देशाच्या अर्थकारणात स्वावलंबन व स्वदेशी या दोन आधारभूत गोष्टींना दीनदयाळजी अनन्यसाधारण महत्त्व देत असत. अर्थव्यवस्थेचे हे प्राणवायू आहेत असे ते म्हणत असत.

स्वावलंबनाच्या दृष्टीने भांडवलाचे स्थान महत्त्वाचे आहे. आपल्या येथे मानवी श्रम व कच्चा माल या गोष्टी विपुल असल्या तरी औद्योगिक विकासासाठी लागणाऱ्या भांडवलाची त्या मानाने चणचण आहे. खरे म्हणजे आपल्या नियोजनाची आखणी भांडवलाची ही मर्यादा ध्यानात ठेवून करावयास हवी होती. दीनदयाळजींचा छोट्या विकेंद्रित उद्योगांवर विशेष भर होता त्याचे प्रमुख कारण हेही आहे. परन्तु पाश्चात्य देशांनी अवजड यंत्रसामुग्रीच्या सहाय्याने निर्माण केलेल्या अमाप समृद्धीची हाव आणि थोड्या अवधीत काहीतरी अचाट करून दाखविण्याची महत्त्वाकांक्षा व निवडणुकीच्या राजकारणातील गरज या गोष्टींमुळे नियोजन आखताना या गोष्टीचे भान राहिले नाही. श्रमप्रधान योजनेऐवजी भांडवलप्रधान योजना हाती घेण्यात आल्या. त्यामुळे भांडवलाची चणचण अधिकच जाणवू लागली, आणि ते मिळविण्यासाठी आपण परकीयांचे उंबरठे झिजवू लागलो. आपल्या अर्थव्यवस्थेतील अनेक समस्यांना स्वदेशी भावनेचा व भांडवलाचा अभाव आणि परकीय विचारप्रणालींचा व परकीय भांडवलाचा अत्यधिक प्रभाव बऱ्याच अंशी कारणीभूत आहे असे म्हणावयास हरकत नाही.

परकीय भांडवल

परकीय भांडवल मुख्यतः तीन प्रकारांनी प्राप्त होऊ शकते. १) परकीय भांडवलदारांकडून वैयक्तिक रीतीने, २) आंतरराष्ट्रीय नाणे संस्थांद्वारे, ३) परकीय सरकारकडून. आपल्या येथे या तीन्ही मार्गांनी परदेशी भांडवलाची आयात होत आहे. यात भांडवलशाही आणि साम्यवादी, दोन्ही प्रकारच्या देशांचा समावेश आहे.

या विविध मार्गांनी येणाऱ्या परकीय मदतीविषयी पं. दीनदयाळजी म्हणतात – " आजकाल पाश्चात्य राष्ट्रे त्यांच्या स्वतःच्या हितासाठी अनेक नवनवीन योजना मांडीत आहेत. वसाहतवाद आणि राजकीय दास्य या गोष्टी आता भूतकाळात जमा होत चालल्या आहेत. त्याऐवजी आता आर्थिक व वैचारिक आधारावर अन्य देशांना आपल्या नियंत्रणाखाली आणण्याच्या कुटिल योजना पाश्चात्य देशांनी सुरू केल्या आहेत. थोडक्यात म्हणजे वसाहतवाद, राजकीय दास्य, यांपेक्षा आर्थिक मदत याचा अर्थ जरी निराळा असला तरी त्यामागचा उद्देश मात्र तोच आहे. अन्य राष्ट्रांत करावयाच्या भांडवलगुंतवणुकीला आर्थिक सहाय्य हे नवीन नाव प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय संस्थांच्या आवरणाखाली मागासलेल्या देशांच्या अर्थव्यवस्थेमध्ये आपले हातपाय पसरणे शक्य व सोयीचे असल्याचे अनेक पाश्चात्य राष्ट्रांच्या ध्यानात आले आहे. आणि तशी त्यांनी सुरुवातही केली आहे.

आपण प्रत्येक वेळीच, मनात काहीना काही किंतू वाळगून, या राष्ट्रांनी मदतीसाठी पुढे केलेला हात झिडकारू शकत नाही. काही बाबतींत आपले व त्यांचे हितसंबंध परस्परांना पूरक असल्याने आपल्याला त्यांची मदत स्वीकारावी लागेल, तर एखादे वेळी परिस्थितीविवश आपल्याला त्यांचे सहाय्य घ्यावे लागेल. परंतु आपल्या अर्थव्यवस्थेचे या दृष्टीने योग्य परीक्षण केले नाही तर आपले हित आणि अहित कशात आहे याचे अचूक ज्ञान आपल्याला होणार नाही. " (अर्थनीती – ६)

अनेक उदाहरणे देऊन पंडित दीनदयाळजींनी वरील विचारांचे विवरण केले आहे. पी. एल्. ४८० कायद्यानुसार येणाऱ्या परकीय मदतीच्या परिणामांचे विवेचन यापूर्वी आलेलेच आहे. येथे, या विदेशी मदतीच्या प्रश्नाचा अधिक विस्ताराने विचार प्रस्तुत आहे.

१९४५ साली दुसरे महायुद्ध संपले तेव्हा भारताजवळ कोट्यवधी रुपयांची परदेशी गंगाजळी जमा होती. या मागे थोडा इतिहास आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात आग्नेय आशियातील युद्धासाठी भारतीय युद्धतळांवरून शेकडो कोटी पौंड खर्चावे लागले. त्यासाठी ब्रिटिश सरकारने चलनफुगवटा करून पैसा उभा केला व हा पैसा रुपयाच्या स्वरूपात ब्रिटिश सरकारने कर्जाऊ घेऊन 'बँक ऑफ इंग्लंड' मधील भारताच्या खात्यावर "भारताने ब्रिटनला दिलेल्या पौडी कर्जाच्या परतफेडीची ठेव" या स्वरूपात नोंदवून ठेवला. अर्थात् पुढे मागे जेव्हा केव्हा या रकमेची परतफेड करण्याची वेळ येईल तेव्हा इंग्लंडच्या तिजोरीतून भारताला कमीत कमी रक्कम द्यावी लागावी अशी परतफेडीच्या अटींमध्ये तरतूद करून ठेवण्यात आली होती. तरीही १९५० – ५१ साली म्हणजे भारताच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीच्या एक वर्ष आधी ही पौंडी गंगाजळी व भारतीय रिझर्व बँकेजवळचे सोने मिळून ९५१ कोटी रुपयांची गंगाजळी भारतापाशी होती.

पण पुढे हळूहळू ही गंगाजळी कमी होत गेली. इतकेच नव्हे तर, भारताला आपले आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहार चालू ठेवण्यासाठी कोट्यवधी रुपयांचे परकीय कर्ज व सहाय्य घ्यावे लागले. आजमितीस प्रत्येक भारतीयाच्या डोक्यावर २५० रुपयांचे परकीय कर्ज आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून जे पाच हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्यात आले आहे, ते कर्ज व त्यावरील व्याज यांचा आकडा यात मिळविला म्हणजे कर्जाचा हा दरडोई बोजा आणखीनच वाढतो. अशा परकीय मदतीमुळे येणारे राजकीय दास्य अगर दडपण याबाबत पं. दीनदयाळजींनी वारंवार इशारा दिलेला होता. पी. एल्. ४८० ची अन्नधान्याची मदत १९६५ च्या भारत–पाक युद्धाच्या वेळी अचानक थांबवून भारताला पेचात पकडण्यात आले होतेच. भारताला परराष्ट्रांनी आर्थिक सहाय्य देऊ नये असे म्हणणारा पश्चिमी लेखक बाअर लिहितो – "हल्ली सर्व व्यवहारांत राजकीय हेतूंचे महत्त्व विशेष आहे. म्हणून मदत या नात्याने पाठविलेल्या साधन-सामुग्रीचे राजकीय परिणाम हे महत्त्वाचे ठरतात. मदतीच्या आवरणाखाली धनको राष्ट्राचा रिणको राष्ट्राच्या अंतर्गत व्यवहारात हस्तक्षेप होत असतोच."

१९६२ च्या स्वातंत्र्यदिनी केलेल्या भाषणात पं. दीनदयाळजींनी याच संदर्भात अर्थशास्त्रज्ञ प्रा. जेकब विनर यांचे पुढील मंतव्य उद्धृत केले होते.

" The under-developed countries are to some extent pawns in the play of power politics and cold war."

१९६२ च्या मे महिन्यात अमेरिकन सीनेटच्या परराष्ट्र-संबंध-समितीने भारताला द्यावयाच्या सुमारे ७३ कोटी डॉलर मदतीत २५ टक्के कपात जाहीर केली. सीनेटर फुलब्राईट हे त्या समितीचे अध्यक्ष होते. ते भारताचे हित-चिंतक होते व अमेरिकेने भारताला अधिक मदत द्यावी अशा मताचे पुरस्कर्ते होते. वरील कपातीला कारणीभूत ठरलेल्या बहुसंख्य सदस्यांच्या मनातील विचार श्री. फुलब्राइट यांनी सांगितला तो असा. " अमेरिकेशी श्री. कृष्ण मेनन असहकार करतात. गोव्यावर भारताने आक्रमण केले. रशियाकडून लष्करी साहित्य विकत घेतले. नेहरू व मेनन यांचे हे धोरण कायम आहे तोवर भारताला मदत देऊ नये." चीनला असाच अनुभव रशियन मदतीचा आला. इंडोनेशिया, फिलिपाइन्स, ब्राझील, घाना, मेक्सिको ह्यांचीही अशीच शोकांतिका विदेशी मदतीच्या मृगजळामागे धावल्यामुळे झाली. आपल्या देशाला तर सुरुवातीच्या काही वर्षांतच रुपयाचे अवमूल्यन करावयास लावण्यात ही विदेशी मदतच कारणीभूत ठरली !

चलनाचे अवमूल्यन

चलनाचे अवमूल्यन ही देशाच्या आर्थिक जीवनातील अतिशय महत्त्वाची घटना असते. अवमूल्यनाचे परिणाम केवळ आयात-निर्यातीपुरतेच मर्यादित नसून उत्पादन, भावपातळी, औद्योगीकरण व आर्थिक विषमता या सर्वांवर त्याचा दूरगामी परिणाम होत असतो. देशाच्या आर्थिक नियोजनाशी त्याचा निकटचा संबंध असतो.

म्हणूनच देशाच्या इतिहासात चलनाचे अवमूल्यन ही सहसा न घडणारी घटना असते व ती टाळण्याचे शिकस्तीचे प्रयत्न केले जातात. देशाची आर्थिक प्रकृती साफ ढासळली असेल व सर्वसामान्य उपायांनी ती दुरुस्त होण्याची शक्यता नसेल तर त्या परिस्थितीत निरुपाय म्हणून चलनाचे अवमूल्यन करण्यात येते.

या संदर्भात आपल्या देशात काय घडले हे पाहणे उद्‌बोधक ठरेल. दिनांक ५ जून १९६६ रोजी भारत सरकारने जाहीर केले की रुपयाची परदेशी चलनातील किंमत साडेछत्तीस टक्क्यांनी कमी करण्यात आली आहे. परदेशांचा

आपल्या चलनावरील ढासळणारा विश्वास हे कारण सरकारतर्फे त्यासाठी सांगण्यात आले. अर्थमंत्रालयाने त्या वेळी काढलेल्या पत्रकात असे स्पष्टपणे म्हटले आहे की, रुपयाचे अवमूल्यन न केल्यास यापुढे आपल्या देशाला अधिक परकीय अर्थसहाय्य मिळणे अगदी अशक्य होईल.

यावर दीनदयाळजी म्हणतात, "परदेशी मदतीवर कमीत कमी अवलंबून राहू अशी सरकार एकीकडे घोषणा करीत असते, आणि दुसरीकडे परदेशी अर्थसाह्य मिळावे यासाठी देशाच्या चलनाचे अवमूल्यनही करून टाकते. याला कमालीचे परावलंबन, दुटप्पीपणा व आर्थिक दिवाळखोरी म्हणावयाचे नाही तर काय म्हणावयाचे ?"

त्या वेळच्या सरकारने रुपयाच्या या अवमूल्यनाचे समर्थन केले, व हे परकीय राष्ट्रांच्या दडपणाखाली करण्यात आलेले नाही असे पुनःपुन्हा सांगितले. तथापि पं. दीनदयाळजींनी या बाबतीतील वस्तुस्थिती उजेडात आणून सरकारच्या शिडातील हवाच काढून घेतली. " Devaluation: A Great Fall " या आपल्या पुस्तिकेत ते लिहितात– " रुपयाचे अवमूल्यन राजकीय दडपणाखाली येऊन केल्याचे अगदी स्पष्ट आहे – मग सरकार त्याचा कितीही इन्कार करो! याबाबत केंद्रीय अर्थमंत्री श्री. टी. टी. कृष्णम्माचारी यांची साक्ष महत्त्वाची आहे. श्री. कृष्णम्माचारी यांनी तत्कालीन काँग्रेस वर्किंग कमिटीपुढे बोलताना गुपित उघड केले की, गेल्या दोन वर्षांपासून जागतिक बँकेने आणि अमेरिकन सरकारने भारताने रुपयाचे अवमूल्यन करावे यासाठी भारत सरकारच्या मागे लकडा लावला होता. श्री. कृष्णम्माचारी पुढे म्हणतात की, या गोष्टीला त्यांचा विरोध होता."

श्री. कृष्णम्माचारी यांना केंद्र सरकारच्या व्यापार-मंत्रालयाचाही पूर्ण पाठिंबा होता. व्यापार-मंत्रालयाने विस्तृत अहवाल तयार करून, रुपयाच्या अवमूल्यनाने भारताचे आर्थिक प्रश्न अवघड होतील व आयात-निर्यात व्यापारात समस्या निर्माण होतील असा परखड इशाराही दिला होता.

परंतु पुढे ताश्कंद येथे पंतप्रधान श्री. लालबहादुर शास्त्री यांचे निधन झाले. त्यामुळे कृष्णम्माचारींचा आधारच तुटला. पुढे मुंदडा-प्रकरणामुळे कृष्णम्माचारींनाही जावे लागले. शास्त्रीजींनंतर त्यांच्या जागी आलेल्या इंदिरा गांधींनी पूर्वीचे धोरण बदलून परकीय चलनाच्या संकटातून बाहेर पडण्यासाठी परकीय मदत जास्तीत जास्त मिळविण्याचे धोरण अवलंबिले. खरे म्हणजे, अशा वेळी दीनदयाळजी म्हणत त्याप्रमाणे, 'स्वदेशी' भावनेला

आवाहन करून या आर्थिक संकल्पाशी मुकाबला करावयास हवा होता. परंतु इंदिरा गांधींना तात्कालिक फलदायी उपाय हवा होता. परकीय कर्जांच्या रूपाने तो त्यांना सापडला. जागतिक बँक व अमेरिका कर्ज द्यावयास तयार होती. पण भारताने रुपयाचे अवमूल्यन करावे ही त्यांची त्यासाठी अट होती. त्याप्रमाणे ५ जून १९६६ रोजी अर्थमंत्री सचिन चौधरी यांनी सुवर्ण-माध्यमात ३६.५ टक्के तर डॉलर व पौंड चलनात ६७.५ टक्के एवढे प्रचंड अवमूल्यन जाहीर केले.

रुपयाचे अवमूल्यन ५ जून १९६६ रोजी झाले. तत्पूर्वी दि. २६ ते २९ मे १९६६ या काळात पं दीनदयाळजींची पुणे येथील 'भारतीय अर्थशास्त्र-राज्यशास्त्र संशोधन संस्थेमध्ये' चार भाषणे झाली होती. त्यांपैकी एका भाषणात ते म्हणतात– "आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आपल्या रुपयाची जी किंमत आहे त्यापेक्षा हुंडणावळीचा अधिकृत दर अधिक आहे. रुपयाची किंमत एका डॉलरला ४.७६ रुपये अशी आहे, पण बाजारात ९.२० रुपये देऊनच एक डॉलर मिळतो आहे. ... विशेषत: गेल्या दीड वर्षांत रुपयाची किंमत झपाट्याने घसरत आहे ... राष्ट्रीय चलनाचा अधिकृत दर आणि त्याचे बाजारातील प्रत्यक्ष मूल्य यांत एवढा फरक पडत असल्यामुळे रुपयाचे अवमूल्यन केले पाहिजे असे म्हणणारा एक वर्ग आहे. अशा प्रकारे अवमूल्यन केले तर सध्या सोने व अन्य वस्तूंचा खूप मोठ्या प्रमाणात चालू असलेला चोरटा व्यापार कमी होईल, आपला माल परदेशांत स्वस्त झाल्याने निर्यात वाढेल, परदेशी वस्तूंच्या किंमतींत बेफाम वाढ झाल्याने आयातही मर्यादित होईल व त्यामुळे आयात-निर्यातीतील तफावत कमी होईल असे अनेक मुद्दे अवमूल्यनाच्या समर्थनार्थ मांडण्यात येत असतात. परंतु या विवेचनाशी मी सहमत नाही··· या संदर्भात दोन मुद्यांचा विचार करणे आवश्यक आहे. १) आपण आयात करीत असलेल्या वस्तूंचे स्वरूप असे आहे की त्यात कपात करणे अशक्य आहे. अन्नधान्य आणि यंत्रसामुग्रीची किंमत वाढली तरी त्यांची आयात कमी करून चालणार नाही. २) आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आपला जवळजवळ ८० टक्के माल 'पॅरिटी प्राइस' मध्येच विकला जात असल्याने अवमूल्यनामुळे आपल्या निर्यात मालाच्या किंमती उतरतील आणि निर्यातीद्वारा येणाऱ्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी निर्यात खूप प्रमाणात वाढवावी लागेल. ज्या उद्योगात खूप शक्ती न वापरता तशीच पडून असेल अथवा जेथे उद्योगाचा अधिक विस्तार करणे शक्य आहे त्या ठिकाणी निर्यातीत अशी वाढ करणे शक्य आहे. परंतु

आपली परिस्थिती अशी नाही. त्यामुळे अवमूल्यन केल्याने निर्यातीतील सध्याच्या उत्पन्नात विशेष वाढ होणे संभवनीय नाही.

अंतर्गत अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अवमूल्यनाचे दुहेरी परिणाम होतील. निर्यात वाढल्याने देशांतर्गत बाजारपेठेत मालाचा पुरवठा कमी होऊन भाव वाढतील. त्याचप्रमाणे आयात होणाऱ्या वस्तूंच्या किंमती वाढल्यानेही देशांतर्गत भाव आणखी वाढतील. देशातील चलनवाढीमुळे थोडचाच काळावधीत निर्यात होणाऱ्या वस्तू महाग होतील आणि परिणामी जो थोडाफार फायदा होत होता तोही नाहीसा होईल. निर्यात कमी झाल्याने रुपयाचे आंतरराष्ट्रीय मूल्य आणखी कमी होईल. अवमूल्यनातून असे दुष्टचक्र निर्माण होण्याचीच शक्यता अधिक आहे."

पं. दीनदयाळजींचे वरील विचार तंतोतंत खरे ठरल्याचे नंतरच्या आर्थिक घटनांनी दाखवून दिले. रुपयाचे अवमूल्यन करूनही म्हणण्याएवढी निर्यातवाढ झाली नाही, चलनवाढ होत राहिली, बाजारभाव आणखी भडकत गेले. साधनसामुग्रीचा तुटवडा वाढला, उत्पादकांची कार्यक्षमता घटली. उत्पादन वाढविण्यात रस घेण्याऐवजी साठेबाजीच्या मार्गाने, टंचाईचा व महागाईचा लाभ घेऊन श्रीमंत होण्याकडे कल वाढू लागला. सटोडिये व स्मगलर यांची चलती सुरू झाली. १९६६ साली प्रसिद्ध झालेली चौथी पंचवार्षिक योजना रद्द करावी लागली व एक एक वर्षाची कामचलावू योजना सुरू झाली. आयात-निर्यात धोरणात सुसूत्रता राहिली नाही. तुटीचा अर्थभरणा वाढत गेला. नियोजनाची सारी मदार परदेशी चलनावर येऊन पडली. जगात भारताची नाचक्की झाली. नियोजन-मंडळाचे एक सदस्य प्रख्यात अर्थपंडित डॉ. ग्यॅनचंद यांनी या बाबतीत म्हटले आहे– "आपण काय केले व त्याची परिणती काय झाली हे राज्यकर्त्यांपैकी अनेकांना कळलेच नाही." कलकत्ता विद्यापीठाचे अर्थतज्ज्ञ डॉ. मानहोत म्हणाले, "Devaluation was a bad remedy of a wrong diagnosis."

१२ जून १९६६ च्या 'ऑर्गनायझर' या इंग्रजी साप्ताहिकामध्ये दीनदयाळजी लिहितात– "With the rupee the country itself stands devalued. Even if it be tolerated as a stimulant, there is fear of our being an addict !"

आज आपल्या अर्थव्यवस्थेची तशीच अवस्था झाली आहे. आज आपल्या डोक्यावर १६००० कोटी रुपयांचे परकीय कर्ज आहे, त्यातच १९८१ साली

आपल्या सरकारने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून आणखी ५००० कोटी रुपयांचे कर्ज उचलावयाचे ठरविले होते. या सर्व परकीय कर्जाचे नुसते व्याजदेखील आपण भरू शकत नाही. व्याज भरण्यासाठी देखील आपल्याला पुनः कर्जच काढावे लागते.

परकीय भांडवल : परकीय तंत्रज्ञान

परकीय भांडवलाबरोबर परक्या देशांचे राजकीय दडपण व प्रभुत्व कसे वाढत जाते याची काही उदाहरणे आपण पाहिली. परंतु परदेशी भांडवलाचे दुष्परिणाम केवळ एवढ्यापुरतेच मर्यादित नसतात. त्या भांडवलाबरोबर परकीय तंत्रज्ञान म्हणजे उत्पादनपद्धतीही ऋणको देशाच्या डोक्यावर येऊन वसते. हा मुद्दा स्पष्ट करताना दीनदयाळजी म्हणतात –

"परकीय भांडवलाबरोबरच आपल्याला अगतिकपणे परदेशांतील उत्पादन-पद्धतीही स्वीकारावी लागते. आपल्या देशात येणारे परकीय भांडवलदार आणि तज्ज्ञ त्यांच्या देशात प्रचलित असलेल्या उत्पादनपद्धतीनुसार आणि उपलब्ध असलेल्या यंत्रसामुग्रीच्या सहाय्यानेच उत्पादन सुरू करतात. यातून आपला देश औद्योगीकरणाच्या मार्गावर चार पावले पुढे जाईल हे खरे, परंतु ज्याची पाळेमुळे खोलवर गेली आहेत अशा विकासोन्मुख व व्यापक औद्योगीकरणाचा पाया मात्र अजिबात घातला जाणार नाही." (अर्थनीती) त्याचबरोबर पं. दीनदयाळजींनी असेही म्हटले आहे की, "अशा प्रकारची उत्पादनपद्धती आपल्या देशावर लादली गेली तर त्यातून रोजगारनिर्मिती कमी होईल."

अशाच प्रकारचे विचार प्रा. गन्नर मिर्डाल यांनी त्यांच्या 'इंटरनॅशनल इकॉनॉमिक्स्' या पुस्तकात मांडलेले आढळतात. अविकसित देशात परकीय सहाय्याने उभ्या राहणाऱ्या औद्योगिक प्रकल्पांनी परकीय पद्धतीची उत्पादन-पद्धती अवलंबू नये असे स्पष्ट मत त्यांनी या पुस्तकात नमूद केले आहे. परकीय मदतीने उभी राहिलेली कारखानदारी स्थानिक सामुग्रीचा वापर करून उत्पादनपद्धती विकसित करण्याचा प्रयत्न कधीच करीत नाही. उलट अशा प्रयत्नामध्ये कोलदांडा घालण्याचीच तिची चाल असते. वानगीदाखल एक उदाहरण पहाण्यासारखे आहे.

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी १९५१ साली सिंद्री येथे खताचा

कारखाना अत्यंत परिश्रमपूर्वक उभा केला. त्या वेळी ते केंद्रीय मंत्रिमंडळात उद्योगमंत्री होते. आपल्या येथे कोळसा मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे हे ध्यानात घेऊन, ज्या तंत्रात इंधन म्हणून कोळशाचा वापर करता येईल अशा उत्पादनतंत्राचा अवलंब करून त्यांनी या कारखान्याची उभारणी केली होती. कारण तेल व पेट्रोकेमिकल्स यांचा इंधन अगर कच्चा माल म्हणून वापर केल्यास पुढे मागे अरब राष्ट्रे अगर रशिया–अमेरिका यांवर या कारखान्यांना अवलंबून रहावे लागेल, हे श्यामाप्रसादांनी बरोबर ओळखले होते. पुढे पं. नेहरूंशी मतभेद झाल्यामुळे डॉ. मुखर्जी मंत्रिमंडळातून राजिनामा देऊन बाहेर पडले. त्यांच्याबरोबर वरील धोरणही गेले. पाश्चात्य तेलकंपन्यांचे चालक, आणि अरब राष्ट्रांचे शेख यांनी खतांच्या कारखान्यासाठी इंधन म्हणून कोळशाऐवजी तेल व पेट्रोकेमिकल्स वापरण्यास भारत सरकारला भरीस घातले. परिणामी आपले खत-उत्पादन परकीय उत्पादनपद्धती व परकीय इंधन यांवर अवलंबून ठेवावे लागले. नंतर 'ओपेक' राष्ट्रांनी सतत चालविलेल्या तेल भाववाढीमुळे भारताला अडचणीत टाकले व खतांचे कारखाने तोट्यात जाऊ लागले.

या परकीय उत्पादन-पद्धतीमुळे व परकीय साधन-सामुग्रीमुळे झालेले दुसरे मोठे नुकसान म्हणजे स्वदेशी विज्ञान व संशोधन मागे पडून देशाचे परावलंबन अधिकच वाढत गेले. त्या विशिष्ट काळात डॉ. चक्रवर्ती हे सिंद्री-खत-कारखान्याचे प्रमुख होते. त्यांच्या खास संशोधनामुळेच त्यांना डॉ. मुखर्जींनी या महत्त्वाच्या प्रकल्पावर नियुक्त केले होते. डॉ. चक्रवर्तींनी कोळशावर प्रक्रिया करून खतांच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या रसायनांच्या व तेलाच्या उत्पादनासाठी त्याचा उपयोग करण्याचे नवे तंत्र अत्यंत परिश्रमपूर्वक विकसित केले होते. परंतु परकीय दडपणापायी त्यांचे हे तंत्र स्वीकारण्यात आले नाही व त्यांना सिंद्री-खत-कारखाना सोडून जावे लागले. त्यानंतरच्या खत-निर्मितीच्या सर्व कारखान्यांना अरबी तेलावर अवलंबून राहण्याचा प्रसंग आला.

परकीय सहकार्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या कोलॅबोरेशन करारात असलेल्या बंधनकारक तरतुदी. या तरतुदींद्वारा आयात-निर्यात, कच्चा माल, पक्क्या मालाची विक्री, उत्पादन-पद्धती, रॉयल्टी, माल खरेदी व त्याची प्रक्रिया या सर्व बाबतीत परकीय कंपन्या आपले आर्थिक हितसंबंध सुरक्षित ठेवतात व अशा पद्धतीने स्थानिक उद्योगांची उपासमार करून त्यांना परकीय भांडवलाच्या कुबड्यांवर अवलंबून राहण्यास भाग पाडतात. हे परावलंबन

उत्तरोत्तर वाढवीत नेतात.

खेदाची गोष्ट म्हणजे परकीय दडपणाला बळी पडून आपल्या देशातील सार्वजनिक क्षेत्रातही अशा बंधनकारक तरतुदींचा स्वीकार करण्यात आला आहे. रिझर्व्ह बँकेच्या 'फॉरीन कोलॅबोरेशन' या अहवालातही ही बाब 'चिंताजनक' म्हणून संबोधण्यात आलेली आहे. पं. दीनदयाळजी याबाबत चपखलपणे म्हणत– " It is neither Private Sector nor Public Sector that is dominant in Indian economy -- but the Foreign Sector that is most powerful."

परदेशातून भांडवल आयात करण्यापेक्षा धंद्याच्या प्राथमिक उभारणीपर्यंतच्या तंत्रज्ञानाची आयात करणे अधिक श्रेयस्कर ठरेल असे दीनदयाळजींचे मत होते. अर्थात् अशा परकीय तंत्रज्ञानावरच कायमचे विसंबून न राहता संशोधन करून त्या बाबतही स्वयंपूर्ण झाले पाहिजे हेही ते आग्रहाने सांगत असत.

परन्तु आज वस्तुस्थिती काय आहे? अहवालात पुढे म्हटले आहे – "स्वयंचलित वाहनांचे वीस वर्षांहून अधिक काळ उत्पादन करणाऱ्या आणि तीस कोटी रुपयांची वार्षिक उलाढाल असलेल्या एका भारतीय कारखान्याचा संशोधनावरचा खर्च विक्रीच्या अर्धा टक्काही नव्हता. पंचवीस वर्षांहून अधिक काळ रसायनांशी संबंधित उत्पादने निर्माण करीत असलेल्या व वार्षिक कोटचवधी रुपयांची उलाढाल असलेल्या दुसऱ्या एका भारतीय कारखान्याचा हाच खर्च अवघा एक टक्का होता. वरील दोन्ही भारतीय कारखान्यांचे परदेशी कंपन्यांशी तंत्रज्ञानाच्या आयातीचे करार झालेले होते.

नियोजन-मंडळाचे उपाध्यक्ष प्रा. लाकडावाला यांनी स्पष्ट शब्दांत म्हटले आहे की," आपल्या देशातील खाजगी व सार्वजनिक क्षेत्रांतील कारखाने संशोधनावर फारच कमी लक्ष देतात. या उलट जपानी उद्योगधंदे परदेशांतून तंत्रज्ञान आयात केल्यावर त्या तंत्रज्ञानावर स्वतंत्रपणे संस्कार करून आपल्या मालाचा दर्जा एवढा वाढवितात की, संबंधित परदेशांनाही जपानच्या स्पर्धेची चिंता वाटू लागते. आपल्या येथे मात्र परकीय तंत्रज्ञानाबाबतचे परावलंबन कायम रहाते. या तंत्रज्ञानावर स्थानिक गरजांनुसार विकास व प्रक्रिया करून स्वदेशी तंत्राचा अवलंब करण्याची प्रवृत्तीच आढळत नाही."

आपल्या देशात परदेशांतून खाजगी संस्थांतर्फे जे भांडवल आयात होते

त्या संस्थांचे स्वरूप, त्यांचे उद्दिष्ट, त्यांची कार्यपद्धती आणि परिणाम यासंबंधी पं. दीनदयाळजी म्हणतात –

" १) ज्यांनी आपल्या भांडवलाच्या प्रभावाने जगाच्या अर्थव्यवस्थेत औद्योगिक साम्राज्य निर्माण केले आहे, असेच परकीय भांडवलदारांचे मोठे मोठे गट आपल्या देशात येण्यास उत्सुक असतात.

२) केवळ उत्पादन व मूलभूत वस्तूंच्याच नव्हे तर, साबण, काडचापेटचा सिगरेट, विजेचे सामान, सौंदर्य-प्रसाधने यांसारख्या उपभोग्य वस्तूंच्याही उत्पादन-क्षेत्रात शिरून हे परकीय भांडवलदारी कारखाने स्वदेशी उद्योगधंद्यांना मारक ठरतात.

३) गेल्या शंभर वर्षांत आपल्या देशात एका विशिष्ट स्वरूपाच्या अर्थ-व्यवस्थेचा विकास झाला आहे. यातून भारतीय अर्थव्यवस्था पाश्चात्य देशांतील औद्योगिक अर्थव्यवस्थेशी जखडली गेली आहे. त्यामुळे भारताच्या आर्थिक हितसंबंधांचे रक्षण होणे तर दूरच राहिले, उलट आपले नियमितपणे शोषण होत आहे. या पाश्चात्य आर्थिक हितसंबंधीयांनी भारताचे आर्थिक शोषण करताना भारतातील काही वर्गांना पाश्चात्य अर्थ-व्यवस्थांचे प्रतिनिधी म्हणून सामील करून घेतले, आणि काही प्रमाणात त्यांना भागीदारही बनविले. आपल्या देशाच्या आर्थिक विकासावर या वर्गाचे खूपच प्रभुत्व राहिले आहे."

(भारतीय अर्थनीती)

काही प्रत्यक्ष उदाहरणे डोळचासमोर आणली म्हणजे परकीय भांडवलाची ही चाल अधिक स्पष्ट होईल.

आपल्या देशात विदेशी भांडवलाचा खाजगी क्षेत्रातील वापर निर-निराळ्या मार्गांनी होत आलेला आहे. सुरुवातीला इंपीरिअल केमिकल कंपनी, लिव्हर ब्रदर्स, मार्टिन ॲन्ड बर्न, बर्मा शेल, सॅन्डोझ यांसारख्या अमेरिकन व पाश्चात्य राष्ट्रांच्या कंपन्या आपल्या देशात होत्या. पुढे यांपैकी बऱ्याच कंपन्यांनी भारतीय कंपनी म्हणून नोद करताना भारतातील भांडवलाचा सहभाग घेतला. परंतु भाग-भांडवलात परकीय कंपन्यांचाच वाटा मोठा होता. स्वातंत्र्यानंतर भारतीय कंपन्यांनी मोठ्या प्रमाणात परकीय भांडवलाचा सहभाग घेण्यास सुरुवात केली. अशा कंपन्यांत टेल्को, प्रीमियर, हिंदुस्थान मोटर्स, जीइसी यांसारख्या मोठ्या कंपन्यांपासून तर बजाज, एन्फील्ड, मेसी,

फर्ग्युसन इत्यादी मध्यम व लहान कंपन्यांचा समावेश आहे. केवळ तंत्रज्ञानाचा सहभाग असलेल्या भारतीय कंपन्या तिसऱ्या गटात मोडतात. अशा प्रकारे गेल्या तीस–पस्तीस वर्षांत भारतात परकीय भांडवलाची भागीदारी व वर्चस्व बऱ्याच प्रमाणात वाढले.

गॅक्सो, फिलिप्स, आय्. सी. आय्, लिव्हर ब्रदर्स, ब्रुक बाँड, यांसारख्या परदेशी कंपन्यांचे जगातील निरनिराळ्या देशांत स्थानिक कंपन्यांमार्फत मोठे औद्योगिक साम्राज्य निर्माण झाले आहे. अशा बहुराष्ट्रीय कंपन्या अविकसित देशांच्या अर्थकारणावर आणि राजकीय धोरणांवर वर्चस्व गाजवू शकतात. त्यांचे व्यवस्थापन, विक्रीतंत्र अत्यंत कुशल असते. त्यामुळे स्थानिक बाजारपेठेवर त्यांची पकड चटकन बसते. तसेच ग्राहकांना नित्य लागणाऱ्या उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनात त्यांचा हिस्सा फार मोठा असतो. या कंपन्या आपल्या आर्थिक व व्यवस्थापकीय सामर्थ्याचा तसेच अन्य देशांतील लागेबांध्यांचा उपयोग, स्थानिक राजकीय प्रश्नांशी संधान बांधून तेथील राजकीय धोरणांना दिशा देण्यासाठी करू शकतात. दक्षिण अमेरिकेतील अविकसित देशांत तसेच आफ्रिकेतील अनेक नवस्वतंत्र देशांत या कंपन्यांनी तेथील राजकीय नेतृत्वावर स्वतःला अनुकूल असा वचक बसविलेला आहे.

भारतातील वीस बड्या उद्योगसमूहांच्या व मक्तेदारी आयोगाच्या दप्तरी तशी नोंद असलेल्या भारतीय कंपन्यांची मालमत्ता १९६९ मध्ये २४३१ कोटी रुपयांची होती. तर १९७५ मध्ये ही मालमत्ता ४४६५ कोटी रुपयांवर गेलेली आढळते. बड्या उद्योगसमूहांची, तसेच मोठ्या उद्योगघटकांची जी वाढ अप्रतिहतपणे होत गेली आहे त्याला काँग्रेस शासनाचे औद्योगिक धोरण व लायसेन्स-परमिट-कोटा-राजकारण जरी कारणीभूत असले तरी, परकीय भांडवलाशी, आंतरराष्ट्रीय उद्योगसाम्राज्याशी आणि परकीय तंत्रज्ञानाच्या आयातीशी या भारतीय उद्योगांची जी सांगड आहे तीच प्रामुख्याने जबाबदार आहे.

हे बडे उद्योगधंदे लहान उद्योगांना पार बसवून टाकीत आहेत. या कामात त्यांना परकीय बड्या भांडवलदारांचे सहाय्य होत आहे. कारण दोन्ही बड्यांचे हितसंबंध एक झालेले आहेत. महाराष्ट्र बँकेचे माजी अध्यक्ष डॉ. वसंतराव पटवर्धन यांनी असे निदर्शनास आणून दिले आहे की, "आपल्या देशातील मोठे उद्योगधंदे आपले ४१% भांडवल छोट्या उद्योगांची बिले

थकवून उभे करतात. थोडक्यात म्हणजे मोठा मासा छोट्या माशांना गिळतो, हा मात्स्य न्याय सध्या आपल्या अर्थव्यवस्थेत चालू आहे."

पं. दीनदयाळजी लिहितात– " आपल्याला विदेशी उदयोगधंदयांपासून लहान उदयोगधंदयांना, तसेच देशातल्या देशात मोठया उदयोगधंदयांपासून लहान उदयोधंदयांना संरक्षण दयावे लागेल. " परंतु आपल्या राज्यकर्त्यांची चाल अगदी उलटी आहे. त्यामुळे आर्थिक समस्या अधिक बिकट होत चालल्या आहेत. १९७५ साली छोट्या उदयोगधंदयांत देशातील एकूण भांडवल-गुंतवणुकीपैकी केवळ ६.५ % भांडवल गुंतविलेले आढळते. वस्तुतः ३३ % कामगार याच क्षेत्रात रोजगार मिळवीत होते व देशातील २५% उत्पादनही या छोट्या उदयोगांतूनच होत होते. अति लहान उदयोगांत तर केवळ २ % भांडवल गुंतवण्यात आले होते. पण १४ % रोजगार व ८% उत्पादन या क्षेत्रातून निर्माण झालेले होते. तेव्हा रोजगार व उत्पादन या दोन्ही दृष्टींनी 'भांडवलाची उत्पादकता' छोट्या उदयोगक्षेत्रात केवढी मोठी आहे हेच यावरून कळून येते. आपल्या देशात त्या वर्षी राजकीय नवे पर्व होते. १९७५ साली आणीबाणी पुकारून इंदिरा गांधींनी आर्थिक क्षेत्रातही नवे पर्व सुरू करण्याचा इरादा बोलून दाखविला होता. परंतु घडले मात्र सर्व बाबतींत उलटेच. २१ महिन्यांच्या आणीबाणीच्या काळात खाजगी क्षेत्रात ५१४ परवाने व ४४३७ कोटी रुपयांचे प्रकल्प उभारण्यास परवानगी दिली गेली. परंतु हे परवानेही कोणाला दिले ? भाजीपाला-प्रक्रिया कॅडबरीला, बेबी फूड्स डेपोंना, मिठाचे उत्पादन चौगुले व टाटांना, ज्युस उत्पादन पुन्हा कॅडबरीला, तर बफेलो मीट टॅलोचा उदयोग विमकोला बहाल करण्यात आला.

.आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अशा प्रभावी बहुराष्ट्रीय कंपन्यांनी तयार केलेल्या मालाला भारतीय कंपन्याची उत्पादने स्पर्धेत तोंड देऊ शकत नाहीत. मर्कशार्प कंपनीची औषधे, कोलगेट कंपनीची दंतमंजने, कॅडबरीची चॉकलेटे, ब्रुकबॉन्डचा चहा अशा मालाला स्थानिक उदयोजक बाजारात टक्कर देताना घायकुतीला येतात. त्यामुळे कमी भांडवलावर, तसेच अधिक श्रमप्रधान पद्धतीवर चालणारे काही उत्पादन-प्रकल्प असले तरी नवीन व मध्यम उदयो-गांना अशा बहुराष्ट्रीय कंपन्यांपुढे फार काळ टिकाव धरणे कठीण जाते. शेवटी या स्पर्धेत या स्थानिक कंपन्यांना वाजूला सारून परकीय कंपन्या आपली मक्तेदारी निर्माण करतात.

परकीय सहकार्याने निघणाऱ्या कंपन्या स्थानिक उदयोजकांना अनेक जाचक अटींनी बांधून ठेवतात असाही अनुभव आहे. अनेकदा अशा सहकार्या-पोटी, अत्याधुनिक पण स्थानिक वातावरणाला सोयीची नसलेली महागडी यंत्रसामुग्री स्वदेशी उदयोजकाला बसवावी लागते. कित्येकदा, मूळ देशात जुनाट ठरलेली यंत्रसामुग्री व उत्पादन-तंत्र परकीय उदयोगधंदयांच्या माथी मारले जाते. ही यंत्रसामुग्री जास्त भांडवल खाणारी व कमी मजूर लागणारी, कमी रोजगार उपलब्ध करणारी असल्याने गरीब देशांना परवडू शकत नाही. तसेच परकीय सहकार्य स्वीकारलेले हे उदयोगधंदे सामान्य माणसाला नित्यो-पयोगी वस्तूंचे उत्पादन करण्याऐवजी चैनीच्या व सुखवस्तू लोकांना लागणाऱ्या वस्तूंचे उत्पादन करून अर्थव्यवस्थेचे संतुलन विघडवून टाकतात. त्याचबरोबर 'मेंटेनन्स इंपोर्टस' या सदराखाली भारतीय उदयोजकांत परावलंबित्व निर्माण करून बराच पैसा परदेशी घेऊन जातात. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात केवळ ' मेंटेनन्स इंपोर्टस ' वर ३८५० कोटी रुपये खर्च पडले. सालोसाल हा बोजा वाढत आहे व सर्व्हिस चार्ज, डिव्हिडंड, रॉयल्टी, व्याज व कर्जफेड यांमुळे देश आर्थिक दृष्टचा धुऊन निघत आहे. उत्तर कोरिया व दक्षिण कोरिया हे देश आपल्या मागून परकीय मदतीच्या शृंखला तोडून आत्मनिर्भर होऊ शकले. त्यांचे परकीय मदतीचे राष्ट्रीय उत्पादनाशी असलेले प्रमाण प्रतिवर्षी कमी होत आहे. भारताचे मात्र प्रतिवर्षी वाढत आहे. त्यांचे उत्पादन-भांडवल (Output Capital Ratio) वाढत आहे, तर भारताचे कमी होत आहे. वेगळ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे भांडवल खर्ची पडूनही आपले उत्पादन कमी होत आहे. अशा परिस्थितीत देश स्वावलंबी कसा होऊ शकणार ?

परकीय भांडवलाच्या परतफेडीचा प्रश्न

आपल्यासारख्या अर्धविकसित देशाला सामान्य माणसाचे राहणीमान उंचावणे या गोष्टीला स्वाभाविकपणेच अग्रक्रम द्यावा लागतो. परंतु त्याच-बरोबर परकीय कर्जाच्या परतफेडीसाठी, तसेच अधिकाधिक परकीय चलन मिळविण्यासाठी निर्यातही वाढवावी लागते. आपल्या देशाच्या निर्यात-व्यापारात बरीच वाढ झाली आहे व अनेक नव्या वस्तूंची निर्यात सुरू झाली आहे हे खरे आहे; परंतु कर्जफेडीच्या तगाद्यामुळे आपण सामान्य माणसाच्या जीवनाशी निगडित व दैनंदिन गरजेच्या वस्तूही फार मोठ्या प्रमाणात परदेशी पाठवू लागलो आहोत. याचा परिणाम असा झाला आहे की, आपण निर्माण करीत

असलेल्या उपभोग्य वस्तूंचा आपल्याच देशात तुटवडा निर्माण झाला आहे. चुकीच्या नियोजनामुळे आपली अर्थव्यवस्था अशा एका चक्रव्यूहात सापडली आहे की ती नुसती गतिमान ठेवण्यासाठीही अशा मार्गानींही जेवढे मिळेल तेवढे परकीय चलन मिळविणे सरकारला अपरिहार्य होऊन बसले आहे.

उदा., आज गोडे तेल व डाळी देशात खूपच महाग होत चालल्या आहेत. पण शेंगदाणे व डाळी यांची परदेशी निर्यात मोठ्या प्रमाणावर चालू आहे. देशातील शेकडा ८० टक्के लोक अनवाणी चालतात, परंतु कमावलेले चामडे व पादत्राणे परदेशी रवाना होत आहेत. प्रत्येक माणसाला जाडेभरडे का होईना, परंतु किमान दहा मीटर कापड देण्याचे उद्दिष्टही आपण अद्याप गाठू शकलेलो नाही. आणि तरीही हातमागाचे कापड परदेशी रवाना होत आहे. देशात भाजीपाल्याची टंचाई आहे, पण अरब देशात भाजीपाला मुबलक प्रमाणात निर्यात होत आहे. केवळ गरीबांनाच नव्हे, तर मध्यम वर्गीयांना देखील, मांस विकत घेऊन खाणे परवडेनासे झाले आहे, कारण मांस, मटन यांची परदेशात खूप मोठ्या प्रमाणात निर्यात सुरू झालेली आहे. त्यासाठी भरमसाठ किंमत देऊन खेडेगावांतून दुभती जनावरे, शेतीयोग्य बैल, शेळ्या वगैरे कत्तलखान्यांत रवाना होत आहेत. थोडक्यात म्हणजे घरचा राहतो उपाशी, बाहेरचा खातो तुपाशी अशी भयानक अवस्था झालेली आहे. आर्थिक परावलंबनाचे हे दुष्परिणाम आहेत.

या संभाव्य दुष्परिणामांची कल्पना दीनदयाळजींना होती व त्याबाबत ते वेळोवेळी सावधगिरीचा इशारा देत होते. गुजरातमधील एका जाहीर सभेत भाषण करताना ते म्हणतात– "आज डॉलरसाठी आपण पागल झालो आहोत. डॉलर हाच जणू आपला परमेश्वर होऊन बसला आहे. तो मिळविण्यासाठी आपण धर्म, नीती यांकडेही पाठ फिरविली आहे. डॉलर मिळविण्यासाठी आपण केवळ वानर, बेडूक यांसारखे प्राणीच नव्हे, तर आपण जिला पवित्र मानतो त्या गाईलाही मारून परदेशी पाठविण्यास प्रारंभ केला आहे. अशा प्रकारे मिळालेले डॉलर देऊन आपण परदेशातून दुधाच्या भुकटीचे डबे व 'बेबी फूड्स' विकत घेत आहोत. गाईचे कातडे परदेशी पाठवून मिळणाऱ्या डॉलर्सचा उपयोग परदेशातून खताची आयात करण्यासाठी केला जात आहे."

आपल्या आर्थिक प्रगतीचे प्रचलित मापदण्ड चुकीचे आहेत. आपल्या परकीय व्यापाराचेही मापदंड दिशाभूल करणारे आहेत. जोवर सामान्य जनतेच्या प्राथमिक गरजा पूर्ण होत नाहीत तोवर प्रगतीचा आभास निर्माण करणाऱ्या

योजना निरर्थक आहेत. दीनदयाळजी म्हणतात– "डोक्यावरील केसांची झुलपे वाढली म्हणजे तेवढ्यावरून माणसाचे स्वास्थ्य उत्तम झाले असे म्हणता येणार नाही !"

विदेशी सहाय्याची बिकट वाटचाल

काही वेळा असे घडते की, आपण ज्या योजनांसाठी परकीय कर्ज घेतो त्यासाठी लागणारी योग्य यंत्रसामुग्री वा कच्चा माल वराच काळपर्यंत उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे हे कर्ज लगेच उपयोगात येऊ शकत नाही. या पडून राहिलेल्या परकीय कर्जाऊ चलनामुळे मध्यवर्ती बँकेतील परकीय हुंडणावळीच्या साठ्यात वाढ होते. या वाढीव साठ्याच्या आधारे मध्यवर्ती बँकेने चलन निर्मिती केली तर त्यामुळे स्वाभाविकपणेच देशात चलन-फुगवटा होतो. दुसरे म्हणजे, आपल्याला मिळणारे परकीय चलन केवळ चलनासंबंधीच्याच नव्हे, तर इतर अनेक बंधनकारक अटी बरोबर घेऊन येत असते. सर्वसामान्य माणसाची परकीय भांडवलासंबंधी, अशी भावना असते की आपल्याला जे परकीय भांडवल मिळते त्याचा आपल्याला हवा त्याप्रकारे उपयोग करण्यास आपण स्वतंत्र असतो. वस्तुस्थिती तशी नसते. येणारी परकीय मदत ही सर्वसामान्यपणे धनको राष्ट्राने मान्यता दिलेल्या प्रकल्पांशी व उत्पादन-पद्धतीशी निगडित असते. या अटी आपल्याकडून पूर्ण झाल्या नाहीत तर त्या परिस्थितीत ते कर्ज मध्यवर्ती बँकेपाशी पडून राहून त्यातून वरील स्थिती निर्माण होऊ शकते. परकीय मदतीचे बोट धरून येणारी ही समस्याही आपण ध्यानात घेतली पाहिजे.

परकीय मदतीवरोबर चोर-पावलांनी येणाऱ्या आणखी एका समस्येवर प्रकाश टाकताना पं. दीनदयाळजींनी प्रा. विलफ्रेड मँडेलथम यांच्या 'प्रॉस्पेक्ट ऑफ अिंडियन डेव्हलपमेंट' या पुस्तिकेतील निवेदनाचा संदर्भ दिला आहे. या निवेदनाचे विवरण करताना दीनदयाळजी सांगतात की, "परदेशी मदत आणि तद्द्वारा येणारी परकीय यंत्रसामुग्री व उत्पादन-पद्धती यांच्यामुळे शहरीकरण वाढते व शहरी लोकांच्या उत्पन्नात अवास्तव भर पडते." 'महालनोबीस समिती 'ने 'उत्पन्नाची फेरतपासणी' या विषयावर संशोधन करताना असेच मत व्यक्त केले आहे. या प्रक्रियेमुळे चलनस्फिती होते व त्यातून महागाईचे दुष्ट चक्र सुरू होते. अमर्याद परकीय तंत्रज्ञान व अमर्याद शहरीकरण याला दीनदयाळजींचा विरोध होता. त्याचे हेही एक कारण आहे. ते म्हणत असत की, "अगदी अनिवार्य असेल तेव्हाच आणि तेवढीच परकीय मदत घ्यावी, आणि ती

मदत शक्य तो अटीविरहित असावी. ही पथ्ये सांभाळून जे नवे उद्योगधंदे उभे राहतील ते राष्ट्राच्या अर्थविकासाला उपयुक्त ठरतील.

ही पथ्ये न पाळता भरमसाट परकीय भांडवलाची आयात करण्यात आली तर ऋणको राष्ट्राची अवस्था कशी होते याचे वर्णन दीनदयाळजी 'विदेशी मदतीची आस, परावलंबनाचा फास' अशा समर्पक शब्दांत करीत.

अन्य देशांकडून घेतलेल्या भांडवलाने तसेच आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व व जागतिक बँक यांच्या कर्जामुळे ज्या अनेक राष्ट्रांची आर्थिक व राजकीय दुर्दशा झाली त्यांची माहिती श्री. चेरिल पेरियर यांनी 'द डेट ट्रॅप (The Debt Trap) या आपल्या पुस्तकात दिली आहे. त्यांनी या संदर्भात पुढील देशांचा उल्लेख केला आहे. १) फिलिपाईन्स, २) इंडोनेशिया, ३) इंडोचायना, ४) युगोस्लाव्हिया, ५). ब्राझिल, ६) भारत, ७) चिली, ८) घाना.

या संदर्भात पं. दीनदयाळजींनी भारतीय जनसंघाच्या लखनौच्या अभ्यासवर्गात म्हटले होते, " परकीय मदतीच्या कुबड्या फेकून दिल्या तरच भारताची यापुढे प्रगती होऊ शकेल. कारण परकीय मदतीमुळे आपल्या सवयीच बदलून गेल्या आहेत. आपल्याला स्वदेशीच्या महामंत्राचे पार विस्मरण होऊ लागलेले आहे. असे विस्मरण व्हावे अशीच विदेशी शक्तींची योजना आहे. भारताचे आर्थिक प्रश्न, परकीय मदत कमी पडत आहे म्हणून बिकट झालेले नसून जरूरीपेक्षा अधिक मदत येत आहे, त्यामुळे आपण स्वदेशी व स्वावलंबन विसरत चाललो आहोत, म्हणून निर्माण झालेले आहेत. ही मदत आपल्याला उपयुक्त ठरत नसून परकीय राष्ट्रांची मंदी, बेकारी दूर करून त्यांची अर्थव्यवस्था समृद्ध करण्यासाठी तिचा वापर होत असतो."

श्री. चेरिल पेरियर 'The Debt Trap' या ग्रंथात लिहितात, " Nations have failed to develop not because they had too little international money but because they had too much ··· The same medicine which in small doses aids and stimulates the body's own pours of recovery may in massive amounts enervate and addict the patient beyond hope of recovery."

१९८५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'The Debt Shock' या, फ्रेंच पत्रकाराच्या अभ्यासू पुस्तकात 'विदेशी भांडवलाचे स्वदेशीला जे ग्रहण लागते' त्याचे वर्णन 'Slow poisoning' या चपलख शब्दांत केलेले आढळते !

• • •

६

चलननीती आणि अर्थसंकल्पीय नीती

औदयोगीकरणासाठी व आर्थिक विकासासाठी भांडवलाचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असतो. भांडवल-निर्मितीसाठी बचत करण्याची आवश्यकता असते. बचत म्हणजे उत्पादन व उपभोग यांमधील फरक. ज्या देशात राष्ट्रीय स्तरावर उपभोगाची पातळी म्हणजेच जीवनाचे राहणीमान खूप खाली असते, अशा देशात बचत होण्याची फारशी शक्यता नसते. वचत होत नसेल तर भांडवल-वाढ होणार नाही, आणि परिणामी उत्पादनही वाढणार नाही.

'उत्पादन केलेल्या संपत्तीचा उत्पादक-रीतीने केलेला वापर म्हणजे भांडवल' अशी अर्थतज्ज्ञ मॅकार्ड यांनी भांडवलाची व्याख्या केली आहे. याचा सरळ अर्थ असा की, अविकसित राष्ट्रांची अर्थव्यवस्था गतिमान होईपर्यंत उपभोगांवर कडक बंधने घालून प्रत्येक ठिकाणी काटकसर करून बचत करणे. ही बचत उत्पादक-रीतीने गुंतविणे व त्या भांडवलाच्या आधारे उत्पादन वाढवीत नेणे हाच मार्ग युक्त ठरतो. यासाठी सर्वसामान्य जनतेचे सहकार्य, राजकीय नेतृत्वाची सुयोग्य धारणा, आर्थिक शिस्तीचे काटेकोर पालन, स्वदेशीचा अभिमान आणि संयमित उपभोगाची शिकवण या सर्व गोष्टींची गरज असते. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत तसेच साम्यवादी अर्थव्यवस्थेत हा भांडवल उभारणीचा प्रश्न ज्या रीतीने सोडविला जातो, त्यातून सर्वसामान्य जनतेचे आर्थिक शोषण, आर्थिक विषमता व वर्गकलह, आणि धनसत्तेचे व राज्यसत्तेचे केंद्रीकरण याच गोष्टी निर्माण होतात. पं. दीनदयाळजी म्हणतात, – "सर्वसामान्य जनतेला या संकटातून सोडविण्याचा एकमेव मार्ग आहे, तो म्हणजे जनतेत

बचत करण्याची इच्छा व सामर्थ्य निर्माण करणे. राष्ट्रीय उत्पन्न वाढविण्याच्या कामी सर्वसामान्य जनतेचे सहकार्य घेणे अती आवश्यक आहे. उपभोगावरील संयमाचा बचत करण्याच्या कामी खूप उपयोग होतो. या बाबतीत आपली भारतीय संस्कृती विशेष सहाय्यक ठरू शकेल."

ख्यातनाम अर्थशास्त्रज्ञ प्रा. विल्यम मॅकार्ड यांनीही आपल्या 'Springtime of Freedom' या ग्रंथात अप्रगत व अविकसित राष्ट्रांना भांडवल-संचय करण्याच्या बाबतीत कमालीची काटकसर, श्रीमंत वर्गाचा संयमित उपभोग, देशातील साधनसामुग्रीचा सुयोग्य विचार व सीमान्त उपयोग, श्रमप्रधान व लघुयंत्रांवर आधारित उत्पादन-प्रणाली याच गोष्टींचा आग्रह धरलेला आहे.

परंतु बहुतेक सर्व अप्रगत व अर्धविकसित देशांनी पाश्चात्यांच्या अर्थशास्त्रीय संकल्पना ग्राह्य मानून त्या पायावर आपली अर्थव्यवस्था उभारली. इंडोनेशिया, घाना, ब्राझील, फिलिपाइन्स इत्यादी राष्ट्रांनी वरील मुद्यांकडे दुर्लक्ष केल्यामुळे, तसेच तेथील राज्यकर्त्यांनी व श्रीमंत वर्गाने संयमित उपभोगाचे महत्त्व विचारात न घेतल्यामुळे त्यांची अर्थव्यवस्था कोसळली. आपणही पाश्चात्य धर्तीचे प्रचंड प्रकल्प, तुटीचे अर्थसंकल्प, केन्सच्या अर्थशास्त्रानुसार तुटीचा अर्थभरणा (अर्थात केन्सची पथ्ये न पाळता), चलनफुगवटा व चलनाचे अंतर्गत अवमूल्यन या मार्गानेच वाटचाल केली.

अर्थव्यवस्थेत सरकारी हस्तक्षेप, अर्थव्यवस्थेचे सरकारी नियोजन, रोजगार निर्मितीसाठी व मंदी दूर करण्यासाठी सरकारी स्तरावर खर्च हे आपल्या शासनाचे अर्थविषयक धोरण आहे. सरकारी हस्तक्षेपाचा सिद्धांत प्रथम जे. एम्. केन्स यांनी मांडला. हा सिद्धान्त पश्चिमी राष्ट्रांनी युद्धानंतर व भारताने स्वातंत्र्यानंतर स्वीकारला.

सार्वजनिक हिताच्या कामांसाठी सरकारने सतत भांडवल-गुंतवणूक करीत राहून पूर्ण रोजगारी टिकवून धरण्यासाठी, तसेच उत्पादनाला क्रयशक्ति-युक्त मागणी चालू रहाण्यासाठी अर्थव्यवहारात हस्तक्षेप करीत राहिले पाहिजे, तसेच खाजगी भांडवलदारांच्या भांडवल-गुंतवणुकीचे आवश्यक तेथे नियंत्रणही केले पाहिजे, हा केन्सच्या एकूण प्रतिपादनाचा निष्कर्ष आहे. बेकारी निवारण करणे हे सरकारचे काम नाही हा त्या काळी प्रचलित असलेला अर्थशास्त्रीय सिद्धांत केन्सला मान्य नाही. बेकारी निवारण करणे ही शासनाची जबाबदारी आहे असे केन्स म्हणतो. आवश्यक पडल्यास तुटीचा अर्थसंकल्पही

करावा परंतु बेकारी येऊ देता कामा नये, अशी केन्सची ठाम भूमिका होती.

दीनदयाळजी एका मर्यादेपर्यंत केन्सच्या विचारांशी सहमत होते. तथापि त्यांचे त्याच्याशी अनेक बाबतींत मतभेदही होते. विकसनशील देशांची अर्थ-व्यवस्था ही केवळ स्वतःच्या गतीने आपोआप गतिमान राहू शकत नाही, हा दीनदयाळजींनी मांडलेला विचार एका अर्थाने केन्सच्या विचारांशी जुळणारा आहे. परन्तु अविकसित राष्ट्रांना नेहमीच केन्सचे अर्थशास्त्र लागू करणे बरोबर ठरणार नाही, असेही दीनदयाळजी प्रतिपादन करतात. त्यांचे म्हणणे असे की, " केन्सने औद्योगिक भांडवलशाहीपलीकडे आपली विचारकक्षा नेली नाही. पाश्चात्य देशांत भांडवल-उभारणी भरपूर होती. भांडवल-संचयही विपुल होता, यंत्रे कार्यक्षम होती. कारखाने उभारून तयार होते, तंत्रज्ञ व कारागीर काम येण्याची वाट पहात बसले होते. परंतु प्रभावी मागणीच्या अभावी उत्पादन खोळंबले होते. बेकारी वाढली होती, आणि सरकार तत्कालीन अर्थशास्त्रा-नुसार स्वस्थ बसून हे सर्व पहात होते. सार्वजनिक हितासाठी सरकारने भांडवल गुंतवावे हा उपाय केन्सने सुचविला; आणि सरकारने तो अंमलात आणताच, रोजगार मिळालेले बेकार बाजारातील माल खरेदी करू लागले. विजेचे बटन दाबताक्षणीच यंत्रे सुरू व्हावीत त्याप्रमाणे भांडवलशाही देशांत उत्पादनयंत्रणा क्रियाशील होऊन संपूर्ण अर्थव्यवस्था गतिमान झाली. "

दीनदयाळजींचे म्हणणे असे की," पाश्चात्यांपुढील समस्या व आपल्यापुढील समस्या यांमध्ये जो मूलभूत फरक आहे तो ध्यानात घेतला पाहिजे. पाश्चात्य देशांसमोरील प्रमुख समस्या भांडवल व इतर सामुग्री जमविणे ही नाही. या दोन्ही गोष्टी त्यांच्यापाशी विपुल प्रमाणात आहेत. या सर्व साधनांचा जास्तीत जास्त वापर कसा करावा हा त्यांच्या समोरील प्रमुख प्रश्न आहे. आपल्याकडे औद्योगीकरण प्राथमिक अवस्थेत आहेत, भांडवलाची चणचण आहे, आणि कच्च्या शेतमालाचे प्रतिहेक्टरी उत्पादनही कमी आहे. अशा परिस्थितीत सरकारने थोडीफार गुंतवणूक केली तरी तेवढ्यामुळे अर्थव्यवस्था गतिमान होणे अशक्य आहे, म्हणून केन्सचे अर्थशास्त्र भारतासारख्या देशांना लागू पडणारे नाही."

दीनदयाळजी तर याहीपुढे जाऊन म्हणतात की, " केन्सचे अर्थशास्त्रीय सिद्धांत पाश्चात्य अर्थरचनांनाही पूर्णांशाने लागू पडणार नाहीत. कारण भांडवल-शाहीतील आर्थिक शक्तींच्या केंद्रीकरणामुळे विवश होऊन सर्वसामान्य जनतेला

आपल्या उपभोगाची पातळी खाली न्यावी लागते. म्हणजेच केलेले उत्पादन मागणीअभावी अर्थव्यवस्थेला मंदीकडे खेचून नेते."

अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिकाचे मानकरी एफ् ए. व्हॉन् हायेक या संदर्भात लिहितात - "केन्स हे समर्थ अर्थतज्ज्ञ होते. परंतु त्यांनी आर्थिक विश्लेषणाचे इंजिन चुकीच्या रुळाला सोडून दिले. त्यातून प्रगत पाश्चात्य औद्योगिक अर्थव्यवस्था Stag-inflation च्या अंधारमय बोगद्यात अडकल्या. म्हणजेच एका बाजूने सरकारी स्तरावर चलननिर्मिती होत असताना उत्पादन मात्र मंद गतीने चालत होते, बेकारी दूर होत नव्हती आणि चलनवाढीचा परिणाम म्हणून भाववाढ मात्र वेग पकडत होती !"

आर्थिक विकासासाठी भांडवल कोणत्याही मार्गांनी उभारण्यात आले तरी त्याचा मूळ स्रोत शेती व उद्योग यांत निर्माण होणाऱ्या वस्तूंचे अतिरिक्त उत्पादन हाच असतो. चलन-फुगवटा, तुटीचा अर्थसंकल्प, आणि तुटीचा अर्थ-भरणा यांच्या तुलनेने जर प्रत्यक्ष उत्पादन वाढले नाही, तर आर्थिक असमतोल वाढत जाऊन त्याची परिणती भाववाढीत होते. त्याचप्रमाणे चलनवाढीच्या स्वरूपात निर्माण झालेला पैसा अनुत्पादक क्षेत्रात अगर शासकीय खर्चात अधिक प्रमाणात गुंतवला गेल्यास कृषिविकास व औद्योगिक विकास मागे पडतो. त्यातूनच 'स्टॅगइन्फ्लेशन' म्हणजेच चलनवाढ होत असतानाच उत्पादन मात्र कमी होत असल्याची व आर्थिक विकास कुंठित झाल्याची परिस्थिती निर्माण होते. लॉर्ड केन्सने भांडवलशाही अर्थव्यवस्थेत वाजवीपेक्षा जास्त उत्पादन व प्रभावी मागणीचा अभाव यांतून निर्माण होणारी मंदी व बेकारी या संकटांवर सुचविलेला 'सरकारी चलननिर्मिती व वाढते खर्च' हा उपाय अशा प्रकारे निरुपयोगी ठरू लागलेला आहे.

आपल्या देशातही हाच अनुभव येत आहे. एका बाजूने सरकार अधिकाधिक कागदी नोटा छापून प्रचंड खर्च करीत आहे, पण त्या प्रमाणात शेती व औद्योगिक क्षेत्रात उत्पादन वाढत नाही. त्याचबरोबर अमर्याद चलननिर्मिती, महागाई, बेकारी व चलनाची घसरगुंडी इत्यादी कारणांमुळे सामान्य जनतेची क्रयशक्ती पार घसरली आहे. या परिस्थितीचा स्वाभाविक परिणाम म्हणजे उत्पादनशक्ती सामान्यजनांच्या गरजेच्या वस्तूंच्या उत्पादनासाठी कामी न लागता श्रीमंतांची चैन, विलास व अनावश्यक उपभोग यांच्यासाठी अधिक प्रमाणात खर्ची पडू लागली आहे.

चलनाची घसरगुंडी

१९६६ नंतर आपल्या देशात असह्य महागाईचे पर्व सुरू झाले. नियोजनाचे लक्ष्य गाठण्यासाठी सरकारने सतत तुटीचा अर्थसंकल्प केला. सातत्याने सालोसाल चलनफुगवटा झाला, बाजारभाव भडकत गेले. रुपयाची किंमत घसरू लागली. परिस्थिती अशी येऊन ठेपली असताही, सरकारने "तुटीच्या अर्थ-संकल्पाचे" धोरण चालूच ठेवले. आणि अर्थशास्त्रीय नियमांकडे बोट दाखवून त्याचे समर्थन केले.

तुटीचा अर्थसंकल्प म्हणजे सरकारने जमेपेक्षा अधिक खर्च करणे. अशा प्रकारे सरकार जेव्हा जमेपेक्षा जास्त खर्च करू इच्छिते तेव्हा ते त्यासाठी तुटीचा अर्थभरणा करून म्हणजेच कागदी चलन वाढवून जमाखर्चाची तोंड-मिळवणी करते. कागदी नोटांचे चलन फुगवून सार्वजनिक हिताची कामे केवळ सरकारच करू शकते. करण चलन हा सरकारच्या अखत्यारातील विषय आहे. करवाढ करूनही त्या पैशाने सरकार बेकारी निवारण्याची कामे करू शकते. परंतु मंदीचा काळच असा असतो की सरकारला मिळणाऱ्या करांतून शासनाचा नेहमीचा खर्चही भागू शकत नाही. दुसरे म्हणजे कर वाढविले तर ज्या पैशांतून लोक उत्पादनातून बाजारात आलेला माल खरेदी करू शकले असते तो पैसा कररूपाने सरकारच्या तिजोरीत गेल्याने तेवढ्या प्रमाणात खरेदी कमी होऊन मंदीलाच चालना मिळते. सरकारने जनतेकडून अगर बँकांकडून कर्ज घेतले तरच हे शक्य होते. अन्यथा चलन-फुगवटा होऊन भीषण महागाई होते.

आपल्या देशात नेमके हेच घडले. पहिल्या पंचवार्षिक योजनेत तुटीचा अर्थसंकल्प सुमारे ४२८ कोटी रुपये झाला. योजनेच्या एकूण अर्थसंकल्पाच्या एकतीस टक्के एवढे हे प्रचंड प्रमाण होते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत हे प्रमाण आणखीनच वाढले.

तुटीच्या अर्थसंकल्पाबद्दल पं. दीनदयाळजी त्यांच्या··· 'दी टू प्लॅन्स' या पुस्तकात चपखलपणे लिहितात–

"The Government failed to calculate the time-lag between its monetary measures and their fruition."

तुटीचा अर्थसंकल्प हे औषध आहे, अन्न नव्हे. तसेच या औषधाची काही विशेष पथ्ये आहेत. ती पथ्ये न पाळल्यास रोगाला उतार पडण्याऐवजी रोग

बळावत जातो. सरकारने एक तर मंदी नसताना तुटीच्या अर्थभरण्याचा आसरा घेतला आणि दुसरे म्हणजे या अर्थभरण्याचा धनोत्पादक रोजगार-निर्मिती-साठी विनियोग न करता तो शासकीय भरमसाट खर्च व इतर अनुत्पादक कामात खर्च केला.

१९६७ साली या परिस्थितीचे वर्णन डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी पुढीलप्रमाणे केले आहे....

"The most outstanding feature of the 'planned' Indian economy is thus the total absence of a policy frame."

देशाच्या अर्थकारणाची नियोजन-पर्वात एवढी परवड झाली की, जर्मनी-प्रमाणे भारत सरकार रुपया रद्द करून (Demonetisation) नवें चलन सुरू करणार अशा अफवा वारंवार पसरू लागल्या. सामान्य माणसाचे नीतिधैर्य खचू लागले व त्याचा शासनावरील विश्वास डळमळू लागला.

रुपयाच्या घसरत्या किंमतीबाबत दीनदयाळजी फार अस्वस्थ असत. भरमसाट नोटा छापून, त्या चलनात आणणे हे या घसरगुंडीचे एक प्रमुख कारण असते. दीनदयाळजी म्हणत – "कोणी बनावटी नोटा छापल्या तर त्याला त्या गुन्ह्याबद्दल सजा करण्यात येते. सरकार सध्या ज्या बेहिशेबी पद्धतीने नोटा छापीत आहे, ते सरकारचे कृत्यही बेकायदेशीर आणि शिक्षेस पात्र आहे."

१९६१ सालच्या एका भाषणात पं. दीनदयाळजी म्हणाले होते ... "कोणत्याही परिस्थितीत सामान्य माणसाचे मनोबळ कमी होऊ देता कामा नये. यासाठी सरकारने काही पथ्ये पाळणे आवश्यक आहे. मुख्य म्हणजे आपल्या रुपयाची किंमत घसरू देता कामा नये. देशाचे रक्षण करणारा जवान हा ज्याप्रमाणे खरा जवान असला पाहिजे, त्याचप्रमाणे देशाच्या अर्थव्यवस्थेचा पाया जो रुपया तोही खरा पाहिजे. आज आपल्या रुपयांची किंमत घसरत आहे. ही वस्तुस्थिती चिंताजनक आहे. भाववाढ होण्याचे खरे कारण हे आहे."

दीनदयाळजींनी मांडलेला हा मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे. लॉर्ड जॉन केन्स आपल्या The Economic Consequences of Peace या ग्रंथात लिहितात –

"असे सांगतात की, लेनिनने जाहीरपणे म्हटले होते की भांडवलशाही नष्ट करण्याचा सर्वोत्तम उपाय म्हणजे तिची चलनपद्धती खिळखिळी करणे (Debase). लेनिनचे म्हणजे अगदी बरोबर होते. समाजाचा पाया उलथून

टाकण्याचा चलन खिळखिळे करण्याइतका दूरगामी आणि खात्रीचा मार्ग दुसरा कोणताच नाही. ही पद्धत आर्थिक सिद्धांताच्या सर्व शक्ती विध्वंसासाठी वापरते, आणि तीही अशा कौशल्याने की दहा लाखांतला एक माणूस देखील ते ओळखू शकणार नाही."

रुपयाची ही घसरगुंडी टाळण्यासाठी दीनदयाळजींनी अनेक उपाय सुचविले. अनुत्पादक कामांना फाटा देणे, शासकीय खर्च कमी करणे, मूल्यनीती व्यवहार्य बनविणे, राजकीय भ्रष्टाचाराला आळा घालणे, परवाना-पद्धतीत बदल करणे, भांडवल-संचयाकडे लक्ष देणे, आर्थिक नियोजन यथार्थवादी बनविणे आदी उपायांचा त्यात समावेश आहे.

मध्यवर्ती बँकेचे अधिकार

चलनाच्या साठ्यातील वाढ मुख्यतः सरकारी आर्थिक शिस्तीच्या अभावामुळे निर्माण होते. राज्य-सरकारांना केंद्राकडून मिळणाऱ्या अधिकर्ष (ओव्हरड्राफ्ट्स) सवलतीमुळेही ही आर्थिक अंदाधुंदी अधिक दूरवर पसरत जाते. तथापि चलनवाढीचे सगळ्यांत महत्त्वाचे कारण म्हणजे केंद्र-सरकारने रिझर्व्ह बँकेकडून घेतलेली कर्जे, म्हणजेच तुटीचा अर्थभरणा.

रिझर्व्ह बँकेजवळ कागदी चलनाच्या म्हणजे नोटांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक असलेले अधिकार नाहीत. सरकारने बँकेजवळ आपली रुपयांतील ऋणपत्रे ठेवली की बँकेला, सरकारला कर्ज द्यावे लागते; आणि हे कर्ज चलनी नोटांच्या स्वरूपात असल्याने आपोआप चलनसाठा वाढतो. रिझर्व्ह बँकेकडील आपल्या ऋणपत्रांचा साठा सरकारला केव्हाही वाढविता येतो. कारण गरजेनुसार ऋणपत्रे निर्माण करण्याचे सारे अधिकार सरकारच्या हाती आहेत. तुटीच्या अर्थभरण्यातून निर्माण होणाऱ्या द्रव्य पुरवठ्याच्या संदर्भात एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती ही की, पैशाच्या पुरवठ्याबाबत कोणतेही ठोस व दीर्घकालीन धोरण नाही. ही गोष्ट फार गंभीर आहे. कारण एक तर हा रोख पैसा असल्याने तुटीच्या अर्थभरण्याने त्याच्या काही पटींनी चलनवाढ होत राहते; आणि दुसरे म्हणजे एकदा अर्थव्यवस्थेत घुसलेला हा पैसा कालांतरानेही तेथून बाहेर पडत नाही.

या संदर्भातील अर्थ-मंत्रालयाची भूमिका पाहता असे दिसते की, तुटीच्या अर्थभरण्याचा द्रव्य-पुरवठ्याशी जो संबंध असतो त्याचा व किंमतवाढीच्या

परिणामांचा या मंत्रालयाने स्वतंत्रपणे व जबाबदारीने विचारच केलेला नसतो. सरकारचे एक अंग एवढीच भूमिका त्या मंत्रालयाची राहात आलेली आहे.

या बाबत पं. दीनदयाळजी असे म्हणत असत की, आर्थिक शिस्त निर्माण व्हावी यासाठी अविकसित देशांनी द्रव्यनीती व अर्थसंकल्पीय नीती संकुचित पक्षीय दृष्टिकोन सोडून, दीर्घकालीन परिणामांचा मागोवा घेऊन आखली पाहिजे. तसेच या बाबतीत राजसत्तेच्या तालावर बदलत राहू नये, तर देशाची मध्यवर्ती बँक संपूर्णपणे स्वायत्त ठेवून तिचा अंकुश अर्थव्यवस्थेवर राहावा. दीनदयाळजींचे असे म्हणणे होते की, देशाच्या मध्यवर्ती बँकेला न्यायपालिके-सारखे अधिकार दिले पाहिजेत. सरकारचे अर्थ-मंत्रालयही द्रव्यनीती रावव-ण्याच्या बाबतीत अशा प्रभावी मध्यवर्ती बँकेला जबाबदार राहील अशी व्यवस्था करावयास हवी. दीनदयाळजी या संदर्भात जपानच्या बँकिंग-क्षेत्राचे उदाहरण देत. त्याचप्रमाणे राज्यसरकारे त्यांच्या ओव्हर ड्रॉफ्ट्ससाठी मध्यवर्ती बँकेच्या धोरणांना बांधील असावीत असाही विचार त्यांनी अभ्यास-वर्गातून मांडलेला आढळतो.

भाववाढीवर उपाययोजना म्हणून स्थूल मानाने चलनविषयक उपाय-योजना, कोषागारविषयक उपाय, द्रव्यनीती व अर्थसंकल्पीय नीती इत्यादी उपाय महत्त्वाचे मानले जातात. उत्पादनात वाढ हा त्याहूनही प्रभावी उपाय मानला जातो. किंमतींचे नियमन, वस्तूंचे नियंत्रित वाटप व सार्वजनिक वितरणव्यवस्थेचे प्रभावी जाळे हेही उपाय सुचविले जातात.

वरील सर्व प्रकारचे उपाय दीनदयाळजींनीही अनेक भाषणांतून चर्चिले होते. परंतु त्यांनी त्याचबरोबर अशा भाववाढीचा एक भयानक दुष्परिणामही दाखवून दिला होता. ते म्हणत, " भाववाढीच्या काळात राहणीमानाचा खर्च उत्पन्नाच्या व्यस्त प्रमाणात वाढतो. बचत संपू लागते. अशा अवस्थेत कष्ट करणे, काटकसर करणे या आदर्शांचाच समाजाला तिटकारा वाटू लागतो. अशा प्रकारे जे सामाजिक अधःपतन सुरू होते ते हळू हळू समाजजीवनाला सर्वांगांनी पोखरू लागते.

या बाबत पं. दीनदयाळ उपाध्याय यांनी जर्मनीतले एक उदाहरण दिले आहे. चलनविषयक घसरगुंडीबाबत त्यांनी जर्मनीचे जे उदाहरण दिले होते, काहीसे तशाच प्रकारचे हे उदाहरण आहे. जर्मनीतील अती भाववाढीतील

परिस्थितीत नैतिक मूल्यांचा कसा व किती ऱ्हास झाला होता याची कल्पना देणारी ही घटना आहे. गोष्ट आहे एका काटकसरी वडिलांची व त्यांच्या उधळ्या मुलाची. वडील खूप परिश्रम करून व काटकसर करून उरलेली पैन्-पै बँकेतील बचतखात्यात जमा करीत. मुलगा मात्र त्याचे कमाईचे पैसे दारू पिण्यात उधळून टाकीत असे. पुढे जर्मनीतील भाववाढीमुळे वडिलांनी बँकेत ठेवलेल्या बचतीच्या पैशाचे मूल्य खूप घटले. ते इतके कमी झाले की उधळ्या मुलाकडे साठलेल्या दारूच्या रिकाम्या बाटल्यांची किमत वडिलांच्या बँकेतील बचतीहून अधिक भरली !

• • •

७

भांडवलाची उधळपट्टी

गरीब विकसनशील राष्ट्रातील भांडवलाचा प्रश्न परकीय मदतीवर विसंबून नव्हे, तर संयमित उपभोग, अनुत्पादक खर्चांना फाटा, शासकीय खर्चात बचत, सार्वजनिक क्षेत्रांच्या खर्चावर अंकुश, उत्पादक कामांना अग्रक्रम यांसारख्या उपायांनी सोडविला पाहिजे, असे दीनदयाळजींचे प्रतिपादन असे. राज्यकर्त्यांनी व धनसंपन्न लोकांनी स्वतःच्या आचरणाने साधेपणाचा आदर्श लोकांसमोर ठेवला तर त्यातून सामान्य जनतेला बचतीची प्रेरणा मिळू शकेल. परंतु आज आपण निवडणुकींच्या सत्तालक्षी राजकारणामुळे, तसेच पाश्चात्य जीवन-पद्धतीच्या अंधानुकरणामुळे आपल्या समाजाची उपभोगाची इच्छा खूप वाढवून ठेवली आहे. याचा परिणाम असा झाला आहे की, उत्पादनातून होणाऱ्या नफ्याचा उपयोग उत्पादक-कार्यासाठी पुनर्गुंतवणुकीत न होता राज्यकर्ते व श्रीमंत वर्ग तो पैसा चैनीपायी उधळून टाकीत आहेत. प्रा. मॅकार्ड म्हणतात... "आफ्रिका, इंडोनेशिया व भारत येथे मी राहिलेल्या घरांपैकी काही घरे अशी होती की तेथील वैभवाचा अमेरिकेतील कोटयाधीशांनाही अतिशय हेवा वाटावा!"

प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. वि. म. दांडेकर यांनी 'भारतातील दारिद्र्य' या विषयावर एक ग्रंथ लिहिला आहे. संयमित उपभोगाशिवाय भारताचा दारिद्र्य-निवारणाचा प्रश्न सुटू शकणार नाही, असे त्यांनी या ग्रंथात म्हटले आहे. त्यांच्या म्हणण्याचा थोडक्यात आशय असा : 'देशाचे दारिद्र्य दूर करण्या-साठी जे भांडवल आवश्यक आहे ते आपणास अंतर्गत सामुग्रीतून उभे केले

पाहिजे. त्यासाठी श्रीमंत, उच्च मध्यम वर्ग व उद्योगपती या सर्वांनी आपले उपभोग कमी करून, खर्चावर मर्यादा घालून, संयमाने राहून, देशाच्या प्रगतीचे उत्तरदायित्व स्वीकारले पाहिजे. यासाठी अतिश्रीमंत व श्रीमंत यांनी दहा टक्के, उच्च मध्यम वर्गाने साडेसात टक्के व सामान्यांपेक्षा थोडे अधिक जीवनमान असलेल्या लोकांनी पाच टक्के उपभोग कमी केले तरी देशाच्या आर्थिक विकासासाठी प्रचंड भांडवल उभे राहील व देशाच्या समस्या सुटू शकतील. यासाठी शहरी व ग्रामीण भागांतील श्रीमंतांनी आपणहून पुढे आले पाहिजे.'

तात्पर्य असे की, उत्पादन आणि उपभोग या दोन्ही बावतींत संयम व देशहिताचे भान ठेवणे आवश्यक आहे. देश आत्मनिर्भर करावयाचा असेल तर संयमित उपभोग हेच धोरण असले पाहिजे. या महत्त्वाच्या प्रश्नाकडे होणारे दुर्लक्ष हेच अर्धविकसित देश सतत कर्जाच्या जाळ्यात अडकण्याचे मुख्य कारण होय.

आधुनिक पाश्चात्य अर्थशास्त्राने गृहीत धरलेल्या 'अमर्याद उपभोग' या सिद्धांताला पं. दीनदयाळजींप्रमाणेच डॉ. शूमाकरही आव्हान देताना दिसतात.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील सर्वांत मोठा व अतिसमृद्ध देश म्हणून अमेरिकेचे नाव घेतले जाते. आश्चर्य असे की, या देशात सध्या जो एक नवप्रवाह सुरू झाला आहे तो संयमित उपभोगाचा पुरस्कर्ता आहे.

आज अमेरिकेतील सुमारे पन्नास लाख लोक संयमित उपभोगाच्या या नवप्रवाहात सामील झाले आहेत. या नवप्रवाहामागील कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न अमेरिकेतील 'स्टॅनफोर्ड रिसर्च इन्स्टिटचूट' या संस्थेने केला. साधी रहाणी, उच्च विचारसरणी, चिंतन-मननाशाठी बाह्य फापटपसाऱ्यापासून मुक्तता, नैतिक मूल्यांच्या घसरगुंडीला अटकाव अशा अनेकविध आंतरिक कारणांसाठी ही नवीन चळवळ सुरू झाली असल्याचे या संस्थेला आढळून आले.

आपल्या येथे तर भगवान् बुद्ध, महावीर, महात्मा गांधी यांसारख्या अनासक्त थोर पुरुषांची फार श्रेष्ठ परंपरा आहे. परंतु आपल्या राज्यकर्त्यांच्या व शासकीय अधिकाऱ्यांच्या मनाला आपण जनतेच्या श्रमाचे, पैशाचे केवळ विश्वस्त आहोत, उपभोगशून्य स्वामी आहोत, असा विचारही कधी शिवत नाही. कृष्ण मेनन यांचे जीप-प्रकरण, कृष्णम्माचारींचे मुंदडा-प्रकरण, संजय गांधी यांचे मारुती मोटार-प्रकरण, अंतुलेंचे सिमेंट-प्रकरण, साखर लॉबीचे 'ऑन मनी'-प्रकरण अशी किती प्रकरणे सांगावी? भ्रष्टाचारातून अमाप पैसा गाठी

बांधताना राज्यकर्ते, काळाबाजारवाले, व्यापारी आणि त्यांना साथ देणारे सरकारी कर्मचारी यांना रोजच्या जीवनावश्यक वस्तूही खरेदी करू न शकणाऱ्या, एक वेळचे जेवणही पोटभर न मिळणाऱ्या आपल्या कोट्यवधी बांधवांची आठवण होऊ नये ही परिस्थिती दीनदयाळजी म्हणतात त्याप्रमाणे 'आपल्या बदललेल्या जीवन-मूल्यांचेच गमक समजावयाचे काय ?'

अर्थव्यवस्थेची गतिमानता

एखादी अर्थव्यवस्था जेव्हा शिथिल होते तेव्हा तिचे स्वतः होऊन सुधारण्याचे सामर्थ्य नाहीसे होते. तिला गतिमान करण्यासाठी योजनापूर्वक प्रयत्न करावे लागतात. स्वतंत्र देशात ही जबाबदारी सरकारवर स्वाभाविकपणेच येऊन पडते. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी सरकारला अर्थव्यवस्थेसंबंधी धोरण ठरवून योजना आखावी लागते. परंतु या बाबतीत सरकारच्या हातून बऱ्याच वेळा मूलभूत स्वरूपाच्या चुका होत राहून अर्थव्यवस्थेला गती देण्याऐवजी, सरकार स्वतःच अर्थव्यवस्थेचे अंग बनून जाते. परिणामी जी उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून सरकारने अर्थव्यवस्थेला गती देण्याचे प्रयत्न सुरू केलेले असतात, त्यांचेच विस्मरण होते. (भारतीय अर्थनीती)

पंडित दीनदयाळजींच्या वरील विचारांची अनेक देशांच्या आणि आपल्याही देशाच्या उदाहरणावरून प्रचीती येते.

मिश्र अर्थव्यवस्थेचा विकास करताना नियोजनातील धोके व नियोजनाची देखभाल यांबाबत सतर्क राहण्यास सांगणारा हा विचार आहे.

आपल्या योजनांवर खर्च होणाऱ्या एकूण रकमेपैकी योजनांतर्गत प्रशासकीय विभागावर होणाऱ्या रकमेचे आकडे पाहिले तर याचा प्रत्यय येईल. सरकारी योजनांचा व त्यासाठी होणाऱ्या खर्चाचा जनतेच्या जीवनमानावर बराच परिणाम होत असतो. हा खर्च जर उत्पादक बाबींवर होत असेल तर त्यातून रोजगार व उत्पादन यांत वाढ होऊन जीवनमान उंचावू शकते. परंतु तसे नसेल तर प्रत्यक्ष लाभ काहीच न होता, खर्चाचा बोजा मात्र वाढत जातो. आपल्या येथे हेच झाले आहे. नियोजनाच्या नावावर शासकीय खर्च आणि सार्वजनिक क्षेत्रातील अनुत्पादक खर्च भरमसाट वाढलेले आहेत.

प्रशासकीय खर्चाचे प्रमाण कसकसे वाढत गेले हे दर्शविणारे पुढील कोष्टक डोळे उघडणारे आहे. सरकारी खर्चाला कात्री लावण्याचे कागदी आदेश

सुटले, पण प्रत्यक्षात फारसे काही घडले नाही.

वर्ष	केंद्र व राज्य सरकारांचा खर्च (कोटी रुपये)	राष्ट्रीय उत्पन्नाशी प्रमाण
१९५१–५२	१०२६	१०.३ %
१९५६–५७	१७२१	१४.८ %
१९६५–६६	५४८२	२८.३ %
१९७१–७२	१०५११	२८.६ %
१९७५–७६	१९९१२	३३.९ %
१९७७–७८	२५२७६	३६.०० %

म्हणजे एकुण राष्ट्रीय उत्पन्नाच्या १/३ पेक्षाही अधिक रक्कम प्रशासकीय व्यवस्थेवर खर्च होते. त्यामुळे स्वाभाविकपणेच विकासकामे मागे पडतात. तसेच महसुली खर्चावर कोणतेही नियंत्रण नसल्याने चलनवाढ, महागाई, करांचा बोजा, टंचाई यांत सातत्याने वाढ होत आली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून सार्वजनिक प्रकल्पांवर अधिकाधिक गुंतवणूक होऊ लागली. पहिल्या योजनेत ही गुंतवणूक १३६० कोटी रुपये होती. ती तिसऱ्या योजनेत ८५७७ कोटींवर पोहोचली. आणि याबरोबर व्यवस्थापकीय खर्चातही वाढ होत गेली. सार्वजनिक प्रकल्पांतील कर्मचाऱ्यांच्या केवळ पगारापोटी १९७९ मध्ये १४०७ कोटी रुपये खर्ची पडले होते. या खर्चाचे प्रमाण प्रतिवर्षी वाढत आहे. आणि एवढा खर्च होऊनही यांपैकी अनेक प्रकल्प प्रचंड तोट्यात चालत आहेत. हा तोटा पुनः चलनवाढ, तुटीचा अर्थभरणा व वाढीव कर यांतून भरून काढण्यात येत असतो. हा खर्चाचा बोजा शेवटी सर्वसामान्य नागरिकांवरच येऊन पडतो. उत्पादनात वाढ करून गरिबांचे जीवनमान उंचावणे हा नियोजनाचा प्रमुख हेतू असतो परंतु नियोजन-खर्चातील फार मोठा भाग उत्पादनवाढीऐवजी सरकारी नोकरशाहीवर म्हणजेच अनुत्पादक विभागावर खर्च होत असेल तर हे उद्दिष्ट कसे साध्य होणार?

नियोजनातील चुकीची क्रमवारी, परक्यांचे ऋण काढून सण साजरा करण्याचे शासनाचे धोरण, जीवनावश्यक उपभोग्य वस्तूंच्या निर्मितीऐवजी उत्पादक व चैनीच्या वस्तूंच्या उत्पादनाला दिले जाणारे बेहिशोबी प्रोत्साहन, त्यामुळे निर्माण होणारी जीवनावश्यक वस्तूंची टंचाई, शासकीय यंत्रणेतील भ्रष्टाचार व उधळपट्टी, उत्पादक व ग्राहक यांमधील निरनिराळ्या मध्यस्थांनी

चालविलेली लूट आदी कारणांमुळे उपभोग्य वस्तूंच्या किंमती सतत वाढत जातात. अशा प्रकारे जीवनावश्यक वस्तूंचे भाव वाढू लागले म्हणजे मग लोकांची ओरड सुरू होते, मग सरकारला काही ना काही मार्ग काढावा लागतो. येथेही पुनः मूलगामी उपाय योजण्याऐवजी शासनाचा सारा भर तात्पुरत्या व थातुरमातुर उपायांवरच असतो. ही उपाययोजना प्रामुख्याने दोन प्रकारची असते.

१) नियंत्रणे, २) वाढत्या महागाईच्या अनुषंगाने वेनतवाढ.

नियंत्रणे

किंमतीवर नियंत्रणे ज्या कारणांसाठी घातली जातात त्यांतील प्रमुख कारणे अशी : जीवनावश्यक वस्तूंचे भाव सामान्य जनतेच्या आटोक्यात ठेवणे. चैनीच्या वस्तूंमधून किंवा मक्तेदारी स्वरूपाच्या उदयोजकांनी उत्पादन केलेल्या वस्तूंमधून होणारा नफा सरकारी तिजोरीकडे वळविणे, किंवा ज्यांच्या किंमती नियंत्रित करावयाच्या त्या वस्तूंमधील दुव्यांचा आर्थिक धोरणाच्या दृष्टीने उपयोग करून घेणे. पंडित दीनदयाळजी म्हणतात, – "आपल्या येथील किंमत नियंत्रणांच्या बाबतीत यांपैकी कोणतीच भूमिका असल्याचे आढळत नाही. सार्वजनिक दडपणे, सवंग लोकप्रियता आणि तात्कालिक भेडसावणाऱ्या समस्या यांचाच प्रभाव नियंत्रणविषयक धोरणावर पडलेला दिसतो. या सर्वांचा परिणाम म्हणजे आपल्या देशातील नियंत्रणे अयशस्वी ठरली आहेत. भाववाढ रोखून धरण्याचे अपेक्षित परिणाम त्यातून साध्य झालेले नाहीत."

या संदर्भात १९२० सालातील जर्मनीतील एका हुशार पाव-विक्रेत्याची गोष्ट उल्लेखनीय आहे. एक पाव तयार करण्यासाठी त्याला दहा हजार मार्क खर्च येई. कारण बेहिशेबी चलनवाढीमुळे मार्कची किंमत पार घसरली होती. परंतु सरकारी नियंत्रणामुळे त्याला पाव अवघ्या शंभर मार्कला विकावा लागे. या कोंडीतून मार्ग काढण्यासाठी त्याने एक युक्ती योजली. गिऱ्हाइकाला पाव हवा असल्यास त्याला या विक्रेत्याचा कुत्रा दहा हजार मार्कला विकत घ्यावा लागे. गिऱ्हाईक कुत्रा विकत घेऊन मग पाव विकत घेई. परंतु जीवनावश्यक वस्तूंची माणसांना देखील अतिशय टंचाई असल्याने कुत्रा सांभाळणे गिऱ्हाइकाला कठीण होते. म्हणून पाव घेतल्यानंतर पावाबरोबर घेतलेला कुत्रा गिऱ्हाइक सोडून देत असे. तो कुत्रा सुटल्याबरोबर आपल्या मूळ मालकाकडे म्हणजे पावविक्रेत्याकडे परत येई व पुनः पावाबरोबर नव्या गिऱ्हाइकाला विकला जाई. स्वातंत्र्योत्तर

काळातील काँग्रेसी शासनाने या जर्मन पावकिक्रेत्याकडून सामान्यज्ञान प्राप्त केले असते तर भावनिर्धारित नीती, नियंत्रणे व काळा पैसा यांबाबत त्याला व्यवहार्य धोरण आखता आले असते.

वाढत्या महागाईचा प्रश्न, वाढता महागाई भत्ता देऊन सोडविण्याच्या सरकारच्या धोरणासंबंधीचे दीनदयाळजींचे विचारही असेच प्रश्नाच्या मुळाला हात घालणारे होते. त्यांचे असे प्रतिपादन असे की, " वस्तूंच्या किंमतवाढीला कारणीभूत असणारे इतर घटक कायम आहेत तोवर केवळ वेतनवाढ करून मूळ प्रश्न सुटणार नाही. म्हणून सरकारने वेतनवाढीऐवजी वस्तूंची भाव-पातळी स्थिर राखण्यावर आपले सर्व लक्ष केंद्रित केले पाहिजे. वेतनधोरण ठरविताना किंमतीचे स्थैर्य विचारात घेतले पाहिजे. " या दीनदयाळजींच्या विचारांचे मजूर-संघटनांनीही स्वागत केले होते. कारण वेतनवाढ होऊनही, वस्तूंच्या किंमती सतत वाढत असल्यामुळे, असली वेतन (Real Wage) सतत कमी कमीच होत गेले. केवळ चलनाच्या स्वरूपात वेतनवाढ (Monetary Wages) वाढ होते, आणि तेही केवळ संघटित श्रमिक क्षेत्रातच !

दीनदयाळजींचे म्हणणे असे होते की, " चुकीच्या पद्धतीने लादलेल्या नियंत्रणांतून चढ्या किंमतींची अर्थव्यवस्था निर्माण होऊन काळ्या बाजाराची प्रवृत्ती वाढीस लागली व काळ्या पैशाची समांतर अर्थव्यवस्था निर्माण झाली. लखनौच्या अभ्यासवर्गात पं. दीनदयाळजींनी या विषयाचा आणखी एक पैलू उलगडून दाखविलेला दिसतो. ते म्हणतात – " राष्ट्रीय उत्पन्नाची वाढ ज्या वेगाने आपल्या देशात झालेली आहे, त्यापेक्षाही जास्त वेगाने काळा पैसा वाढत गेलेला असावा. परंतु राजकीय दडपणांमुळे शासन या काळ्या पैशाचा कायदेशीर प्रतिकार करू शकले नाही. "

म्हणजे, राजकीय भ्रष्टाचार व राजकीय दडपणांखाली कुंठलेली अर्थ-व्यवस्था यांचे मूळ कोठे आहे यावर दीनदयाळजींनी बोट ठेवले आहे.

करपद्धती

१९६१ साली करपद्धतीच्या संदर्भात पं. दीनदयाळजींनी गुजरातमधील एका भाषणात म्हटले होते – " आपल्या पंचवार्षिक योजनेमध्ये कितीतरी पैसा पाण्यासारखा खर्च होत असतो. योजनांना पैसे कमी पडू लागले की, सरकार जनतेवर नवे नवे कर लादते. एकट्या केंद्र-सरकारनेच आतापर्यंत एक

हजार कोटी रुपयांहून अधिक कर लादले आहेत. राज्य-सरकार आणि नगर-पालिका करवाढ करतात ती वेगळीच. याशिवाय निरनिराळ्या प्रकारचे नवे कर सुचविण्यासाठी सरकारने एक ' फायनान्स कमिशन ' नियुक्त केले आहे. या सततच्या करवाढीमुळे महागाई वाढत जाते व रुपयांची क्रयशक्ती घटत जाते " हे स्पष्ट करून पं. दीनदयाळजी म्हणतात,—" अशा प्रकारे कर वाढल्या-मुळे वस्तूंच्या किंमती परत वाढतात. म्हणून सरकारने वेतनवाढ करण्याऐवजी वस्तूंचे भाव स्थिर ठेवण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. "

" करयोजनेबाबत सरकारपाशी कोणत्याही शास्त्रीय धोरणाची रूपरेषा नाही " हा पंडितजींचा आक्षेप खराच होता. अंदाजपत्रकात तूट वाढली की कर वाढविण्यात येतात. त्यातही अप्रत्यक्ष कर अधिक असतात. त्यामुळे सामान्य माणसावर अधिक बोजा पडतो व आर्थिक विषमता वाढते. आर्थिक विषमता निरनिराळे कर लादून कमी करता येईल हा सरकारचा दावा चूकीचा आहे हे स्पष्ट करताना दीनदयाळजी म्हणतात – " आपल्या पाश्चात्य धर्तीच्या नियोजना-मुळे उद्योगधंद्यांचे व त्याबरोबरच संपत्तीचे केंद्रीकरण होणे अपरिहार्य आहे. देशातील आर्थिक विषमता दूर करावयाची असेल तर त्या बाबतीत करपद्धतीचा फारसा उपयोग नाही. अर्थव्यवस्थेचे विकेंद्रीकरण हाच त्यावर उपाय आहे. "

करविषयक विवेचन करताना दीनदयाळजींनी अर्थव्यवस्थेतील सततच्या चलनवाढीच्या प्रक्रियेकडे लक्ष वेधून एका मूलभूत विचाराचा मागोवा घेतलेला दिसतो. ते म्हणतात, " भाववाढीत परिणाम होणारी चलनवाढ ' अप्रत्यक्ष करवाढ ' करण्याचाच प्रकार असून अप्रत्यक्ष कर हे नेहमी गरीबांवरच अधिक बोजा टाकीत असतात. तेव्हा या प्रकारच्या द्रव्यनीतीचाही करवाढीचे परिणाम (Incidence of Taxation) तपासताना विचार व्हावयास हवा. "

• • •

८

नियोजन

नियोजनातील चुकीची क्रमवारी, अर्थविकासाचा विविध क्षेत्रांतील असमतोल, परकीय मदतीवर अत्याधिक मदार, साध्य-साधन-विवेकाचा अभाव आणि या गोष्टींचे एकूण अर्थव्यवस्थेवर झालेले तात्कालीन व दूरगामी दुष्परिणाम यांचे विश्लेषण दीनदयाळजींच्या दृष्टिकोनातून येथवर करण्यात आले आणि त्यावरील उपाय कोणते याचेही विवेचन त्या त्या प्रसंगी करण्यात आले आहे. असे म्हणता येईल की, बिरबल बादशाहाच्या प्रसिद्ध कथेतील, घोडा अडला का ? भाकरी करपली का ? आणि पाने सडली का ? या तिन्ही प्रश्नांचे ' न फिरविल्याने ' हेच एक उत्तर होते, त्याचप्रमाणे अर्थव्यवस्थेत आढळून येणाऱ्या निरनिराळ्या समस्यांचे एकच एक कारण सांगावयाचे झाले तर ते ' चुकीचे नियोजन ' या शब्दात सांगता येईल. आतापर्यंतच्या विवेचनात त्या त्या प्रसंगी दीनदयाळजींचे नियोजनासंबंधीचे विचार नमूद करण्यात आले असताही, त्यांतील काही विचारांचे संकलित रूपाने पुनरावर्तन करणे, प्रतिपाद्य विषयाचे सूत्र सुदृढ होण्यासाठी उपयुक्त ठरेल असे वाटते.

प्रत्येक देशाला त्याची स्वतःची अशी विशिष्ट ऐतिहासिक, सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती असते. त्यामुळे एखाद्या समाजापुढील समस्या सोडविण्यासाठी जे उपाय सुचविले वा योजले जातात तेच उपाय दुसऱ्या वेगळ्या परिस्थितीत रहाणाऱ्या समाजाला जसेच्या तसे लागू पडतीलच असे समजणे चुकीचे आहे. पाश्चात्यांचे अर्थशास्त्र एक तर औद्योगिक भांडवलशाही अथवा तिच्या प्रतिक्रियेतून पुढे आलेला समाजवाद यांच्या भोवतीच फिरताना

दिसते. त्यांचे अर्थशास्त्रांचे नियम सार्वदेशिक वा त्रिकालाबाधित नाहीत.

आपले व पाश्चात्यांचे जीवनादर्श हे पूर्णपणे वेगळे आहेत. म्हणूनच केवळ नव्हे, तर देश व काल यांच्या भिन्नत्वामुळे आपल्या देशाच्या आर्थिक विकासाचा मार्ग हा पाश्चात्यांच्या विकासाच्या मार्गाहून निश्चितपणे भिन्न असावयास हवा.

लोकशाहीप्रधान देशात सरकार चलनविषयक धोरणाने, किंमत व वेतन-विषयक धोरणाने, तसेच आंतरराष्ट्रीय व्यापाराचे नियंत्रण आदी मार्गांनी अर्थव्यवस्थेतील व्यवहार चालवीत असते. तेथे सरकारचे नियोजनासंबंधीचे कार्य केवळ आर्थिक धोरण निश्चित करणे व अंदाजपत्रक सादर करणे या गोष्टींपुरतेच मर्यादित राहाते. सरकार प्रत्येक क्षेत्राची व घटकाची तपशील-वार आखणी करीत नाही. अशा आर्थिक नियोजनाला बृहत् आर्थिक नियोजन (Maero Economie Planning) जसे म्हणतात. या उलट जेव्हा शासन अर्थ-व्यवस्थेची लहान लहान उद्दिष्टे निश्चित करून अतिसूक्ष्म व्यवहारांचेही नियंत्रण करते तेव्हा त्यास अणू-आर्थिक-नियोजन (Micro Economic Planning) असे म्हणतात. सोव्हिएट रशिया व युरोकम्युनिझम मानणारी पोलंड, हंगेरी, इत्यादी राष्ट्रे दुसऱ्या पद्धतीचे अवलंबन करतात; तर अमेरिका, इंग्लंड इत्यादी देशांतील नियोजनाचे स्वरूप पहिल्या प्रकारचे असते.

आपल्या देशाने आर्थिक नियोजनाची आखणी करताना दोन्ही पद्धतींचे एकत्रीकरण केले. परंतु त्यातून प्रभावी नियोजन साधता आले नाही. पं. दीनदयाळजींनी याबाबत मधला मार्ग सुचविला आहे. त्यांच्या मते सरकारने अगदी थोडे व अपरिहार्य असे मोठे उद्योग चालवावे. अवजड यंत्रसामुग्री लागणारे व मूलभूत स्वरूपाचे (Infra structural) आणि संरक्षणाच्या साहि-त्याचे मोठमोठे प्रकल्प जरूर हातात घ्यावेत व त्यानंतर मुद्रा, चलननिर्मिती किंमती-वेतन स्थैर्य, अंदाजपत्रके आदी मार्गांचा अवलंब करून उरलेल्या फार मोठ्या खाजगी उद्योगधंद्यांचे व अर्थव्यवहाराचे नियमन प्रभावी नियंत्रणांच्या (Strategic Controls) द्वारे करून आर्थिक विकास साधावा.

अर्थव्यवस्थेला नियोजनाद्वारे सरकारने गती जरूर देत रहावे, तथापि सरकारने स्वतःच अर्थव्यवस्थेचे फार मोठे अंग बनून राहू नये, असे दीनदयाळजींचे प्रतिपादन असे. ते असे म्हणत असत की, अर्थव्यवस्थेत क्रांतिकारी परिवर्तन संपूर्ण जनतेच्या सहकार्यानेच येऊ शकते. नियोजनात जनतेचा सहभाग ही

अत्यंत आवश्यक गोष्ट असते.

देशाचे आर्थिक नियोजन खालून वर सरकले पाहिजे. खेड्यापासून वर सरकत केंद्रापर्यंत पोहोचले पाहिजे. म्हणूनच केंद्रीभूत आर्थिक नियोजनाला दीनदयाळजींचा विरोध होता. केंद्रीभूत नियोजनात सामान्य जनतेच्या उत्स्फूर्त व सृजनशील सहभागाला स्थान नसते आणि जनसामान्यांच्या आर्थिक विकासाला प्राधान्यही केवळ कागदोपत्रीच राहाते असे ते म्हणत असत.

'भारतीय अर्थनीती' या पुस्तकात दीनदयाळजी म्हणतात, "कोणत्याही नियोजनपर्वात जनतेचे स्थान शासनाने हिरावून घेऊ नये. हे स्थान जर शासनाने आपल्याकडे घेतले तर त्यामुळे कार्यक्षमता, सृजनशीलता व भगीरथ प्रयत्नांची प्रेरणा आदी सद्गुण सामान्य जनतेतून हळूहळू लुप्त होतात. आर्थिक विकास व मानवी स्वातंत्र्य यांना ग्रहण लागते.

या संदर्भात 'पोलिटिकल डायरी' मध्ये ते म्हणतात–" In our country after independence, the Government should have told the people its limitations in principle and in practice. But it did not. On the contrary, by adopting the ideal of a welfare state, and later of a Socialistic state it made the people all the more dependent upon the Government."

आज खेड्यापाड्यांपासून तर थेट दिल्लीपर्यंत जनतेच्या कर्तृत्वाऐवजी सरकारी घोषणा व सरकारी योजना यांचाच बोलबाला चालू आहे. यांतून समाजाची उपक्रमशीलता लुप्त होत चाललेली आहे. हाच अनुभव समाजवाद आणण्याच्या इरादयाते भरमसाट सरकारी हस्तक्षेप करीत नियोजनाची अंमलबजावणी करणाऱ्या घाना, मेक्सिको, ब्राझिल, इंडोनेशिया, ब्रह्मदेश, व्हेनेझ्युएला, नायजेरिया इत्यादी देशांना आला. याउलट जनतेचा सहभाग घेऊन व जनतेच्या सृजनशीलतेला प्रोत्साहन देऊन ज्यांनी आर्थिक नियोजन आखले त्या जपान, कोरिया, इस्त्राएल, नॉर्वे, स्वीडन, पश्चिम जर्मनी, यांसारख्या देशांनी आर्थिक विकासाचे शिखर गाठले.

आजच्या परिस्थितीत केवळ दोन शब्दांत आपल्या अर्थव्यवस्थेच्या परिवर्तनाची दिशा दाखवावयाची असेल तर, ते शब्द म्हणजे 'विकेंद्रीकरण व स्वदेशी' आजच्या आमच्या अर्थरचनेत केंद्रीकरण हा कळत वा नकळत आपल्या श्रद्धेचा विषय बनला आहे. केंद्रीकरणच फायदेशीर आहे असे आपले मत बनले आहे व त्याच्या दुष्परिणामांची क्षिती न बाळगता किंवा जाणूनबुजून

आपण केंद्रीकरणाकडे जात आहोत. स्वदेशीचीही हीच स्थिती आहे. स्वदेशीची कल्पना जुन्या युगातील व प्रतिगामी आहे असे समजले जाते. अनेक परदेशी वस्तू आपण मोठ्या आवडीने घेत असतो. विचार, शासनपद्धत, उत्पादन-प्रणाली, उपभोग या सर्वांबाबतचा मानदंड परकीयांवर आधारित आहे. परंतु हा प्रगतीचा मार्ग नव्हे. यातून आपण 'स्व'त्व विसरून परावलंबी होऊ. स्वदेशीचे भावात्मक रूप समजून घेऊन त्याला विकासाचा आधार मानून स्वदेशीचाच अवलंब केला पाहिजे.

आपल्या नियोजनाचा आधार शेती आणि त्या शेतीच्या अभिन्न अवयवांच्या स्वरूपात उभे असलेले विकेंद्रित उद्योगधंदे हा असला पाहिजे. विकेंद्रित कृषी-औद्योगिक ग्राम-समाजच आपल्या राष्ट्राच्या पाठीचा कणा होऊ शकेल. त्याचा विकास करणाऱ्या संस्था निर्माण करण्याची व्यवस्था करणे हे सरकारी नियोजनाचे प्रमुख लक्ष्य असले पाहिजे.

योजना आखताना आर्थिक उद्दिष्टे म्हणजे निरनिराळ्या क्षेत्रांवर किती रक्कम खर्च करावयाची हे नक्की करावे लागते, त्याचप्रमाणे त्या आर्थिक गुंतवणुकीतून किती उत्पादनाचे लक्ष्य गाठावयाचे आहे याचाही विचार करणे आवश्यक असते. पहिल्या पंचवार्षिक योजनेत अनेक उत्पादनांवर ८० टक्केपर्यंत रक्कम खर्च होऊनही उत्पादन-उद्दिष्ट मात्र केवळ ३० % एवढेच गाठले गेले. दुसऱ्या व तिसऱ्या पंचवार्षिक योजनांतही हीच स्थिती होती. प्रचंड प्रमाणात भांडवल खर्च होऊनही, उत्पादन त्या मानाने मागे पडलेले दिसते. प्रकल्पाचा 'जेस्टेशन पीरियड' ध्यानात घेऊनही ही तफावत एवढी मोठी असता कामा नये.

आपल्या नियोजनातील या उणीवांकडे लक्ष वेधताना दीनदयाळजी म्हणतात– "There should also be a machinery to assess the achievements in physical terms together with the financial outlays. It should concern with the working and achievements both in the public sector and the private sectors. Inter-relationship between the physical and the financial targets should be finally established."

भांडवल अत्यल्प असलेल्या भारतासारख्या देशाने कमीत कमी भांडवलात जास्तीत जास्त आर्थिक लाभ कसा मिळविता येईल यावाबत अतिशय सावध राहिले पाहिजे. यासाठी प्रत्येक प्रकल्पात Output Capital Ratio सातत्याने तपाशीत राहिले पाहिजे. परंतु आपले सर्व लक्ष जमेल तेथून, जमेल त्या मार्गाने अधिकाधिक भांडवल जमविणे आणि उत्पादनाच्या नव्हे तर खर्च केलेल्या

पैशाच्या मापाने नियोजनाच्या यशाचे मोजमाप करण्याकडे लागलेले आहे. कमीत कमी खर्च करून जास्तीत जास्त फायदा पदरात पाडून घेण्याचा साधा व्यवहार सुद्धा आपण विसरून गेलो आहोत.

पं. दीनदयाळजींनी मांडलेल्या मुद्द्याची सत्यता खालील कोष्टकावरून ध्यानात येऊ शकेल.

देश	भांडवल गुंतवणुकीचा खर्च दर युनिटची उत्पादन-वाढ. (capital cost of increasing production) वर्ष १९६० ते १९६९	ठोक राष्ट्रीय उत्पादन वाढ दर युनिट भांडवलामागे. (average increase in per capita GNP) वर्ष १९६० ते १९६९
कोरिया	१.७०	६.४
इस्राएल	२.९०	५.३
जपान	२.९०	१०.००
अमेरिका	३.७०	३.२
भारत	३.९०	१.१

(संदर्भ– जागतिक बँक १९७१, यु. एस्. ए. एजन्सी फॉर इकॉनॉमिक डेव्हलपमेंट १९७०.)

म्हणजे दारिद्र्यपीडित भारताचे आर्थिक नियोजन जगातल्या सर्वांत श्रीमंत व समृद्ध असलेल्या अमेरिकेपेक्षाही महागडे ठरले आहे. कोरिया, जपान तर दूरच राहिला !

सहाव्या पंचवार्षिक योजनेत भांडवल व उत्पादन यांचे प्रमाण ४:१ असे नियोजन-मंडळाने गृहित धरलेले होते. म्हणजे चार रुपयांची भांडवल गुंतवणूक केल्यास उत्पादनाचे एक युनिट वाढू शकेल. असे गृहीत धरण्यात आले होते. (Capital Output Ratio) मुळात हे प्रमाण खूप मोठे आहे कारण कमी भांडवल गुंतवणुकीतून अधिक उत्पादनवाढ इतर देशांतून घडून आलेली आहे. परंतु आपल्याला हे प्रमाणही गाठता आलेले नाही. सहाव्या पंचवार्षिक योजनेत एक रुपया उत्पादन वाढीसाठी दहा रुपये भांडवल खर्ची पडले आहे.

एवढा भांडवली खर्च होऊनही आर्थिक विकास घडवून आणण्यात नियोजन अपयशी ठरत आहे.

देशात भांडवलाची तीव्र टंचाई असताना त्या अमूल्य भाडवलातून उभी राहिलेली औद्योगिक तसेच कृषी क्षेत्रातील क्षमता जर पुरेपूर उपयोगात आणली गेली नाही, तर ते नियोजनाचे फार मोठे अपयशच समजले पाहिजे नियोजनातील समन्वय व संतुलन यांच्या अभावाचेच हे द्योतक समजावयास हवे.

१५ ऑगस्ट १९६२ रोजी लिहिलेल्या एका लेखात पं. दीनदयाळजी म्हणतात –

"The planner has to take into account all the aspects of savings, development and consumption. It is here that the present planners have erred. There-fore, while on one side we are faced with shortages and scarcity, on the other, workers industrial capacity and irrigation potential are hugely lying idle."

थोडक्यात, नियोजन आखताना व त्याची अंमलबजावणीं करताना चतुरस्र अवधान न ठेवल्याने आपल्या देशात आज औद्योगिक क्षेत्रात उत्पादन-क्षमतेचा प्रचंड ताण पडत आहे. तोच अनुभव शेती-क्षेत्रातही येत आहे. उपलब्ध असलेली सिंचनक्षमता पूर्णपणे वापरली जात नाही.

भांडवल-गुंतवणुकीचा सीमान्त उपयोग, उत्पादन – भांडवल-गुंतवणुकीचे समुचित प्रमाण, विविध प्रकल्पांमध्ये समन्वय, आर्थिक शिस्तीचे पालन, श्रम-प्रधान उत्पादन-पद्धतीची निकड, स्वावलंबन व स्वदेशी यांची अपरिहार्यता आदी गोष्टींचा पाठपुरावा करण्यासाठी दीनदयाळजींनी एक स्वतंत्र लेखच लिहिला होता. त्या लेखाचे शीर्षक होते Let us plan anew !

• • •

९

उपसंहार

एकात्म अर्थनीतीच्या विवेचनाच्या अनुषंगाने आपण येथवर साध्य-साधन-विवेक, अर्थाचा अभाव-प्रभाव, अर्थायाम, मानवी जीवनातील संपत्तीचे स्थान, अर्थव्यवस्थेची प्रेरणा, उत्पादनाच्या मर्यादा, अर्थव्यवस्थेचा मानवी उद्देश, अतिरिक्त मूल्य, न्यूनाधिक मूल्य, विकेंद्रित अर्थव्यवस्था आदी पैलूंचा विचार केला. त्यानंतर या पार्श्वभूमीवर आपल्या देशाची आर्थिक स्थिती व गेल्या काही दशकांतील अर्थकारण, या संदर्भात स्वावलंबन व शेतीला अग्रक्रम, औद्योगीकरण, आर्थिक शिस्तीतून भांडवल-संचय, 'स्वदेशी' व परकीय भांडवलाचा प्रश्न, द्रव्यनीती, अर्थसंकल्पीय नीती, किंमतीविषयक धोरण, नियोजन, आदी विविध विषयांसंबंधीचे पं. दीनदयाळजींचे मौलिक विचारही पाहिले. आर्थिक विकासाची दिशा कोणती असावी याचा बोध त्यामधून होऊ शकेल असे वाटते.

या विवेचनाच्या अगदी सुरुवातीला पाश्चात्य देशातील प्रमुख आर्थिक विचारप्रणाली आणि त्यांचे प्रत्यक्ष यशापयश यांचा थोडक्यात आढावा घेतला आहे. निष्कर्षरूपाने असे म्हणता येईल की, अधिकाधिक उत्पादनाची आणि अधिकाधिक उच्च रहाणीमानाची भूक तृप्त होऊ शकत नसल्याने समृद्ध देशांतही एक प्रकारची विफलता, विविध प्रकारचे मानसिक तणाव यांनी जीवन असह्य झालेले आहे. मनुष्य आणि उपभोग्य वस्तू यांच्यामधील नातेच उफराटे झाले आहे. आता तेथे मनुष्य उत्पादित वस्तू वापरीत नसून उत्पादन माणसाला वापरते आहे. भांडवलशाही वा समाजवाद आधुनिक जीवनातील हे तणाव, या विकृती दूर करण्यास असमर्थ आहेत. समाजाची नैतिक उद्दिष्टे

आर्थिक उद्दिष्टांच्या प्राप्तीतून आपोआप साध्य होतात ही भांडवलशाही व साम्यवाद या दोघांचीही समजूत भ्रामक असल्याचे सिद्ध झाले आहे.

ही वस्तुस्थिती तिकडील काही विचारवंतांनाही आता जाणवू लागली आहे. डॉ. शूमाकर म्हणतात " जीवनविषयक मूल्यांची निराळी जाण उत्पन्न होण्याची निकड निर्माण झाली आहे. यासाठी जीवसृष्टीशी तादात्म्य पावणारे, मानव्य जपणारे, उदात्तत्ता विकसित करणारे, शांत, सौम्य, सौदर्ययुक्त आणि भौतिकता व आध्यात्मिकता यांचा मिलाफ करणारे नवे वळण अर्थशास्त्राला, विज्ञानाला, व तंत्रज्ञानाला द्यावयास हवे आहे."

समाजाची नैतिक उद्दिष्टे व आर्थिक विकासाची उद्दिष्टे या दोहोंमध्ये प्रभावी संवादी संबंध प्रस्थापित करणे हे मानवी प्रज्ञेचे कार्य आहे. केन्स म्हणतो – " अर्थशास्त्रज्ञाने भविष्यकाळासाठी वर्तमानाचा अभ्यास, भूतकाळाचा संदर्भ ध्यानात ठेवून केला पाहिजे. तो काही प्रमाणात गणितज्ञ, इतिहासज्ञ, राजकारणी आणि तत्त्वज्ञ असला पाहिजे. त्याची प्रतिभा मूर्त आणि अमूर्त या दोहोंना विचाराच्या एका झेपेत स्पर्श करणारी असली पाहिजे."

पं. दीनदयाळजींचे व्यक्तिमत्व या सर्व कसोट्यांना पूर्णपणे उतरणारे आहे. त्यामुळे केवळ आपल्या देशालाच नव्हे तर अर्थाच्या अभाव-प्रभावाच्या कात्रीत सापडलेल्या समस्त मानवजातीला त्यांचे अर्थचिन्तन कल्याणप्रद आणि स्थायी पर्याय देऊ शकेल.

• • •



संदर्भसूची

१) राष्ट्रचिंतन

२) राष्ट्रजीवनाची दिशा

३) भारतीय अर्थनीति – विकासाची एक दिशा

४) Two Plans-Promises, Performance, Prospects

५) एकात्म मानववाद (Integrated Humanism)

६) Devaluation - A Great Fall.

७) Political Dlary : ले. पं. दीनदयाळजी उपाध्याय

८) अर्थशास्त्राचे शिल्पकार : प्रा. बाळ गाडगीळ

९) समाजवाद वि. भांडवलशाही : प्रा. आर्थर पिगू

१०) भाकरी व स्वातंत्र्य : प्रा. ग. प्र. प्रधान

११) Small is Beautiful : डॉ. शूमाकर

१२) आर्थिक सिद्धांत व अविकसित प्रदेश : प्रा. गन्नर मिर्डाल

१३) The New Economics of Growth : प्रा. जान मेलॉर

१४) स्वातंत्र्याचा अद्यतन संदर्भ : श्री. अच्युतराव पटवर्धन

१५) Our Renaissance-its Direction and Destination : ले. श्री. दत्तोपंत ठेंगडी

१६) The Debt Trap : श्री. चेरिल पेरियर.

१७) भारताचे आर्थिक नियोजन : श्री. पां. वा. गाडगीळ

१८) India's Economic-Policy The Gandhian Blue print : ले. श्री. चरणसिंग

१९) New Economic Deal : डॉ. मोहनोत (कलकत्ता विद्यापीठ)

२०) Menance of Multinationals : ले. श्री. साधन मुखर्जी, आर. आनंद, जी. रामराव आणि व्ही. शंकर

२१) Inflation and India's Econmic Crisis : Publication of Institute of Economic Growth, Delhi.

निवडक उल्लेख सूची

अकाली दल (मास्टर तारासिंग ग्रुप) ४९
'अॅक्विटेड बाय हिस्टरी'
(राजा, के. एन्.) १३०
(दि) 'अॅक्वेरियन कॉन्स्पिरसी'
(फर्ग्युसन, मेरिलिन)
अग्निहोत्री, राजीवलोचन ४
अग्निहोत्री, रामशंकर ३८
अग्रवाल, बालेश्वर ८
अजेंडा फॉर इंडिया ६०
अडवानी, एल्. के. ८
अँडर्सेन, वॉल्टर के. ७, ३१–३३
अँड्रयूज, सी. एफ्. १०३
अणे, बापूजी २१
अंतुले-सिमेंट-प्रकरण ५३९
'अथातो तत्त्वजिज्ञासा' ठेंगडी १–१२८
अध्यात्म म्हणजे काय ? २०१–०२
अनन्तु, टी. एस्. १०६
अप्रबुद्ध ८४
अॅबेलॉर्ड २९ (टी)
अब्रोल, जगदीशजी ८
अमेरिकन रिव्हयू १०६
अमेरिका
अन्य देशांना आर्थिक मदत
परिणाम ५१५
कुटुंबसंस्था उद्ध्वस्त ४१७
गणकयंत्र युग ४४३
नैसर्गिक संपत्तीची उधळपट्टी ४३६
भारताची धान्य-आयात-योजना
४८३, ४८५
संयमित उपभोगाचा नवा प्रवाह
५३९
अमेरिका होलीस्टिक हेल्थ
अॅसोसिएशन, ११२
अमोनिया कारखाना, अमेरिका
– कॉप्युटरमुळे बेकारी ४३७
अम्तुस्सलाम, बी. बी. १०४
अयोनियन तत्त्वचिंतक ६०
अय्यर, अल्लादी कृष्णस्वामी १६२
अय्यर, एस्. स्वामीनाथन ८१
अय्यर, जी. सुब्रह्मण्यम् १०२
अय्यर, सी. पी. रामस्वामी १०३
अय्यर, हिराबाई ३०
अरविंद २३ (ही), ११३, ११७, १३७,
१४७
अॅरिस्टॉटल ७४
अरुण कुमार ३
अर्थ
प्रभाव व अभाव ३५६

अर्थनीति
अनार्थिक गोष्टींचा विचार ४४०–४१
'अर्थनीती' (दीनदयाळजी) ५१३
अर्थ पुरुषार्थ
अभाव, प्रभाव २११–२१३
आजीविका
(अजीविकेचा व्यवसाय)
२०९–२११
अर्थव्यवस्था
अर्थाचा अभाव ४४४–४५
अर्थाचा प्रभाव ४४५–४६
अध्यात्मिक व भौतिक उद्दिष्टें ४६९
आर्थिकेतर घटकांचा विचार ४६१
उत्पादक वस्तू : व्याख्या ४९८
उत्पादनमर्यादा ४५५
उद्योगधंद्याचे क्षेत्रविभाजन व राष्ट्रीय
क्षेत्राची कल्पना ५०९–१०
उपभोग्य वस्तू : व्याख्या ४९८
केंद्रबिंदू संपत्ति नव्हे तर माणूस ४४४
क्रमवारी ४८१–८३
क्रयशक्ती ४९८
गतिमानता ५४०–४१
चलन अवमूल्यन ५१५–१९
निकष : मानवाचा
सर्वांगीण विकास ४४३–४४
नियोजन ५४५–५०
परकीय भांडवल,
परतफेडीचा प्रश्न ५२५–२७
परकीय भांडवलाने दुर्दशा झालेले देश
५२८
पाश्चात्य लेसेफेअर
(अहस्तक्षेप) सिद्धान्त ४४७
प्रेरणा ४५२–५५
बहुराष्ट्रीय कंपन्या ५२४–२५
भांडवल : व्याख्या ५२९
भूस्वामी कृषी व लघुयंत्राधिष्ठित
उद्योग ४७८
मानवी उद्देश ४५९-६१
लघुकेंद्राधिष्ठित व विकेंद्रित ४७३
विकसनशीलता ४९८
विकेंद्रिकरण ४६५, ४७५–७६, ४८०
विदेशी साह्याची बिकट वाटचाल
५२७–२८
संपत्तीचे स्वामित्व ४५०–५२
संयमित उपभोग सिद्धान्त
४५९, ४६५–६६
स्वावलंबन भांडवलाचे स्थान ५१२
अर्थायाम ३५६, ४४९
अर्धविकसित देश
आर्थिक नियोजनाचे परिणाम ५४७
कर्जाच्या जाळ्यात पडण्याची कारणे
५३९
अर्बन ९० (टी)
अलिक ६०
ॲल्विन, एफ्. आर्. व बी. ८२
अल्वा, व्हायोलेट १
अल्वारिस, क्लॉड ७८
अविनाशलिंगम्, टी. एस्. १०४
अशोक २५३
असफअल्ली, अरुणा ९५
असर, प्रेमजीभाई ३०
ॲसोसिएटेड लेबर ॲक्ट,
झेकोस्लाव्हिया १४७
ॲस्ट्रा रिसर्च सेंटर,
झेकोस्लाव्हिया ११५
'ॲस्ट्रॉलॉजिकल मॅगझिन' ११४
'ॲस्ट्रॉलॉजिकल रिसर्च इन कम्युनिस्ट
कंट्रीज' (वेदव्यास, ई) ११४
ॲस्ट्रॉलॉजी
म्हणजे कॉस्मिक बायॉलॉजी ११४

अस्तित्व व एकात्मता ६९
अस्पृश्यता २१८
अहंमद, फकरुद्दीन १
अहंमद बशिरुद्दीन ६०

आइन्स्टाईन १११, ४८०, ५०३, ५०४
आचार्य, गिरिराज किशोर ३०
आचार्य, श्रीधर ३०
आझाद, मौलाना, ३१६
आझाद काश्मीर ९
आझाद गोमांतक दल २८
आठवले, मनोहर ४
आंतरराष्ट्रीय नाणेनिधी ५२८
आत्मसुख
  व्यापक स्वरूप १९९, २०२
आत्मस्वरुप १९७, १९९
आत्मा
  अस्तित्व १९६
  सुख १९५–१९७
  ज्ञान-सर्वश्रेष्ठ १९७
आपटे (डॉ.) ५२
आपटे, दादासाहेब ८
आपटे, बाबासाहेब ३१८
आपटे, विनायकराव २८
आंबेडकर, बाबासाहेब
  १०, १६–१७, ५७–५८, ७०,
  ८२–८३, १४१, ३१६, ३२६
आमटे, बाबा व इतर समाजसेवक १५५
'आयडीऑलॉजी अॅज ए कल्चरल सिस्टिम'
  (गीर्टझ्, क्लीफर्ड) ३१
आयसेन हॉवर १६२, ४८०
(दि) आर. एस्. एस्. स्टोरी
  (मलकानी) ३१८, ३२१–२२, ३३१
आरसीवाला, एस्. जे. ८०
आर्किमिडीज १९४
'आर्गनायझर', ३१७, ३२९, ३५७,
  ३६७, ३७४–७५, ३७७, ३७९,
  ३८७, ३८९–९०, ३९२, ३९४–९५
  ३९७, ३९९, ४१३, ४१६, ४२१,
  ४३५, ५१८
  जनसंघ विशेषांक ३६२
आर्थिक प्रश्न
  हिंदुदृष्टी १४३–४७

आर्थिक मानव ९०
आर्थिक विकास
  दोन पायाभूत सिद्धान्त ४५५
आर्थिक विकेंद्रिकरण
  घटक ४७७–७८
आर्थिक विचारप्रणाली ४३५–३८
आर्थिक स्वातंत्र्य–दीनदयाळजी ४४९
ऑर्नस्टीन, रॉबर्ट १०८
आर्य, राधोमल ४
आर्यनायकम् पतिपत्नी १०४
'(दि) आर्यन्स, ए रिअॅप्रेझल'
  (थापर, बी. के.) ८२
आर्यसमाज ५०, १०२
आल्फ्रेड, गाय १०३
आसाम
  जनसंघाचा ठराव ४१४
ऑस्ट्रेण्डर, शीला ११४

(दि) इकॉनॉमिक कॉन्सिक्वेन्सेस
  ऑफ पीस (केन्स, लॉर्ड जॉन) ५३४
'इकॉनॉमिक पॉलिसी रिझोल्यूशन
  ऑफ बी. जे. एस्.' ३४४
इक्सॉन बहुराष्ट्रीय कंपनी ४३७
इग्नेशियस २९ (टी)
'ईटरनॅशनल इकॉनॉमिक्स'
  (मिर्डाल, गन्नर) ५१९

इंडियन ॲसोसिएशन १०२
' इंडियन एक्स्प्रेस ' ४८९
इंडियन कॉन्स्टिटचूशन ॲट वर्क
(चितामणी ॲंड मसानी) ७०
' इन्क्रेडिबल कोइन्सिडन्सेस '
(वॉन, एलन) १०६
इस्माइल, मिर्झा १०३
' इहवादी शासन '
(सहस्रबुद्धे, पु. ग.) १३९
इस्ट इंडिया ॲसोसिएशन १०२
इस्राएल २४९

उपनिषदे ११३
उपाध्याय दीनदयाळजी
पहा
दीनदयाळजी

ऋषिसंस्था १२५, १६२–६३

एकनाथ ३७
एकराष्ट्रीयत्व ८६
एकात्मदर्शन २७८–९१
एकात्मदर्शन व सायन्स ११९–२०
' एकात्म मानव दर्शन ' १७०–२९१
(नेने वि. वा.)
अध्यात्मविचाराचे अधिष्ठान १९८
आध्यात्मिक उन्नती २०१
एकात्मसुख २०४
व आधुनिक पाश्चात्य साहित्य
१०६–१२
व्यक्ति व समाजविषयक भूमिका
२३२–३३
श्रुतिफल २८७–२९१
समग्र जीवनदर्शन २८९
साध्यसाधन-विवेक २८९–९१
सूत्र १७२–७३, ४४०–४१
एकात्म मानवधर्म
कर्तव्यरूप धर्म २८८
' एकात्म मानववाद, (दीनदयाळजी)
९१, २४६, ३४६–४७, ३५२, ४५९
एकात्म मानववाद
आणखी पहा
एकात्म मानवदर्शन १६७
एकात्म शासनप्रणाली ७०–७३
एकात्म समाज व्यवस्था २५५–७१
एंजल्स ५०, ४७९
एडवर्डस्, पॉल ६१
एडवर्डस्, हेन्री ११२
एथिक्स म्हणजे रिलिजन ९०
' एम् ' टोपणनाव म्हणजे महेन्द्रनाथ गुप्त
४१ व ४१ (टी)
' एन्सायक्लोपीडिया ऑफ फिलॉसफी '
(एडवर्डस, पॉल) ६१
एरिगो ११२
एलिस, फ्रॅन्सिस व्हाईट ८१
एलेजिमिट्टम, ॲंथनी २१
एल्विन, डी १०७

ओक, वसंतराव १, ७,
२९४, ३१९, ३२३, ३२७
ओपेनहायमर १०८
ओवेन, रॉबर्ट ८९, ९३, १७८, १८१

औद्योगिक उत्पादन
दोन प्रकारच्या वस्तू ४९८
पैलू ४९८–५००
संस्कृती – पहा यंत्रसंस्कृती
कझिन, नॉर्मन १५२

कंटक, प्रेमा १०४

'कनेकशन बिट्वीन ॲस्ट्रॉलॉजी ॲंड हठयोग' (झोल्टाज, एल्.) ११४
कन्फ्यूशस २४, (टी)
कॅपरा, फित् जॉफ १०५, ११६–१२०
'कंपॅरेटिव्ह् ग्रामर ऑफ दि द्राविडियन लँग्वेजेस' (काल्डवेल, बिशप) ८१
कपूर, गिरिराज किशोर ३०
कपूर, राधेशाम ४
कबीर, हुमायून १, १९
'कमल' टोपण नाव पहा मलकानी
कम्युनिझम
भारतातील ९७
युरोपातील ९७–९८
व जनसंघ ५०–५१
कम्युनिस्ट
कार्यशैलीची वैशिष्ट्ये ३६३
भ्रष्टाचार, पक्षीय व हुकुमशाही आणण्यासाठी ३७७
कम्युनिस्ट पक्ष, भारत ९५
रशियन धार्जिणेपना ९७
कम्युनिस्ट पार्टी ऑफ चायना ९८
कम्युन्स २२७
करंजकर वंधू ३
करपात्रीजी स्वामी ४९
करमरकर, आप्पा २८ (टी)
'करियार मासिक' ८३
'कर्मयोगशास्त्र (गीतारहस्य)' (टिळक, लोकमान्य) ३४७
कलंत्री, गोपाळ कृष्ण ३
कळसकर, रामदास ३०, १६७
काँग्रेस १०, ५०, ३१४–१५, ३३१, ३६०
दिल्ली महानगरपालिका निवडणूक ३८७–८८
धार्मिक अल्पसंख्याची मनधरणी ३६१
नेहरू–पटेल संघर्ष ३१६
पक्षकार्यकर्ता ३६५
मुसलमानांचा अनुनय २१ (टी)
मुस्लिम अनुनयाचे राजकारण ३३२
व जनसंघ ५०
विसर्जन व लोकसेवक संघात रूपांतर ४१९
शक्तिकसोटीचा सामना ३२३
संघ-स्वयंसेवकांना दरवाजे उघडले ३१७
सत्तेपासून दूर ठेवा ४०४
सोशॅलिस्ट फॉर्म ऑफ सोसायटी ९५
स्वातंत्र्योत्तर शतमुखांनी अधःपात ४०८
हटाव मोहीम ४०६
काँग्रेस नॅशनल पार्टी २१
काँग्रेस सोशॅलिस्ट पक्ष ९५
काजरेकर, नाना २८
कॉटन, हेन्री जे. एस्. १०३
कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ४९८
काणे, पांडुरंग वामन ११, ७१
कानिटकर, गं. भा. १६७
काय, के. विल्यम १९
कॉपल्स्टन ६०
कामथ, एच्. व्ही. ५०
कामदंडी ११
कॉमनविल पार्टी ४९
कामपुरुषार्थ आणि धर्मपुरुषार्थ २१३
कारडचू ८१
कार्लोव्हस्की, लॅबर्ग ८१
काल्डवेल, पोप रॉबर्ट ८१
कालिया गोपाळदास ४
कालेलकर, नाना १०४
कॉलेट, सोफिया ९३
काल्विन ५९ (टी)

काश्मीर
आंदोलन ३७८–७९
एकीकरण ४१३
कॉस्मिक बायॉलॉजी ११४
'काळ' दैनिक ३१६
काळे, मल्हारराव ८
किटेल, डॉ. ८१
किडवाई, रफि अहमद ३१६, ३२३
किरिलियन, जोसेफ ११४
किवोरोटोव्ह, व्हिक्टर ११२
किसान मजदूर प्रजापक्ष २९६
व्हीन्स, जे. एम्. ९९
कुटुंबसंस्था २२५–२७, २६३
पाश्चात्य देशातील २२६–२७
कुंडलिनी योग ११५
कुब्लर रॉस, डॉ. एलिझाबेथ १०८
कुमारप्पा, जे. सी. १०४
कुमारप्पा, भारत १०४
कुमारमंगलम्, मोहन १६२
कुराण २१६
कुलकर्णी, अनंत ४६
कुलश्रेष्ठ, महेंद्र ४
कुशमन ६०
कुष्ठसेवा
समाजसेवा व्यक्ती, पाश्चात्य व पौर्वात्य १५५
कृपलानी, आचार्य १, ५०, १०१
कृपलानी सौ. १
कृष्ण, महाशय ७
कृष्णम्माचारी, टी. टी. ५१६
मुंदडा-प्रकरण ५३९
केचनिट्झ, के. ११५
केन, विल्यम स्पोर्टसन ७३
केनेडी, के. ए. आर्. ८१
केन्स, लॉर्ड जे. एम्.
९२, ४३५–३६, ४४४–४५, ४६६, ५३०, ५३४, ५५२
अर्थशास्त्र ४३६
केल्प्पन १०४
केशवसुत ४३१
केळकर, न. चिं. २१
केळकर, भा. कृ. ३०, ४७
ग्रंथ ४७
केळकर, भालबा १५९
कोगन ११४
कोठारी, रजनी ६०, ७८
कोपरनिकस ३७, ७४
कोरॅके ८९
कोविझेव्ह, कॉन्स्टंटाईन ११४
कोसिटस्की जी. ११४
कोस्त्युचेकॉव्ह, व्ही. एस्. ११३
कोस्लर १०६, ४३९
'कौटिलीय अर्थशास्त्र' चाणक्य २४९
कौटिल्य ११
क्रोपोट्किन ९३, ३५३
क्लकदोहन, क्लाइड १५०
'क्लब ऑफ रोम' ७९
क्लार्क, जी. बी. १०३
'(दि) क्लासिक वेदांत अॅंड निओ वेदांतिझम'
(कोस्त्यूचेकॉव्ह, व्ही. एस्.) ११३
क्वाँटम मेकॅनिक्स १०८
'क्वांटम मेकॅनिक्स' (बोहम, डेव्हिड) १०६
क्वांटम सोलिप्सिझम् १११

खलिस्तान ८३
खरे, ना. भा. ४९
खापर्डे, दादासाहेब ४०८

खोब्रागडे, राजाभाऊ १
ख्राईस्ट, जिझस ३६
ख्रिश्चन हचुमॅनिझम ८८
ख्रिस्त, येशू २१६
ख्रिस्ती मिशनरी,
विदेशी-कारवाया ९

गंगा नदी पाणी-प्रदूषण ४५८
गजेंद्रगडकर, प्र. ब. १८
गजेंद्रगडकर, वसंत ३०
गणतंत्र परिषद ४९
गॅलब्रेथ ४३७, ४५४
'गॉड अँड् दि न्यू फिजिक्स'
(डेव्हिस, पॉल) १०६
गाडगीळ, धनंजयराव
५०, ४९९, ५३४
गाडगीळ न. वि. ३१५-१६
गाडगीळ, पां. वा. ९९
'गॉड दॅट फेल्ड' १८४
गांधी, इंदिरा २, ५१६
गांधी, महात्मा
१७, ४१, ५३, ७८, ९५, १००, १०१,
१०३-०४, १५४, १७०, २४६, २५३,
२९५, ३१४-१५, ३२३, ३४१, ३६०,
३६३-६४, ३८३, ४१९, ४२१, ४३१,
४५०, ५३९
आर्थिक सिद्धांत ४१६
रामराज्य कल्पना ३२५
शिष्य, विधायक कार्यकर्ते १०४
सर्वोदय व ग्रामोद्योगी अर्थकारण ५०२
गांधी, संजय
- मारुती मोटार प्रकरण ५३९
'गांधीयन वे' (कृपलानी) १०१
गांधीवाद, ३१५, ३२४
गांधीवादी अर्थशास्त्र ३५६
गांधी सेवासंघ अधिवेशन १०१
गॉम्पर्झ ६०
गायकवाड, दादासाहेब ५०
गॉर्की, मॅक्झिम ८८
गिमी, जाल ३०
गिरी, व्ही. व्ही. १
गिल, लक्ष्मणसिंग १
गिलिमन, एच्. एफ्. डब्ल्यू. ८१
'गीतारहस्य' (टिळक, लोकमान्य)
१७०, २२२
गीर्टझ, क्लिफर्ड ३१
गुजर, रमण - २८
गुड, पॅट्रिक ५५
गुंडर्ट, डॉ. एच. ८१
गुणे, डॉ. ग्वाल्हेर ४
गुप्त, घनश्यामदास ५०
गुप्त मनमोहन ४
गुप्त, लाला हंसराज १, ३२७
गुरुजी (मा. स. गोळवलकर)
२, ४, ६, ९-१०, १२, १७-१८,
२७, ३३-३५, ५५, ६४, ७२, ८१-
८२, १०१-१०४, १२१, १२५, १४०,
१४५, १५०, १७०, २०४, २३९,
३००, ३२२, ३२९, ३३१, ३४३,
३४६, ३७३, ४२४
व दीनदयाळजी ९-१०, १२
व मुखर्जी ३२९
संघ शिबिर ठाणे येथील
भाषण १४३ - १४७
हिंदुत्व स्वरूप २०
'गुरुजी समग्र दर्शन' ३०६ - १२, ३२२
गुरुदत्त २९४
गोखले, अनंतराव ४
गोखले, गो. कृ. ९३
गोखले, दि. वि. ४०

गोडबोले, रामभाऊ ३०
गोरे, ना. ग. तथा नानासाहेब १, ९५
गोवा मुक्ति संग्राम समिती ४९
गोविंददास, शेठ १, ५०
गोविंदसिंह २५ (टी)
गोविंदस्वामी, एन्. डी: ४९
गोलवलकर, मा. स. **पहा**
गुरुजी
ग्यॅनचंद ५१८
ग्राड, वर्नार्ड ११२
ग्रिस, हेन्री ११३
ग्रीक तत्त्वज्ञान-चिंतक व लेखक ६०
ग्रेग, रिचर्ड १०६

धटाटे, बाबासाहेब १
घोष, देवप्रसाद ८
घोष रामगोपाल १०२

चक्रवर्ती ५२०
चँग कै. शेक ३७ (टी)
चटर्जी, पी. सी. १६
चट्टोपाध्याय कमलिनी ९५
चतर्जी, एन्. सी. १, ४९
चतुर्वेदी ज्वालाप्रसाद ४
चमनलालजी ७, २९४
चरणसिंह १
चर्चिल, विंस्टन ४० – ४१
चलननीती आणि
अर्थसंकल्पीय नीती ५२९ – ३६
चव्हाण, यशवंतराव १
चाणक्य २४९, ३५५
चातुर्वर्ण्य
आंतरिक तत्त्व २६९
चिंतामणी ७०
चिती ३४६
चा प्रकाश ३४९ – ५०
दीनदयाळजी ३४९
चिपळूणकर, एस्. एन्. १०२
चीन साम्यवाद १८४
सांस्कृतिक क्रान्ती १८४
चोपडा, प्राण ६०
चौधरी, गोपबंधू १०४
चौधरी, नवकृष्ण १०४
चौधरी सचिन् ४८३
रुपयाचे अवमूल्यन ५१७

छोटूराम ४९

जग – आर्थिक प्रगतीचा मागोवा ४३५
जगजीवनराम १
जगन्नाथ शंकरशेठ १०२
जनक्रांत्तित्व ४९
जनता पार्टी, छोटा नागपूर ४९
जनता पार्टी, राजस्थान ४९
जनसंघ १७०, २९६, ३४१, ४०७, ४१४
अखंड भारत श्रद्धा ४०९–११
अंतिम लक्ष्य-राष्ट्रीय लोकशाहीचा
पर्याय ४०१–०२
अर्थ-रचनेची उद्दिष्टे ३५८–५९
अभ्यास-वर्ग २५
अमेरिकन गहू नको ३८२
अल्पसंख्या-संकल्पना ३९२
आचार-संहिता ४०६
आठवे अधिवेशन ४१७
आर्थिक मार्ग ३९२–९३
आर्थिक विचार ३३६–३८
आसाम प्रश्न ४१३–१४
कच्छ करार आंदोलन २८
कच्छ-करार-निषेध मंत्र ४२०
कच्छ-मोर्चा ३८२–८३

काँग्रेससत्तेच्या मक्तेदारीस आव्हान ३८७–८८
कानपूर अधिवेशन ४२२
कार्यकर्त्यांचा पक्ष ३६४–६६,४२२
कार्यकर्त्याविषयी कल्पना ३६९
कार्यकारिणी २
काश्मीर-आंदोलन २७–२८
काश्मीर-प्रश्न ४१३
केरळ आंदोलन ३७७
क्रमांक दोनचा पक्ष ३९०
गोवा मुक्ति आंदोलन ३७८–७९
गोहटी ठराव ४१४
'घेराडालो' आंदोलन ३७८
चार निवडणुकातील प्रगती ३९८–९९
चार मार्गदर्शक ध्येयसूत्रे ४२८–२९
जन आंदोलन ३७६–८५
जनसंपर्क व विचारप्रसार ३७१
जन्मकथा ३१४–३३२
जमीनदारी निर्मूलन भूमिका ३५(टी)
जमीनमालकी ३८१–८२
जालंधर-अधिवेशन ३८४
दिल्लीचे भव्य अधिवेशन ३३१–३२
दिल्ली महानगर पालिका निवडणूक ३८८
धर्मराज्य हे आदर्श राज्य-ध्येयसूत्र ३३५
ध्येय व कार्यक्रम २४३
निवडणूकीच्या आखाडयात ३८६–८८
निवडणूक निकालांचा अन्वयार्थ– ३९६–९८
नियोजनाविषयी विचार ३३७–३८
पर्यायी पक्ष ३९९
पहिली निवडणूक ३७५
पहिली निष्ठा लोकांची ४०४
पक्षसंघटना व कार्यकर्ते यांचे स्थान उंचावण्याचा प्रयत्न ४२०
पक्षांतर्गत लोकशाही ३७२
पाकिस्तानशी संबंध ४१०–११
प्रतिनिधिसभा, विजयवाडा १७०
प्रभावी राजकीय शक्ती ३८४–८५
प्रशासनाविषयी मते ३४०
प्रसिद्धी व प्रचार ३७४
भारतीय संस्कृतीचा एकात्मवादी दृष्टिकोन सूत्र ३३४–३५
भाषाविषयक धोरण त्रिभाषा सूत्र ४१५
भूमिका-दीनदयाळजीकृत ३६२
भोपाळ-अधिवेशन १३
भ्रष्टाचाराविरुद्ध आंदोलन ३७७
महागाईविरुद्ध आंदोलन ३८१
महाराष्ट्र प्रदेश १२वे अधिवेशन ३८६
महिला आघाडीचे कार्य ३७४
राष्ट्रव्यापी आंदोलने ३७८–८२
राष्ट्रीय जीवनदर्शन ३३३–४०
राष्ट्रीय जीवनदर्शन सूत्रे ३३३–३४
लखनौ अभ्यासवर्ग ५
लोकशाहीवर श्रद्धा ३३५–३६
व कम्युनिझम विचारसरणी ५०
व काँग्रेस सत्तास्पर्धा ५०
व मुसलमान ३९८, ४१२–१३
व संघ ३३०
व समानविचारी पक्ष एकीकरण ४४
विचारधन २३–२४
विजयवाडा अधिवेशन ३६७
विराट रूप ३८२–८४
वैचारिक गुरु– दीनदयाळजी ३४४
व्यक्ति आणि समाज समन्वय दृष्टी ३३५
व्यक्ति व समाज एकात्मता ३३५
व्यक्तिविकासवादी चार पुरुषार्थ ३३५

शेती आणि शेतकरी ३९४–९५
सत्याग्रह ३७२–७३, ३८३
समस्या ४३–४४
संमिश्र मंत्रिमंडळास मान्यता ४००–४०१
संयुक्त आघाडीत का नाही ? ३९५–९६
सर्वस्वी नवीन कार्यक्षेत्र ३६३–६४
संस्कृतीनिष्ठा ३३४
सहकारी शेतीस विरोध ३७९–८०
सार्वत्रिक निवडणुका ३८८–९०
सिद्धांत व धोरण १२
सिद्धांत व नीति १७०
सैद्धांतिक बैठक २४३–४५
स्वच्छ व लोकाभिमुख प्रशासन ४१७–१८
स्वतंत्र परराष्ट्र नीति ४२०–२१
स्वदेशी व स्वावलंबन ३३७
स्वातंत्र्य हे प्राणतत्त्व ३३६
हिंदु-मुस्लिम जातीय दंगे ४१४–१५
जनसंघ (बॅक्स्टर ग्रेग) ७,३९८
'जनसंघ आयडिऑलॉजी अँड ऑर्गनायझेशन इन पार्टी बिहेवियर' (अँडरसेन, वॉल्टर के)
'जनसंघ का' ? (दीनदयाळजी) ३३४
जनाधिकार समिती ३१६, ३१८
जनार्दनन् २९४
जपान – उद्योगधंदे व शेती यांत क्रांती ५०५–०६
जयकर, मु. रा. २१, १०२
जयगोपालजी ४
जयप्रकाश नारायण १, ५३, ८९, ९५–९६, १५४, ५०६
जयरामन्, ए. ४९
जर्मनी – पाव विक्रेत्याचे उदाहरण ५४२
भाववाढीचे परिणाम ५३६–३७
जागतिक बँक ५३७, ५४९
जाधव, शिवाजी २८
जॉन, प्रा. ४३५
जॉन, व्ही. के. २३
जॉन्सन, लिंडन ४१
जॉर्ज, लॉइड ४०
जावडेकर, आचार्य १०४, १२५
जिलास ४३९
जीझस ५९
जुगादे बंधु ३
जेफर्सन ७४
जैन, हुकुमचंद ३०
जोईस, राम १०५, १३२
जोग, ब. ना. ४६, ७०, ७३, ३६५
ग्रंथ ४६
जोड, सी. ई. एम्. १०५
जोन ऑफ आर्क ३६
जोशी, आप्पाजी ८
जोशी, एस्. एम्. १,९५
जोशी, गजानन नारायण ६१
जोशी, जगन्नाथराव २८
जोशी, बापूजी ३
जोशी, बिंदुमाधव २८
जोशी, भ. न. १२२ (टी)
जोशी, मुरली मनोहर २९४
जोशी, यादवराव ८
जोशी, विनायकराव ४६
ज्यूट कार्पोरेशन ऑफ इंडिया ४९४
ज्योतिष–पाश्चात्य साहित्य ११४–१५

झा, ताराकांत ३०
झुकॉव्ह गॅरी ६६, १०६, १५९
झेलर ६०
झोल्टाज, एल्. ११४

झिवगली ५९ (टी)

टंडन, पुरुषोत्तमदास
५०, ३२३–२४
टॅबेन, बॉब १०६
' टर्निंग पॉइंट ' (का. प्रा.) १०८
' टाइम, स्पेस अँड वियाँड '
(टॅबेन, बॉब) १०६
' टाइम्स ऑफ इंडिया ' दिल्ली ३६३
जनसंघ जालंधर अधिवेशन ३८४
' (दि) टाओ ऑफ फिजिक्स '
('काप्रा' एफ्) १०५
' टॉक्स वुइथ नेहरू ' (कझिन) १५२
टाटा ३५९
उद्योग समूह ५०७
टॉप्लर, आल्विन ४४१, ४८०
टॉयन्बी, अर्नाल्ड १८, १२६, २५३
टॉलस्टॉय ५५ (टी), ४९५
टिळक, लोकमान्य बा. गं.
२१, ४२, ५९, १५३, १७०, २२२,
३१४, ३४६–४८, ३६६, ३७१, ४०८
टीटो मार्शल ४१,९८
टुलधारिया, बद्रीसाह १३१, १६७,
३४६–४७, ३४९
'(दि) टू प्लॅन्स '(दीनदयाळ) ४९४, ५३३
' टेकिंग दि क्वान्टम लीप '
(वुल्फ, फ्रेड ॲलन) १०६, १९१
टेलर, ई. बी. १५०
टेलर, विंडल ७९
टेस्टर, एम्. एच्. ११२
ट्रॉटस्की ९३
ट्रू हयुमॅनिझम ' (मॅरिटेन) ८९

ठाकूर गोपाळराव ३०
ठाकूर रघुनाथसिंग ५०

ठेंगडी दत्तोपंत १, १८३
२९४, ३७३, ३८०
मानवी समाजाचा विकास
२८६

डांगे, श्रीपाद अमृत १८३–८४
डॉज ४५८
'डांसिंग यू ली मास्टर्स
(झुकॉव्ह, गॅरी) १०६
डॉमर ८८
डायसन, रॉबर्ट ८२
' डार्कनेस ॲट नून ' (कोसलर)
१८४, ४३९
डार्विन २७९
डिक, विल्यम ११३
डिग्वी, सर विल्यम १०३
डिसिजन ऑफ दि सेंट्रल कमिटी
चायना ९८
डिस्कव्हरीज बिहाइंड दि आयर्न
कर्टन (ऑस्ट्रेंडक व श्रोडर) ११४
डी व्हॅलेरा, इमॉन ५३
डीव्हॅल्युशन, ए ग्रेट फॉल
(दीनदयाळजी) ५१६
डे, एस्. के १५६
डेकार्ट ५९ (टी)
'डेट ट्रॅप' (पेरियर, चेरिक) ५२८
' (दि) डेट शॉक ! '(फ्रेंच पत्रकार) ५२८
डेव्हिडसन, लिवेल ८१
डेव्हिस, पॉल १०६
डोग्रा, प्रेमनाथ जी. ८
डोग्रा, भारत ४८९
डयुरांट, विल २६

तत्त्वज्ञान, पाश्चिमात्य ६०
तय्यवजी, बद्रुद्दिन १०२

तामीळनाडू टॉयलर्स पार्टी ४९
तारकुंडे, व्ही. एम्. ३४
तारकुंडे, व्ही. एस. ६०
तिवारी, बजरंगशरण ४, २९४
तुकाराम ३६३
'तुमचे मत' (दीनदयाळजी) ३९०
तुर्कस्थान – अफूचे साठे अमेरिकेला ४३७
तुलसीदास, गोस्वामी १९५
'तुलसीरामायण' (तुलसीदास) १९५
तेंडुलकर, डी. जी ३१४
तेलंग, का. त्र्यं. १०२
त्यागी ओमप्रकाश १
त्रिपाठी, महावीरप्रसाद ४
त्रिपाठी, माधवप्रसाद ३०
त्रिपाठी, वचनेश ४
त्रिवेदी, उमाशंकर ७

थंडर, रॉलिंग ११२
थत्ते, आबासाहेब ८
थापर, बी. के ८२.
थापर रोमेश ६०
थिऑरेटिकल फिजिक्स १०७
थिऑसॉफिकल कन्व्हेन्शन १०२
थिऑसॉफिकल सोसायटी १०२
थिली ६०
थोर पुरुष
  व्यक्ति दर्शन व विचारदर्शन
  औचित्य ३६ – ३७
  कार्याचे मूल्यांकन ३६ – ३७
'थ्रि फेसेस ऑफ मार्क्सिझम'
  (हार्ड) ५४
थ्रेश ७९

दकार्त ७४
द मैस्त्र ८६
दंडशक्ती २४८
दत्त, रमेशचंद्र ९३
दत्त चौधरी, मृणाल ६०
'द न्यू क्लास' (जिलास) ४३९
दयानंद सरस्वती
  ३४६, ३४८, ३७१
दर्शन ६५
दलित चळवळ – पुढारी १४२
दांडेकर, एस्. वी. २७
दाडेकर, वि. म. ७९, ४६४, ५३८
दाणी, भय्याजी ८
दांतवाला, एम्. एल्. ९५
दात्ये, बाबुकाका ४६
दादरा, नगर हवेली मोहीम २८
दार्शनिक ६३
दास, अमलप्रभा १०४
दास, चित्तरंजन १५३–५४
दास, नीलकंठ ४९
दास, रामप्रसाद ३०
दिल्ली महानगरपालिका निवडणूक ३८७
दी गॉल, चार्लस ४१
'दीनदयाळ उपाध्याय ए प्रोफाईल'
  (माथूर, जगदीशप्रसाद) ४२०–४२२
दीनदयाळजी
  १० (टी) १३, १६, ५५, ८१–८२
  ९७, ९९, १०३, १४०, १४७, १५०,
  १७०, १८६, १९२, १९७–९८, २१२,
  २२४, २४६–४८, २५१–५३, २५५.
  २६८–६९, २८७, २९०–९१, ३०२-
  ३०८, ३१९, ३२८, ३३३–३५, ३४७
  –४८, ३५५, ३६३, ४०५, ४४३,४८४,
  ५१३–१४, ५१६–१८, ५२२, ५२९–
  ३०, ५४७, ५५०
  अतिरिक्त मूल्ये ४७२
  अनुयायी ४१

अमेरिका–रशिया सामंजस्य ४२०
अर्थकारणात स्वावलंबन व स्वदेशीला महत्त्व ५१२
अर्थाचा प्रभाव ४४५–४६
अर्थव्यवस्था
अंगभूत कामगारांचा परस्पर संबंध ४६९–७०
उद्दिष्टे ३५९
कामगार आधारभूत ५०२
त्रिसूत्री ४६६–६९
द्रव्य व्यवस्था व गतिमानता ४९८
भौतिक व आध्यात्मिक उद्दिष्टे ४६६–६९
मूलभूत प्रेरणा ४५२–५३
राजकीय भ्रष्टाचार व दडपण ५४३
शेतीला प्राधान्य ४८२
अर्थसंकल्पीय नीती ५३५
अर्थायाम ४४६–४७, ४४९
अस्सल भारतीय नियोजन हवे ३९३–९४
आचारसंहितेचा आग्रह ४०६
आज हयात असते तर ४२–४३
आदर्शकार्यकर्त्यांची कल्पना ३६३
आंदोलनाविषयी मते ३७६–८४
आंदोलने २७–२८
'ऑर्गनायझेशन' च्या विशेषांकातील श्रद्धांजली १२२–२५
आर्थिक परावलंबनाचे दुष्परिणाम ५२६
आर्थिक प्रगतीचे मापदंड ५२६–२७
आर्थिक लोकशाही ४४८
आर्थिक विकासाचे सिद्धांत व मर्यादा ४५५–५६
आर्थिक व्यवहार २७
आर्थिक स्वातंत्र्य ४४७–५०
उत्पादनात यंत्रसाह्य ४६०
उद्योगधंदे-परस्पर पूरकता ५०८–०९
क्षेत्रविभाजन व राष्ट्रीय क्षेत्र ५०९–१०
संरक्षण ५२४
उपयोग्य वस्तूंच्या भाववाढीवर उपाय योजना ५४२–४४
ऋषी १२५–१२८
एक मूलगामी विचारवंत ३४१–७४
एकात्म अर्थनीती ४४०–४१, ५५१–५२
औद्योगिक विकासाची उद्दिष्टे ५००–५०१
कच्छ-करार ३८३–८५
कुटिरोद्योगांना प्राधान्य ५०४
ग्राहकाभिमुख वितरणव्यवस्था ४६८
चरित्र २–४
चलन अवमूल्यनाचे परिणाम ५१८
चांगला पक्ष कोणता ? ३६७
छोटचा उद्योगांवर भर ४९७, ५०८
जनतेला बदल हवा आहे १९५
जनसंघ निवडणुका ३८८–९०
जनसंघ पक्ष नव्हे राष्ट्रीय आंदोलन ३७१–७२
जनसंघ हा सामान्य जनांचा पक्ष ४१८,
जनसंघाची भूमिका ३६२
जनसंघाची प्राणप्रतिष्ठा ४२३
जनसंघाचे वैचारिक गुरु ३४४
'जनसंघाचे सिद्धान्त व नीती' व्याख्याने १७०
जनसंघाच्या गुणात्मक परंपरेचे शिल्पकार ४२३
जनसंघाची भूमिका ३४२–४३
टेक्नॉलॉजीवरील विचार ७८–७९
डावे उजवे पक्ष हे वर्गीकरण अमान्य ३९३

तिबेट स्वातंत्र्य ४२०–२१
तिसऱ्या पर्यायाचा शोध ४३५–४१
तुटीचे अंदाजपत्रक ५३३
दार्शनिक ६०–६१
धर्म ३०१–३०२
धर्मराज्य हवे ४१७, ४२६,
निकोप पक्ष संबंधाची गरज ४०५
निवडणुका ३८६
निवडणुका : अन्वयार्थ ३९६-९८
निवडणुक मतदारांच्या शिक्षणाची संधी ३९०
नियोजन ३५७–५८, ५४५
नेतृत्वाला आवश्यक असे गुण २९
नैसर्गिक साधने ४५६–५७
पद्धतशीर अभ्यासपद्धती ३६४
परकीय आर्थिक मदत ५१३
परकीय भांडवलाचे परिणाम ५१९
पक्षकल्पना ३६१–६२
पक्षसंघटक ३६०–७५
पक्षसंघटना २५
पाश्चिमात्य सिद्धांताचा फोलपणा ८०
पुनः प्रबोधनाने सामाजिक प्रश्नांचा विचार ५७–५८
प्रवास ३९–४०
प्रसिद्धीपराङ्मुखता २
बहुपक्षीय राजकारण ३६९–७१
भांडवलासंबंधी भारतीय व पाश्चात्य समस्या ५३१–३२
भारतातील करपद्धती, ५४३–४४
भारतातील नियोजन ५४८–५०
भारतीय अर्थकारणाच्या पाच संकल्पना ४१७
भारतीय घटना ७१
भारतीय परिभाषेचा उपयोग ३४८-४९
भाववाढ व वेतनवाढ ५४३
भाववाढीचे भयानक दुष्परिणाम ५३६
भाववाढीवर उपाय ५४२–४३
भाषाविषयक मत ४३६
भूस्वामी कृषी पद्धती ४९१
मजुरांना कारखान्याच्या अधिकारात सहभागी ५११
मजूर संघटना मार्गदर्शक तत्त्वे ३७३–७४
मतांसाठी सौदा नाही ४६२
मानवतावादी ४०८
मानववादाविषयी विचार ४८०
मुंबई भाषणमाला–समारोप २९१
मूलगामी चिंतक १७०
'मृत्यूनंतर स्मारक नको' ४०
मृत्योत्तर जागतिक घटना ४५
मोठे उद्योगधंदे सोयीचे नसण्याची कारणे ४९७–९८
योगाचे आचरण २९०–९१
राजकारण राष्ट्रासाठी ४२८
राजकीय जीवन, व्यक्तित्व व विचार-धारा, स्फूर्तिस्थान ४३१
राजकीय पक्ष व जनता संबंध ४२८
राजकीय पक्षाची दोन अंगे ३६७
राजकीय पक्षांशी सख्यत्वाचे संबंध ४१५
राजकीय पुढारी ४८–४९
राजकीय विचार ४१८
राजकीय श्रद्धा राष्ट्रवाद व लोकशाही ४१९
राजकीय क्षेत्रांतील कर्तृत्व १७१
राष्ट्रजीवनाची दिशा ४६९–७१
राष्ट्रधर्म मासिकाचे काम ६, १३०
राष्ट्रवादी राजकारणाचे तत्त्वचिंतक ४०७–२३
राष्ट्राचे सैनिकीकरण ३९१–९२

रुपयाचे अवमूल्यन ५१६, ५३४, ५३५
लघुयंत्राधिष्ठित उत्पादनपद्धती ५०३, ५०६
लघुयंत्राधिष्ठित, विकेंद्रित अर्थव्यवस्था ४७३–७४
लक्ष्य–ज्ञानोत्तर भक्तिपूर्वक कर्मयोग ६
लेख, ग्रंथ ५, ३८, १२९
लोकशाहीचे कट्टे पुरस्कर्ते २६
व केन्स ५३
व गांधी (ग्रामोद्योग) ५०३
व गुरुजी ९, १०, १२
व लोहिया (ग्रामोद्योग) ५०३
व संघ ४२१
व हिंदु परंपरा १२१
वर्णव्यवस्था २६८–७०
वस्तू व उत्पादन उपभोग ४६७
वारसा ४२४–३२
वारसा – शुद्धाचरणाचा व नव्या राजकीय संस्कृतीचा ४२४
विकेंद्रित अर्थव्यवस्था ४७६, ४७७, ५०६
विचार ७३, ७४, ७७, ३५९
विदेशी मदतीची आस व परावलंबनाचा फास ५२८
विषयक ग्रंथ ३१
वैचारिक पार्श्वभूमी ३२४–२५
वैचारिक शोध ३४६–४७
व्यक्तिगत जीवन ६
व्यक्तित्व – संघ संस्कारांतून ३१२
व्यक्तिस्वातंत्र्य व हुकूमशाही समन्वय हवा २९९
व्यक्ती आणि समाज संबंध ३६
शत्रुव्याप्त प्रदेश ३९१
शिस्तबद्ध पक्ष शिस्तबद्ध राष्ट्र ४२२–२३
शेतमालाचे भाव ४९४–९५
शेती-उद्योगाने बेकारी निवारण ४८५–८७
शेती – कसेल त्याची जमीन तत्त्व ४९३
शेती – गोवंश रक्षा व नांगर यास प्राधान्य ४९१
शेतीचे प्रश्न ३८१–८३
शेती जमिनीचे वाटप ४९२–९३
शेतीस प्राधान्य ४८६
श्रमाची प्रतिष्ठा जपणारी अर्थरचना ४६९
श्रेष्ठ विचारक ५९–६३
संक्रमणकालीन राजनीती ४२९–३०
संघघटना लिपिबद्ध ८
संघप्रचारक ५
संघविचाराचे प्रतीक ३१३
संघसंकल्पनांची चौकट ३१२–१३
संघसिद्धांताप्रमाणे वर्तन ३५
संघाची स्वातंत्र्योत्तर ध्येयधोरणे २९८–९९
संघाच्या मुशीत घडलेले नेतृत्व २९६
सत्ता संक्रमणाच्या दोन पायऱ्या ३९९–४००
संपत्ती – विश्वस्त कल्पना ४५२
संयमित उपभोग ४५२, ४५९, ४६५–६६
संपर्कातील व्यक्ती ४९–५०
समष्टिजीवन २३७–३८
समाजशास्त्रीय विचारसरणी ३५०–५१
संमिश्र मंत्रिमंडळे ४००, ४०३ ४०४, ४२९–३०
सहकारी ३०
सहकारी शेती ३८०–८१
साध्य-साधन-विवेक ४४२–४४
सामान्य मनुष्य हे आराध्य दैवत ४२७
सेक्युलॅरिझम १७
सेवा सहकारी संस्थाची कल्पना ४९१–९२
स्वयंसेवक - नैरोबी येथील भाषण ३०५
स्वातंत्र्य ही आंतरिक ऊर्मी ३६५
स्वातंत्र्य हे साध्य, नव्हे साधन २९७
हिंदु राष्ट्र – जीवितकार्य १२६
हिंदु राष्ट्रवाद म्हणजेच भारतीय राष्ट्रवाद २२

हिंदु विचार हा सर्वांगीण पुनर्रचनेचा आधार ४२२
हिंदु विचाराचा अंतःस्रोत ३००–०१
हिंदु संघटना कशासाठी ३०२
हिंदु समाजापुढील सामाजिक समस्या, मार्गदर्शकसूत्रे व विशदीकरण ५६–५९
हिंसाचार व आंदोलने ३७७
'दीनदयाळ शोधसंस्थान' २९४
ग्रंथ ३८–३९
'दी न्यू क्लास' १८४
'दी न्यू लेफ्ट' १८४
दुर्गादास ३१५
देव, नरेंद्र ९५
देव, राजेंद्र नारायणसिंग ४९
देव, शंकरराव ३२३
देवधर, वि. ना. तथा विसुभाऊ ४७
देवरस, बाळासाहेब सरसंघचालक, १,२९४
देवरस, भाऊराव १, ३, ८, ३४, ४५, २९४
देवळे ४
देशपांडे, बबनराव ३०
देशपांडे, बा. नी. ११६
देशपांडे, भाऊराव ३०
देशपांडे पु. य. ४९
देशपांडे, वि. घ. ४९
'देशभक्त' (दीनदयाळ) ३४९
देशमुख, नानाजी ३४, २९४, ३६८, ४०४
देशमुख, यादवराव ४
देशिंगकर, गिरी ६०
देसाई, जयंतभाई २८ (टी)
देसाई महादेवभाई ४१
देसाई, मोरारजी १
'दैशिक शास्त्र' (टुलधारिया बद्रिनाथ) ३७, १३१, १६७, ३४६-४८
'दैशिक शास्त्र' व्यक्ति व समाजविषयक भूमिका २३३, २५१
दैशिक शास्त्रकार २००
दोरायस्वामी ४९
द्रविड कळघम् ४९
'द्रविडियन थिअरीज' (अय्यर; एस्. स्वामीनाथन्) ८१
द्राविडियन सिद्धांत ८०, ८१
द्विवेदी, सुरेंद्रनाथ ९५
द्विवेदी सोहनलालजी ५०

धर्म
आणि पंथ २१५–१६
आशय २१३–१४
कर्मकांड २१४
कल्पना १०५
कल्पनेतील विकृतीची मीमांसा २१७–२०
तीन भाग ५५ (टी)
दोन भाग ५५–५६
धारणाशक्ती २४०
व उपासनापद्धती २१५
व प्रार्थनास्थान २१४
व्याख्या २१६
व्युत्पत्ती २१४
धर्मपुरुषार्थ २१३–१५
धर्माधिकारी, दादा १०४
'ध्येयदर्शन' (गुरुजी) ४

'नथिंग बाय चान्स' (बॉक, रिचर्ड) १०६
नंदा गुलझारीलाल १०३
नंदा, वेदप्रकाश ८
नंबुद्रिपाद १८३–८४
नरवणे, विश्वनाथ २८
नरेंद्रजितसिंहजी २
नवरोजी फरदूनजी १०२
नॅशनल एन्व्हायर्मेंटल एंजिनियरिंग रिसर्च इन्स्टिटचूट ८०
नॅशनल कॉन्फरन्स विद्यार्थी नेते १३८–३९
नॅशनल डेमोक्रॅटिक पार्टी सदस्य ४९
नॅशनॅलिझम, इट्स मीनिंग (स्नायडर एल्. एल्.) ८५
नाईक, शाम २९४
नायडू, रंगय्या १०२
नायर, एन्. आर्. गोपाळकृष्णन् ८३
नायर, कुलदीप ६०
नारंग, गोकुळचंद ४९

नित्शे ४१, ९४
नियोगी कमिटी ९
नियोजन केंद्रिभूत अर्थरचना ४७९
निवेदिता, भगिनी १९, २९, ९४, १०५
निसर्गसुष्टी
भारतीय संस्कृतीची दृष्टी २७६–७७
निळा झेंडा पक्ष १४२
नूलकर, के. एस्. १०२
नेने, वि. वा. ४६, ६९, ६८, २९४
ग्रंथ ४६
नेपोलियन २५ (टी), ३६,४१,४९ (टी)
नेहरू जवाहरलाल
१०, ४०, ७३, ७५, १०३, १५१ –
५२, १५४, १९२, ३१४, ३१६,
३२४, ३२६, ३४१–४२, ३६०–६१,
३७२, ३७८, ४१९, ४७५, ४८३,
५१५, ५२०
गट ३२३
नीति जातीयवाद व मुसलमानांबद्दल
नरमाई ही वैशिष्ट्ये ४२१
लियाकत करार ३२७
हिंदु व हिंदुत्वाविषयी भूमिका ३१५
नैसर्गिक संपत्ती व मानव २७३
नौरोजी, दादाभाई ९३, १०२, ३१४
'न्यू इकॉनॉमिक्स ऑफ. ग्रोथ'
(मेलॉर, जॉन ४८६)
न्यू परस्पेक्टिव्ह ऑफ इंडस
सिव्हिलायझेशन (लाल, वी. पी.)
न्यूयॉर्क टाईम्स ८२, ४८४
न्यू. राईट मूव्हमेंट ९४ (टी)
'न्यू लेफ्ट' (सार्त्र व मार्क्यूज, हर्बर्ट) १००
न्यू लेफ्ट आंदोलन ९४ (टी)
(दि) न्यू सोव्हिएट सायकिक डिस्कव्हरीज
(ग्रिस व डिक) ११३

पटवर्धन, अच्युत ९५
पटवर्धन, अण्णासाहेब २१
पटवर्धन अप्पासाहेब १०४
पटवर्धन, प्रभाकर १६७
पटवर्धन, वसंतराव ५२३
पटेल, वल्लभभाई
३३, ४१, १०३, ३१४–१५,
३२२–२३, ३२६–२७
व नेहरू – काँग्रेस अंतर्गत संघर्ष ३१५
संघ-स्वयंसेवकांना काँग्रेसमध्ये
निमंत्रण ३१५
संघाविषयी भूमिका ३१५
पंडितजी **पहा** दीनदयाळजी
पं. दिनदयाळ उपाध्याय ए
प्रोफाईल (राजे, सुधाकर) ३८ (टी)
पंडित दीनदयाळ उपाध्याय समग्र
(व्यक्ति व विचार) दर्शन ३८, ४६
पंतलू, सुब्बाराव १०२
पँरिटो ९४
पंड्या, विष्णुभाई २८ (टी)
पणशीकर, रा. द. १६७
पंथ व धर्म २१६
पदयाची, व्ही. नूबर्ग सामी ४९
परमार, मिलकसिह ४
परमार्थ, दादा, २१, ३१९, ३२१
परमेश्वरन् पी. २१, २९, ३०
पॅव्हलिटा ११४
पश्चिम जर्मनी
टी. व्ही. वर ब्ल्यू फिल्म ४३८
'पांचजन्य' साप्ताहिक ४, २९७, २९९,
३३४, ३४६–४७, ३५१–५२
पाटील, स. के. १
पायथागोरस ७४
'पायोनियर' लखनौ ३८५
पारीख, सुमंत ३०
पॉल, एडवर्ड ४९
पाल, बिपिनचंद्र ६८–९
८५, १५३
पालकर, नाना ३९
पालखीवाला, नानी २५३
पावगी ४
'पॉवर टु दि पीपल' (डे, एस्. के.) १५६
पाश्चात्य तत्त्वज्ञान : विविध कालखंड
व त्यातील तत्त्वचिंतक लेखक ६०–६२
'पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा इतिहास' जोशी
(गं. ना.) ६१

पाश्चात्य विचारप्रणाली २७८–७९
पाश्चात्य विचारसरणी–वैशिष्ट्ये २७८–७९
पाश्चिमात्य राष्ट्रवादाचा
उदय व पार्श्वभूमी १७५–१७८
समाजजीवन स्पर्धा २३१–३२
सोशल कॉंट्रॅक्ट थिअरी २३३
पास्कल ७४
पिगु ऑर्थर सेसिल ४५४, ४६६
पिले, कनकसभाई ८१
पिले, रामचंद्र ४९
'पी. यू. डी. आर्' ६०
पी. यू. सी. एस् ६०
पीतांबरदास ८
पीपल्स पार्टी (भारतीय जनसंघ) ४, ३२७
पुजारी, प्रभाकर ६३
पुणे सार्वजनिक सभा १०२
पुरंदरे, बाबासाहेब २८
पुरी, राजपाल ८
पुरुषार्थ एकात्मता २२२–२४
परस्पर संबंध २५५
व्याख्या २५५
पुरुषोत्तम त्रिकमदास ९५
'पूरब और पश्चिम' (दीनदयाळजी) २६२
पूर्व पाकिस्तान ९
पेज १५६
पेरॉं ४८३
पेरियर, चेरिल ५२८
पै, नाथ १
पै, सुशीला १०४
पोतदार, द. वा. १०६
पोद्दार, हनुमानप्रसाद ४९
पोप–अधिसत्ता १७५–७६
पोप, अलेक्झांडर १३
ए पोट्रेट ऑफ ए मार्टिर
(मधोक, बलराज) ३२९
पोर्तुगाल, पॅमेला १०६
'पोलिटिकल डायरी' (दीनदयाळजी) ५४७
'पोलिटिकल पार्टीज (रॉबर्ट मिचेल्स) ३१
पोसेल, जी. एल्. ८२
प्रकृति, धर्म व प्रतिकृती (दीनदयाळजी) ३५०–५२
प्रजापरिषद, जम्मू २८ (टी) ४९, ३७८
प्रभुणे, रामशास्त्री १६२
प्रभुदत्त ब्रह्मचारी ४९
प्रार्थनासमाज १०२
'प्रॉस्पेक्टस ऑफ इंडियन डेव्हलप्मेंट (मॅंडेलथम, विलफर्ड) ५२७
प्रिब्रॅम, कार्ल १०८
प्लेफेअर ११५–१६

फडके, सुधीर २८
फतेसिंह, संत १
फॅनॉन, फ्रॅन्झ ७५
फर्ग्युसन, मेरेलिन १०७
फाटक, सिंधुताई १
फॉरिन कोलॅबोरेशन (रिझर्व्ह बँक) ५२१
'फिलॉसॉफी ॲक्शन ऑफ दि आर् एस् एस् फॉर दि हिंदु स्वराज्य १
(एलेन् जिमिझम, ॲंथनी २१)
फिश्चर, लुई १५४
फिश्टे ९४
सोशलिझम ९४
फुलब्राईट ५१५
के बियन समाजवाद १८१
फुल्लर ६२
फैजपूरकर, प्रभाकरराव ३०
फोरियर, चार्लस १७८
फ्रान्सिस, सेंट २९ (टी)
'फ्यूचर शॉक' (टॉयलर, आल्विन) ४४१
फ्यूरियस, चार्लस १८१
फ्रॅंकलिन बेंजामिन ४१
फ्रान्स : विद्यापीठ विद्यार्थी मोर्चा व त्यांची घोषणा ४४४
'फ्रॉम, एरिक ९०
'फ्रॉम कर्झन टु नेहरू'
(दुर्गादास) ३१५ (टी)
'फ्रीडम ऑफ कॉंशन्स इन दि यू. एस्. एस्. आर.'
(बार मिन् कोव्ह) १३५ – ३६

फ्रेंच : पत्रकार ५२८
राज्यक्रान्ती २८०
फ्रेंड्स ऑफ इंडिया कमिटी १३

बँक ऑफ इंडिया ५१४
बॅकुनिन ९३
बॅक्स्टर, ग्रेग ७, ३१, ३९८
'बंच ऑफ थॉट्स' (गुरुजी) १४९–५०
बजाज, जमनालाल ३२१
बडवे, वसंत २८
बॅनर्जी, पी. के. ४
बॅनर्जी, प्रा. ७२
बॅनर्जी, सुभाष ३०
बॅनर्जी, सुरेंद्रनाथ १०२, ३१४
बनियन, जॉन ४७
बर्गसन ९४
बर्नहॅम, जेंम्स ४३५, ४७३
बर्नेट ६०
बर्लिजर, एन्रिच ९८
बसू ७१
बसू, ज्योतिर्मय ४९४
बहुराष्ट्रिय कंपन्या
दबावाचे राजकारण ४३७
बहेल, ओमप्रकाश ८०
बाअर ५१४
बॉक, रिचर्ड १०६
बापट, मधुसूदन ४
बापट, वसंत विनायक २७
बॉबे ॲसोसिएशन १०२
बॉबे प्रेसिडेन्सी ॲसोसिएशन १०२
बायबल ५९, २१६
बॉर, नील्स् १०८
बारमिन्कोव्ह १३५
बॉर्ने, ए. ८८
बिली ३५९
उद्योगसमूह ५०७
बिस्मार्क ९४
बील ७९
बुआजी, सौ. २
बुद्ध, गौतम ३४७–४८, ५३९
बुद्धी : व्यवसायात्मिका १९४, २०८
सुख १९३ – ९५
बुरंगुळे, धनाजी २८
बेकन ५९
बेकर, रॉबर्ट ११२
बेंटॉव्ह, आयझॅक १०६
बेंथॅम ११
बेबी, एस्. के. कंडस्वामी ४९
बेसजी ८१
बोस, आनंदमोहन १०२
बोस, सत्येन ३०
बोस, सुभाषचंद्र २९५–९६, ३१४–१५
बोहम, डेव्हिड १०६
ब्रह्मदेवजी १
ब्रह्मानंद ३
ब्रॉकवे, लॉर्ड फेनर १०३
ब्राह्मोसमाज ९३, १०२
ब्रिटिश इंडियन ॲसोसिएशन इन बेंगॉल १०२
'ब्रेन रिसर्च' (प्रिब्रॅम व ऑर्नस्टोन) १०६
ब्लॅक, लुई १८१
'ब्लड अँड आयर्न' सिद्धांत–बिस्मार्क ९४

भगवति प्रसादजी २, ३
भगवद्गीता ५६, २०१, २५०, २७०
भगवा ध्वज १० (टी) ४०८
भगवानदासजी, लाला ३०
भंजदेव, प्रफुल्लचंद्र ४९
भट, त्र्यंबक २८
भंडारी सुंदरसिंहजी ३, २९४, ४१३, ४२३
भरत १५
भल्ला, रामनाथ ३
भल्लाबंधु ७
भसीन, प्रेम १
भागवत, ज. स. १०४
भाटिया २९४
भांडवल उधळपट्टी ५३८–४४
परकीय प्राप्तीचे तीन प्रकार ५१३

भांडवलशाही ४३५–३६, ४६१
अर्थव्यवस्था सामान्य जनांची उपेक्षा ४५४
अर्थव्यवस्थेतील दुष्परिणाम प्रतिक्रिया- ४३८
भारत
अन्नधान्य आयात योजना ४८३–८५
अर्थकारण राष्ट्रवादी आधारसूत्रे – ४१६–१७
अर्थरचनेची राष्ट्रीय ध्येये ३५८–५९
अर्थव्यवस्थेचे सरकारीकरण ५३०
अर्थव्यवस्थेतील नियोजन ५४६–४७
अर्थव्यवस्थेत विकेंद्रिकरण व स्वदेशी व्रत ५४७
अर्थशास्त्र ३५६
आर्थिक पुनर्रचना ४१६
आणीबाणी ४४
आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहार ५१४
आरक्षण प्रश्न ५७
इंग्रज गेल्यानंतरचे राष्ट्रजीवन १७१
उद्योगधंद्यांना संरक्षण ५२४
एकपक्षीय लोकशाहीचा धोका ३२५
औद्योगिकरणाची दिशा ४९६–५११
औद्योगिकविकासाचे धोरण ५००–०४
कम्युनिस्टांचा राष्ट्रीय प्रवाहाला तडे देण्याचा प्रयत्न ८२
काँग्रेसपूर्व स्वातंत्र्यप्रयत्न, व्यक्ति व संस्था १०२–०४
काँग्रेस शासनाचे निर्णय ३४४
गांधीजींचे नैतिक दडपण ३२५–२६
ग्रामोद्योग स्वरूप ५१०–११
चलनवाढ व उत्पादनशक्ती ५३२
चलनाचे अवमूल्यन ५१५–१९
चार विचार प्रणाली ३२४–२५
चिती २४४
तुटीचे अर्थसंकल्प ५३३
नियोजन
क्रमवारी ४९९–५००
चुकीची दिशा ४९८
व राष्ट्रीय उत्पादन ४९९
निःसंग नेतृत्वाची गरज ४२६–२७
पंचतारांकित संस्कृती व झोपडपट्टी-तील संस्कृती ५२५
परकीय कर्ज ५१८–१९
परकीय खाजगी कंपन्यांशी सहभाग ५२३
परकीय भांडवलाचा सहभाग कंपन्या ५२२
परदेशी गंगाजळी-इतिहास ५१४–१५
पाश्चात्य अर्थशास्त्राचा प्रभाव ३५६–५७
पाश्चात्य उद्योगधंद्याशी कोलॅबोरेशन ५०७–०८
पी. एल्. ४८० कायदा ५१३–१४
खोडा ४८३–८५
प्रशासकीय खर्चाची आकडेवारी ५४१
बौद्धिक गुलामगिरी ८०
मजूर चळवळ ३७३–७४
मार्केटिंग फेडरेशन्स ४९८
मूल्यसिद्धांत व पाश्चात्य मूल्यसिद्धांत ३५६
मोठे उद्योगधंदे सोयीचे नसण्याची कारणे ४९७–९८
राजकीय विचारांचे चार घटक ३२५–२६ राज्यघटना १७, २४२
व पाश्चात्य देशांच्या घटना ७०–७३
राष्ट्रजीवन : चार ध्येयसूत्रे ४२८–२९
राष्ट्रनिर्माण कार्याची परंपरा १४–१५
राष्ट्रीयत्व ८५
रुपयाचे अवमूल्यन ४८३
लोकशाही १८२-८३
आचारधर्म ४२७–२८
व पाश्चात्य विचार ३०३–०४
वामपंथी विचारधारा ९३
विकसित राष्ट्रीय समूहांचा मित्रसंघ ८२–८३
विदेशी गुप्तचर संस्थाच्या कारवाया २७
विदेशी भांडवल व स्वदेशीला ग्रहण ५१२–५२८
शेती आणि पाणी पुरवठा ४८७–८९

शेती प्रधानता-स्वावलंबन हवे ४८२-८३
शेती व पशुधन ४९१
शेतीसाठी खतांचा प्रश्न ४९०–९१
शेतीक्षेत्राला सापत्न वागणूक ४८६-८७
संक्रमण काल ४३०–३१
संघराज्य २४२–४३
समाजवाद ३५४
संविद सरकारे ४४, ४०६
संसद २
पब्लिक अंडरटेकिंग कमिटी ४९४
सांस्कृतिक न्यूनगंड ८०
स्वदेशी आणि विकेंद्रिकरण ४२८–२९
स्वातंत्र्य ४७५
स्वातंत्र्याविषयी आस्था असणारे ब्रिटिश लोक १०३
स्वातंत्र्योत्तर घडामोडी २९५–९६ प्रश्न ९, १२
विकासाची दिशा ४३९–४०
समस्या ४०८–०९
हातमागाचे अर्थकारण ५०१–०२
भारत सेवक समाज १०३
'भारताची अर्थनीती विकासाची नवी दिशा' (दीनदयाळजी) ३५५
'भारताच्या राष्ट्रजीवनाच्या समस्या' (दीनदयाळजी) ३२४
'भारतातील दारिद्र्य' (दांडेकर वि. म.) ५३९
भारती, हरिपद ३०
'भारतीय अर्थनीति' (दीनदयाळजी) २१३, २४८, ४७८, ४८७, ५२२, ५४०, ५४७
'भारतीय अर्थविकासाची दिशा' (दीनदयाळजी) २४७
भारतीय क्रांतीदल ४९
भारतीय जनसंघ **पहा** जनसंघ
भारतीय जनसंघ घोषणा प्रस्ताव ४१०,४१७
'भारतीय जनसंघ घोषणाएँ' ३४०
'भारतीय फाळणीचे गुन्हेगार' (लोहिया राममनोहर) ४११
'भारतीय राष्ट्रधारा का पुण्यप्रभाव' (दीनदयाळजी) ३४६
भारतीय लोक काँग्रेस ४९
भारतीय विचार (तत्त्वज्ञान) ९२
भारतीय विचार साधना संस्था ४६
भारतीय संस्कृती : अर्थनीति ४४२–४८०
अर्थायाम ४४६–४७
उपभोगावर संयमवृत्तीने राष्ट्रीय उत्पन्न वाढ ५३०
चार पुरुषार्थ १७३
जीवनाचा सर्वांगीण विचार ४४०
पाश्यात्य विद्वानांची प्रशंसा १५७–५८
मानवी एकतेचा विचार २८३–८६
वनस्पती सृष्टी २७६–७७
वैशिष्ट्ये २६२
समष्टी ते परमेष्टी २७२–७७
सुखप्राप्तीचा समन्वय १९१
स्त्रीचे आदर्श स्वरूप २६२–६३
'भारतीय संस्कृतीचा अमोल ठेवा' (टॉयन्बी, अर्नाल्ड) अनुवाद नानी पालखीवाला २५३
भार्गव, प्रकाशेदत्तजी १
भावे, विनोबा १०३, १२५, २३९
भिडे, श्रीकृष्ण २८
भिशीकर, चं. प. ४७, १६७
भिसे, आचार्य १०४
भूस्वामी कृषीपद्धती ४९२
भोपटकर, ल. व. ३१६
भोपळे, विष्णू २८

मॅक आयव्हर १५६
मकानास, फेलिसा ११२
मॅकार्ड, विल्यम ५२९–३०, ५३८
मॅक्समुलर, फ्रेडरिक २५३
मॅक्स्वनी, टेरेन्स ७४,
मंगलदास, नाथूबाई १०२
मॅरड्युगल २३९
मॅझिनी २६, ७४
मॅडेलयम, विल्फ्रेड, ५२७
मद्रास द्राविडियन असोसिएशन ८१
मद्रास महाजन सभा १०२

मथुराम ४९
मधोक, बलराज ७, २१, २९४, ३१९–२०, ३२८–२९, ३७९
मध्यभारत : राजकारणी नेते १३८
मध्यवर्ती बँक अधिकार ५३५
मन विकास ९७–९८
सुख १९१–९३
मॅनशॉप्ट ४३८
मनु ११, २०७
'मॅनेजरियल रीव्होल्यूशन' (बर्नहॅम जेम्स) ४७३
'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' (राजवाडे, वि. का.) ४६
मॅरिटेन ८०
मलकानी, के. आर. ८, २१, २९४, ३१७, ३१९–२१
मॅलॉर, जॉन ४८४, ४८६
मसानी मिनू ४९, ७०, ९५
मॅसिच्युटिस इन्स्टिटचूट ऑफ टेक्नॉलॉजी, अमेरिका – अमेरिकेतील भांडवलशाही ४३६
मॅसीव्हेक, अॅनी ४९
मस्कारनीस १०
महम्मद, पैगंबर २१६
महमद, बक्षी गुलाम १
महांकाळ, राजाभाऊ २८
महागुजरात जनता परिषद ४९
'महात्मा' (तेंडुलकर, डी. जी.) ३१४
'महाभारत' ८५, ११३
महोलनोविस ४८५
महालनोविस समिती
उत्पन्नाची फेरतपासणी अहवाल ५२७
महावीर ५३९
महावीर, डॉ. भाई ७
'माईन कांफ' (हिटलर) ४०
माओ त्से तुंग ४०, ९८
माटे, श्री. म. १२२ (टी)
मॉडेल, हेन्री ११२
माथुर, जगदीशप्रसाद ८, २९४, ३९७, ४२४
माधवराव, टी १०३
मानव : उत्क्रांतीची वाटचाल २०४–०५
एकात्म मानव हा दर्शनाचा आदर्श १७४
जीवनलक्ष्य २०० – ०१
जीवनाचा आदर्श १७४
जीवनाचे एकात्म सूत्र सुख १८९–१९९
जुळणी १८७ – ८८
यंत्राची गुलामी ३५४
शृंगापत्तीची अवस्था ४३५ – ३९
सर्वांगीण विचार १७३
सुखसाधना
स्थलाकडून सूक्ष्माकडे २०२ – ०५
ज्ञानी पुरुष ३१०
मानवकेंद्रित विश्वदर्शन ८८
मानवतावाद ८६
ईश्वरकेंद्रित ८८
भौतिकवादी ४४०
युरोपातील ८७
मानवसमाज : चक्रव्यूहात १८६
मानवी एकता
भारतीय संस्कृतीचा विचार २८३–८६
मार्कसचे प्रयत्न २८२
मानवी जीवन
तुकडयातुकडयांनी विचार २८२
प्रगमनशील विकास २८६
भाकरी-सर्वस्व १९२
विकासक्रम २८५
संपत्तीचे प्रयोजन व स्थान ४५०–५१
संस्कारकेंद्रे २८९
'मानवी विचारांचा अंतराळावर होणारा परिणाम (कोसिट्स्की व कोगन) ११४
मानवेतर प्राणिसृष्टी व मानव २७२–७३
मार्क्यूज, हर्बर्ट १००
मार्क्स, कार्ल ४१, ५३–४, ७४, ८२, ८९-९०, ९८–९९, १५३, १७९, २८२, ३५३, ३५६, ४३५–६६, ४५५, ४७९
अतिरिक्त मूल्य ४७३–७४
एलिअनेशन (परात्मभाव) प्रक्रिया ४६३

क्रांतिकारक विचार ४३८
भूमिका १७९–८०
' मार्क्स अँड दीनदयाळ ' प्रबंध ९९
मार्क्सवाद ९८, ९९, ४६९
अर्थविचार ४३८
प्रतिक्रिया १७८–८५
मार्शल ३५६, ४५५, ४६६
मालवीय, मदनमोहन २१, ४९
मिचेस, रॉबर्ट ३१
मित्र, राजेंद्रलाल १०२
मिरासदार, हरिभाऊ ४६
मिर्झा हाजी मस्तान १४२
मिर्डाल, गन्नर ४३५, ४४१, ४८६, ५१०
मिल, जे. एस्. ४३५, ४४१
मिश्र, गिरीशचंद्र ४
मिश्र, द्वारकाप्रसाद ४९
मिश्र, रमेश ३०
मिश्र शाम नारायण ३
' मीच हे संपूर्ण विश्व आहे ' तत्त्व ११०
मीराबेन १०४
मुखर्जी, अमलेंदुप्रसाद ६९
मुखर्जी श्यामाप्रसाद ४, १०, १२, २८, ४९, १३७, १७०, ३२८–२९, ३४१, ३६०, ३७४, ३७८, ३९६, ४१३, ४२३, ५१९–२०
जनसंघ कानपूर अधिवेशनांतील भाषण २२–२३
दिल्ली अधिवेशन भाषण ३३१–३२
मंत्रिमंडळात कुचंबणा ३२६–२७
संघकार्यकर्त्यांशी संपर्क ३२७
मुखर्जी, हिरेन १
मुजुमदार, एन्. ८०
मुजुमदार, चारू १२, १८४,
मुंजे डॉ. २१
मुंजे विजय ४
मुंदडा-प्रकरण ५१६
मुदलियार, ए. कृष्णस्वामी ४९
मुनशी, के. एम्. १,५०, ३१६
मुन्नुस्वामी, व्ही. ४९
मुसलमान १०
अनुनय २१
आणि जनसंघ ३९८
मुसोलिनी ४० ९४, ३५२
मुळे, माधवराव १, ८
मूडी, रेमंड १०८
मेकॉले १४८
मेनन, कृष्ण ५१५
जीप-प्रकरण ५३९
मेलॉर ४३५, ४८६
मेहता, अशोक ५०, ९५
मेहता, आर. एस्. ८०
मेहता, जमनादास ४६
मेहता, नवलभाई १०४
मेहता, फिरोजशहा १०२
मेहता, मनहर ३७४
मेहेरअल्ली, युसूफ ९५
मैंगी, ओमप्रकाश ३०
' मै या हम ' (लिमये विश्वनाथ) २१५
मैत्र, प्रवाल २९४
मोघे, बापुराव ३, २९४
मोडक, अशोक १६७
मोडक, एन्. व्ही. ७९–८०
मोक्ष पुरुषार्थ २२०–२२
म्हाळगी, रामभाऊ ३०

यंग, ऑर्थर १०६, १०८
यंत्र संस्कृति (औद्योगिक संस्कृति) ४६३
भस्मासूर १८५–१८६
युक्लीड ७४
युनियनिस्ट ४९
युरो कम्युनिझम ९८, १८४
युरोप
प्रमुख विचार प्रवाह १७५–८६
प्रॉटेस्टंट १७६
यंत्रयुग १७७–७८
राजसत्ता १७७–७८
राष्ट्रीय चर्च १७६
लोकशाही १७६–७८
व्यक्ति भांडवलशाही
सदनशीर समाजवादी १७८

समाजवाद १७८–१७९
समाजवादी मवाळ १७८–७९
हिप्पींचे वाढते प्रमाण ४३७
होली रोमन एंपायर १७५
युरोपियन एकॉनॉमिक कम्युनिटी ४३८
यू. एस्. ए. एजन्सी फॉर एकॉनॉमिक डेव्हलपमेंट १९७० ५४९
यूल, जॉर्ज डेव्हिड १०३
योधराज, लाला ३२७
योनाज, डॉ. ११५
रंगा, एन्. जी. ४९
रघुवीर, डॉ. ८
रमण, बी. व्ही. ११४
रविशंकर महाराज १०४
रॅव्हिटस, एल्. ११२
रशिया
कम्युनिस्ट क्रांतीतून नवी अर्थव्यवस्था ४६३
व्ल्यू प्रिंट ५३
भारतीय अभौतिक विषयांचे संशोधन क्षेत्र ११३–१५
भारतीय साहित्य व तत्त्वज्ञानविषयी संशोधन ११३–१५
मार्क्सवादी क्रान्ती १८०
वैचारिक इतिहास ६२
साम्यवाद १८४
रसेल ६०
'राइज अँड इन्फ्ल्युअन्स ऑफ रॅशनॅलिझम इन युरोप' (लेकी, एडवर्ड) १३५
(दि) राइज ऑफ सिव्हिलायझेशन इन इंडिया अँड पाकिस्तान (आल्चिन, एफ् आर व बी) ८२
रॉकफेलर ४५८
राघवदास बाबा १०४
'राजकीय दैनंदिनी' (दीनदयाळजी) ३७९
राजकीय पक्ष
कार्यकर्ता आदर्शत्वाची कल्पना ३६३–६४
गुणात्मक दर्जावर भर ३६९
निकोप संबंधाची गरज ४०५
पुढारी ४८–४९
वर्गवारी ३७०
सरकार चालविण्याचे एक साधन ४०५
राजकुमार, ॲडव्होकेट, लखनौ ४
राजगोपालाचार्य, चक्रवर्ती १, ४९, १०३
राजगोपालाचारी, व्ही. ३०
राजनीतीचे उद्दिष्ट ११
राजवाडे, वि. का. ४६, १३५
रॉजर्स, कार्ट ६०, ११२
राजस्थान ३७२
राजा, के. एन्. १३०
राजे, सुधाकर ३८ (टी)
राजेंद्रप्रसाद ७०, १०३, ३१६, ४०५
राजेंद्रसिंहजी ३
राज्य : कल्याणकारी २२७–२८
व्याख्या १३३–३४
राठी, कुंजविहारीलाल ३–४
राधाकृष्णन्, सर्वपल्ली ११३, ११७, १३७ २६२, २६६
रानडे, एकनाथजी ८, ३२२
रानडे (न्यायमूर्ति, म. गो.) ५८, ९३, १०२, ४०८, ४१६
रानडे, मोहन १०
रामकृष्ण परमहंस ४१, २५३, २६४
रामकृष्ण मिशन १०२
रामचंद्र १५, ३०७
रामचंद्रन्, जी. १०४
रामदास (समर्थ) १६, ६२–६३, ३४३, ३६४
रामधियारी २
रामराज्य परिषद ४४, ४९
रामायण ८५, ११३
रामाराव, ए. ८
रॉय, मानवेंद्रनाथ २९५–९६, ३३३, ३५३, ३६६
रॉय, राममोहन ५७, ९०, ९३, ११२
रायरीकर, अ. चिं. ४६
रॉयल कमिशन ऑन सुएझ डिस्पोजल ७९
राव कोटेश्वर ७०

राष्ट्र :
आत्मा चिती २४८
एक देश एक संस्कृति ४२५
कम्युनिस्टांची कल्पना ८३
धर्म चितीच्या अभिव्यक्तीचे नियम २४८
म्हणजे काय ? ३००–३०१
लक्ष्य-चितीचा साक्षात्कार आणि अभिव्यक्ती २५१
शरीर, मन आणि आत्मा २३८
समाजघटकांना जोडणारे टप्पे २४१-४२
'राष्ट्रकारणासाठी राजकारण' (जोग ब. ना.) ३६५
'राष्ट्रचिंतन' (दीनदयाळजी) २५०,, २५९,४६९–७०
'राष्ट्रजीवनाची दिशा' (दीनदयाळजी) १९७–९८, २५२–५३, २७०, ४४९, ४६४, ४६९–७१
राष्ट्रधर्म प्रकाशन संस्था ४, ६,
'राष्ट्रधर्म' मासिक ३२४–२५, ३४६ ३४८–५०
राष्ट्रवाद ३५१
राष्ट्रसेविका समिती ५०
राष्ट्रीय एकात्मता
माध्यम भाषा ४१५–१६
व मुसलमान ४१२–१३
राष्ट्रीयता ६८
रॉस ६०
रिकार्डो ४३५
रिंग, केनेथ १०८
रिझर्व्ह बँक इंडिया ५२१, ५३५
रिपब्लिकन पार्टी ५०, १४२
'(दि) रिफ्लेक्टिव्ह युनिव्हर्स' (यंग, ऑर्थर) १०६
'रिफ्लेक्शन्स अँड व्हायोलन्स' (सोरेल, जॉर्ज) ९४
रिलिजन : म्हणजे धर्म नव्हे २१७
व्युत्पत्ती २१५
रिलेटिव्ह थिअरी १०७
'रिलेशन्स बिटवीन ॲस्ट्रॉनोमी अँड एन्शंट ॲस्ट्रॉलाजी' (बलोघ, बर्ना) ११५
'(ए) रीॲसेसमेंट ऑफ दि थिअरी ऑफ रेसिअल ओरिजिन ॲंथ्रापॉलॉजिकल डेटा' (केनेडी के. ए.) ८१
'रीडिंग्ज इन मार्क्सिस्ट सोसायटी' (वॉटमोर, वूम टाम व गुड पॅट्रीक) ५५
'रूट्स ऑफ कोइन्सिडन्सेस' (कोस्लर) १०६
रूथरफोर्ड, एच्. व्ही. १०३
रूसो ४१, ७४
रेगे कमिटी ९
रेडिओ ॲक्टिव्ह वेस्ट साठचाचा प्रश्न ४५६
रेड्डी, नागी ७०
रेड्डी, (नीलम् संजीव) १
रेने ल्प - आर्थिक मानव ४४९
रेनोवीयर २६
लजपतराय, लाला ३१४
लवंदे, विश्वनाथ २८ (टी)
लाओत्से १६१
लाकडावाला ५२१
लाड, शामराव २८ (टी)
लाल बीबी २
लास्की, हेरल्ड ३१२
लाहिरी रजनीकांत ४
लिंकन ७४
लिप्टन, मायकेल, ४९५
लिमये, मधू १
लिमये, विश्वनाथ २१५, २९४
लिमुरियन कॉंटिनेंट ८१
लियाकत–नेहरू करार ३२७
लुई १४ वा, ४१
लेकी, एडवर्ड १३५
लेनिन ३१, ४०–४१, ५३–५४, ४७९, ५३५
लेले, वापूराव ८, २९४
'(दि) लोअर डेप्थस्' (गॉर्की, मॅक्झिम) ८८
लोकनाथन् ५०६
लोकशाही २६
अमेरिकेची १८२

आचारसंहिता ४१८–१९
भारतातील १८२–८३, ४१९–२०
व समाजवाद १८१, ३५३
स्वराज्य पक्ष ४९
'लोकसत्ता' ३१६
लोकसेवक संघ ४९
लोहिया, राम मनोहर ५०, ९५, ३५२
३६६, ४८०, ५०३
छोटे यंत्र संकल्पना ४१७
दीनदयाळजी संयुक्त पत्रक ४११
ल्यूथर, मार्टिन २९ (टी), ५९
वॅट, जेम्स १८५
वनवासी कल्याण आश्रम २६५
वनस्पतिसृष्टी व मानव
२७२ व २७६–७७
'वर्गकलह की सांसदीय समाजवाद'
(गाडगीळ, पां. वा) ९९
वर्गीज, जॉर्ज ६०
वर्ण व जातिव्यवस्था २६८
वर्णव्यवस्था : मूल्यांकन २७०
व्याख्या २६१
वर्तनवाद १००
वर्मा, शामबहादूर १३
वर्ल्ड वॉच इन्स्टिटचुट, अमेरिका
स्टेट ऑफ दि वर्ल्ड, १९८४, ४५८
वाकणकर, राजाभाऊ २८
वाजपेयी, अटलबिहारी
२, ४, ३४४, ३८१–८२, ३८७
४१२, ४२१
'वॉट इज टु बी डन' (लेनिन) ३१
वॉटमोर, कम टॉम ५५
वॉटसन १८०
वॉज, एलन १०६
वॉल्टेअर ४१, ७४
वाळिबे, रा. शं. ११५
विकल, रामचंद्र १
विकेंद्रिकरण
संकल्पना ४७६ – ७७
विचारक ६०
'विचारधन' (गुरुजी) २०५, २३२
'विचारवीथी' (पराशर) ३९ (टी)
विजयकुमार ३
विंडल्बँड ६०
विनर जेकब ४३५, ४४१, ५१४–१५
विनोद कुमार ३
वियोगी, हरी १०४
विराट ३४६
चितीमुळे जागृत होणारी शक्ती ३५०
'विवेक' साप्ताहिक ३७४
विवेकानंद, ५६, ९३, ११३, २६४, ३५३,
विश्व : पसारा ५८८
विश्वहिंदु परिषद २६५
विश्वेश्वरय्या १०३
विहारी, कृष्ण ३
वीर राघवचारियर १०२
वीरेनभाई ३
'वुई आर वन वुइथ नेचर' सिद्धांत १११
वुल्फ, फ्रेड अॅलन १०६, १११
वेडरबर्न विलियम १०३
वेद ११३
वेदन्यास, ई ११४ – १५
वेब आल्फ्रेड १०३
वैद्य, गुरुदत्त ७
वैद्य शांताराम २८
वैज्ञानिक तत्त्वज्ञ : पाश्चात्य व पौर्वात्य १५९
व्यंकटराव, एम्. ए. ३०
व्यक्ति :
अर्थ पुरुषार्थ २०८–११, २४५
आणि समाज २२९–३६, ३०२–०३
आणि परंपरा २२५–२८
कर्मवृत्ति २०७
कामपुरुषार्थ २०६, २०८
गृहस्थाश्रम २६१–६४
चतुर्विध पुरुषार्थ २०६–१२
चतुर्विध सुख १८७, २०५
धर्म २१९–२२०
ब्रह्मचर्याश्रम २६०–६१
म्हणजे काय? २०७
संन्यासाश्रम आणि
वानप्रस्थाश्रम २६४–६६

संन्यासी जीवन २६५
समाजात विलीन झालेले व्यक्तित्व ३०९
सुप्त गुणांचा आविष्कार, विकास समाजामुळे २३४–३५
स्वातंत्र्य २२६
व्यक्ति व समष्टी १७३
परस्परपूरक आश्रम २६६–६७
परस्परसंबंधाचे घटक २५५–२५७
पुरुषार्थांचे अन्योन्य परस्पर संबंध २५५–५९
वर्णव्यवस्था २६७–७१
व्यास, बच्छराज ८, १२
'व्हाय पुअर पीपल स्टे पुअर-ए स्टडी ऑफ अर्बन बायस इन वर्ल्ड डेव्हलपमेंट' (लिप्टन, मायकेल) ४९५
'व्हॉलंटरी सिम्प्लिसिटी मुव्हमेंट' १०६–०७
व्हेअर, के. सी. ७२
व्हेनेज्युवेल ४८२
व्हेव्लेन ४३५

शंकर, आर. ४९
शंकराचार्य २६४, ३४७–४८
धर्मसंजीवन २४७–४८
नेतृत्व गुण २९
समन्वयवृत्ती ३४८
'शंकराचार्य व गौतमबुद्ध' (दीनदयाळजी) ३४८
शर्मा, कृष्णदत्त ३
शर्मा, टेकचंद ३०
शर्मा, महेशचंद्र २९४
शर्मा, मौलिचंद्र ७, ३७२
शर्मा, सौमित्री ३०
शालवाले, राम गोपाळ १
शासन समाजवादी २२७–२८
शास्त्री, टी. व्ही. आर. १५३
शास्त्री, नंदलाल ४९
शास्त्री, रघुवीरसिंह १
शास्त्री, लालबहादुर ५०, ४८५, ५१६
शास्त्री, वेंकटराम ३१, ३१८
शिवदयाल ३
शिवाजी : अभिषेक प्रसंग १६
शुक्ल, चुनीलालजी २, ३
शुक्ल, नारायण ३
शुक्ल, प्रभुदयालजी २, ३
शुक्ल, भानुप्रताप ३८, २९४
शुक्ल, राधारमणजी ३
शुम्पिटर, जोसेफ ९२
शुमाकर ४४४, ४५७, ४६०, ४६६
शेख, अबदुल्ला ४१३
शेट्टी, वरदराज ३०
शेती आणि स्वावलंबन ४८१–९५
इंधन समस्या ४५७
उत्पादन
वितरणाभिमुख ४६८
उद्दिष्ट सामाजिक गरजांची परिपूर्ति ४६८
नैसर्गिक संपत्ती अमेरिकेची उधळपट्टी ४३६
नैसर्गिक साधनसामुग्री ४५५–५९
शेल्डरेक, रूपर्ट १०८
शोनफील्ड ५०६
शोषितदल, बिहार ४९
श्योचरणसिंह ४
श्रोडर, लिन ११४

सर्कलिग ७९
सक्सेना, सतीश ४
संघ ८, ५८, १२१, २२३, २८९, २९६, ३१६, ३६४, ३७३, ४०७, ४१४
अंतःप्रेरणेने राष्ट्रसेवा ३०६–०७
अनुशासनबद्ध जीवन ३०८
आदर्श स्वयंसेवक ३०५
एकात्मवाद ३०२
कर्तव्याची प्रेरणा ३०४–०५
कर्मरत जीवन ३०७
कानपूर शाखा ३
कार्यकर्ता गुण ३१०–११
गांधी वधोत्तर ससेहोलपट ३१६–१७
चिरंतन स्वयंसेवकत्व ३०५
निरहंकारी स्वभाव ३०९
परिवर्तन हवे २९६–९८

बौद्धिकवर्ग, राजस्थान ३०२
भूमि माता ३०७
मधुर वाणी व स्नेह ३११–१२
राजकारणाविषयी तात्विक भूमिका ३२२
राजकीय पक्षाचे स्वरूप ३१८–१९
राष्ट्र व राज्य समन्वय १२
व काँग्रेस ३१७–१८
व जनसंघ ३१–३२
व भारतातील राजकीय पक्ष ३२१
व राजकारणी ३२१–२२
विचारांची परिभाषा ३१३
विचारांचे बीज २९५, ३१३
वैचारिक कुल ३२४–२५
वैचारिक पार्श्वभूमी ३२४–२५
व्यक्ती व समाजविषयक भूमिका ३०२–०३
शिबीर, डोडाबल्लापूर १६
शुद्ध चारित्र्य ३०६
सत्याग्रह ३१६
स्वयंसेवक देशभक्त ३१५
स्वयंसेवकांना काँग्रेसमध्ये पटेलांचे नियंत्रण ३१५
स्वयंसेवक मनःस्थिती ३३
स्वयंसेवक व्यक्तित्व समाजात विलीन ३०९
स्वातंत्र्योत्तर ध्येय २९८–९९
हिंदुत्वाचा बीजविचार ३१८
संघअधिकारी शिक्षणवर्ग ३०२
'संघर्शातून जीवन विकास' (दीनदयाळ) २७९
सन्यत्सेन, मॅडम ४१
संपूर्णानंद ३८, ५०, ३१६, ३४२
सप्रू, तेजबहादूर १०२
सॅबॉय, मिचेल १०८
समष्टी : अर्थ २४४–२४९
अर्थ पुरुषार्थ २४५–४९
आश्रम व्यवस्था २६०
कामपुरुषार्थ २४९–५१
ते परमेष्टी २७२–७७
धर्म २१९, २४०–४४
पुरुषार्थ २३७, २४४
मुक्तिकल्पना २५२–५३
मोक्ष पुरुषार्थ २५१–५४
परस्परपूरक आश्रम २६६–६७
वर्णव्यवस्था २६०, २६७–७१
विचार २२५–३६
समाज : जीवन २३८
निर्मिती २२९–३०
व व्यक्ती श्रेष्ठ कोण २३०–३१
समाजवाद : मार्क्सप्रणीत सूत्र १७९
व लोकशाही १८१
शासनविरहित वर्गविरहित समाज १८०
समाजवाद व भांडवलशाही (पिगू. ऑर्थर) ४६६
समाजवादी पक्ष ९६–९७, २९६
'समूह मन' मॅगड्गलचे मत २३९
'समृद्धीचा शाप' (सहस्रबुद्धे, पु. ग.) २८७
संयुक्त महाराष्ट्र समिती ४९
संयुक्त राष्ट्रसंघ ४५८
सरलाबेन १०४
सरहदी, सरदार अजितसिंग ४९
सर्वदलीय गोरक्षा महाभियान समिती ५०
सर्वोदयवाद ४७७
सहस्रबुद्धे, अण्णासाहेब १०४
सहस्रबुद्धे, पु. ग. १३५, २२७
सहस्रबुद्धे, भय्याजी ३
साखरलॉबी ऑन मनी प्रकरण ५३९
सातवळेकर, पंडित ३
सादिक, गुलाम महमद १
'साधना' साप्ताहिक ३७७–७८
सानेगुरुजी १०४
साने, वाळकृष्ण २८
'सामंजस्यपूर्ण सामाजव्यवस्था' (दीनदयाळजी) २६९–७०
साम्यवाद : आंतरराष्ट्रीय संबंध १८४–८५
दारुण अपयश १८३–८५
व समाजवाद ४३५

साम्यवादी अर्थरचना
राज्यव्यवस्थेकडे ४३८
सामान्य जनांची अवहेलना, ४३९, ४५४
'सायकल ऑफ हेवन' (प्लेफेअर व हिल स्कॉट) ११५–१६
सायकिकल हीलर्स ११२
सायमन, सेंट ८९, १७८
सार्त्र १००
सार्वजनिक काका १०२
सार्वजनिक पुढारी – वर्गीकरण १४
सार्वजनिक संस्था : आर्थिक व्यवहार २७
सावरकर, वि. दा. स्वातंत्र्यवीर ५२, ५३, ५९, (टी) १५५, १९५, २९५, ३१६
सावरगावकर, राजाभाऊ ४
सावळापूरकर, पां. कृ. १६७
सिंडिकॅलिझम ९४
सितारी, प्रभाकर २८ (टी)
सिंद्री खत कारखाना ५२०
सिद्धान्त व धोरण 'दीनदयाळजी ५६-५९
सिन्हा, महामायाप्रसाद ४९
सिन्हा, सच्चिदानंद ७०
सिन्हा, सत्यव्रत ३
'सिस्टिम व्हयू ऑफ लाइफ (कॅपरा) ११७–१९
सीझर, ज्युलिअस ४१
सीसन, जोसेफीना ११२
सुकळीकर, सुमतीबाई ३०
सुख : एकांगी कल्पना १८९–९१
भौतिक १९०
विषयोपभोग १९०
शरीरसुख सर्वस्व नव्हे १९१
सुझुकी, डी. टी. ११७
सुदरेशन, बी. बी. ८०
सुशीलकुमार ४९
सूर्य भारतीय संस्कृतीत स्थान २७६–७७
'सेक्युलर व्हॅल्यूज फॉर सेक्युलर इंडिया (चटर्जी, पी. सी.) १६
सेक्युलॅरिझम १६–१७
सेंटर फॉर दि स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटी ६०
सेंटर फॉर पॉलिसीरिसर्च ६०
सेठ, डी. एल्. ६०
सेनगुप्ता, भवानी ६०
सोमण हेमंत २८ व २८ (टी)
सोरन्सेन. लॉर्ड १०३
सोरेल, जॉर्जेस ९४
'सोशल अँड पोलिटिकल आयडियाज ऑफ विपिनचंद्र पाल (मुखर्जी, अमलेंदुप्रसाद) ६९
सोशल कॉन्फरन्स १०२
सोशिअॅलिझम ५०
सोशिअॅलिझम व्हर्सेस कॅपिटॅलिझम (पिगु) ४५४
सोशिअॅलिस्ट हयूमॅनिझम (फ्रॉम, एॅरिक) ९०
सोहनसिंहजी १
सोहनी, बापूसाहेब
स्क्रोएंडिजर ११०
स्टॅन्फ्रोर्ड रिसर्च इन्टिटयुट अमेरीका १०६
संयमित उपभोग विचारसरणीचा प्रयोग ४६६
स्टॅलिन ९७, १५८, ३५२
स्टॉकिग दि वाइल्ड पेंडयुलम(बेटॉव्ह)१०६
'स्टेट ऑफ दि वर्ल्ड १९८४'
वर्ल्ड वॉच इन्टिटयूट अमेरिका ४५८
स्टेटस्मन कलकत्ता
जालंधर अधिवेशन ३८४
स्टेस ६०
स्त्री : भारतीय संस्कृतीतील आदर्श स्वरूप २६३
स्नायडर, एल्, एल्. ८५
'स्पेस, टाईम अँड मेडिसिन' (डॉमे, लॅरी) १०६
स्प्रिंग टाईम ऑफ फ्रीडम' (मॅकार्ड, विल्यम) ५३०
'स्मॉल इज ब्युटिफुल' (शुमाकर) ४४४, ४५७
स्मिथ अॅडॅम ४३५, ४५५
स्मिथ, व्ही. ए. ८१

स्वतंत्र पार्टी ४९
'(स्वदेश)' दैनिक ४
' स्वयं विकसनशील कारण ' २१५
स्वराज्य २५१ – ५२
स्वरूप, देवेंद्र २९४
स्वर्णसिंग सरदार १
स्वतंत्र्य ६९
स्वाधीन जनसंघ ४९
स्वाधीनता ६९
स्वान, इन्गो ११२
स्वामी, एन्. आर्. एम्. ४९
स्वामी, शिवमूर्ती ४९
स्वामेश्वर नाथ ३
हॅमिक, मूरे ८१
हरदयाल, लाला २१
' हरप्पयन सिव्हिलायझेशन ' (पोसेल, जी. एल्.) ८२
हॅरिस लुइस संस्था, अमेरिका ४६७
हरी रामजी २
हॉन्सन ४३५
हायझेन बर्ग वर्नर ११७
हायेक, एफ. ए, व्हॉन ५३२
हार्ट ११५
हार्ड, वुल्फगॅड लिऑन ५४
हार्डी, जे. के. १०३
हिक्स ६०
हिटलर २९ (टी), ४०, ९४, ३१२
'हिंदु आक्रमक आहेत,पाश्चात्य सिद्धांत ८०
हिंतुत्व २०. ६९, १२१
हिंदुत्वनिष्ठ नांवे १२९–१३०
हिंदुत्ववाद : जीवन दर्शन ३५५
हिंदुधर्म : कल्पना १०१
पंथ, संप्रदाय २१६
व शास्त्र यावरील आधुनिक साहित्य १०५–०७
हिंदु महामंडळ ४९
हिंदु महासभा २१, ४४, ४९, ३१६,३३०
हिंदु मानसशास्त्र ७०
हिंदु राज्य सभा – नेते १३८
हिंदु राष्ट्र २१–२२
कल्पना व सेक्युलॅरिझम १७
व्ह्यू प्रिंट ५०–५५
विराट जागृत ठेवा ४३१–३२
हिंदुराष्ट्रवाद ३००–३०१
हिंदु व मुसलमान : समूह मन २३९
हिंदु व हिंदुत्व : नेहरूंची भूमिका ३१५
हिंदु संघटन
धर्माधिष्ठित वैभवासाठी ३०२
हिंदु सोशिएलिझम ९२
' हिंदुस्तान टाईम्स ' ३८३, ३८८
हिल, नेपोलियन २५
हिल, स्कॉट ११५-१६
'हिस्टरी ऑफ फिलॉसफी ' (फुल्लर) ६२
हुकुमसिंग, सरदार ४९
हुसेन, झाकीर १, ६६, १०४
हेडगेवार, डॉ. संघसंस्थापक १२१, ३०५, ३१७, ३२१, ३४६
हो चि मिन्ह ४१
होमो फेबर (अल्वारिस, क्लॉड) ७८
' होलनेस अँड दि इम्प्लिकेट ऑर्डर ' (बोहम, डेव्हिड) १०६, ११०
क्षीरसागर, पांडुरंगपंत ८
ज्ञानेश्वरी ३



• • •


REFBK-0024899